# कौमारभृत्यतंत्र

## [ स्त्री–गर्भ–गर्भिणी–सूतिका–विज्ञानासहित ]

लेखिका

**वैद्य निर्मला सदाशिव राजवाडे**

आयुर्विद्यापारंगत

सन्माननीय स्त्रीरोगचिकित्सक– शेठ ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय रुग्णालय, पुणे

आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तमशास्त्री नानल रुग्णालय, कर्वे रोड, पुणे

प्राध्यापक– काश्यप विभाग, लोकमान्य टिळक आयुर्वेदिक महाविद्यालय, पुणे

महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी

वैद्यमित्र प्रकाशन

७०१, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

०३९

# कौमार भृत्यतंत्र ( स्त्री - विज्ञानीय)

लेखिका : वैद्य निर्मला सदाशिव राजवाडे

प्रकाशक : विलास अंधारे,
संचालक - सचिव,
महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,
विधी महाविद्यालय परिसर,
अमरावती मार्ग,
नागपूर - ४४० ००१.

मुद्रक : कल्पना मुद्रणालय
४६१/४, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

पाचवी आवृत्ती : १९९८ ©सर्व हक्क सुरक्षित
किंमत रुपये ३००/-

---

039

# KAUMARBHRUTYATANTRA

## Stree-Garbha -Garbhini - Sutika Vidnyanasahit
by
Vaidya Nirmala Sadashiv Rajwade

Publisher : VILAS ANDHARE,
Director - Secretary,
The Maharashtra Universities Book Production Board, Law College Premises, Amravati Road
Nagpur - 440 001.

Printer : M/s Kalpana Mudranalaya
461/4, Sadashiv Peth, Pune 411030

Fifth Edition : 1998 © All Rights Reserved
Price Rs. 300/-

श्रीशंकर
॥ ॐ ॥

न देवा दण्डमादाय रक्षन्ति पशुपालवत् ॥
यं तु रक्षितुमिच्छन्ति बुद्धया संयोजयन्ति तम् ॥

श्री ॐ श्री

माननीय गुरुवर्य
कै. वैद्यराज श्री. भास्कर विश्वनाथ
उपाख्य मामा गोखले, आयुर्विद्या पारंगत
यांचे सेवेसी विनीतभावाने
प्रेमादरपूर्वक समर्पण

निर्मला स. राजवाडे
नम्र विद्यार्थिनी

# ग्रंथनिर्मिती योजनेविषयी थोडेसे

मातृभाषेतून दिलेले शिक्षण हे जास्त प्रभावी आणि उपयुक्त असते याविषयी आता दुमत होण्याचे कारण नाही. महाराष्ट्रातील महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्यांची संख्या दरसाल वाढत आहे. शिक्षणाचा प्रसार स्वातंत्र्योत्तरकाळात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर झाला आहे. महाराष्ट्रातील दहा विद्यापीठांतील महाविद्यालयांची संख्या बरीच वाढली आहे. या विद्यापीठांतील बहुसंख्य विद्यार्थी मराठी माध्यमातून लिहिण्याच्या सवलतीचा उपयोग करून घेतात. काही विद्यापीठांनी मराठी माध्यमाचा अधिकृतपणे स्वीकारही केला आहे. थोडक्यात, प्रादेशिक माध्यमाच्या विकासाबरोबर प्रादेशिक ग्रंथांची निकड नितान्तपणे भासू लागली आहे. प्रादेशिक भाषेतून ग्रंथनिर्मितीचे प्रमाण वाढले आहे, हे जरी खरे असले तरी आवश्यक त्या विषयावर अधिकारी आणि अनुभवी लेखकांच्याकडून असे लिखाण फार अल्प प्रमाणात झाल्याचे आढळून येते. तसेच काही काही विषय ऐच्छिक स्वरूपाचे असतात. त्यांना विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यामुळे, प्रकाशक अशा विषयांवरील पुस्तके काढण्यास धजावत नाहीत. याचा परिणाम त्या विषयाच्या विकासावर होतो.

प्रादेशिक भाषेचा माध्यम म्हणून वापर मोठ्या प्रमाणावर व्हावा व त्यासाठी आवश्यक साहित्य निर्माण व्हावे या उदात्त हेतूने प्रेरित होऊन केंद्रीय शिक्षण-मंत्रालयाने सर्व राज्यांना या कार्यासाठी भरपूर आर्थिक साहाय्य देऊ केले. प्रादेशिक भाषांतून सर्व विषयांसाठी पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी केंद्राच्या शिक्षण-विभागाने एक स्थूल योजना तयार केली असून, त्या योजनेचा तपशील ठरवून ती अमलात आणण्याचे काम प्रत्येक राज्यातील शासन व विद्यापीठे यांजकडे सोपविले आहे.

महाराष्ट्र राज्याने या योजनेचा स्वीकार करून मराठी माध्यमातून ग्रंथनिर्मिती करण्याच्या उद्दिष्टाने एक स्वतंत्र व स्वायत्त मंडळ स्थापन करण्याचे ठरविले व त्यानुसार १९ मार्च १९६९ रोजी महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाची स्थापना झाली. या मंडळाच्या मध्यवर्ती समितीवर महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू, त्याचप्रमाणे केन्द्रीय शिक्षण विभाग, विद्यापीठ अनुदानमंडळ व महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, यांचे तसेच इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलजीचे एक प्रतिनिधी असे सभासद आहेत.

मध्यवर्ती कार्यालयाची जबाबदारी नागपूर विद्यापीठाने उचलली. प्रत्येक विद्यापीठाने काही विषयांची जबाबदारी उचलावी असे ठरवून विषयांची विभागणी करण्यात आली. आणि या मंडळाच्या कार्याला प्रारंभ झाला.

प्रत्येक विषयासाठी एक ' विषय-समिती ' नेमण्यात आली. या ' विषय-समितीवर ' विद्यापीठातील त्या त्या विषयाच्या आभ्यसमंडळाच्या अध्यक्षांची अथवा विद्यापीठाने सुचविलेल्या प्रतिनिधीची सभासद म्हणून नियुक्ती करण्यात आली. यामुळे निरनिराळ्या विद्यापीठांतील अभ्यासक्रम व त्यांच्या गरजा यांचा साकल्याने विचार होणे सुलभ झाले. प्रत्येक विषय-समिती ह्या पाठ्यपुस्तक निर्मितीच्या कार्यक्रमातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. विद्यापीठात व संलग्न महाविद्यालयांत काम करणारे प्राध्यापक व इतर तज्ज्ञ अनुभवी लेखक व ग्रंथनिर्मितीमंडळ या सर्वांना एकत्र जोडणारा तो महत्त्वाचा दुवा आहे. ग्रंथनिर्मिती मंडळाचे महत्त्वाचे कार्य या विषय-समितीच्या मार्फत सुरू झाले आहे.

आपल्या विषयात सर्व विद्यापीठांत प्रचलित असलेल्या अभ्यासक्रमांचे परिशीलन करून संयुक्त अभ्यासक्रमांचा एक आराखडा तयार करणे, योग्य लेखकांची निवड करणे, लेखनासंबंधी त्यांना मार्गदर्शन करणे, लेखन मुदतीत पुरे करून घेणे, लेखन निर्दोष व्हावे म्हणून त्या विषयांतील तज्ज्ञांची तपासणीसाठी शिफारस करणे इत्यादी महत्त्वाची कामे विषय-समितीकडे सोपविली आहेत.

सिद्ध झालेले ग्रंथ छापून घेऊन प्रकाशित करण्याची व्यवस्था, मंडळाने आता या कामासाठी एक स्वतंत्र प्रकाशन समिती नेमून केलेली आहे.

२४ मार्च १९७४

कार्यकारी अध्यक्ष,
महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ

# प्रास्ताविक

आयुर्वेदाचा प्रचार, प्रसार व प्रतिष्ठा यांच्या मार्गात अनेकविध अडचणी आहेत ही वस्तुस्थिती आता सर्वांनाच विदित आहे.

आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांकडून आयुर्वेदीय विषयांचा अभ्यास उत्तम प्रकारे व्हावा आणि त्यांच्या व्यवसायातही आयुर्वेदाचाच प्राधान्याने अवलंब करण्याची प्रेरणा त्यांना व्हावी हा हेतू साध्य होण्याच्या मार्गात ज्या अनेक गंभीर स्वरूपाच्या अडचणी आहेत त्यांत विषयवारीने रचलेली, मूळ अधिकृत ग्रंथाचे सांगोपांग संकलन करून लिहिलेली व विषय मातृभाषेमध्ये स्पष्ट करून मांडलेली अशी पाठ्यपुस्तके नसणे ही एक मूलभूत अडचण होती. परंतु ती आता ह्या पुस्तकाद्वारे दूर होईल अशी अपेक्षा आहे.

आयुर्वेदासंबंधी ज्या अनेक प्रकारच्या सत्यासत्य कल्पना समाजामध्ये पसरल्या आहेत– ज्यांचा प्रभाव सुशिक्षितांवरही आहे– त्यांचा परिणाम म्हणून असा एक ग्रह रूढ झाला आहे की, आयुर्वेदामध्ये वर्णिलेली औषधे, वनस्पतिकल्प, हे सर्व चांगले आहेत. सर्पगंधेसारखे औषध हे याचे उदाहरण म्हणून सांगता येईल. परंतु व्याधीचे निदान करण्याच्या दृष्टीने आयुर्वेदाचा आजच्या या पुढारलेल्या जगात काय उपयोग आहे? अत्यंत प्रगत जंतुशास्त्र (Bacteriology), शारीरक्रियाशास्त्र (Physiology) विकृतिविज्ञानशास्त्र (Pathology) यांच्या शास्त्रीय प्रगतीमुळे रोगासंबंधीचे वर्गीकरण, विवेचन, विनिश्चय, संप्राप्ती या दृष्टीने किती तरी पटीने सविस्तर वर्णन आज उपलब्ध आहे. ते शुद्ध, शास्त्रीय स्वरूपाचे आहे. रोगपरीक्षेसाठी आवश्यक असलेले क्ष-किरण (X–Ray), आलेखयन्त्र (Cardiogram) काढावयाचे यंत्र, रसाभिनोदनमापकयंत्र (Sphygmomanometer) सूक्ष्मदर्शकयन्त्र (Micros-

cope) व रक्त-मूत्र-मल-निष्ठीवनाच्या परीक्षेच्या रासायनिक प्रतिक्रिया (Blood, urine, stool, etc. examination) इत्यादी साधने उपलब्ध असताना या ना त्या रूपाने "लक्षणैक शरण" असलेला आणि उपलब्ध शब्दप्रामाण्याच्या पलीकडे कोणतेही साधन जवळ नसलेला आयुर्वेद व्याधिविनिश्चयासाठी आजच्या प्रगत शास्त्रीय जगताला काय सांगणार ? हा जो पूर्वग्रह आज बऱ्याच व्यापक प्रमाणावर सुशिक्षितांमध्ये आधुनिक वैद्यकाच्या पुरस्कर्त्यांकडून प्रसृत केला आहे, त्याला सविस्तर उत्तर देण्याचे हे स्थळ नव्हे. कै. डॉ. पां. ल. देशमुख, एम. डी. यांनी लिहिलेल्या लेखातील उताराच उद्धृत केला म्हणजे माझी आयुर्वेदीय निदानाची भूमिका कशी इष्ट व म्हणूनच केवळ उपयुक्त नव्हे तर शास्त्रीयही आहे, हे वाचकांच्या लक्षात येईल.

### डॉ. देशमुख लिहितात—

As if to meet the challange, new diseases like Viral hepatitis, Encephalitis, Industrial diseases etc. are appearing on the horizon and old diseases like Hypertension, Coronary artery disease, diabetes are assuming grimmer appearances. They are causing morbidity on the iscreasing scale and are demanding a progressively greater toll of useful life. Thus, it appears that Nature has a way of striking back at those who grossly try to violate her gaurded secrets. Accent on prophylaxis has increased so much recently that few moments are left for man to enjoy the happiness of positive health so achieved.

The Advancing front of Medicine is bewildering. At least a dozen types of hæmoglobin are now discernible instead of one type known a few years ago. When RH factor was discovered, it was antigen–antibody reactions of blood. Now the RH groups have increased in such enormous numbers that RH typing has not remained the task of a common pathologist but has developed into speciality by itself. So is the case with Viruses. The immunological characters of the adeno-viruses, encephalitis viruses, Coxsackie viruses and others are so varied that in a few more years every virogist will have a virus by his name or by the name of his home town. Then the craze for albumins and globulins of blood associated with various Greek and Latin letters. Similar is the case of products from different fungi. It appears that every discovery instead of simplifying matters, appears to make the confusion worse confunded. Thus, a doubt is Created about the Correctness of approach. One is inclined to pause and think, " Where is this to stop ? "

It may be, perhaps that our approach to the problem is wrong. This consideration makes it necessary to emplore new paths to achieve the end. We are searching and scanning all the world outside man under the microscope, in the laboratory by immunologcial methods, by radio–Isotope technique etc. for the origin of disease, while actually the object of our quest may be inside the man himself. The researches of Hans Selye support such a presumption. He has demonstrated that the diseases are the result of inadequate accomodation to stress, Stress arises when one or more sentiments predominate over the mind upsetting its equilibrium. Thus, the prevention of stress and disease depends upon the maintenance of the balance of the mind.

This approach is understandable only when we consider man as existing in three dimensions. He is an intergrated unit movements. Mind makes and modulates thought. Spirit is the vital force that gleams through the eyes and gives life to the body. Spirit is common to all the objects where life can be conceived. The ultimate aim of man is to understand that this indivisual spirit is the same as the Ever-true, Ever-existing. All pervading powerful force that governs the Universe. The realisation of this unity in the diversity of creation is highest bliss a man can have.

Our ideas about disease need re-orientation. Origin of disease is not outside but inside man. Hence the cure must come from 'inside'. Disease really represents internal struggle for self–expression, self-assertion and ultimate sublimation into the infinite.

—All India Medical Conference,
Cuttack, Souvenir
December 1958, Page 31.

आजच्या या प्रगत जगात राहणारे आणि आधुनिक वैद्यकाचे तज्ज्ञ असलेले लोक एका दृष्टीने आजच्या परीक्षण पद्धतीला आणि रोग-हेतूसंबंधी शास्त्रीय म्हणून मानल्या गेलेल्या सिद्धान्ताला कसे त्रासले आहेत, त्याचे दिग्दर्शन वरील अवतरणावरून कोणालाही होण्यासारखे आहे. डॉ. देशमुखांना पाहिजे असलेला नवा मार्ग किंवा अभिनव दृष्टिकोण चरकाचार्यांइतका जुना आहे. आधुनिकांनी मात्र त्याची उपेक्षा चालविली आहे, याचा खेद वाटतो.

आयुर्वेदाची शास्त्र-लेखन-पद्धतीसंबंधीची प्रतिज्ञा " नाति संक्षेप्य विस्तरम्" अशी आहे. प्रत्येक संस्कर्ता हा " विस्तारयति लेशोक्तं, संक्षिपत्यति—विस्तरम् ।" या आदेशाप्रमाणे ग्रंथलेखन करतो. वस्तुस्थिती व ग्रंथलेखन यांच्या मधला हा " नातिसंक्षेप विस्ताराचा" मध्यममार्ग, विस्ताराच्या वेडाने भारावलेल्या जगताला आश्वासन देणारा ठरेल असा माझा विश्वास आहे. रुग्णाचा व्याधिपरिमोक्ष करणे हे वैद्यकाचे मुख्य प्रयोजन आहे. तेच प्राथमिकही आहे आणि अंतिमही आहे. " व्याधेस्तत्त्वं परिज्ञानम् " या दृष्टीकोणातून केलेला विचार हा खरोखरी साधन आहे, साध्य नव्हे; हा विचार आयुर्वेदीयांनी दृष्टीआड होऊ दिलेला नाही. रोगाचे कारण आत आहे, बाहेर नाही; हा तर आयुर्वेदीयांचा दृढ सिद्धान्त आहे. बहिर्मुख विज्ञानाने या आध्यात्मिक विज्ञानास आपल्या जड विस्ताराच्या बळावर अशास्त्रीय ठरविण्याचा प्रयत्न करण्याचे कारण नाही हे वरील उताऱ्यातील आशयावरून स्पष्ट होईल.

आयुर्वेदीय वाङ्मयाचा अभ्यास उत्तम रीतीने होऊ लागेल, अनेकानेक बुद्धिमान व्यक्ती आत्मीयतेने आयुर्वेदीय संशोधनास वाहून घेतील आणि आयुर्वेदीय व्यवहार व्यापक क्षेत्रात निष्ठेने होऊ लागेल तर प्रत्यक्ष आणि ग्रंथवर्णन यांची संगती लावताना वाटणारी उणीव नाहीशी होण्यास विशेष काळ लागणार नाही, असा माझा विश्वास आहे. दृढ श्रद्धा आहे म्हणा पाहिजे तर. खरोखरीच आयुर्वेद शास्त्राच्या शास्त्रीयतेत उणीव नसून संगती लावण्याच्या प्रयत्नांची व प्रज्ञेची उणीव आहे. निष्ठेची वाण आहे. तसेच साधनांचा अभाव आहे व माणूसबळही पुरेसे नाही. या सर्व उणिवा दूर होतील. आयुर्वेदाचे शास्त्रीयत्व सिद्ध करणे अवघड नाही. दुसरे असे की, एखादे औषध आयुर्वेदीय आहे हे म्हणणे खऱ्या अर्थाने शास्त्रीय नव्हे. ते वापरण्याची विशिष्ट पद्धती आयुर्वेदीय आहे किंवा नाही हे पाहिले पाहिजे. आयुर्वेदाची एक विशिष्ट पद्धती आहे, आणि त्या पद्धतीचा अवलंब करावयाचा तर औषधोपचाराप्रमाणे रोगाचे निदानही आयुर्वेदीय पद्धतीने केलेले असणे आवश्यक आहे. खरे वैद्यक शास्त्र केवळ निदानात किंवा केवळ चिकित्सेत असू शकणार नाही. निदान व चिकित्सा मिळून एक शास्त्र बनते, हे लक्षात ठेवले पाहिजे. आयुर्वेद हे तसे शास्त्र आहे, असा माझा विश्वास आहे. या ग्रंथाच्या वाचनानंतर आयुर्वेदाची निदान करण्याची पद्धती कशी सर्वांगीण, व्यापक, उपयुक्त व म्हणूनच शास्त्रीय आहे, ते लक्षात येण्यास सहाय्य होईल अशी मला आशा वाटते.



आयुर्वेदीय वाङ्मयाचा अभ्यास करण्याची माझी धारणा समन्वयाची आहे. आयुर्वेदाला काही एक विशेष सिद्धान्त सांगावयाचा असून तोच आपापल्या परीने बहुतेक सर्व ग्रंथकारांनी सांगितलेला आहे. निरनिराळ्या अंगांचे प्राधान्य ग्रंथकारांनी स्वीकारले असले तरी 'अन्ध-गजन्याय' त्यांना लावता येणार नाही. या विचाराने मी केवळ शब्दांच्यापेक्षा शब्दांतून व्यक्त होणाऱ्या किंवा व्यक्त होऊ शकणाऱ्या अर्थाचा मागोवा घेत हा ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. एखाद्या वाक्यात व्याकरणदृष्ट्या जरी शब्द व त्याचे रूप महत्त्वाचे असले तरी शब्दातून व्यक्त होणाऱ्या अर्थाचा परस्परसंबंध विचारात घेऊन संकलित बोध काय आहे हे जाणून घेणे जसे महत्त्वाचे असते, तसेच ग्रंथाचेही आहे. यासाठीच ग्रंथाला महावाक्य म्हटले जाते. वाक्याचे जे तीन गुण वा धर्म तेच महावाक्याला म्हणजे ग्रंथाला लागू होत असल्याने ग्रंथातील शब्दरचनेवरून अर्थबोधात विसंगती होऊ नये वा होऊ देऊ नये असे विश्वासपूर्वक वाटते. चरक, सुश्रुत, अष्टांगसंग्रह, अष्टांगहृदय हे ग्रंथ कदाचित भिन्नकाळी भिन्न लेखकांनी संपादिले असतीलही. चरक सुश्रुतापुरते फार तर ते खरे मानता येईल. पण संग्रह व हृदयाच्या रचनेमध्ये तीही शंका येण्याचे कारण नाही. मात्र हे सर्व ग्रंथ सुसंगत सिद्धांतांनी भरलेले व एकाच तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारे आहेत असा माझा विश्वास आहे, व त्या सुसंगतीच्या विश्वासानेच मी हा ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

" कौमारभृत्यतंत्र " हे या ग्रंथाचे नाव हेतुपूर्वक ठेवलेले आहे. आयुर्वेदीय ग्रंथात आयुर्वेदामध्ये समाविष्ट होणाऱ्या विषयांचे ज्या ज्या विभागात वर्गीकरण केलेले आहे, त्या विभागांना "अंग" अशी संज्ञा असून ती आठ आहेत.

" कायबालग्रहोर्ध्वाङ्गशल्यदंष्ट्राजरावृशानष्टौवङ्गानि तस्याहुः ॥ "

या वाग्भटाच्या वचनामध्ये त्यांची नावेही दिलेली आहेत. आयुर्वेदीय ग्रंथात विषयाची विभागणी जरी या आठ अंगांमध्ये केलेली असली तरी विषयवर्णन करताना मात्र सूत्र, शारीर, निदान, चिकित्सा, कल्प, उत्तर, इंद्रिय, विमान अशा नावांच्या वेगवेगळ्या स्थानांमध्ये त्या आठ अंगांचे वर्णन केले जाते.

आज स्त्री-सौतिक आणि बाल असा विषय बहुधा सर्वत्र समुच्चयाने शिकविला जातो ते योग्यच आहे. या विषयांचे चरक, सुश्रुत, वाग्भट या बृहत्त्रयीतील वर्णन पाहू गेले असता ते निरनिराळ्या स्थानांमध्ये समाविष्ट झालेले आढळून येईल. शारीर, निदान, चिकित्सा, सूत्र, उत्तरतन्त्र अशा वेगवेगळ्या स्थानांत हा विषय विभागला गेला आहे. आणि प्राचीन काळातील विषय वर्णन पद्धतीच्या दृष्टीने त्याचे समर्थनही करता येईल.

सध्या विषयवारीने संकलितपणे आयुर्वेदाचा अभ्यास करण्याची पद्धती रूढ झालेली आहे. ग्रंथप्रधानता जाऊन विषयप्रधानता स्वीकारण्याचे लाभही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अनेक आहेत. म्हणून प्रस्तुत विषय हा स्त्री-सौतिक-बाल या पाश्चात्त्यसदृश

संमिश्र नावाने उल्लेखावा की आयुर्वेदीय परिपाठीचा अवलंब करून त्यास कौमारभृत्यतंत्र असे पूर्वाचार्यसंमत नाव द्यावे हा प्रश्न स्वतंत्र दृष्टिकोणातून सोडविताना आयुर्वेदीय परंपरा स्वीकारणे इष्ट ठरवून कौमारभृत्यतंत्र हेच नाव या ग्रंथास दिले आहे.

बालकाशी संबंधित असलेल्या ग्रंथांतर्गत विषयाचा विचार करता गर्भविज्ञानीय आणि बालविज्ञानीय ही दोन प्रकरणे स्पष्टपणेच बालकाशी संबंधित अशी आहेत. गर्भिणी-विज्ञानीय आणि सूतिका-विज्ञानीय या दोन प्रकरणांचाही अर्धाअधिक संबंध बालकाशी येतोच. स्त्रीविज्ञानीय तेवढे बालकाशी संबंध नसलेले असे स्वतंत्र प्रकरण आहे. असा विचार मांडता आला तरी चरकादी ग्रंथकारांनी स्त्री-विज्ञानीयाचा संबंध सु-प्रजननाशी जोडून तेही अगदी साक्षात नसले तरी पण निकटच्या पर्यायाने बालकाशीच संबंधित असल्याचे उल्लेखिलेले आहे आणि म्हणूनच सुश्रुत व त्याचा टीकाकार डल्हण याने योनिव्यापत् या उत्तरतंत्रातील अडतिसाव्या अध्यायाचा "उत्तरतंत्रांतर्गते कौमारभृत्यतंत्रे योनिव्यापद् प्रतिषेधाध्यायोऽष्टत्रिंशत्तमः ।।" असा स्त्रीविज्ञानीयाशी संबंध असलेल्या योनिरोगाध्यायाचा उल्लेख केला आहे. या अध्यायाचा उपक्रम करतानाही डल्हणाने "कुमार, जन्म, विकार कारणत्वाच्च योनिव्यापत् चिकित्सितार्थं प्रतिषेधाध्यायारंभो युज्यते ।" असे म्हटले आहे. तसेच काश्यपसंहितेतही गर्भिणी व सूतिका यांच्याशी संबद्ध असा विषय पुष्कळच आहे. या सर्व विवेचनावरून प्रस्तुत ग्रंथास दिलेले कौमारभृत्यतन्त्र हे नाव कसे शास्त्रशुद्ध आहे ते लक्षात येईल.

हा पाठ्य-ग्रंथ लिहिताना एक विशिष्ट धोरण डोळ्यांपुढे ठेवलेले आहे. विद्यार्थ्यांना सर्व विषय निरनिराळ्या ग्रंथांतून प्राचीन टीकाकारांच्या महत्त्वाच्या टीकेसह संकलितपणे व विषयानुक्रमाने एकत्र पाहावयास मिळावा आणि त्यायोगे विषयाच्या व्याप्तीचे त्यांना पूर्ण आकलन व्हावे हा प्रमुख उद्देश डोळ्यांपुढे ठेवून ग्रंथलेखन केले आहे.

'कौमार-भृत्य-तंत्र' या ग्रंथाची स्त्री-विज्ञानीय, गर्भविज्ञानीय, गर्भिणीविज्ञानीय सूतिकाविज्ञानीय अशी चार प्रकरणे असून पाचव्या प्रकरणात रक्तदाब कसा घ्यावा? रक्त-मूत्र परीक्षण करणे, शस्त्रकर्मे, संततिप्रतिबंधक उपाययोजना, आयुर्वेदातील चिकित्सेचा षड्विधोपक्रम, औषधी पाठ यांचा समावेश केलेला आहे.

पाश्चात्त्य विज्ञानाच्या अभ्यासकास या ग्रंथातील काही वर्णने पाश्चात्त्य विज्ञानातील वर्णनांसारखी वाटतील. पण ती मूळ आयुर्वेदीय ग्रंथास सुसंबद्ध आहेत.

पूर्वाचार्यांची वचने उद्धृत करताना पुनरुक्तीचा दोषही अपरिहार्य म्हणून पत्करला आहे; कारण सारांशाने सर्व ग्रंथकारांचे तात्पर्य एकच असले तरी, लक्षणसमुच्चय, त्यांचा अनुक्रम, व पर्याय शब्द वापरण्यात बहुधा प्रत्येक ग्रंथकाराचे काही वैशिष्ट्य आहे आणि त्यामुळे प्रकरणाचा अर्थ विस्तृत करण्यास काही अंशी सहाय्य होते; हा लाभ मुळीच दुर्लक्षणीय नाही आणि त्या विषयविस्ताराला ग्रंथप्रामाण्याचा



आधार उद्धृत करणेच आवश्यक. म्हणून एकाच विषयावरील निरनिराळ्या ग्रंथकारांची अवतरणे प्रस्तुत ग्रंथात घातली आहेत व त्याखाली अवतरणांचे संदर्भ शक्यतो सविस्तर दिले आहेत. त्यामुळे अभ्यासकांची विशेष सोय होणार आहे. मूळ वचनांचा अनुवाद करताना शब्दनिष्ठा तत्त्वतः स्वीकारली असली तरी भाषांतर शब्दशः करण्याचा आग्रह न धरता विषय समजण्याच्या दृष्टीने सोपे जाईल अशीच वाक्यरचना केली आहे. भाषा शक्यतो सोपी वापरण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण विषयाच्या शास्त्रीयतेमुळ भाषेला क्वचित कोठे काठिण्य आले असेल तर ते स्वाभाविकच मानले जाईल असे वाटते. केवळ अनुवादित लेखन वाचून विषय समजून घेणे शक्य असले तरी मूळ ग्रंथवाचनाकडे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष होणार नाही अशी मांडणी केली आहे. टीकांतील वचनांचा अनुवाद सर्वच ठिकाणी केलेला नाही. मूळ वचनांच्या अर्थव्यक्तीसाठी टीकांचे सहाय्य तेवढे घेतलेले आहे.

ज्या ठिकाणी मूळ वचने दुर्बोध वाटली त्या ठिकाणी आम्ही आमच्या कल्पनेप्रमाणे मूळ वचनांशी शक्यतो सामंजस्य राखून आणि पूर्वापार संबंधाचा सांगोपांग ऊहापोह करून विषयविस्तार केला आहे. त्यामुळे निरनिराळ्या विद्वानांशी मतभेद होण्याची शक्यता बरीच आहे. पण ग्रंथ अतिप्राचीन व तुटलेल्या परंपरा अशा परिस्थितीत प्रत्यक्षाच्या आधारे जेवढे सुसंगत वर्णन वाटले तेवढे केलेले आहे. केलेला अर्थ अधिक चांगल्या सयुक्तिक कारणांनी कोणी चुकीचा ठरविला तर त्यात मला आनंद होणार आहे. कारण या वादातून शेवटी आयुर्वेद शास्त्राचेच वैभव प्रगट होईल.

ग्रंथ लिहिताना आयुर्वेदीय वाङ्मयोक्त-विषयविस्ताराची व्याप्ती थोडीसुद्धा ओलांडली जाणार नाही अशी सावधता कटाक्षाने ठेवली आहे. प्राचीन आयुर्वेदीय ग्रंथ हे निरनिराळ्या ग्रंथकारांनी खंडशः लिहिलेले व सूत्रमय असल्याने आजच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींची विस्ताराने नोंद घेऊन ग्रंथ लिहिण्याच्या पद्धतीची प्राचीन पद्धतीशी वरवरच्या दृष्टीने तुलना करता येणार नाही. परंतु सूत्ररूपाने का होईना विषयाची व्याप्ती कशी सर्वसंग्राहक आहे आणि तत्त्वतः प्रत्यक्षाशी संबंध असलेला कोणताही विषय कसा सुटला नाही हे या सुसंगत मांडलेल्या ग्रंथाच्या स्वरूपावरून स्पष्ट होईल. आणि प्राचीनांच्या विषयज्ञानाचे सादर आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. इतक्या विशाल प्रज्ञेची आजवर आपण कशी उपेक्षा केली तेही ध्यानात घेऊन शास्त्रबुद्धी अध्ययनाभ्यास खंतही वाटल्यावाचून राहणार नाही.

खरोखरच एखाद्या प्रज्ञावान दृष्टकर्मा अशा वैद्याला हवा तेवढा विषयविस्तार करता यावा इतकी सोय प्राचीन आचार्यांनी करून ठेवली आहे. त्याचा फायदा घेऊन या ग्रंथामध्ये मी विषयविस्तार करण्याची दृष्टी ठेवलेली आहे.

या ग्रंथामध्ये एक शब्द एकाच अर्थाने वापरण्याचा प्रयत्न केलेला आहे. जेथे हे शक्य झालेले नाही तेथे कोणत्या वस्तूचा तो बोधक आहे ते चित्ररूपाने दाखविलेले आहे. विषय समजण्यास सुलभ जावा म्हणून जेवढी देता आली तेवढी चित्रे

ग्रंथामध्ये दिली आहेत. विषय डोळ्यांपुढे उभा राहण्यास व लक्षात ठेवण्यास सोपा जावा या हेतूने जवळ प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी पुरेशी कोष्टके दिलेली आहेत.

शरीरातील विविध अवयवांवर केली जाणारी शस्त्रकर्मे, त्या शस्त्रकर्मांना उपयुक्त असणारी यंत्र-शस्त्रादी उपकरणे, शस्त्रकर्मापूर्वी व नंतर करावे लागणारे उपचार यांची माहिती सांगोपांगपणे दीड दोन हजार वर्षांपूर्वीच्या ग्रंथामध्ये आलेली पाहून चिकित्सक मनुष्यही थक्क झाल्याशिवाय राहणार नाही. शस्त्रसाध्य व्याधीवर उपचार करण्यापूर्वी जंतुसंसर्ग टाळण्याच्या दृष्टीने शस्त्रे अग्नितप्त करून घेण्यास सांगितले आहे आणि ते ग्रंथद्वारा जनतेस सादर केले आहे. हे पाहिले म्हणजे आपली शस्त्रे उकळून घेण्याची युक्ती इतरांना ज्ञात होऊ नये म्हणून अत्यंत दक्षता घेणाऱ्या पाश्चात्त्य शस्त्रवैद्यांच्या विचारसरणीतील भिन्नत्व चांगलेच जाणवते. "मत्तः शस्त्रं न बुद्धयति ॥" या वाक्याने काही तरी संमोहनाची आवश्यकता सिद्धांतरूपाने सुश्रुतकाली ज्ञात असल्याचे निश्चित होते. तात्त्विक विचाराच्या दृष्टीने शस्त्रकर्म विचार हा सुश्रुताच्याच मार्गाने जातो आहे असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही. उत्तमोत्तम संमोहन द्रव्यांच्या प्राप्तीमुळे शस्त्रकर्माचे तंत्र कितीही उत्क्रांत झाले असले आणि जंतुनाशकामुळे शस्त्रकर्मोपचार अत्यंत निर्भयपणे करता येत असला तरी ती वाढ शास्त्राच्या तत्त्वज्ञानाची नसून, व्यवहाराच्या कलेची आहे. तिचा आवश्यकतेप्रमाणे अवलंब करण्यास काहीच हरकत नाही. कोणताही बुद्धिवादी माणूस आधुनिक तंत्र स्वीकारू नये असे म्हणणार नाही; परन्तु शास्त्रदृष्टया आपण सुश्रुताचे अत्यंत ऋणी आहोत हे कोणी कधीही विसरता कामा नये. शस्त्रकर्म करावे, व्रणांची काळजी घ्यावी, व्रणामुळे कुरूपता येऊ देऊ नये. व्रण चांगला भरून येण्यासाठी दुसरीकडची त्वचा आणून त्याठिकाणी आरोपित करावी, बद्धगुदोदर व छिद्रोदरासारख्या अत्यंत गंभीर व्याधीमध्ये शस्त्रकर्माने आंत्राचा छेद घेऊन अनिष्ट भाग काढून आंत्राचे सीवन करावे. यासारखी अनेक सिद्धांतार विधाने सुश्रुताने केलेली आहेत. प्रत्येक व्याधीसाठी सुश्रुतांनी सांगितलेले औषधी–उपचारही महत्त्वाचे आहेत. यंत्रशास्त्राची वर्णने तर एखाद्या इंग्रजी ग्रंथाचा संस्कृत अनुवाद वाटावीत इतकी सारखी आहेत. केवळ मराठी भाषांतर प्रसिद्ध केले असते तर पाश्चात्त्यांच्या उसनवारीचा आरोप निश्चितपणे केला गेला असता. सुश्रुत दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेला असल्यामुळे या आरोपापासून सहजच रक्षण झाले आहे.

सदर ग्रंथामध्ये उल्लेखिलेली शस्त्रकर्मे शक्यतो सविस्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. काही ठिकाणी चित्रांच्या सहाय्याने ती अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या त्या शस्त्रकर्मात जी ती यंत्रशस्त्रे घातलेली आहेत.

या ग्रंथात उल्लेखिलेली ग्रंथोक्त चिकित्सा बव्हंशी उपयुक्त आढळली तेवढीच दिलेली आहे आणि सिद्धकल्प व कोष्टकातून उद्धृत केलेले उपचार सांगितले आहेत ते सर्व अनेक वेळा अनुभवलेले असेच आहेत. व्यवहारात चिकित्सा करताना



त्यांना विशेष उपयोग होईल. जे कल्प मी वापरले आहेत त्यांचे पाठही शेवटी उद्धृत केले आहेत. ग्रंथाच्या अभ्यासास अत्यंत उपयुक्त ठरणारी सूचीही या ग्रंथास जोडलेली आहे. अशा रीतीने ग्रंथ अंतर्बाह्य उपयुक्त होईल असा प्रयत्न केलेला आहे. पण याची सत्यता शेवटी तज्ज्ञांच्या अभिप्रायावरच अवलंबून आहे, यात शंका नाही. कालिदासासारखा अलौकिक प्रतिभेने संपन्न असा महाकवीसुद्धा "आ परितोषाद्विदुषां न साधुमन्ये प्रयोगविज्ञानं । बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः ।" असे म्हणतो; मग माझ्यासारखीची गती काय असेल याची सहज कल्पना येईल. काही नवे देण्याच्या अहंकाराने हा ग्रंथ लिहिलेला नसून विद्यार्थ्यांची व शिक्षकांचीही प्रत्यही अनुभवास येणारी अडचण दूर करणे एवढाच प्रधान हेतू या ग्रंथलेखनाच्या मागे आहे. या ग्रंथाचा विषयाच्या अभ्यासापुरताच नव्हे तर पुढे व्यवसायातही पुष्कळ उपयोग होईल अशी निश्चिती वाटते.

—निर्मला सदाशिव राजवाडे

# आभार

आयुर्वेदाच्या अभ्यासाची दिशा ज्यांच्या कृपेने लाभली, ज्यांनी माझ्या ठिकाणी आयुर्वेदाविषयी प्रेमादर आणि निष्ठा निर्माण केली, फार परिश्रमपूर्वक ज्यांनी आमच्याकडून आयुर्वेदाचा अभ्यास करून घेतला आहे त्या कै. गुरुवर्य भास्कर विनायक उपाख्य मामा गोखले यांच्याविषयीची कृतज्ञता शब्दांनी व्यक्त करणे खरोखरीच शक्य नाही.

आयुर्वेदाच्या अभ्यासाचे क्षेत्र रा. शि. मंडळाने निर्मिलेल्या आयुर्वेदीय संस्थांमुळे लाभले. त्यामुळे त्या संस्थेचे आद्यसंस्थापक कै. आयुर्वेदाचार्य गुरुवर्य पुरुषोत्तम-शास्त्री नानल यांचे उपकार मानावे तेवढे थोडेच आहेत.

अध्ययन, अध्यापन व रुग्णोपचार द्वारा आयुर्वेदाच्या अभ्यासाची संधी लाभली यासाठी मी टिळक आयुर्वेदिक महाविद्यालय, ताराचंद रामनाथ आयुर्वेदीय रुग्णालय व नानल रुग्णालय, या संस्थांच्या चालकांची व प्रमुखांची अत्यंत आभारी आहे.

सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे व अखिल भारतीय स्तरावर ज्याचे अध्यापन सुरू होणार आहे, त्या अभ्यासक्रमानुसार "कौमारभृत्यतंत्र" हा ग्रंथ लिहिला आहे. म. वि. ग्रंथ निर्मिती मंडळाने मला "कौमारभृत्यतंत्र" या विषयावर ग्रंथलेखन करण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. वैद्य शकुंतलाबाई देशपांडे यांनी हा ग्रंथ परीक्षण करून दिला त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

वैद्य दुर्गाबाई परांजपे, वैद्य सौ. पुष्पा तुळपुळे, वैद्य सौ. प्रभुगावकर, वैद्य सौ. वझे यांनी ग्रंथाच्या रचनेसंबंधी केलेल्या सूचनांचा ग्रंथ लिहिताना खूप उपयोग झाला.

आम्ही दिलेल्या कल्पनेप्रमाणे अत्यंत आपलेपणाने व तत्परतेने श्री. सुधाकर ग. खाजगीवाले, बी. ए.; जी. डी. (आर्टस्) यांनी ग्रंथातील चित्रे काढून दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

क्ष-किरण प्रतिमांचे फोटो काढून देण्याचे काम वामन अ‍ॅन्ड दस्तुर कंपनीच्या चालकांनी अत्यंत तत्परतेने केले त्याबद्दल त्यांची मी आभारी आहे.

माझ्या सहकारी वैद्य सुधा नरहर सप्रे यांनी तर मला मुद्रणप्रत तयार करण्यापासून पुस्तक छापून तयार होईपर्यंत सर्व प्रकारची मदत केली. त्यांनी ज्या जिव्हाळ्याने आणि आस्थेने हे काम केले; त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजते.

मुद्रितशोधनाचे काम श्री. आबासाहेब सरदेशपांडे यांनी काळजीपूर्वक केल्यामुळे ग्रंथ शक्य तितका शुद्ध छापला जाण्यास मदत झाली. ग्रंथाचे मुद्रण उत्कृष्ट व्हावे आणि ग्रंथ लवकर प्रकाशित व्हावा यासाठी कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे श्री. अ. अं. कुलकर्णी व कल्पना मुद्रणालयाचे श्री. लाटकर यांनी जे श्रम घेतले, जे कौशल्य दाखविले व जी आपुलकीची वागणूक दिली त्यासाठी त्यांना जितके धन्यवाद द्यावेत तेवढे थोडे होतील.

चित्रांचे ठसे खाडिलकर प्रोसेस स्टुडिओचे श्री. खाडिलकर यांनी करून दिल्याबद्दल त्यांनाही धन्यवाद द्यावयास हवेत.

हा ग्रंथ कै. गुरुवर्य वैद्य भा. वि. उपाख्य मामा गोखले यांना अर्पण करण्यास परवानगी दिल्याबद्दल कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे श्री. अ. अं. कुलकर्णी यांची मी अत्यंत आभारी आहे. तसेच अर्पण-पत्रिकेत कै. गुरुवर्य वैद्य भा. वि. उपाख्य मामा गोखले यांचा फोटो छापण्याची कल्पना सुचविल्याबद्दल वैद्य भा. पु. नानल यांना धन्यवाद !

चित्रकारास चित्रांची कल्पना देताना काही इंग्रजी पुस्तकांचा आम्हास काही वेळा फार उपयोग झाला आहे. या सर्व ग्रंथकारांचे आम्ही फार आभारी आहोत.

यातील हारित व काश्यप या संहितांतील अवतरणांमध्ये शुद्धाशुद्धतेच्या दृष्टीने फार संशय आहे.

शेवटी तज्ज्ञांनी ग्रंथासंबंधी उपयुक्त त्या सूचना कराव्या अशी नम्र विनंती करून मी हे आभार पूर्ण करते.

—निर्मला सदाशिव राजवाडे

# अनुक्रमणिका

## प्रकरण पहिले

## स्त्री–विज्ञानीय पृष्ठे १ ते १४३


| | | | |
|---|---|---|---|
| स्त्री-शरीर रचना | १ ते ६ | ऋतुकाल | २९ |
| श्रोणी | ४ | ऋतुमती | ३० |
| अवयव परीक्षा | ७ ते २२ | विकृतिविज्ञान | ३३ ते १३९ |
| १. योनी | ७ | रज:क्षीणता (आर्तवक्षय) | ३४ |
| २. अस्थी | ८ | रजोवृद्धी | ३७ |
| ३. संधी | ९ | रजोदुष्टी | ३८ |
| ४. आशय | ९ | असृग्दर (रक्तप्रदर) | ४३ |
| ५. जरायु | १० | योनिव्यापत् | ५४ |
| ६. पेशी | १२ | रक्तगुल्म | ९७ |
| ७. अन्त:फल | १६ | योनिकंद | १२५ |
| ८. स्तन | १६ | योनिअर्श | १२६ |
| ९. स्रोतस् | १७ | सोमरोग | १२७ |
| १०. धमनी (चेतनी) | १८ | मूत्रातिसार | १३० |
| ११. मर्म | २० | स्तनरोग | १३१ |
| शारीरक्रिया विज्ञान | २२ ते ३२ | स्तनविद्रधी | १३२ |
| स्त्री-शुक्र | २२ | स्तनकीलक | १३५ |
| रज, रक्त, आर्तव | २३ | अर्बुद | १३७ |
| रज:स्वला | २६ | रक्तविद्रधी | १३८ |

## पत्रके : रुग्णपरीक्षापत्रक पृष्ठ १४०

### कोष्टके


१. स्त्री-शरीरात प्रतिमासिक उत्पन्न होणाऱ्या प्राकृत अवस्था ३२
२. असृग्दर (रक्तप्रदर) ५२–५३
३. योनिव्यापत् तौलनिक नामकरण ७४–७५
४. योनिव्यापत् निदान व लक्षणे ७६–७८
५. योनिव्यापत् चिकित्सा ९३–९६
६. रक्तगुल्म—निदानविवेक १२१
७. स्थानपरत्वे गुल्म व त्याची कारणे, लक्षणे, दोषानुबंध आणि चिकित्सा १२२–१२४
८. प्रदर १३१


### प्रकरण दुसरे

## गर्भ-विज्ञानीय पृष्ठे १४४ ते १९४


गर्भसंभव सामग्री १४४
पुरुषबीज (शुक्र) १४५
स्त्री-बीज १४८
गर्भाधान १४९
गर्भहेतू १५०
गर्भहेतूसंबंधी शंका १५१
शंका-समाधान १५२
विविध हेतूंप्रमाणे गर्भभावोत्पत्ती १५३
आत्मस्वरूप १५४
गर्भाकृती १६०
षड्धातुपुरुष १६२
गर्भाची मासानुमासिक वृद्धी १६४
गर्भाचा वर्ण १६९
गर्भाच्या नेत्राचा वर्ण १७०
गर्भाचे आसन १७०
गर्भाच्या अवयवांचा उत्पत्तिक्रम व त्यासंबंधीचा वाद १७४
गर्भाचे पोषण १७६
गर्भोदक १७९
प्रकृती १८१
अनेकापत्यता १८२
गर्भलिंग १८५
गर्भविकृती १८८
गर्भविकृती (आनुवंशिक) १८९


### कोष्टके


१. शुक्र + आर्तव + जीव = गर्भ १३३
२. बालक १७४




### प्रकरण तिसरे

## गर्भिणी-विज्ञानीय पृष्ठे १९५ ते ३४१


सद्योगृहित गर्भिणीची लक्षणे १९५
गर्भलिंग प्राप्तिकाल १९६
पुंसवन विधी १९६
गर्भिणीची व्यक्त लक्षणे १९८
किक्किस २००
मासानुमासिक गर्भिणी परीक्षा २०३
गर्भोपघातकर भाव २०६
गर्भिणी-परिचर्या २१३
गर्भव्यापद् २१६ ते २३५
गर्भस्राव पात २१७
ग्रहबाधेने गर्भिणीवर होणारे परिणाम २१९
गर्भिणी परिचर्या–मासानुमासिक चिकित्सा (योनिगत रक्तस्रावासाठी) २२२
उपविष्टक २२९
नागोदर २३०
लीनगर्भ २३२
मृतगर्भ २३३
गर्भोपद्रव २३५ ते ३२६
१. छर्दी २३७
२. ज्वर २४४
३. शोथ २५३
४. अरुची २६४
५. पांडुरोग (वैवर्ण्य) २६७
६. हृद्रोग २७६
७. श्वास २८४
८. प्रमेह २९४
९. अपस्मार ३०१
१०. अतिसार ३०९
११. काश्यपोक्त गर्भोपद्रव व त्याची चिकित्सा ३११
१. प्रवाहिका ३११
२. रक्तातिसार ३११
३ परिकर्तिका ३११
४. पार्श्वग्रह ३१२
५. मुखपाक ३१२
६. आक्षेपक ३१३
७. शोथ ३१३
८. छर्दी ३१३
९. कामला ३१४
१०. शूल ३१४
११. श्वास व कास ३१५
१२. हिक्का ३१५
१३. मूत्रग्रह ३१५
१४. वातगुल्म योनिगुल्म ३१५
१५. उदावर्त ३१६
१२. योनिसंवरण ३१९
१३. मक्कल्ल ३२१
अतिगर्भोदक ३२६


### कोष्टके


१. ज्वर २४८
२. तमकश्वासी गर्भिणीचा चिकित्साक्रम २९३

३. अपस्मारातील वेगातील चिकित्सा ३०८
४. व्यवच्छेदक निदान अतिगर्भोदक, उदर, अंत:फलस्थ गुल्म ३२८
५. गर्भिणी–परिचर्या ३३०
६. गर्भव्यापद् ३३३
७. गर्भोपद्रव ३३५
पत्रके [ स्त्री–सौतिक बाल ] स्त्री-रोग / गर्भिणी परीक्षा पत्रक ३३९


## प्रकरण चौथे

## सूतिका–विज्ञानीय पृष्ठे ३४२ ते ५१७


सूतिकागार ३४२ ते ३४४
परिचारिका ३४४
सूतिकागार प्रवेश ३४५
प्रसव कालावस्था ३४५ ते ३६२
प्रसव ३४५
१. प्रजायिनी (प्रसवपूर्व अवस्था) ३४६
२. उपस्थित प्रसवा ३५०
आवी ३५३
गर्भोदक ३५६
३. प्रजनयिष्यमाणा ३५६
गर्भसंग ३६२
शस्त्रकर्माने योनिप्रसारण ३६२
अपरा ३६२ ते ३६६
अपरासंग ३६६ ते ३६८
प्रसवोत्तर रक्तस्राव ३६९ ते ३७१
जातमात्र परिचर्या ३७२ ते ३७७
सूतिका परिचर्या ३७७ ते ३८६
मूढ गर्भ ३८७ ते ४२३
अपरादर्शन ४०५
गर्भसंग ४२३ ते ४२६
सूतिका रोग ४२७ ते ४६२
१. ज्वर ४३२
२. शोथ ४४२
३. मक्कल्ल ४४५
४. विद्रधी ४४६
५. योनिक्ष[illegible] ४४७
६. वाताष्ठीला ४४७
स्तन्यविकृती ४६३ ते ४८३
कुमारागार ४८३
स्तनपान ४८९
धात्री ४९०
स्तन्यसंपत् ४९२
स्तनपानाचा काल ४९३
दुधाचे गुण ४९४
बालग्रह ५०४


### कोष्टके


१. आवी व शूल यांतील फरक ३५४
२. गर्भोदक ३५५





३. सूतिकारोग शोथ लक्षणे ४४३
४. सूतिकारोग शोथ चिकित्सा ४४४
५. मासानुमासिक गर्भिणी परिचर्या ४४९ ते ४५२
६. सूतिका परिचर्या ४५३ ते ४५४
७. सूतिका रोग ४५५ ते ४६२


### पत्रके


१. सूतिका-स्त्रीरोग परीक्षापत्रकम् ५०७–५०८
२. विशेष– परीक्षण– प्रसवोत्सुका ५०९
३. विशेष– परीक्षण – सूतिका ५१०
४. विशेष– परीक्षण– स्त्रीरोग ५११
५. सूतिकागृह – प्रवेशित पत्रिका ५१४
६. सूतिकागृह – बालपत्र ५१६


## प्रकरण पाचवे

## रक्तदाब रक्त–मूत्र परीक्षण शस्त्रकर्मे–औषधीपाठ पृष्ठे ५१८ ते ६५५


रक्तदाब घेणे— ५१८
रक्तपरीक्षण करणे— ५२२
मूत्रपरीक्षण करणे— ५२४
१. स्त्री-रोग विषयक शस्त्रकर्मे ५२७–५५६
१. गर्भाशय-मुख दहनकर्म ५२७
२. आर्तववहस्रोतसांचे गर्भाशयमार्ग परीक्षण ५२७
३. गर्भाशय मुख विस्तृतीकरण व गर्भाशय लेखनकर्म ५३२
४. गर्भाशय पुर:प्रवर्तित करणे ५३६
५. गुल्मनिर्हरण ५४२
६. गर्भाशयनिर्हरण ५४७
२. प्रसवकालीन शस्त्रकर्मे ५५६ ते ५८०
१. विटपछेद ५५६
२. गर्भशंकूने गर्भनिर्हरण करणे ५६२
३. वामदेवीय प्रसव ५६७
४. आर्तववाहिनी छेदन वा वंध्यत्वीकरण
संततिप्रतिबंधक उपाय ५८१–६०२
गर्भधारणा ५८१
१. संपूर्ण ब्रह्मचर्य ५८५
२. संभोग घेऊनही गर्भधारणा होऊ न देणे ५८५
१. साधने न वापरता ५८५
२. साधने वापरून संभोग घेणे व गर्भधारणा होऊ न देणे ५८८

३. इतर पद्धती ५९६
१. तात्पुरती संततिप्रतिबंधक योजना
(अ) लूप बसविणे ५९६
(ब) द्रवरूप
२. कायम संतती प्रतिबंधक उपाय शस्त्रकर्मे ५९९
(अ) आर्तववाहिनी छेदन वा वंध्यत्वीकरण ५९९
(ब) शुक्रनाडीकर्तन ६०१
चिकित्साक्रम ६०३ ते ६०७
औषधी पाठ ६०८ ते ६५५


## कोष्टके


१. रक्तदाब ५२०
२. संततिप्रतिबंधक उपाय ५८४
३. सुरक्षित काल ५८७
४. षड्विधोपक्रम ६०४


❋

## आकृत्या


१. अ—स्त्री-श्रोणिः ५
ब—पुरुषोरः ५
२. शकटाकृती-योनिसंपत् ७
३. अस्थि ८
४. आशय-गर्भाशय १०
५. श्यावर्त योनि ११
६. ७ पेशी १३
८. ९. पेशी १४, १५
१०. पेशी १६
११. स्तनसंगत् १७
१२. धमनी (चेतनी) १९
१३. कर्णिनी योनिव्यापत् ६१
१४. अंतर्मुखी योनिव्यापत् ६२
१५. सूचिमुखी योनिव्यापत् ६३
१६. योनिस्रंस ६६
१७. वलय ६६
१८. अंतःफलाचे गुल्म १००
१९. गर्भाशयसंबंधित गुल्म १०१
२०. गर्भाशयसंबंधित गुल्म १०२
२१. गर्भाशयसंबंधित गुल्म १०३
२२. गर्भ आणि गुल्म ११२
२३. योनिकंद १२५
२५. गर्भाचे आसन १७१
२६. गर्भाचे आसन १७१
२७. गर्भाचे पोषण १७७
२८. यमगर्भ १८३
२९. किक्विस २००
३०. नाडी यंत्र (गर्भहृद्स्पंद ऐकण्याकरिता) २०४
३१. कटिरामापन यंत्र २०४
३२. उदरावरून गर्भाचे परीक्षण करीत असताना २०५
३३. उदरावरून गर्भाचे परीक्षण करीत असताना २०५
३४. गर्भहृद्स्पंद ऐकत असताना २०६
३५. गर्भाची आसने २०७
३६. ज्वरमापक यंत्र २४५
३७. अ. स्वस्तिक यंत्र (जीभ पकडण्यासाठी) ३०७
ब. नाडी यंत्र (श्वसन नलिका) ३०७

३८. न्युब्जास्थिती (न्युब्जासन) ३१७
३९. गर्भिणी मक्कल्ल ३२४
४०. गर्भिणी मक्कल्ल ३२५
४१. नाडी यंत्र (गर्भोदक स्तुती करण्याकरिता) ३२९
४२. योनिपरीक्षण (प्रजायिनी) अवस्थेमधील ३४७
४३. कटिर मापने ३४८
४४. कटिर मापने ३४८
४५. कटिराचे प्रकृत व विकृत प्रकार ३४९
४६. प्रसवासन ३५६
४७. १– गर्भशिराचे अंतः परिवर्तन ३५९
४७. २–गर्भशिराचे अंतःपरिवर्तन ३५९
४८. गर्भशिराचे अंतःपरिवर्तन ३६१
४९. गर्भशिराचे अंतःपरिवर्तन ३६१
५०. विटपछेद ३६३
५१. अपरा ३६४
५२. अपरापातन ३६५
५३. अपरासंग ३६७
५४. अपरानिर्हरण ३६८
५५. अपरानिर्हरण ३६९
५६. कफ आचूषण यंत्र ३७२
५७. नालकर्तन ३७४
५८. कील ३९०
५९. प्रतिखुर ३९१
६०. बीजक ३९२
६१. बीजक ३९२
६२. बीजक ३९२
६३. परिघ ३९३
६४. गर्भाच्या गतीचे बाह्यपरिवर्तन ३९४
६५. गर्भाच्या गतीचे बाह्यपरिवर्तन ३९५
६६. गर्भाच्या गतीचे बाह्यपरिवर्तन ३९५
६७. गर्भाची ऊर्ध्वगती ३९७
६८. गर्भाची ऊर्ध्वगती ३९७
६९. गर्भाची ऊर्ध्वगती ३९७
७०. गर्भाची ऊर्ध्वगती ३९८
७१. गर्भाची ऊर्ध्वगती ३९८
७२. बडीशयंत्र ३९८
७३. गर्भाची तिर्यग्गती ३९९
७४. गर्भाची तिर्यग्गती ३९९
७५. गर्भाचे मुखदर्शन ४००
७६. गर्भाची न्यूब्जगती ४००
७७. गर्भाची न्यूब्जगती ४००
७८. उत्तानगर्भ ४०१
७९. उत्तानगर्भाच्या शिराचे अंतःपरिवर्तन ४०२
८०. मुखदर्शनाचा प्रसव होत असताना ४०३
८१. मुखदर्शनोत्पन्न बालकाचा चेहरा ४०४
८२. नालदर्शन ४०४
८३. स्फिकभागाचे अंतःपरिवर्तन ४०५
८४. अपरादर्शन ४०६
८५. अपरादर्शन ४०६
८६. अपरादर्शन ४०७
८७. सकील स्वस्तिक यंत्र (गर्भशिर पकडण्याकरिता) ४०८
८८. व्रीहिमुख स्वस्तिक शस्त्र ४११
८९. गर्भशिराचे भेदन व छेदन ४११
९०. गर्भनिष्क्रमण (छेदन भेदनानंतर) ४१२



९१. ऊर्ध्वगती असलेल्या गर्भाची प्रसवकालीन परिचर्या ४१८
९२. ऊर्ध्वगती असलेल्या गर्भाची प्रसवकालीन परिचर्या ४१९
९३. रक्तदाबमापक ५१९
९४. श्रवण नलिका ५१९
९५. रक्तपरीक्षणाचे साहित्य ५२२
९६. मूत्रपरीक्षण साहित्य ५२४
९७. मूत्रपरीक्षण शर्करामापन ५२५
९८. मूत्रपरीक्षण कफाधिक्य मापन ५२६
९९. द्विताल योनिवीक्षण यंत्र ५२७
१००. बस्ती यंत्र ५२८
१०१. स्वस्तिक यंत्र (पिचू धरण्यासाठी) ५२८
१०२. अर्धनाडी यंत्र ५२८
१०३. कंकमुख स्वस्तिक यंत्र ५२९
१०४. द्विताल यंत्र ५२९
१०५. एषणी ५२९
१०६. नाडीयंत्र ५२९
१०७. सूचिका-भरणाची पिचकारी व सूची ५२९
१०८. श्रवण नलिका ५३०
१०९. आर्तववहस्त्रोतस परीक्षणाचे यंत्र ५३०
११०. आर्तववहस्त्रोतस परीक्षणाचे यंत्र ५३०
१११. नाडीयंत्र ५३३
११२. स्वस्तिक यंत्र ५३३
११३. अर्धनाडीयंत्र ५३३
११४. द्वितालयंत्र ५३४
११४- अ कंकमुख स्वस्तिक यंत्र ५३४
११५. सूचिका-भरणाची पिचकारी व सूची ५३४
११६. एषणी ५३४
११७. शलाका यंत्र ५३४
११८. लेखनशस्त्र ५३५
११९. लेखनशस्त्र ५३५
१२०. लेखनशस्त्र ५३५
१२१. स्वस्तिक यंत्र ५३५
१२२. नाडीयंत्र ५३७
१२३. स्वस्तिक यंत्र ५३७
१२४. संदंशयंत्र ५३७
१२५ वृद्धिपत्र ५३८
१२६. वृद्धिपत्र ५३८
१२७. अनिग्रह संदंश यंत्र ५३८
१२८. सनिग्रह संदंश यंत्र ५३८
१२९. कर्तरी ५३९
१३०. स्वस्तिक यंत्र ५३९
१३१. संदंश स्वस्तिक यंत्र ५३९
१३२. तालयंत्र ५३९
१३३. स्वस्तिक यंत्र ५४०
१३४. स्वस्तिक यंत्र ५४०
१३५. डॉ. शिरोडकर यंत्र ५४०
१३६. स्वस्तिक यंत्र ५४१
१३७. सूचि-वक्र, आयात ५४१
१३८. प्राणिज सूत्र ५४१
१३९. नाडीयंत्र ५४२
१४०. स्वस्तिक यंत्र ५४२
१४१. संदंश यंत्र ५४३
१४२. वृद्धिपत्र ५४३
१४३. वृद्धिपत्र ५४३
१४४. सनिग्रह संदंश यंत्र ५४३
१४५. अनिग्रह संदंश यंत्र ५४४
१४६. स्वस्तिक यंत्र ५४४
१४७. स्वस्तिक यंत्र ५४४
१४८. स्वस्तिक यंत्र ५४४

१४९. तालयंत्र ५४५
१५०. कर्तरी ५४५
१५१. स्वस्तिक यंत्र ५४५
१५२. स्वस्तिक यंत्र ५४६
१५३. प्राणिज सूत्र ५४६
१५४. नाडी यंत्र ५४७
१५५. स्वस्तिक यंत्र ५४७
१५६ संदंश यंत्र ५४८
१५७. वृद्धिपत्र ५४८
१५८. वृद्धिपत्र ५४८
१५९. कर्तरी ५४८
१६०. अनिग्रह संदंश यंत्र ५४९
१६१. सनिग्रह संदंश यंत्र ५४९
१६२. स्वस्तिक यंत्र ५४९
१६३. स्वस्तिक यंत्र ५४९
१६४. स्वस्तिक यंत्र ५५०
१६५. ताल यंत्र ५५०
१६६. स्वस्तिक यंत्र ५५०
१६७. स्वस्तिक यंत्र ५५०
१६८. प्राणिज सूत्र ५५१
१६९. सूचि-वक्र, आयात ५५१
१७०. स्वस्तिक यंत्र ५५२
१७१. नाडी यंत्र ५५२
१७२. नाडी यंत्र ५५२
१७३. ताल यंत्र ५५३
१७४. द्वितात यंत्र ५५३
१७५. कंकमुख स्वस्तिक यंत्र ५५३
१७६. स्वस्तिक यंत्र ५५३
१७७. स्वस्तिक यंत्र ५५४
१७८. स्वस्तिक यंत्र ५५४
१७९. सनिग्रह संदंश यंत्र ५५४
१८०. अनिग्रह संदंश यंत्र ५५४
१८१. वृद्धिपत्र ५५५
१८२. वृद्धिपत्र ५५५
१८३. सूचि-वक्र-आयात ५५५
१८४. प्राणिज सूत्र ५५५
१८५. स्वस्तिक यंत्र ५५६
१८६. संदंश यंत्र ५५७
१८७. सूचिका-भरणाची पिचकारी व सूची ५५७
१८८. वक्र कर्तरी ५५७
१८९. सूचि-वक्र, आयात ५५७
१९०. प्राणिज सूत्र ५५८
१९१. स्वस्तिक यंत्र ५५८
१९२. अनिग्रह संदंश यंत्र ५५८
१९३. सनिग्रह संदंश यंत्र ५५८
१९४. स्वस्तिक यंत्र ५५९
१९५. कर्तरी ५५९
१९६. विटपछेद ५६०
१९७. विटपछेद ५६०
१९८. विटपछेद सीवनकर्म ५६१
१९९. विटपछेद सीवनकर्म ५६१
२००. गर्भशंकू ५६२
२०१. गर्भशंकू लावीत असताना ५६३
२०२. गर्भशंकू लावीत असताना ५६३
२०३. गर्भशंकू लावीत असताना ५६४
२०४. गर्भशंकू लावीत असताना ५६४
२०५. गर्भशंकू लावलेला असताना ५६६
२०६. गर्भशंकू लावलेला असताना ५६६
२०७. नाडी यंत्र ५६७
२०८. स्वस्तिक यंत्र ५६८
२०९. संदंश यंत्र ५६८
२१०. सूचिकाभरणाची पिचकारी व सूची ५६८
२११. वृद्धिपत्र ५६८
२१२. वृद्धिपत्र ५६९



२१३. कर्तरी ५६९
२१४. स्वस्तिकयंत्र ५६९
२१५. स्वस्तिकयंत्र ५६९
२१६. सनिग्रह संदंश यंत्र ५६९
२१७. अनिग्रह संदंशयंत्र ५७०
२१८. स्वस्तिकयंत्र ५७०
२१९. तालयंत्र ५७०
२२०. स्वस्तिकयंत्र ५७१
२२१. सूचि-वक्र, आयात ५७१
२२२. प्राणिज सूत्र ५७१
२२३. वामदेवीय प्रसव ५७२
२२४. वामदेवीय प्रसव ५७२
२२५. वामदेवीय प्रसव ५७३
२२६. स्वस्तिकयंत्र ५७४
२२७. नाडीयंत्र ५७४
२२८. संदंशयंत्र ५७५
२२९. तालयंत्र ५७५
२३०. सनिग्रह संदंशयंत्र ५७५
२३१. अनिग्रह संदंशयंत्र ५७५
२३२. वृद्धिपत्र ५७५
२३३. वृद्धिपत्र ५७६
२३४. स्वस्तिकयंत्र ५७६
२३५. कर्तरी ५७६
२३६. स्वस्तिकयंत्र ५७६
२३७. स्वस्तिकयंत्र ५७७
२३८. सूचि-वक्र-आयात ५७७
२३९. स्वस्तिकयंत्र ५७७
२४०. प्राणिजसूत्र ५७८
२४१. अर्धनाडीयंत्र ५७९
२४२. द्वितात यंत्र ५७०
२४३. कंकमुख स्वस्तिकयंत्र ५७९
२४४. पुरुष इंद्रिये ५८१
२४५. पुरुष इंद्रिये ५८२
२४६. स्त्री इंद्रिये ५८२
२४७. स्त्री इंद्रिये ५८३
२४८. सुरक्षित कालपद्धतीचक्र ५८६
२४९. स्त्री इंद्रिये (फेस गोळी) ५८८
२५०. स्त्री-इंद्रिये (जेली पद्धत) ५८९
२५१. रबरी पिशवी-पद्धती (शीथ, कंडोम) ५९०
२५२. गोल टोपी व जेली ५९२
२५३. गोल टोपी व जेली ५९३
२५४. गोल टोपी व जेली ५९४
२५५. गोल टोपी व जेली ५९४
२५६. गोल टोपी व जेली ५९५
२५७. लूप ५९६
२५८. आर्तववाहिनीछेदन शस्त्रकर्म ६००
२५९. शुक्रनाडीकर्तन शस्त्रकर्म ६०१

❋

सूचना : कृपया आकृती क्रमांक ११४ चे नंतर आकृती क्रमांक १०३ पाहावी.

# १

# स्त्री-विज्ञानीय

॥ श्रीशंकर ॥

अमृतांशुधरं देवं विभुं मृत्युंजयं शिवम् ।
वंदे विनम्रभावेन शश्वल्लोकमहेश्वरम् ॥

समालोच्य च संगृह्य पूर्वाचार्यगिरः शुभाः ।
तंत्रं कौमारभृत्याख्यं नूतनं लिख्यतेऽधुना ॥

कौमारभृत्य हे आयुर्वेदाच्या आठ अंगांपैकी एक महत्त्वाचे अंग असून काश्यप आणि वृद्धजीवक यांनी त्या अंगाचा विचार करण्यासाठी स्वतंत्र ग्रंथ लिहिले आहेत. त्यांतील काश्यपसंहिता ही त्रुटित स्वरूपात अलीकडे उपलब्ध आहे. चरक, सुश्रुत, वाग्भट इत्यादी प्राचीन अधिकृत ग्रंथांतही या विषयाचे विस्तृत वर्णन आढळते. ते सर्व संकलित करून पाहिले असता आयुर्वेदातील हे अंग चांगले उपबृंहित असल्याचे प्रत्ययास येईल.

[१]जे मुळात सूत्ररूपाने थोडक्यात सांगितले आहे, त्याचा विस्तार करावा. ज्याचा विनाकारण अतिविस्तार झाला आहे ते संक्षेपाने सांगावे. नवीन ग्रंथकार या दोन्ही गोष्टींच्या सहाय्याने जुन्या कालबाह्य तंत्राला नवीन स्वरूप प्राप्त करून देतो.

१. विस्तारयति लेशोक्तं संक्षिपत्यतिविस्तरम् ।
संस्कर्ता कुरुते तन्त्रं पुराणं च पुनर्नवम् ॥ च. सि. अ. १२·३६–३७.

[1]अपत्याचे धारण आणि पोषण उत्तम प्रकारे कसे होईल ? यासंबंधीचा विचार कौमारभृत्यतंत्रात केला जातो. तदनुषंगाने माता, तिचे दूध यांचाही विचार यात येतो. आणि विशेषतः बालकांना होणारे 'ग्रहबाधा' या नावाने उल्लेखिले जाणारे व्याधी आणि बालविशिष्ट इतरही रोग यांचे वर्णन याच प्रकरणात समाविष्ट होते.

कौमारभृत्य तंत्राचा विचार करताना प्रथमतः 'स्त्री'चा विचार करणे अवश्य आहे. अपत्याचे धारण गर्भावस्थेत स्त्रीच करते आणि पुढे पोषणाचे कार्यही तिलाच पार पाडावयाचे असते. निसर्गक्रमामध्ये जो स्त्रीत्वाचा विकास झाला त्याचे प्रयोजन अपत्याचे धारण-पोषण हेच होय. हे स्त्रीत्व (स्त्रीविशिष्ट शरीर व शरीरक्रिया) सुस्थितीत असणे प्रथमतः आवश्यक आहे. ते तसे असेल तरच अपत्याचे धारण-पोषण चांगले होण्याची शक्यता असते.

[2]मनुष्यामध्ये स्त्री हीच अपत्याला मुख्य आधार आहे; असा उल्लेख करून मगच चरकाने त्या स्त्रीत्वाचा व तदनुषंगाने गर्भाचा विघात करणारे रोग चिकित्सेसह सांगितले आहेत. आम्हीही कौमारभृत्यतंत्राची मांडणी करताना स्त्रीविशिष्ट शरीर आणि स्त्रीविशिष्ट रोग यांचा प्रथम विचार केला आहे.

[3]स्त्रीचे तिच्या वयाच्या अवस्थेप्रमाणे नग्निका, कन्या, गौरी इत्यादी विभाग केले असले तरी आपल्या प्रस्तुत विवेचनाशी त्या अवस्थांचा विशेष संबंध येत नाही. स्त्रीत्वाचा विकास पूर्ण झाल्यानंतरचे जे वय तेच आपणास येथे अभिप्रेत आहे. रजोदर्शन हेच स्त्रीत्व व्यक्त झाल्याचे दर्शक मानले पाहिजे. हा काल सामान्यतः आपल्या इकडे तरी वयाच्या बाराव्या वर्षानंतर सुरू होतो आणि तो सुमारे वयाच्या ५० वर्षेपर्यंत असतो, असे सुश्रुताने म्हटले आहे.

या स्त्रीत्वाची संपन्नता वयाच्या सोळा वर्षांनंतर प्राप्त होत असल्यामुळे तोच काल गर्भाधानास योग्य मानला आहे. आणि शरीरावयवप्रमाण यांची यथोक्त परिपूर्णता याच कालामध्ये होते असे शास्त्रकार म्हणतात.

१. कौमारभृत्यं नाम कुमारभरणधात्रीक्षीरदोषसंशोधनार्थं ।
दुष्टस्तन्यग्रहसमुत्थानां च व्याधीनां उपशमनार्थम् ॥ सु. सू. १–८ (५)
कुमाराः बालाः तेषां भृतिः धारणं पोषणं च तस्या ।
भृत्या इदं तन्त्रं इति कौमारभृत्यम् ॥ डल्हण टीका सु. सू. १–७

२. अपत्यानां मूलं नार्यः परं नृणां । च. चि. ३०–५

३. "तद् वर्षात् द्वादशात् काले वर्तमानमसृक् पुनः ।
जरापक्वशरीराणां याति पंचाशतः क्षयम् ॥" सु. शा. अ. ३–११



[1]सोळा वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीचा वीस वर्षे पूर्ण झालेल्या पुरुषाशी संयोग झाला तरच आरोग्यसंपन्न पुत्रास (अपत्यास) ती जन्म देते (वा. शा. १–८). पुरुषाची पंचवीस वर्षे पूर्ण झाली आणि स्त्रीची १६ वर्षे पूर्ण झाली म्हणजेच ती दोघे "समत्वागतवीर्य" झाली असे चतुर वैद्याने जाणावे. टीकाकाराने या ठिकाणी "समत्वागतवीर्य" या शब्दाची व्याख्या करताना स्त्री आणि पुरुष यांच्या श्रोणी, उर इत्यादी अवयवांचे आकार-प्रमाण ही केवळ तरुण वयामध्येच परिपूर्ण होतात असे स्पष्टपणे म्हणून त्याच वेळी रसादी सर्व धातूंचीही शरीरामध्ये परिपूर्णता झालेली असते असे सांगितले आहे. यासच मध्यवय असेही कोठे कोठे म्हटलेले आहे. स्त्रीचा तो काळ १२ ते ५० वर्षे वयापर्यंत मानलेला आहे.

प्रत्यक्षामध्ये प्रकृत प्रसवाचे, वयाच्या दृष्टिकोनातून प्रमाण पाहिले असता असे दिसून येते की, १६ ते २० वर्षे या वयातील स्त्रियांच्या प्रथम प्रसवामध्ये प्रकृत प्रसवाचे प्रमाण जास्त सापडते. जवळ जवळ ९० टक्के हे प्रमाण सापडते. याउलट यापुढील वयातील स्त्रियांच्या प्रथम प्रसवामधील प्रकृत प्रसवाचे प्रमाण फारच अल्प सापडते. याच्या कारणांचा विचार केला असता असे दिसून येते की, १६ ते २० वर्षे या वयातील स्त्रियांमध्ये गर्भधारणेचा हा सम्यक् योग असतो; व प्रौढ स्त्रिया म्हणजेच २२ वर्षांच्या पुढील वयात प्रथम गर्भधारणा होणे हा अयोग असतो. आणि प्रौढ वयामध्ये स्त्रियांच्या शरीरामध्ये वाताचे आधिक्य येऊ लागते; त्यामुळे स्त्रीच्या धातूंना रूक्षता व काठिण्य येते. त्यामुळे प्रकृत प्रसवामध्ये अडथळा येतो. याचे अधिक वर्णन 'मूढगर्भ' प्रकरणी येईलच.

प्रकृत प्रसवाप्रमाणेच स्तन्यप्रवर्तनाचाही विचार करीत असता आपल्याला असे दिसून येते की, पूर्ण षोडशवर्षा स्त्रीमध्ये प्रसवानंतर स्तन्योत्पत्ती पुरेशी असते. पण प्रौढ स्त्रियांमध्ये मात्र स्तन्यप्रवर्तन फारच अल्प प्रमाणात सापडते. क्वचित त्याचा अभावही सापडतो.

१. पंचविंशे ततो वर्षे पुमान् नारी तु षोडशे ।
समत्वागतवीर्यौ तौ जानीयात् कुशलो भिषक् ॥ सु. सू. ३५–१३
– रसादिधातुपरिपूर्त्यां वीर्यपूर्तिः, परिपूर्णसर्वधातुकावित्यर्थः । सु. सू. ३५–१३ टीका
– पूर्ण षोडशवर्षा स्त्री पूर्णविंशेन संगता ।
…………वीर्यवंतं सुतं सूते ॥ वा. शा. १–८
– तत्र स्त्रीश्रोणिपुरुषोरःप्रभृतीनां यौवन एव यथोक्तप्रमाणता भवति, नत्वन्ये वयसीति । अन्यत्राप्युक्तं, 'वर्षेऽथ पंचविंशे नरःसमन्वितबलः षोडशे नारी । अर्हति भागो न्मानं जीवितभागे चतुर्थ वा" इति । सु. सू. ३५–१३ टीका

[1]वरील गोष्टींचा विचार करता प्रथम प्रथम गर्भधारणेचा काल स्त्रियांमध्ये १६ ते २० वर्षांचाच असावा असे आमचे स्पष्ट मत आहे.

बारा वर्षांपूर्वी आणि पन्नास वर्षांनंतर स्त्रियांच्या ठिकाणी रज, स्तन्य इत्यादी आढळत नाही असे वृद्ध वाग्भटाने म्हटले आहे. या ग्रंथामध्ये स्त्री-शरीर व स्त्री-शरीर-क्रिया यांचा विचार करताना स्त्रीचे हे मध्यमवयच गृहीत धरलेले आहे.

[2]स्त्री-शरीराचा विचार करताना ते शरीर मानवी-शरीराच्या सर्व अंगोपांगांनी युक्त असले तरी सापेक्षतः पुरुषाच्या शरीरापेक्षा सुकुमार असते. साहित्यांमध्ये येणारी सुकुमारी, मृद्वंगी, कोमलांगी, तन्वी, बाला इत्यादी विशेषणे केवळ काव्यमय नसून वास्तविकही आहेत. शरीराच्या रचनेचा अभ्यास करतानाही अस्थी मृदू व लहान, स्नायुबंध शिथिल अशा गोष्टी आढळतातच.

स्त्रिया या बहुतकरून सुकुमार आणि अल्पबल असलेल्या अशा असतात. त्यांचे हृदयही अस्थिर, कोमल, उथळ (लहान, अल्प) व हळवे असते असे म्हटले आहे. येथे हृदय शब्दाने जसे चित्त वा मन घेता येईल त्याप्रमाणेच हृदय या 'अवयवाच्या उपलक्षणंने इतर शरीरावयवही असेच असतात असे म्हणता येईल.

स्त्री-शरीराच्या या सुकुमारतेमुळेच स्त्री-शरीरातील व्याधी हा सापेक्षतः पुरुष-शरीरातील व्याधीपेक्षा अधिक कष्टसाध्य असतो असे वाग्भटाने सुखसाध्यप्रकरणी केवळ पुरुषाच्या विशेषत्वाने उल्लेख करून सुचविले आहे (वा. सू. १–३०) ते मानले पाहिजे. कारण शरीराची व्याधिक्षमता चांगली नसण्याच्या कारणामध्ये चरकाने शरीराच्या दुर्बलत्वाचा उल्लेख केलेला आहे (च. सू. २८–७). याचा अर्थ स्त्रिया नेहमीच रोगी असतात किंवा त्यांना रोग चटकन होतात असा करावयाचा नाही. तर रोगाच्या उत्पत्तीस कारणीभूत असलेले जे दोन भाव स्थानवैगुण्य व दोषदुष्टी, यांतील स्थानवैगुण्य सुकुमारतेमुळे स्त्री-शरीराच्या ठिकाणी थोडे अधिक संभवते इतकेच. कश्यपाने सूत्रस्थानाच्या क्षीरोत्पत्ती अध्यायामध्ये स्त्रियांची सर्व स्रोतसे विवृत (मोकळी, शिथिल) असतात असे म्हटले आहे.

## शरीररचना

**श्रोणी :**

स्त्री-शरीरामध्ये प्रथमच लक्षात येण्यासारखे अवयव म्हणजे श्रोणी आणि स्तन हे

१. योषितश्च ऊनद्वादशातीतपंचाशद्वर्षायाः रजस्तन्यादयः (नोपलभ्यंते) ।
अ. सं. शा. १–२१

२. ता हि अनवस्थितमृदुविवृतहृदयाः प्रायः सुकुमार्याः अबलाः । च. वि. ८–९४



होत. अपत्यप्रसवाच्या दृष्टीने या दोन अवयवांनाच विशेष प्रकारचे उपयुक्त कार्य करावयाचे असल्याने स्त्री-शरीरामध्ये या दोन अवयवांची वाढ विशेषरीतीने झालेली असते. [1]स्त्री-श्रोणी ही पुरुषाच्या अपेक्षेने परिघाने मोठी असते.

पुरुषाच्या शरीराचा वरचा भाग मोठा व जड असतो, तर स्त्रीशरीराचा खालचा भाग मोठा व जड असतो असा सुश्रुतात उल्लेख आहे. हेच वचन चरक टीकाकार चक्रदत्त याने आपल्या टीकेत पाठभेदाने दिले आहे.

[2]कदाचित असा पाठ इतरत्र असावा. हे प्रकरण मुळात सुश्रुतामध्ये मांसगुणाच्या वर्णनामध्ये आणि चरकावरील टीकेत शोथाची साध्यासाध्यता सांगताना आले आहे (च. सू. १८–१७ टीका). त्यामुळे या वचनातील 'गुरू' या शब्दाचा अर्थ जरी जड असा केला तरी तो श्रोणीपुरता मर्यादित का घ्यावा असे वाटण्याची शक्यता आहे. परंतु गुरुत्व हे श्रोणीपुरतेच वैशिष्ट्याने प्रगट होते हे प्रत्यक्ष अनुभवास येणारे आहे आणि त्यावरूनच स्त्रियांच्या गतीचे वर्णन करताना ती मंद असते असे काव्यमय




अ– स्त्री-श्रोणिः ब– पुरुषोरः
आ. १

१. 'पूर्वभागो गुरुः पुंसां अधोभागस्तु योषिताम् ।' सु. सू. ४६–१३२

२. श्रोणिभारात् अलसगमना– मेघदूत
न दुर्वहश्रोणिपयोधरार्ता भिंदन्ति मंदां गतिमश्वमुख्यः –कुमारसंभव

वर्णन करून कवींनी पुढे तिच्या अवयवांचा उल्लेख करून जी कारणे दिली आहेत त्यांत श्रोणीभागाचेच गुरुत्व वर्णन केलेले आहे.

हा जडपणा आकारामुळेही येतो असे म्हटले पाहिजे. कारण अंगुलीप्रमाण देताना, "पुरुषोरःप्रमाणविस्तीर्णा स्त्रीश्रोणिः" ( सु. सू. ३५–१२ ) असे वचन सुश्रुताने दिले आहे. मात्र या ठिकाणी छापील ग्रंथांमध्ये बरवर पाहिले असता थोडा घोटाळा आहे असे वाटेल. सुश्रुतातील वचन पुढीलप्रमाणे आहे :

पुरुषोरःप्रमाणविस्तीर्णा स्त्रीश्रोणिः अष्टादशांगुल विस्तारमुरः तत्प्रमाणा पुरुषस्य कटी । —सु. सू. ३५–१२

यात सुश्रुताने पुरुषाच्या उराचे प्रमाण दिलेले छापील प्रतीत आढळत नाही. परंतु याच प्रकरणावर टीका लिहिताना डल्हणाने 'चतुर्विंशत्यंगुलविस्तारमुरः' असा पाठ काही लोक घेतात असे मोघम म्हटलेले आहे. पण ते वस्तुतः पूर्णपणे स्वीकारले पाहिजे असे आम्हाला वाटते. चरकाने शरीरावयव प्रमाण देताना 'चतुर्विंशत्यंगुलविशालं उरः' असे स्पष्टपणे वि. अ. ८–११७ मध्ये म्हटले आहे. त्यामुळे डल्हणाने विकल्पाने दिलेला पाठ सुश्रुतात मुळात असावा आणि तो गृहीत धरला की सुश्रुताच्या वर उद्धृत केलेल्या वचनाचा अर्थ सुसंगतपणे लावता येतो, तो असा– ( पुरुषाच्या ) उराची ( छातीची ) रुंदी २४ अंगुळे असतो आणि तेवढीच स्त्रीच्या श्रोणीची असते. स्त्रीच्या उराचा विस्तार १८ अंगुळे असतो आणि तेवढाच पुरुषाच्या कटीचा असतो. संदर्भाने 'अष्टादशांगुलविस्तारमुरः' याचा अन्वय 'स्त्रीणां' या अध्याहृत शब्दांशी केला नाही तर 'तत्प्रमाणा पुरुषस्य कटी' या वचनातील पुरुषस्य वा विशेष रीतीने वापरलेल्या शब्दांचे प्रयोजन लक्षात येणार नाही. असो.

स्त्री-श्रोणी ही रुंद असते आणि त्यामुळेच जडही असते हे स्पष्टपणे लक्षात घ्यावयास अडचण नाही. स्त्री-श्रोणीच्या विस्ताराप्रमाणे काव्यात पुरुषाच्या उराच्या विस्ताराचेही वर्णन येते.

— 'व्यूढोरस्कः ( वृषस्कंधः )...... – रघुवंश

– योनिः शकटाकृतिरपत्यलाभाय, पीना सौभाग्याय, लम्बाऽपत्यवधाय, मण्डला व्यभिचरणाय, लक्षिप्ताऽनपत्यत्वाय, सूचिमुखी दौर्भाग्याय, भृशविवृतसंवृतशुष्का लम्बा विषमा विलिङ्गा क्लेशलाभाय, मध्यनिबिडा कन्याप्रजननाय, उन्नता रमणीया मांसला पुत्रजन्मने, व्यञ्जनवती च धन्या, अतिलोमशा वैधव्यकरी, व्यञ्जनहीना त्वयशसे, पिप्लुमद्वसावती व्यभिचारप्रव्रज्यायै । तथैव लोमराज्युभयतो मध्यमागता नातिघनः स्यते, वैधव्यायातिस्थूला, अतिस्थूलघनलोमा पौंश्चल्याय, अधोजाता दौर्भाग्याय, नाभिमतिवृत्ता मध्यत्वाय । का. सं. पान ४७, ४८



# अवयव-परीक्षा

## ( १ ) योनी :

योनीचा आकार शकटाकृती असणे अपत्यदायक आहे. योनीची पुष्टता सौभाग्य-दायक आहे. योनीची दीर्घता अपत्यनाशास कारणीभूत होते. मंडलाकृती योनी व्यभिचा-रिणीची असते. योनीचा आकार उचलल्यासारखा असणे हे अनपत्यतेचे कारण आहे. सूचिमुखी योनी दौर्भाग्याचे चिन्ह आहे. योनी ही फार विस्तृत, फार आकुंचित वा झाकलेली ( संवृत ), शुष्क, लांब, विषम, विलिंग ( योनीचा अभाव असणे वा विकृत योनी व पुंचिन्ह असणे ) असणे हे क्लेशदायक आहे. योनी मध्येच घट्ट असणे ( संकुचित ) हे कन्या संततीचे द्योतक आहे. सर्व सुलक्षणांनी युक्त असणे ( व्यञ्जन ) धन्यतेचे द्योतक आहे. योनीवर अत्यंत केस असणे वैधव्य उत्पादक आहे. सुलक्षणरहित योनी अमंगल आहे. योनीवर तीळ असणे वा मेदाचे आधिक्य असणे व्यभिचार व भटकेपणाचे द्योतक आहे. याचप्रमाणे योनीच्या दोन्ही बाजूंस अल्प रोम असणे, ती आकाराने मध्यम, व फार घट्ट नसणे अशी योनी प्रशस्त आहे. अतिस्थूल योनी वैधव्याचे द्योतक आहे. योनी अतिस्थूल व दाट केसांनी युक्त हे वाईट वर्तनाचे द्योतक आहे.

योनी खाली सरकलेली असणे ( अधोजात ) हे दुर्भाग्याचे व फार खोल जणू नाभीपर्यंत गेलेली अशी असणे हे मध्यम गुणाचे आहे.



आ. २ : १. शकटाकृती

[ अ ] **योनिसंपत् :** योनीचा बाह्य भाग शकटाकृती असतो. म्हणजेच बहिर्गोलाकार असतो. तो भाग पुष्ट असणे, योनीच्या दोन्ही बाजूंस अल्प रोम असणे, योनी आकाराने मध्यम, व फार घट्ट नसणे ही प्रशस्त योनीची लक्षणे आहेत.

[ ब ] **कुयोनी लक्षणे :** प्रथम आवर्त वाजवीपेक्षा दीर्घ असणे, अतिव्यवायामुळे योनीच्या ठिकाणी शैथिल्य प्राप्त होऊन त्याचे गोलाकारामध्ये रूपांतर होणे, गर्भाशयमुख वरच्या बाजूला वळलेले असणे किंवा सुईच्या अग्राप्रमाणे बारीक असणे, योनिमुख किंवा गर्भाशयमुख प्रकृत असते. त्यापेक्षा जास्त लहान किंवा विस्तृत

असणे वा शुष्क असणे, द्वितीय आवर्ताची लांबी नेहमीपेक्षा जास्त किंवा कमी असणे, योनीच्या ठिकाणी विकृती असणे, उदा.– गर्भाशयमुख दोन असून आशय एक असणे किंवा गर्भाशयमुख एक असून आशय दोन असणे, प्रथम, द्वितीय किंवा तृतीय आवर्त यांपैकी कोणाचाही भाग पटलयुक्त असणे किंवा स्त्रीत्वाची लोमादी लक्षणे नसणे ही सर्व कुयोनीची लक्षणे आहेत.

## ( २ ) अस्थी :

[1]श्रोणीच्या आश्रयाने असणाऱ्या अस्थी, पेशी, संधी इत्यादींचे वर्णन क्रमाने पाहिले पाहिजे. श्रोणीमध्ये एकूण पाच अस्थी असतात. श्रोणीच्या बाजूमध्ये दोन नितंबास्थी आकारामुळे यांना [2]कपालास्थी असे म्हणतात. गुदभागी एक, भगभागी एक आणि त्रिकभागी एक, एकूण पाच अस्थी झाल्या. गुदास्थी व त्रिकास्थी हे एकावर एक आहेत, आणि दोन श्रोणीफलक जेथे एकत्र होतात त्या ठिकाणी भगास्थी अशी संज्ञा दिलेली आहे. याच श्रोणीभागामध्ये गुदविवर आणि अपत्यपथ यांचा समावेश होतो. गर्भशय्या ही याच ठिकाणी असते. [3]त्याचप्रमाणे बस्ती,




१–२. श्रोणिफलक (नितंबास्थी), ३. त्रिकास्थी, ४. गुदास्थी, ५. भगास्थी.
आ. ३ अ, ३ ब, ३ क

१. द्वे श्रोणिफलके, एकं भगास्थि । च. शा. ७–६
श्रोण्यां पंच, तेषां गुदभगनितंबेषु चत्वारि त्रिकसंश्रितमेकम् । सु. शा. ५–१९
२. नितंबेषु कपालसंज्ञानि अस्थीनि । सु. शा. ५–२०
३. बस्तिबस्तिशिरोमेढ्रकटीवृषणपायवः ।
एक संबंधनाः प्रोक्ता गुदास्थिविवराश्रयाः । वा. नि. ९–१



बस्तिशिर (पुरुषांमध्ये मेढ्र वृषण), गुद असे परस्परांच्या जवळ असलेले अवयव याच पाच अस्थींनी बनलेल्या कटिरामध्ये असतात आणि विशेष कार्यासाठी हे सर्व चांगले रुंद असणे आवश्यक आहे. म्हणूनच स्त्रीश्रोणी ही पुरुषाच्या श्रोणीच्या मानाने चांगलीच रुंद असते. त्याचे वर्णन वरती आलेलेच आहे.

## ( ३ ) सन्धी :

[1]गुद, भग, नितंब या ठिकाणच्या अस्थींचे संधी सामुद्ग म्हणजे संपुट ( डाव व त्याचे झाकण) या आकाराचे असतात. आणि कटिकपाल यांचा एकजीव झालेला जो संधी 'तुन्नसेवनी' तो शिवणीच्या आकाराचा असतो.

[2]यौवनापूर्वीच कटिकपाल संधी ( तुन्नसेवनी ) हा घट्ट होतो. त्यामुळे तरुण स्त्रीच्या शरीरातील कटिराचे उरलेले संधी उदा.– सामुद्ग, अल्पचल असतात; म्हणूनच उपस्थित प्रसवेमध्ये चक्रमण ही क्रिया सांगितलेली आहे.

## ( ४ ) आशय :

[3]स्त्रियांच्यामध्ये पुरुषांच्याप्रमाणेच रक्तपित्तादी सात आशय असून शिवाय तीन आशय अधिक असतात. दोन स्तनांच्या ठिकाणी दोन आणि गर्भाशयाच्या ठिकाणी एक. गर्भाशयालाच धरा असाही पर्यायशब्द आहे. [4]सुश्रुत व वाग्भट या ग्रंथकारांनी स्तनांतील आशयाचा उल्लेख न करता फक्त सात आशयांपेक्षा आठवा गर्भाशय जास्त असतो असे म्हटले आहे. या गर्भाशयाचे स्थान सांगत असताना निरनिराळ्या संदर्भामध्ये निरनिराळे संबंध सांगितले आहेत. त्या सर्वांचा विचार करता गर्भाशय हा भगास्थीच्या खाली असलेल्या बस्तीच्या वर, थोडा मागील बाजूस असून तो पक्वाशयाच्याही जवळ येतो व पित्ताशय (लघ्वंत्र) हा गर्भाशयाच्या वर असतो.

१. गुदभगनितंबेषु सामुद्गाः कटिकपालेषु तुन्नसेवन्यः । सु. शा. ५–२७
२. तुन्नसेवन्यो नाम परस्परपीडनैः दंतुरधारादिभि निर्मिताः कापालान्तरालाः संधयः ।
शिरःकपालेषु दृश्याः कटिकपालेषु च प्राणयौवनात् ।
सामुद्गा नाम सामुद्गनिर्मापिका इव संधयोऽल्पा चेष्टाः । सु. शा. ५–२० टीका
३. पुरुषेभ्योऽधिकाश्चान्ये नारीणामशयास्त्रयः ।
धरा गर्भाशयः प्रोक्तः स्तनौ स्तन्याशयौ मतौ ॥ शा. प्र. खंड ५–१०
४. स्त्रीणां गर्भाशयः अष्टमः । सु. शा. ५–८

## ( ५ ) जरायू – ( कश्यपोक्त ) :

[१]गर्भाशयाची आतील बाजू एका आवरणाने वेष्टिलेली असते. यालाच जरायू ही संज्ञा काश्यपाने दिली आहे. प्रत्यक्षामध्ये याच आवरणामध्ये प्रसादरूप रज ( 'गते पुराणे च अवस्थिते।' इत्यादी ) असते.

गर्भाशय हा तीन आवर्तांनी युक्त असलेल्या योनीच्या तिसऱ्या आवर्तामध्ये असतो.




आ. ४ : १. बस्ती, २. लघ्वंत्र ( पित्ताशय ), ३. गर्भाशय, ४. पक्वाशय.

१. जरायुणां परिवीतं स गर्भाशय उच्यते । का. सं. पान ७४
पित्तपक्वाशययोर्मध्ये गर्भशय्या यत्र गर्भस्तिष्ठिति । सु. शा. ५–१९
स्त्रीणां तु बस्तिपार्श्वगतो गर्भाशयः सन्निकृष्टः । सु. चि. ७–७३
भगस्याधः स्त्रिया बस्तिरूर्ध्वं गर्भाशयः स्थितः ।
गर्भाशयश्च बस्तिश्च महास्रोतः समाश्रितौ । सु. चि. ७–३३ टीक वैतरण



म्हणजे या गर्भाशयालाच योनीचा तिसरा आवर्त असे म्हटले आहे. आवर्त शब्दाचा 'भोवरा' असा अर्थ आहे किंवा पेच असाही त्याचा अर्थ करता येईल. आणि बाह्यांगाचा विचार करता गर्भाशयाचा आकार हा शंखनाभीप्रमाणे असतो. प्राकृत अवस्थेत गर्भाशय पुरःप्रवर्तित असतो. आतील रचनेचा विचार करता तो पेचाच्या भागासारखा आहे. याचा आकार रोहित नावाच्या माशाच्या मुखाप्रमाणे आहे. या उपमेवरून तो तोंडाकडे निमूळता व मागे पसरट होत गेलेला व गोलाकार असलेला असा आहे हे लक्षात येईल. यामध्येच गर्भ राहतो म्हणून त्यास




आ. ५ : १. आर्तववह स्रोतस् ( आर्तव वाहिनी ), २. अंतःफल, ३. गर्भशय्या ( तृतीयावर्त ), ४. गर्भाशयमुख ( द्वितीयावर्त ), ५. योनिमार्ग ( प्रथमावर्त )

¹'गर्भशय्या' असेही म्हणतात. हाच गर्भाशय आर्तववह स्रोतसांचे मूळ असून विशिष्ट अंशाने तो त्या स्रोतसाचा भागही आहे. यातूनच रजःप्रवृत्ती ही प्रतिमासी होत असते.

## ( ६ ) पेशी :

²पेशी या अवयवासंबंधी वैद्यकामध्ये विद्वानांचे काही मतभेद आहेत. स्वतंत्र शरीररचनाविषयक ग्रंथामध्ये त्याचा ऊहापोह उचित होईल. या ठिकाणी फक्त आमच्या मताप्रमाणे पेशीचा अर्थ स्पष्ट करून गृहीतकृत्यावर पुढील वर्णन केले आहे.

पेशी हा अवयव एकूण विचार करता स्नायुसदृश, मांस धातूने घटित, चपटा, रुंद, गोल, लांबट, पातळ, जाड, स्थिर, चल, आखूड इत्यादी निरनिराळ्या आकाराचा अवयवांच्यामध्ये राहून त्यांच्या मर्यादा स्पष्ट करणारा, वा संधी, अस्थी, सिरा, स्नायू इत्यादींना झाकणारा अवयवविशेष आहे असे त्याचे वर्णन ग्रंथामध्ये आढळते. त्यामुळे प्रायः अवयवांना आवरणासारखा असणारा, अवयवांना जोडणारा, आकार देणारा, पटबंधासारखा हा अवयव असला पाहिजे. निदान योनीशी संबंधित असलेल्या पेशींचा समावेश तरी या प्रकारात करण्यास हरकत नाही असे आम्हास वाटते. या ठिकाणी थोडीशी अव्याप्ती होते हे खरे. कारण काही पेशींच्या वर्णनावरून त्या पटबंधासारख्या नाहीत असे निश्चितपणे म्हणता येते; पण काही ठिकाणी

१. – शंखनाभ्याकृतिर्योनिस्त्र्यावर्ता सा प्रकीर्तिता ।
तस्यास्तृतीये त्वावर्ते गर्भशय्या प्रतिष्ठिता ।।
यथारोहितमत्स्यस्य मुखं भवति रूपतः ।
तत्संस्थानां तथारूपां गर्भशय्यां विदुर्बुधाः ।। सु. शा. ५–४३, ४४

२. – सिरा स्नाय्वस्थिपर्वाणि संधयश्च शरीरिणाम् ।
पेशीभिः संवृतान्यत्र बलवन्ति भवन्त्यतः ।। सु. शा. ५–३८
– मांसावयवसंघातः परस्परविभक्तः पेशीत्युच्यते । सु. शा. ५–३८ टीका
– तासां बहलपेलवस्थूलाणुपृथुवृत्तह्रस्वदीर्घस्थिरमृदुश्लक्ष्णकर्कशभावाः संध्यास्थिसिरास्नायुप्रच्छादकाः यथाप्रदेशं स्वभावतः एव भवन्ति ।
सु. शा. ५–५०
– पेश्यः पुनः स्नाय्वाकृतयो मांसमय्यः । अ. सं. शा. ५–१०० पृष्ठ ४१ टीका
मांसपेश्यो बलाय स्युरवष्टंभाय देहिनाम् । शाङ्‌र्गधर प्र. खं. ५–३९
– स्त्रीणां तु विंशतिरधिका । दश तासां स्तनयोः एकैकस्मिन् पंच पंचेति, यौवने तासां परिवृद्धिः । अपत्यपथे चतस्रः तासां प्रसृते अभ्यन्तरतो द्वे, मुखाश्रिते बाह्ये च वृत्ते द्वे, गर्भच्छिद्रसंश्रितास्तिस्रः शुक्रार्तप्रवेशिन्यास्तिस्र एव ।
सु. शा. ५–३९
– पुंसां पेश्यः पुरस्ताद्याः प्रोक्ता लक्षणमुष्कजाः ।
स्त्रीणामावृत्य तिष्ठन्ति फलमन्तर्गतं हि ताः । सु. शा. ५–४१



अर्थ स्पष्ट करताना उपयोग होईल या कल्पनेने वरील तुलना आम्ही केली आहे. 'भेत्ता हि भेद्यं अन्यथा भिनत्ति' या न्यायाने वर्गीकरण निरनिराळे होऊ शकते हे उघडच आहे.




आ. ६ : १–२. अभ्यंतरतः प्रसृते द्वे, ३. शुक्रप्रवेशिनी, ४–५. आर्तवप्रवेशिन्यौ द्वे.




आ. ७-१ :
१–२. मुखाश्रिते बाह्ये वृत्ते द्वे, ३. योनिर्लिंग




आ. ७-२ :
स्मरातपत्र पिप्पलाकृति

या पेशी स्त्रियांच्यामध्ये पुरुषांच्यापेक्षा वीस जास्त आहेत. त्यांतील प्रत्येकी पाच याप्रमाणे दहा स्तनांच्या ठिकाणी असून त्या यौवनात वाढतात. दहा योनिमार्गात आहेत. त्यांतील अपत्यपथामध्ये चार असतात. त्यांपैकी दोन आत महास्रोतसाकडे पसरलेल्या असून दोन बाहेर मुखाशी गोल आकाराच्या अशा असतात व त्यामुळे योनिद्वाराच्या मर्यादा व्यक्त होतात. तीन गर्भाशयाच्या मुखाशी (गर्भच्छिद्राशी) संबद्ध




आ. ८ : १–२. गर्भाशयसंश्रिते (पृष्ठतः), ३. गर्भाशय (पृष्ठतः)

– स्त्रीणां तु विंशतिरधिका । तत्र दश स्तनयोः तासां यौवने परिवृद्धिर्भवति । दश योनौ । अ. सं. शा. ५–११२

– स्त्रीणां विंशतिः पेश्योऽधिकाः । तासां मध्यादृश स्तनयोः । तासां बालभावे सद्भावमात्रम् । यौवने वृद्धिः । योनौ दश ।

अ. सं. शा. ५–११२ टीका

– योनिलक्षणं तद्गताः पेश्यश्च ।

तासामभ्यंतराश्रिते द्वे । मुखाश्रिते वृत्ते द्वे । तिस्रो गर्भमार्गाश्रयाः । यस्यां गर्भस्तिष्ठति । योनिस्तु शंखनाभ्याकृतिस्त्र्यावर्ता । तस्यास्तृतीये आवर्ते पित्त-पक्वाशयान्तरे रोहितमत्स्यमुखाकारा गर्भशय्या तस्यां शुक्रार्तवप्रवेशिन्यस्तिस्रः पेश्यः ।

अ. सं. शा. ५–११३



असतात. एक गर्भाशयमुखाच्या पुढील बाजूस असून इतर दोन गर्भाशयमुखाच्या पार्श्वे व पश्चात् भागी असतात. उरलेल्या तीन या गर्भाशयामध्ये शुक्रप्रवेश जेथून होतो तेथे एक व आर्तव ( स्त्री-बीज ) प्रवेश गर्भाशयात जेथून होतो तेथे प्रत्येक बाजूस एक याप्रमाणे दोन, अशा एकूण दहा पेशींची गणना येथे ( योनीच्या ठिकाणी ) होते. स्त्रियांच्या इतर पेशींमध्ये संख्येच्या दृष्टीने नसले तरी अवयवभेदाने वैशिष्टय




आ. ९ : १. गर्भमार्गाश्रिता ( पृष्ठतः ) पेशी, २. गर्भमार्गाश्रिता ( पुरतः ) पेशी.

आहे. ज्या पेशी पुरुषामध्ये वृषणाच्या आश्रयाने असतात त्याच दोन स्त्रियांच्यामध्ये अंतर्गतफलाला झाकून त्यांच्या आधाराने राहतात. या ठिकाणी पुरुषांच्यामध्ये वृषणाचे जे कार्य तेच स्त्रियांच्यामध्ये अंतःफल ह्या अवयवाचे असते. संख्यान करताना असे समानजातीय गुणधर्म लक्षात घेऊन आयुर्वेदीय ग्रंथकार सादृश्य दाखवितात वा मोजणी करतात हे लक्षात घेतले म्हणजे 'अंतःफला'चे कार्य लक्षात येण्यास अधिक मदत होते.

– तासां विभागः । द्वे अभ्यन्तरे, महास्रोतसि प्रवृत्ते, द्वे योनि मुखाश्रये वृत्ताकारे, तिस्रो गर्भमार्गमाश्रिताः । तिस्रश्च गर्भाशये शुक्रार्तवप्रवेशिन्यो गर्भशय्यायां प्रतिबद्धाः । सा च योनौ शंखनाभ्याकृत्या तृतीय आवर्ते निबद्धा । रोहितमत्स्यमुखाकार गर्भशय्या । अ. सं. शा. ५–११३ टीका

## ( ७ ) अंतःफल :

स्त्री-शरीरामध्ये पुरुषाच्या वृषणासारखेच कार्य करणारा हा अवयव असून त्याला अंतःफल अशी संज्ञा आहे. वृषण पुंबीजाला उत्पन्न करते. वृषणासारखे हेही दोन असतात. रजःप्रवृत्तीसही पर्यायाने हेच कारणीभूत होतात.

## ( ८ ) स्तन :

अपत्याच्या पोषणासाठी स्त्रीशरीरामध्ये निसर्गाने स्तन या विशिष्ट अवयवाची योजना केली आहे. पुरुषामध्ये याची फक्त खूण असते. स्त्रियांच्या स्तनांची वाढ यौवनकाली होते.




आ. १० : १ ते ५. स्तनसंश्रिता पंच्यपेश्य

यामध्ये दोन स्तन्याशय, दहा पेशी, दोन स्रोतसे, दोन धमन्या असे अवयव-विशेष असतात. या सर्वांची वाढ यौवनकाली होते. स्तनाचा एकूण आकार कलशाकृती असून ते मांसल, उन्नत आणि पुष्ट असे असतात. स्तनाच्या अग्रभागी चुचूक असून त्याभोवती कृष्णमंडल असते. स्तन्यवाहिन्या सर्व स्तनातून याच चुचूकांशी एकत्र होतात व यासाठीच स्तन-विद्रधीच्या शस्त्रकर्मप्रसंगी कृष्णमंडलावर छेद घेऊ नये असे सांगितले



आहे. जर चुकून छेद घेतला तर स्तनवाहिन्यांच्या ठिकाणी नाडीव्रण निर्माण होतो.



आ. ११ : स्तनसंपत्

प्रत्यक्षामध्ये स्तनचुचूकावरून स्तनाची विकृती ओळखता येते. उदा.– स्तनार्बुदामध्ये स्तनचुचुक आत ओढलेले असते.

अपत्याच्या दर्शन, स्पर्शन, आचूषणाने त्यातून स्तन्य स्रवते.

स्तन हे फार वर, फार खाली, लोंबलेले, फार लहान, फार मोठे, असे असू नयेत. त्याभोवतालचे कृष्णमंडल योग्य स्वरूपाचे असावे व चुचूकाचा आकार मूल सहज चोखू शकेल असा असावा. काही स्त्रियांमध्ये चुचूक अगदी लहान व आत गेल्याप्रमाणे असतात. तसे असू नयेत. तो दोष आहे. कारण मूल ते चोखू शकत नाही. यासाठी स्तनांना सुखप्रपानौ हे विशेषण दिले आहे.

## ( ९ ) [1]स्रोतस् :

स्त्रियांमध्ये पुरुषांच्याइतकीच इतर स्रोतसांची संख्या असून तीन अधिक

– पुरुषेभ्योऽधिकाश्चान्ये नारीणां आशयः त्रयः ।
धरा गर्भाशयः प्रोक्तः स्तनौ स्तन्याशयौ मतौ । शा. प्र. खंड ५–१०

– स्त्रीणां तु विंशतिरधिका (पेश्यः) तत्र दश स्तनयोः तासां यौवने परिवृद्धिर्भवति। अ. सं. शा. ५–११२

– तासा बालभावे सद्भावं मात्रं यौवने वृद्धिः । अ. सं. शा. ५–११२ टीका

– स्त्रीणां च अपराणि त्रीणि (स्रोतांसि) द्वे स्तनयोः । सु. शा. ५–१०

– द्वे स्तन्यं स्त्रियाः वहतः स्तनसंश्रिते (धमन्यौ) । सु. शा. ९–५

१. सर्वे स्रोतांसि हि स्त्रीणां विवृतानि विशेषतः । का. सं. पृष्ठ ९ स्तनकीलक प्रकरण नात्यूर्ध्वौ, नातिलंबौ, अनतिकृशौ, अनतिपीनौ, युक्तपिप्पलकौ सुखप्रपानौ, चेति । च. शा. ८–५३

स्त्रीणां त्रीण्यधिकानि स्युः स्तनयोर्गर्भवर्त्मनः ।
सूक्ष्मच्छिद्राणि चान्यानि मतानि त्वचि जन्मिनाम् ॥ शा. सं. प्र. खंड ५
अन्यानि च त्रीणि स्त्रीणां स्तनोरक्तपथश्चः । अ. सं. शा. ६–३४

आहेत. दोन स्तनांमध्ये आणि एक योनिमार्गामध्ये 'रजोवहस्रोतस्'. यालाच मूळ ग्रंथामध्ये रक्तवह व टीकेमध्ये 'आर्तववह स्रोतस्' असे म्हटले आहे. परिभाषा-निश्चितीकरणाच्या दृष्टीने आता या स्रोतसाचा रजोवहस्रोतस् असाच उल्लेख केला पाहिजे. हे बहिर्मुख स्रोतस् असल्याचे ग्रंथकाराने सांगितलेच आहे. आणि त्याचे स्थान देताना योनीचा पिंपळाच्या पानाच्या आकाराचा बाह्य असलेला जो भाग – ज्याला 'स्मरातपत्र' असे म्हणतात, त्याच्या खाली हे स्रोतस् असल्याचे वर्णन आहे. म्हणून यास 'आर्तववह' म्हणणे योग्य नव्हे; कारण पुरुषांच्या शुक्रवह स्रोतसांच्या संख्यानाबरोबर समानकर्माप्रमाणे 'आर्तववह' स्रोतसांचा उल्लेख येऊन गेला असल्यामुळे या अधिक स्रोतसांच्या गणनेत त्यांचा समावेश करता येणार नाही. म्हणून तीन अवर्तांनी बनलेला जो योनिभाग जो बाह्यस्रोतस् आहे असे स्पष्ट दिसते व ज्यातून मासिक पाळीच्या वेळी रजःप्रवृत्ती होते त्यासच येथे "रजोवहस्रोतस्" म्हणून संबोधिले पाहिजे हे स्पष्ट आहे.

( ꣸ ) स्रोतसे दोन प्रकारची असतात – [1]बाह्यमुखी, [2]अंतर्मुखी.

## ( १० ) धमनी ( चेतनी ) :

स्त्रियांच्या स्तनाच्या आश्रयाने राहून स्तन्यवहनाची प्रेरणा देणाऱ्या दोन धमन्या आहेत. अपत्याच्या दर्शन, स्पर्शन, आचूषणादी कारणांनी संवेदना उत्पन्न होऊन व्यान वायू गतियुक्त होतो व धमनीद्वारा प्रेरणा देऊन स्तन्य स्रवविते. अपत्य-विषयक स्नेह ( म्हणजेच वात्सल्य ) येथे प्रेरक हेतू असतो.

यानंतर अधोभागी स्त्रियांच्यामध्ये चार विशिष्ट धमन्या असल्याचे वर्णन आहे. त्यांतील दोन आर्तव ( स्त्रीबीज ) याच्या अभिवहनास साहाय्य करणाऱ्या आणि




आ. १२ : १ ( प्रसादरूप ) रजोवह धमनी ( चेतनी )

दोन रजोवह स्रोतसापर्यंत येऊन त्या ठिकाणी रजाची उत्पत्ती करणाऱ्या. यांतील पहिल्या दोन या केवळ प्रेरणेचे काम करणाऱ्या मानाव्यात आणि दुसऱ्या दोन ज्या रजोत्पादक म्हणून वर्णन केल्या आहेत त्या गर्भाशयाशी येऊन मिळणाऱ्या दोन रक्तवाहिन्या मानाव्यात. एकाच प्रकरणात परस्परांपुढे आलेल्या दोन संदर्भांत धमनी

– तत्र इयं स्तनसंपत् –
– एतान्येव स्त्रीणामपराणि च त्रीणि द्वे स्तनयोरधस्ताद्रक्तवहं च । सु. शा. ५–१०
– अधस्ताद्रक्तवहं स्मरातपत्रस्याधः आर्तववहं, स्मरातपत्रं भगस्योपरितने भागे । सु. शा. ५–१० टीका
द्वे शुक्रं वहतो द्वे च मुञ्चतः । ते एव नारीणामार्तवम् । अ. सं. शा. ६–६६
– आहाररसयोनित्वात् एवं स्तन्यं अपि स्त्रियाः ।
तदेवापत्यसंस्पर्शाद् दर्शनात् स्मरणादपि ॥
ग्रहणाच्च शरीरस्य शुक्रवत् संप्रवर्तते ।
स्नेहो निरंतरस्तत्र प्रस्रवे हेतुरुच्यते ॥ सु. नि. १०–२१–२२
– द्वे स्तन्यं स्त्रिया वहतः स्तनसंश्रिते । सु. शा. ९–५
– ꣸ दृश्यानि अदृश्यानि च । अ. हृ. शा. ३
– बाह्यानि अंतराणि च इति द्विविधानि । अ. सं. शा. २
१ बाह्यमुखी – श्रवणनयनवदनघ्राणगुदमेढ्राणि नव स्रोतसि नराणां बहिर्मुखानि ।
एतान्येव स्त्रीणां अपराणि च त्रीणि । द्वे स्तनयोः अधस्तात् रक्तवहं च । सु. शा. ५
२ अंतर्मुखी – प्राणोदकान्नरसरुधिरमांसमेदोऽस्थिमज्जाशुक्रमूत्रपुरीषस्वेदवहानीति । च. वि. ५

– ते एव शुक्रं नरस्य स्तनाभ्यामभिवहतः ।
ते एव रक्तमभिवहतो विसृजतश्च नारीणामार्तवसंज्ञम् । सु. शा. ९–७
– द्वे शुक्रं वहतो द्वे च मुञ्चतः ते एव नारीणां आर्तवम् । अ. सं. शा. ६–३६
– द्वे पुरुषस्य शुक्रं देहे वहतः द्वे च शुक्रं बहिः मुञ्चतः ते एव पुरुषस्य शुक्रं ते एव स्त्रियः रक्तं इति चतस्रः । अ. सं. शा. ६–३६ टीका
तास्तु वातमूत्रपुरीषशुक्रार्तवोन्यधोवहन्ति । शा. सं. ख. ५–३६ टीका
अधोगास्तु दश – द्वाभ्यां पुरुषस्य शुक्रं स्त्रिय आर्तवं च प्रादुर्भवति,
द्वे च तद्द्वयं निःसारयतः । शा. सं. प्र. ख. अ. ५ टीका
द्वाभ्यां च रक्तवहनं भवति शिव्हेन स्तनसंस्थितेन द्वयेन च स्त्रियाः स्तन्यवहनं पुंसश्च शुक्रवहनं स्तनाभ्यां भवति । शा. सं. प्र. ख. ५ अ. ५ टीका

*या एका शब्दाचे वेगवेगळे अर्थ कसे घ्यावेत? ते अत्यंत विसंगत व अशास्त्रीय* होईल अशी शंका उत्पन्न होणे अगदी स्वाभाविक आहे. पण हा वाद पूर्णपणे तुटेल असे आम्हालाही म्हणावयाचे नाही. सिरा, धमनी, स्रोतस् यांविषयी कोणतेही एक निश्चित मत मांडता येऊ नये अशीच खरोखर स्थिती आहे.

खालील वचने पाहिली म्हणजे यांच्या परिभाषेच्या निश्चितीकरणासाठी कोणतेही एकमत मांडले तरी त्यास काही अनुकूल, काही अगदी प्रतिकूल, तर काही संदिग्ध असे पुरावे अधिकृत ग्रंथांत निश्चितपणे उपलब्ध होतात. आम्ही आज आमच्यापुरती परिभाषा निश्चित करण्याचा प्रयत्न करीत आहोत. अर्थातच हा शेवटचा निर्णय नाही. परंतु व्यवहाराच्या सोईसाठी कोठे तरी थांबून निश्चित परिभाषा रूढ करणे आवश्यक आहे हे खरे. चरकासारख्या अत्यंत अधिकृत ग्रंथामध्ये स्पष्टपणे सिरा, धमनी, स्रोतस् हे शब्द परस्परांचे पर्याय म्हणूनच सांगितले आहेत. ज्या सुश्रुताने धमनी स्रोतसापेक्षा किंवा सिरापेक्षा वेगळी आहे असे म्हटले आहे त्यानेच त्यांची एकरूपता मानली आहे की काय असे वाटण्यासारखी परिस्थिती स्तन्यवह व आर्तववह धमनी स्रोतसांच्या प्रकरणी झाली आहे. तरी पण या प्रकरणी एक गोष्ट स्पष्ट होते. सुश्रुत हा चरकानंतरचा ग्रंथकार आहे. त्याने चरकाच्या पर्यायवाचकतेच्या घोटाळ्यातून सिरा, धमनी, स्रोतसांना परस्परांपासून वेगळे मानून परिभाषा निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. आम्हीही त्या दृष्टीने प्रयत्न करीत आहोत.

धमनी प्रकरणातच शब्द-स्पर्श-रूपांचे वहन करणाऱ्या धमन्या आणि अश्रू, रक्त, आर्तव यांचे वहन करणाऱ्या धमन्या, 'धमनी' या नावाने एकाच प्रकरणात एकत्रच दिलेल्या आहेत. शरीराचे पूर्ण ज्ञान उपलब्ध असताना रूपवह धमनी आणि रक्तवह धमनी ही आजच्या वर्गीकरणाप्रमाणे एकजातीय कशी मानता येईल? आजचे त्यांचे वर्गीकरण जातिदृष्टया वेगवेगळे पाहिजे; म्हणून आम्ही वर एकापुढे एक आलेल्या धमनींचे अर्थ आमच्या मताप्रमाणे वेगवेगळे केले आहेत.

## (११) मर्मे[१] :

अधोभागामध्ये स्त्रीपुरुषांच्या कटिरामध्ये एकूण आठ मर्मे आहेत. एका व्यक्तीमध्ये स्त्री-पुरुष भेदाने अनुक्रमे सात-सात असतात. सेवनी, गुद, मूत्रसेक, (गविनी); मूत्रवह (बाह्य मूत्रमार्ग), योनी (तीनही आवर्त), बस्ती (मूत्राशय) हे सहा व दोन अंतःफल व आर्तववह स्रोतस् अशी ही स्त्रीश्रोणीमध्ये असणारी (एकूण आठ) मर्मे होत. या भागातील शस्त्रकर्माच्या वेळी या अवयवांना धक्का लागणार नाही, याची काळजी शस्त्रकर्मप्रसंगी घेतली पाहिजे. येथे जर विशेषतः अंतःफलापासून निघणाऱ्या स्रोतसांचा वेध झाला तर वंध्यत्व येते; मैथुनाचे असहत्व येते आणि रजःप्रवृत्ती नष्ट होते. [येथील स्रोतोवेधाचा आज वंध्यत्व यावे म्हणून उपयोग केला जातो. पुरुषामध्ये शुक्रवह-स्रोतसांच्या वेधाचा परिणामही यथासंभव असाच होतो आणि त्यांचाही प्रजोत्पत्ती थांबविण्यास उपयोग करून घेतला जातो. स्रोतोवेध करीत असताना जर चूक झाली तर त्याचा परिणाम मैथुनासहिष्णुत्व व रजोनाश यांमध्ये होऊन स्त्रीचे जीवन कष्टमय होण्याची शक्यता असते] बीजवाहिनी छेदनात सिरा, धमनी यांचा छेद होणार नाही याची काळजी घ्यावी. येथे आर्तवनाश या शब्दाचा अर्थ रजोविकृती असा घ्यावा. म्हणजेच प्रत्यक्षामध्ये रजोवृद्धी किंवा रजोविकृती ही लक्षणे सापडतात.

(अ) **सेवनी मर्म :** [१]सेवनी मर्माच्या ठिकाणी आघात झाला तर शूल सातत्याने सापडतो. विशेषतः प्रौढ वयातील प्रथम प्रसवेत विटपभेद होऊन रुजाप्रादुर्भाव जास्त सापडतो. तो टाळण्यासाठी गर्भिणी परिचर्या सांगत असताना, गर्भिणी अवस्थेच्या शेवटच्या दोन महिन्यांत योनिभागी तेलाने भिजवलेला पिचू सातत्याने ठेवावा व अनुवासन बस्ती द्यावा. म्हणजे अवयवाचे स्नेहन होऊन अवयव मृदू होतो व अपान वायूचे अनुलोमनामुळे प्रसवामध्ये होणारा मर्माघात टळतो. याच तत्त्वावर प्रसवपरिचर्या करत असतानाही योनीचे स्नेहन करावयास सांगितले आहे.

(ब) **बस्ती :** मूढगर्भ किंवा गर्भसंगामध्ये मूत्रनिर्हरण न करता जर गर्भशंकू लावला तर या मर्माला आघात होण्याची शक्यता असते. मूढगर्भाची चिकित्सा सांगत असताना ज्या उत्कर्षण...इत्यादी क्रिया सांगितलेल्या आहेत त्या करण्यापूर्वी मूत्रनिर्हरण केले नाही तर बस्ती या मर्माला आघात होण्याची शक्यता असते. तसेच वामदेवीय प्रसव करीत असतानाही मूत्राशय रिकामा केला गेला नाही तर बस्तीला आघात होण्याची शक्यता असते. स्त्री-रोगातील गर्भाशयविषयक शस्त्रकर्मे करत असतानाही ही काळजी घेणे आवश्यक आहे. नाही तर मर्माघातामुळे नाडीव्रण निर्माण होतो.

---

– स्रोतांसि सिरा धमन्यो रसायन्यो...............शरीर धात्ववकाशानां लक्ष्यालक्षाणा नामानि भवति । च. वि. ५–९

– स्रोतसां व्यवहारार्थं पर्यायान् आह स्रोतांसि इत्यादि । च. वि. ५–९ टीका

– वातपित्तकफशोणितरसान् द्वे द्वे वहतः
शब्दरूपरसगंधान् अष्टाभिर्गृह्णीते । द्वे च अश्रुवाहिन्यौ । सु. शा. ९–५

१ सेवनी शुक्रहरणी स्रोतसी फलयोर्गुदम् ।
मूत्रसेक मूत्रवहं योनिर्बस्तिस्तथाऽष्टमः । सु. चि. ७–३८

– शुक्रवहे द्वे, तयोर्मूलं स्तनौ वृषणौ च, तत्र विद्धस्य क्लीबता, चिरात् प्रसेको रक्तशुक्रता च ।
आर्तववहे द्वे, तयोर्मूलं गर्भाशयः आर्तववाहिन्यश्च धमन्यः तत्र विद्धाया वन्ध्यात्वं मैथुनासहिष्णुत्वं आर्तवनाशश्च । सेवनीच्छेदाद्रुजाप्रादुर्भावः । सु. शा. ९–१२

१ सेवनीच्छेदात् रुजाप्रादुर्भावः ।

(क) **मूत्रवह :** योनीतून म्हणजेच प्रथम आवर्तामधून गर्भशिराचे निष्क्रमण होत असताना ते जर योनिद्वारापेक्षा थोडेसे मोठे असेल ( व्यासाने ) तर मूत्रवहमर्माच्या ठिकाणी आघात होऊन त्याचे विदारण होते.

(ड) **मूत्रसेक :** स्त्री-रोगामध्ये गर्भाशयविषयक शस्त्रकर्मामध्ये या दोन्ही गविनींना आघात होण्याची शक्यता असते.

(इ) **गुद :** गर्भसंगामध्ये गर्भशंकू लावत असताना किंवा आवि प्राकृत असून योनिसंवरण असताना मूढगर्भातील शेवटच्या प्रकारामध्ये ( विष्कंभ ) गुदमर्माला आघात होतो.

(फ) **त्र्यावर्त योनी :** योनी या शब्दात त्र्यावर्त योनी अपेक्षित आहे.

अभिघातज – स्त्रीरोगांची चिकित्सा करत असताना, उदा.– गर्भाशय लेखनाचा अतियोग, वामदेवीय प्रसव, रक्तगुल्म निर्हरण वा सूचिमुखी किंवा अंतर्मुखी योनी वगैरे चिकित्सा करत असताना या मर्माला आघात होतो.

वर वर्णन केल्याप्रमाणे मूढगर्भाचे उपचार करीत असताना, वा विकृत प्रसवामध्ये या वरील उल्लेखिलेल्या मर्मांपैकी सेवनी, गुद, मूत्रसेक, बस्ती, योनी या अवयवांना दुखापत पोहोचून रुजाप्रादुर्भावादी अनेक विकृती उत्पन्न होतात; म्हणून या मर्माचे महत्त्व नीट लक्षात ठेवले पाहिजे.

## शारीरक्रिया विज्ञान

### स्त्री – शुक्र :

स्त्री-शरीरामध्ये सर्वसामान्य मानवी शरीराप्रमाणे वा पुरुषाप्रमाणे रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व (शुक्र) आर्तव असे सात धातू आहेतच. यांतील पुरुष शरीरातील शुक्राच्या समानधर्माचे म्हणून स्त्री-शरीरामध्ये आर्तव मानले जाते. असे सात धातू होतात. परंतु काही ग्रंथकार स्त्रीशरीरामध्येही शुक्र असा स्वतंत्र धातू मानतात. त्याचा उपयोग साक्षात् गर्भधारणेशी नसला तरी मैथुनसमयी सुखोत्पादनासाठी त्याचा

– योषितोऽपि स्रवत्येवं शुक्रं पुंसः समागमे ।
तत्र गर्भस्य किंचित्तु करोतीति न चिंत्यते ॥ भा. पृष्ठ २९–२२१

– स्त्रीणां गर्भोपयोगिस्यादार्तवं सर्वसम्मतम् ।
तासामपि बलं वर्णं शुक्रं पुष्टिं करोति हि ॥ भा. पृष्ठ २९–२२३

– स्त्रियश्च सशुक्र एव, परं तासां शुक्रं गर्भारंभक न भवतीत्यादि प्रतिपादितं प्राक् ।
च. चि. १५–१६ टीका



स्राव कारणीभूत होतो. त्यामुळे शुक्राचे संपूर्ण कर्म जरी नसले तरी त्यातील काही अंशरूप कर्मे या धातूकडून होतात; त्यामुळे शुक्र हा धातू स्त्रियांच्यामध्येही असतो असे भावप्रकाशकाराने मानले आहे. शुक्र हे सर्व शरीरास बल–वर्ण–पुष्टी देते. मैथुनसमयी आनंददायक होते आणि प्रामुख्याने गर्भोत्पादक असते. यातील गर्भोत्पादनाशिवाय बाकीची सर्व कामे स्त्री-शुक्रही करते असे भावप्रकाशकार म्हणतो. आणि त्याचे ते मत चिंत्य असे आहे. त्यात स्त्रीशारीरविज्ञानाचा एक प्रकारचा बारकावा आहे यात शंका नाही.

[1] भावप्रकाशकाराने या स्त्रीशुक्रासंबंधी आणखी एक विधान केले आहे; ते मात्र संशयास्पद आहे. दोन स्त्रिया कामोन्मत्त होऊन ज्या वेळी परस्पर मैथुनास प्रवृत्त होतात त्या वेळी हे शुक्र स्रवून गर्भही उत्पन्न होतो. मात्र तो अस्थिरहित असतो; असे तो म्हणतो. यातील प्रथमार्ध सत्य आहे. विकृतमनोवृत्तींच्या स्त्रियांमध्ये विकृतमनोवृत्तींच्या पुरुषाप्रमाणेच समलिंगी मैथुनप्रवृत्ती आढळते. त्या वेळी पिच्छिल द्रवरूप अशा द्रव्याचा स्रावही होतो. परंतु त्या योगाने अस्थिरहित का होईना पण गर्भोत्पत्ती कशी होते हे समजणे कठीण आहे.

### रज, रक्त, आर्तव :

स्त्रियांमध्ये रजःस्राव ही एक विशिष्ट अवस्था प्रत्येक महिन्यामध्ये उत्पन्न होते. ती वयाच्या सुमारे १२ व्या वर्षापासून ५० व्या वर्षापर्यंत टिकते आणि सगर्भावस्थेमध्ये प्रायः तिचा अभाव असतो. या प्रकरणामध्ये सामान्यतः तीन शब्द ग्रंथान्तरी प्रचारामध्ये येतात. आर्तव, रज आणि रक्त. यात परिभाषेची निश्चिती नाही कोणताही शब्द कोणत्याही अर्थाने मूळ ग्रंथामध्ये येतो. परिभाषा निश्चित करण्याच्या दृष्टीने आमच्या या ग्रंथात तरी आम्ही हे शब्द विशिष्ट अर्थानेच वापरणार आहोत. तसे मानण्यास अधिकृत ग्रंथातून भरपूर आधारही आहेत.

[2] आर्तव म्हणजे गर्भधारणसमयी शुक्राशी संयोग पावणारे स्त्रीबीज होय. उदरस्थ झालेल्या गर्भामध्ये जसे आस्थी आदी पितृबीजोत्पन्न भावविशेष असतात त्याप्रमाणेच यकृतादी मातृबीजोत्पन्न भावविशेषही असतात. सत्कार्यवादाप्रमाणे 'असत्'पासून 'सता'ची उत्पत्ती कधीच होणार नाही. तेव्हा या विशिष्ट भावांना उत्पन्न करणारे

१. यदा नार्यावुपेयातां वृषस्यन्तौ कथंचन ।
मुञ्चन्त्यौ शुक्रमन्योन्यमनस्थिस्तत्र जायते ॥ भा. पृष्ठ २९–२२२

२. बीज इति शुक्रशोणिते । बीजस्य अंगप्रत्यंगनिर्वर्तको भागः बीजभावः ।

– मनुष्यबीजं हि प्रत्यंगबीजभागसमुदायात्मकं स्वसदृशप्रत्यंगसमुदायरूपपुरुषजनकम् ।
च. शा. ३–२३ टीका

सूक्ष्म कारण बीजामध्ये असलेच पाहिजे. म्हणून स्त्रीशरीर जरी क्षेत्ररूप असले तरी ते संपूर्ण गर्भबीजाला क्षेत्ररूप आहे. गर्भबीज उत्पन्न होण्यासाठी पुरुषाप्रमाणेच स्त्रीचे स्वतंत्र महत्त्व आहे आणि त्यालाच उद्देशून शुक्रार्तवसंयोग गर्भोत्पादक मानला आहे. याकरिता आर्तवाचे कार्य गर्भोत्पत्तीच्या दृष्टीनेच मर्यादित व महत्त्वाचे आहे. म्हणून पुंबीजासारखा स्त्रीबीज हा शब्द आर्तवाचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी *आम्ही वापरला आहे.*

[1]अष्टांग संग्रहकाराने आर्तवही दोषाने दुष्ट झाले तर दुष्ट शुक्राप्रमाणे अबीज होते असे म्हणून आर्तवाचे बीजत्व स्पष्ट शब्दात सांगितले आहे.

रज हा आर्तवाप्रमाणे स्वतंत्र धातू मानला नसून रसाचा उपधातू मानला आहे.

[2]भावप्रकाशकाराने त्याला रक्ताचा उपधातू मानले आहे. स्वरूपसादृश्याचा विचार करता भावप्रकाशकारांचे म्हणणे ठीक आहे. तरी पण चरक, सुश्रुत इत्यादी महर्षींनी रसाचा उपधातू म्हणून केलेले वर्णन उचित आहे. रस हा सर्व शरीरभावाचे पोषण करणारा पदार्थ असल्याने अपत्यजन्मानंतर स्तन्यरूपाने बालकाचे पोषण होते तर प्रसादभाग रजोरूपाने गर्भाचे पोषण होते.

[3]याच प्रसादभागरजोरूपाचे वर्णन करताना चरकाने ते गुंज, तांबडे कमळ; आळता वा इंद्रगोपकिडा यांच्या रंगाचे असते असे म्हटले आहे.

[4]वाग्भटही सशाच्या रक्ताची किंवा लाक्षारसाची उपमा या प्रसादरूप रजाच्या रंगाला देतो. जर क्वचित ते व्यक्त झालेच तर त्याचा वस्त्रावरील डागही लवकर नाहीसा होतो असे त्यांनी सांगितले आहे. गर्भाधानानंतर हेच प्रसादरूप रज अपरेत मध्ये परिणत होते व याच्याच काही अंशाने गर्भिणीच्या स्तनांना पीनत्व येते.

[5]नित्यक्रमामध्ये हे रज स्त्री-शरीरामध्ये गर्भाशयात येणाऱ्या रस-रक्तवाहिन्यांच्या

१ "आर्तवमपि शुक्रवत् दोषैः उपसृष्टं अबीजमेव ।" – अ. सं. शा. १–२५
२ स्तन्यं रजो वसा स्वेदो दंताः केशास्तथैव च ।
ओजश्च सप्तधातूनां क्रमात् सप्तोपधातवः।। भा. पूर्वखंड गर्भप्रकरण पृ. ३१–२४८
३ गुंजाफलसवर्णं च पद्मालक्तकसंन्निभम् ।
इंद्रगोपकसंकाशमार्तवं शुद्धमादिशेत् । च. चि. ३०–२२६
४ लांक्षारसशशास्राभं धौत यच्च विरज्यते । वा. शा. १–१८
५ तद् वर्षात् द्वादशात् काले वर्तमानमसृक् पुनः ।
जरापक्वशरीराणां याति पंचाशतः क्षयम् ।। सु. शा. ३–११
मासि मासि रजः स्त्रीणां रसजं स्रवति त्र्यहम् ।
वत्सराद् द्वादशादूर्ध्वं याति पंचाशतः क्षयम् ।। वा. शा. १–७
मासेनोपचितं रक्तं धमनीभ्यामृतौ पुनः ।
ईषत् कृष्णं विगंधं च वायुर्योनिमुखान्नुदेत् ।। वा. शा. १–२२



( धमनीच्या ) द्वारा व्यानाच्या प्रेरणेने अवस्थित होते. ही स्थिती एक मासपर्यंत राहते. त्यात जर गर्भधारणा झाली नाही तर जे त्याचे कार्य त्यास वाव न मिळाल्यामुळे या रजाला मलरूपता प्राप्त होऊन ते अपत्यपथद्वारा शरीरातून प्रत्येक महिन्यात बाहेर पडते.

[1]लहान मुलांना शुक्र ( वा आर्तव ) असते. परंतु अतिशय थोडे असल्यामुळे दिसत नाही. जरी फुलांच्या कळ्यांमधून सुवास असला तरी तो ते फूल उमलल्याशिवाय येत नाही.

[2]हा काल तीन ते पाच दिवसांचा असतो. प्रकृतिस्थितीमध्ये या काळी दाह; शूल इत्यादी वेदना उत्पन्न होत नाहीत; परंतु थोडा क्लम मात्र असतो. बाहेर टाकल्या जाणाऱ्या रजाचा वर्ण ( ईषत् ) थोडासा काळसर असतो व त्यास कोणताही दुर्गंध वा बुळबुळीतपणा असत नाही.

[3]याचे प्रमाण एकूण चार अंजली असे जास्तीत जास्त असते. यापेक्षा फार कमी अथवा फार अधिक प्रमाण असणे ही विकृती मानली पाहिजे. या चार अंजली प्रमाणातही प्रकृत्यनुसार वेगवेगळेपणा आढळतो. वातप्रकृतीत रजाचे प्रमाण अगदी अल्प पण सकष्ट असते. कफप्रकृतीत ते मध्यम पण कष्टरहित असते व पित्तप्रकृतीत ते कष्टरहित असून प्रमाण सापेक्षतः सर्वांत अधिक असते.

प्रकृतीच्या वर्णनात या स्वरूपाचे वर्णन आलेले नाही. पुरुषव्यक्ती डोळ्यांपुढे ठेवूनच बहुतेक प्रकृती वर्णिल्या आहेत. स्त्रियांच्या दृष्टीने त्या प्रकृति-वर्णनात रजःप्रवृत्तीची ही विविधता समाविष्ट केली पाहिजे. केवळ या एका साधनाने उलट क्रमाने प्रकृती निश्चित करता येईल असे नाही. पण इतर अनेक लक्षणांच्या समवेत या रजःप्रवृत्तिरूपलक्षणांच्या सहाय्याने प्रकृतिविनिश्चयास पुष्कळ सहाय्य होईल म्हणून याही लक्षणाचा समावेश प्रकृति-वर्णनात करावा.

[4]रक्त शब्द अर्थदृष्ट्या उभयान्वयी आहे. ज्या वेळी गर्भोत्पत्तीशी त्याचा संबंध

मासेनोपचितं काले धमनीभ्यां तदार्तवम् ।
ईषत् कृष्णं विवर्णं च वायुर्योनिमुखं नयेत् ।। सु. शा. ३–१०
१ बालानां शुक्रमस्त्येव किन्तु सौक्ष्म्यान्न दृश्यते ।
पुष्पाणां मुकुले गन्धो यथा सन्नपि नाप्यते ।। भा. पूर्वखंड पृष्ठ ३०
२ मासान्निष्पिच्छदाहार्ति पंचरात्रानुबंधि च ।
नैवातिबहु नात्यल्पमार्तवं शुद्धमादिशेत् ।। च. चि. ३०–२२५
३ आर्तवं हि चतुरंजलिप्रमाणं शुक्रं तु प्रसृतिमात्रम् । सु. शा. ३–५ टीका
४ रसात् स्तन्यं ततो ( तथा ) ( स्त्रियाः ) रक्तं असृजः कंडराः सिराः ।
च. चि. अ. १५–१७

वर्णिलेला असतो त्या ठिकाणी रक्त शब्दाचा अर्थ आर्तव असा घ्यावा, आणि ज्या वेळी मासिक पाळीशी त्याचा संबंध जोडला जातो त्या वेळी 'रज' असा अर्थ घ्यावा.

आर्तव हे प्रतिमासी नवीन उत्पन्न होत असते; म्हणूनच त्यास 'ऋतुमवं आर्तवम्' या व्युत्पत्तीने आर्तव ही संज्ञा प्राप्त झाली आहे. ऋतू शब्द नियतकालाचा वाचक असून या ठिकाणी तो स्थूलमानाने एक महिन्याचा द्योतक आहे. त्यातही गर्भोत्पत्तीस अनुकूल असा ऋतुकाल वेगळा आहेच; त्याचा विचार गर्भोत्पत्ती-प्रकरणी करू.

## रजस्वला व ऋतुमती

### रजस्वला :

पुरुषाने कोणत्या स्त्रीशी मैथुन करू नये असा उल्लेख करताना रजस्वला हा शब्द वापरला आहे. यावरून व लोकभाषेवरून रजःप्रवृत्तीच्या तीन दिवसांमध्ये स्त्रीला 'रजस्वला' हे विशेषण असल्याचे निश्चित होते. या कालात योनिद्वाराने सुमारे तीन दिवसपर्यंत किंचित काळसर वर्णाचा रजःस्राव होत असतो. या अवस्थेमध्ये स्त्रीने काही विशेष आहार–विहार सांभाळणे आवश्यक आहे. जुन्या वळणाच्या आचार-विचारांत स्त्री ही अस्पृश्य समजली जात असल्यामुळे काही चांगल्या गोष्टी आपोआप आचारात येत असत. आज मात्र त्या नियमांचा मुद्दाम उल्लेख करणे आवश्यक झाले आहे. शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने या नियमांचे पालन हितकर आहे. ते नियम असे—

रजस्वलेने रजस्राव सुरू झाल्यापासून तीन दिवसपर्यंत मैथुन अगदी वर्ज्य मानावे; प्राणिहिंसा करू नये. दर्भाच्या शय्येवर (चटयांवर) झोपावे. पतीचे दर्शनही घेऊ नये. जेवण जेवावयाचे ते दूध व यव (सातू) यांच्यापासून बनविलेले अन्न कमी प्रमाणात, पत्रावळीवर, परळात किंवा नुसत्या हातांत घेऊनच खावे. शोक करू नये. नखे काढणे, अभ्यंग करणे, उटणे लावणे, डोळ्यांत काजळ घालणे, स्नान करणे, दिवसा झोपणे, धावपळ करणे, फार मोठे आवाज ऐकणे, फार हसणे, सारखी बडबड करणे, श्रमाची कामे करणे, जमीन खणणे आणि वारे अंगावर घेणे इत्यादी गोष्टी करू नयेत. शरीर शृंगारणे किंवा अलंकार घालणे या गोष्टी वर्ज्य कराव्यात. आहार जो घ्यावयाचा तो कोष्ठाचे शोधन होईल (मलानुलोमन) अशा बेताचा आणि लेखन गुणाचा असावा. तीन दिवस शक्य तो चांगल्या, कल्याणकर, हितकर गोष्टींचे चिंतन व मनन करावे. चांगले विचार मनात आणावे.

हे सर्व नियम शरीराचे आणि मनाचे आरोग्य टिकविण्यासाठी, परिणामतः अत्यंत हितकर आहेत. लोकरूढीमध्ये काही वेळा याचा विपर्यास झालेला दिसतो, आणि रजस्वलेच्या कपाळी कसली तरी घाणेरडी जागा व आहाराच्या बाबतीत शिळेपाके अन्न वाटयास येते; हे निश्चितच शास्त्रोक्त नाही.

ब्रह्मचर्यपालन आवश्यक आहे. कारण एक तर रजस्वला अवस्थेमध्ये सर्व योनिमार्ग हा क्षुब्ध झालेला असतो. अशा वेळी मैथुनकर्म पीडाकर होण्याची फार शक्यता असते. त्यामुळे मैथुनकर्म हे वर्ज्यच मानले पाहिजे. शिवाय रजःस्राव चालू असताना शुक्र हे ऊर्ध्वगामी होऊन गर्भोत्पादन होणेही संभवनीय नसते. ग्रंथकाराने या कालामध्ये एक तर गर्भधारणा होतच नाही व झालीच तर ती टिकत नाही, आणि टिकली तर अपत्य मृत होते वा क्वचित जगलेच तर ते विकृत शरीराचे होते असे वर्णन केले आहे.

आहार हा अल्प असावा हे त्या काळात उत्पन्न होणारे अग्निमांद्य लक्षात घेता आवश्यक आहे. या वेळी अग्निमांद्य होणे हे अगदी स्वाभाविक असते. कारण स्वाभाविक

---

– रजस्वला व्याधिमती विशेषात् योनिरागिणी । भा. पृष्ठ १२–२५
– मासि मासि भगद्वारा प्रकृत्यैवार्तवं स्रवेत । भा. पृष्ठ १०–१
– मासि मासि रजः स्त्रीणां रसजं स्रवति त्र्यहम् । वा. शा. १–७
– आर्तवस्रावदिवसात् अहिंसाब्रह्मचारिणी ।
शयीत दर्भशय्यायां पश्येदपि पतिं न च ॥
करे शरावे पर्णे वा हविष्यं त्र्यहमाहरेत् ।
अश्रुपातं नखच्छेदमभ्यंगमनुलेपनम् ॥
नेत्रयोरंजनं स्नानं दिवास्वापं प्रधावनम् ।
अत्युच्चशब्दश्रवणं हसनं बहुभाषणम् ॥
आयासं भूमिखननं प्रवातं च विवर्जयेत् । भा. पृष्ठ १०–३, ४, ५

– ततः पुष्पेक्षणादेव कल्याणध्यायिनी त्र्यहम् ॥
मृजालंकाररहिता दर्भसंस्तरशायिनी ।
क्षैरेयं यावकं स्तोकं कोष्ठशोधनकर्षणम् ।
पर्णे शरावे हस्ते वा भुंजीत ब्रह्मचारिणी । वा. शा. १–२४
– ऋतौ प्रथमदिवसात् प्रभृति ब्रह्मचारिणी दिवास्वप्नांजनाश्रुपातस्नानानुलेपनाभ्यंगनखच्छेदनप्रधावनहसनकथनातिशब्दश्रवणावलेखनानिलायासान् परिहरेत् ।
सु. शा. २–२५
– तत्र प्रथमे दिवसे ऋतुमत्यां मैथुनगमनमनायुष्यं
पुंसां भवति, यश्च तत्राधीयते गर्भः स प्रसवमानो
विमुच्यते, द्वितीयेऽप्येवं सूतिकागृहे वा,
तृतीयेऽप्येवमसंपूर्णाङ्गोऽल्पायुर्वा भवति, चतुर्थे
तु संपूर्णाङ्गो दीर्घायुश्च भवति । न च प्रवर्तमाने
रक्ते बीजं प्रविष्टं गुणकरं भवति, यथा नद्यां
प्रतिस्रोतः प्लाविद्रव्यं प्रक्षिप्तं प्रतिनिवर्तते नोर्ध्वं
गच्छति तद्वदेतद्द्रष्टव्यम् तस्मान्नियमवतीं त्रिरात्रं परिहरेत् । सु. शा. २–३१

का होईना पण बऱ्याच प्रमाणात शरीरातून रक्त बाहेर जाते. रक्त कमी होणे हे अग्निमांद्याचे महत्त्वाचे कारण आहे. या काळी जर आमाची उत्पत्ती झाली तर तो अधिक पीडा उत्पन्न करील. आहाराच्या लेखनगुणामुळे रिक्त झालेल्या स्रोतसामध्ये दोषांची संचिती होत नाही.

स्नान वर्ज्य करावयास सांगितले याचा अर्थ स्वच्छताही पाळू नये असा नव्हे. योनिभागाची आवश्यक ती स्वच्छता विशेषतः केलीच पाहिजे. परंतु सर्व शरीराला स्नानामुळे जे उत्तेजन मिळते त्यामुळे रजःस्रावामध्ये व्यत्यय उत्पन्न होण्याचा संभव असतो. अति हसणे, बोलणे, यासाठीच वर्ज्य मानले आहे. शोकादी गोष्टींनी मन अधिकच दुबळे बनेल व त्याचा शरीरावरही परिणाम होईल.

*शरीराची इतर प्रसाधने वापरणे हे कामोत्तेजक असल्याने ते या स्थितीत* अनिष्ट आहे, म्हणून त्यासंबंधीचे नियम घातले आहेत.

चटईवर झोपणेही कामेच्छेला उत्तेजन मिळू नये म्हणूनच आहे. पतिदर्शन होऊ नये तेही यासाठीच.

श्रमाची कामे व फार हालचाल केली तर रजःस्राव जास्त प्रमाणात होतो आणि थकवाही अतिशय येतो, म्हणून विश्रांतीची आवश्यकता आहे. परंतु विश्रांतीसाठी दिवसा झोपणे मात्र हितकर नाही. त्यामुळे झालेली कफवृद्धी ही आमाप्रमाणेच पीडाकर होईल.

हे जे नियम आहेत ते जर पाळले नाहीत तर त्याचे भयानक दुष्परिणाम लगेच शरीरावर दिसतात असे नाही. तरी पण आदर्श आरोग्याच्या दृष्टीने शरीराची हानी व्हावयाची ती होतच असते आणि गर्भधारणा, प्रसूती, अपत्यसंगोपन ही कार्ये जितकी सुरळीत आणि सुखावह व्हावयाची ती तशी न होता त्यामध्ये अनेक तऱ्हेच्या व्यथा, पीडा उत्पन्न होतात, आणि स्त्री-रोगही उत्पन्न होण्याची शक्यता असते.

– अज्ञानाद्वा प्रमादाद्वा लोभाद्वा दैवतश्च वा ।
सा चेत्कुर्यान्निषिद्धानि गर्भो दोषास्तदाप्नुयात् ॥
एतस्या रोदनाद्गर्भो भवेद्विकृतलोचनः ।
नखच्छेदे कुनखी कुष्ठी त्वभ्यंगतो भवेत् ॥
अनुलेपात्तथा स्नानाद् दुःखशीलोऽञ्जनादृक् ।
स्वापशीलो दिवास्वापाच्चंचलः स्यात्प्रधावनात् ॥
अत्युच्चशब्दश्रवणाद्बधिरः खलु जायते ।
तालुदंतौष्ठ जिव्हासु श्यावो हसनतो भवेत् ॥
प्रलापी भूरिकथनादुन्मत्तस्तु परिश्रमात् ।
स्खलते भूमिखननादुन्मत्तो वातसेवनात् ॥ भा. पूर्वखंड गर्भप्रकरण ६ ते १०



रजस्वला जर सांगितलेल्या नियमांप्रमाणे वागणार नाही तर त्या दोषांचे परिणाम (पुढे होणाऱ्या) तिच्या गर्भास भोगावे लागतील. रजस्वला रडली तर गर्भाचे डोळे विकृत होतील. तिने नखे काढली तर तो गर्भ वाईट नखांचा व अभ्यंगामुळे गर्भ कुष्टी होईल. उटणे लावणे व स्नान करणे यामुळे बालक सर्वदा दुःख भोगणारे होईल. रजस्वलेने अंजन घातले तर बालक दृष्टिहीन निपजेल. दिवसा झोपल्यामुळे ते चंचल स्वभावाचे होईल. मोठ्या शब्दांच्या श्रवणामुळे ते बहिरे होईल. फार हसण्यामुळे त्याचे टाळू, जिव्हा, दात, ओठ हे काळे होतील. बडबडीमुळे मूल वाचाळ निघेल. अतिश्रमामुळे बालकास वेड लागेल. जमीन खणण्यामुळे बालक अडखळत चालणारे होईल. वाऱ्यावर बसण्यामुळे बालक वेडे होईल.

भावप्रकाशकारांनी सांगितलेली ही कार्यकारणमीमांसा वस्तुस्थितीस कितपत धरून आहे हे सांगता येणार नाही. कदाचित नियम योग्य रीतीने पाळले जावे यासाठी केवळ हा धाकही घातलेला असावा.

**ऋतुकाल :** चित्र पाहावे (९ अ) चक्र :

ऋतू आणि ऋतुकाल हे दोन्ही शब्द समान अर्थाचे वाचक आहेत. रजोदर्शनापासून गर्भधारणेस जो योग्यकाल तो ऋतू किंवा ऋतुकाल या शब्दाने संबोधिला जातो. वस्तुतः पहिले तीन दिवस हे मैथुनासाठी सर्व दृष्टीने अयोग्य असे गणले गेले असल्याने चवथ्या दिवसापासूनच पुढे आठ किंवा बारा दिवसांचा जो काल गर्भाधानास योग्य काल म्हणून ऋतुकाल मानला आहे. काही आचार्य स्त्रीचे योनी, गर्भाशय आणि आर्तव हे भावदोषांच्या दुष्टीपासून अत्यंत अलिप्त असतील म्हणजेच शुद्ध असतील तर सर्व मासभर ऋतुकाल मानतात. ही ऋतुकालाची दीर्घता बहुधा कफप्रकृतीच्या स्त्रियांत आढळते किंवा ज्यांच्या आहारामध्ये दूधतुपासारखे पदार्थ जास्त असतात आणि स्वभावाने ज्या आनंदी असतात, त्यांच्यामध्येही ऋतुकाल दीर्घकालीन असतो. या अवस्थेमध्ये गर्भाधानयोग्यता असल्यामुळे नेहमीच ऋतू असतो. त्याची मर्यादा विशेषरीत्या सांगण्याचे कारण नाही. मात्र या कालातही रजाच्या दृष्टीने क्रमाने चयापचयाची अवस्था येतेच. त्यामुळे चयकाल व अपचयकाल असे विशेष

– ऋतुस्तु दृष्टार्तवो द्वादशरात्रं भवति । षोडशरात्रमित्यन्ये । शुद्धयोनिगर्भाशयार्तवाया । मासमपि केचित् । तद्वददुष्टार्तवोऽप्यस्तीत्यपरे । अ. सं. शा. १–४१

– मासि भवादार्तवदर्शनादारभ्य यावत् द्वादशरात्रम् । अन्येत्वाचार्याः षोडशरात्रमिति वदन्ति । अन्ये त्वेवं वदन्ति सर्वथा योन्यादीनां शुद्धौ दोषानुपहितत्वे सति मासमृतुर्भवतीति । अत्र सदैवर्तुः क्रमोपचयापचये तु विशेषः गर्भाधानाय न विशेषः ऋतुत्वोपदर्शनरहितं अन्ये ऋतुमिच्छन्ति । इति मतचातुर्विध्यं गर्भस्यानियत दर्शनात् । अ. सं. शा. १–४१ टीका

विभाग या मासकल्पित ऋतुकाळात असतातच. काही आचार्य प्रत्यक्ष रजोदर्शन न होताही ऋतुकाल असू शकतो असे मानतात. व्यवहारात आपण मिधे दिवस ( प्रसूतीनंतर पुन्हा रजोदर्शन न होताच गर्भधारणा होणे ) राहिले असे जे म्हणतो ते याच मतास अनुसरून आहे. ही अवस्था प्रसूतीनंतरच येते असे नाही. पूर्वी ज्या वेळी बालविवाह होत असत त्या वेळी प्रथम प्रसूती ही अशी अदृष्ट ऋतुकालीन संभवत असे.

ही जी ऋतुकालासंबंधीची चार मते आहेत ती चारही आपापल्या परीने बरोबरच आहेत. कारण गर्भसंभव असा अनियतकालीन असल्याचे अनेक वेळा प्रत्ययास येते.

### ऋतुमती :

गर्भाधानास योग्य काल जिच्याठिकाणी प्राप्त झाला आहे त्या स्त्रीस ऋतुमती अशी परिभाषिक संज्ञा आहे. रजःप्रवृत्तीच्या तीन दिवसांनंतर या अवस्थेमध्ये स्त्री प्रविष्ट होते; त्या वेळी तिची मुद्रा झालेल्या रजःस्रावामुळे किंचित ओढल्यासारखी दिसते, तरी आकर्षक आणि प्रसन्न असते. तिच्या नितंब, स्तन, ऊरू, भुज, नाभी या ठिकाणी एक तऱ्हेचे स्फुरण होत असते. नेत्र किंचित पेंगुळल्यासारखे दिसतात. कुशी मोकळ्या झाल्यासारख्या ( हलक्या ) वाटतात. पुरुष सहवासाची इच्छा तिच्या ठिकाणी उत्पन्न होते. त्यामुळे तद्विषयक गोष्टी ऐकणे तिला आवडते आणि कामसुखाविषयी ती सहर्ष उत्सुक असते. या लक्षणांवरून स्त्रीच्या ठिकाणी गर्भाधानास योग्य असा ऋतुकाल प्राप्त झाला आहे असे समजावे.

---

– घृतक्षीरादिनित्यासु मुदितासु कफात्मसु ।
आर्तवं तिष्ठति चिरं विपरीतास्वतोऽन्यथा । अ. सं. शा. १–६९

– याश्च श्लेष्मप्रकृतयस्तासामार्तवं गर्भयोग्यं शोणितं ऋतौ बहुकालं भवति । न तु क्षीयते । नापि विकृतिं आयातीत्यर्थः । यथोक्तलक्षणविपरीतासु विपरीतं चिरं न तिष्ठतीत्यर्थः । अ. सं. शा. १–६९ टीका

– ऋतुस्तु द्वादशरात्रं भवति दृष्टार्तवः ।
अदृष्टार्तवोऽप्यस्तीत्येके भाषंते । सु. शा. ३–६

– आर्तवस्रावदिवसादृतुःषोडशरात्रयः ।
गर्भग्रहणयोगस्तु स एव समयः स्मृतः ।। भा. पृष्ठ १०–२

– पीनप्रसन्नवदना प्रक्लिन्नात्ममुखद्विजाम् ।
नरकामां प्रियकथां स्रस्तकुक्ष्यक्षिमूर्धजाम् ।।
स्फुरद्भुजकुचश्रोणि नाभ्यूरुजघनस्फिचाम् ।
हर्षौत्सुक्यपरां चापि विद्यात् ऋतुमतीमिति ।। सु. शा. ३–७, ८

– क्षामप्रसन्नवदनां स्फुरच्छ्रोणिपयोधराम् ।
स्रस्ताक्षिकुक्षिं पुंस्कामां विद्यात् ऋतुमतीं स्त्रियम् । वा. शा. १–२०



या अवस्थेत संचय झालेले पहिले ( जुने ) रज स्रवून जाते आणि नवे संचित होऊ लागून त्याचा संचय पूर्ण होतो. योनी शुद्ध होते. आर्तव प्रकृत स्थितीत असते. आवर्त हे आग्नेय गुणभूयिष्ट असल्याने स्त्रीचा शरीरोष्मा या काली थोडा वाढतो. गर्भाशय गर्भग्रहणास योग्य असा होतो.

या कालामध्ये जर गर्भधारणा झाली नाही तर ज्याप्रमाणे दिवस मावळल्यानंतर विकसित कलम मिटावे, संकोच पावावे त्याप्रमाणे गर्भाशयही संकोच पावतो. ही स्थिती पूर्ण झाली की मासभर संचित असलेले रज अपानवायूच्या प्रेरणेने योनिद्वारातून बाहेर टाकले जाते. अशा रीतीने हे चक्र स्त्रीच्या वयाच्या ५० व्या वर्षापर्यंत गर्भिणी, सूतिका या अवस्थेव्यतिरिक्त मासानुमास सतत चालू असते.

[१]काहींच्या मते या प्रतिमासी होणाऱ्या रजःस्रावामुळे स्त्रीचे शरीर हे प्रत्येक वेळी शुद्ध होते. दोषांचे शोधन असे आपोआप झाल्यामुळे तिला प्रमेहासारख्या व्याधी होत नाहीत. हे विधान संपूर्ण सत्य मानता येत नाही. माधवनिदानाच्या मधुकोश टीकेत या विधानाविषयी संशय प्रगट केला आहे. स्त्रियांनाही प्रमेह होतो असे आढळते असे तो म्हणतो. पण त्याने या रजःप्रवृत्तीमुळे होणाऱ्या दोषशुद्धीने इतरही योगांचा संभव उणावतो असे विधान केले आहे. स्त्रीशरीर कोमल असूनही अनेक वेळा ते पुरुषापेक्षा कमी वेळा व्याधिपीडित असते असे अगदी स्थूलमानाने म्हणण्यासारखी परिस्थिती आहे.

स्त्रीमध्ये अकाली रजोनिवृत्ती झाली तर आवृत्त-वाताची लक्षणे सापडतात. उदा.– मेदोवृद्धी, संधिशूल, अस्थिशूल इत्यादी. त्याचप्रमाणे रजःक्षीणतेमध्ये अंग-

---

– एवं विस्त्रां स्त्रियमृतुमती-ऋतुयुक्तां विद्यात् ।
तस्याः स गर्भग्रहणकाल इत्यर्थः । वा. शा. १–२० टीका

– गते पुराणे रजसि नवे चावस्थिते, शुद्धास्नातां स्त्रियमव्यापन्ना योनिशोणितगर्भाशयामृतुमतीं आचक्ष्महे । च. शा. ४–७

– पुरुषस्य गुणैर्युक्ता विहिता न्यूनभोजना ।
नारी ऋतुमती पुंसा संगच्छेत्तु सुतार्थिनी ।। भा. पू. १२–२३

– पुराण इति ऋतुकालातिक्रमसंचिते । च. शा. ४–७ टीका

– ऋतुकालजं आर्तवं शुद्धशोणितम् । सु. शा. २–४८

– आर्तवमाग्नेयम् । सु. शा. ३–३

– रक्तलक्षणमार्तवं गर्भकृच्च । सु. स. १५–५

– नियतं दिवसेऽतीते संकुचत्यम्बुजं यथा ।
ऋतौ व्यतीते नार्यास्तु योनिः संव्रियते तथा । सु. शा. ३–९

१ रजः प्रसेकान्नारीणां मासि मासि विशुध्यति ।
सर्वं शरीरं दोषाश्च न प्रमेहन्त्यतः स्त्रियः ।। सु. नि. ६–३ टीका

– एतद्धेतुबलादन्यरोगासंभवत्वाच्चैतत्
प्रायोवादमाश्रित्योक्तम् । मा. नि. प्रमेह-प्रकरण ३६ टीका

गौरव, मेदोवृद्धी अग्निमांद्य इत्यादी लक्षणे सापडतात. स्त्रीच्या आयुष्यात प्राकृत रजोनिवृत्ती वयाच्या ५० व्या वर्षी तिच्या धातुक्षीणतेमुळे येते. सर्व धातूंचे जे सार ओज, त्याचीही क्षीणता होत असल्यामुळे स्त्रीच्या शरीरावर ओज-क्षयाची लक्षणे दिसू लागतात.

रजोनिवृत्ती व रजःक्षीणता यावर चिकित्सा केली असता ही लक्षणे नाहीशी होतात.

### स्त्री–शरीरात प्रतिमासिक उत्पन्न होणाऱ्या प्राकृत अवस्था

| १ | रजःकाल | ऋतुकाल | ऋतुव्यतीतकाल |
|---|---|---|---|
| (१) दोष | वात | कफ | पित्त |
| (२) | रजस्वला | ऋतुमती | ऋतुव्यतिता |
| (३) | मलरूप रज स्रवत असतानाचा काल | प्रसादरूप रजाचा काल | पुराणरजाचा काल |
| (४) | पहिले ३ ते ५ दिवस | गर्भधारणेस योग्यकाल, त्याबद्दलची मते<br>१. पहिले १६ दिवस<br>२. पहिले १२ दिवस<br>३. महिनाभर | ऋतुकाल संपल्यापासून पुढील रजोदर्शन होईपर्यंत |
| लक्षणे (५) | अधोदरशूल अधोगुरुत्व, कटिशूल, पिंडिकोद्वेष्टन, क्वचित ऊरूचे ठिकाणी शूल, मलावष्टंभ, हृल्लास क्वचित छर्दि ऋतुकाळात सुरू झालेली लक्षणे— स्तनशूल व स्तनगौरव नाहीसे होते. | प्रसन्नता, लाघवत्व उत्साहित, नितंब-ऊरू-स्तन-भुज-नाभी या ठिकाणी स्फुरण | स्तनशूल व स्तन-गौरवास आरंभ |

| २ | मलरूप रज | प्रसादरूप रज | (आर्तव स्त्रीबीज) |
|---|---|---|---|
| १. स्थान | गर्भाशय | गर्भाशय | अंतःफल |
| २. प्रमाण | ४ अंजली | | २ बिंदू |
| ३. रंग | इषत् कृष्ण | लाक्षारसाप्रमाणे, सशाच्या रक्ताप्रमाणे रक्तवर्ण | ... |
| ४. गंध | विगंध | लोहगंध | .... |
| ५. कार्य | शरीर शोधन | पोषण | गर्भोत्पत्ती |
| ६. गुण | आग्नेय | आग्नेय | आग्नेय |



## विकृति-विज्ञान

या प्रकरणामध्ये स्त्रियांच्यामध्ये उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या व्याधींचा विचार केला जातो. व्याधींच्या उत्पत्तीस कारणीभूत होणारे जे भाव इतर सामान्य व्याधींमध्ये मानले जातात, तसेच ते स्त्रीविशिष्ट व्याधींमध्येही कारणीभूत असतात. त्यामुळे व्याधिलक्षणे, व्याधिसंप्राप्ती, व्याधीची अवस्था, या ठिकाणी सर्वसामान्य व्याधिविज्ञानाचे जे नियम वा ज्ञानोपाय आहेत तेच येथेही तारतम्याने वापरले पाहिजेत. सर्वसामान्यपणे थोडक्यात सांगावयाचे झाले तर दोषदुष्टी आणि स्थान-वैगुण्य हे जे व्यवहारतः स्वतंत्र दिसणारे पण तत्त्वतः परस्परावलंबी असणारे भाव, तेच कोणत्याही व्याधीच्या उत्पत्तीला कारणीभूत होतात. स्त्रीरोगांच्या बाबतीतही तेच घडते. तसेच लक्षण आणि व्याधी यांची भिन्नताही स्थूलमानाने त्यांतील तदात्व ( परस्वाधीनता ) पाहून ठरविता येते. त्यामुळे एकदा जे लक्षण असते ते अन्य कोण्या संप्राप्तीवर अवलंबून नसेल तर स्वतंत्र व्याधी म्हणूनही मानता येते. वर्गीकरणाचा हा नियम एकदा स्पष्टपणे लक्षात ठेवला म्हणजे मग आमचे पुढील विवेचन समजून घेताना अडचण उत्पन्न होणार नाही.

रोगोत्पत्ती ही जशी दोषांच्या आणि तज्जन्य धातुमलांच्या वृद्धिक्षय दुष्टीवर अवलंबून असते, त्याप्रमाणेच स्थानवैगुण्यावरही अवलंबून असते. हे स्थानवैगुण्य मूलतः कशामुळे उत्पन्न होते व केव्हा उत्पन्न होते याचे विवेचन निदानविषयक ग्रंथात येईल. येथे फक्त स्थानवैगुण्याचा, आहे तसा विचार करावयाचा आहे. स्थानवैगुण्य स्रोतोमय असते असेच मानले पाहिजे. कारण शरीरातील कोणत्याही भावविशेषांच्या उत्पत्तीस स्रोतसेच कारण असतात. मग ते भावविशेष धातूंच्या उत्पत्तीसारखे प्राकृत आरोग्यमय अवस्थेतील असोत वा रोगलक्षणांसारखे अनारोग्यावस्थेतील असोत. स्रोतसे ही शरीरातील अवयवविशेष आहेत हेही स्पष्ट आहे. यांची विकृती, अतिप्रवृत्ती, संग, ग्रंथी, विमार्गगमन या स्वरूपांत स्रोतसांच्या रचनेची वा क्रियेची विक्रिया दाखविते. विमार्गगमन आणि संग या लक्षणांचे व्यक्त स्वरूप जरी एकच असले तरी त्यांच्यामध्ये कार्याची विकृती व रचनेची विकृती

– अन्येऽपि च मला यथायथं मलायनं
शोषशून्यत्वलाघवैः । ( पीडयन्ति ) अ. सं. सू. अ. १९ पृष्ठ १४०

– अतिप्रवृत्तिः संगो वा सिराणां ग्रंथयोपि वा ।
विमार्गगमनं चापि स्रोतसां दुष्टिलक्षणं ।। च. वि. ५–२४

– कुपितानांहि दोषाणां शरीरे परिधावताम् ।
यत्र संगः स्ववैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते ।। सु. सू. २३–१०

– स एव कुपितो दोषः समुत्थान विशेषतः ।
स्थानान्तराणि च प्राप्य जनयत्यामयान् बहून् ।। च. सू. १८–४५

यांपैकी काहीही किंवा दोनही हेतू असतात आणि त्यास मार्गावरोध हे अवयवाच्या बाहेरचेही कारण असू शकते. उदा.– संग हे एकच व्यक्त लक्षण जर घेतले तर ते तीन प्रकारांनी असू शकेल. जो भाव स्रवावयाचा तोच अल्प असेल तर, ज्या मार्गातून स्रवावयाचा तो मार्ग सूक्ष्म असेल तर, किंवा त्या मार्गामध्ये काही अडथळा उत्पन्न झाला तर, उदा.– मलांच्या क्षयाची कारणे देताना जे मलायतन आहे ते सुकले, मुळातच नसले, किंवा लहान असले तर क्षय वा अभाव प्रत्ययास येतो. उदा.– स्तन कृश असले म्हणजे स्तन्यच पुरेसे येत नाही. ज्यामुळे तो धातू किंवा तो भाव उत्पन्न व्हावयाचा तेच अल्प असले तर, उदा.– लंघनामध्ये मलमूत्र उत्पन्नच होत नसल्यामुळे वा अत्यल्प उत्पत्तीमुळे त्याचा संग असतो; किंवा गुदामध्ये उत्पन्न झालेल्या अर्शासारख्या व्याधीने मलावरोध उत्पन्न झाल्याने अवष्टंभ उत्पन्न होतो; हाही संगच. त्यामुळे रोगांचे वर्गीकरण करताना स्थूलमानाने शारीरक्रियाविकृतिजन्य आणि शारीररचनाविकृतिजन्य असे विभाग करावयास हरकत नाही. स्त्री-रोगाचे वर्गीकरण या पद्धतीनेच यापुढे करावयाचे आहे.

## रजःक्षीणता ( आर्तवक्षय ) :

[1]मासिक रजःस्राव अनियमित, अल्प वा मुळीच नसणे ही लक्षणें या व्याधीत असतात. क्वचित योनिभागी वेदनाही आढळतात.

[2]अति संशोधन-पंचकर्मातील चिकित्सेचा अतियोग होणे, गर्भाशयलेखनाचा अतियोग होणे, स्तंभनचिकित्सेचा अतियोग वेगधारण, अतिशीत गुणाचे अन्नपान, मानसिक कारणे, अतिव्यायाम, दीर्घकालपर्यंत उपवास करणे, अतिमैथुन, ही सर्व कारणे रजःक्षीणता उत्पन्न होण्यास कारणीभूत होतात.

हा व्याधी स्वतंत्र वा परतंत्रही असतो. याचे उत्पत्तिस्थान असलेला तीन आवर्तांनी बनलेल्या योनीचा आतला तिसरा आवर्त जो गर्भाशय तोच प्रसादरूप रजाचे आश्रय-स्थान असून मलरूप रजाचे उत्पत्तिस्थान आहे. त्यामुळे त्याला रजाचे मलायतन असे म्हणता येते. हे मलायतन ( म्हणजे गर्भाशय ) ज्या वेळी शोषित झालेले, मुळीच नसलेले वा अगदी लहान आकाराचे ( लघू ) असते, त्या वेळी त्यातून होणारा रजःस्राव हा अगदी अनियमित म्हणजे एका पाळीपासून दुसऱ्या पाळीपर्यंत १½, २, ३ किंवा ४ महिनेसुद्धा जातात, असा होतो; आणि क्वचित नियमित झाला तरी त्याचे प्रमाण

१ आर्तवक्षये यथोचितकालादर्शनमल्पता वा योनिवेदना च ।
तत्र संशोधनमाग्नेयानां च द्रव्याणां विधिवदुपयोगः । सु. १५–१२

२ पुनरेषाम् अतिसंशोधन अतिशमन वेगधारण असात्म्य
अन्नमनस्तापव्यायाम अनशन अतिमैथुनैः
भवति इति क्षयकारणानि पठंति । सु. सू. १५–९ डल्हण टीका



अत्यल्प असते. पुष्कळ वेळी ३–४ महिन्यांनी पाळी येऊनही रजाचे प्रमाण प्रकृत स्थितीसारखे असत नाही; म्हणजे त्या वेळीही अल्पताच असते. गर्भाशय ( रजाचे मलायतन ) ज्या वेळी मुळीच नसतो, वा आकाराने फारच लहान ( लघू ) असतो, त्या वेळी रजःप्रवृत्ती मुळीच नसते. अशा स्थितीमध्ये वायूच्या प्रेरणेस गर्भाशयाच्या संकुचित स्थितीत मुळीच वाव मिळत नाही वा थोडा मिळतो; त्यामुळे आर्तव-प्रवृत्तिकाली किंवा थोड्या आधीही अनेक प्रकारच्या योनी, ऊरू, जंघा, कटी, पृष्ठ अशा ठिकाणी सौम्य वा तीव्र स्वरूपाच्या शूलादी वेदना होतात.

रजःक्षीणता ज्या वेळी परतंत्र व्याधी म्हणून असते, त्या वेळी ते पांडू, अपतर्पण, राजयक्ष्मा, व्याधीनंतर आलेली दुर्बलता किंवा विविध प्रकारचे योनिरोग या व्याधीत आढळून येणारे एक लक्षण असते.

अशा स्थितीत दोषांनी रजोमार्ग व्यापिला जातो आणि त्यामुळे रजोदर्शन होत नाही. या अवस्थेमध्ये मुख्यतः वात व कफांची दुष्टी असते. धातुक्षय ज्या वेळी कारण नसते [1]त्या वेळी वातदुष्टी व मार्गावरोध असतो. त्या वेळी कफ किंवा वात दोनही दोषांमुळे शोथ, ग्रंथी इत्यादी लक्षणे उत्पन्न होऊन मार्गावरोध होतो व रजःप्रवृत्ती होत नाही; किंवा रस-रक्तादी धातूंच्या क्षयामुळे वृद्ध झालेला वायू त्यांचा उपधातू जो रज त्याला अधिकच क्षीण करतो त्या वेळीही रजःप्रवृत्ती अल्प होते.

प्रत्यक्षात रजःक्षीणता या व्याधीचे व्यवच्छेदक निदान करीत असताना पुढील रोगांचा विचार करावा.

(१) षंढी योनी, (२) वंध्या योनी, (३) अरजस्का योनी, (४) शुष्का योनी, (५) अतिसार, (६) पांडू, (७) राजयक्ष्मा, (८) मेदोवृद्धी, (९) अपतर्पणा-मुळे उत्पन्न होणारे व्याधी.

## चिकित्सा ( रजःक्षीणतेची ) :

[2]गर्भाशय शुष्क वा लहान असल्यामुळे जी व्याधिरूप रजःक्षीणता उत्पन्न होते त्यावर आग्नेयगुणयुक्त द्रव्यांच्यासवेच अवयवाचे पोषण करण्यास कारणीभूत होणारी पृथ्वी आणि आप् या महाभूतांचे प्राधान्य असलेली मधुर, स्निग्ध, बृंहण, बलवर्धक, जीवनीय अशा गुणांची द्रव्ये वापरली पाहिजेत.

१ दोषैरावृतमार्गत्वादार्तवं नश्यति स्त्रियाः । सु. शा. २–२१
– अत्र दोषाः कफो वायुः वातकफौ च । सु. शा. २–२१ टीका
२ रक्तमार्तवरक्तम् । सु. शा. २–२३ टीका

[1]'स्वयोनिवर्धन द्रव्योपयोग' यासाठीच ग्रंथकाराने दोषधातुमलांच्या क्षीणतेत सांगितला आहे.

[2]या अवस्थेमध्ये मासे, कुळीथ, कांजी, तीळ, उडीद, मद्य, गोमूत्र, ताक, दही, [3]शुक्त असे पदार्थ आहारात व औषधात द्यावे.

ज्या वेळी अवयव प्राकृत असून काही दोषांनी धातूला क्षीणता आल्यामुळे वा मार्गावरोधामुळे रजःप्रवृत्ती उणावते त्या वेळी आग्नेयगुणभूयिष्ठ अशा वरील द्रव्यांचा विशेष उपयोग होतो. अवयवाच्या पोषणाची गरज असेल त्या वेळी शतावरी, अश्वगंधा, भुईकोहळा, माषपर्णी, यष्टिमधू इत्यादी जीवनीय बृंहण अशी द्रव्ये क्षीरपाक, स्नेहपाकचूर्ण, क्वाथ अशा स्वरूपात वापरावीत. अवयवाला बल मिळण्याच्या दृष्टीने त्रिवंगभस्म, वसंतकुसुमाकर, चंद्रप्रभा, वसंतकल्प, मकरध्वज, च्यवनप्राश, वृष्यवंटी असे कल्प, तूप, मध, दूध अशा अनुपानाबरोबर वापरावेत. जेवणानंतर दशमूलारिष्ट, द्राक्षारिष्ट द्यावे. गर्भाशयाची लघुता ही या व्याधीस कारणीभूत असताना फलघृत अनेक वेळा उत्तम उपयोगी पडते. त्याचा ग्रंथोक्त असा वंध्यत्वनाशक गुणधर्म आश्चर्यकारकरीत्या प्रत्ययास येतो.

आहारामध्ये दूध, तूप, लसूण, गहू, उडीद, हुलगे, अंडी, मांसरस असे पदार्थ द्यावेत. पौष्टिक म्हणून बदाम, गोडंबी, पिस्ते या द्रव्याचा वेगवेगळ्या प्रकारांनी उपयोग करावा.

विहारात शक्तीप्रमाणे चालण्याचा व्यायाम अवश्य घेण्यास सांगावे.

ज्या वेळी रजःक्षीणता ही अन्यलक्षण दुसऱ्या कोणत्या तरी व्याधीचे रूप म्हणून असते त्या वेळी मुख्यतः त्या त्या व्याधींची चिकित्सा प्राधान्याने करून मग त्या व्याधीच्या चिकित्सेबरोबर वर सांगितल्याप्रमाणे रजोवृद्धीला अनुकूल असलेली चिकित्सा करावी. मार्गावरोध या कारणाने उत्पन्न झालेल्या रजःक्षीणतेत शोधन आणि लेखनकर्मांची आवश्यकता असते. त्यासाठी ही कर्मे करणाऱ्या वनस्पतींच्या

१ तत्रापि स्वयोनिवर्धनद्रव्योपयोगः (प्रतीकारः) । सु. सू. १५–१०

२ तत्र मत्स्यकुलत्थाम्लतिलमाषसुरा हितः।
पाने मूत्रमुदश्विच्च दधि शुक्तं च भोजने ॥ सु. शा. २–२२

३ मृण्मयादि शुचौ भांडे सगुडे क्षौद्रकाञ्जिकम् ।
धान्यराशौ त्रिरात्रस्थं शुक्तं चुक्रं तद् उच्यते ॥ अमरकोश तृतीयकाण्ड नानार्थ वर्ग ३ रामाश्रमी टीका.

मातीच्या वा इतर स्वच्छ भांड्यामध्ये गूळ, मध आणि कांजी एकत्र मिसळून धान्यराशीमध्ये तीन दिवस ठेवावी. या आंबट झालेल्या द्रवास शुक्त किंवा चुक्र असे म्हणतात.



काढ्यांचे उत्तरबस्ती देऊन शिलाजतू, गुग्गुळ, ताम्र, लोह, वत्सनाभ, सोमल यांसारखी विषमद्रव्ये वा या द्रव्यांनी युक्त असे विविध कल्प आवश्यकतेप्रमाणे वापरावेत.

## [1]रजोवृद्धी :

हा व्याधी स्वतंत्र क्वचितच आढळतो. बहुधा तो प्रदर वा असृग्योग रक्तपित्त यांतील पूर्वरूप वा लक्षण म्हणूनच असतो. तीक्ष्ण उष्ण, विदाही अशा आहार-द्रव्यांच्या सेवनाने पित्त वाढून स्वतःचे अधिष्ठान जे रक्त त्याला व त्याचा उपधातू असलेल्या रजालाही वाढविते. वातपित्त कफांच्या अनुबंधाप्रमाणे या व्याधीत अंग अतिशय दुखणे, रजःस्राव अतिशय होणे आणि त्याला दुर्गंधी असणे अशी लक्षणे असतात. अतिरजःप्रवृत्तीचा परिणाम म्हणून क्लम, पांडुता, ही लक्षणेही उत्पन्न होतात. रजाची ही अतिप्रवृत्ती बहुधा मासिकपाळीबरोबर सुरू होते. स्रावाचे प्रमाण व स्रावाच्या दिवसांची संख्या वाढते आणि पुढील पाळी लवकरच येते. अतिप्रवृत्ती या शब्दाचे इतके अर्थ संभवतात आणि ते प्रत्यक्षात आढळतातही.

व्यवच्छेदक निदान-प्रत्यक्षामध्ये पित्तला योनी, असृजायोनी, परिप्लुता योनी, योनी-अर्श, गर्भाशयस्थ रक्तगुल्म, ग्रंथी, अर्बुद, रक्तप्रदर, गर्भव्यापत् या रोगांचा विचार करावा.

## चिकित्सा :

सुश्रुताने सांगितलेल्या सूत्राप्रमाणे रजाचे शोधन होईल अशी चिकित्सा प्रथम करून मग त्याचे शमन करावे. हे करीत असताना इतर दोषधातूंमध्ये विकृती उत्पन्न होणार नाही याची काळजी घ्यावी. या धोरणाप्रमाणे तिक्त, कषाय, रसात्मक, द्रव्यांचा उत्तर-बस्ती द्यावा. प्रथम निंब, कटुकी, करंज, बोल वा तिक्तरसांचा उत्तरबस्ती देऊन नंतर अशोक, मोचरस, पंचवल्कल, खदिर अशा कषाय रसात्मक द्रव्यांचा उत्तरबस्ती द्यावा. पोटात प्रथम शोधनासाठी काळाबोळ, लताकरंज, ही द्रव्ये द्यावीत व नंतर शमनासाठी अशोक, मोचरस, गैरिक, प्रवाळ, नागकेशर, लोहभस्म माक्षिकभस्म इत्यादी द्रव्ये वापरावीत.

१ आर्तवं ( रजःवृद्धं ) अंगमर्दं अतिप्रवृत्तिं दौर्गंध्यं च । सु. सू. १५–१६
– आर्तवं वृद्धतया वातरोधात् अंगमर्दं करोति इति चक्रः । सु. सू. १६ टिप्पणी
– पित्तवृद्धौ तस्य ( रजसः ) अतिप्रवृत्तिः उक्तत्वात् । सु. शा. २–२३ टीका
– तेषां यथास्वं क्षपणं च क्षयात् अविरुद्धैः क्रियाविशेषैः प्रकुर्वीत ।
अविरुद्धैरिति वृद्धस्य तथा क्षपणं कर्तव्यं तथा अन्य दोषस्य धातोर्वा वृद्धिः क्षयो वा न भवति इति भावः । सु. सू. १५–१७ टिप्पणी

आहार-विहारामध्ये मधुर, शीतकषाय गुणांची द्रव्ये वापरावीत. तीक्ष्ण आणि विदाही असे पदार्थ वर्ज्य करावेत.

विहारात आतपसेवन, व्यायाम, अग्निसेवा वर्ज्य करावी.

## रजोदुष्टी :

दोषसंसर्गाने दुष्ट झालेले जे रज त्याचे स्वरूप वृद्ध व क्षीण रजापेक्षा वेगळे असते. धातूपधातुमलांच्या वृद्धिक्षयास दोष हे निमित्त कारण असतात. दोषांच्या प्रकोपाचा परिणाम म्हणून हे वृद्धी व क्षय होतात. दोषांचा साक्षात् संबंध त्यांच्याशी असतोच असे नाही. परंतु दुष्टी या विकृतीमध्ये दोष हे समवाय संबंधाने उपस्थित असतात. त्यामुळे धातुमलांशी दोषांचा दुष्टावस्थेत साक्षात् संबंध असतो. यासाठीच शुद्धीचे स्वरूप सांगताना दुष्टदोषासंपर्कता असे वर्णन केले आहे.

दुष्ट शुक्र आणि दुष्ट आर्तव यांचे वर्णन एकत्र व समान लक्षणांनी केले असले तरी पुढील लक्षणांच्या, स्वरूपावरून ते वर्णन आर्तव म्हणजे स्त्री-बीजाचे नसून मासिक पाळीच्या वेळी स्रवणाऱ्या रजाचे आहे हे स्पष्ट होईल. कारण अशी प्रत्यक्ष-गम्य लक्षणे फक्त रजासंबंधीच संभवतात; म्हणून टीकाकारानेही आर्तव शब्दाचे स्पष्टीकरण करताना 'आर्तव-शोणित' असा शब्दप्रयोग केला आहे. याचाही अर्थ कल्पिता आला तरी मागे आम्ही केलेल्या परिभाषा-निश्चितीप्रमाणे या ठिकाणी आर्तव शब्द रजोवाचक घेतला पाहिजे असे आमचे मत आहे.

— आर्तवमपि त्रिभिर्दोषैः[1] शोणितचतुर्थैः[2] पृथग् द्वन्द्वैः समस्तैश्चोपसृष्टमबीजं भवति; तदपि दोषवर्णवेदनादिभिर्विज्ञेयम् । तेषु कुणपग्रंथि पूतिपूयक्षीणमूत्रपुरीष-प्रकाशमसाध्यं साध्यमन्यच्चेति । सु. शा. २–५

— इदानीं शुक्रविषयं प्रतिपाद्य आर्तवशोणितविषयं अपि प्रतिपादयितुं आहआर्तव-मित्यादि । आर्तवं अपि यदा पृथक्दोषैः शोणितचतुर्थैर्द्वंद्वैः । समस्तैश्चोपसृष्टं तदा अबीजं भवतीत्यर्थपिंडः । तस्य विज्ञानोपायं दर्शयन्नाह–तदपीत्यादि । तदपीति आर्तवमपि । दोषवर्णवेदनाभिः शुक्रदोषे व्याख्याताभिः । तेषां साध्यासाध्यभेदं दर्शयन्नाह–तेष्वित्यादि । मूत्रपुरीषप्रकाशमिति गंधवर्णादिभिर्मूत्रपुरीषतुल्यम् । साध्यमन्यच्चेति एकैकदोषजनितत्रयम् । शुक्रार्तवदोषा याप्या न भवन्ति, व्याधि-स्वभावात् । सु. शा. २–५ टीका

— तेषु वातवर्णवेदनं वातेन, पित्तवर्णवेदनं पित्तेन, श्लेष्मवर्णवेदनं श्लेष्मणा, कुणप-गंध्यनल्पं च रक्तेन ग्रंथिभूतं श्लेष्मवाताभ्यां पूतिपूयनिभं पित्तश्लेष्मभ्यां क्षीणं प्रागुक्तं पित्तमारुताभ्यां, मूत्रपुरीषगंधि सान्निपातेनेति । तेषु कुपापग्रन्थि पूति-पूयक्षीणरेतसः कृच्छ्साध्याः, मूत्रपुरीषरेतसस्त्वसाध्या इति । सु. शा. २–४



रज हे वात, पित्त, कफ असे तीन दोष आणि दोषदुष्ट रक्त अशा चार कारणांनी मुख्यतः विकृती पावते. एकदोषज, द्वंद्वज, त्रिदोषज असे त्याचे पुन्हा भेद होतातच. रज हे दोषांनी दुष्ट झाल्यामुळे त्याचा आर्तवाच्या गर्भोत्पत्तिक्षमतेवरही परिणाम होतो. साहचर्यामुळे असा विकृत परिणाम होणे संभवनीय असते.

रज हे ज्या वेळी वाताने दुष्ट होते त्या वेळी तांबुस काळसर, काळसर असे वर्ण रजाला प्राप्त होतात; आणि वायूचा प्रकोप ज्या कारणाने झाला असेल त्या कारणानुरूप तोदभेदादी वेदना रजःप्रवृत्तीच्या वेळी उत्पन्न होतात.

पित्ताने दुष्ट झालेल्या रजामध्ये नील, पीत असे वर्ण दिसतात. ओष, चोष अशा वेदना स्त्रीच्या ठिकाणी उत्पन्न होतात. रजाला पित्तामुळे एक प्रकारचा दुर्गंध येतो.

कफदुष्टीमुळे रजाचा वर्ण फिकट होतो व कंडू, गौरव अशा वेदना भासतात. विस्रगंध रजाला येतो.

दुष्टरक्ताने दूषित अशा रजाला प्रेतासारखी घाण येते. त्याचे प्रमाण वाढलेले असते. ( पित्तदुष्टीमुळेही रजाचे प्रमाण थोडे वाढलेले असते; पण त्याहीपेक्षा रक्तदुष्टीमध्ये साक्षात तद्रूपतेमुळे ते अधिकच असते. )

कफवात संसर्गाने रज ग्रंथियुक्त बनते. पित्तकफामुळे रजाला पूयाचे स्वरूप प्राप्त होते व कुजकी घाण येते.

वातपित्तामुळे रजाचे प्रमाण इतर दुष्टीमुळे असणाऱ्या प्रमाणापेक्षा सापेक्षतः अल्प असते. रक्तदुष्टीमध्ये जशी रजाची सापेक्ष अधिकता सांगितली आहे तशीच येथे तुलनेने क्षीणता म्हणजे अल्पता अभिप्रेत आहे. सुश्रुताचा टीकाकार म्हणतो त्याप्रमाणे

— तेष्वित्यादि । तेषु वातादिषु दुष्टेषुमध्ये वातेन यच्छुक्रं दूषितं तदातवर्णवेदनं भवति । तत्र वातवर्णा अरुणकृष्णादयः यद्यप्यव्यक्तस्य वायोर्वर्णासंभवः तथाऽपि वातदुष्टे दूष्येऽरुणकृष्णौ वातेन वर्णौ भवत इत्यदोषः । वातवेदनास्तोदभेदादयः, ननु कथमेकस्माद्वायोरनेकवेदनाविशेषाः तोदादयः । सत्यं बहुकारणप्रकोपात्त-स्येति । गंधस्तु वायोर्नास्त्येव । पित्तेन यत् शुक्रं दूषितं तत् पित्तवर्णवेदनं भवति, पित्तवर्णा पीतनीलादयः, पित्तवेदना ओषचोषादयः पित्तदुष्टे शुक्रेऽनुक्तोपि गंधः कुणपे पूतिपूयाभे च वक्ष्यमाणो द्रष्टव्यः । श्लेष्मणा यच्छुक्रं तत् श्लेष्मवर्णवेदन भवति । श्लेष्मवर्णः शुक्लः, श्लेष्मवेदनाः कण्डूवादयः गंधस्त्वनुक्तोऽपि विस्रो द्रष्टव्यः । रक्तेन यच्छुक्रं दूषितं तत् कुणपगंध्यनल्पं च भवति । चकारात् शोणित-वर्णं पित्तवेदनं च, कुणपं शवस्तस्यैव गंधोऽस्येति कुणपगंधि, अनल्पं बहुलं अत्र रक्तेनेति व्यपदेशो घृततैलदग्धवत् । ( अग्निदग्ध घृततैलाभ्यां दग्धं द्रव्यं घृततैल-दग्धं इत्युच्यते न त्वग्निना दग्धं इति, तथाऽत्रापि वातादिदूषितरक्तेन दुष्टं

( पुढे चालू )

वातादि कुणपग्रंथिपूयक्षीण मलाव्हयम् । अ. स.

सु. सू. १५ येथेही उल्लेखिलेल्या रजःक्षीणतेशी याचा संबंध नाही असे आम्हास वाटते. आणि तसे वाटणे योग्यही आहे. परंतु या ठिकाणी पित्त स्वतंत्र नसून ते वाताशी संबद्ध आहे. त्यामुळे स्वतंत्र पित्ताच्या सर द्रव गुणांमुळे होणारी रजोवृद्धी या ठिकाणी प्रतीतीस न येता वाताच्या रूक्ष गुणांमुळे बाधित होऊन अल्पताच प्रत्ययास येते आणि पित्ताचा उष्ण गुण द्रवांश शोषणाचे कार्य करून वायूच्या रूक्षतेस सहाय्यक होतो. त्यामुळे वातपित्ताच्या संसर्गाने होणाऱ्या रजोदुष्टीमध्ये रजःक्षीणता असते.

सन्निपातामुळे रजाला मूत्रपुरीषासारखे स्वरूप येते व दुर्गंधी तशीच असते. रजोदुष्टीच्या या आठ प्रकारांत वात, पित्त, कफ दुष्टीमुळे उत्पन्न होणारा व्याधी साध्य[१] असतो; *व बाकीचे पाच असाध्य असतात असे सुश्रुताने म्हटले आहे* (सु. शा. २–५).

परंतु शुक्रदृष्टीतील साध्यासाध्य प्रकरणाप्रमाणे येथेही साध्य, कृच्छ्रसाध्य आणि असाध्य असे तीन प्रकार करावेत असे आमचे मत आहे. त्याचे वर्गीकरण वातपित्त-कफांमुळे उत्पन्न होणारी एकदोषज रजोदुष्टी साध्य, कुणपग्रंथी पूतिपूय आणि क्षीण या लक्षणांनी व्यक्त होणारी रजोदुष्टी ही कृच्छ्रसाध्य आणि मूत्रपुरीषस्वरूप रजोदुष्टी असाध्य असे मानावे. ते व्याधीच्या साध्यासाध्यतेच्या नियमाशी सुसंगत असे असून सुश्रुतानेच शुक्रदुष्टीमध्ये तसे वर्गीकरण केले आहे.

## रजोदुष्टि-चिकित्सा :

[१] रजोदुष्टीवर चिकित्सा करताना वमन, विरेचन, बस्ती, अनुवासन आणि उत्तर-

रक्तदूषितमिति व्यपदेशः । यतो रक्तस्यापि दोषा एव दूषयितारः । श्लेष्म-वाताभ्या यच्छुक्रं दूषितं तत् ग्रंथिभूतं ग्रंथिसदृशं ग्रंथिलं भवतीत्यर्थः । पित्त-श्लेष्मभ्यां यद्दूषितं तत् शरितपूयसदृशं भवति । क्षीणं पित्तमारुताभ्यां भवति, तस्य लक्षणं प्राग् दोषधातुमलवृद्धिविज्ञानीये (सू. अ. १५) उक्तम् । ग्रंथ्यादयस्तु ये द्विदोषजास्ते द्विदोषवर्णवेदना बोद्धव्याः । सन्निपातेन यच्छुक्रं दूषितं तन्मूत्र-पुरीषगंधि भवति । तेषा कृच्छ्रसाध्यासाध्यभेदं दर्शयन्नाह, तेष्वित्यादि । तेषु मध्ये कुपापादयश्चत्वारः कृच्छ्रसाध्याः मत्रपुरीषगंधिरन्तिमोऽसाध्याः, शेषा अर्थत एव साध्याः । सु. सू. २–४ टीका

१ विधिमुत्तरबस्त्यन्तं कुर्यादार्तवशुद्धये ।
स्त्रीणां स्नेहादियुक्तानां चतुर्ष्वार्तववर्तिषु ॥
कुर्यात् कल्कान् पिचूंश्चापि पथ्यान्याचमनानि च ।
ग्रंथिभूते पिबेत् पाठां त्र्यूषणं वृक्षकाणि च ॥
दुर्गंधिपूयसंकाशे मज्जतुल्ये तथाऽऽर्तवे ।

(पुढे चालू)



बस्ती अशी पंचकर्मोक्त शोधनचिकित्सा प्रथम करावी. त्यासाठी यथादोष औषधी द्रव्यांचा उपयोग करावा. **वमनाकरिता—** मदन, यष्टिमधू, वचा अशी द्रव्ये वापरावीत.

**विरेचनासाठी—** निशोत्तर, त्रिफळा स्नुहि किंवा इच्छाभेदी, नाराच रस यांसारखी द्रव्ये वापरावीत.

**बस्तीसाठी—** दशमूल काढा वापरावा. उत्तरबस्तीसाठी– त्रिफला, निंबपत्र, धमासा यांचा काढा वापरावा. वाताधिक्य असताना स्नेहनासाठी एरंडस्नेह तिलतैल वापरावे.

शोधनानंतर **शमनासाठी—** निरनिराळे कल्क, पिचू योनिभागी ठेवावेत. तसेच इतरही हितकर औषधी द्रव्यांनी योनिधावन करावे.

कल्कामध्ये करंज, निंब, निर्गुंडी, अर्क यांच्या पानांचा गुळगुळीत घट्ट असा कल्क वा तिळाचा कल्क करून तो वापरावा.

[१] **पिचू—** हा शुद्ध सरकी काढलेल्या कापसाचा वा शुभ्र, मृदू, तलम वस्त्रांचा वापरावा. त्यासाठी यथादोष, यथालक्षण, मधू, करंजतैल, पारिभद्रतैल, नारायणतैल, बलातैल, शतधौतघृत, अशी द्रव्ये वापरावीत.

**धावनासाठी—** पंचवल्कल, निंबपत्र, लोध्र, तुरटी, अशोक, मोचरस, बाभुळसाल, बकुळसाल इत्यादी द्रव्ये व त्यांचे काढे किंवा फांट वापरावेत.

## [२] वातज रजोदुष्टीवर :

भार्ङ्गीमूळ, यष्टिमधू, देवदार, काण्ड यांनी सिद्ध केलेले तूप व शिवणमूळ, रिंगणी (पंचांग व मूळ) व शेवंती (मूळ व पंचांग) यांनी सिद्ध केलेले दूध प्राशनासाठी वापरावे. मधुक (ज्येष्ठ मधाचा) कल्क, दूध, तूप घालून तयार करावा व तो पोटात घ्यावा. गव्हला व तीळ यांचा कल्क तयार करून तो वापरावा (योनीत ठेवावा). सरल व रानमूग (पंचांग) यांचा काढा प्रक्षालनासाठी (योनिधावनासाठी) वापरावा.

पिबेत् भद्रश्रियः क्वाथं चंदनक्वाथमेव च ।
शुक्रदोषहराणां च यथास्वमवचारणम् ॥
योगानां शुद्धिकरणं शेषास्वप्यार्तवार्तिषु ।
अन्नं शालियवं मद्यं हितं मांसं च पित्तलम् । सु. शा. २–१२ ते १६

१ यथास्वं (यत्र यदौषधं तत्) च योनौ कल्कैः पिचुभिः (देयं) । अ. सं. शा. १–४०

२ वातजे पुष्पदोषे भार्ङ्गीमधुकभद्रदारुसिद्धं सर्पिष्पानम् । काश्मर्यक्षुद्रसहासिद्धं वा क्षीरम् । मधुक सृगालविन्नाकल्कं पयस्सर्पिस्सहितं प्रियंगुतिलकल्कं वा योनौ धारयेत । सरलमुद्गपर्णी कषायः प्रक्षालनम् । अ. सं. शा. १–३१

## [1] पित्तज रजोदुष्टीवर

काकोळी, क्षीरकाकोळी (कंद), विदारी (कंद) यांचा काढा, किंवा कमळ व पद्मकाष्ठ यांचा काढा, किंवा मोहाची फुले, शिवणीची फळे यांचा काढा साखर घालून घ्यावा. पांढऱ्या चंदनाचा काढा मध घालून घ्यावा. धावडा, धायटी यांचा कल्क किंवा ज्येष्ठमध, मोरवेल, मनुका यांचा कल्क तुपाबरोबर घ्यावा. बाहवा व लहान इंद्रावण (फळ), यांनी सिद्ध केलेले दूध विरेचनासाठी वापरावे. चंदन व दुधी (पंचांग) यांचा कल्क योनीत धारण करावा. गैरिक आणि रिठा (फळ) यांचा काढा योनिधावनासाठी वापरावा.

## [2] कफज रजोदुष्टीवर :

कुडा, कुटकी, अश्वगंधा (मूळ) यांचा काढा, पोटात घ्यावा. क्षीरीवृक्ष (वड, उंबर, पिंपळ, पारोसा-पिंपळ (पिंपर्णी) यांच्या कोवळ्या पानांचा काढा तूप घालून घ्यावा किंवा मधाबरोबर चाटावा. गेळफळाच्या काढ्याने वमन द्यावे. गेळफळांचाच कल्क योनीत धारण करावा. लोध्र आणि टेंभुर्णी यांचा काढा किंवा बोकड व मेंढा यांचे मूत्र प्रक्षालनासाठी वापरावे.

## [3] ग्रंथिरजोदुष्टीवर :

पहाडमूळ, गोखरू (पंचांग, मूळ), कुडा यांचा काढा पोटात घ्यावा. कल्क व धावनासाठी वातकफज रजोदुष्टीवरील औषधी द्रव्ये वापरावीत.

## [4] कुणपपूतिपूयरजोदुष्टीवर :

चंदनाचा काढा प्राशन करावा. त्रिफला कल्क योनीत ठेवावा. त्रिफला काढा धावनासाठी वापरावा.

---

१ पित्तजे काकोलीद्वयंविदारीमूलक्वाथमुत्पलपद्मकक्वाथं मधूकपुष्पकाश्मर्यफलक्वाथं वा सशर्करं पिबेत् । श्वेतचंदनक्वाथं वा सक्षौद्रम् । धवधातकी कल्कं वा घृतेन वा मधुकमधुरसामृद्वीकाकल्कम् । शम्याकगवाक्षीक्षीरं विरेकः । चंदन पयस्याकल्कं योनौ धारयेत् । गैरिकारिष्टकषायः प्रक्षालनम् । अ. सं. शा. १–३२

२ श्लेष्मिके कुटजकटुकाश्वगंधाक्वाथं पिबेत् । समाक्षिकं वा क्षीरिवृक्षप्रवालक्वाथमेतेषामेव वा चूर्णं मधुघृताभ्यां लिह्यात् । मदनफलकषायेण वमनम् । तत् कल्कमेव च योनौ धारयेत् । लोध्रतिंदुककषायः प्रक्षालनं बस्तमेषमूत्रं वा ।
अ. सं. शा १–३

३ तथा ग्रंथ्यार्तवे पाठा त्रिकंटकवृक्षकक्वाथम् । अ. सं. शा. १–३८

४ कुणपपूयार्तवे चंदनक्वाथं पिबेत् । त्रिफलाकल्कक्वाथौ चात्र धारणाचमने ।
अ. सं. शा. १–३९



[1]मूत्रपुरीषरूपरजोदुष्टीची चिकित्सा, ते व्याधी असाध्य असल्यामुळे ग्रंथात सांगितले नाहीत. हे व्याधी औषधी साध्य तर नाहीतच. निजकारणांनी उत्पन्न झालेल्या या मूत्रपुरीषरूपरजोदुष्टीत काहीच करता येत नाही. पण काही वेळा शस्त्रकर्मातील चुकीमुळे. मिथ्यास्थानी व्रण उत्पन्न होतात; त्या वेळी मात्र शस्त्रकर्माने ते सीवनादिकांनी साध्य होऊ शकतात.

अशा तऱ्हेचे आगंतू व्रण विकृत प्रसूतीच्या वेळी प्रसवामुळे, मूढ गर्भोपचाराच्या वेळी शस्त्रकर्मामुळे व बस्तीतील अश्मर्यादिकांच्या शस्त्रकर्मामुळे उत्पन्न होऊ शकतात.

## रक्तप्रदर ( असृग्दर ) :

व्याख्या : [2]असृग्दर – रक्त (अवयव) फाटून बाहेर पडल्याप्रमाणे अत्यधिक प्रमाणात स्रवते म्हणून असृग्दर किंवा पुष्कळ प्रमाणात वाहते म्हणून प्रदर हे नाव या व्याधीस प्राप्त झाले आहे. सुश्रुताने या व्याख्येप्रमाणेच वर्णन करताना म्हटले आहे.[3]

[4]ज्या वेळी (हीच) रजप्रवृत्ती पाळीच्या वेळी किंवा मासिक पाळी नसतानाही अधिक प्रमाणात स्रवते त्या वेळी या व्याधीस असृग्दर असे म्हणतात. मात्र त्या वेळी स्रवणाऱ्या रजाचे स्वरूप वेगळे असते. निर्दोष व प्रकृत रजाची जी लक्षणे सांगितलेली आहेत ती या स्रावाच्या ठिकाणी नसतात, म्हणून पुढे सांगितलेल्या वातादी

---

१ स्त्रीणां तु बस्तिपार्श्वगतो गर्भाशयः सन्निकृष्टः तस्मात्तासामुत्संगवच्छस्त्रं पातयेत्, अतोऽन्यथा खल्वासां मूत्रस्रावी व्रणो भवेत् । सु. चि. ७–७३
स्त्रीणां पुनर्बस्तिप्रत्यासन्नमधिकमाशयान्तरमस्ति अतः सामान्यहरणे दोषमभिवीक्ष्य छेदविशेषं निर्दिशन्नाह स्त्रीणामित्यादि उत्संगवदिति ऊर्ध्वं संगः स यस्यास्तीति तदुत्संगवत् उत्तानमित्यर्थः । अन्यथेति यदाऽवगाढः शस्त्रपातः स्यात्तदा बहिर्गतं त्वङ्मांसं भित्वा बस्तित्वचा सह भगवस्तु बस्तिपार्श्वाश्रयस्य गर्भाशयस्यापि त्वचो भेदः स्यात्, ततस्तासां भगान्तर्गतो मूत्रस्रावी व्रणः स्यादित्यर्थः । तथा च वैतरणः
'भगस्याधः स्त्रिया बस्तिरूर्ध्वं गर्भाशयस्थितः ।'
गर्भाशयश्च बस्तिश्च महास्रोतः समाश्रितौ ॥
बस्तिभागं समुन्नम्य अवनम्याश्मरीं बुधः ।
स्फिगग्रे भेदनं तासां हितमन्यत्र दोषकृत् ॥ इति । सु. चि. ७–३३ टीका

२ असृक् दीर्यते इति असृग्दरः ।
प्रकर्षेण दीर्यते । इति प्रदरः ।

३ तदेवातिप्रसंगेन प्रवृत्तं अनृतावपि । असृग्दरं विजानीयात् अतोऽन्यत् रक्तलक्षणात् ॥
( विजानीयात् रक्तलक्षणलक्षितम् । ) सु. शा. २–१८

४ अतिप्रसंगेन अनृतौ वा तदेव असृग्दरं प्रदरं व्यापदं च रक्तयोनिसंज्ञां लभते ।
तत् साधने रक्तपित्तचिकित्सितं गुह्यरोगप्रतिषेधं चेक्षेत । अ. सं. शा. १–११, १२

दुष्टिलक्षणांनी युक्त अशी पुष्कळ रजःप्रवृत्ती असेल त्या वेळीच प्रदर ही संज्ञा द्यावी. एरवी दोषदुष्टीची लक्षणे मुळीच नसताना वा अत्यल्प असताना रजःप्रवृत्तीचे प्रमाण तेवढे पुष्कळ असेल तर त्यास रजोवृद्धी ( अत्यार्तव ) हा व्याधी मानावा. रजोवृद्धी व प्रदर यामध्ये दोषदुष्टी लक्षणांची अल्पता व अधिकता यांच्या सहाय्याने व्यवच्छेद करावा.

[1]संग्रहाच्या सूत्राप्रमाणे रजाच्या अतिप्रवृत्ति-लक्षणाला असृग्दर, प्रदर एवढेच नव्हे तर योनिव्यापत् रक्तयोनी अशाही संज्ञा दिल्या असल्या तरी चिकित्सेचे जे सूत्र सांगितले आहे, त्यात अतिप्रवृत्ती हे एकच लक्षण अवस्था विशेषांनी भिन्न भिन्न प्रकारचे असते व त्यामुळे त्यांची चिकित्साही वेगवेगळ्या प्रकारची – कधी रक्त-पित्तासारखी, तर कधी योनिरोगासारखी – करावी असे सांगितले आहे. यावरून अवस्थानुरूप असणारी लक्षणांची भिन्नता प्राचीन ग्रंथकारांच्या डोळ्यांपुढे नक्की होती, पण परिभाषेच्या निश्चितीकरणाचे फारसे महत्त्व त्या वेळी नसल्याने त्यांनी शिथिल शब्दयोजना केली असावी असे वाटते.

### [2] रक्तप्रदराचे निदान :

जी स्त्री खारट, आंबट, पचावयास जड, तिखट, विदाह उत्पन्न करणारे, ओशट असे पदार्थ खाते; डुकरासारख्या ग्राम्य व जलचर प्राण्यांचे मेदोबहुल असे मांस भक्षण करते, खीर, खिचडी, दही, शुक्त, दह्याचे पाणी, मद्य हे पदार्थ अधिक प्रमाणात खाते तिला प्रदर उत्पन्न होतो.

### [3] रक्तप्रदराची संप्राप्ती :

अशा तऱ्हेच्या अन्नपानाने रक्ताची व त्याचा उपधातू रज याची दुष्टी होते; त्याचे प्रमाण वाढते. स्रोतोरोध उत्पन्न होतो व त्यामुळे वातवृद्धी होते. असा प्रकुपित झालेला

१ तेनैतत् उक्तं भवति । तथाविधस्य निदानादिवशात् कदाचित्
रक्तपित्तता भवति, कदाचित् योनिरोगोक्तान्यतमप्रकारता ।
अतएव च तेषां विशेषे, विशेषात् चिकित्सितं उक्तं इति । अ. सं. शा. १–१२ टीका

२ याऽत्यर्थं सेवते नारी लवणाम्लगुरूणि च ।
कटून्यथ विदाहीनि स्निग्धानि पिशितानि च ॥
ग्राम्यौदकानि मेद्यानि कृशरं पायसं दधि ।
शुक्तमस्तुसुरादीनि भजन्त्यः कुपितोऽनिलः ॥ च. चि. ३०–२०५, २०६

३ रक्तं प्रमाणमुत्क्रम्य गर्भाशयगताः सिराः ।
रजोवहाः समाश्रित्य रक्तमादाय तद्रजः ॥
पित्तवृद्धौ तस्य अतिप्रवृत्तिः उक्तत्वात् । सु. शा. २–२३
यदातु तच्छोणितं दुष्टमार्गंप्रति प्रपद्यते
तदा स्त्रीणां प्रदरो भवति । भेल सं. शा. ५–६



वायू गर्भाशयात असलेल्या रजोवह स्रोतसांचा आश्रय करून रजाच्या संचितीचे प्रमाण अधिकच वाढवून त्यास ( रजास ) योनिमार्गाने अधिक प्रमाणात बाहेर स्रववितो. याचे वातज, पित्तज, कफज व सान्निपातिक असे चार प्रकार होतात. त्यांचे स्वरूप क्रमाने पुढीलप्रमाणे आहे.

### [1] वातज रक्तप्रदर :

रूक्षादी कारणांनी प्रकुपित झालेला वायू सामान्य संप्राप्तीत उल्लेखिलेल्या पद्धतीने रजाची अतिप्रवृत्ती करतो. या वातज प्रदरांमध्ये होणाऱ्या स्रावाचे स्वरूप फेसाळ, द्रव, रूक्ष, काळसर, तांबुस काळसर, पळसाच्या फुलांच्या काढ्याप्रमाणे (किंचित पीतवर्णयुक्त तांबुस काळसर) असते. या वेळी हा स्राव चालू असताना योनि-मार्गात वेदना असतात वा क्वचित नसतातही. कटी, वंक्षण, ऊर, पार्श्व, पृष्ठ, श्रोणी (नितंब) इत्यादी अवयवांमध्ये मात्र वातज प्रदरामध्ये तीव्र स्वरूपाच्या वेदना असतात.

### [2] पित्तज रक्तप्रदर :

अम्ल, उष्ण, लवण, क्षार इत्यादी कारणांनी प्रकुपित पित्त पूर्वोक्त सामान्य संप्राप्ति-प्रमाणे रजःप्रवृत्ती वाढविते. या पित्तज प्रदरामध्ये स्रावाचे स्वरूप निळसर, पिवळे, काळे व उष्ण स्पर्शयुक्त असते. कित्येक वेळी स्राव हा अगदी रक्तस्वरूपही असतो व स्राव

यस्माद्विवर्धयत्याशु रसभावाद्विमानता ।
तस्मादसृग्दरं प्राहुरेतत्तन्त्रविशारदाः ॥
रजःप्रदीर्यते यस्मात् प्रदरस्तेन स स्मृतः । च. चि. २०७–२०९

१ रूक्षादिभिर्मारुतस्तु रक्तमादाय पूर्ववत् ।
कुपितः प्रदरं कुर्यात्लक्षणं तस्य मे श्रृणु ॥
फेनिलं तनु रूक्षं च श्यावं चारुणमेव च ।
किंशुकोदकसङ्काशं सरुजं वाऽथ नीरुजम् ॥
कटीवंक्षणहृत्पार्श्वपृष्ठश्रोणिषु मारुतः ।
कुरुते वेदनां तीव्रामेतद्वातात्मकं विदुः ॥ च. चि. ३०–२११, २१३

२ अम्लोष्णलवणक्षारैः पित्त प्रकुपितं यदा ।
पूर्ववत्प्रदरं कुर्यात् पैत्तिकं लिङ्गतः श्रृणु ॥
सनीलमथवा पीतमत्युष्णमसितं तथा ।
नीतान्तरक्तं स्रवति मुहुर्मुहुरर्त्यार्तिमत् ॥
दाहरागतृषामोहज्वरभ्रमसमायुतम् ।
असृग्दरं पैत्तिकं । च. चि. ३०–२१४, २१६

होताना वरचेवर वेदना होत असतात. योनिदाह होतो. याव्यतिरिक्त दाह, राग, तृषा, मोह, ज्वर, भ्रम अशी पित्तामुळे होणारी विविध सार्वदेहिक लक्षणे असतात.

### [1]कफज रक्तप्रदर :

गुरू, मधुर इत्यादी कफवर्धक कारणांनी कफ प्रकुपित होतो. हा पूर्वीप्रमाणे प्रदराची संप्राप्ती घडविण्यास कारणीभूत होतो. या कफज प्रदरात स्रावाचे स्वरूप बुळबुळीत, फिकट वर्णाचे, जड, स्निग्ध, स्पर्शास शीत आणि मंद, वेदनायुक्त असे असते. बुळबुळीत आणि स्निग्ध, या लक्षणांमुळे या रजःस्रावात कफ मिसळल्यासारखा दिसतो आणि छर्दी, अरुची, हल्लास (मळमळ), श्वास, कास अशी कफाची सार्वदेहिक लक्षणेही दिसतात.

### सान्निपातिक रक्तप्रदर :

[2]सान्निपातिक प्रदरामध्ये स्तन्यदुष्टीची जी कारणे चरकाने सांगितली आहेत तीच होतात. ती कारणे अशी—

अजीर्ण झाले, असात्म्य, विषम विरुद्ध अशा अन्नाचे अतिप्रमाणात सेवन केले; खारट, आंबट, तिखट, क्षारयुक्त आणि आंबून लाळ किंवा तार आलेल्या (प्रक्लिन्न पदार्थांचे भक्षण केले; मन आणि शरीर यांचा संताप झाला, रात्रीची जाग्रणे घडली, चिंता लागली, उत्पन्न वेग धारण केले आणि अनुत्पन्न वेग कुंथून उत्पन्न केले. गुळाची पक्वान्ने खाल्ली, खिचडी, अदमोरे दही, अभिष्यंदी पदार्थ, ग्राम्य, आनूप आणि जलचर प्राण्यांचे मांस खाल्ले आणि या स्वरूपाच्या आहाराबरोबर दिवसा झोप घेतली, फार मद्य प्राशन केले. शरीरास कोणत्याही स्वरूपाचा व्यायाम मुळीच घडला नाही काही मार लागला, क्रोध अनावर झाला वा इतर काही व्याधींनी शरीर क्षीण झाले तर तीनही दोषांचा प्रकोप होऊन सान्निपातिक प्रदर उत्पन्न होतो.

या त्रिदोषज प्रदरामध्ये तीनही दोषांची लक्षणे दिसतात आणि दोषांमुळे उत्पन्न होणाऱ्या विविध अवस्थाही असतात. स्त्री अत्यंत पीडित होऊन रक्त रजाच्या अतिप्रवृत्तीमुळे अत्यंत क्षीण होते आणि त्रिदोषकर मिथ्या आहारविहार जर याही स्थितीत चालू राहिले तर वातप्रकोप अधिकच होतो. आणि त्यामुळे कफही रजाबरोबर योनिद्वारातून बाहेर पडू लागतो. स्रावाला दुर्गंधी, बुळबुळीतपणा असतो. पित्ताच्या अनुबंधाने स्राव पीतवर्णी व विदग्ध होतो. पुढे पुढे तर मेद आणि वसा यांनाही वायू अपत्यमार्गातून वेगाने स्रववितो, आणि मग स्रावालाही तूप, मज्जा, वसा यांसारखे स्वरूप प्राप्त होते. हा स्राव सारखा चालू असतो. त्याचा परिणाम म्हणून स्त्री अत्यंत दुर्बल व क्षीणरक्त होते. दाह, तृष्णा, ज्वर अशी त्रासदायक लक्षणे उत्पन्न होतात. ही सन्निपाताची अवस्था असाध्य अशी आहे.

### रक्तप्रदराची चिकित्सा :

[1]पुढे योनिरोगांमध्ये जी वात, पित्त, कफदोषांनी उत्पन्न झालेल्या योनिरोगांची चिकित्सा सांगितलेली आहे तीच चारही प्रकारच्या प्रदररोगांमध्ये करावी; याशिवाय रक्तातिसार, रक्तपित्त किंवा रक्तार्श यांमध्ये जी चिकित्सा सांगितली आहे तीही यथायोग्य पद्धतीने करावी.

या चरकाच्या वचनाप्रमाणे पुढे त्या त्या प्रकरणांतील काही पाठ देत आहोत :

– मनःशरीरसंतापादस्वप्नान्निशि चिन्तनात् ।
प्राप्तवेगप्रतीघातादप्राप्तोदीरणेन च ॥
परमान्नं गुडकृतं कृशरां दधि मन्दकम् ।
अभिष्यन्दीनि मांसानि ग्राम्यानूपौदकानि च ॥
भुक्त्वा भुक्त्वा दिवास्वप्नान्मद्यस्यातिनिषेवणात् ।
अनायासादभीघातात्क्रोधाच्चातङ्कर्शनैः ॥ च. चि. ३०–२३२, २३५

– त्रिलिङ्गसंयुतं विद्यानैकावस्थमसृग्दरम् ।
नारी त्वतिपरिक्लिष्टा यदा प्रक्षीणशोणिता ॥
सर्वं हेतुसमाचारादतिवृद्धस्तदाऽनिलः ।
रक्तमार्गेण सृजति प्रत्यनीकबलं कफम् ॥
दुर्गंधं पिच्छिलं पीतं विदग्धं पित्ततेजसा ।
वसां मेदश्च यावद्धि समुपादाय वेगवान् ॥
सृजत्यपत्यमार्गेण सर्पिर्मज्जवसोपमम् ।
शश्वत्स्रवत्यथास्रावं तृष्णादाहज्वरान्विताम् ॥
क्षीणरक्तां दुर्बलां च तामसाध्यां विवर्जयेत् । च. चि. ३०–२२०, २२२, २२४

१ स्याच्छ्लैष्मिकं तु प्रवक्ष्यते ।
गुर्वादिभिर्हेतुभिश्च पूर्ववत् कुपितः कफः ।
प्रदरं कुरुते तस्य लक्षणं तत्त्वतः श्रृणु ॥
पिच्छिलं पाण्डुवर्णं च गुरुस्निग्धं च शीतलम् ।
स्रवत्यसृक् श्लेष्मलं च घनं मन्दरुजाकरम् ॥
छर्द्यरोचकहृल्लास श्वासकाससमन्वितम् । च. चि. ३०–२१६, २१९

२ वक्ष्यते क्षीरदोषाणां सामान्यमिह कारणम् ।
यत्तदेव त्रिदोषस्य कारणं प्रदरस्य तु ॥ च. चि. ३०–२१९

१ योनीनां वातलाद्यानां यदुक्तमिह भेषजम् ।
चतुर्णां प्रदराणां च तत्सर्वं कारयेद्भिषक् ॥
रक्तातिसारिणां यच्च तथा शोणितपित्तिनाम् ।
रक्तार्शसां च यत्प्रोक्तं भेषजं तच्च कारयेत् ॥ च. चि. ३०–२२७, २२८

[१]रक्तप्रदरावरील चिकित्सेस आरंभ करण्यापूर्वी, विशेषतः स्तंभनद्रव्ये वापरण्यापूर्वी चरकाने रक्तार्शाच्या प्रकरणात सांगितलेल्या चिकित्सासूत्राप्रमाणे प्रथम संदीपन होण्यासाठी, व ग्राही गुणाने रक्त थांबण्यास मदत होण्यासाठी कडू रस पुष्कळ प्रमाणात वापरावा.

[२]वाळा, कालीयक, ( कृष्णागुरू, पीतचंदन, दारूहळद, केशर ) लोध्र, पद्मकाष्ठ, गव्हला, कायफळ, शंखभस्म, गैरीक यांतील एक एक द्रव्य व त्याच्या समभाग चंदन ( जेज्जटाने रक्तचंदन घ्यावे असे सुचविले आहे ) असे घेऊन साखर मिसळून तांदुळाच्या धुवणाबरोबर सेवन करावे.

काडेचिराईत, क्रमुक ( सुपारी असा अर्थ जेज्जट करतो तर चक्रपाणी पट्टिका लोध्र म्हणजे लोध्राचा एक प्रकार असा अर्थ करतो. जेज्जटचा अर्थ अधिक बरा. ) नागरमोथे, प्रपौंडरीक ( मोठे स्थल-कमल काही पुंड्या उसाचे मूळ वापरतात. ) कमळ, वाळा, पडवळाची पाने, धमासा, पित्तपापडा, कमलनाळ, अर्जुन, उंबर, वेताची साल, वड, राळ, यवासक, ( धमाशाचा एक प्रकार ) दालचिनी, वंशलोचन, गव्हला, केशर, तांदुळजा, अनंतमूळ, मोचरस, लाजाळू यांतीलही एक एक औषध व चंदन समभाग घेऊन त्याचा हिम, फांट, स्वरस कल्क वा काढा सेवन केला असता रक्तपित्ताचे शमन होते. यातील औषधें यथासंभव व दोषदूष्यांच्या बलाबलाचा विचार करून एक दोन किंवा अधिक अशी मिसळून वापरावीत. चंदनाबरोबरच यातील द्रव्ये साखर घालून तांदुळाच्या धुवणाबरोबरच घ्यावी असे चक्रदत्ताने आपल्या टीकेत सुचविले आहे.

[३]सालवण, पिठवण, डोरली-रिंगणी, एरंड, काकोली ( अनुपलब्ध ) चंदन, वाळा, वेलदोडे, मध या द्रव्यांनी शेळीचे दूध वा गाईचे दूध पाचपट पाणी घालून सिद्ध करावे.

---

१ अग्निसंदीपनार्थं च रक्तसंग्रहणाय च ।
दोषाणां पाचनार्थं च परं तिक्तैरुपाचरेत् ॥ च. चि. १४–१८२

२ उशीरकालीयकलोध्रपद्मकप्रियङ्गुकाकट्फलशङ्खगैरिकाः ।
पृथक्पृथक् चन्दनतुल्यभागिकाः सशर्करास्तण्डुलधावनाप्लुताः ॥
रक्तं सपित्तं तमकं पिपासां दाहं च पीताः शमयन्ति सद्यः ।
किराततिक्तं क्रमुकं समुस्तं प्रपौण्डरीकं कमलोत्पले च ॥
ह्रीबेरमूलानि पटोलपत्रं दुरालभा पर्पटको मृणालम् ।
धनञ्जयोदुम्बरवेतसत्वङ् न्यग्रोधशालेययवासकत्वक् ॥
तुगालतावेतसतण्डुलीयं ससारिवं मोचरसः समङ्गा ।
पृथक् पृथक् चन्दनयोजितानि तेनैव कल्पेन हितानि तत्र ॥
निशि स्थिता वा स्वरसीकृता वा कल्कीकृता वा मृदिताः श्रृता वा ।
एते समस्ता गणशः पृथग्वा रक्तं सपित्तं शमयन्ति योगाः ॥ च. चि. ४; ७३–७७

३ छागं पयः स्यात् परमं प्रयोगे गव्यं श्रृतं पञ्चगुणे जले वा ।
सशर्करं माक्षिकसंप्रयुक्तं विदारिगन्धादिगणैः श्रृतं वा ॥



आणि त्यात साखर व मध घालून बरेच दिवस सेवन करावे. किंवा काळ्या मनुका, सुंठ, चिकणा, गोखरू, जीवक, ऋषभक (अनुपलब्ध) यांनी सिद्ध केलेले दूध, तूप, साखर घालून घ्यावे. शतावरी व गोखरू किंवा चार पर्णिनी (सालवण, पिठवण, रानमूग, रानउडीद) यांनी सिद्ध केलेले दूध विशेषतः (मूत्रमार्गातील) अधोग रक्तपित्तात वापरावे.

[१]वडाचे अंकुर (कोवळ्या पानाच्या कळ्या किंवा वडाच्या पारंब्यांची कोवळी टोके, वाळा, निळे कमळ, सुंठ, यांचा कल्क दुधाबरोबर सेवन करावा; किंवा यांच्या कल्ककषायाने तूप सिद्ध करून ते प्राशन करावे व दूधभाताचे पथ्य करावे. यामुळे (गुदमार्गातील) अधोग रक्तपित्त विशेषतः नाहीसे होते. मोचरसाने सिद्ध केलेले दूधही अधोग रक्तपित्तावर विशेषतः उपयोगी पडते.

अडुळसा या वनस्पतीचे पंचांग घेऊन (पान, फूल, कांड) त्यामध्ये तूप सिद्ध करावे व ते मधाबरोबर सेवन करावे.

[२]कुड्याची साल एक शेर घेऊन त्यांत १६ शेर पाणी घालावे व कुड्याच्या सालीतील कडूपणा नाहीसा होईपर्यंत शिजवावे (सामान्यतः आठवा हिस्सा २ शेर उरेपर्यंत शिजवावे लागते) नंतर हा काढा गाळून घ्यावा.

---

द्राक्षाश्रृतं नागरकैः श्रृतं वा बलाश्रृतं गोक्षुरकैः श्रृतं वा ।
सजीवकं सर्षभकं ससर्पिः पयः प्रयोज्यं सितया श्रृतं वा ॥
शतावरीगोक्षुरकैः श्रृतं वा श्रृतं पयो वाऽप्यथ पर्णिणीभिः ।
रक्तं निहन्त्याशु विशेषमस्तु यन्मूत्रमार्गात् सरुजं प्रयाति ॥
च. चि. ४; ८३–३५

१. विशेषतो विट्पथसंप्रवृत्ते पयो मतं मोचरसेन सिद्धम् ।
वटावरोहैर्वटशुङ्गकैर्वा ह्रीबेरनीलोत्पलनागरैर्वा ॥
कषाययोगान् पयसा पुरा वा पीत्वाऽनुचाद्यत् पयसैव शालीन् ।
कषाययोगैरथवा विपक्वमेतैः पिबेत् सर्पिरतिस्रवे च ॥
वासां सशाखां सपलाशमूलां कृत्वा कषायं कुसुमानि चास्याः ।
प्रदाय कल्कं विपश्चेद्घृतं तत् सक्षौद्रमाश्वेव निहन्ति रक्तम् ।
च. चि. ४·८३–८८

२. कुटजत्वचो विपाच्चं पलशतमार्द्रं महेन्द्रसलिलेन ।
यावात्सात् गतरसं तत् द्रव्यं पूतो रसः ततो ग्राह्यः ॥
च. चि. १४·१८८

[१]मोचरस, लाजाळू आणि गव्हला ही द्रव्ये एक एक तोळा व तीन तोळे इंद्रजव घेऊन चांगले कुटून वरील कुडासालीच्या काढ्यात घालून शिजवावे. त्यांचा पुनः चांगला काढा झाल्यावर तो गाळून घ्यावा व पळीला लागण्याएवढा चिकट होईपर्यंत पुनः आटवावा. योग्य मात्रेमध्ये योग्य काळी अग्नीचे बळ पाहून शेळीच्या दुधाबरोबर ही रसक्रिया सेवन करावी व जुन्या तांदळाचा भात शेळीच्या दुधाबरोबर पथ्यास खावा, ही रसक्रिया कोणत्याही स्वरूपाचा रक्तस्राव थांबविण्यास उपयोगी पडते.

[२]काळी माती, ज्येष्ठमध, शंख, केशर, ( काही येथे रुधिर या शब्दाने शेळीचे रक्त असेही घेतात ) तांदुळाचे धुवण हे सर्व मध घालून प्यावे. हा प्रयोग उत्तम रक्तसंग्राहक म्हणून उपयोगी आहे. या ठिकाणी काळी माती नुसती न वापरता तिचे ढेकूळ तापवून लाल करून तांदुळाच्या धुवणात बुडवावे व वर येणारी निवळ वापरावी. इतर पदार्थ या पाण्यात टाकावे व सेवन करावे.

[३]गव्हल्याचा कल्क तांदुळाच्या धुवणातून मध घालून सेवन करावा. आहारासाठी जांगल प्राण्याचे मांसरस वापरावेत– रक्तस्राव थांबतो.

काळ्या तिळांचा कल्क एक पंचमांश भाग साखर घालून शेळीच्या दुधाबरोबर सेवन करावा. याने रक्त पडणे बंद होते.

---

१. मोचरसः ससमङ्गः फलिनी च समांशिकैस्त्रिभिस्तैश्च ।
वत्सकबीजं तुल्यं चूर्णितमत्र प्रदातव्यम् ॥
पूतोत्क्वथितः सान्द्रः स रसो दर्वीप्रलेपनो ग्राह्यः ।
मात्रा कालोपहिता रसक्रियैषा जयत्यसृक्स्रावम् ॥
छगलीपयसा पीता पेयामण्डेन वा यथाग्निबलम् ।
जीर्णौषधश्च शालीन् पयसा छागेन भुञ्जीत ॥
रक्तार्शांस्यतिसारं रक्तं सासृग्रुजो निहन्त्याशु ।
बलवच्च रक्तपित्तं रसक्रियैषा जयत्युभयभागम् ॥
च. चि. १४–१८९, १९१

२. कृष्णमृन्मधुकं शङ्खं रुधिरं तण्डुलोदकम् ।
पीतमेकत्र सक्षौद्रं रक्तसंग्रहणं परम् ॥
च. चि. १९–८६, ८८

३. पीतः प्रियङ्गुकाकल्कः सक्षौद्रस्तण्डुलाम्भसा ।
रक्तस्रावं जयेच्छीघ्रं धन्वमांसरसाशिनः ॥
कल्कस्तिलानां कृष्णानां शर्करापञ्चभागिकः ।
आज्येन पयसा पीतः सद्यो रक्तं नियच्छति ॥
च. चि. १९–८७–८८



या ग्रंथोक्त कल्पाप्रमाणेच महायोगराज गुग्गुळ, मोचरस, लाक्षा, मौक्तिक, प्रवाळ, कामदुधा, चंद्रप्रभा, नागकेशर, लोहपर्पटी, बोलपर्पटी, ( तांबडा बोल ) अशी औषधे योग्य मात्रेमध्ये वेगवेगळी किंवा यथोचित प्रमाणात एकत्र करून दाडिमावलेह, कुटजावलेह, लोणी, तूप, मध यांच्याबरोबर वापरावीत.

भोजनोत्तर कुटजारिष्ट, लोध्रासव, अशोकारिष्ट, चंदनासव, उशीरासव, सारीवाद्यासव, मंजिष्ठादी काढा वापरावा.

आसव किंवा अरिष्ट ही वात किंवा कफ यांच्या अनुबंधाच्या वेळीच वापरावीत. कुटजपर्पटी व सौराष्ट्रबोलवटी ही फक्त रक्तस्तंभनासाठी वापरावीत. शमन चिकित्सा दीपन-पाचन करून रोगमुक्त न झाल्यास शोधनचिकित्सा करावी. उदा. - गर्भाशय लेखन, दहन.

लेखनानंतर अपुनरोद्भव चिकित्सा म्हणून शतावरीकल्प, शतावरीसिद्ध दूध प्यावे. वरील चिकित्सा करूनही स्थानवैगुण्य दूर न झाल्यास गर्भाशयनिर्हरण करावे.

आहार साठेसाळ, वरई, मूग, मटकी यांची कढणे, शेळीचे दूध, गाईचे दूध, जांगल प्राण्यांचे मांसरस, असा लघू आहार घ्यावा व निदानोक्त आहार-विहार वर्ज्य करावा.

दूर्वा स्वरस २–२ चमचे दोन वेळा दुधातून द्यावा. आमलकी स्वरस १–२ चमचे दोन वेळा घ्यावा.

## असृग्दर (रक्तप्रदर)

| प्रकार | कारण | स्राव | लक्षणे स्थानिक | सार्वदेहिक लक्षणे | बाह्य चिकित्सा | अभ्यंतर चिकित्सा | परिणाम साध्यासाध्यत्व |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. वातज | रूक्षादी सेवा | फेनिल, तनु, रूक्ष, स्राव अरुण, किंशु, कोदकसंकाश, सरुज वा नीरुज रक्तस्राव | .... | कटिवंक्षण हृत्पार्श्व पृष्ठश्रोणी वेदना | कोष्ण बलातेलाचा अनुवासन बस्ती किंचित् बलातेल घालून पंचवल्कल काढ्याचा उत्तर-बस्ती देणे. | नागकेशर, शुंठी, सिद्धघृत, लोहपर्पटी, बोलपर्पटी (रक्त-बोळ) अनुपान– लोणी, मध, कुटजारिष्ट कुडाचूर्ण, ताका-बरोबर. | वातला, योनी, पांडू, कष्टसाध्य |
| २. पित्तज | अम्लोषण क्षारलवण सेवा | नीलपीत कृष्ण, प्रभूत रक्तस्राव | दाह, राग | तृषा, मोह, ज्वर, भ्रम | पंचवल्कल, तुरटी, जलाचे शीत, उत्तर-बस्ती. | अशोक, मोचरस, प्रवाळ, माक्षिक, शतावरी, सूतशेखर, चंद्रकला, अशोकारिष्ट, उशी-रासव, सारिवाद्यासव– उंबर, दूर्वा व आमलकी स्वरस. | असृजा योनी, पांडू, रक्तार्बुद कष्टसाध्य |
| ३. कफज | गुर्वादी सेवा | पिच्छिल, पांडु-वर्ण, गुरू, स्निग्ध, घन, रक्तस्राव | मंदरुजा | छर्दी, अरो-चक, हृल्लास, श्वास, आलस्य, गौरव | तुरटी, पंचवल्कल यांचा उत्तरबस्ती. | लोध्र, तुरटीलाही, लाजाळू, शंखभस्म, गैरिक, लाक्षा, सुपारी, पांढरे कमळ, शेळीचे दूध. | उपप्लुता योनी कफजयोनी कष्टसाध्य |
| ४. सान्नि-पातिक | असात्म्य विरुद्ध प्रक्लिन्न, भोजन मद्य, मनःशरीर-संताप, कटु-क्षार सेवन. | कफयुक्त, पिच्छिल, दुर्गंधी, दाहयुक्त, रक्त-स्राव, वसामेद स्राव, प्रमाण अधिक. | पाक, कोथ, तीव्र वेदना, दाह. | ज्वर, कार्श्य, पांडू, अतिसार अवष्टंभ, शूल. | चंदनतेलाचा उत्तर-बस्ती. | अनुपक्रम्य. प्रत्याख्येय. | असाध्य रक्तगुल्म (सान्निपातिक) |

## योनिव्यापत् :

स्त्रिया या अपत्याचे धारण करितात आणि त्यांना झालेल्या योनिरोगामुळे अपत्याचा विघात होतो. म्हणून स्त्रीत्वाच्या योनिरोगाचे निदान, त्यांची चिकित्सा यांचे ज्ञान आवश्यक आहे.

निरनिराळ्या ग्रंथांतून या प्रकरणासंबंधी वर्गीकरण, नामकरण व लक्षणे या स्वरूपाचे काही मतभेद आढळतात; तरी या प्रकरणात समाविष्ट होणाऱ्या रोगांची संख्या मात्र सर्वांनी सारखीच – वीस ही – दिलेली आहे. काही ठिकाणी किंचित नामभेद वाटला तरी वस्तुतः वर्णन एकच आणि नामाचा अर्थही तोच; असे असल्यामुळे हा वर्णनभेद उपेक्षणीय मानला पाहिजे. आम्ही प्रथम चरकाच्या आधारे वर्णन करून त्यानंतर इतर ग्रंथकारांच्या आधारे तौलनिक विवेचन करणार आहोत. 'योनिव्यापत्' या प्रकरणात त्र्यावर्त योनी, तिची कार्ये व रचना यांमधली विकृती वर्णन केलेल्या आहेत. याव्यतिरिक्त गुल्म, ग्रंथी, वृद्धी इत्यादी कोणतेही भाव या प्रकारात समाविष्ट होत नाहीत. 'योनिव्यापत्' रोगांचे निरनिराळ्या ग्रंथांतून उपलब्ध होणारे वर्णन पाहता या विशेषात सर्व ग्रंथकारांचे एकमत आहे असे आढळते.

[1]योनिव्यापत् या नावाने जे वीस रोग सांगितले आहेत, त्यांस एकूण चार प्रकारची कारणे असतात.

(१) स्त्रीने केलेला मिथ्या आहार-विहार.
(२) दुष्ट झालेले रज आणि आर्तव,
(३) शुक्रशोणित संयोगामधील विशेषतः मातृद्वारा आलेले बीजदोष, व
(४) दुर्दैव.

ही चार योनिरोगास कारणीभूत होतात.

[2]बीजदोष म्हणजे स्त्रीच्या जन्मकाली, ती मातेच्या गर्भाशयात असताना व तेथे

– पुनर्वसुं जितात्मानमग्निवेशोऽनुपृष्टवान् ।
भगवन् यदपत्यानां मूलं नार्यः परं नृणाम् ।।
तद्विघातो गदैश्चासां क्रियते योनिमाश्रितैः ।
तस्मात्तेषां समुत्पत्तिमुत्पन्नानां च लक्षणम् ।।
सौषधं श्रोतुमिच्छामि प्रजानुग्रहकाम्यया । इति ।।
शिष्येण पृष्टस्तु प्रोवाचर्षिवरोऽत्रिजः ।।

१ विंशतिर्व्यापदो योनेर्निर्दिष्टा रोगसंग्रहे ।
मिथ्याचारेण ताः स्त्रीणां प्रदुष्टेनार्तवेन च ।
जायन्ते बीजदोषाच्च दैवाच्च शृणु ताः पृथक् । च. चि. ३०–७, ८

२ बीजदोषः स्त्रियो जन्मकाले योन्यारंभकस्य बीजस्य उपहतत्वम् ।
अ. सं. उ. ३८ टीका, पान २८९



निरनिराळ्या अंगप्रत्यंगांची वाढ होत असताना ज्यातून योनीसारख्या स्त्री-विशिष्ट अवयवांची वाढ व्हावयाची ते बीजच दोषांनी उपहत होते. त्यामुळे उत्पन्न होणारा योनी हा अवयव विकृत निपजतो.

[1]मिथ्या आहार-विहारांमध्ये – विकृत मनःप्रवृत्तीची स्त्री-पुरुष-शिस्नाकृती लोहादी द्रव्यांनी निर्माण केलेली साधने वापरत – याचाही समावेश होतो. वाग्भटाच्या वर्णनातील अपद्रव्य शब्दांनी हे कृत्रिम शिस्नही अभिप्रेत आहे ( वा. उ. ३३–२८ ).

या चार कारणांचे, मिथ्याचारामुळे दुष्ट झालेले रज आणि आर्तव व दैवामुळे उत्पन्न झालेले बीजदोष असे पुन्हा द्विविध वर्गीकरण करणे शक्य आहे.

## [2]वातज योनिव्यापत् :

वातकर आहार-विहार करणाऱ्या, विशेषतः वातप्रकृती असलेल्या स्त्रीमध्ये वायूचा प्रकोप होऊन तो योनिमार्गामध्ये आश्रय करतो. त्यामुळे योनीमध्ये टोचल्यासारख्या वेदना उत्पन्न होतात. योनिभागाचे मार्दव जाते, लवचिकपणा उणावतो. ( स्तंभ ), मुंग्या चालल्याप्रमाणे वाटते, खरखरीतपणा येतो, बधिरता येते, योनीमध्ये आवाज उत्पन्न होतो, पार्श्वशूल, कटिग्रह, उदरशूल, मलावष्टंभ, श्रम अशी वाताची अनेक लक्षणे होतात; व रजःस्राव हा सशब्द, सवेदन, फेनिल, तनू ( अल्पद्रव ), रूक्ष असा होतो. वंक्षणपार्श्व गळून गेल्याप्रमाणे वाटते ( भ्रंश असा पाठ घेऊन योनिभ्रंश असा अर्थ काही करतात. ) गुल्म हा उपद्रव होतो.

टीकाकाराने 'वातिकप्रदररूपेयं योनिव्यापद् ।' असे म्हटले असले तरी त्यातील

१ अपद्रव्यैः इति लोहादिकृतैः उपलिंगैः ।
उपलिंगसुरतं देशान्तरेषु प्रसिद्धम् ।। अ. सं. उ. ३८ टीका, पान २८९

२ वातलाहारचेष्टाया वातलायाः समीरणः ।
विवृद्धो योनिमाश्रित्य योनेस्तोदं सवेदनम् ।। ९ ।।
स्तम्भं पिपीलिकासृप्तिमिव कर्कशतां तथा ।
करोति सुप्तिमायासं वातजांश्चापरान् गदान् ।। १० ।।
सा स्यात् सशब्दरुक्फेनतनुरूक्षार्तवाऽनिलात् । च. चि. ३०–९, १०

विषमस्थाङ्गशयन भृशमैथुनसेवनैः ।
दुष्टार्तवादपद्रव्यैर्बीजदोषेण दैवतः ।।
योनौ क्रुद्धोऽनिलः कुर्याद् रुक्तोदायामसुप्तताः ।
पिपीलिकासृप्तिमिव स्तम्भं कर्कशतां स्वनम् ।।
येनिलारुणकृष्णाल्पतनुरूक्षार्तवस्रुतिम् ।
भ्रंसं वंक्षणपार्श्वादौ व्यथां गुल्मं क्रमेण च ।। वा. उ. ३३–२८ ते ३०

रजासंबंधीची लक्षणे तेवढीच वातप्रदरात असतात. मूलभूत असे रजःस्रावाचे आधिक्य असणे त्याचा उल्लेख नाही. शिवाय स्तंभ, कर्कशता, सुप्ती यांसारखी अवयवांच्या विकृतीची लक्षणेही प्रदरामध्ये नसतात. एकाच अध्यायामध्ये चरकासारखा श्रेष्ठ ग्रंथकार एकच रोग दोन वेगवेगळ्या नावांनी वर्णन करील हे शक्य नाही. यासाठी वातज योनिव्यापद् व वातज प्रदर हे एक नव्हेत, असे म्हटले पाहिजे. पुढेही पित्त, कफ, रक्त यांच्यामुळे होणाऱ्या योनिरोगांच्या बाबतीत तसेच मानले पाहिजे. टीकाकाराने हे मतही लक्षात घेतले पाहिजे.

जे ही योनिव्यापद् आणि प्रदर वेगवेगळे मानतात ते या अध्यायाच्या शेवटी प्रदरचिकित्सेसाठी एक स्वतंत्र प्रकरण मानतात, असे म्हणून टीकाकार चक्रदत्त प्रदरावरील ग्रंथास ( च. चि. ३०–२०४ ) प्रक्षिप्त मानतो, ते मात्र योग्य नाही. चरकाने मूलवचनामध्ये जे चिकित्सेचे सूत्र सांगितले आहे त्यामध्ये त्याने वातजादी चार योनिरोगांवर जी चिकित्सा सांगितली आहे तीच या चारही प्रदरांवर करावी असे म्हटले आहे. त्याप्रमाणेच रक्तातिसार, रक्तपित्त व रक्तार्श यांतीलही चिकित्सा प्रदरावर करावी ( च. चि. ३०–२२७, २२८ ) असे सांगितले आहे. या वर्णनावरून चरकासही योनिव्यापत् आणि प्रदर हे भिन्न असणे अभिप्रेत होते असे दिसते. केवळ चिकित्सा एक सांगितली म्हणून जर योनिव्यापत् आणि प्रदर एकच मानावयाचा असेल तर मग त्याच तर्काने प्रदर व रक्तार्श, प्रदर व रक्तातिसार यांनाही एकच मानण्याची आपत्ती येईल; आणि ते योग्य नाही हे स्पष्ट आहे.

वातज योनिव्यापत् – कष्टसाध्य आहे.

## [1] पित्तज योनिव्यापत् :

तिखट, आंबट, खारट, क्षार अशी द्रव्ये अति प्रमाणात सेवन केल्यामुळे पित्त प्रकुपित होऊन योनीचा आश्रय करते. त्यामुळे निळसर, पिवळसर, काळसर अशा रंगांची रजःप्रवृत्ती होते. रजाचे प्रमाण अधिक असते. स्पर्श उष्ण असतो. दुर्गंधी येते. योनिमार्गाची आग होते; कित्येक वेळा योनिमार्गाचा पाकही होतो. सर्व अंग गरम वाटते; ज्वर येतो.

वाग्भटामध्ये ओष हे लक्षणही सापडते.

— 'ये तु एतद्व्यापदां प्रदरं भिन्नमेव मन्यन्ते ते प्रदरचिकित्सार्थं प्रकरणान्तरं अत्राध्याये पठिष्यन्ति । च. चि. ३०–१५ टीका

१ व्यापत्कट्वम्ललवणक्षाराद्यैः पित्तजा भवेत् ।
दाहपाकज्वरोष्णार्ता नीलपीतासितार्तवा ॥
भृशोष्णकुणपस्रावा योनिः स्यात्पित्तदूषिता । च. चि. ३०–११, १२



## [1] कफज योनिव्यापत् :

अभिष्यंदी पदार्थांचे सेवन केल्यामुळे कफ प्रकुपित होऊन त्याने ज्या वेळी योनिमार्ग दुष्ट होतो त्या वेळी योनिमार्गामध्ये बुळबुळीतपणा येतो, शैथिल्य येते, खाज सुटते, स्पर्श शीत असतो. वेदना अतिशय अल्प असतात. स्त्रीच्या वर्णात पांडुता दिसते व रजःस्राव चिकट बुळबुळीत असा होतो.

## [2] सान्निपातिक योनिव्यापत् :

पथ्यकर व अपथ्यकर अशी सर्व प्रकारची द्रव्ये एकत्र मिसळून खाण्याची सवय असलेल्या स्त्रीमध्ये तीनही दोष दुष्ट होतात आणि ते योनिमार्गामध्ये आश्रय करून दोषांच्या आधिक्यानुरूप ज्वर, पाण्डु, तीव्रशूल, कार्श्य, निद्रानाश अशी वेगवेगळी लक्षणे उत्पन्न करतात. दाह, शूल ही लक्षणे त्यात विशेषेकरून आढळतात. आणि रक्तस्रावाचे स्वरूप फिकट, बुळबुळीत, दुर्गंधी, सपूय असते. या योनिरोगामध्ये तीनही दोषांची लक्षणे प्रत्ययास येतात.

## [3] असृजा योनिव्यापत् :

रक्तपित्तकर आहारविहाराने स्त्रीचे पित्त दूषित होऊन ते रक्तास दुष्ट करते व योनिमार्गातून अधिक प्रमाणात स्रवते. गर्भधारणा झाली तरीसुद्धा हा स्राव थांबत नाही. त्यामुळे गर्भ टिकत नाही. म्हणूनच या योनीला 'असृजायोनी' असे नाव आहे. त्याप्रमाणे 'अप्रजा योनी' असेही नाव पाठान्तरी आहे. दाहयुक्त रक्तस्राव अधिक प्रमाणात होतो ती 'लोहितक्षरा' संज्ञा असृजेलाच सुश्रुताने दिली आहे.

१ कफोऽभिष्यन्दिभिर्वृद्धो योनिं चेद् दूषयेत् स्त्रियाः ।
स कुर्यात् पिच्छिलां शीतां कण्डुग्रस्ताल्पवेदनाम् ॥
पाण्डुवर्णां तथा पाण्डुपिच्छिलार्तववाहिनीम् । च. चि. ३०–१३, १४

२ समश्नन्त्या रसान्सर्वान्दूषयित्वा त्रयो मलाः ।
योनिगर्भाशयस्थाः स्वैर्योनिं युञ्जन्ति लक्षणैः ।
सा भवेद्दाहशूलार्ता श्वेतपिच्छिलवाहिनी ॥ च. चि. ३०–१४, १५

३ रक्तपित्तकरैर्नार्या रक्तं पित्तेन दूषितम् ।
अतिप्रवर्तते योन्यां लब्धे गर्भेऽपि सासृजा ॥ च. चि. ३०–१६
सदाहं प्रक्षरत्यस्रं यस्यां सा लोहितक्षरा । सु. उ. ३८–१२

### [१] अरजस्का योनिव्यापत् :

पित्त प्रकुपित होऊन गर्भाशयाचा आश्रय करते व त्या ठिकाणच्या रजाला दुष्ट करते. पित्ताच्या उष्ण गुणामुळे रज शुष्क होते, रजःप्रवृत्ती होत नाही. कृशता व वैवर्ण्य ही लक्षणे उत्पन्न होतात. दाह हे लक्षणही असते.

वाग्भटाने "वातपित्ताभ्यां क्षीयते रजः सदाहकार्श्यवैवर्ण्यं यस्या सा लोहित-क्षया।" (वा. उ. तं. ३०।४५) असे वर्णन याच व्याधीचे केले आहे.

### [२] अचरणा योनिव्यापत् :

योनिमार्गाची मासिक पाळीच्या वेळी वा एरवीही प्रक्षालन करून (त्या भागाची) स्वच्छता राखणे, स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. हे ज्या वेळी होत नाही त्या वेळी तेथे जंतू उत्पन्न होतात आणि ते कण्डू उत्पन्न करतात. या कंडूमुळे स्त्रीच्या-ठिकाणी मैथुनाची अत्यंत इच्छा होते. त्यामुळेच स्त्री पुष्कळ वेळा कृत्रिम साधनांचाही उपयोग करते. या कुकृत्यामुळे दुष्ट वर्तनाची अशा अर्थी 'अचरणा' शब्द या व्याधीस प्राप्त झाला आहे. योनिमार्गात उत्पन्न होणारे कृमी हे सूक्ष्म असे बुरशीच्या स्वरूपाचेही असतात आणि कित्येक वेळा सूत्राकृतीही असतात. अचरणा योनीमध्ये पुढे दिलेल्या चिकित्सेतील वर्णनावरून शोथ हे लक्षण समाविष्ट केले पाहिजे (च. चि. ३०–१०४). कृमिकण्डूबरोबर शोथ येणे स्वाभाविक आहे. हा रोग प्रमेहाचा उपद्रव म्हणूनही असतो. याच योनिरोगास वाग्भट 'विप्लुता योनी' म्हणतो.

### [३] अतिचरणा योनिव्यापत् :

अतिमैथुनामुळे वातप्रकोप होऊन तो वायू योनिमार्गामध्ये शोथ, सुप्ती व शूल ही लक्षणे उत्पन्न करतो. मैथुनाच्या अतिचरणाने ही (अतिभोगाने) योनिव्यापत् निर्माण होते म्हणून हिला अतिचरणा अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. ही गर्भ ग्रहण करू शकत नाही.

१ योनिगर्भाशयस्थं चेद् पित्तं संदूषयेदसृक् ।
सारजस्का मता कार्श्यवैवर्ण्यजननी भृशम् ।। च. चि. ३०–१७

– अरस्का अनार्तवा । टीका

२ योन्यामधावनात् कण्डू जाताः कुर्वन्ति जंतवः ।
सा स्वादचरणा कण्ड्वा तथाऽतिनरकांक्षिणी ।। च. चि. ३०–१८]

– सजातजन्तु कंडूला कण्ड्वा चातिरतिप्रिया विप्लुताख्या त्वधावनात् ।
वा. उ. ३३–४९

३ पवनोऽतिव्यवायेन शोफसुप्तिरुजः स्त्रियाः ।
करोति कुपितो योनौ सा चातिचरणा मता ।। च. चि. ३०–१९

– बहुशश्चातिचरणात् अन्या बीजं न विंदति । सु. उ. त. ३८–१६



### [१] प्राक्चरणा योनिव्यापत् :

जिच्या अवयवांची अजूनही पूर्ण वाढ झालेली नाही अशा बालिकेवर जर मैथुनाची आपत्ती आली तर वायूचा प्रकोप होतो आणि तो योनी दुष्ट करून त्या ठिकाणी वेदना वाढवितो. कटी, पृष्ठ, ऊरू आणि वंक्षण या ठिकाणी शूलादी लक्षणे उत्पन्न होतात.

योग्य अशा मैथुनकालाच्या पूर्वीच मैथुनाचरण घडून ही योनिव्यापत् उत्पन्न होत असल्यामुळे प्राक्चरणा हे नाव या व्याधीस मिळाले आहे.

### [२] उपप्लुता योनिव्यापत् :

स्त्रीने विशेषतः गर्भिणीने कफकर पदार्थ अधिक प्रमाणात पुष्कळ दिवसपर्यंत सेवन केल्यामुळे कफाची वृद्धी होते व छर्दी आणि निःश्वास यांचे वेगधारण केल्यामुळे वायू प्रकुपित होतो. तो कफकर आहाराने संचित झालेल्या कफास योनिमार्गात खेचून नेतो, त्यामुळे योनिमार्गातून पाण्डुर, श्वेत असा स्राव वा अगदी कफसदृश स्राव वाहतो. योनीमध्ये टोचल्यासारख्या वेदना उत्पन्न होतात. क्वचित आलस्य, अंगमर्द, शूल, मलावष्टंभ, अग्निमांद्य, हृल्लास, रोमहर्ष अशी कफाची वा वाताची इतरही लक्षणे उत्पन्न होतात. श्वेतप्रदर ही संज्ञा याच रोगास आहे.

वरील सर्व लक्षणांनी ती अतिशय पीडित, क्षुब्ध होते म्हणून तिला उपप्लुता असे नाव आहे.

१ मैथुनादतिबालायाः पृष्ठकटयूरुवंक्षणम् ।
रुजन् दूषयते योनिं वायुः प्राक्चरणा हि सा ।। च. चि. १०–२०

– रूजन्निति दुःखयन् । उचितव्यवायकालात् प्राक्
व्यवायाचरणात् प्राक्चरणा उच्यते ।। च. पा. टीका

– (एवं) प्राक् चरतीति प्राक्चरणा ।
रुजन्वायुर्दुःखयतीत्यर्थः । ज. टीका

२ गर्भिण्याः श्लेष्मलाभ्यासाच्छर्दिनिः श्वासनिग्रहात् ।
वायुः क्रुद्धः कफं योनिमुपनीय प्रदूषयेत् ।।
पाण्डुं सतोदमस्रावं श्वेतं स्रवति वा कफम् ।
कफवातामयव्याप्ता सा स्याद्योनिरुपप्लुता ।। च. चि. ३०–२१ ते २२

## [1] परिप्लुता योनिव्यापत् :

पित्तप्रकृतीची स्त्री मैथुनाच्या वेळी शिंक व ढेकर यांचे वेग धारण करील तर वायू प्रकुपित होऊन पित्ताशी संमूर्च्छित होतो. आणि त्यासह योनिमार्गास दूषित करतो. योनीस सूज येते. स्पर्श सहन होत नाही. यामुळेच सुश्रुताने सांगितलेले 'परिप्लुतायां भवति ग्राम्यधर्मे रुजा भृशम् ।' हे लक्षण ( सु. उ. ३८–१० ) आढळते. नीलवर्ण, पीतवर्ण असा पीडाकर रजःस्राव होतो.

श्रोणी, वंक्षण, पृष्ठ यांच्यामध्ये वेदना उत्पन्न होतात व ज्वर येतो. परिप्लुतेमध्ये चिकित्सेतील लक्षणसमुच्चयाचा विचार करता विस्फोट हे लक्षण अधिक घ्यावे. परिप्लुतेमध्ये पित्तदुष्टी असते आणि चरकपाठसंवादी सुदान्तसेनाच्या मताप्रमाणे विस्फोट हे प्रकुपित पित्ताचे कार्य आहे.

वाग्भटाप्रमाणे बस्ती व कुक्षीच्या ठिकाणी गुरुत्व, अरोचक, अतिसार ही लक्षणे अधिक सापडतात ( वा. उ. ३३–४७ ).

## [2] उदावर्ता योनिव्यापत् :

वेगाच्या उदावर्तनामुळे वायू हा योनीमध्ये प्रतिलोम होतो. त्यामुळे स्त्री वेदनापीडित होऊन तिचा रजःस्राव कष्टाने होतो. रजःस्राव झाल्यानंतर लगेच बरे वाटते. रजाचा वेग प्रतिहत होतो म्हणून या व्याधीस उदावर्तिनी असे म्हणतात. यातील सकष्ट रजःप्रवृत्ती या प्रमुख लक्षणावरून कष्टार्तव अशी संज्ञा या व्याधीस दिली जाते. व्याधीच्या काही दिवस अगोदर वा पाळी सुरू झाल्यानंतर एक दिवस या व्याधीचे विशेस स्वरूप व्यक्त होते.

या योनीव्यापदामध्ये रजःस्राव फेनिल असतो असे वाग्भटाने दिले आहे. ( वा. उ. ३३–३३ )

१ पित्तलाया नृसंवासे क्षवथूद्गारधारणात् ।
पित्तसंमूर्च्छितो वायुर्योनिं दूषयति स्त्रियाः ॥
शूना स्पर्शाक्षमा सार्तिनीलपीतमसृक् स्रवेत् ।
श्रोणिवंक्षणपृष्ठार्ति जरार्तायाः परिप्लुता ॥ च. चि. ३०–२३ ते २४

२ वेगोदावर्तनाद्योनिमुदावर्तयतेऽनिलः ।
सा रुगार्ता रजः कृच्छ्रेणोदावृत्तं विमुञ्चति ॥
आर्तवे सा विमुक्ते तु तत्क्षणं लभते सुखम् ।
रजसो गमनादूर्ध्वं ज्ञेयोदावर्तिनी बुधैः । च. चि. ३०–२५ ते २६



## कर्णिनी योनिव्यापत् :

प्रसूतिकाल अगदी जवळ आल्यानंतर परंतु गर्भ गर्भाशयमुखात प्रवेश करण्यापूर्वीच म्हणजे गर्भाशयमुख संकुचित असतानाच गर्भिणी या अशा अयोग्य वेळीच जर प्रवाहन करू लागली तर वातप्रकोप होतो आणि गर्भच वायूच्या अनुलोम गतीस अडथळा आणतो, त्यामुळे वायू विमार्गग होऊन रक्तकफाशी मूर्च्छित होतो व त्यांच्या सहाय्याने योनीमध्ये कर्णिकाकार (बिट्टी वा पिवळी कण्हेर यांच्या फुलांच्या आकाराप्रमाणे) विकृती उत्पन्न करतो. रक्तकफाच्या संचितीमुळे द्वितीय आवर्ताच्या मुखाशी




आ. : १३

१. प्रकृत गर्भाशय मुख. २. कर्णिका. ३. गर्भशिर.

– अकाले वाहमानाया गर्भेण पिहितोऽनिलः ।
कर्णिकां जनयेद्योनौ श्लेष्मरक्तेन मूर्च्छितः ॥
रक्तमार्गावरोधिन्याः सा तया कर्णिनी मता । च. चि. ३०–२७

– अकाले वाहमानाया इत्यादि अप्राप्ते गर्भनिष्क्रमणकाले प्रवाहणं कुर्वन्त्याः ।
कर्णिकामिति कर्णिकाकारं ग्रन्थिम् ॥ च. चि. ३०–२७ टीका

येणारा हा एक प्रकारचा आशुकारी शोथच आहे. प्रसव होऊन गेल्यावर वा तत्पूर्वीही यातून श्लेष्म रक्ताचा स्राव होऊन जातो. आणि व्याधींचा आपोआप उपशम होतो. परंतु श्लेष्म रक्ताची संचिती असून जर या शोथामुळे प्रसवापूर्वी होणारा रक्तादी स्राव व गर्भ यांच्या गतीस अडथळा आला तरच त्यावर लेखन-चिकित्सा करावी लागते.

## [1] पुत्रघ्नी योनिव्यापत् :

रूक्षादी गुणांनी वायू प्रकुपित होतो तो रजासही दुष्ट करतो. दुष्ट रजामुळे उत्पन्न झालेला गर्भ जन्मास येताच मरतो. गर्भाचे पोषण करणाऱ्या प्रसादरूप रजाची दुष्टी आणि रूक्षादी गुणांनी वाढलेला वात या हत्येस कारण आहे. शार्ङ्गधराच्या टीकाकराने 'पुत्रघ्नीरक्तसंक्षयात्' असे केलेले वर्णन या दृष्टीने चिंत्य आहे. संप्राप्तीमध्ये गर्भाचे दुष्टशोणितजत्व हीच प्रधान घटना आहे. अपत्ये जन्माबरोबर मरतात म्हणून या योनीस पुत्रघ्नी म्हणतात. येथे पुत्र शब्द सामान्य अर्थाचाच वाचक आहे. या अपत्यमृत्यूमध्ये पुत्रांचीच संख्या अधिक असते असे आढळते; म्हणूनच टीकाकारांनी तसा उल्लेख केला आहे.

यालाच जातघ्नी असे नाव वाग्भटाने दिले आहे.

## अंतर्मुखी योनिव्यापत् :




आ. १४ अ : वलय

१. प्रकृत गर्भाशय. २. पश्चात् वक्र गर्भाशय.
३. पुरतो वक्र गर्भाशय (अंतर्मुखी योनीकरिता)

१ रौक्ष्याद्वायुर्यदा गर्भं जातं जातं विनाशयेत् ।
दुष्ट शोणितजं नार्याः पुत्रघ्नी नाम सा मता ॥ च. चि. अ. ३०–२८

– रौक्ष्यादिति रूक्षगुणोत्कर्षात् ।
दुष्ट शोणितजमिति वचनादिह वायुनाऽऽर्तवदुष्टिरपि क्रियते इति दर्शयति । अत्र च यद्यपि सामान्येनैव गर्भविनाश उक्तः तथाऽपि पुत्रस्यैव प्राधान्यात् पुत्रघ्नीति व्यपदेशो ज्ञेयः । च. चि. ३०–२८ टीका.



साध्या उत्तानासनाव्यतिरिक्त इतर प्रकारची वेडीवाकडी शरीरस्थिती असणारी आसने करून मैथुनास प्रवृत्त होणाऱ्या स्त्रीस हा व्याधी होतो; वा भोजनाने पोट फार भरलेल्या स्थितीमध्ये मैथुन केल्यामुळे हा रोग होतो. वायू हा अन्नभाराने किंवा आसनाच्या वाकड्यातिकड्या स्थितीमुळे योनिभागावर आलेल्या विकृत-भारामुळे प्रकुपित होऊन योनिमार्गातील द्वितीय, तृतीय आवर्तास वाकडेपणा आणतो. यात विशेषतः गर्भाशयमुख विकृत होते. यात अस्थी व मांस यामध्ये वाताच्या विविध पीडा होतात. स्त्री मैथुनकर्म सहन करू शकत नाही.

काही वेळा ही योनी सहजावस्थेतही सापडते.

## सूचिमुखी योनिव्यापत् :




आ. : १५

१. प्रकृत गर्भाशयमुख, २. विकृत गर्भाशयमुख (सूचिमुख अणुद्वार), ३. गर्भाशय.

– सर्वो हि गर्भः पुत्र इत्यभिप्रेतः । जज्जट टीका

[१]गर्भावस्थेत असताना मातेच्या मिथ्या आहारविहारामुळे वायू रूक्षगुणांनी प्रकुपित होतो आणि तो गर्भाच्या योनिमुखास अगदी संकुचित करतो. योनिमुख अगदी लहान सुईच्या छिद्राच्या आकारासारखे असते. मुख सुईच्या आकारासारखे असते असे म्हणण्यात गर्भशय्येचा आकार म्हणजेच तृतीय आवर्ताचा आकार प्रकृत असतो असा अर्थ केला पाहिजे असे नाही, तर तो आकारही सूचिमुख असताना तदनुकूल असा पुष्कळ वेळा लहानच असतो. गर्भाशयोत्पादक भागावर वायूच्या रूक्ष गुणांचे कार्य होऊन, मुखाप्रमाणे गर्भाशयाचाही संकोच होतो. परंतु पूर्णपणे उपहनन होत नाही. गर्भाशयाचे उपहनन नसल्यामुळे पुढे विकसित होणाऱ्या स्त्रीत्वाला व्यत्यय येत नाही. उपहननामुळे होणारी अशी अनुपक्रमा षंढीयोनी सूचिमुखी योनीपेक्षा वेगळी सांगितली आहे. ही सूचिमुखी योनी उपक्रम्य आहे.

## [२]शुष्का योनी :

मैथुनकाली वेगांचा रोध केल्यामुळे वायू प्रकुपित होऊन योनिमार्गास अगदी कोरडेपणा आणतो. या स्थितीत मलमूत्राचाही अवरोध असतो आणि तो पीडाकार होतो. ही शुष्कता तारुण्यात सापडली तरच ती शुष्क योनी ठरेल.

## [३]वामिनी योनी :

गर्भाशयात प्रविष्ट झालेले शुक्र सहा सात दिवसांतच स्थानवैगुण्यामुळे वायूने ओकल्यासारखे बाहेर टाकले जाते. या स्रावाच्या वेळी व्यथा असते वा नसतेही.

– व्यवायमतितृप्ताया भजन्त्यास्त्वन्नपीडितः ।
वायुमिथ्यास्थिताङ्गाया योनिस्रोतसि संस्थितः ।
वक्रयत्याननं योन्याः साऽस्थिमासानिलार्तिभिः ॥
भृशार्तिर्मैथुनाशक्ता योनिरन्तर्मुखी मताः । च. चि. ३०–२९, ३०
– व्यवायमतितृप्ताया इत्यादौ अतितृप्ताया व्यवायं भजन्त्या व्यवायकाले मिथ्या-स्थिताङ्गाया अन्नपीडितो वायुर्योनेराननमन्तर्मुखं वक्रयति; वक्रयतीतिपदेन वक्रतायाऽन्तर्मुखनयनमभिप्रेतम् । टीका
१ गर्भस्थायाः स्त्रिया रौक्ष्याद्वायुर्योनिं प्रदूषयन् ।
मातृदोषादणुद्वारां कुर्यात् सूचिमुखी तु सा । च. ज. ३०–३१
– मातृदोषेण गर्भस्थितायाः सूच्यग्रवदणुमुखीं
निर्वर्तयतीत्यणुमुखी बीजदोषादेव योनिव्यापत् । जज्जट टीका
२ व्यवायकाले रुन्धन्त्या वेगान् प्रकुपितोऽनिलः ।
कुर्याद्विण्मूत्रसङ्गार्ति शोषं योनिमुखस्य च ॥ च. चि. ३०–३२
३ षडहात् सप्तरात्राद्वा शुक्रं गर्भाशयं गतम् ।
सरुजं नीरुजं वाऽपि या स्रवेत् सा तु वामिनी । च. चि. ३०–३३



[१]येथे 'शुक्र' या शब्दाचा अर्थ शुक्रार्तव संयोगानंतर उत्पन्न झालेला परंतु गर्भाशयामध्ये स्थिर होण्यापूर्वीच्या अवस्थेतील गर्भ असा अभिप्रेत आहे.

## [२]षंढीयोनी :

शुक्र-आर्तव संयोगातील बीजभूत दोषामुळे प्रकुपित झालेला वायू गर्भावस्थेत असतानाच स्त्रीच्या गर्भाशयाचे उपहनन करतो. गर्भाशय अगदी लहान राहतो. त्यामुळे पुढे योग्य वयात येऊनही स्त्रीत्वाचा विकास होत नाही. स्तन खुरटलेले राहतात आणि पुरुषाविषयी ती तिरस्काराची भावना बाळगते. त्यामुळे हिच्याठिकाणी बरे न करता येण्यासारखे वंध्यत्व असते, म्हणून हिला 'षंढीयोनी' म्हणतात. मैथुन घडला, तर तो योनीच्या खरस्पर्शामुळे सुखावह होत नाही. हिला रजोदर्शनही नसते. [अनार्तवाऽस्तनी षढी खरस्पर्शा च मैथुने ।] (शा. प्र. ख. अ. ७ सू. १७८ टीका).

चरकाने षंढी आणि पुत्रघ्नी अशा ज्या दोन योनी वर्णन केल्या आहेत वा हारीताने जे वंध्येचे वर्णन केले आहे त्याची मूलभूत कारणे कशी उत्पन्न होतात हे या अष्टाङ्ग संग्रहाच्या वचनावरून लक्षात येते.

स्त्रीबीजामध्ये ज्या वेळी दोषांनी अतिशय विकृती उत्पन्न होते आणि असे बीज पुरुषबीजाशी संयोग पावून गर्भ उत्पन्न करते त्या वेळी उत्पन्न होणारी कन्या ही पूर्णपणे वंध्या असते. ज्या वेळी हे दोष थोडे कमी दुष्ट असतात आणि स्त्रीबीजाचा विशेष उपघात करीत नाहीत त्या वेळी जी कन्या उत्पन्न होते तिला मुले उत्पन्न होतात, पण ती जन्मतःच मरतात.

## [३]महायोनी :

विषम आणि दुःखकारक मैथुनामुळे वायू प्रकुपित होऊन तो अपत्यपथातील

१ सवातमुद्गिरेद्बीजं वामिनी रजसा युतम् । वा. उ. अ. ३८–१२
– रजसायुतमार्तवमिश्रम् । वा. उ. अ. ३८–१२ टीका
२ बीजदोषात्तु गर्भस्थमारुतोपहताशया ।
नृद्वेषिण्यस्तनी चैव षण्ढी स्यादनुपक्रमा । च. चि. ३०–३४
– बीजदोषादिति सामान्यवचनेनापि आर्तवरूप बीजदोष एव ज्ञेयः, तद्दोषस्यैव गर्भाशयोपघातकरत्वात् । उक्तं हि— यदा ह्यस्याः शोणिते गर्भाशयबीजभागः प्रदोषमापद्यते तदा वन्ध्यां जनयति ( शा. अ. ४ ) इति । मारुतोपहताशयेति मारुतोपहतगर्भाशया । अस्तनी ईषत्स्तनी । टीका
३ विषमं दुःखशय्यायां मैथुनात् कुपितोऽनिलः ।
गर्भाशयस्य योन्याश्च मुखं विष्टम्भयेत् स्त्रियाः ॥
असंवृतमुखी सार्तीरूक्षफेनास्रवाहिनी ।
मांसोत्पन्ना महायोनिः पर्ववंक्षणशूलिनी ॥ च. चि. ३०–३५, ३६

पेशींना शिथिल करून गर्भाशयाचे वा योनीचे मुख विस्तृत करतो. त्यामुळे योनीचे मुख हे उघडे राहून त्यातून आतील मांसमय भाग बाहेर येतो– येथे मांसमय




आ. १६ : १. योनिस्रंस

भागाने त्र्यावर्त योनीचे स्थानभ्रष्ट भाग आणि त्यावर येणारा शोथ अभिप्रेत आहे. चरकाच्या वचनामध्ये महायोनीच्या लक्षणात स्रंस म्हणजे स्थानभ्रंश प्रत्यक्ष वर्णन केलेला नसला तरी पुढे महायोनीची चिकित्सा सांगत असताना त्याने–

प्रस्रस्तां सर्पिषाऽभ्यज्य क्षीरस्विन्नां
प्रवेश्य च बध्नीयात् इति ।

च. चि. अ. ३०–३१३

यातील प्रस्रस्तां आणि प्रवेश्य च या पदांवरून महायोनिव्याधित विवृत मुखातून योनीच्या त्र्यावर्त भागाचा होणारा भ्रंश (स्थानभ्रंश) त्यास अभिप्रेत आहे असे दिसते.



आ. १६ अ : वलय
गर्भाशयभ्रंश, स्रंस व महायोनी या योनिरोगांमध्ये गर्भाशय स्वस्थानी राखण्याकरिता.



वाग्भटाने " कुरुते विवृतां स्रस्तां वातिकीम् इव दुःखिताम् । " वा. उ. ३३–४१ असे स्पष्टपणे म्हटले आहे. त्यावरून योनिमार्गाचा स्थानभ्रंश येथे अभिप्रेत आहे यात शंका घेण्याचे कारण नाही. या भ्रंश लक्षणाव्यतिरिक्त या अवस्थेमध्ये रूक्ष फेनिल असे स्राव होतात व पर्व ( सांधे ) वंक्षण या ठिकाणी शूल होतो. वातज योनीत सांगितलेली इतर लक्षणे होतात. सस्वनतादी इतर लक्षणे विशेषतः असतात.

प्रत्यक्षामध्ये स्रंश, भ्रंश व महायोनी यांतील फरक पुढीलप्रमाणे दिसतो.

(१) **स्रंस** : यामध्ये गर्भाशय हा स्वस्थानापासून अल्प प्रमाणात खाली सरकलेला असतो.

(२) **भ्रंश** : अंडिनी, फलिनी योनी –

या अवस्थेमध्ये मूत्राशय व मलाशय हेही गर्भाशयाबरोबर स्वस्थानापासून जास्त प्रमाणात खाली सरकलेले दिसतात. यामध्ये मूत्राशयाचा खाली आलेला भाग अंडासारखा दिसतो म्हणून याला अंडिनी किंवा फलिनी योनी म्हणतात.

(३) **महायोनी** : यामध्ये संपूर्ण गर्भाशय योनिद्वारातून बाहेर आलेला दिसतो. वर दिलेल्या अवस्था ह्या दुःस्थित गर्भाशयाच्या एकापुढच्या एक अवस्था होत.

सुश्रुताने सांगितलेल्या विंशति योनी रोगामध्ये वंध्या, विप्लुता, लोहितक्षरा, प्रस्रंसिनी, अत्यानंदा, फलिनी, अशा सहा योनिव्यापत् चरकापेक्षा वेगळ्या सांगितल्या आहेत.

**[१]वंध्यायोनी :**

जिचे आर्तव नष्ट झाले आहे तिला वंध्या म्हणावे. ही स्थिती मासिक पाळी ज्या वयात बंद होते त्या वयातीलच घ्यावी. आर्तवावर स्त्रीचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य अवलंबून असते (ज्याप्रमाणे पुरुषाचे शुक्रावर असते). कारण, ओज हे शुक्राच्या प्रसाद भागातून उत्पन्न होत असते. शुक्र आणि आर्तव ही प्रसादरूपच असल्याने

– विषममिति क्रियाविशेषणं, विषमं यथा भवति तथा मैथुनादित्यर्थः । विष्टम्भयेदिति विस्तारयेत् । मांसोत्सन्नेति उत्सन्नमांसा ॥ टीका

– दुःखशय्यातिमैथुनात् कुपितोऽनिलो विषमं गर्भाशयं च योन्याश्च मुखं विष्टम्भयेत् । ( एवं कुपितो हि वायुर्योनिमुखं ) तथा विष्टम्भयति यथाऽन्योन्यं पेश्यो न सङ्घटन्त इति । असंवृतमुखत्वादसंवृतमुखी, मांसैरुत्सन्ना मांसापचितातिस्थूलेत्यर्थः । सा महती योनिर्महायोनिः ॥ जज्जट टीका

१ वंध्यां नष्टार्तवाम् विद्यात् । सु. उ. ३८–१०
यदास्याः शोणिताख्ये बीजे गर्भाशयस्ये निर्वर्तकं बीजं प्रदुष्यति तदा वंध्यां जनयति ॥ अ. स. शा. २–४६
इह नच्छेति गर्भं स्त्री वातेनोपहता तथा ।
या(यो) निदोषेण चात्रे(न्ये)न नहि वंध्याऽस्तिना(का)चना
भेल सं. शा. २

ओजाच्या रक्षणामध्ये त्यांचा फार मोठा भाग असतो. या ओजामुळेच शरीर सुदृढ व बांधेसूद राहते. निरनिराळ्या प्रकारच्या हालचाली सहजतेने करता येतात. स्वर, वर्ण, प्रसन्न असतात; आणि अंतर्बाह्य सर्व शरीराचे व्यापार सुस्थितीत चालतात.

स्त्रीमध्ये शुक्रस्थानी असलेले आर्तव नष्ट झालेल्या स्थितीत स्वभावतःच ओजाचे बलही कमी होते, आणि अनेक प्रकारची शारीरिक व मानसिक व्यथा उद्भवते.

[1]हारिताने वंध्येचे सहा प्रकार सांगितले आहेत :

१. वंध्येचा पहिला प्रकार : बाल्यामुळे गर्भकोष्ठाचा भंग झाल्यामुळे आणि धातुक्षयामुळे जिला गर्भ उत्पन्न होण्याचा संभव असत नाही ती.

२. वंध्येचा दुसरा प्रकार : जिला एकच अपत्य होते व पुन्हा अपत्य होत नाही ती काकवंध्या.

३. तिसरा प्रकार : जिला मूल होत नाही.

४. चौथा प्रकार : जिच्या गर्भाचे नेहमी स्राव होतात.

५. पाचवा प्रकार : जिला मुले होतात व लगेच मरतात.

६. सहावा प्रकार : बलक्षयामुळे म्हणजे आर्तव क्षीण झाल्यामुळे (वयोमानानुसार) गर्भसंभव थांबतो ती. हीच सुश्रुतोक्त नष्टार्तवा वंध्या होय.

पहिल्या प्रकारात बालेचा उल्लेख आहे व धातुक्षय (नैमित्तिक) हे एक कारणही येथेच सांगितले आहे. त्यामुळे या सहाव्या प्रकारात वृद्धा (वंध्याच) घ्यावी. धातुक्षय हे कारण पहिल्या प्रकारातच गेले असल्यामुळे तोच अर्थ पुन्हा बलाचा घेण्यात अर्थ नाही. बल शब्द शुक्रवाचक आहेच, तुल्यधर्मात तो स्त्रीमध्ये आर्तववाचकही घ्यावा.

[2]हारीताने या सहा प्रकारांतील साध्यासाध्यविवेक पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

बालवयामध्येच (रजोदर्शनापूर्वी) मैथुन घडला तर गर्भाशय संकुचित होतो वा फाटतोही. व त्यामुळे ती स्त्री वंध्या होते व गर्भधारणा करू शकत नाही. ही पुन्हा गर्भवती होणे कष्टाचे आहे; पण औषधोपचाराने तिच्यामध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे.

जिचे अपत्योत्पादक बल नाहीसे झाले आहे (अनपत्यबल) अशी निवृत्तार्तवा स्त्री व काकवंध्या ही असाध्य असते.

अनपत्या कदाचित् (अपि) साध्य होते. धातुक्षयाने आलेले वंध्यत्व औषधाने नाहीसे होते.

## [1]विप्लुता योनी :

वाग्भटाने जरी विप्लुता योनीचे वर्णन केलेले असले तरी ते वर्णन चरकाच्या अचरणा योनीच्याप्रमाणे आहे. सुश्रुताने विप्लुता योनीमध्ये नित्यवेदना एवढे एकच लक्षण सांगितले आहे. टीकाकाराने परिप्लुतेशी तुलना करताना परिप्लुतेमध्ये केवळ मैथुनसमयीच पीडा असते, विप्लुतेमध्ये ती नेहमीच असते, असे सांगितले आहे. त्यामुळे चरकाच्या अचरणेतील "अतिनरकांक्षिणी" या लक्षणांशी सुश्रुताच्या वर्णनाप्रमाणे विरोध उत्पन्न होतो; म्हणून सुश्रुताच्या दृष्टीने वाग्भटाचे नामकरण अयोग्य वाटते. सुश्रुताचे वर्णन व टीकाकाराचे स्पष्टीकरण गृहीत धरून हा व्याधी वंध्यायोनीप्रमाणे स्वतंत्र घ्यावा.

## [2]लोहितक्षरा योनी :

या ठिकाणी टीकाकारांनी खालीलप्रमाणे पाठभेद दिला आहे. तो जर स्वीकारला तर चरकाच्या अरजस्का योनीशी त्याचे साम्य घडते; आणि वाग्भटाने वर्णन केलेल्या लोहितक्षयेच्या वर्णनाशी मेळ जमतो.

## [3]अत्यानंदा योनी :

कितीही मैथुनाने जिचे समाधान होत नाही ती अत्यानंदा योनी होय. हे लक्षण चरकाच्या अचरणाच्या योनीशी जुळते आहे. अचरणा या योनिरोगाचे सुश्रुताने केलेले वर्णन नावाने चरकाच्या संज्ञेशी जुळते असले तरी लक्षणाने वेगळे आहे.

---

— वंध्या स्यात्षट्प्रकारेण बाल्येनावाथवा पुनः ।
गर्भकोशस्य भङ्गाद्वा तथा धातुक्षयादपि ॥
जायते न च गर्भस्य सम्भूतिश्चकदाचन ।
काकवन्ध्या भवेच्चैका अनपत्या द्वितीयका ॥
गर्भस्रावी तृतीयाऽथ कथिता मुनिसत्तमैः ।
मृतवत्सा चतुर्थी स्यात्पञ्चमी च बलक्षयात् । हा. सं. तृतीयस्थान अ. ४८–१ ते २

२ तस्योपक्रमणं वक्ष्ये येन सा लभते सुतम् । अजातरजसां स्त्रीणां क्रियते यदि मैथुनम् । तेनैव गर्भसंकोचं भगत्वमुपगच्छति ।
तेन स्त्री भवते वन्ध्या गर्भं गृह्णाति नो भृशम् । सा च कष्टेन भवति रामा गर्भवती भिषक् ॥ औषधैश्चोपचारैश्च सिद्धिश्चापि न संशयः । अनपत्यबलेनापि जायते भिषजां वर । न भवेत्काकवन्ध्या च अनपत्यापि सिध्यन्ति । सिध्यन्ति क्षीणधातुत्वाज्जायते सा भिषग्वर । हा. सं. तृतीयस्थान अ. ३८–४ ते ८

---

१ "विप्लुता नित्यं रुजावती परिप्लुता पुनर् व्यावाये एव पीडावती इति अनयोः भेदः ।" सु. उ. ३८–१० टीका

२ सदाहं प्रक्षरत्यस्त्रम् यस्यां सा लोहितक्षरा । सु. उ. ३८–१२

— सदाहं क्षीयते रक्तं यस्यां सा लोहितक्षया । सु. उ. ३८–१२ टीका

३ अत्यानंदा न संतोषं ग्राम्यधर्मेण गच्छति । सु. उ. ३८–१५

[१]पुरुषापेक्षा स्त्रीचे मैथुनसामर्थ्य अधिक असते व त्यामुळे ती पुरुषापेक्षा श्रेष्ठ होते असा अर्थ सुश्रुताच्या सूत्रावरून व त्याच्या टीकाकाराच्या भाष्यावरून उत्पन्न होतो. तो सुश्रुताच्याच अत्यानंदा योनीशी जुळता आहे, त्यामुळे अत्यानंदा व अचरणा हे दोन रोग वेगळे कसे मानावे अशी शंका उत्पन्न होते.

योगरत्नाकराने अचरणा असा पाठ न घेता चरणा असे नाव या रोगास दिले आहे. पण अर्थ देताना भाषान्तरकाराने 'पुरुषापूर्वी स्रवते' असा अर्थ केला आहे तो 'पुरुषात् अतिरिच्यते' या मुळातील पदयोजनेशी सुसंगत वाटत नाही. पुरुषाच्या थोडे अगोदर स्रवणे ही स्त्रीच्या दृष्टीने प्रकृतीच आहे.

## [२]फलिनी योनी :

ज्याचे शिस्न फार मोठे आहे त्याच्याशी मैथुन घडल्याने जी विकृती उत्पन्न होते ती फलिनी योनी होय. प्रत्यक्ष विकृती कोणती होते हे सुश्रुताने सांगितले नाही. टीकाकाराने अफलिनी असा पाठभेद सांगून ती अप्रजा असते असे वर्णन केले आहे; ते चिंत्य आहे. सुश्रुताने जो फलिनियोनिरोग सांगितला आहे, तोच योगरत्नाकराने अंडिनी योनिरोग सांगितला आहे. तिलाच शार्ङ्गधर[३]खंडिता असे म्हणतो. त्याच्या टीकेतील पाठ मात्र सर्वसम्मत नाही. तरी पण स्पष्टीकरण ठीक आहे. अंडाप्रमाणे योनीचा अंतर्भाग लोंबकळतो असा जर याचा अर्थ केला तर चरक, वाग्भटाच्या, महायोनिवर्णनातील स्रंस या लक्षणात अंडिनी योनीचा अंतर्भाव होतो, तसेच विषम मैथुन हे जे महायोनीचे कारण दिले आहे त्याच्याशी येथील कारण जुळते, एवढेच नव्हे तर स्पष्टीकरणही होते.

सुश्रुत टीकाकार 'स्यंदते[४]'चा अर्थ 'स्रवति' असा करतो व क्षोभिता[५] म्हणजे

१ "मैथुनेऽचरणापूर्वं पुरुषाद् अतिरिच्यते । सु. उ. ३८–१६
– "पूर्वाचरिणी अतिरिच्यते मैथुनाचरणे अधिका भवति ।
अन्ये मैथुने अचरणापूर्वं इति पठंति । शेषं समं । पुरुषात् पूर्वं अतिरिच्यते अत्यर्थं कण्डूयते इत्यर्थः ।" सु. उ. ३८–१६ टीका

२ अतिकायगृहीतायाः तरुण्याः फलिनी भवेत । सु. उ. ३८–१८
अतिकायो बृहत् साधनो नरः ।
तेन गृहीतायाः फलिनी इति संज्ञाः । सु. उ. ३८–१८ टीका

३ बृहन्मेहेन पुरुषेण गृहीता या तरुणी खंडिता भवेत ( सा अंतर्मुखी ) ।
अंडवत् निसृता योनिः इत्येके । तत्र अंडली शब्दवाच्या यतः अतिकायगृहीतायाः तरुण्यास्त्वंडली भवेत् इति । शा. प्र. खं. अ. ७–१७८ टीका

४–५ प्रस्रंसिनी स्यंदते तु क्षोभिता दुःप्रसूश्चया । सु. उ. ३८–१३
– प्रस्रंसिनी स्रंसते च क्षोभिता दुःप्रजायिनी । यो. र. भाग २, पान ५७२



'संचालिता' म्हणतो. यावरून ही योनी हालचाल केली असता स्थानभ्रष्ट होते असा प्रस्रंसिनी शब्दाचा अर्थ सुश्रुतास अभिप्रेत असावा असे वाटते. भ्रंशाच्या जोडीला स्राव असतो हे चरकाच्या महायोनीतील लक्षणावरून लक्षात येईल. प्रस्रंसिनी योनी अर्थातच दुष्प्रजायिनी म्हणजे प्रसूतीच्या वेळी अत्यंत कष्ट होणारी असते. महा-योनीच्या लक्षणामध्ये दुष्प्रजायिनी हे एक अधिक लक्षण गृहीत धरण्यासारखे आहे.

स्यंदते या पदावरून केवळ स्राव होतो असा अर्थ घेतला तर सुश्रुत एकाच महायोनीचे अवस्थांनुरूप तीन भेद करतो असे म्हणता येईल. स्रवते ती प्रस्रंसिनी योनी. स्थानभ्रष्ट होते ती फलिनी योनी (अंडिनी), व योनिमुख विस्तृत होऊन गर्भाशय योनिमुखातून संपूर्ण बाहेर येतो ती महायोनी.

वाग्भटाच्या रक्तजा व लोहितक्षया या दोन योनी नामतः चरकाच्या वर्गी-करणापेक्षा वेगळ्या भासल्या, तरी त्यांचे अनुक्रमे असृजा व अरजस्का या चरकोक्त व्याधींशी साम्य आहे.

## उद्वृत्त फलयोनी :

मिथ्या आहारविहाराने प्रकुपित झालेल्या वातपित्तामुळे अंतःफल दुष्ट होऊन ते आपल्या स्वाभाविक स्थानापेक्षा वर सरकते व त्या ठिकाणी अवस्थित होऊन शूल, स्पर्शासहत्व ही लक्षणे विशेष रीतीने उत्पन्न होतात. या उद्वृत्तफलाचे ज्ञान योनि-परीक्षेमध्ये स्पर्शाने होते.

## अपवृत्त फलयोनी :

मिथ्या आहारविहाराने वातपित्त प्रकुपित होऊन अंतःफलास दुष्ट करतात व ते अंतःफल आपल्या स्थानापासून खाली सरकते (स्रंस).

शूल, अधोदरात वेदना, ओढल्याप्रमाणे वेदना, स्पर्शासहत्व ही लक्षणे असतात. या व्याधीचे निदानही योनिपरीक्षेत स्पर्शाने होते.

## चिकित्सा :

वातपित्तशामक अशा तिक्त, मधुर, स्निग्ध व उष्णस्पर्श अशा द्रव्यांनी चिकित्सा करावी. त्यासाठी लताकरंजचूर्ण, गंधकरसायन, सूक्ष्मत्रिफळा, शतावरी व अश्वगंधा यांनी सिद्ध केलेले दूध व दशमूल काढ्याचा कोष्ण उत्तरबस्ती द्यावा.

पुढे लघुत्रयी व बृहत्त्रयीतील योनिरोगांचे कोष्टक दिले आहे. (पृ. ७४ ते ७८).

[१]अशा रीतीने निदान, संप्राप्ती, लक्षणासह वीस योनिरोगांचे वर्णन आतापर्यंत केले आहे. या व्याधींनी ज्या वेळी योनी पीडित होते त्या वेळी ती शुक्र-ग्रहण करू शकत नाही आणि म्हणून तिला गर्भधारणाही होत नाही. या योनिव्यापदामुळे इतर अनेक प्रकारचे रोग उपद्रव म्हणून उत्पन्न होतात. त्यात गुल्म, अर्श, प्रदर इत्यादी व्याधी प्रमुख असतात. वातादी दोषांनी योनी अतिशय दुष्ट झाली म्हणजेच हे उपद्रव नंतर उत्पन्न होतात.

[२]या विंशति योनींपैकी पहिले वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक हे चार प्रकार सोडून पुढील सोळा प्रकारांपैकी असृजा व अरजस्का या दोन योनिव्यापत् पित्तदोषांमुळे, परिप्लुता व वामिनी वातपित्तामुळे, कर्णिनी आणि उपप्लुता या वातकफामुळे, उरलेल्या अचरणा, अतिचरणा, प्राक्चरणा, उदावर्तिनी, पुत्रघ्नी, अंतर्मुखी, सूचिमुखी, शुष्का, षंढी, महायोनी या सर्व विशेषेकरून वातप्रधान आहेत, असे विशेष संप्राप्तीतील दोषांचा विचार करिताना आढळते.

[३]कोणताही योनिरोग वाताशिवाय उत्पन्न होऊ शकत नाही, असे चरकाने सांगितल्यामुळे प्रत्येक योनिरोगाच्या सामान्य संप्राप्तीत वातदोषाचा प्रकोपच गृहीत धरला पाहिजे.

सर्व ठिकाणी वात, वातपित्त वा वातकफच आहेत. चरकाने अरजस्केमध्ये जरी वाताचा उल्लेख केला नसला तरी चरकाच्या खालील सामान्य संप्राप्तीच्या सूत्राप्रमाणे तसेच वाग्भटाच्या लोहितक्षया या अरजस्कारूप व्याधीत दोषदुष्टी सांगताना पित्ताबरोबर वातही उल्लेखिला आहे.

सुश्रुताने एकदोषज व सान्निपातिक अशा चार प्रकारांमध्ये विंशती योनींपैकी प्रत्येकी पाच पाच रोग उल्लेखिले आहेत.

**वातप्रधान :** उदावर्ता, वंध्या, विप्लुता, परिप्लुता व वातला या पाच.

**पित्तप्रधान :** लोहितक्षरा, वामिनी, प्रस्रंसिनी, पुत्रघ्नी व पित्तला या पाच.

१ इत्येतैर्लक्षणैः प्रोक्ता विंशतिर्योनिजा गदाः ।
न शुक्रं धारयत्येभिर्दोषैर्योनिरुपद्रुता ॥
तस्माद्गर्भं न गृह्णाति स्त्री गच्छत्यामयान् बहून् ।
गुल्मार्शः प्रदरादींश्च वाताद्यैश्चातिपीडनम् ॥ च. चि. अ. ३०–३७, ३८

२ आसां षोडश यास्त्वन्या आद्ये द्वे पित्तदोषजे ।
परिप्लुता वामिनी च वातपित्तात्मिके मते ॥
कर्णिन्युपप्लुते वातकफाच्छेषास्तु वातजाः ।
देहं वातादयस्तासां स्वैर्लिंगैः पीडयन्ति हि । च. चि. २०–३९, ४०

३ न हि वाताद्दते योनिः नारीणां संप्रदूष्यति । च. चि. ३०–११५



**कफप्रधान :** अत्यानंदा, कर्णिनी, अचरणा, अतिचरणा व श्लेष्मला या पाच.

**सान्निपातिक :** षंढी, फलिनी, महायोनी, सूचिवक्त्रा व सर्वदोषजा या पाच.

याप्रमाणे वर्गीकरण केले आहे.

चरकाने योनिदोषांची जी मिथ्या आहारविहार, रजोदुष्टी, बीजदोष आणि दैव अशी चार कारणे सांगितली आहेत, त्या कारणांनुरूप जर विंशति योनिरोगांचे वर्गीकरण करावयाचे झाले तर ते पुढीलप्रमाणे करता येईल.

**मिथ्याचाराने :** वातज, पित्तज, कफज, त्रिदोषज, अचरणा, अतिचरणा, प्राक्चरणा, कर्णिनी, शुष्का, उदावर्ता, अंतर्मुखी, महायोनी अशा योनिव्यापत् उत्पन्न होतात.

**रजोदुष्टीने :** असृजा, अरजस्का, उपप्लुता, परिप्लुता, पुत्रघ्नी आणि वामिनी.

**बीजदोषामुळे :** (दैवात्) सूचिमुखी, षंढी.

[१]सुश्रुत आणि अष्टाङ्गसंग्रह या ग्रंथांमध्ये क्षारकर्म कोठे करू नये याचे वर्णन करीत असताना रोग वा रुग्णावस्था यांची जी यादी दिली आहे तिच्यामध्ये एक स्वतंत्र योनिरोगाचे वर्णन आले आहे असे वाटते.

[२]टीकेचा विचार करता टीकाकाराने जे अनेक पर्याय दिले आहेत त्यांत फलशब्दाच्या मूळ अर्थाला स्पर्शच केला नाही असे दिसते. वस्तुतः योनीशी संबद्ध असलेल्या फल शब्दाने स्त्रीबीजोत्पादनाचे कार्य करणारे अंतःफल हेच घ्यावयास पाहिजे होते. रज, गर्भाशय या अर्थापेक्षा अंतःफल हा अर्थ स्वाभाविकही आहे. हे अंतःफल आपल्या स्वाभाविक स्थितीपासून पुष्कळ वेळा वर जाते किंवा खाली सरकते. क्षारवर्ज्यामध्ये या रोगाचा उल्लेख आला असल्यामुळे योनिरोगातील सामान्य वातदोषांबरोबर पित्ताचा अनुबंध या व्याधीमध्ये असला पाहिजे, असे म्हणावयास अडचण नाही.

१ अथ नैते क्षारकृत्या–तद्यथा–दुर्बलबालस्थविरभीरुसर्वाङ्गशूनोदररिरक्तपित्तिगर्भिण्यृतुमतीप्रवृद्धज्वरिप्रमेहिरूक्षक्षतक्षीणतृष्णामूर्च्छोपद्रुतक्लीबापवृत्तोद्वृत्तफलयोनयः ॥ सु. सू. ११–२८

२ उद्वृत्तापवृत्तफलयोनय इति उद्वृत्तापवृत्तशब्दौ फलयोनिभ्यां सह प्रत्येकं संबध्येते; फलमण्डं, योनिर्गर्भाशयः, उद्वृत्तफलः स्थानादूर्ध्वंगताण्डः, अपवृत्तफलः स्थानात् स्रस्ताण्डः, उद्वृत्तयोनिः स्थानादूर्ध्वगतयोनिः, अपवृत्तयोनिः स्थानात् स्रस्तयोनिः, अन्ये तु फलयोनिशब्देन समुदितेन गर्भाशयमाचक्षते, तत्रायमर्थः–उद्वृत्तफलयोनिः स्थानादूर्ध्वगतगर्भाशया, अपवृत्तफलयोनिः स्थानात् स्रस्तगर्भाशयेत्यर्थः, अपरे तु फलशब्दं रजसि वर्तयन्ति, कुतः? गर्भस्य फलसाधनत्वात् तेन यस्याः योनेः सकाशात् फलं रज उद्वृत्तमूर्ध्वंगतम्, अपवृत्तमधोगतं, सा उद्वृत्तापवृत्त फलयोनिः ॥
सु. सू. ११–२८ टीका

## योनिव्यापत् : तौलनिक नामकरण

| चरक | सुश्रुत | अष्टाङ्गसंग्रह | अष्टाङ्गहृदय | योगरत्नाकर | भावप्रकाश | शार्ङ्गधर |
|---|---|---|---|---|---|---|
| च. चि. ३० | सु. उ. ३८ | अ. सं. उ. ३८ | अ. हृ. उ. ३३ | पृष्ठ ५७१ | पृष्ठ ७४९ | प्र. ७. १७९ |
| वातजा १ | वातला ५ | वातजा १ | वातजा १ | वातला ५ | वातला ५ | वातजा १ |
| पित्तजा २ | पित्तला १० | पित्तजा १२ | पित्तला १२ | पित्तला १० | पित्तला १० | पित्तजा २ |
| कफजा ३ | श्लेष्मला १५ | श्लेष्मला १४ | कफजा १४ | श्लेष्मला १५ | श्लेष्मला १५ | कफजा ३ |
| सन्निपातजा ४ | त्रिदोषजा २० | सान्निपातिकि २० | सान्निपातिकी २० | त्रिदोषिणी २० | त्रिदोषिणी २० | सान्निपातिका ४ |
| असृजा ५ | — | रक्तजा १३ | रक्तजा १३ | — | — | रक्तजा ५ |
| अरजस्का ६ | लोहितक्षरा ६ | लोहितक्षया १५ | लोहितक्षया १५ | लोहितक्षया ६ | लोहितक्षया ६ | लोहितक्षया ६ |
| अचरणा ७ | — | विप्लुता १८ | विप्लुता १८ | — | — | — |
| अतिचरणा ८ | अतिचरणा १४ | अतिचरणा २ | अतिचरणा २ | — | — | अतिचरणा २० |
| प्राक्चरणा ९ | — | प्राक्चरणा ३ | प्राक्चरणा ३ | — | — | प्राक्चरणा १६ |
| उपप्लुता १० | — | उपप्लुता १७ | उपप्लुता १७ | — | — | उपप्लुता १५ |
| परिप्लुता ११ | परिप्लुता ४ | परिलुप्तता १६ | परिप्लुता १६ | — | — | — |
| उदावर्ता १२ | उदावर्ता १ | उदावृत्ता ४ | उदावृत्ता ४ | उदावर्ता १ | उदावर्ता ९ | — |
| कर्णिनी १३ | कर्णिनी १२ | कर्णिनी १९ | कर्णिनी १९ | कर्णिनी १२ | कर्णिनी १२ | कर्णिनी १८ |
| पुत्रघ्नी १४ | पुत्रघ्नी | जातघ्नी ५ | जातघ्नी ५ | पुत्रघ्नी ९ | पुत्रघ्नी ९ | पुत्रघ्नी १३ |
| अंतर्मुखी १५ | — | अंतर्मुखी ६ | अंतर्मुखी ६ | — | — | अंतर्मुखी १० |

| चरक | सुश्रुत | अष्टाङ्गसंग्रह | अष्टाङ्गहृदय | योगरत्नाकर | भावप्रकाश | शार्ङ्गधर |
|---|---|---|---|---|---|---|
| च. वि. ३० | सु. उ. ३८ | अ. स. २. ३८ | अ. हृ. उ. ३३ | पृष्ठ ५७१ | पृष्ट ७४९ | प्र. ७, १७९ |
| सचिमुखी १६ | सचिवक्त्रा | सूचिमुखी ७ | सूचिमुखी ७ | सचिवक्त्रा १९ | सचिवक्त्रा १९ | सूचिमुखी ११ |
| शुष्का १७ | — | शुष्का ८ | शुष्का ८ | — | — | शुष्का ७ |
| वामिनी १८ | वामिनी | वामिनी ९ | वामिनी ९ | वामिनी ८ | वामिनी ८ | वामिनी ८ |
| षंढी १९ | षंढी | षंढी १० | षंढी १० | षंढी १६ | षंढी १६ | — |
| महा २० | — | महा ११ | महा ११ | — | — | महा १७ |
| — | — | — | — | वंध्या २ | वंध्या २ | — |
| | वंध्या | — | — | विप्लुता ३ | विप्लुता ३ | विप्लुता १२ |
| | विप्लुता | — | — | परिप्लुता ४ | परिप्लुता ४ | परिप्लुता १४ |
| | संसिनी | — | — | प्रस्रंसिनी ७ | प्रस्रंसिनी ७ | — |
| | अत्यानंदा | — | — | अत्यानंदा ११ | अत्यानंदा ११ | नंदा १९ |
| | अचरणा | — | — | — | — | — |
| | फलिनी | — | — | — | — | खंडिता ९ |
| | महती | — | — | महती १८ | महती १८ | — |
| | — | — | — | चरणानंदपूर्विका १३ | चरणानंदपूर्विका १३ | — |
| | — | — | — | अति १४ | अति १४ | — |
| | — | — | — | अंडिनी १७ | अंडिनी १७ | — |

## योनिव्यापत् : निदान व लक्षणे

| योनिव्यापत् | निदान (हेतू) | दोषाधिक्य | स्राव–लक्षणे | स्थानिक लक्षणे | सार्वदेहिक लक्षणे | साध्यासाध्यत्व | (परिणाम उदर्क) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ वातजा | वातकर आहार-विहार, अतिमैथुन, विषमस्थानांगशय-नादि,रजोदुष्टी,बीज-दोष, अपद्रव्योपयोग. | वात | सफेन, सशब्द, सरुक, तनू, रूक्ष, वर्ण-अरुण, कृष्ण | तोद, स्तंभ, सुप्ती, कर्कशता, पिपीलिका, सुप्तिमिववेदना | कटीग्रह, पार्श्वशूल, उदरशूल, मलावष्टंभ श्रम | कष्टसाध्य | मैथुनासहत्व गुल्म |
| २ पित्तजा | पित्तकर आहार-विहार,पित्तरजोदुष्टी | पित्त | उष्ण, दुर्गंधी, प्रभूत, वर्ण-नील, पीत, कृष्ण | दाह, राग, पाक | दाह, ज्वर, उष्णता | कष्टसाध्य | मैथुनासहत्व, पाक, पांडुता, गुल्म |
| ३ कफजा | कफकर आहार-विहार. | कफ | पिच्छिल, शीत. वर्ण-पांडू. | कंडू, अल्पवेदन शैथिल्य. | पांडुता, गौरव, शैत्य, आलस्य. | कष्टसाध्य | दौर्बल्य, गुल्म |
| ४ सान्निपातिक | त्रिदोषकर आहारविहार | त्रिदोष | पिच्छिल, दुर्गंधी, रक्तपूययुक्त, वर्ण-श्वेत चित्र | दाह, शूल | ज्वर, पांडु, तीव्र उदरशूल, श्रम, निद्रानाश, कार्श्य. | असाध्य | शोथ, पांडू, गुल्म |
| ५ असृजा | रक्तपित्तकर आहारविहार | पित्त दूष्य रक्त. | रक्ताची अतिप्रवृत्ती. | दाह, राग, पाक (पित्तजेप्रमाणे) | दाह, ज्वर, उष्णता [पित्तजेप्रमाणे] | कष्टसाध्य शस्त्रकर्मसाध्य | पांडू, वंध्यत्व |
| ६ अरजस्का | वित्तकर आहारविहार | पित्त, वात, दूष्य रक्त. | स्राव नसतो किंवा अत्यल्प, सदाह. | दाह | कार्श्य, वैवर्ण्य | कष्टसाध्य | गर्भाशयकार्श्य वंध्यत्व, गुल्म |
| ७ अचरणा | योनीची अस्वच्छता | वात, कफानुबंध | क्लेदयुक्त अल्प दुर्गंधी | कंडू, शोथ, दाह | अतिमैथुनेच्छा — | कष्टसाध्य | शोथ,मूत्रकृच्छ्र |

| योनिव्यापत् | स्नेहन | स्वेदन | शोधन | बाह्यशमन | अभ्यंतर शमन | रसायन | पथ्यापथ्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ अतिचरणा | वातघ्न तैल | परिषेक–वातघ्न क्वाथ, उपनाह | एरंडस्नेह | पिचू-बलातेल | चंद्रप्रभा, दशमूला-रिष्ट, देवदार्व्यादि-क्वाथ | महायोगराज-गुग्गुळ | वातघ्न, स्निग्ध आहार |
| ९ प्राक्चरणा | अचरणा व अतिचरणाप्रमाणे उपचार करावेत. | | | | | | |
| १० उपप्लुता | धातक्यादि तैल | उत्तरबस्ती, लोध्र सातला यांचा उष्ण क्वाथ, धूपन, अगरु गुग्गुल. | विरेचन, उत्तरबस्ती-त्रिफळा, तुवरीजल | पिचू-धातक्यादि तैल, पंचवल्कल चूर्ण-धारण | चंद्रप्रभा, लोध्रचूर्ण लोहकल्प | चंद्रप्रभा लोध्रासव | कफजेप्रमाणे |
| ११ परिप्लुता | उपप्लुताप्रमाणे पित्तानुबंधासाठी शीतस्पर्शतिक्तकषाय रसाची द्रव्ये वापरावीत. | | | | | | |
| १२ उदावर्ता | त्रिवृत्सिद्ध तैलाचे अनु-वासन, उत्तरबस्ती | वातघ्न द्रव्यांनी परिषेक, अवगाह | एरंडस्नेह | पिचू-त्रिवृत्तैल, उत्तरबस्ती-दशमूल-सिद्ध | शंखवटी, भल्लातक, सिद्ध दूध, देव-दार्व्यादिक्वाथ. | वातगजांकुश, भल्लातका-वलेह | वातजेप्रमाणे |
| १३ कर्णिनी | — | — | वर्ति-पिप्पली, अर्क लेखन-कर्म करावे. | | | — | — |
| १४ पुत्रघ्नी | काश्मर्यकुटज सिद्ध घृत. | दशमूलक्वाथाचा परिषेक, अवगाह. | — | पिचू-उदुंबरतेल | — | त्रिवंग, वसंत-कुसुमाकर. | कटू, तीक्ष्ण, उष्ण वर्ज्य. |
| १५ अंतर्मुखी | बलातैल | दशमूलक्वाथाचा परिषेक, अवगाह | एरंडस्नेह | बलातैल पिचू योनिसंस्थापन | सुवर्णमालिनीवसंत महायोगराजगुग्गुळ | भल्लातकाव-लेह, बृहद्वात-चिंतामणी | विश्रांती, बलवर्धक आहार |
| १६ सूचिमुखी | बलातैल | दशमूलक्वाथाचा परिषेक, अवगाह | एरंडस्नेह | बलातैल पिचू अंगुल्यग्रेण प्रसारयेत् | | | |

| योनिव्यापद् | निदान (हेतु) | दोषाधिक्य | स्राव–लक्षणे | स्थानिक लक्षणे | सार्वदेहिक लक्षणे | साध्या-साध्यत्व | परिणाम (उदर्क) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ शुष्का | मैथुनकाली वेगधारणा | वात | — | कर्कशता, शुष्कता वेदना | विट्मूत्रसंग, शूल | असाध्य | वंध्यत्व, मैथुनासहत्व |
| १८ वामिनी | दैव | वात, पित्त | — | — | — | कष्टसाध्य | वंध्यत्व, गुल्म |
| १९ षंढी | दैव, बीजदोष | वात | — | — | अस्तनी, नृद्वेषिणी | असाध्य | वंध्यत्व |
| २० महा | विषममैथुन | वात | रूक्ष, फेनिल | विवृतत्व, मांसांकुर येतात, स्रंस | पर्व, वंक्षण यांत शूल | साध्य, शस्त्र-साध्य | मैथुनासहत्व, वंध्यत्व, योनिव्रण |



## योनिव्यापत् चिकित्सा :

[1]वातावाचून स्त्रियांच्यामध्ये कोणताही योनिरोग उत्पन्न होत नाही. त्यामुळे सर्व योनिविकारांमध्ये मुख्यत्वेकरून वातघ्न चिकित्साच केली पाहिजे. चिकित्सेने वाताचे शमन झाल्यानंतर मग इतर दोषांवर चिकित्सा करावी.

[2]सर्व योनिव्यापत् रोगांमध्ये स्त्रीला प्रथम स्नेहन, स्वेदन असे पूर्वकर्म करून मग वमन, विरेचन, बस्ती, उत्तरबस्ती व रक्तमोक्ष अशी पाचही कर्मे यथायोग्य रीतीने करावीत. मात्र स्त्रीशरीर सुकुमार असल्यामुळे या पाचही कर्मांचे स्वरूप सौम्य असावे. अशा रीतीने पंचकर्माने शरीर पूर्णपणे शुद्ध झाल्यानंतर इतर चिकित्सोपचार करावेत.

[3]वातजा योनीमध्ये प्रथम सैंधवाचे सूक्ष्म चूर्ण व तिलतैल यांनी स्नेहन करून मग स्वेदन करावे. त्यासाठी जलचर किंवा आनूप प्राण्यांच्या मांसाचे रस, किंवा तिल-तण्डुलांनी सिद्ध केलेले दूध वा दशमूलादी वातघ्न औषधांचे काढे वापरून नाडीस्वेद, वा कुंभीस्वेद द्यावा किंवा अश्म, प्रस्तर, संकर प्रकारांनी स्वेदन करावे. स्वेदनानंतर कोमट पाण्याने स्नान करून वातघ्न अशा द्रव्याचे ( मांसरसाचे ) भोजन करावे.

[4]शिवणीचे फळ, त्रिफळा, मनुका, कासविंदा, फालसा, पुनर्नवा, हळद, दारू-हळद, काकमाची, कोरांटी ही एक एक तोळा, शतावरी व गुडूची यांचा स्वरस एक एक शेर, यांनी तूप सिद्ध करावे. याच्या सेवनाने वातज योनिरोग नाहीसा होतो. हे तूप गर्भसंस्थापन करणारेही आहे.

१ योनिव्यापत्सु भूयिष्ठं शस्यते कर्म वातजित् । वा. उ. ३४-२२
न हि वाताद्दते योनिर्नारीणां संप्रदुष्यति ।
शमयित्वा तमन्यस्य कुर्यात् दोषस्य भेषजम् ।। च. चि. ३०-११५

२ सर्वां व्यापन्नयोनिं तु कर्मभिर्वमनादिभिः ।
मृदुभिः पंचभिर्नारीं स्निग्धस्विन्नां उपाचरेत् ।
सर्वतः सुविशुद्धायाः शेषं कर्म विधीयते । च. चि. ३०–४५, ४६

३ वातव्याधिहरं कर्म वातार्तानां सदा हितम् ।
औदुकानूपजैर्मांसैः क्षीरैः सतिलतन्डुलैः ।।
सवातघ्नौषधैर्नाडी कुंभिस्वेदैरुपाचरेत् ।
आक्तां लवणतैलेन साश्मप्रस्तरसंकरैः ।।
स्विन्नां कोष्णाम्बुसिक्ताङ्गिं वातघ्नैर्भोजयेत् रसैः । च. चि. ३०–४७, ४८

४ काश्मर्यत्रिफलाद्राक्षाकासमर्दपरूषकैः ।
पुनर्नवाद्विरजनीकाकनासासहाचरैः ।।
शतावर्यागुडूच्याश्चप्रस्थमक्षसमैर्घृतात् ।
साधितं योनिवातघ्नं गर्भदं परमं पिबेत् । च. चि. ३०–५२, ५३, ५४

[1]पिंपळी, काळे जिरे, शहाजिरे, अडुळसा, शेंदेलोण, वेखंड, यवक्षार व चित्रक तुपात भाजून त्यात साखर घालावी व हे औषध मधाच्या निवळीबरोबर सेवन करावे. योनिशूलावर याचा उपयोग होतो.

[2]वातज योनीवर उपचार म्हणून सेक, अभ्यंग, पिचू यासाठी जे काही वापरावयाचे ते सर्व उष्ण व स्निग्ध असावे.

शेंदेलोण, तगर, कोष्ठ, डोरली, देवदार समभाग घेऊन त्यांच्या कल्कानेच तैल सिद्ध करावे. हे तेल योनीमध्ये पिचूच्या सहाय्याने धारण केले असता वेदना नाहीशा होतात.

गुळवेल, मालती, रास्ना, चिकणा, यष्टिमधू, चित्रक, रिंगणी, देवदारू, जाई यांचा कल्क एक एक तोळा घ्यावा व त्यांत गोमूत्र व गोदुग्ध दोन दोन शेर घालून ते सिद्ध करावे. या तेलाचा उत्तरबस्ती द्यावा व नंतर याच तेलाचा योनीमध्ये पिचू ठेवावा. वातज योनिरोगावर हे तेल उपयोगी पडते.

[3]वातज योनीमध्ये डोरलीच्या मुळाचा कल्क करून त्यात थोडे तेल घालून तो योनीत धारण करावा.

[4]ताठरलेल्या व खरखरीत झालेल्या वातज योनीमध्ये मार्दव आणण्यासाठी वेशवाराचा ( एक प्रकारचे सिद्ध मांस ) पिंड धारण करावा वा दुधात शिजविलेल्या खिचडीचा पिंड ठेवावा.

[5]वातज योनिरोगासाठी वापरावयाचे बस्ती, उत्तरबस्ती तेल आणि अम्ल द्रव्यांनी युक्त असावेत.

१ पिप्पलीकुंचिकाजाजीवृषकं सैंधवं वचाम् ।
यवक्षाराजमोदेच शर्करां चित्रकं तथा ॥
पिष्ट्वा सर्पिषि भृष्टानि पाययेत प्रसन्नया ॥ च. चि. ३०–५४, ५५

२ वातार्तानां च योनीनां सेकाभ्यङ्गपिचुक्रियाः ।
( उष्णाः स्निग्धाः प्रकर्तव्यास्तैलनिस्नेहनानि च । )
सैंधवं तगरं कुष्ठं बृहती देवदारु च ॥
समांशैः साधितैः कल्कैस्तैलं धार्यं रुजापहम् ।
गुडुचीमालतीरास्नाबलामधुकचित्रकैः ॥
निदिग्धिकादेवदारूयूथिकाभिश्च कर्षिकैः ।
तैलप्रस्थं गवां मूत्रे क्षीरे च द्विगुणे पचेत् ॥
वातार्तायाः पिचुं दद्याद्योनौ च प्रणयेत्ततः । च. चि. ३०–५८ ते ६१

३ हिंस्राकल्कं तु वातार्ता कोष्णमभ्यज्य धारयेत् । च. चि. ३०–६२

४ स्तब्धानां कर्कशानां च कार्यं मार्दवकारकम् ।
धारयेत् वेशवारं वा पायसं कृशरां तथा ॥ च. चि. ३०–१२३, १२४

५ वाते तैलाम्लसंयुताः ( बस्तयो हिताः ) । च. चि. ३०–८५



## पित्तज योनिचिकित्सा :

[1]पित्तज योनिरोगावर जी चिकित्सा करावयाची ती शीतवीर्य व रक्तपित्तघ्न असावी.

[2]पित्तज योनीमध्ये सेक, अभ्यंग, पिचू हे उपचार शीत व पित्तहर असे असावेत. स्नेहनासाठी तूपच वापरावे व तेही पित्तघ्न औषधांनी स्निग्ध केलेले असावे.

[3]योनीमध्ये पंचवल्कलाचा कल्क करून तो धारण करावा.

[4]शतावरीच्या मुळाचा रस आणि दूध सहभाग घेऊन त्यांत जीवनीय गणांतील द्रव्ये, शतावरी, मनुका, फालसा, चारोळी, यष्टिमधू यांचा कल्क घालून तूप सिद्ध करावे. ते थंड झाल्यावर त्यात मध, पिंपळीचे चूर्ण व साखर घालावी आणि योग्य मात्रेत ते सेवन करावे. हे बृहत्शतावरीघृत रक्तपित्तघ्न असून पित्तज योनीवर उत्तम औषध आहे. ते गर्भस्थापकही आहे.

[5]पित्तज योनीमध्ये स्रावाला दुर्गंध असतो. त्यावर कडू कवठांच्या फळांचे चूर्ण करून त्याचा कल्क योनीमध्ये ठेवावा. किंवा चंदन, नागरमोथे, वाळा, कचोरा, जटामसी, यांसारख्या सुगंधी द्रव्यांच्या चूर्णाचा कल्क करून तो योनीत ठेवावा. त्यामुळेही सर्व प्रकारचे दुर्गंध नष्ट होतात.

[6]पित्तज योनिरोगांवर मधुर रसाची द्रव्ये व दूध यांचे बस्ती, उत्तरबस्ती वापरावेत.

## कफज योनिचिकित्सा :

[7]कफज योनिरोगांवर चिकित्सेसाठी रूक्ष आणि उष्ण गुणांची द्रव्ये वापरावीत. योनीमध्ये निशोत्तर, बाहवा, शिकेकाई अशा द्रव्यांचा कल्क धारण करावा.

१ कारयेत् रक्तपित्तघ्नं शीतं पित्तकृतासु च । च. चि. ३०–४२

२ पित्तलानां तु योनीनां सेकाभ्यङ्गपिचुक्रियाः ।
– शीताः पित्तहराः कार्याः स्नेहनार्थं घृतानि च ।
( पित्तघ्नौषधसिद्धानि कार्याणि भिषजा तथा । ) च. चि. ३०–६३

३ पंचवल्कस्य पित्तार्ता ( कल्कं धारयेत् ) । च. चि. ३०–६२

४ शतावरीमूलतुलाश्चतस्रः संप्रपीडयेत् । रसेन क्षीरतुल्येन पचेत् तेन घृताढकम् ॥
जीवनीयैः शतावर्या मृद्विकाभिः परूषकैः । पिष्टैः प्रियालैश्चाक्षांशैर्द्वियष्टि-
मधुकैर्भिषक् ॥ सिद्धे शीते च मधुनः पिप्पल्याश्च पलाष्टकम् ।
सितादशपलोन्मिश्राल्लिह्यात् पाणितलं ततः । च. चि. अ. ३०–६४ ते ६७

५ दुर्गंधानां कषायं स्यात् तौवरः कल्क एव वा ।
चूर्णं वा सर्वगंधानां पूतिगंधापकर्षणम् ॥ च. चि. अ. ३०–१२४

६ पित्ते समधुरक्षीराः बस्तयो हिताः । च. चि. ३०–८५

७ श्लेष्मजासु च रूक्षोष्णं कर्म कुर्यात् विचक्षणः । च. चि. ३०–४२

[1]कफज योनिरोगासाठी कटुरसांच्या द्रव्याचे काढे व मूत्र यांचे बस्ती, उत्तरबस्ती वापरावेत.

[2]श्लेष्मदुष्ट योनिरोगामध्ये शोधनासाठी वर्ती वापराव्यात. यवाचे चूर्ण घेऊन त्याला रुईच्या चिकाच्या भावना द्याव्यात. त्यात सैंधव घालावे व त्याची वर्ती करून ती योनीत ठेवावी. काही वेळाने कोमट पाण्याने सिंचन करावे.

पिंपळी, मिरे, उडीद, बाळंतशेपा, कोष्ट, शेंदेलोण एकत्र करून त्याची वर्ती धारण करावी. त्यामुळे योनीतील कफाचे विशोधन होते.

वर्ती तयार करावयाची ती हाताच्या आंगठ्याजवळील बोटाएवढी (प्रदेशिनी) जाड व तितकीच लांब असावी.

## सान्निपातिक योनिरोग चिकित्सा :

[3]सन्निपातज योनिरोगावर वातपित्त कफावर उल्लेखिलेल्या द्रव्यांनीच सेक, अभ्यंग, पिचू, वर्ती, बस्ती असे उपचार करावेत.

द्विदोषजावरही त्या त्या दोषांची द्रव्ये मिसळून चिकित्सा करावी.

## [4]रक्तज योनिचिकित्सा :

चरकाने असृजा योनीलाच रक्तयोनी अशी संज्ञा दिलेली आहे. चिकित्सेमध्ये अशी नामान्तरे चरकाने वापरली आहेत. पुढील ग्रंथांतून यामुळेच वेगवेगळी नावे रूढ झाली. वाग्भट जिला रक्तजा म्हणतो तो योनिरोगही हाच.

असृजा योनीमध्ये रजःस्रावाचा वर्ण व लक्षणे यांवरून दोषांच्या अनुबंधाचा निश्चय करावा व यथादोष चिकित्सा करावी. चिकित्सेचे सामान्य धोरण मात्र रक्तस्थापन होईल असे असावे.

[1]तिळाचे चूर्ण, दही, तूप, काकवी, डुकराची चरबी ही द्रव्ये वातप्रधान असृज योनीवर वापरावीत. पुष्ट अशा डुकराचा मांसरस हा उत्तम स्निग्ध असतो. तो हुलग्याबरोबर वातप्रधान अवस्थेत सेवन करावा.

साखर, मध, ज्येष्ठमध व सुंठ हे पदार्थ दह्याबरोबर वातज असृजा योनीसाठी सेवन करावे.

(पयस्या) भुईकोहळा, कमळ, कमलकंद, कमलकेसर, दारूहळद, नागरमोथे यांचे चूर्ण, दूध, साखर व मध घालून पित्तज असृजा योनीसाठी सेवन करावे.

[2]रसांजन व लाक्षा यांचे चूर्ण शेळीच्या दुधाबरोबर प्राशन करावे व पित्तज असृजेवर करावयाची सर्व चिकित्सा सामान्यतः रक्तपित्ताप्रमाणे असावी.

कुष्ट प्रकरणात सांगितलेले महातिक्त घृत वापरावे.

कफज असृजेसाठी ज्येष्ठमध, त्रिफला, लोध्र, मुस्ता, तुरटी, मध, निंब, गुडूची ही मधाबरोबर सेवन करावीत.

[3]पहाडमूळ, जांभळाचे बी, आंब्याची बाठ, पाषाणभेद, रसांजन, अंबष्ठा (पहाडमुळाचा एक प्रकार) सात्ररीची साल, लाजाळू, कुडासाल, केशर, अतिविष, बेल,

---

१ श्यामादीनां कफातुराः (कल्कं धारयेत्) । च. चि. ३०–६२
– योन्यां बलासजुष्टायां सर्वं रूक्षोष्णमौषधम् ।
तैलं सीधु यवान्नंच पथ्यारिष्टंच योजयेत् ।। यो. योनिरोगचिकित्सा, भा. २ पृ. ५८२
– श्लेष्मलायां कटुप्रायः समूत्रा बस्तयो हिताः ।। च. चि. ३०–८५

२ योन्यां श्लेष्मप्रदुष्टायां वर्तिः संशोधनी हिता ।
वाराहे बहुशः पित्ते भावितैर्लक्तकैः कृता ।।
भावितं पयसाऽर्कस्य यवचूर्णं ससैंधवम् ।
वर्तिः कृत्वा मुहुर्धार्या ततः सेच्या सुखाम्बुना ।।
पिप्पल्यामरीचैर्माषैः शताह्वा कुष्ठसैंधवैः ।
वर्तिस्तुल्या प्रदेशिन्या धार्या योनिविशोधनी ।। च. चि. अ. ३०–७० ते ७३

३ सन्निपाते विमिश्रं तु संसृष्टासुच कारयेत् । च. चि. ३०–४३
– सन्निपातसमुत्थायाः कर्मसाधारणं हितम् । च. चि.३०–८६

४ रक्तयोन्यामसृग्वर्णैरनुबंधं समीक्ष्य च
ततः कुर्याद्यथादोषं रक्तस्थापनमौषधम् । च. चि. अ. ३०–८७

१ तिलचूर्णं दधि घृतं फाणितं शौकरी वसा ।
क्षौद्रेण संयुतं पेयं वातासृग्दरनाशनम् ।।
वराहस्य रसो मेद्यः सकौलत्थोऽनिलाधिके ।
शर्कराक्षौद्रयष्टयाह्वनागरैर्वा युतं दधि ।।
पयस्योत्पलशालूकबिसकालीयकाम्बुदम् ।
सपयःशर्कराक्षौद्रं पैत्तिकेऽसृक्दरे पिबेत् ।। च. चि. अ. ३०–८८ ते ९०

२ रसाञ्जनं च लाक्षां च छागेन पयसा पिबेत् ।
..................पैत्ते सर्वथैवास्रापित्तजित् ।।
विरेचनं महातिक्तं पैत्तिकेऽसृक्दरे पिबेत् ।
मधुकं त्रिफलां लोध्रं मुस्तं सौराष्ट्रिकां मधु ।।
मद्यैर्निंबगुडूच्यौ वा कफजेऽसृग्दरे पिबेत् । च. चि. अ. ३०–९७; ९८; ९९

३ पाठाजम्ब्वाम्रयोर्मध्यं शिलोद्भेदं रसाञ्जनम् ।
अम्बष्ठा शाल्मलीश्लेषं समंगा वत्सकत्वचम् ।। च. चि. अ. ३०–९०

[1]नागरमोथे, लोध्र, काव, टेंटू, मिरे, सुंठ, काळया मनुका, रक्तचंदन, कायफळ, इंद्रजव, उपळसरी, धायटी, ज्येष्ठमध व अर्जुन ही द्रव्ये (पुष्य नक्षत्रावर) एकत्र करून त्याचे सूक्ष्म चूर्ण करावे व ते मधात कालवून तांदुळाच्या धुवणाबरोबर सेवन करावे. सर्व योनिरोगांवर, विशेषतः असृजा योनीवर याचा उत्तम उपयोग होतो.

### अरजस्का योनीची चिकित्सा :

[2]शिवणीचे फळ, कुडयाचा काढा यांमध्ये तूप सिद्ध करून ते अरजस्का योनी-साठी उत्तरबस्तीकरिता वापरावे.

[3]हरीण, शेळी, डुक्कर यांचे रक्त, दही, अमसुलाचा रस व तूप यांच्याबरोबर प्राशन करावे किंवा जीवनीय गणातील द्रव्यांनी सिद्ध केलेले तूप अरजस्का योनि-रोगाने पीडित स्त्रीने सेवन करावे.

### अचरणा योनीची चिकित्सा :

[4]जीवनीय द्रव्यांनी सिद्ध केलेले तैल अचरणा योनीत उत्तरबस्तीसाठी वापरावे.

१ बाह्लीकातिविषे बिल्वं मुस्तं लोध्रं सगैरिकम् ।
कट्वङ्गं मरिचं शुंठीं मृद्वीकां रक्तचंदनम् ।।
कट्फलं वत्सकानन्ताधातकीमधुकार्जुनम् ।
पुष्येणोद्धृत्य तुल्यानि सूक्ष्मचूर्णानि कारयेत् ।।
तानि क्षौद्रेण संयोज्य पिबेत्तन्डुलवारिणा ।
अर्शःसु चातिसारेषु रक्तं यच्चोपवेश्यते ।।
दोषागन्तुकृता ये च बालानां तांश्च नाशयेत् ।
योनिदोषं रजोदोषं श्वेतं नीलं सपीतकम् ।।
स्त्रीणां श्यावारुणं यच्च प्रसह्य विनिवर्तयेत् ।
चूर्णं पुष्यानुगं नाम हितमात्रेयपूजितम् ।।
इति पुष्यानुगचूर्णम् । च. चि. ३०–९० ते ९५

२ काश्मर्यकुटजक्वाथ सिद्धमुत्तरबस्तिना ।
अरजस्कानां हितं घृतम् । च. चि. ३०–१००

३ मृगाजाविवराहासृग्दध्यम्लफलसर्पिषा ।
अरजस्का पिबेत् सिद्धं जीवनीयैः पयोऽपि वा ।। च. चि. ३०–१०१, १०२

४ ........अचरणासु........दातव्यं (जीवनीयैः सिद्धं)तैलं उत्तरबस्तिना ।
गोपित्ते मत्स्यपित्ते वा क्षौमं त्रिः सप्तभावितं ।।
मधुना किण्वचूर्णं वा दद्यात् अचरणापहम् ।
स्रोतसां शोधनं कण्डूक्लेदशोफहरं च तत् ।। च. चि. ३०–१०२ ते १०४



जीवनीय गणातील औषधी द्रव्ये उपलब्ध नाहीत. त्यांचे प्रतिनिधी म्हणून शतावरी, यष्टिमधू, भुईकोहळा, डुक्करकंद, अश्वगंधा वापरण्याची पद्धती आहे.

गोरोचन आणि कुटकी यांच्या द्रवामध्ये रेशमी वस्त्र तीन, सात किंवा एकवीस वेळा भिजवून वाळवावे व त्याची घडी करून (पिचू) ती योनीमध्ये धारण करावी किंवा किण्वाचे चूर्ण मधात कालवून त्याचा पिचू धारण करावा. त्यामुळे अचरणा योनीमध्ये स्रोतसांचे शोधन होते व कंडू, क्लेद नाहीसा होतो. सूज असेल तर तीही नष्ट होते.

### अतिचरणा योनीची चिकित्सा :

[1]वातघ्न अशा द्रव्यांनी शतपाकी तैल सिद्ध करून त्याने अतिचरणा योनिपीडित स्त्रीला आस्थापन व अनुवासन बस्ती द्यावेत. वातघ्न अशा स्निग्ध द्रव्यांनी वा उपनाहांनी स्वेदन करावे आणि वातघ्न असा आहार द्यावा. (हे उपचार वातज योनिव्यापद्प्रमाणे करावे.)

### प्राक्चरणा योनीची चिकित्सा :

प्राक्चरणा योनीमध्ये अचरणा योनीमध्ये सांगितल्याप्रमाणे जीवनीय सिद्ध तैला चा उत्तरबस्ती वापरावा व तसेच अतिचरणा योनीमध्ये सांगितल्याप्रमाणे चिकित्सा करावी (च. चि. १०२–१०५).

### [2]उपप्लुता योनीची चिकित्सा :

धायटी, आमलकी, तालिसपत्र (काही आमलकीपत्र असा एक शब्द घेऊन आवळयाची पाने असा अर्थ करतात. कफाचे आधिक्य लक्षात घेता पत्र शब्द

१ वातघ्नैः शतपाकैश्च तैलैः—अतिचारिणी ।
आस्थाप्याचानुवास्या च स्वेद्याचानिलसूदनैः ।
स्नेहद्रव्यैस्तथाऽहारैः उपनाहैश्च युक्तितः ।। च. चि. ३०–१०५,१०६

२ धातक्यामलकीपत्रस्रोतोजमधुकोत्पलैः ।
जम्ब्वाम्रमध्यकासीसलोध्रकट्फलतिन्दुकैः ।।
सौराष्ट्रिकादाडिमत्वगुदुम्बरशलाटुभिः ।
अक्षमात्रैरजामूत्रे क्षीरे च द्विगुणे पचेत् ।।
तैलप्रस्थं पिचूं दद्याद्योनौ च प्रणयेत्ततः ।
कटीपृष्ठत्रिकाभ्यङ्गं स्नेहबस्तिं च दापयेत् ।।
पिच्छिला स्राविणी योनिर्विप्लुतोपप्लुता तथा ।
उत्ताना चोन्नता शूना सिध्येत्सस्फोटशूलिनी ।। च. चि. ३०–७८ ते ८२

निराळा मानून त्याचा अर्थ तालिसपत्र करावा असे वाटते. ), स्रोतोञ्जन, यष्टिमधु, कमळ, जांभळाचे बीज, आंब्याची बाठ, हिराकस, लोध्र, कट्फल, टेंभुर्णीचे फळ, तुरटी, डाळिंबाची साल आणि उंबराची कच्ची फळे एक एक तोळा घेऊन त्यात एक शेर तेल टाकावे. शेळीचे मूत्र व दूध दोन दोन शेर घालून ते तैल सिद्ध करावे. हे तेल कटीपृष्ठत्रिकाच्या ठिकाणी अभ्यंगासाठी वापरावे. स्नेहबस्तीसाठीही वापरावे व याचाच योनीत पिचू धारण करावा.

[1]उपप्लुता योनीमध्ये श्वेतस्राव असतो. त्यावर रक्तरोहिड्याच्या मुळांचा कल्क सेवन करावा किंवा आवळ्याच्या फळांतील मज्जेचा कल्क साखर व मध घालून पाण्याबरोबर घ्यावा. किंवा आवळकाठीचे चूर्ण वा रस मधाबरोबर चाटावा.

वडाच्या सालीचा काढा व लोध्राचा कल्क प्राशन करावा.

रेशमी वस्त्राला लोध्र कल्क व वडाच्या सालीचा काढा यांची पुटे देऊन ( भिजवून पुनःपुनः वाळवून ) त्याचा पिचू स्राव नाहीसा होण्यासाठी योनीमध्ये धारण करावा.

पिंपरीच्या ( प्लक्ष ) सालीचे चूर्ण मधात कालवून त्याचा गोळा योनीत धारण करावा.

लोध्र, गव्हला, ज्येष्ठमध यांच्या चूर्णाची वर्ती मधात तयार करून योनीस आतून तेल लावून धारण करावी. याच वर्तीसाठी कषायरसात्मक औषधी द्रव्येही वापरावीत.

स्राव बंद होण्यासाठी तेलाने योनीचे स्नेहन करून राळ, गुग्गुळ, यव, तेल, त्रिकटू, मासे ( बोंबिल ) यांना तुपाने माखून त्यांची धुरी द्यावी.

योनीतील स्राव पिच्छिल असेल तर हिराकस, त्रिफळा, तुरटी, लाजाळू, आंब्याच्या कोयीतील मज्जा, धायटी यांचे चूर्ण मधात कालवून लावले असता योनी स्वच्छ होते.

१ रोहितकान्मूलकल्कं पाण्डुरेऽसृग्दरे पिबेत् ।
जलेनामलकीबीजं कल्कं वाससितामधुम् ॥
मधुनाऽमलकं चूर्णं रसं वा लेहयेत्च ताम् ।
न्यग्रोधत्वक्कषायेण लोध्रकल्कं तथा पिबेत् ॥
आस्रावे क्षौमपट्टं वा भावितं तेन धारयेत् ।
प्लक्षत्वक्चूर्णपिण्डं वा धारयेन्मधुना कृतम् ॥
योन्या स्नेहाक्तया लोध्रप्रियंगुमधुकस्य वा ।
धार्या मधुघृतावर्तिः कषायाणां च सर्वशः ॥
स्रावच्छेदार्थमभ्यक्तां धूपयेद्वा घृताप्लुतैः ।
सरलागुग्गुलुयवैः सतैलकटुमत्स्यकैः ॥
कासीसं त्रिफलाकांक्षी समङ्गाऽऽम्रास्थि धातकी ।
पैच्छिल्ये क्षौद्रसंयुक्तश्चूर्णो वैशद्यकारकः ॥
पलाशसर्जजम्बूत्वक् समङ्गामोचधातकीः ।
सपिच्छिलापरिक्लिन्नास्तम्भनः कल्क इष्यते ॥ च. चि. ३०–११६ ते १२३



पळस, सरल (सर्ज वृक्ष), जांभूळ यांच्या सालींचे चूर्ण, लाजाळू, मोचरस, धायटी यांचा कल्क तयार करून तो योनीत ठेविला असता योनीतील पिच्छिल स्राव व क्लेद नाहीसे होऊन योनीचे स्तंभनही होते (बुळबुळीतपणामुळे आलेली शिथिलता जाते).

[1]उपप्लुता योनीत कफवाताचे प्राबल्य असते. वरील उपचाराने कफाचे स्राव वगैरे नष्ट झाल्यानंतर वातशमनासाठी अचरणा योनीतील जीवनीय द्रव्यांनी सिद्ध केलेले तेल उत्तरबस्तीसाठी वापरावे.

परिप्लुता योनीवर उपप्लुता योनीमध्ये सांगितलेले "धातक्यामलकीपत्रस्रोतोज-मधुकोत्पलैः ।" इत्यादी पाठाने सिद्ध केलेले तैल त्या पद्धतीनेच वापरावे.

## उदावर्ता योनीची चिकित्सा :

[2]उदावर्ता योनीमध्ये वाताची पीडा अधिक असताना निशोत्तराने विरेचन द्यावे; निशोत्तराने सिद्ध केलेल्या तेलाने स्नेहन करावे (योनीचे).

वातघ्न द्रव्यांनी स्वेदन करावे. ग्राम्य, आनूप, जलचर प्राणी यांच्या मांसरसाने आणि दशमूलसिद्ध दुधाने बस्ती द्यावा. त्याचप्रमाणे निशोत्तरसिद्ध तेलाचा अनुवासन वा उत्तरबस्ती उपयोजावा.

भल्लातकसिद्ध दूध, भल्लातकावलेह, देवदार्व्यादी काढा, शंखवटी असे कल्प पोटातून द्यावेत.

## कर्णिनी योनीची चिकित्सा :

[3]कर्णिनी योनीमध्ये कोष्ठ, पिंपळी, रुईचे कोंब यांच्या सूक्ष्म चूर्णाच्या वर्ती बोकडाच्या मूत्रामध्ये तयार कराव्या व त्या वापराव्यात. इतरही कफघ्न उपचार करावेत. लेखनकर्म करावे.

जीवनीय द्रव्यांनी सिद्ध केलेले तेल उत्तरबस्तीसाठी वापरावे.

१ कफवाते च दातव्यं तैलमुत्तरबस्तिना । च. चि. ३०–१०३
२ त्रैवृतं स्नेहनं स्नेहो ग्राम्यानूपौदका रसाः ॥
दशमूलपयोबस्तिश्चोदावर्तानिलार्तिषु ।
त्रैवृतेनानुवास्या च बस्तिश्चोत्तरसंज्ञितः ॥ च. चि. ३०–११०, १११
३ कर्णिन्यां वर्तिका कुष्ठपिप्पल्यर्काग्रसैंधवैः ।
बस्तमूत्रकृता धार्या सर्वं च श्लेष्मनुद्धितम् ॥ च. चि. ३०–१०९, ११०

## पुत्रघ्नी योनीची चिकित्सा :

[१]शिवणीचे फळ व कुडा यांच्या काढ्यामध्ये सिद्ध केलेले तूप पुत्रघ्नी योनीमध्ये उत्तरबस्तीसाठी वापरावे.

[२]उंबराची कोवळी फळे ५१२ तोळे, व पंचवल्कल, कडू पडवळ, जाई व कडुनिंबाची पाने समभाग मिळून ५१२ तोळे एकत्र करून एक द्रोण म्हणजे १०२४ तोळे पाण्यात रात्रभर भिजत घालावी. सकाळी ते पाणी कल्क पिळून गाळून घ्यावे. त्यात लाख, धावडा, पळसाची साल व डिंक, मोचरस यांचे चूर्ण सर्व सम मिळून १६ तोळे घालून या सर्वांमध्ये एक शेर तेल सिद्ध करावे. या तेलाचा पिचू योनीमध्ये धारण करावा व नंतर साखर घातलेल्या शीतकषायांनी धावन करावे (तैलसिद्धीसाठी वापरलेलीच द्रव्ये या काढ्यासाठी वापरावीत). यामुळे योनिरोग नष्ट होऊन मूल होते.

[३]हा उपचार प्रामुख्याने पुत्रघ्नी योनीसाठीच सांगितलेला असला पाहिजे.

[४]उंबराच्या चिकाच्या सहा भावना तिळाला द्याव्यात व नंतर त्या भावित तिळापासून तेल काढावे. हे तेल उंबराच्याच काढ्यामध्ये सिद्ध करावे. क्वाथेन तस्यैव या पदाने काही भावित तिळाचा क्वाथ घेतात.) या तेलाचा पिचू धारण करावा.

फलघृत, शतावरीकल्प, गर्भाशयमृत, मधुमालिनीवसंत इत्यादी कल्प व रक्तवर्धक कल्प पोटातून वापरावेत.

१ काश्मर्यकुटजक्वाथसिद्धमुत्तरबस्तिना ।
पुत्रघ्याश्च हितं घृतम् ॥ च. चि. अ. ३०–११० ते १११

२ उदुंबरशलाटूनां द्रोणमब्द्रोणसंयुतम् ।
सपंचवल्ककुलकमालतीनिंबपल्लवम् ॥
निशां स्थाप्यं जले तस्मिंस्तैलप्रस्थं विपाचयेत् ।
लाक्षाधवपलाशत्वङ्निर्यासैः शाल्मलेन च ॥
पिष्टैः सिद्धस्य तैलस्य पिचुं योनौ निधापयेत् ।
सशर्करैः कषायैश्च शीतैः कुर्वीत सेचनम् ॥
पिच्छिला विवृता कालदुष्टा योनिश्च दारुणा ।
सप्ताहाच्छुध्यति क्षिप्रमपत्यं चापि विंदति ॥ च. चि. ३०–७३ ते ७७

३ अपत्यं चापि विंदति ।

४ उदुंबरस्य दुग्धेन षट्कृत्वो भाविताच्तिलात् ।
तैलं क्वाथेन तस्यैव सिद्धं धार्यं च पूर्ववत् ॥ च. चि. ३०–७७ ते ७८



## [१]अंतर्मुखी योनीची चिकित्सा :

अंतर्मुखी योनीमध्ये प्रथम स्नेहस्वेद करून मग आपल्या स्थानापासून भ्रष्ट झालेल्या योनिभागांना पुन्हा प्रकृत स्थानी स्थापन करावे. अंतर्मुखी योनीमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा ( अंतर्मुखाचा) भाग वाकडा होतो. अशा वेळी योनीमध्ये हात घालून तो वाकडेपणा निरनिराळ्या दिशेने योग्य तसा वळवून नाहीसा करावा; आणि एकदा आलेली सुस्थिती पुन्हा तशीच राहील असे पाहावे. त्यासाठी वलयाचा उपयोग करावा.

या अवस्थेमध्ये गर्भाशयाला स्वस्थानी स्थापन करण्याकरिता निरनिराळ्या शस्त्रकर्माची आवश्यकता भासते.

( दुःस्थितां स्थापयेत् पुनः । ) दुस्थितां समां स्थापयेत् । वा. उ. ३४–२४ असा वाग्भटाचा पाठ आहे आणि सम शब्दाचा अखंड असा अर्थ अमरकोशामध्ये दिला आहे ( सम शब्दाचा अर्थ वर्ष असाही आहे. )

## सूचिमुखी योनीची चिकित्सा :

[२]स्नेहन स्वेदन करून सूचिमुखी योनीचे संवृत, संकुचित झालेले मुख वर्धयेत् म्हणजे विस्तृत करावे. हे कार्य बोटाने वा तत्सदृश साधनाने कुशलतेने करावे.

पोटातून फलघृत वापरावे. त्याने वाताचा नाश होऊन रूक्ष गुणाने संकुचित झालेला गर्भाशय वाढतो.

प्रत्यक्षामध्ये स्थानिक स्नेहनस्वेदनामुळे गर्भाशयमुख विस्तृत करण्यास फारच सुलभ जाते.

[३]गर्भाशयमुखाचे विस्तृतीकरण अंगुलीने करावे असे दिले आहे. प्रत्यक्षामध्ये अंगुलीच्या अग्राप्रमाणे असलेले जे शलाकायंत्र त्याचाच उपयोग या शस्त्रकर्मात अभिप्रेत आहे.

१ स्निग्धस्विन्नां तथा योनिं दुःस्थितां स्थापयेत् पुनः । पाणिना नामयेत् जिह्मां ॥
च. चि. ३०–४३ ते ४४

– दुःस्थितां स्थानभ्रंशात् विषमां योनिं समां यथास्थानं स्थापयेत् । जिह्मां कुटीलां, पाणिना योन्यंतरगततुल्याग्रेण हस्तेन नमयेत् । अत्र नमन कथनेन उन्नमनस्य अशक्यत्वात्, उन्नतप्रदेशस्य नमनेनैव निम्नस्य औन्नत्यजननं द्योत्यते ।
इंदुटीका अष्टाङ्गसंग्रह, उत्तरतंत्र ३९

२ संवृतां वर्धयेत् पुनः । च. चि. ३०–४४

– संवृतां व्यासयेत् पुनः । (पाठभेद वाग्भटाच्या टीपेत आहे.) वा. उ. ३४–२५

३ अंगुल्यग्रेण प्रसादयेत् । अष्टाङ्गसंग्रह, उ. ३९ इंदुटीका

## शुष्का योनीची चिकित्सा :

अरजस्का योनीमध्ये उल्लेखिलेले जीवनीय गणांतील औषधांनी सिद्ध केलेले तेल उत्तरबस्तीकरिता वापरावे. च. चि. ३०–१०२

## वामिनी योनीची चिकित्सा :

[1]बाळंतशेप, जव, गहू, मद्यातील गाळ, कोष्ठ, गव्हला, चिकणा, मंडूकपर्णी, लवंग ( श्याह्व, काही याचा अर्थ अश्वगंधा असाही करतात. जेज्जटाच्या टीकेत नवनीतधूप असे म्हटले आहे. याचा अर्थ लक्षात येत नाही. ) यांचा चुरमा करून तो कल्करूपाने योनीमध्ये ठेवावा. त्यामुळे गर्भाचे धारण होते. शिवाय स्नेहस्वेदादी उपचार स्नेहपिचुधारण व संतर्पण होईल असा आहार इत्यादी चिकित्सा करावी.

## षंढी योनीची चिकित्सा :

षंढी योनी अनुपक्रम्य आहे.

## महायोनीची चिकित्सा :

[2]महायोनिव्याधीवर प्रथम स्नेहस्वेद करून खाली घसरलेला योनीचा भाग हा हळूहळू आत सरकवावा. जर योनीचे मुख नुसतेच शिथिल होऊन रुंदावले असेल ( काहीही अंग बाहेर आले नसेल ) तर ते इंदूच्या टीकावचनाप्रमाणे निवृत्त भाग

१ शताह्वायवगोधूमकिण्वकुष्टप्रियंगुभिः ।
बलाखुपर्णिकाश्याह्वैः संयावो धारणः स्मृतः ॥
वामिन्युपप्लुतानां च स्नेहस्वेदानिकः क्रमः ।
कार्यस्ततः स्नेहपिचुस्ततः संतर्पणं भवेत् ॥ च. चि. ३०–१०६ ते १०८

– प्रवेशयेन् मिसृतां च विवतां परिवर्तयेत् । च. चि. ३०–४४

२ एतदेव महायोन्यां स्रस्तायां च विधीयते ।
वसाऋक्षवराहाणां घृतं च मधुरैः शृतम् ॥
पूरयित्वा महायोनिं बध्नीयात् क्षौमलक्तकैः ।
प्रस्रस्तां सर्पिषाऽभ्यज्य क्षीरस्विन्नां प्रवेश्य च ॥
बध्नीयात् वेशवारस्य पिण्डेनामूत्रकालतः ।
यच्च वातविकाराणां कर्मोक्तं तच्च कारयेत् ॥
सर्वे व्यापत्सु मतिमान् महायोन्यां विशेषतः । च. चि. ३०–११२ ते १५
'परीवर्तयेत् परीतः शनैर्गृहीत्वा संवृणुयात्' । इंदुटीका



ह्या कौशल्याने सभोवताली टाके घेऊन (शस्त्रकर्म करून) संकुचित करावा. ही दोनही (निसृत व विवृत) स्त्रियांमध्ये शल्यभूत होतात.

[अंतर्मुखीची गर्भाशयवक्रता ही पीडाकरच होते. म्हणून चरकाने,
योनिः स्थानाप्रवृत्ताहि शल्यभूता स्त्रिया मता । च. चि. ३०–४५
असे या अवस्थेचे वर्णन केले आहे. ]

महायोनीच्या उपचारामध्ये उदावर्ता योनीच्या चिकित्सेत सांगितलेले निशोत्तर सिद्ध तैल उत्तरबस्तीसाठी वापरावे. त्याचप्रमाणे अस्वल व डुक्कर यांची चरबी किंवा मधुर द्रव्यांनी सिद्ध केलेले घृत यांनी योनीचे पूरण करून ती रेशमी तस्त्राने बांधून टाकावी. योनीचे कोणतेही अंग बाहेर आले असेल तर ते हळूहळू आत

– चंदनोशीरमंजिष्ठा पटोलं वनवालकम् ।
मधुकं मधुयष्टी च तथा लोहितचंदनम् ।
सारिवाजीरकं मुस्तं पद्मकं च पुनर्नवा ।
क्षीरेण शर्करायुक्तं पानं पित्तोद्भवे गदे ।
ज्ञात्वा योनिविशुद्धिं च तत्र दद्यान्महौषधम् ।
चंदनोशीरमंजिष्ठा गिरिकर्णी सिता तथा ।
क्षीरेणालोडिता पित्ते पुष्पसिद्धिं करिष्यति ।
रजो रक्तं परीक्षेत वातपित्तकफात्मकम् ।
सरुजं च सकृष्णं च पक्वजम्बूनिभं च यत् ।
वातेन बाधितं पुष्पं तत् च संलक्षयेत् बुधः ।
तस्य नागरपिप्पल्यौ मुस्ताधन्वयवासकम् ।
बृहत्यौ पाटलाचैव क्वाथः सगुडकोदधि ।
सप्ताहं पाययेद्धीमान्यावत् स्रवति शोणितम् ।
विशुद्धे च तथा रक्ते पाययेत् पयसान्वितम् ।
श्वेता च गिरिकर्णी च श्वेतागुंजा पुनर्नवा ।
तेन सा लभते गर्भं मासमेकं प्रयोगतः ।
जपाकुसुमसंकाशं कुसुंभरससंनिभम् ।
दाहशोषमूत्रकृच्छ्रयुक्तं तत् पित्तदूषितम् ।
चंदनोशीर मंजिष्ठा पटोलं धनवालकम् ।
मधुकं यष्टिमधुकं तथा लोहितचंदनम् ।
पद्मकं पुनर्नवे द्वे सारीवा जीरकं घनम् ।
क्षीरेण शर्करायुक्तं पानं पित्तकृते गदे ।
ज्ञात्वा योनिविशुद्धिं च तत्र दद्यान्महौषधम् ।

सरकविण्यापूर्वी प्रथम सिद्ध घृताने ह्या भागाचे स्नेहन करावे आणि दुधाने स्वेदन करावे; व मग ते अंग आत घालावे; आणि त्याच्यापुढे ते पुन्हा बाहेर येऊ नये म्हणून वेशवाराचा पिंड भरावा व घट्ट बांधून ठेवावा. मूत्रप्रवृत्तीच्या वेळी हा बंध सोडावा व पुन: नवीन बांधावा.

वातज योनिरोगाच्या चिकित्सेमध्ये जे उपचार सांगितले आहेत ते सर्वच योनिरोगांमध्ये विशेषत: महायोनीमध्ये अवलंबावेत.

---

श्वेतार्कमूलं पयसा श्वेता च गिरिकर्णिका ।
– वंध्यानां गर्भजननं भवेत्तल्लक्षणान्वितम् ।
सघनं पिच्छिलं चापि जाड्यं स्यान्मूत्ररोधनम् ।
आलस्य तंद्रा निद्रा च कफदुष्टं रजो विदुः ।
त्रिफला गिरिकर्णी च तथारग्वधवत्सकौ ।
पयसा पयसा पानं स्त्रीणां च गर्भकारणम् ।
पलाद्यं चंदनाद्यं च द्राक्षाद्यं चूर्णमेव च ।
दापयेत् गर्भजननं नारीणां भिषगुत्तमः ।
खंडकाद्यश्च चूर्णं च नारीणां भिषगुत्तमः ।
पुनर्नवाद्यं देयं वा स्त्रीणां गर्भप्रदायकम् ।
अथ पथ्यं प्रवक्ष्यामि स्त्रीणां च शृणु पुत्रक ।
कच्चरं सूरणं चैव तथा चाम्लं च काञ्जिकाम् ।
विदाहिकं च तीव्रं च स्त्रीणां दूरे परित्यजेत् ।
वंध्याकर्कटकीमूलं लांगली कटुतुंबिका ।
देवदाली द्विबृहती सूर्यवल्ली च भीरुका ।
निर्माल्यं माल्यवस्त्रं च तथा स्यात् ऋतुसंगमः ।
अन्यस्त्रीस्नातमुदकं स्त्रीणां पथ्यमुपक्रमः । हारीतसंहिता–चिकित्सा–तृतीय ४८

## योनिव्यापत् चिकित्सा

| योनिव्यापत् | स्नेहन | स्वेदन | शोधन | बाह्यशमन | अभ्यंतर शमन | रसायन | पथ्यापथ्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ वातजा | लवणतैल (उष्ण) | मांसरस, तिलसिद्ध क्षीर, नाडी, परिषेक स्वेद. | एरंडस्नेह, निरूह-बस्ती, दशमूल-क्वाथाचा उदर-बस्ती. | वातघ्न द्रव्यांनी सिद्ध तेलाचा पिचू व अनुवासन उत्तर-बस्ती, उष्ण वेशवार व कृशरा यांचे योनीत धारण. | वातविध्वंस, शंख-वटी, संजीवनी, दश-मूलारिष्ट, देवदारु-क्वाथ, अश्वगंधा, अनुपान तूप + मध | महायोगराज-गुग्गुल,भल्ला-तकावलेह, वर्धमान भल्लातक-सिद्ध दूध. | विश्रांती, सिद्ध दूध, मांसरस, वातकर आहार वर्ज्य |
| २ पित्तजा | बलातैल | वर्ज्य | हृद्यविरेचन क्वाथ आमलकी, त्रिवृत् आरग्वध, मार्कंडी | शीत उपचार, शत-धौतघृताचा पिचू, धावन–पंचवल्कल-क्वाथाने. पंचवल्क-लाचा कल्क, उत्तर-बस्ती–चंदर, उशीर, मुस्ता, शतावरी, यष्टिमधु-क्वाथाने | शतावरीघृत, दाडिमादिघृत, चंद्रपुटीप्रवाळ, मोचरस, अशोक, भूकूष्माण्ड, नागके-शर,केशर यांचे चूर्ण, चंद्रकला, सूतशेखर, लोहपर्पटी, बोल-पर्पटी, सुवर्णमाक्षिक, कामदुधा,अशोकारिष्ट | च्यवनप्राश, आमलकी रसायन | कटू, तीक्ष्ण, उष्ण, विदाही वर्ज्य |

| योनिव्यापत् | स्नेहन | स्वेदन | शोधन | बाह्यशमन | अभ्यंतर शमन | रसायन | पथ्यापथ्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ कफजा | वर्ज्य | धूम–श्रोवा, बाळंतशेपा, धत्तूरपत्रचूर्ण. परिषेक–लोध्रकषाय. | उत्तरबस्ती–त्रिवृत् सातला क्वाथ, गोमूत्र, कल्क–त्रिवृत्, सातला, आरग्वध, क्षारकर्म वर्तिकटू, तीक्ष्ण, उष्ण द्रव्ये, विरेचन, वमन | धावन-कोष्ण तुवरीजल, पिचू–मध, करंजेल, खदिरचूर्ण, पोटली धारण | चंद्रप्रभा, आरोग्यवर्धिनी, लघुमालिनीवसंत, जसदभस्म, शिलाजित, त्रिफलागुग्गुल, भल्लातक, लोध्रासव, लोध्रचूर्ण, तुवरीचूर्ण, प्रवाळपंचामृत | पिप्पली-रसायन, पूगपाक, सुवर्णमालिनीवसंत, अभयारिष्ट, शिलाजित, पुष्यानुगचूर्ण | मधुर, स्निग्ध, वर्ज्ययव, जीर्णरक्तशाली, बाजरी, पालेभाज्या, श्रम. |
| ४ सान्निपातिक | लक्षण प्राधान्यारूप | वातपित्तकफयोग्य चिकित्सा करावी अथवा शस्त्रकर्म. | | | | | |
| ५ असृजा | — | — | हृद्यविरेचनक्वाथ | दाह असल्यास शतधौतघृत | पित्तजेप्रमाणे, पुष्यानुगचूर्ण | मौक्तिक कामदुहा, चंद्रप्रभा. | उष्ण, तीक्ष्ण, सर, विदाही, वर्ज्य-विश्रांती. |
| ६ अरजस्का | काश्मर्यादी घृत | अवगाह–सैंधवयुक्त जल | विरेचन, बस्ती, उत्तरबस्ती. | पिचू–बलातैल काश्मर्यादिघृत. | शतावरीकल्प, केशर, सूतशेखर, आमगर्भ | चंद्रप्रभा | नारळ, गूळ, उडीद, तीळ, लसूण, दूध, गहू. |
| ७ अचरणा | उत्तरबस्ती–जीवनीय सिद्ध तैल | परिषेक-दशमूल-क्वाथ, सैंधवजल | एरंडस्नेह | धावन-दशमूलक्वाथ, त्रिफळा, मध, सैंधव पोटली. पिचू–चंदन तैल | गंधकरसायन, सूक्ष्म त्रिफळा, आरोग्यवर्धिनी | चंद्रप्रभा | योनिभागाची स्वच्छता, आहारात अभिष्यंदी पदार्थ वर्ज्य |

| योनिव्यापत् | निदान (हेतू) | दोषाधिक्य | स्राव–लक्षणे | स्थानिक लक्षणे | सार्वदेहिक लक्षणे | साध्या-साध्यत्व | परिणाम (उदर्क) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ अतिचरणा | अतिमैथुन | वात | — | शोथ, सुप्ती, रुजा | | कष्टसाध्य | वंध्यत्व मैथुनासहत्व मूत्रकृच्छ्र |
| ९ प्राक्चरणा | बालवयात मैथुन | वात | — | शोथ, व्रण | पृष्ठ, कटी, ऊरू, वंक्षण यांत तीव्र शूल | साध्य | |
| १० उपप्लुता | सगर्भावस्थेत कफकर आहार, वेगधारण, (छर्दी, निःश्वास). | कफ, वात | कफसदृश, सशूल. | शैथिल्य, शूल | आलस्य, अंगमर्द, मलावष्टंभ रोमहर्ष, अग्निमांद्य हृल्लास, आध्मान. | कष्टसाध्य | गर्भनाश |
| ११ परिप्लुता | पित्तप्रकृती, मैथुनाचे वेळी वेगधारण (शिंक, ढेकर) | वात, पित्त | सशूल, वर्ण-नील, पीत | शोथ, शूल, स्पर्शासहत्व | ज्वर, श्रोणी, वंक्षण, पृष्ठ यांत शूल | कष्टसाध्य | मैथुनासहत्व |
| १२ उदावर्ता | वेगविधारण | वात | सकष्टप्रवृत्ती, स्रावानंतर बरे वाटते. | वातजेप्रमाणे | वातजेप्रमाणे | कष्टसाध्य | — |
| १३ कर्णिनी | प्रसूतीच्या वेळी अकालप्रवहण | वात, कफ, दूष्य रक्त. | — | विलंबितप्रसव | कटी, पृष्ठ, वंक्षण यांत पीडा | साध्य | मृतगर्भ, योनिसंवरण |
| १४ पुत्रघ्नी | बीजदुष्टी, वातकर आहार | वात | — | — | — | असाध्य | गर्भनाश, गुल्म |
| १५ अंतर्मुखी | जेवणानंतर किंवा विषमासन मैथुन | वात | सकष्ट | शूल, मैथुनासहत्व | अरति, कटी, पृष्ट वंक्षण यात पीडा | याप्य, शस्त्रसाध्य | वंध्यत्व |
| १६ सूचिमुखी | बीजदोष | वात | कष्टाने अत्यल्प | — | — | याप्य, शस्त्रसाध्य | वंध्यत्व |

| योनिव्यापत् | स्नेहन | स्वेदन | शोधन | बाह्यशमन | अभ्यंतर शमन | रसायन | पथ्यापथ्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ शुष्का | अरजस्के-प्रमाणे. | | | | | | |
| १८ वामिनी | पुत्रघ्नीप्रमाणे | | | | | | |
| १९ षंढी | अनुपक्रम्य | | | | | | |
| २० महायोनी | जीवनीयसिद्ध घृत | दशमूलसिद्धक्षीर-अभिषेक कृशरा उष्मस्वेद | | | अंतर्मुखीप्रमाणे | | |



# रक्तगुल्म

**सामान्यरूप :**

दोष निरनिराळ्या कारणांनी प्रकुपित होऊन कोष्ठामध्ये येऊन गुल्म नावाचा व्याधी उत्पन्न करतात. तो पाच प्रकारचा असतो. हृदय व बस्ती यांच्यामधील अंतरामध्ये दोन्ही पार्श्व, नाभी, बस्ती व हृदय यांच्या आसमंतात दोषांनी एक प्रकारची ग्रंथी उत्पन्न होते. ती फिरते वा स्थिरही असते. ग्रंथीचा आकार वर्तुळाकृती असतो. तो आकार क्वचित लहान-मोठाही होतो. ( " स्थिरोपचयवान " असाही पाठभेद आहे. याचा अर्थ ज्याची [ झाली तर ] सारखी वृद्धी होते, आकार उणावत नाही असा आहे; हे लक्षणही आढळते; त्यामुळेच क्वचित असा शब्द वापरला आहे.) या ग्रंथीलाच गुल्म असे म्हणतात. गुल्म शब्दांचा अर्थ झाळकट वृक्ष असा आहे. तो जसा वर्तुळाकृती दिसतो व त्याचे मूळ उमगून येत नाही, आकार मोठा असतो. (करवंदाची जाळी हे त्याचे उदाहरण होय.) त्याप्रमाणेच हाही व्याधी असतो. कुपित झालेला वायू हा त्याचे कारण असतो. त्याचप्रमाणे याचे आरंभस्थानही गूढ असते. (आवृत वातामुळे उत्पन्न होतो.) आकार मोठा असतो. हा गुल्म केवळ दोषमय असतो. इतर कशाच्याही आश्रयाने न राहता निराश्रय, स्वतंत्र असा असतो. दोष हळूहळू संचित होत विशिष्ट आकार घेतात. पाण्यातील बुडबुड्यांसारखी ही स्थिती असते. बुडबुडा ज्याप्रमाणे प्रथम बारीक असतो आणि त्याला इतर अनेक बारीक बुडबुडे मिळत मिळत तो मोठा होत जातो व व्यक्त होतो, बुडबुडा पाण्यातच वाढतो व वायू त्यास कारण असतो, त्याप्रमाणेच प्रथम दोष-दुष्टीने कोष्ठभागी कोठे तरी बारीक केन्द्र निर्माण होते व त्याच्याभोवती दुष्ट दोष साचत जाऊन त्यास गुल्माचा आकार येतो. दोषामुळे व दोषांतच वाढणारा हा व्याधी आहे.

– यथोक्तैः कोपनैर्दोषाः कुपिताः कोष्ठमागताः ।
जनयन्ति नृणां गुल्मं स पंचविध उच्यते ॥
हृद्बस्त्योरन्तरे ग्रंथिः संचारी यदि वाऽचलः ।
चयापचयवान् वृत्तः स गुल्म इति कीर्तितः ॥
पंचगुल्माश्रया नृणां पार्श्वे हृन्नाभिबस्तयः ।
कुपितानिलमूलत्वाद्गूढमूलोदयादपि ॥
गुल्मवद्वा विशालत्वात् गुल्म इत्यभिधीयते ।
स यस्मादात्मनि चयं गच्छत्यप्स्विव बुद्बुदः ॥
अन्तः सरति यस्माच्च न पाकमुपयात्यतः ।
स व्यस्तैर्जायते दोषैः समस्तैरपि चोच्छ्रितैः ।
पुरुषाणां तथा स्त्रीणां ज्ञेयो रक्तेन चापरः ॥ सु. उ. ४२–३, ७

[1]तो कोष्ठातल्या कोष्ठात बहुधा फिरत असतो. केवळ दोषाधिकतेमुळे याचा सहसा पाकही होत नाही. रक्तपित्ताचे अनुबंध घडले तर मात्र याचा पाक होण्याची शक्यता असते, तरी पण विद्रधीच्या अपेक्षेने ही पाक होण्याची क्रिया फारच मंद असते.

या गुल्माचे वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक व रक्तज असे पाच प्रकार होतात. यांतील पाचवा जो रक्तज प्रकार तो केवळ स्त्री-विशिष्टच आहे. विशिष्ट कारणाने विशिष्ट ठिकाणी केवळ स्त्रीमध्येच आढळून येतो. तोच येथे 'रक्तगुल्म' या प्रकाराने अभिप्रेत आहे. तत्त्वतः रक्त हा धातू स्त्री–पुरुष या दोघांनाही समान आहे. त्याची दुष्टी होऊन इतर दोषांप्रमाणे सामान्य अर्थाने रक्तगुल्म उत्पन्न होण्याची शक्यता आहे. पण तेथे रक्तदुष्टी ही पित्त परतंत्र असल्यामुळे त्याचा स्वतंत्र उल्लेख गुल्म प्रकरणात केला गेला नाही. त्यामुळे रक्तगुल्म हा शब्द नुसता यौगिक न मानता योगरूढ मानला पाहिजे आणि म्हणून पुरुषांच्या बाबतीत रक्त-दुष्टीमुळे गुल्म उत्पन्न झाला तरी त्यास रक्तगुल्म न म्हणता पित्तजगुल्मामध्ये रक्तानुबंधाने उत्पन्न होणारा असा त्याचा पोटप्रकार मानावा. त्यासाठीच ग्रंथकाराने ( एव कारपूर्वक ) या गुल्माचा स्त्रीविशिष्ट उल्लेख केला आहे.

## रक्तगुल्माची पूर्वरूपे :

[1]या पाचही गुल्मांमध्ये पूर्वरूपे पुढीलप्रमाणे होतात. अन्नावर वासना नसते; तोंडाला रुची नसते, अन्न पचत नाही. अग्नी विषम असतो, खाल्लेल्या अन्नाचा विदाह होतो, पचनाच्या वेळी कारणावाचून छर्दी होते. ढेकर येतात, वातमूत्रपुरीष यांचे वेग नीट येत नाहीत, वेग आले तरी त्या मलांची प्रवृत्ती होत नाही वा वेगाच्या मानाने वातमूत्रपुरीषादींची प्रवृत्ती फारच थोडी होते. पोटामध्ये वातजशूल उत्पन्न होतो, पोट गुबारते. आंतड्यामध्ये गुरगुर असा आवाज येतो. जिवाला चैन पडत नाही. ( परिहर्षण असा पाठ घेऊन अंग उगीचच शहारणे, रोमांच उभे राहणे असा अर्थ केला जातो. ) पुरीषाचे उदावर्तन होते. मनाचे अनुलोमन होत नाही ( मलाचे

१ गुल्मस्तिष्ठति दोषे स्वे विद्रधिर्मांसशोणिते ।
विद्रधिर्पच्यते तस्मात् गुल्मः क्वाऽपि न पच्यते ॥

– रक्तेन आर्तवरक्तेन चकारात् धातुरक्तेनापि गुल्मो जायते । स च पुंसाम् स्त्रीणाम् च भवति । तस्यच पृथगुपादानम् न कृतं । पैत्तिकगुल्मसमानलक्षणतया तत्रैवावरोधात् ।
सु. उ. ४२–७ टीका

१ एषां तु खलु पञ्चानां गुल्मानां प्रागभिनिर्वृत्तेरिमानि पूर्वरूपाणि भवन्ति, तद्यथा अनन्नाभिलषणम्, अरोचकाविपाकौ अग्निवैषम्यं, विदाहो भुक्तस्य, पाककाले चायुक्त्या छर्द्युद्गारौ, वातमूत्रपुरीषवेगानां चाप्रादुर्भावः, प्रादुर्भूतानां चाप्रवृत्तिरीषदागमनं वा, वातशूलाटोपान्त्रकूजनापरिहर्षणातिवृत्तपुरीषताः अबुभुक्षा, दौर्बल्यं, सौहित्यस्य चासहत्वमिति । च. चि. ३–१५



खडे बनतात असाही अर्थ केला जातो. ), भूक लागत नाही, दुर्बलता येते आणि पोट भरले असता तडस लागते अशी लक्षणे होतात.

[2]पुष्कळ ढेकरा येणे, मलाचा अवरोध, थोडे जेवले असताही पोट भरल्यासारखे वाटणे व अधिक जेवण झाले असता न सोसणे, आतड्यात कुरकुर वाजणे, पोटात गुरगुर होणे, पोट फुगणे व अग्निमांद्य ही गुल्माची पूर्वरूपे आहेत.

## रक्तगुल्माची कारणे :

रक्तगुल्म हा केवळ स्त्रियांमध्येच होतो. पुरुषांमध्ये तो होणे खरोखरीच कधीही शक्य नाही. कारण या गुल्मास कारणीभूत असणारा गर्भकोष्ठ आणि त्या ठिकाणी असणारी रजःप्रवृत्ती हे वैशिष्ट्य केवळ स्त्रियांमध्येच असते. स्त्रियांमध्येसुद्धा तो विशिष्ट कालीच होतो. लहान वयामध्ये रजःप्रवृत्ती नसताना व म्हातारपणी रजः-प्रवृत्ती नष्ट झाल्यानंतर गुल्माची उत्पत्ती होण्याची शक्यता नसते. क्वचित वृद्ध स्त्रीमध्येही गुल्म आढळतात, पण ते मध्यवयातच उत्पन्न झालेले असतात. शरीराचे बल कायम असते तोपर्यंत त्याची उपेक्षा केली जाते व पुढे जराजीर्ण शरीरामध्ये पीडा होऊ लागल्यावर रुग्णा वैद्याकडे येते.

स्त्रिया ह्या बहुधा परावलंबी असतात, लज्जाशील असतात, अहितकर विहार कोणता याची त्यांना कल्पना असत नाही. घरातील सर्व प्रकारची कामेही सारखी मागे असतात व त्यामुळे वातमूत्रपुरीषादींचे उत्पन्न होणारे वेग त्या वरचेवर धारण करतात, त्यामुळे वातप्रकोप होतो, अतिमैथुन हेही वातप्रकोपाचे कारण असते (काश्यप चि. गुल्मचिकित्साध्याय १५, पान ११२).

गर्भ गात झाला असताना किंवा नुकतीच प्रसूती झाली असता किंवा मासिकपाळीच्या वेळी त्या स्त्रीने (या तीनही अवस्थांत) वातप्रकोप होईल असा आहार-विहार केला तर तिच्या ठिकाणी गर्भाशयामधून बाहेर जाणाऱ्या रजःप्रवृत्तीस वायू अडथळा उत्पन्न

१ उद्गारबाहुल्यपुरीषबन्धतृप्त्यक्षमत्वान्त्रविकूजनानि ।
आटोपमाध्मानमपक्तिशक्तिमासन्नगुल्मस्य वदन्ति चिह्नम् ॥ वा. नि. अ. ११–६३

– ऋतावनाहारतया भयेन विरूक्षणैर्वेगविनिग्रहैश्च ।
संस्तंभनोल्लेखनयोनिदोषैः गुल्मः स्त्रियं रक्तभवोऽभ्युपैति ॥ च. चि. ५–१८

– शोणितगुल्मस्तु खलु स्त्रिया एव भवति न पुरुषस्य, गर्भकोष्ठार्तवागमनवैशेष्यात् । पारतन्त्र्यादवैशारद्यात् सततमुपचारानुरोधाद्वा वेगानुदीर्णानुपरुन्धत्या आमगर्भे वाऽप्यचिरपतितेऽथवाऽप्यचिरप्रजाताया ऋतौ वा वातप्रकोपणान्यासेवमानायाः क्षिप्रं वातः प्रकोपमापद्यते । च. चि. अ. ३–१३

करतो. हे संचित रज गुल्म उत्पन्न करते वा त्याचे पोषण करते. त्यामुळे कुक्षिभाग मोठा होत जातो. ( लौकिकामध्ये कुक्षी हा शब्द अधोदर व तत्सन्निध उभयपार्श्व या अर्थाने वापरला जातो; तोच भाग येथे अभिप्रेत आहे. ) योनिदोषामुळे आमगर्भावस्थेतच गर्भवैगुण्यानेही गुल्म बनतो. जे कारण घडले असेल त्या कारणानुरूप स्वरूप विविध असते.

योनिदोषाने आमगर्भ नाहीसा होऊन दुष्ट दोषाने बुद्बुदाकृती गुल्म वाढत जातो. जल-बुद्बुदाची उपमा यामुळेच उपलक्षणाने गुल्मास दिली असावी.




आ. १८ :
१. अंतःफलवाहिनी. २. गर्भाशय. ३. गुल्म.

**लक्षणे :**

गुल्म उत्पन्न झाल्यानंतर त्या स्त्रीला शूल, कास, द्रवमलप्रवृत्ती, छर्दी, अरुची, अन्न न पचणे, अंगमर्द, निद्रा, आलस्य, गारठा वाटणे, तोंडास पाणी सुटणे अशी लक्षणे उत्पन्न होतात. स्तनांमध्ये दूध उत्पन्न होते, ओठ आणि स्तनमंडले यावर काळसर छटा येते. डोळे अगदी पेंगुळतात. मूर्च्छा येते, मळमळते, डोहाळे लागल्यासारखे वाटते, पायावर सूज येते, भगास्थीपासून नाभीपर्यंत असलेल्या लवयुक्त रोमराजींचा

— स प्रकुपितो योनिमुखमनुप्रविश्यार्तवमुपरुणद्धि, मासि मासि तदार्तवमुरुध्यमानं कुक्षिमभिवर्धयति । तस्याः शूलकासातिसारच्छर्द्यरोचकाविपाकाङ्गमर्दनिद्रालस्यस्तैमित्यकफप्रसेकाः समुपजायन्ते स्तनयोश्च स्तन्यम्, ओष्ठयोः स्तनमंडलयोश्च कार्ष्ण्यम् अत्यर्थं ग्लानिश्चक्षुषोः, मूर्च्छा, हृल्लासः, दोहदः, श्वयथुश्च पादयोः, ईषच्चोद्गमो रोमराज्याः, योन्याश्चाटालत्वम्, अपि च योन्या दौर्गन्ध्यमास्रावश्चोपजायते, केवलश्चास्या गुल्मः पिण्डितः एव स्पन्दते, तामगर्भां गर्भिणीमित्याहुर्मूढाः । च. नि. अ. ३–१४.



काळसरपणा वाढून ती स्पष्ट होते व किंचित रुंदावते. योनीतून थोडे थोडे दुर्गंधी स्रावही येतात. गुल्म सबंध गोळाच्या गोळा असा स्फुरण पावतो. अशा स्थितीत अज्ञानी लोक तिला गर्भिणी असे मानतात. वास्तविक ही लक्षणे गुल्मामुळे असतात, गर्भामुळे नसतात. मग स्तनामध्ये दूध कसे उत्पन्न होते अशी शंका येईल. त्यावर टीकाकाराने केलेले विवरण स्पष्टीकरण करणारे आहे. स्त्रियांच्या ठिकाणी सगर्भावस्थेत रस तीन प्रकारची कार्ये करतो. त्या स्त्रीच्या शरीराचे पोषण, स्तन्याचे पोषण, व गर्भाचे पोषण. रजस्राव प्रतिहत झाला की स्तन्यपोषणाच्या क्रियेस प्रेरणा मिळते आणि दुसरीकडे गर्भाचे पोषण होऊ लागते. येथेही रजःस्राव प्रतिहत होतोच; पण त्याचे कारण गर्भ नसून गुल्म असतो. त्यामुळे स्तन्याच्या पोषणाची प्रवृत्ती होते आणि उरलेल्या अंशाने गर्भाऐवजी गुल्म पोसला जातो. रजःप्रवृत्तीचा अभाव आणि उदरात जाणवणारी गुल्माची वाढ यामुळे आपण गर्भिणी आहो असे स्त्रीस वाटते आणि त्याचा परिणाम म्हणून तिला डोहाळे लागतात.




आ. १९ : गर्भाशयसंबंधित गुल्म
१–२ गुल्म. ३ गर्भाशय.

— शोणितगुल्मः स्त्रिया एवेति वचनादेव न पुरुषस्येति वचनं स्पष्टार्थम् । गर्भार्थः कोष्ठोगर्भकोष्ठस्तस्मिन् गर्भकोष्ठे य आर्तवस्यागमनरूपो विशेषो रक्तगुल्मकारणं स स्त्रिया एव भवति; तेनैवंरूप आर्तवप्रतिबन्धजन्यः शोणितगुल्मः पुरुषस्य न भवति सामान्यशोणितदुष्टिजन्यस्तु पुरुषस्यापि भवतिः तथाहि वक्ष्यति— —" कफो वाते जितप्राये पित्तं शोणितमेव च । यदि कुप्यति वा तस्य क्रियमाणे




आ. २० : गर्भाशयसंबंधित गुल्म
१, २. गुल्म. ३. गर्भाशय.

चिकित्सिते ( चि. अ. ५ ) इत्यादी; तथा 'गुल्मोपकुशवीसर्प' (सू. अ. २४) इत्यादयो 'रक्तजा गदाः' इत्युक्तम् । पारतंत्र्यादिहेतुत्रयं वेगविधारणे, पारतन्त्र्यादेव स्त्रियो वेगं विधारयन्ति । अवैशारद्यम् अज्ञानं; तेन, वेगविधारणेन महान् व्याधिर्भवतीत्यज्ञानाद्वेगं विधारयन्ति । उपचारानुरोधादिति भर्त्राद्युपचार-परत्वात् । योनिमुखमिति गर्भाशयद्वारम् । स्तनयोः स्तन्यमिति रोगप्रभावादेव बोद्धव्यम् । आर्तवरोधलक्षणस्य व्याधेरयं प्रभावो यत् स्तन्यं करोति, दृष्टत्वात् । तेन, यदुच्यते—"त्रिधा ह्यापन्नसत्त्वायास्त्रिधा रसः संपद्यते—स्वशरीरपुष्टये, स्तन्याय, गर्भाभिवृद्धये च" (शा. अ. ६) इति वचनाद् गर्भ एवं स्तन्यं भवति "तन्निरस्तं मन्तव्यम् । दोहदशब्देनेह नार्या उच्चावचभावतृष्णायोगो दोहदाभि-धानो ज्ञेयः । यदुक्तं क्षारपाणिना – "दोहदिनी वा स्यान्नारी शोणितगुल्मिनी" इति । न त्विह द्वैहृद्यकृतो दोहदोऽभिप्रेतः, स हि गर्भहृदयस्य मातृहृदयेन संबंधा-द्भवति; वचनं हि – "मातृजं ह्यस्य हृदयं तदस्य मातृहृदयेन संबद्धं भवति रसवाहिनीभिः संवाहिनीभिः; तस्मात्तयोस्ताभिर्भक्तिः संपद्यते (शा. अ. ४) इति; शोणितगुल्मे च चेतना नास्ति, तेन नैवंरूपमिह द्वैहृद्यं दोहृदम् । तेन






आ. २१ : गर्भाशयसंबंमित गुल्म
१. गुल्म. २ गर्भाशय.

गर्भभ्रान्त्या यत्किंचिदभ्यवहारेच्छादिलक्षणं दोहदं तस्या भवति, असत्यपि विषसंबन्धे तथा शङ्काविषाद्विषलिङ्गानि भवन्ति; वचनं हि – "शङ्काविशेषणो-पहताः कुर्वन्ति विषलक्षणम्" इति । आटालत्वं विस्तृतत्वं; योनिविस्तारेण च रोमराज्या अपि विस्तरणं वितन्यमानचर्मरोम्णा चैवोपमन्नम् । केवलः स्पन्दत इति नैकदेशेन; गर्भो ह्येकदेशेनापि स्पन्दते तेनैतल्लक्षणं गर्भशङ्काव्यावर्तकम् । ननु यदुक्तं रक्तगुल्मे – "समगर्भलिङ्गः" इति ।, तथा "मासे व्यतीते दशमे चिकित्स्यः" (चि. अ. ५) इति, तदनुपपन्नं यतो गर्भाद्विशिष्टं पिण्डित स्पंदनं विद्यत एव तथा नवत्वं सुखसाध्यता हेतुत्वेनोक्तम् इह च कथं कालातिक्रमेणोप-क्रमणीयत्वमुच्यते ? ब्रूमः – समगर्भलिङ्गत्वं तावद्भूरिगर्भसमलिङ्गताभिप्राये-णोक्तं; किंवा, समस्यावैकारिकस्य दशमासिकपर्यन्तस्य गर्भस्य लिङ्गानि यस्य स समगर्भलिङ्गः, तेन वैकारिकसुप्तनागोदरादेर्लक्षणं नेह भवतीति दर्शयति । दशमासचिकित्स्यत्वं चेह व्याधिमहिम्ना बोद्धव्यं, दशममास एवायं शिथिलीभूतः सन् चिकित्स्यो भवतीति व्याधिप्रभावः द्रष्टा । च व्याधिप्रभावकृता कालापेक्षा – "ज्वरे पेयाः कषायाश्च सर्पिः क्षीरं विरेचनम् । षडहे षडहे देयम्" इत्यादिषु ।

माधव निदानकाराने 'पैत्तस्य लिङ्गेन समानलिङ्गः' असे म्हणून रक्तगुल्मात ही पित्तजगुल्माची लक्षणे अधिक घ्यावयास सांगितली आहेत.

रक्तगुल्म स्वतंत्र जसा होतो तसा वातला योनिव्यापत्मध्ये उपद्रव म्हणूनही होतो. वाग्भटाने यासाठीच गुल्मंक्रमेणच ( वा. उ. ३३।३० ) असे वर्णन वातज योनीच्या प्रकरणात केले आहे.

काश्यपसंहितेत याच रक्तगुल्मप्रकरणी एक संपूर्ण अभ्यास दिलेला आहे. त्यामधील वर्णन सांगोपांग, सविस्तर व मार्मिक असल्यामुळे तो सर्व अध्याय थोडीशी पुनरुक्ती वाटली तरी आम्ही येथे अर्थासह उद्घृत करीत आहेत. रक्तगुल्माची कल्पना त्यावरून फारच चांगली येते.

[ का. खिलस्थान अ. ९, रक्तगुल्म विनिश्चय पृ. २८६ ते २९२ ]

¹भार्गवाने सर्वशास्त्रविद् असे आपले गुरू कश्यप यांना रक्तगुल्मासंबंधी प्रश्न

---

यत्तु समगर्भलिङ्गत्वेन गर्भशङ्कानिरासार्थं रक्तगुल्मस्य दशममासापेक्षणं; तन्न, दशममासादर्वागपि पिण्डित स्पन्दनेन रक्तगुल्मस्यावधारणात्, तथा दशममासादर्वागपि पिण्डित स्पन्दनेन रक्तगुल्मस्यावधारणात्, तथा दशममासादूर्ध्वमपि गर्भावस्थानस्य दृष्टत्वेन गर्भशङ्कानपगमाच्चः वक्ष्यति हि दशममासादूर्ध्वमवस्थानं-गर्भस्य – " वैकारिकमत उर्ध्वमवस्थानं " (च. शा. अ. ४) इति ।। – टीका

– उक्तविशेषणैरेव स्त्रीभवत्वेलब्धे स्त्रीग्रहणेन कुमारीं अतिवृद्धां च निषेधयति । अनुद्भूतक्षीणरजस्कत्वात् तयोः । मा. नि. गुल्म प्र. १६ टीका

– नवप्रसूताऽहितभोजना या या चामगर्भं विसृजेद्दतौ वा ।
वायुर्हि तस्याः परिगृह्य रक्तं करोति गुल्मं सरुजं सदाहम् ।।
पैत्तस्य लिङ्गेन समानलिङ्गं विशेषणं चाप्यपरं निबोध ।
न स्पन्दते नोदरमेति वृद्धिं भवन्ति लिङ्गानि च गर्भिणीनाम् ।।
तं गर्भकालातिगमे चिकित्स्यमसृग्भवं गुल्ममुशन्ति तज्ज्ञाः ।।
सु. उ. ३ अ. ४२–१४–१५

ज्वरःपिपासाःवदनाङ्गरागः, शूलं महज्जीर्यति भोजने च ।
स्वेदो विदाहो व्रणवत्च गुल्मः स्पर्शासहः पैत्तिकगुल्मरूपम् ।।
मा. नि. गुल्म प्र. १०

१ भगवंतमृषिश्रेष्ठं सर्वशास्त्रविदावरम् ।
कश्यपं भार्गवो धीमान् पर्यपृच्छत् प्रजापतिम् ।।
रक्तगुल्मः कथं स्त्रीणां जायते दुरुपद्रवः ।
अथ कस्मात् कुमाराणां कन्यायां च न जायते ।।
–का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय



विचारले की, महाराज, अतिशय पीडाकर अशा लक्षणांनी युक्त असा रक्तगुल्म स्त्रियांना का होतो ? कुमारांना व लहान मुलींना तो का होत नाही ? त्याला रक्तगुल्म असे नाव का पडले ? वास्तविक त्यात जीव नसताना तो सजीव गर्भासारखी हालचाल कशी करतो ? चेतन गर्भ व अचेतन गुल्म यांत तसे फारसे अंतर असत नाही. काही तर या दोन्हींत भेद नाहीच असे मानतात. पण काही लक्षणांच्यामुळे त्यांच्यामध्ये विशेष आहे असेही मानतात. दोन्हींतील विशेष जर जाणवत असेल तर मग गुल्माची कल्पना आधी येते असे होईल. मग दहा महिने त्याची उपेक्षा का केली जाते ? गर्भधारणा झाली म्हणजे त्यामुळे डोहाळे सांगणे, स्तनामध्ये दूध उत्पन्न होणे, मुखाला चिकटपणा येणे ही लक्षणे उत्पन्न होतात व ते योग्यही आहे. परंतु रक्तगुल्मामध्येही हीच लक्षणे दिसतात. ते योग्य कसे ? रक्तगुल्म दहा महिनेपर्यंत पाक न होता राहतो. एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ या महिन्यांमध्ये त्याचा भेद होत नाही; अगदी गर्भासारखाच टिकून राहतो. हे कसे ? स्त्रिया ह्या सुकुमार असतात, त्यांच्यामागे ही पीडा उगीचच लागली आहे, याची चिकित्सा तरी कशी करावयाची ? कोणते उपचार यासाठी करावेत ? यांच्या काही अवस्था आहेत का ? व त्या अवस्थेनुरूप काही विशेष

---

रक्तगुल्मः कथं चासौ रक्तगुल्म इति स्मृतः ।
कस्मान्निश्चेतनत्वेऽपि गर्भचेष्टा त्रिचेष्टते ।।
दूरान्तरं न त्वनयोश्चेतनाचेतनावतोः ।
विप्रकृष्टान्तरेऽप्यस्मिन् गर्भशोणितगुल्मयोः ।।
केचित् विशेषं नेच्छन्ति केचिदिच्छन्ति लिङ्गतः ।
तयोर्दिशेषोयद्यस्ति किमर्थं स उपेक्षते ।।
युक्तो गर्भे दोहदस्य क्षीरस्य च समुद्भवः ।
आपाण्डुगण्डतादीनां लिङ्गानां च समुद्भवः ।।
न युक्तमिव पश्यामि तस्मिन्नेषाम् समुद्भवम् ।
रक्तगुल्मेऽथ दृश्यन्ते लिङ्गान्येतानि तत् कथम् ।।
कस्मादादशमान्मासात् परीपाकं नियच्छति ।
एकद्वित्रिचतुष्पंचषट्सप्ताष्टनवादिषु ।।
मासेषु भेदं नाप्नोति प्रायो गर्भवदास्थितः ।
नारीणां सुकुमारीणां सकष्ट इति मे मतिः ।।
उपक्रम्यः कथमयं कश्चास्योपक्रमः स्मृतः ।
कस्यां कस्यामवस्थायां का का वाऽस्यावचारणा ।।
कस्मिन् काले च निर्भेद्यो भेदनीयं च किं भवेत् ।
विनिर्भिन्ने च किं कार्यमेतदाचक्ष्व मे विभो ।।
का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

चिकित्सा करावी लागते का ? त्याचे भेदन केव्हा करावे ? कशाने करावे ? आणि भेदन झाल्यावर मागून कोणते उपचार करावेत हे सर्व मला कृपा करून सविस्तर सांगा.

[1]असे प्रश्न बुद्धिमान शिष्याने विचारल्यानंतर वक्त्यांमध्ये श्रेष्ठ असे भगवान कश्यप म्हणाले, 'रक्तगुल्म स्त्रियांनाच होतो. कुमारांना वा लहान मुलींना होत नाही याचे कारण तुला पूर्णपणे व सविस्तर सांगतो, ऐक.'

पुरीष, मूत्र, कृमी (?), पक्व, आम, कफ, वात यांचे सात आशय मानवी शरीरामध्ये कोष्ठात असतात. याव्यतिरिक्त स्त्रियांच्यामध्ये गर्भाशय नावाचा आठवा आशय जास्त असतो. या गर्भाशयात रजोवह सिरा असतात व त्या रज उत्पन्न करतात. ते पाळीच्या वेळी प्रत्येक महिन्यात बाहेर स्रवते. विकृतीमध्ये हेच गर्भाशयामध्ये (गुल्मरूपाने) संचित होत जाते. या कारणाने रक्तगुल्म हा केवळ स्त्रियांच्यामध्येच होतो. पुरुषांच्यामध्ये गर्भाशय आणि त्यातील रजोवह सिरा यांचा अभाव असल्यामुळे रक्तगुल्म पुरुषांना कधीही होत नाही; बालिकेचा योनिमार्ग हा लहान असतो. त्यामुळे रजोत्पत्तीही नसते. रक्त सर्व शरीरभर पसरून असते. पण शरीराची वाढ पूर्ण झाली म्हणजे रक्त योनिमार्गातही येते. त्यामुळे वयात आलेल्या स्त्रीमध्येच रक्तगुल्म होतो.

[2]स्त्रीशरीरातील रक्ताचा काही भाग गर्भाचे पोषण करतो, काही भाग स्तन्याचे

१ इति पृष्टः सशिष्येण प्रोवाच वदतां वरः ।
रक्तगुल्मस्तु नारीणां जायते येन हेतुना ॥
येन चैव कुमाराणां कन्यानां च न जायते ।
तत्सर्वमभिधास्यामि विस्तारेण निबोध मे ॥
विण्मूत्रकृमिपक्वामकफवाताशयाः पृथक् ।
सप्तैते देहिनां कोष्ठे स्त्रीणां गर्भाशयोऽष्टमः ॥
रजोवहाः सिरा यस्मिन् रजः प्रतिसृजन्त्यतः ।
पुष्पभूतं हि तत् दैवान् मासि मासि प्रवर्तते ॥
विपर्ययात् तदेवेह तत्रैव तु निचीयते ।
अनेन हेतुना स्त्रीणां रक्तगुल्मो हि जायते ॥
... ... ... ... ... ...
तदाशयस्य चाभावात् पुरुषाणां न जायते ॥
हीनयोन्यास्तु बालायाः कायं गच्छति शोणितम् ।
अथ पूर्णस्वभावायाः कायं योनिं च गच्छति ॥
का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्म विनिश्चय

२ गर्भमङ्गं भावयति, किंचित् स्तन्याय कल्पते ।
पक्तये शोणिताद्य(दे)स्तु शेषः कायं समन्वति ॥
तथैव गर्भः सूतायाः सद्यः स्तन्याय कल्पते ।
शेषं तु रुधिरीभूतं कायं योनिं च सर्पति ॥



पोषण करतो, आणि काहींच्या शरीरामध्ये पचन होते. अर्थात शरीरपोषणास सहाय्य होते. गर्भाच्या प्रसवानंतर गर्भाकरिता कामी येणारा भागही लगेच स्तन्याच्या उत्पत्तीस कारण होतो. म्हणून सूतिकेमध्ये दूध वाढते, व बाकीचे रक्त योनीमध्ये व शरीरामध्ये फिरत राहते. शरीर समस्थितीत आले (सगर्भावस्थेमध्ये क्षीण झालेले) धातू पुनः पूर्ण झाले म्हणजे योनिमार्गामध्ये पुनः रक्तसंचय होऊ लागतो व योग्य वेळी त्याचा स्रावही होतो. ह्या रक्तवह सिरा दोषांनी व्यापिल्या गेल्या म्हणजे त्यांतून संचित स्रवणारे रक्त विमार्गग होते. त्यामुळे अनेक व्याधी उत्पन्न होतात. रक्तगुल्मही याच कारणाने उत्पन्न होऊ शकतो. त्याची विशेष कारणे सांगतो.

[1]ऋतुमती स्त्री उत्पन्न झालेल्या वेगांचे धारण करील तर वायूचा प्रकोप होतो. मग हे वेगविधारण लाजेमुळे असो, भयामुळे असो वा मैथुनात गुंतल्यामुळे असो. अधोभागी बहिर्गम करणारे वेग उद्वृत्त झाले की त्यांनी वातप्रकोप स्वाभाविक आहे. हा प्रकुपित वायू रजोवह सिरामध्ये स्थानसंश्रय करून गर्भाशयामध्येच रक्त संचित करतो.

गर्भस्राव झालेली स्त्री जर मिथ्या आहार-विहार करील तरीही वायू प्रकुपित होऊन प्रतिलोम होतो व रक्तासह गर्भाशयाचा मार्ग रुद्ध करतो. रक्त हे वायूचे आवरण करते, वायूची गती विषम होते, रजोवह स्रोतस् दूषित होऊन रज स्तंभित होते व गर्भाप्रमाणे आकार घेते. हा गर्भाकार म्हणजेच गुल्म. तो वायूच्या प्रेरणेने स्पंदन पावतो व जी लक्षणे उत्पन्न करतो ती सर्व आता सांगतो.

धातुषु प्रतिपूर्णेषु शरीरे समवस्थिते ।
संचितं रुधिरं योनिः पुनः कालेन मुञ्चति ॥
यदा रक्तवहा रक्तं प्रदोषान्नानुपद्यते ।
विमार्गाद्योनिमन्वेति ( विकृति ) स्तेन जायते ॥
तथैव रक्तगुल्मोऽपि हेतुनाऽनेन जायते । का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

१ यदा ऋतुमती नारी प्राप्तान् वेगान् विधारयेत् ।
ह्रिया त्रासाद्व्यवायाद्वा वर्तमानानधोगतान् ॥
एवमादिभिरप्यन्यैरुदावृत्तैः प्रकोपितः ॥
वायुः शोणितमादाय प्रतिस्रोतः प्रपद्यते ।
गर्भाशयमुदावृत्तस्तस्या वहति शोणितम् ॥
मारुतश्च्युतगर्भाया यदा मिथ्योपचर्यते ।
तस्याः स वायुरुद्वृत्तः प्रतिघातात् सशोणितः ॥
गत्वा गर्भाशयं रुद्धः स्थिरत्वमुपपद्यते ।
संवृतं शोणितं तत्र मारुतो विषमं गतः ॥
रजोवहाः समावृत्तः संस्तम्भयति गर्भवत् ।
स गुल्मः स्पन्दतेऽभीक्ष्णं मारुतेन समीरितः ॥
दर्शयन् यानि रूपाणि तानि वक्ष्यामि सर्वशः ॥
का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

[१]या गुल्मामुळे कास, शूल, ज्वर, द्रवमलप्रवृत्ती, शरीर जड होणे, मूर्च्छा, अंधारी, कृशता, छर्दी, अरुची ही लक्षणे उत्पन्न होतात.

उदरामध्ये गाठ वाढू लागते. नाभीपासून दिसणारी लोमराजी नीलकृष्ण वर्णाची होऊन वाढते. ओष्ठ, स्तनमंडळ काळसर होतात, स्तन स्रवू लागतात, डोहाळे लागतात, निरनिराळ्या रसांचे पदार्थ खावेसे वाटतात. तोंडास पाणी सुटते. सुगंध नकोसे होतात. वर्ण उजळतो. अशी गर्भिणीसारखी अनेक लक्षणे दिसू लागल्यामुळे हा खरोखरीच गर्भ आहे असे वाटते आणि स्त्रिया वर्षानुवर्षे त्याची पीडा सहन करतात.

[२]काही कालाने जर गुल्म फुटला तर गुल्म नाहीसा झालेल्या त्या स्त्रीचा पुष्कळ कालानंतर गर्भस्राव झाला असे लोकांना वाटते. पण इतक्या दिवसांनंतरही स्रावामध्ये गर्भाचे रूप न आढळल्याने पाहणारे शंकाकुल होतात. त्यांना आश्चर्य वाटते आणि

---

१ कासते शूल्यते चैव ज्वर्यतेऽथातिसार्यते ।
मन्यते सर्वगात्राणि मूर्च्छितानि गुरूणि च ।।
तमोऽस्या जायतेऽभीक्ष्णं कार्श्यं चैव निगच्छति ।
वमत्यभीक्ष्णशो भुक्तमन्नं चास्यै न रोचते ।।
जायन्ते चोदरे गण्डा नीलं चास्या प्रदृश्यते ।
स्तनान्तरं च नाभिश्च लोमराजी च मूर्च्छिताः ।।
ओष्ठौ च कृष्णौ भवतस्तथैव स्तनचूचुकौ ।
पयोधरौ प्रसिच्येते दोहदं च निगच्छति ।।
नानारसान् प्रार्थयते निष्ठीवति मुहुर्मुहुः ।
शुभादुद्विजते गंधाद्वर्णश्चास्याः प्रसीदति ।।
गर्भिण्या यानि रूपाणि तानि संदृश्य तत्त्वतः ।
वर्षाणि हरति व्याधिं गर्भोऽयमिति दुःखिता ।।

का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

२ केनचित्त्वथ कालेन निर्भेदं यदि गच्छति ।।
ततो गुल्मप्रमुक्ता सा ज्ञातिमध्ये प्रभाषते ।
गर्भिण्यहं चिरं भूत्वा प्रच्युते गर्भशोणिते ।।
गर्भरूपं न पश्यामि तत्र मे संशयो महान् ।
तामिदं प्रतिभाषन्ते सर्वग्रामकुतूहलाम् ।।
दिव्यो गर्भो व्यतिक्रान्तो नैगमेषेण ते हृतः ।
इत्येनामबुधाः प्राहुर्हृतं सर्वमशोभनम् ।।
परिप्लुत इति प्राहुः कुशला ये मनीषिणः ।
गुल्मश्चय इति प्रोक्तो रक्तं रुधिरमुच्यते ।।



मग हा गर्भ काही निराळाच होता, अलौकिक होता आणि त्याचे ‘ नैगमेषाने ’ हरण केले, बरे झाले; सर्व अमंगळ दूर पळाले अशी अज्ञानी लोकांच्यामध्ये समजूत असते. पण जे जाणते आहेत ते मात्र हा गर्भ नसून ‘ परिप्लुत ’ आहे असे ओळखतात. ( परिप्लुत = स्रवून जाण्यास योग्य असा न टिकणारा पदार्थ. ) गुल्म म्हणजे चय साचणे. रक्त साचते म्हणून याला रक्तगुल्म म्हणतात. हा हालचाल करतो, एवढेच त्याचे गर्भाशी सादृश्य. पण याची हालचाल गर्भाच्या हालचालीसारखी नसते.

[१]गर्भ राहावा अशी इच्छा करणारी स्त्री आपल्याला गर्भ राहिला आहेच असे समजते आणि त्यामुळे मग ती गर्भिणीसारखी वागू लागते. तिला जे डोहाळे लागतात असे वाटते त्यालाही एक कारण आहे. जे रस बहुधा धातूंच्या वाढीस कारणीभूत असतात त्या त्या रसांची अभिलाषा ( धातू क्षीण झाले म्हणजे ) उत्पन्न होते. कारण समानगुणधर्मांची द्रव्ये धातूंच्या उत्पत्तीस हेतू असतात. वातपित्ताने दुष्ट झालेले रक्त संचित होऊ लागले की विकृती करते; आणि कटू, अम्ल, लवण रसांची इच्छा होते. या इच्छेलाच डोहाळे असे मानले जाते. आपण गर्भिणी झालो, या आनंदात प्रेमातिशयाने तिच्या स्तनामध्ये दूधही उत्पन्न होते.

[२]रसवह स्रोतसे नाभीच्या अवतीभोवती पुष्कळच आहेत. गर्भ वाढू लागला की त्याचा भार या स्रोतसांवर पडतो. रक्तगुल्महो वाढू लागला की गर्भाप्रमाणेच याचाही

---

रक्तस्य संचयस्तेन रक्तगुल्म इति स्मृतः ।
गर्भवच्चेष्टते नायं किन्तु सादृश्यदर्शनात् ।।

का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

१ गर्भोऽयमिति मन्वाना मनसा तद्विभाविनी ।
नारी विचेष्टते तास्ता गर्भचेष्टाः पृथग्विधाः ।।
दोहदं यत् करोतीऽति शृणु तत्रापि कारणम् ।
य एव हि रसाः प्रायो धातूनां वृद्धिहेतवः ।।
तेषामेवाभिलाषः स्याद्योनिसाधर्म्यतत्त्वतः ।
वातपित्तान्वितं रक्तं चीयमानं विकारवत् ।।
कट्वम्ललवणादीनां रसानां वृद्धिमावहेत् ।
गमिष्यस्मीति तत्प्रीतिप्रीमसकल्पसंभृतः ।।
प्रसूतो जायते नार्यास्तेन स्तन्यं प्रवर्तते ।

का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

२ सर्वा रसवहा नाड्या समंतान्नाभिमाश्रिताः ।
गर्भो विवर्धमानश्च संपीडयति ताः स्त्रियाः ।
तद्वच्च रक्तगुल्मोऽपि पीडयन्नुपचीयते ।।

भार त्या रसवह स्रोतसांवर येतो. ही स्रोतसे या भाराने दाबली गेली की रस सहजपणाने वाहू शकत नाही. त्यामुळे मुखाला फिकटपणा येतो.

[1]हा गुल्म दीर्घकालपर्यंत वाढत का राहतो याचे कारण सांगतो. पोटात काही तरी वाढते आहे या संवेदनेने हा गर्भ आहे असा भ्रम उत्पन्न होतो आणि त्यामुळे कोंबडी ज्याप्रमाणे आपल्या अंड्यास जपते, त्याच्यावर कशाचाही आघात होणार नाही अशा रीतीने त्याचे संरक्षण करते त्याप्रमाणे स्त्री गर्भाला (खोटया कल्पनेतील) जपते. त्याला अपाय होईल असे काहीही करीत नाही. उपवास वा श्रम करीत नाही. तीक्ष्ण, उष्ण, क्षारयुक्त ( खारट ) असे पदार्थ खात नाही आणि त्यामुळे गुल्माचे चांगले यापन होते व तो वाढतो. जर त्याचा उपघात करणारी कारणे घडली तर त्याप्रमाणे उशिरा किंवा लवकर त्याचा भेद होतो व खाली फुटलेल्या पाण्याच्या डेऱ्याप्रमाणे सर्व ( संचित रक्त ) वाहून जाते. काही लोक-फळे जशी योग्य काली पिकतात त्याप्रमाणे गुल्माचाही दहाव्या महिन्यात पाक होतो असे मानतात. अर्थात या वेळी या व्याधीची चिकित्सा करणे फारसे अवघड असत नाही; म्हणून त्या वेळीच जाणते लोक त्यावर उपचार करतात. योग्य काल आला नाही तोवर गर्भासारखेच याचेही यापन करावे, (गर्भाप्रमाणे हाही याप्य मानावा.)

ताभिश्च पीड्यमानाभिर्न सम्यग् वर्तते रसः ।
आपाण्डु गण्डतादीनि लक्षणानि भवन्त्यतः ।।

का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

१ कथं प्रकर्षते कालमिति तत्रापि मे शृणु ।
विवृद्धेरिह सारूप्याद् गर्भोऽयमिति निश्चिता ।।
संरक्ष्यतेऽभिघातेभ्यः कुक्कुटचण्डमिवागता ।
तदपायकरान् हेतून्न कथंचन सेवते ।।
श्रमोपवासतीक्ष्णोष्णक्षारादीनि च सर्वशः ।
स एवं याप्यमानस्तु यथाकालं प्रकर्षते ।।
व्यापत्तिहेतुमासाद्य कालेनाल्पेन वा पुनः ।
भेदं गच्छत्यधस्ताद्धि जलकुंभ इव क्षतः ।।
केचिदिच्छन्ति गुल्मस्य मासादादशमात् परम् ।
परिपाकं फलस्येव स्वकालपरिणामतः ।।
तस्मिंश्च काले स व्याधिः स्यान्नातिदुरुपक्रमः ।
तत्रोपक्रममिच्छन्ति तस्य कर्तुमतो बुधाः ।।
अप्राप्तकालो याप्यः स्याद् गर्भवद्युक्तिकोविदैः ।
नापक्वो भिद्यते व्याधिरिति मत्त्वा यथाभवम् ।।

**का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय**



असे तज्ज्ञांनी ठरविलेले आहे व ते योग्यही आहे. नाही तरी पाक झाल्यावाचून भेद करीत नाहीतच.

## [1]गर्भ व गुल्म यांचे व्यवच्छेदक निदान :

आता तुला रक्तगुल्म व गर्भ यांमध्ये काय अंतर आहे हे सांगतो. गर्भाला अंगप्रत्यंग असतात आणि त्यांची वेगवेगळी हालचाल होत असते. गुल्म हा वाटोळा असतो व एखाद्या गोळ्याप्रमाणे सबंधच्या सबंध हालतो. गर्भ हा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे फिरतो आणि त्याचे हे फिरणे त्या त्या स्थानी घुसल्यासारखे जाणवते ( व्याविद्ध इव ). गुल्म हा बहुधा नाभीच्या खालीच राहतो आणि फिरला तरी घुसल्यासारखे वाटत नाही. गर्भाच्या वाढीमध्ये एक क्रम आहे; व दिवसेंदिवस त्याप्रमाणेच त्याची सतत सारखी वाढ होत असते. गुल्म याच्या अगदी विपरीत आहे. त्याची वाढ विषम व थांबून थांबून होते. गर्भाला मासानुमासिक अवस्था नेमकी प्राप्त होते; ( तर गुल्माचे तसे नसते. ).

[2]ज्या वेळी गर्भ गर्भाशयात वाढत असतो त्या वेळी गर्भाबरोबर गर्भाशयही ( योग्य त्या प्रमाणात ) वाढत असतो. तर गुल्म गर्भाशयात वाढत असताना गर्भाशय न वाढता फक्त गुल्मच वाढतो.

गर्भिणीला कारणावाचून ज्वर येत नाही वा दाह होत नाही, गुल्मिनीला मात्र

१ विशेषं रक्तगुल्मस्य गर्भस्य च निबोध मे ।
अंगप्रत्यंगवान् गर्भस्तैरेव च निचेष्टते ।
स्थानात् स्थानम् व्रजन् गर्भो व्याविद्धं परिवर्तते ।।
नाभेरधस्ताद् गुल्मोऽयमव्याविद्धं विवर्तते ।
आनुपूर्वेण गर्भश्च अहन्यहनि वर्धते ।।
विपरीतं हि गुल्मस्तु मंदं मंदं विवर्धते ।
तां तामवस्थां गर्भस्तु मासि मासि प्रपद्यते ।।
गर्भिणीनानिमित्तं च ज्वर्यते दह्यतेऽपि वा ।
गुल्मिणी ह्यनिमित्तं तु ज्वर्यते दह्यतेऽपि वा ।।
अस्मिन् विशेषेऽपि सति संदेहो जायते महान् ।
नानागर्भविकाराणां संकराद्भिषजे मतः ।।

का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

२ न चास्या वर्धते कुक्षिः गुल्म एव तु वर्धते तथा ।
गर्भेऽन्तःस्थिते कुक्षिरस्या वर्धते ।
गुल्मस्त्वन्तःस्थिते स एव वर्धते गुल्मो, न कुक्षिः ।। वा. नि. ११–५५ सटीक

ज्वर, दाह स्वतंत्र कारणावाचूनही असतो, असे हे गर्भ व गुल्म यांचे विशेष असले तरी प्रत्यक्ष गर्भामुळेच विविध प्रकारची लक्षणे एकमेकांशी मिसळून जातात आणि मग निर्णयाच्या कामी मोठा संदेह उत्पन्न होतो.

कित्येक वेळा गर्भ आणि गुल्म दोन्ही एकत्र असतात आणि या संकरामुळे निर्णय करणे अधिकच कठीण होते.

[1]यासाठी शास्त्रामध्ये निष्णात अशा वैद्यांची सभा भरवावी व त्यांच्याशी पूर्ण-पणे विचारविनिमय करून आम्ही पुढे सांगणार आहोत त्याप्रमाणे चिकित्सा योग्य काळी करावी.




आ. २२ : १. गुल्म. २. गर्भ.

१ संभूय सह संमन्त्र्य भिषग्भिः शास्त्रकोविदैः ।
काले चिकित्सां कुर्वीत यथा वक्षाम्यतः परम् ॥
अल्पान्तरावुभावेतौ गर्भो गुल्मश्च रक्तजः ।
तद्यथावद्विदित्वाऽऽदौ क्रियां कुर्याद्भिषग्वरः ॥
यो हि गुल्मे गर्भ इति गर्भं वा गुल्म इत्यपि ।
क्रियां कुर्यादयशसा एनसा चैव युज्यते ॥
अतस्तु संशये जाते कुर्यात् साधारणीः क्रियाः ।
नोपक्रमेदविदितं रोगं किञ्चिच्चिकित्सकः ॥

का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय



गर्भ आणि गुल्म यांच्या लक्षणांमध्ये अंतर असते ते फारच थोडे; म्हणून चांगल्या वैद्याने त्याचे जसेच्या तसे स्वरूप आधी जाणून घ्यावे आणि मग चिकित्सेस हात घालावा. जो गुल्माला गर्भ व गर्भाला गुल्म समजून उपचार करील, त्याची अपकीर्ती होईल. इतकेच नव्हे तर त्याला पातकही लागेल. यासाठी गर्भ का गुल्म निश्चय होत नाही अशा संशयित स्थितीत विशेष चिकित्सा न करता सामान्य उपचार करावेत. कोणत्याही रोगाचे पूर्ण ज्ञान झाल्याबाचून वैद्याने त्यावर चिकित्सा करू नये.

[1]जर पुरे दिवस भरले नसतील आणि दर्शन (परीक्षा) संदिग्ध असेल तर त्या वेळी काही कारणाने रक्तस्राव होऊ लागल्यास त्याचे निवारण त्वरित करावे. प्रसवकाल पूर्ण झाला असेल तर स्रवणारे रक्त थांबविण्याचे काही कारण नाही. उलट त्या वेळी अनुवासन बस्ती द्यावा व त्या स्त्रीला स्निग्ध व द्रव पदार्थ खावयास द्यावे. या पद्धतीने जर गर्भ असेल तर सुखाने प्रसूती होईल आणि रक्तगुल्म असेल तर त्याचे नीटपणे भेदन होईल. म्हणून योग्य काळी प्रवृत्त होणारा रक्तस्राव वैद्य थांबवीत नाहीत.

[2]रक्तगुल्मामध्ये प्रथमतः युक्तीने स्नेहन करून बाहूमधील सिरांचा वेध करावा; म्हणजे गुल्माचा पाक होत नाही. उरलेले दोष नाहीसे करण्यासाठी संशमन चिकित्सा

१ अथ काले त्वसंपूर्णे संदिग्धे चापि दर्शने ।
हेतुना केनचिद्रक्तं स्रवेत्तं चाशु वारयेत् ॥
पूर्णे प्रसवकाले तु न रक्तं प्रतिवारयेत् ।
तत्रानुवासनं दद्याद् द्रवं स्निग्धं च भोजनम् ॥
विधिनाऽनेन गर्भश्चेत् सुखेन प्रसविष्यति ।
अथवा रक्तगुल्मः स्यात् सोऽप्यकृत्स्नेन भेत्स्यते ॥
एतस्मात् कारणाद्रक्तं प्रवृत्तं न निवार्यते ।

का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

२ रक्तगुल्मे प्रथमतो युक्त्या स्नेहोपपादनम् ।
शस्तं बाहुसिरायाश्च वेधनं पाकवारणम् ।
तथा संशमनीयं च दोषशेषावकर्षणम् ॥
कल्याणकं पञ्चगव्यं षट्पलं तिक्तमेव वा ।
सरुजां पाययेन्नारीं दोषवित् कर्मकोविदः ॥
तीक्ष्णैरास्थापयेदेनां युक्तितश्चानुवासयेत् ।
पथ्यानि भोजयेच्चैव क्षीरयूषरसादिभिः ॥
अन्नपानानि रूक्षाणि विदाहीनि गुरूणि च ।
व्यायामं मैथुनं चिन्तां गुल्मिनी तु विवर्जयेत् ॥

का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

करवी. कल्याणक, पञ्चगव्य षट्पल, किंवा तिक्तक यांसारखी घृते, वेदना व दोष यांचा विचार करून वैद्याने द्यावीत. तीक्ष्ण औषधांचा आस्थापन बस्ती द्यावा, अनुवासन बस्तीही युक्तीने वापरावा. पथ्यकर अशा क्षीरयूष मांसरसाचे भोजन करावे. व्यायाम, मैथुन, चिंता या गोष्टी वर्ज्य कराव्यात.

[1]ज्वर, अरुची, श्वास, कास, कार्श्य, अरती, वेदना, शोथ असे उपद्रव गुल्मात होतात. त्यांची चिकित्सा त्या त्या रोगाप्रमाणे करावी.

[2]जाङ्गल प्राण्यांच्या मांसरसात बेल व टेटू यांचा काढा करून रक्तगुल्मामध्ये द्यावा. त्यामुळे रक्तगुल्म शिथिल होतो. स्थिरगुल्माला स्थानचलित करण्यासाठी कुळथाच्या काढ्यातून वा लावापक्ष्याच्या मांसरसातून त्रिवृत आणि त्रिफळा विरेचनासाठी वापरावा. वायूच्या उपशमनासाठी फलतैलाचे अनुवासन बस्ती द्यावे. शूल आणि आटोप नाहीसा करण्यासाठी याचाच एकदोन वेळा आस्थापन बस्ती द्यावा.

[3]आस्थापन बस्तीसाठी मध, तेल समान मात्रेत घेऊन त्यांच्याइतकेच उष्ण जल घेऊन त्यात दोन तोळे बाळंतशेप व अर्धा तोळा सैन्धव घालावे आणि ते वापरावे. किंवा दशमूलाचा काढा वापरावा.

सिद्ध दूध वा सिद्ध मांसरस वापरून स्त्रीचे बल राखावे.

१ ज्वरारुचिश्वासकासशोषकार्श्यारतिव्यथाः ।
शोफश्चोपद्रवा गुल्मे तांश्चिकित्सेत् स्वभेषजैः ।।
का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

२ बिल्वश्योनाकनिर्यूहे साधितैर्जाङ्गलै रसैः ।
शैथिल्यकरणार्थं च रक्तगुल्मस्य भोजयेत् ।।
यूषेण वा कुलत्थानां लावसंस्कारिकेण वा ।
चालनार्थं विरेकं च त्रिवृत्त्रिफलया पिबेत् ।।
वायोरुपशमार्थं च फलतैलानुवासितम् ।
आस्थापयेत् सकृद् द्विर्वा शूलाटोपनिवृत्तये ।।
का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

३ तुल्यं मधु च तैलं च ताभ्यामुष्णोदकं समम् ।
द्वौ कर्षौ शतपुष्पायाः कर्षार्धं सैन्धवस्य च ।।
एतेनास्थापयेन्नारीं दशमूलादिकेन वा ।
बलं चाप्याययेत्तस्या रसैः क्षीरैश्च संस्कृतैः ।।
का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय



[1]त्यानंतर शोधन-पातन करणाऱ्या औषधांचा उपयोग करावा. त्यासाठी हिरडा, वेखंड, हिंग, सैंधव, अम्लवेतस, ओवा, यवक्षार, यांचे चूर्ण उष्ण पाण्याबरोबर द्यावे.

[2]हिरडा, यवक्षार, बिडलोण हे तीन पदार्थ तुपाबरोबर योग्य मात्रेत सेवन केले असता रक्तगुल्माचा भेद होतो.

तेजपत्र, पिंपळी, सुंठ, यांचे चूर्ण किंवा बिडलोण, सुंठ व शौक्तिक भस्म हे गोमूत्राबरोबर सेवन करावे.

वेलदोडे, शहाजिरे, चवक, पिंपळी, चित्रक यांचा कल्क लव्हाळ्याच्या यूषाबरोबर किंवा मंडाबरोबर ( साळीच्या ) सेवन करावा.

अपरापतनासाठी जी औषधे सांगितली आहेत तीही करावीत, म्हणजे भेदन होते.

[3]रक्त फार गेल्यामुळे जर ग्लानी आली तर, गुल्मदोष नष्ट न झाले वा किंचित शिल्लक राहिले तरी रक्तस्तंभनासाठी विशेष प्रयत्न न करता, आस्थापन चिकित्सा करावी. त्याप्रमाणेच पुन्हा व्याधी उत्पन्न होण्याचे भय राहू नये म्हणून शोधन करावे.

[4]कमळ हे मुळासकट जाळून त्याचे भस्म करावे व ते त्याच्याच क्वाथात घालून घट्ट करावे व त्यात नंतर सुंठ, पिंपळी, कुष्ठ, चव्य, चित्रक, देवदार यांची चूर्णे घालून

१ उपक्रमेत्ततश्चूर्णैरेतैः शोधनपातनैः ।
हरीतकी वचा हिङ्गु सैन्धवं साम्लवेतसम् ।।
का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

२ यवानी यावशूकं च चूर्णमुष्णाम्बुना पिबेत् ।
हरीतकीयवक्षारसौवर्चलमिति त्रयम् ।।
घृतयुक्तं पिबेद्युक्त्या रक्तगुल्मस्य भेदनम् ।
पत्रैलापिप्पलीशुण्ठीचूर्णं वा विडसंयुतम् ।।
नागरं शुक्तिचूर्णं वा पिबेद्गोमूत्रसंप्लुतम् ।
सूक्ष्मैलाकुञ्चिकाचव्यपिप्पलीचित्रकस्य वा ।।
कल्कं बल्वजयूषाद्यैः पिबेन्मण्डोदकेन वा ।
अपरापातनोद्दिष्टैरौषधैश्चापि भेदयत् ।। का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

३ अतिप्रवृत्तं रुधिरं ग्लानिं जनयते यदि ।
विनिर्हृते गुल्मदोषे सावशेषेऽपि वा भिषक् ।।
पुनरास्थापनोक्तेन तत्र कुर्याद्भिषग्जितम् ।
अनुबन्धभयाच्चैव शनैस्तदनुशोधयेत् ।। का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

४ पद्मादीनि समूलानि दग्ध्वा तद्भस्म संहरेत् ।
गाढयित्वा च तत्क्वाथं चूर्णैरेतैर्विपाचयेत् ।।
शुण्ठीपिप्पलिकुष्ठैश्च चव्यचित्रकदारुभिः ।
दर्विप्रलेपितं सिद्धमभ्यसेत्तेन शुद्धयति ।। का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

पळीस चिकटण्याइतके आटवावे. हे औषध सतत घेतले असता दोषांचे पूर्ण शोधन होते.

[1]शिलाजतु आणि अभयारिष्ट यांच्या दीर्घकालीन सेवनाने रुग्णा व्याधिमुक्त होते. इतर गुल्मांवर जी चिकित्सा सांगितली आहे तीही बलाबल पाहून वापरावी.

## रक्तगुल्माची चरकोक्त चिकित्सा :

[2]गर्भकाल संपला म्हणजे मग रक्तगुल्माची चिकित्सा करावी. प्रथम स्नेहस्वेद करून स्नेहविरेचन द्यावे.

[3]पलाशक्षार दोन भाग व तेल-तूप एक एक भाग असे घेऊन (पाणी घालून) शिजवावे व योग्य प्रमाणात सेवन करावे. यामुळे गुल्म शिथिल होतो. या प्रयोगाने जर गुल्माचे भेदन झाले नाही तर योनिविशोधनासाठी पळसाचा क्षार व तिलकल्क, किंवा त्रिधारी निवडुंगाचा चीक असे एकत्र करून योनीत ठेवावे; किंवा पलाश-क्षारजल व त्रिधारी निवडुंगाचा चीक यांनी त्रिकटू चूर्ण व मत्स्यचूर्ण यांना भावना देऊन तो पिंड योनिविशोधनासाठी वापरावा (काहींनी कटुकमत्स्य असा एक शब्द घेऊन मत्स्यजातिविशेष असा त्याचा अर्थ केला आहे).

[4]चिध्यांना (लस्तक) वराह किंवा मत्स्य यांच्या पित्ताची भावना द्यावी किंवा वमनविरेचन करणाऱ्या तीक्ष्ण द्रव्यांची भावना द्यावी व त्यांचा पिचू योनीत ठेवावा.

---

१ शिलाजत्वभयारिष्टं कल्पेनाभ्यस्य मुच्यते ।
यच्चापि पञ्चगुल्मीये चिकित्सितमुदाहृतम् ॥
तदिहापि प्रयोक्तव्यं प्रसमीक्ष्य बलाबलम् ।
इति ह स्माह भगवान् कश्यपः ॥
का. खिलस्थान अ. ९; रक्तगुल्मविनिश्चय

२ रौधिरस्य तु गुल्मस्य गर्भकालव्यतिक्रमे ।
स्निग्धस्विन्नशरीरायै दद्यात्स्नेहविरेचनम् ॥ च. चि. ५–१७२

३ पलाशक्षारपात्रे द्वे द्वे पात्रे तैलसर्पिषोः ।
गुल्मशैथिल्यजननीम् पक्त्वा मात्राम् प्रयोजयेत् ॥
प्रभिद्येत न यद्येवं दद्याद्योनिविशोधनम् ।
क्षारेण युक्तं पललं सुधाक्षीरेण वा पुनः ॥
आभ्यां वा भावितान् दद्याद्योनौ कटुकमत्स्यकान् ।

४ वराहमत्स्यपित्ताभ्याम् लक्तकान् वा सुभावितान् ॥
अधोहरैश्चोर्ध्वं हरैर्भावितान् वा समाक्षिकैः ।



[1]मद्य, गूळ, लालाशक्षार, मद्यातील गाळ हे एकत्र करून त्यांचा पिचू योनि-विशोधनासाठी वापरावा.

रक्तपित्तहर म्हणून सांगितलेला नीलकमलाचा क्षार तूप–मधाबरोबर चाटावा.

[2]लसूण, तीक्ष्ण मद्य, मासे सेवन करावे. रक्तप्रवृत्ती होत नसेल तर गुल्माचे भेदन करण्यासाठी दूध, गोमूत्र, पळसाचा क्षार व काढा, दशमूलकाढा यांचा बस्ती द्यावा.

[3]रक्त वाहणे सुरू झाल्यावर मांसरसात शिजवलेला भात द्यावा. घृत तैलाने अभ्यंग करावे, व नवीन मद्य सेवन करावे.

[4]रक्तप्रवृत्ती फार झाली तर रक्तपित्तहर चिकित्सा करावी.

[5]वाताच्या वेदना फार असतील तर वातघ्न उपचार करावेत. घृत, तैल यांचे सेक घ्यावे, तित्तिर व कोंबडा यांचे मांस खावे. अम्ल द्रव्यांनी सिद्ध केलेले तूप घ्यावे, मद्य घ्यावे. भोजनानंतर व उत्तरबस्तीसाठी जीवनीय घृताचा उपयोग करावा.

रक्त फारच वाहू लागले तर तिक्त द्रव्यांनी सिद्ध केलेल्या घृतांनी अनुवासन द्यावे.

रक्तगुल्माची चिकित्सा सामान्यतः पुढील धोरणाप्रमाणे करावी. या चिकित्सेमध्ये काळाला एक विशिष्ट महत्त्व आहे. रक्तगुल्म का गर्भ याचा निर्णय सहसा लवकर होत नाही. त्यास बराच दीर्घकाळ लागतो. तो प्रसवकालाइतकाही दीर्घ असतो. तसेच त्यास पाकावस्थाही लवकर येत नाही. म्हणून दीर्घ काळ थांबावे लागते. त्यासाठी–
मासे व्यतीते दशमे चिकित्स्यः – ।" मा. नि. गुल्म १६

---

१ किण्वं वा सगुडक्षारम् दद्याद्योनिविशोधनम् ॥
रक्तपित्तहरं क्षारं लेहयेन् मधुसर्पिषा ।

२ लशुनं मदिरां तीक्ष्णां मत्स्यांश्चास्यै प्रदापयेत् ॥
बस्तिं सक्षीरगोमूत्रं सक्षारं दाशमूलिकम् ।

३ अदृश्यमाने रुधिरे दद्याद्गुल्मप्रभेदनम् ।
प्रवर्तमाने रुधिरे दद्यान्मांसरसौदनम् ।
घृततैलेन चाभ्यङ्गं पानार्थं तरुणीं सुराम् ॥ च. चि. ५–१७३ ते १७८

४ रुधिरेऽतिप्रवृत्ते तु रक्तपित्तहरीः क्रियाः ।

५ कार्या वातरुगार्तायाः सर्वा वातहरीः पुनः ॥
घृततैलावसेकांश्च तित्तिरींश्चरणायुधान् ।
सुरां समण्डाम् पूर्वं च पानमम्लस्य सर्पिषः ॥
प्रयोजयेदुत्तरं वा जीवनीयेन सर्पिषा ।
अतिप्रवृत्ते रुधिरे सतिक्तेनानुवासनम् ॥ च. चि. ५–१७९ ते १८२

अशी वचने ग्रंथान्तरी आढळतात. मात्र हा काही निरपवाद नियम नव्हे. सुश्रुताचा टीकाकार डल्हण याने ( रक्तगुल्मे सम्यगुपचिते ज्ञाते प्रसूतिकालात् अर्वाक् अपि चिकित्सा करणीया इति बोधयति । ) असे स्पष्ट विधान केले आहे ते उचित आहे.

गुल्माचे ज्ञान पूर्णपणे नीट झाले आणि त्याचा उपचय ( पाककाल ) पूर्ण झाला म्हणजे मग प्रसूतिकालाच्या आधीही केव्हाही योग्य वेळी चिकित्सा करावी.

गुल्म शिथिल करणे हे चिकित्सेचे महत्त्वाचे अंग आहे. त्यासाठी उष्ण, तीक्ष्ण, क्षार अशा पदार्थांचे सेवन किंवा त्याच पदार्थांच्या पिचुपिंडांनी योनिविशोधन करावे.

शिथिल झालेल्या गुल्माचे भेदन होऊन शोधन व्हावे यासाठी विरेचन बस्ती, उत्तरबस्ती यांचेही प्रयोग केले जातात.

## अपुनरुद्भव चिकित्सा :

बरा झालेला गुल्म पुन्हा होऊ नये, झालेला नष्ट व्हावा यासाठी उष्णतीक्ष्ण, अग्निदीपन, लेखनभेदन अशा गुणांची द्रव्ये वा सिद्धकल्प वापरले जातात, आणि त्यातही अग्निदीपनाच्या दृष्टीने उपचार करताना लक्ष केन्द्रित केले पाहिजे; कारण अष्टाङ्गसंग्रहकाराने गुल्मचिकित्सा-अध्यायाच्या शेवटी —

" मंदेऽग्नौ वर्धते गुल्मः प्रदीप्ते तु प्रशाम्यति ।
शमप्रकोपौ दोषाणां सर्वेषां यत् तदाश्रयौ ॥ "

असे आवर्जुन सांगितले आहे. योगरत्नाकराने नाराचरस, भास्करलवणचूर्ण, वडवानलरस, कांकायनगुटी, च्यविकासव, कुमारी आसव असे कल्प सांगितले आहेत.

रोगी, व्याधी व दोष यांच्या अवस्था व बलाबल पाहून वरील कल्पांचा योग्य मात्रेत उपयोग करावा.

गुल्माचे भेदन करावे असे सांगितले आहे. भेदन जसे क्षाराग्निकर्माने होते तसेच शस्त्रकर्मानेही केले जाते. अवघड व कौशल्याचा असला तरी शस्त्रकर्म हाही एक गुल्मावरील उपचार आहे.

— गर्भकालव्यतिक्रमे इति दशममासरूपस्य गर्भकालस्य व्यतिक्रमे । क्षारपात्रे इति क्षारोदकस्याढकद्वयम् । मात्रमिति योग्यप्रमाणम् । पललं तिलपिष्टम् । क्षारश्चात्र पलाशक्षार एव, प्रकृतत्वात् । ताभ्यामिति क्षारसुधाक्षीराभ्याम् । कटुकमत्स्यः शफरी शुष्कमत्स्यः । लक्तकान् वस्त्रावयवान् । किण्वं सुराबीजम् । रक्तपित्तहरं क्षारमिति नीलोत्पलक्षारम् । अम्लस्य सर्पिषः अम्लद्रव्यसाधितस्य घृतस्य । उत्तरं भोजनोत्तरकालं पानं, किंवोत्तरबस्तिः । जीवनीयं सर्पिर्वातरक्ते वक्तव्यम् । सतिक्तेन तिक्तद्रव्यसाधितेनानुवासनमिति । च. टीका



तो करण्यापूर्वी शरीराच्या इतर अवयवांपासून गुल्म शिथिल होणे अवश्य आहे. त्यासाठी स्नेहस्वेदोपचार करून अवश्य तर [1]घटिकायंत्राचाही उपयोग करावा. घटिकायंत्र लावताना गुल्म असलेला भाग स्नेहाने हळूहळू चोळून उपनाह वा तापस्वेद याने शेकावा व एका खापरीवर कापूर ठेवावा. ती खापरी गुल्मभागी जरा वरच्या बाजूस ठेवावी. नंतर पसरट तोंडाचे मडके घेऊन ते कापूर पेटवून त्यावर पालथे घालावे व शरीराशी घट्ट दाबून धरावे. या मडक्याच्या तोंडाची रुंदी पसरट पण बेताची असणे आवश्यक आहे. फार रुंद असेल तर शरीरावर सर्व बाजूने दाबून बसणार नाही आणि मुख फार लहान असेल तर गुल्म आत खेचला जाणार नाही.

काही वेळानंतर गुल्म आत खेचला गेला आहे असे पाहून हे मडके फोडून वेगळे करावे व मग गुल्मावर शस्त्रकर्म करावे. अलीकडे संमोहन कल्पांच्या प्रगतीमुळे शस्त्रकर्म करताना गुल्माला शिथिल करण्याचा इतका उपद्व्याप करावा लागत नाही.

[2]शस्त्रकर्माप्रमाणेच दाहकर्म हाही उपचार आहे. पूर्वीप्रमाणेच स्नेहस्वेद करून घटिकायंत्राने गुल्म शिथिल व व्यक्त करून घ्यावा, आणि त्याभोवती वस्त्र बांधून त्याच्या मर्यादा स्पष्ट करून घ्याव्यात. मग ऐरण, टेंटू यांच्या जळत्या काष्ठाने किंवा बाणासारख्या तापलेल्या शस्त्राने डाग द्यावेत. डाग फार खोल देऊ नयेत व नाभी-बस्ती, हृदय, अंत्र, रोमराजी यांवर डाग बसणार नाही अशी काळजी घ्यावी. नंतर कषाय, मधुर, शीत अशा गुणांची द्रव्ये वापरून व्रणकर्म करावे.

ज्या वेळी अंतःफलाचा गुल्म असून तो चल असेल, तर क्वचित वेळी त्या गुल्माला पीळ पडून तीव्र शूल उत्पन्न होतो व अशा वेळी अरती, छर्दी, श्वास, आध्मान, अतिस्वेद, पांडू अशी लक्षणे तीव्र शूलाबरोबर उत्पन्न होतात. या वेळी शस्त्रकर्माशिवाय कोणतीही चिकित्सा लागू पडत नाही, म्हणून त्वरित गुल्म निर्हरण करावे.

पथ्यापथ्य सामान्य गुल्माप्रमाणेच ठेवावे.

१ ततोऽस्य सर्वसङ्गं गुल्मं च साध्मानं सविबंधं कठिनं, उन्नतं, गूढमांसं, स्थिरं महावस्तुं च बहुधा बहुशश्च स्वेदयेत् । स्निग्धस्विन्नशरीरस्य शिथिलतां गते गुल्मे । यथोक्तां घटिकां लागयेत् । तया संगृहीते च गुल्मे घटीं अपनयेत् भिद्याद् वा । अ. सं. चि. १६, पान २३३

२ अथ वस्त्रान्तरितं, सपर्यंतं गुल्मनिचयं, प्रदीप्तेन, शरलोहाग्निमंथतिंडुक काष्ठाना अन्यतमेन नाभिबस्तीहृदयान्त्ररोमराजीः परिहरन् नातिगाढं परामृशेद् । ततः कषायस्वादुशीतैः अग्निवेगमुपशमय्यस्य व्रणोपक्रमं कुर्वीत ।
अ. सं. चि. १६, पान २३५

**साध्यासाध्यता :**

गुल्माची साध्यासाध्यता चरकाने सांगितली आहे ती अशी :

[1]गुल्म ज्या वेळी क्रमाक्रमाने वाढत जाऊन मोठा होतो व पुष्कळ जागा व्यापतो; त्याची मुळे खोलवर (कृतमूल:) निरनिराळ्या धातूंत गेलेली असतात; सिरांचा रोध होतो; कासवाच्या पाठीप्रमाणे कठीण, स्पर्शयुक्त व उन्नत होतो; दौर्बल्य, अरुची, हृल्लास, कास, छर्दी, अस्वस्थता, ज्वर, तृष्णा, तंद्रा, प्रतिश्याय या लक्षणांनी रोगी अतिशय पीडित होतो, त्या वेळी गुल्म बरा होत नाही.

[2]ज्या वेळी गुल्मपीडित रोग्याला ज्वर, श्वास, छर्दी, अतिसार या लक्षणांनी युक्त असा शोथ हात, पाय, हृदय, नाभी यांवर येतो तेव्हा तो रोग्याचा नाश करतो.

रक्तगुल्मात तिन्ही दोषांचा अनुबंध झाला असता वरील सर्व लक्षणे सापडतात व ती क्रमाने असाध्य होत जातात.

---

१ संचित: क्रमशो गुल्मो महावास्तुपरिग्रह: ।
कृतमूल: सिरानद्धो यदा कूर्म इवोन्नत: ॥
दौर्बल्यारुचिहृल्लासकासवम्यरतिज्वरै: ।
तृष्णातंद्रा प्रतिश्यायैर्युज्यते न स सिध्यति ॥ च. चि. ५–१६९–१७०

२ गृहीत्वा सज्वरश्वासं वम्यतिसारपीडितम् ।
हृन्नाभिहस्तपादेषु शोफ: कर्षति गुल्मिनम् ॥ च. चि. ५–१७१
– संचित इत्यादिना क्रमादसाध्यता प्राप्तं गुल्ममाह ।
महावास्तुपरिग्रह इति भूरिदेशव्यापक: ॥ च. चि. ५–१७१ टीका



रक्तगुल्म – निदान विवेक

| रक्तगुल्म | गर्भ | विद्रधि (गर्भाशयाचा | अर्बुद (गर्भाशयाचा |
|---|---|---|---|
| १. पिंडाकृती<br>२. वर्धमान<br>३. रज:प्रवृत्तीचा अभाव<br>४. अग्निमांद्य<br>५. कृशता, पांडुता<br>६. मलावष्टंभ<br>७. प्राय: मूत्रकृच्छ्र<br>८. हृल्लास, छर्दी, आलस्य, दोहद, ओष्ठ व स्तन-मंडळाचे ठिकाणी कृष्णवर्ण, स्तन्योत्पत्ती, स्फुरण. | पिंडाकृती<br>वर्धमान<br>रज:प्रवृत्तीचा अभाव<br>अग्निमांद्य<br>कृशता, पांडुता<br>मलावष्टंभ<br>मूत्रकृच्छ्र (क्वचित)<br>सर्व लक्षणे रक्त-गुल्माप्रमाणेच | पिंडाकृती<br>वर्धमान<br>रज:प्रवृत्तीचा अभाव<br>अग्निमांद्य<br>कृशता, पांडुता<br>मलावष्टंभ<br>मूत्रकृच्छ्र<br>— | पिंडाकृती<br>वर्धमान<br>रज:प्रवृत्तीचा अभाव<br>अग्निमांद्य<br>कृशता, पांडुता<br>मलावष्टंभ<br>मूत्रकृच्छ्र<br>— |
| ९. वाढ विषम, अनियमित. | वाढ सम, नियमित | वाढ सम, अनियमित | वाढ विषम, अनियमित |
| १०. अंगस्फुरण नाही. पिंडस्फुरण होते. | अंगस्फुरण असते. | स्थिरता | स्थिरता |
| ११. — | हृदस्पंदन चौथ्या महिन्यापासून प्रत्यास येते. | — | — |
| १२. ज्वर, दाह<br>१३. अपाकी | —<br>— | ज्वर, दाह<br>प्रपाकी | ज्वर, दाह<br>प्राय: अपाकी |
| १४. — | नवव्या महिन्यानंतर प्रसव | — | — |
| १५. अनियमित स्राव | — | अनियमित स्राव | दुर्गंधी स्राव |
| १६. विशिष्ट पूर्वरूपे असतात | — | ग्रंथोक्त नाहीत | ग्रंथोक्त नाहीत |
| १७. कष्टसाध्य | — | कष्टसाध्य | असाध्य |

## स्थानपरत्वे गुल्म व त्यांची कारणे, लक्षणे, दोषानुबंध आणि चिकित्सा

| स्थान | कारणे | दोषानुबंधत्व | लक्षणे | चिकित्सा |
|---|---|---|---|---|
| १. अंतःफल | कटू, अम्ल, तीक्ष्ण, विदाही, असा आहार विरुद्ध अन्नसेवन, क्रोध इत्यादी | पित्तानुबंधी | अनार्तव (दोन्ही अंतःफलाचा गुल्म असेल तर); अनियमित मासिक पाळी (एका अंतःफलाचा गुल्म असेल तर); वंध्यत्व, समगर्भलिंग लक्षणे, स्तनवृद्धी, स्तन-चुचुकाच्या ठिकाणी कृष्णता, स्तन्यप्रवर्तन, छर्दी, रोमराजी काळसर होणे, किण्विस, गुल्माच्या ठिकाणी द्रवप्रचीती, गुल्माचे चलन, उदरात फिरलेला रुग्णेस कळतो. सामान्य लक्षणे–अधोदरात गौरव, मधून-मधून शूल. | आकार लहान असेल तर शोषणचिकित्सा म्हणून लताकरंजचूर्ण ४ गुं. ते १ मा. दिवसातून २ वेळा द्यावे. आकार कमी होत जातो असे वाटल्यास २ ते ३ महिने चिकित्सा चालू ठेवावी. ७० ते ८० टक्के रुग्णांत गुल्म नाहीसा झालेला दिसतो. लक्षणे कमी होत जातात. गुल्म जर मोसंबीएवढा अगर मोठा असेल तर उदरपाटनपूर्वक शस्त्रकर्म करावे. शक्य असेल तेव्हा अंतःफलाचे अस्तित्व कायम ठेवण्याची काळजी घेऊन गुल्मनिर्हरण करावे. तसे शक्य नसल्यास संपूर्ण गुल्म निर्हरण करावे. |
| २. आर्तववाहिनी | " | " | वंध्यत्व, अधोदरशूल<br>सामान्य लक्षणे–अधोदरात गौरवशूल | गुल्मनिर्हरण |

| स्थान | कारणे | दोषानुबंधत्व | लक्षणे | चिकित्सा |
|---|---|---|---|---|
| ३. गर्भाशयाच्या आतील बाजूस | (अ) नवप्रसूता स्त्री, गर्भस्राव किंवा पात झालेली स्त्री, मासिक पाळी सुरू असलेली अशा स्त्रियांनी वात-प्रकोपकर आहार-विहार केला तर; आमदोष योनिदोष, व गर्भवैगुण्य यामुळे. | वातरक्तानु-बंधी | अधोदरात गौरव, अनियमित योनिगत रक्तस्राव, योनिगुखातून स्रावाबरोबर अधूनमधून भिजलेल्या साबुदाण्याप्रमाणे बुद्बुदाकृती बाहेर पडतात. हा गुल्म बरेच दिवस गर्भाशयात राहिला तर रोगाला धातुगत अवस्था प्राप्त होऊन रोग असाध्य होतो. | शोधन–(१) औषधी : कार्पासमूल, शूलहरवटी, त्रिकटू, चित्रक, भल्लातक, इत्यादी औषधे गर्भाशयशोधक आहेत. (२) शस्त्रकर्म : गर्भाशयलेखन किंवा उदरपाटनपूर्वक गुल्मनिर्हरण अवस्थेप्रमाणे करावे. |
| | (ब) कफकर व अभिष्यंदी आहार-विहार सातत्याने करणे. | कफानुबंधी | रजोवृद्धी समगर्भलिंग लक्षणे व सामान्य लक्षणे. | गुल्मनिर्हरण |
| ४. गर्भाशयाच्या स्नायूतील | " | " | कष्टार्तव, रजोवृद्धी, वंध्यत्व, वारंवार गर्भस्राव, गर्भपात, अकालप्रसव, अधोदरात गौरव. | गुल्मनिर्हरण |
| ५. गर्भाशयाच्या बाहेरील भागास असलेला | " | " | गुल्माची सामान्य लक्षणे. गुल्म सबंध गोळाच फिरतो. गुल्मिणी जर गर्भिणी झाली तर मूढगर्भ होण्याची किंवा प्रसवा-मध्ये गर्भसंगाची शक्यता. | " |

| स्थान | कारणे | दोषानुबंधत्व | लक्षणे | चिकित्सा |
|---|---|---|---|---|
| ६. गर्भाशयमुखस्थ | ,, | ,, | कष्टार्तव, वंध्यत्व, अनियमित योनिगत रक्तस्राव. | ,, |
| ७. गर्भाशयाच्या बाहेरील पेशीतील | ,, | ,, | नं. ५ च्या गुल्माप्रमाणे | ,, |



## योनिकंद

¹दिवसा झोपणे, अतिक्रोध, अतिव्यायाम, अतिमैथुन, नख, दंत वा इतर कारणांनी व्रण उत्पन्न होणे, अशा हेतूंनी प्रकुपित झालेले दोष लकुचाच्या आकाराची रक्तपूययुक्त ग्रंथी योनीमध्ये उत्पन्न करतात. यास योनिकंद असे म्हणतात.




आ. २३ : योनिकंद

वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक असे याचे चार प्रकार आहेत.

²वातज योनिकंद रूक्ष, विवर्ण व स्फुटित असतो (भेगा पडलेला, खरखरीत पृष्ठभागाचा).

³पित्तामुळे उत्पन्न होणाऱ्या योनिकंदामध्ये दाह, लाली व ज्वर ही लक्षणे असतात.

१ दिवास्वप्नादतिक्रोधाद् व्यायामादतिमैथुनात् ।
क्षताच्च नखदंताद्यैः वाताद्याः कुपिता मलाः ॥
पूयशोणितसंकाशं लकुचाकृतिसंन्निभम् ।
जनयन्ति यदा योनौ नाम्ना कंदः स योनिजः ॥
भा. प्र. मध्यखंड; योनिरोगाधिकार प्रकरण

२ रूक्षं विवर्णं स्फुटितं वातिकं तं विनिर्दिशेत् ।

३ दाहरागज्वरयुतं विद्यात् पित्तात्मकं तु तम् ॥

[१]कफज योनिकंद हा आकाराने तिळाच्या फुलासारखा असून त्या ठिकाणी अतिशय खाज असते.

[२]सन्निपातजामध्ये सर्व दोषांची लक्षणे दिसतात.

या रोगाचे वर्णन योगरत्नाकर व भावप्रकाश यांमध्ये आहे. प्राचीन चरकादी ग्रंथांत यांचा उल्लेख आढळत नाही. प्रत्यक्षात हा व्याधी पुष्कळदा आढळतो.

## योनिकंदाची चिकित्सा :

[३]गैरिक, आंब्याची कोय, वावडिंग, हळद, सुरमा, कायफळ यांचे चूर्ण मधात कालवून तो कल्क योनीत धारण करावा व हेच चूर्ण त्रिफळधाच्या काढ्यातून मध घालून सेवन करावे; म्हणजे योनिकंद नष्ट होतो.

शस्त्रकर्माने ग्रंथिभेद करून व्रणकर्म करावे.

## योनी अर्श :

[४]इतर अर्शांमध्ये सांगितलेल्या मिथ्या आहारविहाराने प्रकुपित झालेले दोष योनीमध्ये स्थानसंश्रय करून (आकाराने लहान), स्पर्शास कोमल, दुर्गंधियुक्त, चिकट रक्ताचा स्राव होणारे, छत्रीच्या आकाराचे किंवा गंडूपदाच्या मुखाच्या आकाराचे अर्श उत्पन्न करतात. त्यामुळे योनीमध्ये (तीनही आवर्तांत) विकृती उत्पन्न होते. रजःप्रवृत्तीच्या संबंधीही स्राव न होणे वा अधिक होणे या स्वरूपाच्या विकृती उत्पन्न होतात. यावर जी चिकित्सा करावयाची ती इतर अर्शांप्रमाणेच असते. या उपचारांचे सुश्रुताने पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे.

१ तिलपुष्पप्रतीकाशं कंडुमन्तं कफात्मकम् ।

२ सर्वलिङ्गसमायुक्तं सन्निपातात्मकं वदेत् ।।

भावप्रकाश मध्यखंड; योनिरोगाधिकार प्रकरण

३ गैरीकाम्रास्थिजंतुघ्नरजन्यंजनकट्फलैः ।
पूरयेद्योनिमेतेषां चूर्णैः क्षौद्रं समन्वितैः ।।
त्रिफलायाः कषायेण सक्षौद्रेण च सेवयेत् ।
प्रमदा योनिकंदेन व्याधिना परिमुच्यते ।।

भा. प्र. मध्यखंड; योनिरोगाधिकार प्रकरण

४ प्रकुपिताः दोषाः योनिमभिप्रपन्नाः सुकुमारान् दुर्गन्धान् पिच्छिलरुधिरस्राविणः छत्राकारान् करीरा जनयन्ति । ते तु योनिं उपघ्नन्ति आर्तवं च । सु. नि. २–१७
– तथा योनौच ते दुष्टान् गंडूपदमुखाकृतीन्... ।

(मा. नि. आतंकदर्पण टीका, अर्श-निदान ४४)



[१]अर्शांवर चार प्रकारांनी उपचार करता येतात. औषध, क्षार, अग्नी व शस्त्र हे ते चार उपाय. जे अर्श उत्पन्न होऊन फारसे दिवस झाले नाहीत, ज्यांच्यातील दोषांचे बल अल्प आहे आणि लक्षणे थोडी आहेत वा विशेष पीडाकर नाहीत ते अर्श औषधाने बरे होतात.

मऊ, रुंद, अधिक ठिकाणी असलेले, खोल गेलेले, उंचावलेले, असे मोड क्षाराने चिकित्सावेत.

खरखरीत, स्थिर, मोठ्या आकाराचे, कठीण असे मोड अग्नीने जाळून बरे करावेत आणि जे आकाराने बारीक, उंचावलेले व स्रावयुक्त असतील त्यांच्यावर शस्त्रकर्म करावे. योनिअर्शांवरही हे सर्व उपचार करावे लागतात. क्षारकर्म व शस्त्रकर्म यांचा विशेष उपयोग होतो. त्यानंतर स्निग्ध, मधुर, तिक्त, कषाय गुणांच्या द्रव्यांनी व्रणकर्म करावे.

# सोमरोग

[२]अतिमैथुनामुळे, शोकामुळे, श्रमामुळे, गरदोषामुळे व अतिसार व्याधी उत्पन्न करणारी कारणे घडली असता वातप्रकोप होतो आणि स्त्रियांच्या सर्व शरीरातील अप्धातू प्रक्षुब्ध होतो. स्वस्थानापासून अप्धातू च्युत होऊन वाहू लागतो व मूत्रमार्गासारख्या अधोमार्गाने बाहेर पडतो.

[३]हा स्राव ( योनिमार्गाने होतो त्या वेळी ) स्वच्छ, गढूळपणा नसलेला, शीत, गंधरहित व वेदनारहित असतो. रंगाने जलाप्रमाणे श्वेतवर्ण असतो. याचे बाहेर पडण्याचे प्रमाण फारच असते.

१ चतुर्विधोऽर्शसां साधनोपायः। तद्यथा–भेषजं क्षारोऽग्नि शस्त्रमिति। तत्र अचिरकाल-जातान्यल्पदोषलिङ्गोपद्रवाणि भेषजसाध्यानि, मृदुप्रसृतगाढान्युच्छ्रितानि क्षारेण, कर्कश स्थिर–पृथु–कठीनान्यग्निना, तनुमूलान्युच्छ्रितानि, क्लेदवन्ति च शस्त्रेण ।
सु. चि. अ. ६–३

२ स्त्रीणामतिप्रसंगेन शोकाच्चापि श्रमादपि ।
अतिसारकयोगाद् वा गरयोगात्तथैव च ।।
आपः सर्वशरीरस्थः क्षुभ्यन्ति प्रस्रवंति च ।
तस्मात्ताः प्रच्युतः स्थानान्मूत्रमार्गं व्रजन्ति हि ।। यो. र. पान ५६८

३ प्रसन्ना विमलाः शीता निर्गंधा नीरुजा सिताः ।
स्रवंति चातिमात्रं ताः सा न शक्नोति दुर्बलाः ।। यो. र. पान ५६८

[१] (मूत्रमार्गाने बाहेर पडेल त्या वेळी) त्याचा वेग धारण करणेसुद्धा अशक्य असते. योनिद्वाराने शरीराचे धारण करणारा हा सोम धातू अधिक प्रमाणात स्रवू लागला म्हणजे त्या स्त्रीला स्वस्थता म्हणून कशी ती वाटत नाही. डोके हलके झाल्याप्रमाणे वाटते. तोंड व टाळू कोरडी पडतात. मूर्च्छा, जृंभा, प्रलाप अशी लक्षणे उत्पन्न होतात. खाण्यापिण्याचे समाधान लाभत नाही.

[२]शरीर धारण करणाऱ्या आप धातूलाच सोम अशी संज्ञा आहे. त्याची विकृती उत्पन्न होऊन तो क्षीण होतो, म्हणून स्त्रियांना होणाऱ्या या व्याधीस सोमरोग[३] असे म्हणतात.

सोम क्षीण झाल्यामुळे शरीर थकून अगदी निश्चेष्ट होते.

याच सोमरोगाचा उपद्रव म्हणून मूत्रातिसारही होतो. योगरत्नाकराने त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे :

[४]सोमरोग फार दिवस राहिल्यामुळे स्थानवैगुण्य उत्पन्न होते. त्यामुळे सोमद्रव्य मूत्रमार्गाने वरचेवर स्रवू लागते. सोमरोगाची लक्षणे तेथे असतात व आप धातूची विकृतीही या ठिकाणी सोमरोगातल्याप्रमाणेच होते. मूत्रमार्गातून बाहेर पडत असल्यामुळे व त्याचे प्रमाण फार असल्यामुळे त्याला मूत्रातिसार असे म्हणतात. यामुळे बलाचा नाश होतो.

या व्याधीसंबंधी वैद्यवर्गामध्ये अद्याप अनिश्चयाचेच वातावरण आहे. शब्दाचे निश्चितार्थक पुरावे धुंडण्याच्या तंत्रामध्ये गुंतल्यावर संदिग्धता कमी होण्याची शक्यताही फार थोडी आहे. प्राचीन आयुर्वेदीय ग्रंथ, व आधुनिक ग्रंथरचनेचे तंत्र यांमध्ये एक अंतर आहे. आज आपण एकेका शास्त्रापुरता तरी एका शब्दाचा एकच अर्थ असावा आणि विषयाचे प्रतिपादन त्याच्या अर्थासाठी संदर्भावर न सोपविता स्पष्टार्थकच असावे असे मानणारे आहोत. पूर्वी एकाच अर्थाने भिन्न शब्द व भिन्नार्थाने एकच शब्द वापरण्याची पद्धती होती; आणि विषयप्रतिपादन हे प्रत्येक वेळी स्पष्ट न करता कुठे संदर्भावर, तर कुठे चालू विषयाच्या ओघावर, तर कुठे पूर्वी सांगितलेल्या सिद्धान्तावर सोपविलेले असे.

१ वेगं धारयितुं तासां न विंदति सुखं क्वचित् ।
शिरःशिथिलता तस्या मुखं तालु च शुष्यति ॥
मूर्च्छा जृंभा प्रलापश्च त्वग्रूक्षा चातिमात्रतः ।
भक्षैर्भोज्यैश्च पेयैश्चं न तृप्तिं लभते सदा ॥
संधारणाच्छरीरस्य ता आपः सोम[२]संज्ञिताः ।
ततः सोमक्षयात् स्त्रीणां सोम[३]रोग इति स्मृतः ॥ योगरत्नाकर, पान ५६८

४ स एव सरुजः सोमः मूत्रेण स्रवते मुहुः ।
सोमलक्षणसंसृष्टः कालातिक्रान्तयोगतः ॥
सोमक्रान्तिक्रमेणैव स्रवेन्मूत्रमभीक्ष्णशः ।
मत्रातिसार इत्येव तमाहुर्बलनाशनम् ॥ यो. सोमरोगाधिकार, पान ५६९



मीमांसाशास्त्राची पूर्वतयारी प्रत्येक शास्त्राभ्यासकाची असल्यामुळे, त्यास त्या पद्धतीने वर्णन केलेला ग्रंथ लावून घेताना कोठे अडथळाही उत्पन्न होत नसे. आता मात्र प्रत्येक वेळी कोणता तरी निर्णय घेणे हे आवश्यक झाले आहे, आणि पद्धती मात्र पूर्वीची राहिलेली नाही. आम्ही या ग्रंथात तरी, एक निश्चित निर्णय आमच्यापुरता तरी घ्यावा असे ठरविले आहे. आम्ही घेतलेला निर्णय चुकीचाही असेल कदाचित; पण निर्णयच घ्यावयाचा नाही, आहे तीच स्थिती वर्षानुवर्षे तशीच संशयित ठेवावयाची हे आम्हास योग्य वाटत नाही; म्हणून सोमरोगासंबंधीच्या आमच्या कल्पना आम्ही स्पष्टपणे मांडीत आहोत.

ग्रंथामध्ये सोमरोगालाच श्वेतप्रदर अशी संज्ञा चिकित्सेच्या प्रकरणात दिलेली आढळते. मागे नुकताच प्रदररोग वर्णन करून झालेला आहे. ग्रंथकार नंतर निदान-संप्राप्तिसह सोमरोग वर्णन करीत आहे आणि थोड्या वेळाने त्यालाच श्वेतप्रदर म्हणतो त्या वेळी प्रदर हा शब्द त्याच्यापुढे निश्चितार्थाने नसून योगार्थाने 'प्रकर्षेण दीर्यते।' या अर्थाने आहे हे स्पष्ट होते.

'सोम ज्या वेळी मूत्रमार्गाने स्रवतो त्या वेळी त्याला मूत्रातिसार म्हणावे' या वर्णनावरून सोमाच्या स्रवणाचा मूत्रमार्गाव्यतिरिक्त आणखीही मार्ग असला पाहिजे.

या वर्णनावरून त्याचे स्त्रीविशिष्टत्व स्पष्ट होते. योगरत्नाकरातील प्रकरणही आधी प्रदर, मध्ये सोमरोग व पुढे योनिव्यापत् असे स्त्रीसंबंधक रोगांचे आहे. त्यावरूनही सोमरोगाची स्त्रीविशिष्टता स्पष्ट होते.

मूत्रमार्ग हे काही स्त्री-शरीराचे वैशिष्ट्य नव्हे. योनिमार्ग हे स्त्री-शरीराचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे सोम द्रव्याचा स्राव जो होतो तो योनिमार्गानेच होतो असे मानणेच सुसंगत आहे.

योगरत्नाकरामध्ये चिकित्सा देताना "स एव सोमः मूत्रेण स्रवेत् चेत् ।" असे सोमरोगाची चिकित्सा दिल्यानंतर म्हटले आहे, व या स्थितीकरिता स्वतंत्र चिकित्सा सांगितली आहे. यावरून मूत्रमार्गाने न स्रवणारा सोम पूर्वीच्या चिकित्सेसाठी अभिप्रेत आहे हे स्पष्ट होते. म्हणून आम्ही सोमरोग हा योनिद्वाराने स्रावाच्या रूपाने व्यक्त होणारा स्वतंत्र व्याधी मानतो. याला जरी प्रदर म्हटले असले, तरी पूर्वी वर्णन केलेल्या प्रदरापेक्षा तो निराळा आहे. प्रदर शब्द तीन-चार ठिकाणी आला आहे. असृग्दर या नावाने, असृजा-योनीच्या प्रकरणात, व येथे सोमरोग प्रकरणात तो वापरला आहे.

आम्ही एकार्थाने शब्द वापरण्याच्या तंत्रात प्रदर म्हणजे स्रावविशिष्टता असृग्दर, उपप्लुतायोनी आणि सोमरोग अशा तीन ठिकाणी असते असे मानतो. स्त्रावाधिक्य हे

जरी लक्षणसाधर्म्य सगळीकडे असले तरी त्यांचे लक्षणसमुच्चय व संप्राप्ती भिन्न आहेत असे आमचे मत आहे. ते आम्ही रक्तप्रदराच्या प्रकरणी थोडेसे स्पष्ट केले आहेच.

येथे पुन्हा अधिक स्पष्टपणे सांगतो. असृग्दर हा रक्तपित्तप्रधान व्याधी, उपप्लुता-योनी हा कफप्रधान व्याधी, व सोमरोग हा वातप्रधान व्याधी. सोमरोगात आप धातूची दुष्टी असते. वात हा त्या विकृतीस निमित्तकारण असतो; म्हणून सोम-रोगातील स्रावाचे वर्णन प्रसन्न, विमल, निर्गंध इत्यादी स्वरूपात केले आहे.

## सोमरोगाची चिकित्सा :

[1]पिकलेली केळी, ताज्या आवळ्यांचा रस, मध हे पदार्थ साखर घालून सेवन करावेत. सोमाचे स्तंभन होते.

[2]उडिदाचे चूर्ण, ज्येष्ठमध, भुईकोहळा, मध, साखर हे सर्व सकाळीच दुधाबरोबर सेवन करावे; म्हणजे सोमाची प्रवृत्ती कमी होते.

[3]सोमरोग बरा होण्यासाठी आवळ्याच्या बीजातील मज्जा, मध आणि साखर घालून पाण्याबरोबर सेवन करावी. हा प्रयोग तीन दिवस करावा.

[4]नागकेशराचे चूर्ण ताकामध्ये वाटून त्याबरोबरच तीन दिवस सेवन करावे व ताकभात खावा.

## मूत्रातिसार-चिकित्सा :

[5]सोमरोगामध्ये वेदना नसतात पण हेच सोमद्रव्य मूत्रमार्गाने स्रवते त्या वेळी वेदना उत्पन्न होतात. अशा मूत्रातिसारावर वेलदोडा व तालीसपत्र यांचे चूर्ण नवीन मद्याबरोबर सेवन करावे.

१ कदलीनां फलं पक्वं धात्रीफलरसं मधु ।
शर्करासहितं खादेत्सोमधारणमुत्तमम् ॥

२ माषचूर्णं समधुकं विदारीं मधुशर्कराम् ।
पयसा पाययेत्प्रातः सोमधारणमुत्तमम् ॥

३ जलेनामलकीबीजकल्कं समधुशर्करम् ।
पिबेद्दिनत्रयेणैव श्वेतप्रदरशान्तये ॥

४ तक्रौदनाहाररता संपिबेन्नागकेशरम् ।
त्र्यहं तक्रेण संपिष्टं श्वेतप्रदरशान्तये ॥ भावप्रकाश, (७४८ पान)

५ स एव सरुजः सोमः स्रवेन्मूत्रेण चेन्मुहुः ।
तत्रैलापत्रचूर्णेन पाययेत् तरुणीम् सुराम् ॥
यो. र. पृष्ठ ५६९ सोमरोगाची चिकित्सा



[1]ताडगोळे (वा ताडाचे मूळ), खजूर, ज्येष्ठमध, भुईकोहळा, मध आणि साखर घालून मूत्रातिसारावर सेवन करावे.

[2]टाकळ्याचे मूळ तांदुळाच्या धुवणामध्ये वाटून ते सकाळी सेवन करावे.

### प्रदर

| | | असृग्दर (रक्तप्रदर) | उपप्लुता योनी (श्वेतप्रदर) | सोमरोग (जलप्रहर) |
|---|---|---|---|---|
| १ | दोष | पित्तप्रधान | कफवातप्रधान | वातप्रधान |
| २ | स्राव स्वरूप | रक्तमय, दाह | कफसदृश, पिच्छिल, गुरू, घन, दुर्गंधी | जलवत्, तनू, निर्गंध, नीरुज, विमल, शीत. |
| ३ | मार्ग | केवल योनी | केवल योनी | योनी वा मूत्रमार्ग अवस्थेप्रमाणे |
| ४ | दूष्य | रक्त | रस | आप् धातू |
| ५ | लक्षणे | ज्वर, पांडू | आलस्य, दौर्बल्य, तंद्रा, कंडू | कार्श्य, श्रम, शोष, अतृप्ती, रूक्षता |

## [3]स्तनरोग

नाडी-व्रण जितके व ज्या प्रकारांनी होतात, स्तनरोगही तितकेच व तशाच प्रकारांनी स्त्रियांच्या ठिकाणी उत्पन्न होतात.

१ तालकंदं च खर्जूरं मधुकं च विदारिकाम् ।
सितां मधुयुतां खादयेत् मूत्रातिसारनाशनम् ।

२ चक्रमर्दकमूलं तु संपिष्टं तंडुलाम्बुना ।
प्रभातसमये पीतं जलप्रदरनाशनम् ॥ यो. र. पृष्ठ ५६९, सोमरोगाची चिकित्सा

३ यावत्यो गतयो यैश्च कारणैः संभवन्ति हि ।
तावन्तः स्तनरोगाः स्युः स्त्रीणां तैरेव हेतुभिः ॥ सु. नि. १०–१५
यावत्यो यावत्प्रमाणा गतयः यैश्च कारणैर्वातपित्तकफसन्निपाताभिघातैः, तावन्तः तावत्प्रमाणाम् ॥ सु. नि. १०–१५

[1]नाडीव्रण हे सुश्रुताच्या सूत्राप्रमाणे वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक, आगंतुज ( शल्यनिमित्ततः ) असे पाच होतात. टीकाकारांनी यामध्ये 'अपि' आणि 'च' या शब्दांच्या आधारावर द्वंद्वज तीन अधिक मानले आहेत. परंतु त्यांचे मुद्दाम वर्णन केलेच पाहिजे असे नाही. प्रकृतिसमवायांचे असतील तर त्या पाचांतही यांचा अंतर्भाव करता येईल.

या संख्येप्रमाणे स्तनरोगांतही असेच वात, पित्त, कफ, सन्निपात, आगंतू या पाच कारणांनी पाच प्रकार होतात. हे सर्व विद्रधिस्वरूपच असल्यामुळे त्यांची कारणे व लक्षणे विद्रधीप्रमाणेच असतात.

[2]लहान मुलींमध्ये स्तन हे व्यक्त नसतात व त्यातील स्रोतसेही तशीच अव्यक्त व सूक्ष्म असतात. त्यामुळे दोष त्यात शिरू शकत नाहीत; म्हणून बालिकांना स्तनरोग होत नाहीत.

## स्तनविद्रधीचे निदान :

[3]शिळे, उष्ण, रूक्ष, शुष्क, विदाही असे अन्न खाल्ल्यामुळे, वेडीवाकडी शय्या, विकृत आहारविहार यांमुळे, तसेच इतरही रक्त दुष्ट करणाऱ्या कारणांनी प्रकुपित झालेले दोष स्तनांमध्ये विद्रधी उत्पन्न करतात.

[4]स्तन क्षीरपूर्ण असले वा स्तनांमध्ये दूध उत्पन्न झालेले नसले, अशा दोनही स्थितींत स्त्रियांना दोषप्रकोपामुळे स्तन व मांस याची दुष्टी होऊन स्तनरोग होतात ( विद्रधी होतात ).

टीकाकाराने 'सक्षीर' व 'अदुग्ध' या शब्दांचे केवळ गर्भिणी व सूतिका एवढेच अर्थ केलेले आहेत. पण 'अदुग्ध' शब्दाचा अर्थ सूतिकेचे स्तन असा करणे फारसे

१ दोषैस्त्रिभिर्भवति सा पृथगेकशश्च ।
संमूर्च्छितैरपिच शल्य निमित्ततोन्या ।। सु. नि. १०–१०

२ धमन्यः संवृतद्वाराः कन्यानां स्तनसंश्रिताः ।
दोषाविसणत्तासां न भवन्ति स्तनामयाः ।। सु. नि. १०–१५

– इदानीं समानायामपि जातावसंभूतगर्भाणां ते रोगा न भवन्ति इति दर्शयन्नाह– धमन्य इत्यादि । कन्यानामसंभूतगर्भाणां स्त्रीणाम् इत्यर्थः । अविसरणम् अप्रसरणम् ।। टीका

३ भुक्तैः पर्युषितात्युष्णरूक्षशुष्कविदाहिभिः ।
जिह्मशय्या विचेष्टाभिस्तैस्तैश्चासृक्प्रदूषणैः ।। वा. नि. ११–१

४ सक्षीरौ वाऽप्यदुग्धौ वा प्राप्य दोषः स्तनौ: स्त्रियाः ।
रक्तं मांसंच संदूष्य स्तनरोगाय कल्पते ।। सु. नि. १०–२६



योग्य नाही. दुग्धसंचिती नसेल, पण अदुग्धावरून दुग्धसंचयाचा अभाव एवढाच अर्थ काय म्हणून काढावा ? मूल अंगावर पीत असते, म्हणून दुग्धाचा संचय होत नाही; पण त्यामुळे स्तनात दूध नसतेच असे नाही. म्हणून 'अदुग्धौस्तनौ' या विशेषणाने गर्भ राहण्यापूर्वी व मुलांचे अंगावरील पिणे संपल्यानंतर ज्या वेळी स्तन्य मुळीच नसते अशा स्थितीतील स्तन समजावेत. ज्या वेळी स्तन क्षीरयुक्त असतात पण त्यांचे दोहन होत नाही, त्या वेळी क्षीर-संचितीचा भार स्रोतसांवर येऊन दोष प्रकुपित होतात व स्तनरोग उत्पन्न करतात. या स्तनरोगांमध्ये स्तन्यविकृती हा सर्वथा नाही तरी महत्त्वाचा हेतू आहे. वाग्भटानेही असेच वर्णन करून विद्रधीची उत्पत्ती सांगितली आहे.

या स्तनरोगाचे जे पाच प्रकार होतात म्हणून वर सांगितलेले आहेत त्यांची लक्षणे रक्तविद्रधी सोडून असणारे जे पाच विद्रधी त्यांच्याप्रमाणेच असतात. वाग्भटामध्ये वातादी विद्रधींची लक्षणे सांगितली आहेत ती अशी :

[1]वातज विद्रधी हा काळसर, तांबूस काळसर रंगाचा, लवकर न वाढणारा, लवकर न पिकणारा, वेड्यावाकड्या आकाराचा (विषमस्थिती), अतिशय तीव्र वेदनायुक्त; व्यध, छेद, भ्रम, आनाह, स्पंदन, सरकणे, सशब्द इत्यादी लक्षणांनी युक्त असतो.

[2]पित्तज विद्रधी तांबडा, निळा, काळा वर्ण असलेला, लवकर वाढणारा व लवकर पिकणारा असतो. तृषा, मोह, ज्वर, दाह इत्यादी लक्षणे त्या वेळी असतात.

– स्तनरोगहेतुं निर्दिश्य स्तनरोगसंप्राप्तिं दर्शयन्नाह सक्षीरावित्यादि । सक्षीरौ गर्भिण्याः तस्या दोहस्यासंभवात् । अदुग्धौ प्रसूतायाः, तस्या दोहस्य संभवात् । तत्र यदा दोहयावदुग्धौभवतः, तदा क्षीरभरपीडिता दोषाः कुपिता स्तनरोगाय जायन्ते । स्तनरोगाय कल्पते स्तनरोगार्थे समर्थो भवति ।। टीका

– पंचानामपि तेषां तु हित्वा शोणितविद्रधीम् ।
लक्षणानि समानानि बाह्यविद्रधिलक्षणैः ।। सु. नि. १०–२७

– तेषामपि संक्षेपार्थं लक्षणमतिदेशेन निर्दिशन्नाह–पंचानामपीत्यादि । तेषां स्तनरोगाणाम् । समानानि तुल्यानि, 'भवन्ति' इत्यध्याहारः ।। टीका सु. नि. १०

– एवमेव स्तनसिरा विवृताः प्राप्य योषिताम् ।
सूतानां गर्भिणीनां वा सम्भवेच्छ्वयथुर्घनः ।।
स्तने सदुग्धेऽदुग्धे वा बाह्यविद्रधिलक्षणः ।
नाडीनां सूक्ष्मवक्रत्वात्कन्यानां न स जायते ।। वा. नि. ११–१९ ते २०

१ ............वातात्तत्रातितीव्ररुक् ।
श्यावारुणाश्चिरोत्थानपाको विषमसंस्थितिः ।।
व्यधच्छेदभ्रमानाहस्पन्दसर्पणशब्दवान् । वा. नि. ११–६ ते ७

२ रक्तताम्रासितः पित्तात् तृण्मोहज्वरदाहवान् ।।
क्षिप्रोत्थान प्रपाकश्च । वा. नि. ११–७ ते ८

[1]कफामुळे होणाऱ्या विद्रधीमध्ये पांडुता असते. कण्डु, उत्क्लेश, शीतज्वर (शीतक), काठिण्य, स्थिरता जृंभा, अरुची, गौरव ही लक्षणे असतात. तो लवकर वाढतही नाही व पिकतही नाही.

[2]सान्निपातामध्ये तीनही दोषांची लक्षणे उत्कट असतात.

[3]शस्त्रादी कारणांनी अभिघात होऊन वा मिथ्या आहार-विहार या कारणांनीही क्षत उत्पन्न होते; व वातप्रकोप होऊन तो क्षतामधील उष्म्याने रक्त व पित्त यांना दुष्ट करून विद्रधी उत्पन्न करतो. हा क्षतज विद्रधी पित्त-लक्षणांनी युक्त असून त्यात रक्तदुष्टीचीही लक्षणे असतात. हा फार पीडाकर असतो.

स्त्रियांमध्ये बालकाच्या आचूषणामुळे क्षत होऊन त्या वेळी इतर अनुकूल कारणे असतील तर हा विद्रधी उत्पन्न होतो असे पुष्कळ वेळा घडते.

## स्तनरोगचिकित्सा :

[4]स्तनरोगावर वैद्याने विद्रधीप्रमाणे उपचार करावे. पण त्यातील उपनाह हा उपचार वापरू नये. कारण स्तन हे मृदू असतात. त्यामुळे उपनाहासारख्या उपचारांनी

१ ......पाण्डुः कण्डूयुतः कफात् ।
सोत्क्लेशशीतकस्तम्भजृम्भारोचकगौरवाः ॥

२ ......संकीर्णः सन्निपातजः ।
चिरोत्थानविपाकश्च

३ शस्त्राद्यैरभिघातेन क्षते वाऽपथ्यकारिणः ।
क्षतोष्मा वायुविक्षिप्तः स रक्तं पित्तमीरयन् ।
पित्तासृग्लक्षणं कुर्याद्विद्रधिं भूर्युपद्रवम् ॥ वा. नि. ११–८ ते ११

४ रोगस्तनोत्थितमवेक्ष्य भिषग्विदध्या– ;
द्यद्विद्रधावभिहितं बहुशो विधानम् ॥
संपच्यमानमपि तं तु विनोपनाहैः ।
संशोजनेन खलु पाचयितुं यतेत ॥
शीघ्रं स्तनो हि मृदुमांसतयोपनद्धः ।
सर्वं प्रकोथमुपयात्यवदीर्यतेच ॥
पक्वेतु दुग्धहरिणीः परिहृत्य नाडीः ।
कृष्णं च चूचुकयुगं विदधीत शस्त्रम् ॥
आमे विदाहिनि तथैव गतेच पाकं ।
धात्र्याः स्तनौ सततमेव च निर्दुहीत ॥ सु. चि. १७–४५ ते ४७



त्यांचा कोथ होतो व विद्रधी फुटतो. यासाठी तेथील दोषांचे पाचन बाह्योपचारापेक्षा पोटात ओषधे देऊनच करावे.

[1]विद्रधीवर शोफाच्या चिकित्सेप्रमाणे अपतर्पणापासून विरेचनापर्यंतचे अकरा उपचार करावेत असे सांगितले आहे.

ते उपचार असे :

अपतर्पण, आलेप, परिषेक, अभ्यंग, स्वेद, विम्लापन, उपनाह (वर्ज्य), पाचन, विस्रावण, स्नेह, वमन, विरेचन. यांतील अपतर्पण, आलेप, परिषेक, सौम्य तापस्वेद, पाचन आणि विरेचन हे उपचार विशेष उपयोगी पडणारे आहेत. इतरांचा अवस्थेनुरूप काळजीपूर्वक उपयोग करावा.

विद्रधी पक्व झाल्यावर दुग्धवाहिन्या व कृष्णमंडल, चुचूक वगळून कौशल्याने शस्त्रक्रिया करावी. दुग्धवाहिन्या या चुचुकापासून सरळ उभ्या गेलेल्या असल्यामुळे छेदही उभाच घ्यावा. आडवा छेद घेण्यात अनेक दुग्धवाहिन्या विद्ध होण्याची भीती असते.

स्तनांचे नेहमी दोहन करावे. त्यामुळे विदग्धता येत नाही. विदग्धावस्थेत नाडीव्रण होत नाही.

आलेपासाठी लेपगोळी, काळाबोळ, रक्तचंदन, सागरगोटा, इत्यादी द्रव्ये वापरावी. पाचनासाठी आमपाचनवटी, त्रिभुवनकीर्ती, सूक्ष्म त्रिफळा, त्रिफळा गुग्गुळ, गंधकरसायन, इत्यादी कल्प वापरावे. गरम पाण्याच्या धारेने शेक द्यावा.

आलेप वा स्वेद फार तीक्ष्ण व उष्ण असणार नाहीत याची काळजी घ्यावी.

## स्तनकीलक :

तृण, कीट, तुष्ण, शूक, माशीच्या अंगाचे भाग, खडे, केस, अस्थी या सर्वांना वज्र असे म्हणतात. यांतील कोणतेही वज्र स्त्री ज्या वेळी अज्ञानाने अन्नपानाबरोबर सेवन करते त्या वेळी 'स्तनकील' हा व्याधी उत्पन्न होतो. त्याची संप्राप्ती अशी : वज्र हे अन्नस्वरूप नसल्याने ते पचत नाही व शरीरातील क्लेदामुळे विक्लिन्न होऊन वायूच्या प्रेरणेने रसवह स्रोतसद्वारा स्त्रीच्या स्तनामध्ये प्रविष्ट होते. स्त्रीच्या शरीरातील सर्व स्रोतसे विशेषतः स्तनातील स्रोतसे निवृत्त असतात. त्यामुळे रसातून संचार करणारे वज्र

१ उक्ता विद्रधयः षडये तेष्वसाध्यस्तु सर्वजः ।
शेषेष्वामेषु कर्तव्या त्वरितं शोफवत् क्रिया ॥ सु. चि. १६–३
– शेषेषु पञ्चसु शोफवत् क्रियेति सा पुनरपतर्पणाद्या विरेचनान्तैकादशविधा ।
सु. चि. १६–३, टीका
– आमेत्यादि आमेविदग्धता परिहाराय विदाहिनि विपाक परिहाराय पक्वे नाडीव्रणपरिहाराय स्तनौ निर्दुहीतं ॥ सु. चि. १७, टीका

स्तनात सहजच येते व तेथे विकृती उत्पन्न करते. वज्र पोटात गेल्याची काही लक्षणेही दिसतात. अजीर्ण, अस्वस्थता, ग्लानी, उगीचच शरीरात कोठे तरी वेदना होणे, संधिपीडा, अंगमर्द, शिरःशूल, दाह, जखडल्याप्रमाणे वाटणे, तोंडास पाणी सुटणे, मळमळणे, ज्वर, तृष्णा, विड्भेद, मूत्रप्रवृत्तीमध्ये अडथळा, स्तन जखडल्यासारखे वाटणे, त्यातून स्राव येणे, त्यावरील सिरा उठून दिसणे, शोथ, शूल, दाह यामुळे स्तनास स्पर्शही सहन न होणे – अशी लक्षणे उत्पन्न होतात.

स्तनामध्ये पाचराप्रमाणे कठीण अशी ग्रंथी उत्पन्न होते म्हणून त्यास '[1]स्तनकील' अशी संज्ञा आहे. हा कीलवत् पीडा देत राहतो, त्यामुळेही त्याला कील ही संज्ञा दिली जाते. पित्ताच्या अनुबंधामुळे लवकर वाढतो. हा जर विमार्गग होऊन शाखा, सिरादी अवयवांत इतरत्र गेला नाही तर स्तनातून बालकाच्या आचूषणक्रियेने दुधाबरोबर ओढला जातो व स्तनातून दूध व रक्त यांसह बाहेर पडलेला क्वचित प्रत्यक्ष दिसतोही.

---

– तृणं कीटं तुषं शूकं मक्षिकाङ्गमलाष्टकम् । ( ङ्गनि लोष्टकः )
केशोर्णास्थ्यादिकं विद्याद्वज्रमित्युपचारतः ॥
सहान्नपानेन यदाधात्री वज्रं समश्नुते ।
पच्यमानेन पाकेन ह्यनन्नत्वान्न पच्यते ॥
अपच्यमानं विक्लिन्नं वायुना समुदीरितम् ।
रसेन सह संपृक्तं यति स्तन्यवहाः सिराः ॥
सर्व स्रोतांसि हि स्त्रीणां विवृतानि विशेषतः ।
तत् पयोधरमासाद्य क्षिप्तं विकुरुते स्त्रियाः ॥
रूपाणि पीतवज्रायाः प्रवक्ष्याम्यत उत्तरम् ।
अजीर्णमरतिर्ग्लानिनिरमित्तं व्यथाऽरुचिः ॥
पर्वभेदोऽङ्गमर्दश्च शिरोरुग् क्षवथुग्रहः ।
कफोत्क्लेदो ज्वरस्तृष्णा विड्भेदो मूत्रसंग्रहः ॥
स्तंभः स्रावश्च कुचयोः सिराजालेन संततः ।
शोथशूलरुजादाहैः स्तनः स्प्रष्टुं न शक्यते ॥

१ स्तनकीलकमित्याहुर्भिषजस्तं विचक्षणाः ।
कीलवत् कठिनोऽङ्गेषु बाधमानो हि तिष्ठति ॥
एषपित्तात्मना शीघ्रं पाकं भेद च गच्छति ।
कफास्थिरं क्लेशयति वातादाशु निवर्तते ( विवर्धते ) ॥
शाखा शिरोभिस्तु यदि विमार्गान्न प्रपद्यते ।
आकृष्यमाणं बालेन क्षिप्रं निर्धावति स्तनात् ॥
निर्दुह्यमानमुत्पीडाद्वज्रं सक्षीरशोणितम् ।
अथवाऽभ्येति सहसा प्रत्यक्षं चोपलभ्यते ॥



## चिकित्सा ( स्तनकीलक ) :

[1]या व्याधीसाठी प्रथम घृतपान करावे. त्यामुळे स्रोतसे मृदू होतात आणि वज्र सहज बाहेर काढता येते. युक्तीने स्तनाचे मर्दन करावे व आचूषण करावे. पोटातूनही औषधे द्यावीत. शीतसेक करावेत. प्रलेप द्यावेत. विरेचन द्यावे. भोजन हितकर असावे. दोष व शरीर यांच्या बलाबलाचा विचार करून रक्तमोक्ष करावा व पक्व झाल्यावर विद्रधीप्रमाणे त्याचे पाटन करून पुढील उपचार करावे (व्रणकर्मांचे).

या व्याधीतील वज्र शब्दाची संगती नीट लागत नाही. स्रावासवे काही वेळा कठीण खड्यासारखा पदार्थ निघतो; पण तो दोषधातूच्या खरीभवनाने झालेला असतो. यात आगंतू द्रव्य प्रत्ययास येत नाही. आगंतू द्रव्याचे अतिसूक्ष्म केन्द्र निर्माण होऊन त्यावर दोषधातूंची संचिती होऊन वज्र निर्माण होत असल्यास न कळे. हा संशोधनाचा विषय आहे.

## अर्बुद :

मांसमय, चिरवृद्ध, अपाकी असा शोथ-दुष्ट झालेले दोष, शरीराच्या कोणत्याही भागात उत्पन्न करतात त्यास अर्बुद असे म्हणतात.

स्त्रीरोगाच्या दृष्टीने योनी व स्तन येथील अर्बुद यांचा विचार येथे करावयाचा आहे. अर्बुदाच्या प्रकारांपैकी रक्तार्बुद व मांसार्बुद स्त्रियांच्यामध्ये विशेषेकरून आढळतात.

रक्तार्बुद हा स्रावयुक्त, मृदू, लवकर वाढणारा, आशुकारी असा व्याधी आहे.

मांसार्बुद हे अल्पवेदना, अपाकी, कठीण व स्थिर असे असते.

---

१ घृतपानं प्रथमतः शस्यते स्तनकीलके ।
स्रोतांसि मार्दवं स्नेहाद्यान्ति वज्रं च चाल्यते ॥
निर्दोहो मर्दनं युक्त्या पायनं च गलेन च ।
शीताः सेकाः प्रलेपाश्च विरेकः पथ्यभोजनम् ॥
स्रावणं चाविदग्धस्य दोषदेहत्यपेक्षया ।
पक्वस्य पाटनं कुर्यान्मृजा विद्रधिवच्चतत् ॥

– दोषः प्रदुष्टो रुधिरं सिरास्तु, संपीड्य संकोच्य गतस्त्वपाकम् ।
सास्रावमुन्नह्यति मांसपिण्डं, मांसाङ्कुरैराचितमाशुवृद्धिम् ।
स्रवत्यजस्रं रुधिरं प्रदुष्टमसाध्यमेतद्रुधिरात्मकं स्यात् ॥ सु. नि. ११–१५ ते १६

– रक्तमोक्षयोपद्रवपीडितत्वात् पाण्डुर्भवेत् सोऽर्बुदपीडितस्तु ।
मुष्टिप्रहारादिभिरर्दितेऽङ्गे मांसं प्रदुष्टं प्रकरोति शोफम् ॥
अवेदनं स्निग्धमनन्यवर्णमपाकमश्मोपममप्रचाल्यम् ।
प्रदुष्टमांसस्य नरस्य बाढमेतद्भवेन्मांसपरायणस्य ॥ सु. नि. ११–१७ ते १८

स्तनाच्या ठिकाणी दोष हे स्तन्यदुष्टी, स्तनचुचुकभागी आगंतू व्रण, अतिमर्दन, आघात या कारणाने स्त्रीच्या स्तनातील रक्त व मांस दुष्ट करून अर्बुद उत्पन्न करतात.

अर्बुदामध्ये धातुदुष्टी असेल त्याप्रमाणे स्तनभागी स्पर्शासहत्व, काठिण्य, तीव्रशूल, सपूय रक्तस्राव, ज्वर, निद्रानाश अशी लक्षणे उत्पन्न होतात.

योनीमध्ये अर्बुद उत्पन्न होण्याची कारणे अशी : बहुप्रसवता, अतिमैथुन, असृक्-दर, सान्निपातिक योनी, विषमप्रसूती, मिथ्या आहार-विहार, गर्भस्राव, व पात या कारणांनी तीनही दोष प्रकुपित होऊन योनीतील रक्त व मांस यांस दुष्ट करतात व अर्बुद उत्पन्न करतात.

धातुदुष्टी असेल त्याप्रमाणे क्रमाक्रमानं वाढत जाणारे कठीण असे अर्बुद प्रायः द्वितीय, तृतीय आवर्तामध्ये उत्पन्न होते.

दुष्ट दुर्गंधी स्राव, मलावष्टंभ, योनी, कटी, पृष्ठ, पार्श्व या ठिकाणी वेदना, ज्वर कार्श्य, पाण्डू, मूत्रकृच्छ्र ही लक्षणे सापडतात.

[1]हे व्याधी औषधिसाध्य नाहीत.

यावर क्षाराग्निशस्त्राने उपचार करावेत.

## रक्तविद्रधी :

[2]प्रसूतीतील विकृतीमुळे किंवा सूतिकेवर करावयाच्या उपचारांच्या मिथ्यायोगां-मुळे स्त्रियांना रक्तविद्रधी नावाचा व्याधी उत्पन्न होतो. यामुळे दाह, ज्वर अशी लक्षणे उत्पन्न होतात. हा विद्रधी व्यावर्त योनीतील द्वितीय व तृतीय आवर्त आणि अंतःफल या ठिकाणी होतो.

[3]प्रसूती नीट झालेली असली तरी प्रसूतीनंतर होणारा रक्तस्राव योग्य रीतीने झाला नाही तर जो मक्कल व्याधी उत्पन्न होतो त्याचाच उपद्रव म्हणून हा रक्तविद्रधी होतो.

टीकाकाराने 'मक्कल्लसंज्ञित' याचा अर्थ 'मक्कलजनित'—मक्कलामुळे उत्पन्न झालेला व्याधी, असाच केलेला आहे व तो योग्य आहे. या व्याधीचे स्वरूप फ. .

१ क्षाराग्निशस्त्राण्यसकृद्विदध्यात् प्राणानहिंसन् भिषगप्रमत्तः ।
आस्फोतजातीकरवीरपत्रैः कषायमिष्टं व्रणशोधनार्थम् ॥ सु. चि. अ. १९–३९

२ स्त्रीणामपप्रजातानां प्रजातानां तथाऽहितैः ।
दाहज्वरकरो घोरो जायते रक्तविद्रधिः ॥ सु. नि. ९–२३

३ आभ्यंतरं रक्तजं नारीणामेव दर्शयन्नाह स्त्रीणामित्यादि । स्त्रीणां रक्तविधिर्जायत इति संबंधः । किंभूतानां स्त्रीणाम् । अपप्रजातानां, पतितगर्भाणां पुनरपि किंभूतानां सम्यक्काल प्रसूतानाम् । अहितैः शीतरूक्षाहारविहारैः । सु. नि. ९–२६, टीका



गंभीर व पीडाकर असे असते. जसजसे दिवस अधिकाधिक जातील तसतशी त्यातील प्रपाकारी लक्षणे वाढत जातात व व्याधी असाध्य होत जातो.

**लक्षणे :** गौरव, दाह, ज्वर, शूल, स्पर्शासहत्व, पाण्डुता, कटिग्रह, अरती, अरुची, मलावष्टंभ, वा द्रवमलप्रवृत्ती अशी लक्षणे या व्याधीत आढळतात.

**चिकित्सा :** शमनासाठी म्हणून सूक्ष्म त्रिफला, गंधकरसायन, आरोग्यवर्धिनी, लताकरंज, कांचनार गुग्गुळ, रक्तशोधक गुगुळ ही औषधे वापरावी.

व्याधींचे स्वरूप गंभीर असल्यामुळे औषधांचा उपयोग क्वचितच होतो.

शस्त्रकर्म करून विद्रधी समूल काढावा.

— अपि सम्यक्प्रजातानामसृक्कायादनिःसृतम् ॥
रक्तजं विद्रधिं कुर्यात् कुक्षौ मक्कल्लसंज्ञितम् ।
सप्ताहान्नोपशान्तश्चेत्ततोऽसौ संप्रपच्यते ॥ सु. नि. ९–२७ ते २८

— तस्यैव रक्तविद्रधेर्विशेषमाह—अपि सम्यगित्यादि । मक्कल्लसंज्ञितं मक्कल्लजनितं, कारणे कार्योपचारात्; घृतमायुरिति यथा । सप्तरात्रमप्रशान्तः पित्तोष्मणाऽन्तः पच्यते, पक्वश्चासाध्यः । सु. नि. ९–२७ ते २८, टीका

— आभ्यंतरं रक्तजं विद्रधिं नारीणामेव दर्शयन्नाह–स्त्रीणामित्यादि । अधःप्रजातानाम् अकालप्रजातानाम्; अपप्रजातानां इत्यन्ते, तत्र पतितगर्भाणामित्यर्थः । प्रजातानां सम्यक्काले प्रजातानामित्यर्थः । तथापि रक्तनिरोधे हेतुमाहअहितैरिति; शीत-रूक्षाहारविहारैः । मक्कल्लसंज्ञितं, मक्कल्लजनितं, कारणे कार्योपचारात्; घृत-मायुरिति यथा । तत्र सप्तरात्रादनुपक्रान्तः पित्तोष्मणा पच्यते । अत्रवार्थभोजः– "प्रजातानां तु नारीणां मक्कल्लप्रतिमः स्थिरः । सप्तरात्रात् परं कुक्षौ जायते रक्तविद्रधिः ॥ न चेत् प्रशान्तः सप्ताहादहिताशनतः क्वचित् । पच्यते तत्संसर्गा-त्तदा वर्ज्यो विजानता ।" इति । केचिदत्रापि "अथ मज्जपरीपाकः" इत्यादिकं ग्रंथमधीयते । प्रायेण हि मेदोस्थिसमाश्रय एव विद्रधिः सर्वः । यदाह—"त्वग्रक्त-मांस मेदोस्थि प्रदूष्यास्थिसमाश्रिताः" इति । शेषं मज्जपाकमिच्छति ।
सु. नि. ९–२६ ते २७, टीका ( न्यायचंद्रिका )

## रुग्ण परीक्षापत्रक

**स्रावपरीक्षण :**

| | वात | पित्त | कफ | सान्निपातिक |
|---|---|---|---|---|
| वर्ण – | अरुण | नील | पांडू | श्वेत |
| | कृष्ण | पीत | श्वेत | सर्पिमांस |
| | किंशुकोदक | आविल | पुलाकतोय | वसोपमस |
| | श्याव | — | — | सक्षौद्र |
| | पिशितोदक | — | — | हरितालवर्ण |
| स्वरूप – | सशब्द | सरक्त | पिच्छिल | पिच्छिल |
| | सफेन | वाहितपय | स्निग्ध | — |
| | तनू | अपिच्छिल | गुरू | — |
| | — | — | घन | — |
| स्पर्श – | रूक्ष | मृशोष्ण | शीत | — |
| गंध – | — | कूणपस्राव पूतिगंध | — | मूत्र–पुरीषगंध |

**काल :**

| | वात | पित्त | कफ | सान्निपातिक |
|---|---|---|---|---|
| ऋतु – | वर्षा | शरद | हेमंत, वसंत | — |
| दिन – | संध्याकाळ | दुपार | सकाळ | — |
| रात्र – | तृतीय प्रहर | मध्य प्रहर | प्रथम प्रहर | — |
| रजःचक्रानुसार – | रजःकाल पूर्व २ दिवस | ऋत्वतीत | ऋतुकाल | — |
| प्रमाण – | अल्प | प्रभूत | — | विविध |
| रस – | तिक्त | अम्ल | मधुर | विविध |
| | कषाय | कटू | लवण | — |



| | वात | पित्त | कफ | सान्निपातिक |
|---|---|---|---|---|
| आनुषंगिक | स्रंस | दाह | छर्दी | — |
| लक्षणे— | तोद | पाक | अरोचक | — |
| | आयाम | ज्वर | हृल्लास | — |
| | सुप्ती | परिप्लुता | श्वास | — |
| | पिपीलिकागम | (श्रोणिवंक्षण | कास | — |
| | स्तब्ध–स्तम्थ | पृष्ठार्ती) | कंडू | — |
| | | | अल्पवेदना | — |

**रजःस्राव–परीक्षण :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रजःप्रवृत्ती – | विषम | सम | सम | विषम |
| रजःप्रमाण – | अल्प | प्रभूत | अल्प | — |
| रजःकाल – | अल्प | प्रदीर्घ | अल्प | — |
| रजःचक्रकाल – | विषम | अल्प | प्रदीर्घ | — |
| रजःस्राव स्वरूप – | तनू | दुर्गंधी साक्षात रक्त | ग्रंथिल | — |

**आनुषंगिक लक्षणे :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शूल – | तीव्र | — | मंद | तीव्र |
| | मलबद्धता | शिरःशूल | प्रसेक | ज्वर |
| | | ज्वर | हृल्लास | दाह |
| | | | छर्दी | |

**योनि-परीक्षण :**

**(१) प्रथमावर्त** – दर्शन – प्रकृत व विकृत –

प्रकृत – बाह्ययोनीचे दर्शन, आकृती, लोम, विटप, सिवनी यांची दर्शनपरीक्षा, स्त्रीविशिष्ट लक्षणे पाहावीत.

विकृत – व्रण, अर्श, शोथ, योनिकंद, राग, पाक, कोथ, गुल्म, ग्रंथी, स्रावपरीक्षण इत्यादी.

स्पर्शन – स्पर्शासहत्व, काठिण्य, मार्दव, द्रवप्रचीती इत्यादी.

प्रश्न – दर्शन व स्पर्शन यांच्या अनुषंगाने येणारे प्रश्न व लक्षणांची निश्चिती.

**(२) द्वितीयावर्त** – योनिवीक्षण यंत्राने दर्शनपरीक्षा करावी.

दर्शन – गर्भाशयमुख– आकार बघावा.
अतिसंकोच, अतिविकृतत्व इत्यादी.
प्रथमावर्तातील विकृतीच्या लक्षणांप्रमाणे विकृतीची लक्षणे असल्यास बघावी.

स्पर्शन – स्थिती, आकार, काठिण्य, मृदुता, स्पर्शासहत्व इत्यादी.

प्रश्न – प्रथमावर्ताप्रमाणे.

**(३) तृतीयावर्त** – गर्भाशय, अंतःफल, आर्तववाहिन्या यांची परीक्षा करावी.

गर्भाशय – द.
दर्शन – —
स्पर्शन – स्थिती आकार, स्पर्शासहत्व, काठिण्य, मृदुता, चल, अचल इत्यादी गोष्टी पाहाव्यात.

प्रश्न – प्रथमावर्ताप्रमाणे.



चिकित्सा – शोधन, शमन, स्नेहन, स्वेदन, रुक्षण, स्तंभन.

(१) शोधन – वमन, विरेचन, बस्ती, नस्य, रक्तमोक्ष.

(२) शमन – दीपन, पाचन, क्षुधानिरोध, तृष्णानिरोध, आतपसेवन मारतसेवन.

(३) स्नेहन – घृत, स्नेह, वसा, मज्जा, अंतःस्नेह, बाह्यस्नेह.

(४) स्वेदन – अवगाहस्वेद, नाडीस्वेद, तापस्वेद, बाष्पस्वेद, उपनाहस्वेद इत्यादी.

(५) रुक्षण – –

(६) स्तंभन – स्थानिक, सार्वदेहिक.

❋ ❋

२

# गर्भ-विज्ञानीय

## गर्भसंभव सामग्री

योग्य रीतीने एकत्र झालेल्या शुक्र आणि आर्तव यांच्या संयोगात आपआपल्या पूर्वकर्मानुरूप जीवांचा संचार होतो. आणि मग गर्भोत्पत्ती होते. ही गर्भोत्पत्ती होण्यासाठी चार गोष्टींची अत्यंत गरज असते. ज्याप्रमाणे अंकुर उगवण्यासाठी योग्य काल, भूमी, बीज आणि जल यांची आवश्यकता असते, त्याप्रमाणे गर्भोत्पत्तीसही योग्य असा ऋतुकाल, ज्या ठिकाणी गर्भाची उत्पत्ती व वाढ व्हावयाची तो गर्भाशय, शरीराच्या अवयवास मूलभूत कारण असलेले स्त्री-पुरुष-बीज, आणि या सर्वांच्या पोषणासाठी



परिवर्धनासाठी प्रसादरूप असा उपधातू रज हे सर्व भाव अविकृत व संपन्न अशा स्थितीत असले पाहिजेत. आणि त्यांचा संयोगही योग्य रीतीने व्हावयास पाहिजे. यातील ऋतुकाल व क्षेत्रभूत असा गर्भाशय यांचा विचार मागील अध्यायात झाला आहे. प्रसादरूप उपधातू रज त्याचेही वर्णन मागे झाले आहे. या ठिकाणी गर्भोत्पत्तीतील मुख्य घटक जे बीज त्याचा साकल्याने विचार आवश्यक आहे. गर्भोत्पत्तीसाठी बीजरूपाने आविर्भूत होणारे ' शुक्र ' आणि ' आर्तव ' हे दोनही भाव उत्तम आरोग्यसंपन्न स्थितीत असले पाहिजेत; तरच सुप्रजाजननास योग्य अशी गर्भोत्पत्ती होईल. [1]गर्भधारणेपासून पुढे मातेला सर्व दृष्टींनी प्राधान्य असले तरी पुरुषाचा उल्लेख चरकाने प्रथम केला आहे. त्याचे मैथुनविषयक स्वातंत्र्य व शरीरभावामध्ये अस्थीसारख्या प्रधान अवयवांचे कारणच लक्षात घेतलेले आहे.

### पुरुषबीज ( शुक्र ) :

[2-3]पुरुषाच्या शुक्राचे अनुपहतत्व म्हणजे दोषरहितत्व कसे असते व त्याची विकृती कशी उत्पन्न होते ते पाहिले पाहिजे. चरकाने यासाठीच पुरुष शुक्राचीही परीक्षा करण्यास सांगितली आहे. शुक्र हे गर्भोत्पत्तीस योग्य आहे की नाही याची परीक्षा करावी. वातादी दोषांनी दुष्ट असेल तर त्यांच्यामुळे उत्पन्न होणाऱ्या विशिष्ट वर्णादी लक्षणांवरून कोणत्या दोषांनी शुक्र दुष्ट आहे ते जाणावे व मग त्या पुरुषास पंचकर्मोपचारांनी शुद्ध करून त्या त्या दोषांना योग्य अशी चिकित्सा करावी.

---

– शुद्धे शुक्रार्तवे सत्त्वः स्वकर्मक्लेशचोदितः ।
गर्भः संपद्यते युक्तिवशात् अग्निरिवारणौ । वा. शा. १–१
( अरणिः = घर्षणाने अग्नी उत्पन्न करणारे लाकूड. )

– ततः शुद्धे शुक्रार्तवे स्वकर्मक्लेशचोदितः एव स सत्त्वः गर्भः संपद्यते । नान्यथा कथं इत्याह युक्तिवशात् अग्निः इव अरणौ । तथाहि मथ्य-मंथन-मथकादि-सामग्रिमंतरेण अरणौ अग्निः यथा न जायते तथा गर्भोऽपि यथोक्तसामग्रिवैकल्यात् न भवति । सकल–सामग्रि–सद्भावात् एव भवति इति भावः । वा. शा. १–१ टीका

– ध्रुवं चतुर्णां सान्निध्याद्गर्भः स्याद्विधिपूर्वकम् ।
ऋतुक्षेत्रांबुबीजानां सामग्र्याद‍ङ्कुरो यथा । सु. शा. २–३३

– एवं ध्रुवं निश्चितं चतुर्णाम् ऋत्वादीनां नैक, द्वि, त्रि, संख्यानाम् विधिपूर्वकं सान्निध्यात् यथोक्त-संयोगात् गर्भः जायते । ऋतुरंगनारजःसमयः क्षेत्रं गर्भाशयः अंबु-पुनराहारपाकजः व्यापिरसधातुः बीजं स्त्रीपुंसयोरार्तवशुक्रे । सु. शा. २–३३ टीका.

– पुरुषस्य अनुपहतरेतसः स्त्रियाश्च अप्रदुष्टयोनिगर्भाशयायाः यदा भवति संसर्गः ऋतुकाले यदा च अनयोः तथायुक्ते संसर्गम् अंतः गर्भाशयगतं जीवः अवक्रामति सत्त्वसंप्रयोगात् तदा गर्भः अभिनिर्वर्तते । च. शा. ३–३

– एवं योनिषु शुद्धासु गर्भं विदन्ति योषितः ।
अदुष्टे प्राकृते बीजे जीवोपक्रमणे सति ॥ च. चि. ३०–१२५

– अदुष्टे इत्यादी प्राकृते बीजे इति सहजगुणसंपन्ने शुक्रशोणितबीजे अदुष्टे सति । टीका

१ प्रथमं तु पुरुषस्य मैथुने स्वातंत्र्यात् तथा शरीरधारकप्रधानास्थिकारणत्वाच्च अग्रे अभिधानम् कृतम् । च. शा. ३–३ टीका

२ पंचकर्मविशुद्धस्य पुरुषस्यापि चेन्द्रियम् ।
परीक्ष्य वर्णैर्दोषाणां दुष्टं तद्घ्नैरुपाचरेत् । च. चि. ३०–१२६

३ इंद्रियं शुक्रम् । टीका

[1]-[2]गर्भोत्पत्तीस उपयोगी पडणारे शुद्ध शुक्र हे शीत गुणाचे, स्निग्ध, गुरु, शुक्ल, मधासारखा गंध असलेले, मधुर, पिच्छिल, प्रमाणाने पुष्कळ असलेले, फार पातळ नाही, पण घट्टही नाही, असे (बहल) तूप, तेल, मध यांपैकी एकासारखे रंगाने दिसणारे व स्रावाच्या वेळी कोणत्याही स्वरूपाचा दाह न उत्पन्न करणारे निर्मल (स्फटिकसंनिभ) असे असते.

## शुक्रदुष्टीची कारणे :

हे शुक्र ज्या वेळी अनेक कारणांनी दुष्ट होते, त्या वेळी अकाल वृष्टीने कुजलेल्या, कृमि-कीटकामुळे किडलेल्या, अग्नीमुळे होरपळलेल्या बीजांतून अंकुर निघत नाही. त्याप्रमाणे गर्भोत्पादन होऊ शकत नाही.

शुक्राची गर्भोत्पादनक्षमता पुढील कारणांनी उणावते वा नष्ट होते :

अतिमैथुन, अतिव्यायाम, असात्म्य पदार्थांचे सेवन, अवेळी मैथुन करणे, विकृत मनोवृत्तीमुळे योनिमार्गाव्यतिरिक्त इतर ठिकाणी मैथुन करणे (गुदमैथुनासारखे), योग्य वेळी मैथुन न करणे; रूक्ष, कडू, तुरट, आंबट, उष्ण अशा पदार्थांचे सेवन अति प्रमाणात करणे, मैथुनाविषयी आवड नसलेल्या स्त्रीशी मैथुन करणे, म्हातारपण, चिंता, शोक, विश्वासघात, शस्त्र, क्षार, अग्नी यांच्या उपचारातील मिथ्यायोग, भय, क्रोध, अभिचार (जादूटोणा), दीर्घकालीन व्याधीमुळे आलेली कृशता, वेगरोध,

१ तत् सौम्यं, स्निग्धं, गुरु, शुक्लं, मधुगंधि, मधुरं, पिच्छिलम्, बहुबहलं, घृततैलक्षौद्रान्यतमवर्णं च शुक्रं गर्भाधानयोग्यं भवति । अ. सं. शा. १–९

२ स्निग्धं घनं पिच्छिलं च मधुरं चाविदाहि च ।
रेतः शुद्धं जानीयाच्छ्वेतं स्फटिकसन्निभम् । च. चि. ३०–१४५
बीजं यस्माद्व्यवाये तु हर्षयोनिसमुत्थितम् ।
शुक्रं पौरुषमित्युक्तं तस्माद्वक्ष्यामि तच्छृणु ॥
यथा बीजमकालाम्बुकृमिकीटाग्निदूषितम् ।
न विरोहति संदुष्टं तथा शुक्रं शरीरिणाम् ॥
अतिव्यवायाद्व्यायामादसात्म्यानां च सेवनात् ।
अकाले वाऽप्ययोनौ वा मैथुनं न च गच्छतः ॥
रूक्षतिक्तकषायातिलवणाम्लोष्णसेवनात् ।
नारीणामरसज्ञानां गमनाज्जरया तथा ॥
चिन्ताशोकादविस्रम्भाच्छस्त्रक्षाराग्निविभ्रमात् ।
भयात्क्रोधादभीचाराद्व्याधिभिः कर्शितस्य च ।
वेगाघातात् क्षयाच्चापि धातूनां संप्रदूषणात् ।
दोषाः पृथक् समस्ता वा प्राप्य रेतोवहाःसिराः ।।
शुक्रं संदूषयन्त्याशु .... .... । च. चि. ३०–१३३ ते १३९



व्रण आणि धातुदुष्टी, इत्यादी शारीरिक व मानसिक कारणांनी विकृती उत्पन्न झाल्यामुळे दोष प्रकुपित होऊन रेतोवह सिरांचा आश्रय करतात व शुक्रदुष्टी उत्पन्न करतात. अतिव्यायामामुळे शुक्राला प्रथमतः द्रवता येते व हा पातळपणा गर्भोत्पत्तीस अनुकूल नसतो.

पैलवानी पेशाच्या व्यायामामुळे दोन तऱ्हेचे परिणाम होतात. एक शरीरातील मांस धातूंच्या बृंहणांकडे रसाचा विनियोग अधिक होतो व त्यामुळे शुक्र उत्पन्न होण्यास पुरेसा रस उरत नाही. तसेच शुक्र हे सार्वदेहिक असल्यामुळे व्यायामाने त्याच्या अनुलोमगतीसही अडथळा उत्पन्न होतो. या प्रतिरुद्ध सार्वदेहिक शुक्रामुळे ओजाची वृद्धी होऊन तुष्टी, पुष्टी, बलोदयादी चांगले भाव उत्पन्न होत असले तरी, शुक्राच्या अनुलोमगतीवर अवलंबून असणारे गर्भोत्पादनाचे कार्य नीट होण्यास प्रत्यवाय येतो. व्यायाम याहीपेक्षा जास्त झाला तर वातवृद्धी होऊन धातुक्षय होतो. स्त्रीला मैथुनविषयक अप्रीती असेल तर त्याचा परिणाम पुरुषाला उद्वेग उत्पन्न होण्यात होतो व त्यामुळे षंढत्व येते, हे क्वचित मर्यादितही असते. यासाठीच "विमना अन्यकामा अकामा" अशी स्त्री मैथुनासाठी वर्ज्य सांगितली आहे.

इतर कारणांमध्ये चिंता, शोकादी कारणे मनोविघातकर आहेत. आहाराशी संबद्ध असलेली कारणे ही दोषदुष्टी उत्पन्न करणारी आहेत. त्यामुळे धातुदुष्टीही होते. शस्त्रक्षाराग्निकर्मादी कारणे प्रत्यक्ष स्रोतोविकृती उत्पन्न करतात.

## शुक्रदुष्टीची लक्षणे :

[1]वरील अतिव्यवायादी कारणांमुळे शुक्र हे आठ प्रकारांनी दुष्ट होते. ती आठ लक्षणे अशी – फेसकट, पातळ, रूक्ष, विवर्ण (विकृतवर्णयुक्त), दुर्गंधी, चिकट, इतर धातूंनी युक्त ( विशेषतः रक्ताने युक्त ), घट्ट झाल्यामुळे लवकर न स्रवणारे व स्रवताना कष्ट देणारे असे असते.

फेनिल, तनू, रूक्ष, कृच्छ्र, अल्प ही लक्षणे वातदुष्ट शुक्रामुळे उत्पन्न होतात.

पित्तदुष्टीमुळे शुक्र हे नीलवर्ण, दुर्गंधियुक्त व स्रावाच्या वेळी आग उत्पन्न करणारे असते.

१ फेनिलं तनु रूक्षं च विवर्णं पूति पिच्छिलम् ॥
अन्यधातूपसंसृष्टमवसादि तथाऽष्टमम् । फेनिलं तनु रूक्षं च कृच्छ्रेणाल्पं भवत्युप हतं शुक्रं न तद्गर्भाय कल्पते । सनीलमथवा पीतमत्युष्ण पूतिगंध च मारुतात् च ।। दहल्लिङ्गं विनिर्याति शुक्रं पित्तेन दूषितम् । श्लेष्मणा बद्धमार्गं तु भवतीत्यर्थपिच्छिलम् ।। स्त्रीणामत्यर्थगमनादभिघातात् क्षतादपि । शुक्रं प्रवर्तते जन्तोः प्रायेण रुधिरान्वयम् ।। वेगसंधारणाच्छुक्रं वायुना विहतं पथि । कृच्छ्रेण याति ग्रथितमवसादि तथाऽऽष्टमम् ।। इति दोषाः समाख्याताः शुक्रस्याष्टौ सलक्षणाः ।।
च. चि. ३०–१३९ ते १४५

कफावरोधामुळे शुक्र फार चिकट बनते. अतिमैथुनामुळे, मार लागल्यामुळे वा व्रणामुळे रक्तयुक्त शुक्रस्राव होतो.

वेगधारणामुळे वायूची गती प्रतिलोम होऊन शुक्र मार्गामध्येच अडखळते. त्यामुळे त्याच्या गाठी बनतात आणि बाहेर पडताना फार कष्ट होतात.

## [१]शुक्रदुष्टीची चिकित्सा :

या शुक्रदुष्टीसाठी सुखावह असे वाजीकरण प्रयोग, रक्तपित्त किंवा योनिरोग यांमध्ये सांगितलेले शमन-शोधन प्रयोग यथायोग्य रीतीने करावेत.

जीवनीय गणांनी सिद्ध केलेले घृत, च्यवनप्राश, शिलाजतु यांच्या उपयोगाने शुक्रातील दोष नष्ट होतात.

वातदुष्ट शुक्रासाठी निरुह आणि अनुवासन बस्तीचा उपयोग करावा.

पित्तदुष्टीसाठी अभयामलकीरसायन वापरावे.

पिंपळी, गुळवेल, लोध्र, त्रिफळा, भल्लातक यांच्या उपयोगांनी कफामुळे उत्पन्न झालेले शुक्रदोष नाहीसे होतात.

शुक्रामध्ये धातूंचा संसर्ग असेल तर त्याला अनुबंधाप्रमाणे दोषधातूंचे उपचार युक्तीने करावेत.

तूप, दूध, मांसरस, यव, गहू, साठेसाळीचा उपयोग, शुक्रदोषासाठी पथ्यास करावा.

शुक्रदोषाला अपानाची दुष्टी, विशेषतः कारण असल्यामुळे निरनिराळ्या प्रकारांच्या बस्तीचाही विशेष उपयोग होतो.

## स्त्रीबीज :

स्त्रीबीज जे आर्तव, त्याची शुद्धता वा अनुपहतता ही रजाच्या स्वरूपावरून आणि ऋतुमती स्त्रीच्या ठिकाणी व्यक्त होणाऱ्या प्राकृत लक्षणांवरून जाणावीत.

---

[१]वाजीकरण योगैस्तैरुपयोगसुखैर्हितैः ।
रक्तपित्तहरैर्योगैर्योनिव्यापदिकैस्तथा । दुष्टं यदा भवेच्छुक्रं तदा तत् समुपाचरेत् ॥ घृतं च जीवनीयं यच्च्यवनप्राश एव च । गिरिजस्य प्रयोगश्च रेतोदोषानपोहति ॥ वातान्विते हिताः शुक्रे निरुहाः सानुवासनाः । अभयामलकीयं च पैत्ते शस्तं रसायनम् ॥ मागध्यमृतलोहानां त्रिफलाया रसायनम् । कफोत्थितं शुक्रदोषं हन्याद्भल्लातकस्य च ॥ यदन्यधातुसंसृष्टं शुक्रं तद्वीक्ष्य युक्तितः । यथादोषं प्रयुञ्जीत दोषधातुभिषग्जितम् ॥ सर्पिः पयो रसाः शालिर्यवगोधूमषष्टिकाः । प्रशस्ताः शुक्रदोषेषु बस्तिकर्म विशेषतः । इत्यष्टशुक्रदोषाणां मुनिनोक्तं चिकित्सितम् ॥
च. चि. ३०–१४६ ते १५४.



## गर्भाधान :

[१]शुद्ध शुक्र असलेल्या पुरुषाने व शुद्ध शोणित, प्रकृतयोनी, गर्भाशय असलेल्या स्त्रीने गर्भाधानासाठी मैथुनास विधिपूर्वक प्रवृत्त व्हावे.

[२]रजःप्रवृत्तीनंतर स्त्रीने तीन दिवस रजःस्वला नियमांनी वागून चवथे दिवशी डोक्यावरून शुद्ध स्नान करावे. स्वच्छ शुभ्र वस्त्र परिधान करावे. अलंकार व पुष्पमाला धारण कराव्या व प्रिय पतीच्या संगमाची इच्छा करीत सम दिवशी (रजोदर्शनापासून चार, सहा, आठ हे सम दिवस व तीन, पाच, सात हे विषम दिवस) पुत्रप्राप्तीची इच्छा असताना, व विषम दिवशी कन्याप्राप्तीची इच्छा असताना पतीसह मैथुनास प्रवृत्त व्हावे. [३]मैथुनकाली कोणीही फार जेवण झालेले, भुकेलेले, तहानलेले, विमनस्क, शोकाकुल, संतापलेले, परस्परांविषयी प्रेम नसलेले, अतिबाल, अतिवृद्ध, वा रोगयुक्त असू नये. [४]स्त्रीपुरुषांनी त्या दिवशी पंचकर्मोपचारांनी स्वशरीर शुद्ध करावे. पुरुषाने मधुर औषधाने सिद्ध केलेले तूप व दूध सेवन करावे. स्त्रीने तेल आणि उडीद यांनी सिद्ध केलेले पदार्थ भक्षण करावेत. [५]शयनगृह हे एकान्तात असावे, तेथील शय्या विस्तृत, सुखकारक व स्वच्छ वस्त्रांची असावी. ते स्थल पुष्पादींनी शृंगारलेले असावे, धूपादींनी सुगंधित केलेले असावे.

[६]प्रसन्न व प्रेमपूर्वक अंतःकरणाने परस्परांच्या संगतीत कामेच्छा उत्पन्न झाल्यावर

---

१ स्त्रीपुंसयोरव्यापन्नशोणितगर्भाशययोः श्रेयसीं प्रजामिच्छतोस्तदर्थाभिनिर्वृत्तिकरं कर्मोपदेक्ष्यामः । च. शा. ८५

२ ततः पुष्पात् प्रभृति त्रिरात्रमासीत ब्रह्मचारिण्यधःशायिनी, पाणिभ्यामन्नं जर्जरात् पात्राद् भुञ्जाना च । न च काञ्चिन्मृजामापद्येत । ततश्चतुर्थेऽह्न्येनामुत्साद्य सशिरस्कं स्नापयित्वा शुक्लानि वासांस्याच्छादयेत् । पुरुषं च । ततः शुक्लवाससौ स्रग्विणौ सुमनसावन्योन्यमभिकामौ संवसेयाताम् । स्नानात् प्रभृति युग्मेष्वहःसु पुत्रकामौ अयुग्मेषु दुहितृकामौ । च. शा. ८–५

३ तत्रात्यशिता क्षुधिता पिपासिता भीता विमना शोकार्ता क्रुद्धाऽन्यं च पुमांसमिच्छन्ती मैथुने चातिकामा वा न गर्भं धत्ते । विगुणां वा प्रजां जनयति । अतिबालामतिवृद्धां दीर्घरोगिणीमन्येन वा विकारेणोपसृष्टां वर्जयेत् । पुरुषेऽप्येत एव दोषाः । अतः सर्वदोषवर्जितौ स्त्रीपुरुषौ संसृज्येयाताम् । च. शा. ८–७

४ अथाप्येतौ स्त्रीपुंसौ स्नेहस्वेदाभ्यामुपपाद्य वमनविरेचनाभ्यां संशोध्य, क्रमेण प्रकृतिमापादयेत् । आचरेच्च मधुरौषधसंस्कृताभ्यां घृतक्षीराभ्यां पुरुषं, स्त्रियं तु तैलमाषाभ्याम् । च. शा. ८–४

५ सञ्जातहर्षा मैथुने.........वामपादेन स्त्री । च. शा. ७–८

६ नच न्युब्जां पार्श्वगतां.........यथास्थानमतिष्ठन्ते दोषाः । च. शा. ८–६

मैथुनास प्रवृत्त व्हावे. स्त्रीने पाठीवर निजूनच बीजग्रहण करावे. मैथुनाच्या वेळी पालथ्या वा कुशीवरच्या स्थितीत असू नये. उत्तानासन हेच सर्व दृष्टीने श्रेष्ठ आसन होय. पालथ्या स्थितीमध्ये वातप्रकोपामुळे योनिमार्गास विकृती येते. उजव्या कुशीवर कफामुळे गर्भाशयमुख अवरुद्ध होते. डाव्या कुशीवर पित्त प्रकुपित होऊन ते शुक्रार्तवास दुष्ट करते. (या वर्णनाची संगती नीट लक्षात येत नाही) म्हणून ही आसने गर्भाधानास योग्य नाहीत.

[1]ऋतुकाली मैथुनास प्रवृत्त झालेल्या स्त्री-पुरुषांच्या योनी आणि शिस्न यांच्या संघर्षाने सर्व शरीर कामसंतप्त व प्रक्षुब्ध होते. पुरुषांचा सर्व शरीरव्यापी असा शुक्रधातू वायूने उत्तेजित होतो व गर्भोत्पादक असे (वृषणस्थ) शुक्र शिस्नातून स्त्रीच्या गर्भाशयमुखाशी स्रवते. तेथून ते ऋतुकालामध्ये विवृतमुख असलेल्या स्त्रीच्या गर्भाशयात प्रविष्ट होते व प्रविष्ट होताच स्रोतसात आलेल्या स्त्रीबीजभूत आर्तवाने वेढले जाते (पुंबीज स्त्रीबीजात प्रविष्ट होते) म्हणजेच स्त्रीबीजाने पुंबीज आवृत होते.

असे प्रविष्ट झालेले बीज म्हणजेच गर्भ गर्भाशयात संसक्त झाल्यानंतर प्रसादरूप रजाने परिवेष्टिला जातो व त्याच ठिकाणी गर्भाचे पोषण उपस्नेहन न्यायाने सुरू होते.

[2]पुरुषबीजास आवृत करणारे हे स्त्रीबीज शेंबासारखे गोल व अगदी लहान आकाराचे असून संख्येने एक, दोन वा तीन प्रमाणात असते. एकाहून अधिक संख्येत असेल त्या वेळी बह्वपत्यता होते. [3]हाच शुक्रशोणितसंयोग होय. यासच पूर्णार्थाने बीज असे म्हणता येते. ह्या बीजामध्ये ज्या वेळी जीव प्रविष्ट होतो, त्या वेळी त्यास गर्भ ही संज्ञा प्राप्त होते. हा गर्भ मुख्यत: कोणामुळे उत्पन्न होतो याविषयी चरकाच्या शारीरस्थान अध्याय तीनमध्ये विशेष प्रकारची चर्चा केलेली आढळते.

## गर्भहेतू :

[4]आत्रेयांनी आरंभीच सांगितले आहे की, गर्भाचे भाव मातेपासून, पित्यापासून, आत्म्यापासून, सवयीपासून (सात्म्य), आहाररसापासून उत्पन्न होतात, आणि सत्त्व

१ ऋतौ स्त्रीपुंसयोर्योगे.........शुक्रवदायातेनार्तवेन युतं भवेत् ।। भावप्रकाश, गर्भप्रकरण, पान १२

प्रविष्टमात्रं बीजं हि रक्तेन परिवेष्टयते । का. शा. असमानगोत्रीय अध्याय, पान ७०

२ ऋतौभवं आर्तवम् । मातुर्द्विस्त्रिबिंदुकावस्थं शोणितम् । वा. सू. १–९ टीका

३ यदा चानयोस्तथैव...... गर्भोऽभिनिर्वर्तते । च. शा. ३–३

४ मातृजश्चायं गर्भः पितृजश्चात्मजश्च सात्म्यजश्च, रसजश्च, अस्ति च खलु सत्त्वमौपपादुकमिति होवाच भगवानात्रेयः । च. शा. ३–३

– नेति भरद्वाजः, किं कारणम्...न हि माता न पिता...गर्भं सत्त्वमवक्रामति । च. शा. ३–४



म्हणजे मन हे त्या ठिकाणी आत्मशरीर संबंधास कारणीभूत होते. यावर भरद्वाज या आत्रेयाच्या शिष्याने आक्षेप घेतला. तो म्हणाला की– आई, वडील, आत्मा, सवयी, खाणेपिणे हे गर्भाच्या उत्पत्तीस कारणीभूत होतात हे मानणे योग्य नाही. जीव परलोकांतून येऊन गर्भामध्ये संचार करतो हेही म्हणणे उचित नाही.

आईबाप जर गर्भास कारण मानले तर गर्भ त्यांच्या इच्छेप्रमाणे उत्पन्न झाला पाहिजे, पण तसे कधीच होत नाही. काहींना मुलगे हवे असतात तर काहींना मुली हव्या असतात; व त्या हेतूनेच ते एकत्रही येतात. पण त्यांच्या इच्छेप्रमाणे मुलगे किंवा मुली होतातच असे नाही.

तसेच आपणास मूल व्हावे असे पुष्कळ वाटत असूनही मूल होत नाही. मुलाची इच्छा करणारे ते बापडे दुःखी राहतात. तेव्हा गर्भोत्पत्ती ही मातापित्यांच्या स्वाधीन आहे असे म्हणण्यात काय अर्थ आहे ?

[1]आत्माही कारण मानता येत नाही. आत्मा जो आत्म्यास उत्पन्न करतो तो उत्पन्न झालेला, की उत्पन्न व्हावयाचा,– दोनही गोष्टी योग्य नाहीत. जो उत्पन्न झाला आहे तो आहेच, त्याची पुन्हा उत्पत्ती कशी होणार, आणि जो उत्पन्न झालाच नाही तो स्वतःच अभावरूप असल्यानंतर दुसऱ्यास उत्पन्न करणार तरी कसा ? पुन्हा एका आत्म्यापासून दुसरा आत्मा असे द्वैत मानणे शास्त्रदृष्ट्या योग्य आहे काय ? असो, हा आक्षेप राहू द्या. असे होते असे एक वेळ गृहीत धरू. परंतु याहून मोठी शंका अशी की, आत्मा हा नको असलेल्या हीन योनीमध्ये कसा प्रकट होतो ? तो स्वत: तर स्वतंत्र अप्रतिहतगती ( ज्याच्या संचारास कोणत्याही प्रकारे अडथळा उत्पन्न होत नाही असा ) आपल्या इच्छेप्रमाणे रूप धारण करू शकणारा, तेज, बल, वेग, वर्ण, सत्त्व यांनी युक्त, अजर, अमर व रोगरहित आहे. तेव्हा तो स्वतःच जर कारण असेल तर आपणापासून उत्पन्न होणारा गर्भ असाच किंवा याहूनही चांगला, अधिक गुणसंपन्न उत्पन्न होण्याचीच इच्छा करणार. पण प्रत्यक्षात मात्र यातील काहीच आढळत नाही. जे उत्पन्न झाले ते गुणहीन, व्यंगयुक्त, रोगी, दुःखी, कुरूप असे आढळतात; त्यामुळे आत्मा हे कारण मानता येत नाही.

– यदि हि मातापितरौ........ वा परिदेवेरत् । च. शा. ३–५

१ न चात्माऽऽत्मानं जनयति । यदि ह्यात्माऽऽत्मानं जनयेत् जातो वा जनयेदात्मानमजातो वा, तमचोभयच्ययुक्तम् । न हि जातो जनयति सत्त्वात्, नचाऽजातो जनयत्यसत्त्वात, तस्मादुभयथाऽप्यनुपपत्तिः। तिष्ठतु तावदेतत्, यद्ययमात्माऽऽत्मानं शक्तो जनयितुं स्यात्, नत्वेनमिष्टास्वेव कथं योनिषु जनयेद्वशिनमप्रतिहतगतिं कामरूपिणं तेजोबलजववर्णसत्वसंहननसमुदितमजरमरुजममरम् । एवंविधं ह्यात्माऽऽत्मानमिच्छत्यतो वा भूयः । च. शा. ३–६

[१]सवयी या गर्भास कारण आहेत असे म्हणावे तर नेहमी हितकर सवयी असणारांनाच मुले व्हावीत; जे वाटेल तसे वागतात त्यांना मुले होऊच नयेत. पण आढळते ते दोन्हीकडे दोन्ही प्रकारचे. यासाठी सात्म्य गर्भकारण आहे असे मानता येणार नाही.

गर्भ हा आहारापासून उत्पन्न होतो म्हणावे तर प्रत्येक स्त्री-पुरुषाला मुले ही झालीच पाहिजेत, कारण कोणीही असा नाही की आहार घेत नाही किंवा ज्याच्या ठिकाणी आहाररस उत्पन्न होत नाही. बरे, सर्वगुणसंपन्न असा श्रेष्ठ आहार जे घेतात त्यांचाच आहाररस चांगला असतो व त्यांनाच गर्भ उत्पन्न होतो असे म्हणावे, तर चांगले उत्कृष्ट मांस खाणारे, दूध, तूप, दही, मध यांचा उपयोग करणारे, आणि उत्तम प्रकारची धान्ये आहारात असणारे, जे संपन्न लोक त्यांनाच तेवढी मुले व्हावीत, रानावनात राहून, कंदमुळे खाणारे, वा नाचणी, वरी यांसारख्या क्षुद्र तृणधान्यांचा उपयोग करणारे अपत्यहीन असले पाहिजेत. पण येथेही पुन्हा दोन्ही प्रकारच्या लोकांमध्ये दोनही प्रकार आढळतात. मग आहाररस गर्भकारण आहे, असे म्हणण्यात काय अर्थ आहे ?

जीव हा परलोकांतून येऊन शुक्र-शोणित संयोगामध्ये प्रवेश करून गर्भ उत्पन्न करतो, या म्हणण्यातही अर्थ नाही. खरोखरीच जीवाचे संक्रमण जर गर्भामध्ये झाले असते, तर त्याला पूर्वजन्माचे स्मरण राहिले असते. पूर्वजन्माविषयी पाहिलेले, माहिती असलेले त्याला या वेळीही आठवले असते. पण तसे काही होत नाही, म्हणून गर्भाला *माता, पिता, आत्मा, सात्म्य, रस हे काहीही कारण नाही. आणि सत्त्व (जीव किंवा मन)*, त्याच्या पूर्वजन्माचा परजन्माशी व आत्म्याचा नव्या जन्माशी संबंध जोडणारे असते असेही म्हणता येणार नाही, असे आमचे मत आहे.

याप्रमाणे भरद्वाजाने शंका उपस्थित करून तत्संबंधी आपल्या कल्पनेप्रमाणे कारण प्रतिपादन केले.

१ असात्म्यजश्चायं गर्भः । यदि हि सात्म्यजः स्यात्, तर्हि......तच्चोभयमुभयत्रैव दृश्यते । च. शा. ३–७
अरसजश्चायं गर्भः । यदि हि रसजः स्यात्......निखिलेनानपत्याः स्युः तच्चोभयमुभयत्र दृश्यते । च. शा. ३–८
– न खल्वपि परलोकादेत्य सत्त्वं गर्भमवक्रामति । यदि......वा, स च तच्च न च किञ्चिदपि स्मरति । च. शा. ३–९
– तस्मात् एतद् ब्रूमहे–अमातृजश्चायं गर्भः अपितृजश्चानात्मजश्चासात्म्यजश्चारसजश्च, न चास्ति सत्त्वमौपपादुकमिति होवाच भरद्वाजः । च. शा. ३–१०
– नेति भगवानात्रेयः सर्वेभ्य एभ्यो भावेभ्यः समुदितेभ्यो गर्भोऽभिनिर्वर्तते ।
च. शा. ३–११



त्यावर आत्रेय महर्षी म्हणाले : या सर्व शंका व्यर्थ आहेत. तू एकान्तिक दृष्टिकोण घेतला आहेस. मी सांगितलेल्या कारणांना प्रत्येकी स्वतंत्र स्वतंत्र उत्तरदायी मानलेस आणि सर्व गोष्टी एकामुळेच घडतात हे गृहीत धरलेस, हेच मुळी एकान्तिक आहे. मी सांगितलेल्या सर्वच भावांच्यामुळे गर्भ मूर्त स्वरूपात येतो. त्या कारणरूप भावांच्या समुदायामुळे गर्भाचे सर्व भाव सुसंपन्न होतात. जी गोष्ट समुदायामुळे उत्पन्न व्हावयाची असते, ती त्या समुदायाच्या अवयवांच्यापैकी एकेकाच्या अस्तित्वाने पूर्ण होत नाही हे योग्यच आहे.

गर्भाचे कोणकोणते भाव कोणकोणत्या कारणांनी उत्पन्न होतात ते तुला आता सांगतो.

[१]मातेपासून गर्भाची उत्पत्ती होत नाही, हे आपण पाहतोच. केवळ मनुष्य गर्भाचीच काय तर 'जरायुज' या कोटीमध्ये ज्या ज्या जीव-वर्गाचा समावेश होतो ते ते सर्व मातेच्या ठिकाणी उत्पन्न होतात. मातेवाचून त्यांचा जन्म होणे शक्य नाही. डास, बेडूक इत्यादी स्वेदज वर्गातील कृमि-कीटकांमधील किंवा वनस्पतींच्या उत्पत्तीमध्ये मातेच्या आधाराची साक्षात् जरूरी नसते. अंडजामध्ये जरी मातेचे काही प्रमाणात साहाय्य उत्पत्तीसाठी व आधारासाठी आवश्यक असले तरी जरायुजाइतका स्पष्ट संबंध त्याही योनीत नसतो. अंडजामध्ये पुरुषसंसर्गाव्यतिरिक्तही अंड विसर्जन होतच असते.

जरायुजामध्ये माता ही केवळ गर्भाच्या उत्पत्ती आणि धारणा एवढ्यालाच कारण नसून, उत्पन्न शरीराच्या घटनेतील काही अवयवांची निर्मितीही तिच्यामुळे घडते. हे अवयव असे– त्वचा, रक्त, मांस, मेद, नाभी, हृदय, क्लोम, यकृत, प्लीहा, वृक्क, बस्ती, आमाशय, क्षुद्रान्त्र, स्थूलान्त्र, पक्वाशय, पुरीषाधान, उत्तरगुद, अधरगुद, वपा व वपावहन हे सर्व मृदू मांसमय अवयव मातेमुळे (मातृबीजातून) उत्पन्न होतात. भावप्रकाशकाराने मज्जाही मातृज मानली आहे.

[२]पिता हाही गर्भास कारण आहे. पित्यावाचून गर्भाची उत्पत्ती झालेली आढळत

१ मातृजश्चायं गर्भः । न हि मातुर्विना गर्भोत्पत्तिः स्यात्, न च जन्मजरायुजानाम् । यानि खल्वस्य गर्भस्य मातृजानि यानि चास्य मातृतः संभवतः संभवन्ति तान्यनुव्याख्यास्यामः, तद्यथा— त्वक् च लोहितं च मांसं च मेदश्च नाभिश्च हृदयं च क्लोम च यकृच्च प्लीहा च वृक्कौ च बस्तिश्च पुरीषाधानं चामाशयश्च पक्वाशयश्चोत्तरगुदश्चाधरगुदं क्षुद्रान्त्रं च स्थूलान्त्रं च वपा च वपावहनं चेति मातृजानि ।
च. शा. ३–१२

२ पितृजश्चायं गर्भः । नहि पितुर्ऋते गर्भोत्पत्तिः स्यात् न च जन्म जरायुजानाम् । यानि खल्वस्य गर्भस्य पितृजानि यानि चास्य पितृतः संभवतः संभवन्ति तान्यनुव्याख्यास्यामः तद्यथा, केशश्मश्रुनखलोमदन्तास्थिसिरास्नायुधमन्यः शुक्रं चेति पितृजानि । च. शा. ३–१३

नाही, जरायुज प्राण्यांच्या उत्पत्तीसाठी मातेप्रमाणे पित्याचीही जरुरी असते. त्याच्या शुक्राचा स्त्रीशरीरातील स्त्रीबीज जे आर्तव त्याच्याशी संयोग व्हावाच लागतो. या संयोगापासून होणाऱ्या गर्भाच्या शरीराचे जे अवयव विकसित होत जातात त्यांतील केश, श्मश्रू (मिशा), नख, रोम, दंत, अस्थी, सिरा, स्नायू, धमनी, शुक्र यांच्या उत्पत्तीस पितृबीजच कारणीभूत असते.

शुक्र ज्याप्रमाणे पितृबीजोत्पन्न त्याप्रमाणे तत्सादृश्यात आर्तवही (स्त्रीबीज) मातृबीजोत्पन्न मानले पाहिजे.

मातृबीजोत्पन्न भाव जसे मृदू असतात तसे पितृबीजोत्पन्न भाव स्थिर, कठीण गुणांचे असतात.

[1]आत्मा हाही गर्भाच्या उत्पत्तीस कारणीभूत आहे. गर्भामध्ये प्रत्ययास येणारे जे चैतन्य ते आत्मसंबंधावाचून प्रत्ययास येत नाही. हा अंतरात्मा ज्या वेळी गर्भात्मा होतो त्या वेळीच त्याला जीव अशी संज्ञा प्राप्त होते. जीव ही संज्ञा शरीरसापेक्ष आहे. हे जीवत्व धारण करणारा जो आत्मा तो शाश्वत (सर्वदा अस्तित्वात असणारा), रोगरहित, अजर, अमर, अक्षय, अभेद्य, अछेद्य, क्षुब्ध न होणारा, विश्वरूप, विश्वकर्मा (वाटेल ते उत्पन्न करण्याचे सामर्थ्य असलेला), अव्यक्त, आरंभ व अंतरहित आणि क्षय न पावणारा असा स्वभावतः आहे. तो गर्भाशयामध्ये शिरून शुक्रार्तवाच्या संयोगात प्रविष्ट होऊन गर्भरूपाने स्वतःस प्रकट करतो, म्हणून त्यास तो उत्पन्न करतो असे म्हटले आहे. आत्म्यास स्वतःस उत्पत्ती नाही. पण तो पूर्वी नसलेल्या गर्भामध्ये चैतन्यरूपाने प्रकट होतो. म्हणून लक्षणेने तो स्वतः अजात असूनही गर्भास उत्पन्न करतो असे म्हटले जाते.

हाच गर्भ पुढे कालान्तराने बाल्य, तारुण्य, वार्धक्य, या अवस्थांतून जातो. ज्या ज्या अवस्थेतून तो जातो त्या त्या अवस्थेत तो तसा तसा होतो. मागील अवस्था पुढील अवस्थेस कारणीभूत होते, म्हणजे अवस्थानुरूप त्या गर्भाच्या ठिकाणी (शरीराच्या ठिकाणी) असणे आणि उत्पन्न होणे (नसलेले उत्पन्न होणे) असे दोनही भाव शब्ददृष्ट्या एकसमयावच्छेदाने राहतात. म्हणजे या ठिकाणी एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाणे म्हणजेच जन्म पावणे असा अर्थ होतो.

१ आत्मजश्चायं गर्भो गर्भात्मा ह्यन्तरात्मा यः तं जीव इत्याचक्षते। शाश्वतमरुजमजरममरमक्षयमभेद्यमलोड्यं विश्वरूपं विश्वकर्माणमव्यक्तमनादिमनिधनमक्षरमपि। स गर्भाशयमनुप्रविश्य शुक्रशोणिताभ्यां संयोगमेत्य गर्भत्वेन जनयत्याऽऽत्मनाऽऽत्मानम् आत्मसंज्ञा हि गर्भे, तस्य पुनरात्मनो जन्माऽनादित्वान्नोपपद्यते। तस्मान्न जात एवायमजातं गर्भं जनयति, अजातो ह्ययमजातं गर्भं जनयति।....तच्चापत्याद्भवति, तथा सतस्तस्यैव गर्भस्य तस्यां तस्यामवस्थायां जातत्वमजातत्वं चोच्यते ॥ च. शा. ३–१४



शुक्र, शोणित आणि जीव या तिघांमध्ये त्यांचा संयोग होण्यापूर्वी अस्तित्व असले तरी गर्भत्व नसते; गर्भत्व नव्यानेच उत्पन्न होते. ज्याप्रमाणे पुरुष हा प्रथमतःच अस्तित्वात असतो, पण अपत्यजन्मापूर्वी त्याच्या ठिकाणी पितृत्व असत नाही, ते अपत्यजन्मानंतर उत्पन्न होते. यात वस्तुतः नवीन काहीच होत नाही. पण एरव्ही लक्षात न येणारे, अवस्थान्तर मात्र असणे आणि उत्पन्न होणे या शब्दाने व्यक्त होते. त्याप्रमाणेच सतत तीनही काळी अस्तित्वात असणाऱ्या आत्म्याला गर्भाच्या ठिकाणी जीवत्व प्राप्त होते म्हणून आत्म्याने आत्मरूप जो जीव अथवा गर्भ त्याला उत्पन्न केले अशी परिभाषा वापरली जाते. त्यामुळे तत्त्वज्ञानदृष्ट्या आत्म्याचे नित्यत्व, अजत्व, अनादित्व अमान्य केले असे होत नाही. चैतन्याचा उलगडा एरव्ही असल्या कोणत्याही प्रकाराने होणे शक्य नसल्यामुळे गर्भाचे आत्मजत्व मान्य केलेच पाहिजे.

माता, पिता, आत्मा हे भाव गर्भाला कारणीभूत असतात हे जरी खरे असले तरी गर्भामधील प्रत्येक भाव प्रत्येक वेळी त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना घडविता येईल असे नाही. काही गोष्टी त्यांच्या स्वाधीन असतात आणि त्यांत ते आपल्या इच्छेप्रमाणे करू शकतात. पण काही गोष्टी कर्माधीन असतात; त्यामुळे त्यांच्या इच्छेशी कर्माची अनुकूलता नसली तर इच्छेप्रमाणे गोष्टी घडत नाहीत. उदा.– स्त्री–पुरुष स्वतःच्या इच्छेने गर्भोत्पत्तीसाठी मैथुनप्रवृत्त होतीलही. शुक्रशोणित संयोगोन्मुख होईलही. हे स्त्री–पुरुषांच्या पुष्कळसे स्वाधीनचे आहे, पण त्यांचा संयोग होऊन त्यामध्ये जीवाचा संचार होणे काही स्त्री–पुरुषांच्या स्वाधीनचे नाही. मिथ्या आहार–विहारामुळे उत्पन्न होणारे शुक्रआर्तवदूषक भाव नाहीसे करून शुक्र वा आर्तव गर्भोत्पत्तिक्षम बनविणे हे स्त्री–पुरुषांच्या स्वाधीनचे आहे. पण त्यांचा संयोग घडविणे हे काही त्यांच्या स्वाधीनचे नाही.

आत्माही गर्भाच्या ठिकाणी चैतन्य उत्पन्न करण्यास स्वतंत्र आहे, तसेच सत्कृत्य वा दुष्कृत्य यांच्या आचरणाचेही त्यास स्वातंत्र्यच आहे, पण कोणत्या योनीमध्ये जन्म घ्यावा, सुख, दुःख, कोणते भोगावे, कोणते टाळावे, या बाबतीत त्यास स्वातंत्र्य नाही, तेथे तो त्याच्या पूर्वकर्माने नियंत्रित आहे.

क्वचितच या माता, पिता, आत्मा, इत्यादी गर्भकारणांना मन, इंद्रिये, शुक्र

— न खलु गर्भस्य न च मातुर्न पितुर्नात्मनः सर्वभावेषु यथेष्टकारित्वमस्ति ते किंचित् स्ववशात् कुर्वन्ति, किंचित् कर्मवशात्, क्वचिच्चैषां करणशक्तिर्भवति, क्वचिन्न भवति। यत्र सत्त्वादिकरणसंपत् तत्र यथाबलमेव यथेष्टकारित्वमतोऽन्यथा विपर्ययः। न च करणदोषादकरणमात्मा संभवति गर्भजनने। दृष्टं चेष्टा योनिरैश्वर्यं मोक्षाश्चात्मविद्भिरात्मायत्तम्। नह्यन्यः सुखदुःखयोः कर्ता, न चान्यतो गर्भो जायते जायमानः न चाङ्कुरोत्पत्तिरबीजात्। च. शा. ३–१५

आर्तव इत्यादी साधनांची अनुकूलता असते, कधी नसते. ज्या वेळी या साधनीभूत गोष्टी योग्य प्रकारे प्रकृत स्थितीत पूर्वकर्माच्या अनुकूलतेमुळे उपलब्ध होतात त्या वेळी इच्छेप्रमाणे घडून येते. ही साधने उपलब्ध होऊ शकली नाहीत, त्यांचा मेलक योग्य प्रकारे झाला नाही तर कार्य इच्छेनुरूप घडत नाहीत. उदा.– एखाद्या स्त्रीपुरुषांना उत्तम प्रकारचा पुत्र व्हावा अशी इच्छा आहे, त्यासाठी किती गोष्टींची अनुकूलता पाहिजे ते पाहा. पुरुष हा सशक्त, निरोगी, बलवान, शुक्रदोषरहित व विपुलशुक्र असला पाहिजे. स्त्रीच्या ठिकाणी तिच्या आर्तवामध्ये, गर्भाशयामध्ये कोणतेही दोष नसले पाहिजेत. पुत्र उत्पन्न होईल असे त्यांचे अनुकूल पूर्वकर्म पाहिजे. त्यांनी मैथुनास प्रवृत्त झाले पाहिजे. या शुक्रार्तव संयोगामध्ये प्रविष्ट होणारा आत्मा हा विशुद्ध, सत्त्वयुक्त व शुभ कर्मे केलेला असून, त्याने श्रेष्ठ योनीमध्ये जन्म घ्यावा अशी इच्छा केली पाहिजे. या सगळ्या गोष्टी एकत्र घडल्या म्हणजे पुत्र उत्पन्न होईल, व तो सुलक्षणी निघेल.

यातील कोणतीही गोष्ट प्रतिकूल असली तर अपत्य उत्पन्न होणारच नाही, झाले तर कन्या वा पुत्र यांमधील नको असेल ते होईल; किंवा सुलक्षणी असणार नाही. यासाठी सर्व गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. कोणीही एक संपूर्ण कार्य करू शकत नाही, वा कोणीही एक नसला तरी चालेल असे म्हणता येत नाही.

साधनांतील दोषामुळे आत्मा गर्भोत्पत्ती करू शकला नाही म्हणून तो कारण नाही. असे कसे ? जे आत्मज्ञानी आहेत त्यांना कुठे जन्म घ्यावा, ऐश्वर्य कसे असावे. मोक्षाची योग्यता असावी, हे सर्व स्वाधीनच असते. सुखदुःखांना आत्मा हाच कारण आहे. त्यावाचून हे भाव जडाच्या ठिकाणी कोणत्याही स्वरूपात व्यक्त होणे शक्य नाही. गर्भातील चैतन्य हे गर्भ उत्पन्न होताना आत्म्यामुळेच संभवते. जी चेतनायुक्त नाहीत अशी जड पंचमहाभूते केवळ संयोगांनी त्यांच्यात मुळात नसलेले चैतन्य उत्पन्न करतील, हे म्हणणे खोटे आहे. जो मुळात चेतन आहे तोच चैतन्य उत्पन्न करील. कोणत्या तरी बीजातून वेगळचाच कोणत्या तरी अंकुराची उत्पत्ती होते हे कधी संभवते का ? यासाठी आत्मा हाच गर्भचैतन्याचे कारण आहे, इतर महाभूते त्या बाबतीत असमर्थ आहेत असे मानले पाहिजे.

– यदुक्तम्–यद्यात्मा जनयति................पराधीन एव । तेन.........................
आत्माधीना योनिः पुरुषं प्रति इष्टा योनिः यथा, ऐश्वर्यादयश्चात्माधीना दृष्टाः, यथोक्तम् कतिधा पुरुषीये—आवेशश्चेतसो ज्ञानम् ।.......... शा. अ. १

– इत्यादिना । आमनः कारणत्वे हेत्वन्तमाह–नह्यन्य इत्यादि ।.........सदृशमेव कारणात् कार्यमुत्पद्यते । ............ धातोरात्मन एवेति दर्शयति ।
च. शा. ३–१५ टीका



[१]आत्म्यामुळे कोणते भाव गर्भाच्या ठिकाणी उत्पन्न होतात ते सांगतो. विशिष्ट योनीमध्ये उत्पन्न होणे हे आत्म्याच्या स्वाधीन आहे. म्हणजे कुठे जन्म यावा हे जरी पूर्वकर्माच्या आधीन असले तरी ते पूर्वकर्म आत्म्याच्याच स्वाधीनचे आहे. आयुष्य हे आत्म्यामुळेच ठरते. ज्ञान (आत्मज्ञान), मन, इंद्रिये, प्राण, अपान, प्रेरणा, धारणा, आकृती, स्वर, वर्ण, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, चेतना, धैर्य, बुद्धी, स्मृती, अहंकार, प्रयत्न हे भाव आत्मसंयोगानेच उत्पन्न होतात.

गर्भ हा हितकर आचारामुळे उत्पन्न होतो. स्त्री-पुरुषांच्या वंध्यत्वाला वा गर्भामध्ये अनिष्ट गोष्टी उत्पन्न होण्याला अहितकर आचार हे कारण असते. असात्म्य सेवन करणाऱ्या स्त्री–पुरुषांच्या ठिकाणी तीनही दोष प्रकुपित होऊन ते जोपर्यंत शुक्रार्तव वा गर्भाशय यांचा उपघात करीत नाहीत तोवर त्यांच्या ठिकाणीही गर्भोत्पत्ती होते. उलट नेहमी सात्म्य सेवन करणाऱ्या स्त्री–पुरुषांत त्यांचे शुक्रार्तव-गर्भाशयादी भाव अनुपहत असूनही ऋतुकाळी संगम करूनही जर त्या संयोगामध्ये जीवाचे संक्रमण झाले नाही तर गर्भ उत्पन्न होत नाही. म्हणून मागे सांगितलेला नियम लक्षात ठेवला पाहिजे की, केवळ सात्म्य हेच गर्भाला कारण आहे असे नाही. सर्व कारणांचा समुदाय हा येथे हेतू आहे. सात्म्यामुळे गर्भाच्या ठिकाणी जे भाव उत्पन्न होतात ते असे.—

आरोग्य, उत्साह, अलोलुपत्व, इंद्रियांची आरोग्यसंपन्नता, स्वर, वर्ण, शुक्र (बीज) यांचे उत्कृष्टत्व, आरोग्यामुळे लाभणारा मनाचा आनंदीपणा (प्रहर्षभूयस्त्वं) हे सात्म्यज भाव आहेत.

[२]आहार-रस हाही गर्भास कारणीभूत आहे. आहाररसाविना माताच जगू शकणार नाही, मग गर्भ उत्पन्न होणार नाही हे सांगावयास नको. उत्तम रीतीने सेवन

१ यानि तु खल्वस्य गर्भस्यात्मजानि, यानि चास्यात्मतः संभवतः संभवन्ति, तान्यनुव्याख्यास्यामः–तद्यथा–तासु तासु योनिषूत्पत्तिरायुरात्मज्ञानं मन इंद्रियाणि प्राणापानौ प्रेरणं धारणमाकृतिस्वरवर्णविशेषाः सुखदुःखे इच्छाद्वेषौ चेतना धृतिर्बुद्धिः स्मृतिरहङ्कारः प्रयत्नश्चेत्यात्मजानि । च. शा. ३–१६

– सात्मजश्चायं गर्भः नह्यसात्मसेवित्वमन्तरेण......भावः। यावत् खल्वसात्म्यसेविना......गर्भजननाय भवन्ति । सात्मसेविनां पुनः......न प्रादुर्भवन्ति । न हि केवलं......गर्भः, समुदयोऽत्र कारणमुच्यते । यानि खल्वस्य गर्भस्य...... संभवतः संभवन्ति,......तद्यथा...... आरोग्यमनालस्यः......लोलुपत्वमिंद्रियप्रसादः स्वरवर्णबीजसंपत्प्रहर्षभूयस्त्वं चेति सात्मजानि ।। च. शा. ३–१७

२ रसजश्चाय गर्भः न हि रसादृते मातुः.........पुनर्गर्भजन्म । न चैवास......... वर्तयन्ति । न च केवलं...... तान्यनुव्याख्यास्यामः । तद्यथा– शरीरस्याभिनिर्वृत्तिरभिवृद्धिः प्राणानुबन्धस्तृप्तिः पुष्टिरुत्साहश्चेति रसजानि ।। च. शा. ३–१८

केलेला रसच गर्भाचे जनन–पोषण करतो. अर्थात केवळ तेवढयावर गर्भनिर्मिती अवलंबून असते असे नाही. हे कार्य सामुदायिक आहे हे लक्षात ठेवलेच पाहिजे. जे भाव गर्भाच्या ठिकाणी रसामुळे उत्पन्न होतात ते असे :

शरीराची उत्पत्ती आणि अभिवृद्धी ही रसामुळे होते. प्राणानुबंध रसामुळेच राहतो. तृप्तता रसानेच लाभते, शरीराची पुष्टी व उत्साह हीही रसावरच अवलंबून असतात.

टीकाकाराने प्राणानुबंध याचा अर्थ बलानुबंध असा केला आहे. पण जीवनाचे सातत्य हाही अर्थ करावयास हरकत नाही. पुष्टी व अभिवृद्धी यांमध्ये भेद दाखविताना टीकाकार जाडी आणि उंची असे त्या शब्दांचे अर्थ करतात ते चिंतनीय आहेत.

[1]आत्म्याचे सत्त्व हे औपपादुक आहे, त्यामुळे ते कारणदेहाशी संबंध घडवून आणते, व त्यासह एका जन्मातून दुसऱ्या जन्मात प्रवेश करते. या देहान्तरगमनासाठी हे सत्त्व ज्या वेळी उद्युक्त होते त्या वेळी पुरुषाचा स्वभाव पालटतो. आवडी विचित्र होतात, इंद्रिये संतप्त होतात. बळ नाहीसे होऊ लागते, व्याधी वाढतात. ज्या वेळी हे जीवसंबद्ध मन शरीराचा त्याग करते त्या वेळीच प्राण जातो. हे मन मग सूक्ष्म देहसामग्रीसह लिंगदेहाने अन्य जन्मामध्ये निराळया शरीराचा आश्रय करते. आत्मा हा सर्वव्यापकच आहे, तेव्हा त्याचा शरीराशी संबंध नाही असे कधी होणारच नाही. परंतु केवळ आत्मसंबंध हा पुरेसा नसून, सूक्ष्म देह आणि मन यांचे अस्तित्व हे जन्म, पुनर्जन्म, देहधारण इत्यादींस आवश्यक असते. हे मन तीन प्रकारचे आहे. शुद्ध (सात्त्विक), राजस, तामस. ज्या वेळी ते शुद्ध सत्त्वाने युक्त असते त्या वेळी एका जन्मातून दुसऱ्या जन्मात प्रवेश झाल्यानंतरही त्याचे मागील जन्माचे स्मरण स्थिर असते. पण राजस आणि तामस गुणांचा उत्कर्ष असेल तर असे स्मरण राहात नाही. मृत्यूच्या वेळी होणाऱ्या यातना आणि योनिमार्गातून बाहेर पडताना भोगावे लागणारे कष्ट यामुळे बहुधा सत्त्वगुण बलहीन होतो आणि रज व तम यांचे आधिक्य होते. म्हणून सामान्यतः कोणासही पूर्वजन्मीचे ज्ञान असत नाही, पण जे शुद्ध सत्त्वाचे पुण्यवान लोक असतात, त्यांच्या ठिकाणी क्वचित हे स्मरण कायम असते. अशा पुरुषांना जातिस्मर असे म्हणतात. क्वचित कुठे तरी अगदी अल्प प्रमाणात का होईना

१ अस्ति खल्वपि सत्त्वमौपपादुकम्.......नानाविधानि खलु सत्त्वानि.......एकं तु प्रायोवृत्त्याऽऽह । च. शा. ३–१९

– अस्तीत्यादिना मनस औपपादुकमाक्षिप्तं समादधाति । अपि शब्दोऽवधारणे । अत्र च......इत्यनेन प्रतिपादितः । किंवा, 'जीवमात्मानं' स्पृक्शरीरेण इति–स्पर्शवताशरीरेण ...... प्रायोवृत्त्येति भूयिष्ठा यस्य सात्त्विकवृत्तयो भवन्ति स सात्त्विकः,........राजस उच्यते इत्यादि। एतदेव पूर्वमुक्तम्,—"यद्गुणं चाभीक्ष्णं पुरुषमनुवर्तते सत्त्वम्, तद्गुणमेवोपदिशन्ति बाहुल्यानुशयात् ।"

(सू. अ. ८ इति) च. शा. ३–१९ टीका



पण या स्वरूपाचे स्मरण जे आढळते त्यास आत्म्याचा पूर्वापार जन्मांशी संबंध जोडणारा मनाचा हा औपपादुकधर्म कारणीभूत असतो, असेच मानले पाहिजे. या मनामुळे गर्भाच्या ठिकाणी पुढील गुण उत्पन्न होतात. भक्ती, शील, शौच, द्वेष, स्मृती, मोह, त्याग, मात्सर्य, शौर्य, भय, क्रोध, तंद्रा, उत्साह, तापटपणा वा उग्रता (तैक्ष्ण्य), मृदुता, गंभीरता, चंचलता इत्यादी.

हे विविध गुण सत्त्व, रज, तम यांच्या उण्याअधिक प्रमाणाने उत्कृष्ट वा अपकृत अशा स्वरूपात असतात. हे सर्व गुण एकाच व्यक्तीमध्ये उण्याअधिक प्रमाणात असू शकतात. त्या सर्वांचे प्रकटीकरण मात्र एका वेळी होत नाही. पुरुषाला सात्त्विक, राजस, तामस अशा संज्ञा मिळतात त्या कोणत्या जातीचे गुण अधिक प्रमाणात त्या व्यक्तीच्या ठिकाणी आहेत त्यावरून. इतर दोन प्रकारचे गुण त्याच्या ठिकाणी नसतातच असे नाही. त्यांचे प्रमाण केवळ कमी असते, इतकेच; त्यामुळे एकच पुरुष धर्माचरणामध्ये सात्त्विक असेल, कामुकतेमध्ये राजस असेल, तर तमामुळे त्यास केव्हा केव्हा मोहही होईल.

अशा रीतीने गर्भाचे नानाविध भाव नानाविध कारणांनी उत्पन्न होतात आणि त्या सर्वांच्या समुदायातून गर्भ उत्पन्न होतो हे स्पष्ट झाले. ज्याप्रमाणे घर बांधावयाचे झाले म्हणजे त्याला अनेक प्रकारच्या वस्तू जमवून त्यांचा विविष्ट प्रकारचा संयोग घडवावा लागतो किंवा एखादा रथ तयार करावयाचा झाल्यास त्यासाठीही अनेक रथांगे जोडावी लागतात त्याप्रमाणेच गर्भोत्पत्तीसही माता, पिता, आत्मा, सात्म्य, रस, सत्त्व, यांच्या समुदायाची आवश्यकता असते.

भरद्वाजाने यावर पुन्हा बऱ्याच शंका विचारल्या. तो म्हणाला, "तुम्ही म्हणता त्याप्रमाणे जर गर्भ हा अनेक प्रकारच्या भावांच्या समुदायामुळे उत्पन्न होत असेल तर त्याची एकत्र संमीलित होण्याची पद्धती तरी कोणती ?

– एवमयं नानाविधानामेषां गर्भकराणां भावानां समुदायादभिनिर्वर्तते गर्भो यथा कूटागारं नानाद्रव्यसमुदायाद्यथा वा रथो नानारथाङ्गसमुदायात् । तस्मादेतदवोचाम–मातृजश्चायं गर्भः पितृजश्चाऽऽत्मजश्च सात्म्यजश्च रसजश्चाऽस्ति च सत्त्वमौपपादुकमितीति होवाच भगवानात्रेयः ॥

– भरद्वाज उवाच :

यद्ययमेषां नानाविधानां गर्भकराणां भावानां समुदायादभिनिर्वर्तते गर्भः कथमयं सन्धीयते यदि चापि सन्धीयते कस्मात् समुदायप्रभवः सन् गर्भो मनुष्यविग्रहेण जायते, मनुष्यश्च मनुष्यप्रभवः उच्यते । ......सविकारश्चात्मा । यदि च दर्शनादिभिरात्मा विषयान्, वेत्ति, निरिन्द्रियो दर्शनादिविरहादज्ञः स्यात्, अज्ञत्वादकारणम्, अकारणत्वाच्च नामेति वाग्वस्तुमात्रमेतद्वचनमनर्थं स्यादिति होवाच भरद्वाजः । च. शा. अ. ३–२१

असा हा एकत्रित होऊन समुदायामुळे गर्भ उत्पन्न होतो तर तो नेमका मनुष्यरूपानेच कसा उत्पन्न होतो ? गाय गाईपासून, घोडा घोड्यापासून अशी जाती निश्चित ठरते हे स्पष्ट आहे. पण मग मनुष्यगर्भ हा माणसापासून उत्पन्न होतो असे म्हणण्याऐवजी तो समुदायात्मक आहे हे म्हणणे अयोग्य ठरते. बरे, मनुष्य हा मनुष्याच्या उत्पत्तीला कारण आहे असे मानले तर, प्रजा ही पितृसदृश का होत नाही ? मंद बुद्धीचे, आंधळे, कुबडे, मुके, बुटके, गेंगाणे, इतरही काही व्यंग असलेले, कोड फुटलेले असे जे लोक त्यांना होणारी प्रजा तशीच असते असे नाही. तुम्ही असे म्हणाल की, आत्मा स्वतंत्र आहे, त्यामुळे तो पंचज्ञानेन्द्रियांनी पाच विषयांचे सेवन यथायोग्यरीत्या करतो व स्वतःच्या बुद्धीने ते ते विषय जाणतो, त्यामुळे जडापासून पितृसदृश असा जड उत्पन्न होत नाही. पण त्यात आत्मा सर्वज्ञ आहे व निर्विकार आहे ही जी प्रतिज्ञा तुम्ही मागे केली तिची हानी होते; कारण इंद्रिये कार्यक्षम असली म्हणजे मग आत्मा ज्ञानी ठरेल. ती तशी नसली की आत्मा अज्ञानी ठरेल; म्हणजे आत्मा ज्ञानी आणि अज्ञानी अशा दोनही भावांनी युक्त झाला की त्याच्या ठिकाणी मग विकारही उत्पन्न झाले असे मानले पाहिजे. कारण कोणतीही एक स्थिती सतत अखंडपणे जशीच्या तशीच राहणे ही प्रकृती होय. कधी ज्ञानी कधी अज्ञानी असे झाल्यास आत्म्याच्या ठिकाणी ती विकृती मानावी लागेल.

आत्मा हा दर्शनवाहिकांच्या साहाय्याने विषय जाणू लागला आणि निरिन्द्रिय स्थितीत त्याला ज्ञान नसले की तो मुळातच अज्ञ ठरतो. अज्ञ ठरला की मग त्याला कारणही मानता येणार नाही. कारण अज्ञ स्थितीमुळे, शरीरातील गमनादी प्रेरणा ज्ञानपूर्वक असल्यामुळे तो देऊ शकणार नाही, आणि मग आत्मा नाहीच असे मानावे लागते. आत्मा पाहतो, आत्मा बोलतो, आत्म्याला सुखदुःख होते इत्यादी बोलणे म्हणजे अर्थहीन शब्दांचा उच्चार करणे होय.

या शंकेवर आत्रेय म्हणाले : आम्ही जे सांगितले आहे की, सत्त्व हे जीवाचा शरीराशी संबंध घडवून आणते ते मुळीच चूक नाही. गर्भ हा समुदायप्रभवच आहे. मनुष्याचा गर्भ मनुष्यरूपाने जो उत्पन्न होतो त्याचे कारण तुला सांगतो.

उत्पन्न होणाऱ्या जीवांच्या चार योनी आहेत, त्या अशा : जरायुज, अंडज, स्वेदज, उद्भिज. या चारही योनींचे पुन्हा अंतर्गत भेद असंख्य आहेत. आणि त्यांतील व्यक्तीव्यक्तींचा विचार केला तर आकृतिविशेषाने पुन्हा अनन्त भेद उत्पन्न होतात.

— आत्रेय उवाच—पुरस्तादेतत् प्रतिज्ञातम्—सत्त्वं जीवं स्पृक्शरीरेणाभिसंबध्नातीति। यस्मात्तु समुदायप्रभवः......तद्वक्ष्यामः । भूतानां.... जराय्वण्डस्वेदोभिदः ।.... तानि यदा मनुष्यबिम्बमापद्यन्ते तदा मनुष्यविग्रहेण जायन्ते, तस्मात् समुदायात्मकः सन् गर्भो मनुष्यविग्रहेण जायते, मनुष्यश्च मनुष्यप्रभव उच्यते तद्योनित्वात् ॥
च. शा. ३·२२



गर्भकर भाव जे आम्ही सांगितले ते जरायुज, अंडज यांच्या ठिकाणी प्रामुख्याने आवश्यक असतात. यात मातापिता यांच्याद्वारा स्वसदृशभावविशेष गर्भाच्या ठिकाणी उत्पन्न होतात. त्यामुळे जातिसादृश्य कायम राहते. एखाद्या साच्यामध्ये सोने, चांदी, तांबे, कथिल, शिसे असे धातू ओतले म्हणजे ज्या मूर्तीच्या आकाराचा तो साचा असेल त्याच आकाराची मूर्ती बनते. धातू तेच आहेत म्हणून कुठेही ओतले तरी एकाच आकाराची त्यांची मूर्ती बनावी असे होत नाही, तर साचा जसा असेल तशीच मूर्ती उत्पन्न होते, साचा मनुष्याचा असला तर मनुष्याकृती, इतर प्रकारचा असला तर इतर प्रकारासारखी आकृती धातूंची बनते.

गर्भही असाच (धातुमेलकाप्रमाणे) समुदायामुळे उत्पन्न होणारा असला, तरी मनुष्ययोनीत मनुष्यरूपाने जन्मास येईल; त्यात नवल वाटण्याचे कारण नाही.

मनुष्यप्रभव असूनही आईबापासारखे जसेच्या तसे मूल होत नाही, असे काही नेहमीच घडत नाही. कधी पितृसदृश असते, कधी नसते. आईबापाच्या ठिकाणी असणाऱ्या वैगुण्याने जर त्याचा त्या त्या अवयवांना उत्पन्न करणारा बीजातील बीजभागही विकृत झाला असेल तर तशीच विकृती असलेली प्रजा उत्पन्न होईल. पण माता-पित्यांच्या ठिकाणी दोष असूनही जर बीजावर त्यांचा विकृत परिणाम झाला नसेल तर उत्पन्न होणारे मूल अव्यंग उत्पन्न होते. कारण इंद्रियोत्पत्तीला आत्मा हाच मूळ कारण आहे. त्याच्यामधील विकृती वा प्रकृती ही दैवयोगाने जशी घडेल तशी घडते. त्यामुळे आई, बाप वा अपत्य यांचे सादृश्य असतेच वा नसतेच असा एकांगी नियम करता येणार नाही.

आत्म्याला इंद्रियपरतंत्रता असल्यामुळे तो कधी ज्ञानी व कधी अज्ञानी असतो हे तुझे म्हणणे योग्य नाही. मूलभूत ज्ञानसामर्थ्य व कार्यज्ञान यांमध्ये अंतर आहे. ज्ञान ही एक निर्गुण, निर्विशेष शक्ती आहे, व तिला सोडून आत्मा कधीच नसतो. त्यामुळे आत्म्याच्या ठिकाणी ज्ञान नाही असे कधीच होत नाही. त्याची क्रियात्मक व्यक्तता व अव्यक्तता ही जरी साधनावर अवलंबून असली तरी त्यामुळे आत्म्याच्या सर्वज्ञतेला बाध येण्याचे कारण नाही. माती नसली म्हणजे कुंभार मडके घडवू शकत नाही; पण त्यामुळे मडके घडविण्याचे ज्ञानही कुंभाराजवळ नाही, असे म्हणावयाचे काय ? आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, ज्यांना आत्मज्ञान झाले आहे व अध्यात्माचा ज्यांनी अनुभव घेतला आहे असे महापुरुष इंद्रिये विषयांपासून मागे ओढून, मनाचे चांचल्य घालवून त्याला स्थिर करून, वृत्ती अंतर्मुख

— यच्चोक्तम्— यदि च मनुष्यो मनुष्यप्रभव कस्मान्न.......नोपजायते चानुपतापात् । तस्मादुभयोपपत्तिरप्यत्र । सर्वस्व चात्मजानीन्द्रियाणि, तेषां भावाभावहेतुर्दैवम् । तस्मान्नैकान्ततो जडादिभ्यो जाताः पितृसदृशरूपा भवन्ति।
च. शा. ३–२३

करून ज्या वेळी एकाग्र होतात, त्या वेळी त्यांना कोणत्याही वस्तूचे वा भावाचे ज्ञान होते असा समाधिस्थितीतील अनुभव आहे. आता कदाचित तुला हे पटणार नाही; म्हणून भरद्वाजा, तुला ज्या स्थितीचा नेहमी अनुभव येतो, तिचे उदाहरण सांगतो.

झोपेमध्ये तरी इंद्रये ही अचेतन असतात. विषय ग्रहण करीत नाहीत हे तुला माहिती आहे का ? मग स्वप्नामध्ये शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध इत्यादी विषयांचा अनुभव येतो व सुखदुःखही भोगावे लागते ते कसे ? इंद्रिये झोपेत कार्यक्षम नसतात हे निश्चित आहे; म्हणून कोणतेही ज्ञान आत्मज्ञानावाचून व्यक्त होत नाही हे निश्चित. प्रत्येक भावाला कारण असलेच पाहिजे व क्रियेला कर्ताही असलाच पाहिजे. यासाठी गर्भाच्या ठिकाणचे चैतन्यादी गुणविशेष आत्म्यामुळे उत्पन्न होतात हे निश्चित समज; तोच सर्वद्रष्टा आहे याविषयी शंका घेऊ नकोस.

[1]गर्भ हा माता, पिता, आत्मा, सात्म्य, रस, सत्त्व, यांच्या समुदायाने उत्पन्न होत असला तरी तो शेवटी शुक्रार्तवसंयोगरूपच असतो; व हे शुक्रार्तव पंचमहाभूतांमुळे बनलेले असल्याने, पंचमहाभूते व सहावा चेतना धातू यांच्या समुदायांतून गर्भ उत्पन्न होतो. यासाठीच त्यास षड्धातुक असेही म्हणतात. याला कुठे चतुर्विंशतिक ( २४ तत्त्वांनी घडलेला ) असे म्हटले असले तरी त्यात विरोध उत्पन्न होतो, असे मानण्याचे कारण नाही. कारण कोणत्याही प्रकाराने वर्गीकरण केले तरी त्यात इतर भावांचा समावेश होतोच.

[2]शुक्रार्तव संयोगामध्ये प्रथमतः गुणग्रहण करण्यास समर्थ असलेल्या जीवाचा संचार होतो. यालाच शास्त्रकारांनी त्याची निरनिराळी कर्मे लक्षात घेऊन अनेक नावे दिली आहेत ती अशी : हेतू, कारण, निमित्त, अक्षर, कर्ता, मन्ता, वेदिता, बोद्धा, द्रष्टा, धाता, ब्रह्मा, विश्वकर्मा, विश्वरूप, पुरुष, प्रभाव, अव्यय, नित्य, गुणी, ग्रहण, प्रधान,

— न चात्मा सत्स्विन्द्रियेषु ज्ञः, असत्सु वा भवत्यज्ञः ।
न ह्यसत्त्वः कदाचिदात्मा सत्त्वविशेषाच्चोपलभ्यते ज्ञानविशेष इति ॥
न कर्तुरिन्द्रियाभावात्कार्यज्ञानं प्रवर्तते ।
.... .... .... .... .... .... .... ....
तस्माज्ज्ञः प्रकृतिश्चात्मा द्रष्टा कारणमेव च ।
सर्वमेऽतद्भरद्वाज, निर्णीतं जहि संशयम् ॥ च. श. ३–२४ ते ३१

१ मातृतः पितृत आत्मतः सात्म्यतो रसतः सत्त्वत इत्येतेभ्यो भावेभ्यः समुदितेभ्यो गर्भः संभवति । तस्य ये येऽवयवा यतो यतः संभवतः संभवन्ति, तान् विभज्य मातृजादीनवयवान् पृथक् पृथगुक्तमग्रे ॥ च. शा. ४–४

२ शुक्रशोणित जीवसंयोगे तु खलु कुक्षिगते गर्भसंज्ञा भवति । गर्भस्तु खल्वन्तरिक्षवाय्वग्नितोयभूमिविकारश्चेतनाधिष्ठानभूतः । एवमनया युक्त्या पंचमहाभूतविकारसमुदायात्मको गर्भश्चेतनाधात्वधिष्ठानभूत : स ह्यस्य षष्ठो धातुरुक्तः ॥ च. शा. ४-६





अव्यक्त, जीव, ज्ञ, पुद्गल, चेतनावान, विभू, भूतात्मा, इंद्रियात्मा, अंतरात्मा.

सुश्रुताने या आत्मप्रवेशासंबंधी वर्णन करताना थोडी अधिक माहिती दिली आहे. आत्म्याच्या विशेषणामध्ये पंचज्ञानेन्द्रिये व पंचकर्मेन्द्रिये यांना अनुलक्षून स्प्रष्टा (स्पर्श करणारा), घ्राता (हुंगणारा), श्रोता (ऐकणारा), रसयिता (चाखणारा), स्रष्टा (उत्पन्न करणारा), गन्ता (चालणारा), वक्ता (बोलणारा) अशी विशेषणे वा पर्यायनामे त्याने वापरली आहेत. तसेच स्वभावातील सुष्टदुष्टताही याच ठिकाणी बीजभूत अशी उत्पन्न होते. हे सांगताना तो म्हणतो, इंद्रियांसह गर्भामध्ये संक्रमित होताना वायूच्या प्रेरणेने सत्त्व, रज, तम, यांच्या कमीअधिक प्रमाणामुळे दैव वा आसुरभावाने युक्त होऊन गर्भाशयात राहतो. हा जीव ज्या वेळी गुणांचे ग्रहण करू लागतो त्या वेळी प्रथमतः आकाश या महाभूताचे ग्रहण केले जाते. सृष्टीचा आरंभही असाच आकाशापासून झाला आहे. नंतर त्यापेक्षा व्यक्त, व्यक्ततर अशा भूतांचा वायू, अग्नी, जल, पृथ्वी यांचा संयोग होत जातो. देहधारणेच्या बाबतीतही हाच क्रम असतो. मात्र हे सर्व कार्य (भूतसंयोगाचे) अत्यल्प काळात होते.

[1]अशा रीतीने सर्व भूतगुणांनी व चेतनाधातू, जीव याने युक्त असा गर्भ एक मासपर्यंत संमूर्च्छित स्थितीत असतो. सर्व धातू एकत्र झाले असले तरी त्यांच्यामध्य व्यक्तत्व आलेले नसते. धातूंनाच व्यक्तता नसते तेथे अवयवही व्यक्त नसतात हे स्वाभाविकच आहे. गर्भालाही शरीराची आकृती नसते, तर तो संचित कफासारखा (खेटभूत) असतो.

[2]या पहिल्या महिन्यातच गर्भाच्या ठिकाणी– रूपान्तराचे वा त्याच्या विकासाचे स्वरूप स्पष्ट झाले नाही तरी सूक्ष्म रूपात परस्परसहाय्यक व परस्परांच्या आश्रयाने असलेली पंचमहाभूते आपआपले विशिष्ट कार्य करावयास जीवाच्या उत्पत्तीपासून आरंभ करीत असतात.

वायू या गर्भाचे विभजन करतो. हे विभजन गर्भाच्या पांचभौतिक भागाचे, एकाचे दोन, दोनाचे चार, चाराचे आठ अशा दुपटीच्या प्रमाणात वाढत जाऊन त्याला कलल स्वरूप प्राप्त होते.

– तत्र पूर्वं चेतना धातुः......सर्वमपि तु खल्वेतद्गुणोपादानमणुना कालेन भवति ॥ च. शा. ४–८

अत्र स्त्रीपुंसयोःसंयोगे.......गर्भाशयमनुप्रविश्यावतिष्ठते ॥ सु. शा. ३–४

१ स तु सर्वगुणवान् गर्भत्वमापन्नः प्रथमे मासि संमूर्च्छितः सर्वधातुकललीकृतः खेटभूतो भवत्यव्यक्तविग्रहः सदसद्भूताङ्गावयवः ॥ च. शा. ४–९

२ सौम्यं शुक्रमार्तवमाग्नेयमितरेषामप्यत्र भूतानां सान्निध्यमस्त्यणुना विशेषेण, परस्परोपकारात् (परस्परानुग्रहात्) परस्परानुप्रवेशाच्च । सु. शा. ३–३



यापुढे आकाशीय द्रव्याच्या सहाय्याने त्या गर्भाला बुद्बुदावस्था प्राप्त होते. बहुपत्यता वायूच्या विभजनामुळेच प्राप्त होते.

अग्नी त्यांचे पाचन करतो. (रूपान्तरित होण्यास सहाय्यभूत होतो). प्रत्यक्षात अग्नीच्या विकृतीमुळे बालकाच्या अंगावर निरनिराळ्या रंगांचे चट्टे सापडतात. त्वचेवरील मस, तिलक, त्वक्वैवर्ण्य (जन्मखुणा) याही विकृती सापडतात.

गर्भाला ओलसरपणा आणून अवयवीभवनास जल मदत करते. जल या तत्त्वाच्या विकृतीमुळे गर्भिणीमध्ये अति-गर्भोदक ही विकृती व गर्भामध्ये जल-शीर्षक, उदर असे सहज व्याधी सापडतात.

पृथ्वी ही त्याच्या ठिकाणी संहनन, स्थिरता, घट्टपणा उत्पन्न करते व बहुधा या अवयवनिर्मितीमध्ये उपादानकारक म्हणून भाग घेते. पृथ्वी या तत्त्वाच्या विकृतीमुळे बालकाच्या ठिकाणी श्लथाङ्गत्व व अस्थीच्या विकृती सापडतात.

आकाश हे त्याच्या वाढीला अवकाश देते. अशा रीतीने त्यास क्रमाक्रमाने पुढे पुढे सर्वावयवसंपन्नता येत जाऊन 'शरीर' हे नाव प्राप्त होते. या गर्भाची अपरा, जरायू, गर्भोदक, गर्भनाभिनाडी, उल्ब अशी उपाङ्गे तयार होतात. गर्भ वाढत असताना गर्भाशयही गर्भाच्या योग्य प्रमाणात वाढत असतो.

आकाश या तत्त्वाच्या विकृतीमुळे हृदय, प्राणवह स्रोतस, महास्रोतस, मूत्रवह स्रोतस इत्यादी स्रोतसांच्या ठिकाणच्या सहज विकृती सापडतात.

गर्भोपनिषदामध्ये गर्भाला कललभाव एक रात्रीपुरताच असतो. पुढे सात दिवसांत त्याला बुडबुड्याचे स्वरूप प्राप्त होते. अर्ध्या महिन्यानंतर त्याचा गोळा बनतो व महिन्याच्या शेवटी त्याला घनता येते असे म्हटले आहे.

[1]दुसऱ्या महिन्यामध्ये गर्भातील महाभूतसंघात घट्ट होऊ लागून त्यास पिंड, पेशी वा अर्बुद यांचा आकार पुढे उत्पन्न होणाऱ्या अपत्याच्या पुरुष, स्त्री, वा नपुंसकलिंगाच्या अनुक्रमाने येतो.

– शुक्रशोणितं गर्भाशयस्थमात्मप्रकृति विकारसंमूर्च्छितं 'गर्भ' इत्युच्यते । तं चेतनावस्थितं वायुर्विभजति, तेज एनं पचति, आपः क्लेदयन्ति, पृथिवी संहन्ति, आकाशं विवर्धयति, एवं विवर्धितः स यदा हस्तपादजिह्वाघ्राणकर्णनितंबादिभिरंगैरूपेतस्तदा 'शरीर' इति संज्ञां लभते । षगङ्गं शाखाश्चतस्रो, मध्यं पञ्चमं षष्ठं शिर इति । सु. शा. ५–३

१ द्वितीये मासि घनः संपद्यते पिण्डः पेश्यर्बुदं वा । तत्र घनः पुरुषः, पेशी स्त्री; अर्बुदं नपुंसकम् ॥ च. शा. ४–१०

[1]तिसऱ्या महिन्यामध्ये सर्व इंद्रिये, सर्व अंगावयव एकदमच व्यक्त होतात. या गर्भशरीरातील अवयवांचे मातृज आणि पितृज असे भाव आम्ही पूर्वी सांगितले आहेतच. आता या अवयवांच्या ठिकाणी ते मूलतः महाभूतोत्पन्नच असल्यामुळे पुढीलप्रमाणे तत्तत्भूतविशिष्ट भाव उत्पन्न होतात.

आकाशामुळे शब्द, श्रवणेन्द्रिय, लघुता, सूक्ष्मता व वेगवेगळेपणा हे भाव उत्पन्न होतात. वायूमुळे स्पर्श ही संवेदना, स्पर्शन हे इंद्रिय, रूक्षता, प्रेरणा धातूंची रचना, शरीराच्या इतर हालचाली या गोष्टी उत्पन्न होतात. अग्नीमुळे रूप, दृष्टी, प्रकाश, पचन उष्णता उत्पन्न होते. जलामुळे रस, रसनेन्द्रिय, शीतता, मृदुता, स्नेह आणि क्लेद उत्पन्न होतात. गंध, घ्राणेन्द्रिय, जडपणा, स्थैर्य आणि मूर्तता ( काठिण्य ) हे भाव पृथ्वीमुळे उत्पन्न होतात.

या ठिकाणी सांगितलेले भाव कोणत्या तरी एकाच अवयवामध्ये, एकाच महाभूतामुळे उत्पन्न होतात असे नाही. स्नेह, मार्दव, रूक्षता काठिण्य, गुरुता, लघुता हे गुण निरनिराळ्या प्रकारांत असतात व त्यास ही महाभूते कारण असतात. या वर्णनाचा पुढे चिकित्सेमध्ये धातूंच्या वृद्धि-क्षयास आवश्यक अशा गुणांच्या वा द्रव्यांच्या दृष्टीने उपयोग होतो.

---

१ हस्तपादशिरसां पंच पिंडका निर्वर्तन्ते । अंगप्रत्यंगविभागश्च सूक्ष्मो भवति ॥ सु. शा. ३–१८

– सर्वेन्द्रियाणि सर्वाङ्गावयवाश्च यौगपद्येन अभिनिर्वर्तन्ते । दन्तश्मश्रुस्तनादीनां तु व्यक्तीभवनं जातस्योत्तरकालगं कालक्रमेण गर्भः मातृजंचास्य हृदयं............ संबद्धं भवति । च. शा. ४–११

– पंचधा प्ररोहति । तद्यथा सक्थिनी, बाहू, शिरश्च । सक्थ्यादि प्ररोहैककालमेव च सर्वाङ्गावयवेन्द्रियाणि युगपत् संभवन्ति । अन्यत्र जन्मोत्तरकालजेभ्यो दंतादिभ्यः क्रमेण तु स्फुटीभवंति । एषा प्रकृतिः । विकृतिः ततोऽन्यथा । अ. संग्रह शा. २–१२

– गात्रपंचकं, सर्वसूक्ष्माङ्गजन्म च । सममेव मूर्धाद्यैः ज्ञानं च सुखदुःखयोः । वा. शा. २–५४ ते ५५

– तत्रास्य केचिङ्गावयवा मातृजादीनवयवान् विभज्य पूर्वमुक्ता यथावत्, महाभूतविकारप्रविभागेन त्विदानीमस्य तांश्चैवाङ्गावयवान् कांश्चित् पर्यायान्तरेणापरांश्चानुव्याख्यास्यामः । मातृजादयोऽप्यस्य महाभूतविकारा एव । तत्रास्याकाशात्मकं शब्दः श्रोत्रं लाघवं सौक्ष्म्यं विरेकश्च । वाय्वात्मकं स्पर्शः स्पर्शनं रौक्ष्यं प्रेरणं धातुव्यूहनं चेष्टाश्च शारीर्यः । अग्न्यात्मकं रूपं दर्शनं प्रकाशः पक्तिरौष्ण्यश्च अबात्मकं रसो रसनं शैत्यं मार्दवं स्नेहः क्लेदश्चः । पृथिव्यात्मकं गन्धो घ्राणं गौरवं स्थैर्यं मूर्ति श्चेति ॥ च. शा. ४–१२



[1]तिसऱ्या महिन्यात सर्व अवयव एकदम उत्पन्न होतात असे जरी म्हटले आहे, तरी दात, दाढीमिशांचे केस, स्त्री-शरीरात व्यक्त होणारे स्तन, शुक्र, रज या गोष्टी पुढे कालान्तराने यथायोग्य उत्पन्न व्हावयाच्या असतात. क्वचित विकृतीमुळेही गर्भकालात दंतोत्पत्ती आढळते. पण ती प्रकृती नव्हे. तो अपवाद आहे. दंताप्रमाणे क्वचित स्त्रीलिंगी अपत्यामध्ये रज ( रक्त ), स्तन, यांचे दर्शन होते. कारण पुढे उत्पन्न होणाऱ्या या सर्वांची बीजे गर्भशरीरात असतातच. या प्रकृतस्थितीत अंकुरित होण्याचा काल पुढे वयोवस्थाविशेषाने प्राप्त होतो, व त्यांचा नाशही वयोवस्थाविशेषानेच होतो.

---

– केचिदिति–न सर्वे । तत्र मातृजाद्यङ्गकथनेन शब्दादयो य इह भूतविकारत्वेन वक्ष्यते, ते न सर्वे प्रोक्ताः, किंतु केचिदेव त्वगादयः । पर्यायान्तरेणेतिवचनात्, ये मातृजादयः त्वक् च लोहितं च(शा. अ. ३) इत्यादिनोक्ताः, त इह न साक्षाद्वक्तव्याः, किंतु ये त्वग्गता मूर्तिस्नेहमार्दवादयः, ते भूतजन्यत्वेनोच्यमानाः त्वचोऽभिधायका भवन्ति । एवं शोणितादिगतभूतविकारकथनेन शोणितादिकथनं ज्ञेयम् त्वगादयो वक्ष्यमाणा ( शा. अ. ७ ) अपि भूतविकारसमुदायरूपा एव । त्वगादीनां च मातृजादिरूपेण यदभिधानम् तत् मात्राद्यधीनत्वप्रतिपत्यर्थम् । पुनश्चेह भूतजन्यत्वेनाभिधानमङ्गानां क्षये वा वृद्धौ वा सत्यां तत्कारणभूतभूतोपयोगप्रतिषेधाभ्यां वृद्धिक्षयजननज्ञानार्थम् । यदङ्गं यद्भूतरभवम्, तदङ्गं तद्भूतप्रधानेन द्रव्येण वर्धते, क्षीयते च तद्विपरीतेन । लाघवं यद्यपि वायौ पठन्ति, रूक्षः शीतो लघुश्चैव ( सू. अ. १ ) इत्यादिना, तथापि आकाशे लाघवं प्रधानं ज्ञेयम्, तेन, इहाकाशविकारे पठन्ति । आकाशं हि अत्यर्थसूक्ष्मत्वाद्वातादपि लघु । विरेको विच्छेदः । धातुव्यूहनं = धातुरचना धातुवहनं च । दृश्यतेऽनेनेति दर्शनं = चतुरिन्द्रियम् । मूर्तिः = काठिन्यम् ॥ च. शा. ४–१२ टीका

१ एवमस्य इंद्रियाणि अंगावयवाश्च यौगपद्येन अभिनिर्वर्तन्ते अन्यत्र तेभ्यः भावेभ्यः ये अस्य जातस्य उत्तरकालं जायन्ते । तद् यथा दंता, व्यंजनानि शुक्ररजो व्यक्तीभावः । तथा युक्तानि च अपराणि । एषा प्रकृतिः । विकृतिः पुनः अतोऽन्यथा । सन्ति खलु, अस्मिन् गर्भे केचिन् नित्याः भावाः सन्ति च अनित्याः केचित् । च. शा. ४–१४

– एषा प्रकृतिरिति इंद्रियाणि अंगानि च युगपद् भवन्ति, दंतादयश्च जातस्य अपि चिरेण भवन्ति इति एवंरूपो मनुष्यस्वभावः इत्यर्थः अन्यथा इति । कदाचित् सदंत एव जायते, इत्यादिका विकृतिर्मनुष्यस्य ।

– उर एव हि स्तनारंभकबीजयुक्तं स्त्रियाः उत्तरकालं स्तनवत् भवति । एवं कपोल एव श्मश्रुबीजयुक्तः श्मश्रुवान् भवति । बीजमहिमाऽयं य उत्तरकाले एव कार्यं करोति । च. शा. ४ टीका

[1]ज्या वेळी इंद्रिये उत्पन्न होतात त्या वेळीच गर्भामध्ये सुखदुःखाची जाणीव उत्पन्न होते. तो चलनवलन करू लागतो; त्याच्यामध्ये हृदय हा अवयव उत्पन्न होतो व हे हृदय नाभीशी संबद्ध असलेल्या रसवाही नाडीच्या द्वारे मातृहृदयाशी जोडले जाते. गर्भाचे व मातेचे अशी दोन हृदये या वेळी असतात. म्हणून या अवस्थेत द्विहृदया अशी संज्ञा गर्भिणीस प्राप्त होते. सुश्रुताने गर्भ-हृदयाची उत्पत्ती चवथ्या महिन्यात मानली आहे.

या तिसऱ्या महिन्यातील अवयवोत्पत्तीतही सुश्रुतान हात, पाय व डोके असे पाच पिंडांकुर गर्भशरीरावर व्यक्त होऊ लागतात व आतील अंगप्रत्यंग विभाग सूक्ष्म रूपाने विभक्त होतो असे म्हटले आहे.

[2]चवथ्या महिन्यामध्ये अंगप्रत्यंग विभाग व्यक्ततर होतो व गर्भाला स्थिरत्व येते. या वेळी गर्भाच्या अवयवांची विशेष वाढ सुरू होत असल्यामुळे, गर्भिणीच्या शरीराला जाडच उत्पन्न होते.

[3]पाचव्या महिन्यामध्ये मन अधिक जाणीवयुक्त होते. मांसशोणित इत्यादी धातूंचा उपचय होतो, व त्याचा परिणाम म्हणून गर्भिणीच्या ठिकाणी कृशता व दुर्बलता ही लक्षणे आढळतात; याच महिन्यात चेतना व्यक्त होते व पृष्ठवंश आकार घेतो.

[4]सहाव्या महिन्यात गर्भाच्या ठिकाणी बुद्धी उत्पन्न होते, व ओजही उत्पन्न होते. केश, रोम, नख, अग्नी, स्नायू, बल, वर्ण, हे भाव स्पष्ट रूप घेतात. गर्भोपनिषदाप्रमाणे मुख, नाक, डोके, कान यांचे आकार स्पष्ट रूपात प्रगट होतात.

१ तस्य यत्कालमेव इंद्रियाणि संतिष्ठंते ते तत् कालमेव वेदनानिबंधं प्राप्नोति । तस्मात् तदाप्रभृति गर्भः स्पंदते प्रार्थयते च जन्मान्तरानुभूतं यत् किंचित् । तत् द्वैहृदयं आचक्षते वृद्धाः । मातृजं चास्य हृदयं मातृहृदयेन अभिसंबद्धं भवति रसवाहिनीभिः संवाहिनीभिः । च. शा. ४–१५
सर्वाङ्गप्रत्यंगविभागः प्रव्यक्तो भवति । गर्भहृदयप्रव्यक्तिभावः । गर्भः इंद्रियार्थेषु अभिप्रायः करोति । द्विहृदया च नारी दौहृदिनी आचक्षते । सु. शा. ३–१८
२ स्थिरत्वं आपद्यते गर्भः । तस्मादत्ता गर्भिणी गुरू गात्रत्वं अधिकं आपद्यते विशेषेण । च. शा. ४–२०
अंगप्रत्यंगविभागः प्रव्यक्तः गर्भश्च स्थिरो भवति । अ. संग्रह बा. २–२१
३ मनः प्रतिबुद्धतरं भवति । सु. शा. ३–३०
– गर्भस्य मांसशोणितोपचयो भवति अधिकं अन्येभ्यो मासेभ्यः । तस्मादत्ता गर्भिणी कार्श्यमापद्यते विशेषेण । च. शा. ४–२१
मनः प्रतिबुद्धतरं भवति मांसशोणितोपयश्च । अ. सं. शा. २–२१
पंचमे पृष्ठवंशो भवति । गर्भोपनिषद्
४ बुद्धिः । सु. शा. ३–३०



गर्भाचे बल, वर्ण व ओज यांची वृद्धी होत असल्यामुळे, या महिन्यात गर्भिणीच्या ठिकाणी श्रम हे लक्षण दिसते.

## गर्भाचा वर्ण :

[1]गर्भाचा वर्ण उत्पन्न करणारा तेजोधातू (अग्निमहाभूत) हा ज्या वेळी जलभूत-प्रधान अशा स्थितीत कार्य करतो, त्या वेळी गर्भाचा वर्ण गोरा होतो. या वर्ण-निर्मितिप्रक्रियेत पृथ्वी महाभूताचे प्राधान्य असेल तर गर्भाचा वर्ण काळा होतो. पृथ्वी आणि आकाशाचे प्राबल्य असेल तर काळा-सावळा गर्भ उत्पन्न होतो. जल आणि आकाश यांची उत्कटता असल्यास गर्भाचा वर्ण निमगोरा होतो. या वर्णोत्पत्तीला महाभूतांचे आधिक्य हे जरी साक्षात कारण असले तरी आहार-विहार यांचाही पर्यायाने वर्णोत्पत्तीवर परिणाम घडतो, व हे परिणाम गर्भसंभवापासूनच घडत असतात. सहाव्या महिन्यात वर्णाला व्यक्तता आली तरी त्याची सिद्धता पहिल्या महिन्यापासूनच होत असते. म्हणून गर्भिणी ज्या प्रकारचा आहार घेईल त्याप्रमाणे गर्भाच्या वर्णामध्ये अंतर पडत जाईल. गर्भकाली दूध, तूप, तांदूळ, यांसारखे सात्त्विक व शुभ्र वर्णाचे व द्रवतायुक्त पदार्थ स्त्री सेवन करील तर जन्मास येणारे मूल गोरे असेल. उलट बाजरी, उडदाचे कढण, पालेभाज्या असे पदार्थ आहारात असल्यास गर्भाचा वर्ण काळा होईल.

शीतता ही आब्भूतबहुल असल्याने शीत प्रदेशाचाही गर्भाच्या वर्णोत्पत्तीवर परिणाम होतो.

वृद्ध वाग्भटाने वर्णोत्पत्तीसाठी चार कारणे मानली आहेत :

## [2]पितृज, मातृज, देशकुलज आणि महाभूतज :

प्रत्यक्षामध्ये पित्याच्या वर्णाचे सातत्य काही मुलांच्यामध्ये स्पष्टपणे दिसून येते. त्याचप्रमाणे काही बालकांच्यामध्ये मातेचा वर्ण व काही बालकांमध्ये माता-पिता

गर्भस्य बलवर्णोपचयो भवति अधिकं अन्येभ्यो मासेभ्यः । तस्मात्तदा गर्भिणी-बलवर्णहानिमापद्यते विशेषेण । च. शा. ४–२२
केशरोमनखास्थिस्नाय्वादीनि अभिव्यक्तानि बलवर्णोपचयश्च । अ. सं. शा. २–३३
मुखनासिकास्थिश्रोत्राणि भवन्ति । गर्भोपनिषद्
१ तत्र तेजोधातुर्वर्णानां प्रभवः स यदा गर्भोत्पत्तौ अब्धातुप्रायो भवति तदा गर्भं गौरं करोति पृथिवीधातुप्रायः कृष्णधामं तोयाकाशधातुप्रायो गौरश्यामम् । यादृग्वर्णमाहारमुपसेवेत गर्भिणी तादृग्वर्णप्रसवा भवतीत्येके भाषन्ते । सु. शा. २–३५ गर्भोत्पत्तौ–गर्भाधानकाले । टीका
२ तत्र शुक्रे शुक्ले, घृतमंडाभेव गर्भस्य गौरत्वं तलाभे कृष्णत्वं मध्वाभे शामत्वं । तथा क्षीरादि मधुराणां उपयोगात् मातुः उदकविहाराच्च गौरता, तिलान्नविदाहीनां

[ पुढे चालू

या दोहोंच्याही वर्णांचा उत्कटभाव आढळतो. उदा.–माता-पिता गौरवर्णाचे असतील तर बालकाचा वर्ण गौरवर्ण उत्कटत्वाने दिसेल. माता व पिता या दोहोंपैकी माता कृष्णवर्णीय व पिता गौरवर्णीय असतील, तर काही वेळा मातेचा कृष्णवर्ण बालकाकडे येतो, तर काही वेळा पित्याचा गौरवर्ण बालकाकडे येतो.

शुक्राच्या वर्णनामध्ये प्रकृतीच्या अनुषंगाने विविध स्वरूपांचे वर्ण मागे सांगितले आहेत. त्यांचा परिणाम गर्भाच्या वर्णावर होतो असे वाग्भटाचे मत दिसते.

देश, कुल आणि धंदा यांचाही गर्भाच्या वर्णावर परिणाम होतो हे अष्टाङ्गसंग्रह-काराचे वर्णन चिंतनीय व प्रत्यक्षानुगामी आहे.

## [1] गर्भाच्या नेत्राचा वर्ण :

गर्भाचे नेत्र व त्यांचा वर्ण यांची उत्पत्ती तेजोधातूच्या परिमाणावर अवलंबून असते. नेत्रगोलकामध्ये तेजाचा प्रवेश झाला नाही तर मूल जन्मान्ध होते. नेत्रामध्ये अधिष्ठान घेत असताना रक्ताचा संबंध आला तर डोळे तांबुस वर्णाचे होतात. कफानुबंधामुळे शुक्ल वर्णाचे होतात व पित्तानुबंधामुळे डोळे पिंगट वर्णाचे होतात. नेत्रनिर्मितीमध्ये वाताचा अनुबंध झाल्यास डोळे विकृत व (चकणे वगैरे) बनतात.

## गर्भाचे आसन :

[2]सर्व अंगे पूर्ण उत्पन्न झालेला गर्भ, प्रसूतिकाळापर्यंत मातेच्या उदरामध्ये डोके वर ( मातेच्या हृदयाकडे ), सर्व अंग संकुचित करून ( पाय पोटाशी घेऊन, हात जोडून डोके, खाली वाकवून ) मातेच्या पाठीकडे तोंड वळलेल्या स्थितीत कधी उजव्या बाजूला तर कधी डाव्या बाजूला असा राहतो.

मागील पानावरून ]

कृष्णता व्यामिश्राणां श्यावता । देशकुलानुवृत्तितश्च वर्णभेदः । तथा तेजोधातो उदकाकाशधातुसंसर्कात् गौरता, भूवायुसंपर्कात् कृष्णता, सर्वधातुसाम्ये श्यामता ।
अ. सं. शा. १–६६

१ तत्र दृष्टीभागमप्रतिपन्नं तेजो जात्यन्धं करोति, तदेव रक्तानुगतं रक्ताक्षं पित्तानुगतं पिंगाक्षं, श्लेष्मानुगतं शुक्लाक्षं, वातानुगतं विकृताक्षमिति । सु. शा. २–३५

२ गर्भस्तु खलु मातुः पृष्ठाभिमुख ऊर्ध्वशिरा संकुच्याङ्गान्यास्तेऽन्तः कुक्षौ ।
च. शा. ६–२२






आ. २५ : १. गर्भ, २. गर्भाशय.
मातुः पृष्ठाभिमुख ऊर्ध्वशिरा संकुचिताङ्गः गर्भः ।
(पहिले सात महिनेपर्यंत गर्भाचे आसन– प्राधान्याने ऊर्ध्वशिर सापडते.)




आ. २६ : १. गर्भ, २. गर्भाशय.
स योनिं शिरसा याति स्वभावात् प्रसवं प्रति ।

अपवादात्मक का होईना, पण सातव्या महिन्यापासून प्रसूतीचा संभव असल्यामुळे ग्रंथकारांनी उपस्थित कालापर्यंत गर्भ ऊर्ध्वशिर राहतो, असे वर्णन केले आहे.

प्रत्यक्षामध्ये गर्भाचे आसन बघत असताना सात महिन्यांपर्यंत गर्भशिर हे ऊर्ध्व-भागी आढळून येते. गर्भाचा रुंद भाग गर्भाशयाच्या रुंद भागामध्ये राहतो. याच तत्त्वानुसार नऊ महिन्यांचा परिपूर्ण गर्भ शेवटी शिराने अपत्यपथात येतो. कारण या वेळेपर्यंत गर्भाच्या स्फिक् भागाचा व्यास गर्भशिराच्या व्यासापेक्षा मोठा होतो.

[1]सातव्या महिन्यात गर्भ हा सर्व अंगप्रत्यंग विभागाने पूर्ण होतो. त्याच्या अवयवांचे स्वरूप विकसित होते व याच महिन्यात शरीरस्थ वात, पित्त, कफ ह्या प्राकृत दोषांनी गर्भयुक्त होतो. त्यामुळे या महिन्यात जर प्रसूती झाली तर ती अकाली असली तरी बालक जगू शकते.

[2]आठव्या महिन्यात ओज अस्थिर असते. कधी मातेमध्ये तर कधी गर्भामध्ये असे ते संचार करते, व गर्भाच्या अवयवांना पुष्टी येते.

– स च उपस्थित काले जन्मनि प्रसूतिमारुतयोगात् परिवृत्त्यावाक्शिरा निष्क्रामत्यपत्या पथेन, एषा प्रकृतिः, विकृतिः पुनरतोऽन्यथा । च. शा. ६–२४
– आभुग्नोऽभिमुखे शेते गर्भो गर्भाशयेस्त्रियाः ।
स योनिं शिरसा याति स्वभावात् प्रसवं प्रति ॥ सु. शा. ५–४५
– आभुग्नः संकुचिताङ्गः । स्वभावात् पूर्वकर्मापेक्षात् । शा. ५–४५ टीका
– गर्भस्तु मातुः पृष्ठाभिमुखो ललाटे कृताञ्जलिः संकुचिताङ्गो गर्भ कोष्ठे दक्षिणपार्श्वमाश्रित्य अवतिष्ठते पुमान्, वामं स्त्री, मध्यं नपुंसकं । अ. सं. शा. २–२९

१ सर्वाङ्ग प्रत्यंगविभागः प्रव्यक्ततरः । सु. शा. ३–३०
– गर्भः सर्वैः भावैः आप्यायते । गर्भिणी क्लान्ततमा भवति । च. शा. ४–२३
– सर्वाङ्गसंपूर्णता । अ. सं. शा. २–२३
– सर्वैः सर्वाङ्गसंपूर्णो भावैः पुष्यति । वा. शा. १–५७
– तेन सर्वेण जन्मजीवनलक्षणेनार्थेनागैश्च संपूर्णो भवतीत्यवतिष्ठते । अकाल प्रसवत्वात् न तथा गर्भस्य जन्मजीवनलक्षणो योऽसावर्थः सोऽप्यस्मिन् भवतीति ज्ञाप्यते । तथा चास्मिन् मासि गर्भोजातो जीवति, किन्त्वकालप्रसवत्वान्न तथा दीर्घजीवितत्वादिकं स्यात् । वा. शा. १–५८ टीका
– तथाच सप्तमे मासि गर्भो जातो जीवति किंतु अकालप्रसवात् न तथा दीर्घ जीवितत्वादिकं स्यात् । अरुणदत्त

२ अष्टमे अस्थिरीभवति ओजः । तत्र जातश्चेन्नः जीवेत् निरोजस्वात् नैर्ऋत भागत्वाच्च । सु. शा. ६–३०
– शिशुरोजोऽनवस्थानान्नारी संशयिताभवेत् । ना. शा. १–६३
नारी संशयिता भवेत ।
कदाचिज्जीवति संशयितेत्यर्थः । अरुणदत्त



[1]नवव्या महिन्यामध्ये गर्भ सर्व शरीरावयवांत परिपूर्ण पुष्ट होऊन प्रसवोन्मुख होतो.

[2]गर्भाची ही वाढ योग्य रातीने होत जाण्यासाठी गर्भाच्या रक्षणास योग्य असे भाव अनुकूल असावे लागतात. त्यांची संपन्नता असावी लागते. मातेचे आहार-विहार जर गर्भरक्षणाच्या दृष्टीने उत्कृष्ट असतील तर त्यामुळे मातेचे स्वतःचे आरोग्य उत्कृष्ट राहते व तिचा आहाररस उपस्नेहन न्यायाने गर्भाचे पोषण करतो. तसेच मातेच्या उदरामध्ये राहणाऱ्या या गर्भाला तिच्या शरीराचा उष्माही योग्य प्रकारे मिळत राहतो आणि त्याचा परिणाम गर्भाच्या वाढीस अनुकूल असा होत जातो. काल आणि स्वभाव हेही गर्भाच्या वाढीस कारण होतात.

[3] जर गर्भाच्या वाढीस कारण होणारे भाव विगुण होतील, सर्वथा विपरीत होतील तर गर्भाचा जन्म व्हावा तसा होत नाही. एक तर त्याचा आरंभीच नाश होतो किंवा तो फार वेळ उदरामध्ये टिकत नाही. लवकरच पडतो.

दहा महिन्यानंतरही प्रसूती न झाल्यास ती विकृती मानावी. ज्या स्त्रीमध्ये ऋतुकाल हा रजोदर्शनापर्यंत असतो, त्या स्त्रीमधील प्रसूतीचा काल जरी नऊ महिने नऊ दिवसांच्या पुढे गेला, तरी तो काल प्राकृत समजावा. ज्या वेळी हा काल उलटून जाऊन गर्भामध्ये कालातीत राहिलेल्या गर्भाची लक्षणे दिसू लागतील त्याच वेळी ती विकृती मानावी. (अशा वेळी विकृत प्रसव होतो, किंवा) बालक हे मृतजात वा जातमृत होण्याची शक्यता असते. कारण अपरा गर्भाशयापासून सुटू लागते. ह्या वेळी गर्भपोषण विकृत होऊ लागते. कारण अपरेमध्ये काठिण्य उत्पन्न होते. कालातीत गर्भाची प्रत्यक्ष लक्षणे :

गर्भाच्या अस्थींची वाढ जास्त झालेली दिसते. अस्थींच्या ठिकाणी काठिण्य प्राप्त होते. अस्थींचा मल जो नख तोसुद्धा गर्भामध्ये जास्त प्रमाणात वाढलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे मांसाचा उपधातू जो त्वचा त्याचीसुद्धा वाढ होऊन त्वचेची सुकुमारता नाहीशी झालेली दिसते.

१ तस्मिन्नेकदिवसातिक्रान्तेऽपि नवमं मासं उपादाय प्रसवकालं आ दशमात् मासात् ।
च. शा. ४–२५

२ सर्व-लक्षण-ज्ञान-करण-संपूर्णो भवति । गर्भोपनिषद्

३ नवमदशमैकादशद्वादशानाममन्यतमस्मिन् जायते, अतोऽन्यथाविकारी भवति ।
सु. शा. ३–३०
– गर्भश्च मातृतः, गर्भतश्च माता ओजः आददाते ।
तस्मात्तदा गर्भिणी मुहुर्मुहुः मुदा युक्ता भवति । मृदुस्व म्लाना । च. शा. ४–२४
सर्वलक्षणसंपूर्णो भवति । गर्भोपनिषद्
– चरकवत् । अ. सं.

अशा स्त्रीचा प्रसव उदरपाटनपूर्वक म्हणजेच वामदेवीय प्रसव करून बालक व माता दोघांनाही वाचवावे.

| | अकाली-प्रसवलेले बालक | सम्यक्-काली प्रसवलेले बालक | कालातीत प्रसवलेले बालक |
|---|---|---|---|
| (१) उपचय | हीन-( ३ ते ५ पौंड वजन ) | सम्यक् ( सुमारे ५ ते ८ पौंड वजन) | अतिउपचय ( ८ पौंडांच्या पुढे ) |
| (२) बल | हीन | सम्यक् | उत्तम |
| (३) | अक्लेशसहत्व | क्लेशसहत्व | क्लेशसहत्व |
| (४) त्वचा-वर्ण | रक्तवर्ण | गुलाबी | श्वेतवर्णाकडे झुकलेला. |
| (५) स्पर्श | अतिमृदू | मृदू | जुनाट |
| (६) केश | अल्पलोमा | सम्यक् | वृद्धी |
| (७) नखे | बारीक | सम्यक् | वृद्धी सापडते. |
| (८) अग्नी | मंदाग्नी | सम्यक् | क्षुधादीप्ती |

एक वर्षापर्यंतचा कालही प्रकृतचा मानावा, असे मत आहे. क्वचित तसे आढळते.

## [1] गर्भाच्या अवयवांचा उत्पत्तिक्रम :

गर्भाच्या अवयवांची उत्पत्ती कशी होते यासंबंधी सुश्रुतामध्ये एक वाद आला आहे. निरनिराळे तज्ज्ञ वैद्य आपआपली मते व त्यांची कारणे सांगत आहेत. यात कारणांचा

१ गर्भस्य खलु संभवतः पूर्वं शिरः संभवतीत्याह शौनकः शिरोमूलत्वात् प्रधानेन्द्रियाणां हृदयमिति कृतवीर्यो बुद्धेर्मनसश्च स्थानत्वात् नाभिरिति पाराशर्यः ततो हि वर्धते देहो देहिनः पाणिपादमिति मार्कण्डेयः, तन्मूलत्वाच्चेष्टाया गर्भस्य मध्यशरीरमिति सुभूतिर्गौतमः तन्निबद्धत्वात् सर्वगात्रसंभवस्य । तत्तु न सम्यक् सर्वाण्यंगप्रत्यंगानि युगपत् संभवन्तीत्याह धन्वन्तरिः गर्भस्य सूक्ष्मत्वान्नोपलभ्यन्ते वंशाङ्कुरवच्चूतफलवच्च, तद्यथाच्युतफले परिपक्वे केशरमांसास्थिमज्जानः पृथग्दृश्यन्ते कालप्रकर्षात्, तान्येव तरुणे नोपलभ्यन्ते सूक्ष्मत्वात् तेषां सूक्ष्माणां केशरादीनां कालः प्रव्यक्ततां करोति एतेनैव वंशाङ्कुरोऽपि व्याख्यातः । एवं गर्भस्य तारुण्ये सर्वेष्वंगप्रत्यंगेषु सत्स्वपि सौक्ष्म्यादनुपलब्धिः तान्येव कालप्रकर्षात् प्रव्यक्तानि भवन्ति । सु. शा. ३–३२

– मात्रादीनां तु खलु गर्भकराणां भावानां सम्पदस्तथा वृत्तस्य सौष्ठवान्मातृतश्चैवोपस्नेहोपस्वेदाभ्यां कालपरिणामात् स्वभाव संसिद्धेश्च कुक्षौ वृद्धि प्राप्नोति । च. शा. ४–२७



जो उल्लेख आहे तो विशेष चिंतनीय आहे. शौनक नावाचे ऋषी म्हणाले, 'गर्भाचे अवयव उत्पन्न होत असताना अगोदर शिर उत्पन्न होते; कारण सर्व महत्त्वाच्या अवयवांचे शिर हे मूळ आहे.

हृदय प्रथम उत्पन्न झाले असले पाहिजे असे मत कृतवीर्याने प्रकट केले; कारण ते बुद्धी आणि मनाचे स्थान आहे.

पाराशर म्हणाले की, गर्भाच्या नाभीपासून त्याच्या सर्व देहाची वाढ होते, तेव्हा नाभीच प्रथम उत्पन्न होत असली पाहिजे.

गर्भाच्या सर्व हालचाली या हातापायांवर अवलंबून असल्यामुळे अवयवांच्या उत्पत्तीस हातापायांपासून आरंभ होत असला पाहिजे असे मार्कण्डेयांनी सांगितले.

सर्वच अवयव हे शरीराचा मध्य जो कोष्ठ (धड) त्याच्याशी जोडलेले वा त्यांतच असल्यामुळे तेच प्रथम उत्पन्न होणे इष्ट आहे अशी कल्पना सुभूती गौतमांनी मांडली.

ही सर्व मते ऐकल्यानंतर भगवान् धन्वन्तरी म्हणाले, तुमच्या कल्पना योग्य नाहीत. सर्वच अंगप्रत्यंगे ही एकदम उत्पन्न होतात व क्रमाक्रमाने त्यांचा विकास होत

– 'यश्चास्य वृद्धिहेतुः' इति प्रश्नस्योत्तरम् मात्रादीनां तु इत्यादि 'आदि' ग्रहणात् पित्रात्मसात्म्यरससत्त्वानि 'मातृजश्चायं पितृजश्चायम्' इत्यादि ग्रंथोक्तानि गृह्यन्ते । वृत्तस्य = मातुराचाररूपस्य सौष्ठवं = श्रेष्ठत्वं– वृत्तसौष्ठवम् । मातृतः इति पदम् वृत्तसौष्ठवेन तथा उपस्नेहोपस्वेदाभ्यां च संबध्यते । रससात्म्यसौष्ठवं तु मात्रादि संपदा लब्धमेव । उपस्नेहो = धातुनिष्यंदसंबंधः । उपस्वेदः = शरीरस्योष्मणः परं गर्भस्य स्वेदनम् । उपस्वेदश्च गर्भवृद्धिकरो भवत्येव । यथा– अण्डजानां पक्षतेरूपस्वेदनं वृद्धिकरं दृष्टम् । कालपरिणामादिति– यथा यथा कालप्रकर्षः तथा तथा वर्धते गर्भः । वृद्धिहेत्वन्तरमाह । स्वभावसंसिद्धेश्चेति, स्वभावेनैव कर्मजन्येन गर्भो भवति वर्धिष्णुरित्यर्थः कर्मणा हि भोगलक्षणशरीर निर्वर्तकेनारभ्यमाणं गर्भशरीरं वर्धिष्णुस्वभावमेवारब्धम् तेन वर्धत एव । च. शा. ४–२७ टीका

– मात्रादीनां तु खलु गर्भकराणां भावानां व्यापत्तिनिमित्तमस्याऽजन्म भवति । च. शा. ४–२८

– 'कुतश्चास्याजन्म भवति' इत्यस्योत्तरम्, मात्रेत्यादि । व्यापत्तिनिमित्तमिति– व्यापत्तिकारणम् तत्र मातुर्व्यार्च्छुकदुष्टिरित्याद्यनुसरणीयम् । च. शा. ४–२८ ये ह्यस्य कुक्षौ वृद्धिहेतुसमाख्याता भावास्तेषां विपर्ययादुदरे विनाशमापद्यतेऽथवाप्यचिरजातः । च. शा. ४–२९

– एतावान् प्रसवकालः, वैकारिकं अतः परं कुक्षौ स्थानं गर्भस्य । च. शा. ४–२८.

जातो. गर्भ सूक्ष्म असल्यामुळे त्या अंगप्रत्यंगांचा वेगवेगळेपणा आरंभी व्यक्त होत नाही. बांबूचा कोंब वा आंब्याचे फळ यांतील अवयव जसे त्यांच्या उत्पत्तिकाळच्या सूक्ष्म, लहान स्थितीतही असतात, तसेच गर्भाचेही आहे. आंब्याचे फळ पिकले म्हणजे त्यातील रेषा, गर, कोय व कोयीतील मगज हे भाग वेगवेगळे झालेले प्रत्ययास येतात. पण तेच फळ अगदी कच्चे असताना (नुकत्याच धरल्या गेलेल्या स्थितीत) सूक्ष्म रूपात असतात; म्हणून प्रत्ययास येत नाहीत. जसजसा काळ लोटेल तसतसा त्यातील एकएक अंगाचा भाग व्यक्त होत जातो. वंशांकुरांचेही असेच होते. त्याप्रमाणेच गर्भही आपल्या उत्पत्तिकाली सर्वांगप्रत्यंगांनी युक्त असा प्रतीत होत नाही. कारण ही अंगे सूक्ष्म स्थितीत असतात. कालक्रमाने गर्भाचे पोषण होत जात असताना हीच अंगप्रत्यंगे अधिकाधिक व्यक्त होत जातात.

## गर्भाचे पोषण :

शुक्रनिषेकानंतर आर्तवाशी त्याचा संयोग होऊन त्यात जीवाचा संचार होतो. या स्थितीपासून गर्भाला पोषणाची आवश्यकता असते. आरंभी गर्भाचे कोणतेही अवयव स्पष्ट नसतात. बुद्‌बुदाप्रमाणे त्याची स्थिती असते. गर्भाशयाच्या आतील भागी ही बुद्‌बुदाकृती चिकटलेली असते. अशा वेळी मातेच्या सर्व शरीरभर पसरलेली जी रसवह स्रोतसे गर्भाशयाशी संबद्ध असतात त्यांतील रसांनी उपस्नेहन न्यायाने गर्भाचे पोषण होत जाते. उपस्नेहन न्यायाचे वैशिष्टच असे की रसवाहक स्रोतस त्यामध्ये स्पष्ट दिसत नाही. रस इकडून तिकडे जाऊन पोषणाचे कार्य तर होत असते व ते एखाद्या प्रवाहाशेजारच्या भूमीवरील वृक्षांचे पोषण ओलावा मिळून व्हावे त्याप्रमाणे रस हा मधील प्रत्येक अवयव भागांना भिजवीत भिजवीत गर्भापर्यंत जाऊन पोहोचतो व गर्भाची सूक्ष्म स्वरूपातील अंगप्रत्यंगे त्यांतून आपले पोषण घेतात. पुढे गर्भाचा

– असंजाताङ्गप्रत्यंगप्रविभागमानिषेकात्प्रभृतिसर्वशरीरावयवानुसारिणीनां रसवाहानां तिर्यग्गतानां धमनीनामुपस्नेहो जीवयति । सु. शा. ३–३१

– मातुस्तुखलु रसवहायां नाड्यां गर्भनाभिनाडी प्रतिबद्धा, साऽस्य मातुराहाररसवीर्यमभिवहति । तेनोपस्नेहेनास्याभिवृद्धिर्भवति । – सु. शा. ३–३१

– धमनीनामुपस्नेहो जीवयति यथा – पूर्णसरः सलिलोपस्नेहस्तरीरजाततरुकदंबकं जीवयति तद्वत् प्राणधारणं करोति । तथाच भोजः 'गर्भो रुणद्धि स्रोतांसि रसरक्तवहानि वै । रक्ताज्जरायुर्भवति नाडी–चैव रसात्मिका । सा नाडी गर्भमाप्नोति तया गर्भस्य वर्तनम् । यद् यद् अश्नाति माताऽस्य भोजनं हि चतुर्विधम् । तस्यादन्नाद्रसीभूतं वीर्यं त्रेधा प्रवर्तते । भागः शरीरं पुष्णाति स्तन्यं भागेण वर्धते । गर्भः पुष्यति भागेन वर्धते च यथा क्रमम् । गर्भकुल्येव केदारं नाडी प्रीणाति तर्पिता इति । सु. शा. ३–३१, ३२ टीका



विकास होत असताना आहाररसवहनाचे काम करणारी गर्भनाभिनाडी उत्पन्न होते व ती गर्भाशयाशी येऊन मिळणाऱ्या रसवहस्रोतसाशी संबद्ध होते. तिच्यातून मग मातेने घेतलेल्या आहाराचा रस गर्भापर्यंत पोचतो, व त्यातील वाढीस आवश्यक असलेल्या पोषक भावाने गर्भाची वृद्धी होत जाते.




आ. २७ : गर्भाचे पोषण

१– नाभिनाडी　२– अपरा　३– उल्ब
४– गर्भोदक　५ – लोमकूपायनैः उपस्नेहनं
६– गर्भ　७– गर्भाशयपेशी　१ + ३ जरायु

– ततो व्यक्तीभवदंगप्रत्यंगस्य अस्य नाभ्यां प्रतिबद्धा नाडी । नाड्यां अपरा तस्यां मातृहृदयं । ततो मातृहृदयात् आहाररसो धमनीभिः स्यंदमानः अपरां उपैति । ततः क्रमात् नाभि ततश्च पुनः गर्भस्य पक्वाशये स्वकायाग्निना पच्यमानः प्रसादबाहुल्यात्धात्वादि पुष्टिकरः संपद्यते । अ. सं. शा. २–३१

– बीजात्मकैर्महाभूतैः सूक्ष्मैः सत्वानुगैश्च स ।
मातुश्चाहाररसजैः क्रमात् कुक्षौ विवर्धते ॥ वा. शा. १–२०

ही नाडी गर्भ ज्या ठिकाणी प्रथमतः गर्भाशयाशी चिकटलेला असतो व त्याच्या त्या चिकटण्यामुळे रस-रक्तवह स्रोतसांचा रोध होतो तेथेच संचित झालेल्या रक्तामुळे उत्पन्न झालेल्या अपरेपासून (जरायू) सुरू होऊन दुसऱ्या बाजूस गर्भाच्या नाभीशी जोडली जाते व या नाडीच्यावाटे गर्भाला मातेने सेवन केलेल्या अन्नाचा आवश्यक तो भाग मिळत जातो. सगर्भावस्थेमध्ये स्त्रीचा आहार-रस तीन कामे करत असतो. त्यांतील एका भागाने स्त्री-शरीराचे पोषण होते. दुसऱ्याने स्तन व स्तन्याची पुष्टी होते, व तिसऱ्याने गर्भाची वाढ होते.

मातेच्या हृदयातून निघालेला रस गर्भ-शरीरात आल्यानंतर त्यावर गर्भशरीरातील पाचक अग्नीची थोडीशी क्रिया होते. मूलभूत द्रव्य हेच प्रसादरूप असल्याने त्यात मलांश जवळ जवळ नसतोच. असा हा पुनःसंस्कृत आहार-रस गर्भाच्या हृदयातून रसवहस्रोतसांच्या द्वारा त्याच्या सर्व शरीराचे पोषण करतो.

ही स्थिती सामान्यतः गर्भसंभवापासून तिसऱ्या, चवथ्या महिन्यात सुरू होते. गर्भाच्या पोषणाच्या दोन अवस्था कल्पिता येतात.

पहिली–उपस्नेहन न्यायाने गर्भाचे पोषण होते ती (हिचे स्वरूप लोमकूपायनाश्रित असते.) व दुसरी केदारकुल्या न्यायाने साक्षात् रसाचे विक्षेपण होऊन होते ती.

गर्भाच्या वाढीसाठी मातेच्या आहार-रसातून अपरा व तत्संबद्ध नाडीच्याद्वारा लाभणारा रस हा अवश्य कारणीभूत असतो. त्याप्रमाणेच वायूची प्रेरणाही अभिवृद्धीसाठी आवश्यक असते व त्याच्याशी अग्नीचे साहचर्यही अपेक्षित असते. गर्भाच्या नाभीच्या आसमंत भागी अग्निस्थान आहे. त्यास वाताचे सहाय्य होऊन तो प्रदीप्त होतो आणि त्यामुळे प्रथमतः सूक्ष्म संकुचित अशी असलेली स्रोतसे हळूहळू लांब व मोठी होत होत वाढत जातात, व ही वाढ शरीरात खालीवर, बाजूला, सगळीकडे सारखी होत जाते. जसजशी स्रोतसे वाढत जातील तसतसे रसाचे अभिवहन अधिक अधिक क्षेत्रात होते व त्यामुळे तेथील अवयवांची पुष्टी होऊन शरीराची वाढ होत जाते.

– गर्भस्य नाभौ मातुश्च हृदि-नाडी निबध्यते ।
यया स पुष्टिमाप्नोति केदार इव कुल्यया ॥ वा. शा. १–५६

– व्यपगतपिपासाबुभुक्षस्तु खलु गर्भः परतंत्र वृत्तिः, मातरमाश्रित्य वर्तयत्युपस्नेहोपस्वेदाभ्यां गर्भाशये सदसद्भूताङ्गावयवः, तदनंतरं ह्यस्य कश्चिल्लोमकूपायनैरुपस्नेहः कश्चिन्नाभिनाडयनैः । नाभ्यां ह्यस्य नाडी प्रसक्ता । नाड्यां चापरा । अपरा चास्य मातुः प्रसक्ता हृदये, मातृहृदयम् ह्यस्य तामपरामभिप्लवते सिराभिः स्यन्दमानाभिः । स तस्य रसो बलवर्णकरः संपद्यते स च सर्वरसवानाहारः । स्त्रिया ह्यापन्नगर्भायास्त्रिधा रसः प्रतिपद्यते–स्वशरीरपुष्टये, स्तन्याय, गर्भवृद्धये च । तेनाहारेणोपष्टब्धः परतंत्रवृत्तिर्मातरमाश्रित्य वर्तयत्यन्तर्गतः । च. शा. ६–२३

– गर्भस्य खलु रसनिमित्ता मारुताध्माननिमित्ता च परिवृद्धिर्भवति । सु. शा. ४–५७



अग्नीच्या साहचर्याने धातूंना लवचिकपणा आलेला असतो. वायूच्या प्रेरणेने ही लवचिक झालेली स्रोतसे थोडी ताणली जातात. आहाररसाच्या पोषणाचे कार्य या वेळी चालूच असते, त्यामुळे हे मूलतः ताणले गेलेले स्रोतस आधी पोसले जाते. त्यायोगे ताणल्यामुळे आलेला त्याच्या भित्तीचा पातळपणा नाहीसा होतो व स्रोतस् स्वभावतःच त्या आकाराचे बनते. हे क्रमाक्रमाने सारखे सुरू असते. त्यामुळे स्रोतसांची लांबी, रुंदी व पुष्टी वाढत जाते व त्याचीच परिणती पुढे शरीराच्या वाढीत व पुष्टीत होते.

शरीराची वाढ जरी होत असली तरी दृष्टी आणि रोमकूप यांच्यात कधीही वाढ होत नाही. ती जशी जितकी असतील तितकीच राहतात. नेत्ररचना व दृष्टीचे जवळदूरचे पाहण्याचे सामर्थ्य यात बदल होत नाही, हा दृष्टी तशीच राहते याचा अर्थ आहे.

गर्भाच्या पोषणासाठी गर्भामुळे अवरुद्ध झालेल्या रस-रक्तवहस्रोतसांतून जरायूची उत्पत्ती होते असे सांगितले आहे. त्याचे दोन भाग बनतात. एक अपरारूप, ज्यातून मातेचा आहाररस घेतला जाऊन गर्भनाडीद्वारा गर्भास मिळतो व दुसरा उल्बरूप. हा गर्भास वेष्टण घालून गर्भाच्या संरक्षणास सहाय्यभूत होतो.

**गर्भोदक** : गर्भाशयामध्ये गर्भ स्थिर झाल्यापासून गर्भ गर्भोदकात वास करीत असतो. या गर्भोदकाची उत्पत्ती पृथ्वी व आप या महाभूतांच्या आधिक्याने होते. हे मागे उल्लेखिलेले आहेच; प्रतिमासी जसा गर्भ वाढत जाईल, तसेच गर्भाशय व गर्भाचे इतर

– रसनिमित्तेति मातुः इतिशेषः तदुक्तंप्राक् मातुस्तु खलु रसवहायां नाड्यां गर्भनाभिनाडिः प्रतिबद्धा, इत्यादि । मारुताध्माननिमित्ता चेति मरुतेन आध्मानं स्रोतसां पूरणं, मारुताध्मानं, तदेव निमित्तं यस्यां सा, मारुताध्माननिमित्ता वक्ष्यमाणेन अनलानिलकृतेन गर्भस्रोतसां अभितः विशाल भूतत्वात् गर्भपरिवृद्धिः ।
सु. शा. ४–५७ टीका

– तस्यान्तरेण नाभेस्तु ज्योतिस्थानं ध्रुवं स्मृतम् ।
तदा धमति वातस्तु देहस्तेनास्य वर्धते ॥
उष्मणासहितश्चापि दारयत्यस्य मारुता ।
ऊर्ध्वंतिर्यग् अधःस्ताच्च स्रोतांस्यपि यथा यथा ॥ सु. शा. ४–५८ ते ५९

– तस्य गर्भस्य नाभेः अंतरेण मध्ये ज्योति स्थानं अग्नि स्थानं, ध्रुवं निश्चितं स्मृतम् । तत् च वायुः आक्रमति, तेन च आध्मानेन वह्निना, स मारुतेन, स्रोतसां अध्मापनं अस्य गर्भस्य देहो वर्धते । उष्मणासहितः अनिलः यथा यथा ऊर्ध्वं तिर्यक् अधःस्तात् च स्रोतांसि दारयति विवृतानि करोति तथा तथा देहो वर्धते इति पूर्ववाक्यात संबंधनीयम् । सु. शा. ४–५८, ५९ टीका

– दृष्टिश्च रोमकूपाश्च न वर्धंते कदाचन ।
ध्रुवाण्येतानि मर्त्यानां इति धन्वंतरेर्मतम् ॥ सु. शा. ४६०

अवयव, उदा.– अपरा, जरायू, गर्भोदक, उल्ब हेही योग्य प्रमाणात वाढत असतात.

गर्भ हा प्रत्यक्ष गर्भोदकाशी संबंधित असा राहतो. गर्भोदकातच तो पोहत असतो. या गर्भोदकामुळे गर्भाचे बाह्य आघातांपासून वा गर्भिणीच्या इतर हालचालींमुळे होणाऱ्या आघातांपासून संरक्षण होते.

बालकाचे पोषण सूक्ष्म पचनाने मातेच्याकडून मिळालेल्या रसधातूकडून होत असते. त्या वेळी गर्भाच्या धात्वग्नीमुळे उत्पन्न झालेली उष्णता गर्भोदकामुळे टिकविली जाते. ह्या गर्भोदकाचे प्रमाण गर्भिणीच्या प्रकृतीनुसार कमीजास्त प्रमाणात सापडते. ते निश्चित प्रमाण किती असते हे ठरविणे फार कठीण आहे. तरी हा एक संशोधनाचा मार्ग उपलब्ध आहे. सर्वसाधारणपणे नवव्या महिन्याच्या शेवटी अंदाजे २ लिटर प्रमाण असते. प्रसव जवळ आला असताना ह्या गर्भोदकाचे प्रमाण कमी कमी झालेले असते. गर्भोदकाचा वर्ण क्वचित पीत व क्वचित श्वेत, क्वचित पीत व क्वचित कृष्ण असा सापडतो. हे वर्ण गर्भाच्या प्रकृतीनुरूप असतात.

जरायूच्या उभयविध स्वरूपामुळे कधी जरायू व अपरा असे पर्याय शब्द वापरले जातात, तर कधी जरायू व उल्ब असे पर्याय शब्द वापरले जातात.

पण उल्ब व अपरा हे मात्र एकमेकांचे पर्याय म्हणून वापरलेले नाहीत. अपरेचे कार्य गर्भाचे पोषणाचे व उल्बाचे कार्य गर्भाच्या आवरणाचे असे स्पष्टपणे उल्लेखिले जाते. 'यथोल्बेनाऽवृतो गर्भः' या गीतावचनावरूनही उल्बाचे आवरणरूप कर्म स्पष्ट होते.

मातेच्या उदरात असताना गर्भ हा श्वासोच्छ्वास करीत नाही, रडत नाही, व मलविसर्जनाचे कार्यही करीत नाही. त्याची कारणे सुश्रुताने पुढीलप्रमाणे सांगितली आहेत :

[1]मातेपासून मिळणाऱ्या आहारामध्ये मलभाग फारच अल्प असतो व मलाचे विभजन करणारी पक्वाशय ही यंत्ररचनाही गर्भाच्या ठिकाणी पूर्ण नसते. त्यामुळे गर्भ मलविसर्जन करीत नाही. तरी पण गर्भाच्या शरीरातील उष्णतारूप अग्नीचा संस्कार मातेपासून मिळणाऱ्या आहाररसावर होतो. कारण हा सिद्ध आहाररसच बालकाचे अन्न आहे. त्यापासून अगदी अल्प प्रमाणात किट्ट विभजनही होते व याचाच बालकाचे महास्रोतस ज्या वेळी पूर्ण विकसित होईल, त्या वेळी त्यात संचय होतो व प्रसूतीनंतर त्याचे विसर्जनही होते.

१ जरायोः अपराख्यस्य । वा. शा. १–८४ टीका
– जरायु उल्बाकाराः । सु. शा. ४–७ टीका
– मलाल्पत्वादयोगाच्च वायोः पक्वाशयस्य च ।
वातमूत्रपुरीषाणि न गर्भस्थः करोति हि ॥ सु. शा. २–५३



[1]उल्बाने बालकाचे मुख आवृत्त असते, व शरीरामध्ये विभक्त झालेल्या अल्पतम किट्टभागापासून उत्पन्न झालेल्या कफाने त्याचा कंठ अवरुद्ध असतो. त्यामुळे वायूच्या संचारास मार्ग असत नाही व म्हणून गर्भ रडत नाही.

त्याच्या श्वासोच्छ्वासाचे कार्य मातेच्या श्वासोच्छ्वासानेच भागते; त्यामुळे बालकाला स्वतंत्र श्वासक्रियेची आवश्यकता असत नाही.

**प्रकृती :**

गर्भाच्या पोषणाचा त्याच्या प्रकृतीशी संबंध आहे. या प्रकृतीच्या उत्पत्तीसंबंधी चरक व सुश्रुत या ग्रंथांमध्ये वर्णन आढळते.

शुक्रआर्तव–संयोगकाळी त्या दोन भावांमध्ये जे दोष उत्कट असतील त्याप्रमाणे गर्भाची प्रकृती बनते. ज्या काळी गर्भसंभव झाला असेल त्या काळातील दोषवैशिष्ट्य-ही प्रकृतीच्या उत्पत्तीस कारण होते. गर्भाशय जर विशिष्ट दोषांनी पीडित असेल आणि त्याच स्थितीत जर गर्भधारणा झाली तर गर्भाशयातील दोषांचा गर्भाची प्रकृती घडविण्यात भाग असतो. गर्भावस्थेत स्त्री ज्या प्रकारचे आहार–विहार करील त्या प्रकाराने दोषप्रकोप होऊन त्यांचाही गर्भाच्या प्रकृतीवर परिणाम घडतो. महाभूतांचे परिणाम होऊन शरीरावयव घडत असताना भूताधिक्यांचाही प्रकृतीवर परिणाम घडत असतो.

या सर्वांत शुक्रआर्तवात असणारे जे दोष त्यांचाच परिणाम प्रकृती घडविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. त्यासाठीच सुश्रुताने प्रकृतीच्या उत्पत्तीचे कारण सांगत असताना शुक्रार्तवसंयोगातील दोषांच्या उत्कटतेचा उल्लेख केला आहे.

प्रकृती घडविणारी जी जी कारणे वर सांगितली आहेत, त्यांतील जे एक कारण बलवान असेल ते इतरांना बाधित करून स्वतः आपणास अनुकूल अशी प्रकृती बनविते. अर्थात हे सामर्थ्य शुक्रार्तवसंयोग वा महाभूतविकार याच्याच ठिकाणी

१ जरायुणा मुखे च्छन्ने कण्ठे च कफवेष्टिते ।
वायोर्मार्गनिरोधाच्च न गर्भस्थः प्ररोदिति ॥
निःश्वासोच्छ्वाससंक्षोभस्वप्नान् गर्भोऽधिगच्छति ।
मातुर्निश्वसतोच्छ्वाससंक्षोभ स्वप्नसंभवान् ॥
( संक्षोभः संचलनम् )– सु. शा. २–५४ ते ५५
– तत्र प्रकृत्यादीन् भावाननुव्याख्यास्यामः । तद्यथा– शुक्रशोणित प्रकृतिं कालगर्भाशय प्रकृतिं आतुराहारविहारप्रकृतिं, महाभूतविकारप्रकृतिंच गर्भशरीरमपेक्षते । एतानि हि येन येन दोषेणाधिकतमेनैकेनानेकेन वा समनुबध्यन्ते तेन तेन दोषेण गर्भोऽनुबध्यते, ततः सा सा दोष प्रकृतिरुच्यते मनुष्याणां गर्भादिप्रवृत्ता । तस्मात् वातलाः प्रकृत्या केचित् पित्तलाः केचित् श्लेष्मलाः केचित् संसृष्टाः केचित् समधातवः केचिद्भवन्ति । च. वि. ८–९५

प्रामुख्याने असते. बाकीची कारणे (काळ, आहार, विहार, गर्भाशय) ही या शुक्रार्तव-संयोगांतील दोषांशी अनुकूल असतील तर प्रकृती सर्व लक्षणांनी परिपूर्ण अशी त्या त्या एकान्तिक दोषांची बनेल. ही इतर कारणे प्रतिकूल असतील तर प्रकृतीतील दोषलक्षणे थोडी वा सौम्य असतील. क्वचित द्वंद्वज प्रकृती बनेल. तरी पण द्वंद्वज प्रकृती बनण्या-साठी मूलतः शुक्रार्तवामध्येच दोन दोषांची उत्कटता असणे आवश्यक आहे.

या ठिकाणी अशी एक शंका उपस्थित होते की, शुक्रार्तवामध्ये दोषांची उत्कटता असताना गर्भसंभवच होतो कसा ? कारण गर्भोत्पत्तीसाठी शुक्रार्तव हे अनुपहत शुद्ध असावे लागते, असे वर्णन केलेले आहे. यावर टीकाकाराने जे समाधान केले ते असे— दोषांची उत्कटता ही गर्भाघातास कारण होईल इतक्या प्रमाणात येथे घ्यावयाची नाही. कारण गर्भाघातास कारण होते ती विकृती झाली. दोषांची उत्कटता इतक्या परिसीमेची नसली म्हणजे मग बीजातील काही काही भाग उपतप्त होतात व त्या त्या बीजभागापासून उत्पन्न होणाऱ्या गर्भभावांना तत्तत्दोषसदृश विकृती येते. ही विकृतीही समधातूंच्यामुळे उत्पन्न होणाऱ्या लक्षणांच्या वा स्वभावाच्या अपेक्षेने आहे; व्याधीच्या अपेक्षेने नाही. तीनही दोष उत्कट झाले तर गर्भसंभव होणार नाही; म्हणून सान्निपातिक प्रकृती वर्णन केलेली नाही. समधातू प्रकृती वर्णन केलेली आहे. ती तीनही दोषांच्या समावस्थेने (उत्कटतेने नव्हे) उत्पन्न होते व ही आदर्श आहे. पण त्यासाठी मातापित्यांच्या प्रकृतीपासून त्यांच्या एरव्हीच्या आहार-विहारासह गर्भकाळातील पथ्यापथ्याचा विचार व कालविचार या ठिकाणी आदर्श स्वरूपात अनपेक्षित आहेत. असे क्वचित असते. म्हणून समधातू प्रकृती ही क्वचितच आढळते. बहुधा एकान्तिक वा द्वंद्वजच प्रकृती विशेषकरून आढळतात.

### अनेकापत्यता :

यमगर्भ व बह्वपत्यता अशा प्रकारे गर्भामध्ये एक प्रकार आढळतो. दोन वा अधिकही

– प्रकृतिमिति स्वभावम् । एतानि तु शुक्रादिनि ।......प्रवृत्ति विकारस्य सूत्रस्थान एव व्यावृत्तः । च. वि. ८–९५ टीका

– शुक्रशोणितसंयोगे यो भवेद्दोष उत्कटः ।
प्रकृतिर्जायते तेन तस्या मे लक्षणं शृणु ।। सु. शा. ४–६३
यो भवेद्दोष उत्कट इति स्वभावास्थितो न प्रकुपितः ।......तदुक्तं–शुद्धं स्वभाव कर्मभ्यां वाताद्यैर्दुष्टमंशतः । दृष्टं बीजार्थकृद् बीजं तत्र प्रकृतिरुत्तरम् ।। इति
सु. शा. ४–६३ टीका

– शुक्रार्तवे पुनः ।
वायुना बहुशो भिन्ने यथास्वं बह्वपत्यता ।। वा. शा. १–५



मुले एका वेळी गर्भाशयात असणे हे त्याचे स्वरूप आहे. यातही प्रकार आढळतात. सगळ्या मुली, सगळे मुलगे वा एक मुलगा व एक मुलगी.

ज्या वेळी कललस्वरूप असलेल्या शुक्र-आर्तवाचे विभजन होऊन दोन गर्भ उत्पन्न होतात, त्या वेळी यमगर्भ होतो. तसेच बीजच मुळात द्विधा स्वरूपात उत्पन्न होऊन त्यात दोन जीव संचार करतात, त्या वेळीही यमगर्भ उत्पन्न होतो.

( कलल द्विधा होऊन झालेल्या यमगर्भामध्ये शुक्राचे सामर्थ्य अधिक असेल तर दोन्ही मुलगे जन्मास येतील; आर्तवाचे सामर्थ्य अधिक असेल तर दोन्ही मुली जन्मास येतील. )

मुळातच दोन असलेली बीजे स्वसामर्थ्यानुरूप ज्या स्वरूपाची असतील त्याप्रमाणे अपत्यलिंग ठरेल. या स्थितीत एका बीजात आर्तवाची समर्थता व दुसऱ्या बीजात शुक्राची समर्थता असल्यास एक पुत्र व एक कन्या अशी जुळी मुले जन्मास येतात.




आ. २८ : यमगर्भ

१–५. यमज अपरा. ६–एकनाभिज अपरा.
२–३–गर्भोदक. ७–८–९. जरायू.
४–गर्भाशय. १०–उल्ब

– बीजेऽन्तर्वायुना भिन्ने द्वौ जीवौ कुक्षिमागतौ ।
यमावित्यभिधीयंते धर्मेतरपुरःसरौ ।। सु. शा. २–३७
शुक्रार्तवेऽनिलेन खंडशो भिन्ने यथाविभागं अपत्यानां उत्पत्तिः ।।
अ. सं. शा. २–५

या अनेकापत्यतेला वायूची प्रेरणाच मूलतः कारण असते. त्याच्या प्रेरणेने बीज कधी द्विविधकृत होते तर कधी द्वैध असते.

[1]सुश्रुताने या अनेकापत्यतेला अधर्म हे कारण सांगितले आहे. त्याचा अर्थ मोठा गंभीर करून कोणत्याही व्यक्तीचे दुर्वर्तन येथे कारणीभूत होते असे मानण्याचे मुळीच कारण नाही. सुखदुःख ही धर्माधर्माधीन असतात असा भारतीय तत्त्वज्ञानाचा सिद्धान्त आहे. त्यामुळे गर्भधारणेतील व प्रसूतीतील दुःखे अधिक वाढविणारी ही अनेकापत्यता त्यांनी अधर्मामुळे होते असे म्हटले आहे; अर्थात हा अधर्म पूर्वजन्मकृत अदृष्टरूप मानला पाहिजे. बीजाची द्विधावस्था व द्विविधकृतावस्था, अशा दोन स्थिती आहेत. यास चरकादी ग्रंथांत स्पष्ट आधार नसला तरी काश्यपसंहितेच्या कल्पस्थानातील खेतीकल्पाध्यायात जातहारिणीग्रह-वर्णनप्रसंगी एक चांगला आधार उपलब्ध होतो.

[2]यमजगर्भ व एकनाभिप्रभवगर्भ असे दोन शब्द काश्यप संहितेमध्ये वापरले आहेत. जातहारिणींचा परिणाम वर्णन करीत असताना आलेली सूत्रे अशी आहेत :

एकनाभिप्रभव अशा दोघांपैकी एक आधी मरतो, आणि दुसरा त्यामुळे जगत नाही – मरण पावतो. ही स्थिती वडवामुखी नावाच्या जातहारिणीमुळे उत्पन्न होते.

या ठिकाणी यमज व एकनाभिप्रभव अशा दोन स्थिती वर्णन करून त्यांच्यावरील परिणाम कसे वेगळे होतात ते स्पष्ट सांगितले आहेत व त्यांना कारणीभूत होणाऱ्या ग्रहांना दोन वेगवेगळी नावे 'इंद्रवडवा' व 'वडवामुखी' अशी दिली आहेत.

इंद्रवडवेमुळे कधी दोन्ही गर्भांचा (अपत्यांचा) तर कधी एकाचाच नाश होतो. अर्थात दुसरा पुढे आपले नैसर्गिक जीवन स्वाभाविकपणे जगू शकतो. पहिल्याच्या मृत्यूचा त्याच्यावर परिणाम होत नाही. हा यमज होय.

[3]दुसरा जो एकनाभिप्रभव त्यामध्ये मात्र 'वडवामुखीमुळे' एकाचा मृत्यू ओढवला की दुसरा त्याच्या मागोमाग मरण पावतो; जगू शकत नाही, कारण तो एकनाभिप्रभव असतो.

– यदा तु कललं वायुस्तत् द्विधा कुरुते बली ।
यमौ तदा संभवतः कृष्णात्रेय वचो यथा ॥ भेलसंहिता, पृ. ७९

१ रक्तेन कन्यामधिकेन पुत्रं शुक्रेण तेन द्विविधीकृतेन ।
बीजेन कन्यांच सूतं च सूते यथास्वबीजान्यतराधिकेन ॥
शुक्राधिकं द्वैधमुपैतिबीजं यस्यः सुतौ सा सहितौ प्रसूते ।
रक्ताधिकं वा यदि भेदमेति द्विधा सुते सा सहिते प्रसूते ॥ च. शा. २, १२–१३

२ यमजं म्रियते यस्या एकं वोभयमेव वा ।
तामाहुरिन्द्रवडवामसाध्यां जातहारिणीम् ॥ का. सं. पान १९३

३ एकनाभिप्रभवयोरेकश्चोन्म्रियते पुरा ।
म्रियते तद्वदप्येक स्तामाहुर्वडवामुखीम् ।



[1]या परिस्थितीत प्रश्न उपस्थित करून त्याचे जे उत्तर सांगितले आहे ते मार्मिक आहे. एकनाभिज बालकाचे मरण आणि जीवन, रोग आणि आरोग्य, सुख आणि दुःख हे अगदी एकसारखे कसे असते ? जन्मानंतर त्यांच्या पोषणाची पद्धती सारखी असेलच असे नाही, तरीसुद्धा ही एकरूपता का ? असा प्रश्न शिष्याने विचारल्यावर, कश्यप म्हणाले, "जन्मानंतर जरी दोन व्यक्ती दिसत असल्या तरी त्यांचे बीज आत प्रथम एकच असते." वायूच्या प्रेरणेने ते द्विविध होते. पूर्वकर्मही सारखेच असते.

प्राङ्नाडी म्हणजे अपरा एकच असते. जन्मही बरोबरच (पाठोपाठ) होतो. निषेकापासून वृद्धीपर्यंत व स्तन्यसेवनामध्येही त्यांची समानता असते. त्यामुळे वय, सुखदुःख, जन्म-मरण, लक्षणे, आकृती, वर्ण, अंगबल, प्रकृती या गोष्टींमध्ये अगदी सारखेपणा असतो.

पृथक् व्यक्तित्वामुळे तृप्ती आणि विसर्ग यांमध्ये मात्र समानता नसते. ही जी सुखदुःख, रोगारोग्य, जीवन-मरणादी एकरूपता ती जसजसे बालक मोठे होत जाईल तसतशी टिकेलच असे नाही. कारण, मग बीजभूत साम्याबरोबरच आहार, विहार, परिस्थिती व तत्जन्य बलाबल यांचाही सुखदुःखादी द्वंद्वावर महत्त्वाचा परिणाम घडत असतो. त्यामुळे बीजभूत एकरूपतेला बाध येऊन अगदी वेगळ्या व परस्परांशी विसंगत अशाही घटना पुढे वाढत्या वयात घडू शकतात. म्हणून जो जो बालक वयाने लहान तो तो एकरूपता अधिक असते व बालके जो जो वाढत जातात तो तो त्यांच्या परिस्थितीतील एकरूपता उणावत जाते.

## गर्भलिंग :

गर्भलिंग हे तीन प्रकारचे असते. स्त्रीलिंग, पुल्लिंग व नपुसकलिंग.

१ एकनाभिकयोः कस्मात्तुल्यं मरणजीवितम् ।
रोगारोग्यं सुखं दुःखं न तु तृप्तिः समानजा ॥ का. सं. पान १९४

– अथ खलु भगवान् कश्यप उवाच–
एकमेव हि तद् बीजं भिन्नं वायुबलादथ ।
समानकर्मकत्वात् प्राङ्नाड्यैकत्वं च जन्म च ॥
तुल्यं निषेकाद् वृद्धश्च जन्मनः स्तनसेवनात् ।
तस्मात्तुल्यं वयः प्रोक्तं सुखं दुःखं भवाभवौ ॥
लक्षणाकृतिवर्णाङ्गबलप्रकृतितुल्यता ।
न तु तृप्तिविसर्गाणां पृथग्भावात् समानता ॥ का. सं. १९४

[1]स्त्रीगर्भ व पुरुषगर्भ यांचे जे विशेष भाव आहेत त्यांच्या उत्पत्तीलाही दोन प्रकारची कारणे असतात. काही आत्म्यांशी संबद्ध असतात, व काही शुक्रार्तव-संयोगातील भूतसंयोगाशी संबद्ध असतात.

दुर्बलता, भित्रेपणा, ज्ञानाला शुद्ध स्वरूपाचा नेमकेपणा नसणे, भ्रम व चंचलता हे आत्मसंबंधी भाव जर दैवयोगाने गर्भाच्या ठिकाणी विशेषरीत्या उत्पन्न झाले तर गर्भ स्त्रीलिंगी होतो. त्याप्रमाणेच शरीराचा खालील भाग जड होत गेला तर, शरीरभाव एकमेकांशी निगडित झाले नाहीत तर त्यांच्यामध्ये शिथिलता येते, मृदुता येते, त्यामुळेही गर्भ स्त्रीलिंगी असतो.

याउलट बळकटपणा, धैर्य, शुद्ध बुद्धी, स्थिरता, शरीराच्या वरच्या भागाला जडपणा असणे, अवयवांमध्ये घट्टपणा, घनता, कठीणपणा असे भाव असतील तर गर्भ पुल्लिंगी होईल व दोन्हींचे मिश्रण असेल तर गर्भ नपुसकलिंगी होईल.

या त्याच्या लिंगवैशिष्ट्यामुळे अवयव, आकृती, स्वभाव यांचे विशेष उत्पन्न होतात.

स्त्रीबीज समर्थ असता गर्भ स्त्रीलिंगी होतो व पुरुषबीज समर्थ असता गर्भ पुरुषलिंगी होतो; व दोन्ही तुल्यबल असता गर्भ नपुसक होतो. या नपुसकाचेही आठ प्रकार संभवतात.

गर्भलिंगाप्रमाणेच गर्भाचे सादृश्य मातापित्यांवर अवलंबून असते. कधी अपत्य आईसारखे तर कधी बापासारखे असते. या सादृश्याशी लिंगाचा संबंध नाही. यासाठीच बीजामध्ये निरनिराळे भाव उत्पन्न करणारे अंश निरनिराळे आहेत असे वर्णन आहे.

[2]हे सादृश्य गर्भधारणेच्या वेळी अथवा पुढेही माता ज्या स्वरूपाच्या गोष्टी करील वा ज्याचे चिंतन करील त्याच्यामुळेही गर्भाच्या ठिकाणी विशेष प्रकारे उत्पन्न होते.

गर्भधारणेनंतर सुमारे १५ दिवस ते सुमारे २ महिने पुरे होण्याच्या काळात गर्भलिंग व्यक्त होते. यासाठी पुत्रप्राप्तीची इच्छा असल्यास पहिल्याच महिन्यात पुंसवन विधी

१ तत्र शुक्रबाहुल्यात् पुमान्, आर्तवबाहुल्यात् स्त्री, साम्यादुभयोर्नपुंसकमिति ।
सु. शा. ३–५

– अत एव च शुक्रस्य बाहुल्याज्जायते पुमान् ।
रक्तस्य स्त्री, तयो साम्ये क्लीबं । वा. शा. १–५

– एवं पितुः संबधि शुक्रं.........अल्पं स्त्री......कारणतां याति ।
वा. शा. १–५ टीका

– तस्य य एव अंगावयवाः.........अतो विपरीतानि......नपुंसककराणि भवन्ति।
च. शा. ४–१४

२ गर्भोपपत्तौ तु मनः स्त्रिया यं जंतुं व्रजेत् तत् सदृशं प्रसूते । च. शा. २–२५



करावा. (पुंसवन विधी गर्भिणी प्रकरणात आहे.) भावप्रकाशकाराने गर्भलिंगोत्पत्ती-संबंधी काही वेगळेच वर्णन केले आहे.

[1]स्त्रियांच्या योनिमार्गामध्ये समीरणा, चांद्रमसी, गौरी अशा तीन नाड्या असतात. योनिमार्गामध्ये 'समीरणा' नावाची जी नाडी आहे तिच्यावर मैथुनसमयी जर शुक्र पडले तर ते व्यर्थ जाते. गर्भधारणा होत नाही असे चंद्रमौळी नावाच्या व्यक्तीचे मत आहे.

'चांद्रमसी' या नावाची जी दुसरी नाडी स्त्रियांच्या योनिमार्गात असते, तिला जर प्राधान्य असेल तर ती स्त्री मैथुनप्रसंगी लवकर तृप्त होते आणि तिला बहुधा मुलीच होतात.

'गौरी' नावाची नाडी ज्या स्त्रीमध्ये प्रधान असते तिची कामतृप्ती लवकर होत नाही, आणि तिला पुत्र होतात.

समीरणा, चांद्रमसी व गौरी या ज्या तीन नाड्या भावप्रकाशकाराने उल्लेखिलेल्या आहेत त्या शरीरावयव-स्वरूपाच्या आहेत असे मानणे फार कठीण आहे. कारण प्रत्यक्षामध्ये असे अवयवविशेष योनिमार्गामध्ये दिसत नाहीत.

वंध्यत्व, स्त्रीत्व व पुत्रत्व गर्भास कसे प्राप्त होते यासंबंधीच्या कल्पना स्पष्ट करण्याकरिता केवळ भाववाचक अशा या संज्ञा दिल्या असतील तर कदाचित त्यांत अर्थ असण्याची शक्यता आहे. अल्पकामा स्त्रीस कन्या होतात व बहुकामा स्त्रीस पुत्र होतात अशा अर्थाचे वर्णन काही आधुनिक कामशास्त्रकारांनी केले आहे.

जी व्यक्ती मैथुनसमयी आधी स्रवेल तिच्याप्रमाणे गर्भाचे लिंग ठरेल. या अर्थाची वाग्भटाच्या टीकेतील वचनेही या कल्पनेस आधारभूत मानता येतील.

१ मनोभवागारमुखेऽबलानां तिस्रो भवन्तिप्रमदाजनानाम् ।
समीरणा चान्द्रमसी च गौरी विशेषमासामुपवर्णयामि ॥
प्रधानभूता मदनातपत्रे समीरणा नाम विशेषनाडी ।
तस्या मुखे यत्पतितं तु वीर्यम् तन्निष्फलं स्यादिति चन्द्रमौलिः ॥
या चापरा चान्द्रमसी च नाडी कन्दर्पगेहे भवति प्रधाना ।
सा सुंदरी योषितमेवसूते साध्याभवेदल्परतोत्सवेषु ॥
गौरीति नाडी यदुपस्थगर्भे प्रधानभूता भवति स्वभावात् ।
पुत्रं प्रसूते बहुधाङ्गना सा कष्टोपभोग्या सुरतोपविष्टा ॥
भा. पूर्वखंड, गर्भप्रकरण, पृष्ठ ११

## गर्भविकृती :

गर्भाच्या विकृती अनेक कारणांनी अनेक प्रकारच्या संभवतात. या कारणांची विभागणी अवस्थानुरूप पुढीलप्रमाणे करता येते :

(१) शुक्र-आर्तव संयोगाच्या पूर्वी स्त्री-पुरुषांच्या ठिकाणी असणारे वैगुण्य.
(२) शुक्रार्तवसंयोगाच्या वेळी उत्पन्न होणारे वैगुण्य.
(३) गर्भावस्थेमध्ये उत्पन्न होणारे वैगुण्य.
(४) प्रत्यक्ष प्रसवक्रियेच्या वेळी उत्पन्न होणारे वैगुण्य.
(५) दैवं चैवात्र पंचमं ! या न्यायाने ज्याचे कोणतेही प्रत्यक्षानुगामी कारण सांगता येत नाही ते – दैव हे पाचवे कारण होय.

या कारणांचा क्रमाने विचार करू.

[1]अवयवांची पूर्ण वाढ झाली नाही अशा स्थितीतील स्त्री-पुरुष हे गर्भाधानास अयोग्य मानले पाहिजेत. सोळा आणि पंचवीस हे येथे उपलक्षणात्मक वय मानले पाहिजे. एखाद्या स्त्रीची पूर्ण वाढ होण्यास क्वचित सोळापेक्षाही अधिक काल लागेल, तर क्वचित एखादा पुरुष पंचविशीपूर्वीही पूर्ण वाढ झालेला असेल; म्हणून वाग्भटाने पुरुषाच्या वयाची मर्यादा २० ही सांगितली आहे. यासाठी वय हा महत्त्वाचा भाग न समजता शरीराची पूर्ण वाढ गर्भाधानाच्या दृष्टीने झाली आहे की नाही हे महत्त्वाचे आहे. त्याप्रमाणेच स्त्री-पुरुषांपैकी कोणीही अतिवृद्ध, दीर्घरोगी असा असेल तरीसुद्धा तो गर्भाधानास योग्य मानता येणार नाही. अशा वर्ज्य स्थितीत उत्पन्न झालेला गर्भ स्रवतो. मरतो; अपत्यरूपाने जन्मास आल्यास अल्पायुषी ठरतो. नेहमी रोगी असतो वा त्याच्या अवयवांमध्ये वैगुण्य असते.

शुक्रार्तवसंयोगकाली स्त्री-पुरुषांच्यामध्ये ज्या स्वरूपाच्या दोषांचे प्राबल्य असेल त्याचा परिणाम बीजावर होऊन त्यात विकृती उत्पन्न होतात. संयोगकाल व संयोग-

१ ऊनषोडषवर्षायां अप्राप्तः पंचविंशतिः ।
यद्याधत्ते पुमान् गर्भं कुक्षिस्थस्य विपद्यते ॥
जातो वा न चिरंजीवेत् जीवेत् वा दुर्बलेन्द्रियः ।
तस्माद् अत्यंतबालायां गर्भाधानं न कारयेत् ॥
अति वृद्धायां दीर्घरोगिण्यां अन्येन वा विकारेण उपसृष्टायां गर्भाधानं नैव कुर्वीत । पुरुषस्य अपि एवंविधस्य त एव दोषाः संभवन्ति ।
सु. शा. १०–५४ ते ५६

– बीजात्मकर्माशय कालदोषैर्मातुस्तथाऽऽहारविहारदोषैः ।
कुर्वन्ति दोषाः विविधानि दुष्टाः संस्थानवर्णेन्द्रिय वैकृतानि ॥ च. शा. २-२९



स्थान यांची विकृतीही गर्भावर परिणाम करते.[1] त्याचप्रमाणे पूर्वजन्माचे कर्मही त्याला कारणीभूत असते. या विकृतीमुळे उत्पन्न होणाऱ्या गर्भावयवाचे बीजात सूक्ष्मरूपाने असलेले जे जे अंश विकृत होतील तत् तत् अनुरोधाने गर्भाचे ते ते अवयव विकृत आकार घेतात.

[2]सगर्भावस्थेमध्ये गर्भिणीने काही पथ्य पाळणे आवश्यक आहे. तिचे आहारविहार गर्भपोषणास अनुकूल होतील अशा दृष्टीने नियंत्रित असणे आवश्यक आहे. अन्यथा त्याचा विकृत परिणाम गर्भावर होतो. तसेच जे डोहाळे गर्भिणीस लागतात त्यांत गर्भाच्या पोषणाच्या दृष्टीने सामान्यतः अपेक्षा उत्पन्न होते. क्वचित डोहाळे उत्पन्न करणारी कारणे मानसिकही असतात. शरीराच्या स्वास्थ्याइतकीच मनाची प्रसन्नता गर्भगर्भिणीच्या सुस्थितीस आवश्यक असल्याने तीही सांभाळली पाहिजे. अनेक कारणांनी त्यामध्ये ज्या वेळी वैगुण्य उत्पन्न होते, त्या वेळी ते गर्भास बाधक होते.

[3]गर्भिणीचे डोहाळे काही वेळा अति उग्र स्वरूपाचे असतात, अत्यंत अपथ्य-कारक गोष्टींचीच इच्छा तिला होत असते. अशा वेळीही तिची कुशलतेने समजूत घातली पाहिजे. एकदम तोडून बोलून कळणार नाही; इतकेच नव्हे तर समजुतीच्या अनेक गोष्टी सांगूनही पटले नाही तर वैद्याने तिची इच्छा थोडीशी पूर्ण करावी व त्याचे दुष्परिणाम गर्भावर वा तिच्या शरीरावर होणार नाहीत अशी योजना जोडीने कुशलतेने करावी. पण डोहाळे नाकारू नयेत.

प्रसवाच्या वेळी अयोग्य काळीच जर स्त्रीने प्रवाहण करण्यास आरंभ केला, तर या अनैसर्गिकपणामुळे अपत्यपथातून बाहेर पडताना गर्भाला विकृत आकार येतो. मूढ गर्भाच्या वेळीही गर्भाचा मार्ग व त्याची बाहेर येण्याची स्थिती यामध्य विकृती उत्पन्न झाल्यामुळे गर्भावयव विकृत होतात.

## गर्भविकृती – ( आनुवंशिक ) :

[4]माता-पित्याच्या ठिकाणी कुष्ठ, प्रमेह, अर्श, फिरंग, राजयक्ष्मा, उन्माद यासारखे व्याधी असल्यास या व्याधींना कारण असलेले स्थानवैगुण्य शुक्रार्तवातील त्या त्या

१ आत्मीयं कर्म आत्मकर्म, आशयो गर्भाशयः दोषो वैगुण्यम् । च. शा. २–२९ टीका
२ यस्य यस्य अवयवस्य बीजे बीजभागः उपतप्तो भवति,
तस्य तस्य अवयवस्य विकृतिः उपजायते । च. शा. ३–२३
३ तीव्रायाम् तु खलु प्रार्थनायां कामं अहितं अपि अस्यै हितोपहितं दद्यात्, प्रार्थना विनयनार्थमिति । प्रार्थनासंधारणात् हि वायुः कुपितः अंतःशरीरं अनुचरन् गर्भस्य आपद्यमानस्य विनाशं वैरूप्यं वा कुर्यात् ॥ च. शा. ४–१९
४ स्त्रीपुंसयोः कुष्ठदोषात् दुष्टशोणितशुक्रयोः ।
यदपत्यं तयो जातं ज्ञेयं तदपि कुष्ठिनं ॥ सु. नि. ५–२८

स्थानांना उत्पन्न करणाऱ्या बीजभागावर परिणाम करते, त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या बालकाच्या शरीरात ती ती स्थाने विगुण राहून बालकास व्याधियुक्त करतात. हे वांशिक वैगुण्य अनुकूल दोषप्रकोप लाभेपर्यंत अप्रगटही राहते.

स्थानवैगुण्यासारखेच दोषप्रकोपही शुक्रार्तवसंयोगातून गर्भात आल्यास बालके जन्मतःच व्याधियुक्त असतात.

मिथ्याहारविहाराने उत्पन्न होणारा दोषप्रकोप जर संपूर्ण नाश करण्याइतका बलवान नसेल तर, त्यामुळे शरीरातील आर्तव व गर्भाशय पूर्णपणे नाही तरी थोडासा दुष्ट होतो. अशा स्थितीत जर गर्भधारणा झाली तर त्या गर्भाचे मातृज भावापासून उत्पन्न होणारे जे अवयव आहेत, त्यांतील एक वा अनेक अवयव विकृती पावतात. ज्या ज्या अवयवांचा आर्तवातील बीजभूत भाग दोषांनी दुष्ट होईल तो तो अवयव विकृत होत जातो. प्रत्यक्षात सापडणाऱ्या विकृती – रक्तदुष्टीचे सर्व व्याधी; स्त्री-गर्भात रक्तगुल्म, रक्तप्रदर, रजाची अतिप्रवृत्ती, इत्यादी व्याधी – सापडतात. कुष्ठ, कामला, विसर्प, गुल्म, तीळ, मशक, मांसप्रदोषज व्याधी; – उदरवृद्धी, गंड, अर्बुद, ग्रंथी; नाभी – तुंडीनाभी, उन्नतनाभी, अनुन्नत नाभी इत्यादी.; हृदयाच्या विकृती, क्लोम, यकृताच्या वृद्धी, प्लीहावृद्धी, वृक्क. स्त्रीला गर्भिणी अवस्था प्राप्त झाली असताना तिला मूत्रवह स्रोतसाचे गर्भोपद्रव आढळतील.

बस्तीच्या विकृती – उदाहरणार्थ अश्मरी, मूत्रकृच्छ्र, मूत्रजठर, शय्यामूत्रता, अर्श, महास्रोतसाचे व्याधी.

ज्या वेळी या स्त्रीच्या आर्तवातील गर्भाशय उत्पन्न करणाऱ्या बीजभागाची दुष्टी काही अंशापुरती असते, तेव्हा जन्मास येणारी स्त्री पूतिप्रजा असते. उदा० – अंतर्मुखी, सूचिमुखी, षंढीयोनी.

– जातप्रमेही मधुमेहिनो वा, न साध्य उक्तः स हि बीजदोषात् ।
ये चापि केचित् कुलजा विकाराः भवन्ति तांस्तान् प्रवदन्त्यसाध्यान् । च.चि.६–५७

– प्रमेहस्य संतानानुबंधीत्वोपदर्शनार्थं पुनः वचनं । टीका

– शुक्रस्य दोषात्..... रोगी वा क्लीबमल्पायुर्विरूपं वा प्रजायते ।
न चास्य जायते गर्भः पतति प्रस्रवत्यपि ।
शुक्रंहि दुष्टं सापत्यं सदारं बाधते नरं ॥ च. सू. २८–१८ ते १९

– आदिबलप्रवृत्ता ये शुक्रशोणितदोषान्वयाः कुष्ठार्शः प्रभृतयः । सु. सू. २४–५

– प्रभृति गृहणात् मेहश्मादयः । टीका

– यतस्तु कार्त्स्न्येनाविनश्यन् विकृतिमापद्यते, तदनुव्याख्यास्यामः । च. शा. ३–३०

– अवशिष्टस्य प्रश्नोत्तरं दर्शयितुमाह – यतस्त्वित्यादि – अविनश्यन्नित्यत्र विनाशेन विकृतिरभिप्रेरता, विकृतावपि विनाशं शब्दो दृष्टः । यथा असच्छीलत्वेन विकृते पुरुषे 'विनष्टोऽयम्' इति व्यपदेशः । एवं च सत्येकदेशेनापि विकृतौ 'विनाश' शब्ददर्शने 'कार्त्स्न्येन' इति विशेषणं युक्तं भवति । टीका



जर गर्भाशयोत्पादक बीजभाग व स्त्रीत्वविशिष्ट शरीर उत्पन्न करणारे बीजभाग यांची काही अंशी दुष्टी झाली असेल तर स्त्रीसारखी दिसणारी पण स्त्रीचे गुणधर्म नसलेली अशी स्त्री जन्माला येते. तिला रांता असे म्हणतात. अष्टाङ्गसंग्रहाने 'वार्ता' असा उल्लेख केला आहे.

पुरुषामध्येही जर अशाच प्रकारे दोषप्रकोप झाला, तर गर्भाच्या ठिकाणी पित्यापासून उत्पन्न होणाऱ्या अवयवांची विकृती होते. तोही वंध्य ( म्हणजेच अपत्योत्पादनक्षमता नसलेला ) किंवा पूतिप्रज होतो.

उदा.– केश व लोम लवकर गळणे, पिकणे, न्यूनाधिकता, कुनखता, अधिदंत कृमिदंत, दंतव्यापत्, अस्थींचे व्याधी, गर्भिणीतील सिराजग्रंथी; सिरा, स्नायू व धमनी यांच्या विकृती ( स्त्रीच्या शारीरातील स्नायू पुरुषाच्या स्नायूप्रमाणे दिसणे.)

जर शुक्रातील पुरुषविशिष्ट शरीर उत्पन्न करणारे बीजभाग वा त्याचा काही भाग ( अंश ) दोषदुष्ट झाला तर पुरुषासारखा दिसणारा पण पुरुषाचे गुणधर्म नसलेला पुरुष जन्मास येतो. त्यालाच 'तृणपुत्रिका' वा 'तृणपुलिक' असे नाव आहे. संग्रहकाराने तृणमुख या नावाने त्याचा उल्लेख केला आहे.

पुरुष ज्या वेळीं अयोग्यपणे विलासातील खुळचा कल्पनांना बळी पडून विपरीत पद्धतीने स्वतः पाठीवर निजून स्त्रीस छातीवर घेऊन मैथुनकर्मास प्रवृत्त होतो, त्या वेळी जो गर्भ उत्पन्न होतो तो स्त्री-चेष्टिताकार पुरुष असतो. (स्त्रीप्रमाणे:हावभाव

– यदा स्त्रिया दोषप्रकोपणोक्तान्यासेवमानाया दोषाः प्रकुपिताः शरीरमुपसर्पन्तः शोणितगर्भाशयावुपपद्यन्ते न तु कार्त्स्न्येन शोणितगर्भाशयौ दूषयन्ति, तदेयं गर्भं लभते स्त्री । तदा गर्भस्य तस्य मातृजानामवयवानामन्यतमोऽवयवो विकृतिमापद्यत एकोऽथवानेके । यस्य यस्य ह्यवयवस्य बीजे बीजभागे वा दोषाः प्रकोपमापद्यन्ते, तदा तं तमवयवं विकृतिराविशति । यदा ह्यस्याः शोणिते गर्भाशयबीजभागः प्रदोषमापद्यते, तदा वन्ध्यां जनयति । यदा पुनरस्याः शोणिते गर्भाशयबीज-भागावयवः प्रदोषमाद्यते, तदा प्रतिपूजां जनयति । यदा त्वस्याः शोणिते गर्भाशयबीजभागावयवः स्त्रीकराणां च शरीरबीजभागनामेकदेशः प्रदोषमापद्यते, तदा स्त्रीकृतिभूयिष्ठामस्त्रियं रान्तां नाम जनयति, तां स्त्रीव्यापदमाचक्षते ।
च. शा. ४–३०

– एकमेव पुरुषस्य यदा बीजे बीजभागः प्रदोषमापद्यते तदा वन्ध्यं जनयति । यदा पुनरस्य बीजे बीजभागावयवः प्रदोषमापद्यते, तदा पूतिप्रजं जनयति । यदा त्वस्य बीजे बीजभागावयवः पुरुषकराणां च शरीरबीजभागानामेकदेशः । प्रदोषमापद्यते, तदा पुरुषाकृतिभूयिष्ठमपुरुषं तृणपुत्रिकं नाम जनयति, तां पुरुषव्यापदमाचक्षते ॥
च. शा. ४–३१

करणारा व आकृती स्त्रीप्रमाणेच असलेला पण जननेन्द्रियाचा काही भाग पुरुषा-प्रमाणेच असलेला असतो.

ऋतुकाळी असेच विपरीत कर्म केले तर जी कन्या उत्पन्न होते ती पुरुषाकृती व काही भाग स्त्रीसदृश असलेला अशी असते.

सुश्रुताने उल्लेखिलेला नारीषंढ व नरषंढ यांची जी विपरीत मैथुनरूप कारणे त्यांचा परिणाम, गर्भोत्पादनाच्या घटनेवर कसा घडतो व विकृती कशी उत्पन्न होते ते अष्टाङ्ग संग्रहकाराने येथे सांगितले आहे. स्त्रीबीज दुष्ट होते व जे स्त्रीकर-भाव आहेत, त्यांच्यामध्ये अपूर्णता येते. त्यामुळे आकाराने स्त्रीसारखी दिसणारी पण स्त्री नसलेली अशी 'वार्ता' नामक स्त्री जन्मास येते.

स्त्रीबीजाप्रमाणेच ज्या वेळी पुरुषबीज दोषांनी उपतप्त होते त्या वेळी अप्रज किंवा मृतप्रज असा पुरुष होतो. किंवा पुरुषत्व उत्पन्न करणाऱ्या भावावर परिणाम होऊन त्यांना दुर्बलता आली तर वरून पुरुषासारखा दिसणारा पण पुरुष नसलेला असा तृणमुख नामक पुरुष जन्मास येतो.

गर्भिणीच्या मिथ्या आहार-विहारामुळे व डोहाळ्यांचे समाधान न केल्यामुळे उत्पन्न होणारे दोष अनेक प्रकारच्या विकृती उत्पन्न करतात.

शुक्र-आर्तव संयोगाच्या वेळी वातादी दोष अत्यंत विकृत झाले असतील, तर त्या-मुळे उत्पन्न होणारा गर्भ विचित्र, विकृत आकाराचा उत्पन्न होतो. विचित्रता ही इतर प्राण्यांच्या थोड्याबहुत सादृश्यामुळे गर्भाच्या ठिकाणी दिसते. डोळे, कपाळ नाक, कान, हनुवटी, डोके, पाठ, पृष्ठवंश, हात, पाय इत्यादी इंद्रियांच्यामध्ये अनेक

– बीज-इति शुक्रे। शुक्ररूपबीजजनको भागो-बीजभागः। इह वन्ध्यमित्यनेन पुरुष-वन्ध्यं ब्रूते। इहापि तु प्रदोषव्याख्या तथा पूतिप्रजव्याख्या च पूर्ववत्। अपुरुष-मिति असमस्तपुरुषलक्षणयुक्तम्। तृणपुत्रिकं संज्ञापि शास्त्रसमयसिद्धैव। रान्ता-तृणपुत्रिक योर्व्यवायेच्छा परं भवति, न तु व्यवायसामर्थ्यमिति ब्रुवते ॥

च. शा. अ. ४–३१, टीका

– यदा पुनः सोऽवयवः स्त्रीकराणां च शरीरसंश्रयाणामधो गुरुत्वादीनां निर्वर्तका ये बीजांशास्तेषामेकदेशः। तदा स्त्र्याकृतिप्रायामस्त्रियं वार्तांनमा जनयति। तां स्त्रीव्यापादमाचक्षते। एवमेव पुंसो यदा शुक्राख्यो बीजे बीजं प्रदुष्यतीत्यादि योजयेद्वंध्यं पूतिप्रजं तथा पुरुषाकृतिप्रायमपुरुषं तृणमुखिनं नाम जनयति।

अ. सं. शा. ९-४८ ते ४९

– यो भार्यायां ऋतौ मोहात् अंगनेव प्रवर्तते।
ततः स्त्री चेष्टिताकारो जायते षंढसंज्ञितः ॥ सु. शा. २–४२

– वियोनिकृताकारा जायन्ते विकृतैर्मलैः। वा. शा. १–६



प्रकारच्या विकृती आढळतात. कधी संख्यांचे आधिक्य असते. अतिदीर्घता, अतिऱ्हस्वता, वा विषमता आढळते. जास्त बोटे असणे, ओठ फाटलेले, कान दुमडलेले, चिकटलेले, कानाची तशीच नाकाची हाडे नसणे, डोक्यावर टेंगळे असणे, अवयवांचे आकार फार मोठे व भेसूर, अशा अनेक विकृती आढळतात.

स्वप्नामध्ये स्त्री मैथुनाचा अनुभव घेईल, वा दोन स्त्रिया कामोन्मत्त होऊन परस्परांशी मैथुन करतील तर कललस्वरूपाचा (लोळागोळा) अस्थिरहित गर्भ उत्पन्न होतो असे सुश्रुताने म्हटले आहे.

मानसिक विकृतीमुळे स्त्रिया स्वप्नमैथुन अनुभवितात, वा दोन स्त्रिया परस्पर-मैथुन करतात असे क्वचित आढळते. तसेच गर्भाशयामध्ये गर्भसदृश अस्थिरहित असा मांसग्रंथीही आढळतो. पण त्यांचा परस्पर कार्यकारणभाव आहे असे मानणे अवघड आहे.

गर्भिणी आहारविहारातील नियमांचे पालन न करता जर वातकर आहार करील, तर प्रकुपित झालेल्या वातदोषाने पांगळा, आंधळा, बहिरा, मुका, गेंगाणा, तोतरा, थोटा, कुबडा असा गर्भ होतो. इतर वातविकार होतात.

पित्तकर आहार-विहार केल्यामुळे प्रकुपित झालेल्या पित्ताने टक्कल असलेला, केस पांढरे असलेला, दाढीमिशा अल्प असलेला, नख व केस यांचा रंग पिंगट असलेला असा होतो.

– यदा नार्या उपेतायां वृषस्यन्त्यौ कथंचन।
मुंच्यंत्यौ शुक्रमन्योन्यं अनस्थि तत्रः जायते ॥
ऋतुस्नानां तु या नारी स्वप्ने मैथुनमावहेत्।
आर्तवं वायुरादाय कुक्षौ गर्भं करोति हि ॥
मासि मासि विवर्धेत गर्भिण्या गर्भलक्षणं।
कललं जायते तस्याः वर्जितं पैतृकैर्गुणैः ॥

सु. शा. २–४७ ते ४९

– जन्मबाधवृत्ता ये मातुः अपचारात पंगु, जात्यंध, बधिर, मूक मिन्मिन्, वामन, प्रभृतयोः जायन्ते। तेपि द्विविधाः रसकृताः दौहृदापचारकृता। सु. सू. २४–५

– गर्भोवातप्रकोपेन दौहृदे वाऽवमानिते।
भवेत् कुब्जः कुणिः पंगुः मूको मिन्मिन् एव वा ॥ सु. शा. २–५१

– वातलैश्च भवेत् गर्भ कुब्जान्धजडवामनः।
पित्तलैः खलतिः पिंगः श्वित्री पाण्डुः कफात्मभिः ॥ वा. शा. १–४८

– यदा च लब्धगर्भा अन्वक्षमेव वातालानि आसेवते तदा अस्याः वायुः प्रकुपितः शरीरं अनुसर्पन् गर्भाशये अवतिष्ठमानाः गर्भस्य जड-बधिर-मूक-मिन्मिन्-गदगद-खंज, कुब्जा-वामन-हीनाधिकाङ्गत्वानि, अन्यं वा वातविकारं करोति।

अ. सं. शा. २–५१

कफकर आहार-विहार करून झालेल्या कफदुष्टीमुळे गर्भ हा कोड फुटलेला, त्वचा पांडुवर्ण असलेला व जन्मतःच दात असलेला होतो.

अकाली प्रवाहणामुळे मूल बहिरे, मुके, कुबडे, हनुवटी भंगलेले, (हनुसंध्येमध्ये) डोक्यास आघात पोहोचलेले, श्वास–कास, शोष या लक्षणांनी युक्त वा विकृताकृती [ अयथास्थाननिवेशितावयव – जे अवयव जेथे असावेत तेथे ते नसणे ] असा होतो. स्त्रीमध्ये कर्णिनीयोनी सापडते.

पूर्वजन्मी केलेल्या पातकामुळे गर्भ निरनिराळ्या विकृतींनी युक्त होतो.

❋ ❋

– तथा वायुवत् पित्तं अपि खलति-पलित-श्मश्रुहीनता त्वङ्नखकेश ( नेत्र ) पैंगल्यादिनी श्लेष्मा तु कुष्ठकिलास सदंतत्वादिनि त्रिवर्गो मिश्रान् विकारान् ।
अ. सं. शा. २–५२–५३

– अकालप्रवाहणात् बधिरं, मूकं, कुब्जं, व्यस्तहनं मूर्ध्वाभिधातिनं, कासश्वास-शोषोपद्रुतं विकटं वा जनयति । सु. शा. १०–९

– सर्पवृश्चिक कूष्मांड विकृताकृतश्चये ।
गर्भास्त्वेते स्त्रियाश्चैव ज्ञेयाः पापकृतोभृशं ॥ सु. शा. २–५०

– मातापित्रोस्तुनास्तिक्यात् अशुभैश्च पुराकृतैः ।
वातादीनां प्रकोपेण गर्भो वैकृतमाप्नुयात् ॥ सु. शा. २–५२

# ३

# गर्भिणी–विज्ञानीय

## गर्भाधान होताच स्त्रीशरीरावर व्यक्त होणारी लक्षणे :

योनीमध्ये निषेक झाल्यानंतर शुक्राचा आर्तवाशी संयोग होताच त्यात जीवाचे संक्रमण होऊन गर्भधारणा होते. या वेळी तोंडास पाणी सुटणे, थकवा वाटणे, अंग गळून गेल्यासारखे वाटणे, तंद्रा, अंगावर रोमांच येणे, अंग जड होणे, छातीत धडधडणे, योनीमध्ये एक प्रकारचे स्फुरण जाणवणे, मांड्या गळून गेल्यासारखे वाटणे, अशी लक्षणे उत्पन्न होतात. ही स्थिती प्राप्त झाल्यानंतर पुन्हा रजःस्राव होत नाही व स्त्रीकडून शुक्राचे ग्रहणही होत नाही.

गर्भधारणेची लक्षणे व्यक्त झाल्यानंतर लवकरच गर्भाचे लिंग जसे होणार असेल तदनुरोधाने गर्भिणीच्या ठिकाणी काही लक्षणे दिसू लागतात.

त्यावरून उत्पन्न होणारा गर्भ कोणत्या लिंगाचा होईल ते सांगता येते. या संवेदना जाणवण्यासाठी मात्र स्त्रीच्या ठिकाणी अतिशय सूक्ष्म अशी संवेदनशीलता असली पाहिजे.

सद्योगृहीतगर्भायाः लक्षणानि—

– निष्ठीविका गौरवमंगसादः तन्द्रा प्रहर्षो हृदये व्यथा च ।
तृप्तिश्च बीजग्रहणं च योन्यां गर्भस्य सद्योनुगतस्य लिंगम् । च. शा. २–२३
तत्र सद्योगृहीतगर्भाया लिंगानि–श्रमो ग्लानिः पिपासा सक्थिसदनं शुक्रशोणित-योरवबंधः स्फुरणं च योनेः । सु. शा. ३–१३

स्त्रीच्या डाव्या अंगाच्या हालचाली सहजपणे व अधिक होऊ लागल्या, पुरुषाचा सहवास हवासा झाला; झोपणे, पिणे, खाणे, वागणे, स्वभाव हालचाली यांच्यामध्ये स्त्रीसदृश्यताच राहिली, गर्भ हा डाव्या बाजूकडे अधिक जाणवला, त्याचा आकार लांबट असला, डाव्या स्तनामध्ये पुष्टी व स्तन्यप्रादुर्भाव प्रथम दिसला तर उत्पन्न होणारा गर्भ हा स्त्रीगर्भ असावा असे समजावे. पुरुष-गर्भ असेल तर याच्या उलट लक्षणे दिसतील. चालताना, चढताना उजवे पाऊल अगोदर पुढे पडेल व तसे करणे सोपे जाईल. उजव्या कुशीवर वळणे, कामाच्या वेळी उजवा हात पुढे होणे, हे सहजासहजी अधिक वेळा घडेल. स्त्रियांची संगती आवडेल. वागणुकीतील स्त्रीसुलभ असे लज्जा, विनय, शालीनतादी गुण उणावतील. खाणे, पिणे यांच्या सवयीही पुरुषासारख्या होतील. गर्भ उजवीकडे जाणवेल. उजवे स्तन प्रथम पुष्ट होऊन त्यात दुग्धप्रादुर्भाव होईल, गर्भाचा आकार गोल असेल तर पुरुष-गर्भ संभवतो. हीच लक्षणे मिश्र असतील तर गर्भ नपुंसक असतो.

**गर्भलिंग–प्राप्तिकाल :**

सद्योगृहीतगर्भाची लक्षणे दिसू लागल्यावर व लिंगविशेष लक्षणे व्यक्त होण्यापूर्वी विशिष्ट अपत्याची, विशेषत: पुत्राची इच्छा असेल तर शास्त्रकाराने पुंसवन नावाचा एक विधी सांगितला आहे. गर्भामध्ये दुसऱ्या महिन्याच्या शेवटी अंगप्रत्यंगे व्यक्त होत असतात. म्हणून ती व्यक्त होण्यापूर्वीच हा पुंसवनविधी करावा लागतो.

## पुंसवनविधी

पुंसवन कर्म, हे वेदोक्त धार्मिक कर्म असून, लिंगव्यक्तीपूर्वी करावयाचे असते. देश, काल, कर्म यांची जर पूर्णपणे अनुकूलता असेल तर, योग्य असे फल उत्पन्न होते.

या ठिकाणी सांगितलेला विधी जसाच्या तसाच करणे आवश्यक आहे. याची कार्य-कारणमीमांसा युक्तिपूर्वक करणे शक्य नाही. टीकाकाराने " नात्र अस्मादृशां युक्तयः

---

– लिंगं तु सद्योगर्भाया योन्या बीजस्य संग्रहः ।
तृप्तिर्गुरुत्वं स्फुरणं शुक्रास्रावनबंधनम् ।
हृदयस्पन्दनं तन्द्रा तृड्ग्लानिर्लोमहर्षणम् । वा. शा. १–३५ ते ३६

– सव्याङ्गचेष्टा पुरुषार्थिनी स्त्री स्त्रीस्वप्नपानाशनशीलचेष्टा ।
सव्याप्तगर्भाः न च वृत्तगर्भाः सव्यप्रदुग्धाः स्त्रियमेव सूते ।
पुत्रं त्वतो लिंगविपर्ययेण व्यामिश्रलिंगां प्रकृतिं तृतीयाम् । च. शा. २–२४ ते २५

– अव्यक्तः प्रथमे मासि सप्ताहात् कलली भवेत् ।
गर्भः पुंसवनान्यत्र पूर्वं व्यक्तेः प्रयोजयेत् । वा. शा. १–३७

– सप्ताहादवांगगर्भगोलकः श्लेष्मपिंडीभूतो भवेत् । सप्ताहादनन्तरं यावन्मासस्तावदव्यक्ताकृतिः कलली भवेत् । अत्र कललीभूते यावत् स्त्री-पुरुषाद्युत्पत्तिलक्षणा व्यक्तिर्न भवति तावत् व्यक्तेः प्राक् प्रथमे मासि पुंसवनानि प्रयोजयेत् ॥

वा. शा. १–३७ टीका



प्रभवन्ति । " असे स्पष्टपणे मान्य केले आहे. आणि तेच योग्य आहे. शेवटी हा प्रश्न श्रद्धेचा आहे; व कोठे ना कोठे तरी कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची श्रद्धा असल्यावाचून माणसास समाधान लाभत नाही असा निसर्ग आहे.

पुंसवनासाठी ज्या ठिकाणी गाई विश्रान्तीसाठी बसतात अशा ठिकाणी वाढलेल्या वडाच्या पूर्व व उत्तर दिशेकडे असलेल्या फांद्यांवरून दोन कोंब ( शुंग ) आणावे. हे किडलेले, वाळलेले खुरटलेले असू नयेत. दोन चांगले उडीद किंवा दोन पांढऱ्या मोहरीचे दाणे यांसह ते कोंब दह्यात टाकून पुष्य नक्षत्रावर प्राशन करावे. त्याचप्रमाणे जीवक, ऋषभक, अपामार्ग, सहचर यांचे कल्क एकत्र किंवा एक एक घेऊन त्यांनी दूध सिद्ध करून ते वरचेवर प्राशन करावे; किंवा बारीक मासोळी कुडचाकिट नावाचा जंतू पाण्याच्या ओंजळीतून पुष्य नक्षत्रावर प्राशन करावा.

सोने, चांदी वा लोखंड यांचे पुरुषाकृती पुतळे करून ते अग्नीमध्ये तापवून चांगले लाल करावे व ते दूध, दही, पाणी यामध्ये टाकून विझवावे, व ते दूध, दही सर्वच्या सर्व प्राशन करावे. चरकाने हा पुतळा करावयाचा तो अणुप्रमाण म्हणजे अगदी बारीक,

---

– पुष्ये पुरुषकं हैमं राजतम् वाऽथवाऽयसम् ।
कृत्वाऽग्निवर्णम् निर्वाप्य क्षीरे तस्याञ्जलिं पिबेत् ॥
गौरदण्डमपामार्गंजीवकर्षभसैर्यकान् । पिबेत् पुष्ये जले पिष्टानेकद्वित्रिसमस्तशः ॥
क्षीरेण श्वेतबृहतिमूलं नासापुटे स्वयं । पुत्रार्थं दक्षिणे सिञ्चेद्वामे दुहितृवांच्छया ।
पयसा लक्ष्मणामूलं पुत्रोत्पादस्थितिप्रदम् ।
नासयाऽऽस्येन वा पीतं वटशुंगाष्टकम् तथा ॥
ओषधिर्जीवनीयाश्च बाह्यान्तरुपयोजयेत् ।
उपचारः प्रियहितैर्भर्ता भृत्यैश्च गर्भधृक् ।
नवनीतघृतक्षीरैः सदा चैनामुपाचरेत् । वा. शा. १–३८ ते ४३

– तयोः कर्मणा वेदोक्तेन निवर्तनमुपदिश्यते प्राग्व्यक्तीभावात् प्रयुक्तेन सम्यक् । कर्मणां हि देशकालसम्पदुपेतानां नियतमिष्टफलत्वं तथेतरेषामितरत्वम् । तस्मादापन्नगर्भां स्त्रियमभिसमीक्ष्य प्राग्व्यक्तीभावाद् गर्भस्य पुंसवनमस्यै दद्यात् ।– गोष्ठे जातस्य न्यग्रोधस्य प्रागुत्तराभ्यां शाखाभ्यां शुंगे अनुपहते आदाय द्वाभ्यां धान्यमाषाभ्यां सम्पदुपेताभ्यां गौरसर्षपाभ्यां वा सह दध्नि प्रक्षिप्य पुष्येपि बेत्, तथाऽपरान् जीवकर्षभकापामार्गसहचरकल्कांश्च युगपदेकैकशो यथेष्टं वाऽप्युपसंस्कृत्य पयसा, कुडचकीटकं मत्स्यकं वोदकाञ्जलौ प्रक्षिप्य पुष्येण पिबेत् । तथा कनकमयान् राजतानायसांश्च पुरुषकानग्निवर्णानणुप्रमाणान् दध्नि पयसि उदकाञ्जलौ वा प्रक्षिप्य पिबेदनवशेषतः पुष्येण, पुष्येणैव च शालिपिष्टस्य पच्यमानस्योष्माणमुपाघ्राय तस्यैव च पिष्टस्योदकसंसृष्टस्य रसं देहल्यामुपनिधाय दक्षिणे नासापुटे स्वयमासिञ्चेत् पिचुना । यच्चान्यदपि ब्राह्मणा ब्रूयुराप्ता वा पुंसवनमिष्टं तच्चानुष्ठेयम्, इति पुंसवनानि ॥ च. शा. ८–१९

सूक्ष्म असा करावयास सांगितला आहे. व तो तापवून दूध, दही इत्यादींत टाकून अनवशेषत: प्राशन करावे, असे सांगितले आहे.

यावरून चरकास दूध, दही यासह तो पुतळाच प्राशन करावा असा अर्थ अभिप्रेत असावा असे दिसते. अन्यथा पुतळयाचा आकार अणुप्रमाण असावा असे सांगण्याचे प्रयोजन नव्हते.

पुष्यनक्षत्रावर साळीचे पीठ शिजत ठेवून त्याची वाफ हुंगवावी व ते पीठ शिजवून तयार झाल्यावर त्यातील रस पिळून उंबरठयावर डोके ठेवून स्वत: पिचून उजव्या नाकपुडीत सोडावा. कन्याप्राप्ती हवी असेल तर याच क्रिया स्त्रीच्या डाव्या नाकपुडीत कराव्या. ब्राह्मणांनी वा इतर आप्तांनी पुंसवनासाठी आवश्यक अशी कर्मे करावी.

अष्टाङ्गसंग्रहकाराने पुंसवनविधी थोडाफार असाच सांगितला आहे.

## गर्भिणीची व्यक्त लक्षणे :

सामान्यत: दुसऱ्या-तिसऱ्या महिन्यात गर्भिणीची लक्षणे व्यक्त होऊ लागतात. खरे म्हणजे सद्योगृहीत गर्भावस्थेची लक्षणे उत्पन्न झाली की त्याच्या मागोमागच ही व्यक्त लक्षणेही स्पष्ट होऊ लागतात. पण सद्योगृहीत गर्भावस्थेतील लक्षणे नेहमीच लक्षात येतात असे नाही. एक तर ही लक्षणे फारच सूक्ष्म असतात व तितकी सूक्ष्म संवेदनाक्षमताही प्रत्येक स्त्रीच्या ठिकाणी प्रत्येक वेळी असतेच असे नाही. म्हणून गर्भिणीच्या अवस्थेसाठी व तिच्यावर करावयाच्या उपचाराचे ज्ञान निश्चित व्हावे यासाठी ग्रंथान्तरी वर्णिलेल्या या व्यक्त लक्षणांवरच भरवसले पाहिजे.

रज:प्रवृत्ती होत नाही, तोंडास पाणी सुटते, अन्नावर वासना जात नाही; कारणावाचून सर्दी होते, तोंडास चव नसते, विशेषत: आंबट पदार्थ खावेसे वाटतात. बरेवाईट पदार्थ खाण्याची इच्छा उत्पन्न होते. डोळे पेंगुळतात. स्तन पुष्ट होतात. स्तनांमध्ये दूध उत्पन्न होते. स्तनमंडळ व ओठ अधिक काळे होतात. पायावर किंचित शोथ येतो. भगास्थीपासून नाभीपर्यंत स्वभावत: असलेली रोमराजी अधिक काळसर

– तद्यथा-लक्ष्मणा वटशुङ्ग-सहदेवा- विश्वदेवानामन्यतमांक्षीरेऽभिषुत्य त्रींश्चतुरो वा बिन्दून्दक्षिणे नासापुटे स्वयमासिञ्चेत्पिचुना वामे तु दुहितृकामा। न चैतान् निष्ठीवेत् तथा पुष्योद्धृतायाः श्वेतबृहत्या मुलकल्कादूसं नावयेत्। तद्वच्चोत्पलपत्रं कुमुदपत्रं लक्ष्मणामूलं वटशृङ्गाणि चाष्टौ च नावयेत्। शुक्लमाल्याम्बरधरा च नारी पुष्योद्धृताया लक्ष्मणाया मूलकल्कमुदुम्बरमात्रं पयसा पिबेत्पुत्रस्योत्पादनायस्थितये च। तद्वद्गौरदण्डमपामार्गं जीवकर्षभकौ शङ्खपुष्पीमध्यदण्डा सहचरं नग्नजीवमग्निजिह्वायष्टौ वा वटशृङ्गाणि। शालिपिष्टस्य च पच्यमानस्योष्माणघ्राय तद्रसं देहल्यां स्थिता पूर्ववन्नावयेत्। यच्चान्यदपि ब्राह्मणा वृद्धस्त्रियो वा ब्रूयुस्तच्च कुर्यात्। अ. सं. शा. १–६२



होऊन स्पष्ट होते. शरीरास किंचित कृशता येते. जांभया वरचेवर येतात. अंग गळून गेल्यामुळे फार आळस वाटतो. विशिष्ट गंध नकोसे होतात. योनिमार्गास शैथिल्य येऊन तो विवृत्त होतो ( आटालत्व ).

ही सर्व लक्षणे स्त्रीमध्ये उत्पन्न होण्याचे कारण असे सांगता येईल की, गर्भ गर्भाशयामध्ये स्थिर झाल्यापासून ते प्रसव होईपर्यंत गर्भाचे पोषण मातेच्या रस, रक्तापासून ( सूक्ष्म पचनाने ) होत असते; व हे पोषण होत असताना जो मलभाव गर्भामध्ये उत्पन्न होत असतो तो मलभाव काही प्रमाणात मातेच्या शरीरामार्फत बाहेर टाकला जातो; व यातील काही मलभाव स्त्रीच्या शरीरामध्ये संचित होतो व त्याचा परिणाम म्हणून वरील लक्षणे स्त्रीच्या शरीरावर व्यक्त होतात. या देवाणघेवाणीचे सात्म्य गर्भिणीला झाल्यानंतर म्हणजेच तीन महिन्यांनंतर हळूहळू ही लक्षणे कमी झालेली दिसतात.

ही लक्षणे सामान्यत: एक ते चार या महिन्यांमध्ये उत्पन्न होतात. त्यात रज.प्रवृत्ती बंद होणे, आळस वाढू लागणे, ही लक्षणे अगदी आरंभी उत्पन्न होतात तर पायावर किंचित सूज येणे हे लक्षण पुष्कळच पुढे उत्पन्न होते.

या लक्षणांना गर्भसंभवामुळे बंद झालेले रजोदर्शन, गर्भाचे अस्तित्व, गर्भशरीरातून परत मातेच्या शरीरात येणारा रस व गर्भभार ही कारणे असतात.

[1]चवथ्या महिन्यात गर्भिणीचे शरीर अधिकच जड होते; कारण या महिन्यात गर्भ स्थिर होऊ लागतो. [2]पाचव्या महिन्यात गर्भिणीला विशेष कृशता येते; कारण गर्भाचे

– तस्या गर्भापत्तेर्हृदय्यस्य च विज्ञानार्थं लिंगानि समासेनोपदेक्ष्यामः। उपचारसाधनं ह्यस्य ज्ञाने, ज्ञानं च लिंगतः तस्मादिष्टो लिंगोपदेशः। तद्यथा आर्तवादर्शनमास्यसंस्रवणमनन्नाभिलाषश्छर्दिरोचकोऽम्लकामता च विशेषेण श्रद्धाप्रणयनमुच्चावचेषु भावेषु गुरुगात्रत्वं चक्षुषोर्ग्लानिः स्तनयोः स्तन्यमोष्ठयोः स्तनमंडलयोश्च कार्ष्ण्यमत्यर्थंश्वयथुः पादयोरीषल्लोमराज्युद्गमो योन्याश्चाटालत्वमिति गर्भे पर्यागते रूपाणि भवन्ति। च. शा. ४–१६

– तत्र व्यक्तस्य लक्षणम्।
क्षामता गरिमा कुक्षेर्मूर्च्छा छर्दिररोचकः।
जृम्भा प्रसेकः सदनं रोमराज्याः प्रकाशनम्॥
अम्लेष्टता स्तनौ पीनौ सस्तनौ कृष्णचूचुकौ। वा. शा. १–५० ते ५१

– अकामतश्छर्दयति गंधादुद्विजते शुभात्।
प्रसेकः सदनं चापि गर्भिण्या लिंगमुच्यते। सु. शा. ३–१५

१ चतुर्थे मासि स्थिरत्वमापद्यते गर्भः तस्माद् तदा गर्भिणी गुरुगात्रत्वमधिकमापद्यते विशेषेण। च. शा. ४–२०

२ पंचमे मासि गर्भस्य मांसशोणितोपचयो भवत्यधिकमन्येभ्यो मासेभ्यः, तस्मात्तदा गर्भिणी कार्श्यमापद्यते विशेषेण। च. शा. ४–२१

मांस, रक्त इत्यादी धातू या महिन्यात अधिक वाढू लागतात. [1]सहाव्या महिन्यात गर्भिणीचे बल व वर्ण यांची हानी होते, कारण या महिन्यात गर्भाचे तेच भाव विशेष वाढत असतात.

[2]सातव्या महिन्यात गर्भिणीस अतिशय थकवा येतो. तिचे सर्व शरीर गळून गेल्यासारखे होते. कारण या महिन्यात गर्भाचे सर्व भाव परिपूर्ण होतात.

## किक्किस

[3]हृदयातून रसाबरोबर संचार करीत असताना गर्भोत्पन्न दोष हे मांड्या, उदर स्तन यांच्यावर एक प्रकारचे रेघांच्या आकाराचे वलिविशेष उत्पन्न करतात. त्यांना




आ. २९ : १ राजी; २, ३, ४ किक्किस

१ षष्ठे मासि गर्भस्य बलवर्णोपचयो भवत्यधिकमन्येभ्यो मासेभ्यः तस्मात्तदा गर्भिणी बलवर्णहानिमापद्यते विशेषेण । च. शा. ४–२२

२ सप्तमे मासि गर्भः सर्वैर्भावैराप्याय्यते, तस्मात्तदा गर्भिणी सर्वाकारैः क्लान्ततमा भवति । च. शा. ४–२३

३ गर्भेणोत्पीडिता दोषास्तस्मिन् हृदयमाश्रिताः ।
कंडुं विदाहं कुर्वन्ति गर्भिण्याः किक्किसानि च ॥ वा. शा. १–५८



किक्किस असे म्हणतात. या किक्किसाबरोबरच विशेषतः याच अवयवांमध्ये कंडू व विदाह ही लक्षणे उत्पन्न होतात.

[1]आठव्या महिन्यात ओज हे अस्थिर असते. ते कधी मातेच्या शरीरातून गर्भामध्ये जाते व कधी गर्भशरीरातून मातेच्या शरीरामध्ये येते. अपरा व नाडी यांतून हे वहन आळीपाळीने चालू असते. ओजाच्या या चंचलपणामुळे माता ही अधूनमधून उत्साही होते व मधूनमधून म्लान होते. गर्भाचेही भाव असेच पालटत राहतात. त्यामुळे या महिन्यामध्ये प्रसूती होणे गर्भास धोक्याचे असते. त्यासाठी आठवा महिना मोजून त्याची गणना करू नये असे शास्त्रकाराने सांगितले आहे.

या ओजाच्या प्रकरणी काही मतमतान्तरे आहेत. ओज संचार करीत राहते हे सर्वांसच मान्य आहे. कारण मधूनच उत्साही होणे व मधूनच थकवा वाटणे ही लक्षणे प्रत्यक्ष दिसतात व त्यावरून ओजाची तरतमता अनुमानिता येते. मतभेद आहेत. ते आठव्या महिन्यात प्रसूती झाली तर कधी मातेस वा कधी गर्भास धोका पोहोचतो का नाही यासंबंधी आहेत.

एक मत असे की, प्रसूती होताना ओज जिथे असेल तदनुरूप परिणाम घडतील. ओज गर्भस्थ असताना माता मरेल व उलट स्थिती असेल तर गर्भ मरेल. परंतु हे म्हणणे शास्त्रकारांच्या वचनांचा संकलितपणे विचार करता योग्य नाही. गर्भाचा जन्म व्यापत्तीने व्यक्त होतो असे सर्व सांगतात. पण मातेसंबंधी तसा उल्लेख नाही. उलट काही ठिकाणी मातेचा मृत्यू घडत नाही असे स्पष्टपणे सांगितले; व त्याचे कारणही योग्य आहे. माता ही पूर्ण वाढ झालेली स्त्री असल्यामुळे तिच्या शरीरातील थोडेसे ओज गर्भाबरोबर बाहेर पडताच तिला मृत्यू येण्याइतका धोका उत्पन्न होईल हे संभवत नाही. प्रसूतीनंतर येणारा थकवा मात्र थोडा जास्त प्रमाणात येईल हे खरे. तसेच आठव्या महिन्यात जन्मास आलेला गर्भ प्रत्येक वेळी मरेलच असे मात्र नाही. गर्भाच्या ठिकाणी ओज असताना जर प्रसूती झाली तर गर्भ जगेल. यासाठी चरकाने गर्भाचा जन्म ओजाच्या अनवस्थितपणाने 'व्यापत्तिमत्' होतो असे वर्णन केले आहे. 'व्यापत्तिमत्' याचा अर्थ धोका निश्चयाने होतोच असा करावयाचे कारण नाही. 'व्यापत्तिमत्' शब्दाने मुख्यतः गर्भाच्या नाशाची संभवनीयता अधिक

– किक्किसानि–उरुस्तनोदरे वलिविशेषा रैखाकारास्तद्काले प्रायो ये जायन्ते ते किक्किस–संज्ञाः । कैश्चित् "शूकैरिव पूर्णता–किक्किसानि" इति व्याख्यायि ।
वा. शा. १–५८ टीका

१ अष्टमे मासि गर्भश्च मातृतो गर्भतश्च माता रसहारिणीभिः संवाहिनीभिर्मुहुर्मुहुरोजः परस्परत आददाते गर्भस्यासंपूर्णत्वात् । तस्मात्तदा गर्भिणी मुहुर्मुहुर्मुदा युक्ता भवति मुहुर्मुहुश्च म्लाना, तथा गर्भः, तस्मात्तदा गर्भस्य जन्म व्यापत्तिमद्भवत्योजसोऽनवस्थितत्वात् । तं चैवार्थमभिसमीक्ष्याष्टमं मासमगण्यमित्याचक्षते कुशलाः । च. शा. ४–२४

एवढेच दाखविले आहे. कारण व्यापत् शब्दाचा अर्थ मुख्यतः विकृती, पीडा, संकट असा आहे.

या ठिकाणचे हे संचारी ओज अर्थातच अष्टबिंद्वात्मक नाही हे अवश्य लक्षात ठेवले पाहिजे. विस्रंस, व्यापत्, क्षय अशा तीन विकृतींनी युक्त होणारे जे शुद्ध श्लैष्मिक ओज तेच येथे अभिप्रेत आहे.

आठ महिने पुरे होऊन वर एखादा दिवस जरी लोटला तरी तेव्हापासून नववा महिना गृहीत धरून १० महिने पूर्ण होईपर्यंतचा काल हा प्रसवाचा सर्वोत्तम काल होय. यापेक्षा पुढे अधिक काल गर्भ पोटात राहणे हे विकृतिदर्शक आहे.

चक्रदत्ताने आपल्या टीकेत सुश्रुताचा उल्लेख करून त्याने सांगितलेला बारा महिन्यांपर्यंतचा काल हाही उत्तम पक्षाने नसला तरी अल्प दोष असल्यामुळे गौणपणे पण प्रसवकालच मानावा असे सुचविले आहे.

– अष्टम इत्यादी–रसवाहिनीभिरिति मातृ–हृदये गर्भनाड्यां च संबद्धा भिः रस-वाहिनीभिः । परस्परत ओजः आददाते इति मातुरोजो गर्भ आदत्ते ग. भस्य चौजो माता आदत्ते । ओजोऽनवस्थाने हेतुमाह–गर्भस्यासंपूर्णत्वादिति, यस्माद्गर्भोऽसंपूर्णः, तस्मादनिष्पन्नाश्रयं गर्भोजोऽनवस्थितं भवति । मातुरोजो गर्भं गच्छतीति यदुच्यते तद्गर्भौज एव मातृसंबद्धं सन्मात्रोज इति व्यपदिश्यते । यदि तु मातुरेव यदोजस्तद्गर्भं गच्छतीत्यर्थः स्यात्तदा ...स्यासंपूर्णत्वादिति हेतुः संपूर्णमातृदेह-स्थितस्यौजसो गमने असंगतः स्यात्, तथा, यथा गर्भौजसो मातर्यवस्थानसमये जन्म-गर्भमरणकरं भवति, तथा मातुरोजसो गर्भावस्थाने सति यद् गर्भजन्म, तत्र मातु-रपि मरणं स्यात् । न चैतदिष्टम् । ये नोभयथापि गर्भस्यैवात्र मरणमुच्यते न मातुः 'तदा गर्भस्य जन्म व्यापत्तिमद् भवति' इति वचनेन । जतूकर्णेऽपि अष्टमे जन्म गर्भविनाशायैव न मातुरितिदर्शितम् । यदुक्तम् स्त्रीगर्भावन्योन्यस्य ओजांसि हरतोऽष्टमे । तस्मात्तदा प्रसूतिः गर्भविनाशायैव' इति । अन्ये तु वर्णयन्ति–यत्–सत्यपि मातुरोजसो 'गर्भगमने जन्मादृष्टवशादेव गर्भस्यैव मरणाय भवति, न मातुः सुश्रुतव्याख्यातारस्तु–अष्टममासे नैर्ऋतभागत्वाच्च गर्भस्य, सत्यप्योजोऽनव-स्थाने तुल्ये, गर्भस्यैव नाशो न मातुः' इति वर्णयन्ति । गर्भिणी मुहुर्मुहुर्मुदा युक्ता भवतीति–गर्भौजोयोगाद् हर्षयुक्ता भवति, ओजोविगमात्तु मुहुर्मुहुर्म्लाना भवतीति योज्यम् । तथा गर्भ इति–गर्भिणीवद्गर्भोऽपि मुहुर्मुहुर्मुदा युक्तो भवति मुहुर्मुहुर्ग्लानो भवति तस्मादिति पूर्वोक्तं गर्भव्यापत्तिहेतुं साक्षाद् ब्रूते–ओजसोऽनवस्थितत्वादिति एतच्च व्याकृतमेव । अष्टममासस्य विशेषान्तरमाह तं चैषेत्यादि । तं चैवार्थमिति गर्भव्यापत्तिरूपमर्थम् । अगण्यमिति न गणनया गर्भिण्यां प्रतिपादनीयम् । यदि हि गर्भिणी गण्यमानमष्टमं मासं गर्भजन्मव्यापत्तिकरं शृणु-यात् ततो भीता स्यात्, तद्भयाच्च गर्भस्य वातक्षोभाद् व्यापत् स्यादिति भावः ।

च. शा. ४–२४ टीका



चक्रदत्ताच्या या म्हणण्याला वाग्भटाचाही आधार आहे. आठ महिने पूर्ण झाल्यापासून पुढे १२ महिन्यांपर्यंत प्रसूतीचा काल असतो. यापुढेही गर्भ राहिल्यास तो विकारकारी होतो.

## मासानुमासिक गर्भिणी-परीक्षा

गर्भाच्या व गर्भिणीच्या अपेक्षेने गर्भिणीची परीक्षा—

### ( १ ) प्रथम मास पूर्ण

गर्भाशय हा कटिविवरातच राहून योनिपरीक्षेमध्ये गर्भाशय मृदू लागतो व वैद्याच्या बोटाला गर्भाशयाचे स्पंदन स्पष्टपणे व्यतीत होते. गर्भिणीला हृल्लास, छर्दी, तंद्रा, गात्रसाद ही लक्षणे होतात व मलमूत्रप्रवृत्ती वारंवार होते.

### ( २ ) द्वितीय मास पूर्ण

क्वचित गर्भाशय भगास्थिजवळ वैद्याला स्पर्शगम्य होतो. बाकी सर्व लक्षणे वरीलप्रमाणेच होतात. क्वचित मूत्रसंग पण सापडतात.

### ( ३ ) तृतीय मास पूर्ण

गर्भाशय भगास्थीच्या वर एक अंगुळ वाढलेला लागतो. छर्दी वगैरे दौहृदाची लक्षणे कमी होऊ लागतात.

### ( ४ ) चतुर्थमास पूर्ण

गर्भाशय भगास्थी व नाभीच्या मध्यापर्यंत वाढलेला आढळतो. क्वचित गर्भावयवही स्पर्शगम्य असतात.

### ( ५ ) पंचम मास पूर्ण

गर्भहृद्स्पंद अस्पष्टपणे ऐकू येतात. गर्भावयव स्पष्टपणे लागतात. गर्भाशय नाभीच्या खाली व्यक्त होतो.

– तस्मिन्नेकदिवसातिक्रान्तेऽपि नवमं मासमुपादाय प्रसवकालमित्याहुरादशमा-न्मासात् । एतावान् प्रसवकालः, वैकारिकमतः परं कुक्षौ स्थानं गर्भस्य ।

च. शा. ४–२५

– तस्मिन्निति अष्टमे मासि । आदशमादिति वचनं प्रशस्ततरप्रसवकालाभिप्रायेण । सुश्रुते द्वादशमासपर्यंतं सम्यक्प्रसवकालाभिधानं स्तोकदोषयोरेकादशद्वादशमासयो-रल्पदोषत्वेनादोषपक्ष एव निक्षेपाद् बोद्धव्यम् । च. शा. ४–२५ टीका

– तस्मिंस्त्वेकाहयातेऽपि कालः सूतेरतः परम् ।
वर्षाद्विकारकारी स्यात्कुक्षौ वातेन धारितः ॥ वा. शा. १–६६

– अष्टमात् मासादनंतरं नवमदशमैकादशद्वादशमासान् यावत् सूतेः कालः ।

वा. शा. १-६६ टीका

**( ६ ) षष्ठम मास पूर्ण**

गर्भाशय नाभीच्या वरच्या बाजूस लागतो. गर्भावयव स्पष्टपणे व्यक्त होतात. गर्भचलन माता व वैद्य या दोघांनाही व्यतीत होते. गर्भशिर हे ऊर्ध्वभागी असलेले आढळते. गर्भहृद्स्पंदन जास्त स्पष्टपणे ऐकू येते.

**( ७ ) सप्तम मास पूर्ण**

गर्भाशयाची व्याप्ती नाभीच्या वर लागते. गर्भहृद्स्पंदन आणखीन स्पष्टपणे ऐकू येते. गर्भशिर ऊर्ध्वभागी सापडते. क्वचित गर्भिणीला पादशोथ, सर्वाङ्गशोथ आढळू शकतो. रक्तदाब घ्यावा. रक्त व मूत्रपरीक्षण करावे. (कृपया प्रकरण ५ वे पाहावे).

**( ८ ) अष्टम मास पूर्ण**

गर्भाशयाची व्याप्ती आमाशयाच्या खाली दोन अंगुलीपर्यंत आढळते. गर्भाचे आसन स्थिर होण्याकडे प्रवृत्ती होते. याच वेळी साधारणतः गर्भशिर अधोभागी म्हणजे कटिराकडे येते.

**( ९ ) नवम मास पूर्ण**

गर्भाशयाचा दाब आमाशयावर पडलेला आढळतो. गर्भ परिपुष्ट झालेला कळतो. गर्भावयव स्पष्टपणे व्यतीत होतात. गर्भहृद्स्पंद स्पष्ट व मातेच्या नाडीच्या संख्येने जवळजवळ दुप्पट सापडतात.



आ. ३० : नाडीयंत्र
(गर्भहृद्स्पंद ऐकण्याकरिता)



आ. ३१ : कटिरमापनयंत्र



नववा महिना पूर्ण होत असताना आसन्नप्रसवेची लक्षणे गर्भिणीमध्ये आढळतात. उदा.– गर्भशिर कटिविवरात उतरते. कुक्षी शिथिल होते. गर्भिणीला अधोगुरुत्व प्राप्त होते. तिला मलमूत्रप्रवृत्ती वारंवार होते.



आ. ३२ : उदरावरून गर्भाचे परीक्षण करीत असताना



आ. ३३ : उदरावरून गर्भाचे परीक्षण करीत असताना



आ. ३४ : गर्भहृद्स्पंद ऐकत न असताना

## गर्भोपघातकर भाव :

गर्भाचे पोषण व संरक्षण चांगले व्हावे यासाठी गर्भवती स्त्रीने काही गोष्टी कटाक्षाने वर्ज्य केल्या पाहिजेत. गर्भ हा अतिशय कोमल, नाजुक अशा स्थितीत असतो. कोणत्याही कारणाने थोडासा जरी दोषप्रकोप झाला तरी त्यांचा क्षोभ गर्भाला सहन होत नाही. गर्भिणीने अत्यंत गुरू, उष्ण, तीक्ष्ण असे पदार्थ वर्ज्य करावेत. अवघड, कठीण, श्रमदायक अशा मैथुनादी हालचाली करू नयेत. अनुभवी स्त्रिया वागणुकीसंबंधी जे नियम सांगतील त्यांचेही पालन करावे. तांबडे वस्त्र हे भूतपिशाच्चादिकांना आकृष्ट करणारे आहे, म्हणून त्यांच्यापासून गर्भाचे संरक्षण करण्यासाठी रक्तवर्ण वस्त्र नेसू नये, अशी समजूत आहे.

मादक पेयांचे वा द्रव्यांचे सेवन करू नये. वाहनात बसू नये (हादरे बसणाऱ्या). मांस खाऊ नये. इंद्रियांना सर्वस्वी प्रतिकूल, उबग आणणारे न आवडणारे, पीडाकर होणारे असे भाव अगदी वर्ज्य करावेत.

— गर्भोपघातकरास्त्विमे भावा भवन्ति तद्यथा-सर्वमतिगुरूष्णतीक्ष्णं दारुणाश्च चेष्टाः इमांश्चान्यानुपदिशन्ति वृद्धाः। देवतारक्षोऽनुचरपरिरक्षणार्थं न रक्तानि वासांसि बिभृयान्न मदकाराणि मद्यान्यभ्यवहरेन्न यानमधिरोहेन्न मांसमश्नीयात् सर्वेन्द्रिय प्रतिकूलांश्च भावान् दूरतः परिवर्जयेत्, यच्चान्यदपि किञ्चित् स्त्रियो विद्युः ॥
च. शा. ४–१८

— दारुणाश्चेष्टाः = व्यवायादिकाः। देवतारक्षोऽनुचरेभ्यः परिरक्षणम्। यदित्यादि। यच्चान्यत् स्त्रियः गर्भकालासेव्यत्वेन विद्युः, तदपि वर्जयेत्। वदन्ति हि स्त्रियः "न गर्भिणी कूपमवलोकयेत्, न नदीपारं यायात्"— इत्यादि। वृद्धस्त्रीवचनमप्यागममूलमेव, इह तु ग्रन्थविस्तरभयान्न दर्शितमिति भावः॥

च. शा. ४–१८ टीका






आ. ३५ : गर्भाची आसने

**आ. क्र. ३ चे १ मध्ये व ४ चे २ मध्ये गर्भाच्या आसनाचे रूपान्तर होते व नंतरच प्रसव प्राकृतरीत्या होतो.**

चरकाने गर्भोपघातकर मिथ्या आहारविहार व त्यांचे गर्भावर होणारे परिणाम विस्ताराने वर्णन केले आहेत. ते असे :

वाकडेतिकडे, उंच, टणक अशा आसनांवर बसल्यामुळे, वातमूत्रपुरीषांचे वेग धारण केल्यामुळे; अवघड, अयोग्य असा व्यायाम केल्यामुळे; तीक्ष्ण, उष्ण पदार्थांचे अधिक प्रमाणात सेवन केल्यामुळे किंवा फार थोडे खाल्ल्यामुळे गर्भ हा उदरातच मरतो; अकाली स्रवतो किंवा शुष्क होत जातो.

गर्भावर जर आघात झाला, वा इतर दाब पडला, किंवा खोल विहिरीत डोकावून पाहिले, धबधब्याजवळ बसले, इतर भयोत्पादक गोष्टी पाहिल्या किंवा फार हादरे बसणाऱ्या वाहनातून प्रवास केला, तिटकारा आणणाऱ्या गोष्टी गर्भिणीच्या पुन्हा पुन्हा कानावर आल्या तर अकाली गर्भपात होतो.

गर्भिणी नेहमीच उताणी झोपेल तर गर्भाची नाळ त्याच्या कंठाभोवती गुंडाळली जाते. असुरक्षित ठिकाणी झोपी गेली किंवा रात्री भटकली तर त्या गर्भिणीस होणारे मूल वेडे होते, अपस्मार व्याधिपीडित किंवा भांडकुदळ होते.

मैथुन सेवन करणाऱ्या गर्भिणीस कुरूप, निर्लज्ज, वा स्त्रैण (स्त्रीवश) अशा स्वभावाचे मूल होते. गर्भिणी नेहमी शोक करील तर जन्मास येणारे मूल भित्रे, खुरटलेले वा अल्पायुषी होईल.

गर्भिणी स्त्री जर मनाने द्रोह (कोणाचा ना कोणाचा तरी) करीत राहील, तर दुसऱ्याला पीडा देण्यात आनंद मानणारे मूल जन्मास येईल वा ते ईर्ष्युषंढ वा स्त्रैण होईल.

चोरीमुळे दुष्ट, कष्टाचे जीवन असलेले, वाईट कृत्य करणारे मूल जन्मास येईल.

---

– गर्भोपघातकरास्त्विमे भावाः तद्यथा– उत्कटकविषमकठिना सनसेविन्या वातमूत्रपुरीष वेगानुरुन्धत्या दारुणानुचितव्यायामसेविन्याः तीक्ष्णोष्णातिमात्रसेविन्याः प्रमिताशनसेविन्या गर्भो म्रियतेऽन्तः कुक्षेः । अकाले वा स्रंसते । शोषी वा भवति । तथाभिघातप्रपीडनैः श्वभ्रकूपप्रपातदेशावलोकनैर्वाऽभीक्ष्णं मातुः प्रपतत्यकाले गर्भः । तथा अतिमात्रसंक्षोभिभिर्यानैर्यानेन, अप्रियातिमात्रश्रवणैर्वा, प्रततोत्तानशायिन्याः पुनर्गर्भस्य नाभ्याश्रया नाडी कण्ठमनुवेष्टयति । विवृतशायिनी नक्तं चारिणी चोन्मत्तं जनयति, अपस्मारिणं पुनः कलिकलहशीला । व्यवायशीला दुर्वपुमन्हीकं स्त्रैणं वा । शोकनित्या भीतमपचितमल्पायुषं वा । अभिध्यात्री परोपतापिनमीर्ष्युं स्त्रैणं वा । स्तेनाऽत्वायासबहुलमतिद्रोहिणकर्मशीलं वा । अमर्षिणी चण्डमौपधिकमसूयकं वा । स्वप्ननित्या तन्द्रालुमबुधमल्पाग्निं वा । मद्यनित्या पिपासालुमल्पस्मृतिमनवस्थितचित्तं वा । गोधामांसप्राया शार्करिणमश्मरिणं शनैर्मेहिनं वा । वराह मांसप्राया रक्ताक्षं क्रथनमतिपरूषरोमाणं वा । मत्स्यमांसनित्या चिरनिमेषं स्तब्धाक्षं वा । मधुरनित्या प्रमेहिणं मूकमतिस्थूलं वा । अम्लनित्या रक्तपित्तिनं त्वगक्षिरोगिणं वा । लवणनित्या शीघ्रवलीपलितं खालित्यरोगिणं



गर्भिणीला मत्सरामुळे कपटी, मत्सरी असे मूल होईल. गर्भिणीने नेहमीच फार झोप घेतली तर मूल झोपाळू, मूर्ख किंवा मंदाग्नी असलेले होईल.

मद्यप्राशनाने मल फार तहान लागणारे, स्मरणशक्ती कमी असलेले व चंचल स्वभावाचे होईल.

घोरपडीचे मांस फार खाल्ल्याने मूत्राश्मरी, मूत्रशर्करा या रोगाने युक्त किंवा शनैर्मेही असे मूल होते.

डुकराचे मांस खाण्याच्या सवयीने तांबडे लाल डोळे असलेले, श्वासोच्छ्वासास कष्ट होणारे ( दमेकरी), व राठ केसांचे मूल होते.

मासे खाण्यामुळे मुलाचे डोळे लवकर मिटत नाहीत वा त्याच्या डोळ्यांची उघडझाप प्रकृत नसते.

फार गोड खाल्ल्याने मूल प्रमेही, मुके, फार लठ्ठ होते. अति आंबट खाण्याने रक्तपित्त, त्वचारोग, नेत्ररोग असलेले होते.

फार खारट खाल्ल्याने मूल टक्कल पडलेले होते, किंवा त्याच्या अंगावर सुरकुत्या पडतात. त्याचे केस फार लवकर पांढरे होतात.

तिखटामुळे दुर्बल, अल्पशुक्र वा प्रजोत्पादनास असमर्थ अशी प्रजा होते.

कडू द्रव्याच्या सेवनाने कृश, शुष्क, बलहीन, खुरटलेले असे मूल होते.

तुरट रसाचे पदार्थ खाल्ल्याने मुलाचा रंग काळा होतो, व त्याला अनाह, उदावर्त असे रोग होतात.

तसेच निरनिराळ्या रोगांची जी कारणे सांगितली आहेत तीही गर्भिणीने वर्ज्य करावीत. अन्यथा ज्या ज्या रोगांच्या कारणाचे सेवन गर्भिणी करील त्या त्या रोगाने पीडित असे मूल तिला होईल. यासाठी चांगले सुदृढ, आरोग्यसंपन्न असे मूल हवे असल्यास स्त्रीने अहितकर आहारविहारांचा विशेष रीतीने त्याग केला पाहिजे.

हितकर अशा आहारविहारांची सवय लावून घेतली पाहिजे.

---

वा । कटुकनित्या दुर्बलमल्पशुक्रमनपत्यं वा । तिक्तनित्या शोषिणमबलमनुपचितं वा । कषायनित्या श्यावमानाहिनमुदावर्त्तिनं वा । यद्यच्च यस्य यस्य व्याधेर्निदानमुक्तम् तत्तदासेवमानान्तर्वत्नी तन्निमित्तविकारबहुलमपत्यं जनयति । पितृजास्तु शुक्रदोषा मातृजैरपचारैर्व्याख्याताः । इति गर्भोपघातकरा भावा भवन्त्युक्ताः । तस्मादहितानाहारविहारान् प्रजासम्पदमिच्छन्ती स्त्री विशेषेण वर्जयेत् । साध्वाचारा चात्मानमुपचरेद्धिताभ्यामाहारविहाराभ्याम् ।

च. शा. ८–१२

– तदा प्रभृतिव्यवायं व्यायामं अतितर्पणं अतिकर्शनं दिवास्वप्नं रात्रिजागरणं शोकं यानारोहणं भयमुत्कटकासनं चैकान्ततः स्नेहादिक्रियां शोणितमोक्षणं चाकाले वेगविधारणं च न सेवेत । सु. शा. ३–१६

गर्भाच्या रक्षणासाठी गर्भिणीवर करावयाचे उपचारही फार जपून करावेत.

गर्भिणीला जर काही व्याधी झाल्या तर त्यावर उपचार करताना मृदु, मधुर, शीत, सुखकर, कोमल अशीच औषधीद्रव्ये वा आहारद्रव्ये वापरावीत. तिच्यावर वमन, विरेचन, नस्य यांचा प्रयोग करू नये. रक्तमोक्ष करू नये. आस्थापन वा अनुवासन बस्तीचाही उपयोग फारसा करू नये. विकार फारच बलवान असेल व वर सांगितलेल्या उपचारावाचून गतीच नसेल तर मग मात्र तारतम्याने वरील उपचारांची योजना करावी.

आठव्या महिन्यानंतर वमनादी पंचकर्मांनी साध्य असलेल्या व्याधींमध्ये सौम्य स्वरूपात पंचकर्माचा वापर करावा. त्यातही प्रत्यक्ष पंचकर्म न करता पंचकर्माचे फल देणारे असे इतर उपचार करता आले तर फार चांगले. शोधनोपचारापेक्षा शमनोपचारावर जास्त भर द्यावा. गर्भिणी ही तोंडोतोंड तेलाने भरलेल्या भांड्यासारखी आहे. त्याला थोडाही धक्का सहन होत नाही. तसेच गर्भिणीसही जपून वागवावे लागते. तिच्या उपचारामध्ये तीक्ष्ण औषधे व स्वेदन यांचा उपयोग करू नये ( गर्भिणी न स्वेदयेत् । वा. सू. १७–२४ ). गर्भिणींना नस्य देऊ नये. त्यामुळे गर्भिणीच्या प्राणास दुर्बलता येते. आणि उत्पन्न होणारा गर्भ हा थोटा, आंधळा, वा इतर इंद्रियेही दुबळी असलेला होतो.

गर्भिणी स्त्रीला धूम्रपान देऊ नये. धूम्रामुळे उत्पन्न झालेल्या उष्णतेने गर्भपात होतो अथवा गर्भाचा वर्ण विकृत होतो.

---

– दोषाभिघातैर्गर्भिण्या यो यो भागः प्रपीड्यते ।
स स भागः शिशोस्तस्य गर्भस्थस्य प्रपीड्यते ॥ सु. शा. ३–१७

– अतिव्यवायं आयासं भारं प्रावरणं गुरु ।
अकालजागरस्वप्नं कठिनोत्कटकासनं ॥
शोकक्रोधभयोद्वेगवेगश्रद्धाविधारणं ।
उपवासाध्वतीक्ष्णोष्णं गुरुविष्टंभिभोजनं ॥
रक्तं निवसनं श्वभ्रकूपेक्षां मद्यमामिषं ।
उत्तानशयनं यच्च स्त्रियो नेच्छन्ति तत्यजेत् ॥
तथा रक्तस्रुतिं शुद्धिं बस्तीमामासतोऽष्टमान् ।
एभिर्गर्भःस्त्रवेदामः कुक्षौ शुष्येन्म्रियेत वा ॥ वा. शा. १–४४ ते ४७

– व्याधींश्चास्याः मृदुमधुरशिशिरसुखसुकुमारप्रायैः औषधाहारोपचारैः उपचरेत् । न चास्याः वमनविरेचनशिरोविरेचनानि प्रयोजयेत् । न रक्तमवसेचयेत् । सर्वकालं च नास्थापनं अनुवासनं वा कुर्यात् । अन्यत्राऽऽत्ययिकाद् व्याधेः । अष्टमं मासमुपादाय वमनादि साध्येषु पुनर्विकारेषु आत्ययिकेषु मृदुभिः वमनादिभिः तदर्थ कारिभिः वा उपचारः स्यात् । पूर्णमिव तैलपात्रं असंक्षोभयते, अंतर्वत्नी भवति उपचर्या ।
च. शा. ८–२२



[1]तीक्ष्ण नस्य (शिरोविरेचन) दिले असता उत्पन्न झालेल्या संक्षोभाने वा भयाने गर्भिणीमध्ये वाताचा प्रकोप होतो. त्यामुळे गर्भाचा घात होतो वा गर्भ वातरोगी बनतो.

[2]गर्भ कोवळा असताना स्वेदन केले असता पित्तप्रकोप होऊन ते गर्भाचा स्राव करते व गर्भाला जर स्थिरता आली असली तर गर्भाचा वर्ण स्वेदामुळे विकृत होतो. यासाठी स्वेदन देऊ नये.

[3]गर्भ कोमल असताना वमन हे स्वभावतःच घातक ठरते; कारण वमनाची औषधे तीक्ष्ण असतात व प्रत्यक्ष वमनाचे वेग आले असता उदरास बसणारे हिसके गर्भिणीस सहन होत नाहीत.

[4]स्रंसन द्रव्ये ही गुरू, ऊष्ण, तीक्ष्ण व मलाला खाली खेचणारी असल्यामुळे त्यांच्या उपयोगांनी नाभिप्रदेशी संक्षोभ उत्पन्न होतो व त्यामुळे गर्भ कोमल असेल तर गर्भस्रावपात होण्याची भीती उत्पन्न होते.

[5]गर्भ तरुण स्थितीत असताना (आमावस्था) गर्भिणीला आस्थापन वा अनुवासन

---

१ गर्भिणी तीक्ष्णौषधव्यायामवर्जनीयानाम् । च. सू. २५–४०

– गर्भिणीनां तु नारीणां नस्ततो नानुसेचयेत् ।
नस्यदानेन गर्भिण्याः प्राणस्तु परिहीयते ॥
कुणिर्वा यदि वाऽन्धश्च जायते दुर्बलेन्द्रियः । का. सं., पान २९४–१९½

– धूम्रपानेन गर्भिण्या धूमतेजोहतो भृशम् ॥
विवर्णो जायते गर्भः पतेद्वाऽपि विशायते । का. सं., पान २९४–२०

– शिरोविरेके गर्भिण्याः संक्षोभात्तु भयेन वा ॥
मारुतः कुपितो देहे गर्भघाताय कल्पते ।
अथवा वातरोगी तु गर्भो भवति पार्थिवः ॥ का. सं. २२

२ स्वेदेन तरुणे गर्भे पित्तं प्रकुपितं भृशम् ।
च्यावयेदाशु गर्भं तु तस्मात् स्वेदं विवर्जयेत् ॥
स्वेदः स्थिरे तु विहितो गर्भवैवर्ण्यकारकः । का. सं., पान २९४–२३

३ वमनं तरुणे गर्भे स्वैर्गुणैर्गर्भघातकम् ॥ का. सं. २४

४ नाभिप्रपीडनोत्कारात् संक्षोभाच्च विशेषतः ।
गर्भिण्यास्तरुणे गर्भे स्त्रंसनं न प्रशस्यते ॥
गुरुत्वादुष्णतीक्ष्णत्वाद्वाहनाच्चास्य घातकम् । का सं. २५

५ आस्थापनं तु तरुणे गर्भे नार्या न शस्यते ।
अनुवासनं च मतिमानिति शास्त्रविनिश्चयः ॥
आस्थापनं सानुवासं करोति स्वेन तेजसा ।
ते हीनाङ्गं स्त्राविणं वाऽपि गर्भमित्येष निश्चयः ॥ का. सं. २९४–२६, २७

बस्ती देऊ नयेत. कारण त्यामुळे उत्पन्न झालेल्या वेगाने गर्भस्राव होतो वा गर्भाचे अवयव विकृत होतात.

[1]गर्भिणीने अगदी पहिल्या दिवसापासूनच नेहमी आनंदी राहावे. स्वच्छ शुभ्र अशी वस्त्रे परिधान करावी. अलंकार घालावे. देवतापूजन, अतिथिसेवा, अशा धार्मिक मंगल गोष्टी कराव्या. मलिन विकृत व्यंग असलेल्या लोकांना स्पर्श करू नये. दुर्गंध व पाहू नयेत अशा गोष्टी टाळाव्यात. उद्वेग उत्पन्न करणाऱ्या कृती ऐकू नयेत. वाळलेले, शिळे, कुजलेले, आंबलेले असे अन्न खाऊ नये. बाहेर भटकणे, ओसाड घरे, स्मशान, वडासारखे मोठे वृक्ष यांच्याजवळ जाणे टाळावे. संताप नये. अप्रशस्त गोष्टी करू नयेत. फार मोठ्याने बोलू नये. तैलाचा अभ्यंग करू नये, उटणी लावू नयेत, शरीरास दमवू नये, दिवसा झोपू नये, इतरही गर्भास पीडा उत्पन्न करतील अशी कारणे घडू देऊ नयेत.

*झोपण्यासाठी शय्या ही मऊ, फार उंच नाही, प्रतिवाहकसहित व वाकडी-तिकडी* नसलेली अशी असावी. जेवण रुचकर, द्रव, स्निग्ध व दीपनीय द्रव्यांनी संस्कृत असे असावे. हे सर्व नियम प्रसूत होईपर्यंत पाळावेत.

चरकाने गर्भ स्थापन करणारे उपचारविशेष सांगितले आहेत. गर्भस्थापन याचा अर्थ या ठिकाणी गर्भाचे संरक्षण असा आहे. हे उपचार गर्भाला घातक होणाऱ्या भावांचा स्वत:च्या प्रभावाने नाश करून गर्भाची स्थिती अबाधित राहील असे करतात. म्हणून या उपचारांना गर्भस्थापना असे म्हटले आहे. यासाठी गोरक्षकर्कटी, ब्राह्मी, दोनही प्रकारच्या दूर्वा, पाटला, गुडूची, कुटकी, पिवळी बला, गव्हला या वनस्पती नेहमी संग्रही ठेवाव्यात. त्या डोक्यावर धारण कराव्या अथवा उजव्या हातात बांधाव्या. यांनीच सिद्ध केलेल्या दुधाचे वा घृताचे प्राशन करावे. याच वनस्पतींनी सिद्ध केलेल्या पाण्याचा उपयोग प्रत्येक पुष्य नक्षत्रावर स्नानासाठी करावा. या वनस्पतींप्रमाणेच इतरही जीवनीय गणातील औषधे योग्य त्या पद्धतीने नेहमी वापरावीत.

चरकाने दिलेले हे उपचार कोणत्याही विशिष्ट विकृत अवस्थेसाठी नसून सामान्यत: गर्भाचे संरक्षण व्हावे यासाठी नेहमीच प्रकृत स्थितीतही वापरण्याच्या उद्देशाने

१ गर्भिणी प्रथम दिवसात् प्रभृति नित्यं प्रहृष्टा शुच्यलंकृता शुक्लवसना शान्तिमंगल-देवता ब्राह्मणगुरुपरा च भवेत्, मलिनविकृतहीनगात्राणि न स्पृशेत्, दुर्गंध दुर्दर्शनानि परिहरेत्, उद्वेजनीयाश्च कथा: शुष्कं पर्युषितं कुथितं क्लिन्नं चान्नं नोपभुंजीत, बहिर्निष्क्रमणं शून्यागारचैत्यश्मशानवृक्षाश्रयान् क्रोधभयशस्करांश्च भावानुच्चै-र्भाष्यादिकं च परिहरेद्यानि च गर्भं व्यापादयंति, न चाभीक्ष्णं तैलाभ्यंगोत्सादना-दीनि सेवेत, न चायासयेच्छरीरं, पूर्वोक्तानि च परिहरेत्, शयनासनं मृद्वास्तरणं नात्युच्चमपाश्रयोपेतमसंबाधं च विदध्यात्, हृद्यं द्रवमधुरप्रायं स्निग्धं दीपनीय-संस्कृतं च भोजनं भोजयेत्, सामान्यमेतदाप्रसवात् । सु. शा. १०–३



सांगितलेले आहेत. गर्भिणीच्या मासानुमासिक परिचर्येबरोबर हेही प्रयोग चालू ठेवण्यास हरकत नाही.

तसेच भावप्रकाशकाराने सांगितलेली ज्वर, उडया मारणे, कुंथणे ही विशेष कारणे गर्भिणीने टाळावीत.

## गर्भिणीपरिचर्या

[1]पुरुष हा आहार-रसामुळे उत्पन्न होतो व पोसला जातो. यासाठी विकृत होण्यापासून आहाररसाचे प्रयत्नपूर्वक रक्षण करावे. अन्नपान, आचार, हे सर्व आहाररसाला विकृत करणार नाहीत, असेच नेहमी राहतील अशी दक्षता बाळगावी.

स्वस्थवृत्तप्रकरणी सामान्य म्हणून सांगितलेले हे सूत्र गर्भिणी परिचर्येमध्ये फार महत्त्वाचे आहे. एरव्ही केवळ पोषणास कारणीभूत असलेला आहाररस गर्भिणीत प्रत्यक्ष निर्मितीस कारण असतो. यासाठी त्याचे स्वरूप निर्दोष ठेवण्यासाठी विशेष काळजी घेतली पाहिजे. गर्भिणीची व्यवस्था प्रत्येक महिन्यात विशेषत: आहाराच्या दृष्टीने कशी असावी याचे नियम या हेतूनेच ग्रंथात सांगितले आहेत. ते असे—

[2]पहिल्या महिन्यामध्ये— गर्भधारणेची शंका आल्यापासून गार दूध योग्य प्रमाणात थोडे थोडे प्यावे. जेवण सोसवेल असेच सकाळी व संध्याकाळी घ्यावे.

दुसऱ्या महिन्यामध्ये— मधुर औषधांनी 'सिद्ध केलेले' दूध प्यावे.

तिसऱ्या महिन्यामध्ये— दुधाबरोबर तूप व मध सेवन करावा.

चवथ्या महिन्यात— दुधातून काढलेले लोणी १ तोळा प्रमाणात सेवन करावे.

पाचव्या महिन्यात— दुधातून काढलेल्या लोण्यापासून तूप काढून ते सेवन करावे.

सहाव्या महिन्यात— वरीलप्रमाणेच करावे. या महिन्यात गर्भिणीला जळजळते. बायका म्हणतात की, गर्भाला आता केस येऊ लागले आहेत त्यामुळे असे होते; पण हे म्हणणे आत्रेयास मान्य नाही.

१ रसजं पुरुषं विद्यात् रसं रक्षेत् प्रयत्नत: ।
अन्नपानाच्च मतिमान् आचाराच्चाप्यतंद्रित: ।। सु. सू. १४–१२

२ परमतो निर्विकारमाप्याय्यमानस्य गर्भस्य मासे मासे कर्मोपदेक्ष्याम: ।

– प्रथमे मासे शंकिता चेद्–गर्भमापन्ना, क्षीरमनुपस्कृतं मात्रावच्छीतं काले काले पिबेत् । सात्म्यमेव च पुनर्भोजनं सायंप्रातश्च भुञ्जीत । द्वितीये मासे क्षीरमेव च मधुरौषधसिद्धम् । तृतीये मासे क्षीरं मधुसर्पिर्भ्यामुपसंसृज्य । चतुर्थे मासे क्षीर-नवनीतमक्षमात्रमश्नीयात् । पञ्चमे मासे क्षीरसर्पि: षष्ठे मासे क्षीरसर्पि: मधुरौषध-सिद्धम् । तदेव सप्तमे मासे । तत्र गर्भस्य केशा जायमाना मातुर्विदाहं जनयन्तीति

गर्भाच्या उत्पीडनामुळे वातपित्तकफाचा प्रकोप होऊन ते उरामध्ये येतात व विदाह उत्पन्न करतात. याच वेळी किक्विस उत्पन्न होतात व त्याचा परिणाम म्हणून खाजही सुटते. ही लक्षणे स्तन, उदर, मांड्या या ठिकाणी दिसतात. मधुरौषधांनी बोरांच्या काढ्यात सिद्ध केलेले नवनीत थोडे थोडे, मधून मधून सेवन करावे. चंदन मृणाल (कमळनाळ) यांच्या कल्कांनी वा शिरीष, धायटी, मोहरी ज्येष्ठमध यांच्या चूर्णाने वा कुडा, अर्जकबीज, नागरमोथे, हळद यांच्या कल्काने वा निंब, बोर, तुळस, मंजिष्ठा यांच्या कल्काने किंवा हरिण, ससे यांच्या रक्तात त्रिफळा कालवून तिने स्तन, उदर, मांड्या या ठिकाणी मर्दन करावे.

कण्हेरीच्या पानाने सिद्ध केलेल्या तेलाने अभ्यंग करावा. जाई, ज्येष्ठमध, क्वाथाने परिषेक करावा. खाज सुटली तरी खाजवू नये, त्यामुळे त्वचेला भेगा पडतात व विरूपता येते. कंडू असह्य झाला तर वरील औषधी द्रव्याने मर्दन करावे.

मधुर, वातहर असे पदार्थ अल्प प्रमाणात सेवन करावे. त्यात स्नेह वा मीठ असू नये, पाणी थोडे प्यावे.

आठव्या महिन्यात— दुधात सिद्ध केलेली यवागू ही उष्ण असल्यामुळे थोडी पित्तकर आहे, व त्यामुळे क्वचित गर्भाचे डोळे पिंगट वर्णाचे होण्याची शक्यता आहे.

स्त्रियो भाषन्ते । तन्नेति भगवानात्रेयः । किन्तु गर्भोत्पीडनाद् वातपित्तश्लेष्माण उरःप्राप्य विदहन्ति । ततः कण्डूरुपजायते । कंण्डूमूला च किक्विसावाप्तिर्भवति । तत्र कोलोदकेन नवनीतस्य मधुरौषधसिद्धस्य पाणितलमात्रं काले कालेऽस्यै पानार्थं दद्यात् । चन्दनमृणालकल्कैश्चास्याः स्तनोदरं विमृद्गीयात् । शिरीषधातकीसर्षपमधूकचूर्णैः कुटजार्जकबीजमुस्तहरिद्राकल्कैर्वा निम्बकोलसुरसमञ्जिष्ठाकल्कैर्वा पृषतहरिणशशरुधिरयुतया त्रिफलया वा । करवीरपत्रक सिद्धेन वा तैलेनाभ्यङ्गः । परिषेकः पुनर्मालतीमधुकसिद्धेनाम्भसा । जातकण्डूश्च कण्डूयनं वर्जयेत् त्वग्भेदवैरूप्यपरिहारार्थम् । असह्यायां तु कण्ड्वामुन्मर्दनोध्दर्षणाभ्यां परिहारः स्यात् । मधुरमाहारजातं वातहरमल्पमस्नेहलवणमल्पोदकानुपानं च भुञ्जीत । अष्टमे तु मासे क्षीरयवागूं सर्पिष्मतीं काले काले पिबेत् । नेति भद्रकाप्यः । पैङ्गल्याबाधो ह्यस्या गर्भमागच्छेदिति । अस्त्वत्रपैङ्गल्याबाध इत्याह भगवान् पुनर्वसुरात्रेयः । न त्वेवैतन्न कार्यम् । एवं कुर्वती ह्यरोगाऽऽरोग्यबलवर्णस्वरसंहननसंपदुपेतं ज्ञातीनां श्रेष्ठ ममत्यं जनयति । नवमे तु खल्वेनां मासे मधुरौषधसिद्धेन तैलेनानुवासयेत् अतश्चैवास्यास्तैलात् पिचु योनौ प्रणयेत् गर्भस्थानमार्गस्नेहनार्थम् । यदिदं कर्म प्रथमं मासं समुपादायोपदिष्टमानवमान्मासात् । तेन गर्भिण्या गर्भसमये गर्भधारिणी कुक्षि कटीपार्श्वपृष्ठं मृदू भवति । वातश्चानुलोमः सम्पद्यते, मूत्रपुरीषे च प्रकृतिभूते सुखेन मार्गावापद्यतै । चर्मनखानि च मार्दवमुपयान्ति । बलवर्णौ चोपचीयेते । पुत्रं चेष्टं संपदुपेतं सुखिनं सुखे काढवी नैषा काले प्रजायते इति ॥

च. शा. ८–३२



त्यामुळे यवागूचा उपयोग करू नये, असा आक्षेप येईल. पण त्याला विशेष महत्त्व न देता हे उपचार करावेतच. कारण डोळे पिंगट होणे हा मोठासा दोष नाही, व पुढे उपचार करून तो नाहीसाही करणे शक्य आहे. पण यवागूपासून उत्पन्न होणारे लाभ मात्र पुष्कळ आहेत.

अशा रीतीने उपचार केले असता गर्भिणी स्वतः निरोगी राहते व आरोग्य, बल, वर्ण, स्वर, यांनी युक्त, ज्याच्या शरीराचा बांधा उत्कृष्ट आहे अशा अपत्यास जन्म देते. अर्थातच अशा गुणांनी युक्त असलेली अपत्ये समाजामध्ये मानमान्यता लाभण्यासही पात्र होतात.

नवव्या महिन्यामध्ये— मधुर औषधांनी सिद्ध केलेल्या तेलाचा अनुवासन बस्ती द्यावा. याच तेलाने भिजविलेला पिचू योनिमार्गात ठेवावा. त्यामुळे गर्भमार्गाचे स्नेहन होऊन तो मृदू होतो.

पहिल्या महिन्यापासून नवव्या महिन्यापर्यंत हे जे उपचार सांगितले आहेत त्यामुळे गर्भिणीला लाभ होतो. तिचे अपरा, कुक्षी, कटी, पार्श्व, पृष्ठ, हे अवयव मऊ राहतात; व त्यामुळे गर्भधारण सुखावह होते. वायूचे अनुलोमन होते. मलमूत्रविसर्जन स्वाभाविकपणे होते. त्वचा नितळ राहते. नखे मऊ होतात. बल, वर्ण यांचा उपचय होतो व अपत्य योग्य प्रकारे व सुखाने प्रसवते.

[1] सुश्रुतानेही गर्भिणीची प्रत्येक महिन्याची परिचर्या सांगितली आहे ती अशी : गर्भिणीने पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या महिन्यात विशेषतः मधुर, शीत व द्रव असा आहार घ्यावा. तिसऱ्या महिन्यात साठे-साळीचा भात दुधाबरोबर सेवन करावा.

चवथ्या महिन्यात तोच भात दह्याबरोबर खावा.

पाचव्या महिन्यात दुधाबरोबर व सहाव्या महिन्यात तुपाबरोबर खावा. असे काहींचे म्हणणे आहे.

१ विशेषतस्तु गर्भिणी प्रथमद्वितीयतृतीयमासेषु मधुरशीतद्रवप्रायमाहारमुपसेवेत; विशेषतस्तु तृतीये षष्ठिकौदनं पयसा भोजयेत् चतुर्थे दध्ना, पञ्चमे पयसा, षष्ठे सर्पिषेत्येके, चतुर्थे पयोनवनीतसंसृष्टमाहारयेज्जाङ्गलमांससहितं हृद्यमन्नं च भोजयेत्, पञ्चमे क्षीर सर्पिःसंसृष्टं, षष्ठे श्वदंष्ट्रासिद्धस्य सर्पिषो मात्रां पाययेद् यवागूं वा सप्तमे सर्पिः पृथक्पर्ण्यादिसिद्धम् एवमाप्यायते गर्भः अष्टमे बदरोदकेन बलातिबलाशतपुष्पापललपयोदधिमस्तुतैललवणमदनफलमधुघृतमिश्रेणास्थापयेत् पुराणपुरीषशुद्ध्यर्थमनुलोमनार्थं च वायोः ततः पयोमधुरकषायसिद्धेन तैलेनानुवासयेत्, अनुलोमे हि वायौ सुखं प्रसूयते निरुपद्रवा च भवति, अत ऊर्ध्वं स्निग्धाभिर्यवागूभिर्जाङ्गलरसैश्चोपक्रमेदाप्रसवकालात् एवमुपक्रान्ता स्निग्धा बलवती सुखमनुपद्रवा प्रसूयते ॥ सू. शा. १०–४

चवथ्या महिन्यात दूध व लोणी यांनी युक्त असा आहार किंवा जाङ्गलमांस रस-सहित रुचकर अन्न सेवन करावे.

पाचव्या महिन्यात जेवणाबरोबर दूध, तुपाचा उपयोग करावा.

सहाव्या महिन्यात गोखरूने सिद्ध केलेले तूप योग्य मात्रेत घ्यावे. यवागू सेवन करावी.

सातव्या महिन्यात पृथक्पर्णीसिद्ध तूप घ्यावे. अशा रीतीने गर्भाचे पोषण चांगले होते.

आठव्या महिन्यात बोराच्या काढयात बला, अतिबला, बडीशेप, मांसरस, दूध, दह्याची निवळ, तेल, मीठ, गेळफळ, मध, तूप असे पदार्थ घालून त्यांचा आस्थापन बस्ती द्यावा. त्यामुळे संचित पुरीष शरीराच्या बाहेर पडून शरीर शुद्ध होते; व वायूचे अनुलोमन होते. या बस्तीनंतर दूध व मधुर द्रव्यांचा काढा यांच्यामध्ये तेल सिद्ध करून त्याचा अनुवासन बस्ती द्यावा. वायूचे अनुलोमन चांगले झाले म्हणजे प्रसूती कष्टरहित व सुखाने होते.

आस्थापन, अनुवासन बस्तीनंतर स्निग्ध अशा यवागूंनी वा जाङ्गल मांसाच्या रसांनी गर्भिणीवर उपचार करावेत. असा क्रम प्रसूतीपर्यंत ठेवावा. या उपचारांच्या-मुळे गर्भिणीचे बल टिकते व तिचे शरीर स्निग्ध झाल्यामुळे प्रसूती दोषरहित अशी सुखाने होते.

सुश्रुताने आठव्या महिन्यात सांगितलेला बस्तिप्रयोग फार हितावह आहे. शोधन करू नये असे जे सांगितले आहे ते गर्भ अस्थिर असतानाच योग्य आहे. वाढलेल्या गर्भाने मार्गावरोध होत असल्याने असा शोधनोपचार इष्टच असतो.

## गर्भव्यापद्

गर्भाच्या अपेक्षेने गर्भिणीच्या शरीरामध्ये जे रोग दिसतात, त्यांना गर्भव्यापद् असे म्हणावे. उदाहरणार्थ : गर्भस्राव, पात, उपविष्टक, नागोदर, लीनगर्भ, मृतगर्भ.

– सा चेदपचाराद् द्वयोस्त्रिषु वा मासेषु पुष्पं पश्येन्नास्या गर्भः स्थास्यतीति विद्यात् । अजातसारो हि तस्मिन् काले भवति गर्भः । सा चेच्चतुर्थप्रभृतिषु मासेषु क्रोधशोका-सूयेर्ष्याभयत्रासव्यवायव्यायामसंक्षोभसंधारणविषमाशनशयनस्थानक्षुत्पिपासाति-योगात् कदाहाराद्वा पुष्पं पश्येत्, तस्या गर्भस्थापनविधिमुपदेक्ष्यामः । पुष्पदर्शना-देवैनाम् । ब्रूयात्-शयनं तावन्मृदुसुखशिशिरास्तरणसंस्तीर्णमीषदवनतशिरस्कं प्रति-पद्यस्वेति । ततो यष्टिमधुकसर्पिर्भ्यां परमशिशिरवारिणि संस्थिताभ्यां पिचुमाप्लाव्योपस्थ समीपे स्थापयेत्तस्याः, तथा शतधौतसहस्रधौताभ्यां सर्पिभ्यामधोनाभेः सर्वतः प्रदिह्यात्, सर्वतश्च गव्येन चैनां पयसा सुशीतेन मधुकाम्बुना न्यग्रोधादि



गर्भिणी स्त्री जर सगर्भावस्थेमध्ये वर्ज्य सांगितलेले मिथ्या आहार-विहार करील, तर तिला दुसऱ्या-तिसऱ्या महिन्यातच रजःस्राव होऊ लागेल. आणि असे झाले तर गर्भ टिकणार नाही. कारण या कालामध्ये गर्भ सारयुक्त झालेला नसतो. त्याची स्थिती अगदी नाजुक असते व त्यामुळे या थोडयाशा स्रावाचा परिणाम होऊन तो गर्भ नष्ट होतो.

तीन महिने पुरे झाल्यानंतर चवथ्या-पाचव्या महिन्यात गर्भिणी जर क्रोध, शोक, असूया, ईर्ष्या, भय, त्रास या मानसिक विकारांस बळी पडेल, अतिमैथुन, अतिव्यायाम आचरील, हिसके बसणाऱ्या वाहनांतून प्रवास करील (संक्षोभ), वेगधारण, विषमाशन, विषमशयन, विषमस्थानसेवा, तहानभूक मारणे, असे मिथ्याचार करील, कदान्न खाईल तर तिला बस्ती, पार्श्व, श्रोणी, योनी या ठिकाणी शूल उत्पन्न होतो, आणि रजःस्राव होऊ लागतो.

चवथ्या महिन्यापासून गर्भ टिकण्याची शक्यता असते. त्यामुळे हा स्राव थांबवून गर्भ सुरक्षित राहील असे उपचार करावे लागतात.

### गर्भस्राव-पात

[1]गर्भ पहिल्या तीन महिन्यांत पडला तर त्याला गर्भस्राव म्हणावे, व गर्भशरीराला आकार प्राप्त झाल्यानंतर चवथ्या, पाचव्या, सहाव्या महिन्यात जर गर्भ पडला तर त्याला गर्भपात म्हणावे. या ठिकाणी चवथ्या महिन्यापर्यंत स्राव व पाचव्या महिन्या-

कषायेण वा परिषेचयेदधो नाभेः, उदकं वा सुशीतमवगाहयेत्, क्षीरिणां कषायद्रुमाणां च स्वरसपरिपीतानि चेलानि ग्राहयेत्, न्यग्रोधादिशुङ्गसिद्धयोर्वा क्षीरसर्पिषोः पिचुं ग्राहयेत्, अतश्चैवाक्षमात्रं प्राशयेत् प्राशयेत्वा केवलं क्षीरसर्पिः पद्मोत्पलकुमुद-किञ्जल्कांश्चास्यै समधुशर्करान् लेहार्थं दद्यात्, शृङ्गाटकपुष्करबीजकशेरुकान् भक्षणार्थं, गन्धप्रियङ्ग्वसितोत्पलशालूकोदुम्बरशलाटुन्यग्रोधशुंगानि वा पाययेदे-नामाजेन पयसा, पयसा चैनां बलातिबलाशालिषष्टिकेक्षुमूलकाकोलीशृतेन समधु-शर्करं रक्तशालीनामोदनं मृदुसुरभिशीतलं भोजयेत्, लावकपिञ्जलकुरङ्गशम्बर-शशहरिणैण कालपुच्छकरसेन वा घृतसुंस्कृतेन सुखशिशिरोपवातदेशस्थां भोजयेत्-क्रोधशोकायासव्यवायव्यायामेभ्यश्चाभिरक्षेत् सौम्याभिश्चैनां कथाभिर्मनोनु-कूलाभिरुपासित; तथाऽस्या गर्भस्तिष्ठति ॥ च. शा. ८–२३ ते ४४

– "बास्तिपार्श्वश्रोणियोनिमुखेषु शूलं पुष्पदर्शनं च स्यात्" । अ. सं. शा. २–४

१ आचतुर्थात्ततो मासात् प्रस्रवेद्गर्भविच्युतिः ।
ततः स्थिरशरीरस्य पातः पंचमषष्ठयोः ॥ सु. नि. ८–१०

– गर्भविच्युतिः गर्भविमुक्तिः प्रस्रवेत् स्रावरूपा भवेत् । एतेन मासचतुष्टयं यावत् मूढगर्भता नास्तीत्युक्तम् । ततश्चतुर्थमासादूर्ध्वं स्थिरशरीरस्य विच्युतिः पातः पातरूप भवेत् । एतेन विच्युतिरियं न स्रावरूपा तस्याश्चतुर्थमासानंतरं घना-वयवत्वान्मूढगर्भो भवतीत्युक्तम् ॥ नि. सं. सु. नि. ८–१० टीका

पासून 'पात' अशी परिभाषा वापरावी असे एक मत आहे. कारण चवथ्या महिन्यामध्ये गर्भाची अंगप्रत्यंगे व्यक्त होऊन गर्भशरीराला आकार प्राप्त झाला असला तरी पूर्ण स्थिरता आलेली नसते. तो गर्भ, कोमल लिबलिबीत असाच असतो. त्यामुळे त्याला स्रावामध्ये गणले पाहिजे. परंतु समजण्याच्या दृष्टीने शरीराचे काठिण्य लक्षात घेण्यापेक्षा शरीराचा आकार व्यक्त होणे हेच महत्त्वाचे मानून चवथ्या महिन्यापासून पुढे नाश झाल्यास गर्भपात अशीच संज्ञा वापरावी. या स्राव–पाताची कारणे गर्भोपघातकर भावामध्ये आलेली आहेत.

## संप्राप्ती :

जी गर्भिणी अपथ्यामध्ये उल्लेखिलेल्या मिथ्या आहारविहाराचे सेवन करील तिच्यात अतिशय दोष-प्रकोप होतो; व त्यामुळे किंवा व्याधीमुळे, किंवा गर्भाच्या वा मातेच्या प्राक्तनकर्मामुळे देठापासून मूळ सुटावे त्याप्रमाणे गर्भ बंधनापासून सुटतो.

दोष-प्रकोपामुळे अभिष्यंद उत्पन्न होऊन यकृत, प्लीहा, आन्त्र यांच्या अंतराळात तो गर्भाशय पसरतो. या दोषामुळे सर्व कोष्ठ संक्षोभित होतो. त्यामुळे गर्भाशयात असलेल्या गर्भावरही स्थानभ्रष्ट होण्याचा प्रसंग येतो. कोष्ठसंक्षोभामुळे प्रकुपित व अवरुद्ध झालेला अपान वायू कुक्षी, बस्ती, पार्श्व, उदर, योनी यांच्यामध्ये शूल उत्पन्न करतो. पुरीषांची अप्रवृत्ती होऊन आध्मान उत्पन्न होते. आणि कोवळा गर्भ हा रक्ताबरोबर बाहेर पडतो.

## पूर्वरूपे :

यात अश्वोदरशूल, कटिशूल, अल्प-योनिगत रक्तस्राव, मलावष्टंभ, दौर्बल्य ही लक्षणे आढळतात.

– भोज – " आतृतीयात्ततो मासाद्गर्भः स्रवति शोणितम् ।
ऊर्ध्वं संयावभूतस्तु गर्भः पतति योषिताम् ।। इति "
संयावो नाम नातिमृदुकठिनः समिताशर्कराकृतभक्ष्यविशेषः ।
तत्र भोजेन चतुर्थे मासि सर्वाङ्गप्रत्यंगविभागप्रव्यक्ततरो भवति, तेन तत्रापि नातिकाठिन्येन स्रावसाधर्म्यात् स्रवतीत्युक्तम् । काश्यपीयेऽप्युक्तम्—
– " आचतुर्थात्ततो मासात् प्रस्तुतं शोणितं मतम् ।
ततः स्थिरशरीरस्तु मूढः पतति कृच्छ्रतः ।। " इति
न्या. च. सु. नि. ८–१० टीका

– कृमिवाताभिघातैस्तु तदेवोपद्रुतं फलम् ।
पतन्त्यकालेऽपि यथा तथा स्याद्गर्भविच्युतिः ।। सु. नि. ८-९
गर्भ विच्युतिर्द्विविधा—
( १ ) द्रवस्य स्रावरूपेण ( २ ) घनावयवस्य पातरूपेण । सु. नि. ८–९ टीका



योनिपरीक्षणात गर्भाशय-मुख संपूर्ण बंद सापडते. ह्या अवस्थेत शक्य तो योनि-परीक्षा करणे टाळावे. कारण, योनिपरीक्षण हा गर्भोपघातकर भाव ठरण्याची शक्यता असते.

यातील शूल व रक्तस्राव शूल-चिकित्सेने थांबतो.

## रूपे :

आमानुबंधामुळे रुग्णा पूर्वरूपावस्थेत जाते व पुढील लक्षणे होतात—

उदरशूल व कटिशूल हा पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात वाढतो. रक्तस्रावाचेही प्रमाण जास्त वाढते, व शूलाचे आवीत रूपान्तर होते.

योनिपरीक्षणामध्ये गर्भाशय-मुख विस्तृत होऊन श्लेष्मल स्राव रक्तस्रावाबरोबर सापडतो.

ह्या अवस्थेमध्ये गर्भस्थापक किंवा शमन चिकित्सेचा काहीही उपयोग होत नाही, व योग्य वेळी गर्भस्राव किंवा पात होऊन गर्भ गर्भाशयाच्या बाहेर पडतो.

## ग्रहबाधेने गर्भिणीवर होणारे परिणाम :

ग्रहबाधा म्हणजेच शारीरिक निजदृष्टचा वा प्रत्यक्ष होणाऱ्या आगंतू हेतूंनी न सांगता येणारी कारणे. व्याधीची लक्षणे अतिशय गंभीर, इंद्रियवैकल्यकर, प्राणवह, मनोवह, स्रोतसांच्या दुष्टींनी युक्त अशी सांगितलेली आहेत. व्याधीचा परिणाम आशुकारी व दारुण असतो. पण कारणांच्या वर्णनांमध्ये मात्र ग्रंथकाराने मुग्धता स्वीकारलेली आहे, आणि शब्दप्रामाण्याचा आधार घेतला आहे.

रोगाच्या उत्पत्तीचे केलेले वर्णन पाहता मिथ्योपचारामुळे स्थानवैगुण्य उत्पन्न होते व त्या ठिकाणी दौर्बल्याचा लाभ घेऊन सूक्ष्म, अदर्शन अशी ही रोगबीजे गर्भिणीच्या शरीरामध्ये प्रविष्ट होतात. या रोगकारणांनाच ग्रह अशी संज्ञा दिलेली आहे. हे ग्रह चर्मचक्षूंनी कधी दिसत नाहीत, दिसणार नाहीत, असे ग्रंथकारांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. कारण अप्रत्यक्ष व अज्ञात असल्यामुळे या ग्रहबाधेसंबंधी काही पुराणकथा ग्रंथकारांनी सांगितल्या आहेत. त्यांतील सारांश असा—

शंकरपुत्र षडानन यांच्या संरक्षणासाठी शंकरांनी काही पुरुष व स्त्री-सेवकांची योजना केली होती. कुमार कार्तिक मोठा झाल्यानंतर सेवकांनी शंकरास विचारले की, 'प्रभो, आता आम्हास उद्योग काय ? आम्ही काय करावे ?' तेव्हा शंकर म्हणाले, 'तुम्ही मनुष्यलोकी जाऊन अधार्मिक, अपवित्र, अस्वच्छ अशा लोकांना

– यस्याः पुनरतिमात्रदोषोपचयाद्यथोक्तैर्वा व्यवायादिभिरन्यैर्वा व्याधिभिः पूर्वोपचितेन वा जनन्यपत्ययोः कर्मणा बन्धनान्मुच्यते गर्भः फलमिव वृन्तात्स मुक्तबन्धनो गर्भशय्यामतिक्रम्य यकृत्प्लीहान्त्रविवरैरवस्रंसमानः कोष्ठसंक्षोभमापादयति । ततः कोष्ठसंक्षोभाद्वायुरपानो मूढः कुक्षिबस्तिपार्श्वोदरयोनिशूलानाह विण्मूत्र-संगानापाद्य गर्भं च्यावयति तरुणं शोणितभावेन । अ. सं. शा. ४–२६.

त्यांच्या दुर्वर्तनासाठी पीडा देण्याचे काम करा आणि त्यांच्याकडून दंड म्हणून पूजादी उपचार वसूल करा.' त्याप्रमाणे ते मनुष्यलोकी येऊन ज्या घरांमध्ये अमंगलता, अपवित्रता, अस्वच्छता असते तेथील गर्भिणींना पीडाकर होऊ लागले.

यातील धार्मिक आचाराच्या व पापाच्या कल्पना पौराणिक व श्रद्धेचा विषय म्हणून लक्षात घ्यावयाच्या नाहीत असे ठरविले तरी स्वच्छतेच्या व संयमाच्या नियमांचे महत्त्व आजही लक्षणीय आहे यात शंका नाही.

कश्यपाने जातहारिणीचे परिणाम सांगत असताना पुढीलप्रमाणे वर्णन केलेले आहे.

[1]जातहारिणी ही आपल्या बाधेने स्त्रीच्या आर्तवाचा नाश करते. स्त्रीच्या शरीराचा नाश करते, उत्पन्न झालेल्याचा नाश करते, उत्पन्न होणाऱ्यांचा नाश करते, आणि पुढे उत्पन्न होणार असलेल्यांचाही नाश करते.

गर्भ आणि बालके या दोघांनाही व स्त्रीसही या जातहारिणीचा त्रास होतो असा त्यांचा अर्थ आहे.

जातहारिणीच्या बाधेचे हेतू हे मिथ्याहार-विहार व अधर्म असे द्विविध आहेत. त्यांतील मिथ्याहार-विहारात्मक कारणांचा काश्यपाने पुढीलप्रमाणे उल्लेख केलेला आहे :

*जी स्त्री देवधर्माचा तिरस्कार करते, अमंगल आचरण करते, स्वच्छता पाळत* नाही, चांगल्या गोष्टींचा तिरस्कार करते, दुराचरण करते, चंचलपणे वागते, मांसाहार, निद्रा, मैथुन यांची जिला फार आवड असते, जी खादाड असते, जी एकदम हसते, एकदम रडते, हितकर अन्नाचा त्याग करते, जिच्या अंतःकरणात प्रेम, स्नेह, वात्सल्य यांचा अभाव असतो, जिचे शील वाईट असते, तिला या वा यासारख्या इतर अशुभ कर्मामुळे, दुर्दैवामुळे पान, भोजन, स्वप्न, व्यायाम, यांच्या अतियोगामुळे (स्थानवैगुण्य उत्पन्न होऊन) जातहारिणीची बाधा होते.

अशा तऱ्हेने मिथ्याचारामुळे स्थानवैगुण्य उत्पन्न झालेल्या स्त्रीचा पतीही तिच्यासारखाच मिथ्या आहारविहार करणारा असेल तर उत्पन्न होणारी जातहारिणीची बाधा असाध्य होते. पतिपत्नींपैकी एकच मिथ्या आहारविहार करणारा असेल तर होणारी जातहारिणीची पीडा कष्टसाध्य असते.

दोघेही स्वस्थवृत्तातील नियमांचे पालन करणारे नम्र, सरळ असे असतील तर तेही निरोगी राहतात व त्यांची प्रजाही निरोगीपणे वाढते.

१ तस्मात् जातहारिणी पुष्प हन्ति, वपुश्च हन्ति । गर्भांश्च हन्ति । जातांश्च हन्ति । जायमानांश्च हन्ति । जनिष्यमाणांश्च हन्ति । का. सं., पृ. १८८

– अथ खलु या स्त्री-त्यक्तधर्ममंगलाचारशौचदेवक्रिया, सद्वेषिणी, दुराचारा, अनवस्थिता मांसनिद्रामैथुनप्रिया, दंदशूका, अकस्मात् प्रहसना, अकस्मात् रोदना, पथ्यभोजनत्यागिनी, निस्नेहा, दुश्शीला भवति। तस्याः एभिः कर्मभिः अन्यैश्च अशुभैः



[1]शुष्करेवतीमुळे सोळा वर्षांपर्यंत स्त्रीस रजोदर्शन होत नाही. तिचे बाहू आणि स्तन, कृश, अपुष्ट असे राहतात.

[2]कटंभरेमुळे स्त्री रजोदर्शन न होताच वृद्ध होते. तिचे शरीर कृश राहते. बल कमी असते. ती स्वभावाने रागीट असते.

[3]रेवती जातहारिणीमुळे स्त्रीला रजोदर्शन होत असले तरी अपत्य-संभव होत नाही. ती स्त्री लठ्ठ, केसाळ असते व तिचा गंडभागही स्थूल, लोमयुक्त असतो.

[4]विकुटेमुळे रजाचे स्वरूप, काल, वर्ण, प्रमाण, प्रकारांनी अनियमित असते. तसेच तिला विनाकारण दौर्बल्य येते व मधून मधून उगीचच बरे वाटते.

[5]परिस्रुतेमुळे स्त्रीच्या योनीतून सारखे स्राव होत असतात व ती कृश होते.

[6]अण्डघ्नीमुळे बीज व्यक्त होताच व गर्भाशयामध्ये चिकटताच पडून जाते.

[7]दुर्धरेमुळे गर्भाच्या देहाला थोडासा आकार येताच त्याचा नाश होतो.

पूर्वकैः च इह कृतैः अतिपानभोजनस्वप्नव्यायामसेवनैः च छिद्रेषु एतेषु अधर्मद्वारेषु जातहारिणी सज्जते । का. सं., पृ. १८९

– अथो पतिरप्या एवंशीलो भवति । तयोरसाध्यां जातहारिणी विद्यात् । अथो दम्पत्योरेकतरोऽधार्मिको भवति कृच्छ्रा भवति । उभयोस्तु धार्मिकयोरार्जवयोरनभिमानिकयोरेरोगयोश्च प्रजा वर्धते । का. सं., पृ. १८९

१. आषोडशवर्षप्राप्ता या स्त्री पुष्पं न पश्यति ।
प्रम्लानबाहुरकुचा तामाहुः शुष्करेवतीम् ।।

२. विना पुष्पं तु या नारी यथाकालं प्रणश्यति ।
कृशा हीनबला क्रुद्धा साऽपि चोक्ता कटंभरा ।।

३. वृथा पुष्पं तु या नारी यथाकालं प्रपश्यति ।
स्थूललोमशगण्डा वा पुष्पघ्नी साऽपि रेवती ।।

४. कालवर्णप्रमाणैर्या विषमं पुष्पमृच्छति ।
अनिमित्तबलग्लानिर्विकुटा नाम सा स्मृता ।।

५. अभीक्ष्णं स्रवते यस्या नार्या योनिः कृशात्मनः
परिस्रुतेति सा ज्ञेया नारीणां जातहारिणी ।।

६. यस्यास्त्वालक्ष्यमालग्नमण्डं प्रपतति स्त्रियाः ।
अण्डघ्नीमिति ह्याहुस्तां दारुणां जातहारिणीम् ।।

७. नातिनिर्वृत्तदेहाङ्गो यस्य गर्भो विनश्यति ।
दुर्धरा नाम सा ज्ञेया सुघोरा जातहारिणी ।। का. सं., पृष्ठ १९२

[1]कालरात्रीमुळे पूर्ण वाढ झालेल्या गर्भाचा नाश होतो व स्त्रीही कष्टानेच जगते.

[2]मोहिनीच्या बाधेमुळे गर्भ स्थानभ्रष्ट होतो व स्त्रीचाही नाश होतो.

[3]स्तंभिनीमुळे गर्भाचे स्पंदन थांबते.

[4]क्रोशनेमुळे उदरस्थ गर्भ आक्रोश करतो. (प्रक्षुब्ध होऊन फार हालचाल करतो असा अर्थ करणे बरे.)

[5]शुष्करेवतीमुळे क्रोशनेपर्यंत ज्या या दहा जातहारिणी त्यांपैकी पहिल्या पाच पुष्पघातक असून असाध्य आहेत व पुढच्या गर्भोपघातक अशा साध्य आहेत.

[6]नाकिनीमुळे मेलेलीच अपत्ये नेहमी जन्माला येतात.

सुश्रुताने ज्या ज्या महिन्यात रजोदर्शन होऊन गर्भस्राव वा पात होण्याची भीती उत्पन्न होईल त्या त्या प्रत्येक महिन्यासाठी निरनिराळी चिकित्सा सांगितलेली आहे.

## गर्भिणी परिचर्या : मासानुमासिक चिकित्सा

### योनिगत रक्तस्रावासाठी :

[7]ज्येष्ठमध, सागाचे बी, क्षीरकाकोली, देवदारू ही द्रव्ये पहिल्या महिन्यातील रजोदर्शनामध्ये दुधाबरोबर वापरावी.

[8]आपटा, तीळ, पिंपळी, मंजिष्ठा, शतावरी ही द्रव्ये दुसऱ्या महिन्यात वापरावी.

[9]बांडगूळ, क्षीरकाकोली, गव्हला, उपळसरी, ही द्रव्ये तिसऱ्या महिन्यात वापरावी.

१ संपूर्णाङ्गं यदा गर्भं हरते जातहारिणी ।
कालरात्रीति सा प्रोक्ता दुःखात् स्त्री तत्र जीवति ॥
२ यथा विषज्जते गर्भः प्रतीतो वाऽथ मुच्यते ।
स्त्रीविनाशाय सा प्रोक्ता मोहिनी जातहारिणी ॥
३ यस्या न स्पन्दते गर्भः स्तम्भवी नाम सा स्मृता ।
४ उदरस्थो यया क्रोशेत् क्रोशना नाम सा स्मृता ॥ का. सं., पान १९२
५ दशैता जातहारिण्यो जीवमानासु मातृषु ।
असाध्याः पुष्पघातिन्यः साध्या गर्भोपघातिकाः ॥ का. सं., पान १९३
६ जायते तु मृतं नित्यं यस्या नार्याः सवे सवे ।
नाकिनीमिति तां विद्याद्दारुणां जातहारिणीम् ॥ का. सं., पान १९३
– अत ऊर्ध्वं मासानुमासिकं वक्ष्यामः –
७ मधुकं शाकबीजं च पयस्या सुरदारु च ।
८ अश्मन्तकस्तिलाः कृष्णास्ताम्रवल्ली शतावरी ।
९ वृक्षादनी पयस्या च लता सोत्पलसारिवा । सु. शा. १०–५८–५९



[1]अनंतमूळ, उपळसरी, रास्ना, भारंगमूळ, ज्येष्ठमध ही द्रव्ये चवथ्या महिन्यात वापरावी.

[2]रिंगणी, डोरली, शिवण, क्षीरिवृक्षांच्या कोवळया पानांच्या कळया, त्यांची साल, तूप ही पाचव्या महिन्यात वापरावी.

[3]पिठवण, चिकणा, शेवगा, गोखरू, ज्येष्ठमध, ही सहाव्या महिन्यात वापरावी.

[4]शिंगाडा, कमळातील तंतू, द्राक्षा, नागरमोथा, यष्टिमधू, साखर ही द्रव्ये सातव्या महिन्यात वापरावी.

[5]कवठ, डोरली, बेल, पडवळ, ऊस, रिंगणी यांची सर्वांची मुळे दुधामध्ये सिद्ध करून आठव्या महिन्यात धावी.

[6]नवव्या महिन्यात सारिवा, अनंता, क्षीरविदारी, ज्येष्ठमध ही द्रव्ये सेवन करावी.

सुंठी, ज्येष्ठमध, देवदारू, ही द्रव्ये दुधाबरोबर वापरली असता गर्भाचे पोषण चांगले होते व तीव्र स्वरूपाचा शूलही थांबतो.

सुश्रुताने या ठिकाणी गर्भस्राव असा जो शब्द वापरला आहे तो अगदी स्थूल अर्थाने घेतला पाहिजे. कारण त्यानेच मागे निदानस्थानातील आठव्या अध्यायात स्राव व पात हे शब्द कोणत्या अवस्थेत वापरावेत याची निश्चित व्याख्या दिली आहे. त्यामुळे गर्भवतीला कित्येक वेळी प्रत्येक महिन्यामध्ये जी रक्तप्रवृत्ती होते तीच येथे चिकित्सेसाठी अभिप्रेत आहे. या रक्तप्रवृत्तीमुळे गर्भ व गर्भिणी या दोघांनाही पीडा उत्पन्न होण्याची शक्यता असते. गर्भाची मासानुमासिक वृद्धी लक्षात घेऊन त्या त्या महिन्यात इष्ट त्या गुणधर्मांची औषधे वापरलेली आहेत असे वाटते. प्रत्येक द्रव्याची कार्यकारणमीमांसा पूर्णपणे करता येणे आज तरी अवघड आहे.

१ अनन्तासारिवा रास्ना पद्मा मधुकमेव च ।
२ बृहत्यौ काश्मरी चापि क्षीरिशुंगास्त्वचो घृतम् ॥
३ प्रश्निपर्णी बला शिग्रुः श्वदंष्ट्रा मधुपर्णिका ।
४ शृंगाटकं बिसं द्राक्षा कशेरु मधुकं सिता ॥
वत्सैते सप्तयोगाः स्युरर्धश्लोकसमापनाः ।
यथासंख्यं प्रयोक्तव्या गर्भस्रावे पयोयुताः ॥
५ कपित्थ बृहतीबिल्वपटोलेक्षुनिदिग्धिका ।
मूलानि क्षीरसिद्धानि पाययेद्भिषगष्टमे ।
६ नवमे मधुकानन्तापयस्यासारिवाः पिबेत् । सु. शा. १०–६०–६३

[१]दहाव्या महिन्यात सुंठी आणि क्षीरविदारी किंवा नुसती सुंठी यांनी सिद्ध केलेले दूध सेवन करावे.

आठव्या महिन्यापासून रक्तस्रावाबरोबरच शूलही असतो, व या स्थितीत दोन महिन्यांपर्यंत गर्भाचे पोषणही होणे आवश्यक असते. या अवस्थेत सांगितलेल्या औषधांमध्ये स्तंभन, शूलघ्न व बृंहण अशा औषधांची योजना केलेली दिसते.

योगरत्नाकराने गर्भिणीच्या मासानुमासिक गर्भचलनासाठीही आठ महिन्यांकरिता स्वतंत्र चिकित्सा सांगितलेली आहे.

योगरत्नाकराने सांगितलेली चिकित्सा पुढीलप्रमाणे आहे :

[२]पहिल्या महिन्यात जर गर्भाचे चलन होईल तर तो स्थिर करण्याकरिता गर्भिणीने मनुका, ज्येष्ठमध, श्वेतचंदन, रक्तचंदन या औषधांचे चूर्ण गाईच्या दुधातून घ्यावे.

निळे कमळ, वाळा, शिंगाडे, नागरमोथे (कचोरा) ही औषधे थंड पाण्यात वाटून दुधात मिसळून प्यावी.

[३]दुसऱ्या महिन्यात कमळाचे देठ व नागकेशर दुधाबरोबर सेवन करावे. किंवा तगर, कमळ, बेलफळ, कापूर ही औषधे शेळीच्या दुधामध्ये वाटून त्यासवेच प्राशन करावी.

१ क्षीरं शुण्ठपयस्याभ्यां सिद्धं स्याद्दशमे हितम् ।
सक्षीरा वा हिता शुण्ठी मधुकं सुरदारु च ॥ सु. शा. १०–६४

२ चलनं प्रथमे मासि गर्भस्य यदि जायते ।
औषधं च तया देयं विचक्षणभिषग्वरैः ॥ १ ॥
मृद्विका ज्येष्ठिका चैव चंदनं रक्तचंदनम् ।
गवां च पयसा पेयं स्थिरता जायते ध्रुवम् ॥ २ ॥
नीलोत्पलं सवालं च शृंगाटं च कशेरुकम् ।
शीततोयेन पिष्ट्वा तु क्षीरेणालोड्य तत् पिबेत् ॥ ३ ॥
एवं न पतते गर्भः स च शूलः प्रशाम्यति । यो. र.

३ द्वितीये मासि गर्भस्य चलनं च भवेत् यदि ॥ ४ ॥
पयसा च तदा पेयं मृणालं नागकेशरम् ।
तगरं कमलं बिल्वं कर्पूरेण समन्वितम् ॥ ५ ॥
अजाक्षीरेण तत् पिष्ट्वा क्षीरेणालोड्यपूर्ववत् । यो. र.



[१]तिसऱ्या महिन्यात साखर व नागकेशर यांचे चूर्ण दुधातून घ्यावे – प्रकाष्ठ, चंदन, वाळा व कमळाचा देठ ही द्रव्ये थंड पाण्यात कालवून दुधातून प्राशन करावी.

[२]चवथ्या महिन्यात किंवा तहान, शूल, दाह, अशी लक्षणे असताना त्यावर केळीचे मूळ, कमळ, वाळा ही औषधे समभाग घेऊन दुधात वाटून सेवन करावी.

[३]पाचव्या महिन्यात डाळिंबाची पाने व चंदन यांचा कल्क, दही व मध घालून घ्यावा.

निळे कमळ, कमळाचा देठ, रेणुकबीज, भुईकोहळा, नागकेशर व प्रकाष्ठ अशी द्रव्ये पाण्यात वाटून सेवन करावी.

[४]सहाव्या महिन्यात सोनकाव, गाईच्या शेणाची राख आणि काळी माती यांनी पाणी सिद्ध करावे. (हे सर्व पदार्थ तापवून लाल करून पाण्यात विझवावे व वरील निवळी घ्यावी) व त्यामध्ये चंदन, साखर घालून ते सेवन करावे.

[५]सातव्या महिन्यात वाळा, गोखरू, नागरमोथे, लाजाळू, नागकेशर, प्रकाष्ठ यांचे चूर्ण मधाबरोबर सेवन करावे.

१. तृतीये मासि चलनं जायते गर्भजं यदि ॥ ६ ॥
पयसा लोडितं पेयं शर्करा नागकेशरम् ।
पद्मकं चंदनं चैव वालकं पद्मनालकम् ॥ ७ ॥
पिष्ट्वा शीतेन तोयेन क्षीरेण आलोड्य तत् पिबेत् ।
एवं न पतते गर्भः स च शूलः प्रशाम्यति ॥ ८ ॥

२ यदि गर्भस्य चलनं चतुर्थे मासि जायते ।
तृष्णाशूलविदाहैश्च ज्वरेण च निपीडनम् ॥ ९ ॥
क्षीरं च कदलीमूलं उत्पलं वालकं तथा ।
आलोड्य समभागेन पिबेत् रोगोपशान्तये ॥ १० ॥

३. पंचमे मासि गर्भस्य चलनं कुत्रचित् भवेत् ।
दध्ना च मधुना पेयं दाडिमीपत्रचंदनम् ॥ ११ ॥
– नीलोत्पलं मृणालं च कौन्तिक्षीरीं तथैव च ।
केशरं पद्मकं चैव तोयेनाऽऽलोड्य तत् पिबेत् ॥ १२ ॥
एवं न पतते गर्भः स च शूलः प्रशाम्यति ॥

४ षष्ठे मासि तु गर्भस्य चलता जायते यदा ॥ १३ ॥
गैरिका गोमयं भस्म कृष्णा मृत्स्ना तथैव च ।
एतेषां साधितं प्राज्ञभिषजा चामृतं तदा ॥ १४ ॥
पेयं शीतं परं साकं सितया चन्दनेन च ॥ यो. र.

५ सप्तमे मासि गर्भस्य चलनं जायते यदा ॥ १५ ॥
उशीरं गोक्षुरघनौ समङ्गा नागकेशरम् ।
सपद्मकं समधुना पाययेच्च विचक्षणः ॥ १६ ॥

[1]आठव्या महिन्यात लोध्र व पिंपळी यांचे चूर्ण मधात कालवून दुधाबरोबर प्यावे.

योगरत्नाकराने यापुढे अकराव्या व बाराव्या महिन्यांसाठी शूलघ्न योजना स्वतंत्रपणे सांगितलेली आहे. तोपर्यंत सगर्भावस्था संभवते व ती जवळ जवळ प्रकृतच समजावी, असे वर्णन आहे ते आपण पाहिले आहेच. तेव्हा यापुढील दोन महिन्यांत जर सगर्भावस्था टिकली तर त्यासाठी चिकित्साही आवश्यक आहेच.

या दोनही चिकित्सांमध्ये आमाचा अनुबंध महत्त्वाचा नसतो हे सामान्य आहे. दोन्हीमधील विशेष असा की, मासानुमासिक होणाऱ्या स्रावात गर्भाशयाच्या क्षोभाचे लक्षण जे शूल ते असत नाही. या स्रावासवे ज्या वेळी शूल हे लक्षण उत्पन्न होते त्या वेळी गर्भाशयाच्या विकृतीस प्रारंभ झाला आहे असे मानता येते व त्याचा परिणाम गर्भ स्थानभ्रष्ट होऊन स्राव व पात होण्यात होतो.

योगरत्नाकराने सांगितलेली ही चिकित्सा 'चय एव जयत् दोषम्' या न्यायाने गर्भाशयक्षोभाच्या अगदी प्रारंभीची आहे. आमाचा अनुबंध होऊन लक्षणे व्यक्त झाल्यास पुढे स्रावपातावाचून दुसरी गती नाही.

गर्भिणी अवस्थेमध्ये रक्तस्राव होऊ लागला की परिणामरूपाने त्याचे काही प्रकार संभवतात. काही वेळा त्याचे स्वरूप सौम्य, निराम असे असते तर काही वेळा आमाचे बल अधिक असून, व्याधी गंभीर स्वरूप धारण करतो.

[2]या आमदोषामुळे आमानुबंधाची लक्षणे व्यक्त दिसू लागतात. गर्भिणीला पूर्वी उल्लेखिलेल्या पार्श्व, पृष्ठ, कटी, बस्ती, योनी या ठिकाणी तीव्र स्वरूपाच्या वेदना होतात. मलप्रवृत्ती होत नाही. स्राव ग्रंथिल, पिच्छिल व दुर्गंधियुक्त असतो. अपत्यपथासही शैथिल्य येते.

या स्थितीमध्ये गर्भ टिकणे शक्य नसते. तरी पण टिकविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे शक्य असल्यास रूक्ष व शीत असे उपचार करावेत.

## चिकित्सा :

गर्भस्राव पूर्वरूपाची सामान्य चिकित्सा—

पूर्वरूपामध्ये पूर्ण विश्रांती रुग्णेस द्यावी. सामान्यतः शमन, स्तंभन ह्यांचा अवलंब करावा, व शीत गुणाची द्रव्ये वापरावी.

१ अष्टमे मासि चलनं गर्भस्य यदि जायते ।
लोध्रमागधिकाचूर्णं मधुना पयसा पिबेत् ।। यो. र. भा. २, पृ. ५११-१२

२ "आमान्वये च ऊर्ध्वमपि विरुद्धोपक्रमत्वात् ।"
(गर्भः न तिष्ठति) तत्र रूक्षशीतानि प्रयुञ्जीत । अ. सं. शा. ४-७



स्राव सुरू होताच गर्भिणीला डोक्यावरील भाग खाली, व पायाकडील भाग उंच अशी शय्या तयार करून त्यावर सुखकारक, मऊ, शीतस्पर्श, अशी गादी घालावी व त्यावर गर्भिणीस झोपवावे. नंतर यष्टिमधू व तूप यांचे पिचू योनीमध्ये ठेवावे. अत्यंत गार अशा पाण्याने थंड करून हे पिचू वापरले असता अधिक चांगले. योनीच्या आसमंतातही या पिचूंचा उपयोग करावा. शतधौत, सहस्रधौत, घृतांचा नाभीच्या खाली लेप करावा. गाईचे गार केलेले दूध, यष्टिमधूचा काढा किंवा न्यग्रोधादी गणांतील द्रव्यांचा काढा चांगला थंड करून त्याने नाभीच्या खाली सगळीकडे परिषेक करावा. थंडगार पाण्यामध्ये बसावे. क्षीरिवृक्षांच्या वा इतर कषाय रसयुक्त अशा वृक्षांच्या स्वरसांची पुटे वस्त्रास देऊन त्याचे पिचू योनीमध्ये ठेवावे. वडाच्या शृंगाने सिद्ध केलेल्या दुधाचे वा घृताचे पिचू धारण करावे. हेच सिद्ध केलेले तूप एक तोळा प्रमाणात सेवन करावे, किंवा दुधातून काढलेले तूप सेवन करावे. निरनिराळ्या प्रकारची कमळे व त्यांतील केसर यांचा कल्क मध आणि साखर घालून चाटावा. शिंगाडा, पुष्करबीज, नागरमोथे यांचे चूर्ण सेवन करावे. गव्हला, पांढऱ्या कमळाचा कंद, उंबराची कोवळी फळे, वडाचे कोंब, शेळीच्या दुधाबरोबर सेवन करावे. बला, अतिबला, साठेसाळ व ऊस यांची मुळे व काकोली यांच्या काढ्यामध्ये तयार केलेला तांबड्या साळीचा भात, दूध व मध साखर यांच्याबरोबर खावा. तो अगदी गार केलेला असावा.

लावा, कपिंजल, ससा, हरीण यांच्या मांसरसाने सिद्ध केलेले अन्न तूप घालून खावे व सुखकारक थंड अशा जागी बसावे. या स्थितीमध्ये गर्भिणीने क्रोध–शोक–श्रम यांच्यापासून दूर राहावे. कोणतीही हालचाल करू नये. पुढेही मैथुन व व्यायाम वर्ज्य करावेत. तिच्या मनाला आवडतील, प्रसन्न करतील अशा गोष्टी सांगून तिची करमणूक करावी.

रक्तप्रवृत्ती थांबवण्यासाठी वरील चरकोक्त उपचाराप्रमाणेच गर्भपालरस, शतावरीकल्प, शतामृत, शतावरिघृत, फलघृत, त्रिवंगभस्म, चंद्रपुटीप्रवाळ, मंडूरभस्म ही द्रव्ये वापरावी. या उपचाराने गर्भ स्थिर होतो.

## रूपावस्थेतील चिकित्सा :

रूपावस्थेत गर्भनिष्क्रमण हे निश्चित होणार असते. ते सुलभ होण्याकरिता म्हणून खालील चिकित्सा करावी :

गर्भ हा संपूर्णपणे गर्भाशयाच्या बाहेर पडणे हे आवश्यक असते. काही वेळा गर्भस्राव वा पात पूर्ण होत नाही, तर अर्धवट होतो. काही अवशेष गर्भकोष्ठामध्ये तसेच

— आमगर्भशेषेणहि पुनः पुनः अकुशलं अनुसज्येत । तस्मात् तीक्ष्णैः अनवशेषयन् उपाचरेत् । ततः परं स्नेहपानैः बस्तिभिः आहारैश्च दीपनीयपाचनीयजीवनीय बृंहणीयमधुरवातहरैः इति । अ. सं. शा. ४-९

राहतात आणि या अवशिष्ट शल्यामुळे स्त्रीला शूल, स्राव, क्लम, उत्क्लेश इत्यादी वेदना वरचेवर होत राहतात. त्यामुळे उपचाराने नुसता स्राव थांबला की झाले असे वैद्याने मानू नये, स्राव थांबून जर खरोखरीची निःशल्यता आली असेल तर इतर लक्षणांचाही उपशम झाला पाहिजे. तो तसा झाला नसेल व स्रावही पुन्हा पुन्हा होत असेल (थांबून थांबून होत असेल) तर तीक्ष्ण अशा द्रव्यांनी शोधन करावे; शल्य पूर्णपणे निघून जाईल अशी व्यवस्था करावी; किंवा शस्त्राने लेखनकर्म करावे व आत अवशिष्ट राहिलेले शल्य बाहेर काढावे. यासाठी योग्य ती यंत्रे वापरावीत.

गर्भाशय शुद्ध झाल्यावर स्नेहपान व बस्ती यांचा उपयोग करावा. दीपन, पाचन, जीवन, बृंहण, वातघ्न अशी द्रव्ये आहारासाठी वापरावी.

प्रथम लंघन करावे व नंतर धमासा, गुळवेल, वाळा, पित्तपापडा, नागरमोथे, चंदन, अतिविषा, बला, टेंटू, धने यांचा काढा प्राशन करावा.

वरी, नाचणी यांसारखी तृणधान्ये सांठे-साळी यांच्या पेया किंवा मूग, मटकी यांचे यूष आहारासाठी वापरावे. आमाचे बल कमी झाले म्हणजे पुन्हा पूर्वीप्रमाणे स्निग्ध, शीत चिकित्सा करावी.

[1]आमगर्भ पडून गेल्यानंतर त्या स्त्रीला कोणते तरी एक मद्य तिच्या शक्तीप्रमाणे पाजावे. यामुळे गर्भकोष्ठ शुद्ध होण्यास मदत होते व गर्भपातामुळे उत्पन्न झालेल्या अत्यंत तीव्र स्वरूपाच्या शूलादी वेदना थांबतात.

मद्य प्राशन करणारी स्त्री नसेल तर पाचनीय द्रव्यांनी सिद्ध केलेल्या हारिकांसारख्या रूक्ष, उष्ण अशा धान्यांच्या तिलासह सिद्ध केलेल्या यवागू द्याव्या. या यवागूमध्ये तूप, तेल वा मीठ घालू नये. (स्नेह लवण वर्ज्य.)

लघुपंचमुळाने सिद्ध केलेल्या काढ्यामध्ये पेया तयार करून ती प्राशन करावी. मद्य पिणारी स्त्री नसेल तर जी पेये द्यावयाची ती पंचकोलांनी सिद्ध करून द्यावी.

– तत्र रुक्षशीतानि प्रयुञ्जीत । तद् यथा–प्राक् उपवासं–ततो दुरालभा अमृता–उशीर–पर्पटक–घन–चंदन–अतिविषा–बला–कठ्वंग–धान्यक–क्वाथपानम् । तृण-धान्यशालिशष्टिकपेयानां अशनं च मुद्गादि युषैः । जिते त्वामे स्निग्धशीतानि पूर्ववत् । अ. सं. शा. ४–८

१ आमगर्भे तु पतिते मद्यानां अन्यतमं सामर्थ्यतः पाययेत् । गर्भकोष्ठविशुध्यर्थं अति विस्मारणार्थं च । अमद्यपां – पाचनीय द्रव्योपहिताभिः स्नेहलवणवर्ज्याभिः सतिलाभिः उद्दालकादिः यवागुभिः उपचरेत् । यावन्तो मासाः तावन्ती अहानि इति । ततः प्रीणनैः बलानुरक्षिभिः अस्नेहैः आहारैः आदोषधातुक्लेदशुद्धेः ।
अ. सं. शा. ४–९



हे उपचार ज्या महिन्यात गर्भस्राव वा पात झाला असेल तितके दिवस करावे. नंतर गर्भिणीला प्रीणन, बलवर्धक असा आहार द्यावा. पण दोषधातू यांतील क्लेद नष्ट होईपर्यंत स्निग्ध द्रव्ये वापरू नयेत.

## उपविष्टक

ज्या वेळी गर्भ सारयुक्त झाला असेल, आकाराने मोठा असेल त्या वेळी जरी मिथ्या-आहार-विहाराने रक्तस्राव होऊ लागला वा इतर स्राव होऊ लागले तरी गर्भ हा सारयुक्त मोठा असल्यामुळे पडत नाही. या स्रावामुळे वायू प्रकुपित होतो व तो कफपित्तांनाही दुष्ट करून गर्भाला मातेकडून रस पोहोचविणारी जी गर्भनाडी नाभी ती अवरुद्ध करतो. या वातविकृतीमुळे गर्भनाडी चेपली जाते वा तिला पीळ पडतो. वायूची विकृती फारच असेल तर क्वचित गाठही पडते, व अशी गाठ पडली की आहार-रस मुळीच न मिळाल्यामुळे गर्भ मृत होतो. पाणी वाहण्याच्या पन्हाळीत पाला-पाचोळा अडकला म्हणजे पाणी वाहण्याचे बंद होते व ते रोपांना मिळत नाही; ती सुकत जातात, त्याप्रमाणे दोषांनी अवरुद्ध झाल्यामुळे गर्भनाडीतून रसांचे वहन चांगले होत नाही. त्यामुळे गर्भाची वाढ होत नाही. तो तसाच राहतो किंवा सुकत जातो.

अपुऱ्या आहाररसामुळे गर्भाच्या स्थितीचे 'उपविष्टक' व 'नागोदर' (उपशुष्कक) असे दोन प्रकार आढळतात.

उपविष्टकामध्ये गर्भ जसाच्या तसाच राहतो. मधूनमधून रक्तस्राव व इतर स्राव थोडे थोडे होत राहतात. त्यामुळे गर्भाची वाढ होत नाही. तरी पण जो आकार, जे परिणाम एकदा त्यास प्राप्त झालेले असतात त्यापेक्षा तो बारीक होत नाही आणि त्याच स्थितीत स्फुरण पावत राहतो. उदराचा आकारही क्रमाने वाढत जावयाचा तो तसे न होता जेवढ्याच्या तेवढाच राहतो. गर्भाच्या या "जैसे थे" स्थितीमुळे त्यास 'उपविष्टक' असे म्हणतात. हा पहिला प्रकार होय.

– लघुना पंचमूलेन रूक्षां पेयां ततः पिबेत् ।
पेयां अमद्यपा कल्के साधितां पंचकौलिके ।। वा. शा. २–१० ते ११

– यस्याः पुनर्महति जातसारे गर्भे वर्ज्यानां अवर्जनात् पुष्पदर्शनं स्यात् अन्यद् वा योनिस्रवणं तस्याः तन्निमित्तं वायुः प्रकुपितः पित्तश्लेष्माणौ परिगृह्य गर्भस्य रसवहां नाडीम् प्रतिपीडय अवतिष्ठते । ततो नाडयां दोषैः कुल्यायाम् इव तृण-पत्रादिभिः प्रतिछन्नायाम् रसस्य असम्यक् वहनात् गर्भः वृद्धि अनाप्नुवन् उपविशति उपशुष्यति वा । अ. सं. शा. ४–१०

– तत्र तस्याः कदाचित्कार्तवपरिस्रावौ अल्पौ च दृश्येते । सततं च गर्भः प्राप्तात् परिमाणात् अपरिहीयमाण एव स्फुरति नच कुक्षिः विवर्धते तं उपविष्टकं इत्याचक्षते ।। अ. सं. शा. ४–११

## नागोदर

गर्भिणी स्त्रीला प्रत्येक महिन्याला रजःस्राव होईल वा हा स्राव प्रतिदिनी चालू राहील; इतरही स्राव तसेच होत राहतील. या स्रावाचे प्रमाण जर पुष्कळ असेल तर गर्भाची वाढ नुसतीच खुंटत नाही तर गर्भास प्राप्त झालेला आकारही उणावत (कमी होत) जातो. गर्भ केव्हा तरी थोडासा स्फुरण पावतो, पोटाचा वाढलेला आकार कमी होतो. अशा रीतीने गर्भ सुकत जातो म्हणूनच त्यास उपशुष्कक किंवा नागोदर अशी संज्ञा आहे.

हे उपविष्टक व उपशुष्कक गर्भ मातेच्या अल्प अशा आहाररसामुळे व उदरातील उष्णतेमुळे थोडे थोडे वाढत जातात. ज्या वेळी त्यांची वाढ पूर्ण होऊन ते पुष्ट होतील त्या वेळी प्रसूती होते. हा काल काही वर्षांचाही असू शकतो व अशा स्थितीत जन्मास आलेले मूल जन्मतःच दंतयुक्त असते. उपविष्टक व नागोदरावर सामान्यपणे पुढील चिकित्सा करावी.

जीवनीय, बृंहणीय, मधुर अशा औषधांनी सिद्ध केलेल्या घृतांचा उपयोग करावा. त्याचप्रमाणे त्याच औषधांनी सिद्ध केलेले दूध वापरावे. अंडी खावयास द्यावी. जेवणामध्ये वरील सिद्ध-घृत वापरावे. अशा जीवनीय, बृंहणीय द्रव्यांनी गर्भिणी तृप्त झाली म्हणजे तिला वाहनातून थोडे थोडे पुन्हा फिरावयास न्यावे. पौष्टिक आहार चालू ठेवावा. या आहार-विहारामुळे गर्भाचे संक्षोभण होऊन त्याचे पोषण होऊ लागते.

या उपविष्टक नागोदराचे वातज, पित्तज, कफज असे तीन प्रकार असून, त्यांवर अष्टाङ्गसंग्रहाने स्वतंत्र चिकित्साही सांगितली आहे. ते वर्णन असे—

न वाढणाऱ्या वा शुष्क होत जाणाऱ्या गर्भामुळे वायूचा रोध होऊन तो प्रकुपित होतो. संशब्द, फेनिल, भसरट मलप्रवृत्ती होते. मूत्रप्रवृत्ती अडखळते. कटि-पृष्ठ-हृदयात वेदना होतात. जांभया फार येतात. झोप येत नाही. वरचेवर पडसे येते.

– यदा तु प्रतिमासं आर्तवं प्रत्यहं वा परिस्रवणं नात्यल्पं च तथा परिहीयमाणः गर्भः चिरात् किंचित् स्पंदते । कुक्षिश्च वृद्धाऽपि परिहीयते । तत् उपशुष्ककं नागोदरं च । अ. सं. शा. ४–१२

– तौ तु मातुः आहारतेजसा अल्पेन आप्याय्यमानौ यदा दुष्टौ स्यातां केशदशना-दियुक्तौ तदा वर्षगणैरपि प्रमदा प्रसूयेत एव । अ. सं. शा. ४–१३

– तयोः जीवनीय-बृंहणीय-मधुरौषध–सिद्धानाम् सर्पिषाम् उपयोगः तथा । पयसां रसानां आमगर्भाणां च गर्भवृद्धिकरः । तथा सम्भोजनं एतैरेव च घृतादिभिः सुभिक्षायाः अभीक्ष्णं यानवाहनापवर्जनबृंहणैः उपपादनम् । अ. सं. शा. ४–१७



कोरडा खोकला येतो. अंग गळून जाते. कानामध्ये आवाज होतो. कानशिले ठणकतात. सगळ्या अंगाला मुंग्या येतात. वात सरताना कापल्यासारख्या वेदना होतात. पोटामध्ये शून्यत्व वाटते. अन्न चांगले पचत नाही. दिवसेंदिवस गर्भिणी थकत जाते. तिची त्वचा स्फुटित, विवर्ण व खरखरीत होते.

सामान्य उपचारांसवे वातज उपविष्टक नागोदरावर प्रथमतः सैंधव व दूध यांचा बस्ती द्यावा. नंतर शीत-जलाने स्नान घालावे. मऊ भात खाण्यास द्यावा. विदार्यादी गणाने ( वा. सू. अ. १५ ) सिद्ध केलेल्या घृताने अनुवासन बस्ती द्यावा व निवान्त स्थळी ठेवावे.

पित्तज उपविष्टक नागोदरामध्य पित्तप्रधान लक्षणे दिसतात. मलप्रवृत्तीचा रंग तांबुस वा हिरवा असतो. घुसमटल्यासारखे वाटते. घशाशी आंबट येते. छर्दी येते, मूर्च्छा येते, कुक्षी व हृदय या ठिकाणी दाह होतो. गर्भिणी काळवंडते, दुर्बळ होते. तिच्या अंगावर नेहमी सूज असते.

पित्तज उपविष्टक नागोदरासाठी ज्येष्ठमध व भुईकोहळा यांच्या रसाने दूध सिद्ध करून ते प्राशन करावे. सावरीची तीन मोठी फळे व तुष काढलेले माषाढक ( उडीद व तूर ) दूध व पाणी घालून उखळीत कुटावे. त्यामध्ये तित्तिर, कपिंजल यांचा मांसरस तयार करावा व तो तूप घालून प्राशन करावा. त्यामुळे उपविष्टक वाढीस लागतो व उपशुष्कचे पोषण होऊ लागते. जीवनीय गणांनी सिद्ध केलेली यवागू शेळीचे तूप घालून प्राशन करावी.

क्षीरविदारी, काकोली, क्षीरकाकोली यांच्या कल्काने दूध घालून तूप सिद्ध करावे. ते सकाळीच दुधाबरोबर सेवन करावे. अंड्यातील रस घ्यावा. किंवा अंडी या सिद्ध तुपात घालून भाजून खावीत. जलचर प्राण्यांचे मांस सेवन करावे.

– तत्र वातेनोपविष्टकोपशुष्ककयोर्वायुः प्रतिहन्यते, सशब्दं फेनिलं विच्छिन्नं शकृदुप-वेश्यते, मूत्रमुपरुध्यते, कटीपृष्ठहृदयेषु वेदना, जृम्भा, निद्रानाशोऽभीक्ष्णं प्रतिश्यायः, शुष्ककासः, सादः क्ष्वेलेते इव कर्णौ, तुद्येते इव शंखौ, पिपीलिकादिरिव संसृज्यते शरीरं परिकृन्तन्निव वायुर्भ्रमति, कुक्षौ तम इव प्रवेश्यते, दुःखेनान्नस्य जरणमहरहः परिहानिः स्फुटितविवर्णपरुषत्वक्त्वं च भवति । अ. सं. शा. ४–१४

– अथ विशेषेण वाते पूर्वमेव सैंधवोपहितं क्षीरबस्तिं दत्वा शीतोदकस्नातां मृदु शाल्यौ-दनं भोजयेत् । ततो विदार्यादिगणसाधितेन सर्पिषाऽनुवासयेत् । निवातं च सेवेत ।। अ. सं. शा. ४–१८

– पित्तेन ताम्रहारितमुपवेश्यते । धूमकोः अम्लकः छर्दिः, मूर्छा, कुक्षि-हृदयदाहः पीतरक्तगोमूत्राभनेत्राभनेत्रमूत्रनखत्वक्त्वं काली दुर्बला नित्यशूना च नारी भवति । अ. सं. शा. ४–१५

कफज उपविष्टक नागोदरामध्ये तोंड गोड होते. उत्क्लेश होतो ( मळमळते, घशाशी येते ), कफाची छर्दी होते. अन्न नकोसे वाटते. सकफ कास व श्वास उत्पन्न होतो. हात, पाय, नेत्र, श्वेतवर्ण होतात.

कफज उपविष्टक नागोदरासाठी आनूप वा जलज मांस खाऊन वर स्वच्छ असे मद्य प्राशन करावे. हा प्रयोग तीन, पाच वा सात रात्री करावा. तीळ, मूग, उडीद, मीठ आणि बेलाचा मगज यांचे चूर्ण एकेक भाग घेऊन त्यात एक भाग तूप मिसळावे. यातच बोराचे चूर्ण एक भाग मिसळावे. हे सर्व चांगले एकत्र करून चांगल्या कुपीमध्ये भरून बंद करून ठेवावे. त्यातून रोज सकाळी योग्य मात्रेत तापवून गार केलेल्या शेळीच्या दुधासवे खावे.

अशा रीतीने सामान्य विशेष औषधी प्रयोग वा उपचार करूनही जर गर्भ वाढला नाही तर तीक्ष्ण अशी औषधे देऊन तो पाडावा किंवा अपरापातनासाठी सांगितलेले उपचार करून गर्भपात करावा.

## लीनगर्भ

वातामुळे स्रोतसे दुष्ट होऊन त्यात गर्भ अगदी लीन होतो. त्याची कोणतीही हालचाल होत नाही (न स्पंदते), या स्थितीत त्यास लीनगर्भ असे म्हणतात.

- पित्ते मधुकविदारीनिर्यूहसिद्धं पयः पिबेत् । तिस्रः स्थूलकुक्कुटीनिस्तुषमाषाढकं च क्षीरोदकेनोलूखले संक्षुद्य तद्रसेन सर्पिषा च तित्तिरिकपिञ्जलान्यतररसं साधयित्वा पाययेदुपविष्टकविवर्धनार्थमुपशुष्ककबृंहणार्थं च । अजासर्पिषा क्षीरेण जीवनीयैश्च संस्कृतां यवागूं पिबेत् । पयस्याकाकोलीद्वयसुनिषण्डककल्केन पयसा च सर्पिर्विपाचयेत् । तत्काल्यं क्षीरानुपानमुपयुञ्जीत । आमगर्भरसेन चाश्नीयात् । तानेव च तत्र भृष्टान् भक्षयेत् । जलचरमांसानि च । अ. सं. शा. ४–१९
- श्लेष्मणा मधुरास्यत्वमुत्क्लेशः; श्लेष्मोद्वमनं, भक्तद्वेषः, श्वेतहस्तपादनेत्रता, कासः, श्वासश्च ।। अ. सं. शा. ४–१६
- कफे त्वानूपौदकपिशितोपदंशामच्छसुरां त्रिरात्रं पंचरात्रं वा पिबेत् । तिलमुद्गमाषलवणबिल्वपात्रैः पंचभिर्घृतपात्रं संयोज्य स्वनुगुप्तं निधापयेत् । ततः प्रातः पिण्डं बिल्वमात्रं शृतशीतच्छागदुग्धानुपानं वाऽश्नीयात् । अत्रैव वा बदरचूर्णपात्रमपि निदध्यात् । अ. सं. शा. ४–२०
- एवमवृद्धौ तीक्ष्णैर्विरेचयेदपरापातनीयैश्च पातयेत् ।। अ. सं. शा. ४–२१
- यस्याः पुनर्वातोपसृष्टस्रोतसि लीनो गर्भः प्रसुप्तो न स्पन्दते तं लीनमित्याहुः ॥ अ. सं. शा. ४–२२



तत्पूर्वीच्या स्थितीत ( गर्भस्पंदन थांबल्यापासून ते प्रसव होईपर्यंत ) अस्वस्थता, उदरशूल, शिरःशूल, क्वचित योनिस्राव, मंदज्वर अशी लक्षणे गर्भिणीच्या ठिकाणी दिसत असतात.

या अवस्थेसाठी ससाणा, मासा, घोरपड, मोर, कोंबडा, तित्तिर यांपैकी कोणाच्या तरी मांसरसाबरोबर पुष्कळ तूप घालून तांबड्या साळीचा भात खावा. किंवा तोच भात तसेच पुष्कळ तूप घालून उडीद किंवा मुळा यांच्या सूपाबरोबर सेवन करावा.

तीळ, उडीद, कोवळे बेलफळ यांच्याबरोबर सातू दुधाशी भक्षण करावे.

पुष्ट प्राण्याचे मांस खाऊन द्राक्षासव प्यावे. तेलाने उदर, वंक्षण, मांड्या, कटी, पार्श्व, पृष्ठ यांना वरचेवर अभ्यंग करावा. त्या गर्भिणीला वरचेवर हर्षित करावे. गर्भवृद्धिकर भाव जे पूर्वी सांगितलेले आहेत त्यांचा अवलंब करावा.

## मृतगर्भ

कारणे : गर्भिणी स्त्रीच्या शरीरामध्ये दोष अतिशय संचित झाले, किंवा तिने तीक्ष्ण-उष्ण अशा द्रव्यांचे अधिक प्रमाणात सेवन केले, वात-मूत्र-पुरीष यांचे वेग धारण केले, वेडेवाकडे बसणे, आसन व शयन वेडेवाकडे असणे, निरनिराळ्या प्रकारचे विषम दाब पडणे (गर्भाशयावर), वा मार लागणे, क्रोध, शोक, ईर्षा, भय, त्रास इत्यादी मनोविकार अधिक प्रमाणात उत्पन्न होणे; ज्वरासारखे रोग उत्पन्न होणे यामुळे किंवा दैवयोगाने गर्भ मरतो.

- तत्र श्येनोत्क्रोश– गो–मत्स्य–गोधा–शिखि–कुक्कुट– तित्तिरीणामन्यतमस्य रसेन भूरिसर्पिष्केण माषयूषेण मूलकयूषेण वा घृताढ्येन रक्तशाल्योदनं भोजयेत् । सक्तून्वा तिलमाषबिल्वशलाटुयुक्तान् पयसा पाययेत् । मेद्यमांसोपदंशं वा मार्द्वीकम् । तैलेन चाभीक्ष्णमुदरवंक्षणोरुकटीपार्श्वपृष्ठान्यभ्यञ्ज्यात् । मुहुर्मुहुश्चैनां हर्षयेत् । पूर्वोक्तं चेक्षेत । अ. सं. शा. ४–२३
- प्रविध्यति शिरो या तु शीताङ्गी निरपत्रपा ।
  नीलोद्धतसिरा हन्ति सा गर्भं स च तां तथा ।। सु. नि. ८–११

लक्षणे : उदर गच्च बसल्यासारखे वाटते, उदर गार लागते, गर्भ स्पंदन पावत नाही (गर्भहृत्स्पंदने ऐकू येत नाहीत), आत दगड ठोकल्यासारखे वाटते. शूल अधिक होतो. गर्भाला हीच मृतावस्था जर अगदी प्रसवाच्या वेळी प्राप्त झाली तर आवी उत्पन्न होत नाहीत. क्वचित आलेल्याही थांबतात. गर्भाशयमुखाचा विस्तार योग्य व अपेक्षित प्रमाणात होत नाही. त्यामुळे गर्भसंग होण्याची शक्यता असते. किंवा मूढगर्भही क्वचित होतो. गर्भिणी इतकी क्लान्त होते की, तिला डोळे उघडवत नाहीत, पोटास तडस लागते, तीव्र वेदना होतात, चक्कर येते, धाप लागते, कोणतीही हालचाल कष्टदायक होते. मल-मूत्रांची प्रवृत्ती योग्य होत नाही. या लक्षणांवरून स्त्री मृतगर्भा आहे असे समजावे.

ही मृतगर्भता प्रसवकालापूर्वी बरेच दिवस आधी आली असेल तर पोट जड वाटणे, स्पंदन नसणे इत्यादी प्रारंभी उल्लेखिलेली तेवढीच लक्षणे होतात व बहुधा गर्भ नऊ महिने पुरे होताच पडून जातो. विशेष असा त्रास होत नाही. पण तसा तो पडून गेला नाही किंवा अगदी प्रसवकालीच मृत झाला तर मात्र तो 'शल्य'रूप बनून आवी न येणे इत्यादी अत्यंत पीडाकर लक्षणे होतात. तसेच काही वेळा गर्भिणीच्या उदरावर आगंतू कारणाने (शस्त्र, शृंग) अभिघात झाला असताना गर्भाशयाचा भेद होऊन गर्भ मृत होण्याची अक्यता असते. असा गर्भ काही वेळा गर्भाशयाच्या बाहेर पण

– यस्याः पुनरतिमात्रदोषोपचयाद्वा तीक्ष्णोष्णातिमात्रसेवनाद्वा वातमूत्रपुरीषवेगविधारणैर्वा विषमासनशयनस्थान संपीडनाभिघातैर्वा क्रोधशोकेर्ष्याभयत्रासादिभिर्वा साहसैर्वा परैः कर्मभिरन्तः कुक्षेर्गर्भो म्रियते । तस्याः स्तिमितं स्तब्धमुदरमाततं शीतमश्मान्तर्गतमिव भवत्यस्पन्दनो गर्भः शूलमधिकमुपजायते । न चाव्यः प्रादुर्भवन्ति । योनिर्न प्रस्रवत्यक्षिणी चास्याः भवतः ताम्यति । व्यथते । भ्रमते । श्वसित्यरतिबहुला च भवति । न चास्या वेगप्रादुर्भावो यथावदुपलभ्यते । इत्येवं लक्षणां स्त्रियं मृतगर्भेयमिति विद्यात् ॥ तस्य गर्भशल्यस्य जरायुप्रपातनं कर्म संशमनमित्याहुरेके । मन्त्रादिकमथर्ववेदविहितमित्येके । परिदृष्टकर्मणा शल्यहर्त्रा हरणमित्येके ॥ च. शा. ८–३१ ते ३२

– विवृद्धे तु गर्भे स्तब्धं स्तिमितं शीतमश्मगर्भमिवोदरमाभाति । शूलमधिकमुपजायते न च स्पन्दते गर्भो नाव्यः प्रादुर्भवन्ति न स्रवति योनिरक्षिणी चास्याः स्रंस्येते तथा भृशमरतिररीता व्यथतेऽन्यथा चेष्टते ताम्यति भ्राम्यति रोदित्यहर्निशं न स्वपिति पूत्युच्छ्वासा कृच्छ्राच्छ्वसित्यतिकष्टं प्राणिति जक्षितीत्येवंविधां स्त्रियं मृतगर्भां विद्यात् ॥ अ. सं. शा. ४–२७

भ्रम, मूर्च्छा, तृषाध्मानं वातरोधं च विव्हलं ।
मूर्च्छां वमिं सपारुष्यं दीनत्वमुपगच्छति ॥
मृतगर्भं विजानीयात् आशुकारी स्त्रियामपि ।

हारित तृतीयस्थान, अध्याय ५१, पान ४५३



उदरामध्ये आंब्याच्या कोयीप्रमाणे बाहेर टाकला जातो व पुढे त्याची गती मूढ होऊन त्याला उदरपाटनपूर्वक बाहेर काढावे लागते. कित्येक वेळा पहिली प्रसूती वामदेवीय पद्धतीने (उदरपाटनपूर्वक) झाली असताना पुढच्या वेळी प्रसव सुरू झाल्यानंतर योग्य त्या वेळी प्रसूती न झाल्यास गर्भाशयाचा पहिल्या व्रणापाशी भेद होऊन गर्भ बाहेर पडून मृत होतो. याही वेळी गर्भाला उदरपाटनपूर्वक बाहेर काढावे लागते. एकूण 'शल्य'रूप झालेल्या गर्भाचे त्वरित व कुशलतेने गर्भनिर्हरण करणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा गर्भिणीही क्वचित वेळी प्राणास मुकते.

## गर्भोपद्रव

व्याख्या : ज्या वेळी गर्भामुळे गर्भिणीच्या अपेक्षेने गर्भिणी स्त्री-मध्ये रोग उत्पन्न होतात, त्या वेळी त्यांना गर्भोपद्रव असे म्हणावे.

[१]गर्भिणीला होणाऱ्या सर्व रोगांना मूलतः गर्भ हाच कारणीभूत असतो. आहाररस मातेच्या शरीरातून गर्भशरीरात जातो व त्याच्या शरीरातील दोष क्लेदांना घेऊन परत येतात. त्यामुळे स्वभावतःच मातेच्या शरीरातील दोषांना वैषम्य प्राप्त होते व तिच्या शरीरातील क्लेदांतही थोडीशी वाढ होते (अ. सं. शा. ४–९). ही स्थिती गर्भिणीच्या बहुतेक उपद्रवांना कारणीभूत असते. गर्भ हेच याचे कारण असल्यामुळे, गर्भिणीला होणाऱ्या उपद्रवांना गर्भोपद्रव (गर्भामुळे उत्पन्न होणारे उपद्रव) अशी संज्ञा प्राप्त होते.

कारणे : गर्भिणीने केलेला मिथ्या आहार-विहार, किंवा गर्भिणीच्या शरीरामध्ये गर्भावस्थेपूर्वीपासूनच असणारे स्थानवैगुण्य, गर्भदोष, गर्भव्यथा, मानसिक आघात, ह्या कारणांनी गर्भोपद्रव उत्पन्न होतात. (गर्भिणीला स्वतंत्र वा निज कारणांनीसुद्धा व्याधी

– मानसागन्तुभिर्मातुरुपतापैः प्रपीडितः ।
गर्भो व्यापद्यते कुक्षौ व्याधिभिश्च प्रपीडितः ॥ सु. नि. ८–१३

– "यदा सोऽन्तर्मृतो गर्भः शूनो बस्तिरिवाततः । तेनावृताया नार्यास्तु कुक्षिरानह्यते भृशम् । उत्क्षिप्यन्त इवाङ्गानि मूत्रबस्तिश्च भिद्यते । क्लोम प्लीहा यकृच्चैव फुफ्फुसं हृदयं तथा । गर्भेण पीडितं ह्येतदूर्ध्वं प्रक्रामति स्त्रियाः । सा शूयते मुह्यति च कृच्छ्रोच्छ्वासा च जायते । पूतिगन्धस्तथा स्वेदो जिह्वा तालु च शुष्यति । वेपते भ्राम्यति तथा जीवितं चोपरुध्यते । एतैर्लिङ्गैर्विजानीयान्मृतं गर्भं चिकित्सकः ।" सु. नि. ८–१४ टीका

१ गर्भेणोत्पीडितादोषास्तास्मिन् हृदयमाश्रितः ।
कण्डुं विदाहं कुर्वन्ति गर्भिण्याः किक्किशानि च । वा. शा. १–५८

होण्याची शक्यता असते. पण त्या वेळी मात्र त्यांना गर्भोपद्रव असे म्हणता येणार नाही.)

**संप्राप्ती :**

वरील कारणांनी गर्भिणीच्या शरीरातील प्रकुपित दोष दुष्ट झाल्यानंतर गर्भिणीच्या शरीरामध्ये स्थानवैगुण्य उत्पन्न करून किंवा पूर्वीच असलेल्या स्थान-वैगुण्याचा आश्रय करून त्या त्या स्थानानुरूप रोग उत्पन्न करतात.

[1]हारिताने हृल्लास, छर्दी, शोष (तोंडास कोरस पडणे), ज्वर, शोथ, अरुची, विवर्णत्व, अतिसार असे आठ उपद्रव गर्भावस्थेमुळे गर्भिणी स्त्रीमध्ये उत्पन्न होतात असे सांगितले आहे. पुढे चिकित्सेतील वर्णनावरून मूत्रविबंध हा आणखी एक उपद्रव हारितास अभिप्रेत असावा असे दिसते. असे एकूण नऊ उपद्रव हारितसंहितेत उल्लेखिलेले आढळतात. प्रामुख्याने हे रोग गर्भिणी स्त्रीमध्ये सापडतात. म्हणून त्यांचे वर्णन प्रथम केलेले आहे.

हृल्लास व शोष ही दोनही लक्षणे गर्भिणीमध्ये तीव्र स्वरूपाने ज्या वेळी दिसतील त्याच वेळी त्यांना रोगवाचक संज्ञा म्हणजेच उपद्रव म्हणावे. व ज्या वेळी ही दोनही लक्षणे गर्भिणीला सहन करण्याजोगी असतील त्या वेळी ती लक्षणे मानावीत (व लाक्षणिक चिकित्सा करावी). त्यावर हारिताने पुढीलप्रमाणे चिकित्सा सांगितली आहे.

वडाचे कोंब, पिंपळी, वाळा, नागरमोथे यांच्या चूर्णाची साखरेबरोबर गोळी करून तोंडात धरावी.

कुडा, पिंपळी, सुंठ, आमलकी, कोवळे बेलफळ, यांचे चूर्ण दह्यामध्ये घालून व त्यात साखर टाकून ते सेवन करावे.

काडेचिराईत व साखर समभाग घेऊन, वा मधाबरोबर सेवन केली असता छर्दी व हृल्लास ही लक्षणे कमी होतात.

सुंठ, त्रिकटू, महाळुंगाचे केसर यांच्या चूर्णाचा गरम पाण्यात गण्डूष केला असता, किंवा या चूर्णाने दात व जीभ घासली तर अरुचीचा नाश होतो.

१ शोषहृल्लासच्छर्दीश्चशोफज्वरस्तथारुचिः ।
अतिसारो विवर्णत्वं अष्टौ गर्भोपद्रवाः स्मृताः ॥ हारितसंहिता, पान ४५१

– वक्ष्यामि भेषजं तस्य यथायोगेन साम्प्रतम् । वटप्ररोहं मगधामुशीरं घनमेव च ॥ युता खण्डगुटिकास्ये विहिता शोषवारिणी । वत्सकं मगधाशुण्ठी तथा चामलकी-फलम् ॥ हारितसंहिता गर्भोद्रवचिकित्सा, अध्याय ५१, पान ४५०–५१



कुडा, डाळिंब, पहाडमूळ, कोवळे बेलफळ, बला, जांभूळ व आंबा यांची पाने यांतील मिळतील ती औषधे एकत्र करून दही–साखरेबरोबर अतिसाराकरिता घ्यावीत.

हिरडे, सुंठ किंवा त्रिफळेचा काढा गार करून त्यात गूळ घालून तो प्राशन केला असता विबंध दूर होतो. काकडीचे बी, वाळा, पिंपळी, पाषाणभेद व साखर ही द्रव्ये तांदुळाच्या धुवणाबरोबर दिली असता व्यवस्थित मूत्रप्रवृत्ती होते.

## १. गर्भोपद्रव–छर्दी

[1]**व्याख्या** : उचंबळून आलेल्या दोषांनी मुख हे भरले जाते आणि दोषांच्या वेगामुळे सर्व शरीर वेदनांनी व्याप्त होते; म्हणून या व्याधीला छर्दी असे म्हणतात. यात दोष मुखावाटे बाहेर पडतात.

स्वभाव— दारुण.

मार्ग— अभ्यंतर.

[2]प्रकार— वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक व द्विष्टार्थजा (नको ते प्राप्त झाल्यामुळे झालेली) असे छर्दीचे पाच प्रकार आहेत.

हे पाचही प्रकार गर्भिणी–छर्दीमध्ये आढळतात.

[3]**कारणे** : अतिशय पातळ, अतिस्निग्ध, न आवडणारे, फार खारट, असे पदार्थ

– युक्तं कोमलबिल्वेन दध्ना पिष्टं तु दापयेत् । शर्करासंयुतं पानं स्त्रीणां गर्भे हितं सदा । पीतो भूनिम्बकल्कश्च शर्करा समभावितः । छर्दि हरेच्च हृल्लेदं मधुना वा समन्वितः । शृङ्गवेरं सकटुकमातुलुङ्गस्य केशरम् ! मार्जनं दन्तजिह्वासु गण्डूषश्चोष्णवारिणा । गुर्विणीनाञ्च सर्वासामरुचिं च नियच्छति । वत्सकं दाडिमं पाठा बिलबिल्वबलास्तथा । जम्ब्वाम्रपल्लवाश्चैव तथा लाभेन सत्तम । शर्करा-दधिसंयुक्तं स्त्रीणाञ्चैवातिसारके हरीतकी नागरकं गुडेन वा त्रिफलाक्वाथः । शीतः स्त्रीणां विनिहन्ति पाने पाने विबन्धविद्रधींश्च । मूत्रविबन्धनस्य त्रपुसैर्वा-रिबीजानि मागधी । शिलाभेदं सिताढ्यञ्च पिबेत्तण्डुलवारिणा । मूत्ररोधं गुर्विणीनां वारयत्याशु निश्चितम् । हारितसंहिता गर्भोपद्रवचिकित्सा, अध्याय ५१, पान ४५०–५१

१ छादयान्ननं वेगैरर्दयन्नङ्गभञ्जनैः । .........दोषो वक्राद्विनिश्चरन् ॥
छर्दिनिरुक्तिमाह.........मुखं गत इति व्याख्यानयन्ति । सटिक सु. उ. ४९–६

२ छर्दिर्दोषैः पृथक्सर्वै द्विष्टैरर्थैश्च पञ्चमी ।
पृथक् प्रत्येकं, दोषैः.........एकैक छर्दिरित्युक्तम् । सटिक वा. नि. ५–३०

३ अतिद्रवैरतिस्निग्धैरहृद्यैर्लवणैरति ।.........संभवो ध्रुवम् ॥
(बीभत्सैर्हेतुभिश्चान्यैर्द्रुतमुत्क्लेशितो बलात् ॥ ).........

सेवन करणे, अयोग्य वेळी पुष्कळ प्रमाणात अति त्वरेने (गपागप) व नेहमी सवयीचे नसलेले, न सोसणारे पदार्थ खाणे, श्रम, भय, उद्वेग (शारीरिक, मानसिक क्षोभ), अजीर्ण, कृमी, **गर्भदोष** आमाधिक्य, आणि बीभत्स दर्शन या कारणांनी छर्दी हा व्याधी उत्पन्न होतो.

**संप्राप्ती** : व्यान आणि उदान हे गर्भदोषामुळे प्रकुपित झालेल्या कफपित्त दोषांना मुखावाटे बाहेर टाकतात. कफ व पित्त प्रकुपित झाल्यानंतर कफाच्या व पित्ताच्या तीक्ष्णोष्ण सर्व गुणांनी आमाशयाचा क्षोभ होतो. त्यामुळे वायूच्या गती-मध्ये विलोमता उत्पन्न होऊन आमाशयस्थ दोष व्यानोदानाच्या प्रेरणेने ऊर्ध्वगती होऊन छर्दी हा व्याधी उत्पन्न करतात.

आमाशयाचा क्षोभ जसजसा वाढत जाईल तसतसे कफपित्तांचे उदीरण अधि-काधिक होत जाते. कफ, पित्त हे द्रव धातू असल्याने त्यांच्या बहिर्मार्गगमनाने आप्धातूही क्षीण होतो. रस व कफांच्या दुष्टीमुळे प्रसेक, हृल्लास, उत्क्लेश ही लक्षणे जरी होत असली तरी पित्तामुळे त्यांच्या संचयाचे प्रमाण अधिक वाढते आणि वाताच्या विगुणतेने छर्दी उत्पन्न होते.

[1]**पूर्वरूपे** : हृल्लास, ढेकर साफ न होणे, तोंडाला पाणी सुटणे, त्याची चव खारट

छर्देर्हेतुमाह–अतिद्रवैरित्यादि ।....अहृद्यैः अप्रियैः । उद्वेग उद्वेजनम् । आपन्नसत्त्वाया गर्भिण्याः । अतिद्रुतम् अतिशीघ्रम् । ............केचित् 'अत्यन्तामपरीतस्य' इत्यत्र 'बीभत्सैर्हेतुभिश्चान्यैः' इति पठन्ति, पूयामेध्यादि–दर्शनगन्धास्वादघृणा-करैरिति च व्याख्यानयन्ति । सटीक सु. उ. ४९–३ ते ५

– दोषानुदीरयन् वृद्धानुदानो व्यानसङ्गतः ।
ऊर्ध्वमागच्छति भृशं विरुद्धाहारसेवनात् ॥
छर्दि संप्राप्तिमाह—दोषानुदीरयन्नित्यादि ।
व्यानसङ्गतः व्यानेन सह एकीभूतः उदानः, विरुद्धाहारसेवनात् विरुद्धानामाहाराणां सेवनात्, वृद्धान् प्रकुपितान् दोषानुदीरयन् भृशमूर्ध्वमागच्छतीति संबन्धः । केचित् 'इरयन्, श्लेष्मपित्ते तु उदानो व्यानसंगतः । ऊर्ध्वमागच्छति रसो विरुद्धाहार-सेविनाम्' इति पठन्ति, तं च कार्तिककुण्ठो नेच्छति, यतो, 'दोषो वक्त्रं प्रधावित इत्यनेन गतार्थं तथा रससहितस्य च दोषस्योर्ध्वगमनं रजदोषजत्वेन छर्द्याः पठितत्वेन सिद्धम् । सटीक सु. उ. ४९–७

– आमाशयोत्क्लेश भवा हि सर्वाश्छर्दयो मता । च. चि. २०–२०

१ हृल्लासोद्गाररोधौ च प्रसेको लवणस्तनुः । द्वेषोऽन्नपाने च भृशं वमीनां पूर्वलक्षणम् ।
मा. नि. छर्दी ५, पान १५६ म. टीकेसह
ताल्वोष्ठकण्ठास्यविशोषदाहसंतापमोहभ्रमविप्रलापाः । .... तु विशेषतो हि ।
मा. नि., तळटीप, पान १५६



असणे, खाणे-पिणे नकोसे वाटणे ही लक्षणे छर्दीच्या पूर्वरूपात होतात. तालू, ओठ, कंठ, मुख कोरडे पडणे, दाह, संताप, मोह, भ्रम, प्रलाप ही लक्षणे छर्दी उत्पन्न होण्याच्या वेळी पूर्वरूपे म्हणून होतात असे म्हटले आहे.

**रूपे** : वरील पूर्वरूपातील लक्षणे अधिक व्यक्त झाली म्हणजे त्यांना रूपे मानावीत.

[1]**वातज छर्दी** : व्यायाम, तीक्ष्ण अशी औषधे, शोक, निरनिराळे रोग, भय, उपवास अशा कारणांनी क्षीण झालेल्या व्यक्तीमध्ये वायू संचित होतो. महास्रोतसां-मध्ये त्याचा प्रकोप होऊन तो तेथे उत्क्लेश निर्माण करतो आणि दोषांना (आम, कफ व पित्त) मुखावाटे बाहेर फेकतो.

आमाशयाचा उत्क्लेश होतो. त्यामुळे दोष अधिकाधिक स्रवतात. हृदयाला पीडा होते व छर्दीचे वेग वाढत जातात.

हृत्शूल, पार्श्वशूल, मुखशोष, शिरःशूल, नाभी-मागी शूल, कास, स्वरभेद, शरीरामध्ये टोचल्यासारख्या वेदना, ओकारीच्या वेळी ओकण्याचा मोठा आवाज येणे, होणाऱ्या ओकारीचे स्वरूप फेसकट, चोथापाणी, तुरट चवीचे, पातळ, काळसर असे असते. ओकारी होताना फार कष्ट होतात. (मोकळेपणाने ओकारी होत नाही.) वेग पुष्कळ मोठा येतो असे वाटते. वेग वरचेवर येतो पण प्रत्यक्ष ओकारी मात्र अल्पशी होते. रोगी थकून जातो. ओकारीचे वेग अन्न पचल्यानंतरच्या काळात अधिक येतात.

[2]**पित्तज छर्दी** : कटू, आंबट, विदाही, उष्ण अशा द्रव्यांचे अजीर्ण झाले असता पित्त प्रकुपित होऊन आमाशयात वेगाने उदीरत होते. प्रकुपित झालेल्या पित्तामुळे केवळ आमाशयाचाच नव्हे तर रसवह स्रोतसाचासुद्धा क्षोभ होतो. हृदय पीडिले जाते. दोषांचा उत्क्लेश होतो आणि ओकारी होते.

मूर्च्छा, तृष्णा, मुखशोष, शिरोदाह, टाळूची व डोळ्यांची आग होणे, अंधारी येणे व चक्कर येणे, घशात, छातीत जळजळणे, तोंड कडू होणे, ज्वर येणे अशी लक्षणे होतात.

१ व्यायामतीक्ष्णौषध........वेगेनार्तोऽनिलाच्छर्दयतीह दुःखम् ॥ च. चि. २०–९

– प्रच्छर्दयेत् फेनिलमल्पमल्पं शूलार्दितोऽभ्यर्दितपार्श्वपृष्ठः ।
श्रान्तः संघोषं बहुशः कषायं जीर्णेऽधिकं साऽनिलजा वमिस्तु ॥ सु. उ. ४९–९

– अजीर्णकट्वम्ल विदाह्यशीतैरामाशये पित्तमुदीर्णवेगम् ।
रसायनीभिर्विसृतं प्रपीड्य मर्मोर्ध्वमाषस्य वमिं करोति ॥
मूर्च्छापिपासामुखशोषमूर्ध्वताल्वक्षिसंतापतमोभ्रमार्तः ।
पीतं भृशोष्णं हरितं सतिक्तं धूम्रं च पित्तेन वमेत् सदाहम् ॥ च. चि. २०–१० ते ११

२ सोऽम्लं भृशं वा कटुतिक्तपीतं सरक्तं हरितं वमेद्वा ।
सदाहचोषज्वरवक्त्रशोषो मूर्च्छान्वितः पित्तनिमित्तजा सा ॥ सु. उ. ४९–१०

उलटीचे स्वरूप पिवळे, हिरवट पिवळे, भुरकट रक्तयुक्त, आंबट, कडू, तिखट, दाह करणारे व क्षार मिसळलेल्या पाण्याप्रमाणे असते. उलटीचे प्रमाण खूप असते व त्यातील द्रव पातळ असतो.

## [1]कफज छर्दी :

अति स्निग्ध, अति गुरू, अति मधुर असे पदार्थ व कच्चे ( आम ) अन्न सेवन करणे, फार झोप घेणे ( दिवसा ), यांनी कफाचा प्रकोप होतो. प्रकुपित कफामुळे उर, शिर, हृदय व रसवह स्रोतसे ही पीडित होऊन दोषांचे आमाशयांमध्ये उदीरण होते आणि छर्दी होते.

तोंड गोड होणे, डोळ्यांवर झापड असणे, तोंडाला पाणी सुटणे, भूक मुळीच नसणे, तोंडाला चव नसणे, अंग जड होणे, झोप फार येणे, मुखशोथ, हृल्लास, कास अशी लक्षणे असतात.

ओकारीचे स्वरूप स्वच्छ, पांढरे, घन, चिकट, तंतुयुक्त, खारट, मधुर असे असते. ओकारीच्या वेळी वेदना होत नाहीत. (सहज होते.) ओकारीचे प्रमाण पुष्कळच असते.

## [2]सान्निपातिक छर्दी :

पथ्यकर व अपथ्यकर असे सर्व प्रकारचे व सर्व दोषांना प्रकुपित करणारे अन्न मिसळून सतत खाण्यात आल्यामुळे, अजीर्ण झाल्यामुळे किंवा ऋतुविपर्ययामुळे तीनही दोष एकदम प्रकुपित होऊन त्रिदोषज छर्दी उत्पन्न करतात.

अरुची, अन्न न पचणे, शूल, दाह, तृष्णा, श्वास, मोह ही लक्षणे बलवान असतात.

छर्दीचे स्वरूप निळसर, घन, खारट, आंबट, रक्तयुक्त व उष्ण असे असते.

## [3]द्विष्टार्थजा छर्दी :

तिटकारा असणारे, विरुद्ध व न सोसणारे, अपवित्र, नासलेले, घाणेरडे किळसवाणे

---

१ स्निग्धातिगुर्वामविदाहिभोज्यैः......सलोमहर्षोऽल्परुजं वमेत्तु । च. चि. २०–१२
– यो हृष्टरोमा मधुरं......... वमेद्वमी सा कफकोपजा स्यात् । सु. उ. ४९–११
– कफात् स्निग्धं घनं शीतं श्लेष्मतन्तुगवाक्षितम् । मधुरं लवणं भूरि प्रसक्तं लोमहर्षणम् ।। मुखश्वयथुमाधुर्यतन्द्राहृल्लासकासवान् । वा. नि. ५–३४, ३५
२ समश्नतः सर्वरसान्.......... वमतां नृणां स्यात् ।।
समश्नत इत्यादिना त्रिदोषजामाह । .......... आमस्य प्रदोषः आमप्रदोषः ।
सटीक च. चि. २०–१४, १५
३ द्विष्टप्रतीपाशुचिपूत्यमेध्यबीभत्सगन्धाशनदर्शनैश्च ।
यच्छर्दयेत्तप्तमना मनोघ्नैर्द्विष्टार्थसंयोगभवा मता सा ।। सटीक च. चि. २२–१८



असे पदार्थ वा असा वास सेवन करावा लागला, वा असे पदार्थ नुसते पुढे आले तरी मनाला उबग येतो. आणि त्याचा परिणाम म्हणून छर्दी उत्पन्न होते. पदार्थ पुढे आले वा काही खाल्ले तरी मनाने एकदा घेतलेल्या किळशीने ओकारी होत राहते.

या छर्दीमध्ये अन्नद्वेष, अरुची ही लक्षणे विशेष असतात.

## [1]आगन्तुजा छर्दी :

कारणानुरूप छर्दीचे काही वेगळे प्रकार उल्लेखिलेले आहेत. कृमिज, तृष्णाज, आमज, दौहृदज, यांमध्ये वातादी दोषांचीच लक्षणे दिसतात. त्यामुळे वातादी प्रकारांमध्येच या प्रकाराचा समावेश वस्तुतः होतो. काही टीकाकारांनी आगन्तू असा पाचवा वर्ग करून त्यामध्ये द्विष्टार्थज व कृमिजादी प्रकारांचा समावेश केला आहे.

कृमी, आमोत्पत्ती, सगर्भावस्था, सात्म्यत्याग या कारणांनी दोषांचा प्रकोप आरंभी होतो व मग छर्दी होते. असे स्पष्ट असताना या प्रकारांचा समावेश आगन्तू मध्ये करणे योग्य नाही, असे आम्हास वाटते. द्विष्टार्थजा छर्दीस तेवढे आगन्तू छर्दी म्हणता येईल.

कृमिज छर्दीमध्ये शूल, कंप, हृल्लास, या लक्षणांसवेच कृमिज हृद्रोगात सांगितलेली अरुची, शोथ, तोद, मिष्ठीवन, उत्क्लेष, श्यावनेत्रत्व ही लक्षणेही होतात. वर जी छर्दीची कृमी इत्यादी कारणे सांगितलेली आहेत त्यांमध्ये दोषप्रकोप अमुक एक प्रकारचाच असेल असे नाही. तीनही दोषांपैकी एक वा अधिक दोष प्रकुपित होणे शक्य आहे.

[2]उपद्रव : कास, श्वास, ज्वर, हिक्का, तृष्णा, मन अस्वस्थ होणे, हृद्रोग व अंधारी येणे हे रोग छर्दीचे उपद्रव म्हणून होतात.

---

१ बीभत्सजा दौर्हृदजाऽमजा च असात्म्यजा च क्रिमिजा च या हि ।
सा पञ्चमी तां च विभावयेच्च दोषोच्छ्रयेणैव यथोक्तमादौ ।।
– म. आगन्तुजामाह–बीभत्सजेत्यादी । दौर्हृदजा दौर्हृदालाभजा,....... पूयामेध्यादिदर्शनगन्धस्वादजा, आपन्नसत्त्वाया स्त्रिया दौर्हृदालाभजा, आमजाअजीर्णजा......
आदाविति पूर्वोक्तेन । मा. नि. छर्दी १२, पान १५५ आ. टीकेसह
– वातादीनेव विमृशेत्कृमितृष्णामदौहृदे । शूलवेपथुहृल्लासैर्विशेषात् कृमिजां वदेत् ।।
कृमिहृद्रोगलिङ्गैश्च ।
कारणे कार्योपचारात्... । कृमितृष्णामामगर्भिणीदौहृदजे छर्दिषि...... लक्षयेत् ।
एवं तृष्णामदौहृदच्छर्दिषि वातादीन्......कृमिजां वदेत् ।
सटीक वा. नि. ५–३७, ३८, पान ४८२
२ कासश्वासो ज्वरतृष्णा हिक्का वैचित्यमेव च ।
हृद्रोगस्तमकश्चैव ज्ञेयाश्छर्देरुपद्रवाः । वंगसेन छर्दी ७२, पान २: -

**व्याधिमुक्तीची लक्षणे** : उर व आमाशय यांत लाघव उत्पन्न होणे, रुची येणे, भूक लागणे, ढेकर साफ येणे, उत्क्लेश, हृल्लास नाहीसे होणे, नेहमीचे अन्न घेतले असता ते न उलटणे या लक्षणांनी रोगी रोगमुक्त झाला असे समजावे.

## साध्यासाध्य विवेक :

छर्दीच्या संप्राप्तीतील वाताचा प्रकोप होऊन अन्नवह व रसवह स्रोतसांसवेच पुरीषवह, स्वेदवह व मूत्रवह स्रोतसे दुष्ट होऊन मार्गांचा रोध होतो. मलसंचय वाढू लागतो आणि कोष्ठातून या दोषांचे छर्दीच्या रूपाने उदीरण होते. छर्दीला मलमूत्रासारखी घाण येते. तृष्णा, श्वास, हिक्का असे अत्यंत त्रासदायक उपद्रव होतात. छर्दीचा वेग व प्रमाण अतिशय वाढते. अशा स्थितीत व्याधी असाध्य होतो.

रोगी क्षीण होणे, छर्दी फार वाढणे, छर्दीबरोबर रक्त-पूय पडणे, छर्दीतून मेदादी दुष्टीमुळे एक प्रकारचा स्निग्ध पदार्थ पडणे व त्यावर पाण्यावर पडलेल्या तेलाच्या तवंगाप्रमाणे निरनिराळ्या रंगांच्या छटा दिसणे, ही लक्षणे छर्दीच्या असाध्यतेची द्योतक आहेत. अतिवेग, श्रम, दौर्बल्य, मूर्च्छा ही लक्षणे नसली वा कासादी उपद्रव झाले नाहीत तर छर्दी हा व्याधी साध्य असतो.

## चिकित्सा :

आमाशयाचा उत्क्लेश होऊन छर्दी उत्पन्न होते. आमाशयदुष्टी हा छर्दीच्या संप्राप्तीतील एक महत्त्वाचा घटक असतो. त्यामुळे एकांत-वातज छर्दी वगळून बाकी सर्व प्रकारच्या छर्दी रोगांत प्रथम लंघन द्यावे आणि नंतर कफपित्ताचे शोधन करणाऱ्या उपचारांचा अवलंब करावा. त्यासाठी हरितकीचे चूर्ण व मध किंवा द्राक्षा, आरग्वध, त्रिवृत् यांनी युक्त असे हृद्य विरेचन द्यावे. अनुलोमन गुणांची मद्ये वापरावीत. किंवा अनुलोमनासाठी सिद्ध दूध द्यावे.

[ उत्क्लेश व कफप्राधान्य असल्यास कडू दोडका व पडवळ याने वमन द्यावे. ]

– विट्स्वेदमूत्राम्बुवहानि वायुः स्रोतांसि संरुध्य यदोर्ध्वमेति ।
उत्सन्नदोषस्य समाचितं तं दोषं समुद्धूय नरस्य कोष्ठात् ॥
विण्मूत्रयोस्तत्समगन्धवर्णं तृट्श्वासहिक्कार्तियुतं प्रसक्तम् ।
प्रच्छर्दयेद्दुष्टमिहातिवेगात्तयार्दितश्चाशु विनाशमेति ॥

मा. नि. छर्दी १०, ११, म. टीकेसह, पान १५४–५५

– क्षीणस्य या छर्दिरतिप्रसक्ता सोपद्रवा शोणितपूययुक्ता ।
सचन्द्रिकां तां प्रवदेदसाध्यां साध्यां चिकित्सेन्निरुपद्रवां च ॥

मा. नि. छर्दी १४, पान १५६, आ. टीकेसह



रोगी शोध न नकरण्यासारखा दुर्बल असल्यास किंवा रोगनिराम असल्यास मनाला आवडतील असे निरनिराळे रस, फळांचे रस, लघू व कोरडे अन्न व स्निग्ध जल असे पदार्थ शमनासाठी वापरावे.

काळ्या मातीचे खापर चांगले लाल तापवून ते पाण्यामध्ये विझवावे. अशी क्रिया कमीत कमी ५–६ वेळा तरी करावी व नंतर ते पाणी गार करून प्यावे.

अतिशय झालेल्या ओकारीमुळे धातुक्षय होऊन वातवृद्धी होते. अशा वेळी स्तंभन व बृंहण अशी चिकित्सा करणे आवश्यक असते. यासाठी सिद्ध केलेले दूध, मांसरस, नारळाचे पाणी, लिंबाचे सरबत, लाजमंड, फलरस, आवळ्याचा रस, जीवनीय घृते, च्यवनप्राशावलेहासारखे वृष्य लेह यांचा उपयोग करावा.

**कल्प** : द्राक्षा, मधू, आमलकी, शुण्ठी, आर्द्रक, शंखभस्म, शौक्तिकभस्म, मौक्तिक-भस्म, मयूरपिच्छामशी.

त्रिफळा, प्रवाळ पंचामृत, सूतशेखर, हृद्यविरेचनक्वाथ, मृद्भृष्टजल.

**आहार** : लिंबू, ताक, मुद्गकुलत्थ-यूष, द्राक्षा, दाडिम, मोसंब यांचा रस. लिंबू-सरबत, कोरडी भाकरी, लाह्या आणि फुटाणे.

**अपथ्य** : स्निग्ध, गुरू, विदाही वर्ज्य.

प्रत्यक्षामध्ये छर्दी हे लक्षण वा उपद्रव गर्भिणी अवस्थेमध्ये पहिल्या तीन ते चार महिन्यांपर्यंतच जास्त प्रमाणात आढळून येते व नंतर ते लक्षण वा उपद्रव हळूहळू कमी कमी होत जाताात; व सहाव्या महिन्यापर्यंत संपूर्णतः नष्ट होते. कारण पहिले तीन महिने गर्भिणीच्या शरीराला गर्भाच्या अस्तित्वाचे सात्म्य नसते. या कालात गर्भाचे पोषण मातेच्या आहाररसाद्वारेच होत असते. व या वेळी फक्त सूक्ष्म पचनच सुरू असते. या सूक्ष्म पचनातील उत्पन्न होणाऱ्या मलांची (म्हणजे वात, पित्त, कफ दोषांची) देवाण-घेवाण गर्भ व गर्भिणी यांत चालू असते. त्यामुळे गर्भिणीच्या शरीरामध्ये गर्भदोष उत्पन्न होऊन छर्दीची उत्पत्ती घडते.

– आमाशयोत्क्लेशभवा हि सर्वाश्छदर्यो मता लङ्घनमेव तस्मात् ।
प्राक्कारयेन्मारुतजां विमुच्य संशोधनं वा कफपित्तहारि ॥
चूर्णानि लिह्यान्मधुनाऽभयाना हृद्यानि वा यानि विरेचनानि ।
मद्यैः पयोभिश्च युतानि युक्त्या नयन्त्यधो दोषमुदीर्णमूर्ध्वम् ॥
वल्लीफलाद्यैर्वमनं पिबेद्वा यो दुर्बलस्तं शमनैश्चिकित्सेत् ।
रसैर्मनोज्ञैर्लघुभिर्विशुष्कैर्भक्ष्यैः सभोज्यैर्विविधैश्च पानैः ॥
आमाशयेत्यादिना........विषमान् तत् संशमनमुच्यते ” इति ।

सटीक च. चि. २०–२० ते २२

गर्भिणीमध्ये चवथ्या महिन्यापासून गर्भाच्या अवयवांच्या वाढीस सुरुवात होते; व यामध्ये सूक्ष्म पचनात जे उत्पन्न होणारे वातपित्तकफ दोष यांच्याही आशयांची वाढ होऊ लागते व ते दोष गर्भामध्ये स्वस्थानी प्रविष्ट होऊ लागतात. त्यामुळे साहजिकच त्यांचे गर्भिणीच्या शरीरातील अस्तित्व कमी होऊ लागते. त्यामुळे गर्भिणीच्या शरीरातील गर्भदोषांचे प्रमाणही कमी होते. म्हणून छर्दी हे लक्षण वा उपद्रव गर्भिणीच्या पुढच्या काळामध्ये कमी वा नष्ट झालेले आढळते. मात्र क्वचित स्त्रियांमध्ये हे लक्षण वा उपद्रव नऊही महिने आढळून येते.

गर्भिणीमध्ये छर्दीचे तीव्र वेग ( कोणताही पदार्थ खाल्ला असता तो पोटात न ठरता तो छर्दीवाटे बाहेर पडतो. पाणीसुद्धा पचत नाही.) असताना तीव्र रसक्षयाची लक्षणे दिसू लागतात. उदाहरणार्थ, नाडी वेगवती होते, दुर्बल होते, क्षीण होते. अतिदौर्बल्य, शोष, श्वास, त्वचेच्या ठिकाणी रूक्षता उत्पन्न होते. शेवटी तंद्रा, डोळे खोल जाणे, मूत्रक्षय, मूत्रविबंध व मलावष्टंभ ही लक्षणे होतात. त्या वेळी छर्दी हा उपद्रव समजून रसक्षयावरील चिकित्सेस प्राधान्य द्यावे. त्याकरिता झालेल्या धातुक्षयाकरिता आप् धातूची द्रव्ये मुखाने वा अन्य मार्गाने– साक्षात् सिरांमार्फत द्यावीत. विशेष चिकित्सा वर उद्धृत केलेली आहेच.

ज्या वेळी गर्भिणीला छर्दी असून रसक्षयाची लक्षणे तिच्या शरीरावर दिसत नसतील त्या वेळी छर्दी हे दौहृदाचे लक्षण मानून चिकित्सा करावी. केवळ पित्ताचा द्रवगुण वाढलेला आहे असे समजूनच चिकित्सा करावी. या वेळी वाताची झालेली ऊर्ध्वगती ही मलावष्टंभ दूर करून अनुलोम करावी व शमन चिकित्सा करावी. (वरीलप्रमाणे.)

## २. गर्भोपद्रव–ज्वर

**व्याख्या :**

ज्वरयति, संतापयति, शरीराणि इति ज्वर।

च. नि. १–४०

देह आणि मन यांचा संताप होतो; ते तापतात; म्हणून तापणे अशा अर्थाने ज्वर शब्द रोगवाचक रूढ झाला आहे.

**स्वभाव :**

ज्वर हा सर्व व्याधींमध्ये प्रमुख असून त्याचा स्वभाव दारुण आहे. त्यामुळेच त्याला पाप्मा (पातके करणारा), मृत्यू, ओजोशन (शरीरातील सारभाग जे ओज त्याचे भक्षण करणारा), अंतक (आयुष्याचा शेवट करणारा), क्रोध (मनाचे स्वास्थ्य नाहीसे करणारा), अशी नावे प्राप्त झाली आहेत.



दक्ष यज्ञाचा विध्वंस करणारा आणि शंकराच्या कपाळावरील तिसऱ्या डोळ्यांतून उत्पन्न झालेला ही दोन विशेषणे पुराणकथेच्या संदर्भामध्ये ज्वर-व्याधीला प्राप्त झाली आहेत.

पुराणाने त्याच्या उग्रतेचे स्वरूप लक्षात येण्यासाठी त्याची मूर्त अशी आकृती कल्पिली आहे.

ज्वरस्त्रिपादस्त्रिशिराः षड्भुजो नवलोचनः।
भस्मप्रहरणो रौद्रः कालान्तकयमोपमः॥

मा. नि. ज्वर १ म. टीका

प्राणिमात्रांच्या जन्ममृत्यूच्या काळी मोहरूपाने त्यांचे अस्तित्व असते त्यामुळेच पूर्वजन्म व पुनर्जन्म यांचे ज्ञान जीवाला होत नाही असे मानतात. ज्वर हा इतर प्राणिसृष्टीमध्येही होतो. त्यांची नावेही अरुणदत्ताने व माधवाचा टीकाकार (मधुकोश) विजयरक्षित यांनी सांगितली आहेत. त्यांच्या नावामध्ये मात्र काही ठिकाणी मतभेद आहेत.

इतर जीवसृष्टी त्यांच्या त्यांच्या जातीतील ज्वर या व्याधीला सहन करू शकत नाही. मनुष्य मात्र ज्वर सहन करू शकतो. संताप होणे हे त्याचे स्वरूप असून अपचारामुळे, अपथ्यामुळे हा व्याधी उत्पन्न होतो.




आकृती ३६ : ज्वरमापक यंत्र

**मार्ग :**

अभ्यंतर मार्ग.

**[1] प्रकार :**

ज्वर हा आठ प्रकारचा आहे. वातज, पित्तज, कफज, वातपित्तज, वातकफज व कफपित्तज, सान्निपातिक आणि आगन्तू.

**[2] कारणे :**

स्नेह-स्वेद व वमनादी पंचकर्मे यांचा वापर अयोग्य रीतीने होणे, निरनिराळ्या

१ दक्षापमानसंक्रुद्धरुद्रनिःश्वाससंभवः।
ज्वरोष्टधा पृथग्द्वन्द्वसंघातागन्तुजः स्मृतः॥ मा. नि. ज्वर १

२ दोषाः प्रकुपिताः स्वेषु कालेषु स्वैः प्रकोपणैः।
व्याप्य देहमशेषेण ज्वरमापादयन्ति हि॥ सु. उ. ३९–१५–१५

प्रकारचा मार लागणे, आघात होणे, विद्रधीसारखे विकार होणे, शरीरामध्ये प्रपाक (पूयप्रवृत्ती) होणे, अतिश्रम करणे, धातुक्षय होणे, अजीर्ण, विषसेवन, असात्म्य-सेवन, ऋतुप्रविपर्यय, विषयुक्त औषधी-गंध व विषयुक्त पुष्पांचे गंध, शोक, भय, कामक्रोधाने मनोदुष्टी, विषमप्रसूती, सूतिकेचे विषमोपचार, स्तन्योत्पत्ती या कारणांनी वा निरनिराळ्या प्रकारे दोषांना प्रकुपित करणाऱ्या इतरही कारणांनी दोष प्रकुपित होऊन ज्वर उत्पन्न करतात. नक्षत्र-ग्रहादींची बाधा, अभिचार, अभिशाप, भूतबाधा या कारणांनीही ज्वर उत्पन्न होतो असे काही लोक मानतात.

## [1] सम्प्राप्ती :

प्रकुपित झालेले दोष आमाशयामध्ये येतात आणि ग्रहणीमधील अग्नीशी मिसळून अग्निमांद्य उत्पन्न करतात. अग्निमांद्यामुळे आहारातून परिणत होणारा आहाररस आमस्वरूपामध्ये उत्पन्न होतो. दोष हे त्या आमरसासह शरीरात प्रवेश करतात. ग्रहणीवर परिणाम होऊन तेथील पाचकाग्नीही रसासह संचार करणाऱ्या दोषांबरोबर आपल्या स्थानातून बाहेर खेचला जातो व तोही दोषासवे रसानुग होऊन सर्व शरीरात संचार करतो. त्यामुळे शरीराचे उष्णतामान नेहमी असते त्यापेक्षा दोषदृष्टीच्या प्रमाणात पुष्कळच अधिक वाढते. या उष्णतेने सर्व शरीर, इंद्रिये व मन यांचा संताप होतो. सामदोषांमुळे रसवह व स्वेदवह स्रोतसांचा रोध होऊन कोंडलेल्या संतापाची तीव्रता अधिक होते व ज्वर हा व्याधी उत्पन्न होतो.

हारिताने रक्ताची दुष्टी ही ज्वराच्या संप्राप्तीचे एक कारण मानले असून दोष रक्ताश्रित होऊन ज्वर उत्पन्न करतात असे म्हटले आहे.

## पूर्वरूपे :

आळस, अस्वस्थता, अंग जड होणे, तोंडाची चव जाणे, पदार्थाची चव न कळणे, डोळ्यांना पाणी येणे, डोळे व्याकुळ होणे (त्रासिक होणे, उजेड सहन न होणे, वाचू नयेसे वाटणे), अंग दुखणे, अन्न न पचणे, श्वासोच्छ्वास कष्टाने होणे, झोप फार येणे, अंगावर रोमांच उभे राहणे, अंग वाकणे, पोटऱ्या वळणे, थकवा येणे, हिताचे सांगणेही सहन न होणे, आंबट, तिखट, खारट खावेसे वाटणे, गोड नकोसे वाटणे, लहान मुलांचा त्रास वाटणे, तहान फार लागणे; शब्द, अग्नी, शीत, वात, जल, छाया, उष्णता या गोष्टी कारणावाचून वरचेवर हव्याशा किंवा नकोशा वाटणे, अंग कापणे व चक्कर येणे, बडबडणे, झोप येणे, दात आंबणे, अशक्तता वाटणे, अंग गळून जाणे, कोणत्याही कामात रेंगाळणे, केलीच पाहिजे अशी कामे न करणे, आपल्याच कार्यांना अडथळा आणणे, शरीर-प्रसाधन वा जेवण यांचा त्रास वाटणे, अंधारी येणे, थंडी वाजणे, शरीराचा वर्ण निस्तेज होणे, स्वभावात थोडा पालट होणे ही लक्षणे ज्वराच्या पूर्वरूपांमध्ये दिसतात.

[1]वातज्वराच्या पूर्वी जांभया येणे, पित्तज्वराच्या पूर्वी डोळ्यांची जळजळ होणे; आणि कफज्वरापूर्वी अन्नाची अभिलाषा मुळीच नसणे, अशी विशेष स्वरूपाची पूर्वरूपे होतात.

## [2] रूपे :

ज्वराच्या सामान्य लक्षणांमध्ये देह, इंद्रिये व मन यांच्या संतापाची लक्षणे दिसतात. घाम येत नाही. अंग तापते, सगळे अंग कचकचते, तोंडाची चव जाते. तहान

---

– मिथ्यातियुक्तैरपि च स्नेहाद्यैः कर्मभिर्नृणाम् । ......स्त्रीणामपप्रजातानां प्रजातानां तथाऽहितैः । स्तन्यावतरणे चैव ज्वरो दोषैः प्रवर्तते ॥

–सटीक सु. उ. ३९–१९ ते २२

१ दुष्टाः स्वहेतुभिर्दोषाः प्राप्यामाशयमूष्मणा । सहिता रसमागत्य रसस्वेदप्रवाहिणाम् ॥ ...............जनयन्त्यथ वृद्धिं वा स्ववर्णं च त्वगादिषु ॥

सु. उ. ३९–१६ ते १८

– तस्य प्राग्रूपमालस्यमरतिर्गात्रगौरवम् । आस्यवैरस्यमरुचिर्जृम्भा सास्राकुलाक्षिता ॥ अङ्गमर्दोऽविपाकोऽल्पप्राणता बहुनिद्रता । रोमहर्षो विनमनं पिंडिकोद्वेष्टनं क्लमः ॥ हितोपदेशेष्वक्षान्तिः प्रीतिरम्लपटूषणे । स्वेदः स्वादुषु भक्ष्येषु तथा बालेषु तृड् भृशम् ॥ शब्दाग्निशीतवाताम्बुछायोष्णेष्वनिमित्ततः । इच्छा द्वेषश्च ॥

सटीक वा. नि. २-६–९

– तमः अप्रहर्षश्च शीतं च । सु. उ. ३९–२६

– वेपथुः श्रम भ्रम......स्वकार्येषुमाल्यालेपनभोजनपरिक्लेशनम् ॥ च. नि. १–८

– हानिश्च बलवर्णयोः शीलवैकृतम् अल्पम् ।......च. चि. ३–२९

१ सामान्यतो, विशेषात्तु जृम्भाऽत्यर्थं समीरणात् ।
पित्तान्नयनयोर्दाहः कफान्नान्नाभिनन्दनम् ॥
सर्वलिङ्गसमवायः सर्वदोषप्रकोपजे ।
द्वयोर्द्वयोस्तु रूपेण संसृष्टं द्वन्द्वजं विदुः । सु. उ. ३९–२७ ते ५८

२ संतापः सारुचिस्तृष्णा साङ्गमर्दो हृदि व्यथा । च. चि. ३–२६

– देहेन्द्रियमनस्तापकरः; प्रज्ञाबलवर्णहर्षोत्साहह्रासकरः, श्रमक्लममोहाहारोपरोधसंजननः । च. नि. १–४०

– ज्वरप्रत्यात्मिकं लिङ्गं संतापो देहमानसः । ज्वरेणाविशता भूतं न हि किञ्चिन्न तप्यते ॥ च. चि. ३–३१

– वैचित्त्यमरतिर्ग्लानिर्मनसस्तापलक्षणम् ।
इन्द्रियाणां च वैकृत्यं ज्ञेयं संतापलक्षणम् ॥ च. चि. ३–३६

लागते. हृदयामध्ये व्यथा होते ( अस्वस्थता वाटणे व नाडीचा वेग वाढणे ही लक्षणे हृदयाच्या व्यथेची द्योतक आहेत. ), वैचित्य ( चित्त, मन चंचल होणे ), अरती ( स्वस्थता न वाटणे ), गळून गेल्यासारखे वाटणे ही मनाच्या संतापाची लक्षणे असतात. इंद्रियांचे विषयग्रहणसामर्थ्यही कमी होते.

| ज्वर-प्रकार | तपमान | नाडी | सार्वदैहिक लक्षणे |
|---|---|---|---|
| १. वातज ज्वर | वेगतः व कालतः विषम | विषम, चपल शीतस्पर्शी (सर्पगती) | त्वक्‌रूक्षता, मलावष्टंभ, पिंडिकोद्वेष्टन, शिरःशूल, अस्वेद, सर्वाङ्गमर्द, कर्णनाद, तृषा, शोष, शुष्ककास, अरुची, जृंभा, प्रलाप, निद्रानाश, शीतपूर्वता. |
| २. पित्तज ज्वर | एकदम तीव्र ज्वर-वेग | मंद, स्थिर, शीत, स्निग्ध, मंडूकगती | मुखास्यता, पाक, तृषा, मद, भ्रम, मूर्च्छा, प्रलाप, स्वेदाधिक्य, पित्तज छर्दी, द्रवमलप्रवृत्ती; पीटिका ( बारीक पुरळ उठणे ). |
| ३. कफज ज्वर | मंद ज्वर वेग | मंद, सूक्ष्म (हंसगती) | अंगगौरव, हृल्लास, तोंड गोड होणे, छाती (कफाने) भरल्यासारखी वाटते, अंगाला ओला कपडा गुंडाळल्यासारखे वाटणे, अग्निमांद्य, निद्राधिक्य, तंद्रा, कास, श्वास, प्रतिश्याय, अस्वेद. |
| ४. द्वंद्वज ज्वर | द्विदोषजाप्रमाणे लक्षणे जाणावीत. | | |
| ५. सान्निपातिक ज्वर | त्रिदोषजलक्षणांनुरूप जाणावे. | | |

गर्भिणीला होणाऱ्या सर्व व्याधींमध्ये ज्वर हा अत्यंत कष्टदायक उपद्रव आहे. ज्वरामुळे वाढलेल्या उष्म्यामुळे गर्भाला बहुधा काही तरी अपाय होतोच.

**कारणे** : खूप भूक लागणे, अतिश्रम करणे, अभ्यंग जास्त प्रमाणात करणे, रूक्ष, उष्ण, अपक्व अन्नाचे सेवन करणे, वेगविधारण करणे, स्नेहस्वेदाचा उपयोग करणे, अग्निविषम होणे, उंच पर्वतावर राहणे, विशिष्ट तृणपुष्पांचा वास घेणे, यामुळे गर्भिणीला ज्वर येतो.



या परिस्थितीत जर आणखी काही मिथ्या आहार-विहार घडतील तर तद् तद् निदानानुसार भिन्न भिन्न व्याधी उत्पन्न होणे शक्य असते. ज्वरासंबंधी येथे सांगितलेले विशिष्ट निदान ते अशाच स्वरूपाचे आहे. गर्भिणीला स्वतंत्र निज कारणांनी व्याधी होत नाही असे नाही. पण चिकित्सा करताना मात्र त्यात फारसा वेगळेपणा मानावयाचे कारण नाही.

[1]क्वचित व्याधीच्या गंभीर स्वरूपाप्रमाणे स्वतंत्रपणे चिकित्सा करावी लागली तरी ती स्त्री गर्भिणी आहे हे लक्षात ठेवूनच उपचार करावे लागतात. काही वेळा स्त्रीच्या रक्षणासाठी विकार अत्यंत दारुण असतील तर गर्भपातही घडवावा लागतो. वा गर्भपात होत असेल तर त्याची उपेक्षा करावी लागते.

## साध्यासाध्यत्व :

[2]पुष्कळ कारणांनी जो ज्वर उत्पन्न झाला असेल, ज्यातील दोषांचे बल अधिक असेल, उत्पन्न होणाऱ्या लक्षणांची संख्या मोठी असेल, योग्य तऱ्हेने उपचार चालू असूनही ज्या ज्वरामध्ये ज्ञानेन्द्रियांना वा कर्मेन्द्रियांना फार त्वरेने वैकल्य येते, तो ज्वर प्राणघातक ठरतो.

तीव्र ज्वरवेग, हिक्का, श्वास, तृष्णा, मूढता, डोळे तारवटणे, सारखी धाप लागणे, क्षीणता येणे ही लक्षणे झाली असता ज्वर असाध्य होतो.

ज्याच्या अंगाला चिकट, गार घाम पुष्कळ प्रमाणात येतो, अंग गार पडते, घाम गळघाला येतो, पण छातीला येत नाही. संधिबंध ढिले होतात. उठून बसविले असता मूर्च्छित होतो, असा ज्वरी रुग्ण फारसा कृश झाला नसला तरी जगत नाही.

[3]रोगी बलवान असेल, दोषांचे बल अल्प असेल, उपद्रव उत्पन्न झालेले नसतील, लक्षणे थोडी असतील तर ज्वररोग साध्य होतो.

[4]वसंत व शरद ऋतूंत उत्पन्न होणारे अनुक्रमे कफाचे व पित्ताचे ज्वर साध्य असतात. वातज्वर प्राकृत असला तरी कष्टसाध्यच असतो.

---

१ " अविषह्ये विकारे तु श्रेयो गर्भस्य पातनम् ।
न गर्भिण्या विपर्यासः तस्मात् प्राप्तं न हापयेत् ॥ " सु. चि. १५–११

२ हेतुभिर्बहुभिर्जातो........ज्वरितं परिवर्जयेत् ॥ मा. नि. ज्वर ६६ ते ७३

३ बलवत्स्वल्पदोषेषु ज्वरः साध्योऽनुपद्रवः । या. नि. ज्वर ६६

४ वर्षाशरद्वसन्तेषु वाताद्यैः प्राकृतः क्रमात् ।
वैकृतोऽन्य स दुःसाध्यः प्राकृतश्चानिलोद्भवः ॥ मा. नि. ज्वर ५५

[1]ज्वराच्या धातुगत प्रकारांपैकी रसरक्ताश्रित ज्वर साध्य, मांसमेदोगतही साध्य, अस्थिमज्जागत कष्टसाध्य व शुक्रस्थ ज्वर असाध्य समजावा. तसाच सान्निपातिक ज्वर असाध्य समजावा.

**[2] रिष्ट लक्षणे :**

ज्वर बलवान् असून गंभीर, दीर्घकालानुबंधी, प्रलाप, भ्रम, श्वास यांनी युक्त; क्षीणता, शोथ, अग्निनाश ही लक्षणे उत्पन्न करणारा असेल वा शूल नसून, बोलणे आत ओढल्यासारखे असणे डोळे लाल होणे, हृदयामध्ये शूल असणे, ज्वर सकाळी वा संध्याकाळी तीक्ष्णवेगी होऊन शुष्ककास असणे, बलमांसविहीनता व कफकास अशी लक्षणे असतील तर ती मरणसूचक ठरतात.

**[3] चिकित्सा :**

लंघनाने दोष नाहीसे झाले, अग्निदीपन झाले म्हणजे रोग्याला पेयादी आहार द्रव्ये (द्रवरूप) दीपन-पाचन औषधांनी सिद्ध करून द्यावीत.

[4]ज्वरितेला तीक्ष्ण असे अन्नपान, स्वेदन व श्रम वर्ज्य करण्यास सांगावे. केवळ यवागू द्यावी.

१ रसरक्ताश्रितः साध्यो मांसमेदोगतश्च यः ।
अस्थिमज्जागतः कृच्छ्रो शुक्रस्थस्तु न सिध्यति ॥ मा. नि. ज्वर ५८

२ ज्वरो निहन्ति बलवान् गम्भीरो दैर्घरात्रिकः । सप्रलापभ्रमश्वासः क्षीणं शूनं हतानलम् ॥ अक्षामं सक्तवचनं रक्ताक्षं हृदि शूलिनम् । सशुष्ककासः पूर्वाह्णेयोऽपराह्णेऽपि वा भवेत् ॥ बलमांसविहीनस्य श्लेष्मकाससमन्वितः ।
वा. शा. ५–७१ ते ७३

३ लङ्घनं स्वेदनं कालो यवाग्वस्तिक्तको रसः ।
मलानां पाचनानि स्युर्यथावस्थं क्रमेण वा ॥ वा. चि. १–२१ रु. टीकेसह

– आमाशयस्थो हत्वाऽग्निं सामो मार्गान् पिधाय यत् ।
विदधाति ज्वरं दोषस्तस्मात्कुर्वीत् लङ्घनम् ॥
प्राग्रूपेण ज्वरादौ वा बलं यत्नेन पालयन् ।
बलाधिष्ठानमारोग्यमारोग्यार्थः क्रियाक्रमः ॥ वा. चि. १–२ स. टीकेसह

– ज्वरे लङ्घनमेवादावुपदिष्टमृते ज्वरात् ।
क्षयानिलभयक्रोधकामशोकश्रमोद्भवात् ॥ च. चि. ३–१३९

– लङ्घनैः क्षपिते दोषे दीप्तेऽग्नौ लाघवे सति ।
स्वास्थ्यं क्षुत्तृड्रुचिः पक्तिर्बलमोजश्च जायते । वा. चि. १–३

४ गर्भिणीं ज्वरितां नारीमेकाहमुपवासयेत् । ततो दद्यादलवणां पेयां स्नेहविवर्जिताम् ॥ तीक्ष्णानि त्वन्नपानानि स्वेदमायासमेव च । वर्जयेज्ज्वरिता नारी यवागूं केवला पिबेत् ॥



[1]यवागूच्या सेवनाने दोष कमी झाले की अन्न म्हणून यूष द्यावेत. यूषांनी दोष आणखी कमी झाले म्हणजे मग मांसरस दूध द्यावे. वैद्याने चार महिने पूर्ण होईपर्यंत गर्भिणीच्या ज्वरासाठी शक्य तो कोणतीही औषधी द्रव्ये वापरू नयेत (कारण गर्भ अद्याप स्थिर झालेला नसतो. अशा नाजुक स्थितीत औषधामुळे थोडा जरी क्षोभ झाला तरी गर्भस्राव होण्याची भीती असते.) चार महिन्यांनंतर गर्भ बराचसा स्थिर होतो. त्या वेळी दोषांचे अनुबंध व गर्भाचा काल विचारात घेऊन औषधी द्रव्यांचा उपयोग करावा.

[2]गर्भिणीच्या ज्वराचे वातपित्तकफात्मक स्वरूप लक्षात घेऊन चिकित्सा करताना (दोषांचे वा औषधांचे) गुरुलाघव विचारात घ्यावे आणि फार तीक्ष्ण नाही, फार मृदू नाही अशी मध्यम स्वरूपाची चिकित्सा करावी. लक्षणांचे बलाबल व गर्भिणीचे सत्त्व आणि गर्भाची अवस्था जाणून दोषांच्या शमनासाठी लेखनगुणयुक्त औषधे वापरावीत.

[3]ज्वरामध्ये वातकफांचा अनुबंध असताना आमावस्थेत तहान लागली तरी गरम पाणीही फारसे पिऊ नये, कारण पाण्याचे प्रमाण अधिक झाले तर ते दुष्परिणाम करते. पित्तानुबंधामध्ये काचेच्या व दगडाच्या पात्रामध्ये पाणी उकळवावे व ते गार करून प्राशन करावे.

[4]ज्वराची आमावस्था संपल्यावर व वेग कमी झाल्यावर तृष्णाप्रशमन द्रव्यांनी सिद्ध केलेले पाणी ज्वराच्या स्वरूपाप्रमाणे उष्ण किंवा शीतल असे थोडे थोडे आवश्यकतेनुसार द्यावे.

१ यवाग्वा ह्रसिते दोषे यूषैरन्नानि दापयेत् । यूषैस्तु ह्रसिते दोषे रसं वा क्षीरमेव वा ॥
दापयेन्मतिमान् प्राज्ञो न त्वौषधविधिर्हितः । अनुबन्धे तु दोषस्य गर्भकालमवेक्ष्य च ॥
मासाच्चतुर्थात् प्रभृति भिषक् भेषजमाचरेत् ।

२ शरीरं तु ज्वरं ज्ञात्वा वातपित्तकफात्मकम् ॥
मध्यां क्रियां प्रयुञ्जीत संचिन्त्य गुरुलाघवम् ।
उपद्रवबलं ज्ञात्वा सत्त्वं चापि समीक्ष्य तु । गर्भावस्था तु विज्ञाय लेखनानि प्रदापयेत् ॥

३ उत्पन्नायां तु तृष्णायां नात्युष्णं प्रपिबेज्जलम् ।
वातश्लेष्मसमुत्थे तु ज्वरे नीरं विषायते ॥
अथ पित्तकृते चापि शृतशीतं प्रशस्यते ।
कुप्यपाषाण निष्पक्वं शीतं तृष्णानिबर्हणम् ॥

४ ज्वरे तु तरुणे दृष्टो विधिरेष विशेषतः ।
मग्नवेगे तु कर्तव्यं तृष्णाप्रशमनैः शृतम् ।
ज्वरं ज्वरं समासाद्य शीतं वा यदि वेतरम् ( तु ) ॥

[1](ज्वरातील) गर्भिणीच्या शिरोरोगांवर शिरोरोगांवरील उपचार यथायोग्य रीतीने करावे. (जटामांसी, खुरासनी, ओवा, सूतशेखर, सर्पगंधा [ अल्प मात्रेत ] ब्राम्ही प्राशांतून वापरावी.) ज्वरवेग पूर्णपणे गेला तरी भोजनासाठी गुरुद्रव्ये वापरू नयेत. जडपदार्थ वापरू नयेत. त्यामुळे पुन्हा दोषप्रकोप होऊन शिरःशूलादी लक्षणे अधिक वाढण्याची शक्यता असते.

[2]ज्वररोगातील दोषांचा व अवस्थेचा विचार करून पुढीलप्रमाणे उपचार करावे :

विदारीगंधा, पृश्नीपर्णी, एरंड, ज्येष्ठमध, देवदारू यांचा काढा, साखर व महाळुंगाचा रस घालून वातज्वरासाठी द्यावा. तसेच वातविध्वंस, त्रिभुवनकीर्ती, देवदार्व्यादी क्वाथ, रक्तगंधावटी, योग्य मात्रेत द्यावी.

[3]दशमूलांचा काढा तयार करून त्यात रास्न्यांचा कल्क घालून कोमट प्राशन करावा. हा वातज्वरहर आहे.

[4]वातज्वर जीर्ण झाला म्हणजे वातघ्न औषधांनी सिद्ध केलेले दूध, क्षीर, यवागू वा जाङ्गलमांसरस सेवन करावेत.

[5]काकोली, क्षीरकाकोली, मनुका, ज्येष्ठमध व साखर यांचे पानक तयार करून मध घालून पित्तज्वरासाठी सेवन करावे.

[6]बोरू, वेत व दूर्वा यांची मुळे; सहदेवी, माका, पाटली, जांभूळ, आंबा व पंचक्षीरी वृक्ष यांची पाने, कमळ, सारिवा, वाळा, चंदन, पद्मपत्र, यांचा श्लक्ष्ण कल्क करून लेप

१ शिरोरोगे तु कर्तव्यो यथावद्भेषजक्रमः ।
भग्नवेगे ज्वरे कृत्स्ने गुरु नैव प्रशस्यते ।।

२ इमानि दद्यात् संचिन्त्य रोगावस्थाविशेषवित् ।
विदारिगन्धां कलशीं तथा गन्धर्वहस्तकम् ।।
मधुकं भद्रदारुं च क्वाथः शर्करया युतः ।
वातज्वरहरो देयो मातुलुंगरसाप्लुतः ।।

३ द्विपंचमूलनिष्क्वाथः कोष्णो वा यदि वा हिमः ।
रास्नाकल्कसमायुक्तो वातज्वरहितो मतः ।।

४ क्षीरं क्षीरयवागूर्वा रसो वा जाङ्गलो हितः ।
जीर्णज्वरे सदा नार्या वातघ्नैरौषधैः शृतः ।।

५ पयस्या क्षीरकाकोली मृद्वीका मधुकानि च ।
शर्करा मधुसंयुक्तं पानकं पैत्तिके ज्वरे ।।

६ नलवञ्जुलमूलानि गुन्द्रामूलानि चाहरेत् ।
सहां च सहदेवां च मार्कवं पाटलीं तथा ।।



लेप करावा. त्यामुळे पित्तज्वरातील दाह नष्ट होतो. यांचाच हिम वा फांट तूप घालून पोटात घेतला असता पित्तज्वरावर तर्पण म्हणून उपयोगी पडतो. चंद्रकलारस, प्रवाळ, सुवर्ण सूतशेखर वापरावा.

[1]देवदारूचा काढा, रास्नाचे चूर्ण व मध घालून प्यावा. चंदनाच्या काढ्यामध्ये पिंपळी व मध घालून प्यावा. रास्ना, अडुळसा व गुळवेल यांचा काढा सेवन करावा. हे तीनही प्रयोग कफज ज्वराचा नाश करणारे आहेत.

## ३. गर्भोपद्रव-शोथ

**व्याख्या :**

सर्वं उत्सेधं शोथमाहुः ।

मा. नि. शोथ २, टीका २७५

शरीराच्या ठिकाणी प्रकृत आकारमानापेक्षा एकंदरीत उंचवटा दिसतो. त्यात काही तरी साचले असे वाटते. या स्थितीस शोथ–शोफ असे म्हणतात. सूज हा त्याचा लौकिक प्रतिशब्द होय.

**स्वभाव :**

दारुण, साध्य.

**मार्ग :**

बाह्यमार्ग.

**प्रकार :**

शोथाचे निरनिराळ्या दृष्टिकोणातून भिन्नभिन्न प्रकार केले जातात. वातज, पित्तज, कफज, द्वन्द्वज तीन, सान्निपातिक, अभिघातज व विषम.

द्वंद्वज आणि सान्निपातिक, हे प्रकार प्रकृती समवायात्मक असल्यामुळे चरकाने

क्षीरिणां च प्रवालानि तथा जम्ब्वाम्रयोरपि ।
उत्पलं सारिवोशीरं चन्दनं पद्मपत्रकम् ।।
श्लक्ष्णान्येतानि पिष्टानि प्रदेहः शीतलो भवेत् ।
पित्तज्वरहरो नार्यास्तर्पणो घृतसंयुतः ।।

१ भद्रदारुकनिष्क्वाथो रास्नाक्षौद्रसमायुतः ।
अथवा चन्दनक्वाथः पिप्पलीक्षौद्रसंयुतः ।।
श्लेष्मज्वरहरः पेयो रास्नावासाऽमृताशृतः ।

[१]तीन दोषांचे तीनच शोथ प्रकारभेदाने मानले आहेत. तसेच [२]आश्रयभेदाने सर्व शरीराला व्यापून असणारा, अर्धे शरीराला व्यापून असणारा, आणि विशिष्ट मर्यादित अवयवांना व्यापून असणारा, व [३]कारणभेदाने निज व आगंतू असे दोन मानले आहेत.

असा तीन प्रकारचा शोथ चरकाने सांगितला आहे.

कश्यपाने वातिक, पैत्तिक, श्लेष्मिक व सान्निपातिक असे चार व पाचवा आगंतू असे वर्गीकरण केले आहे.

वाग्भटाने पसरलेला, उंचवटा आणणारा, व ग्रंथिरूप असा स्वरूपभेदाने तीन प्रकारचा शोथ वर्णन केला आहे.

उदकवह श्रोतसाच्या प्रकरणामध्ये मुख्यत: सर्व शरीर व अर्ध-शरीराला व्यापून असणारे वर्णन करणे इष्ट आहे. असे असले तरी शोथ लक्षण सामान्यत: प्राचीन ग्रंथकारांनी ज्या इतर शोथांचा उल्लेख शोथ प्रकरणात केला आहे, त्यांतील काही शोथ तरी याच ठिकाणी वर्णन करणे इष्ट आहे. कारण शोथाचे समवायीकरण जो कफ तो उदकाचा प्रतिनिधी म्हणून त्या त्या एकाङ्गज शोथ व्याधीमध्येही उपस्थित असतोच.

## कारणे :

निरनिराळे व्याधी, पंचकर्मासारखे शोधनोपचार आणि उपवास या कारणांनी ज्याचे शरीर क्षीण झाले आहे अशा व्यक्तींनी एकाएकी व अधिक प्रमाणात गुरू, अम्ल, स्निग्ध, शीत, लवण, क्षार, तीक्ष्ण, उष्ण अशा गुणांचे पदार्थ, दह्यासारखी अभिष्यंदी द्रव्ये, पूर्ण पक्व न झालेली आमद्रव्ये (फळे वा अन्न), परस्परविरोधी पदार्थ (दूध, व मासे), दुष्ट झालेले अन्न, गर-विषयुक्त अन्न, भाज्या वा पाणी सेवन करणे, झोपणे वा जागणे यांच्यामध्ये उलटापालट करणे, मृद्‌भक्षण, ग्राम्यमांस, शुष्क मांस, अजीर्ण झालेल्या स्थितीत श्रम करणे, खूप दूरवर पायी चालणे, हादरे-हिसके बसणाऱ्या वाहनांतून प्रवास करणे, मर्मोपघात अशी अपथ्ये घडली तर शोथ हा व्याधी उत्पन्न होतो.

१ दोषैः पृथग्द्वयैः सर्वैरभिघाताद्विषादपि । मा. नि. शोथ, ३ पान २७५

२ त्रिविधो निजश्च सर्वार्धगात्रावयाश्रितत्वात् । च. चि. १२–७ पान ११२२

३ त्रयः शोथा भवन्ति वातपित्तश्लेष्मनिमित्ताः ते पुनर्द्विविधा निजागन्तुभेदेन ।

च. सू. १८–३ पान २२४

– एवं प्रकृतिभिस्ताभिर्भिद्यमानो द्विविधस्त्रीविधश्चतुर्विधः सप्तविधोऽष्टविधश्च शोफ उपलभ्यते पुनश्चैक एवोत्सेधसामान्यारिति । च. स. १८–१५, पृ. २२५

– द्विधा वा निजमागंतु सर्वाङ्गैकाङ्गजं च तम् ॥ वा. नि. १३–२३ सटीक, पान ५२०

– सः चतुर्विधः वातिकः पैत्तिकः श्लेष्मिकः । सान्निपातिकः । का. सं., पान ३३९



तसेच छर्दी, अलसक, विषूचिका, श्वास, कास, अतिसार, धातुक्षय, शोष, राजयक्ष्मा, पांडू, ज्वर, उदर, प्रदर, भगंदर, अर्श, कुष्ठ, कंडू, पीडका, गर्भधारणा, गर्भपात, सूतिकावस्थेतील मिथ्योपचार या कारणांनीही शोथ उत्पन्न होतो (च. सू. १८–६). या रोगानंतर येणारा शोथ बहुधा व्याधीचा उपद्रव वा परिणाम म्हणून उत्पन्न होतो.

शोथाच्या कारणांमध्ये मर्मोपघात असा हेतू सांगितला आहे. त्याचा अर्थ इतर मर्मांप्रमाणेच प्रधान म्हणून सांगितलेल्या तीन मर्मांपैकी हृदय व बस्ती या स्थानांचा निज कारणांनी (वा आगंतू) उपघात होणे असाच आहे. वंगसेनाने एका कल्पाच्या उपयोगाचे कार्यक्षेत्र सांगत असताना श्वयथू, गुल्म, उदर व बस्तिसाद हे विकार एकत्र घेतले आहेत. त्यांतील संगती शोथाच्या कारणांतील मर्मोपघाताने नीटपणे लागते (वंगसेन, उदर २६४ पान ५२८).

छेदन (म्हणजे कापले जाणे), भोसकणे, चूर्ण होणे, फुटणे, पिचणे, ठेचले जाणे, मार लागणे, बांधणे, आवळणे, टोचणे, पिळवटणे इत्यादी कारणांनी किंवा बिब्बा, त्याचे फूल, फळ, रस यांचा स्पर्श होणे, खाजकुयली लागणे, निरनिराळ्या प्रकारच्या किड्यांचा स्पर्श होणे वा ते चिरडले जाणे, विषारी, अहितकर गुण असलेल्या वृक्ष,

– सामान्यहेतुः शोफानां दोषजानां विशेषतः ।
व्याधिकर्मोपवासादिक्षीणस्य भजतो द्रुतम् ।
अतिमात्रमथान्यस्य गुर्वम्लस्निग्धशीतलम् ॥
लवणक्षारतीक्ष्णोष्णशाकाम्बु स्वप्नजागरम् ।
मृद् ग्राम्यमांसवल्लूरमजीर्णश्रममैथुनम् ॥
पदातेर्मार्गगमनं यानेन क्षोभिणाऽपि वा । श्वासकासातिसारार्शोजठरप्रदरज्वराः ॥
विषूच्यलसकच्छर्दिगर्भवीसर्पपाण्डवः । अन्ये च मिथ्योपक्रान्ता........ ॥

वा. नि. १३–२४ ते २८, पान ५२०

– दध्याममृच्छाकविरोधिदुष्टगरोपसृष्टान्ननिषेवणं च ।

च. चि. १२–५, ६ पान ११२१

– मर्मोपघात इह दोषकृत एव ज्ञेयः बाह्यहेतुजस्तु मर्मोपघात आगन्तुहेतुरेव.....॥

टीका

– तत्राऽऽगन्तवच्छेदनभेदनक्षणनभञ्जन – पिच्छनोत्पेषणप्रहारवधबन्धनवेष्टनमथन-पीडनादिभिर्वा भल्लातकपुष्पफलरसात्मगुप्ताशूकक्रिमिशूकाहितपत्रलतागुल्म-संस्पर्शनैर्वास्वेदनपरिसर्पणावमूत्रणैर्वा विषिणां सविषाविषप्राणिदंष्ट्रादन्तविषाण-नखनिपातैर्वा सागरविषवातहिमदहनसंस्पर्शनैर्वा शोथाः समुपजायन्ते ॥

भेदनमाशयविदारणम् । क्षणनमस्थिचूर्णनम् भञ्जनं = जर्जरीकरणम् । पिच्छनमत्यर्थपीडनम् । उत्पेषणं = शिलोत्पेषणमिव । वेष्टनमग्रन्थिबन्धनं सर्पादिभिः । शूकवतां क्रमीणां शूकः शूकक्रिमिशूकः । स्वेदनादिभिर्विषिणामिति योज्यम् ।

सटीक– च. सू. १८–४, पान २२४

वेली, गुल्मांचा वा त्यांच्या पत्रपुष्पांचा स्पर्श होणे, विषारी प्राण्यांचा घामाशी, मूत्राशी संबंध येणे वा विषारी प्राणी अंगावरून जाणे किंवा सविष, निर्विष प्राण्यांच्या दात, दाढा, शृंग, नख, यांनी व्रण होणे किंवा समुद्रावरून येणारे वारे, विषारी वारे, बर्फ, अग्नी यांची बाधा होणे, ही आगंतू शोथाची कारणे आहेत. प्रकृतिविशेष वा विशिष्ट प्रकारचे स्थानवैगुण्य असणाऱ्या व्यक्तींत हा आगन्तू प्रकारचा शोथ कारणानुरूप उत्पन्न होतो.

**संप्राप्ती :**

शोथाची जी कारणे वर सांगितली आहेत त्यांचा परिणाम होऊन शरीरातील रक्त, पित्त व कफ (रस) यांच्यामध्ये वैगुण्य उत्पन्न होते. वायू प्रकुपित होतो. हा प्रकुपित झालेला वायू रक्तपित्तकफांना दुष्ट करून त्यांना शरीरातील बहिःसिरांमध्ये घेऊन जातो. या बहिःसिरांमध्ये आलेल्या दुष्ट रक्तपित्तकफाने वायूचाच मार्ग रुद्ध होतो आणि त्यामुळे रक्तपित्तकफादी द्रव्ये केवळ बहिःसिरांतच न राहता विमार्गग वायूच्या प्रेरणेने त्वग् आणि मांस यांच्यामध्ये येऊन संचित होतात. स्वाभाविकपणेच त्या ठिकाणी उत्सेध उत्पन्न होतो.

– बाह्याः सिराः प्राप्य यदा कफासृक्पित्तानि संदूषयतीह वायुः ।
तैर्बद्धमार्गः स तदा विसर्पन्नुत्सेधलिङ्गं श्वयथुं करोति ॥
उरःस्थितैरुर्ध्वमधस्तु वायोः स्थानस्थितैर्मध्यगतैस्तु मध्ये ।
सर्वाङ्गगः सर्वगतैः क्वचित्स्थैर्दोषैः क्वचित् स्याच्छ्वयथुस्तदाख्यः ॥
च. चि. १२–८, ९, पान ११२२

– पित्तरक्तकफान्वायुर्दुष्टो दुष्टान् बहिः सिराः ।
नीत्वा रुद्धगतिस्तैर्हि कुर्यात्त्वङ्मांससंश्रयम् ॥
उत्सेधं संहतं शोफं तमाहुर्निचयादतः ।
बहिर्भूताः सिरा बहिः सिराः, बाह्याः सिराः । वायुः पित्तरक्तकफान् कर्मभूतान् बहिः सिराः कर्मभूता नीत्वोत्सेधं कुर्यात् । नयतेर्द्विकर्मकत्वात् पित्तादयो बहिःसिराश्च कर्म । यथा– अजां नयति ग्राममिति । तेनायमर्थोऽवतिष्ठतेबहिःसिरासु पित्तादीन्नीत्वेति । किम्भूतो वायुः दुष्टः सन्–कोपनैः कुपितः । किम्भूतमुत्सेधम् ? त्वक् च मांस च त्वङ्मांसे, ते संश्रयः आश्रयो यस्यतम् । तैर्हीति हिशब्दोऽवधारणे । तैरेव बहिःसिराप्राप्तैः पित्तरक्तकफैः रुद्धगतिः । अत एव संहतंसमन्ताद्धतं, निश्चलमिव सम्पन्नं, उत्सेधम् । यतश्चैवं वातपित्तकफैः शोफः सञ्जायते, तस्मात्सर्वं शोफं निचयात् – दोषत्रयात्, आहुः । ननु, एवं सतीदं न विरुध्यते " दोषैः पृथग्द्वयैः सर्वैः " इति । सटीक– वा. नि. १३–२१, पान ५१९

– मारुतः सर्वशोफानां मूलहेतुरुदाहृतः । का. सं., पान ३४०



निज शोथामध्ये अभ्यंतर मार्गातील आम, पक्वाशय व बस्ती, रसवाहिनी आणि तत्सान्निध्यात आहारजलाचे वहन करणाऱ्या सिरांचे आश्रयस्थान असलेले वृक्क हे शोथाचे उद्भवस्थान असून बहिःसिरा हे त्याचे अधिष्ठान आहे. दोष-दूष्याच्या प्रमाणावर त्याचा संचार सर्व शरीर, अर्ध शरीर वा विशिष्ट अवयव यापुरताच मर्यादित राहतो. शोथाच्या उद्भवस्थानामध्ये वृक्काचा उल्लेख स्पष्टपणे आला नाही याचे कारण असे की, वृक्क-विकृतीपेक्षाही रसवहनातील विकृती हीच शोथाला मूलभूत कारण असून, वायूचा प्रकोप हे त्यास निमित्त असते, असे असावे. त्यामुळे विशिष्ट अवयवाच्या विकृतीमध्ये उद्भव असल्यासारखे वाटले तरी खरे कारण त्याहीपेक्षा गंभीर असते. शोथाच्या संप्राप्तीतील आयुर्वेदीयांनी यासाठी सर्वांना मूलभूत असणाऱ्या विकृतींचा विचार स्पष्टपणे मांडला आहे. तो असा–

[1]स्थानांच्या दृष्टीने निरनिराळ्या अवयवांपासून शोथाचा आरंभ होतो. दोष आमाशयात असतील तर मुखापासून शोथ येतो. दोष नाभिसमंतात असतील तर मध्यदेशातून शोथ सुरू होतो व पक्वाशयामध्ये असल्यास शोथ पायापासून येतो.

शोथामध्ये दूष्य सांगत असताना रक्तासवेच रसाचा उल्लेखही गृहीत धरला पाहिजे. उपलब्ध वर्णाप्रमाणे रक्तामध्ये तो उपलक्षणांनी समाविष्ट आहे असे म्हणावे किंवा कफसदृश गुणाचा असल्यामुळे कफाच्या उल्लेखात समाविष्ट आहे असे मानावे. या कल्पनेस हारिताचा आधार आहे. तो असा :

' रसे सर्वानुगाः शोफाः सर्वदेहानुगाः रसाः ।
हारित तृतीय २५, पान ३७२

रसाश्रित उदक सर्व शरीरास व्यापून असल्यामुळे त्याच्या विकृतीने सर्वाङ्ग शोथ उत्पन्न होतो.

पित्त आणि कफ हे जरी दोष असले तरी या ठिकाणी त्यांची विकृती दूष्यासारखीच होते. कश्यपाने दूष्यांच्या यादीत त्वग्, मांस, मेद यांचेही अधिष्ठान म्हणून उल्लेख केलेला आहे. तो विचार करण्यासारखा आहे. मात्र मेदोदुष्टीची व्यक्त लक्षणे विशिष्ट रोगात व विशिष्ट अवस्थेतच व्यक्त होतात. विशेषतः सूतिकेच्या मिथ्योपचाराने उत्पन्न होणारा एकाङ्गज शोथ मेदोदुष्टिप्रधान असू शकतो. कश्यप हा ग्रंथ सौतिकाकडे विशेष लक्ष देणारा असल्याने त्याच्या क्षेत्रात पुष्कळदा आढळणाऱ्या शोथाचे वैशिष्टय पाहून त्याने मेदाचा स्वतंत्र व स्पष्ट उल्लेख केला असला पाहिजे.

१ दोषाः श्वयथुमूर्ध्वं हि कुर्वन्त्यामाशयस्थिताः ।
पक्वाशयस्था मध्ये तु वर्चः स्थानगतास्त्वधः ॥
कृत्स्नदेहमनुप्राप्ताः कुर्युः सर्वसरं तथा । मा. नि. शोथ १५, १६ पान २७९

शोथाच्या प्रकारानुरूप कधी रक्ताची, कधी पित्ताची तर कधी कफाची लक्षणे व्यक्त होत असली तरी या तिघांचीही दुष्टी सामान्य स्वरूपामध्ये शोथात असतेच.

## [1] पूर्वरूपे :

शोथाचे पूर्वरूप म्हणून उष्णता वाढणे, आग होणे, सिरा तापल्याप्रमाणे वेदना होणे, आणि अंग जड वाटणे अशी लक्षणे होतात.

## [2] रूपे :

शोथ हा अनवस्थित म्हणजे पसरत जाणारा, वाढत जाणारा असतो. जडपणा वाटतो. त्या त्या अवयवांना सुजेमुळे फुगवटा आल्यासारखा दिसतो. उष्ण स्पर्श असतो. सिरा बारीक होतात. अंगावर रोमांच उभे राहतात. त्वचेचा वर्ण विकृत होतो. ही लक्षणे शोथाची सामान्य रूपे म्हणून होतात.

## [3] वातज शोथ :

वातज शोथ हा चल व तनू (म्हणजे स्पर्शाला पातळ, मृदू असा लागणारा) असतो. शोथाच्या ठिकाणची त्वचा व केस खरखरीत होतात. वर्ण अरुण व कृष्ण असा होतो. अवयवाचा संकोच होतो. त्या त्या स्थानी स्पंद, हर्ष, तोद, भेद, सुप्ती (स्पर्शाज्ञत्व) अशी लक्षणें असतात. शोथ वाढतोही लवकर व कमीही लवकर होतो. टणक जागी बोटाने दाबून पाहिले असता शोथामध्ये जो खळगा पडतो तो वातज शोथामध्ये लवकर भरून येतो. शोथाच्या ठिकाणच्या त्वचेमध्ये मोहरी लावली असता

---

१ ऊष्मा तथा स्याद्दवथुः सिराणामायाम इत्ये व च पूर्वरूपम् ।
च. चि. १२–१०, पान ११२२

– तत्पूर्वरूपं दवथुः ......... तथा अङ्गगौरवं स्यात् ।
सटीक वा. नि. १३–३०, पान ५२०

– सिरायामः सिराप्रसरणवत् पीडा ।   मा. नि. शोथ ३ म. टीका

२ सगौरवं स्यादनवस्थितत्वं सोत्सेधमूष्माऽथ सिरातनुत्वम् ।
सलोमहर्षाङ्गविवर्णता च सामान्यलिङ्गं श्वयथो प्रदिष्टम् ।
च. चि. १२–११, पान ११२२–११२३

३ चलस्तनुत्वक्परुषोऽरुणोऽसितः............श्वयथुः समीरणात् ॥
चल इत्यादिना वातजशोथालिङ्गमाह । ...... संपीडनानन्तरमेवोन्नमिति ।
सटीक च. चि. १२–१२, पान ११२३

– स्वररोमा, संकोच, ....... तत्स्थे चिमचिमायते ।   वा. नि. १३–३० ते ३२



जशी चुणचुण होते तशी चुणचुण होते. शोथ दिवसा वाढतो व रात्री त्यामानाने कमी होतो. वायू हा विषमस्वभावी व चल गुणाचा असल्यामुळे हा शोथ कारणावाचून (वाढतो वा) कमी होतो. स्निग्ध, उष्ण अशा उपचाराने या शोथामध्ये उपशय येतो. वातप्रधान शोथ बहुधा प्रथम पायावर येतो, मग सर्व शरीरभर पसरतो. पक्वाशय हे या शोथाचे प्रमुख उद्भवस्थान असते.

## [1] पित्तज शोथ :

पित्तामुळे उत्पन्न होणाऱ्या शोथाचा वर्ण रक्त, पीत, नील असा असतो. हा शोथ लवकर पसरतो वा नाहीसाही होतो. याची उत्पत्ती बहुधा शरीराच्या मध्यभागापासून होते. शोथाचा स्पर्श मृदू असतो. त्या ठिकाणी स्पर्श सहन होत नाही. रुग्णाच्या अंगास एक प्रकारचा उग्र गंध येतो. शोथाच्या ठिकाणी आग होते, व त्या ठिकाणी पाकही होण्याची शक्यता असते. गार हवेसे वाटते. सार्वदैहिक लक्षणांमध्ये डोळे लाल होणे, भ्रम, ज्वर, स्वेद, तृष्णा, क्लेद, मद, दाह, द्रवमल असे विकार असतात.

## [2] कफज शोथ :

कफज शोथामुळे त्वचा पांडुर दिसते. कफाचे स्वरूप स्निग्ध, श्लक्ष्ण, गुरू, स्थिर, स्त्यान, कठिण, शीतल असे असते. शोथ बोटाने दाबला असता जो खळगा पडतो तो लवकर भरून येत नाही. शोथ रात्री जास्त होतो. शोथाच्या ठिकाणी काही कारणांनी क्षत झाले तर त्यातून रक्त न येता चिकट असा लसिकास्राव होतो. रोग्याला उष्ण स्पर्श हवासा वाटतो. अरुची, तोंडाला पाणी सुटणे, छर्दी, निद्रा, अग्निमांद्य अशी इतर लक्षणे असतात.

रात्री हालचाल नसल्याने शरीरातील क्लेदाने स्रोतोरोध अधिक असतो म्हणून कफप्रकोपाची भर पडताच शोथ त्या वेळी वाढतो.

---

१ मृदुः सगन्धोऽसितपीतरागवान् भ्रमज्वरस्वेदतृषामदान्वितः ।
य उष्यते स्पर्शरुगक्षिरागकृत् स पित्तशोथो भृशदाहपाकवान् ॥
च. चि. १२, १६, पान ११२३

– स्निग्धानुसारप्रशमो, मध्ये प्राक्, जायते तनु, स्पर्शासह, विड्भेदी, शीताभिलाषी ।
वा. नि. १३–३३, ३४

२ गुरुः स्थिरः पाण्डुररोचकान्वितः......कफशोथस्तु हीयते ।
सटीक च. चि. १२–१४

– स्निग्धः श्लक्ष्णः ....... स्पर्शोष्णकांक्षी ।   वा. नि. १३ ते ३५–३६

[1]द्वंद्वज शोथामध्ये जे दोन दोष प्रकुपित असतील त्यांची लक्षणे एकत्र दिसतात.

[1]सन्निपातामध्ये तीनही दोषांची लक्षणे दिसतात.

माधवनिदान व वाग्भट यांनी अभिघातज व विषज असे आगन्तूचे दोन प्रकार देऊन त्यांच्या लक्षणांमध्ये थोडासा फरक करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु ती सर्व लक्षणे आगन्तू या प्रकरणामध्ये एकत्र घेणे सोयीचे आहे. आगन्तू कारणाने उत्पन्न होणारा शोथ हा लवकर वाढणारा, पसरणारा असून त्याचा उष्ण स्पर्श असतो. वर्ण आरक्त असतो. हे शोथ शीघ्रकारी, दाहयुक्त, वेदनावान्, मृदू व शिथिल (अवलंबी) असे असतात. दाह हे लक्षण विषजशोथात विशेष असते.

## [2]शोथाची आमावस्था :

वंगसेनाने शोथाच्या आमावस्थेची लक्षणे सांगितलेली आहेत. भूक नसणे, हृदयामध्ये अशुद्धता ( मळमळणे ), तंद्रा, उदरगुरुता व स्वेद-मलमूत्रांची अप्रवृत्ती अशी लक्षणे या अवस्थेत असतात.

## वृद्धी, स्थान व क्षय :

एका अवयवावर प्रथम दिसावयास लागलेला शोथ क्रमाने सर्व शरीरावर पसरत जातो. त्याचा पसरण्याचा वेग अधिक असतो. स्पर्शाला प्रथम मृदू असणारा शोथ पुढे गुरू, कठीण असा होत जातो. शोथाचा उत्सेध हाही वाढत जातो. त्यामुळे त्वचा ताणली जाऊन श्लक्ष्ण दिसू लागते. पुढे स्राव येऊ लागतो. शोथ फार सावकाश पसरतो व त्याचा मृदू स्पर्श व अल्पत्व तसेच राहते.

शोथाचे पसरण्याचे स्वरूप नाहीसे होऊन एकएक अवयव शोथरहित होत जातो. शेवटी संधीच्या ठिकाणी वा पावलावर शोथाचे प्रमाण अवशिष्ट राहून इतर सर्व शरीरावर कृशता येते व कातडी सुरकुतलेली दिसते. त्वचेचा वर्ण प्रकृत होतो.

संधी; पाय वा अक्षिकूट या ठिकाणीही शोथ दिसेनासा झाला आणि बलमांस वाढू लागले, कृशता नाहीशी झाली, त्वचा पूर्ववत् सम व सतेज दिसू लागली म्हणजे शोथ-व्याधी नाहीसा झाला असे समजावे.

---

१ निदानाकृति ...... व्यामिश्रलक्षणः ॥ सटीक मा. नि. शोथ १०, पान २७८

– स्याद्विसर्पवान् । भृशोष्मा लोहिताभासः प्रायशः पित्तलक्षणः ।

मा. नि. शोथ, १४ पान २७८

२ क्षुन्नाशो हृदयाशुद्धिस्तन्द्राजठरगौरवैः ।
दोषप्रवृत्तिर्नो यत्र व्याधिमामान्वितं वदेत् ॥ वंगसेन शोथ, २२, पान ५३१



## साध्यासाध्यत्व :

नुकताच उत्पन्न झालेला व उपद्रवरहित असा शोथ साध्य असतो.

जो शोथ मध्यभागी सुरू होतो व सर्वांगावर पसरतो तो कष्टसाध्य असतो.

स्त्री-रुग्णामध्ये मुखावर उत्पन्न होऊन सर्वांगावर पसरत जाणारा शोथ असाध्य होतो.

बस्तीच्या विकृतीमुळे होणारा व सर्व शरीरभर पसरणारा शोथ असाध्य होतो.

दोषांची संचिती अतिशय होऊन त्वचा फुटते व त्यातून स्राव वाहू लागतो, त्या वेळी व्याधी असाध्य होतो.

## गर्भिणीमधील शोथ या व्याधीचे व्यवच्छेदक निदान :

ज्या वेळी गर्भिणीमध्ये गर्भाच्या प्रपीडनामुळे पादशोथ उत्पन्न होतो त्या वेळी शोथ हे लक्षण मानावे. हे लक्षण बहुधा फक्त पावलांवरच किंवा क्वचित वेळी घोटयावरही सापडते. हे लक्षण नवव्या महिन्याच्या शेवटी शेवटी आलेले सापडते. मात्र पादशोथ हे लक्षण नवव्या महिन्याच्या पूर्वी म्हणजेच सहा ते आठ महिन्यांपर्यंत केव्हाही आले तर ते गर्भिणीला असलेल्या दुसऱ्या व्याधींचे लक्षण समजावे. उदा.– पांडू, हृद्रोग इत्यादी.

अतिगर्भोदक व यमगर्भ असतानासुद्धा गर्भिणीला पादशोथ हे लक्षण सापडते. अशा वेळी गर्भिणीने भरपूर विश्रांती घेतली असता हे लक्षण कमी होते. परंतु ज्या वेळी शोथ हे इतर व्याधींचे लक्षण असते त्या वेळी नुसत्या विश्रांतीने शोथ हे लक्षण कमी होत नाही तर त्याबरोबर त्या विशिष्ट व्याधीचीही चिकित्सा करावी लागते, तरच शोथ बरा होतो.

---

– यो मध्यदेशे श्वयथुः स कष्टः सर्वगश्च यः । अर्धाङ्गे रिष्टभूतः स्याद्यश्चोर्ध्वं परिसर्पति । ......पुरुषं हन्ति नारीं च........साध्योऽसाध्यः पुरेरितः ॥
विवर्जयेत्कुक्ष्युदराश्रितं...... मर्मणि संश्रितं च ॥

म. टीका, मा. नि. शोथ १७–२०

– पादाभिनिर्वृत्तः शोथः...... गुरुप्रदेशे गतो नितरामेव न पार्यते । एवम्, प्रसृतः स्त्रीमुखाच्च य इत्यपि ज्ञेयम् । वचनं हि । अधोभागो गुरुः स्त्रीणामूर्ध्वपुंसां गुरुस्तथा । टीका च. सू. १८–२५, पान २२५

– कृशस्य रोगैरबलस्य या भुवेदुपद्रवैर्वा वमिपूर्वकैर्युतः ।
स हन्ति मर्मानुगतोऽथ राजिमान् परिस्रवेद्धी न बालस्य सर्वगः ॥

च. चि. १२–१५, पान ११२३

गर्भिणीमध्ये तिने केलेल्या मिथ्या आहार-विहारामुळे ( उदा. विशेषतः अभिष्यंदी आहार, अतिलवणयुक्त व चमचमीत असा आहार ) व स्वभावतःच गर्भिणीच्या शरीरामध्ये असलेले दोष प्रकुपित करून शोथ हा व्याधी उत्पन्न होतो, त्या वेळी गर्भिणीच्या शरीरावर खालीलप्रमाणे लक्षणे दिसतात.

अंगगौरव, सामता ( जिव्हा ), मलावष्टंभ, छर्दी, अग्निमांद्य, आलस्य, ग्लानी, अनुत्साह, सर्वांगावर शोथ [ दोषाप्रमाणे ], नोन्नमित व प्रोन्नमित ही लक्षणे सापडतात.

असा शोथ हा व्याधी असताना जर वेळेवर शोथाची चिकित्सा केली गेली नाही तर गर्भिणीमध्ये भ्रम, मूर्च्छा, तंद्रा व सरतेशेवटी अपस्माराचे वेग आलेले सापडतात आणि गर्भ व गर्भिणी यांच्या जीवास धोका उत्पन्न होतो.

## चिकित्सा :

शोथाला कारणीभूत झालेले निदान ( कारणे ), शोथ उत्पन्न करणारे दोष (दूष्य) व शोथ येतो तो काल हे सर्व लक्षात घेऊन व रोग्याच्या बलदोषाचा (प्रकृतिस्थ) विचार करून समयज्ञ वैद्याने विरुद्ध गुणांच्या साहचर्याने शोथाचा उपचार करावा.

शोथातील दोष आमावस्थेत असताना प्रभूत असतील तर लंघन, पाचन अशा क्रमाने प्रारंभीच शोधन करावे. शिरोगत दोषांचे नस्याने, पक्वाशयस्थ दोषांचे विरेचनाने आणि आमाशयातील दोषांचे वमनाने शोधन करावे.

स्निग्ध पदार्थ शोथास कारण झाले असतील तर रुक्षण करावे व रूक्षता उत्पन्न करणाऱ्या द्रव्यांनी शोथ आला असल्यास उपचारासाठी स्निग्ध द्रव्ये वापरावीत.

शोथामध्ये वातप्राधान्य असून मलबद्धता असल्यास निरूहबस्ती वापरावा.

वातपित्तज शोथासाठी तिक्तद्रव्यांनी सिद्ध केलेले घृत वापरावे.

मूर्च्छा, अरती, दाह, तृष्णा ही लक्षणे असताना दूध वापरावे. त्याच वेळी शोधन द्यावयाचे असल्यास दूध व गोमूत्र यांचा उपयोग करावा.

– निदानदोषर्तुविपर्ययक्रमैरुपाचरेत्त बलदोषकालवित् ।
सामान्येन चिकित्सासूत्रमाह–निदानेत्यादि ॥ च. चि. १२ ते १६, पान ११२३,२४

– अथामजं लंघनपाचनक्रमैर्विशोधनैरुल्बणदोषमादितः ।
शिरोगतं शीर्षविरेचनैरधोविरेचनैरूर्ध्वहरैस्तथोर्ध्वजम् ॥
उपाचरेत् स्नेहभवं विरूक्षणैः प्रकल्पयेत् स्नेहविधिं च रूक्षजे ।
सटीक च. चि. १२–१७ ते १९, पान ११२४

– विड्वातसङ्गे पयसा रसैर्वा प्राग्भक्तमद्यादुरुबूकतैलम् ।
स्रोतोविबन्धेऽग्निरुचिप्रणाशे मद्यान्यरिष्टांश्च पिबेत् सुजातान् ॥
च. चि. १२–१८, पान ११२६



कफज शोथावर क्षार, कटू, उष्ण अशी द्रव्ये, मूत्र, तक्र व आसवे युक्तीने वापरावी. टीकाकाराने 'मूत्रयुक्त तक्रासव' असा अर्थ केला आहे तोही योग्य आहे.

वात व पुरीष यांचा अवरोध असताना दुधाबरोबर वा मांसरसाबरोबर जेवणापूर्वी एरंडेल द्यावे. स्रोतसांचा विबंध असताना व अग्निमांद्य, अरुची, ही लक्षणे असताना आसवारिष्टे सेवन करावी.

गर्भिणीमध्ये शोथाची चिकित्सा करीत असताना ती चिकित्सा गर्भाला गर्भोपघातकर ठरणार नाही याची वैद्याने काळजी घ्यावी.[1] परंतु ज्या वेळी शोथ हा व्याधी गर्भिणीला मारक ठरण्याची शक्यता असते त्या वेळी मात्र गर्भाच्या जीवनाचा विचार न करता गर्भिणीला वाचविण्यासाठी जी जी चिकित्सा (गर्भाला मारक ठरणारी चिकित्सासुद्धा) वैद्याने करावी. तसे न केल्यास मात्र गर्भिणीच्या मृत्यूला वैद्य कारणीभूत ठरतो.

## विशेष चिकित्सा :

सामता असेपर्यंत आमपाचक म्हणून गर्भिणीला आमपाचकवटी, संजीवनी, शंखवटी, भास्करलवणचूर्ण, सामुद्रादी चूर्ण योग्य मात्रेत द्यावी. पंचकोलासव, पुनर्नवासव, गोक्षुरादी गुग्गुळ, चंद्रप्रभा, पुनर्नवामंडूर, मूत्रलक्वाथ, पुनर्नवादी क्वाथ हे कल्प युक्तीने वापरावे.

आहारावर नियंत्रण ठेवून लवण व अभिष्यंदी आहार वर्ज्य करावा. व्यवहारामध्ये गर्भिणीला दौहृदाच्या [ डोहाळे पुरविण्याच्या निमित्ताने ] नावाखाली जो अति चमचमीत, लवणयुक्त व अभिष्यंदी असा आहार आग्रहाने घातला जातो तो गर्भिणीला पोषक न ठरता अपायकारकच ठरलेला आमच्या निदर्शनास येतो. त्याकरिता म्हणून नववा महिना लागल्यानंतर गर्भिणीची डोहाळजेवणे बंद करावीत.

वाताचा अनुबंध असून रक्तदाबात जर वाढ झाली असेल तर रक्तगंधावटी द्यावी. सामता संपूर्ण नाहीशी होईपर्यंत संपूर्ण विश्रांती द्यावी. क्वचित रक्तपित्ताचे आधिक्य असल्यास रक्तमोक्षही योग्य प्रमाणात केल्यास उपयुक्त ठरतो.

वरील सर्व चिकित्सा करीत असताना गर्भिणीचे बलरक्षण करणे हा महत्त्वाचा भाग लक्षात ठेवावा.

आहारामध्ये (गोड) ताक, दूध, गहू, सातू यांचा वापर करावा. मीठ, दही, सर्व तऱ्हेच्या कोशिंबिरी, पापड, लोणची, मद्य, मांस वर्ज्य करावे. दिवसा निद्रा वर्ज्य, मैथुन वर्ज्य.

१ अविषह्ये विकारे तु श्रेयो गर्भस्य पातनम् ।
न गर्भिण्या विपर्यासस्तस्मात्प्राप्तं न हापयेत् ॥ सु. चि. १५–११

**कल्प :**

हरितकी, निशोत्तर, दंती, जयपाल, स्नुही, इंद्रवारुणी, कुटकी, गोमूत्र, लोहभस्म; ताम्रभस्म, पुनर्नवा, दशमूल, एरंडमूल, एरंडतैल, हेमशिलाजतू, गोमूत्र, हरितकी; आरोग्यवर्धिनी, चंद्रप्रभा, गंधर्वहरितकी, लोहपर्पटी, पुनर्नवामंडूर, पुनर्नवासव; कुमारी आसव, दशमूलारिष्ट, अश्वकंचुकी, नाराचरस.

वरील कल्प व त्यांची मात्रा गर्भिणीचे बलाबल पाहून वापरावेत.

अन्न : दूध, ताक, बाजरी, लसूण, कुलत्थ यूष, पुराण-यव व शाली.

विहार : संपूर्ण विश्रांती. व्यायाम वर्ज्य.

## ४. गर्भोपद्रव—अरुची

**व्याख्या :**

प्रक्षिप्तं तु मुखे चान्नं यच नास्वादते नरः अरोचक स विज्ञेयः ।

भावप्रकाश म. खं. पान ४७४

तोंडामध्ये घातलेल्या अन्नाची रुची लागत नाही. त्याचा स्वाद कळत नाही. रुचकर अन्न घेण्यामुळे बरे वाटण्याची जी संवेदना जिव्हेच्याद्वारा उत्पन्न होते ती होत नाही. या व्याधीस अरोचक असे म्हणतात.

'अरोचक' शब्दाशी समानार्थक असणारे काही शब्द आयुर्वेदीय वाङ्मयात येतात. 'अस्य वैरस्य', 'विरसास्यता', 'भक्तोपघात', 'अरुचि', 'अश्रद्धा', 'अभक्तः', 'छंद', 'अनन्नाभिलाषा', 'भक्तद्वेष'.—यामध्ये थोडाफार फरक असला तरी हे सामान्यतः समानार्थक शब्द आहेत असे म्हणता येईल. प्रमाणभेद आहे पण प्रकारभेद क्वचितच आढळतो.

**प्रकार :**

वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक, मानसज असे अरोचकाचे पाच प्रकार आहेत.

**कारणे :**

अग्निमांद्य, अजीर्ण, अतिगुरू, अतिस्निग्ध, अतिमधुर, एकरसात्मक असा आहार, चिंता, शोकभयादी मानसिक कारणे, दुर्गंधी व किळसवाणे पदार्थ पुढे येणे, अशुची अन्नसेवन या कारणांनी अरुची हा व्याधी उत्पन्न होतो.

– पृथग् दोषैः समस्तैर्वा मानसैः । (आरोचको भवेत्) च. चि. ८–६०



**[१]संप्राप्ती :**

अग्निमांद्यादी कारणांनी प्रकुपित झालेले दोष अन्नवह स्रोतस या स्थानाला दुष्ट करून जिव्हेच्या आश्रयाने अरुची हा व्याधी उत्पन्न करतात. दोषदुष्टी गंभीर असल्यास रसवह स्रोतसाचीही दुष्टी होते. आणि त्यामुळेही अरुची हा व्याधी उत्पन्न होतो. यासाठीच अन्नवह स्रोतसाबरोबरच रसवह स्रोतसाचे स्थान जे हृदय त्याचाही उल्लेख केला आहे. चरकाने रसदुष्टीने उत्पन्न होणाऱ्या विकारामध्ये याच दृष्टीने अश्रद्धा, अरुची अशा लक्षणांचा उल्लेख केला आहे (च. सू. २८–२३).

आमच्या मते अरोचक हा स्वतंत्र व्याधी असतो त्या वेळी त्यातील दोषदुष्टी व्याप्ती केवळ अन्नवह स्रोतसांपुरती मर्यादित असते. व्याधी परतंत्र असताना रसवह स्रोतसाच्या आश्रयाने असतो किंवा अरोचक हा व्याधी जेव्हा दारुण होतो तेव्हा संप्राप्तीला गंभीरता प्राप्त झालेली असते आणि त्यात रसवह स्रोतसही अन्नवह स्रोतसाबरोबर दुष्ट होते. अरोचक हा विकार व्याधी म्हणावा या स्वरूपात स्वतंत्रपणे क्वचित आढळतो. बहुधा तो ज्वरादी विकाराचे लक्षण म्हणून असतो.

**[२]पूर्वरूपे :**

अरोचकाची जी रूपे म्हणून सांगितलेली आहेत तीच अल्प प्रमाणात व्यक्त असताना त्यांना पूर्वरूपे म्हणावीत.

अग्निमांद्यादी कारणांनी गर्भिणीमधील प्रकुपित झालेले दोष वरीलप्रमाणेच संप्राप्तीतील घटना घडून अरोचक हा व्याधी उत्पन्न करतात. व त्यामुळे गर्भिणी व बालक यांचे पोषण ज्या प्रमाणात होणे आवश्यक असते त्या प्रमाणात होत नाही.

**[३]लक्षणे– वातज :**

तोंड तुरट होते. हृदयामध्ये वेदना होतात. कोणत्याही रसाची चव कळत नाही.

– दोषैः पृथक् सह च चित्तविपर्ययाच्च । भक्तायनेषु हृदि चावतते प्रगाढम् ॥
चान्ने रुचिर्भवति तं भिषजो विकारं । भक्तोपघातमिह पश्चविधं वदन्ति ॥
सु. उ. ५७–३

१ पृथग्दोषैः समस्तैर्वा जिह्वाहृदयसंश्रितैः । जायतेऽरुचिहारे द्विष्टैरर्थैश्च मानसैः ॥
च. चि. ८–६०

२ अरोचकानां प्रागूरूपाभिधानं, रूपाणामेव अव्यक्तानां प्रागूरूपत्वात् ।
सु. उ. ५७–४ टीका

३ हृच्छूलपीडनयुतं विरसाननत्वं । वातात्मके भवति लिङ्गमरोचके तु ॥
सु. उ. ५७–३

**[1] पित्तज :**

हृदयामध्ये दाह, चोष ही लक्षणे जाणवतात. तोंड कडू होते, आंबट होते, चव जाते, गरम वाटते, तहान लागते, मूर्च्छा येते.

**[2] कफज :**

तोंड खारट पडते, गोड होते, चिकट होते, खाज सुटते, जडपणा वाटतो, कफ फार सुटतो, अंग गळून गेल्यासारखे वाटते, तंद्रा, थंडी वाजते.

**सान्निपातिक :**

तिन्ही दोषांची लक्षणे असतात.

**मानसज :**

मानसिक कारणांनी उत्पन्न होणाऱ्या अरोचकामध्ये जरी जिभेला वातादी दोषांमुळे विशेष स्वरूपाची विकृत चव जाणवत नसली तरी अन्नाला रुची नसणे हे लक्षण येथेही असतेच. तसेच मानसिक कारण ज्या स्वरूपाचे असेल त्याप्रमाणे दोष-प्रकोप होऊन निरनिराळ्या दोषांच्याप्रमाणे लक्षणे उत्पन्न होतात. असे वाग्भटाच्या अरुणदत्त या टीकाकाराने सांगितले आहे. मानसिक कारणांनी अरोचक झाले असता अश्रद्धा व भक्तद्वेष ही लक्षणे विशेष असतात.

**उपद्रव :**

छर्दी, उत्क्लेश.

**साध्यासाध्यता :**

स्वतंत्र व केवळ अन्नवह स्रोतसाश्रित व्याधी साध्य असतो. उपद्रवात्मक व रसवह स्रोतसाश्रित कष्टसाध्य व असाध्य होतो.

१ हृद्दाहचोषबहुता मुखतिक्तता च । मूर्च्छा सतृड्भवति पितृकृते तथैव ॥
सु. उ. ५७–४

२ कण्डूगुरुत्वकफसंस्रवसादतन्द्राः । श्लेष्मात्मके मधुरमास्यमरोचके तु ॥
सु. उ. ५७–४

– विचित्रमन्नमरुचौ हितैरुपहितं हितम् । बहिरन्तर्मृजा चित्तनिर्वाणं हृद्यमौषधम् ।
द्वौ कालौ दन्तपवनं भक्षयेन्मुखधावनैः ।
कषायैः क्षालयेदास्यं धूमं प्रायोगिकं पिबेत् ॥ वा. चि. ५–४७



**रिष्ट लक्षणे :**

अत्यंत भक्तद्वेष वा अन्न पुढे येताच वा तोंडात घेताच उलटी होणे ही रिष्ट लक्षणे मानावीत.

**चिकित्सा :**

अरुचीमध्ये प्रथम अंतर व बाह्य शोधन करावे. [ परंतु गर्भिणीमध्ये मात्र शोधन वर्ज्य करावे. ( अंतरशोधन ). ]

बाह्य शोधनात तिक्त कषायरसाच्या वनस्पतीने सकाळ-संध्याकाळ तोंड स्वच्छ धुवावे. तिक्तरस न आवडणारा असला तरी अरुची घालवणारा आहे. तिक्तरसाच्या द्रव्यांच्या काढ्यांची गुळणी तोंडामध्ये धरावी. मिठाच्या पाण्याने गुळण्या कराव्या. जीभ घासावी. औषधी धूम्रपान करावे. गर्भिणीच्या दौहृदाच्या लक्षणांचा विचार ( छर्दी, भक्तद्वेष अशी ) करून मगच बाह्य शोधन करावे.

अंतःशुद्धीसाठी दोषानुरूप बस्ती, वमन, विरेचन यांचा उपयोग गर्भिणीचे बलाबल पाहून करावा. लंघन करावे. नंतर रुचकर असे नाना प्रकारचे पदार्थ खावयास द्यावे. निरनिराळी तोंडीलावणी द्यावीत. अम्ल-लवण-कडू ( तिखट ) हे रस चव उत्पन्न करणारे आहेत, म्हणून यांचा उपयोग करावा. मन प्रसन्न राहील अशी व्यवस्था करावी. आवडणारे पदार्थ खावयास द्यावे.

**कल्प :**

महाळुंग, लिंबू, आले, सुंठ, मिरी, पिंपळी, आमसूल, जिरे, तालिसपत्र, कुटकी, काडेचिराईत, हिंग, सैंधव, पांदेलोण.

डोंगरी आवळ्याची, सुपारी, आवळ्याचे सरबत.

पंचकोलासव, द्राक्षासव, आरोग्यवर्धिनी, अष्टाङ्गलवणचूर्ण.

**पथ्य :**

अजीर्ण होऊ देऊ नये. ( गर्भिणीमध्ये हे कटाक्षाने पाळावे. ) लघुद्रव आम्ल-रसात्मक आहार द्यावा. आले लावलेले ताक उत्तम.

## ५. गर्भोपद्रव– ( वैवर्ण्य )–पांडुरोग

मागे दिलेल्या हारितसंहितेप्रमाणे जे आठ गर्भोपद्रव दिले आहेत, त्यांतील 'विवर्ण' या शब्दाने पांडू हा व्याधी घ्यावा असे आमचे मत आहे.

– अरुचौ कवलग्राहा धूमाः समुखधावनाः ।
मनोज्ञमन्नपानं च हर्षणाश्वासनानि च ॥ च. चि. २६–२१५

**[1] व्याख्या :**

पांडुत्व, पांडुरकेपणा, फिकेपणा हे प्रधान लक्षण ज्या व्याधीत शरीरावर दिसू लागते त्या व्याधीस पांडुरोग असे म्हणतात.

[2]गर्भिणीमध्ये पुढीलप्रमाणे पांडूची उपपत्ती दिसून येते. रसवह स्रोतसे नाभी-भोवती पुष्कळच आहेत. गर्भ वाढू लागला की त्याचा भार या स्रोतसांवर पडतो. तसेच रक्तगुल्मही वाढू लागला की गर्भाप्रमाणेच याचाही भार त्या रसवह स्रोतसांवर येतो. ही स्रोतसे या भाराने दाबली गेली की रस सहजपणे वाहू शकत नाही. त्यामुळे मुखाला फिकटपणा येतो.

**स्वभाव :**

दारुण.

**मार्ग :**

अभ्यंतरमार्ग.

**[3] प्रकार :**

वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक आणि मृज्जन्य असे पांडुरोगाचे पाच प्रकार आहेत.

१ स कामलापानकिपाण्डुरोगः ।
कुम्भाह्वयो लाघ ( ब ) रकोऽलसाख्यः ।
विभाष्यते । सु. उ. ४४–६, पान ७५

२ सर्वा रसवहा नाड्या समंतान्नाभिमाश्रिताः ॥
गर्भो विवर्धमानश्च संपीडयति ताः स्त्रियाः ।
तद्वच्च रक्तगुल्मोऽपि पीडयन्नुपचीयते ॥
ताभिश्च पीड्यमानाभिर्न सम्यग् वर्तते रसः ।
आपाण्डु गण्डतादीनि लक्षणानि भवन्त्यतः ॥ काश्यपसंहिता

३ पाण्डुरोगाः स्मृताः पञ्च वातपित्तकफैस्त्रयः ।
चतुर्थः सन्निपातेन पञ्चमो भक्षणान्मृदः ॥ मा. नि. पाण्डु १, पान ११२



**[1] कारणे :**

क्षार, अम्ल, अतिउष्ण, तीक्ष्ण, विरुद्ध, असात्म्य असे अन्न सेवन केल्यामुळे; शिंबीधान्य (पावटा, उडीद), तिळाचे तेल असे पदार्थ अधिक खाल्ल्यामुळे, अन्नाचा विदाह झालेला असतानाही दिवसा झोपल्यामुळे, व्यायाम वा मैथुन केल्यामुळे पंच-कर्माचे मिथ्यायोग, ऋतुवैषम्य, वेगविधारण, काम, चिंता, भय, क्रोध, शोक यांनी मन व्याकुळ होणे ही कारणे पांडुरोगाच्या उत्पत्तीस कारण होतात.

**[2] संप्राप्ती :**

पित्त प्रकुपित होऊन ते रसरक्ताचे आश्रयस्थान जे हृदय त्याचा आश्रय करते. वायूच्या प्रेरणेने रसवाहिन्यांतून सर्व शरीर व्यापते. त्वचा व मांस यांच्या आश्रयाने कफ, वात, रक्त, त्वचा, मांस या शरीरभावांना दुष्ट करून शरीरावर दोषभेदानुरूप वा अवस्थानुरूप निरनिराळे वर्ण (त्वचेवर) उत्पन्न करते. या वर्णामध्ये पांडुता ही सर्व वर्णसामान्य अशी असते. पांडुवर्ण अधिक प्रमाणात असतो. (पांडुत्वं तेषु चाधिकं। वा. नि. १३–३) म्हणूनच या व्याधीला पांडुरोग असे म्हणतात. पित्तामुळे प्रथमतः रसाची दुष्टी होऊन सर्व धातूंमध्ये शैथिल्य येते. शरीरात जडपणा जाणवतो. शरीरा-तील वर्ण, बल, स्नेह हे भाव वा ओजाचे स्थिर, मृदू, प्रसन्न इत्यादी गुण नाहीसे होऊ लागतात. पित्ताचा रसधातूवर परिणाम झालेला असल्यामुळे रक्तपोषक अशा रसभागाची विकृती होऊन रक्ताची उत्पत्तीच होत नाही. त्यामुळे शरीरातील रक्ताचे प्रमाण अल्पाल्प होत जाते. शरीर निःस्सार होते. इंद्रिये शिथिल होतात. (मेद कमी होत जातो.) त्वचा विवर्ण होते.

१ क्षाराम्ललवणात्युष्णविरुद्धासात्म्यभोजनात् ।
निष्पावमाषपिण्याकतिलतैलनिषेवणात् ॥
विदग्धेऽन्ने दिवास्वप्नाद्व्यायामान्मैथुनात्तथा ।
प्रतिकर्मर्तुवैषम्याद्वेगानां च विधारणात् ।
कामचिन्ताभयक्रोधशोकोपहतचेतसः ॥ च. चि. १६–७ ते ९

२ समुदीर्णं यदा पित्तं हृदये समवस्थितम् ।
वायुना बलिना क्षिप्तं संप्राप्य धमनीर्दश ॥
प्रपन्नं केवलं देहं त्वङ्मांसान्तरमाश्रितम् ।
प्रदूष्य कफवातासृक्त्वङ्मांसानि करोति तत् ॥
पाण्डुहारिद्रहरितान् वर्णान्बहुविधांस्त्वपि ।
स पाण्डुरोग इत्युक्तः ॥ च. चि. १६–९ ते ११

व्याधीचा उद्‌भवच रसवह स्रोतसांत होतो. अधिष्ठान रक्तात असते आणि संचार सर्व शरीरभर विशेषतः हृदय, यकृत, प्लीहा, त्वचा व मांस या ठिकाणी असतो.

सुश्रुताने पांडुरोगाच्या संप्राप्तीत "विदूष्य रसं कुर्वंति दोषाः त्वचि पांडुभावम् ।" असे म्हणून रक्तदुष्टीचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे. त्यामुळे पांडूच्या सामान्य-संप्राप्तीतील दोष जरी पित्त हा असला तरी दूष्य कोणते, रस की रक्त, अशी शंका उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. रसदृष्टीच्या प्रकरणात सुश्रुतानेही स्पष्टपणे चरका-प्रमाणेच पांडुरोग उल्लेखिलेला आहे ( सु. सू. २४-९ ). त्यामुळे पांडुरोगाच्या सामान्य संप्राप्तीत दूष्य म्हणून रसधातूच मानावा आणि रसदुष्टीचा परिणाम रक्त-क्षयात होतो असे समजावे. सुश्रुताचा रक्तस्रावोत्पन्न पांडूशी संबंध वरचेवर येत असावा; कारण तो शस्त्रवैद्य होता आणि म्हणून त्याने रक्ताचा उल्लेख केला असावा, असे मात्र नाही. कारण सुश्रुताचे वचन व्यवायादी निजकारणाने उत्पन्न होणाऱ्या पांडुरोगाचेच आहे हे स्पष्ट दिसते. चिकित्सेमध्ये रक्तधातूच्या दृष्टीने विशेष चिकित्सा करावी लागत असल्याने संप्राप्तीमध्ये सुश्रुताने व्यवहारोपयोगी दृष्टीने रक्ताला महत्त्व दिले असावे. रस व रक्त हे समान अधिष्ठानाचे असल्याने या उल्लेखामुळे रसदुष्टीचे महत्त्व बाधित होते असे मानावयाचे कारण नाही.

## १ पूर्वरूपे :

पांडुरोगाच्या पूर्वरूपामध्ये हृत्स्पंद ( छातीत धडधडणे ), रूक्षता, अक्षिकूटशोथ, वरचेवर थुंकावेसे वाटणे, अरुची, अग्निमांद्य, अविपाक, अंगसाद, श्रम, त्वचा रूक्ष होणे, मलमूत्रांना अल्प पीतत्व येणे अशी लक्षणे दिसतात.

– दोषाः पित्तप्रधानास्तु यस्य कुप्यन्ति धातुषु ।
शैथिल्यं तस्य धातूनां गौरवं चोपजायते ॥
ततो वर्णबलस्नेहा ये चान्येऽप्योजसो गुणाः ।
व्रजन्ति क्षयमत्यर्थं दोष दूष्यप्रदूषणात् ॥
सोऽल्परक्तोऽल्पमेदस्को निः सारः शिथिलेन्द्रियः ।
वैवर्ण्यं भजते । च. चि. १६–४ ते ६

१ प्राग्रूपमस्य हृदयस्पन्दनं रूक्षता त्वचि । अरुचिः पीतमूत्रत्वं स्वेदभावोऽल्पवह्निता ।
सादः श्रमः । वा. नि. १३–८, पान ५१८

– त्वक्स्फोटनं ष्ठीवनगात्रसादौ मृद्भक्षणं प्रेक्षणकूटशोथः ।
विण्मूत्रपीतत्वमथाविपाको भविष्यतस्तस्य पुरःसराणि ॥ सु. उ. ४४–५, पान ७२९

– पिपासारुचिहृल्लासैश्छर्दीदाहोऽङ्गगौरवम् ।
रक्तलोचनता तस्य पूर्वरूपस्य लक्षणम् ॥ वंगसेन पांडु, पान १९५



## रूपे :

पांडूच्या सामान्यरूपात अक्षिकूट शोथ, हृत्साद, रूक्षता, नख, नेत्र, त्वचा, ओष्ठ, तालू यांच्या ठिकाणी पांडुता, कानात आवाज होणे, अग्नी मंद होणे, दौर्बल्य, अंग गळून गेल्यासारणे वाटणे, अन्नद्वेष, भ्रम, श्रम, ज्वर, श्वास, गौरव, अरुची, शरीर ठेचले गेल्याप्रमाणे वेदना, पिंडिकोद्वेष, कंबर, मांड्या, पाय गळून जाणे व त्या ठिकाणी वेदना होणे, चढणे श्रमाचे वाटणे [ चढण्याच्या श्रमाने मांड्या, पाय गळून जाणे, भरून येणे ] मोठे केस गळणे, निस्तेजपणा येणे, हृदय द्रवणे [ पातळ होऊन आकाराने मोठे ] अशी लक्षणे दिसतात. रोगी त्रासिक व चिडचिडा होतो. त्याला थंडी नकोशी होते, झोप येते. फार बोलू नयेसे वाटते.

गर्भिणीमध्ये काही वेळा गर्भिणीला माती खाण्याची तीव्र इच्छा उत्पन्न होऊन ती बरेच दिवस सातत्याने खाल्ली जाते व त्यामुळे मृद्‌जन्य पांडूच्याप्रमाणेच गर्भिणीला पांडू हा उपद्रव होतो. तसेच काही वेळा वर उद्‌धृत केलेल्या कारणांमुळे गर्भिणीचे पित्त प्रकुपित होऊन वरीलप्रमाणे संप्राप्तीतील घटना पांडु हा गर्भोपद्रव उत्पन्न होतो.

गर्भिणीमध्ये पांडू लक्षण व व्याधी यात व्यवच्छेद करावा लागतो. ज्या वेळी गर्भाच्या प्रपीडनामुळे उत्पन्न होणारे पांडू हे लक्षण असते त्या वेळी ते एकटेच सापडते. परंतु पांडू हा रोग म्हणजेच उपद्रव असेल त्या वेळी जतिपांडू हे लक्षण असून त्याच्याबरोबर अक्षिकूट शोथ, हृत्स्पंद, क्षुद्र श्वास, भ्रम, दौर्बल्य, शिरा-शैथिल्य असा लक्षण-समुच्चय दिसून येतो, त्या वेळी तो गर्भोपद्रव समजून त्वरित चिकित्सा करावी.

## १ वातज पांडू :

वातकर आहार-विहारांनी वायू प्रकुपित होऊन पांडूरोग उत्पन्न होतो. या प्रकारा-

– तेन गौरवम् ।
धातूनां स्याच्च शैथिल्यमोजसश्च गुणक्षयः ॥
ततोऽल्परक्तमेदस्को निःसारः स्याच्छ्लथेन्द्रियः ।
मृद्यमानैरिवाङ्गैर्ना द्रवता हृदयेन च ॥
शूनाक्षिकूटः सदनः कोपनः ष्ठीवनोऽल्पवाक् ।
अन्नद्विट् शिशिरद्वेषी शीर्णरोमा हतानलः ॥
सन्नसक्थो ज्वरी श्वासी कर्णक्ष्वेडी भ्रमी श्रमी । वा. नि. १३–४ ते ६

१ आहारैरुपचारैश्च वातलैः कुपितोऽनिलः ।
जनयेत्कृष्णपाण्डुत्वं तथा रूक्षारुणाङ्गताम् ॥
अङ्गमर्दरुजं तोदं कम्पं पार्श्वशिरोरुजम् ।
वर्चः शोषास्यवैरस्यशोफानाहबलक्षयात् ॥ च. चि. १६–१७,–१८

मध्ये त्वचा, वदन, नेत्र, नख, मूत्र, पुरीष यांचा वर्ण श्याव, कृष्ण, अरुण यांच्या छटांनी युक्त असा पांडुर असतो. त्वचा अधिक रूक्ष होते. रुजा, तोद, अंगमर्द, कंप, पार्श्वशूल, शिरःशूल, पुरीष शुष्क होणे, मुखवैरस्य शोथ, आनाह, बलक्षय अशी लक्षणे असतात. सुश्रुताने ' युक्तं तथाऽन्यैस्तदुपद्रवैश्च । ' ( सु. उ. ४४–७ ) असे म्हणून वाताच्या इतर लक्षणांचाही समावेश यात करावा असे सांगितले आहे.

## [1]पित्तज पांडु :

पित्तकर आहर-विहाराने प्रकुपित झालेले पित्त रक्तादींना दुष्ट करून पांडरोग उत्पन्न करते. या प्रकारच्या पांडुतेत पिवळट, हिरवट छटा दिसते. नख, नेत्र, मूत्र, त्वचा इत्यादींचा वर्ण पिवळसर असतो. ज्वर, दाह, तृष्णा, मूर्च्छा, पिपासा, स्वेद, शीतेच्छा, कटुकास्यता, अम्लोद्गार, विदाह, दुर्गंधी, द्रवमलप्रवृत्ती, दौर्बल्य, तम [ अंधारी येणे ] ही लक्षणे असतात. विदाह हे लक्षण अन्नाच्या विदग्धावस्थेने उत्पन्न होते. आंबट व उष्ण पदार्थ रोग्यास सोसत नाहीत. हारिताने आम उत्पन्न होणे [ अन्न न पचणे ], कोरड पडणे, मोह आणि शोथ अशी लक्षणे सांगितली आहेत. ( हारीत तृतीयस्थान ८, पृ. २५८ ).

## [2]कफज पांडु :

कफकर आहार-विहारांनी प्रकुपित झालेला कफ पांडुरोग उत्पन्न करतो. या प्रकारामध्ये जडपणा, मंदता, छर्दी, प्रसेक, रोमहर्ष, गात्रसाद, मूर्च्छा, भ्रम, क्लम, श्वास, कास, आलस्य, अरुची, वाग्रह, शोथ, मधुरास्यत्व, अशी लक्षणे असतात. त्वचेचा वर्ण

१ पित्तलस्याचितं पित्तं यथोक्तैः स्वैः प्रकोपणैः ।
दूषयित्वा तु रक्तादीन् पाण्डुरोगाय कल्पते ॥
स पीतो हरिताभो वा ज्वरदाहसमन्वितः ।
तृष्णामूर्च्छापिपासार्तः पीतमूत्रशकृन्नरः ॥
स्वेदनः शीतकामश्च न चान्नमभिनन्दति ।
कटुकास्यो न चास्यौष्णमुपशेतेऽम्लमेव च ॥
उद्गारोऽम्लो विदाहश्च विदग्धेऽन्नेऽस्य जायते ।
दौर्गन्ध्यं भिन्नवर्चस्त्वं दौर्बल्यं तम एव च ॥ च. चि. १६–१९ ते २२

२ विवृद्धः श्लेष्मलैः श्लेष्मा पाण्डुरोगं स पूर्ववत् ।
करोति गौरवं तन्द्रां छर्दि श्वेतावभासताम् ॥
प्रसेकं लोमहर्षं च सादं मूर्च्छां भ्रम क्लमम् ।
श्वासं कासं तथाऽऽलस्यमरुचिं वाक्स्वरग्रहम् ॥
शुक्लपत्राक्षिवर्चस्त्वं कटुरूक्षोष्णकामताम् ।
श्वयथुं मधुरास्यत्वमिति पांड्वामयः कफात् ॥ च. चि. १६–२३



अधिक पांढरा असतो. नख, मूत्र, मल याचा वर्ण श्वेत असतो. रुग्णाला तिखट, रूक्ष, उष्ण असे पदार्थ खावेसे वाटतात.

## [1]सान्निपातिक पांडु :

सर्व प्रकारच्या मिथ्याहारविहाराने प्रकुपित झालेले दोष सान्निपातज पांडु उत्पन्न करतात. त्यांमध्ये तिन्ही दोषांची लक्षणे दिसतात. तंद्रा, शोथ, आलस्य, छर्दी, कास, हृल्लास, शोष, द्रवमलप्रवृत्ती, नेत्ररूक्षता, ज्वर, क्षुधा, मोह, तृष्णा, क्लम अशी लक्षणे असतात.

## [2]मृज्जन्य पांडु :

नेहमी माती खाणाऱ्या व्यक्तींमध्ये (बालके व अडाणी स्त्रिया यांमध्ये) माती खाण्याची सवय फार असते. माती तुरट, खारट, मधुर रसाची असेल त्याप्रमाणे वात, पित्त, कफ या दोषांचा अनुक्रमे प्रकोप होतो. माती ही आपल्या रूक्ष गुणाने आहाररसाचेही रूक्षण करते आणि त्या आम आहाराबरोबर स्रोतसांमध्ये शिरून स्रोतोरोध उत्पन्न करते. इंद्रियांचे बल कमी होते. शरीराचे तेज, वीर्य, ओज, नाहीसे होतात. बल, वर्ण, अग्नी यांचा नाश होतो. आणि पांडुरोग उत्पन्न होतो. या प्रकारामध्ये अक्षिकूट, गंडप्रदेश यावर असणारी सूज अधिक प्रमाणात असते. पाय, नाभी, शिस्न (उपस्थ) हीही सुजतात. मलप्रवृत्ती कफयुक्त, रक्तयुक्त आणि द्रव अशी होते. उदरामध्ये कृमीही होतात.

१ सर्वान्नसेविनः सर्वे दुष्टा दोषास्त्रिदोषजम् ।
त्रिदोषलिङ्गं कुर्वन्ति पाण्डुरोगं सुदुःसहम् ॥ च. चि. १६–२६, पान १२१९
– तन्द्रालस्यं श्वयथुवमथू कासहृल्लासशोषा ।
विष्ठाभेदः परुषनयने सज्वरो वै क्षुधार्तः ॥
मोहस्तृष्णाक्लममय नरस्याशु पश्येत्सुदूरं ।
त्याज्यो वैद्यैर्निपुणमतिभिः सन्निपातोत्थपाण्डुः ॥ हारित, पान २५९

२ मृत्तिकादशनशीलस्य कुप्यत्यन्यतमो मलः ।
कषाया मारुतं, पित्तमूषरा, मधुरा कफम् ॥
कोपयेन्मृद्रसादींश्च रौक्षाद्भुक्तं विरुक्षयेत् ।
पूरयत्यविपक्वैव स्रोतांसि निरुणद्धि च ॥
इन्द्रियाणां बलं हत्वा तेजो वीर्योजसी तथा ।
पाण्डुरोगं करोत्याशु बलवर्णाग्निनाशनम् ॥
शूनगण्डाक्षिकूटभ्रूः शूनपान्नाभिमेहनः ।
क्रिमिकोष्ठोऽतिसार्येत मलं सासृक् कफान्वितम् ॥
च. चि. २६–२७ ते ३०, पान १२१९–२०

**उपद्रव :**

अरुची, तृष्णा, छर्दी, ज्वर, शिरःशूल, अग्निमांद्य, शोथ, दौर्बल्य, मूर्च्छा, क्लम, हृद्रोग, घसा सुजणे.

हृद्विकार, अग्निमांद्य, कर्णनाद, कामला, कष्टप्रसूती, मूढगर्भ, मृतगर्भ, स्तन्यक्षय (प्रसवानंतर स्तन्याचा अभाव किंवा क्षय), सूतिकारोग (उदा०—योनिदुष्टी वगैरे), प्रसवोत्तर रक्तस्राव.

**[1] साध्यासाध्यत्व :**

पांडुरोग उत्पन्न होऊन फार दिवस झाले असल्यास, तो गंभीर झाला असल्यास असाध्य होतो. सर्वांगावर शोथ येणे आणि सर्व वस्तू पिवळ्या दिसू लागणे हे असाध्यतेचे द्योतक आहे. मलप्रवृत्ती द्रव, कफयुक्त, हिरवट रंगाची व थोडीथोडी, थांबून थांबून होणे, दीनता येणे, त्वचा अत्यंत पांढरी फटक होणे व छर्दी, मूर्च्छा, तृषा ही लक्षणे. रक्तक्षय अतिशय झाल्यामुळे पांडुता, श्वेतता येणे अशा स्थितीत रोगी जगत नाही.

**चिकित्सा :**

पांडुरोगामध्ये प्रथमतः स्नेहन, स्वेदन देऊन मग बलाबल असेल त्याप्रमाणे तीक्ष्ण अशी वमन-विरेचन द्रव्ये द्यावीत. गर्भिणीमध्ये मात्र तीक्ष्ण वमन-विरेचन द्रव्यांचा वापर करू नये. कोष्ठ शुद्ध झाल्यानंतर पुराण शाली, गोधूम, यूष, जांगल मांस असा हितकर आहार वापरावा. स्नेहनासाठी पंचगव्यघृत महातिक्तकघृत किंवा कल्याणघृत वापरावे.

लोहभस्म हे गोमूत्र व हरितकीक्वाथ भावित (भावना दिलेले) वापरावे.

१ पाण्डुरोगश्चिरोत्पन्नः खरीभूतो न सिध्यति । ... ... ... ... ... ...
... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...
विवर्जयेत्पाण्डुकिनं यशोऽर्थी तथाऽतिसारज्वरपीडितं च ।
मा. नि. पाण्डु १२ ते १५, पान ११५

तत्र पाण्ड्वामयी स्निग्धस्तीक्ष्णैरूर्ध्वानुलोमिकैः । ... ... ... ... ... ...
स्नेहनार्थं घृतं दद्यात्कामलापाण्डुरोगिणे ॥ च. चि. १६–४० ते ४३

साध्यं च पाण्ड्वामयिनं ... ... ... ... ... ... सम्पादयेत्क्षौद्रघृतप्रगाढै-
र्हरीतकीलोहरजःप्रयोगैः ॥ यो. र. पान १४१

— हरेच्च दोषान् बहुशोऽल्पमात्रान् । स्वयेद्धि दोषेष्वतिनिर्हृतेषु ॥ सु. उ. ४४–१८
— यथा दोषं प्रकुर्वीत भैषज्यं पाण्डुरोगिणाम् ।
**क्रियाविशेष एषोऽस्य मतो हेतुविशेषतः ॥ च. चि. १६–१२३**



पांडुरोगामध्ये दोषशोधन हे थोड्याथोड्या प्रमाणात पण वरचेवर करावे. अधिक प्रमाणात एकदम दोषांचे शोधन झाल्यास शोथ येण्याची भीती असते.

पांडुरोगावर स्नेहन, रक्तवर्धक व अग्निदीपन अशी चिकित्सा करावी.

पांडुरोगामध्ये दोषलक्षणे वा अवस्था असतील त्याप्रमाणे चिकित्सा करावी.

वातप्रधान्य असेल तर स्नेहप्रधान, पित्तासाठी तिक्तरसात्मक व शीतवीर्य आणि कफप्रकोपासाठी कटुतिक्तरसात्मक व उष्णवीर्य अशा द्रव्यांनी चिकित्सा करावी.

[1] मृद्भक्षणामुळे शरीरात झालेला उपलेप नाहीसा करण्यासाठी शोधनद्रव्ये वापरावीत. ती तीक्ष्ण असावीत की मृदू असावीत ते गर्भिणीमध्ये बलाबल पाहूनच वापरावीत. शरीर शुद्ध झाल्यानंतर बलवर्धक अशी घृते वापरावीत.

गर्भिणीमध्ये वर दिलेल्या चिकित्सेच्या धोरणाचा अवलंब करून पांडुता (रक्ताचे शरीरातील प्रमाण) कमी न झाल्यास साक्षात सिरांच्या मार्फत रक्त द्यावे.

**[2] कल्प :**

दाडिम, आमलकी, फालसा, द्राक्षा, करवंद, आंबा (कलमी), गोदुग्ध, घृत, गुडूची, शतावरी, काडेचिराईत, अश्वगंधा, लोह, अभ्रक, ताम्र, सुवर्ण माक्षिक, वंग, यांची भस्मे; मुक्तापिष्टी व यकृतरस.

आरोग्यवर्धिनी, सूतशेखर, योगराज, ताप्यादिलोह, नवायस चूर्ण, नवजीवन रस, लक्ष्मीविलास, लोहपर्पटी, लोहासव, द्राक्षासव, दशमूलारिष्ट, यकृतपाश.

**आहार :**

फलरस, यूष, जीर्ण शाली, पुराण गोधूम, जाङ्गल मांस, यकृत रस.

**विहार :**

श्रम, धावणे, चढणे वर्ज्य करावे.

— वातिके स्नेहभूयिष्ठं पैत्तिके तिक्तशीतलम् ।
श्लैष्मिके कटुतिक्तोष्णं विमिश्रं सान्निपातिके ॥ च. चि. १६–११६

१ निपातयेच्छरीरात्तु मृत्तिकां भक्षितां भिषक् । ... ... ... ... ... ...
... ... ... व्योषं बिल्वं हरिद्रे द्वे त्रिफलाद्वे पुनर्नवे ॥ च. चि. १६–११८

२ यवगोधूमशाल्यन्नं रसैर्जाङ्गलजैः शुभैः ।
मुद्गाढकीमसूराद्यैः पाण्डौ भोजनमिष्यते ॥ यो. र. पान २९८

— वह्निमातपमायासमन्नपानं च पित्तलम् ।
मैथुनं क्रोधमध्वानं पाण्डुरोगी सदा त्यजेत् ॥ यो. र. २९८

**अपथ्य :**

पित्तकर अन्न, अग्निसेवन (उन्हात हिंडणे), व्यायाम करणे, चालणे, रागावणे; मैथुन या सर्व गोष्टी वर्ज्य कराव्यात.

## ६. गर्भोपद्रव—हृद्रोग

**शारीर :**

हृद्रोगाच्या वर्णनापूर्वी हृदय या अवयवाचे स्थान, स्वरूप, कार्य, तदाश्रित भावविशेष यांचा विचार केला पाहिजे.

हृदय हा मांसपेशींनी घटित असा अवयव आहे. गर्भावक्रान्तीमध्ये त्याची उत्पत्ती रक्त व कफ यांच्या प्रसादभावापासून होते (सु. शा. ४–३१). हृदय हे अधोमुख कमलाच्या आकाराचे असून ते उरामध्ये दोन स्तनांच्यामध्ये किंचित डाव्या बाजूला, आमाशयाच्या मुखाजवळ असते. रस, रक्त, ओज हे धातूचे धारण–पोषण करणारे भाव शरीराला पुरविण्याचे कार्य या अवयवांतून होते. सत्त्व, रज, तम हे तीन गुण. चैतन्य, विषयग्रहण सामर्थ्य, सर्व शरीराची नियंत्रणशक्ती हे सर्व परमार्थतः हृदयात असते, असें योगशास्त्राचे मत असून, त्याचाच अनुवाद आयुर्वेदीयांनी केला आहे.

- द्वारमामाशयस्य च सत्वादिधाम हृदयं स्तनोरः कोष्ठमध्यगम् । हृदयं नाम यन्मर्म तदपि सद्योध्नम् । तच्चामाशयस्य द्वारं-मुखम् । तेन हि द्वारेणान्नपानमामाशये प्रविशति । तच्च सत्वादीनां—सत्यरजस्तमसां, तथा विज्ञानस्य—इन्द्रियाणां चार्थपञ्चकस्य, तथाऽऽत्मनः चेतसः, धामस्थानम् । तच्च स्तनोरः कोष्ठमध्यगम् । स्तनौ चोरश्च कोष्ठश्च स्तनोरः कोष्ठं, तस्य मध्यं, तत्र गच्छति—स्थितिं बध्नाति, कोष्ठवक्षसोः स्तनयोश्चमध्ये स्थितमित्यर्थः । वा. शा. ४–१३ सटीक पान ४१०
- कफरक्तप्रसादात्स्याद्धृदयंस्थानमोजसः । ... ... यकृत्फुफ्फुसमास्थितम् ॥ वा. शा. ३–१२, टीका पान ३८७
- अर्थे दश महामूलाः.......हृदि संश्रितम् । च. सू. ३०–३–४, पान ३८८
- तत्र हृदये दशधमन्यः......इव प्रतिष्ठितानि । च. सि. ९–४
- यद्धि तत्स्पर्शविज्ञानं......तस्मादुक्तं चिकित्सकैः । च. सू. ३०–६, ७
- तेन मूलेन......विधम्यन्ते समन्ततः । च. सू. ३०–८, पान ३९०
- हृदयं मनसः......सम्यग् ज्योतिः समाहिताः । वा. सू. १२–१५, टीका पान १९४



**कार्य :**

रस-विक्षेपणाचे कार्य ज्या वाताच्या प्रेरणेवर अवलंबून असते तो व्यान हृदयाच्या आश्रयाने राहतो. हृदयाचा संकोच-विकास घडवून तत्द्वारा सर्व शरीरभर रसरक्ताचे विक्षेपण करतो. या संकोच-विकासामुळे हृदयाच्या ठिकाणी लयबद्ध अशी विशिष्ट ध्वनीची निर्मिती होते. या स्पंदनामुळेच हृदयामध्ये असलेला प्रसादरूप पोषक असा आहार-रस व शरीराचे जीवन चालविणारे रक्त सर्व धातूंचे पोषण करण्यासाठी रसवाहिनीतून सर्व शरीरभर विक्षिप्त होते. आणि तेथून पुन्हा प्राणाचे अनुवर्तन व्हावे, यासाठी परत हृदयात येते. हृदयातून बाहेर शरीरात जाणे व बाहेरून हृदयात परत येणे या घटनेचे वर्णन 'परिवृत्तिस्तु चक्रवत्' या शब्दाने आयुर्वेदीयांनी केले आहे.

**हृदयस्थ भावविशेष :**

हृदयाचे शारीर व कार्य यांसवेच हृदयामध्ये राहणाऱ्या इतर भावविशेषांचाही विचार लक्षात घेतल्यावाचून हृद्रोगाची संपूर्ण कल्पना येणे अवघड आहे. यासाठी येथे क्रमाक्रमाने हृदयातील भावविशेष व त्यांची प्रकृत–विकृत कर्मे यांचा विचार केला पाहिजे.

हृदय हा अवयव ज्याने घटित आहे असा मांसधातू, शरीराचे पोषण करणारा रसधातू, रसासवे सर्व शरीरात फिरणारा जीवनगुणयुक्त रक्तधातू, जीवनाधार असे अष्टबिंद्वात्मक ओज, वर्ण, कान्ती, बल, उत्साह, कार्यक्षमता यांना कारणीभूत होणारे शुद्ध, प्रकृत, कफ स्वरूपाचे अर्धांजलीप्रमाण ओज, अवलंबक कफ, साधक पित्त, प्राण, व्यान, उदान हे वाताचे प्रकार इतके भाव हृदयामध्ये राहतात. हृदय हे रसवह व प्राणवह स्रोतसांचे मूल म्हणूनही सांगितले आहे.

**हृद्रोगाची व्याख्या :**

हृदि बाधां प्रकुर्वन्ति हृद्रोगं तं प्रचक्षते । मा. नि. हृद्रोग २, पृ. २३८

हृदय या अवयवामध्ये निरनिराळ्या प्रकारची विकृती उत्पन्न होते व व्याधीची लक्षणे दिसू लागतात. म्हणून या व्याधीस हृद्रोग असे म्हणतात.

हृदय हे मर्म असल्यामुळे हृद्रोग हा कष्टद, दारुण असा व्याधी आहे.

- व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा ।
  युगपत्सर्वतोऽजस्त्रं देहे विक्षिप्यते सदा ॥ च. चि. १५–३६, पान ११९१
- संतत्या भोज्यधातूनां परिवृत्तिस्तु चक्रवत् । च. चि. १५–२१ पान ११८९
- रसो यः स्वच्छतां यातः स तत्रैवावतिष्ठते ।
  ततो व्यानेन विक्षिप्तं कृत्स्नं देहं प्रपद्यते ॥ वा. सू. १२–१५ सटीक, पान १९४

**[1]प्रकार :**

वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक, व कृमिज.

**[2]कारणे :**

व्यायाम, वेगविधारण, विशेषतः छर्दीवेगविधारण, शोधन, लेखन अपतर्पण या कर्मांनी कर्षण होईल असे वागणे, मार लागणे, तीक्ष्ण विरेचन वा तीक्ष्ण बस्ती यांचा अतियोग, अतिगुरू, कषाय, तिक्तरसप्रधान, अतिरूक्ष व अतिस्निग्ध असे अन्न-सेवन करणे; विरुद्ध असात्म्य अजीर्ण करणारे असे भोजन करणे, अध्यशन करण (आमवातादी), रोगाचे उपचार व्हावे तसे न होणे; भीती, काळजी, शोक. त्रास या मानसिक विकारांनी पीडित होणे, या कारणांनी हृद्रोग उत्पन्न होतो. वाग्भटाने गूल्माची जी कारणे सांगितली आहेत तीच हृद्रोगामध्ये असतात असे म्हटले आहे.

**[3]संप्राप्ती :**

निदानामध्ये सांगितलेल्या कारणांनी दोष प्रकोप होऊन ते दोष रसधातूलाही दुष्ट करतात. हा दुष्ट झालेला रसधातू चिंता, व्यायामादी कारणांनी वैगुण्य उत्पन्न झालेल्या हृदयामध्ये येतो. त्या वेळी तेथेच त्याचा संग होऊन हृद्रोग हा व्याधी उत्पन्न होतो.

हृद्रोगाचा उद्‌भव रसधातूमध्ये, अधिष्ठान हृदय या अवयवात आणि संचार व्यान प्राणोदानाच्या क्षेत्रात होतो.

१ हृदामयः पंचविधः प्रदिष्टः । मा. नि. हृद्रोग १

२ अत्युष्णगुर्वन्नकषायतिक्तश्रमाभिघाताध्यशनप्रसङ्गैः ।
संचिन्त्यनैर्वेगविधारणैश्च हृदामयः पञ्चविधः प्रदिष्टः । मा. नि. हृद्रोग- १ पान २३८

– व्यायामतीक्ष्णाति...हृद्रोगकर्तृणि तथाऽभिघातः ॥ च. चि. २६–७७, पान १४१२

– वेगाघातोष्णरूक्षान्नै......श्चापि ( ति ) भोजनैः ॥ सु. उ. ४३–३

– तेषां गुल्मनिदानोक्तैः समुत्थानैश्च संभवः । अ. सं. नि. ५, पान ३५

३ दूषयित्वा रसं दोषा विगुणा हृदयं गताः ।
कुर्वन्ति हृदये बाधां हृद्रोगं तं प्रचक्षते ॥ सु. उ. ४३–४ पान ७२७

– तस्य संप्राप्तिं सामान्यलक्षणं चाह– दूषयित्वेत्यादि ।......हृद्रोगमिति वा शोक-षष्यज्‌रोगषु इति रोगे परे हृदयस्य हृद्भावः अथवा हृदो रोगो हृद्रोगः ।
मा. नि. हृद्रोग २ म.; टोका पान २३८



**पूर्वरूपे :**

भीती वाटणे, छातीमध्ये कधीकधी धडधडणे, केव्हा तरी हृदयभागी शूल उत्पन्न होणे; नाडीची गती विषम होणे, उरोभागी गौरव वाटणे, जखडल्यासारखे वाटणे, झोपेतून मधूनच दचकून वा छाती आवळली गेल्यासारखी वाटून किंवा उरावर ओझे पडल्यासारखे वाटून जाग येणे, श्रम करताना हृदयात वेदना होणे, श्वासोच्छ्वास केव्हा तरी अडखळल्यासारखा होणे अशी पूर्वरूपे होतात.

[1]त्वचेचा रंग पालटणे (निस्तेज पांडू वा श्याव, कृष्ण होणे), मूर्च्छा, ज्वर, कास, हिक्का, श्वास, मुखामध्ये तिक्त कषाय रस जाणवणे, तहान लागणे, विषयज्ञान नीट न होणे (प्रमोह), कफाचा उत्क्लेश होणे (घशाशी येणे, लाळ सुटणे, थुंकी येणे), छर्दी रुजा (उरोभागी), अरुची अशी लक्षणे होतात.

'विविधास्तथान्ये' या वचनावरून हृदयाच्या प्रकृत भावांच्या विकृतीमुळे उत्पन्न होणारी व हृदि–बाधा या शब्दाने सहज लक्षात येणारी जी लक्षणे तीही या ठिकाणी अभिप्रेत आहेत.

हृदयाच्या संकोच–विकासशीलतेमध्ये व्यत्यय उत्पन्न होऊन वैषम्य आल्यामुळे हृदयाच्या गतीचा लय विकृत होणे, रसाच्या विक्षेपणकाली उत्पन्न होणाऱ्या हृद्‌गत शब्दांना विकृती येणे, अवलंबक कफाच्या विकृतीमुळे हृदयाचा आकार पाहिजे तसा प्रकृत न राहता तो मोठा होणे (द्रवता हृदयेन), थकवा वाटणे, थोड्याशा हालचालीने दम वाटणे, बोलणे, खाणे नकोसे होणे, ही उदानाच्या विकृतीची लक्षणे होतात. ओजोत्पत्तीमुळे आणि व्यानाच्या विक्षेपण–आक्षेपण क्रियेत व्यत्यय आल्यामुळे शोथ हे लक्षण उत्पन्न होते. अकस्मात घाम येणे, अंग गळून जाणे, दीनता वाढणे, भीती वाटणे, निष्प्रभ होणे, उत्साह नष्ट होणे, अशी ओजाच्या विकृतीमुळे उत्पन्न होणारी लक्षणे हृद्रोगामध्ये विकृतीच्या गांभीर्याप्रमाणे लवकर वा उशिरा दिसू लागतात.

**वातज हृद्रोग :**

[2]नाना प्रकारच्या वेदना उत्पन्न होणे हे या प्रकारामध्ये विशेष लक्षण असते. हृदय पातळ होऊन ताणले गेल्याने आकाराने मोठे होते (आयम्यते), शरीर कापते,

१ वैवर्ण्यमूर्च्छाज्वरकासहिक्काश्वासास्यवैरस्यतृषाप्रमोहाः ।
छर्दिःकफोत्क्लेशरुजोऽरुचिश्च हृद्रोगजाःस्युर्विविधास्तथाऽन्ये ॥
च. चि. २६–७८, पान १४१२

२ शोकोपवासव्यायामरूक्षशुष्काल्पभोजनैः । वायुराविश्य हृदयं जनयत्युत्तमां रुजम् ॥
लेपथुर्वेष्टनं स्तम्भः प्रमोहः शून्यता दरः । हृदि वातातुरे रूपं जीर्णे चात्यर्थवेदना ॥
च. सू. १७–३०, ३१ पान २१०

एकाएकी शोक येणे, भयभीत होणे दीन होणे, आवाज सहन न होणे, श्वास अडखळल्यासारखे होणे, विषयग्रहण नीट होत नाही; हृत्स्पंद, हृद्गतिवैषम्य अशी लक्षणेही होतात.

### [1] पित्तज हृद्रोग :

यामध्ये तोंड कडू पडणे, आंबट-कडू अशी उलटी होणे, तहान लागणे, घाम येणे, ज्वर येणे, अंग गरम वाटणे, हृदयात दाह होणे, तोंड कोरडे पडणे, हृदयामध्ये क्लेद उत्पन्न होणे, चक्कर येणे, मूर्च्छित होणे, अंधारी येणे, अस्वस्थता, नख–नेत्रादींच्या ठिकाणी पीतता दिसणे अशी लक्षणे होतात.

### [2] कफज हृद्रोग :

यात शरीर जड होणे, हृदयभागी जडता वाटणे, जखडल्यासारखे वाटणे, छातीवर जणू घोंडा ठेवला आहे व त्यामुळे हृदय दडपले गेले आहे असे वाटणे, ओल्या कपड्याने अंग गुंडाळल्यासारखे वाटणे, तोंडास पाणी सुटणे, कास, तंद्रा, ज्वर, अग्निमांद्य, अशी लक्षणे होतात.

### [3] सान्निपातिक हृद्रोग :

तिन्ही दोषांमुळे उत्पन्न होणारी लक्षणे समुच्चयाने दिसतात.

### [4] कमिज हृद्रोग :

त्रिदोषज हृद्रोगामध्ये जो रोगी तीळ, दूध व गूळ असे कफकर पदार्थ खातो;

– आयम्यते मारुतजे हृदयं तुद्यते तथा ॥
निर्मथ्यते दीर्यते च स्फोटयते पाटयतेऽपि च ॥ सु. उ. ४३–६, सटीक पान ७२७

१ उष्णाम्ल लवणक्षारकटुकाजीर्णभोजनैः ।
मद्यक्रोधातपैश्चाशु हृदि पित्तं प्रकुप्यति ॥
हृद्दाहस्तिक्तता वक्त्रे तिक्ताम्लोद्गिरणं श्र (क्ल) मः ।
तृष्णा मूर्च्छा भ्रमः स्वेदः पित्तहृद्रोगलक्षणम् ॥
च. सू. १७–३२, ३३, पान २१०, ११

२ अत्यादानं गुरुस्निग्धमचिन्तनमचेष्टनम् । निद्रासुखं चाभ्यधिकं कफहृद्रोगकारणम् ॥
हृदयं कफहृद्रोगे सुप्तास्तिमितभारिकम् ।
तन्द्रारुचिपरीतस्य भवत्यश्मावृतं यथा ॥ च. सू. १७–३४, ३५ पान २११

३ हेतुलक्षणसंसर्गादुच्यते सान्निपातिकः । च. सू. १७–३६, पान २०१

४ त्रिदोषजे तु हृद्रोगे यो दुरात्मा निषेवते । तिलक्षीरगुडादीनि ग्रन्थिस्तस्योपजायते ।
मर्मैकदेशे संक्लेदं रसश्चास्योपगच्छति । संक्लेदात् क्रिमयश्चास्य भवन्त्युपहतात्मनः ॥



त्याच्या हृदयामध्ये एक प्रकारची ग्रंथी उत्पन्न होते. हृदयाचा काही भाग विकृत होऊन तेथील रसाचा क्लेद बनतो. या क्लेदामध्ये पुढे कृमी उत्पन्न होतात. आणि ते हृदयाचा भाग कुरतडतात. या कृमिसंभवामुळे हृदयामध्ये सुया टोचल्यासारखी, शस्त्राने तोडल्यासारखी तीव्र स्वरूपाची वेदना होते. घशाशी येते. थुंकी येते. अंधारी येते. श्वास लागतो तोंडाची चव जाते. डोळ्याभोवती काळेपणा येतो व अंग सुजते.

गर्भिणीमध्ये आठव्या महिन्यामध्ये गर्भाच्या ओजाची अस्थिरता असते. अशा वेळी स्त्रीमध्ये पूर्वी असलेल्या हृदयाच्या ठिकाणच्या स्थानवैगुण्यामुळे हृद्रोग उत्पन्न होतो.

गर्भाचे पोषण व स्वतःचे पोषण, स्तन व स्तन्य यांचे पोषण अशी कार्ये गर्भिणीला करावी लागत असल्याकारणाने रसवह स्रोतसांवर ताण पडून (अतियोगाने) हृदयाच्या ठिकाणी स्थानवैगुण्य उत्पन्न होण्याची शक्यता असते. हे स्थानवैगुण्य बऱ्याच वेळा बहुप्रसवेमध्ये सापडते.

गर्भधारणा होण्यापूर्वी जर स्त्रीला हृद्रोग असेल तर त्या स्त्रीला गर्भिणी अवस्थेमध्ये नऊ महिने पूर्ण होईपर्यंतच्या कालामध्ये स्वतःच्या व गर्भाच्या पोषणाचा ताण पडून तिचे बल आणखीनच कमी होते व त्यामुळे प्रसवामध्ये बलक्षयामुळे उत्पन्न होणाऱ्या विकृती उदा.– गर्भसंग, अपरासंग, मृतगर्भ, प्रसवोत्तर रक्तस्राव उत्पन्न होतात व प्रसवातील श्रम सहन न झाल्यामुळे त्या स्त्रीला विपन्नावस्था प्राप्त होऊन तिच्या जिवाला धोका पोहोचतो.

### [1] उपद्रव :

कास, श्वास, शोथ, वैवर्ण्य, उदर हे उपद्रव होतात.

### साध्यासाध्यत्व :

हा व्याधी असाध्य आहे. क्वचित अगदी नुकताच उत्पन्न झालेला असेल, रोग्याचे बल चांगले असेल व लक्षणे अल्प असतील तर अतिकष्टाने साध्य होतो.

मर्मैकदेशे संजाताः सर्पन्तो भक्षयन्ति च ॥ तुद्यमानं स हृदयं सूचीभिरिव मन्यते ।
छिद्यमानं यथा शस्त्रैर्जातकण्डूं महारुजम् । हृद्रोगं क्रिमिजं त्वेतैर्लिङ्गैर्बुद्ध्वा सुदारुणम् । त्वरेत जेतुं तं विद्वान्विकारं शीघ्रकारिणम् । च. सू. १७–३६ ते ४०
– विद्यान्त्रिदोषं त्वपि सर्वलिङ्गं तीव्रार्तितोदं क्रिमिजं सकण्डूम् ।
उत्क्लेदः ष्ठीवनं तोदः शूलं हृल्लासकस्तमः ।
अरुचिः श्यावनेत्रत्वं शोथश्च क्रिमिजे भवेत् ॥ मा. नि., हृद्रोग ६ म. टीका.
– उत्क्लेशः, ष्ठीवनं तोदः शूलोहृल्लासकस्तमः ।
अरुचिः श्यावनेत्रत्वं शोषश्च कृमिजे भवेत् ॥ सु. उ. ४३–९, पान ७२७
१ भ्रमक्लमौ सादशोषौ ज्ञेयास्तेषामुपद्रवाः । सु. उ. ४३–१०, सटीक पान ७२७

**रिष्ट लक्षणे :**

[१]ऊर्ध्व किंवा छिन्न श्वास, नख, ओष्ठ, नेत्र, मुख, त्वचा त्यांच्या ठिकाणी श्यावता, शीतगात्रता, तीव्र शूल, स्वेदातिरेक, ही लक्षणे रिष्ट समजावीत.

**चिकित्सा :**

[२]हृदयाचे हृदयाशी संबंध असलेल्या रसरक्तवाहिन्यांचे, हृदयस्थ ओजाचे चांगल्या रीतीने संरक्षण करावयाचे असेल तर मनाला दुःखदायक होतील अशा सर्व गोष्टी पूर्णपणे वर्ज्य केल्या पाहिजेत. कोणत्याही कारणाने मनाला आकस्मिकरीत्या धक्का बसणे, मन हेलकावणे अनिष्ट आहे. त्यासाठी चिंता, शोक, भय, क्रोध, उत्कंठा, मत्सर, लोभ असे विकार उत्पन्न होणार नाहीत, वा निदान मनुष्य त्यांच्या आधीन होणार नाहीत एवढी तरी काळजी घेतली पाहिजे. सर्वदा शान्त राहण्याची सवय प्रयत्नपूर्वक लावून घेतली पाहिजे. तत्त्वज्ञानाच्या विचारांचा वा आध्यात्मिक भावनांचा त्यासाठी चांगला उपयोग होतो. आहार व उपचारातही हृदयाला हितकर होतील, ओजोवर्धक असतील आणि स्रोतसांना प्रसन्नता देतील ( संकोच करणारी नसतील ) अशी औषधी द्रव्ये व आहारद्रव्ये वापरावीत.

[३]वातज हृद्रोगावर प्रथम स्वेदन स्नेहन देऊन नंतर अगदी सौम्य स्वरूपाचे वमन द्यावे.

[४]हृद्रोगावर शीत लेप किंवा शीत परिषेक करावेत आणि हृद्य असे विरेचन पित्तज हृद्रोगावर वापरावे.

— क्रिमिजे क्रिमिजातीनां श्लेष्मिकाणां च ये मताः ।

सु. उ. ४३-१०, सटीक पान ७२७

१ शिरोहृद्रोगवमथुप्रतिश्यायकराश्च ते ॥ सु. उ. ५४-१४, सटीक पान ७७३

२ तन्महत्ता महामूलास्तच्चौजः परिरक्षता ।
परिहार्या विशेषेण मनसो दुःखहेतवः ॥
हृद्यं यत्स्याद्यदौजस्यं स्रोतसां यत्प्रसादनम् ।
तत्तत्सेव्यं प्रयत्नेन प्रशमो ज्ञानमेव चेति ॥
संप्रति हृदिस्थस्यः परिपालनहेतुमाह तन्महदित्यादि । तन्महदिति षडङ्गादिस्थानं हृदयम् । ता महामूला = इत्योजोवहा धमन्यः । तच्चौज इति – " येनौ जसा "– इत्यादिनोक्तगुणमोजः = शान्ति । ज्ञानं = तत्त्वज्ञानम् ।
च. सू. ३०-१३, १४, सटीक पान ३९२

३ वातोपसृष्टे हृदये वामयेत् स्निग्धमातुरम् । सु. उ. ४३-११

४ शीतप्रदेहा परिसेचनानि तथा विरेको हृदि पित्तदुष्टे । च. चि. २६-९०



[१]कफज हृद्रोगावर स्वेद, वमन, लंघन हे उपचार करून चिकित्सेसाठी कफज द्रव्ये वापरावीत.

[२]त्रिदोषज हृद्रोगामध्ये प्रथम लंघन द्यावे. नंतर हितकर असा लघू संतर्पण आहार द्यावा. दोषांचे बलाबल पाहून त्याप्रमाणे चिकित्सा करावी.

[३]क्रिमिज हृद्रोगामध्ये वायूची गती रुद्ध होते. त्यासाठी मार्गशोधन म्हणून विरेचन देऊन आमाशय शुद्ध करावा. नंतर लंघन, पाचन उपचार करून क्रिमिघ्न द्रव्ये द्यावीत.

हृद्रोग व्यक्त झाल्यापासून गर्भिणीमध्ये पुढीलप्रमाणे चिकित्सा द्यावी. संपूर्ण विश्रांती आहारावर नियंत्रण [ मित आहार ], अभिष्यंदी व लवणयुक्त आहार वर्ज्य.

एकूण विचार करता गर्भिणीचे बल वाढवण्याकडे जास्त लक्ष द्यावे.

**द्रव्ये व कल्प :**

अर्जुन, शालिपर्णी, द्राक्षा, दाडिम, हरमल, कुचला, कण्हेरमूळ, पिंपळमूळ, कर्पूर-शृंग, कस्तुरी, मौक्तिक, अभ्रक, सुवर्ण, वंग, अकीक, लक्ष्मीविलास, त्रैलोक्यचिंता-मणी, हेमगर्भ, अर्जुनारिष्ट, द्राक्षासव.

**आहार :**

द्रव, लघू, संतर्पण अशी द्रव्ये. तांदुळाची, रव्याची खीर. फलरस (द्राक्षा दाडिमादी).

**विहार :**

विश्रान्ती.

[४]**पथ्यापथ्य :**

व्यायाम, शोक, क्रोध, चिंता, मलावष्टंभ, अजीर्ण, मैथुन वर्ज्य करावे.

१ स्विन्नस्य वान्तस्य विलंघितस्य क्रिया कफघ्नीः कफमर्मरोगे । च. चि. २६-९६

२ त्रिदोषजे लङ्घनमादितः स्यादन्नं च सर्वेषु हितं विधेयम् ।
हीनातिमध्यत्वमवेक्ष्य चैनं कार्यं त्रयाणामपि कर्म शस्तम् ॥
च. चि. २६-१००, सटीक, पान १४१५

३ प्रायोऽनिलो रुद्धगतिः प्रकुप्यत्यामाशये शोधनमेव तस्मात् ।
कार्यं तथा लङ्घनपाचनं च सर्वं क्रिमिघ्नं क्रिमिहृद्गदे च ॥
च. चि. २६-१०३, सटीक, पान १४१५-१६

४ शालिर्मुद्गा यवा मांसं जाङ्गलं मारिचान्वितम् ।
पटोलं कारवेल्लं च पथ्यं प्रोक्तं हृदामये ॥ यो. र. हृद्रोग, पान ५३४
तैलाम्लतक्रगुर्वन्नकषायश्रममातपम् ।
रोषं स्त्रीनर्म चिन्तां वा भाष्यं हृद्रोगवास्त्यजेत् ॥ यो. र. हृद्रोग पान ५३५

## ७. गर्भोपद्रव—श्वास

[१] **व्याख्या :**

भाता जोराने फुंकला असता ज्याप्रमाणे ऊर्ध्वगती वायूचे स्वरूप असते, त्याप्रमाणे (सशब्द, सावरोध) श्वासोच्छ्वास होतो. म्हणून या व्याधीस श्वासरोग असे म्हणतात. श्वसनाचा वेग वाढतो.

[२] **शारीर :**

श्वासरोगांतील मुख्य अधिष्ठान जे उर त्यातील प्रधान अवयवाचे शारीर श्वासरोग वर्णन करण्यापूर्वी जाणणे आवश्यक आहे. श्वासोच्छ्वासामध्ये बाहेर जाणे आणि आत येणे या दोन क्रिया करणारा मुख्य वायू प्राण आहे. उदान हा प्रयत्न करणे व बल देणे या दृष्टीने श्वासोच्छ्वास क्रियेस साहाय्यक होतो. ही श्वासोच्छ्वास क्रिया व बाह्य पोषक प्राणवायूचे येणे-जाणे मुख्यतः क्षेत्रात होते तो अवयव फुप्फुस होय.

फुप्फुस हे प्राणवायूचे वहन करणाऱ्या लहान लहान स्रोतसांनी बनलेले असून, रक्ताच्या फेसापासून उत्पन्न झाले असल्यामुळे दिसावयासही ते फेनपुंजाप्रमाणे दिसते. रक्तवाही सिरांच्या द्वारा ते हृदयाशी जोडलेले असते. रक्तासवे अनुवर्तन करणाऱ्या प्राणाचा विनिमय याच ठिकाणी होतो. बाह्य वायूचे अभ्यंतर वायूमध्ये परिणमन होते ती क्रिया हीच. त्यामुळे श्वासोच्छ्वास क्रियेतील फुप्फुस हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. श्वासास कारण असणाऱ्या स्थानवैगुण्याला फुप्फुसाश्रित-प्राणवह स्रोतसाची रचना व बल यांची विकृती कारणीभूत होते. सुश्रुताच्या टीकाकाराने सुश्रुताच्या वचनातील प्राण शब्दाचा अर्थ आम्ही गृहीत धरलेल्या प्राणाच्या अर्थापेक्षा वेगळा केला आहे. प्राण शब्दाच्या अर्थाची व्यापकता लक्षात घेता ते योग्य दिसत असले तरी या ठिकाणी प्राण शब्दाचा बाह्यपोषक वायू व त्याच्या परिणमनाने झालेला अभ्यंतर प्राण हाच अर्थ अधिक योग्य आहे असेच आम्हाला वाटते.

१ श्वासत्वं वेगवदूर्ध्ववातत्वम् ।
श्वासस्तु भस्त्रिकाध्मानतमवातोर्ध्वगामिता । मा. नि. श्वास १५, म. टीका पृ. १४२
२ उदानवायोराधारः फुप्फुसः प्रोच्यते बुधैः । शा. रं. प्र. ५–४३, पृ. ५७
– शोणितफेनः प्रभवः फुप्फुसः । सु. शा. ४–२५, पृ. ३५७
– फुप्फुसो हृदयनाडिका लग्नः । सु. शा. ४–२५, टीका
– तावत्योऽसृग्वहाज्ञेया यकृत्फुप्फुसहृत्स्वति रक्तेन संप्लुताः सर्वावस्थैवीतादिभिः सदा । आयुर्वेद शारीर. पृ. ११०. शालिहोत्रसंहिता
– प्राणो ह्याभ्यन्तरो नृणां बाह्यप्राणगुणान्वितः ।
धारयत्यविरोधेन शरीरं पाञ्चभौतिकम् ॥ सू. सू. १७–१३, पान ८३



**स्वरूप :**

अनेक रोग प्राणघातक म्हणून प्रसिद्ध असले तरी श्वास हा व्याधी त्वरेने प्राणघातक होतो. इतर रोगांनी पीडित असलेल्या रोग्याच्या मरणसमयीही तीव्र स्वरूपाच्या वेदना उत्पन्न करणारा श्वास बहुधा उत्पन्न होतो. हा कफवातात्मक असून याच्या दोषदुष्टीचे मूलस्थान आमाशयात असते. रसादी धातूंचे व हृदयाचे उपशोषण करणे हे याचे कार्य आहे. हा व्याधी असाध्य असून उपचार करण्यामध्ये चूक झाली तर त्वरित प्रकोप पावतो. आणि दुष्टी वा निःश्वास यांनी प्राणघातक होणाऱ्या तीव्र विषारी सर्पाप्रमाणे मारक ठरतो.

**मार्ग :**

मध्यम व अभ्यन्तर.

[२] **प्रकार :**

महाश्वास, ऊर्ध्वश्वास, छिन्नश्वास, तमकश्वास, क्षुद्रश्वास असे श्वासाचे पाच प्रकार आहेत.

[३] **कारणे :**

धूळ, धूप, वावटळी, वारा, गारठ्याची जागा, गार पाण्याचे सेवन, व्यायाम, मैथुन, फार चालणे, रूक्षान्न, विषमाशन, आमप्रदोष, रूक्षण, अपतर्पण, दौर्बल्य, मर्मोपघात गुरू–लघु–शीत–उष्ण–मंद–तीक्ष्ण–मृदू–कठीण–खर–श्लक्ष्ण–विशद–पिच्छल-स्निग्ध

१ कामं प्राणहरा रोगा बहवो न तु ते तथा ।
यथा श्वासश्च हिक्का च प्राणानाशु निकृन्ततः ॥
अन्यैरप्युपसृष्टस्य रोगैर्जन्तोः पृथग्विधैः ।
अन्ते संजायते हिक्का श्वासो वा तीव्रवेदनः ॥ च. चि. १७-६-७, पान १२३३
– कफवातात्मकावेतौ पित्तस्थानसमुद्भवौ ।
हृदयस्य रसादीनां धातूनां चोपशोषणौ ॥
तस्मात्साधारणावेतौ मतौ परमदुर्जयौ ।
मिथ्योपचरितौ क्रुद्धौ हता आशीविषाविव ॥ च. चि. १७-१८-१९, पान १२३३
२ महोर्ध्वच्छिन्नतमकक्षुद्रभेदैस्तु पञ्चधा ।
भिद्यते स महाव्याधिः श्वास एको विशेषतः ॥ मा. नि. श्वास १५, आ. टीकेसह
३ रजसा धूमवाताभ्यां शीतस्थानाम्बुसेवनात् ।
व्यायामाद्ग्राम्यधर्माध्वरूक्षान्नविषमाशनात् ॥ च. चि. १७–११

रूक्ष अशी द्रव्ये कधी ही तर कधी ती अशी अनियमितपणे सेवन करणे, पंचकर्मोक्त शोधन कर्मांचा अतियोग होणे; पावटा, उडीद, पेंड, तिळाचे तेल–पिठूळ पदार्थ–कमलकंद मलावष्टंभ करणारी द्रव्ये–विदाही द्रव्ये–पचण्यास जड असे पदार्थ जलज आनूप प्राण्यांचे मांस-कच्चे दूध ( चीक ) यांच्या सेवनाने, तसेच अभिष्यंदी उत्पन्न करणारे किंवा कफकर असे योग यांच्यामुळे श्वासरोग होतो. अतिसार, ज्वर, छर्दी, प्रतिश्याय, उरःक्षत, राजयक्ष्मा, रक्तपित्त, दाह, ( वा. चि. ४–१९ ) उदावर्त, आनाह, विषूचिका अलसक, पाण्डुरोग, कास, विष ( असात्म्य द्रव्ये ) यांचा परिणाम म्हणूनही ( उदर्क ) श्वास होतो.

श्वासव्याधी उत्पन्न करणाऱ्या कारणामध्ये स्थानवैगुण्य व दोषप्रकोप करणारी कारणे सामान्यतः वेगळी सांगता येतील. धूळ, धूर येथपासून सांगितलेली कारणे विशेषतः वातकर असून ती स्थानवैगुण्ये उत्पन्न करण्यास कारणीभूत होतात. उडदापासून सांगितलेली कारणे विशेषतः कफकर असून ती दोषप्रकोपक होतात. निरनिराळे रोग बहुधा स्थानवैगुण्य उत्पन्न करणारे ठरतात. स्थानवैगुण्यासही तत्वतः योषांची विकृतीच कारणीभूत असल्याने कोणत्याही रोगामध्ये स्थानवैगुण्य उत्पन्न करणारी आणि दोषप्रकोप उत्पन्न करणारी कारणे अशी काटेकोर विभागणी करता येणे शक्य नाही. स्थानवैगुण्य मुळात नसेल तर दोषप्रकोप कारण स्थानवैगुण्य उत्पन्न करण्यास सहाय्यक होईल. उलट स्थानवैगुण्य मुळातच असल्यास, स्थानवैगुण्य उत्पन्न करणारे नवीन कारण दोषप्रकोप करील.

आमप्रदोषादानाहाद्रौक्ष्यादत्यपतर्पणात् ।
दौर्बल्यान्मर्मणो घाताद्द्वन्द्वाच्छुद्धयतियोगतः ॥
अतिसारज्वरच्छर्दिप्रतिश्यायक्षतक्षयात् ।
रक्तपित्तादुदावर्ताद्विसूच्यालसकादपि ॥
पाण्डुरोगाद्विषाच्चैव प्रवर्तंते गदाविमौ ।

च. चि. १७–१२ ते १३, सटीक पान १२३३–३४

– निष्पावमाषपिण्याकतिलतैलनिषेवणात् ॥
पिष्टशालूकविष्टम्भिविदाहिगुरुभोजनात् ।
जलजानूपपिशितदध्यामक्षीरसेवनात् ॥
अभिष्यन्द्युपचाराच्च श्लेष्मलानां च सेवनात् ।
कण्ठोरसः प्रतीघाताद्विबन्धैश्चः पृथग्विधैः ॥

च. चि. १७–१४ ते १६, पान १२५४ सटीक

– कासवृद्धा भवेच्छ्वासः पूर्वैर्वा दोषकोपनैः ।
आमातिसारवमथुविषपाण्डुज्वरैरपि ॥
रजोधूमानिलैर्मर्मघातादतिहिमाम्बुना । सं. टीकेसह वा. नि. ४–१, पान ४७२



**संप्राप्ती :**

मिथ्याहार-विहाराने अग्निमांद्य होऊन प्राणवह स्रोतस् विगुण होते. आमाशयामध्ये दोषप्रकोप व आम उत्पन्न होतो. या कफप्रधान दोषाने प्राणवह स्रोतसांचा उपरोध झाल्याने प्राणवायूच्या गमनक्रियेस अडथळा होऊन तो विमार्गग होतो व त्यामुळे सर्व उरःस्थल क्षुब्ध होऊन श्वास उत्पन्न होतो. प्राणवह स्रोतसाच्या साहचर्यात उदकवह व अन्नवह स्रोतसाचीही दुष्टी होते. प्रकुपित वात प्राणवह स्रोतसांत प्रवेश करतो. (आविश्य). प्राणवहस्रोतसामध्ये राहून प्राणवहस्रोतसाला कार्यक्षम ठेवण्यासाठी मृदुत्व, स्निग्धत्व, स्थिरत्व, हे गुण उत्पन्न करणारा प्रकृतस्थितीतील कफ, वातामुळे स्थानभ्रष्ट होतो (कफं उद्धूय). त्यामुळे स्रोतसांचे स्वाभाविक मार्दव नष्ट होते. वातामुळे उत्पन्न होणारे रौक्ष्य, काठिन्य, संकोच हे गुण स्रोतसांच्या ठिकाणी येतात. या कठिण व संकुचित स्रोतसांमध्ये आमाशयातून येणारा साम कफ-मार्गावरोध उत्पन्न करतो (कफपूर्वकः संवृद्धः). त्यामुळे वायूचे वहन नीट होत नाही. तो विमार्गग होतो. अंबरपीयूषाच्या स्वीकाराची क्रियाही नीट होऊ शकत नाही. आमाशयातील क्लेदक कफाची दुष्टी ही श्वासाच्या उत्पत्तीस मूलभूत कारण असल्यामुळे आमाशय हे श्वासाचे उद्भवस्थान होय. क्लेदक कफाचा परिणाम होऊन प्राणवह-स्रोतसातील विशेषतः उरातील अवलंबक कफ दुष्ट होऊन त्या ठिकाणी श्वास उत्पन्न होतो; म्हणून उर हे श्वासाचे अधिष्ठान होय आणि सर्व प्राणवह स्रोतस् हे लक्षणे उत्पन्न होण्याचे क्षेत्र असल्यामुळे ते श्वासाचे संचारक्षेत्र होय. हृदय, कण्ठ, शिर, नासा, महास्रोतस् या अवयवांमध्ये श्वासव्याधीत लक्षणे व्यक्त होतात.

[1]"वाताधिको भवेत् क्षुद्रः तमकस्तुकफोद्भवः । कफवाताधिकश्चैव
संसृष्टच्छिन्नसंज्ञकः । श्वासो मारुत संसृष्टो महानूर्ध्वस्तथा मता"

१ मारुतः प्राणवाहीनि स्त्रोतांस्याविश्य कुप्यति ।
उरःस्थः कफमुद्धय हिक्काश्वासान्करोति सः ॥
घोरान् प्राणोपरोधाय प्राणिनां पञ्च पञ्चच । च. चि. १७–१७ पान १२३४
यदा स्रोतांसि संरुध्य मारुतः कफपूर्वकः ।
विष्वग्व्रजति संरुद्धस्तदा श्वासान्करोति सः ॥ च. चि. १७–४५, पान १२३७
– विहाय प्रकृतिं वायुः प्राणोऽथ कफसंयुतः ।
श्वासयत्यूर्ध्वगो भूत्वा तं श्वासं परिचक्षते ॥ सु. उ. ५१–४ सटीक, पान ७६१
– कफोपरुद्धगमनः पवनो विष्वगास्थितः ।
उरःस्थः कुरुते श्वासमामाशयसमुद्भवम् ॥ वा. नि. ४–३, पान ४७२
– एते हि कफसंरुद्धगतिप्राणप्रकोपजाः । वा. चि. ४–८

असे प्रकारांचे दोषप्राधान्य प्राचीनांनी सांगितले आहे. सु. उ. ५१–४ च्या टीकेत छिन्नश्वास पित्तप्रधान असतो असा उल्लेख आहे.

गर्भिणीमध्ये मिथ्याहार-विहाराने अग्निमांद्य होऊन वर सांगितल्याप्रमाणे संप्राप्तीतील घटना घडून श्वास उत्पन्न होतो.

## [1] पूर्वरूपे :

श्वासाच्या पूर्वरूपामध्ये अग्निमांद्य वा आमाशय दुष्टी दर्शविणारी भक्तद्वेष, अरुची, आनाह अशी लक्षणे दिसतात. प्राणवह स्रोतसाच्या विकृतीचीं निदर्शक अशी अरती व प्राणाची पर्याकुलता दिसते (श्वास घेताना व बाहेर टाकताना अशक्तता वाटणे, किंचित अवघडल्यासारखे वाटणे, पार्श्वशूल, हृत्पीडा, शंखभेद, घुसमटल्यासारखे वाटणे, त्यामुळे वायूचे विमार्गगमन प्रत्ययास येते. त्या त्या अवस्थेतील सर्व घटना परिपूर्ण होऊ लागल्या की श्वासाचे रूप व्यक्त होते.

## [2] तमकश्वास :

श्वासवेगाच्या वेळी अंधेरी आल्यासारखे होते; म्हणून या प्रकारास तमकश्वास असे नाव आहे. या तमकामध्ये स्रोतसे कफाने रुद्ध झाल्यामुळे वायूची गती प्रतिलोम होऊन त्याच्या या प्रतिलोम गतीचे परिणाम लक्षणाच्या रूपाने उर, कण्ठ, शिर या सर्वच अवयवांमध्ये व्यक्त होतात. व्याधीचा आरंभ पीनस (प्रतिश्याय), कास अशा पूर्वरूपोत्पन्न व्याधीपासून होतो. पीनस, कास घशामध्ये घुरघुर असा आवाज होणे हे

१ आनाहः पार्श्वशूलं च पीडनं हृदयस्य च ।
प्राणस्य च विलोमत्वं श्वासानां पूर्वलक्षणम् ॥ च. चि. १७–२०, पान १२३४

– प्राग्रूपं तस्य हृत्पीडा भक्तद्वेषोऽरतिः परा ।
आनाहः पार्श्वयोः शूलं वैरस्यं च वदनस्य ॥ सु. उ. ५१–६, पान ७६१
प्राग्रूपं तस्य हृत्पार्श्वशूलं प्राणविलोमता ।
आनाहः शंखभेदश्च ॥ वा. नि. ४–४ पान ४७२

२ प्रतिलोमं यदा वायुः स्रोतांसि प्रतिपद्यते । ग्रीवां शिरश्च संगृह्य श्लेष्माणं समुदीर्य च ॥ करोति पीनसं तेन रुद्धो घुर्घुरकं तथा । अतीव तीव्रवेगं च श्वासं प्राणप्रपीडकम् ॥ प्रताम्यत्यतिवेगाच्च कासते सन्निरुध्यते । प्रमोहं काकमानश्च स गच्छति मुहुर्मुहुः ॥ श्लेष्मण्यमुच्यमाने तु भृशं भवति दुःखितः । तस्यैव च विमोक्षान्ते मुहूर्तं लभते सुखम् ॥ अथास्योद्ध्वंसते कण्ठः कृच्छ्रात्शक्नोति भाषितुम् । न चापि निद्रां लभते शयानः श्वासपीडितः ॥



विकार पुढे लक्षण म्हणूनही आढळतात. श्वासाचा वेग आला की, प्राणवह स्रोताचे अधिष्ठान जे हृदय ते व्याकुल होऊन जीव जातो की काय असे वाटते. रुग्ण कासावीस होतो. मधून मधून खोकल्याच्याही उबळी येतात. खोकल्यामध्ये कफ सुटला नाही तर फारच त्रास होतो. कफ सुटला म्हणजे थोडा वेळ बरे वाटते. घसा सारखा खवखवत राहतो. बोलणे कष्टाचे होते. निजले असता पार्श्वपीडन होत असल्यामुळे वायू अधिकच अवरुद्ध होऊन आडवे होता येत नाही. बसून राहिले असता बरे वाटते. उंच तक्क्या, उशा, लोड यावर दोन्ही हात आडवे ठेवून त्यावर डोके टेकून कशीबशी विश्रान्ती घ्यावी लागते. व्याधी कफवातात्मक असल्यामुळे शेकले वा गरम पाणी प्यायले म्हणजे बरे वाटते. श्वास, कास यांचे वेग वरचेवर तीव्र स्वरूपात आले असता वेगकाली प्रमोह उत्पन्न होऊन काही सुचेनासे होते. डोळे सुजल्यासारखे होतात. कपाळावर, गळ्यावर, छातीवर घाम येतो. खोकला कोरडा असेल तर अतिशय त्रास होतो. श्वासाच्या वेगकाली सर्व अंग जणू हिंदकळल्यासारखे होऊन दुखते. श्वासाचा वेग बहुधा कफकारक आहाराने थंडीमध्ये वा ढग आले असता येतो वा आलेला वाढतो. हा व्याधी अगदी नुकताच सुरू झाला असेल व रोगी मुळात सुदृढ प्रकृतीचा असेल तर योग्य उपचारांनी बरा होण्याची शक्यता असते. व्याधी स्वभावतः याप्य आहे. उपचारांनी तेवढ्यापुरते बरे वाटते.

तमक श्वास व्याधीमध्ये कारणांच्या व कालाच्या मध्येही अनेक प्रकारची विविधता प्रकृतिभेदानुरूप आढळते. कारण असलेल्या वायूच्या विषमरूपतेचा प्रत्यय या व्याधीइतका इतर व्याधींत क्वचितच येत असेल.

तमकश्वासाचे वेग येतात. आलेला वेग काही दिवसांपासून काही आठवडेपर्यंत टिकतो. मध्यन्तरी काही दिवस, महिने वा त्याहूनही अधिक काल सुखाने जातो. या काळातही स्थानवैगुण्य असतेच; पण दोषप्रकोप झालेला नसल्याने, व्याधी प्रकट होत नाही.

गर्भिणीमध्ये गर्भधारणा होण्यापूर्वीच तमकश्वास हा रोग असलेला आढळतो. गर्भधारणेनंतर तमकश्वास उत्पन्न होणे ही स्थिती क्वचित आढळते. त्यामुळे तमकश्वासी बाईला गर्भिणी अवस्थेमध्ये श्वासावर चिकित्सा करणे अवश्यंभावी ठरते.

पार्श्वे तस्यावगृह्णाति शयानस्य समीरणः ।
आसीनो लभते सौख्यमुष्णं चैवाभिनन्दति ॥
उच्छ्रिताक्षो ललाटेन स्विद्यता भृशमार्तिमान् ।
विशुष्कास्यो मुहुः श्वासो मुहुश्चै वावधम्यते ॥
मेघाम्बुशीतप्राग्वातै । श्लेष्मलैश्चाभिवर्धते ।
स याप्यस्तमकश्वासः साध्यो वा स्यान्नवोत्थितः ॥
च. चि. १७–५५ ते ६२, सटीक पान १२३८–३९

श्वास या व्याधीमध्ये प्राण व उदान हे वायू व रसवह स्रोतस आणि पर्यायाने हृदय या सर्वांचे बल रक्षण करणे आवश्यक आहे. कारण प्रसवामध्ये या सर्वांच्या कार्याचा अतियोग होत असतो. त्यामुळे प्रसवामधील कार्याचा ताण वरील स्रोतसावर पडून गर्भिणीला प्रसवामध्ये कष्ट होण्याची शक्यता असते. उदा.— कष्टप्रसूती, गर्भसंग, अपरासंग वगैरे.

**साध्यासाध्यता :**

तमकश्वास कष्टसाध्य वा याप्य आहे. रोग्याचे शरीरबल चांगले असून रोग नुकताच उत्पन्न झाला असेल (लहान वयामध्ये झाला असेल) तर तमकश्वास बरा होण्याची शक्यता असते.

तमकश्वासी स्त्रीला एक किंवा दोन प्रसूती होऊ देणे हे तिच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने योग्य ठरते.

**रिष्ट लक्षणे :**

ज्वर, छर्दी, तृष्णा, अतिसार, शोथ हा श्वासामधील रिष्ट लक्षणसमुच्चय आहे.

**चिकित्सा :**

[1]श्वासरोग्याला प्रथम मीठ व तेल यांनी अभ्यंग करून स्निग्ध द्रव्यांनी स्वेदन करावे (छातीला). त्यामुळे ग्रंथिल झालेला कफ पातळ होऊन स्रोतसांतून सुटतो. स्रोतसे मृदू होतात व वाताचे अनुलोमन होते. स्वेदनानंतर त्यास स्निग्ध पदार्थ खाण्यासाठी देऊन कफाचे उदीरण करावे व वमन द्यावे. स्त्यान, ग्रंथिल, दुष्ट असा कफ या स्वेदनवमनादी उपचारांनी निघून गेल्यावर स्रोतसे मोकळी स्वच्छ होऊन वायूचे वहन अडथळा न होता होऊ शकते.

[2]वमनानंतरही काही दोष शेष स्रोतसांमध्ये लीन होऊन राहिले असल्यास धूम्र-पान देऊन त्याचे शमन करावे.

[3]श्वासाचा रोगी बलवान व कफप्रधान असल्यास वमन, विरेचन व धूम, लेह इत्यादी सर्व उपचार पथ्यकर आहारासह करावे. रोगी दुर्बल व वातप्रधान असल्यास वातघ्न अशा स्नेह, यूष, रसांनी संतर्पण करावे व शमनोपचार करावेत. शोधन

१ हिक्काश्वासार्दितं स्निग्धैरादौ ... ... ... ।
... ... ... विशुद्धेषु चरत्यविहतोऽनिलः ॥ च. चि. १७–७१ ते ७६

२ लीनश्चद्दोषशेषः स्याद्धूमैस्तं निर्हरेद्बुधः । च. चि. १७–७७, पान १२४१

३ हिक्काश्वासामयी ह्येको बलवान् दुर्बलोऽपरः ।
... ... ... ... ... ... ... ... ...
तर्पयेदेव शमनैः स्नेहयूषरसादिभिः ॥ च. चि. १७–८८ ते ९०, पान १२४२



देऊ नये. तमकश्वासी गर्भिणी असेल तर तिच्यामध्ये तिच्या बलाबलाचा विचार करून मगच शोधन उपचार करावेत; अन्यथा शमनोपचारच करून आहारविहारावर नियंत्रण ठेवून तमकश्वासाच्या वेगापासून तिचे रक्षण करावे.

[1]कफदोष उत्क्लिष्ट नसताना, स्वेद न करता, रोगी दुर्बल असताना जर शोधनोपचार केले तर वाताचा प्रकोप अधिक होतो. मर्माचा उपघात होऊन प्राणघात होतो. यासाठी शोधनोपचार करताना कफाधिक्य, स्नेहन, स्वेदन, उत्क्लिष्टत्व, रोग्याचे बल यांचा विचार करून शोधन करावे.

[2]मार्गामध्ये अडथळा आला असताना पाणी पात्राच्या बाहेर जाऊन वाहते व ते पाणी अनर्थ उत्पन्न करते, त्याप्रमाणेच मार्गावरोध असताना प्रकुपित वात पीडाकर होतो. यासाठी वैद्याने वाताचा मार्ग शुद्ध व मोकळा राहील अशी व्यवस्था नित्य केली पाहिजे. याच स्रोतस शोधनासाठी स्वरभेद व कास ही लक्षणे असताना वातकफहर द्रव्यांनी वमन द्यावे. तमक श्वासामध्ये विरेचनही द्यावे.

[3]श्वासरोगावर वापरावयाचे औषध अन्न व पेय हे पदार्थ उष्ण, वीर्य, उष्णस्पर्श, कफवातघ्न आणि वाताचे अनुलोमन करणारे असावेत. जे द्रव्य कफघ्न पण वातकर (कषाय) वा वातघ्न पण कफकर (पिच्छिल) असे असेल ते वापरू नये. त्यातल्या त्यात औषधामध्ये वातघ्न गुण असणे अधिक मानावे.

[4]चिकित्सेचा सामान्य नियम लक्षात घेतला तर तो "न बृंहयेत् लंघनीयाम् बृंहयास्तु मृदु लंघयेत् ।" (वा. सू. १४–१५) असा आहे. हा व्याधी बहुधा

१ अनुत्क्लिष्टकफास्विन्नदुर्बलानां ... ... ।
....तृप्तान्विशोधयेत्स्विन्नान्बृंहयेदितरान् भिषक् ॥
च. चि. १७–९१, ९२, पान १२४२

२ कासिने च्छर्दनं दद्यात् ... ... ... ।
... ... ... मार्गं नित्यं विशोधयेत् ॥ च. चि. १७–१२१, १२२, पान १२४५

३ यत्किञ्चित् कफवातघ्नमष्णं ... ... ... ।
... ... ... ताभ्यां प्रायः श्रयोऽनिलापहम् ॥
च. चि. १७–१४७, १४८, पान १२४७

४ सर्वेषां बृंहणे ह्यल्पः शक्यश्च प्रायशो भवेत् ।
नात्यर्थं शमनेऽपायो भृशोऽशक्यश्च कर्शने ॥
तस्माच्छुद्धानशुद्धांश्च शमनैर्बृंहणैरपि ।
हिक्काश्वासार्दिताञ्जन्तून् प्रायशः समुपाचरेत् ॥
च. चि. १७–१४९, ५०, पान १२४८

आत्मोत्पन्न असा असतो. मनुष्याचा विचार करता संतर्पणोत्थ असतो. त्यामुळे व्याधीवरील मूलभूत चिकित्सा सामान्यपणे लंघन हीच ठरते. गर्भिणीमध्ये मात्र लंघन म्हणजे लघुभोजन हे लक्षात ठेवूनच वागावे. बृंहण हे अवस्थाविशेषाने कधी तरी अवलंबावे लागते. परंतु श्वासरोग्यामध्ये स्रोतसे कफाने रुद्ध असली व व्याधी आमाशयोद्भव असल्यामुळे आमपचनासाठी लंघन देणे योग्य असले तरी, प्राणवह स्रोतस हे अधिष्ठान, ज्याची विकृती होते तो प्राण, या गोष्टी विचारात घेऊन सामान्य नियमांपेक्षा थोडा वेगळा असा चिकित्सेचा विचार येथे सांगितला आहे.

करावयास नको अशा स्थितीत जरी श्वासरोग्याला थोडेसे बृंहणोपचार केले गेले तरी त्यापासून होणारा अपाय हा प्रमाणतः अल्प असतो, आणि साध्यही असतो. परंतु लंघनामध्ये जर चूक झाली तर (थोडासा जरी अतियोग झाला तरी) जो अपाय होईल तो विशेष त्रासदायक आणि बरा करण्यास फार कठीण असा असेल. यासाठी शमनोपचाराचा मध्यम मार्ग श्वासरोग्यावर उपचार करताना उत्तम असतो. चूक झालीच तर ती बृंहणात व्हावी, कर्षणात होऊ नये.

श्वास व्याधीमध्ये वमनासाठी मदनफल व विरेचनासाठी निशोत्तर वापरावे.

## औषधे व कल्प :

सोमलता, रिंगणी, पिंपळी, यष्टिमधू, तालिसपत्र, दालचिनी, वासा, मनःशीला, धत्तूर, वत्सनाभ, श्वासकुठार, श्लेष्मांतकरस, चतुर्भुजकल्प, समीरपन्नग, मल्लसिंदुर, हेमगर्भ, अभ्रक भस्म, रससिंदुर, दशमूलारिष्ट, द्राक्षारिष्ट, कनकासव, पंचकोलासव अशी द्रव्ये वापरावीत.

## पथ्यापथ्य :

सूर्यास्तानंतर आहार घेऊ नये; आहार लघू असावा. सौहित्य निर्माण करणारा नसावा. आहार द्रव असणे अधिक चांगले. श्वासामध्ये कफप्राधान्य असेल तर कुलत्थ यूष चांगला उपयोगी पडतो.

श्रम, व्यायाम व अनावश्यक हालचाली वर्ज्य कराव्यात. खोलीमध्ये वारा खेळता राहील पण अंगावर येणार नाही अशी व्यवस्था असावी. निवासस्थल कोंदट, दमट, धूळ, धूर यांनी युक्त असे असू नये.

श्वासाचा वेग नसताना सापेक्षतः स्वास्थ्य असलेल्या मधील काळात रोग्याचे स्थानवैगुण्य नाहीसे करण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी रसायनोपचार करावेत. च्यवनप्राश, अभ्रकभस्म, शृंगभस्म, सुवर्णमालिनी वसंत, लक्ष्मीविलास, बृहद्वातचिंतामणी, त्रैलोक्यचिंतामणी, वर्धमानपिप्पली, भल्लातक रसायन ही द्रव्ये उपयोगी पडतात.

## व्याधिमुक्तीची लक्षणे :

श्वासवेग नसणे, झोप लागणे, उरःस्थलामध्ये हलकेपणा, मोकळेपणा वाटणे, श्वासाचा ध्वनी कोणत्याही प्रकारे अवरुद्ध नसणे, आवाज चांगला होणे, थोड्याशा श्रमानंतरही दम न लागणे.

तमकश्वासी गर्भिणीमध्ये खालीलप्रमाणे चिकित्सा–क्रम ठेवावा :

| | वेग असताना | वेग नसताना |
|---|---|---|
| चिकित्सा | तालिसादीचूर्ण, चौसष्टपिंपळी व यष्टिमधू यांचे मिश्रण, बकुलचंपकावलेह व मध यांतून दिवसातून ३ ते ४ वेळा चाटावयास द्यावे. अनुलोमन–आरग्वधकल्प व बलाबलाचा विचार करून निशोत्तर वापरावे. द्राक्षारिष्ट | हरिणशृंगभस्म, लक्ष्मीविलास व लघुमालिनीवसंत यांचे मिश्रण मधामधून चाटावयास देऊन वर च्यवनप्राश खाण्यास सांगावे. दिवसातून दोन वेळा माक्षिक भस्म, प्रवाळ. |
| स्थानिक चिकित्सा | उरोभागी मोहरीचे तेल लावून रूक्षस्वेद द्यावा. (गरम पाण्याच्या पिशवीने, विटेच्या टोल्याने अथवा फडक्याने शेकावे.) | रूक्ष स्वेद द्यावा. ( उरोभागी ) |
| आहार | पेया, विलेपी, द्रवाहार. रात्री आहार वर्ज्य. दही, तळलेले, चमचमीत फोडणीयुक्त पदार्थ वर्ज्य. | सामान्य आहार रात्री आहार वर्ज्य. |
| विहार | दिवास्वाप वर्ज्य ( दिवसा झोपू नये. ) संपूर्ण विश्रान्ती | दिवास्वाप वर्ज्य प्राणवह स्रोतसाचे बल वाढविण्यासाठी दीर्घश्वसन व उत्श्वसन ( प्राणायाम ) करावे. मोकळ्या हवेत फिरावे. |

## ८. गर्भोपद्रव—प्रमेह

**व्याख्या :**

प्रकर्षेण मेहति इति प्रमेहः । च. नि. ४–३

वारंवार व पुष्कळ प्रमाणात मूत्रप्रवृत्ती होते म्हणून या व्याधीस प्रमेह असे म्हणतात.

**स्वभाव :**

चिरकारी व याप्य.

**मार्ग :**

मध्यम मार्ग.

**[1]प्रकार :**

कफज दहा, पित्तज सहा व वातज चार असे मिळून वीस प्रकारचे प्रमेह होतात. ह्या वीस प्रकारांचे प्राधान्य विचारात घेऊन कफज, पित्तज व वातज असे तीन मुख्य गट बनत असले तरी सर्व प्रकारचे प्रमेह त्रिदोषज आहेत. त्यामुळे त्यांचे प्रकार तीन न म्हणता वीस असे म्हटले आहे.

**[2]कारणे :**

नेहमी सुखाने बसून राहणे, फार झोप घेणे, ग्राम्य, औदक व अनूप या प्राण्यांचे मांस खाणे; दूध, दही यांचा उपयोग भरपूर प्रमाणात करणे, नवीन धान्य व नवीन मद्य यांचे सेवन करणे, गूळ, साखर ह्यापासून तयार केलेली गोड पक्वान्ने पुष्कळ प्रमाणात व रोज खाणे, व्यायाम न करणे असे कफप्रकोप करणारे भाव प्रमेहाच्या उत्पत्तीस कारणीभूत होतात.

१ विंशतिरेव मेहाः । च. चि. ६–८

– त्रिदोषकोपनिमित्ताः विंशतिः प्रमेहाः भवन्ति ।
त्रिदोषप्रकोपनिमित्ता इति सर्वे मेहेष्वेव त्रिदोषाः कारणम्, अधिकत्वाच्च श्लैष्मिकादिव्यपदेश इति दर्शयति । सुश्रुतेऽप्युक्तं " सर्व एव मेहाः सर्वदोषजाः " इति च. नि. ४–३ टीका, पान ४५०

२ आस्यासुखं स्वप्नसुखं दधीनि ।
ग्राम्यौदकानूपरसाः पयांसि ।
नवान्नपानं गुडवैकृतं च
प्रमेहहेतुः कफकृच्च सर्वम् ॥ ४॥ च. चि. ६–४, पान १०३६



वर दिलेली कारणे प्रामुख्याने गर्भिणीमध्ये दौहृदामुळे घडण्याची शक्यता जास्त प्रमाणात असते; म्हणून गर्भिणीला गर्भिणी अवस्थेपुरता प्रमेह झालेला आढळतो.

**[1]संप्राप्ति :**

प्रमेहाच्या संप्राप्तीत कफ, पित्त, वात हे तीनही दोष, मेद, रक्त, शुक्र, उदक, वसा, लसिका, मज्जा, रस, ओज, आणि मांस ही दूष्ये विकृत होतात. यामध्ये कफ हा दोष व मेद, मांस, क्लेद ही दूष्ये प्रमेहास विशेषरीत्या कारणीभूत असून, बाकीची सामान्य स्वरूपात विकृत असतात. किंवा प्रकारभेदाने त्यांच्या ठिकाणी विशेष स्वरूपाची दुष्टी आढळते. प्रकुपित झालेले दोष मेदादी दूष्यांना दुष्ट करून मूत्रासह बस्तीमध्ये येऊन प्रमेह हा व्याधी उत्पन्न करतात.

**[2]पूर्वरूपे :**

प्रमेहाची पूर्वरूपे म्हणून केसांच्या जटा बनतात. (स्वेदाधिक्यामुळे). तोंड गोड होते. हात व पाय यांना बधिरता येते. आग होते. मुख, तालू, कंठ यांना कोरड पडते. तहान लागते. आळस येतो. शरीर मळकट होते. शरीरामध्ये सर्व ठिकाणी चिकटपणा वाढतो. आग झाल्यासारखी वाटते. अंग बधिर होते. मुंग्या (झिणझिण्या) येतात. मूत्राला मुंग्या लागतात. मूत्रामध्ये निरनिराळ्या स्वरूपाचे दोष दिसतात.

१ कफः सपित्तः पवनश्च दोषा
मेदोऽस्र शुक्राम्बुवसालसीकाः
मज्जा रसौजः पिशितं च दूष्याः
प्रमेहिणां, विंशतिरेव मेहाः ॥ ८ ॥

– मेदश्च मांसं च शरीरजं च । क्लेदं कफो बस्तिगतं प्रदूष्य ।
करोति मेहान् समुदीर्णमुष्णैस्तानेव पित्तं परिदूष्य चापि ॥ ५ ॥
क्षीणेषु दोषेष्ववकृष्य बस्तौ धातून् प्रमेहाननिलः करोति ।
दोषो हि बस्तिं समुपेत्य मूत्रं संदूष्य मेहाञ्जनयेद्यथास्वम् ॥ ६ ॥
च. चि. ६–५ ते ६, पान १०३६

२ त्रयस्तु खलु दोषाः प्रकुपिताः प्रमेहानभिनिर्वर्तयिष्यन्त इमानि पूर्वरूपाणि दर्शयन्ति; तद्यथा जटिलीभावं केशेषु, माधुर्यमास्यस्य, करपादयोः सुप्ततादाहौ, मुखतालुकण्ठशोषं, पिपासाम्, आलस्यं, मलं काये, कायाच्छिद्रेषु पदेहं, परिदाहं सुप्ततां चाङ्गेषु, षट्पदपिपीलिकाभिश्च शरीर मूत्राभिसरणं, मूत्रे च मूत्रदोषान् विस्रं शरीरगंधनिद्रा तन्द्रां च सर्वकालमिति ॥ ४६ ॥ च. नि. ४–४६ पान; ४५७–५८

– यथर्तु खलु सर्वं कालमिति । च. नि. ४-४६ पान ४५७–५८
स्निग्ध, पिच्छिल, गुरुता, गात्राणां सादः, श्वासः, तालुगलजिव्हादंतेषु मलोत्पत्तिः वृद्धिश्च नखानां । सु. नि. ६–५

शरीरास दुर्गंध येतो. शरीर जड व स्निग्ध वाटते. अंग गळून जाते. दम लागतो. तालू, गल, जिव्हा, दंत या ठिकाणी मलसंचय होतो. नखांची वाढ अधिक प्रमाणात होते. केसही अधिक वाढतात. घाम पुष्कळ येतो. गर्भिणीमध्ये योनीतून श्वेतस्राव होणे हे लक्षण सापडते. अतिस्वेद व योनिगत स्राव यांमुळे योनिकंडू हे लक्षण तीव्र स्वरूपात आढळते. अंग शिथिल होते. पडून राहावेसे वाटते. डोळे व कान यांतून मळ वाढतो. उरामध्ये भरल्यासारखे वाटते व गार पदार्थ आवडतात.

**[1]रूपे :**

प्रमेहामध्ये वरचेवर व अधिक प्रमाणात मूत्रप्रवृत्ती होणे, आणि मूत्राचा वर्ण आविल गढूळ असणे, असे सामान्य लक्षण असते. चरकाच्या मताप्रमाणे चार ओंजळी ( म्हणजे एक प्रस्थ = ६४ तोळे ) इतके मूत्राचे प्राकृत प्रमाण सांगितले आहे. मूत्राचा प्रकृत वर्ण किंचित् पीत असून ते स्वच्छ असते. प्रमेहामध्ये प्रमाण आणि वर्ण या दोन्ही दृष्टींनी विकृती झाल्याचे स्पष्ट दिसते. प्रमेहाच्या रुग्णाला बहुधा रात्रीतून एका वेळेपेक्षा अधिक वेळा मूत्रोत्सर्गासाठी जावे लागते. याशिवाय शरीराला चिकटपणा वाटणे, तहान लागणे, हातापायांची जळजळ होणे, अंग जड वाटणे, आळस येणे अशी रूपामध्ये सांगितलेली लक्षणेही असतात. सुश्रुताने मधुरमूत्रता हे लक्षण प्रमेहाच्या पूर्वरूपामध्येही सांगितलेले आहे. ते अर्थातच रूपामध्येही व्यक्त होते. ही मधुरता कित्येक वेळा अत्यंत अल्प असते. क्षारधर्म मूत्रामध्ये ती झाकलीही जाते.

प्रमेह उत्पन्न करणारा कफ द्रवगुणांनी वाढलेला असतो. मेद, क्लेद, मांसादी दूष्ये ही वृद्ध झालेली असून, त्यांना शिथिलता आलेली असते. रस, रक्त, वसा, मज्जा, शुक्र, ओज यांच्यामध्येही उण्या-अधिक प्रमाणात विकृती उत्पन्न होते. जी दूष्ये स्वभावतः द्रव स्वरूपात असतात त्यांच्यामधील विकृती केवळ प्रमाणाधिक्याने होते. मेदमांसासारख्या ज्या दूष्यांच्यामध्ये घनत्व असते, त्यांच्यामध्ये प्रमाणाधिक्याच्या जोडीने अबद्धत्वअसंहतत्त्व–शैथिल्यही उत्पन्न होते.

– हृन्नेत्रश्रवणोपदेह, शीतप्रियत्वं, केष्यवृद्धिः शिथिलत्वमंगे स्वेदः शय्यासनस्वप्नासुखतर्षंगः वा. नि. १०–३८

१ प्रमेहपूर्वरूपाणामाकृतिर्यत्र दृश्यते ॥
किंचिच्चाप्याधिकं मूत्रं ते प्रमेहिणामादिशेत् ॥ २२ ॥
सु. नि. ६–२२, पान २९३

– दोषदूष्या विशेषेऽपि तत्संयोगविशेषतः ॥
मूत्रवर्णादिभेदेन भेदो मेहेषु कल्प्यते । मा. नि. प्रमेह ६, म. टीकेसह पान २५६

– यथा हि वर्णानां पञ्चानामुत्कर्षापकर्षकृतेन संयोगविशेषेण शबलबभ्रुकपिलकपोतमेचकादीनां वर्णानामनेकेषामुत्पत्तिर्भवति; एकमेव दोषधातुमलाहारविशेषेणोत्कर्षापकर्षकृतेन संयोगविशेषेण प्रमेहाणां नानाकरणं भवति ॥ सु. नि. ६–२६



धातूंची वृद्धी (उपचय नव्हे) अग्निमांद्याने होते हे स्पष्ट आहे. आहार-रसाचे धातूंत, धातूंचे इतर धातूंत वा धात्वग्नींच्या द्वारा परिणमन होत असताना, सारकिट्ट विभजनाच्या प्रत्येक परिणमन क्रियेत अस्तित्वात असणाऱ्या सामान्य नियमाप्रमाणे क्षारभूत धातू व उपधातू निर्माण होत असताना त्या वेळी एक प्रकारचाही किट्टभागही वेगळा होत असतो. यासच क्लेद अशी संज्ञा आहे. हा क्लेद प्रकृत स्थितीत स्वेदाच्या आश्रयाने राहून त्वचा स्निग्ध ठेवण्यास सहाय्यभूत होतो. व मूत्रासवे मलरूपाने प्रतिदिनी शरीरातून बाहेर पडतो. प्रमेह व्याधीतील जठराग्निमांद्य कफप्रकोप या कारणांनी इतर धातूपधातूंप्रमाणे या क्लेदाचीही विकृती होते, प्रमेहात असणाऱ्या प्रभूताविलमूत्रतेसही कफदृष्टी व क्लेददृष्टीच विशेषतः कारणीभूत असते.

प्रमेह व्याधीच्या विशिष्ट स्वभावामुळे कफ-प्रकोप होऊन मेद-मांसादींच्या असहततेमुळे शिथिल झालेल्या शरीरामध्ये या प्रकुपित कफाचा संचार होतो. मेदाचे व कफाचे गुण जवळजवळ सारखेच असल्यामुळे प्रकुपित झालेला कफ वृद्ध, शिथिल झालेल्या मेदाशी मिसळून त्यास विकृत करतो. दुष्ट झालेले हे कफमेद क्लेद-मांस यांच्याशी संसर्ग पावतात आणि क्लेद-मांसांनाही दुष्ट करतात. कफामुळे दुष्ट झालेल्या क्लेदांचे मूत्रामध्ये रूपांतर होते. क्लेद, रस, मेद, मांस यांच्या दुष्टीमुळे वृक्कापासून बस्तीपर्यंतच्या वा त्यापूर्वीच्याही मूत्रनिर्मितीस कारण असणाऱ्या मूत्रवह स्रोतसांत विकृती उत्पन्न होऊन मूत्राच्या प्रकृत स्वरूपामध्ये निरनिराळे विकार उत्पन्न होतात व प्रमेह हा व्याधी उत्पन्न होतो.

प्रमेह व्याधीच्या सामान्य संप्राप्तीत कफ-दोषाला महत्त्व असल्याने चरकाने कफज मेहाची म्हणून जी संप्राप्ती सांगितली आहे, तीच त्याच क्रमाने इतरही प्रकारांत घडते. आरंभक दोष तेवढे प्राधान्याने निरनिराळे असतात.

आयुर्वेदीय कल्पनेप्रमाणे मूत्राचे उत्पत्तिस्थान पक्वाशयामध्ये आहे, त्या ठिकाणी वायूच्या प्रेरणेने पुरीषापासून मूत्र पृथक होऊन शोषले जाते. हे शोषित मूत्र प्रारंभी अच्छजलाच्या स्वरूपात असते. आहारातील जलांशच या ठिकाणी प्रामुख्याने वेगळा होतो. हा जलांश सर्व शरीरामध्ये क्लेद संग्रहाचे कार्य करीत करीत वृक्कामध्ये येतो. यासाठी वृक्काला आहारजलवाही सिरामुळे असे सार्थ विशेषण शारंगधराच्या टीकाकाराने दिले आहे (शा. प्र. ५–४४. गु. टीका. पान ५८). आहारजलवाहिनी सिरांच्या मुळाशी संबद्ध असलेले दोन अवयव एक क्लोम किंवा तीळ व दुसरा वृक्क, त्यात तिळाकडे आहारजलातील सारभागाचे नियंत्रण असून किट्टभागाचे नियंत्रण वृक्क, हे अवयव करतात. या वृक्कातून किट्ट वहनाचे कार्य करणारे मूत्र गविनीद्वारा बस्तीमध्ये येते व तेथून ते मूत्रमार्गाने शरीराबाहेर पडते. प्रमेहामध्ये मेदाची दुष्टी असल्यामुळे त्यांच्या स्रोतसाच्या मूळस्थानी असलेले वृक्क दुष्ट होणे स्वाभाविक होते. सर्व अपधातूच प्रमेहामध्ये दुष्ट होतो. असेही त्याच्या दूष्यांच्या वर्णनावरून दिसते. वृक्क हे या उदकवह स्रोतसाशी संबद्ध आहे हे आपण पाहिलेच.

प्रमेहातील अवयव-विकृतीचा विचार करता तृषा उत्पन्न करणारे क्लोम मेदावर नियंत्रण असलेले वपावहन व वृक्क, मूत्राचे आधार असलेला बस्ती या सर्व अवयवांमध्ये कफामुळे, अग्निमांद्यामुळे दुष्टी उत्पन्न झालेली असते. या सर्व संप्राप्तीचा संकलित परिणाम प्रमेह त्याचे प्रकार वा प्रमेहामध्ये उत्पन्न होणारे उपद्रव यांच्यामध्ये होतो.

ज्या वेळी कफाचे सर्वच्या सर्व गुण विकृत होऊन सर्व मूत्रवह स्रोतस दुष्ट झालेल्या क्लेद-भेदाने व्याप्त होते, त्या वेळी साध्य असलेला हा कफज मेदही स्थिर किंवा असाध्य होतो. संप्राप्तीतील कफाने होणाऱ्या मांसदुष्टीचे प्रमाण अधिक झाल्यास प्रमेह-पीडका नावाचा उपद्रव उत्पन्न होतो.

सर्व प्रकारचे प्रमेह उपेक्षेने, मिथ्या आहार-विहाराने, दीर्घ काळाने वा दोष-दूष्याच्या बलवान विकृतीमुळे मधुमेहामध्ये परिणत होतात. वायूच्या सामान्य विकृतीच्या कारणाप्रमाणे मधुमेहातही धातुक्षयोत्पन्न मधुमेह आणि दोषावृत वातप्रकोपजन्य मधुमेह असे दोन प्रकार होतात. आवरणामुळे उत्पन्न होणाऱ्या मधुमेहामध्ये कफ-पित्ताची लक्षणे मधून मधून एकाएकी दिसतात. आणि मधून मधून केवळ वाताची व इतरही दूष्याची लक्षणे दिसतात. धातुक्षयजन्य मधुमेहामध्ये मात्र केवळ वाताचीच लक्षणे सातत्याने दिसतात. काही ग्रंथकारांच्या मते ओजाची विकृती करणारा मधुमेह हा मार्गावरोधजन्य वातप्रकोपानेच होतो. चरकाने कफपित्ताने व मेदमांसाने आवृत्त झालेला वायू ओजाला घेऊन बस्तीमध्ये येतो व मधुमेह उत्पन्न करतो, असे म्हटले आहे. ( च. सू. १७-७९, ८० )

प्रमेहाला मधुमेह असेही संबोधिले जाते; कारण मूत्राला उण्या-अधिक प्रमाणात मधुरता असणे हे लक्षण सर्वच प्रमेहांत असते. तसेच प्रमेहातील विकृती वाढत जाईल त्या प्रमाणात सर्व शरीरालाही माधुर्य येते. म्हणूनही मधुमेह हा प्रमेहाचा प्रतिशब्द म्हणून मानला जातो.

हिंडता फिरता मधुमेही हिंडण्याचा कंटाळा करतो. नंतर बसूनच राहतो. पुढे पुढे पडून राहण्याची ( शय्येवर ) अपेक्षा करतो व शेवटी सारखा झोप घेत राहतो.

मूत्रप्रवृत्तीचे प्रमाण, वेळा, आविलता, घनता, मधुरता वाढत जाणे, थकवा येत जाणे, कृशता येणे हे व्याधी वाढत असल्याचे द्योतक समजावे. नेहमीचेच पथ्यकर साधे

– सर्व एव प्रमेहास्तु कालेनाप्रतिकारिणः । मधुमेहत्वमायान्ति तदाऽसाध्या भवंति हि ॥
मधुमेहे मधुसमं जायते स किल द्विधा । क्रुद्धे धातुक्षयाद्वायौ दोषावृतपथेऽथवा ॥
आवृतो दोषलिङ्गानि सोतिमात्रं प्रदर्शयन् ।
क्षणात्क्षीणः क्षणात्पूर्णो भजते कृच्छ्रसाध्यताम् ॥
मधुरं यच्च मेहेषु प्रायो मध्विव मेहति । सर्वेऽपि मधुमेहाख्या माधुर्याच्च तनोरतः ॥
मा. नि. प्रमेह २३ ते २६, पान २६२



अन्न घेऊन तृष्णा, दौर्बल्य व प्रभूताविल मूत्रता ही लक्षणे नियंत्रित राहिली वा कमी कमी होत गेली तर व्याधी बरा होत आहे असे समजावे.

गर्भिणीमध्ये वर दिलेल्या लक्षणांची काटेकोरपणे परीक्षा करणे आवश्यक असते.

हा व्याधी अत्यंत चिरकारी व याप्य असा आहे. वर्षानुवर्षे पथ्यकर आहार-विहाराने राहणे व औषधे घेणे या उपचाराने नियंत्रित राहतो. तो संपूर्ण बरा असा क्वचितच होतो.

## [1]साध्यासाध्यता :

दहा प्रकारचे कफज मेह हे दोषांच्या दृष्टीने एकाच प्रकारच्या लंघन-रूक्षणादी क्रियेने बरे होणारे असल्याने साध्य होतात. क्रियावैगुण्यामुळे सहा प्रकारचे पित्तज मेह कष्टसाध्य वा याप्य होतात. आणि दोषदूष्याच्या चिकित्सेतील अति विपरीततेमुळे वायूच्या प्रभावामुळे चारही प्रकारचे वातज मेह असाध्य असतात.

ज्या वेळी प्रमेही स्त्रीला गर्भिणी अवस्था प्राप्त होते त्या वेळी गर्भिणी-परिचर्येमध्ये प्रमेहाचे पथ्यापथ्य कटाक्षाने पाळले तर त्या स्त्रीचा प्रमेह याप्य असतो. अन्यथा त्याचे प्रमाण वाढलेले आढळते. व त्यामुळे गर्भ हा प्रमाणापेक्षा जास्त पोसला जातो. व गर्भिणी ही कृश झालेली आढळते. त्या कारणाने गर्भसंग वा मूढगर्भता आढळून येते. प्रसवानंतर तो संपूर्ण बरा होण्याची शक्यता नसते.

ज्या वेळी गर्भिणी स्त्रीमध्ये गर्भोपद्रव म्हणून प्रमेह उत्पन्न होतो, त्या वेळीसुद्धा गर्भिणीच्या आहार-विहारावर नियंत्रण ठेवावे लागते. मात्र प्रसवानंतर ती स्त्री व्याधिमुक्त होण्याची शक्यता असते.[9] परंतु पुष्कळ वेळा गर्भिणी अवस्थेमध्ये प्रमेह होणे ही सवय लागल्याचे प्रत्यक्षात आढळून येते. म्हणून अशा स्त्रियांमध्ये शक्य तो अपत्यांची संख्या मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न करावा.

प्राकृत गर्भिणीच्या आहारापेक्षा वरील दोन्ही प्रमेही गर्भिणी स्त्रीमध्ये आहाराचे प्रमाण जास्त सापडते. त्याचा परिणाम म्हणून बालक हे प्रमाणापेक्षा जास्त पुष्ट होऊन मूढगर्भासारख्या, मृतगर्भासारख्या विकृती उत्पन्न होतात. तसेच योनिकंडू हे लक्षण जास्त असल्याने प्रसवानंतर कफज योनिदुष्टी होण्याची शक्यता जास्त असते. गर्भिणीमध्ये प्राकृत अवस्थेत तिच्या शरीरात जी क्लेदसंचिती होते, त्यापेक्षा गर्भिणी स्त्रीच्या शरीरामध्ये क्लेदसंचिती जास्त प्रमाणात होते व त्यामुळे अतिगर्भोदकासारखे स्रोतोरोधाचे व्याधी उत्पन्न होतात.

---

१ ते दश प्रमेहाः.......समक्रियत्वाच्च ॥ ११ ॥ च. नि. ४–१२, पान, ४५४
– सर्व एव ते व्याप्याः.......क्रमत्वाच्चेति ॥ च. नि. ४–१८, पान ४५५
– इमांश्चतुरः प्रमेहान्......क्रमत्वाच्चेति ॥ च. नि. ४–३८, पान ४५७

[1]अगदी लहानपणीच ज्याला प्रमेह उत्पन्न झाला आहे किंवा प्रमेही माता-पित्यांच्यामुळे बीजदोषाने ज्याला प्रमेह जडला आहे, असा प्रमेह असाध्य होतो. अनुवंशातील दोषामुळे उत्पन्न होणारे सर्वच व्याधी असाध्य होतात. अनुवंशातून पसरत जाण्याची प्रवृत्ती प्रमेह या व्याधीत विशेष आहे.

### [2]रिष्ट लक्षणे

तृष्णा, दाह, प्रमेहपीटिका मांसकोथ, ही मेहाची रिष्ट लक्षणे आहेत.

### [3]चिकित्सा :

प्रमेहाचे चिकित्सेच्या सोईसाठी चार विभाग अवस्थांनुरूप केलेले आहेत ते असे. बलवान्, स्थूल, कृश, या भावांच्या संयोगाने आणखीही ४ भेद कल्पिता येतील ते असे: *कृशदुर्बल, कृशबलवान्, स्थूल बलवान्, स्थूल दुर्बल.*

कृश आणि दुर्बल रोग्यांमध्ये प्रमेह व्याधीतही संतर्पण व संशमन असेच करावे. वमन-विरेचन यांचे इष्ट ते द्रव्य वापरावे. प्रमेह व्याधी चिरकारी असल्यामुळे संशोधनानंतर सर्व प्रकारच्या रुग्णांत योग्य प्रमाणात संतर्पणच केले पाहिजे. अविचाराने केलेल्या अपतर्पणाने गुल्म, क्षय, उपस्थशूल, बस्तिशूल मूत्रग्रह, असे विकार उत्पन्न होतात.

[4]प्रमेहाच्या सामान्य संप्राप्तीमध्ये क्लेद, मेद, कफ यांची दुष्टी असल्यामुळे कफ-पित्तांचे प्राधान्य असलेल्या मेहात तरी प्रथमतः अपतर्पण करावे. व्यायाम, चंक्रमण, उद्वर्तन, स्नान या विहारांचा अवश्य उपयोग करावा.

### कल्प :

आमलकी, हरिद्रा, निंब, कारले, सप्तकपी, मुस्ता, चंदन, दारुहळद, अर्जुन, खदीर, कदंब, हरीतकी, लोध्र, गुडूची, पटोल, वड, उंबर, जांभूळ, बेल, लोह, माक्षिक, शिलाजतु, वंग, नाग, जसद, आहिफेन, भांग, चंद्रप्रभा, वसंतकुसुमाकर, आरोग्यवर्धिनी, प्रमेहगजकेसरी, कुंभजतु, लोहासव, लोध्रासव, खदिरारिष्ट, जंब्वासव, असनाद.

१ जातः प्रमेही मधुमेहिनो वा........भवन्ति तांश्च प्रवदन्त्यसाध्यान् ॥
क. चि. ६–५७

२ मेहतृट्दाहपिटिकायांसकोथातिसारिणम् ॥ वा. शा. ५–८५, पान ४२६

३ स्थूलः प्रमेही बलवानिहैकः........तस्य प्रसमीक्ष्य वह्निम् ॥ च. चि. ६–१५ ते १७

४ क्लेदश्च मेहश्च......कार्याण्यपतर्पणानि ॥ च. चि. ६–५१, पान १०४५

– व्यायामयोगैर्विविधैः......न सन्ति मेहाः ॥ च. चि. ६–५०, पान १०४५



### आहार :

सातू, वरी, नाचणी, गोधूम, मूग, कुळीथ, हरभरा, जुने जाडी तांदूळ, ताक, दूध, पालेभाज्या हे सेवन करावे.

### विहार :

चालण्याचा व्यायाम भरपूर घ्यावा.

### अपथ्य :

[1]बसून राहणे, दिवसा झोप घेणे, नवीन धान्य, दही, धूम्रपान, स्वेदन, रक्तमोक्ष मद्य, तेल, तूप, गूळ, साखर, क्षार, आंबट पदार्थ, पिठाचे पदार्थ, आनूप मांस वर्ज्य करावे.

## ९. गर्भोपद्रव–अपस्मार

### [2]व्याख्या :

वस्तुस्थितीच्या ज्ञानास स्मृती असे म्हणतात : अशी स्मृती ज्या अवस्थेत नाहीशी होते त्या व्याधीस अपस्मार म्हणतात. ह्या व्याधीत स्मृती, बुद्धी, सत्त्व या भावांना विकृती येऊन विकृत स्वरूपाच्या हालचाली करीत रोगी मूच्छित होतो. याचे वेग येतात.

### स्वभाव :

दारुण.

### मार्ग :

माध्यम मार्ग.

### [3]प्रकार :

वातज, पित्तज, कफज व सान्निपातिक असे चार प्रकार आहेत.

१ सदाऽसनं दिवा निद्रा ... ... अम्लेक्षुरसपिष्टान्नानूपमांसानि वर्जयेत् ॥
यो. र., पान ५७६

२ स्मृतिर्भूतार्थविज्ञानमपश्च परिवर्जने ।
अपस्मार इति प्रोक्तस्ततोऽयं व्याधिरन्तकृत् ॥ सु. उ. ६१–३ पान ७९९

– अपस्मारं पुनः स्मृतिबुद्धिसत्त्वसंप्लवाद्बीभत्सचेष्टमावस्थिकं तमः प्रवेशमाचक्षते ॥
सटीक च. नि. ८–५, पान ४७८

३ इह खलु चत्वारोऽपस्मारा भवन्ति वातपित्तकफसन्निपातनिमित्ताः ॥
च. नि. ८–३, पान ४७३

गर्भिणीमध्ये हे चारही प्रकार गर्भोपद्रव झालेले आढळतात.

## [1]कारणे :

इंद्रियांचे व्यापार हे हीन-मिथ्यातियोग दोषांनी युक्त होणे, विरुद्ध अन्न, मलिन असा आहार-विहार, वेगनिग्रह व अहितकर, अशुची भोजन, रजःस्वला स्त्रीशी मैथुन करणे, काम, भय, उद्वेग, क्रोध, शोक, यांचा चित्तावर परिणाम होऊन मनाचे रजोगुण व तमोगुण हे दोष वाढणे, या कारणांनी दोष प्रकुपित होऊन अपस्मार हा व्याधी उत्पन्न करतात. गर्भिणीमध्ये अतिशय अभिष्यंदी, अहितकर, ( चमचमीत तळलेले), अशुची (आंबलेले) भोजन यामुळे दोष प्रकुपित झालेले आढळतात. बहुधा प्रत्यक्षात डोहाळे पुरविण्याच्या तंत्रामध्ये चमचमीत, तळलेले व अभिष्यंदी असे पदार्थ गर्भिणीला पुरविले जातात व त्यामुळे आठव्या किंवा नवव्या महिन्यामध्ये अपस्मार हा गर्भोपद्रव उत्पन्न झालेला आढळतो.

आहारविहारातील मलिनता केवळ दृश्य स्वरूपाचीच असते असे नाही; तर ती अदृश्य स्वरूपाचीही असू शकते. यासाठीच आतंकदर्पणकार व डल्हण यांनी मलिनता दृष्टादृष्टार्थ असते असे म्हटले आहे.

चरकाने अभिचार कर्मातील तंत्रप्रयोगात चूक होणे, शरीराच्या हालचाली विषम होणे, शरीर अतिशय क्षीण होणे, अशी कारणे अधिक सांगितली आहेत.

(च. नि. ८–४).

## संप्राप्ति :

[2]प्रकुपित झालेले दोष रजःस्तमाने चित्त विकृत झालेल्या मनुष्याच्या चेतना स्थानात प्रवेश करून इंद्रियांची विकृती उत्पन्न करतात. संज्ञावह स्रोतसांचा रोध होऊन रोग्याला मूर्च्छना उत्पन्न होते.

[3]अपस्माराच्या संप्राप्तीत हारिताने पित्त, कफ, उदान, प्राणवायू हे शिरामध्ये

१ मिथ्यातियोगेन्द्रियार्थकर्मणानभिसेवनात् ।
विरुद्धमलिनाहारविहारकुपितैर्मलैः ॥ ४ ॥
वेगनिग्रहशीलानामहिता शुचिभोजिनाम् ।
रजस्तमोभिभूतानां गच्छतां च रजस्वलाम् ॥ ५ ॥
तथा कामभयोद्वेगक्रोधशोकादिभिर्भृशम् ।
चेतस्यभिहते पुंसामपस्मारोऽभिजायते ॥ ५ ॥ सु. उ. ६१–४ ते ६, पान ७६१

२ दोषाः प्रकुपिता रजस्तमोभ्यामुपहतचेतसामन्तरात्मनः श्रेष्ठतममायतनं......
...सहसाऽभिपूरयन्ति, तदा जन्तुरपस्मरति ॥ ४ ॥ च. नि. ८–४. पान ४७८

३ पित्तं मरुच्च श्लेष्मां च उदानः कुपितो भृंश ।
... ... ... ... ... ... ... ... ... ...
कंपेते हस्तपादौ च रक्तव्यावर्तितलोचनं ॥ हारित तृतीय १८, पान ३४०



प्रकुपित होऊन अपस्मार व्याधी उत्पन्न करतात असे म्हटले आहे. या व्याधीत मूर्च्छा येते; हातापायास झटके येतात. घसा घुरघुरतो. डोळे लाल होतात व फिरतात. तोंडावाटे फेस येतो. ही हारिताने सांगितलेली लक्षणे सामान्य लक्षणे म्हणून सांगितली आहेत.

## पूर्वरूपे :

[1]हृदय कापणे, हृदयात व डोक्यात रिकामेपणा वाटणे, श्रम, अंधारी येणे, ध्यान, भिवयांचा संकोच होणे, डोळे विकृत होणे, नसलेले शब्द ऐकू येणे, घाम येणे, लाळ सुटणे, नाकातून पाणी येणे, अन्न न पचणे, रुची नसणे, मूर्च्छा, पोट गुबारणे, बल कमी होणे, झोप न येणे, अंग दुखणे, तहान लागणे, स्वप्नामध्ये गातो आहो, नाचतो आहो, तेल वा मद्य पीत आहो, वा तेलाची वा मूत्राची मूत्रप्रवृत्ती होत आहे असे दिसणे अशी लक्षणे अपस्माराच्या पूर्वरूपात होतात.

चरकाने अस्थिभेद, हृदयग्रह, तमोदर्शन, स्वप्नामध्ये कापणे, पडणे, भोसकले जाणे, अशी लक्षणे अधिक वर्णन केलेली आहेत.

## [2]रूपे :

दोषांनी चित्ताचा उपघात झाला, चेतनास्थान व्यापले गेले, संज्ञामोह स्रोतसांचा अवरोध झाला म्हणजे रुग्णाचे संज्ञाग्रहणसामर्थ्य नष्ट होते, अंधारी येते व त्याच्या शरीराच्या चेष्टा (हालचाली) बीभत्स स्वरूपाच्या होतात. दात खाणे, तोंडाला फेस येणे, हातपाय झाडणे, मूर्च्छित होत असताना काही तरी भलतीच दृश्ये दिसणे, झटका येऊन पडणे, डोळे व भुवयांचे स्वरूप विकृत होणे अशी लक्षणे होतात. दात खाण्याचा परिणाम म्हणून बहुधा जीभ चावली जाते. दोषदूष्यांच्या बलाबलाप्रमाणे

१ रूपमुत्पत्स्यमानेऽस्मिन् हृत्कम्पः शून्यता भ्रमः ।
... ... ... ... ... ... ... ... ... ...
पानं तैलस्य मद्यस्य तयोरेव च मेहनम् ॥ वा. उ. ७–६ ते ८, पान ८०२

२ हते सत्त्वे हृदि व्याप्ते संज्ञावाहिषु खेषु च ।
तमो विशन् मूढमतिर्बीभत्साः कुरुते क्रियाः ॥
दन्तान् खादन् वमन्फेनं हस्तौ पादौ च विक्षिपन् ।
पश्यन्नसन्तिरूपाणि प्रस्खलन् पतति क्षितौ ॥
विजिह्माक्षिभ्रुवो दोषवेगेऽतीते विबुध्यते ।
कालान्तरेण सपुनश्चैवमेव विचेष्टते ॥ अ. सं. उ. १०, पान ७९–८०

– अपस्मारो हि स्मृत्यपायः स्मृत्यपगम उच्यते । ... ... ... ... ... ... ...
... ततो दोषाणां वेगेऽतीते विजिह्माक्षिभ्रुवो विबुध्यते । सुबोधम् । निचयः सन्निपातः ॥ ... ... इन्दुटीका

अपस्माराचा हा वेग काही काल टिकतो आणि त्यानंतर रोगी झोपेतून जागा झाल्याप्रमाणे सावध होतो. कालांतराने हे अपस्माराचे वेग वरचेवर येत राहतात.

[1]चरकाने बारा दिवसांनी, पंधरा दिवसांनी व एक महिन्याने प्रकुपित दोष अपस्माराचे वेग उत्पन्न करतात, असे म्हटले आहे. अर्थात ही कालमर्यादा निश्चित स्वरूपाची नाही. वेग, काल यापेक्षा लवकर अगर उशिराही येऊ शकतात.

[2]सुश्रुताने प्रलाप, कण्हणे व क्लेश ही तीन लक्षणे सर्वच अपस्मारांत सामान्य असतात, असे म्हटले आहे.

## [3]वातज अपस्मार :

वातज अपस्मारात मांड्या ह्या स्फुरण पावल्याप्रमाणे वरचेवर दीर्घकाळपर्यंत कंपित होतात. अपस्माराचे वेग पुनः पुनः येतात व थोडा वेळ टिकतात. रोगी विकृत स्वराने रडतो, बडबडतो, डोळे बाहेर आल्यासारखे होतात, श्वास लागतो. तोंडाला फेस येतो. रोगी कापतो. डोके आपटले जाते. दात खातो, मान व गळा फुगतो. अंगाला झटके येतात. बोटे वाकडीतिकडी होतात. नखे, नेत्र त्वचेच्या ठिकाणी रूक्षता, श्यावता व अरुणता दिसते. मूर्च्छा येण्यापूर्वी थोडा वेळ चंचल, कुरूप, वेडीवाकडी कठोर कृष्णवर्णाची दृश्ये रुग्णास दिसतात.

सुश्रुताने चंचल इत्यादी गुणांनी युक्त दृश्ये अंगावर धावून आल्यासारखी वाटतात व नंतर मूर्च्छता येते असे रोगी सांगतो, असे वर्णन केले आहे (सु. उ. ६१–६२). हृदयामध्ये टोचल्यासारखी पीडा होणे असे वातज अपस्माराचे विशेष लक्षण सुश्रुताने सांगितले आहे (सु. उ. ६१–१६).

१ पक्षाद्वा द्वादशाहाद्वा मासाद्वा कुपिता मलाः ।
अपस्माराय कुर्वन्ति वेगं किंचिदथान्तरम् ॥ चः चि. १०–१३, पान ११०४

२ प्रलापः कूजनं क्लेशः प्रत्येकं तु भवेदिह ॥ सटीक सु. उ. ६१–१६, पान ८००

३ तत्र वातात् स्फुरत्सक्थिः प्रततः च मुहुर्मुहुः ।
अपस्मरति संज्ञां च लभते विस्वरं रुदन् ॥
उत्पिण्डिताक्षः श्वसिति फेनं वमति कम्पते ।
आविध्यति शिरो दन्तान् दशत्याध्मानकन्धरः ॥
परितो विक्षिपत्यङ्गं विषमं विनताङ्गुलिः ।
रूक्षश्यावारुणाक्षित्वङ्नखास्यः कृष्णमीक्षते ॥
चपलं परुषं रूपं विरूपं विकृताननम् ॥ अ. सं. उ. १०, पान ८० सटीक



## [1]पित्तज :

पित्तज अपस्मारात अपस्माराच्या वेगानंतर रोगी लवकरच सावध होतो. तोंडाला येणारा फेस पीत वर्णाचा असतो. नख-नेत्रादींच्या ठिकाणी पीत व ताम्र वर्ण दिसतो. जमिनीवर हातपाय आपटतो. मूर्च्छित होत असताना उग्र, तेजस्वी, क्रुद्ध अशी दृश्ये दिसतात. फार तहान लागते.

## [2]कफज :

कफज अपस्मारात आलेल्या मूर्च्छेतून रोगी बऱ्याच वेळाने सावध होतो व पुन्हा येणारी मूर्च्छाही अधिक दीर्घकाळाने येते. चेष्टा फारशा विकृत नसतात. तोंडातून लाळ गळते. नख-नेत्र, त्वचेच्या ठिकाणी श्वेतता दिसते. मूर्च्छित होण्यापूर्वी श्वेत, गुरू, स्निग्ध रूपे दिसतात.

## सान्निपातिक :

सान्निपातिक अपस्मारात सर्व दोषांची लक्षणे एकत्र दिसतात.

## साध्यासाध्यता :

सर्व लक्षणांनी युक्त असा सान्निपातिक अपस्मार व व्याधी उत्पन्न होऊन बरेच दिवस झाले असल्यास, तसेच रोगी क्षीण असल्यास अपस्मार ( कष्टसाध्य, याप्य ) असाध्य असतो.

गर्भिणीमध्ये गर्भोपद्रव म्हणून अपस्मार व्याधी झालेला आढळतो. त्या वेळी दोन वेगांमधील अंतर व वेग टिकण्याची काल-मर्यादा यांच्यावर गर्भाचे स्वास्थ्य अवलंबून असते. वेग उशिरा येणे व फार थोडा वेळ टिकणे अशा स्थितीत गर्भाला धोका पोहोचत नाही. गर्भिणीला लंघनादी उपचार करूनही हे वेग पूर्णपणे बंद होऊ शकतात. जर दोषदुष्टी तीव्र स्वरूपाची असेल व अपस्माराचे वेग वारंवार येऊन पुष्कळ काळ टिकत असतील तर गर्भाला धोका पोहोचेल व गर्भ मृत होण्याची शक्यता फार प्रमाणात आढळते. व एकदा गर्भ मृत झाला म्हणजे मृतावस्थेत गर्भिणीची प्रसूती त्वरित होते व स्त्री व्याधिमुक्त होण्याची शक्यता असते. क्वचित प्रसंगी प्रसूती होऊनही अपस्माराचे वेग पुढे काही काळपर्यंत ( संपूर्ण दोष नाहीसे होईपर्यंत २ -३ दिवस ) येत राहतात.

१ अपस्मरति पित्तेन मुहुः संज्ञां च विन्दति ।
पीतफेनाक्षिवक्त्रत्वगास्फालयति मेदिनीम् ।
भैरवादीप्तरुषितरूपदर्शी तृषान्वितः । सटीक अ. सं. उ. १०, पान ८०

२ चिरादपस्मरन्तं, चिराच्च संज्ञां प्रतिलभमानं, पतन्तम्, अनतिविकृतचेष्टं लालामुद्वमन्तं शुक्लनखनयनवदनत्वचं, शुक्ल गुरू । स्निग्धरूपदर्शिनं, श्लेष्मलानुपशयं विपरीतोपशयं च श्लेष्मणा उपस्मरन्तं विद्यात् ॥३॥ च. नि. ८–१० पान ४७९

### रिष्ट लक्षणे :

अतिशय कंप, क्षीणता, हालचाल, नेत्रविकृती. ही लक्षणे अधिक प्रमाणात असताना अपस्मार व्याधी मारक ठरतो.

प्रत्यक्षामध्ये गर्भिणीमध्ये शोथ हा गर्भोपद्रव उत्पन्न होऊन त्याची उपेक्षा (चिकित्सा केली नाही तर) झाली असताना अपस्मार हा व्याधी होऊन व्याधिसंकर उत्पन्न झालेला आढळतो. तर काही वेळा कफज अपस्माराचे लक्षण म्हणून पादशोथ आढळतो. अशा शोथ व अपस्मार यांच्या व्याधिसंकरामध्ये गर्भ व गर्भिणी या दोघांच्याही जीवास धोका पोहोचतो. म्हणून गर्भिणी-परिचर्येमध्ये गर्भिणीच्या शोथाकडे विशेष लक्ष पुरवून त्यावर वेळीच चिकित्सा करावी.

### अपस्माराच्या वेगामध्ये गर्भिणी व बालक यांवर होणारी लक्षणे :

वारंवार अपस्माराचे वेग आल्यामुळे अकालप्रसूती किंवा बालक मृतजात (जन्मतः मृत) वा जातमृत (जन्मानंतर लगेचच मेलेले) होण्याची शक्यता असते. नेत्रामध्ये रक्तस्राव, जीभ चावून तुटणे, दात पडणे. गर्भिणी अपस्माराचा वेग येऊन खाली पडली तर अस्थिभंग होतो.

कोणत्याच चिकित्सेने गर्भिणी अपस्माराच्या वेगातून संपूर्ण शुद्धीवर न आल्यास ती मृत होते.

क्वचित वेळी दोषांचे प्रमाण अल्प असताना गर्भिणीला लवकर चिकित्सा पोहोचली असताना गर्भिणी रोगमुक्त होते व गर्भ जिवंत राहून तसाच पुढे वाढतो व अशा जिवंत गर्भामध्ये प्रसूतीनंतर सहजविकृती सापडण्याची शक्यता असते.

### चिकित्सा–सामान्य :

अपस्माराच्या मूर्च्छेतून सावध करण्यासाठी प्रथम तीक्ष्ण उपचार करावेत. (अंजन, धूप, नस्य), व दोषानुरूप बस्ती, वमन, विरेचनप्रधान चिकित्सा करावी.

### विशेष :

गर्भिणीमध्ये अपस्माराचा वेग आला असताना पुढीलप्रमाणे चिकित्सा करावी :

गर्भिणीला प्रथम रुग्णालयात प्रवेशित करावी (शक्यतो रुग्णाच्या घरी चिकित्सा करू नये). तिला रुग्णालयाच्या एका बाजूच्या शांत व अंधेऱ्या खोलीत (प्रकाश आत येऊ नये म्हणून गडद निळ्या रंगाचे पडदे लावलेल्या पण हवेशीर अशा खोलीत)

१ समवेत सर्वलिंग अपस्मारं सान्निपातिकं विद्यात्। च. चि. ८ ते ११

२ सर्वैरेतैः......क्षीणस्यानवश्च यः। मा. नि. अपस्मार ६, पान १९१

३ प्रस्फुरन्तं......विकुर्वाणमपस्मारो विनाशयेत्। मा. नि. अपस्मार ७, पान १९१



ठेवावे. तिला कॉटवर उताणे निजवावे. परंतु तिची मान एका कुशीवर ठेवून तिला श्वसनास कोणत्याही तऱ्हेने अडथळा येणार नाही अशी ठेवावी व जीभ चावली जाणार नाही अशी खबरदारी घ्यावी. त्याकरिता रुग्णेच्या तोंडामध्ये एक इंच रुंदीचे नाडीयंत्र घालून ठेवावे. त्यामुळे जीभ चावली न जाता श्वास घेण्यास मदत होते. जरूर वाटत असल्यास तिला प्राणवायू पण पुरवावा.



आ. ३७ : [अ] स्वस्तिक यंत्र (जीभ पकडण्यासाठी)
[ब] नाडीयंत्र (श्वसननलिका)

अपस्माराचा वेग सहसा ½ ते १ मिनिटापर्यंत टिकलेला आढळतो.

गुडशुंठीचे नस्य द्यावे.

गर्भिणीच्या अपस्माराचा वेग गेल्यानंतर खालीलप्रमाणे चिकित्सा करावी :

प्रथमतः संज्ञावह स्रोतसांस विश्रांती घेण्यासाठी म्हणून निद्राजनक औषधे शमनाकरिता द्यावीत. यासाठी अहिफेनाचे कल्प विशेष उपयुक्त ठरतात. शोधनासाठी म्हणून निरुहबस्ती दशमूल क्वाथाचा द्यावा. या अवस्थेमध्ये रुग्णा मुखाने कोणतेही औषध वा आहार घेण्याच्या स्थितीत नसते; म्हणून रुग्णेच्या आमाशयामध्ये नासिकेच्या द्वारे नलिका घालून तिच्या साहाय्याने तिच्या पोटात औषधे वा द्रव असा आहार तिला द्यावा. विरेचनासाठी म्हणून वृद्धिविरेचन काढा (४–५ तोळे द्रव्यांचा काढा) घालावा. तसेच मूत्रल औषधांचा काढा नलिकेद्वारा द्यावा. पुनर्नवासव, पुनर्नवादी क्वाथ द्यावा.

स्मृतिसागर रस, चंद्रप्रभा, ब्राह्मी द्यावी.
*सकाळ, दुपार, संध्याकाळ :* सूतशेखर २ गुं.
सर्पगंधा २ गुं.
जटामांसी २ गुं.
अनुपान
ब्राह्मी प्राश.

गर्भिणीला आमाचे प्रमाण व दोषांचे आमानुबंध यांचा विचार करून चिकित्सा करावी. रोगाची आमावस्था असेपर्यंत हे अपस्माराचे वेग थांबून थांबून गर्भिणीस येत असतात. त्याकरिता तिच्यावर अतिशय कटाक्षाने लक्ष ठेवून वर दिल्याप्रमाणे वेगांमध्ये वा वेग गेल्यानंतर उपचार करावे.

ह्या रोगाची पक्वावस्था आल्यानंतर ( वेग येण्याचे नाहीसे झाल्यानंतर ) ती पक्वावस्था येण्यास जितका काल लागेल त्या कालावर, गर्भाचे भवितव्य अवलंबून असते. आमावस्था चोवीस तासांच्या पुढे टिकली तर गर्भ मृत होण्याची शक्यता जास्त असते. व अपस्माराची ही अवस्था दोन चार तासच जर टिकली तर गर्भिणी व्याधिमुक्त होऊन गर्भ जिवंत राहण्याचीही शक्यता असते.

या अवस्थेत सृष्टमूत्रपुरीषता ( अंथरुणात नकळत मलमूत्रप्रवृत्ती होणे ) होत असल्यामुळे शय्याव्रण होऊ न देण्याची खबरदारी घ्यावी लागते.

वेग येत असतील तोपर्यंत त्या गर्भिणीला संपूर्ण लंघन द्यावे. ( साधारणतः २४ तास. ) संपूर्ण वेग येण्याचे थांबल्यानंतर आहारासाठी म्हणून शुंडीसिद्ध दुग्ध, लाजमंड, नारिकेल जल, मुद्गयूष असा आहार द्यावा.

| गर्भ जिवंत असताना | गर्भ मृत असताना |
| --- | --- |
| गर्भाचे व गर्भिणीचे पोषण नीट व योग्य त्या प्रकारे होण्यासाठी गर्भिणीवर योग्य ते उपचार करावेत. अग्निमांद्यासाठी पेयाविलेपी अशा सांसर्गिक क्रमावरून अग्नीचे बल वाढवून मगच शतावरीकल्प, गर्भपालरस, अश्वगंधारिष्ट अशी गर्भवृद्धीकर औषधे द्यावीत. आहारात दूध-तूप, साठेसाळी द्यावे. अशा स्थितीत प्रसवापर्यंत गर्भाची अवस्था व स्थिती याकडे वैद्याने विशेष लक्ष ठेवावे. अन्यथा गर्भ गर्भव्यापदामध्ये परिणत होण्याची शक्यता असते. | गर्भिणीचे बलाबल पाहून गर्भ मातेच्या शरीरातून बाहेर काढण्याचे धोरण ठेवावे. अशा वेळी गर्भोदकस्रुती करून प्रसवाला प्रसृत करावे व आवी सुरू होतील अशी चिकित्सा द्यावी. त्यासाठी अपरासंगामध्य अपरापतनासाठी जी चिकित्सा सांगितली आहे तिचा अवलंब करावा. प्रथम निरुहबस्ती देऊन १/२ तासाने एरंडस्नेह १/२ तोळा शुंठीक्वाथाबरोबर द्यावा व पुन्हा २ तासांनी निरुहबस्ती द्यावा. त्याच वेळी समीरपन्नग १/२ गुंज–आलेरस व मधातून चाटण दर १/२ तासाने असे पाच-सहा वेळा द्यावे. |



अपस्माराचे वेग थांबून गर्भिणी रोगमुक्त झाल्यानंतर दोन अवस्था संभवतात. पहिलीत गर्भ जिवंत असू शकतो; तर दुसरीत गर्भ मृत असतो. अशा वेळी पुढीलप्रमाणे चिकित्सेचे धोरण ठेवावे.

**औषधी :**

ब्राह्मी, वचा, जटामांसी, कृष्णा, पुराणघृत, तुळस, पंचगव्य, रौप्य, अभ्रक, धत्तुर, त्रिफळा, स्मृतिसागर रस, मेधामृत, सुवर्ण सूतशेखर.

**[1]पथ्यापथ्य :**

रक्तशाली, गोधूम, घृत, दुग्ध, दाडिम, द्राक्षा, आमलकी, हे पदार्थ खावे.
विदाही, गुरू, तीक्ष्ण, उष्ण, विरुद्ध असे पदार्थ, उपवास, तृष्णा, निग्रह, जागरण; श्रम, मैथुन, उष्णसेवन वर्ज्य करावे.

## १०. गर्भोपद्रव–अतिसार

**[2]कारणे :**

विरुद्ध अन्न, अजीर्ण, अध्यशन, भय, वेगविघात, दोषप्रकोप, अतिसंतर्पण, धातुक्षय, कच्ची कंदमुळे, फळे, दुष्ट झालेले पाणी यांच्यामुळे, भुकेमुळे ( भूक मारल्यामुळे ) उत्पन्न झालेल्या रूक्षतेने, गुरू, अभिष्यंदी असे पदार्थ खाल्ल्यामुळे, आप धातूचा उद्रेक झाल्यामुळे अतिसार हा व्याधी उत्पन्न होतो.

१ मद्यं मत्स्यं विरुद्धान्नं तीक्ष्णोष्णं गुरुभोजनम् ।
अतिव्यवायमायासं पूज्यपूजा व्यतिक्रमम् ।। ३ ।।
पत्रशाकानि सर्वाणि बिम्बीमाषाढकीफलम् ।
तृषानिद्राक्षुधावेगानपस्मारी नरस्त्यजेत् ।। ४ ।। अपस्मार यो. र. पान ४३१

२ विरुद्धाध्यशनाजीर्णैस्तथैवात्यशनादपि ।
भयोद्वेगविघाताद्वा संघातात् पूरणात् क्षयात् ।
कन्दमूलफलैरामैर्दुष्टतोयनिषेवणात् ।
रौक्ष्यात् बुभुक्षया शोकाद् गुर्वभिष्यंदिभोजनात् ।
अब्धातोश्च समुद्रेकादतीसारः प्रवर्तते ।

## [1]चिकित्सा :

अतिसाराच्या आमावस्थेत पाचनासाठी इंद्रजव, नागरमोथे, पहाडमूळ ही औषधे वापरावी. आमातिसार कफानुबंधी असेल तर अजमोदा, सरल, अतिविष यांचे चूर्ण सुखोष्ण पाण्याबरोबर सेवन करावे.

[2]आमातिसारामध्ये पित्ताचा अनुबंध असेल तर पाठा, चंदन, इंद्रजव, अतिविषा यांचे चूर्ण तापवून थंड केलेल्या पाण्याबरोबर सेवन करावे.

[3]हिंग, शेंदेलोण, नागकेशर, रिंगणी, डोरली, इंद्रजव, पिंपळमूळ, अतिविषा, यांचे चूर्ण कोंबट पाण्याबरोबर सेवन करावे. हा प्रयोग आमातिसारामध्य वातानुबंध असताना उपयोगी पडतो.

[4]इंद्रजव, धायटी, मिरे, लोध्र, टेटू, देवदारु यांचे चूर्ण मध घालून कफातिसारासाठी तांदुळाच्या धुवणाबरोबर सेवन करावे.

[5]कमळ, लाजाळू, आंब्याची बाठ, ज्येष्ठमध, पद्मकेसर, लोध्र, मोचरस, ही द्रव्ये साखर व मध यासवे सेवन करावी म्हणजे पित्तातिसार नाहीसा होतो.

[6]पिंपळी, धायटी, कमळ, लाजाळू, मोचरस, इंद्रजव, यांचे चूर्ण मत्स्यंडिकेसह (काकवीचा राब बसून तयार झालेली साखर) तांदुळाच्या धुवणाबरोबर सेवन करावे. यामुळे वातातिसार व त्यातील शूल नष्ट होतो.

१ आमातिसारे संजाते पाचनानि प्रदापयेत् ।
कुटजस्य च बीजानि मुस्ता पाठा तथैव च ॥
अजमोदाऽथ सरलं तथा चातिविषा शुभा ।
आमे श्लेष्मान्विते पेयमेतत् पिष्टं सुखाम्बुना ॥

२ पाठाचन्दनभागश्च कुटजस्य फलानि च ।
तथा चातिविषा मुख्या पिष्टमेतद्धिताम्बुना ॥
आमे पित्तान्विते पेयमिति ह स्माह कश्यपः ।

३ हिंगुसैंधवनागाश्च बृहत्यौ कौटजं फलम् ।
तथा पिप्पलिमूलं च मुख्याचातिविषा नृप ॥
आमे वातोत्थिते पेयमेतत् पिष्टं सुखाम्बुना ।

४ अथवा कौटजं पिष्ट्वा फलं क्षौद्रेण संयुतम् ।
धातकी मरिचं लोध्रं कट्वंगं देवदारु च ॥
तंडुलोदकसंयुक्तं श्लेष्मातिसारनाशनम् ।

५ पद्मं समङ्गाम्रास्थिमधुकं पद्मकेसरम् । लोध्रः मोचरसश्चैव शर्कराक्षौद्रसंयुतः ॥
पित्तातिसारशमनो योग एष विधीयते ।

६ पिप्पल्यो धातकी पद्मं समंगा मोचजो रसः ।
मत्स्यण्डिकेन्द्रधान्यं च पिष्टमेतदनूपोत्तम ॥
तंडुलोदकसंयुक्तं सशूले वातिके हितम् ।
पिप्पल्यो धातकी लोध्रं समंगा पद्मकेसरम् ॥



# ११. काश्यपोक्त गर्भोपद्रव व त्याची चिकित्सा

## १ प्रवाहिका :

[1]पिंपळी, धायटी, लोध्र, लाजाळू, पद्मकेसर, कमळ, मोचरस, टेटूची साल, नागकेशर यांचे बारीक चूर्ण तयार करून त्यामध्ये तूप, मध आणि मत्स्यंडिका घालून त्यांचा लेह तयार करावा. हा कल्याणकावलेह सर्व प्रकारच्या अतिसाराकरिता उपयोगी पडतो.

## [2]चिकित्सा :

शिवणीच्या मुळीची साल आणि निशोत्तराचे मूळ यांचे चूर्ण दह्याच्या निवळीत घालून यवागू सिद्ध करावी व त्यात थोडेसे तूप घालून प्राशन करावी. त्यामुळे प्रवाहिका नाहीशी होते.

काडेचिराईत, लोध्र, ज्येष्ठमध, तिलकल्क यामध्ये साखर, मध व काकवी घालून ते तांदुळाच्या धुवणाबरोबर सेवन करावे म्हणजे प्रवाहिका बरी होते.

## २. रक्तातिसार :

कमळ, लाजाळू, यष्टिमधू, चंदन, पद्मकेसर यांचे चूर्ण मध घालून दुधाबरोबर सेवन करावे. म्हणजे रक्तातिसार बरा होतो.

ज्या वेळी अतिसारामध्ये गुदवेदना फार असतील व रक्त पडताना फार कष्ट होत असतील, त्या वेळी काचेच्या अथवा दगडाच्या पात्रामध्ये तापविलेल्या दुधासह ज्येष्ठमध सेवन करावा आणि तुपाच्या निवळीचा (घृतमंड) अनुवासन बस्ती द्यावा.

## ३. परिकर्तिका :

[3]गर्भिणीला गुदामध्ये कातरे पडून मलप्रवृत्तीच्या वेळी वा एरव्हीही कातरल्यासारखी वेदना होते त्यास परिकर्तिका म्हणतात.

१ पद्मा मोचरसश्चैव दीर्घवृन्ततरोस्त्वचः । केसर चेति चूर्णानि श्लक्ष्णान्येतानि चूर्णयेत् । घृतं मत्स्यंडिका क्षौद्रं लेहीभूतानि लेहयेत् । लेहः कल्याणकस्त्वेष सर्वातिसारनाशनः ।

२ काश्यर्यमूलत्वक्कल्कः श्यामामूलं तथैव च ।
यवागूं दधिमण्डेन सिद्धामल्पघृतां पिबेत् ।
प्रवाहिकार्ता सततं तथा संपद्यते सुखी ।
– किराततिक्तकं लोध्रं यष्टीमधुकमेव च ।
फाणितं तिलकल्कश्च शर्करामधुसंयुतम् ।
तण्डुलोदकमित्येतत् प्रतिहन्ति प्रवाहिकाम् ।

३ पद्मं समंगा मधुकं चन्दनं पद्मकेशरम् ।
पयसा मधुसंयुक्तं रक्तातिसारनाशनम् ।

यात शूल, दाह व अल्पवेदना या लक्षणांनुसार वातज, पित्तज, कफज असे परिकर्तिकेचे प्रकार पडतात.

[1]त्यावर वातज परकर्तिकेत डोरली, बेल व अनंतमूळ ही द्रव्ये घालून यूष तयार करून सेवन करावा. पित्तज परिकर्तिकेसाठी ज्येष्ठमध, हंसपदी, धने यांचे चूर्ण मधात कालवून तांदुळाच्या धुवणाबरोबर सेवन करावे. कफज परिकर्तिकेवर रिंगणी, गोखरू, पिंपळी यांचे चूर्ण समभाग घेऊन त्यात मीठ घालून ते सेवन करावे.

## ४. पार्श्वग्रह :

गर्भिणीच्या पार्श्वग्रह या विकारासाठी सालवण, रिंगणी, डोरली, बेल, ऐरण, टेटू, शिवण, पाडळ यांचे चूर्ण करून त्याचा यूष बनवून तो सेवन करावा.

## ५. मुखपाक :

[2]गर्भिणीला मुखपाक झाला असताना हळद व दारूहळद यांच्या काढयाच्या गुळण्या कराव्यात. त्याप्रमाणेच लोध्राच्या काढयामधे तेल वा तूप आणि साखर घालून त्याच्या गुळण्या कराव्या. लोध्रचूर्णाचे प्रतिसारण करावे. अनंतमूळ, लाजाळू घृष्णी व मोचरस यांचे चूर्ण मधाबरोबर चाटावे.

---

– रक्तं निर्वा ( व ) हते यावत् कृच्छ्रात् सगुदवेदनम् ।
कुप्यपाषाणतप्तेन पयसा भोजितां ततः ।
मधुकं घृतमण्डेन त्वर्थेनामनुवासयेत् ।

१ गर्भिण्या वातिकी यस्या जायते परिकी ( क ) र्तिका ।
बृहतीबिल्वमानन्तैर्युषं कृत्वा तु भोजयेत् ।
परिकी ( क ) र्तिकायां गर्भिण्याः पैत्तिकायामिदं हितम् ।
मधुकं हंसपादी च वितुन्नकमथापि च ।

– पाययेन्मधुसंयुक्तं सुपिष्टं तण्डुलाम्बुना ।
श्लेष्मिकायां तु कर्तव्यं यथावत्तन्निबोधत ।
कण्टकारी श्वदंष्ट्रा च अश्वत्थं चेति तत् समम् ।
संपन्नलवणं कृत्वा भोजयेत् पाययेदपि ।

२ अथ चेदत्र गर्भिण्याः पार्श्वस्योपग्रहो भवेत् ।
शालपर्णीं पृश्निपर्णीं बृहतीं कण्टकारिकाम् ।
बिल्वाग्निमन्थश्योनाकं काश्मर्यमथपाटलीम् ।
यूषं कृत्वा तु संपन्नं भोजयेत् पाययेदपि ।



## ६. आक्षेपक :

[1]गर्भिणीला आक्षेपक वा आपतानक हे व्याधी उत्पन्न झाले असता महाळुंगाच्या रसामध्ये बिडलोण व सैंधव घालून ऐरण वा वायवरणा यांचा काढा द्यावा वा तित्तिर-लावा पक्ष्यांचे मांसरस स्नेहयुक्त द्यावेत.

## ७. शोथ :

[2]पुनर्नवेचे मूळ व देवदारू यांचा काढा मध घालून प्राशन करावा. त्यात मोरवेलाचा काढा व चूर्णही घालावे.

## ८. छर्दी–चिकित्सा :

[3]गर्भिणीस होणारी छर्दी वातप्रधान असेल तर महाळुंगाचा रस, साळीच्या लाह्या, बोरांच्या बीतील मज्जा, रसांजन, डाळिंब यांचे चूर्ण करून साखर व मध घालून लेहाप्रमाणे चाटावे.

---

– अथचेदत्र गर्भिण्या मुखपाको भवेदिह ।
हरिद्रादारुनिष्क्वाथं ग्राहयेत् कवलं ततः ॥
ततः स्नेहेन कृत्वा तु ततः स्याच्छर्करोदकम् ।
लोध्रोदकेन कृत्वा तु कुर्यात्तत्प्रतिसारणम् ॥
अनन्तां च समङ्गां च घृषीं मोचरसः तथा ।
मधुना सह(म)मश्नीयात्ततः संपद्यते सुखी ॥

१ आक्षेपके समुत्पन्ने तथैवाप्यपतानके ।
मातुलुंगरसः पेयो बिडसैंधवसंयुतः ॥
अग्निमन्थस्य निर्यूहः क्वथितो वरुणस्य वा ।
लावो वा तैत्तिरो वाऽपि रसः स्निग्धः प्रशस्यते ॥

२ वर्षाभूमूलनिष्क्वाथं योजयेद्भद्रदारुणा ।
तत् पिबेन्मधुसंयुक्तं शोफं स्त्री पूर्वया सह ॥

३ अथ छर्दिचिकित्सां तु प्रोच्यमानां निबोधत ।
मातुलुंगरसो लाजाः कोलमज्जा तथाऽञ्जनम् ।
तथा दाडिमसारश्च शर्करा क्षौद्रमेव च ।
एष वातात्मिकां छर्दिं हन्ति लेहो विशेषतः ।
दाडिमाम्लो रसः पक्वी हृद्यो लवणवर्जितः ।
वातच्छर्दिहरो राजन् माहिषो वा सुसंस्कृतः ।
शर्करामधुसंयुक्तं लाजचूर्णसमायुतम् ।

पित्तज छर्दीसाठी दालचिनी, वेलदोडे, तालिसपत्रे, नागकेशर या चतुर्जाताचे चूर्ण लाह्याचे चूर्ण घालून साखर व मध यांजबरोबर सेवन करावे.

कफज छर्दीसाठी आंबा व जांभूळ यांच्या कोवळ्या पानांचा काढा मध घालून प्राशन करावा.

## ९. कामला–चिकित्सा :

[1]पिंपळी, अंकोलाचे मूळ यांचे चूर्ण घोड्याच्या लिदीचा रस व म्हशीचे दही याजबरोबर कामलेसाठी सेवन करावे.

## १०. शूल :

[2]गर्भिणीला उत्पन्न होणारा हृदयशूल वातप्रधान असेल तर त्यावर महाळुंगाचा रस सैंधव घालून द्यावा. हृद्शूल पित्तप्रधान असेल तर गव्हला, पिंपळी, नागरमोथे, रेणूक बीज व बोर यांचे चूर्ण मधाबरोबर द्यावे. हृदयशूल कफप्रधान असेल तर पिंपळी, तालिसपत्र, दालचिनी, गव्हला व महाळुंगाचा रस यांचा अवलेह करून तो सेवन करावा.

चातुर्जातककल्केन हृद्यं पुष्पैः सुवासितम् ।
पित्तच्छर्दिप्रशमनं हितं तंडुलधावने ।
हिता लाजमयी पेया सिताक्षौद्रेण संयुता ।
जाङ्गलो वा रसः पथ्यः शर्करामधुरीकृतः ।
आम्रजम्बूप्रवालानि सितानि सुशृतानि तु ।
क्षौद्रयुक्तानि पेयानि श्लेष्मछर्द्यां विशेषतः ।
भोजनार्थे हितं यूषं मुद्गैर्दाडिमसारि (धि) तम
व्यपेतस्नेहलवणं हृद्यं च्छर्दिविनाशनम् ।

१ पिपल्यङ्कोममूलानि वाजिलिण्डरसस्तथा ।
दधिमाहिषमित्येतत् कामलायाश्चिकित्सतम् ।

२ मातुलुंगरसः पेयः सैन्धवेन सुयोजितः ।
वातिके हृदि शूले तु प्रधान इति निश्चयः ।
प्रियङ्ग्वोऽथ पिप्पल्यो भद्रमुस्ता हरेणवः ।
क्षौद्रं बदरचूर्णं च पिबेत् पित्तार्दिते हृदि ।
पिप्पलीचूर्णकल्कस्तु पत्रचोचं प्रियङ्गवः ।
मातुलुंगरसश्चैव लेहः श्लेष्मार्दिते हृदि ।



## ११. श्वास व कास :

[1]हिरडा, आमलकी, शल्यकाची साल ( मदनवृक्ष ), गृहधूम, उंटाच्या अस्थी यांचे चूर्ण, दही व तेल याबरोबर चाटावे. पिंपळी, आमलकी, नागरमोथे, हरितकी यांचे चूर्ण साखर, काकवी, मध व तेल घालून चाटावे. यामुळे गर्भिणीचे सर्व प्रकारचे श्वास-कास थांबतात.

## १२. हिक्का :

[2]पिंपळी, गैरिक, भारंगी, हिंग, काकडशिंगी, यांचे समभाग चूर्ण घेऊन त्याचा लेह बनवावा व तो प्रशमन म्हणून सेवन करावा.

## १३. मूत्रग्रह :

[3]शतावरी, दर्भाचे मूळ, यष्टिमधू, मोरवेल, पाषाणभेद, वाळा, निवळीचे बी यांचा काढा, स्वरस, कल्क वा या औषधांनी सिद्ध केलेले दूध गर्भिणीच्या मूत्रग्रहासाठी वापरावे.

## १४. वातगुल्म–योनिगुल्म :

[4]गर्भिणीला होणारे वातगुल्म व योनिगुल्म यांची चिकित्सा गुल्म प्रकरणात सांगितल्याप्रमाणे करावी.

१ अभयाऽऽमलकं वाऽपि शल्यकस्य त्वचा युतम् ।
अन्तर्गृहं सहोष्ट्रास्थि दधितैलेन लेहयेत् ।
पिप्पल्यामलकी मुस्ता तथा फाणित शर्करा ।
हरीतकीति चूर्णानि मधुतैलेन लेहयेत् ।
शमनं सर्वकासानां श्वासानां च प्रशस्यते ।

२ पिप्पली गैरिकं भार्गी हिंगु कर्कटकी तथा ।
समानि च भवेल्लेहो हिक्काप्रशमनः स्त्रियाः ।

३ शतावरी दर्भमूलं मधुकं क्षीरमोरटः ।
पाषाणभेदकोशीरं कतकस्य फलानि च ।
एषां क्वाथरसं कल्कं क्षीरं वा पाययेद्भिषक् ।
मूत्रग्रहेषु सर्वेषु सिद्धमित्याह कश्यपः ।

४ वातगुल्मस्य भैषज्यं योनिगुल्मस्य चाप्यथ ।
यथावत् पूर्वमुद्दिष्टं समासेन चिकित्सितम् ।

## १५. उदावर्त :

[1]गर्भिणी स्त्रीच्या गर्भभारामुळे पुष्कळदा उदावर्त व्याधी उत्पन्न होतो. कारण गर्भाच्या वाढत्या आकाराने मूत्र-वात आणि पुरीष यांच्या मार्गांचा अवरोध होत असल्यामुळे वायू प्रकुपित होऊन उदावर्त व्याधी उत्पन्न करतो.

त्यात वातज, पुरीषज, मूत्रज उदावर्तातील लक्षणे दिसतात. त्यामध्ये आटोप, शूल, क्लम, आध्मान, वात-मूत्र-पुरीष यांचा संग, वंक्षणानाह, शिरःशूल, ऊर्ध्ववात इ. लक्षणे आढळतात.

हा व्याधी आशुकारी आहे म्हणून याची उपेक्षा मुळीच करू नये असे सांगून, त्यावर चरकाने स्नेहन व अनुलोमन अशी चिकित्सा सुचविली आहे. उदावर्ताची जर उपेक्षा झाली तर गर्भ वा गर्भिणी यांना धोका पोहोचण्याची फार शक्यता असते. हा व्याधी बहुधा सहाव्या, सातव्या महिन्यानंतर उत्पन्न होतो. कारण त्या वेळीच गर्भभारामुळे अधिक प्रपीडन होण्याची शक्यता असते. गर्भिणीमध्ये अंतर्मुखी योनी असताना (पश्यात् प्रवर्तित गर्भाशय) पहिल्या दोन ते चार महिन्यांपर्यंत मूत्रसंग होऊन मूत्रजठर उत्पन्न होतो. त्या वेळी अधोदरशूल, अस्वस्थता व आध्मान ही लक्षणे दिसतात. अंतर्मुखी योनीमध्ये मार्गावरोधामुळे मूत्रजठर उत्पन्न होतो.

अशा स्थितीत गर्भिणीला कुचल्याचा कल्प म्हणून वातगजांकुशरस द्यावा व सातत्याने मूत्र-निर्हरण करावे.

आठव्या महिन्यापूर्वी या उदावर्तासाठी वातहर व स्निग्ध अशा अन्नपानाची योजना करावी. एरंडस्नेह, सुंठीचा फांट वा सुंठीसिद्ध दुधाबरोबर द्यावे.

सामुद्रादी चूर्ण, शंखवटी, हिंगाष्टक चूर्ण इ. द्रव्ये तूप व कोंबट पाणी याबरोबर द्यावी.

स्निग्ध, वातहर अशा पेया व यवागूंचा उपयोग करावा.

१ उदावर्तं तु गर्भिण्याः स्नेहैराशुतरां जयेत् ।
योगैश्च बस्तिभिर्हन्यात् सगर्भां स हि गर्भिणीम् ॥ वा. शा. २-११

– यस्याः पुनरुदावर्तविबन्धः स्यादष्टमे मासे न चानुवासनसाध्यं मन्येत ततस्तस्यास्तद्विकारप्रशमनमुपकल्पयेन्निरूहम् । उदावर्तो ह्युपेक्षितः सहसा सगर्भां गर्भिणीं गर्भमथवाऽतिपातयेत् । तत्र वीरणशालिषष्टिककुशाशेक्षुवालिकावेतसपरिव्याधमूलानां भूतीकानन्ताकाश्मर्यपरूषकमधुकमृद्वीकांना च पयसाऽर्धोदकेनोद्गमय्य रसं प्रियालबिभीतकमज्जतिलकल्कसंप्रयुक्तमीषल्लवणमनत्युष्णं च निरुहं दद्यात् । व्यपगतविबन्धां चैनां सुखसलिलपरिषिक्तांगी स्थैर्यकरमविदाहिनमाहारं भुक्तवतीं सायं मधुरकसिद्धेन तैलेनानुवासयेत्न्युब्जां त्वेनामास्थापनानुवासानाभ्यामुपचरेत् । च. शा. ८-२९



[1]आठव्या महिन्यानंतर जर उदावर्त व्याधी उत्पन्न झाला तर यष्टिमधुसिद्ध तेलाचा अनुवासन बस्ती द्यावा.

या अनुवासन प्रयोगाचा उपयोग होत नाही असे आढळले तर वाळा, शाली, दर्भ इ. तृण पंचमुळांतील द्रव्यांची मुळे, वेताचे मूळ, वेखंड, गुग्गुळ, सारिवा, शिवण, फालसा, यष्टिमधू, मनुका इ. द्रव्ये घेऊन त्यात दूध व अर्धे पाणी घालून दूध उरवावे व त्यात चारोळी, बेहडामगज, तीळ यांचा कल्क घालून थोडेसे मीठ घालून कोंबट असा निरुह बस्ती द्यावा.

अवरोध नाहीसा होऊन वातादींचे अनुलोमन झाल्यानंतर सुखोष्ण जलाने स्नान घालावे व गर्भ स्थिर करणारे अविदाही असे अन्न खावयास द्यावे. सायंकाळी यष्टिमधू सिद्धतैलाचा अनुवासन बस्ती द्यावा. गर्भिणीला आस्थापन अनुवासन बस्तीच्या वेळी शक्य तो न्युब्ज स्थितीत ठेवावे.



आ. ३८ : न्युब्ज स्थिती

[2]न्युब्जस्थिती म्हणजे रांगण्याच्या स्थितीत असल्याप्रमाणे मऊ आसनावर पालथे निजवून नितंब उंच करावे व सर्व भार गुडघ्यावर घ्यावा. डोके मऊ पातळ उशीवर टेकावे. या स्थितीमुळे वातपुरीषांच्या मार्गावर पडणारा गर्भाचा भार उणावतो व त्यांच्या अनुलोमनाचे कार्य सुकर होते.

जी गर्भिणी अतिशय दुर्बळ होते, एकदम पांढरी (वा काळी) पडते, जिला ज्वर येऊ लागतो तिचा गर्भ नाश पावतो. जी गर्भिणी पुनः पुन्हा पुष्कळ खाते व जिला वरचेवर मूर्च्छा येते तिचा गर्भपात होतो.

१ अष्टमे तु मासे मधुकसिद्धेन तैलेन अनुवासयेत् । अ. स. शा. ४-२४

२ गर्भिणीम् तु न्युब्जामास्थापयेदनुवासयेच्च ।
तथाऽस्या विवृत मार्गतया सम्यगौषधमनुप्रविशति ॥ अ. सं. शा. ३-१०

– न्युब्जाजानुभ्याम् अधोमुखी भूमौस्थिता तथाहि
जठरस्य लम्बत्वात् बस्तेर्मार्गो विवृतो भवति ॥ इन्दू टीका

जिचे डोळे नागरमोथ्यासारखे उचललेले दिसतात, कान व पाय गार पडतात, केसाचा गुंतडा होतो, तिचा गर्भ नाश पावतो. ज्या स्त्रीचा गर्भ नाभीच्या वर दोन्ही पार्श्वांत उमटून दिसतो वा मध्येच उंचवटा दिसतो तो नाश पावतो.

जिच्या सांध्यामध्ये अत्यंत वेदना होतात, सांधे ढिले पडतात, रुचकर अन्नावरही जिची वासना जात नाही, जिला हालचाल नको वाटते, नेहमी झोपून राहावेसे वाटते तिचा गर्भ नाश पावतो. जिचे सांधे सुजले आहेत, शरीरामध्ये पाक हे लक्षण दिसते आहे, चालणे अतिशय जड जाते आहे, तिचा गर्भ उपजताच मरतो.

जी स्त्री गर्भावस्थेत फार चिंता करते, दुःख करते; नेहमी कसला तरी विचार करीत असते, जिच्या बोटास भेगा गेल्या आहेत, तिचा गर्भ जिवंत राहात नाही. जिचे दूध दुर्गंधियुक्त झाले आहे, केस मलिन व गुंतलेले आहेत तिचा गर्भ मरतो.

जिच्या तोंडाला घाण येत आहे, पोटात फार शूल होतो आहे, जिला अतिनिद्रा आहे, तिचा गर्भ मरतो. जिला अग्नी मोराच्या मानेप्रमाणे निळा दिसतो, जिच्या पायांवर व तोंडावर सूज आली आहे, अशी गर्भिणी जगत नाही.

गर्भिणी दुर्बलाकारा या भवत्यसिता सती ।
ज्वरश्चाभिद्रवत्येनां तस्या गर्भो विपद्यते ।
बहु भुंक्ते तु याऽत्यर्थं बहुशो बहुमूर्च्छिता ।
भवेत्तस्याः पतेद्‌गर्भो गर्भिण्यास्तु न संशयः ।
नेत्रे मुस्तोत्थिताकारे कर्णौ पादौ च शीतलौ ।
केशाश्च जटिला यस्यास्तस्या गर्भो विपद्यते ।
उपरिष्टात्तु यो नाभ्या उभे पार्श्वे निषेवते ।
मध्ये वा तिष्ठते नार्याः सोऽपि गर्भो विपद्यते ।
रुक् सन्धिमोक्षे यस्याः स्यान्मृष्टान्ने चारुचिस्तथा ।
निश्चेष्टस्वप्नकामास्तस्या गर्भो विपद्यते ।
सन्धिशोथोऽङ्गपाकश्च विक्रामश्च गुरुर्भवेत् ।
यस्यास्तस्याः सुतो जातो म्रियते नात्र संशयः । का. सं. पृ. ३०३, १६० ते १६५
– शोचन्त्याः परिदेविन्याः प्रध्यायिन्यास्तथैव च ।
अंगुलीस्फोटशीलाया जातः जटिलाश्च शिरोरुहः ।
मलिनाश्च ततस्तस्या जातः पुत्रो न जीवति ।
पूतिगन्धि मुखं यस्याः शूलं चैवोपजायते ।
निद्रावाऽभिद्रवत्येनां मूढगर्भा न जीवति ।



पार्श्व-शूल, संज्ञा-नाश, तृष्णा, श्वास व मार्गावरोध अशी लक्षणे जिच्या ठिकाणी दिसतात ती गर्भिणी जगत नाही.

कटिग्रह, योनिशूल, मुखदुर्गंधी, संज्ञानाश, प्रलाप ही लक्षणे झाली तर गर्भिणी जगत नाही. जिला गाढव, डुक्कर, म्हैस, कुत्रा, उंट यांवर बसलो आहोत अशी स्वप्ने पडतात ती गर्भिणी व गर्भ जगत नाहीत.

## १२. गर्भोपद्रव-योनिसंवरण

व्यवाय, जागरण, वातकर आहार-विहार यांच्या अतियोगाने वायू प्रकुपित होऊन गर्भिणीच्या योनिमार्गाचा आश्रय करतो, आणि योनिद्वार संकुचित करतो. योनिद्वाराचा संकोच होऊन वायूच्या मार्गात अडथळा आल्यामुळे अधिकच वात-प्रकोप होऊन तो गर्भाशयद्वाराचाही अवरोध करतो. या अवरोधामुळे गर्भ गर्भाशयामध्ये सुस्थितीत राहू शकत नाही. त्याचे पीडन होते. क्वचित त्याचे पोषणही थांबते. योनिद्वारा अवरुद्ध असल्यामुळे गर्भ बाहेरही पडू शकत नाही आणि गर्भ-संबंधामुळे गर्भिणीवर अनेक पीडाकर लक्षणे व्यक्त होतात.

मयूरग्रीवसंकाशं या पश्यति हुताशनम् ।
शूनपादमुखी चैव मूढगर्भा न जीवति ।
पार्श्वशूलं च तृष्णा च संज्ञानाशस्तथैव च ।
श्वासश्च वर्त्मरोधश्च यस्याः साऽपि न जीवति ।
– कटिग्रहो योनिशूलं पूतिगन्धमुखं तथा ।
संज्ञानाशः प्रलापो वा गर्भिण्याः सा न जीवति ।
नासा तु काकवद्यस्याः त्रस्तनेत्रा च या भवेत् ।
तथा शकुन्तगन्धा च गर्भः शस्त्रेण मुच्यते ।
अजाश्वगन्धा श्वेता या मायूरं मांसमिच्छति ।
गर्भस्तस्यापि शस्त्रेण नार्या निर्ह्रियते नृप ।।
रक्तवस्त्रपरीधाना रक्तमाल्यानुलेपना ।
स्मयते सा शयाना वा श्मशानं याऽधिरोहति ।
मूढगर्भा सगर्भा वा गर्भिणी सा विनश्यति ।
खरं वराहं महिषं श्वानमुष्ट्रं तथैव च ।
स्वप्नेऽधिरोहते या तु सगर्भा सा विनश्यति ।
काश्यपसंहिता, १६० ते १७५, पृ. ३०३
– योनिसंवरणं संगः कुक्षौ मक्कल एव च ।
हन्युः स्त्रियं मूढगर्भो यथोक्ताश्चाप्युपद्रवाः ।। मा. नि. १० (मूढगर्भ)

या ठिकाणी योनी या शब्दाने त्र्यावर्तयोनी असा अर्थ अभिप्रेत आहे. हे योनिसंवरण तीनही आवर्तांमध्ये किंवा कोणत्याही आवर्तामध्ये असण्याची किंवा होण्याची शक्यता असते. उदा.– गर्भिणी स्त्री. ती लहान असताना फक्क या व्याधीने पीडित असेल तर तिच्यामध्ये अशा तऱ्हेचे योनिसंवरण सापडण्याची शक्यता असते. योनिसंवरण हे जसे गर्भावस्थेत नैमित्तिक कारणाने उत्पन्न होते तसे ते सहजही असते, असे आढळते. प्रत्यक्षामध्ये श्रोणी या अवयवामध्ये संकुचितत्व हे जन्मतःच आढळते किंवा दुसऱ्या व्याधीमुळे (उदा. गर्भ व गुल्म) उत्पन्न झालेले आढळते. वा धातुक्षयजन्यही असते. काही वेळा विशेषतः महायोनीच्या शस्त्रकर्मानंतर उपद्रव म्हणून योनिसंवरण होते. हे संकुचितत्व श्रोणीमध्ये तीन ठिकाणी अपेक्षित असते.

(१) ज्या ठिकाणी गर्भ प्रविष्ट होतो तो भाग.
(२) कटिविवरामध्ये जेव्हा गर्भ असतो तो भाग व
(३) ज्यामध्ये कटिविवरातून गर्भ बाहेर पडतो तो भाग.

अशा तीनही ठिकाणी योनिसंवरण (संकुचितत्व) असते. यामुळेच प्रसूती अत्यंत कष्टदायक किंवा अशक्यप्राय होते. हे योनिसंवरण मूढगर्भाचे एक महत्त्वाचे कारण आहे. प्रसूती अशक्य असेल त्या वेळी शस्त्रकर्माने उदरपाटन करून अपत्यास बाहेर काढावे लागते.

— वातलान्यन्नपानानि ग्राम्यधर्मं प्रजागरम् ।
अत्यर्थं सेवमानाया गर्भिण्या योनिमार्गगः ॥
मातरिश्वा प्रकुपितो योनिद्वारस्य संवृतिम् ।
कुरुते बद्धमार्गत्वात् पुनरन्तगतोऽनिलः ॥
निरुणद्ध्याशयद्वारं पीडयन् गर्भसंस्थितम् ।
निरुद्धवदनोच्छ्वासो गर्भश्चाशु विपद्यते ॥
बद्धां संरुद्धहृदयां नाशयत्याशु गर्भिणीम् ।
योनिसंवरणं विद्याद्व्याधिमेनं सुदारुणम् ॥
अन्तकप्रतिमं घोरं नारभेत चिकित्सितम् । मा. नि. मूढगर्भ १०
मधुकोश टीका, भावप्रकाश पान ७५८

— योनिसंवरणे सति प्रतिनिवृत्तो वायुर्गर्भाशयद्वारं यदा रुणद्धि तदा गर्भः कुक्षौ सक्तो भवति स उच्यते– संगः कुक्षाविति । योनिसंवरणं तंत्रांतरे रोगविशेषः । यथा "वातलान्यन्नपानानि ग्राम्यधर्मं प्रजागरम् । अत्यर्थं सेवमानायां गर्भिण्या योनिमार्गगः । मातरिश्वा प्रकुपितो योनिद्वारस्य संवृतिम् । कुरुते रुद्धमार्गत्वात्पुनरन्तर्गतोऽनिलः । निरुणद्ध्याशयद्वारं पीडयन् गर्भसंस्थितम् । निरुद्धवदनोच्छ्वासो गर्भश्चाशु विपद्यते । विपन्नशूनसर्वांगः सर्वाण्ये वायनानि च । बद्धां संरुद्धहृदयां नाशयत्याशु गर्भिणीम् । योनिसंवरणं नाम व्याधिमेनं सुदारुणम् । अंतकप्रतिमं घोरं नारभेत चिकित्सितम्" इति ॥
माधवनिदान, आतंकदर्पण टीका, पृ. ४६५



हा व्याधी अत्यंत घोर आहे. याने गर्भिणीच्या जिवास तात्काल धोका पोहोचतो. यावर औषधी चिकित्सेचा उपयोग झालेला आढळत नाही. यावर शस्त्रकर्मचिकित्साच आवश्यक आहे व तीच उपयोगी ठरते. [1]गर्भ व गर्भिणी यांस विपन्नावस्था प्राप्त होण्यापूर्वीच शस्त्रकर्म केल्यास गर्भ व गर्भिणी दोनही सुखरूप राहू शकतात. ही शस्त्रकर्मचिकित्सा म्हणजे उदरपाटनपूर्वक गर्भनिर्हरण हीच आहे.

## १३. गर्भोपद्रव–मक्कल्ल

**व्याख्या :**

मक्कल्लो रक्तमारुतजः शूलविशेषः ।
—मधुकोश टीका.

[2]गर्भिणीला होणारा मक्कलही रक्त आणि वायू यांच्या दुष्टीतून उत्पन्न होणारा व्याधी आहे.

माधव निदानकाराने गर्भिणीला पीडाकर होणाऱ्या उपद्रवांचा उल्लेख करताना काही महत्त्वाच्या रोगांचा उल्लेख केला आहे. त्यांचे वर्णन इतरत्र फारसे आढळत नाही. माधवनिदान आणि त्यावरील मधुकोश आतंकदर्पण या दोन टीका; यांतच या रोगाविषयीचे वर्णन आढळते. गर्भिणीला होणारा मक्कल हा असाच

१ बस्तिद्वारे विपन्नायाः कुक्षिः प्रस्पंदते यदि ।
जन्मकाले ततः शीघ्रं पाटयित्वोद्धरेच्छिराम् ॥ वा. शा. अ. २-५३

२ यद्यपि प्रसूतायाः शूलं मक्कल्लमुक्तं सुश्रुते—
"प्रजातायाश्चोत्तरकालं तीक्ष्णैरविशोधितं रक्तं मक्कल्लं करोति" (सु.शा.अ.१०) इति, तथापि प्रजाताश्चेति चकारेणाप्रजाताया अपि शूलं मक्कल्लमिति । —
माधवनिदान मूढगर्भ, मधुकोश टीका १०

— वायुः प्रकुपितः कुर्यात् संरुध्य रुधिरं स्रुतम् ।
सूताया हृच्छिरोबस्तिशूलं मक्कल्लसंज्ञकम् । माधवनिदान.

— भोजप्रभृतयस्तु धातुरक्तजं विद्रधिं परित्यज्य मक्कल्लसंज्ञयाऽऽर्तवलक्षणरक्तजं पठन्ति । तेषां मते आर्तवजेन सह षड्विद्रधयः सुश्रुते तु धातुरक्तजोऽपि तथा मक्कल्ल–संज्ञकोऽपि विद्रधिः सामान्यजेन रक्तजः एवेति षड्विद्रधयः । इति
—मा. निदान विद्रधि, मधुटीका १०

माधवनिदानोक्त व्याधी आहे. माधवाचे हे परीक्षण अत्यंत महत्त्वाचे असून व्यवहारसिद्ध आहे. सूतिका मक्कल या नावाने सुश्रुतादी ग्रंथांत मक्कल नावाच्या व्याधीचा उल्लेख येतो. त्याचे वर्णन पुढे सूतिकाविज्ञानीयात येईल. माधवनिदानाच्या टीकाकाराने सुश्रुतातील वचनावरून गर्भिणीमक्कलही सिद्ध केला आहे.

( 'वायुः प्रकुपित' हा श्लोक प्रक्षिप्त म्हणून प्रकाशकाने ग्रंथ छापताना कंसात घातला आहे. कारण मधुकोशकाराने त्याचा उल्लेख केला नाही. परंतु आतंकदर्पणकाराने मात्र आपल्या टीकेमध्ये 'मक्कल्लमाह वायुप्रकुपित' इत्यादी या वचनाचे उद्धरण केले आहे. त्यावरून आतंकदर्पणकारास हा श्लोक संमत असल्याचे दिसते व ते उचितही आहे. )

गर्भिणी मक्कल्लाची अवस्था व कारणे जरी सूतिका मक्कल्लापेक्षा निराळी असली तरी संप्राप्तीतील मूळघटक सारखेच आहेत.

गर्भिणी मक्कल्लाच्या कारणांचा विचार करता सुश्रुताने मूढगर्भ प्रकरणामध्ये गर्भाच्या एकूण विकृतीचा जो संकलित विचार केला आहे तोच येथे विभागशः विचारात घेतला पाहिजे. कारण माधवनिदानातील मागे उल्लेख केलेल्या श्लोकांवरून लक्षात येईल की गर्भिणीला उपद्रवरूप होणारे अनेक पीडाकर व्याधी ग्रंथकारांनी मूढगर्भ या प्रकरणातच समाविष्ट केले आहेत.

निदान व संप्राप्ती यासंबंधी मूढगर्भ या प्रकरणातील सुश्रुताचे वचनामध्ये प्रत्यक्ष व्यवहाराला सुलभ असे व्याधींचे वर्गीकरण करणे आवश्यक आहे हे लक्षात येईल; कारण या वचनात शूल गर्भाचा स्थानभ्रंश, रक्तस्राव, गर्भपात, मूढगर्भ असे अनेक अवस्थांनुरूप होणारे व्याधी उल्लेखिलेले आहेत. शूल या प्रकरणामध्ये गर्भिणीमक्कलही समाविष्ट होतो. कारण त्यातही शूल हेच प्रधान लक्षण आहे. या व्याधीची कारणे, संप्राप्ती लक्षणे आणि उपचार पुढीलप्रमाणे असतात :

## कारणे :

अतिव्यायाम, फार धक्के बसणाऱ्या वाहनांतून प्रवास करणे, धावपळ, मार लागणे, उपवास, अतिक्रोध, अतिशोक, अतिउष्ण, कटू अशा आहाराचे सेवन, अतिवमन, अतिविरेचन, गर्भपात करण्याचा प्रयत्न करणे ही कारणे असतात.

— ग्राम्यधर्मयानवाहनाध्वगमनप्रस्खलनप्रपतनप्रपीडनधावनाभिघातविषमशयनासनोपवासवेगाभिघातातिरूक्षकटुतिक्तभोजनशोकातिक्षारसेवनातिसारवमनविरेचनप्रेंखोलनाजीर्णगर्भशातनप्रभृतिभिर्विशेषैर्बन्धनान्मुच्यते गर्भः, फलमिव वृत्तबन्धनादभिघातविशेषैः, स विमुक्तबन्धनो गर्भाशयमतिक्रम्य यकृत्प्लीहान्त्रविवरैरवस्रंसमानःकोष्ठसंक्षोभमापादयति,तस्या जठरसंक्षोभाद्वायुरपानो मूढःपार्श्वबस्तिशीर्षो



## संप्राप्ती :

या कारणांनी वातप्रकोप व रक्तदुष्टी होऊन गर्भ हा आपल्या आश्रयापासून सुटू लागतो व गर्भाशयामध्ये रक्तस्राव होऊ लागतो. निदानातील कारणांनी प्रकुपित झालेल्या वायूने गर्भाशयमुखाचा संकोच झाला असल्याने, स्रवणारे रक्त बाहेर पडत नाही. त्यामुळे अधिकच वातप्रकोप होतो. हा वातप्रकोप व रक्तस्राव यामुळे लक्षणे उत्पन्न होतात.

## लक्षणे :

उदर, कुक्षी, पार्श्व, अधोदर, कटी, योनी या ठिकाणी तीव्र स्वरूपाच्या वेदना उत्पन्न होतात. या वेदना सर्व ठिकाणी एकसमयावच्छेदाने असतात असे नाही. यांपैकी कोठेही एके ठिकाणी वा अधिक ठिकाणी शूल असतो. शूल हा बहुधा नाभीच्या आसमंतात सुरू होतो आणि तीव्रता जसजशी वाढत जाईल त्याप्रमाणे तो वर उल्लेखिलेल्या इतरही अवयवांत प्रतीत होतो. शूलाच्या कारणामध्ये रक्तदुष्टी हे कारण असल्यामुळे शूलाच्या तीव्रतेबरोबर स्पर्शासहत्व हे लक्षणही वाढत जाते. तसेच शोष, तृष्णा, ग्लानी, पांडुत्व, हात व पाय गार पडणे ही लक्षणेही तीव्र शूल व रक्तस्राव यांचा परिणाम म्हणून गर्भिणीच्या ठिकाणी दिसू लागतात.

गर्भिणीमध्ये काही विशिष्ट गर्भोपघातकर भावामुळे गर्भाशयाला संसक्त असलेली अपरा गर्भाशयापासून सुटू लागते व त्या वेळी गर्भकोष्ठामध्ये रक्तसंचिती होऊ लागते.

प्राकृत गर्भिणीमध्ये गर्भाबरोबर योग्य त्या प्रमाणात गर्भाशयही वाढत असतो. (गर्भाच्या वास्तव्यासाठी) हा संचित झालेला रक्तस्राव बाहेर न पडल्याने व गर्भाशय गर्भाच्या प्रमाणातच वाढलेला असल्याकारणाने गर्भाशयावर ताण पडतो. तीव्र व असह्य असा शूल उत्पन्न होतो. प्रत्यक्षामध्ये बहुधा गर्भिणीमक्कल्ल हा गर्भोपद्रव गर्भिणी अवस्थेच्या म्हणजेच सातव्या महिन्यानंतरच्या काळात सापडतो.

रक्त बाहेर न पडल्याने संचित होते; त्याचा परिणाम म्हणून शूलादी लक्षणांसवेच उदरवृद्धी होते. या व्याधीचे स्वरूप अतिशय उग्र व घातक असे आहे. त्याचा प्रतिकार वेळीच करणे आवश्यक आहे.

सुश्रुताच्या वर्गीकरणाप्रमाणे हा व्याधी 'अविषह्य' असल्यामुळे यावर गर्भपातन हीच महत्त्वाची व एकमेव चिकित्सा आहे.

दरयोनिशूलानाहमूत्रसंगानामन्यतममापाद्य गर्भं च्यावयति तरुणं शोणितस्रावेण; तमेव कदाचिद्विवृद्धमसम्यगागतमपत्यपथमनुप्राप्तमनिरस्यमानं विगुणापानसंमोहितं गर्भं मूढमित्याचक्षते । सु. नि. ८-३.




अ




ब

आकृती ३९ : गर्भिणी मक्कल्ल
१. रक्तसंचिती, २. अपरा, ३. गर्भ, ४. गर्भोदक.

गर्भपातन करण्यासाठी शस्त्रकर्मच आरंभी करावे लागते. प्रथम गर्भाशयमुखातून तीक्ष्ण शस्त्राने जरायूचा भेद करावा. त्यामुळे गर्भोदक व संचित रक्त यांचा स्राव होऊन जातो व त्यामुळे गर्भाशयाचा संकोच होऊ लागून गर्भ योनिमुखातून बाहेर टाकला जातो. हे शक्य न झाल्यास उदरपाटनपूर्वकही गर्भनिर्हरण करणे इष्ट ठरते.

या सर्व उपक्रमासाठी कुशल शस्त्रवैद्य व शस्त्रकर्मानुकूल साधनसंभार यांची अत्यंत आवश्यकता आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

गर्भपात झाल्यानंतर उदरावर घट्ट पटबंध बांधावा व त्या स्त्रीस शोधन होईल व वाताचे शमन होईल असे उपचार करावेत. यासाठी त्रिकटू, काळा बोळ, लताकरंज ही औषधे योग्य प्रमाणात बलाबल पाहून वापरावीत.

'गर्भाशयं अतिक्रम्य ... ... ... ...' या सुश्रुतोक्त शब्दावरून आणखी एका प्रकारचा मक्कल्ल शूल गर्भिणीच्या ठिकाणी संभवतो तो असा :

गर्भ गर्भाशयाच्या बाहेर वाढू लागतो. काही वेळा तृतीय आवर्ताचा भाग असलेली आर्तववाहिनी या ठिकाणी गर्भधारणा होऊन गर्भ वाढण्यास आरंभ होतो. त्यामुळे आर्तववाहिनीवर जास्त ताण पडून तीव्र शूल उत्पन्न होतो. व क्वचित वेळी आर्तववाहिनीचा भेद होऊन गर्भ मातेच्या उदरामध्ये ( म्हणजेच गर्भकोष्ठाच्या






आकृती ४० : १. गर्भ, २. गर्भाशय

बाहेर ) प्रविष्ट होतो. गर्भधारणा झाल्यापासून एक ते दीड महिन्याच्या कालापर्यंत ही घटना घडते.

काही वेळा हा आर्तववाहिनीमधील गर्भ आर्तववाहिनीचा भेद न करता आर्तववाहिनीच्या दुसऱ्या सुट्या असलेल्या मुखातून मातेच्या उदरकोष्ठामध्ये बाहेर टाकला जातो.

यास बीजदोष व दैव हेच कारणीभूत असतात. गर्भाची ही वाढ गर्भ ज्या बाजूस असेल त्याप्रमाणे यकृत किंवा प्लीहांत्र-विवरामध्ये होऊ लागते. आणि त्यामुळे कोष्ठामध्ये पीडन होऊन क्षोभ उत्पन्न होतो. ज्या वेळी रक्तदुष्टी होते त्या वेळी शूल तीव्रतर ( असह्य ) होतो. त्यामुळे भ्रम, पांडुता, शोष, स्वेदाति-प्रवृत्ती अशी लक्षणे उत्पन्न होतात.

आणखी एक प्रकारचा मक्कल्ल शूल गर्भिणीच्या ठिकाणी संभवतो तो असा—

गर्भ हा गर्भाशयामध्येच वाढत असताना उदराच्या बाहेरून अभिघात होऊन गर्भाशयास झालेल्या व्रणामुळे गर्भाशयाचा भेद होऊन गर्भ गर्भाशयाच्या बाहेर पडून मातेच्या उदरामध्ये संचार करतो.

काही वेळा प्रथम प्रसूती वामदेवीयाने झाली असेल व द्वितीय प्रसवाच्या वेळी प्रसवकाल लांबला ( विलंबित प्रसव ) तर पहिल्या शस्त्रकर्माच्या व्रणाचा भेद होऊन वरील लक्षणे आढळतात व माता आणि बालक यांच्या जिवास धोका उत्पन्न होतो.

अगदी क्वचित प्रसंगी गर्भाशयाच्या बाहेर पडलेला गर्भ ( अपरेसह ) वपा ( ओमेन्टम् ) यावर गर्भाची अपरा संसक्त होऊन गर्भ मातेच्या उदरकोष्ठामध्ये सुखरूप वाढू लागतो. असा हा अयोनिज गर्भ आठ महिन्यांपर्यंतसुद्धा वाढत असलेला आढळतो.

या सर्वांवर उदरपाटनपूर्वक शस्त्रकर्मोपचारच आवश्यक आहेत. कारण हे गर्भ

गर्भाशयाचे बाहेर असल्यामुळे ते योनिमार्गे बाहेर येणे संभवत नाही.

मधुकोष टीकाकाराने मक्कल्लाचा संबंध विद्रधीशी जोडला असला तरी त्याचा विचार विद्रधी म्हणून स्वतंत्रच केला पाहिजे.

[1]गर्भामुळे उत्पन्न होणारे गर्भिणीचे अनेक प्रकार या प्रकरणात सांगितले आहेत व त्यांची ग्रंथोक्त चिकित्साही सांगितली आहे. हे विकार उत्पन्न झाल्यानंतर काही काही वेळा गंभीर लक्षणे उत्पन्न होतात. सगर्भावस्थेमुळे होणारी दोषदुष्टी अत्यंत उत्कट होऊन तिला गरविषाप्रमाणे असह्य असे स्वरूप प्राप्त होते. या दोष-दुष्टीने छर्दी, मूर्च्छा, भ्रम, अपस्मार, अपतंत्रक, ज्वर, पांडू, अतिसार इ. अत्यंत तीव्र स्वरूपाचे व्याधी उत्पन्न होतात. अशा वेळी शमन उपचारांचा काही उपयोग होत नाही. लक्षणे वाढत गेली तर गर्भिणीच्याच जिवाला धोका पोहोचतो व गर्भही जगत नाही तो नाहीच. याच स्थितीत तीव्र स्वरूपाच्या दोषदुष्टीला मूलभूत कारण असलेला जो गर्भ त्याचाच नाश करणे आवश्यक होते. वैद्याने शस्त्रकर्माने, तीक्ष्ण उत्तरबस्तीने वा तीक्ष्णोष्ण औषधांच्या उपचाराने कुशलतेने गर्भ बाहेर काढावा.

ही लक्षणे फार उशिरा म्हणजे नवव्या महिन्यात व्यक्त झाली तर शस्त्रकर्माच्या साधनाने गर्भ व गर्भिणी या दोघांनाही वाचविणे शक्य होते.

पुढील गर्भिणी अवस्थेमध्ये गर्भोपद्रव होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असते; कारण एकदा झालेला गर्भोपद्रव पुन्हा पुढील गर्भिणी अवस्थेमध्ये होण्याची शक्यता जास्त प्रमाणात आढळते.

## अतिगर्भोदक

हे गर्भव्यापादामध्ये सापडते.

**व्याख्या :**

गर्भिणीमध्ये प्रमाणापेक्षा जास्त गर्भोदक असणे या अवस्थेस अतिगर्भोदक असे म्हणावे.

प्राकृत गर्भोदक १–२ लिटर असते.

---

१ अविषह्ये विकारे तु श्रेयो गर्भस्य पातनम् ।
न गर्भिण्या विपर्यासस्तस्मात्प्राप्तं न हापयेत् ।। सु. चि. १५–११
– सोढुमशक्ये विकारे व्याधौ सति किं कर्तव्यमित्याह–श्रेयो गर्भस्येति; श्रेयोभव-तीत्यर्थः गर्भपातनफलमाह– न गर्भिण्या विपर्यास इति; विपर्यासो मृत्युरित्यर्थः । तस्मात् प्राप्तकालं न हापयेत् नोल्लङ्घयेदित्यर्थः । टीका
– अक्रियाणां ध्रुवो मृत्युः । सु. चि. ७–२९



**कारणे :**

गर्भधारणेच्या वेळी क्रमाने अग्नी, जल व वायू यांच्या प्रमाणापेक्षा आधिक्याने अति-गर्भोदक होण्याची शक्यता असते. प्रमेही स्त्रीमध्ये (गर्भिणीमध्ये) अतिगर्भोदक जास्त प्रमाणात आढळतो. बीजदोषामुळेसुद्धा अतिगर्भोदक आढळतो.

**पूर्वरूपे :**

दौहृदाची लक्षणे तीव्र स्वरूपात आढळतात.

**रूपे :**

श्वास, पादशोथ, मासानुमासिक गर्भाशयवृद्धी प्रमाणापेक्षा जास्त आढळते. द्रव-प्रचीती जास्त प्रमाणात आढळून येते. गर्भिणी मक्कल्ल, कटी–ऊरूशूल तीव्र असतो. गर्भिणीच्या ऊरू, योनी व पायावर सिराजग्रंथी आढळतात. गर्भिणीला गर्भचलन असह्य होते, गर्भिणीच्या उदर-परीक्षणामध्ये गर्भशिराचा अभाव, गर्भावयव स्पष्ट-पणे न लागणे, गर्भहृद्स्पंद स्पष्टपणे ऐकू न येणे वा अजिबात ऐकू न येणे, अनेका-पत्यता (यमगर्भ) ही लक्षणे आढळतात.

साधारणतः ९ व्या महिन्यात योनिपरीक्षेमध्ये गर्भाशयमुख नेहमी विस्तृत लागते.

अतिगर्भोदक असलेल्या स्त्रीच्या प्रसवानंतर बालकामध्ये साधारणतः पुढील— सहज विकृती आढळतात. उदा०– ओष्ठभंग, तात्वोष्ठ भंग, पृष्ठ वा स्फिकभागी ग्रंथी, पादवक्रता, विकृत यमगर्भ, उदरवृद्धी, सन्निरुद्ध गुद वा योनी वगैरे.

अतिगर्भोदक हे जास्त प्रमाणात बहुप्रसवा स्त्री, एकनाभिप्रभवज यमगर्भ यात आढळतो.

अतिगर्भोदक असताना गर्भस्राव वा पात होण्याची शक्यता जास्त प्रमाणात असते.

**प्रकार :**

प्रत्यक्षामध्ये गर्भोदकाच्या उत्पत्ती व संचितीच्या कालावरून दोन प्रकार आढळतात.

(१) संथ गतीने गर्भोदकाची उत्पत्ती व संचिती होऊन गर्भिणीच्या शरीरावर त्याचे परिणाम सावकाशपणे होत असलेले दिसू लागतात. हा प्रकार साधारणतः ६ व्या महिन्यापासून सुरू झालेला आढळतो. परंतु क्वचित वेळी ही अवस्था ९ व्या महिन्यापर्यंत लक्षात येऊ शकत नाही. व प्रसवाच्या वेळी ते लक्षात येते. सामान्यतः हाच प्रकार प्रत्यक्षात जास्त प्रमाणात सापडतो.

(२) अतिशय थोड्या काळामध्ये गर्भोदकाची उत्पत्ती व संचिती होते; तसेच अति-अल्पकाळात गर्भिणीदर त्याची लक्षणे दिसू लागतात. साधारणतः ४–५ व्या महिन्यात हा प्रकार आढळतो.

## व्यवच्छेदक निदान :

| अतिगर्भोदक | उदर | अंत:फलस्थ गुल्म |
|---|---|---|
| (१) श्वास, पादशोथ | श्वास, पादशोथ | श्वास,पादशोथ |
| (२) गर्भाशयवृद्धी (मासानुमासिक) जास्त प्रमाणात आढळते. | उदरवृद्धी<br>— | उदरवृद्धी |
| (३) दौहृदाची लक्षणे जास्त तीव्रतेने आढळतात. | दौहृदाची लक्षणे आढळत नाहीत. | दौहृदासारखी लक्षणे अल्प प्रमाणात आढळतात. |
| (४) द्रवप्रचीती | — | द्रवप्रचीती. |
| (५) गर्भावयव लागतात. | — | — |
| (६) गर्भहृद्स्पंद ऐकू येऊ शकतात. | — | — |
| (७) गर्भचलन गर्भिणीस असह्य होते. | रुग्णेस गर्भचलन जाणवत नाही. | क्वचित वेळी रुग्णेस गुल्माचे चलन जाणवते. |

## चिकित्सा :

### (प्रसवपूर्व) :

(अ) औषधाने गर्भोदकाचे प्रमाण कमी करणे—

सामान्य चिकित्सेचे तत्त्व—

गर्भोदकाचे प्रमाण कमी करणे. त्याच्या दोन पद्धती आहेत. त्या अशा—

(अ) औषधाने (ब) शस्त्रकर्माने.

लोध्र, आमलकीमज्जा, चंद्रप्रभा, आरोग्यवर्धिनी, मूत्रल क्वाथ, पुनर्नवासव.

आहार – लवण व अभिष्यंदी आहार वर्ज्य.

विहार – विश्रांती.

(ब) शस्त्रकर्माने गर्भोदकाचे प्रमाण कमी करणे—

स्थानिक संमोहन देऊन उदरावरून सूचिकेच्या साहाय्याने गर्भोदक अल्प प्रमाणात करणे. निर्हरण ही क्रिया साधारणत: १५ ते २० दिवसांनी पुन्हा पुन्हा करता येते. काही वेळा प्राकृत प्रसवही झालेला आढळतो. क्वचित याचा परिणाम गर्भपातामध्येही होतो.

या दोन्ही चिकित्सांनी उपशय न वाटल्यास अपस्मारासारखे उपद्रव उत्पन्न होतात.



### (२) प्रसवामधील परिचर्या :

आवी सुरू झाल्यानंतर लगेच गर्भोदक स्रुती करून ठेवावी; म्हणजे गर्भाला मूढता प्राप्त होत नाही. गर्भोदक स्रुती करीत असताना वैद्याने गर्भनाभिनाडी गर्भाशयमुखातून बाहेर न येण्याची खबरदारी घ्यावी.

प्राकृत प्रसवात गर्भोदक स्रुतीचे प्रमाण १ ते २ लिटर असते. अतिगर्भोदकात मात्र प्रत्यक्षात ७–८ लिटर गर्भोदक स्रुती झाल्याचे आढळते.



आकृती ४१ : नाडी यंत्र

गर्भोदक स्रुती करून प्रसवावस्था प्राप्त करून देण्यासाठी वापरण्यात येते.

गर्भनिष्क्रमणानंतर क्वचित वेळी अपराहृतनास विलंब लागून योनिगत रक्तस्राव प्रभूत प्रमाणात होण्याची शक्यता असते. तसेच अपरापतनानंतरही अतिरक्तस्राव झालेला आढळतो. त्याकरिता अपरापतनाची व अपरासंगाची चिकित्सा त्वरित करावी. मातेस विपन्नावस्था प्राप्त झाल्यास रक्तदानादी चिकित्सा द्यावी.

## गर्भिणी-परिचर्या

| मास | प्राकृत लक्षणे | प्रा. ल. ची कारणे | उपचार | विकृत लक्षणे | उपचार | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रथम | प्रसेक, आलस्य, तंद्रा, अंगसदन, योनिस्फुरण, हृत्स्पंद | गर्भाधान | व्यवाय-व्यायाम अजीर्ण-तीक्ष्ण द्रव्ये वर्ज्य. | स्राव | पूर्ण विश्रांती, मौक्तिक, प्रवाळ, माक्षिक, अशोक, कमळ, यांचा उपयोग; तीक्ष्ण, उष्ण द्रव्ये वर्ज्य, शीतद्रव्योपयोग. | गर्भस्राव कष्टसाध्य |
| द्वितीय | हृल्लास, रजोऽप्रवृत्ती, अरुचि, छर्दि अम्लप्रीती | गर्भदोषोत्पीडन | लघू मधुर द्रव शीत आहार, निंबु-दाडिम-रस, आमलकी, प्रवाळ पंचामृत, नारीकेल जल. | छर्दी, कार्श्य, अनन्नाभिलाषा, अवष्टंभ, स्राव | मयूरपिच्छामषी, मृद्भृष्ट-जल, दाडिमादी घृत, च्यवनप्राश, गर्भपालरस, शतामृत, शतावरी कल्क, मात्राबस्ती, द्राक्षा+आमलकी–फांट अनुलोमनासाठी. | गर्भस्राव कष्टसाध्य |
| तृतीय | स्तनपुष्टी, गौरव, कृशता | — | — | छर्दीनंतर रक्तप्रवृत्ती | लाक्षा, प्रवाळ दाडिमघृत | गर्भस्राव कष्टसाध्य |

| मास | प्राकृत लक्षणे | प्रा. ल. ची कारणे | उपचार | विकृत लक्षणे | उपचार | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| चतुर्थ | स्तनमंडल-ओष्ठ, कृष्णता, अपांग, श्यावता, रोमराजी, कृष्णत्व, जृंभा, गंधाप्रीती, योनिशैथिल्य, गौरव. | गर्भाचे स्थिर होणे | — | शोथ, योनिभ्रंश, गर्भपात | अवनत शिरस्कासन, पिचुधारण, प्रवाहण वर्ज्य, चंद्रप्रभा, पुनर्नवा, गर्भपालरस, अस्थिपोषक. मीठ वर्ज्य. | गर्भपात कष्टसाध्य |
| पंचम | कार्श्य, गर्भस्फुरण, उदरवृद्धी व्यक्त गर्भहृत्स्पंदन. | गर्भधातुवृद्धी | मधुरौषधसिद्ध घृत | शूल, अरति, निद्रानाश, शोथ | फलघृत, शतावरीकल्प | गर्भपात कष्टसाध्य |
| षष्ठम | बलवर्णहानी, अल्पपादशोथ, पाण्डुता | गर्भ बल वर्णवृद्धी | यकृतप्राश, मंडूरभस्म नवजीवनरस. | अतिपाण्डु, हृद्रोग | रक्तवर्धक, लक्ष्मीविलास | गर्भपात कष्टसाध्य |
| सप्तम | क्लम, किक्विस. | गर्भ सर्वांगपूर्णता | लघु बल्य बृंहण आहार मधुमालिनी वसंत आमगर्भ | कंडू, विदाह, अकालप्रसव | करंजतैल, पारिभद्रतैल, प्रतिसारण, निंबजलधावन, फलघृत. | — |
| अष्टम | म्लानता, हर्ष. | ओजाचे परिवर्तन | विश्रांती, प्रवास वर्ज्य. | बालमृत्यू | — | — |

| मास | प्राकृत लक्षणे | प्रा. ल. ची कारणे | उपचार | विकृत लक्षणे | उपचार | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| नवम | क्षुद्रश्वास, उरोदाह, छर्दी, सौहित्यं, न सहते, पादशोथ, पुरोनमन कष्टदायक. | गर्भप्रपीडन | थोडे थोडे खावे, शंखभस्म, सज्जीक्षार, निंबुपानकातून दूध + पाणी गार करून घेणे. | — | — | — |
| दशम | अधोगुरुत्व, हृदयबंध-विमोचन, मलमूत्र प्रवृत्ती वारंवार ऊरुसाद. | गर्भप्रपीडन | एरंडस्नेहाने अनुलोमन, स्निग्ध बस्ती, तैलाने योनिभागी अभ्यंग. | मूढगर्भ | — | कष्टप्रसव |

## गर्भ–व्यापद

| प्रकार | काल | हेतू | पूर्वरूपे | रूपे | उपचार | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. गर्भस्राव | १ ते ३ महिने | श्रम, उष्णतीक्ष्ण आहार, शोधन आघात | कटिपार्श्वशूल अल्पस्राव कृष्णवर्ण | शूल, अतिस्राव रक्तवर्ण, | अवनतशिरस्कासन, पिचुधारणा (शीतकषाय) शीतोपचार, द्रव-लघु-शीत आहार, विश्रांती. | पाण्डू |
| २. गर्भपात | ४ ते ६ महिने | श्रम, उष्णतीक्ष्ण आहार, शोधन आघात रक्तदुष्टिफिरंग | कटिपार्श्वशूल अल्पस्राव कृष्णवर्ण | उदरशूल, आवी, अतिरक्तस्राव | वरील सर्व + गर्भपालरस, फलघृत, शतावरीकल्प | पाण्डू अपरासंग |
| ३. उपविष्टक | ४ महिन्यांनंतर | अपतर्पण वातप्रकोप नाभिनाडीप्रपीडन | स्राव | गर्भाची मासानुमासिक वृद्धिलक्षणे दिसत नाहीत. दौर्बल्य, अविपाक, श्रम गर्भस्फुरणहोते. | आमगर्भ, सुवर्णमालिनी-वसंत, द्राक्षासव, मांसरस, फलघृत, बृंहणजीवन द्रव्यांनी सिद्ध घृत. | |

| प्रकार | काल | हेतू | पूर्वरूपे | रूपे | उपचार | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. नागोदर | ४ महिन्यांनंतर | अपतर्पण वातप्रकोप नाभिनाडीप्रपीडन | स्राव | गर्भाचा आकार कमी होत जातो. गर्भाचे स्फुरण क्वचित होते. | आमगर्भ, सुवर्णमालिनी-वसंत, द्राक्षासव, मांसरस, फलघृत, बृंहणजीवन द्रव्यांनी सिद्ध घृत. | बलक्षय |
| ५. लीनगर्भ ( मृतगर्भ ) | ४ महिन्यांनंतर | अपतर्पण वातप्रकोप नाभिनाडीप्रपीडन | स्राव | उदरवृद्धी होत नाही. गर्भ प्रसुप्त वा न स्पंदते या स्थितीत असतो. उदर शून्यता, शूल, स्राव, मंदज्वर अरति | आमगर्भ, सुवर्णमालिनी-वसंत, द्राक्षासव, मांसरस, फलघृत, बृंहणजीवन द्रव्यांनी सिद्ध घृत. बलातेलाने कटीपार्श्वपृष्ठ ऊर, उदर येथे अभ्यंग करावा. | बलक्षय |
| ६. मृतगर्भ ( प्रसवकाली ) | नवमदशम मास | मूढगर्भ योनिसंवरण दौर्बल्य | | आवी थांबतात. शूल, भ्रम, श्वास, ग्लानी, पूती, उच्छ्वास शीतगात्रता | गर्भनिर्हरण शस्त्रकर्म | विलंबामुळे मातेचा मृत्यू |

## गर्भोपद्रव

| प्रकार | हेतू | रूपे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. हृल्लास | गर्भदोषोत्पीडन अजीर्ण | मळमळ, तोंडास पाणी सुटणे | सौम्य अनुलोमन, द्राक्षाक्वाथ | शंखभस्म, प्रवाळ, दाडिमस्वरस, दाडिमावलेह मातुलुंगावलेह, आमलकी खंड मुखात धरावा. | लघु-द्रव-अम्ल मधुर भोजन | छर्दी |
| २. छर्दी | गर्भदोषोत्पीडन अजीर्ण मलावष्टंभ | काहीही खाल्ले तरी उलटते, शूल, दौर्बल्य भ्रम, उरोविदाह | सौम्य अनुलोमन द्राक्षाक्वाथ | प्रवाळ पंचामृत, मयूरपिच्छामषी, मृद्भृष्टजल, सुवर्णसूतशेखर-मिश्रण, द्राक्षासव, लाजमंड | द्रव—अतिशीत—मधुर आहार, नारळाचे पाणी, तीक्ष्ण —उष्ण विदाही वर्ज्य | रक्तछर्दी, गिळण्यास त्रास होतो |
| ३. अरुची | मलावष्टंभ | तोंड बेचव होते, अन्न जात नाही. | सौम्य अनुलोचन द्राक्षाक्वाथ | निबुपानक, मातुलुंगावलेह अमसुलाचे सार, सुंठीपाक, त्रिफला + त्रिकटूने दंतधावन | — | भक्तद्वेष दौर्बल्य |
| ४. शोष | मलावष्टंभ | तोंडास कोरड पडते, तृषा लागते | — | यष्टिमधु + खडीसाखर, द्राक्षा तोंडात ठेवावी, षडंगोदक द्यावे. | नारीकेलजल लाजमंड | — |

| प्रकार | हेतू | रूपे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| ५. पाण्डू ( विवर्णत्व ) | अपतर्पण, गर्भ-दोषोत्पीडन, गर्भपोषण | भ्रम, शोथ, हृत्स्पंद, क्षुद्र, श्वास, दौर्बल्य मंदज्वर | सौम्य अनुलोमन | नवजीवनरस, लोहासव, रक्तवर्धक यकृतप्राश, मधुमंडूर, दाडिमघृत ताप्यादिलोह मिश्रण | लघु-बृंहण-दीपन अम्लरसयुक्त आहार | मूर्च्छा अतिपांडू कामला, कष्टप्रसव |
| ६. शोथ | अपतर्पण गर्भ-दोषोत्पीडन, गर्भपोषण | पादशोथ, वैवर्ण्य अंगगौरव आलस्य | स्रंसन, सोनामुखी, बाहवा, हरीतकी, निशोत्तर | पुनर्नवामंडूर, चंद्रप्रभा, आरोग्य-वर्धिनी, गोक्षुर-पुनर्नवा-धनेक्वाथ, पुनर्नवासव. | पिपळी + अर्जुन-सिद्ध दुग्ध | सर्वांगशोथ मूर्च्छा अपस्मार |
| ७. ज्वर | गर्भप्रपीडन | संताप, अंगमर्द शिरःशूल, श्रम तृष्णा | — | चंद्रकला, सुवर्णसूतशेखर, सारिवा, मुस्ता, पर्पट, गडूची, त्रिभुवनकीर्ती, पारिजातकगुटी. | षडंगोदक पेया, विलेपी, विश्रांती | मूर्च्छा अपस्मार, स्राव गर्भपात, अकालप्रसव |
| ८. अतिसार | मिथ्याहारविहार गर्भप्रपीडन | द्रवमलप्रवृत्ति, पिंडिकोद्वेष्ट, श्रम, शोथ | — | कुटज, संजीवनी, शंखोदर, लोहपर्पटी, कुटजारिष्ट | ताक, ताकभात, मुद्गयूष | गर्भपात, मृत्यू. |

| प्रकार | हेतू | रूपे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. प्रवाहिका | मिथ्याहार-विहार गर्भप्रपीडन | सकफ सप्रवाहण सरक्त मलप्रवृत्ति | एरंडस्नेह | संजीवनी, कुडा, कुटजारिष्ट, शंखोदर | ताक, ताकभात, मुद्गयूष | — |
| १०. परिकर्तिका | मिथ्याहार विहार गर्भप्रपीडन | सदाह, सशूल, मलप्रवृत्ति, सरक्त-मलता, अरति | स्रंसन | चक्रतैल पोटात देणे, चक्रतैल शत-धौतघृत यांचा पिचू अवगाहस्वेद, चविकासव | तक्र, चुका, चाकवत भाजी | अरति, निद्रानाश |
| ११. अर्श | मिथ्याहार विहार गर्भप्रपीडन | सदाह, सशूल, मलप्रवृत्ती, सरक्त-मलता, अरति | स्रंसन | वरील सर्व, नागकेशर मिश्रण, कुडा, कांकायन गुटी, अर्श-शामक मलम. | तक्र, चुका, चाकवत भाजी | अरति, निद्रानाश उदावर्त |
| १२. मुखपाक | अजीर्ण, पाण्डू | लालास्राव, कटुरसासहत्व | सौम्य अनुलोमन | ताप्यादिमिश्रण, शंखजीरक-गैरिक प्रतिसारण, कामदुधा जात्यादी घृत. | कटुरस, अम्ल वर्ज्य, दुग्धाहार | — |

| प्रकार | हेतू | रूपे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १३. आक्षेपक | गर्भदोषोत्पीडन | मूर्च्छा, फेनवमन, दंतखाद, आक्षेप, ज्वर. | शोधन, बस्ती विरेचन | स्मृतिसागर, सर्पगंधा, जटामांसी वचातैल नस्य सूतशेखर अनुपशये गर्भपात करावा. | कटुरस, अम्ल वर्ज्य, दुग्धाहार | दौर्बल्य, कृशता |
| १४. शूल | प्रपीडन | आध्मान, अवष्टंभ, मूत्रसंग, कटी-पार्श्व-पृष्ठपीडा, ज्वर | बस्ती, मृदु-विरेचन एरंडस्नेह | शंखवटी, आमपाचनवटी, आरोग्य वर्धिनी, अहिफेनकल्प, सामुद्रादिचूर्ण, काळाबोळ+हिंग+लता-करंज—लेप. | द्रव वातानुलोमन कोष्ण आहार | गर्भपात, मृत्यू |
| १५. मूत्रग्रह | प्रपीडन | आध्मान, अधोदर शूल, अरति | बस्ती, मूत्र-निर्हरण | वातगजांकुश, विषतिंदुकवटी, कृष्णमृत्तिका लेप. | द्रव वातानुलोमन कोष्ण आहार | गर्भपात |
| १६. उदावर्त | अवष्टंभ, प्रपीडन | आटोप, शूल, संग, शिरःशूल | बस्ती | सामुद्रादी चूर्ण, शंखवटी, हिंगाष्टक इ. द्रव्ये तूप+गरम पाण्यासवे द्यावीत. | द्रव वातानुलोमन कोष्ण आहार | — |
| १७. मक्कल्ल | मिथ्याहारविहार गर्भाचे विमार्गगत्व | हृच्छिरोबस्ती-शूल, तीव्र वेदना | बस्ती | वरील उपचार वा गर्भनिर्हरण | — | मृत्यू |



[ स्त्री-सौतिक-बाल ]

## स्त्रीरोग / गर्भिणी परीक्षा पत्रक

रुग्णनाम –

जाती – वय – व्यवसाय –

क्रमांक – काल –

चिकित्सा प्रारंभ दिन –

चिकित्सा समाप्ती दिन –

परिणाम –

रुग्णाप्रकृती –

आहार –

प्रसवसंख्या – अपत्ये, विद्यमान – मृत –

व्याधिलक्षणे –

व्याधिकाल –

पूर्वोत्पन्नव्याधिविशेष –

सार्वदेहिक परीक्षा –

नख – नेत्र – त्वचा –

दंत – दंतवेष्ट – जिव्हा –

उरःपरीक्षण –

हृद्ध्वनी – फुप्फुसध्वनी –

नाडी – श्वसन –

रसाभिनोदन – शरीरभार –

उदरपरीक्षण –

उदरपरीघ – गर्भाशयोच्चता –

गर्भशिर – गर्भस्थिती – गर्भहृत्स्पंदन –

विशेष परीक्षा –

रज:प्रवृत्ती – पूर्वरज:काल

पूर्वप्रसव –

मलप्रवृत्ती – मूत्रप्रवृत्ती –

रक्तपरीक्षण – योनिपरीक्षा –

मूत्रपरीक्षण – गर्भाशय –

इतरस्रोतोदुष्टिलक्षणानि – पार्श्व –

गर्भाशयमुख –

स्राव –

व्याधिनिदान –

दोष – प्रकार –

उपद्रव – उदर्क –



उपशयानुपशय –

साध्यासाध्यत्व –

चिकित्सकस्य अभिप्रायः –

चिकित्सा –

बहि:परिमार्जन –

अन्त:परिमार्जन –

| दिनांक | दैनिकवृत्त | उपक्रम | पथ्य |
| --- | --- | --- | --- |
| | | | |

# ४

# सूतिका – विज्ञानीय

## सूतिकागार

सूतिका परिचर्येमध्ये सूतिकागार ( बाळंतघर ) याचे महत्त्व विशेष आहे. प्राचीन ग्रंथांमध्ये त्याचे विस्तृत वर्णन आहे.

[1]सूतिकागार निर्माण करताना हाडे, वाळू, खापरे नसलेली अशी भूमी निवडावी. तेथे पाणी चांगले असावे. वातावरण प्रसन्न असावे. कोणताही दुर्गंध येणार नाही अशी काळजी घ्यावी. सूतिकागार बांधताना त्याचे प्रवेशद्वार पूर्वेस वा उत्तरेस असावे. सूतिकागारामध्ये बेल, टेंटू, हिंगण, भल्लातक, वायवर्णा, खैर यांची लाकडे वापरावी. किंवा अथर्ववेदातील किंवा ब्राह्मण सांगतील त्याप्रमाणे इतरही गोष्टी कराव्या.

हे आगार वास्तुशास्त्राच्या आदेशाप्रमाणे बांधावे. शौचकूप, स्नानगृह, स्वयंपाकाची जागा, पिण्याचे पाणी व सांडपाण्याची सोय असलेले व सर्व ऋतूंत सुखकर होईल

१ प्राक् चैवास्या नवमान्मासात् सूतिकागारं कारयेदपहृतास्थिशर्कराकपाले देशे प्रशस्तरूपरसगन्धायां भूमौ प्राग्द्वारमुदङ्द्वारं वा बैल्वानां काष्ठानां तैन्दुकैङ्गुदकानां भल्लातकानां वार( रु )णानां खदिराणां वा; यानि चान्यान्यपि ब्राह्मणः शंसेयुरथर्ववेदविदस्तेषां;वसनालेपनाच्छादनापिधानसंपदुपेतं वास्तुविद्याहृदययोगाग्निसलिलोदूखलवर्चःस्थानस्नान–भूमिमहानसमृतुसुखंच । च. शा. अ. ८–३३.



असे ते बांधावे. अग्निसंरक्षणाचीही सोय तेथे असावी. त्यामध्ये सामान ठेवण्यासाठी कपाट असावे ( अपिधानम् ). चांगली वस्त्रे व बैठक यांची सोय असावी.

या सूतिकागाराच्या भिंतींना गिलावा चांगला केलेला असावा. वरून स्वच्छ असे छत दिलेले असावे. सूतिकागारातील प्रसवाची खोली आठ हात लांब, चार हात रुंद असावी ( १२′×६′ ). या खोलीमध्ये संरक्षणासाठी, स्वच्छतेसाठी व मंगलासाठी धूपादी योजना करावी. या सूतिकागाराची भूमी गोमयाने उत्तम प्रकारे सारवलेली असावी.

[1]या सूतिकागारात तूप, तेल, मध, सैंधव, सौवर्चल, पादेलोण, वावडिंग, कोष्ठ, देवदार, पिंपळी, पिंपळमूळ, गजपिंपळी, मंडूकपर्णी, वेलदोडे, कळलावी, वेखंड, च्यवक, चित्रक, चिरफळ, हिंग, मोहरी, लसूण, कतक (निवळी), जिरे, कळंब, भूर्जपत्र, हुलगे व आसव अशा औषधोपयोगी वस्तूंचा संग्रह असावा. दोन चांगले दगड, उखळ, मुसळ, तीक्ष्ण अशा सोन्याच्या वा चांदीच्या सुया, इतर तीक्ष्ण अशी पोलादाची शस्त्रे, दोन चांगल्या खाटा, ( शक्य तो बेलाच्या लाकडाच्या ) अग्नी प्रज्वलित करण्यासाठी टेंटू वा हिंगण यांचे इंधन इत्यादी संभार सुसज्ज असावा.

चरककाली सूतिकागार हे त्या त्या वेळी मुद्दाम नवीन बांधले जात असावे असे दिसते. घराच्या भोवती असलेली मोकळी जागा त्यासाठी वापरीत असावेत. म्हणूनच अस्थी, कपाल वगैरेंनी ती वर्ज्य असावी वा स्वच्छ करून घ्यावी असे सांगितले आहे. हे सूतिकागार झोपडीवजा दोन वा तीन खोल्यांचे बांधले जात असावे. त्याच्या बांधणीत ज्या लाकडांचा उपयोग करावयास सांगितला आहे तो त्या वेळच्या वर्णव्यवस्थेप्रमाणे प्रत्येक वर्णासाठी वेगवेगळा आहे असे सुश्रुतावरून दिसते. चरकाने मात्र तसा उल्लेख केलेला नाही. विशिष्ट लाकडे निवडताना त्यांच्या औषधी गुणांपेक्षा ग्रहादी बाधेपासून रक्षण करण्यास उपयुक्त या दृष्टीने असलेल्या त्या वेळच्या लौकिक समजुतींचा विचार केलेला दिसतो.

– नवमे मासि सूतिकागारमेनां प्रवेशयेत् प्रशस्ततिथ्यादौ, तत्रारिष्टं ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्राणां श्वेतरक्तपीतकृष्णेषु भूमिप्रदेशेषु बिल्वन्यग्रोधतिन्दुकभल्लातकनिर्मितं सर्वागारं यथासंख्यं तन्मयपर्यङ्कमुपलिप्तभित्तिसुविभक्तपरिच्छदं प्राग्द्वारं दक्षिणद्वारं वाऽष्टहस्तायतं चतुर्हस्तविस्तृतं रक्षामङ्गलसंपन्नं विधेयम् ॥ सु. शा. अ. १०–५

१ तत्र सर्पिस्तैलमधुसैन्धवसौवर्चलकालविड्लवणविडङ्गकुष्ठकिलिमनागरपिप्पलीपिप्पलीमूलहस्तिपिप्पलीमण्डूकपर्ण्येलालाङ्गलीवचाचव्यचित्रकचिरबिल्वहिङ्गुसर्षपलशुनकतककणकणिकानीपातसीबल्वजभूर्जकुलत्थमैरेयसुरासवाः सन्निहिताःस्युः; तथाऽश्मानौ द्वौ, द्वे कु(च)ण्डमुसले, द्वे उदूखले, खरवृषभश्च, द्वौ च तीक्ष्णौ सूचीपिप्पलकौ सौवर्णराजतौ, शस्त्राणि च तीक्ष्णायसानि, द्वौ च बिल्वमयौ पर्यङ्कौ, तैन्दुकैङ्गुदानि च काष्ठान्यग्निसन्धुक्षणानि ॥ च. शा. अ. ८–३४

हे सूतिकागार बांधताना वास्तुशास्त्रज्ञ (इंजिनीअर) यांचा विचार घेण्यास सांगितले आहे ते चिंतनीय आहे. प्रत्यक्ष प्रसवाची जागा ही सुश्रुताने त्यामानाने फार लहान सांगितली असली तरी सूतिकेला निवांतपणा मिळावा व स्वच्छता चांगली राखली जावी यासाठी ही खोली लहान असणे इष्ट आहे. अपत्य व सूतिका यांच्या उपयोगासाठी दोन वेगळ्या खाटा सांगितल्या आहेत. साधन-संभारामध्ये जातकर्माच्या दृष्टीने आणखीही काही वस्तू सूतिकागारामध्ये आधीच संग्रहित केल्या पाहिजेत.

पांढरी शुभ्र, स्वच्छ, मऊ अशी वस्त्रे वा या वस्त्रांचे मोठे चौकोनी तुकडे, स्वच्छ–निवडलेला–पिंजलेला कापूस, बळकट दोरा, स्वच्छ असे थंड आणि उष्ण जल ते साठविण्यासाठी सोईची निर्मल पात्रे, वारा घालण्यासाठी चांगला मजबूत पंखा वा सूप, प्राणप्रबोधनासाठी हुंगावयास देण्याकरिता कांदा, चुना, नवसागर, मद्य, मधु, सैंधव; पटबंधासाठी वस्त्रे असा संभार अवश्य सज्ज ठेवावा.

### [1] परिचारिका :

प्रसूती या वेळी आसन्नप्रसवेची परिचर्या करण्यासाठी चार परिचारिका असाव्यात. त्या स्त्रिया प्रौढ वयाच्या, मुले झालेल्या, निरोगी, प्रेमळ स्वभावाच्या, चतुर, कर्तव्यदक्षा, स्वच्छ, अनेक वेळा प्रसूतिकर्म केलेल्या–पाहिलेल्या, प्रसवाच्या वेळी करावयाच्या वेगवेगळ्या कर्मांचे चांगले ज्ञान असलेल्या अशा अनुभवी असाव्यात. त्यांचे वागणे, बोलणे आश्वासन देणारे व जिव्हाळ्याचे असावे. त्या व त्यांचे कपडे नीटनेटके, स्वच्छ व निर्मळ ( शस्तधाविता ) असावे. नखे काढलेली असावीत.

या परिचारिकांचा स्वभाव, विशेष रीतीने शांत व सोशिक असावा. त्यांची मुद्रा प्रसन्न असावी. कारण आसन्नप्रसवा ही अतिशय हळवी झालेली असते. तिचे मन व शरीर अतिशय पीडित व नाजूक स्थितीत असते. अशा अवस्थेत तिला धीर येईल व चिंता वाटणार नाही अशीच वागणूक तिच्याशी परिचारिकेने ठेवणे हे फार महत्त्वाचे आहे.

१ स्त्रियश्च बह्वयौ बहुशः प्रजाताः सौहार्दयुक्ताः सततमनुरक्ताः प्रदक्षिणाचाराः प्रतिपत्तिकुशलाः प्रकृतिवत्सलास्त्यक्तविषदाः क्लेशसहिन्योऽभिमताः ब्राह्मणाश्चाथर्ववेदविदः; यच्चान्यदपि तत्र समर्थं मन्येत, यच्चान्यच्च ब्राह्मणा ब्रूयुः स्त्रियश्च वृद्धास्तत् कार्यम् ॥ च. शा. अ. ८–३४

– चतस्रः स्त्रियः परिणतवयसः प्रजननकुशलाः कर्तितनखाः परिचरेयुरिति ॥ सु. शा. अ. १०–८

– प्रविशेयुः स्त्रियो वृद्धाः कुशलाः शस्तधाविताः । का. जातिसूत्रीय, पृ. ८४



### [1] सूतिकागारप्रवेश :

नववा महिना लागताच चांगला दिवस पाहून शुभमुहूर्तावर देवता व पवित्र वस्तू, विद्वान् ब्राह्मण यांना नमस्कार करून, त्यांचा आशीर्वाद घेऊन, गर्भिणीने सूतिकागारात प्रवेश करावा. त्याच ठिकाणी राहून प्रसवकालाची प्रतीक्षा करावी. थोडाही मलमूत्रावरोध वाटल्यास फलवर्तीसारख्या उपचारांनी अनुलोमन करावे.

## प्रसवकालावस्था

### प्रसव :

व्याप्ति : सर्व अंगप्रत्यंग परिपूर्ण झालेल्या जीवनक्षम अशा गर्भाचे ज्या वेळी अपत्यपथातून निष्क्रमण होते त्या या गर्भनिष्क्रमणक्रियेला प्रसव अशी संज्ञा आहे.

हा प्रसव काही स्त्रियांमध्ये ७ व्या महिन्यामध्ये झालेला आढळतो. तेव्हा त्यास अकाल प्रसव असे म्हणावे. बहुतांश स्त्रियांमध्ये हा प्रसव ९ वा महिना सुरू झाल्यापासून तो १० चांद्रमास पूर्ण होईपर्यंत (९ म. ९ दि.) या कालात झालेला आढळतो. त्यास प्रकृत प्रसव म्हणावे. क्वचित स्त्रियांमध्ये हा प्रसव १० चांद्रमास पूर्ण झाल्यानंतरही झालेला आढळून येतो त्यास कालातीत प्रसव म्हणावे.

प्रसवकाल जवळ आल्यापासून प्रत्यक्ष प्रसूती होईपर्यंत गर्भिणीच्या काही विशिष्ट अवस्था असतात. ग्रंथकारांनी त्या त्या अवस्थेला अनुलक्षून विशिष्ट नावेही दिली आहेत असे दिसते. या नावांना पारिभाषिक निश्चिती आहे की नाही हे निश्चित सांगता येत नसले तरी तसा प्रयत्न प्राचीन ग्रंथकारांनी केला असावा असे दिसते.

चरकाने विशेष असा कोणताही शब्द वापरलेला नाही. त्याने फक्त प्रजननकालाचे वर्णन करून त्यामध्ये सर्व अवस्थांमध्ये उत्पन्न होणारी लक्षणे दिली आहेत. आपापल्या इच्छेप्रमाणे या सर्व लक्षणांची वर्गवारी दोन-तीन वा चार अशा अवस्थांमध्ये योग्य त्या पद्धतीने वाटल्यास करावी.

१ ततः प्रवृत्ते नवमे मासे पुण्येऽहनि प्रशस्तनक्षत्रयोगमुपगते प्रशस्ते भगवति शशिनि कल्याणे कल्याणे च करणे मैत्रे मुहूर्ते शान्तिं हुत्वा गोब्राह्मणमग्निमुदकं चादौ प्रवेश्य गोभ्यस्तृणोदकं मधुलाजांश्च प्रदाय ब्राह्मणेभ्योऽक्षतान् सुमनसो नान्दीमुखानि च फलानीष्टानि दत्वोदकपूर्वमासनस्थेभ्योऽभिवाद्य पुनराचम्य स्वस्ति वाचयेत् । ततः पुण्याहशब्देन गोब्राह्मणं समनुवर्तमाना प्रदक्षिणं प्रविशेत् । तत्रस्था च प्रसवकालं प्रतीक्षेत ॥ च. शा. अ. ८–३५

– स्वल्पेऽपि च विण्मूत्रविबंधे फलवर्तीः प्रणिदध्यात् ॥ अ. सं. शा. ३–१५

सुश्रुतांनी प्रजायिनी, उपस्थितप्रसवा आणि प्रजनयिष्यमाणा अशा तीन संज्ञा वापरल्या आहेत. संग्रहकारांनी आसन्नप्रसवा व उपस्थितप्रसवा अशा दोन संज्ञा वापरल्या आहेत.

अष्टांगहृदयकार अद्यप्रसवा व उपस्थितगर्भा अशी दोन नावे देतात. तर भावप्रकाश-कारांनी आसन्नप्रसवा व प्रसवोत्सुका असे शब्द वापरले आहेत.

या सर्व वर्णनांचा विचार करता 'प्रजायिनी', 'उपस्थितप्रसवा' व 'प्रजनयिष्यमाणा' हे सुश्रुताचे वर्गीकरण योग्य आहे व त्याप्रमाणेच अवस्था कल्पिल्या पाहिजेत असे म्हणावे लागते. आम्ही त्याप्रमाणेच वर्गीकरण करून पुढे अवस्थांनुरूप वर्णन केले आहे.

**१. प्रजायिनी :** ( प्रसवपूर्व अवस्था )

**व्याप्ती :** कुक्षिबंध शिथिल झाल्यापासून तो आविप्रादुर्भाव होईपर्यंतचा काल किंवा गर्भाशयमुख विस्तृत होऊ लागेपर्यंतची अवस्था म्हणजे प्रजायिनी अवस्था होय.

ही प्रजायिनी अवस्था प्रत्यक्षामध्ये बहुतेक स्त्रियांमध्ये २–३ दिवसपर्यंत सापडते; तर काहींच्यात काही तास अशी सापडते. ज्या वेळी ही अवस्था गर्भिणीला ७ व्या किंवा ८ व्या महिन्यात येईल, त्या वेळी ती विकृती मानावी व ती जेणेकरून उपस्थित प्रसवेमध्ये प्रवेश करणार नाही अशी चिकित्सा वैद्याने द्यावी. ही अवस्था धातुक्षयजन्य वातविकृतीने उत्पन्न होते म्हणून अशा वेळी गर्भिणीला पूर्ण विश्रांती

– तयास्तु खल्विमानि लिङ्गानि प्रजनकालमभितो भवन्ति । तद्यथा क्लमो गात्राणां, ग्लानिराननस्य, अक्ष्णो शैथिल्यं, विमुक्तबन्धनत्वमिव वक्षसः, कुक्षेरवस्त्रंसनम्, अधोगुरुत्वं, वंक्षणबस्तिकटीकुक्षिपार्श्वपृष्ठनिस्तोदः, योनेः प्रस्रवणम्, अनन्नभिलाषश्चेति ततोऽनन्तरमावीनां प्रादुर्भावः प्रसेकश्च, गर्भोदकस्य ।।

च. शा. अ. ८–३६

– जाते हि शिथिले कुक्षौ मुक्ते हृदयबन्धने । सशूलजघने नारी ज्ञेया तु प्रजायिनी ।।

– तत्रोपस्थितप्रसवायाः कटीपृष्ठं प्रति समन्ताद्वेदना भवत्यभीक्ष्णं पुरीषप्रवृत्तिर्मूत्रं प्रसिच्यते योनिमुखाच्छ्लेष्मा च ।।

– प्रजनयिष्यमाणां कृतमङ्गलस्वस्तिवाचनां कुमारपरिवृतां पुन्नामफलहस्ता स्वभ्यक्तामुष्णोदकपरिषिक्तामथैनां सम्भृतां यवागूमाकण्ठात् पाययेत् ततः कृतोपधाने मृदुनि विस्तीर्णे शयने स्थितामाभुग्नसक्थीमुक्तानामशङ्कनीयाश्चतस्रः स्त्रियः परिणतवयसः प्रजननकुशलाः कर्तितनखाः परिचरेयुरिति ।। सु. शा. अ. १०–७,८

१ तत्रासन्नप्रसवायाः क्लमो ग्लानिर्मुक्तबंधने इवाक्षिणी निष्टीविका मूत्रपुरीषबाहुल्यंशिथिलकुक्षिताऽधोगुरुत्वमन्ननभिलाषो वेदनोदरहृदयकटीबस्तिवंक्षणेषु तोदभेदशूलस्फुरणस्रवणानि च योन्या भवंति । तदनंतरमावीनां प्रादुर्भावो गर्भोदकप्रवाहश्च ।। अ. सं. शा. ३–१६



देणे आवश्यक ठरते. त्याचबरोबर शतावरी, अश्वगंधा या द्रव्यांसारखी गर्भाशयाला बल देणारी द्रव्ये दुधाबरोबर द्यावीत. त्यामुळे अकाल प्रसूती टळते.

काही गर्भिणींमध्ये गर्भाशयमुखाच्या पेशीचे धारण करण्याचे जे कार्य ते योग्य रीतीने होत नाही. प्रकृत अवस्थेत जे गर्भाशयाचे मुख बंद असते व ते आवश्यक असते. ते या स्थितीमध्ये थोड्या प्रमाणात विस्तृत होऊ लागते. ही स्थिती गर्भिणीला जाणवतही नाही. अशा स्थितीत विश्रांती द्यावी. वायूच्या विकृत कार्यास सुरुवात होऊन अकाल प्रसूती होते. ती टाळण्यासाठी वैद्याने योनिपरीक्षा करून परिस्थिती सम्यक् ज्ञान प्राप्त करून वेळीच गर्भाशयमुख सूत्राने बांधून ठेवावे (संवृत करावे

या अवस्थेत विश्रांतीचे आसन पायाकडची बाजू उंच केलेली असावी. ते त्या बाजूस कॉटखाली ठोकळे ठेवून साधावी.

प्रत्यक्षात काही वेळा काही स्त्रियांमध्ये प्रजायिनी ही अवस्था न सापडता एकदम उपस्थितप्रसवेची लक्षणे दिसू लागतात. त्या स्त्रियांमध्ये सामान्यतः कटिविवर श्रोणी यांची संकुचितता सापडते व त्यामुळे त्या स्त्रियांमध्ये मूढगर्भ होण्याच्या शक्यतेचा विचार करून वैद्याने उपचार करावेत.



आकृती ४२ : अपत्यपथाची प्रकृत अवस्था योनिपरीक्षणाने अजमावणे

(१) गर्भशिर, (२) वैद्याच्या उजव्या हाताची बोटे. (३) भगास्थि, (४) त्रिकास्थि, (५) गुदास्थि, (६) वैद्याचा डावा हात.




आकृती ४३ : प्रकृत कटिविवराची मापे दर्शविण्यासाठी घेतलेला उभा छेद.




आकृती ४४ : प्रसवावस्थेत गर्भाचे कटिविवरातील मार्गक्रमणासाठी आवश्यक असलेली प्रकृत मापे.

१. गर्भ कटिविवरात प्रविष्ट होण्यासाठी माप
२. „ „ तून मार्गस्थ „ „
३. „ „ तून निष्क्रमण „ „





आकृती ४५ : प्रकृत व विकृत कटिराचे प्रत्यक्षात सापडणारे प्रकार :
१. प्रकृत कटिर; २, ३, ४. विकृत कटिर.

**लक्षणे :**

[1]अवयव गळून गेले आहेत असे वाटते. मुद्रा उतरते. डोळे शिथिल होतात. त्यावर झापड असते. गर्भिणीच्या हृदयापासून गर्भ खाली सरकल्यामुळे त्या ठिकाणी मोकळे-पणा जाणवतो. कुशीमध्येही शिथिलता जाणवते गर्भाचे डोके कटिप्रदेशामध्ये शिरून बसल्यामुळे अधोदरामध्ये जडपणा वाटतो. वंक्षण, बस्ती, कटी, अधःकुक्षी, अधःपार्श्व, अधःपृष्ठ या भागी शूल होतो. स्फुरण होते. तोद, भेद, स्फुरण, शूल इत्यादी वेदना योनिभागी विशेष जाणवतात. पुनःपुनः मलमूत्रप्रवृत्ती होते.

**गर्भाचे आसन :**

(१) वामः मातुःपृष्ठाभिमुख आभुग्न अवाक्शिरः
(२) दक्षिण मातुःपृष्ठाभिमुख आभुग्न अवाक्शिरः
(३) वामः मातुः उदराभिमुख आभुग्न अवाक्शिरः
(४) दक्षिण मातुः उदराभिमुख आभुग्न अवाक्शिरः

— जाते हि शिथिले कुक्षौ मुक्ते हृदयबन्धने ।
सशूले जघने नारी विज्ञेया प्रसवोत्सुका ।।
आसन्नप्रसवायास्तु कटिपृष्ठं तु सव्यथम् ।
भवेन्मुहुः प्रवृत्तिश्च मूत्रस्य च मलस्य च ।। भा. प्र., पूर्वखंड पृ. ४१

या आसनांचे परीक्षण खालील प्रकारे करावे.

**गर्भपरीक्षण** ( आसनानुरूप ) :

१. वाम – डाव्या बाजूस; दक्षिण—उजव्या बाजूस. ( मातेच्या उदराच्या अपेक्षेने घ्यावीत.)

२. मातुः पृष्ठाभिमुख – म्हणजे गर्भाचे तोंड, उरोभाग, उदरभाग हे मातेच्या पाठीकडे वळलेले असतात. प्रत्यक्षामध्ये बालकाचे तोंड परीक्षकास हाताने स्पर्शगम्य नसते तर बालकाचे शिर विशेषतः पश्चात तालूचा भाग हा मातेच्या उदरपरीक्षणावरून स्पर्शगम्य असतो. म्हणून ज्या वेळी बालक मातुःपृष्ठाभिमुख असेल त्या वेळी बालकाची पश्चात् तालू निश्चित करून पाहावी व त्याचबरोबर गर्भाचा पृष्ठवंश मातेच्या उदरपरीक्षणावरून वाम वा दक्षिण बाजूस निश्चित असल्याचा पहावा. त्याचबरोबर गर्भाचे हृद्स्पंद पृष्ठवंशावरून नलिकायंत्राच्या साहाय्याने किंवा साक्षात कानाने ऐकावेत.

ही पृष्ठाभिमुखता वाम वा दक्षिणभागी जशी असेल त्याप्रमाणे गर्भाचे आसन समजावे.

३. आभुग्नता – आभुग्नः संकुचितांगः । संकुचितांग या वचनानुसार शिर, हस्तपाद पृष्ठवंश या शरीरावयवांमध्ये संकुचित अभिप्रेत आहे. प्रत्यक्षामध्ये ही संकुचितता गर्भशिर, पृष्ठवंश, व गर्भाचे हस्तपाद यांच्या ठिकाणी असते. स्पर्शाने परीक्षणावरून वैद्याने समजून घ्यावी.

४. अवाक् शिर – गर्भ शिर हे मातेच्या अधोदरामध्ये प्रविष्ट झालेले असते व या गर्भाच्या स्थितीला अवाक् शिर असे म्हणतात.

५. मातुः उदराभिमुख – गर्भाचे तोंड, उरोभाग, हस्तपाद हे मातेच्या उदराकडे वळलेले असतात. प्रत्यक्षामध्ये गर्भाचा पृष्ठवंश हा मातेच्या वामपार्श्वामध्ये किंवा दक्षिणपार्श्वामध्ये स्पर्शगम्य असतो व गर्भहृद्स्पंद पृष्ठवंशाबरोबरच पार्श्वामध्येच नलिकायंत्राच्या साहाय्याने किंवा साक्षात कानाने ऐकावेत.

**गर्भिणीपरीक्षण :**

या अवस्थेत गर्भिणीची सर्व स्रोतस् परीक्षा वैद्याने काळजीपूर्वक करावयाची असते.

गर्भिणीपरीक्षण करताना गर्भशिर हे कटिरामध्ये प्रविष्ट होणे आवश्यक असते. परंतु बहुप्रसवेमध्ये ते या अवस्थेत कटिरात प्रविष्ट होईलच असे नाही. तर ते उपस्थितप्रसव या अवस्थेत प्रविष्ट झालेले दिसून येते.

## २. उपस्थितप्रसवा :

**व्याप्ति :** आवीप्रादुर्भावापासून तो गर्भ गर्भाशयमुखात प्रविष्ट होईपर्यंतची अवस्था म्हणजेच उपस्थित प्रसवा ही अवस्था होय.



**लक्षणे :**

या अवस्थेत अन्नावरील वासना नष्ट होते. कटिपृष्ठादींत वेदना वाढतात व आवी सुरू होतात. कटिशूल हे प्रामुख्याने रुग्णेस जाणवते. गर्भाशयमुख थोडे थोडे विस्तृत होऊ लागते. योनिमुखातून श्लेष्मल द्रवाचा स्राव सुरू होतो. या स्रावावरून[1] 'स्त्रीला' पुत्रप्राप्ती होणार की कन्याप्राप्ती होणार याचा अंदाज करता येतो. तो असा की, ज्या वेळी हा श्लेष्मल स्राव गुळवेलीच्या रसाप्रमाणे वर्णाचा व अल्प प्रमाणात असून जास्त पिच्छिल असतो तेव्हा पुत्रप्राप्ती होणार असा अंदाज करावा. तर हाच स्राव कुसकरलेल्या पळसाच्या फुलाप्रमाणे (किंशुकोदक) असल्यास त्या स्त्रीला कन्याप्राप्ती होणार असे समजावे.

या अवस्थेमध्ये आभुग्न स्थितीत असलेला गर्भ आणखीच संकुचित अंग करून, विस्तृत झालेल्या गर्भाशयमुखात शिरून कटिविवरात (अपत्यपथात) प्रविष्ट होतो. या वेळी योनिपरीक्षा केली असताना गर्भाशयमुखाची विस्तृती झालेली आढळते व त्यामधून गर्भोदकाने पूर्ण भरलेले उल्ब हातास लागते.

**गर्भपरीक्षण :**

(१) गर्भ आभुग्न स्थितीत असतो.

(२) गर्भ अव्यावृत होतो. (अधिक संकुचित होतो.)

(३) गर्भशिर हे मातेच्या कटिरामध्ये शिरण्यास योग्य अशा व्यासाचे बनते. ते बनत असताना कपालास्थि योग्य त्या प्रमाणात एकमेकावर चढतात.

[2]**उपचार :** या अवस्थेमध्ये आरंभी सर्वांगास स्वेदन करून उष्णोदकाने स्नान घालावे व घृतयुक्त यवागू प्यावयास द्यावी. काही मद्य द्यावे असे म्हणतात व ते योग्य आहे. थोडे थोडे चंक्रमण करावयास सांगावे (शतपावली). जांभया आणाव्यात. (तोंड उघडून जोराने खोल श्वास घ्यावा) कुष्ठ, वेलदोडे, कळलावी, वेखंड, चवक, चित्रक, चिरफळ यांचे चूर्ण हुंगावयास द्यावे, भूर्जपत्र, शिसवी, राळ यांपैकी एखाद्याचा धूम द्यावा.

पार्श्व, पृष्ठ, कटी, मांड्या या भागांस गरम तेलाने अभ्यंग करून सुखकर होईल असे पीडन करावे. त्यामुळे आवी वाढतात व प्रसूती सुलभ होते. चंक्रमण किंवा चूर्णाचे अवघ्राणन किंवा स्नेहाने मर्दन करणे या गोष्टी आलटूनपालटून कराव्यात.

१ तन्त्रीवर्णोऽल्पशः स्रावः पिच्छिलः पुत्रजन्मनि ।
किंशुकोदकसंकाशः पुत्रिकाजन्म शंसति ॥ का. सं. शा. पृ. ८५

२ अथैनामुपस्थितगर्भां कृतकौतुकमंगलां पुन्नामफलहस्तां स्वभ्यक्तामुष्णोदकपरिषिक्तां सघृतां यवागूं पाययेत् ॥ अ. सं. शा. ३–१७

काहींनी आवी चांगल्या येण्यासाठी धान्य उखळामध्ये घालून मुसळाने कांडण करावे असे सांगितले आहे. पण ते या अवस्थेत मुळीच योग्य नाही. गर्भिणीला श्वासोत्पादक व्यायाम हा नेहमीच वर्ज्य सांगितला आहे. प्रसवाच्या वेळी तर असा व्यायाम विशेष करून त्याज्य मानला पाहिजे. स्त्रीची स्थिती या वेळी फार नाजूक झालेली असते. तिचे सर्व धातू व दोष प्रचलित (शिथिल) झालेले असतात. अशा स्थितीत मुसळ घेऊन धान्य कांडण्याचा व्यायाम जर तिने केला तर त्या श्रमाने प्रकुपित झालेला वायू हृदयामध्ये शिरून प्राणाचा उपघात केल्याशिवाय राहणार नाही. म्हणून, जृंभण, चक्रमण एवढीच हालचाल गर्भिणीकडून करवावी. यापेक्षा अधिक वर्ज्य मानावे.

[1]आवी येऊ लागल्या की जमिनीवरच मऊ असे अंथरुण घालून गर्भिणीस त्यावर

– सा चेदावीभिः संक्लिश्यमाना न प्रजायेतार्थैनां ब्रूयात् उत्तिष्ठ, मुसलमन्यतरं गृह्णीष्व, अनेनैतदूलूखलं धान्यपूर्णं मुहुर्मुहुरभिजहि अव जृम्भस्व चङ्क्रमस्व चान्तराऽन्तरेति; एवमुपदिशन्त्येके । तन्नेत्याह भगवानात्रेयः । दारुणव्यायामवर्जनं हि गर्भिण्याः सततमुपदिश्यते, विशेषतश्च प्रजननकाले प्रचलितसर्वधातुदोषायाः सुकुमार्या नार्या मुसलव्यायामसमीरितो वायुरन्तरं लब्ध्वा प्राणान् हिंस्यात्, दुष्प्रतीकारतमा हि तस्मिन् काले विशेषेण भवति गर्भिणी; तस्मान्मुसलग्रहणं परिहार्यमृषयो मन्यन्ते, जृम्भणं चङ्क्रमणं च पुनरनुष्ठेयमिति । अथास्यै दद्यात् कुष्ठेलालाङ्गलिकीवचाचित्रककचिरबिल्वचव्यचूर्णमुपघ्रातुं, सा तन्मुहुर्मुहुरुपजिघ्रेत् तथा भूर्जपत्रधूमं शिंशपासारधूमं वा । तस्याश्चान्तराऽन्तरा कटीपार्श्वपृष्ठसक्थिदेशानीषदुष्णेन तैलेनाभ्यज्जानुसुखमवमृद्गीयात् । अनेन कर्मणा गर्भोऽवाक् प्रतिपद्यते । च. शा. अं., ८–३८.

– अथास्यै दद्यात्कुष्ठैलालांगलीवचाचव्यचित्रकचिरबिल्वचूर्णमुपाघ्रातुं मुहुर्मुहुः । तथा भूर्जपत्रींशिंशिपासर्जरसान्यतमधूममन्तरान्ततरा च पार्श्वपृष्ठकटी सवीक्थ देशान्कोष्णेन तैलेनाभ्यज्यानुसुखमस्या मृद्‌गीयात् । एवमवाक् परिवर्तते गर्भः ।
—अ. सं. शा., अ. ३–१९

– तस्य लक्षणं विमुच्य हृदयमुदरमाविशति बस्तिशिरोऽवगृण्हाति त्वरयंत्येनामाव्यः । अ. सं. शा. ३–२०

– न चेदेवं परिवर्तते ततो मुहुर्मुहुर्जुभणं चंक्रमणं च कारयितव्यमनंतरोक्तं विधिम् । अन्ये तु मुसलेनोलूखलं धान्यपूर्णमाहननीयमित्याहुः । तत्तु न सम्यक् । दारुणव्यायामवर्जनं हि गर्भिण्याः सततमुपदिष्यते । विशेषतश्च प्रसवकाले प्रचलितसर्वधातुदोषायाः सौकुमार्यत्वान्नार्या मुसलव्यायामेनेरितो वायुरंतरं लब्ध्वा प्राणान् हिंस्यादिति ॥ अ. सं. शा. ३–२१ ते २३

१ आवी प्रादुर्भावे तु भूमौ शयनं विदध्यान्मृद्वास्तरणोपपन्नम् । तदध्यासीत सा । तां ततः समन्ततः परिवार्य यथोक्तगुणाः स्त्रियः पर्युपासीरन्नाश्वासयन्त्यो वाग्भिर्ग्राहिणीयाभिः सान्त्वनीयाभिश्च । च. शा. अ. ८–३७



बसवावे. परिचारिकेने तिच्याभोवती राहून तिची परिचर्या करावी. तिचे सांत्वन करावे. तिला आश्वासन वाटेल, धीर येईल अशा तऱ्हेने बोलणे करावे.

काश्यपांनी या प्रकरणी तर जृंभण व चंक्रमणही मुसलाघाताइतके वर्ज्य करण्यास सांगितले आहे. ते म्हणतात—

केचिदस्यमवस्थायां व्यायामं मुसलादिकम् ।
जृंभाचंक्रमणाद्यं च भिषजो ब्रुवते हितम् ॥ का. सं. शा. पृ. ८५

प्रसवकालामध्ये स्त्री ही इतक्या नाजूक स्थितीमध्ये असते की, तिचे दुःख पाहून अनुभवी स्त्रिया एकमेकींमध्ये तिचा एक पाय मृत्युलोकी तर दुसरा पाय यमलोकी आहे अशा अर्थाचे चिंतायुक्त बोलणे करीत असतात. अशा नाजूक स्थितीमध्ये मुसलाघात तर नाहीच पण चंक्रमणही वर्ज्य मानावे, हे म्हणणे योग्य आहे.

## आवी :

आवी येणे हे जरी वेदनायुक्त असले व वेदना क्वचित अतिशय तीव्र असल्या तरी प्रसवाच्या दृष्टीने ती एक स्वाभाविक व प्रकृत अशी अवस्था आहे. गर्भाशयातून गर्भाला पुढे ढकलण्याचे जे अपान वायूचे कार्य त्याचा आरंभ झाल्याचे व चालू असल्याचे आवी हे लक्षण आहे; ते अपरापतनापर्यंत व्यक्त होत असते.

प्रत्यक्षात प्रत्येक आवीबरोबर गर्भाशयाचे (तृतीय आवर्ताचे) आकुंचन होते व त्यामुळे गर्भाशयाच्या मुखाचे विस्तृतीकरण होऊन गर्भ गर्भाशयमुखातून खाली ढकलला जातो. या आवी प्रसव सुरू झाला असताना प्रथम अतिशय मंद स्वरूपात येत असतात म्हणजेच दोन आवींमधील अंतर हे जवळ जवळ अर्ध्या तासाचे सापडते. व ती अर्धा मिनिटपर्यंत टिकते. जसजसा प्रसवकाल जवळ येत जाईल तसे तसे या दोन आवींमधील अंतर कमी कमी होत जाते व कळ टिकण्याची मर्यादा वाढत जाते. प्रसवाच्या सुरुवातीस येत असलेल्या आवींमुळे गर्भ हा कटिरामध्ये जास्तीत जास्त शिरतो व प्रसवाच्या वेळी प्रत्येक आवीबरोबर स्त्रीला स्वभावतःच प्रवाहण करण्याची संवेदना होऊन ती आपोआप प्रवाहण करू लागते. ही क्रिया गर्भशिराचे निष्क्रमण होण्यापूर्वी थोडा वेळ म्हणजेच सुमारे अर्धा तास झालेली आढळते. त्याच वेळी मलमूत्रविसर्जनही होत असलेले आढळते.

– ततः सुरक्तार्षभचर्मप्रच्छदे मृदुनि भूमिशयने शयानामुत्तानामाभुग्नसक्थिपृष्ठामहतवाससोऽशंकनीया, प्रियदर्शनाः परिणतवयसः प्रजननकुशलाः प्रगल्भा कृत्तनखाः स्त्रियः सूतिकां सूनृताभिर्वाणीभिराश्वासयंत्यः पर्युपासीरन् । अ. सं. शा. ३–१८

– अव्यावृते स्त्रिया गर्भे विवृते चापरामुखे ।
ग्राहीषु वर्तमानासु सा विवर्तेत गर्भिणी ॥ का. सं. शा. पान ८५

– न तीक्ष्णं ग्राहिशूलेषु क्षिप्रं नारी प्रजायते ।
विलम्बिताभिरावीभिर्गर्भः क्लेशयते स्त्रियम् ॥ का. सं. शा. पृ. ८५

या काळात आवीमधील अंतर केवळ १ ते २ मिनिटपर्यंत झालेले आढळून येते.

आवीचा शूलाशी संबंध नाही. वेदनांच्या दृष्टीने थोडेसे सादृश्य असले तरी आवीचा वेग असतो व त्या थांबून थांबून येत असतात. यासाठी त्या येतील त्या वेळीच कुंथावे व आवीचा वेग नसताना बळाने कुंथून त्या उत्पन्न करू नयेत असे मुद्दाम सांगितले आहे. तसेच वायूचे अनुलोमन करणाऱ्या उपचारांनी आवी वाढतात; उलट या उपचाराने शूल नाहीसा होतो. आवी प्रादुर्भावासाठी समीरपन्नग, पोटातून एरंडस्नेह यांसारखी औषधे व बस्ती असे उपचार करण्याची पद्धती आहे. या उपचारांनी मंदावलेल्या वा थांबलेल्या आवी वाढतात.

| आवी | शूल |
|---|---|
| (१) नियमित असतात व नियमित प्रमाणातच पुढे पुढे वाढतात. | (१) शूल सातत्याने असून अनियमित असतो. |
| (२) कोणत्याही उपचाराने थांबत नाहीत. | (२) उपचाराने शूल शमन पावतो. |
| (३) आवीचे कार्य दिसून येते. | |
| (४) आवी प्रकृत आहे. | (४) शूल ही विकृती आहे. |
| (५) आवीचे कार्य संपल्यावर त्या नाहीशा होतात. | |
| (६) बस्तीनंतर आवी वाढतात. | (६) बस्तीनंतर शूल कमी होतो. |
| (७) आवी उदरावरून स्पर्शगम्य असतात. | (७) स्पर्शासहत्व असते. |

प्रत्यक्षात गर्भिणीमध्ये तीव्र शूल असताना गर्भिणी-मक्कल व गर्भिणी-उदावर्त हे रोग संभवतात.

काही गर्भिणींमध्ये प्रजायिनी अवस्थेमध्ये आवी सुरू होऊन बस्ती दिल्यानंतर आवी संपूर्णपणे थांबलेल्या आढळतात; व पुढे एक-दोन दिवसांत किंवा क्वचित वेळी एक आठवड्यानेसुद्धा प्रसव सुरू होतो.

प्रत्यक्षात योनिपरीक्षा केली असता प्रथम प्रसवेमध्ये गर्भाशयमुखाची विस्तृती एक अंगुळ असेल तर तिच्यामध्ये प्रसव सुरू झाला आहे असे म्हणावे. परंतु बहुप्रसवेमध्ये पुष्कळ वेळा द्वितीय आवर्ताच्या शैथिल्यामुळे प्रसव सुरू नसतानासुद्धा गर्भाशयमुख हे एक ते दोन अंगुळेपर्यंत विस्तृत असलेले आढळते.

काही वेळा उपस्थित प्रसवेमध्ये आवी स्थगित झालेल्या आढळतात व त्यामुळे बालकाची व मातेची विपन्नावस्था आढळते. अशा वेळी वैद्याने बालक व माता या दोघांचाही विचार करून उदरपाटनपूर्वक प्रसव करण्याचा निर्णय घ्यावा.



अशा ठिकाणी स्थगित झालेल्या आवींची कारणे पुढीलप्रमाणे दिसून येतात. गर्भोपद्रव—पांडु, शोथ.

## गर्भोदक

**व्याख्या :**

गर्भावस्थेमध्ये गर्भ व उल्व या दोहोंच्यामध्ये जो द्राव सातत्याने असतो त्यास गर्भोदक असे म्हणतात :

याची उत्पत्ती दुसऱ्या महिन्यापासून झालेली आढळते.

**कार्य :**

काही प्रमाणात हे गर्भाच्या वाढीस उपयुक्त असे ठरते. ज्या वेळी गर्भ हा एक मांसाचा गोळा असतो त्या वेळी गर्भाला उदरामधील इतर अवयवांपासून इजा न होता संरक्षण मिळते. गर्भावर गर्भोदकामुळे मातेच्या आहारविहाराचा आघात होत नाही. गर्भोदकामुळे वर्धमान असणाऱ्या गर्भाशयाला एक विशिष्ट आकार कायम ठेवण्यास मदत होते. कारण गर्भाशयामध्ये गर्भ हा चांगल्या तऱ्हेने वाढावयाचा असतो.

गर्भधारणेपासून पहिले चार महिनेपर्यंत गर्भाच्या अपेक्षेने गर्भोदक जास्त प्रमाणात (अंदाजे गर्भाच्या ३–४ पट) असते. चार महिन्यांनंतर मासानुमासिक गर्भाची वाढ होत असताना हे प्रमाण गर्भाच्या अपेक्षेने कमी सापडते. ९ व्या महिन्यामध्ये गर्भ संपूर्ण वाढ झालेला असेल त्या वेळी हे प्रमाण १–२ लिटर सापडते. कालातीत गर्भिणीमध्ये गर्भोदकाचे प्रमाण यापेक्षा खूपच कमी आढळते. प्रमेही गर्भिणी किंवा यमगर्भ असताना हे प्रमाण प्राकृत प्रमाणापेक्षा २–३ पट सापडते. म्हणजेच अतिगर्भोदकाची अवस्था प्राप्त होते.

ज्या वेळी गर्भोदकाचे प्रमाण जास्त असते, त्या वेळी गर्भस्राव-पात वा अकालप्रसव होण्याची जास्त शक्यता असते.

या गर्भोदकाचा गर्भाच्या त्वचेवर परिणाम झालेला आढळतो. हा परिणाम गर्भोदकातील दोषाधिक्यावर अवलंबून राहतो. या गर्भोदकामध्ये गर्भाचे मल-मूत्र विसर्जन झालेले आढळते. या गर्भोदकाच्या वर्णावरून दोषांचे आधिक्य ठरविता येते.

| गर्भोदकाचा रंग | दोषांचे आधिक्य | प्रकृती |
|---|---|---|
| कृष्ण | वाताधिक्य | वात |
| पीत | पित्ताधिक्य | पित्त |
| श्वेत | कफाधिक्य | कफ |

## ३. प्रजनयिष्यमाणा :

**व्याप्ती :** गर्भ गर्भाशयमुखात आल्यापासून तो प्रसूती होऊन अपरापतनापर्यंतची अवस्था.

### गर्भिणी तपशील :

गर्भ गर्भाशयमुखात येऊन गर्भाशयाचे मुख पूर्णपणे विस्तृत झाले की त्या स्त्रीस पर्यंकावर (प्रसवपीठ) उताणे निजवावे. पाय पोटाशी घेण्यास सांगावे. ते इतके की स्फिक् भागावर टाचा याव्यात. कुशल स्त्रियांनी तिच्या पायगती होऊन कोष्ण तैलाने योनीचे पुनः पुनः अभ्यंजन करावे व तिला येणाऱ्या आवींच्या जोडीने हळूहळू कुंथण्यास सांगावे. आवी नसतील त्या वेळी 'कुंथू नको, विश्रांती घे' अशी जाणीव परिचारिकेने मुद्दाम करून द्यावी. अयोग्य वेळी कुंथले असता वा आवी येत असता कुंथले नाही तर वेगोदीरणाधारणातील दोष उत्पन्न होऊन गर्भावर त्यांचे परिणाम विकृत होतात. या वेळी निरनिराळ्या सांत्वनपर शब्दांनी तिला आश्वासन देऊन धीर येईल असे करावे. चरकादींनी सांगितलेले मंत्रोपचारही श्रद्धा असतील तर करावे.



आ. ४६ : प्रसवासन

गर्भ ज्या वेळी अगदी गर्भाशयमुखाशी येऊन फिरतो वा योनिमुखात येतो, त्या वेळी आणखी जोराने कुंथण्यास सांगावे. काही वेळा या अवस्थेमध्ये स्त्रीला उताण्या स्थितीऐवजी उकिडवे बसवून कुंथण्यास सांगितले असता कुंथण्याकरिता जोर मिळतो व प्रसूती सुलभ होते. पण या स्थितीत स्त्रीस अत्यावश्यक अशी विश्रांती मिळत नाही व योनिभागावर ताण अधिक पडतो. त्यामुळे उत्तान-शयनच अधिक चांगले. या विकल्पामुळे प्रसवासन कसे असावे ते परिस्थिती पाहून ठरवावे.

प्रसूती होत असताना बालकाविषयी चांगल्या गोष्टी तिला ऐकवाव्यात. त्यामुळे तिला आनंद होऊन तिच्या बळाचे रक्षण चांगले होते.

( अप्रतिलोमं ) प्रांजलमाकर्षेत ।

सु. शा. १०–१०



प्रत्यक्षामध्ये गर्भनिष्क्रमण होत असताना दोन आवींमध्ये गर्भिणीला ग्लानी हे लक्षण आढळते. त्या वेळी परिचारिकेने तिला स्वस्थ झोपू द्यावे. अथवा झोपण्यास सांगावे. ह्यामुळे रुग्णेस विश्रांती मिळून, पुढील आवी आली असताना प्रवाहणास जोर सापडतो.

ग्लानीबरोबरच गर्भिणीला अतिस्वेद, ऊरुकंप, तृष्णा ही लक्षणे प्रसूती जवळ आल्याचे सूचित करतात.

### गर्भनिष्क्रमण तपशील :

(१) गर्भशिराचे परिवर्तन

- स यदा जानीयाद्विमुच्य हृदयमुदरमस्यास्त्वाविशति, बस्तिशिरोऽवगृह्णाति त्वरयन्त्येनामाव्य; परिवर्ततेऽधो गर्भ इति । अस्यामवस्थायां पर्यङ्कमेनामारोप्य प्रवाहयितुमुपक्रमेत । कर्णे चास्या मन्त्रमिममनुकूला स्त्री जपेत् ।
  क्षितिर्जलं वियत्तेजो वायुर्विष्णुः प्रजापतिः ।
  सगर्भां त्वां सदा पांतु वैशल्यं च दिशन्तु ते ॥
  प्रसूष्व त्वमविक्लिष्टमविक्लिष्टा शुभानने ।
  कार्तिकेयद्युतिपुत्रं कार्तिकेयाभिरक्षितम् ॥
  ताश्चैनां यथोक्तगुणाः स्त्रियोऽनुशिष्युः– अनागतावीर्मा प्रवाहिष्ठाः या ह्यनागतावीः प्रवाहते व्यर्थमेवास्यास्तत् कर्म भवति, प्रजा चास्या विकृता विकृतिमापन्ना च, श्वासकासशोषप्लीहप्रसक्ता वा भवति । तथा हि क्षवथूद्गारवातमूत्रपुरीषवेगान् प्रयतमानोऽप्यप्राप्तकालान्न लभते कृच्छ्रेण वाऽप्यवाप्नोति, तथाऽनागतकालं गर्भमपि प्रवाहमाणा । यथा चैषामेव क्षवथ्वादीनां सन्धारणमुपघातायोपपद्यते, तथा प्राप्तकालस्य गर्भस्याप्रवाहणमिति । सा यथानिर्देशं कुरुष्वेति वक्तव्या स्यात् । तथा च कुर्वती शनैः पूर्वं प्रवाहेत, ततोऽनन्तरं बलवत्तरम् । तस्यां च प्रवाहमाणायां स्त्रियः शब्दं कुर्युः "प्रजाता प्रजाता धन्यं धन्यं पुत्रं" इति । तथाऽस्या हर्षेणाप्याय्यन्ते प्राणाः ॥

च. शा. अ. ८–३९, ४०

- अथास्या विशिखान्तरमनुलोममनुसुखमभ्यज्यानुब्रूयाच्चैतामेका—सुभगे प्रवाहस्वेति, नचाप्राप्तावी प्रवाहस्व, ततो विमुक्ते गर्भनाडीप्रबंधे सशूलेषु श्रोणिवङ्क्षणबस्ति शिरः सु च प्रवाहेथाः शनैः शनैः (पूर्वं), ततो गर्भनिर्गमे प्रगाढं, ततो गर्भे योनिमुखं प्रपन्ने गाढतरमाविशल्यभावात् अकालप्रवाहणाद्बधिरं मूकं कुब्जं व्यस्तहनुमूर्ध्वाभिघातिनं कासश्वासशोषोपद्रुतं विकटं वा जनयति ॥
- तत्र प्रतिलोममनुलोमयेत् । सु. शा. अ. १०–९, १०
- अथ परिवृत्तगर्भां पर्यंकमेनामारोप्य कुशला स्त्री पादतोऽस्या निषण्णाया योनिमनुलोममनुसुखमभ्यज्य स्फिचौ पादाभ्यां पीडयेत् ॥ योनिं च पुनः पुनः प्रसारयेत् (प्रसाधयेत् ) ॥ ब्रूयाच्च सुभगे: शनैः शनै प्रवाहयस्व सुप्रसन्नस्ते मुखवर्णः पुत्रं जनयिष्यसीति ॥




आ. ४७ : १ : प्रसव होत असताना कटिरातील गर्भशिराचे अंतःपरिवर्तन.

१. गर्भशिराची पश्चात् तालु. २. गर्भशिराची उभी सीवनी.

अ. वामः मातुः पृष्ठाभिमुख आभुग्न अवाक्शिरः

ब. दक्षिण मातुः पृष्ठाभिमुख अवाक्शिरः

या दोन्ही गर्भाच्या आसनांतील गर्भशिराचे अंतःपरिवर्तन अनुक्रमे वामतः किंवा दक्षिणतः भगास्थीकडे १/८ इतके होते. म्हणजेच आ. अ वा ब मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे गर्भशिर असता प्रसव होताना त्याचे अंतःपरिवर्तन आ. क मध्ये दर्शविल्याप्रमाणे होते, व नंतर गर्भशिराचे निष्क्रमण होते.

या पद्धतीने पुढे गर्भाच्या अंसाचेही अंतःपरिवर्तन होऊन गर्भनिष्क्रमण होते.




आ. ४७ : २ प्रसव होत असताना कटिरातील गर्भशिराचे अंतःपरिवर्तन.

१. गर्भशिराची पश्चात् तालु. २. गर्भशिराची उभी सीवनी.

अ. वाम मातुः उदराभिमुख आभुग्न अवाक्शिरः ।

ब. दक्षिण मातुः उदराभिमुख आभुग्न अवाक्शिरः ।

या दोन्ही गर्भाच्या आसनांतील गर्भशिराचे अंतःपरिवर्तन अनुक्रमे वाम वा दक्षिणतः भगास्थीकडे प्रथम ३/८ इतके होते. म्हणजेच आ. अ वा ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे गर्भशिर असता प्रसव होत असताना त्यांचे अंतःपरिवर्तन आ. क वा ड मध्ये दर्शविल्याप्रमाणे होते. तसे पुढे भगास्थीकडे वाम वा दक्षिणतः आणखी १/८ इतके परिवर्तन आ. इ मध्ये दर्शविल्याप्रमाणे होते. म्हणजेच एकूण ३/८ इतके गर्भशिराचे अंतःपरिवर्तन होऊन मग गर्भशिराचे प्राकृतरीत्या निष्क्रमण होते.

याच पद्धतीने पुढे गर्भाच्या अंसाचेही अंतःपरिवर्तन होऊन गर्भनिष्क्रमण होते.

(२) उन्नमन

(३) पुन्हा गर्भशिराचे परिवर्तन.

(१) गर्भशिराचे परिवर्तन– ह्या अवस्थेमध्ये आवी वारंवार येत असतात व आवींमुळे गर्भ हा विस्तृत झालेल्या गर्भाशयमुखातून खाली ढकलण्याचे काम चालू असते. प्रथम गर्भोदकस्रुती होऊन गर्भशिरापुढील असलेले गर्भोदक योनीतून जोराने बाहेर टाकले जाते व त्याच वेळी गर्भशिराचे प्रथम आवर्तामध्ये योग्य त्या प्रमाणात परिवर्तन होते. ह्या परिवर्तनामुळे गर्भाच्या मानेला अल्प प्रमाणात पीळ पडलेला सापडतो.

(२) उन्नमन– परिवर्तन झालेले गर्भाचे शिर पुढील आवींमुळे व स्त्रीच्या प्रवाःहणामुळे योनिमुखातून गर्भशिर बाहेर पडण्यासाठी म्हणून आभुग्न स्थितीत असलेल्या शिराचे उन्नमन होऊन गर्भशिर बाहेर पडते.

(३) यानंतर येणाऱ्या आवीच्या वेळी गर्भशिराचे मातेच्या मांडीकडे (ऊरु) बाह्य परिवर्तन होते. त्याच वेळी प्रथम आवर्तामध्ये गर्भाच्या अंसाचेही गर्भशिराएवढेच परिवर्तन झालेले असते. या वेळीच मानेला पडलेला पीळ सुटतो.

अशा तऱ्हेने प्रथम गर्भशिर, नंतर गर्भाचे अंस व त्यानंतर उदर, कटी क्रमाने बाहेर येतात.

— यदा गर्भोदकं योनौ सशूलं संप्रवर्तते ।
कालेन चोदितो गर्भो विमुच्य हृदयोदरम् ॥
बस्तिशीर्षमधोभागमवगृह्णाति जन्मनि ।
ग्लानिश्च जायतेऽत्यर्थं योन्युत्पीडनभेदनम् ॥
इत्येतैः कारणैर्विद्याद्गर्भस्य परिवर्तनम् ।

१ अथास्याः प्रसवश्चेति ततः पर्यङ्कमारुहेत् ॥ का. सं. शा. पृ. ८६

— अन्या तु वामकर्णेऽस्या मन्त्रमिमं जपेत् —
इहामृतं च सोमश्च चित्रभानुश्च भामिनी ॥
उच्चैःश्रवाश्च तुरगो मंदिरे निवसन्तु ते ।
इदममृतपां समुद्धृतं वै तव लघु गर्भमिमं प्रमुंचतु स्त्रि ।
तदनलपवनार्कवासवास्ते सह लवणांबुधरैर्दिशंतु शांतिमिति ॥
तथा पराऽनुशिष्यात् ॥
अनागतायां वेदनायां मा प्रवाहिष्ठाः। अकालप्रवाहणं हि विण्मूत्रादिवेगानामिवोदीरणमनर्थकरमहितं च गर्भस्य श्वासकासशोषकुब्जतादिकारित्वात् ॥...तथाऽस्या हर्षेण प्राणा आप्याय्यंते ॥ अ. सं. शा. ३-२४, २५, २६, २७, २८






आ. ४८ : (१) भगास्थि (२) त्रिकास्थि (३) गर्भशिर



आ. ४९ : गर्भशिराचे अंत.परिवर्तन

## प्रसूतीच्या वेळी गर्भोदकाचे कार्य

(१) गर्भशिराचे संरक्षण

(२) गर्भोदकस्रुतीमुळे अपत्यःपथाचे शुचित्व राखणे.

(३) प्राकृत अवस्थेमध्ये गर्भोदकस्रुती ही प्रसवकाळाच्या शेवटी व प्रजनःयिष्यमाणा अवस्थेपूर्वी होणे आवश्यक असते. परंतु ती जर [१]अकाली झाली तर ती गर्भोपघातकर ठरते व गर्भाला विपन्नावस्था येते.

## गर्भपरीक्षण :

या अवस्थेमध्ये प्रत्येक आवीबरोबर गर्भ खाली खाली सरकत असतो. दोन आवींमधील वेळामध्ये गर्भाचे स्वास्थ्य असणे आवश्यक असते.

गर्भाचे हृद्स्पंद मातेच्या उदरावरून दक्षिण वा वामभागी ( गर्भाच्या आसनाप्रमाणे) नलिकेच्या सहाय्याने किंवा साक्षात कानाने ऐकावेत. गर्भाचे हृद्स्पंद प्रकृत अवस्थेमध्ये मातेच्या नाडीच्या सुमारे दुप्पट (१३० ते १४० प्र. मि.) असतात.

(२) गर्भशिर हे कटिरामध्ये संपूर्ण प्रवेशित झालेले आहे की नाही ते उदरावरून पाहावे.

१ अकाली– योग्य काळापूर्वी किंवा नंतरही.

(३) योनिपरीक्षा— वैद्याने योनीची व स्वतःच्या हाताचीही संपूर्ण शुद्धता राखून योनिपरीक्षा करावी. त्यात खालील गोष्टींचे परीक्षण करावे.

गर्भाशयमुख— गर्भाशयमुखाची विस्तृती व मार्दव बघावे. कर्णिनी योनीचे अस्तित्व असल्यास पाहावे.

उल्ब— उल्बभेद झाला असल्यास गर्भोदकस्रुतीचे परीक्षण करावे. हे गर्भोदक जर बालकाच्या मलाने मिश्रित असेल तर ते बालक विपन्नावस्थेत आहे असे समजावे.

गर्भशिर— गर्भशिराचे परिवर्तन पूर्ण झालेले आहे किंवा नाही ते पाहावे. बालकाची ताळू कोठे व कशी लागते ते पाहावे. अकाली प्रवाहणामुळे उपशीर्षक उत्पन्न झाले आहे काय ते पाहावे.

सामान्यतः प्रकृत प्रसवाच्या वेळी गर्भशिर योनीच्या बाहेर आल्यानंतर गर्भनिष्क्रमणासाठी मुद्दाम काही करावे लागत नाही. पण क्वचित गर्भाच्या अंसाचे परिवर्तन इष्ट तितके पुरेसे होत नाही व ते थोडेसे हाताने फिरवून नीट करून घ्यावे लागते. तसेच मध्यंतरी गेलेला काळ दीर्घ असल्यास आवींच्या वेळी बाहेर पडण्यास गर्भास थोडेसे ओढावे लागते.

## गर्भसंग

[1]गर्भ अपत्यपथातील प्रथम आवर्तातून बाहेर पडत असताना रचनेच्या दृष्टीने त्याचे तीन अवयव मार्गामध्ये अडकण्यासारखे असतात. अपत्यपथ प्रमाणतः अरुंद असेल वा गर्भाचे अवयव सापेक्षतः अधिक मोठ्या आकाराचे असतील, म्हणजेच त्या अवयवांमध्ये वैगुण्य असेल तर प्रसवाच्या वेळी बाहेर येताना गर्भाचे डोके, खांदे, वा कटिप्रदेश हा प्रथम आवर्तात अडकून बसतो. तो अडथळा सोडविण्यासाठी गर्भास थोडेसे हाताने व इतर तद्सदृश साधनाने ओढून काढावे लागते. ओढून काढताना गर्भाच्या वा गर्भिणीच्या अवयवांना पीडा होणार नाही अशी काळजी घेतली पाहिजे. गर्भ प्रथम आवर्तात येण्यापूर्वी योनीचे तेलाने पुनः पुनः प्रसाधन करून प्रसारण करावे. हे केलेले असले म्हणजे सहसा संग होत नाही वा योनिमार्गास संगामुळे होणारी पीडाही होत नाही.

### शस्त्रकर्माने योनिप्रसारण :

प्रसारणासाठी केवळ स्नेहाभ्यंग पुरेसा न झाल्यास योनिमार्ग प्रसारणासाठी योनिमुखास शस्त्राने छेदही घ्यावा. सीवनी हे मर्म योनिमार्गाजवळ असल्याकारणाने हा छेद

१ गर्भसङ्गे तु योनिं धूपयेत् कृष्णसर्पनिर्मोकेण पिण्डीतकेन वा, बध्नीयाद्धिरण्यपुष्पीमूलं हस्तपादयोः, धारयेत् सुवर्चलां विशल्यां वा ॥ सु. शा. प्र. १०–११
स्वभावगता अपि त्रयः सङ्गा भवन्ति– शिरसो वैगुण्यात् अंसयोर्जघनस्य वा ॥
सु. चि. अ. १५–४






आ. ५० : विटपछेद
१. गर्भशिर, २. विटपछेद कसा करावा ?
३. विटप. ४. गुद.

घेताना ते मर्म सोडून एक अंगुळ अंतरावर आवश्यकतेप्रमाणे एकीकडे वा दोन्हीकडे योनिमुखाशी असलेल्या बाह्यपेशींमध्ये घ्यावा. गर्भसंग झाला असताना काळ्या सापाच्या कातीचा किंवा गेळफळाचा धूम योनीस द्यावा.

हिरण्यपुष्पी ( कळलावी ), सुवर्चला ( सूर्यफूल ), विशल्या ( पाटल्या ) अशा वनस्पती हातापायांत बांधाव्या वा मण्यासारख्या शरीरावर धारण कराव्या.

## अपरा

अपरा ही गर्भ स्थापन झाल्यापासून अव्यक्त स्वरूपात गर्भाशयामध्ये म्हणजेच तृतीय आवर्ताच्या वरच्या ३–४ भागामध्ये असते व हीच अपरा चवथ्या महिन्यामध्ये त्याच ठिकाणी व्यक्त होऊन गर्भाचे पोषण करू लागते.

### अपरेचे कार्य :

(१) पहिल्या तीन महिन्यांत या अव्यक्त अपरेमार्फतच उपस्नेहन न्यायाने गर्भिणीच्या आहारापासून गर्भाचे पोषण होत असते. या अपरेपासून गर्भाच्या नाभीपर्यंत एक ' गर्भनाभिनाडी ' जोडलेली असते. या गर्भनाभिनाडीमार्फत पहिल्या तीन महिन्यांत उपस्नेहन

– गृहीत गर्भाणामार्तववहानां स्रोतसां वर्त्मान्यवरुध्यन्ते गर्भेण, तस्माद् गृहीतगर्भाणामार्तवं न दृश्यते, ततस्तदधः प्रतिहतमूर्ध्वमागतमपरं चोपचीयमानमपरेत्यभिधीयते, शेषं चोर्ध्वंतरमागतं पयोधरावभिप्रतिपद्यते, तस्माद् गर्भिण्यः पीतोपचितपयोधरा भवन्ति । सु. शा. अ. ४–२४




आ. ५१ : १. नाभिनाडी, २. अपरा, ३. उल्ब, ४. गर्भोदक.

प्रसवोत्तर अपरेचे वजन सुमारे ५४० ग्रॅम पर्यंत भरते व त्याची जाडी १" व व्यास ८" असतो.

(२) जरायूचा एक भाग जो उल्ब त्याचे कार्य म्हणजे गर्भोदकाचे धारण करून गर्भाचे संरक्षण करणे हे होय.

## अपरेची विकृती :

(१) स्थानानुसार : अपरा ही गर्भाशयाच्या मुखाजवळ स्थिर होणे. त्याचे प्रकार तीन.

हे तीनही प्रकार योनिपरीक्षणावरून समजण्यास मदत होते.

(२) आकारानुरूप—प्रत्यक्षामध्ये अपरेचे लोमकूप, हा भाग एका भागात न सापडता दोन किंवा तीन भागांमध्ये विभागलेले सापडतात. कधी कधी अशा अपरेमध्ये अपरापतनाच्या वेळी अपरेचा एखादा भाग (लोमकूप) गर्भाशयात संसक्त होऊन राहतो व तो संपूर्ण अपरेबरोबर बाहेर न आल्यामुळे प्रसवोत्तर रक्तस्राव होतो, क्वचित् योनिदुष्टी संभवते व गर्भाशयाचा ऱ्हास होण्यास अडथळा येतो.



अशा वेळी गर्भाशयात असलेला अपरेचा भाग रुग्णेस संमोहन देऊन गर्भाशयात हात घालून तो गर्भाशयापासून सोडवून काढावा लागतो.

(३) अपरासंसक्ती—प्राकृत अवस्थेमध्ये अपरा चवथ्या महिन्यात गर्भाशयात स्थिर होते. अपरासंसक्तीमध्ये ज्या वेळी अपरा गर्भाशयामध्ये स्थिर होऊ लागते त्या वेळीच ती स्थिर होत असतानाच गर्भाशयाशी एकरूप होते. त्यामुळे गर्भनिष्क्रमणानंतर अपरापतन योग्य काली न होता प्रसवोत्तर रक्तस्राव अतिप्रमाणात होऊन रुग्ण कालवश होण्याची शक्यता असते. अशा वेळी अपरासंगाची पूर्ण चिकित्सा करूनसुद्धा अपरा बाहेर काढणे अशक्य होते. कारण त्या वेळी ती गर्भाशयाशी एकरूप झालेली सापडते. अशा वेळी अपरेसकट साक्षात् गर्भाशय निर्हरण करावे लागते.

## अपरापतन

गर्भ अपत्यपथातून बाहेर पडल्यानंतरही अपरापतन होईपर्यंत प्रसव पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही. गर्भनिष्क्रमणानंतर बहुधा थोड्याच वेळात अपरा पडते. प्रत्यक्षात हा काळ १० मिनिटे ते १५ मिनिटेपर्यंत आढळतो.



आ. ५२ : अपरापातन प्राकृतरीत्या करीत असताना

– यदा च प्रजाता स्यात्तदैवैनामवेक्षेत– काचिदस्या अपरा प्रपन्ना न वेति । तस्याश्चेदपरा न प्रपन्ना स्यादथैनामन्यतमा स्त्री दक्षिणेन पाणिनानाभेरुपरिष्टाद्बलवन्निपीडय सव्येन पाणिना पृष्ठत उपसंगृह्य तां सुनिर्धूतं निर्धूनुयात् । अथास्याः पार्ष्ण्या श्रोणीमाकोटयेत् । अस्या, स्फिचावुपसंगृह्य सुपीडितं पीडयेत् । अथास्या बालवेण्या कण्ठतालु परिमृशेत् । भूर्जपत्रकाचमणिसर्पनिर्मोकैश्चास्या योनिं धूपयेत् । कुष्ठतालीसकल्कं बल्वजयूषे मैरेयसुरामण्डे तीक्ष्णे कौलत्थे वा यूषे मण्डूकपर्णी-

गर्भनिष्क्रमणानंतर अपरापतनासाठी कुशल परिचारिकेने उजव्या हाताने सूतिकेच्या नाभीच्या वर पोट चांगले घट्ट बांधून पिळल्यासारखे करावे व त्याच वेळी डाव्या हाताने सूतिकेच्या पाठीकडचा भाग धरून दोन्हीकडून चांगले हलवावे. तिच्या टाचा श्रोणीच्या भागावर आणून दाबाव्यात. तिच्या नितंबांचे चांगले पीडन करावे. या क्रिया सूतिकेस बसवून वा निजवून जशा सोयीच्या होतील तशा कराव्यात.

## अपरासंग

काही वेळा अपरापतनास वेळ लागतो व त्यासाठी स्वतंत्र उपचार करावे लागतात. गर्भनिष्क्रमणासाठी जसे कुंथणे, कटी, नितंब, कुक्षीचे पीडन इत्यादी करावे लागतात ते स्वाभाविकच आहेत. पण तेवढ्याने जर अपरापतन झाले नाही तर मात्र ती विकृती समजावी.

अपरासंगाची कारणे–(१) विलम्बितप्रसवा. (२) पान्डू. (३) धातुक्षयजन्य गर्भाशयशैथिल्य. (४) मार्गावरोधजन्य वातविकृती. (५) अपरेची संसक्ती. (६) कालातीत प्रसव.

**लक्षणे :**

उदरपरीक्षणात गर्भाशयशैथिल्य, आवींचा अभाव, मूत्र-पुरीष संग, आनाह, आध्मान, योनिगत रक्तस्राव क्वचित प्रभूत प्रमाणात क्वचित अपरेचा काही भाग गर्भाशयापासून सुटून गर्भाशयातच रक्तसंचिती होऊ लागते. व या रक्तस्रावामुळे स्त्रीमध्ये विपन्नावस्थेची, लक्षणे दिसू लागतात. उदा. भ्रम, श्वास कास, सर्दी, मूर्च्छा, नाडी–वेगवती तृष्णा, श्यावता, इ.

---

पिप्पलीसंपाके वा संप्लाव्य पाययेदेनाम् । तथा सूक्ष्मैलाकिलिमकुष्ठनागरविडङ्ग-पिप्पलीकालागुरुचव्यचित्रकोपकुञ्चिकाकल्कं खरवृषभस्य वा जीवंतो दक्षिणं कर्णमुत्कृत्य दृषदि जर्जरीकृत्य बल्वजक्वाथादीनामाप्लावनानामन्यतमे प्रक्षिप्याप्लाव्य मुहूर्तस्थितमुद्धृत्य तदाप्लावनं पाययेदेनाम् । शतपुष्पां कुष्ठमदनं हिङ्गुसिद्धस्य चैनां तैलस्य पिचुं ग्राहयेत् । अतश्चैवानुवासयेत् । एतैरेव चाप्लावनैः फलजीभूतेक्ष्वाकुधामार्गवकुटजकृतवेधनहस्तिपिप्पल्युपहितैरास्थापयेत् । तदा स्थापनमस्याः सह वातमूत्रपुरीषैर्निर्हरत्यपरामासक्तां वायोरेवाप्रतिलोमगत्वात् । अपरा हि वातमूत्रपुरीषाण्यन्यानि चान्तर्बहिर्मार्गाणि सज्जन्ति ॥ च. शा. अ. ८–४१






आकृती ५३ : १. गर्भाशय, २. अपरा, ३. गर्भाशयमुख.

**चिकित्सा :**

१. त्रासनचिकित्सा—एखाद्या कुंचल्याने तिच्या तालूला स्पर्श करून ठसका लागेल असे करावे.

२. धूमचिकित्सा—सापाची कात, भूर्जपत्र, गुग्गुळ इत्यादींचा धूम योनीस द्यावा किंवा शालिमूळाने सिद्ध केलेले घृत योनीस अभ्यंगासाठी वापरावे व कडू भोपळा, कडूनिम्ब व सापाची कात यांचा धूम द्यावा.

३. लेपचिकित्सा— सुंठ, गूळ खाण्यास द्यावा व कळलावीच्या मुळाचा लेप पोटावर घालावा.

४. शोधन चिकित्सा— बडिशेप, हिंग, कोष्ठ, गेळफळ यांनी सिद्ध केलेल्या तेलामध्ये भिजलेला पिचू योनीमध्ये धारण करावा.

५. औषधी चिकित्सा— कुष्ठ, कळलावी यांच्या मुळाचे चूर्ण आसवाबरोबर वा गोमूत्राबरोबर पिण्यास द्यावे.

**बस्तिचिकित्सा :** शाल्मलीचे देठ बृहत् पंचमूळाच्या काढ्यात वाटून त्यात थोडेसे तेल घालून त्याचा आस्थापन बस्ती द्यावा. आस्थापन द्रव्यांनी सिद्ध केलेल्या कटुतैलाचा उत्तरबस्ती द्यावा. देवडांगरी, कडुवृंदावन, कुडा, गजपिंपळी इ. द्रव्यांच्या काढ्यांचा आस्थापन बस्ती द्यावा. कारण यामुळे मूत्र, पुरीष व वायू यांचे अनुलोमन होऊन अपरापतनासाठी सहाय्य होते. कारण अपरासंगास वायूची प्रतिलोम गतीच कारण असते.

या उपचारांनी अपरापतन न झाल्यास कुशल परिचारिकेने हाताची नखे चांगली काढून हातास सिद्ध केलेले तेल किंवा तूप माखून नालेबरोबर मागोवा घेत हात योनीमध्ये घालून अपरा गर्भाशयातून सोडवून काढावी.

या वेळी रुग्णेस संमोहन देऊन किंवा योग्य तेवढे मद्यपान देऊन हा उपचार करावा.




आ. ५४ : अपरानिर्हरण

२. वैद्याचा हात. ३. अपरा. ४. गर्भाशय






आ. ५५ : अपरानिर्हरण

१. वैद्याचा डावा हात, ३. अपरा,
२. वैद्याचा उजवा हात, ४. गर्भाशय,

## प्रसवोत्तर रक्तस्राव

अपरापतनानंतर प्राकृत रक्तस्रावापेक्षा अति प्रमाणात योनिगत रक्तस्राव होत असेल तर तो विकृत समजावा.

प्रत्यक्षामध्ये रक्तस्रावाचे अति-प्रमाण असणे हे ठरविणे फार कठीण असल्यामुळे रुग्णेच्या शरीरावर होणारी धातुक्षयाची लक्षणे पाहून मगच त्याचे निदान करावे.

**कारणे :**

( १ ) बहुप्रसवा स्त्री.

( २ ) संमोहन देऊन प्रसव झाला असेल तर.

( ३ ) प्रसवामधील प्रजनयिष्यमाणा अवस्थेमध्ये आवी मंद वा स्थगित होणे ही अवस्था असेल तर.

(४) विलंबित प्रसव.
(५) अनेकापत्यता ( यमगर्भ ) गर्भिणी.
(६) गर्भिणी मक्कल्ल.
(७) अपरादर्शन.
(८) अपरासंग– गर्भनिष्क्रमण झाल्यानंतर अपरेचे निष्क्रमण होण्यापूर्वी हा रक्तस्राव प्रभूत प्रमाणावर होऊ लागतो. काही वेळा अपरा ही गर्भाशयापासून अर्धवट सुटून हा रक्तस्राव होत असतो तर काही वेळा अपरा न सुटताच हा रक्तस्राव होत असतो.
(९) अपत्यपथातील व्रणामुळे हा रक्तस्राव होतो. व्रण विशेषतः द्वितीय व प्रथम आवर्तामध्ये होतो.
(१०) मूढगर्भ व गर्भसंग असताना–मूढगर्भाच्या प्रसव परिचर्येमध्ये संमोहन देऊन उत्क्षेपणाक्षेपणादी क्रिया करून झालेल्या प्रसवामध्ये योनिगत रक्तस्राव प्रभूत होतो.

**संप्राप्ती :**

वरील दिलेल्या कारणांनी स्त्रीच्या शरीरातील अपान व व्यानवायू ( धातुक्षयजन्य वातवृद्धीमुळे ) विकृत होऊन गर्भनिष्क्रमणानंतर प्रमाणापेक्षा जास्त रक्तस्राव सतत होतो.

**लक्षणे :**

योनिगत रक्तस्राव प्रभूत प्रमाणात होणे. प्रत्यक्षात हा रक्तस्राव नळ सुटल्याप्रमाणे स्त्रीच्या योनिमार्गातून बाहेर येतो असे दिसते. झालेल्या रक्तस्रावामुळे सूतिकेच्या शरीरावर थोडक्याच काळात रक्तक्षयाची लक्षणे खालील क्रमाने दिसू लागतात.

(१) शोष व श्वास. तोंडास कोरड पडते. रुग्णा तोंडाने श्वास घेऊ लागते.
(२) नाडी जलद, क्षीण, व लघु लागते.
(३) रक्तदाब कमी होतो.
(४) श्रम उत्पन्न होतो.
(५) जृंभा–जांभया पुष्कळ येतात.
(६) मूर्च्छा.
(७) चिकित्सेच्या अभावी मृत्यूही येतो.

**साध्यासाध्यता :**

ही अवस्था कष्टसाध्य की असाध्य आहे, ते पुढील गोष्टींवर अवलंबून आहे.

(१) रुग्णेचे वय : तरुण स्त्री कष्टसाध्य आहे तर प्रौढ स्त्रीमध्ये हे असाध्य आहे.
(२) योनिगत रक्तस्राव झाल्याचे प्रमाण : अल्प काळामध्ये परंतु प्रभूत प्रमाणात झालेला असेल तर व रुग्णेस त्वरित रक्तदानादी चिकित्सा मिळाली तरच कष्टसाध्य आहे. अन्यथा असाध्य आहे.
(३) कारण : वरील कारणांपैकी बहुप्रसवा स्त्री; संमोहन देऊन प्रसव झाला असेल तर; विलंबितप्रसव; गर्भिणी मक्कल्ल; व अपत्यपथातील व्रण या कारणांनी होणारा रक्तस्राव कष्टसाध्य आहे. आवी मंद वा स्थगित होऊन प्रसव झाल्यास होणारा प्रभूत रक्तस्राव; अनेकापत्यता गर्भिणी, अपरासंग; मूढगर्भ व गर्भसंगाच्या प्रसवानंतर होणारा रक्तस्राव असाध्य होतो.



**उपद्रव :**

पांडु, स्तन्यक्षय, सूतिकारोग, अन्य वातव्याधी.

**चिकित्सा :**

तत्त्वे : त्वरित रक्तस्राव थांबविणे.

पायाकडची बाजू उंच करून आसन देणे. रक्तस्तंभक द्रव्ये, अहिफेनकल्प तोंडाने अथवा सूचिकाभरणाने देणे.

द्रव्ये : तुरटी ( सौराष्ट्री ), प्रवाळ, नागकेशर, मोचरस, कार्पासमूलार्क, सौराष्ट्र बोलवटी.

वरील चिकित्सेने रक्तस्राव न थांबल्यास उदरावरून गर्भाशयभागी बला-तेलाने मर्दन करावे. थंड पाण्याची पट्टी ठेवावी. यानेही रक्तस्राव न थांबल्यास रुग्णेचे बल रक्षण करून रक्तदानादी चिकित्सा द्यावी.

बलरक्षणासाठी रुग्णेस पुढील चाटण द्यावे.

( १ ) हेमगर्भ १ गुं.
( २ ) लक्ष्मीविलास १ गुं.

आले रस व मध किंवा आर्द्रकावलेहातून व्यत्यासात् प्रमाणात चाटण द्यावे.

वरील सर्व चिकित्सा रुग्णेस लागू पडली आहे की नाही हे तिच्या नाडीपरीक्षेवरून ठरवावे लागते. कारण रक्तस्राव आतल्या आत होत राहतो. त्यासाठी रुग्णेची नाडी व रक्तदाब यांच्यावर वैद्याचे संपूर्णतः लक्ष असावे लागते.

अपरादर्शन व अपरासंग झाला असता योनिगत रक्तस्राव प्रभूत प्रमाणात सुरू असेल तर रुग्णेचे बल पाहून व त्याचे रक्षण करून संमोहन देऊन अपरा व अपरेचे गर्भाशयात अवशिष्ट असलेले भाग निर्हरण करावे व त्वरित वरील सर्व चिकित्सा द्यावी.

अपत्यपथातील व्रणाचे त्वरित सीवनकर्म करून रक्तस्राव थांबवावा.

प्रसवोत्तर रक्तस्राव होत असलेल्या स्त्रीस ती जर घरी प्रसूत झाली असेल तर तिचे बल पाहून तिला त्वरित जवळील व सुसज्ज अशा रुग्णालयात अलगद नेऊन प्रवेशित करून मगच रक्तदानादी चिकित्सा त्वरित केल्यास रुग्णेची ही अवस्था साध्य होऊ शकते.

प्रसवोत्तर रक्तस्राव थांबल्यानंतर सूतिकारोग होणार नाहीत याची खबरदारी घेऊन सूतिका परिचर्या लक्षपूर्वक करावी.

## जातमात्र परिचर्या

सूतिकेचे अपरापतन होत असताना वा अपरापतनासाठी उपचार चालू असताना इकडे सद्योजात बालकाचे आवश्यक ते उपचार (जातकर्म) करणे आवश्यक असते. कारण अपरापतनापूर्वी नालकर्तनापर्यंतचे उपचार होणे आवश्यक असते.



आ. ५६ : कफआचूषणयंत्र

प्रसूतीच्या वेळी अपत्यपथातून बाहेर येत असताना अत्यंत सुकुमार अशा अर्भकाला अतिशय पीडा होते. अर्भकाचे शरीर फार कोवळे असते. त्याच्या शरीरातील सप्त-धातू हे स्थिर झालेले नसतात. त्याची त्वचाही फार हळुवार असते. साध्या हाताचा वा वस्त्राचा स्पर्शही त्या त्वचेस वेदना उत्पन्न होण्याइतका खरखरीत भासतो. त्यामुळे प्रसवक्रियेमध्ये त्यास फार शीण होतो व ते अर्भक पुष्कळ वेळा संमूढ स्थितीतच असते. आणि म्हणून ते रडूही शकत नाही. यासाठी त्याला त्याचे श्वासोच्छ्वास व्यवस्थित सुरू व्हावेत म्हणून काही वेळा त्रासन चिकित्सा करावी लागते. त्यासाठी दगड त्याच्या कानाशी नेऊन जोराने एकमेकांवर आपटून वाजवावेत. उष्ण व थंड अशा पाण्याचा त्याच्या शरीरावर सपका मारावा. त्यामुळे त्रासन होते आणि प्रसूति-श्रमामुळे अवरुद्ध झालेला प्राणवायू पुन्हा आपले कार्य सुरू करतो.

टीकाकाराने येथील शीतोदकेन, उष्णोदकेन वा मुखपरिषेकः याचा अर्थ करताना उष्णकाली शीतोदक व शीतकाली उष्णोदक वापरावे असे म्हटले आहे. कोणते तरी एकच जल वापरावयाचे असेल त्या वेळी हे ठीकही आहे. परंतु असे एक प्रकारचेच जल परिषेकासाठी वापरले असता पुरेसे त्रासन नेहमीच होते असे नाही. त्यासाठी आलटून पालटून शीत व उष्ण जल वापरावे लागते म्हणून ' वा ' या पदाने नुसता विकल्प न घेता व्यत्यासाने दोन्ही घ्यावीत.

तसेच त्यास त्याची श्वासोच्छ्वास क्रिया नीट होऊ लागेपर्यंत वारा घालावा. त्यासाठी चरकाने नल, मुंज, वंश, इत्यादी वनस्पतींच्या काढ्यापासून तयार केलेले सूप वापरावे असे सांगितले आहे. या कामी सुपाच्या ताठपणामुळे वारा घालणाऱ्याला जरी श्रम झाले तरी घातला जाणारा वारा हा अधिक जोराने घातला जातो. तेच अपेक्षित आहे, चांगला पंखाही या कामी वापरण्यास हरकत नाही. प्राणवायूचा पुरवठा करणारे कोणते तरी साधन येथे अपेक्षित आहे हे लक्षात ठेवले म्हणजे झाले.

या उपचारांनी अर्भकाचा मोह दूर होऊन जर त्याचा श्वासोच्छ्वास हवा तसा होऊ लागला नाही तर त्याची ती मूर्च्छा प्रबळ आहे असे समजून त्यासाठी मूर्च्छा दूर करणारे तीक्ष्ण गंध उपचारासाठी वापरावेत किंवा प्रधमन नस्य वापरावे. या नस्यासाठी अगदी अल्प प्रमाणात सुंठ, वचा, कुष्ठ वा श्वासकुठार यांचे चूर्ण वापरावे. हा उपचार करताना फारच काळजी घेतली पाहिजे. मूर्च्छा दूर झाल्या-नंतर वरील नस्यामुळे उत्पन्न झालेला दाह दूर करण्यासाठी गोघृत वापरावे.

बालकाचा श्वासोच्छ्वास नीट होऊ लागल्यानंतर अंगठ्याजवळील बोटाभोवती चांगला स्वच्छ केलेला, स्वच्छ धुतलेला व गरम पाण्यात भिजवलेला कापूस गुंडाळून त्याने बालकाच्या मुखातील संचित कफ बाहेर काढून कंठ, तालू, जिव्हा, ओष्ट नीट स्वच्छ करावे. या स्वच्छतेसाठी हात स्वच्छ, निर्मळ असावेत व बोटांची नखे काढलेली असावीत. या कंठादी अवयवांच्या शोधनाचा प्राणाच्या उद्बोधनासाठी उपयोग होतो. प्रथम सांगितलेले उपचार करूनही जर श्वासोच्छ्वास नीट होऊ लागला नसेल तर मार्गावरोध दूर करण्यासाठी कंठादींतील संचित कफ काढून टाकणे

---

– ततोऽस्यातिप्रबलमोहज्वरपरीतसर्वगात्रस्य क्रोशितुमपि रुजानुरूपमसमर्थस्यान-वस्थिताशेषदेहधातोरसंभाव्ययौवनाद्यवस्थस्य क्रकचस्पर्शमिव करवसनशयनसंसर्ग-मन्यमानस्याविकल्पितमंगानि विक्षिपतः पुनरिव मरणमनुभवतो लीयमानसंज्ञस्या-तिसंबाधयोनिपुटावपीडितप्राणप्रत्यानयनाय बलातैलेन परिषेकं कुर्यात् ।
अ. सं. उ. अ. १, पृ. १

– तस्यास्तु खल्वपरायाः प्रपतनार्थे कर्मणि क्रियमाणे जातमात्रस्यैव कुमारस्य कार्याण्ये-तानि कर्माणि भवन्ति । तद्यथा अश्मनोः संघट्टनं कर्णयोर्मूले, शीतोदकेनोष्णोदकेन वा मुखपरिषेकः, तथा स क्लेशविहतान् प्राणान् पुनर्लभेत । कृष्णकपालिकाशूर्पेण चैन-मभिनिष्णुणीयुर्यद्यचेष्टः स्याद् यावत् प्राणानां प्रत्यागमनम् तत्तत् सर्वमेव कार्यम् ।

टीका— शीतोदकेन चोष्णोदकेनेति विकल्पो ऋतुभेदेन ज्ञेयः, ग्रीष्मकालेन शीतोदकेन, शीतकाले तूष्णोदकेनेत्यर्थः । क्लेशविहतानिति योनियन्त्रपीडनादिक्लेशपराहतान् । ईषिकानलमूञ्जवंशादिभवः तत्कृतः शूर्पः कृष्णकपालिका शूर्पः तेन निष्पुणीयुर्वीजये-युरित्यर्थः । अथ कियन्तं कालं तद्वीजनमित्याह– यावत् प्राणानां प्रत्यागमनमिति ।
च. शा. ८–४२

– अथास्य ताल्वोष्ठकण्ठजिह्वाप्रमार्जनमारभेताङ्गुल्या सुपरिलिखितनखया सुप्रक्षा-लितोपधान कार्पासपिचुमत्या । प्रथमं प्रमार्जितास्यस्य चास्य शिरस्तालु कार्पास-पिचुना स्नेहगर्भेण प्रतिसंछादयेत् ततोऽस्यानन्तर सैन्धवोपहितेन सर्पिषा कार्यं प्रच्छर्दनम् ।। च. शा. अ. ८–४३

– अथ जातस्योल्बमपनीय, मुखं च सैन्धवसर्पिषा विशोध्य, घृताक्तं मूर्ध्नि पिचुं दद्यात् ।। सु. शा. अ. १०–१२

प्रथमतःच इष्ट ठरते. तोंड स्वच्छ करून झाल्यानंतर स्नेहयुक्त असा कार्पास पिचू डोक्यावर ठेवून त्याची टाळू झाकावी.

**नालकल्पनविधी :**

बालकाच्या नाभीपासून नाळ ही आठ अंगुळे अंतर मोजून वर पक्क्या दोऱ्याने चांगली बांधावी. तेथून सामान्यतः मध्यभागी यंत्राने घट्ट धरून तीक्ष्ण धारेच्या शस्त्राने ती नाळ कापावी. शस्त्र कात्री असेल तर ठीकच. पण तीक्ष्ण धारेचा चाकू



आ. ५७ : नालकर्तन

अगर सुरी असेल तर ते शस्त्र धार वर करून नाळेखाली घालून मग वर ओढून नाळ कापावी व ही कापलेली बाजू सूत्राने घट्ट बांधावी. नाळ नाभीपासून चार अंगुळांवर व त्याचे पुढे चार अंगुळांवर प्रथम सूत्राने घट्ट बांधून पहिल्या बंधाच्या किंचित वर नाळ कापणे अधिक सोईचे असते.

– ततोऽस्य सुपरिलिखितनखया सुप्रक्षालितोपधानया कार्पासपिच्वगुंठितया दक्षिण प्रदेशिन्या जिह्वोष्ठकंठमनुसुखं प्रमृज्यात्तालु चोन्नम्य स्नेहपिचुनोपरिष्टादवगुंठयेत्।
अ. सं. उ. अ. १ पृ. २

– ततः कल्पनं नाड्याः । अतस्तया: कल्पनविधिमुपदेक्ष्यामः—नाभिबन्धनात् प्रभृत्यष्टाङ्गुलमभिज्ञानं कृत्वा छेदनावकाशस्य द्वयोरन्तरयोः शनैर्गृहीत्वा तीक्ष्णेन रौक्मराजतायसानां छेदनानां अन्यतमेन (ऊर्ध्वं) अर्धधारेण छेदयेत् । तामग्रे सूत्रेणोपनिबध्य कण्ठेऽस्य शिथिलमवसृजेत् । तस्य चेन्नाभिः पच्येत तां लोध्रमधुक प्रियङ्गुसुरदारुहरिद्राकल्क सिद्धेन तैलेनाभ्यज्यात् । एषामेव तैलौषधानां चूर्णेनावचूर्णयेत् । इति नाडी कल्पनविधिरुक्तः सम्यक् । च. शा. अ. ८-४४



उभय दिशेने होणाऱ्या रक्तस्रावाचा परिहार व्हावा म्हणून नाळ दोनही ठिकाणी बांधणे आवश्यक असते. क्वचित नालकर्तनापूर्वी अपरा सुटलेली असेल तर मग केवळ बालकाच्या बाजूस बांधून नाळ-कर्तन केलेले चालते. पण यात पुष्कळ वेळा धोका उत्पन्न होण्याची शक्यता असते म्हणून दोनही बाजूंस बांधून नाळ कापणे हेच श्रेयस्कर असते.

नालकर्तनासाठी वापरावयाची शस्त्रे व सूत्र ही शुद्ध स्वच्छ धुतलेली आणि निर्मळ असावीत. यासाठी शस्त्रे व सूत्र उकळून घेणे आवश्यक आहे. नालकर्तनानंतर लोध्र, मधुक (ज्येष्ठमध), गव्हला, देवदार, कुष्ठ व चंदन यांपैकी उपलब्ध होईल त्या द्रव्याचे, श्लक्ष्ण चूर्ण नाळेवर घालावे. व सैल दोऱ्याने नाळ बालकाच्या गळयात अडकवावी. नाळेला ओढ बसू नये. म्हणून बंधन सैल असावे. या बांधण्याचा मुख्य उद्देश नाळ लोंबकळत राहू नये हा आहे.

" सूत्रेण आसज्जयेत्, लंबत्व परिहारार्थम् ।
अ. सं. उ., १ पृ. ४

त्यामुळे नाळ गळयातच बांधली पाहिजे असे नाही. ती ऊर्ध्व-मुख करून त्यावरून स्वच्छ, पातळ, मऊ वस्त्राचा पटबंध बालकाच्या पोटाभोवती बांधून ठेवला तरी चालतो. मात्र हा पटबंध पुढे सांगितलेल्या स्नानादी उपचारानंतर करावा. हा पटबंध रोज बदलून नाळ गळून जाईपर्यंत त्यावर वरील चूर्ण पुन्हा रोज लावावे.

क्वचित् प्रसंगी नाळेच्या ठिकाणी पाक होतो आहे असे वाटले तर वरील औषधांपैकी उपलब्ध होतील त्या सर्व द्रव्यांनी सिद्ध केलेले तैल पटबंधामध्ये वापरावे. स्वच्छता चांगली राखली गेली असेल व शस्त्रादी साधने अग्निसंस्कृत असतील तर पाक होणे संभवत नाही. नाळ सामान्यतः ४ ते ६ दिवसांत सुकून गळून पडते. नुसते श्लक्ष्ण चूर्ण वापरणे हे नाळ सुकून सुटणे या दृष्टीने अधिक उपयोगी आहे. सिद्ध तैल वापरले असता नाळ सुकावयास वेळ लागतो.

– ततो नाभिनाडीमष्टाङ्गुलमायम्य सूत्रेण बद्ध्वा छेदयेत् तत्सूत्रैकदेशं च कुमारस्य ग्रीवायां सम्यक् बध्नीयात् ॥

टीका – ततो नाभिनाडीमिति आयम्य आकृष्य, ग्रीवायां सम्यग्बध्नीयात् स्रावपरिहारार्थं; गयी तु 'गर्भनाडीमष्टाङ्गुलमायम्य नातिगाढं नातिशिथिलमग्रे सूत्रेणाबध्य वर्धयित्वा कुष्ठतैलेन सिक्त्वाऽपत्यमाश्वास्य मधुसर्पिर्मिश्रमङ्गुल्याऽनामिकया कनकचूर्णं लेहयेत् ॥ सु. शा. अ. १०–१२

– प्रत्यागतप्राणस्य च प्रकृतिभूतस्य नाभिनालं मूलाच्चतुरंगुलस्यौर्ध्वं क्षौमसूत्रेण बध्वा तीक्ष्णेन शस्त्रेण वर्द्धयेत् । ग्रीवायां चैनमवसज्जेन्नाभिं कुष्ठतैलेन सेचयेत् ॥
अ. स. उ. अ. १ पृ. २

नाळ जर नीट कापली गेली नाही तर ती ओढली जाते, संदावते, सुजते, ग्रंथिल होते, वाकडी होते; व स्पंद पावत राहते. क्वचित घट्ट बांधली गेली नाही तर त्यातून रक्तस्राव होत राहतो. नाडीचे ठिकाणचे हे दोष बहुधा वातपित्तप्रधान असतात. त्यामुळे योग्य ते उपचार वेळीच झाले नाहीत वा दोषप्रकोप अधिक असेल तर नाभीच्या ठिकाणी राग, पाक, शूल ही लक्षणे दिसतात व बालक आक्षेपक, ज्वर इ. लक्षणांनी पीडित होते; म्हणून योग्य ते उपचार वेळीच करावेत. वातपित्तघ्न अशा द्रव्यांनी उत्सादन करावे. त्यांनीच सिद्ध केलेल्या तेलाने अभ्यंग करावा व त्याच द्रव्याच्या काढयाने परिषेक करावा. वातपित्तघ्न द्रव्यांनी सिद्ध केलेल्या घृताचाही अंतर्बाह्य उपयोग करावा.

हे वरील उपचार लक्षणांचे गुरु–लाघव लक्षात घेऊन करावे. याव्यतिरिक्त शोधन तैल, रोपण तैल यांचा अवस्थानुरूप उपयोग करावा. उद्धूलनासाठी चंदन, निम्बत्वक्, कुष्ठकचोरा, मुस्ता, उशीर यांच्या चूर्णांचा उपयोग करावा व अर्भकाला स. त्रिफळा, गं. रसायन सूतशेखर, वातविध्वंस अशी द्रव्ये वा कल्प लक्षणानुरूप द्यावेत.

अथ खलु जातमात्रं एव बालं उल्बात् सैंधवसर्पिषा विशोधयेत् ।।

अ. सं. उ. –अ. १ पृ. १

बालकाच्या अंगावरील त्वचेवर चिकासारखा पदार्थ असतो. –नाळ चांगली कापून काढल्यावर हा मल दूर करण्यासाठी सैंधव व तूप यांचा उपयोग करावा; किंवा बलातैल वापरावे; किंवा नुसत्या तिळतैलाचाही उपयोग होतो. त्वचेवरील संचित मल ज्या प्रमाणात असेल त्या प्रमाणात वरील द्रव्ये वापरावीत. या चिकट पदार्थास उल्ब अशी संज्ञा दिलेली आहे. या द्रव्यास 'उल्बमल' असे म्हणणे योग्य होईल.

– असम्यक्कल्पने हि नाड्या आयामव्यायामोत्तुण्डितापिण्डलिकाविनामिकाविजृम्भिका बाधेभ्योभयम् । तत्राविदाहिभिर्वातपित्तप्रशमनैरभ्यङ्गोत्सादनपरिषेकैः सर्पिभिश्चोपक्रमेत गुरुलाघवमभिसमीक्ष्य ।
टीका— नाड्या अविधिकल्पने दोषमाह–असम्यगित्यादि। आयामो दैर्घ्य, व्यायामो विस्तारः, ताभ्यामुत्तुण्डिता आयामव्यायामोत्तुण्डिताः दीर्घपीनत्वयुतेत्यर्थः पिण्डलिका परिमण्डलयुता। विनामिका अन्तोच्छूना मध्यनिम्ना। विजृम्भिका तु मुहुर्मुहुर्वृद्धिमती। गुरुलाघवमभिसमीक्ष्येति नाडीपाककारकपित्ते तथा वाते चायामव्यायामोत्तुण्डितादि विकारचतुष्टयकारके यो दोषो गुरुः स उपचरितव्यस्त्वरयेत्यर्थः। च. शा. अ. ८–४५

– अथ कुमारं शीतभिरद्भिराश्वास्य जातकर्मणि कृते मधुसर्पिरनन्तचूर्णङ्गुल्याऽनामिकया लेहयेत्; ततो बलातैलेनाभ्यज्य, क्षीरवृक्ष कषायेण सर्वगंधोदकेन वा रुप्यहेमप्रतप्तेन वारिणा स्नापयेदेनं कपित्थपत्रकषायेण वा कोष्णेन यथाकालं यथादोषं यथाविभवं च ॥ सु. शा. अ. १०–१३



उल्बमल अधिक प्रमाणात व चिकट असेल तरच सैंधव वापरावे लागते; अन्यथा नुसत्या स्नेहनाने भागते. स्नेहन झाल्यावर अर्भकास स्नान घालावे. या स्नानासाठी दोषानुरूप वा शक्यतेनुरूप निरनिराळ्या प्रकारांनी सिद्ध केलेले जल वापरावे.

अर्भक स्वच्छ असल्यास नुसत्या उष्णोदकाने स्नान घालणे पुरेसे होते. पण अर्भकाची त्वचा मलयुक्त, चिकट, बुळबुळीत असल्यास वट, पिंपळ, उंबर, पारोसापिंपळ, पिंपरी यांच्या सालीच्या काढ्याचा स्नानासाठी उपयोग करावा.

पित्तदोषाचा अनुबंध जर दिसत असेल, बालकाची त्वचा राग, वैवर्ण्य, स्फुटित व विस्फोटयुक्त अशी असेल तरी याच क्षीरीवृक्षांच्या सालीचा काढा स्नानासाठी वापरावा.

काही वेळा गर्भोदक हे दुर्गंधियुक्त असते. याचा परिणाम अर्भकावरही क्वचित झालेला असतो. अशा वेळी बालकास स्नान घालण्यासाठी वापरावयाचे पाणी हे वेलदोडे, कचोरा, मुस्ता, चंदन, उशीर, वचा अशा सुगंधी द्रव्यांनी सिद्ध केलेले असावे (फांट करून वापरावा). हे गंधोदक वातघ्नही आहे.

ज्यांना ऐपत असेल त्यांनी गरम करावयाचे पाणी चांदी सोन्याचे तुकडे चांगले लाल करून पाण्यात पाणी गरम होईल इतके वेळा विझवावे. व ते पाणी स्नान घालण्यासाठी (अर्भकास) वापरावे. यानंतर बाळाला सैंधव व तूप चाटवून वमन करवावे. असे चरकाने सांगितले आहे. हा प्रयोग फार त्रासदायक होतो; तेव्हा हेच शोधनाचे कार्य होण्यासाठी एक चमचा एरंडस्नेह व समभाग मध एकत्र करून ते मिश्रण अर्भकास चाटवावे.

## सूतिका-परिचर्या

### सूतिका–व्याख्या :

अपत्यप्रसवानंतरही जोपर्यंत अपरापतन होत नाही तोपर्यंत त्या स्त्रीला खऱ्या अर्थाने सूतिका म्हणता येत नाही. अपरापतनानंतरच प्रसव क्रिया पूर्ण होते व त्या स्त्रीला सूतिका असे नामाभिधान प्राप्त होते.

### सूतिका–कालमर्यादा :

प्रत्यक्षाच्या दृष्टीने सूतिकावस्थेचे तीन भाग पडतात.

१. प्रथम कालमर्यादा—अपरापतनापासून पहिले १० दिवसांपर्यंत–या दिवसांत सूतिका ही क्षती व व्रणी असते. त्यामुळे या दहा दिवसांतील सूतिका-परिचर्या ही

– सूतायाश्चापि तत्र स्यात् अपरा चेन्न निर्गता ।
प्रसूताऽपि न सूता स्त्री भवत्येवं गते सति ॥ का. सं. पृ. ३०५

प्राधान्याने व्रणाच्या अपेक्षेने सांगितलेली दिसते. हा व्रण गर्भाशयात ज्या ठिकाणी अपरा गर्भाशयाला संसक्त असते तेथे असतो.

२. दुसरी कालमर्यादा—अपरापतनापुढे १॥ महिन्यापर्यंत. या कालामध्ये स्तन, स्तन्य, व त्यावर्त योनी यांच्या स्वास्थ्यरक्षणाकरिता या दिवसांतील परिचर्या सांगितलेली दिसते. कारण सूतिकेमध्ये स्तन्यप्रवर्तन हे साधारणतः तिसऱ्या ते पाचव्या दिवसापर्यंत होते व त्याची वाढ ही १० दिवसांपासून ते १॥ महिन्यापर्यंत मातेच्या आहारविहारावर अवलंबून राहते. म्हणजेच ही परिचर्या स्तन व स्तन्य यांच्या अपेक्षेने करावयाची असते. म्हणजे याच कालात स्तन व स्तन्य यांची पुष्टी अभिप्रेत आहे, या कालातच स्तन्यजनन म्हणून चिकित्सा केली तर ती उपयोगी पडते; अन्यथा त्याचा उपयोग होत नाही.

दुसरे म्हणजे गर्भिणी अवस्थेमध्ये गर्भाबरोबर गर्भाशयाची जी वृद्धी झालेली असते ती प्रसव झाल्यापासून या कालाच्या शेवटापर्यंत पूर्वस्थितीप्रत येणे आवश्यक असते व याही दृष्टीने ही परिचर्या उपयुक्त ठरते.

३. तिसरी कालमर्यादा–अपरापतनापासून रजोदर्शनापर्यंत–ही कालमर्यादा व्यक्ती-प्रमाणे बदललेली सापडते. ती क्वचित २ महिने, ६ महिने, तर १½ वर्ष इतकीसुद्धा सापडू शकते. क्वचित स्त्रियांमध्ये रजोदर्शन न होताच पुन्हा गर्भधारणा झालेली दिसते.

## सूतिका-परिचर्येचे तत्त्व :

१. व्रणी.
२. रक्तस्रावजन्य व क्लेदजन्य धातुक्षय.
३. प्रवाहणजन्य वातप्रकोप.
४. धातुक्षयामुळे अग्निमांद्य.
५. स्तन्य-प्रवर्तन.
६. स्तनपुष्टी.
७. योनिसंरक्षण (योनिदुष्टीपासून व ग्रहबाधेपासून.)

## परिचर्या :

### (१) आश्वासन :

अपरापतन होताच परिचारिकेने मधुर शब्दाने आश्वासन द्यावे.

– प्रजातमात्रामाश्वास्य सूता शक्ला विजा (प्रसा) विका ।
न्युब्जां शयानां संवाह्य पृष्ठे संश्लिष्य कुक्षिणा ॥   का. सू. ११–१८ पृ. ३०५



### (२) स्नेहन व मर्दन :

अपरापतन होताच सूतिकेला पालथे निजावयास सांगून पाठ व कुक्षी यांच्या ठिकाणी तैलाने मर्दन करावे. प्रसवाच्या वेळी कटी, पृष्ठ व कुक्षी यांच्या ठिकाणी उत्पन्न झालेला शूल या अवयवांना अत्यंत श्रांत करतो. त्यामुळे स्नेहन मर्दनाने सूतिकेला बरे नाटते. तसेच गर्भाशयातील स्राव पूर्ण बाहेर पडून जाण्यासाठी सूतिकेच्या पोटाचे चांगले पीडन करावे.

### (३) पटबंध :

पीडनानंतर चांगल्या स्वच्छ, जाड अशा वस्त्राने कुक्षी, पार्श्व, पृष्ठ, उदर घट्ट आवळून बांधावे. त्यामुळे उदराचा आकार प्रकृत होण्यास सहाय्य होते. आणि वायू प्रकोप न पावता त्याचे शमन होते.

चरक, वृद्ध–वाग्भट या ग्रंथकारांनी हा पटबंध करावयास सांगितला आहे, तो स्नेहपानानंतर जरा सावकाशीने करावयास सांगितला आहे असे दिसते. सुश्रुताने तर या पटबंधाचा उल्लेखच केला नाही. कश्यपाने मात्र प्रजातमात्र या शब्दाने अपरापतनानंतर लगेच पृष्ठ, पार्श्वमर्दन व पटबंध सांगितला आहे. आणि त्याचे विधान अत्यंत उचित असेच आहे. पटबंध वेळीच न बांधणे वा मुळीच न बांधणे या दोनही गोष्टी सूतिकेच्या दृष्टीने अहितकारकच आहेत. त्यामुळे पुढे शूलादी लक्षणे तीव्रतर होतात आणि उदराचा आकारही प्रकृत राहात नाही.

### (४) स्नेहपान :

पटबंध बांधून झाल्यावर सूतिकेला काही प्यावयास देणे आवश्यक असते. चरक व वृद्धवाग्भटाने सूतिकेला स्नेहपान करविण्यास सांगितले आहे. हा स्नेह एक दिवसात पचेल इतका असावा. सवय, आवड असेल त्यानुसार तूप, तैल, वसा व मज्जा स्नेहपानासाठी वापरावी. या स्नेहाबरोबर पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक सुंठ, ओवा, जिरे, सैन्धव, मरीच यातील इष्ट त्या द्रव्याचे चूर्ण वापरावे.

– पीडयेद्धट्टमुदरं गर्भदोष प्रवृत्तये ।
महताऽदुष्टपट्टेन कुक्षिपार्श्वे च वेष्टयेत् ॥
तेनोदरं स्वसंस्थानं याति वायुश्च शाम्यति ।   का. सूति. ११-१९ पृ. ३०५

– अथ सूतिकां बलातैलाभ्यक्तां वातहरौषधनिष्काथेनोपचरेत् । सदोषदोषां तु तदहः पिप्पलीपिप्पलीमूलहस्तिपिप्पलीचित्रकशृङ्गवेरचूर्णं गुडोदकेनोष्णेन पाययेत् एवं द्विरात्रं त्रिरात्रं वा कुर्यादादुष्टशोणितात् । विशुद्धे ततो विदारिगन्धादि सिद्धां स्नेहयवागूं क्षीरयवागूं वा पाययेत् त्रिरात्रम् । ततो यवकोलकुलत्थासिद्धेन जाङ्गलरसेन शाल्योदनं भोजयेद्बलमग्निबलं चावेक्ष्य । अनेन विधिऽनाध्यर्म-मासमुपसंस्कृताविमुक्ताहाराचारा विगतसूतिकाभिधाना स्यात् पुनरार्तव-दर्शनादित्येके ॥   सु. शा. अ. १०–१६

आनूप देशांतील सूतिकेला किंवा अतिस्थूल, अतिदुर्बल, अतिमंदाग्नी अशा सूतिकेस स्नेहन करणे योग्य नाही. स्नेहनाची पद्धत विशेषतः जांगल प्रदेशांतच अवलंबावी. एरव्ही स्नेहन इतक्या मोठ्या मात्रेत तरी करू नये. स्नेहपान मुळीच न करणे हा मात्र अपवादच समजावा. कारण प्रसवक्रियेमुळे उत्पन्न झालेल्या वातप्रकोपासाठी स्नेहनाची आवश्यकता असते. जिला स्नेहपान अयोग्य असेल त्या सूतिकेला वातहर औषधांनी सिद्ध केलेला क्वाथ प्राशनासाठी द्यावा.

प्रसूतीनंतर होणारा गर्भाशयातील रक्तस्राव उचित त्या प्रमाणात झाला नसेल तर सूतिकेला पहिल्या दिवशी पिंपळी, पिंपळमूळ, गजपिंपळी, चित्रक, सुंठ यांचे चूर्ण गुळाबरोबर खावयास देऊन वर गरम पाणी पिण्यास सांगावे. (गूळ पाणी एकत्र गरम करून त्यासवेही चूर्ण घेण्यास सांगावे).

## (५) गर्भाशयशोधन :

सूतिकेला गर्भाशय शोधनासाठी प्रसवानंतर पहिले तीन दिवसपर्यंत काळाबोळ-१ मास अनुपान गूळ असा दिवसातून दोन वेळा, वर दशमूलारिष्ट २–४ चमचे समभाग पाण्यातून द्यावे. काळाबोळ हा उत्कृष्ट शोधन व लेखन असल्यामुळे गर्भाशयाची शुद्धी होण्यास सहाय्य होते, गूळ आणि दशमूळ हे अनुपान वातघ्न असल्यामुळे सूतिकेस हितकर आहे.

गर्भाशय संकुचित होऊन प्रकृत स्थितीत यावा यासाठी लताकरंज व पिंपळमूळ यांच्या चूर्णाचा उपयोग पुढील ७ ते ८ दिवस करावा. एवढ्यानेही गर्भाशयाचा आकार प्रकृत स्थितीत आला नाही तर पिंपळमूळाचे चूर्ण रोज सकाळी ताकातून सेवन करावे. योगरत्नाकराने हा योग मुद्दाम सांगितला आहे.

## (६) कोष्ठ-शोधन :

तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी सूतिकेला कोष्ठ शोधनासाठी एरंडस्नेह सुंठीच्या काढ्यातून द्यावा. त्यामुळे प्रसूतीमध्ये प्रकुपित झालेल्या वायूचे शमन होते व मलाचे शोधन होते. याच सुमारास स्तन्योत्पत्ती होते, जर कोष्ठ शोधन झालेले नसेल तर तेथील दोषांमुळे आम वाढून तो उत्पन्न होणाऱ्या स्तन्यास दुष्ट करतो व त्यामुळे सूतिकेस ज्वर येण्याची भीती असते. एरंडस्नेहाने शोधन झाल्यामुळे ही ज्वराची भीती दूर होते.

## (७) स्तन्योत्पत्ती व वृद्धी :

स्तन्य उत्पन्न होत असेल त्या प्रमाणात सूतिकेला द्यावयाच्या दुधाचे प्रमाण ठरवावे लागते. स्तन्यवृद्धीकरता आळीव, बाळंतशेपा, खसखस, कार्पासबीज यांचा उपयोग करावा. शतावरीकल्पासारखे पदार्थ वापरावेत. स्तन्यजनन क्वाथातील द्रव्यांचा यथायोग्य उपयोग करावा.

स्तन्य फार उत्पन्न होत असेल तर दूध, खीर यांसारखे पदार्थ आहारातून कमी करावे लागतात.

## (८) रक्षोघ्न :

सूतिकेला दुसऱ्या दिवसापासून दहा दिवसपर्यंत उष्णोदकाने योनिप्रक्षालन करावे व तदनंतर ओवा, शेपा यांचा धूप देणे आवश्यक आहे. रक्षोघ्न म्हणून योनिशुद्धीसाठी त्याचा उपयोग होतो.

## (९) स्नान :

सूतिकेला चवथ्या दिवसापासून भरपूर गरम पाण्याने स्नेहाभ्यंगपूर्वक स्नान घालावे. पहिले तीन दिवस स्नान घालणे उचित नसते; कारण स्नानामुळे व तन्निमित्त कराव्या लागणाऱ्या हालचालींमुळे अधिक श्रांत झालेली स्त्री अधिक थकते. पहिल्या

---

– धन्वभूमिजानां तु सूतिकां घृततैलयोरन्यतरस्य मात्रां पाययेत् पिप्पल्यादिकषायानुपानां, स्नेहनित्या च स्यात्त्रिरात्रं पञ्चरात्रं वा (बलवती) अबलां यवागूं पाययेत्त्रिरात्रं पञ्चरात्रं वा । अत ऊर्ध्वं स्निग्धेनान्न संसर्गेणोपचरेत् ।
सु. शा. अ. १०–१७

– प्राक स्नेहयवागूपानाभ्यां चोभयकालमुष्णोदकेन परिषेचयेत् (३) एवं त्रिरात्रं पञ्चरात्रं सप्तरात्रं वानुपाल्य ततो यवकोलकुलत्थयूषेण लघुना चान्नपानेन । द्वादशरात्रात्परं जाङ्गलरसाभिश्च क्रमादाप्याययेदग्निबलादीन्यपेक्ष्य । क्वाथितशीतं च तोयं पाययेत् । तथा जीवनीयबृंहणीयमधुरवातहरसिद्धैरभ्यङ्गोद्वर्तनपरिषेकावगाहैरन्नपानैश्च हृद्यैरुपाचरेत् । अ. सं. शा., अ. ३–३४

– सूतिकां तु खलु बुभुक्षितां विदित्वा स्नेहं पाययेत् परमया शक्त्या सर्पिस्तैलं वसां मज्जानं वा सात्म्यीभावमभिसमीक्ष्य पिप्पलीपिप्पलीमूलचव्यचित्रकशृङ्गवेरचूर्णसहितम्। स्नेहं पीतवत्याश्च सर्पिस्तैलाभ्यामभ्यज्य वेष्टयेदुदरं महताऽच्छेन वाससा; तथा तस्या न वायुरुदरे विकृतिमुत्पादयत्यनवकाशत्वात्। जीर्णे तु स्नेहे पिप्पल्यादिभिरेव सिद्धां यवागूं सुस्निग्धां द्रवां मात्रया पाययेत् । उभयतः कालं चोष्णोदकेन च परिषेचयेत् प्राक् स्नेहयवागूपानाभ्याम् । एवं पञ्चरात्रं सप्तरात्रं वाऽनुपाल्य क्रमेणाप्याययेत् । स्वस्थवृत्तमेतावत् सूतिकायाः । च. शा. अ. ८–४८

– तथास्तु खलु यो व्याधिरुत्पद्यते स कृच्छ्रसाध्यो भवत्यसाध्यो वा, गर्भवृद्धिक्षयितशिथिल सर्व धातुत्वात्, प्रवाहणवेदनाक्लेदनरक्तनिःस्रुतिविशेषशून्यशरीरत्वाच्च; तस्मात्तां यथोक्तेन विधिनोपचरेत्; । च. शा. ८–४९

– प्रसूता वनिता वृद्धकुक्षिह्रासाय संपिबेत् ।
प्रातर्मथितसंमिश्रां त्रिःसप्ताहात्कणाजटाम् ॥ यो. र. पान ६०१, सूत्र ३

१ प्रायशश्चैनां प्रभूतेन उष्णोदकेन परिषिंचेत् । सु. शा. १०–१८

तीन दिवसांत विश्रांतीची आवश्यकता जास्त असते. म्हणून पहिल्या तीन दिवसांत सर्वांगस्नानाऐवजी योनिभागाच्या स्वच्छतेपुरताच उष्ण जलाचा परिषेक योग्य आहे.

टीकाकारानेही या सूत्रावर टीका लिहिताना "गर्भक्षोभकृत रक्तस्रावणार्थं; वातशमनार्थं च एनां स्त्रियं धारया परिषिचेत् ।" हे जे भाष्य केले आहे ते सार्वजनिक स्नान या अर्थाने न घेता योनिपरिषेकापुरतेच मर्यादित घेतल्यास अधिक योग्य होईल असे वर्णनाचा रोख पाहून वाटते.

## (१०) आहार :

स्नेह पचल्यानंतर पंचकोलद्रव्यांनी सिद्ध केलेली पातळ अशी यवागू द्यावी किंवा लघुपंचमूळांनी दूध सिद्ध करून त्यांत यवागू सिद्ध करावी व ती स्नेहयुक्त अशी तीन दिवसपर्यंत प्राशन करण्यास द्यावी. स्नेहयवागू प्राशनापूर्वी दोनही वेळा (सकाळ-सायंकाळ) उष्णोदकाने योनिभागी परिषेक करावा.

यानंतर पाचव्या सहाव्या दिवसापासून यव, कोल, कुलत्थ यांच्या यूषासवे जुन्या तांदळाचा भात, तूप घालून अग्निबलाप्रमाणे सेवन करण्यास द्यावा.

मांसाहारी स्त्रीस जांगलप्राण्याच्या मांसरसाने सिद्ध केलेला भात खाण्यास सांगावा.

वृद्धवाग्भटाने मांसरसात सिद्ध केलेला भात पुढे १२ दिवसांनंतर सेवन करण्यास सांगितला आहे.

काश्यपांनी पटबंधानंतर सूतिकेला पुढीलप्रमाणे उपचार सांगितले आहेत.

[१]सूतिकेला चामड्याने मढविलेल्या खुर्चीसारख्या आसनावर बसवून, उष्ण अशा बलातेलाने योनिभागाचे स्नेहन करावे व गव्हला शिजवून त्यांच्या पोटलीने (स्वेदन केलेल्या योनीचे) स्वेदन करावे.

[२]सूतिकेला विश्रांती मिळून तिचा थकवा नाहीसा झाला म्हणजे मग (दोन तीन दिवसांनी) सूतिकेला गरम पाण्याने स्नान घालावे. स्नानानंतर अंग कोरडे करून कुष्ठ, गुग्गुळ, अगरू यांचा धूप तिला द्यावा.

[३]सूतिकेने स्वतःच्या अग्निबलाचा विचार करून पहिले तीन ते पाच दिवस मंडाबरोबर स्नेहपान करावे व हितकर असा आहार घ्यावा.

१ चर्मविद्धामासन्दीं बलातैलोष्णपूरिताम् ।
अप्यासीत सदा सूता तथा योनिः प्रसीदति ॥
प्रियङ्गुकानां कृसरैः स्वभ्यक्तां स्वेदयेत्ततः । का. सं. पृ. ३०७
२ स्विन्नामुष्णाम्बुना स्नातां विश्रान्तां विगतक्लमाम् ।
कुष्ठगुग्गुल्वगुरुभिर्धूपयेद्घृतसंयुतैः ॥
३ ततोऽग्निबलव(वि)द्वीक्ष्य त्र्यहं पञ्चाहमेव वा ।
मण्डानुपानमन्वक्षं पिबेत् स्नेहं हिताशिनी ॥ का. सं. ११–२२, २३



[१]पहिले स्नेहन चांगले झाल्यावर पुढे तीन दिवस थोडासा स्नेह घातलेली व लवणवर्जित अशी यवागू, सुंठ, पिंपळी यांनी संस्कृत करून सेवन करावी. त्यानंतर हीच यवागू औषधी द्रव्ये न घालता तूप व मीठ घालून द्यावी.

[२]यानंतर पुढे हुलग्याचे कढण, तूप, मीठ रुचीप्रमाणे अम्ल द्रव्ये घालून द्यावे. जांगल मांसाचा रस घ्यावा. तुपाची फोडणी दिलेल्या कोहळा, मुळा काकडी, यांच्या भाज्या खाव्यात.

[३]अशा रीतीने एक महिन्यापर्यंत स्नेह, स्वेद व उष्णोदक यांचे सेवन करावे व त्यानंतर स्वस्थवृत्ताच्या नियमांप्रमाणे वागावे.

सूतिकेवर करावयाचे उपचार हे देशसात्म्य व कुलसात्म्य पाहून मग त्याप्रमाणेच करावेत, असे काश्यपांनी सांगितले आहे. ते म्हणतात—

[४]आनूप, जांगल आणि साधारण असे तीन प्रकारचे देश असतात. या त्रिविध प्रदेशांमध्ये उपचारही वेगवेगळ्या पद्धतीने केले पाहिजेत. आनूप देशामध्ये बहुधा वातकफप्रधान व्याधी उत्पन्न होतात. येथील वातावरणही अभिष्यंदास अनुकूल असते. म्हणून या प्रदेशातील सूतिकेस प्रथमतः स्नेहपान करू नये. मंडादी उपचार अग्नीचे बल पाहून करावेत. शेक द्यावा. सर्व उपचार उष्ण करावेत. आणि सूतिकागार निवात असावे.

[५]जांगल देशामध्ये वातपित्ताचे रोग अधिक होतात. या प्रदेशात स्नेहाचे सात्म्यही असते. म्हणून सूतिकेकरिता सांगितलेले स्नेहादि सर्व उपचार या ठिकाणी करावेत.

१ स्नेहव्युपरमेऽश्नीयादल्पस्नेहामसैन्धवाम् ।
यवागूं त्र्यहमेवान्नं पिप्पलीनागराश्रिताम् ।
स्याद्व्यपेतौषधा पश्चात् सस्नेहलवणोत्तरा ।
२ कुलत्थयूषः सस्नेहलवणाम्लस्ततः परम् ।
तथैव जांगलरसः शाकानीमानि चाप्यतः ।
घृतभृष्टानि कूष्माण्डमूलकैर्वारुकाणि च ॥ का. सं. ११–२४ ते २६
३ स्नेहस्वेदौ च सेवेत माममेकमतन्द्रिता ।
उष्णोदकोपचारं च स्वस्थवृत्तमतः परम् ॥ का. सं. ११–२७
४ त्रिविधं देशमाश्रित्य वक्ष्यामि त्रिविधं विधिम् ।
आनूपदेशे भूयिष्ठं वातश्लेष्मात्मका गदाः ॥
तत्राभिष्यंदभूयस्त्वादादौ स्नेहो विगर्हितः ।
मण्डादिरत्र कर्तव्यः संसर्गोऽग्निबलावहः ॥
स्वेदो निवातशयनं सर्वमुष्णं च शस्यते । का. सं. ११–२८ ते २९
५ नियतं जांगले देशे वातपित्तात्मका गदाः ।
तदत्र स्नेहसात्म्यत्वात् स्नेहादिः स्यादुपक्रमः ।
कार्यः प्रजातमात्राया विशेषश्चात्र बुध्यते ॥ का. सं. ११–३० ते ३१

[१]सूतिकेला मुलगा झाला असेल तर स्नेहासाठी तेल द्यावे व मुलगी झाली असेल तर तूप द्यावे. (त्या विशेषाचे कारण लक्षात येत नाही.) स्नेह पचल्यानंतर दीपनीय द्रव्यांनी सिद्ध केलेली यवागू प्राशनासाठी द्यावी. पाच ते सात दिवसपर्यंत हा उपक्रम करावा.

[२]देश साधारण असेल तर उपचारही सामान्य असेच करावेत.

[३]काही परदेशी म्लेंच्छ जातींमध्ये सूतिकेला विशिष्ट कंद, मूळ, फळे, रक्त आणि मांसरस देण्याची पद्धती आहे. ज्या देशामध्ये वा ज्या जातींमध्ये सूतिकेचे उपचार करण्याची जी रीत सांगितली असेल त्याप्रमाणेच औचित्याचा विचार करून उपचार करावेत. सूतिकेच्या उपचारासंबंधी कोणत्या तरी एकच पद्धतीचा हट्ट धरण्यात अर्थ नाही. देश, जाती इत्यादी गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

[४]सूतिकेवरचे उपचार व तिच्या आहार-विहारादी संबंधीची नियंत्रणे ही दीड महिन्यापर्यंत कटाक्षाने पाळावीत. त्यानंतर क्रमाक्रमाने नेहमीचे आहार विहार करावयास लागावे. दीड महिन्यानंतर तिला सूतिका म्हणण्याचे कारण नाही, तिची सूतिकावस्था या वेळी संपते. काही लोकांच्या मते पुनः रजःप्रवृत्ती होईपर्यंत ती सूतिका असते असे सुश्रुताने सांगितले आहे.

[५]वाग्भटाने मात्र असा विकल्प न देता रजःप्रवृत्तीनंतर ती "गतसूताभिधाना" होते. तोपर्यंत तिला सूतिका म्हणावे. पण तोही दीड महिन्यानंतर आहार-विहारातील नियंत्रणे शिथिल करण्यास सांगतो.

१ कुमारप्रसवे तैलं कुमारीप्रसवे घृतम् ।
पिबेज्जीर्णे यवागूं च दीपनीयोपसंस्कृताम् ॥
पश्चाहं सप्तरात्रं वा ततो मण्डाद्युपक्रमः । का. सं. ३०७–११-३२

२ देशे साधारणे चास्य हितः साधारणो विधिः ॥ का. सं. ११–३३

३ वैदेश्याश्च प्रयच्छन्ति विविधा म्लेंच्छजातयः ।
रक्तं मांसस्य निर्यूहं कन्दमूलफलानि च ॥
कुलसात्म्यं च बुध्येत यस्मिन् यस्मिन् यथायथा ।
औचित्यात् कुलसात्म्यस्य तत्तथैवानुवर्तते ॥
अतो नैकान्तिकत्वाच्च सूतिकोपक्रमस्य च ।
देशं च जातिसात्म्यं च संप्रधार्य प्रयोजयेत् ॥ का. सं. ११–३४ ते ३६

४ अनेन विधिनाऽध्यर्धमासमुपसंस्कृता विमुक्ताहाराचारा ।
विगतसूतिकाभिधाना स्यात्, पुनरार्तवदर्शनादित्येके ॥ सु. शा. अ. १०-१६

५ एवं च मासादध्यर्धान्मुक्ताहारादियन्त्रणा ।
गतसूताभिधाना स्यात्पुनरार्तवदर्शनात् ॥ वा. शा. अ. १-१००



[१]योगरत्नाकरांनी स्वतःचा मध्यमक्रम दिला आहे. ते म्हणतात—

[२]ज्या सूतिकेचे प्रसूती संबंधीचे दौर्बल्यादी सर्व विकार गेले आहेत आणि जिच्या शरीराची कांती पूर्वीप्रमाणेच सतेज झाली आहे तिने चार महिन्यांनंतर पथ्यासंबंधीचे सर्व नियम सोडावेत व नेहमीप्रमाणे वागावे.

सूतिकावस्थेत स्त्रीने कोणते पथ्य पाळावे हे सांगताना सुश्रुत म्हणतात—

(१) क्रोध, (२) आयास (३) शोक (४) मैथुन (५) दिवास्वप्न (६) उच्च संभाषण (७) यानायान (वाहनांतून प्रवास करणे.) (८) चिरासन (९) अतिचंक्रमण (१०) शीतसंभोगतोयसेवा (फुले, हार, चंदनाची उटी असे शीतोपचार) (११) वातसेवा (१२) आतपसेवा (१३) विरुद्धाशन (१४) अध्यशन (१५) असात्म्य भोजन.

वर उल्लेखिलेली पंधरा अपथ्ये या स्थितीत वर्ज्य करावीत. या सर्व अपथ्यांमुळे सूतिकेवर अनेक प्रकारचे दुष्परिणाम होतात. कारण सूतिकेचे शरीर हे अगोदरच अत्यंत दुर्बल झालेले असते. त्यामुळे कोणत्याही अपथ्याचा परिणाम तिच्या शरीरावर चटकन रोग उत्पन्न करण्यास कारणीभूत होतो, व हे उत्पन्न झालेले व्याधी कृच्छ्रसाध्य होतात. या संदर्भात चरकांनी असे म्हटले आहे की,

१ प्रसूता सार्धमासान्ते दृष्टे वा पुनरार्तवे ।
सूतिकानामहीना स्यादिति धन्वन्तरेर्मतम् ॥ यो. र. पा. ६१०-२

२ उपद्रवैर्विशुद्धां च विज्ञाय वरवर्णिनीम् ।
ऊर्ध्वं चतुर्भ्यो: मासेभ्य परिहारं विसर्जयेत् ॥ यो. र. पा. ६१०-३

३ क्रोधायासमैथुनादीन् परिहरेत् । सु. शा. अ. १०–१८
टीका—आयासो व्यायामः मैथुनं पुरुषसेवा,
क्रोधादयः पञ्चदश आतुरोपद्रवचिकित्सितोक्ताः ।
आतुरोपद्रवचिकित्साध्यायात—
– क्रुध्यतः कुपितं पित्तं कुर्यात्तांस्तानुपद्रवान् ।
आयास्यतः शोचतो वा चित्तं विभ्रममृच्छति ॥
मैथुनोपगमाद्धोरान् व्याधिमाप्नोति दुर्मति ।
आक्षेपकं पक्षघातमङ्गप्रग्रहमेव च ।
गुह्यप्रदेशे श्वयथुं कासश्वासौ च दारुणौ ॥
रुधिरं शुक्रवच्चापि सरजस्कं प्रवर्तते ।
लभते च दिवास्वप्नात्तांस्तान् व्याधीन् कफात्मकान् ।
प्लीहोदरं प्रतिश्यायं पाण्डुतां श्वयथुज्वरम् ।
मोहं सदनमङ्गनामविपाकं तथाऽरुचिम् ॥ इत्यादी. सु. चि. ३१–२५ ते ३७

[१]प्रथमतः गर्भाच्या वाढीमुळे तिच्या शरीरातील सर्व धातू क्षीण व शिथिल झालेले असतात व त्यांतच प्रसवकाली होणाऱ्या वेदना, करावे लागणारे प्रवाहन, प्रसवाच्या वेळी होणारा क्लेदाचा व रक्ताचा स्राव यांमुळे तिच्या शरीराला विशेष प्रकारे शून्यत्व येते. आणि म्हणून जो व्याधी तिच्या ठिकाणी उत्पन्न होतो तो कृच्छ्रसाध्य वा असाध्यच होतो. यासाठी सूतिकेला काळजीपूर्वक उपचार करून प्रयत्नाने सांभाळले पाहिजे.

जीवनीय, बृंहणीय, मधुर, वातहर, रक्षोघ्न अशा द्रव्यांनी सिद्ध केलेल्या औषधांनी तिला अभ्यंग, उत्सादन, परिषेक, अवगाहन, अन्नपान असे उपचार केले पाहिजेत.

[२]पहिला महिना, दीड महिना तरी या सर्व उपचारांचा अवलंब काळजीपूर्वक केला पाहिजे. योगरत्नाकरांनी सूत्ररूपात एकाच श्लोकात या उपचारांचे सार सांगितले आहे. ते म्हणतात—सूतिकेने सर्व प्रकारची स्वच्छता पाळावी. स्निग्ध पथ्यकर असा आहार योग्य मात्रेत अल्प प्रमाणात सेवन करावा. प्रतिदिनी तेलाने अंगास मर्दन करून घ्यावे आणि नंतर स्वेद घ्यावा. अशा रीतीने एक महिन्याभर तरी दक्षता घ्यावी.

या सर्व पथ्यांचा सूतिकेला दोन प्रकारे लाभ होतो. एक तर तिच्या स्वतःच्या शरीरातील धातूंची झालेली झीज भरून येते व दुसरे म्हणजे बालकाच्या पोषणास आवश्यक असणाऱ्या स्तन्याचा पुरवठा भरपूर येतो.

म्हणून या सर्व दृष्टिकोणांतूनच पूर्वापार पद्धतींतही सूतिकेच्या आहारविहाराची एक विशिष्ट रीती रूढ आहे. अभ्यंग व स्वेद हे उपचार तिच्यावर रोज होतातच. तिला कटाक्षाने जुन्या तांदळाचाच भात, साजूक तूप व दूध आहारात दिले जाते. शिवाय खसखशीची खीर, सुंठीपाक, डिंकाचे लाडू, अहाळीवाची खीर व लाडू असे स्निग्ध पौष्टिक पदार्थ व बाळंतशेपा, मुसळी, ओवा, मेथिका, तांबूल इत्यादी दीपनपाचन दिले जाते.

सूतिकेला पहिले तीन चार महिने जे पाणी द्यावयाचे ते शृतशीत (उकळून गार केलेले) असे द्यावे.

१ तस्यास्तु खलु यो व्याधिरुत्पद्यते स कृच्छ्रसाध्यो भवत्यसाध्यो वा गर्भवृद्धिक्षयित-शिथिलसर्वधातुत्वात् प्रवाहण वेदनाक्लेदनरक्तनिःस्रुतिविशेषशून्यशरीरत्वाच्च; तस्मात्तां यथोक्तेन विधिनोपचरेत् । भौतिकजीवनीयबृंहणीयमधुरवातहर-सिद्धै-रभ्यङ्गोत्सादनपरिषेकावगाहनान्नपानविधिभिर्विशेषतश्चोपचरेत्; विशेषतो हि शून्यशरीराः स्त्रियः प्रजाता भवन्ति । च. शा. ८-४९

२ सर्वतः परिशुद्धा स्यात्स्निग्धपथ्याऽल्पभोजना ।
स्वेदाभ्यङ्गपरा नित्यं भवेन्मासमतन्द्रिता ॥ यो. र. सू. पान ६०९



# मूढगर्भ

व्याख्या : ज्या वेळी उपस्थित प्रसवेमध्ये गर्भाचे आसन प्रकृत न सापडता विकृत आढळते व या विकृत आसनामुळे गर्भाची गती किंवा बाहेर येण्याचा मार्ग खुंटतो, गर्भनिष्क्रमण होऊ शकत नाही त्या वेळी या गर्भाला मूढगर्भ असे म्हणावे.

प्रकृत प्रसव होण्यासाठी आवश्यक असलेले भाव—

( १ ) गर्भाचे प्राकृत आसन.

( २ ) स्त्रीचे कटिविवर व अपत्यपथ हे प्रमाणबद्ध असणे.

( ३ ) आविप्रादुर्भाव होणे व आवींचे बल गर्भनिष्क्रमण होईपर्यंत टिकून राहणे.

( ४ ) स्त्रीचे मानसिक व शारीरिक बल पुरेसे राहणे.

या चारही गोष्टींवर स्त्रीचा प्रसव प्रकृत होणे, वा न होणे हे अवलंबून असते. त्यांपैकी एखादा भाव जरी विकृत असला तरी प्रसवामध्ये मूढता येऊन मूढगर्भ होण्याची शक्यता असते.

## मूढगर्भाची कारणे :

( १ ) गर्भव्यथा ( २ ) मातृव्यथा

( ३ ) विरुद्ध आहारविहार ( ४ ) गर्भोपद्रव

( १ ) **गर्भव्यथा :** विपुल शिर, जलशीर्षक, उपशीर्षक, गर्भविकृती, अतिगर्भोदक, अपरेची विकृत स्थानी संसक्ती ( मुखस्थ अपरा )यमगर्भ, विपुल अवयव, मृतगर्भ, गर्भव्यापद.

( २ ) **मातृव्यथा :** योनिसंवरण, कटिविवरणसंकोचता, अपत्यपथामध्ये गुल्म असणे, योनिस्रंस, योनिभ्रंश, महायोनी, द्वितीय आवर्ताचे म्हणजेच गर्भाशयमुखाच्या काठिण्यामुळे असणारी संकुचितता, गर्भाच्या डोक्याने गर्भाशय पीडित होणे.

( ३ ) **विरुद्ध आहारविहार :** विरुद्ध आहारविहारामुळे वायू विकृत होतो व त्यामुळे अपानवायूचे जे आवी उत्पन्न करणे हे प्राकृत कर्म ते विकृत होते.

( ४ ) **गर्भोपद्रव :** गर्भिणीला आठव्या किंवा नवव्या महिन्यात गर्भोपद्रव झाला तर त्या स्त्रीमध्ये प्रसवाच्या वेळी मूढगर्भ होण्याची शक्यता असते. उदा० प्रत्यक्षामध्ये पांडू, शोथ, अपस्मार, उन्माद, इ. गर्भोपद्रवामध्ये प्रसवाच्या वेळी मूढता येण्याची

– न तीक्ष्णं आवीषु ग्राहिशूलेषु क्षिप्रं नारी प्रजायते ।
विलम्बिताभिरावीभिर्गर्भः क्लेशयते स्त्रियम् ॥ काश्यप संहिता शरीर पान ८५

– भुग्नोऽनिलेन विगुणेन ततः स गर्भः
संख्यामतीत्य बहुधा समुपैति योनिम् ॥ हारीत ५२ पृ. ५२

शक्यता असते. अशा अवस्थेमध्ये बहुधा आवींची विकृती किंवा स्त्रीच्या बलाची विकृती उत्पन्न होते व या दोन्ही कारणांमुळे गर्भाचे आसन विकृत होण्याची शक्यता आहे.

क्वचित वेळी प्रसूतीच्या वेळी स्त्रीस लाज वाटून तिचे योनिद्वार संकुचित होते. त्यामुळेही गर्भास मूढता येते.

सद्यःपरिस्थितीत स्त्रीच्या वैवाहिक आयुष्याची सुरुवातच उशिरा होत असल्यामुळे (२५ च्या पुढे) प्रथम गर्भधारणेचा हीनयोग होत असल्यामुळे मूढगर्भ किंवा गर्भसंग यांचे प्रमाण वाढलेले आढळेल.

गर्भस्रावाची यशस्वी चिकित्सा केल्यानंतर स्थिर झालेला व प्रकृत अवस्थेत वाढलेल. गर्भ प्रसवाच्या वेळी विकृत आसनामध्ये जाण्याची शक्यता असते.

## मूढगर्भाची संप्राप्ती :

[१]मागे उल्लेखलेल्या ग्राम्यधर्म, यानवाहन इत्यादी कारणांनी वात प्रकुपित होतो व त्याचा परिणाम गर्भ व गर्भाशय या दोहोवरही होऊन त्यांच्या स्वाभाविक अवस्थेमध्ये विकृती उत्पन्न होते. आशयांना शिथिल करून विस्तृत करणे हे जे विगुण वायूचे कार्य ते या ठिकाणी प्रत्ययास येते. आणि यामुळेच गर्भाला आवरण घालून असणारा गर्भाशयप्रतिबद्ध असा जो उल्ब व (पेशी) त्याचे गर्भावर असणारे जे बंधक आवरण तेही शिथिल होते. अशा रीतीने गर्भ हा विमुक्त बंधन होतो व या शैथिल्यामुळे उल्बाचा आकार वाढू लागला की, (प्रत्यक्ष अर्भक व त्याच्या भोवतालचे उल्बाचे आवरण या दोघांस मिळून गर्भाशयात असेपर्यंत गर्भ ही संज्ञा आहे.) गर्भाशय आपल्या प्रकृत स्थितीत असलेल्या प्रदेशाचे अतिक्रमण करून यकृत, प्लीहा, आंत्र यांच्यामध्ये असलेल्या अंतराळात घुसतो व त्यामुळे कोष्ठसंक्षोभ उत्पन्न होतो. प्रत्यक्षात ही गर्भाची मूढता बहुतांशी अतिगर्भोदकात सापडते.

१ विरुद्धाहारसेवाभिस्तथा गर्भव्यथासु च
अतिमूर्धनपीडायाः पीडां प्राप्नोति चार्भकः
तिर्य्यग्वापि च गर्भश्च त्यक्त्वा द्वारं भगस्य च
अन्यद्वा म्रियतेऽपत्यं तेन कष्टं प्रपद्यते
अथवा लज्जया स्त्रीणां सङ्कोचात्संकुचिते भगे
मूढगर्भं च जानीयात् । हारीत ५२-१-३, पृ. ४५२

– सविमुक्तबन्धनो गर्भाशयमतिक्रम्य यकृत्प्लीहान्त्रविवरैरवस्रंसमानः कोष्ठसंक्षोभमापादयति, तस्या जठरसंक्षोभाद्वायुरपानो मूढः पार्श्वबस्तिशीर्षोदरयोनिशूलानाहमूत्रसङ्गानामन्यतममापाद्य गर्भं च्यावयति तरुणं शोणितस्रावेण; तमेव कदाचिद्विवृद्धमसम्यगागतमपत्यपथमनुप्राप्तमनिरस्यमानं विगुणापानसंमोहितं गर्भं मूढगर्भमित्याचक्षते ।। सु. नि. अ. ८-३



या स्थितीत पार्श्व, बस्तिशीर्ष, उदर, योनी, यांच्यात शूल उत्पन्न होतो. उदराचा आकार अधिक मोठा होतो. (आनाह) मूत्रप्रवृत्ती होत नाही– अशी लक्षणे आढळतात. गर्भाशयाचा व्यास व कोष्ठसंक्षोभ या विकृतींमुळे गर्भस्राव वा गर्भपात होण्याची शक्यता उत्पन्न होते. पण गर्भाचा देठ जी अपरा ती न सुटल्यामुळे तसे जर झाले नाही तर गर्भाची वाढ होऊ लागते. पण बंधनाच्या शिथिलतेमुळे त्याची स्थिती ही प्रकृत न राहता विकृत होते (विगुणापानसंमोहितं) व प्रसूतीच्या वेळी अपत्यपथातील त्याचा प्रवेशही विकृत होतो. या सर्व परिस्थितीस मूढगर्भ अशी संज्ञा मिळालेली आहे. अर्थात मूढगर्भाची गर्भाशयामध्ये उत्पन्न झालेली व्यासादी वैगुण्ये ही जशी कारणे आहेत. त्याप्रमाणेच स्वभावतः योनिसंवरण असणे हेही गर्भ मूढ होण्याचे एक कारण आहे. या साठीच गर्भ अनिरस्यमान (बाहेर न टाकला जाणारा) झाला की मूढ होतो असा शब्दप्रयोग मूल ग्रंथामध्ये केलेला आहे. हारिताने सांगितलेल्या कारणांपैकी विशेषतः गर्भाचे विकार–गर्भाशयाच्या संकोचामुळे गर्भाचे प्रपीडन होणे, योनिद्वार सोडून गर्भ वाकडा होणे व प्रसूतीच्या वेळी स्त्रीस लाज वाटून तिचे योनिद्वार संकुचित होणे, या कारणांनीही गर्भास मूढता येते. मूढगर्भाची ही ग्रंथोक्त संप्राप्ती मार्मिक आहे. या ठिकाणी आम्ही 'गर्भाशयं अतिक्रम्य' या शब्दाचा वरवर दिसतो वा टीकाकार करतो तसा अर्थ न करता 'अंतरभावित निजार्थ' मानून प्रयोजकाप्रमाणे अर्थ केला आहे. तसा केला नाही तर गर्भ गर्भाशय फाटून बाहेर येतो असा अर्थ करावा लागेल. आणि मग "गर्भच्यावयति" (गर्भपात होणे) ही घटना कधी घडणारच नाही. तसेच तरुणस्थितीमध्ये (आकाराने लहान असताना) गर्भाशयाला फाडण्याचे सामर्थ्यही गर्भास असणार नाही. आणि एकदा गर्भाशय फाडून बाहेर गेलेला गर्भ ग्रंथकाराने उल्लेखिल्याप्रमाणे 'कदाचित् विवृद्धं' (क्वचित वाढीस लागणे) या स्थितीत येणे शक्य नाही. कारण गर्भाशय फाडून बाहेर येताच तो मरून जाईल. यासाठी अतिक्रम्य या पदाचा अर्थ प्रयोजकासारखाच केला पाहिजे. तरच गर्भ च्यावयति आणि कदाचित

टीका—बन्धनमत्र गर्भाशयप्रतिबद्धाः सिराः पेश्यश्च । मोचने उपमानमाह–फलमित्यादि । भवति– एतेनैतदुक्तं यथा वृक्षेऽपरिपक्वफलमभिघातैरकाल एव पतति तद्वद्यथोक्तपातनहेतुसामर्थ्यादप्रसवकाल एव गर्भः पतति । अतिक्रम्य उल्लंघ्य, विवरैरन्तकालैः, अवस्रंसमानोऽधः पतन्, कोष्ठशब्देनामाशयपक्वाशयादि स्थानं, संक्षोभश्चलनं तस्याः स्त्रियाः मूढो विमार्गगामी, अन्यतममेकतमं, आपाद्य निर्वर्त्य । तरुणं गर्भमघनो मूढः सन् च्यावयतीति संबन्धः । तरुणमघनाङ्गमव्यक्तचेतनम् । मूढगर्भस्य निरुक्तिमाह तमेवेत्यादि । असम्यगागतं विलोमभागेनागतं; अवाग्गमनात् । अपत्यपथं योनिम् । अनुप्राप्तमाश्रितम् । अनिरस्यमानमनिःसरन्तम् । संमोहितं मूर्च्छितम् ।। सु. नि. अ. ८-३ टीका

विवृद्धं ' हे पुढील वर्णन सयुक्तक होईल. प्रयोजक न मानता होणारा अर्थ आम्ही मागे गर्भिणीमक्कल्लप्रकरणी केला आहेच.

## मूढगर्भाचे प्रकार :

काही वैद्य मूढगर्भाचे त्याच्या अपत्यपथामध्ये येणाऱ्या प्रकारांवरून चार प्रकार करतात.

ते असे : ( १ ) कील, ( २ ) प्रतिखुर, ( ३ ) बीजक, ( ४ ) परिघ.

### ( १ ) कील :

या स्थितीमध्ये गर्भाचे हात, डोके आणि पाय हे अवयव वर राहतात आणि गर्भ हा पाठीकडून अपत्यद्वारांत अडकून राहतो. त्याचा आकार टोक वर व तळ खाली असलेल्या त्रिकोणासारखा दिसतो. म्हणून त्यास कील ( पाचर ) अशी संज्ञा दिलेली आहे.



आ. ५८

– चतुर्विध भेदः ।
ततः कीलः प्रतिखुरो बीजकः परिघ इति । तत्र ऊर्ध्वबाहुशिरः पादो यो योनिमुख निरुणद्धि कील इव स कीलः निःसृतहस्तपादशिराः कायसङ्गी प्रतिखुरः; यो निर्गच्छ-त्येकशिरोभुजः सबीजकः; यस्तु परिघ इव योनिमुखामावृत्य तिष्ठेत् स परिघ इति



### ( २ ) प्रतिखुर :

गर्भाचे हात व पाय दोन्ही पुढे आल्यामुळे पशूप्रमाणे तो चतुष्पाद स्थितीत दिसतो म्हणून प्रतिखुर म्हटले असावे. ज्या वेळी गर्भाचे हात, पाय आणि शिर योनिमार्गात खाली येते व पृष्ठ आणि नितंब हा शरीराचा मुख्य भाग वरच अडकून राहतो त्या वेळी या मूढगर्भास प्रतिखुर अशी संज्ञा आहे. ही स्थिती कील या अवस्थेच्या बरोबर उलट आहे. येथेही गर्भाच्या अंगाचा त्रिकोणच तयार होतो; पण त्याचे टोक खाली व तळ वरती अशी किलाच्या उलट स्थिती असते.



आ. ५९

### ( ३ ) बीजक :

एकच हात पुढे आल्यामुळे धान्याला आलेल्या मोडासारखी ही स्थिती दिसते. म्हणून बीजक हे नाव दिलेले असावे. डोके व एकच हात हे अपत्यपथात येतात व इतर अवयव अडकून राहतात त्या वेळी त्यास 'बीजक' अशी संज्ञा प्राप्त होते.

चतुर्विधो भवतीत्येके भाषन्ते । तत्तु न सम्यक्; कस्मात् ? स यदा विगुणानिल-प्रपीडितोऽपत्यपथमनेकधा प्र(ति)पद्यते तदा सङ्ख्या हीयते ॥

टीका—तस्य चातुर्विध्यमाहः तत इत्यादि । तत, असभ्यगागमनात् । तान् प्रकारान् प्रकटयन्नाह—तत्रोर्ध्वबाहुशिर इत्यादि । कायसङ्गी निरुद्धकायः एकशिरोभुज इति एको भुजः शिरसा सह यस्य निर्गच्छतीत्यर्थः । परिघ इवेति परिघोऽर्गलादण्डः ॥
सु. नि. अ. ८–४



आ. ६०



आ. ६१

बीजक



आ. ६२



## (४) परिघ

परिघ म्हणजे अडसर; अडसर ज्याप्रमाणे दारात आडवा अडकलेला असतो त्याप्रमाणे योनिमार्गात पूर्ण आडव्या स्थितीत अडकलेल्या मूढ गर्भास परिघ अशी संज्ञा आहे. यामध्ये गर्भ दंडासारखा सरळ असतो. त्याच्या शरीराचा 'कील' किंवा 'प्रतिखुर' या स्थितीतील अवस्थेप्रमाणे त्रिकोण होत नाही.

हे वर्गीकरण योग्य नाही असे सुश्रुतच म्हणतो. कारण विगुण झालेल्या वायूच्या विकृत प्रेरणेने अपत्यपथामध्ये येणाऱ्या गर्भाचे स्थितिदृष्ट्या अनेक प्रकार संभवतात. चार या संख्येला या ठिकाणी महत्त्व नाही.



आ. ६३

– विगुणानिलप्रतिपीडनवैचित्र्यादसंख्यगतिं च। समासतस्तु त्रिविधा गतिरूर्ध्वा तिर्यङ् न्युब्जा च। संस्थानानि पुनरष्टौ। तान्यत्रैवोत्तरत्र वक्ष्यते। अ. सं. शा. ४–२९

टीका—संक्षेपेण त्रिविधा गतिरूर्ध्वादिभेदेन। ऊर्ध्वा-यस्यामुत्थितो गर्भ आयाति। तिरश्चीना–गर्भिणीपार्श्वयोः कृतपादशिरसः। न्युब्जाअधश्शिरस ऊर्ध्वपादस्य। तस्य च गर्भस्याष्टौ संस्थानानि तानि वक्ष्यन्ते (१) सक्थिभ्यामागमनमेकम् (२) एकेन सक्थ्ना द्वितीयम् (३) स्फिङ्मूलेन तृतीयम् (४) तिर्यक् चतुर्थम् (५) पार्श्ववृत्त शिरसः पञ्चमम्। (६) बाहुद्वयेन षष्ठम् (७) वक्रेन पृष्ठेन पाणिपादशिरसा योनिमुखागमन सप्तमम् (८) एकेन पादेन योनिं द्वितीयेन गुद-मित्यष्टमम्।

अ. सं. शा. ४–२९ टीका

वृद्धवाग्भटाने मूगढर्भासंबंधी पुढीलप्रमाणे वर्गीकरण केलेले आहे. मूढगर्भाच्या गतीचे वृद्धवाग्भट तीन प्रकार करतो :

( १ ) ज्यात डोके वर राहून गर्भ योनिमार्गामध्ये येतो व अडकतो ती ऊर्ध्व गती.

( २ ) ज्यामध्ये गर्भाचे हात, पाय, डोके गर्भिणीच्या कुशीमध्ये येऊन गर्भ आडवा होतो व अडकतो त्या वेळी या गतीस तिर्यग् गती असे म्हटले आहे.

( ३ ) ज्या वेळी डोके खाली व पाय वर अशा स्थितीत गर्भ योनिमार्गात येऊन अडकतो त्या वेळी त्या गतीस ' न्युब्ज गती ' असे नाव संग्रहाने दिले आहे.

या त्रिविध गतींत प्रत्यक्ष योनिमार्गात अडकलेल्या गर्भाच्या स्थिती आठ प्रकारच्या असतात. वाग्भटाने या स्थितींना उद्देशून संस्थान असा शब्द वापरला आहे. पुढे चिकित्साप्रकरणी केलेल्या वर्णनावरून टीकाकारांनी या आठ प्रकारांचे स्वरूप सांगितले आहे ते असे—




आ. ६४

मूढगर्भातील ऊर्ध्वगती व तिर्यक्गती यांचे न्युब्जगतीत बाह्यपरिवर्तनाने रूपांतर करणे
१. गर्भ २. वैद्याचा उजवा हात ३. वैद्याचा डावा हात






आ. ६५




आ. ६६

मूढगर्भातील ऊर्ध्वगती व तिर्यक्गती यांचे न्युब्जगती बाह्य परिवर्तनाने रूपांतर करणे.
( १ ) गर्भ, ( २ ) वैद्याचा उजवा हात, ( ३ ) वैद्याचा डावा हात.

**(१) ऊर्ध्व गती :**

(१) दोन्ही तंगड्या खाली येतात.
(२) एकच तंगडी खाली येते.
(३) नितंब भाग खाली येतो.
(४) एक पाय योनिमुखातून व दुसरा पाय गुदातून येतो.

**(२) तिर्यग् गती :**

(५) गर्भ आडव्या स्थितीत येतो.
(६) डोके बाजूला वळलेल्या स्थितीत येतो.

**(३) न्युब्ज गती :**

(७) दोन हात पुढे येतात.
(८) पाय वाकून हात, पाय, डोके योनिमुखात येते.

"विगुणानिल प्रतिपीडन वैचित्र्यादसंख्यगति।"

या वचनाप्रमाणे वर प्रमुख म्हणून उल्लेखिलेल्या आठ गतींपेक्षा जे इतरही विकृत प्रकार संभवतात त्यांत गर्भाची नाळ तेवढी बाहेर येणे हाही एक वरचेवर आढळणारा त्रासदायक प्रकार आहे. त्याचप्रमाणे अपरादर्शन म्हणजेच नेहमी अपरा तृतीय आवर्तात स्थिर असते त्याऐवजी द्वितीय आवर्तात स्थिर होणे ही ही स्थिती होय. प्रत्यक्षात ह्या प्रकारात कोणत्याही गतीने गर्भ आलेला सापडतो. सुश्रुताने ह्याच आठ गतींचे वर्णन थोड्या अधिक स्पष्ट शब्दांत केलेले आहे. तो म्हणतो—

(१) या स्थितीमध्ये दोन प्रकार संभवतात. दोन्ही तंगड्या या सरळ उभे राहिल्याप्रमाणे खाली येतात किंवा पाय गुडघ्यात मोडून पाउले नितंबाशीच राहतात व दोन्ही गुडघे खाली येतात. (आ. ६७–६८ पाहावी.)

— तत्र, कश्चिद्वाभ्यां सक्थिभ्यां योनिमुखं प्रतिपद्यते; कश्चिदाभुग्नैकसक्थिरेकेन; कश्चिदाभुग्नसक्थिशरीरः स्फिग्देशेन तिर्यगागतः; कश्चिदुरःपार्श्वपृष्ठानामन्यतमेन योनिद्वारं पिधायावतिष्ठते; अन्तःपार्श्वापवृत्तशिराः कश्चिदेकेन बाहुना; कश्चिदाभुग्नशिरा बाहुद्वयेन, कश्चिदाभुग्नमध्यो हस्तपादशिरोभिः; कश्चिदेकेन सक्थ्ना योनिमुखं प्रतिपद्यतेऽपरेण पायुम् इत्यष्टविधा मूढगर्भगतिरुद्दिष्टा समासेन॥
सु. नि. ८–५





आ. ६७



आ. ६८

(२) या प्रकारात एकच तंगडी खाली येते व दुसरी गर्भाच्या पोटाशी दुमडलेली संकुचित अशी राहते वा वर सरळ राहते.



आ. ६९

(३) दोनही गुडघे गर्भाच्या पोटाशी संकुचित स्थितीत दुमडलेले राहतात आणि गर्भाचे नितंब तेवढे योनिमुखात येते. त्याच स्थितीमध्ये नितंबाबरोबर पाउलेही योनिमुखाशी येतात.



आ. ७०




आ. ७१

बडिश यंत्राचा वापर मूढगर्भात करीत असताना
१. गर्भ २. बडिशयंत्र ३. वैद्याचा हात



आ. ७२ : बडिशयंत्र



(४) क्वचित गर्भ आडवा होऊन त्याचा पुरोभाग ( छाती व पोट ) पुढे येतो. क्वचित् गर्भ तिरपा होऊन त्याचे पार्श्व ( उजवी व डावी कुशी ) योनिमुखाशी येतात. क्वचित् गर्भ पाठीकडून योनिमुखाशी येतो. या तीनही स्थितींमुळे सर्व योनिद्वार हे अडले जाते व गर्भ तसाच अडकून राहतो.



आ. ७३

(५) क्वचित डोके हे आंत मातेच्या पार्श्वभागी घुसलेले अर्थात दुसऱ्या पार्श्वभागी नितंब असलेले अशा स्थितीत गर्भ आडवा अडकतो.



आ. ७४

क्वचित् डोके मागे (अपवृत्त) वळलेल्या स्थितीत राहून गर्भाचे मुख व हनुवटी हे अवयव योनिमुखात येतात. (आ. ७५ पाहावी.)



आ. ७५



आ. ७६

(३) क्वचित गर्भाचे डोके छातीकडे वळलेल्या स्थितीत असून ते दोन्ही हातांसह योनिमुखात येते. (आ. ७६ पाहावी)



आ. ७७



(७) क्वचित गर्भाचे अंग (मध्यभाग) दुमडलेल्या स्थितीत हातपाय, डोके योनिमुखात येते. (ही स्थिती प्रतिखुराप्रमाणे असते.)

(८) गर्भ अपत्यपथात येत असताना अपानाच्या विगुणतेमुळे योनिसंवरण असणाऱ्या स्त्रीमध्ये प्रथमावर्त व गुद यांमध्ये भेद होऊन गर्भाचा एक पाय योनिमार्गातून व दुसरा गुदमार्गातून बाहेर पडतो. (आ. ७७ पाहावी.)

**प्रत्यक्षात सापडणारे काही इतर मूढगर्भ :**



आ. ७८ : उत्तानगर्भ




आकृति ७९ :
उत्तानगर्भाची योनिपरीक्षा करीत असताना गर्भशिराच्या सीवनीची प्रचीती :
( १ ) त्रिकास्थी ( २ ) भगास्थी ( ३ ) पुरोताल्.



## प्रत्यक्षात सापडणारे इतर काही मूढगर्भ




आ. ८० : मुखाकडून प्रसव होत असताना



आ. ८१ : मुखाकडून प्रसूती झालेल्या नवजात बालकाचा चेहरा काही तासांनंतर बालकाचा चेहरा प्रकृत अवस्थेमध्ये येतो.



आ. ८२ : नालदर्शन






आ. ८३ : गर्भाची ऊर्ध्वगती असताना गर्भ-स्फिक्भागाचे अंतःपरिवर्तन.
(१) स्त्री-कटिर (२) गर्भाचा स्फिक्भाग.

## अपरादर्शन

हा एक मूढगर्भाचाच प्रकार मानावा लागेल. कारण अपरा ही एक गर्भाचाच भाग आहे व ही अपरा प्राकृत अवस्थेत गर्भाशयाच्या वरील बाजूस तयार झालेली असते. अपरादर्शन या अवस्थेत ती गर्भाशयमुखापाशीच तयार होते. म्हणजेच तिचे प्राकृत आसन किंवा स्थिती बदलून तिला विकृत स्वरूप प्राप्त होते.

**कारणे :**

वायूच्या चलगुणामुळे गर्भाशयाच्या वरील बाजूस अपरा संसक्त न होता मुखापाशीच संसक्त होते.

**प्रकार :**

(१) गर्भाशयाच्या मुखाशी संपूर्णतः अपरा असणे–अकाल प्रसवात आढळते.

(२) गर्भाशयाच्या मुखाशी अर्धा भाग अपरेने व्यापलेला असणे–उपस्थित प्रसवेमध्ये आढळते.

(३) गर्भाशयाच्या मुखापाशी अल्पभाग अपरेने व्यापलेला असणे–उपस्थित प्रसवेमध्ये आढळतो.




आ. ८४




आ. ८५ अपरादर्शन
१. अपरा २. गर्भाशय






आ. ८६ : अपरादर्शन
(१) अपरा (२) गर्भाशय

लक्षणे : उदरशूलविरहित (आवी न येता) योनिगत रक्तस्राव प्रभूत प्रमाणात होणे. पांडू, भ्रम, अस्वस्थता, रक्तदाब कमी होणे. हस्तपादशीतता, नाडी क्षीण होणे. अरती मातेस विपन्नावस्था प्राप्त होऊन मातेचा मृत्यू होतो. तसेच गर्भही मृत होतो.

पहिल्या प्रकारात गर्भशिर चल असते. दुसऱ्या प्रकारात अल्पचल असते. तिसऱ्यात ते अचल असते.

**चिकित्सा-प्रकारानुरूप :**

(१) गर्भाशयाच्या मुखाशी संपूर्णतः अपरा असताना-कोणत्याही महिन्यात योनिगत रक्तस्राव आवी न येता, प्रभूत प्रमाणात होत असेल तर गर्भिणीच्या बलाचे रक्षण करून वामदेवीय प्रसव करून गर्भिणीस वाचवावे.

रक्तस्राव अल्प प्रमाणात असेल व रुग्णेचे बल उत्तम असेल तर पूर्ण विश्रांती देऊन रक्तस्तंभक व रक्तस्कंदन चिकित्सा द्यावी.

रुग्णेस रुग्णालयात प्रवेशित करूनच चिकित्सा द्यावी. कारण या अवस्थेमध्ये साधारणतः वामदेवीय प्रसवच करावा लागतो.

ज्या ठिकाणी वामदेवीय प्रसवाची सोय नसते वा वामदेवीय प्रसवास रुग्णेची वा जबाबदार नातेवाइकांची तयारी नसते त्या वेळी वैद्याने रुग्णेस संमोहन देऊन सर्व स्वच्छता, निर्जंतुकता पाळून योनिमार्गे गर्भाशयमुखातून हस्तक्षेप करून अपरेचा भेद करावा व गर्भाचा पाय (एक अथवा दोन) गर्भाशयमुखातून बाहेर ओढून गर्भनिर्हरण करावे व मग अपरा पण संपूर्णपणे काढावी.

गर्भाशयाच्या मुखाशी अर्धा भाग अपरेने व्यापलेला असताना—रुग्णेस रुग्णालयात प्रवेशित करून मगच चिकित्सा द्यावी. या प्रकारामध्ये उपस्थित प्रसवेच्या अवस्थेमध्ये प्रभूत असा रक्तस्राव होऊ लागतो. त्या वेळी वैद्याने रुग्णेची संपूर्ण परीक्षा करून वामदेवीयाची तयारी ठेवून योनिपरीक्षा करावी व गर्भाशयमुखातून जरायूचे भेदन करता येईल किंवा नाही याचा अंदाज घेऊन लगेच गर्भोदक स्रुती करावी म्हणजे गर्भाचा अल्पचल असा असलेला अवयव गर्भाशयमुखात येऊन मुखस्थ असलेल्या अपरेवर दडपण घालून होत असलेला रक्तस्राव थांबवावा. यामुळे जर रक्तस्राव थांबला नाही तर मात्र त्वरित वामदेवीय करून गर्भ व माता यांना वाचवावे. या प्रकारात बराच वेळ रक्तस्राव होत राहिला तर जीवनक्षम असलेल्या या गर्भास विपन्नावस्था प्राप्त होऊन गर्भ मृत होतो.

याच प्रकारात गर्भोदकस्रुती केल्यानंतर जर गर्भशिर हे गर्भाशयमुखावर दाब देण्यासाठी स्थिर करावयाचे असेल तर सकील स्वस्तिकयंत्र शिराच्या ठिकाणी लावून ते युक्तीने सर्व स्वच्छता पाळून योनीच्या बाह्य भागी ओढून धरावे.



आ. ८७ : सकील स्वस्तिकयंत्र (गर्भ-शिर पकडण्यासाठी)

(३) गर्भाशयाच्या मुखापाशी अल्प प्रमाणात अपरा असताना— या प्रकारामध्ये उपस्थितप्रसवेच्या अवस्थेमध्येच नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात योनिगत रक्तस्राव होतो. अशा वेळी बहुशः गर्भाशयमुखाची संपूर्णतः विस्तृती झालेली असते. याच वेळी वैद्याने आवीमध्ये गर्भोदकस्रुती योग्य ती स्वच्छता पाळून करावी म्हणजे थोड्याच वेळात आवी वाढून गर्भनिष्क्रमण होते.



## मूढगर्भाची साध्यासाध्यता :

मूढगर्भाच्या या वर उल्लेखिलेल्या प्रकारांतील पहिले सहा प्रकार कष्टदायक असले तरी उपचारांनी साध्य करता येण्यासारखे आहेत. परंतु शेवटचे दोन प्रकार मात्र असाध्य आहेत.

गर्भिणीमध्ये पहिल्या सहांतही जर शब्द, स्पर्श, रूप, रस, गंधाची विकृती उत्पन्न झाली असेल तर मूढगर्भचिकित्सा असाध्य होते.

तसेच आक्षेपक, इतर वातव्याधी, योनिभ्रंश, योनिसंवरण, उग्र स्वरूपाचे श्वास, कास, भ्रम हे व्याधी जर असतील तर चिकित्सा यशस्वी होत नाही, म्हणून ती करू नये.

मूढगर्भातील शेवटच्या दोन प्रकारांना वाग्भटाने 'विष्कंभ' अशी संज्ञा दिली आहे.

गर्भ व गर्भिणी या दोघांचेही संरक्षण करण्यासाठी ज्या वेळी चिकित्सा केली जाते व तिला यश येते त्या वेळीच तो मूढगर्भ साध्य आहे असे म्हणता येईल. अर्थात ही साध्यताही कष्टसाध्यच आहे. कष्टाने का होईना पण पहिल्या पाच प्रकारांमध्ये गर्भिणीवर करावयाचे उपचार त्वरित झाले व चतुष्पाद संपत् चांगली असली तरच चिकित्सा व्यवस्थित होते. या कामी जो जो विलंब होत जाईल तो तो यशाची आशा दुरावत जाते. विशेषतः गर्भाला वाचविता येत नाही. याहीपेक्षा विलंब झाला व वर सांगितल्याप्रमाणे उपद्रव ( विपरितेन्द्रियार्थादी ) दिसू लागले तर गर्भिणीला वाचविणेही अशक्य होते. शेवटचे दोन मूढगर्भ यांना वाग्भटाने 'विष्कंभ' म्हटले आहे. त्यांची असाध्यता प्रधानतः गर्भसंरक्षणाच्या दृष्टीनेच समजावी. गर्भिणीवरील उपचार त्वरित व कुशलतेने केले तर त्या स्त्रीस वाचविण शक्य होते.

– तत्र द्वावन्त्यावसाध्यौ मूढगर्भौ, शेषानपि विपरीतेन्द्रियार्थाक्षेपकयोनिभ्रंशसंवरण-मक्कल्लश्वासकासभ्रमनिपीडितान् परिहरेत् ॥
टीका— तेष्वसाध्यान्निर्दिशन्नाह— तत्रेत्यादि । द्वावन्त्यौ सप्तमाष्टमावसाध्यौ स्वभावेनैव । अन्येष्वप्यवस्थयाऽसाध्यत्वं दर्शयन्नाह – शेषानपीत्यादि । विपरीतेन्द्रियार्थादिभिः पीडिता जननी यैर्मूढगर्भैस्ते तथाविधास्तान् । विपरीतेन्द्रियार्था रूपाद्यर्थग्रहण भ्रान्ताः । योनिभ्रंशो योनिर्बहिर्गमनम् । योनिसंवरणं योनिसङ्कोचः प्रसूताया वायुरसृगारोध्य बस्तिशिरः प्रभृतिषु शूलं करोति स मक्कलः भ्रमश्चक्राधिरूढस्येव भ्रमणम् । सु. नि. अ. ८–६

– हस्तपादशिरोभिर्यो योनिं भुग्नः प्रपद्यते ।
पादेन योनिमेकेन भुग्नोऽन्येन गुदं च यः ॥
विष्कम्भौ नाम तौ मूढौ शस्त्रदारणमर्हतः ॥ वा. शा. अ. २–२९ ते ३०

## मूढगर्भ चिकित्सा :

मूढगर्भावर औषधी चिकित्सेचा काही विशेष उपयोग होत नाही. यंत्रशस्त्राने करावयाची चिकित्सा हीच काय ती मूढगर्भाच्या बाबतीत शक्य आहे. त्यातही मूढगर्भाकरिता करावे लागणारे यंत्रशस्त्रकर्म इतर यंत्रशस्त्रसाध्य कर्मापेक्षा विशेष अवघड आहे. सुश्रुताने मूढगर्भावरील चिकित्सेच्या आरंभीच या काठिण्याचा उल्लेख केला आहे. मूढगर्भावर उपचार करून त्या शल्याचे ( मूढगर्भरूप ) उद्धरण करण्याइतके कष्टदायक कृत्य दुसरे कोणतेही नसेल. या ठिकाणी योनी, यकृत, प्लीहा, आंत्र यासारखे नाजूक व महत्त्वाचे अवयव सभोवती असताना मधील अंतराळात गर्भाशयामध्ये केवळ स्पर्शज्ञानाने निर्णय घेऊन कर्म करावयाचे असते. ते कर्मही सरळ एकमार्गी एकाच प्रकारचे नसते. पुढे दिल्याप्रमाणे त्याचे अनेक प्रकार संभवतात.

(१) उत्कर्षण— खाली गेलेल्याला वर करणे.

(२) अपकर्षण— वर चढलेल्याला खाली ओढणे.

(अ) अपत्यपथामध्ये अडकून बसलेल्या, उताण्या स्थितीत असलेल्या गर्भाला गर्भशय्येमध्ये सरकवणे व वळवून पालथे करणे.

(ब) उद्वर्तन-पालथ्या स्थितीत अडकून बसलेल्याला उताणा करणे. या ठिकाणी स्थानापवर्तनाऐवजी स्थानव्यावर्तन असा पाठ कोणी घेतात असे टीकाकाराने सांगितले आहे व त्याचा अर्थ करताना गर्भशय्येमध्ये असलेली गर्भाची तिर्यग्, उत्तान, ऊर्ध्व, अवाक् अशी स्थिती फिरवून पाहिजे तशी करणे असा त्याचा अर्थ केला आहे.

— नातः कष्टतममस्ति कथा मूढगर्भशल्योद्धरणं; अत्र हि योनियकृत्प्लीहान्त्रविवरगर्भाशयानां मध्ये कर्म कर्तव्यं स्पर्शेन, उत्कर्षणापकर्षणस्थानापवर्तनोत्कर्तनभेदनच्छेदनपीडनर्जूकरणदारणानि चैकहस्तेन गर्भं गर्भिणीं चाहिंसता, तस्मादधिपतिमापृच्छ्य परं च यत्नमास्थायोपक्रमेत ।। सू. चि. अ. १५-३

टीका—

उत्कर्षणमधोगतस्योर्ध्वीकरणं, अपकर्षणमूर्ध्वगतस्याधः कर्षणं; स्थानापवर्तनं स्थानेषु सक्तस्य गर्भशय्यात् उत्तानस्यावाङ्मुखीकरणम्, उद्वर्तनमवाङ्मुखस्योत्तानीकरणम्, अत्र केचित् स्थानव्यावर्तनमिति पठन्ति तत्र स्थाने गर्भशय्यायां तिर्यगादिस्थितस्योत्तानस्याधोव्यावृत्या स्थापनम्; ऊर्ध्वस्य कस्यचिदङ्गस्य छेदनमुत्कर्तनं छेदनमिति मृतस्य तु तेषु तेषु स्थानेषु सक्तस्य तस्याङ्गस्य छेदनं द्वैधीकरणं, गर्भकुक्ष्यादेराध्मातस्य विदारणं, भेदनं, पीडनं, चम्पनं (वलनम्), ऋजूकरणं वक्रस्य प्राञ्जलीकरणं दारणं विदारणम् ।



(३) उत्कर्तन— गर्भाचे जे अवयव खाली न येता वरच राहिले असतील (तृतीय आवर्तामध्ये ) त्यांचे छेदन करून ते बाहेर काढणे.



आकृती ८८ : व्रीहिमुखस्वस्तिकशस्त्र

अ)




आकृती ८९ : गर्भाच्या शिराचे भेदन करीत असतांना
(१) गर्भशिर (२) व्रीहिमुखस्वस्तिकशस्त्र (३) वैद्याचा हात

(४) भेदन— गर्भाचे डोके, पोट फार मोठे असेल त्या वेळी ते फोडून लहान करणे.

(५) छेदन— (मृत) गर्भ ज्या ज्या अवयवांनी मार्गामध्ये अडकून राहिला असेल ते ते अवयव तोडणे.

(६) पीडन—चेपणे, वळविणे, दाबणे.

(७) ऋजूकरण—वाकडे असलेल्याला सरळ करणे.

(८) दारण–विदारण– कापणे.




आकृती ९० : गर्भशिराच्या छेदन व भेदनानंतर गर्भशिर पकडून बाहेर काढीत असताना (१) गर्भशिर (२)त्रितालयंत्र (३) वैद्याचे हात



(टीकाकाराने केलेल्या स्पष्टीकरणासह ही जी सुश्रुतोक्त ८ कर्मे येथे सांगितली आहेत त्यांतील उत्कर्षण, अपकर्षण, स्थानापवर्तन, ऋजूकरण ही चार कर्मे यंत्रसाध्य असून त्यांनी गर्भ-गर्भिणी या दोघांनाही वाचविता येते. इतर जी पाच कर्मे आहेत ती शस्त्रसाध्य असून त्यांनी गर्भाचा नाश होतो, गर्भिणी मात्र वाचविता येते.)

ही सर्व कर्मे (बहुधा) एका हाताने करावी लागतात. ही कर्मे करीत असताना गर्भ व गर्भिणी यांचा उपघात होऊ नये अशी काळजी घ्यावयाची असते. (ते नेहमीच शक्य होत नाही.) उपघात होण्याची विशेषतः गर्भ नाश होण्याची फार शक्यता असते. म्हणून हे उपचार करण्यापूर्वी अधिकारावर असलेल्या व्यक्तीची पूर्वसंमती घ्यावी व मगच कुशलतेने प्रयत्नपूर्वक उपचार करावेत.

सुश्रुताच्या या सूचनेकडे लक्ष देणे आवश्यक आहे. वर्णनाच्या रोखावरून मूढ-गर्भावरील शस्त्रकर्म सुश्रुतकाली प्रधानतः योनिमार्गातूनच खालच्या खालून करीत असावेत असे दिसते.

## दैवव्यपाश्रय चिकित्सा :

सुश्रुताने मूढगर्भ सोडविण्यासाठी मंत्रजपाची दैवव्यपाश्रय चिकित्साही सांगितली आहे.

[1]श्रद्धा, विश्वास व अधिकार असणाराने योग्य वाटले तर हाही उपचार करून बघावा. दैवव्यपाश्रय चिकित्सेसही महत्त्व आहे; पण तो त्या पद्धतीच्या विशेषज्ञांचा व अधिकारी व्यक्तींचा प्रश्न आहे. आम्ही युक्तिव्यपाश्रय चिकित्सा पद्धतीचा अवलंब करणारे आहोत. म्हणून उल्लेखापलीकडे या पद्धतीचे वर्णन करणे आम्हास शक्य नाही.

## [2]औषधी चिकित्सा :

अपरापतन प्रकरणामध्ये सांगितलेली हातापायास लेप लावणे, योनिधूपन करणे, स्त्रीला औषधे प्राशनासाठी देणे ही जी औषधी चिकित्सा सांगितलेली आहे ती आरंभी करावी.

औषधी चिकित्सा निष्फळ झाल्यानंतर मूढगर्भासाठी यंत्रशस्त्र करून शल्य (गर्भ)

१ जीवति तु गर्भे सुतिकागर्भनिर्हरणे प्रयतेत ।
निर्हर्तुमशक्ये च्यावनान् मन्त्रानुपश्रृणुयात्; तान् वक्ष्यामः ।।
इहामृतं च सोमश्च चित्रभानुश्च भामिनि । उच्चैःश्रवाश्च तुरगो मन्दिरे निव-सन्तु ते ।। इदममृतमपां समुद्धृतं वै तव लघु गर्भमिमं प्रमुञ्चतु स्त्रि ।।
तदनलपवनार्कवासवास्ते सह लवणाम्बुधरैर्दिशन्तु शान्तिम् ।।
मुक्ताः पशोर्विपाशाश्च मुक्ताः सूर्येण रश्मयः ।
मुक्तः सर्वभयाद्गर्भ एह्येहि विरमावितः । सु. चि. १५, ५ ते ८
२ औषधानि च विदध्याद्यथोक्तानि, सु. चि. अ. १५–९
– औषधानीत्यादि तानि पुनः शारीरे अपरापातनोदितानि । टीका सु. चि. अ. १५–९

निर्हरण करावे. मूळग्रंथात जरी जिवंत गर्भाचा उल्लेख नसला, केवळ मृते एवढेच पद असले तरी पुढे आलेल्या चकारावरून या ठिकाणी जिवंत गर्भासंबंधीचे उपचार याच पद्धतीने ( पण अधिक काळजीपूर्वक ) करावे असे जे टीकाकाराने सुचविले आहे ते योग्य आहे.

योगरत्नाकराने गर्भ जिवंत असून मूढ झाला असेल तर तूप माखलेल्या हाताने युक्तीने तो काढावा आणि गर्भ मृत झाला असेल तरच शस्त्र वापरावे असे स्पष्ट सांगितले आहे.

हे उपचार करीत असताना स्त्रीला उताणे निजवून तिचे पाय गुडघ्यात दुमडून वर करावेत व तिच्या कमरेखाली वस्त्राची चुंबळ देऊन कटी उंच करावी. नंतर हातास ( नखे काढलेल्या, स्वच्छ धुतलेल्या ) धावडा, शल्लकी ( राळेचा वृक्ष ) शाल्मली यांचा पिच्छिल असा निर्यास व तूप माखून हात योनीतून बेताने आत घालून गर्भ ओढून काढावा.

**१–कील :**

**चिकित्सा तत्त्व :** गर्भाच्या मूढगर्भातील गतींचा विचार केला असताना या प्रकारात गर्भाची ऊर्ध्वगती आढळून येते. या ऊर्ध्व गतीमधून गर्भाला न्युब्ज गतीत आणणे आवश्यक असते.

## तपशील–उपस्थित प्रसवेमधील चिकित्सा :

ह्या अवस्थेत जर मूढगर्भ असला, तर प्रथम शक्य झाल्यास गर्भाचे शिर अपत्यपथात आणण्याचा प्रयत्न करावा.

(१) प्रथम पीडन व नंतर ऋजुकरण करावे.

---

– मृते चोत्तानाया आभुग्नसकथ्या वस्त्राधारकोन्नमितकटया धन्वननगवृत्तिकाशाल्मलीमृत्स्नघृताभ्याम्रक्षयित्वा हस्तं योनौ प्रवेश्य गर्भमुपहरेत् ॥

सु. चि. अ. १५–९

– निष्फले मन्त्रे तन्त्रे च, भिषजा शल्याहरणोपायं निर्दिशन्नाहमृतेचेति । चकारादफलीभूतेषु मन्त्रतन्त्रप्रसूतीजननव्यापारेषु । जीवत्यपीत्यनुक्तं समुच्चीये । आभुग्नसक्थ्या इति सङ्कुचितसक्थ्याः । धन्वनो धनुर्वृक्षः नगवृत्तिका शल्लकी, यद्यपि मृत्स्नशब्दः प्रशस्तायां मृदि वर्तते तथाऽप्यत्र धनुर्वृक्षशल्लकीशाल्मलीनां पिच्छिलेष्वेव मृत्स्नशब्दो बोद्धव्य घृतं गव्यं, ताभ्यां पाणीम्रक्षयित्वा विलिप्य, मूढगर्भमपहरेत् । टीका सु. चि. अ. १५–९

– गर्भे जीवति मूढं तु गर्भं यत्नेन निर्हरेत् ।
हस्तेन सर्पिषाक्तेन योनेरन्तर्गतेन च ।
मृते तु गर्भे गर्भिण्या योनौ शस्त्रं प्रवेशयेत् । यो. मूढगर्भ पृ. ५९९



प्रत्यक्षामध्ये या दोन्ही क्रिया आपणास प्रसव सुरू झाल्यानंतर करावयाच्या आहेत. या अवस्थेमध्ये आवी सुरू झाल्या असल्यास या क्रिया दोन आवींच्यामध्ये जो काल असतो त्यात कराव्या म्हणजे पीडन व ऋजुकरण करणे सुलभ जाते.

या क्रिया करत असताना, विशेषत: ऋजुकरण करत असताना काही गोष्टी वैद्याने लक्षात ठेवणे आवश्यक असते. त्या अशा—

(१) गर्भ हा आभुग्न स्थितीतच फिरविला गेला पाहिजे.

(२) फिरवताना गर्भिणीच्या उच्छ्वसनाच्या कालामध्येच फिरवावा.

(३) शक्य तो संमोहन न देता परिवर्तन करावे; कारण हे परिवर्तन करत असताना गर्भोपघात होण्याची शक्यता असते. ती गर्भिणी शुद्धीवर असेल तरच वैद्यास गर्भिणीत उत्पन्न होणाऱ्या शूलादी लक्षणांवरून गर्भोपघात कळू शकेल.

गर्भोपघाताची कारणे पुढीलप्रमाणे होऊ शकतात.

(१) अपरेचे गर्भाशयात असून अकाली विमुक्तिबंध होणे.

(२) गर्भनाभीनाडीचे गर्भाच्या मानेभोवती जास्त प्रमाणात गुंडाळली जाणे.

(३) क्वचित गर्भनाभीनाडीला गाठ बसणे.

(४) अकाली गर्भोदकस्रुती होणे.

वरील धोके टाळण्यासाठी ऋजुकरण केल्यावर गर्भिणीचे वरचेवर परीक्षण करावे. व त्यात गर्भ हृद्स्पंद, गर्भचलन व गर्भाशयाच्या ठिकाणी स्पर्शासहत्व आहे किंवा काय ते पाहावे. वरील परीक्षणावरून गर्भ विपन्नावस्थेत नाही ना याची खात्री करून घ्यावी.

क्वचित प्रसंगी प्रत्यक्षात हे गर्भपरिवर्तन करणे वैद्यास शक्य होत नाही. अशा वेळी प्रजनयिष्यमाणा या अवस्थेपर्यंत– (गर्भाशयमुख संपूर्ण विस्तृत होईपर्यंत) थांबावे. व नंतर प्रजनयिष्यमाणामध्ये दिलेली पुढील चिकित्सा करावी.

परंतु या मध्यंतरीच्या काळात गर्भाला विपन्नावस्था प्राप्त झाली तर मात्र उदरपाटनपूर्वक म्हणजे वामदेवीय प्रसव करावा.

## प्रजनयिष्यमाण अवस्थेमधील चिकित्सा :

संमोहन देऊन व गर्भाशयमुख संपूर्ण विस्तृत झाल्यावरच चिकित्सा करावी. वर दिलेल्या नियमाप्रमाणे गर्भशिर हे योनीत आणणे आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्षात वैद्याला योनीतून हस्त वा यंत्र घालून गर्भशिर खाली आणणे अशक्यप्राय होते. म्हणून गर्भाचा पाय वैद्याने स्वहस्ताने सुलभ रीतीने पकडून खाली ओढून आणावा. अशा तऱ्हेने दोन्ही पाय खाली आणून गर्भाची प्रसूती करावी. वरील क्रियेत डोक्याचे उत्कर्षण व पायाचे अपकर्षण या दोन क्रियांच्या सहाय्याने ऋजुकरण करावे लागते.

### २–प्रतिखुर :

**चिकित्सा तत्त्व** : या मूढगर्भात गर्भाची शिराच्या अपेक्षेने तिर्यक् गती असते. ही गती बदलून न्युब्ज गती करणे हे आवश्यक असते.

**तपशील :**

उपस्थितप्रसवा व प्रजनयिष्यमाणा या अवस्थांमधील चिकित्सा—

( १ ) पीडन. ऋजुकरण.

कीलकामध्ये सांगितलेले सर्व नियम लक्षात ठेवून गर्भशिर हे कटिरामध्ये जाईल अशा रीतीने परिवर्तन करावे. हे परिवर्तन करणे अशक्य झाल्यास प्रजनयिष्यमाणा अवस्था प्राप्त होईपर्यंत ( गर्भाशयमुख संपूर्ण विस्तृत होईपर्यंत ) थांबावे व गर्भिणीस संमोहन देऊन व गर्भोदकस्नुती करून गर्भाचे दोन्ही पाय बाहेर ओढावेत. या क्रियेमुळे गर्भाचे दोन्ही हात व डोके गर्भाशयात वरच्या बाजूस जातील व पुढील प्रसव 'पायाकडून होणाऱ्या प्रसवानुसार करावा.'

### ३–बीजक :

**चिकित्सा तत्त्व** : या अवस्थेत मूढगर्भाची तिर्यग् गती असते, ती न्युब्ज गती करणे.

**तपशील** : हा प्रकार प्रजनयिष्यमाणा अवस्थेतच सापडतो. म्हणून उपस्थित-प्रसवेमध्ये याची चिकित्सा करणे संभवत नाही.

तिर्यग् गतीची न्युब्ज गती करत असताना योनीमधून गर्भाचा बाहेर आलेला हात प्रकृत अवस्थेमध्ये वर ढकलणे वैद्यास अशक्य असते. तरीसुद्धा वैद्याने संमोहन देऊन तो हात आत घालण्याचा प्रयत्न केल्यास बालकाच्या हाताला इजा होण्याची शक्यता असते. म्हणून साक्षात हात वर ढकलण्याचा प्रयत्न कधीही करू नये. तर रुग्णेस संमोहन देऊन पुढील चिकित्सा करावी.

गर्भाशयमुखाची संपूर्ण विस्तृती झाल्यानंतर वैद्याने गर्भाच्या हाताच्या खालून स्वतःचा उजवा हात गर्भाशयमुखातून गर्भाशयात घालून गर्भाचा पाय बोटांमध्ये पकडून गर्भाशयमुखाकडे वळवून खाली ओढावा. हा पाय ओढत असताना गर्भाचा पकडलेला हात सोडून द्यावा. गर्भाचा पाय जसजसा योनिमुखाशी येईल, तसतसे गर्भाचे शिर गर्भाशयमुखापासून गर्भशय्येकडे म्हणजेच वरती ओढले जाईल. त्याच-बरोबर गर्भाचा बाहेर आलेला हातही आशयामध्ये कोणत्या तऱ्हेची इजा न होता ओढला जातो व योनिमुखातून गर्भाचे दोन्ही पाय खाली आणणे सुलभ होते.

### ४– परिघ :

**चिकित्सा तत्त्व** : या मूढगर्भाच्या प्रकारात गर्भाची गती तिर्यग् असते. (शिर-वाम वा दक्षिण पार्श्वामध्ये असते ) ती न्युब्ज करणे.



**तपशील** : अवस्थेनुरूप–पीडन, ऋजुकरण.

**उपस्थितप्रसवा** : ह्या अवस्थेमध्ये वैद्यान गर्भाचे बाहेरून म्हणजे उदरावरून गर्भ परिवर्तन करून ऋजुकरण करावे.

**प्रजनयिष्यमाणा** : या प्रकारात या अवस्थेत मूढगर्भ झाला तर गर्भशिर हे खाली ओढून आणणे कष्टप्राय होते. म्हणून वैद्याने गर्भाशयात हात घालून गर्भ फिरविण्याइतके गर्भाशयमुख विस्तृत झालेले असल्यास गर्भाचा पाय पकडून योनिमुखातून बाहेर आणून ठेवावा. व नंतर याच पद्धतीने दुसराही पाय खाली आणून शक्य झाल्यास पायाकडून प्रसूती करावी. अन्यथा दोन्ही पाय गर्भाशयमुखातून बाहेर काढून ठेवून सहजप्रसूती होण्याची वाट पाहावी.

गर्भ फिरविणे अशक्य झाल्यास, गर्भाला किंवा मातेला विपन्नावस्था दिसू लागल्यास त्वरित उदरपाटनपूर्वक प्रसव करावा.

## सुश्रुतानुसार चिकित्सा :

१. दोन्ही तंगड्या खाली आल्या असतील तर क्रिया :

( १ ) अपकर्षण, ( २ ) अवाङ्मुखीकरण, ( ३ ) उद्वर्तन.

**तपशील** : दोन्ही तंगड्या योनीच्या बाहेर आल्यावर त्या ओढून बाहेर काढाव्यात. याच पद्धतीने गर्भ छातीपर्यंत ओढून घ्यावा. नंतर गर्भाचा अंश बाहेर काढण्यासाठी गर्भ अशा तऱ्हेने फिरवावा की एक अंस भगास्थीच्या खाली येईल. हा अंस प्रथम गर्भाच्या छातीकडे थोडा दाबावा व सोडवून घ्यावा. त्याचप्रमाणे दुसरा अंस बाहेर काढण्यासाठी त्रिकास्थीच्यापासून तो अंस छातीकडे दाबून बाहेर काढावा. गर्भ अवाङ्मुख करावा. अशा तऱ्हेने स्फिक्भाग व अंसभाग योनीबाहेर येईल व गर्भाचे शिर हे गर्भाशयात असेल. या वेळी वैद्याने गर्भाच्या मुखामध्ये आपली मध्यमा घालून गर्भाची हनुवटी गर्भाच्या छातीला भिडवून शिराचे उद्वर्तन करावे. या योगाने

– तत्र सक्थिभ्यामागतमनुलोममेवाञ्छते, एक सक्थ्ना प्रतिपन्नस्येतरसक्थि प्रसार्या-पहरेत् स्फिग्देशेनागतस्य स्फिग्देशं प्रपीड्योर्ध्वमुत्क्षिप्य सक्थिनी प्रसार्यापहरेत् ।।
सु. चि. अ. १५–९

– मृतं चेति चकारात् अपहरणे विशेषेण विधिमाह– तत्रेत्यादि आच्छेत् आकर्षेत् । एकसक्थ्नेति प्रथममेकसक्थिप्रतिपन्नं, द्वितीयसक्थिपुनराभुग्नं कृत्वाऽऽगतं, तदपि प्रसार्य प्रगुणीभूतसक्थिद्वयमपहरेघालाणार्थमाञ्छेदिति पूर्वस्माद्विशेषः; सक्थि जङ्घोच्यते; अयं द्वितीयः स्फिगित्यादि अयं तृतीयः ।
टीका सु. चि. अ. १५–९




आकृती ९१






आकृती ९२

गर्भशिर हे आभुग्न स्थितीमध्ये राहून बाहेर येण्यास मदत होते. याच वेळी परिचारिकेने गर्भिणीच्या उदरावरून गर्भाशयाला पीडन केले असता गर्भनिष्क्रमणाला मदत होते. वरील प्रसवकालात वैद्याने गर्भाला विपन्नावस्था प्राप्त होणार नाही अशी काळजी घ्यावी. विपन्नावस्था येऊ नये यासाठी खालील काळजी घ्यावी.

(१) सर्व क्रिया द्रुतगतीने कराव्यात.

(२) जो जो गर्भाचा भाग योनिमुखातून बाहेर येऊन बाह्य वातावरणाशी संसर्ग पावत असेल तो तो भाग वैद्याने वस्त्राने गुंडाळून मगच पुढील अवयव बाहेर काढावेत.

(३) गर्भसंगाकडे लक्ष ठेवून ज्या भागाचा संग होईल, उदा.- स्फिक्, अंस, शिर. यांपैकी प्रत्येकाचा संग दूर करावा. स्फिक् भागाचा विटपछेदाने; अंसाचा उद्वर्तनाने व उपवर्तनाने; शिराचा गर्भ शंकूने संग दूर करावा.

२. एकाच पायाने गर्भ बाहेर आला असेल तर दुसरा पायही ओढून सोडवून बाहेर काढावा व मग सर्वांग मागीलप्रमाणेच ओढून बाहेर काढावे.

३. नितंब—गर्भाचा नितंब भाग गर्भाशयमुखात आला असेल तर (या वेळी गर्भाची पावले गर्भाच्या हनुवटीवर दाबून धरलेली असतात.) नितंब दाबून वर ढकलावेत. म्हणजेच उत्कर्षण करावे व त्याचे पाय ओढून अपकर्षणाने खाली आणावेत आणि नंतर मग हळू हळू सर्व गर्भ वरीलप्रमाणेच सोडवावा.

४. गर्भ क्वचित आडवा होऊन त्याचा पुरोभाग (छाती व पोट) पुढे येतो—

अशा वेळी पाठीमागचा भाग वर ढकलावा. आणि पुढील डोक्याकडचा भाग अपत्यमार्गामध्ये आणून त्यास आडव्याचे सरळ करावे व गर्भ बाहेर काढावा.

प्रत्यक्षात गर्भशिर योनीत आणणे शक्य न झाल्यास वैद्याने गर्भाशयामध्ये आपला हात घालून गर्भाचा पाय खाली आणून गर्भ पायाकडून ओढून घ्यावा व मग हळू हळू सर्व गर्भ सोडवावा. (म्हणजेच परिघाप्रमाणे करावे.)

— तिर्यगागतस्य परिघस्येव तिरश्चीनस्य पश्चादर्धमूर्ध्वमुत्क्षिप्य पूर्वार्धमपत्यपथं प्रत्यार्जवमानीयापहरेत्, पार्श्वापवृत्तशिरसमंसं प्रपीड्योर्ध्वमुत्क्षिप्य शीरोऽपत्यपथमानीयापहरेत्, बाहुद्वयप्रतिपन्नस्योर्ध्वमुत्पीड्यांसौ शिरोऽनुलोममानीयापहरेत् ।
सु. चि. अ. १५–९

— तिर्यगित्यादि परिघोऽर्गलादण्डः आर्जवमानीय ऋजुभारमानीयापहरेदिति अयं चतुर्थः । पार्श्वेत्यादि पार्श्वापिवृत्तं पार्श्ववलितं शिरो यस्य, अपत्यपथो योनिः, अयं पञ्चमः । बाहुद्वयेत्यादि अयं षष्ठः । आद्यं मूढगर्भत्रितयं पादाभ्यामाहरणीयं, तदितरत्तु त्रितयं शिरसा ॥ टीका सु. चि. अ. १५–९



५. ज्या वेळी गर्भ पार्श्वापवृत्त होतो, डोके स्त्रीच्या पार्श्वभागी शिरलेले असून योनिमुखाशी गर्भाचा पार्श्वभाग येतो त्या वेळी पुढे आलेला गर्भाचा खांदा (अंस) दाबून वळवून वर ढकलावा व त्याचे शिर अपत्यपथात आणून गर्भ सोडावा.

प्रत्यक्षात ही क्रिया करणे अशक्य झाल्यास गर्भाला पायाकडून वळवून ओढून घ्यावा व मग सर्व गर्भ सोडवावा.

६. गर्भाचे दोन्ही हात जर पुढे आलेले असतील तर त्याचे खांदे दाबून वर सरकावेत आणि डोके खाली आणून गर्भ ओढून बाहेर काढावा.

ही जी गर्भ फिरवून बाहेर काढण्याची पद्धती निरनिराळ्या अवस्थांनुरूप निरनिराळी वर्णन केली आहे ती त्या त्या प्रकारापुरतीच मर्यादित आहे असे समजण्याचे कारण नाही. टीकाकाराने पायाकडून काढण्याच्या व डोक्याकडून काढण्याच्या पद्धतीचा जो संकलितपणे उल्लेख केला आहे, त्यांतील कोणताही प्रकार अवस्थेनुरूप कोणत्याही प्रकारच्या मूढगर्भासाठी वापरावयास हरकत नाही.

'एवमशक्ये शस्त्रमवचारयेत् ॥' सु. चि. अ. १५–९

ज्या वेळी हाताने वा गर्भ काढण्यासाठी वापराव्या लागणाऱ्या इतर यंत्रसाधनांनी गर्भ काढणे अशक्य होईल त्या वेळी त्या साध्य म्हणून सांगितलेल्या अष्टविध मूढगर्भांपैकी पहिल्या सहा प्रकारांतही शस्त्रकर्म करावे.

७–८. आठ प्रकारांपैकी शेवटचे दोन प्रकार मूलतःच असाध्य आहेत. त्या ठिकाणी वामदेवीय प्रसवावाचून दुसरा उपाय नाही.

शस्त्रकर्मामध्ये बहुधा गर्भाचा नाश होतो. गर्भ नाश होऊ न देणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून अवयवछेदादी प्रकार करण्यापूर्वी गंभीरपणे विचार करणे अवश्य आहे. ही आवश्यकता वैद्याच्या मनावर चांगली ठसवावी, यासाठी प्राचीन ग्रंथकाराने एक प्रकारचा धाक शस्त्रकर्म चिकित्सकास घातला आहे.

— तिर्यगागतस्य परिघस्येव तिरश्चीनस्य पश्चादर्धमूर्ध्वमुत्क्षिप्य पूर्वार्धमपत्यपथं प्रत्यार्जवमानीयापहरेत् पार्श्वापवृत्तशिरसमंसं प्रपीड्योर्ध्वमुत्क्षिप्य शिरोऽपत्यपथमानीयापहरेत्, बाहुद्वयप्रतिपन्नस्योर्ध्वमुत्पीड्यांसौ शिरोऽनुलोममानीयापहरेत् ।
सु. चि. अ. १५–९

— तिर्यगित्यादि परिघोऽर्गलादण्डः आर्जवमानीय ऋतुभावमानीयापहरेदिति अयं चतुर्थः । पार्श्वेत्यादी पार्श्वापिवृत्त पार्श्ववलितं शिरो यस्य, अपत्यपथो योनिः, अयं पञ्चमः । बाहुद्वयेत्यादी अयं षष्ठं । आद्यं मूढगर्भत्रितयं पादाभ्यामाहरणीयं, तदितस्तु त्रितयं शिरसा । टीका सु. चि. अ. १५–९

पूर्वाचार्य म्हणतात की, जिवंत गर्भावर शस्त्राने कापण्याचे काम कधीही करू नये. असा हा छेदला जाणारा गर्भ स्वतःसवे मातेच्याही घातास कारणीभूत होतो. यातील दुसरे विधान अतिशयोक्त आहे. जिवंत गर्भ कापावा लागतो आहे याचा भावनात्मक परिणाम स्त्रीवर झाला तर त्यामुळे तिच्या जीवितास अपाय होण्याची शक्यता आहे. परंतु प्रत्येक वेळी गर्भछेद मातेस मारील असा नियम सांगणे कठीण आहे. तेव्हा या विधानाचे प्रयोजन जिवंत गर्भाच्या हत्येस सहसा प्रवृत्त होऊ नये एवढ्यापुरतेच मानले पाहिजे. कारण जर मूढगर्भामुळे सहन करण्यास अशक्य अशी गंभीर विकृती उत्पन्न झाली तर गर्भघात करूनही बाहेर काढावा पण गर्भिणीच्या जीवास जपावे. या कामी थोडाही विलंब करू नये असे पुढच्याच श्लोकात सुश्रुताने सांगितले आहे. तेव्हा या संदर्भात पहिल्या श्लोकातील विधानांचा मुख्य हेतू लक्षात घेतला पाहिजे. गर्भ व गर्भिणी या दोघांचे रक्षण करणे कितीही महत्त्वाचे असले तरी विकल्पच उत्पन्न झाल्यास गर्भापेक्षा गर्भिणीच्या जीवाचेच महत्त्व अधिक समजून तिचे रक्षण सर्व प्रकाराने केले पाहिजे.

शस्त्रकर्मापूर्वी स्त्रीला धीर देऊन शस्त्रकर्मास आरंभ करावा. अवयवछेद करावयाचा तो मंडलाग्रशस्त्राने वा अंगुलिशस्त्राने करावा. शिराचे विदारण करावे. शिरःकपाल भेदून वा छेदून बडिशाच्या आकाराच्या शंकूने उरःकक्षा यांना पकडून ओढून बाहेर काढावे.

गर्भाचे डोके फुटले नसेल वा फुटण्यासारखे नसेल तर शंकू त्याच्या डोळ्याच्या खोबणीत वा गंडाच्या उपलक्षणेने तोंडात अडकवून गर्भास ओढून काढावे.

खांदे अडकलेल्या स्थितीत असेच ओढून काढावे. किंवा बाहूंचा छेद करून गर्भास बाहेर काढावे.

पक्षालीप्रमाणे गर्भाचे पोट फुगलेले असेल त्या वेळी त्याचे विदारण करून आतडी कापून काढावी व मग सैल झालेला गर्भ ओढून काढावा.

जघन भाग अडकला असेल तर कटिरातील कपालास्थींचा भेद करून मूढगर्भ ओढून काढावा. थोडक्यात म्हणजे गर्भाचे जे जे अंग योनिमार्गात अडकून राहील त्या त्या अवयवाचा कुशलतेने छेद करून गर्भनिर्हरण करावे व प्रयत्नपूर्वक स्त्रीचे रक्षण करावे.

— ततः स्त्रियमाश्वास्य मण्डलाग्रेणाङ्गुलीशस्त्रेण वा शिरो विदार्य, शिरःकपालान्याहृत्य, शङ्कुना गृहीत्वोरसि कक्षायां वाऽपहरेत्, अभिन्ने शिरसि चाक्षिकूट गण्डे वा, अंससंक्तस्यांसदेशे बाहु छित्वा दृतिमिवाततं वातपूर्णोदरं वा विदार्य निरस्यान्त्राणि शिथिलीभूतमाहरेत्त जघनसक्तस्य वा जघनकपालानीति ॥

(किंबहुना) — यद्यदङ्गं हि गर्भस्य तस्य सज्जति तद्‌भिषक् ।

यद्यदङ्गं हि गर्भस्य तस्य सज्जति तद्‌भिषक् ।

सम्यग्विनिर्हरेच्छित्वा रक्षेन्नारीं च यत्नतः ॥ सु. नि. अ. १५–१२, १३



¹वातप्रकोपामुळे मूढगर्भाचे प्रकार सांगितले एवढेच असतील असे नाही. अनेक प्रकारची विचित्रता मूढगर्भाच्या गतीमध्ये असू शकते. यासाठी बुद्धिमान वैद्याने त्या त्या प्रसंगी उचित होतील अशा इतरही पद्धती गर्भनिर्हरणासाठी वापराव्यात.

मूढगर्भाची उपेक्षा करू नये. गर्भ मृत असेल तर अगदी थोडा वेळही व्यर्थ घालवू नये. अगदी त्वरित स्त्रीची सुटका करावी. नाही तर मृतगर्भ मातेसही मारतो.

मूढगर्भावर करावयाचे शस्त्रकर्म मंडलाग्र शस्त्रानेच करावे. त्याचा आकार लहान असल्यामुळे तेच सुखावह होते. शस्त्रकर्म आतून करावयाची असल्यामुळे (योनिमार्गाने) वृद्धिपत्रासारखे लांब पात्याचे तीक्ष्णाग्र शस्त्र वापरल्यास त्यामुळे स्त्रीस कदाचित अपाय होण्याची शक्यता असते.

## गर्भसंग

²गर्भसंग हा तीन प्रकारांनी संभवतो.

(१) शिराने संग होणे.

(२) अंसाने संग होणे.

(३) स्फिग्भागाने संग होणे.

(१) शिराने संग असल्यास—यातील शिराने संग झाला असता परीक्षणात अक्षिकूट गंड व या दोन्ही प्रदेशांचे योनिपरीक्षण करीत असताना गर्भाचा अक्षिकूट व गंडप्रदेश हे दोन्ही असल्यास प्रथमावर्तात दक्षिण व वामभागी सहज हाताला लागले पाहिजेत. आणि अशाच वेळी गर्भशंकू लावून गर्भाचे निर्हरण करावे.

१ गर्भस्य गतयश्चित्रा जायन्तेऽनिलकोपतः ।
तत्रानल्पमतिर्वैद्यो वर्तेत विधिपूर्वकम् ॥
नोपेक्षेत मृतं गर्भं मुहूर्तमपि पण्डितः ।
स ह्याशु जननीं हन्ति निरुच्छ्वासं पशुं यथा ॥
मण्डलाग्रेण कर्तव्यं छेद्यमन्तर्विजानता ।
वृद्धिपत्रं हि तीक्ष्णाग्रं नारीं हिंस्यात् कदाचन ॥ सु. चि. अ. १५, १४ ते १६

२ समालम्ब्य दृढं कर्षेत्कुशलो गर्भशङ्कुना ।
आभिन्नशिरसं त्वक्षिकूटयोर्गण्डयोरपि ॥ वा. शा. अ. २–३२
समालम्ब्य—तं गर्भं गृहीत्वा, दृढं कृत्वा आकर्षेत् । केन ? गर्भशंकुना । कः ? कुशलः अभ्यस्तकर्मा वैद्यः । अभिन्नशिरसं—अविदारितोत्तमाङ्गं पुनर्गर्भं, अक्षिकूटयोस्तथा गण्डयोस्तद्विषयेऽन्यतमे प्रदेशे—कदाचिदक्षिकूटप्रदेशे कदाचिद्गण्डप्रदेशे, समालम्ब्य तं गर्भं दृढं गर्भशंकुना गृहित्वा कर्षेत् ॥
वा. शा. अ. २–३२ टीका

" गर्भशंकूना समालम्ब्य " असे वर्णन अक्षिकूट व गंड यांच्या द्विवचनी उल्लेख आणि गभाची अभिन्न शिर ही स्थिती या सर्व वर्णनावरून डोके हे डोळ्याजवळ वा गालाजवळ गर्भशंकूने पकडून कुशल वैद्याने (अभ्यस्तकर्मा) ओढून काढावे असे जे वर्णन आहे ते जिवंत गर्भाच्या बाबतीत असले पाहिजे. मृतगर्भाच्या बाबतीत शिरः-कपालाचे भेदन करून बडिशयंत्र वापरावयास सांगितले आहेच. मूढगर्भ विकृतींतून स्त्रीची सुटका झाल्यानंतर तिला सूतिकेचे सर्व उपचार यथायोग्य करावेत.

(२) अंसाने संग असल्यास– या स्थितीत अंस हे परिघाप्रमाणे अडसरासारखे योनीत आडवे राहतात म्हणून संग होतो. अशा वेळी आडव्याचे सरळ करून, आधी एक खांदा ओढून नंतर दुसरा खांदा योनीच्या बाहेर ओढून काढावा.

या वेळी वैद्याने बडिशयंत्र किंवा अंगुलियंत्राचा उपयोग करावा.

(३) स्फिग्भागी संग असल्यास– या वेळी बाहेर आलेला गर्भ कपड्यात पकडून गर्भ ओढून काढावा.

उपस्थित प्रसवेमध्ये येणाऱ्या आवींची तीव्रता वा इतर काही कारणे यामुळे स्त्री मृत झाली आणि अर्भाचे हृदृस्पंदन चालू असल्यामुळे स्त्रीच्या कुक्षीच्या ठिकाणीही जर स्पंदन प्रत्ययास येत असेल तर तत्क्षणीच स्त्रीच्या उदराचे पाटन करून अपत्य बाहेर काढावे.

## मातेची विपन्नावस्था :

गर्भिणीमध्ये ज्या वेळी उपस्थितप्रसवा व प्रजनयिष्यमाणा या दोनही अवस्थांचे काल वाजवीपेक्षा जास्त झालेले आढळतात त्या वेळी गर्भिणी व बालक या दोघांच्यामध्ये विपन्नावस्था दिसून येते.

**कारणे** :(१)गर्भाची मूढगति व गर्भसंग– यामुळे होणारा स्रोतोरोध. या स्रोतोरोधामुळे होणारी वायूची प्रतिलोम गती येथे अपेक्षित आहे व या ऊर्ध्वगतीमुळे श्वास, कास, आध्मान, अरती ही लक्षणे आढळतात.

(२) प्रसवाचा विलंब — यामुळे अपत्यपथावर पडलेला ताण यामुळे धातुक्षय उत्पन्न होतो. म्हणजेच मार्गावरोधजन्य वातवृद्धी व धातुक्षयजन्य वातवृद्धी असे दोनही प्रकार येथे सापडतात.

वरील दोनही प्रकारांनी विकृत झालेल्या वातामुळे मातेची नाडी–अल्पबल, तृष्णा, अरती, मलमूत्रसंग, आध्मान, छर्दी, श्वास, अतिस्वेद, क्वचित मूर्च्छा ही लक्षणे आढळतात.



## बालकाची विपन्नावस्था :

बालकात गर्भाचे हृद्स्पंद विकृत्, अनियमित होतात व अस्पष्ट ऐकू येतात. आतल्याआत गर्भाचे मलमूत्रविसर्जन होते, ते वैद्यास साक्षात् मलमूत्रदर्शनाने किंवा गर्भोदकाच्या परीक्षणावरून समजते.

त्याचप्रमाणे बालकाला उपशीर्षक उत्पन्न होते, अशा वेळी बालकाची विपन्नावस्था समजावी.

गर्भिणी वा गर्भ या दोहोंपैकी एकाचीही जरी विपन्नावस्था आढळली तरी तत्क्षणी त्यांना वाचविण्याकरिता उदरपाटनपूर्वक म्हणजेच वामदेवीय प्रसव करावा.

वाग्भटाने हेच वर्णन थोड्या निराळ्या प्रकाराने केले आहे.

बस्तिद्वारे विपन्नाया......पाटयित्वोद्धरेत् शिशुम् ।

या वर्णनातील मुख्य फरक बस्तमार व बस्तद्वार या शब्दप्रयोगात आहे. बस्तमार म्हणजे यज्ञामध्ये बळी देण्यासाठी आणलेल्या बोकडाचा जसा मान मुरगळल्यामुळे त्वरित मृत्यू घडतो त्याप्रमाणे उपस्थितप्रसवेचा मृत्यू आरंभीची कोणतीही रिष्ट लक्षणे न दिसता एकदम अकल्पित रीतीने होतो.

बस्तिद्वार या शब्दाचा अर्थ लक्षणेने घेऊन त्याचा अन्वय टीकाकाराने प्रस्पंदते असा केला आहे. गर्भस्पंदन बस्तीशी ( बस्तीशिराशी ) जाणवत असेल तर– असे म्हणून अरुणदत्त वाग्भटावर टीका लिहितो.

हाराणचन्द्र या टीकाकाराचा उल्लेख याच प्रकरणी सुश्रुतसंहितेतील टीपेत आला आहे. त्याने 'बस्तिद्वारे' शब्दाचा अन्वय 'पाटयित्वा' या पदाशी करून बस्तीचे वा द्वाराचे पाटन करावे असे सुचविले आहे.

( या पाठभेदामध्ये काही विशेष महत्त्व आहे असे आम्हास वाटत नाही. )

– बस्तिद्वारे विपन्नायाः कुक्षिः प्रस्पन्दते यदि ।
जन्मकाले ततः शीघ्रं पाटयित्वोद्धरेच्छिशुम् ॥ वा. शा. अ. २–५३

– विपन्नायाः मृतायां गर्भिण्याः, यदि कुक्षिः प्रस्पन्दते अत्यन्तं चलति । क्व प्रदेशे ? बस्तिद्वारे,– तत्समीपे । कदा ? जन्मकाले, गर्भप्रसवोन्मुखे काले । तदा कुशलो वैद्यः शीघ्रं कुक्षिप्रस्पन्दनादन्तरं, पाटयित्वा, शिशुं–बालं उद्धरेत् ।
टीका, वा. शा. २

– हाराणचंद्रस्तु 'बस्तिद्वारे विपन्नायाः' इति पठित्वा 'जन्मकाले उपस्थिते प्रसवकाले विपन्नाया मृताया यदि कुक्षिः प्रस्पन्दते, तर्हि तत्क्षणात् बस्तिद्वारे बस्तिद्वारं च पाटयित्वा भिषक् तं गर्भमुद्धरेत् इति व्याख्यानयति ।
सु. नि. ८–१४ हरिश्चंद्र टीका

हाराणचंद्राच्या टीकेप्रमाणे बस्तीशिर व योनिद्वाराशी असा दोन ठिकाणी छेद घेऊन गर्भ बाहेर काढता येतो असे दिसते. हा प्रयोग फक्त स्त्री मृत झाली तरच करावा असे मानण्याचे कारण नाही. जिवंतपणीही गर्भिणीवर गर्भ निर्हरणासाठी या पद्धतीचेच शस्त्रकर्म करावे लागते.

विशेषतः योनिसंवरण असताना गर्भ व गर्भिणी या दोघांनाही वाचविण्यासाठी या शस्त्रकर्माचा उपयोग करता येतो. तसेच गर्भिणीमक्कलामध्ये स्त्रीस वाचविण्यासाठी तिच्या उदराचे पाटन करून गर्भाशयातील बंधनापासून सुटून मृत झालेल्या गर्भास याच पद्धतीने उदरपाटन करून बाहेर काढणे इष्ट ठरते.

हरिताने मूढगर्भाचे वेगळ्याच दृष्टिकोणातून काही प्रकार कल्पिले आहेत. वस्तुतः ते मूढगर्भाचे प्रकार नसून मूढगर्भामुळे गर्भिणीच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या लक्षणांवरून हरिताने वर्गीकरण केलेले आहे असे दिसते. या लक्षणांच्या उपशमनासाठी हरिताने त्यावर चिकित्साही सांगितली आहे.

---

– बस्तिशूलश्च भवति योनिद्वारं निरुन्धति ।
गर्जते जठरं यस्या आध्मानञ्चैव जायते ॥
तोदनं चाङ्गभङ्गश्च निद्राभङ्गश्च जायते ।
वाताद्भवति गर्भस्य संरोधी भिषगुत्तमम् ॥
शूलं ज्वरस्त्रिदोषश्च तृष्णादोषो भ्रमस्तथा ।
मूत्रकृच्छ्रं शिरोऽर्तिः श्वासपित्ताद्रोधोभ्रूणस्य च ॥
आलस्यतन्द्रानिद्रा च जाड्याध्मानं च वेपथुः ।
कासो विरसता चास्ये श्लेष्मणा मूढगर्भके ॥
द्वन्द्वैश्च द्वंद्वजं विद्यात्सर्वं स्यात्तान्निपातिकम् ॥ हारितसंहिता, पान ४५२

– वातिके मर्दनाभ्यङ्गं स्वेदनं वाल्पमेव च ।
यवागूं पञ्चकोलश्च पाययेद्भिषगुत्तमः ॥
पैत्तिके शीतलं पानं शीतान्नसहितानि च ।
व्यञ्जनानि तथा तस्य यष्टिकं पयसा पिबेत् ।
त्रिकटु त्रिफला कुष्ठं रोध्रं वस्तकधातुकी ।
सगुडं क्वथितं पाने श्लेष्मणा मूढगर्भके ।
मूर्वाचिञ्चावास्तुकर्णीमञ्जिष्ठारोध्रनीलिका: ।
कर्कन्धुमूल सौराष्ट्री क्वाथश्च सगुजे हितः ॥
रक्तपित्तविकारेषु कुक्षिशुद्धिश्च जायते ॥ हारितसंहिता ४५४



# सूतिका रोग

योगरत्नाकराने सूतिकेला होणाऱ्या रोगांची कारणे व रोग पुढीलप्रमाणे सांगितले आहेत.

**कारणे :**

[1]सूतिकेवर तिच्या नाजूक स्थितीमुळे करावयाचे उपचार फार काळजीपूर्वक करावे लागतात. त्यामध्ये जर चूक झाली तर त्याचे परिणाम सूतिकेस व्याधीच्या रूपाने भोगावे लागतात. या मिथ्योपचारामध्ये पूर्वकर्म, पश्चात्कर्म व्यवस्थित न करणे; स्वच्छता न पाळणे; गर्भ वा अपरा सोडविताना हिसकाहिसकी करणे, पटबंधादी नीट न बांधणे, शोधन-उपचार पुरेसे नसणे इत्यादी गोष्टी समाविष्ट होतात. तसेच प्रसूती फार कष्टदायक झाली तर तीही सूतिकारोगास कारण होते.

सूतिका जर प्रसूतीनंतर स्वाभाविकपणे आलेल्या दुर्बल स्थितीत विषम आहार करील वा अजीर्ण होईल इतके अन्न खाईल तर त्याचे दुष्परिणाम तिला भोगावे लागतील.

**लक्षणे :**

[2]अंग दुखणे, ज्वर, कंप, तहान, अवयव जड होणे, शोथ, शूल, द्रवमलप्रवृत्ती अशी लक्षणे सूतिका रोगात असतात असे योगरत्नाकर म्हणतो.

त्याचे हे म्हणणे चिंतनीय आहे. पुढे कश्यपाने दिलेली ६४ रोगांची यादी पाहिली म्हणजे त्यातील फारच थोडे केवळ सूतिकाविशिष्ट असे रोग आहेत. इतर व्याधी एरव्ही आढळणारे आहेत. त्यांचे सूतिका विशिष्टत्व ठरविण्यासाठी योगरत्नाकराने सांगितलेली ही सामान्य लक्षणे व्यवच्छेदक निदानासाठी उपयोगी पडणारी आहेत.

सूतिकेच्या सर्व रोगांना त्र्यावर्त योनीची दुष्टी हीच मूलभूत कारण असते. सूतिका रोगांचा इतर रोगांपासून व्यवच्छेद करण्यास योनिदुष्टी हे महत्त्वाचे कारण आहे.

[3]ज्वर, अतिसार, शोथ, आनाह, बलक्षय, तंद्रा, अरुची, प्रसेक असे वातकफदुष्टी-

---

१ मिथ्योपचारात्संक्लेशाद्विषमाजीर्णभोजनात् ।
सूतिकायास्तु ये रोगा जायन्ते दारुणाश्च ते ॥ यो. र. पा. ६०३, भा. २

२ अङ्गमर्दो ज्वरः कम्पः पिपासा गुरुगात्रता ।
शोफः शूलातिसारौच सूतिकारोगलक्षणम् ॥ यो. र., पान ५०४

३ ज्वरातिसारशोथश्च शूलानाहबलक्षयाः ।
तन्द्रारुचिप्रसेकाद्या वातश्लेष्मसमुद्भवाः ॥
कृच्छ्रसाध्या हि ते रोगाः क्षीणमांसबलाश्रिताः ।
ते सर्वे सूतिकानाम्ना रोगास्ते चाप्युपद्रवाः ॥ यो. र., पान ६०४

मुळे होणारे विकार सूतिकेस होतात. त्यांनाच सूतिकारोग असे म्हणतात. सूतिका ही बलमास परिक्षीण असते. त्यामुळे तिला होणारे कृच्छ्रसाध्य होतात.

कश्यपाची सूतिका रोगाची यादी पुढीलप्रमाणे आहे.

प्रसूती ही जर अनेक कारणांनी दूषित झाली तर त्या दुष्प्रजाता स्त्रीस पुढे उल्लेखिल्याप्रमाणे ६४ प्रकारचे रोग होतात.

योनिभ्रंश, योनिक्षत, योनिभेद, मूत्रसंग, योनिशोथ, योनिस्राव, प्रसुप्ती, (विशेषत: योनिभागी स्पर्शज्ञान नसणे) योनि-वेदना, पार्श्वशूल, पृष्ठशूल, कटिशूल, हृद्‌शूल विषूचिका, प्लीहावृद्धी, महोदरता, शाखावात (पक्षवध), अंगमर्द, भ्रूक्षेप, हनुस्तंभ मन्यास्तंभ, अपतानक, मक्कल्ल, विद्रधी, शोथ, प्रलाप, उन्माद, कामला, दुर्बलता, भ्रम, कृशता, भक्तद्वेष, अविपाक, ज्वर, अतिसार, विसर्प, छर्दी, तृष्णा, प्रवाहिका, हिक्का, श्वास, कास, पाण्डू, रक्तगुल्म, आनाह, आध्मान, विड्‌ग्रह, मूत्रग्रह, मुख-रोग, नेत्ररोग, प्रतिश्याय, गलग्रह, राजयक्ष्मा, अर्दित, कंप, कर्णस्राव, निद्रानाश, उष्णवात, ग्रहबाधा, स्तनरोग, रोहिणी, वाताष्ठिला, वातगुल्म, रक्तपित्त (अधोग), विचर्चिका.

कश्यपामध्येच सूतिकारोगांची आणखी एक यादी चिकित्सास्थानाच्या 'दुष्प्रजाता चिकित्सा' अध्यायात आलेली आहे ती अशी :

प्रथम उल्लेखिलेल्या यादीप्रमाणेच रोग या यादीतही उल्लेखिलेले असून योनिदुष्टी दद्रू, पामा, किटिभ, विस्फोट, अर्धशिर:शूल, मोह असे रोग या यादीमध्ये जास्त आहेत तर काही पहिल्या यादीपेक्षा कमी आहेत.

– दुष्प्रजातामया: सन्ति चतु:षष्टिरिति स्थिती: ।
योनिभ्रष्टा क्षता चैव विभिन्ना मूत्रसङ्गिनी ।
सशोफस्राविणी चैव प्रसुप्ता वेदनावती ।
पार्श्वपृष्ठकटीशूलं हृदि शूलं विषूचिका ॥
प्लीहा महोदरत्वं च शाखावातोऽङ्गमर्दक: ॥
भ्रूक्षेपको हनुस्तम्भो मन्यास्तम्भोऽपतानक: ॥
मक्कल्लो विद्रधि: शोफ: प्रलापोन्मादकामला: ।
दौर्बल्यं भ्रमली कार्श्यं भक्तद्वेषोऽविपाचक: ।
ज्वरातिसारौ वैसर्पश्छर्दिस्तृष्णा प्रवाहिका ।
हिक्का श्वासश्च कासश्च पाण्डुगुल्मश्च रक्तज: ॥
आनाहाध्मापने चोभे वर्चोमूत्रग्रहावपि ।
मुखरोगोऽक्षिरोगश्च प्रतिश्यायगलग्रहौ ॥
राजयक्ष्मार्ऽदितं कम्प: कर्णस्राव: प्रजागर: ।
उष्णवातो ग्रहाबाधस्तनरोगोऽथ रोहुणी ।
वाताष्ठीला वातगुल्मरक्तपित्तविचर्चिका ॥ कश्यप, पान ३०५



या वरील विकारांचा विचार करता कारणानुरूप त्यांचे वर्गीकरण करणे आवश्यक आहे असे लक्षात येईल. हे सर्व विकार नेहमी आढळणारे आहेत असे नाही. यांतील काही नेहमी आढळतात तर काही फारच क्वचित झालेले दिसतात.

कश्यपोक्त अनुक्रम लक्षात न घेता रोगांचे महत्त्व लक्षात घेऊन येथे रोगांचा अनुक्रम निराळ्या पद्धतीने घेऊन त्याचे वर्णन करावयाचे आहे.

## (१) अतिप्रवाहण :

[1]अतिप्रवाहणामुळे अपत्यपथावर अधिक ताण पडतो. त्याप्रमाणेच जोराने कुंथत असताना पृष्ठ, पार्श्व, उदर, कंठ, मुख इत्यादी अवयवांमधील सिरा स्नायूंवरही प्रवाहनप्रसंगी केलेल्या प्राणोपरोधामुळे विपरीत परिणाम होऊन व्यानाच्या कर्मातही विक्षेप उत्पन्न होतो. अशा रीतीने स्रोतसांना अतिश्रमामुळे आलेले दौर्बल्य, प्रसवामुळे अवयवांना प्राप्त होणारे शैथिल्य व वात-प्रकोप या संप्राप्तीतील प्रमुख घटनांमुळे सूतिकेला अनेक व्याधींचा उपद्रव होतो.

### अतिप्रवाहणामुळे उत्पन्न होणारे व्याधी :

योनिभ्रंश, योनिक्षत, योनिभेद, योनिशोथ, योनिसुप्ती, पार्श्वशूल, पृष्ठशूल, हृद्‌शूल, अंगमर्द, दुर्बलता, अक्षिरोग, गलग्रह, भ्रूक्षेप, अर्धशिर: शूल, ज्वर.

– योनिपृष्ठकटीभेदशाखावायुरसृग्दर: ।
वाताष्ठीला च गुल्मश्च हृदि शूलं प्रवाहिका ॥
पुरीषमूत्रसंरोध आध्मानं शूलमेव च ।
शूयते दुष्यते योनिर्योनिशूलं च दारुणम् ॥
वेपथुश्छर्दनं मोहो मन्यास्तम्भो हनुग्रह: ।
ज्वरातिसारो वैसर्पो दद्रुपामाविचर्चिका: ॥
किटिभायथ विस्फोट गात्रे चार्धशिरोरुजा ।
हृद्रोगाश्चाक्षिरोगाश्च प्लीहा श्वयथुकामले ॥
एते चान्ये च बहवो दुष्प्रजाताशरीरजा: ।
व्याधय: संप्रकुप्यन्ति चिकित्सितमत: परम् ॥ कश्यप, चि. स्थान, पा. ९७

१ तस्य तीव्राभिरावीभि: प्रततं वाहनश्रमै: ।
शैथिल्यं चागते देहे संक्षुब्धेष्वनिलादिषु ॥
क्लान्तेष्विन्द्रियमार्गेषु सारशून्येषु धातुषु ।
एकोऽपि दोष: कुपित: कृच्छ्रतो वहते महत् ॥
का. सं. खिलस्थान, सु. उ. ११, पान ३०७

### ( १ ) विकृतप्रसव :

विकृतप्रसवामध्ये गर्भाच्या अपत्यपथातील क्रियेमध्ये अनेक प्रकारच्या विकृती उत्पन्न होत असतात. मूढगर्भ प्रकरणी त्यांचे विस्ताराने विवेचन आले आहेच. या विकृतीमुळे अपत्यपथासारखा नाजुक मांसमय अवयव अतिशय क्षीण दुर्बल असा होतो. या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अपानवायूला अत्यंत विगुणता येते व त्याचे परिणाम म्हणून गर्भिणीस अनेक उपद्रव सहन करावे लागतात.

### विकृतप्रसवामुळे उत्पन्न होणारे व्याधी :

योनिभ्रंश, योनिक्षत, योनिभेद, मूत्रसंग, योनिशोथ, प्रसुप्ती, योनिवेदना, कटिशूल, अंगमर्द, मक्कल्ल, दुर्बलता, श्रम, योनिस्राव, पाण्डू, निद्रानाश, वाताष्ठिला रक्तपित्त ( अधोग ), ज्वर.

### ( ३ ) मिथ्योपचार :

मिथ्योपचारामध्ये सूतिकेची परिचर्या करणाऱ्या परिचारिका व तज्ज्ञ यांच्याकडे दोष असतो. परिचारिका अशुची असेल, दक्ष नसेल, तज्ज्ञही दृष्टकर्मा नसेल आणि स्वच्छतेची काळजी घेणारा नसेल तर (अपत्यपथाची स्वच्छता) सूतिकेच्या बाबतीत पाळणे आवश्यक असलेली उपकरणे, साधने, वस्त्रे यांची स्वच्छता पर्याप्याने आदर्श न राहिल्यामुळे या अस्वच्छतेचा परिणाम योनिमार्गामध्ये अनेक प्रकारची दुष्टी उत्पन्न करण्यात होतो. ही दोषदुष्टी आमविषासारखी अत्यंत त्रासदायक होऊन अनेक व्याधी उत्पन्न करते.

### मिथ्योपचारामुळे उत्पन्न होणारे व्याधी :

योनिदुष्टी, योनिशोथ, योनिस्राव, योनिवेदना, महोदर, मक्कल्ल, विद्रधी, हनुस्तंभ; मन्यास्तंभ, रक्तगुल्म, अपतानक, ज्वर, विसर्प, ग्रहबाधा, मोह, शाखावात (पक्षवध); अर्दित.

### ( ४ ) मिथ्याहारविहार :

या कारणामध्ये विशेषतः सूतिकेकडेच दोष असतो. सूतिकेचे शरीर हे प्रसवामुळे दुर्बळ झालेले असते. रक्तस्राव, श्रम, यांचा परिणाम म्हणून अग्नी मंद झालेला असतो व वाताचा प्रकोपही असतो. अशा स्थितीत जर सूतिकेने आहारविहारावरील नियंत्रण सांभाळले नाही; विषमाशन, अध्यशन, अजीर्णाशन इत्यादी आहारदोष तिच्या हातून घडले, विश्रांती घेतली नाही तर दोषदुष्टी होऊन वाताच्या



प्रेरणेने कोणत्याही विगुणस्थानाचा आश्रय दोषांनी घेणे शक्य आहे. या दोषदुष्टी-मुळे अनेक प्रकारचे व्याधी संभवतात.

### मिथ्याहारविहारामुळे उत्पन्न होणारे व्याधीः

विषूचिका, प्लीहावृद्धी, शोफ, प्रलाप, उन्माद, कामला, कृशता, भक्तद्वेष, अविपाक, अतिसार, छर्दी, तृष्णा, प्रवाहिका, हिक्का, श्वास, कास, अर्दित, आनाह, आध्मान, विट्ग्रह, मूत्रग्रह, सुखरोग, प्रतिश्याय, राजयक्ष्मा, अर्दित, कंपन, उष्णवात, स्तनरोग, रोहिणी, वाताष्ठिला, विचर्चिका, दद्रू, पामा, विस्फोट, किटिभ, ज्वर.

सूतिका रोगांचे हे जे कारणानुरूप चतुर्विध वर्गीकरण केलेले आहे त्या प्रत्येक कारणामुळे उत्पन्न होणाऱ्या सामान्य संप्राप्तीचे स्पष्टीकरण वर केलेले आहे.

या सर्व सूतिका व्याधींमध्ये विशेषतः पहिल्या तीन कारणांनी उत्पन्न होणाऱ्या सूतिका-रोगांमध्ये योनिदुष्टी हे महत्त्वाचे व आवश्यक असे कारण आहे. यामुळे पुढे अनेक प्रकारचे सूतिकारोग उत्पन्न होतात. त्या सूतिकारोगांमध्येही एकामुळे दुसरा अशी व्याधिपरंपरा वा लक्षणसमुच्चय उत्पन्न होतो. तसेच वर केलेल्या व्याधींच्या वर्गीकरणामध्ये कोणते तरी एकच कारण असते असे नाही. एकच व्याधी पहिल्या वा दुसऱ्या वा तिसऱ्या यांपैकी कोणत्याही एक वा अनेक कारणांनी उत्पन्न होऊ शकतो. म्हणून वर्गीकरणांमध्ये उल्लेखिलेल्या यादींतील काही रोग अनेक गटांत आले आहेत.

### चिकित्सा : सामान्य तत्त्व :

सूतिकारोगांच्या चिकित्सेचे सामान्य धोरण कश्यपाने सांगितले आहे ते असे :

[1]कष्टप्रसूती झालेल्या व प्रसूति-रोगांनी पीडिलेल्या स्त्रीवर स्नेहन, स्वेदन हे उपचार केले असता वातप्रकोप त्वरित नाहीसा होतो. या स्नेहस्वेदानंतर वैद्याने दीपन चिकित्सा करावी व त्यासाठी दीपनीय द्रव्यांनी सिद्ध केलेल्या यवागू वापराव्यात. त्याप्रमाणेच विहार म्हणून सूतिकेला सुखकर अशा शय्येवर विश्रांती घेण्यास सांगावे. या उपचारांनी ती व्याधिमुक्त होते.

या वचनावरून चिकित्सेचे सामान्य धोरण स्पष्ट होईल. वातप्रशमन करणारी चिकित्सा स्नेहस्वेदपूर्व करून बलवर्धक, अग्निदीपन असा आहार सूतिकेस द्यावा. व तिच्या शरीरास विश्रांती मिळेल असे शय्यासुखादी विहार करण्यास सांगावे.

१ याः कृच्छ्रेण प्रजायन्ते प्रसूताश्चामयन्ति याः ।
स्नेहस्वेदैस्ततस्तासां क्षिप्रं वायुः प्रशाम्यति ॥
यवागूं दीपनीयां तु स्मृतिमान् दातुमर्हति ।
यथा शेते सुखं नारी नीरुजा शयने सुखे ॥

तसेच धातूंची क्षीणता दूर करून बळाची वृद्धी करणारे व दोषदृष्टी नाहीशी करणारे रसायनकल्पही औषधासाठी वापरावेत.

## सूतिकेमध्ये विशेषेकरून आढळणारे काही विशिष्ट रोग व त्यांची चिकित्सा :

### ( १ ) सूतिका ज्वर

कश्यपाने सूतिकाज्वराचे निदान व चिकित्सा सविस्तर दिली आहे.

[1] सर्व रोगांमध्ये ज्वर हा कष्टमय असल्यामुळे त्याचे निदान व चिकित्सा आम्ही प्रथम सांगत आहोत; असे ज्वररोगास आरंभ करताना कश्यपाने म्हटले आहे.

मक्कल्लानंतरचा महत्त्वाचा व्याधी ज्वर हाच असल्याने कश्यपसंहितेतील ज्वराचे सर्व प्रकरण या ठिकाणी आम्ही उद्धृत केले आहे. निदान, लक्षणे व चिकित्सा या प्रत्येकामध्ये सूतिकेच्या ज्वराचे थोडेसे वैशिष्टय आहे. त्यामुळे इतरत्र आढळणारे प्रकरण जसेच्या तसे देणे इष्ट वाटते.

**व्याख्या :**

सूतिकेला योनिदुष्टीमुळे जो ज्वर उत्पन्न होतो त्यास सूतिकाज्वर असे म्हणावे.

**प्रकार :**

[2]सूतिकाज्वर वातज, पित्तज, कफज, सान्निपातज, स्तन्यजन्य व ग्रहज (ग्रहबाधेमुळे उत्पन्न होणारा) अशा सहा प्रकारचा असतो.

**कारणे :**

[3]वेग धारण करणे, रूक्ष आहार वा स्नेहाचा अभाव यामुळे रूक्षता वाढणे;

१ सर्वेषामेव रोगाणां ज्वरः कष्टतमो मतः ।
तदस्यादौ विधिं वक्ष्ये निदानाकृतिभेषजैः ॥ का. सं. सूति ११–३८

२ षड्विधस्तु प्रसूतानां नारीणां जायते ज्वरः ।
निजागन्तुविभागेन निदानं तस्य मे शृणु: ॥ का. सं. सू. ११–३९

३ वेगसंधारणाद्रौक्ष्याद्व्यायामादत्यसृक्क्षयात् ।
शोकादत्यग्निसंतापात् कट्वम्लोष्णातिसेवनात् ॥
दिवास्वप्नात् पुरोवाताद्गुर्वभिष्यन्दिभोजनात् ।
स्तन्यागमाद्ग्रहाबाधादजीर्णाद्दुष्प्रजायनात् ॥
ज्वरः संजायते नार्याः षड्विधो हेतुभेदतः । का. सं. सूति ११–४१



व्यायाम अतिशय रक्तस्राव, शोक, शेक फार घेणे; कटू, अम्ल, उष्ण अशा पदार्थांचे अधिक प्रमाणात सेवन करणे; दिवसा झोपणे, वाऱ्यावर बसणे (विशेषतः पूर्वेकडील), गुरू, अभिष्यंदी असे पदार्थ खाणे, स्तनांमध्ये दूध उत्पन्न होणे, अजीर्ण, विकृत प्रसूती वा प्रसूतीच्या वेळचे मिथ्योपचार; सूतिकेने पाळावयाचे पहिले दहा दिवसांतील ( ती क्षती व व्रणी असेपर्यंत ) नियम न पाळल्यास–या कारणांनी सूतिकेस वर सांगितल्याप्रमाणे सहा प्रकारचे ज्वर होतात.

**संप्राप्ती :**

प्रसूत झालेल्या स्त्रीने–सूतिकेने पाळावयाच्या नियमांचे योग्य तऱ्हेने पालन न केल्यास व वरील कारणांनी प्रकुपित झालेले सूतिकेच्या शरीरातील दोष हे प्रथम योनिदुष्टी करून नंतर आमाशयामध्ये येतात व ग्रहणीमधील अग्नीशी मिसळून अग्निमांद्य उत्पन्न करतात. व या अग्निमांद्यामुळे साम आहाररस उत्पन्न होऊन सहा प्रकारचे ज्वर उत्पन्न करतो.

[1]या ज्वरांच्या पूर्वावस्थेत सूतिकेने स्नेहन, शीतांबुपान, स्नान, शीताशन असे विरोधी आहार-विहार केले तर अत्यंत घोर असा सन्निपातज्वर उत्पन्न होतो व त्यावर चिकित्सा करणे अत्यंत कठीण असते.

**रूपे– [2]वातजज्वर :**

ज्वराचे प्रमाण विषम असणे, अंग दुखणे, जांभया येणे, अंगावर रोमांच उभे राहणे, तोंड बेचव होणे वा तोंडास तुरट चव येणे, शीत नकोसे होणे, उष्णता हवीशी वाटणे, दात आंबणे, बडबडणे, कोरडया ढेकरा येणे, झोप न येणे, आध्मान होणे आणि अवयव आखडणे अशी लक्षणे वातज ज्वरात होतात.

१ स एव पूर्वरूपेषु व्यभिचीर्णो विरोधिभिः ।
संसृष्टैः स्नेहशीताम्बुस्नानपानाशनादिभिः ॥
सान्निपातज्वरो घोरो जायते दुरुपक्रमः ॥ का. सं. सू. ११–४२, ४३

२ विषमोष्माऽङ्गमर्दश्च जृम्भथू रोमहर्षणम् ॥
कषायविरसास्यत्वं शीतद्वेषोष्णकामते ।
दंतहर्षः प्रलापश्च शुष्कोद्गारः प्रजागरः ॥
आध्मानमङ्गसंकोचो वातज्वरनिदर्शनम् । का. सं. सूति, ११–५४, ५५

### [1] पित्तज ज्वर :

तृष्णा, अंगाची आग होणे, बडबडणे, ओकारी, तोंड कडू पडणे, नख, नेत्र, दंत, पुरीष, मूत्र यांमध्ये पिवळसर छटा दिसणे, घसा कोरडा होणे, अंग जणू जळते आहे असे भासणे, चक्कर येणे, शीत स्पर्श हवासा वाटणे अशी लक्षणे पित्तज्वरात होतात.

### [2] कफज ज्वर :

उष्ण स्पर्श, उष्ण पदार्थ हवेसे वाटणे, कास, डोके जड होणे, डोके दुखणे, अंग जड होणे, ज्वरमान कमी असणे, पडसे येणे, मलमूत्रांचा वर्ण श्वेत होणे, तंद्रा असणे, झोप जास्त येणे, शीत नकोसे होणे, सारखी थुंकी येणे, तोंड गोड होणे, चिकट होणे, अंग गळून जाणे, अन्नाचा तिटकारा येणे अशी लक्षणे कफज ज्वरात होतात.

### [3] सन्निपातज ज्वर :

मध्येच थंडी वाजणे, मधेच दाह होणे; ज्वराचे उष्णतामान मधून मधून सम–विषम होणे, वातमूत्रपुरीष यांची प्रवृत्ती कष्टान होणे, पोटात गुरगुरणे, क्रियानाश, बलहानी, कंप, सुप्ती अशी वातलक्षणे अवयवांच्या ठिकाणी उत्पन्न होणे, अंगांची तलखी होणे, तहान फार लागणे, बडबडणे, चित्त अस्थिर होणे, घसा आवळला जाणे, सारखी थंडी वाजणे अशी लक्षणे सन्निपातामध्ये उत्पन्न होतात. त्यातही त्रिदोषांपैकी ज्या ज्या दोषांचे आधिक्य असेल त्याप्रमाणे मुहुःशीतादी, दाहादी वा गुरुत्वादी लक्षणे वात, पित्त, कफांच्या अनुरोधाने विशेषरीत्या प्रत्ययास येतात.

१ तृष्णादाहप्रलापश्च वमथुः कटुकास्यता ।
पीतास्यनखदन्ताक्षिविण्मूत्रत्वं च लक्ष्यते ॥
कण्ठस्य शोषः सर्वं च प्रदीप्तमिव मन्यते ।
भ्रम-शीताभिलाषश्च पित्तज्वर निदर्शनम् ॥ का. सं सूति. ११–५६, ५७

२ उष्णाभिकामता कासः शिरोरुग्गात्रगौरवम् ।
मन्दोष्मता प्रतिश्यायः शुक्लमूत्रपुरीषता ॥
निद्रा तन्द्रीर्हिमद्वेषः ष्ठीवनं मधुरास्यता ।
गात्रसादोऽन्नविद्वेषः कफज्वरनिदर्शनम् ॥ का. सं. सूति. ११–५८, ५९

३ मुहुः शीतं मुहुर्दाहो मुहुरुष्मा समोऽसमः ।
कृच्छ्रविण्मूत्रवातत्वं वाताङ्गान्त्राभिसंजनम् ॥
दाहस्तृष्णाप्रलापश्च पित्ताद्विक्षिप्तचित्तता ।
गुरुत्वं कण्ठसंरोधः कफाश्च प्रतिशीतता ।
सन्निपातज्वरस्यैतल्लक्षणं समुदाहृतम् ॥ का. सं सूति.११–६० ते ६२



### [1] स्तन्यज ज्वर :

तिसऱ्या वा चवथ्या दिवशी सूतिकेच्या स्तनांमध्ये दूध उत्पन्न होण्यापूर्वीच्या अवस्थेमध्ये स्तनांतील दुग्धवह स्रोतसे ही संकुचित होत असतात. नवीन उत्पन्न होणारे दूध हे पीयूष (चीक) स्वरूपात असल्यामुळे गुरु, पिच्छिल, सांद्र असे असते. त्यामुळे स्रोतोरोध उत्पन्न होऊन स्तनामध्ये स्तंभ (शोथ, काठिण्य, गौरव) उत्पन्न होतो व रसदुष्टी होऊन ज्वर येतो. याच वेळी रसदुष्टीनंतर अल्प प्रमाणात योनिदुष्टी झालेली आढळते. या ज्वरामध्ये हृदयस्पंद, कुक्षी, पार्श्व व कटिःशूल, अंगमर्द, शिरःशूल अशी लक्षणे उत्पन्न होतात. हा स्तन्यज ज्वर पीयूषाची शुद्धी झाली म्हणजे बहुधा स्वभावतःच शमन पावतो.

स्तन्यांतील पीयूषावस्था अधिक काळ टिकून त्याचे शोधन झाले नाही वा पीयूषाची सांद्रता, घट्टता जास्त असेल तर रसदुष्टी अधिक होते व त्यामुळे स्तनांतील रक्तमांस दुष्ट होऊन विद्रधी उत्पन्न होतो.

### [2] ग्रहजज्वर :

सूतिकेवर ग्रहांची दृष्टी पडल्यामुळे वा तिला भीती वाटल्यामुळे जो ज्वर उत्पन्न होतो तो ग्रहज ज्वर होय. हा ज्वर वाताघात व अवधूनन या कारणानेही होतो. या ज्वरामध्ये आक्षेप, अंग पिळवटणे, डोळे तारवटणे, थकवा वाटणे, अंग कापणे (विशेषतः हात व डोळे), मुखनेत्र या ठिकाणी पीतता येणे, अंग मधूनच काळवंडणे,

१ तृतीयेह्नि चतुर्थे वा नार्याः स्तन्यं प्रवर्तते ।
पयोवहानि स्रोतांसि संवृतान्यभिवाहयेत् ॥
करोति स्तनयोः स्तम्भं पिपासां हृदयद्रवम् ।
कुक्षिपार्श्वकटीशूलमङ्गमर्दशिरोरुजाम् ॥
एतत् स्तन्यागमोत्थस्य ज्वरस्योक्तं स्वलक्षणम् ।
स हि पीयूषसंशुद्धौ क्रममात्रेण तिष्ठति ॥ का. सं. सूति. ११–६३ ते ६५

२ ग्रहावलोकितत्रासवाताघातावधूननैः ।
ज्वर्यते चेत् प्रसूता स्त्री तस्य वक्ष्यामि लक्षणम् ॥
उद्वेपको निष्टननं चक्षुषो विभ्रमः श्रमः ।
कम्पनं हस्तनेत्राणां हारिद्रमुखनेत्रता ॥
क्षणेन श्यावताऽङ्गाना क्षणेन च सवर्णता ॥
सुप्रबोधः सह क्रोशः केशलुञ्चनम् ॥
पवनज्वररूपाणि भूयिष्ठानि करोति च ।
विधिर्ग्रहघ्नोऽस्य हितः क्रमो यश्चानिलज्वरे ॥ का. सं. सूति. ११–६६ ते ६९

( सुप्रबोध ), आरडाओरडा करणे, केस ओढणे, तोडणे अशी लक्षणे होतात. योनिदुष्टी पण आढळते. तसेच वातज्वरात सांगितलेली इतर लक्षणेही अधिक उत्कटतेने उत्पन्न होतात.

**चिकित्सा :**

कश्यपाने निदानानंतर ज्वराची प्रत्यक्ष चिकित्सा सांगण्यापूर्वी सूतिकेच्या चिकित्सेसंबंधी काही सामान्य नियम सांगितले आहेत ते असे—

[1]ज्या सूतिकेमध्ये कफाचे आधिक्य असेल, अभिष्यंद असेल, क्लेद व स्राव पुरेसे वाहून गेले नसतील, जी शरीराने स्थूल असेल, जिला स्नेहन दिलेले असेल त्या सूतिकेवर उपचार करण्यापूर्वी तिला प्रथम लंघन द्यावे.

[2]जी सूतिका प्रकृत्या ( प्रकृतीने ) रूक्ष असेल, जिच्या शरीरातून पुष्कळ रक्तस्राव झालेला असेल, जिला वातज्वर झाला असेल, तहानेने, भुकेने जी व्याकुळ झाली असेल, वा जिचे शरीर गळून गेले असेल, तिच्यावरील उपचार हे शमनरूप असावेत. तिला लंघन देऊ नये. पहिल्या दिवसापासूनच तिला क्रमाक्रमाने पेया, विलेपी यूष, असे पदार्थ भोजनासाठी द्यावेत.

[3]जिला लंघन दिले असेल तिला लंघनानंतर प्रथम मंड द्यावा व मग पेय, विलेपी अशा क्रमाने आहार देत जावा.

अशा रीतीने सूतिकेच्या आहाराची पद्धती दोन प्रकारची आहे.

[4]पेया ही अग्निदीपन करणारी असून, ती धातूंचे शमन करते.

मंड हा गर्भाचे अवशिष्ट दोष नाहीसे करतो. कारण दोषांचे पचन करण्याचा गुण

---

१ श्लेष्माभिष्यन्दिनीं स्थूलामक्लिन्नामल्पनिःस्रुताम् ।
विदग्धभक्तां स्निग्धां च लंघनेनोपपादयेत् ॥ का. सं. सूति, ११–७०

२ रूक्षां निःस्रुतरक्तां च कृशां वातज्वरार्दिताम् ।
क्षुत्तृष्णाभिहतां क्लान्तां शमनेनोपपादयेत् ॥
तस्यास्तदहरेवेह पेयादिः क्रमः इष्यते । का. सं. सूति, ११–७४

३ लंघितायाश्च मण्डादिरित्येष द्विविधः क्रमः ॥ का. सं. सूति, ११–७२

४ पेया हि दीपयत्यग्निं धातून् संशमयत्यपि ।
गर्भदोषावशेषघ्नो मण्डो दोषविपाचनः ॥
तस्मात् पेया च मण्डश्च क्रमादौ विहितौ हितौ ।
आकृतश्च कृतश्चैव द्विस्त्रिर्यूषरसौ तथा ॥ का. सं. सूति. ११–७३, ७४



त्यामध्ये असतो. यासाठी पेयादिक्रम वा मंडादिक्रम आहारासाठी वापरावा. त्यानंतर दोन–तीन दिवसपर्यंत अकृतयूष, कृतयूष व मांसरस द्यावेत.

[1]युक्तीने स्वेदन करणे, अपतर्पण करणे, पाचन औषधे वापरणे, निरनिराळे काढे देणे, अभ्यंग करणे व सिद्धघृत देणे असा हा ज्वरनाश करणारा श्रेष्ठ उपचार आहे.

[2]शीतस्पर्श वा शीतपदार्थ यांचे सेवन, व्यायाम, श्रम, अहितकर पदार्थ खाणे वा ज्वर उत्पन्न करणाऱ्या कारणांचे सेवन करणे, हे सर्व ज्वरामध्ये वर्ज्य मानावेत. अन्यथा या अपथ्य गोष्टींच्या सेवनामुळे ज्वराचे बल वाढते.

[3]सूतिकेच्या शरीरातून पुष्कळ रक्तस्राव झालेला असल्यामुळे तिच्या ज्वरासाठी तीव्र वमन, विरेचन हे शोधनोपचार करू नयेत. शोधनासाठी तीक्ष्ण द्रव्येही वापरू नयेत. कारण सूतिकेचा गर्भाशय आपल्या स्थानापासून च्युत झालेला असतो. आणि त्यामधील दोषही खाली येऊन बाहेर पडून जात असतात. म्हणून शरीरशुद्धीसाठी बहुधा दोषशमन करण्याची आवश्यकता नाही. दोषशुद्धीसाठी, वमन, नस्य, बस्ती, विरेचन हे उपचार अल्पदोष असलेल्या सूतिकेवर तर मुळीच करू नयेत. पण शरीराचे बल पुन्हा प्राप्त झाले असेल आणि शोधन करणे आवश्यक असेल तर दोषांचे बलाबल पाहून युक्तिपूर्वक वमनादी उपचार करावेत.

[4]ज्वराने देह संतप्त झाला असता व दुर्बल झालेल्या शरीरामध्ये क्षीण झालेल्या धातूंचा पाक होण्याची भीती असताना पुन्हा जर या अवस्थेत तीक्ष्ण औषधे वापरली तर त्याचे परिणाम कोठवर जातील हे सांगता येणार नाही. ( म्हणून ती औषधे वापरू नयेत. )

---

१ स्वेदोऽपतर्पणं युक्त्या पाचनौषधसेवनम् ।
कषायोऽभ्यञ्जनं सर्पिर्ज्वरघ्नः परमो विधिः ॥ का. सं. सूति. ११–७५

२ शीतोपवासे व्यायामायासमहिताशनम् ।
तद्धेतुसेवनं चैव क्षिप्रं ज्वरबलावहम् ॥ का. सं. सूति. ११–७६

३ वमनं वा विरेकं वा तीक्ष्णं तीक्ष्णौषधान्वितम् ।
न ह्यतिच्युतदोषाया ज्वरितायाः प्रशस्यते ॥
गर्भाशये च्युते नार्या दोषास्तदनुगामिनः ।
च्यवन्ति तस्माद्वमनं नस्यं बस्तिर्विरेचनम् ॥
न कार्यमल्पदोषायाः शरीरे परिसंस्थिते ।
तदेव युक्तितः कार्यं वीक्ष्य दोषबलाबलम् ॥ का. सं. सूति. ११

४ संतप्ते तूष्मणा देहे धातवः परिपाचिताः ।
भूयस्तीक्ष्णौषधं प्राप्य गच्छेयुरमितां गतिम् ॥ का. सं. सूति. ११–८०

[1]जर कफाचा उत्क्लेश होऊन कफाने छाती दाटली असेल तर कफज्वरामध्ये सौम्य स्वरूपाचे वमन द्यावे. हे वमन देतानाही ते सोसण्याइतके बल सूतिकेस आहे की नाही ते पाहावे.

सूतिकेचा अग्नी चांगला असेल आणि व्याधीचे स्वरूप फारसे उग्र नसेल तर सिद्ध [2]सामान्य उपचाराने जर वातपित्तात्मक ज्वर नाहीसे झाले नाहीत तर त्यावर सिद्धघृत वापरावे. त्याचा चांगला उपयोग होतो.

घृत हे निश्चयाने गुणकारी ठरते. सूतिका ही वातभूयिष्ठ दोषाने पीडित होत असल्याने तिचे बहुतेक व्याधी स्नेहनोपचाराने नाहीसे होतात.

सन्निपातज्वरांतही वायूचे प्राधान्य असताना जुने तूप, मांसरस व यूष यांनी सिद्ध करून वापरावे.

सर्व सूतिकारोगांमध्ये योनिदुष्टी ही बहुतेक एक महत्त्वाचे कारण असते. त्यासाठी सूतिकेच्या व्याधीमध्ये योनिदुष्टीच्या दृष्टीने करावी लागणारी चिकित्सा ही सामान्य चिकित्सेचाच एक भाग समजली पाहिजे. त्यासाठी धावन व धूपन ही दोन कर्मे अवश्य केली पाहिजेत.

कश्यपाने वातज्वर चिकित्सेच्या संदर्भात काही धूपनोपचार सांगितले आहेत. ते सार्वदेहिक न घेता योनीपुरते मर्यादित घ्यावेत असे आम्हांस वाटते.

[3]धूपनासाठी देवदारू, कोष्ट, गुग्गुळ यांचे चूर्ण तुपाने माखून त्याने योनीचे धूपन करावे.

[4]ज्वरामध्ये जी सामान्य लंघनस्वेदनादी चिकित्सा सांगितली आहे ती चिकित्सा सूतिकाज्वरातही कार्यकारीत आणावी.

---

१ उत्क्लिश्यमाने हृदये कफे चाप्युरसि स्थिते ।
कफज्वरे क्षमे देहे विदध्याद्वमनं मृदु ॥ का. सं. सूति. ११-८१

२ यश्च नैवं शमं याति वातपित्तात्मको ज्वरः ॥
सर्पिस्तं शमयेदाशु दावाग्निमिव तोयदः ।
विमलेऽग्नौ मृदौ (व्याधौ) सर्पिरेव परायणम् ॥
स्नेहवध्यास्तु भूयिष्ठं व्याधयो दुष्प्रजातयः ।
सान्निपातज्वरे नार्या मारुते च बलीयसि ॥
संस्कृतं रसयूषाभ्यां पुराणं सर्पिरिष्यते ॥ का. सं. सूति. ११-८७ ते ८९

३ धूपयेत् सुदारुणा ॥ का. सं. सूति ११
कुष्ठगुग्गुलुधूपेन घृतमिश्रेण धूपयेत ॥ का. सं. सूति.

४ लंघनं स्वेदनं कालो यवागूस्तिक्तको रसः ।
मलानां पाचनानि स्युर्युथावस्थं क्रमेण वा ॥ वा. चि. अ. ११-८२



सूतिकाज्वरामध्ये रोगाच्या अवस्थेनुरूप चिकित्सा करावी.

## १. आमावस्थेची चिकित्सा :

यात ज्वराचा वेग जास्त असतो व आमाची लक्षणे दिसतात. जिव्हा साम असते. अशा स्थितीत ज्वराला संपूर्ण लंघन देणे आवश्यक असते. परंतु सूतिका ही संपूर्ण लंघन देण्यास अयोग्य असल्याकारणाने तिला यवागू व द्रव आहार देणे आवश्यक असते. स्वेदन हेसुद्धा नुसत्या गरम कपड्याने शेकणे जेवढे होईल तेवढेच येथे अभिप्रेत आहे. कारण सूतिका ही अस्वेद्य आहे. या अवस्थेत पुढीलप्रमाणे औषधी योजना करावी.

(१) दर २–२ तासांनी चाटण द्यावे.
सूक्ष्म त्रिफळा २ गुं.
गंधक रसायन २ गुं.
त्रिकटू चूर्ण २ गुं.
अनुपान – आर्द्रकावलेह, मध, किंवा गरम पाणी –दोषानुरूप.

(२) पित्तज ज्वर अथवा ज्वरवेग जास्त असल्यास दर दोन तासांनी चाटण द्यावे.
चंद्रकला २ गुं.
सूतशेखर २ गुं.
अनुपान – मध

(३) सकाळ संध्याकाळ जेवणानंतर
देवदार्व्यारिष्ट ४ चमचे
दशमूलारिष्ट ४ चमचे
पाणी ८ चमचे

(४) संपूर्ण विश्रांती.

(५) रुग्णाचे आसन – डोके उंच करून ठेवावे.

(६) दिवसातून योनिप्रक्षालन त्रिफळा क्वाथाने व धूपन ३–४ वेळा करावे. उदरावर भगास्थीच्या वरच्या बाजूस लेपगोळी अथवा लताकरंज यांचा लेप घालावा.

(७) आहार–द्रवाहार–फांट, पेया, लाजमंड, सुंठीसिद्ध वा त्रिकटुसिद्ध दूध द्यावे. अभिष्यंदी व लवणयुक्त आहार वर्ज्य करावा.

(८) स्तनपान देऊ नये. पण स्तन्य जास्त प्रमाणात येत असेल तर काढून टाकावे.

## २. पच्यमानावस्थेची चिकित्सा :

(१) दर ४–४ तासांनी
प्रतापलंकेश्वर २ गुं.
अनुपान – मध, गरम पाणी

(२) सकाळ संध्याकाळ जेवणानंतर
देवदार्व्यारिष्ट ४ चमचे
दशमूलारिष्ट ४ चमचे
पाणी ८ चमचे

(३) संपूर्ण विश्रांती.

(४) रुग्णाचे आसन – डोके उंच करून ठेवावे.

(५) दिवसातून योनिप्रक्षालन त्रिफळा क्वाथाने व धूपन ३-४ वेळा करावे. उदरावर भगास्थीच्या वरच्या बाजूस लेपगोळी अथवा लताकरंज यांचा लेप घालावा.

(६) आहार-द्रवाहार-फांट, पेया, लाजमंड, सुंठीसिद्ध वा त्रिकटुसिद्ध दूध द्यावे. अभिष्यंदी व लवणयुक्त आहार वर्ज्य करावा.

(७) स्तनपान देऊ नये. पण स्तन्य जास्त प्रमाणात येत असेल तर काढून टाकावे.

सामावस्था कमी होऊन ज्वराचा वेग कमी झालेला आढळतो व रुग्णास थोडी थोडी भूक लागते.

## ३. पक्वावस्थेची चिकित्सा :

ज्वरमुक्ती होऊन जिव्हा वगैरे निराम होते. रुग्णेस दौर्बल्य, स्वेदाधिक्य जास्त प्रमाणात सापडते. अशा वेळी

(१) सकाळ, दुपार, संध्याकाळ
चंद्रप्रभा २ गुं.
आरोग्यवर्धिनी २ गुं.
अनुपान – गरमपाणी, जीरकफांट



(२) सकाळ, दुपार, संध्याकाळ
त्रिफळा, गुग्गुळ २ गुं.
अनुपान– गरम पाणी; तूप + साखर

(३) सकाळ, संध्याकाळ, जेवणानंतर
दशमूलारिष्ट ४ चमचे
देवदार्व्यारिष्ट ४ चमचे
पाणी ८ चमचे

(४) संपूर्ण विश्रांती.

(५) रुग्णाचे आसन– डोके उंच करून ठेवावे.

(६) दिवसातून योनिप्रक्षालन त्रिफळा क्वाथाने व धूपन ३–४ वेळा करावे. उदरावर भगास्थीच्या वरच्या बाजूस लेपगोळी अथवा लताकरंज यांचा लेप घालावा.

(७) आहार–द्रवाहार–फांट, पेया, लाजमंड, सुंठीसिद्ध वा त्रिकटुसिद्ध दूध द्यावे. अभिष्यंदी व लवणयुक्त आहार वर्ज्य करावा.

(८) स्तनपान देऊ नये. पण स्तन्य जास्त प्रमाणात येत असेल तर काढून टाकावे.

## ४. स्तन्यज ज्वराची चिकित्सा :

स्तन्यज ज्वरामध्ये स्तन्याच्या ठिकाणी स्वतंत्र चिकित्सा करणे आवश्यक असते.

(१) स्तनावर लेप गोळी; तांदूळ व दूर्वा; लताकरंज; गुग्गुळ यांचा कोष्ण लेप घालावा. यामुळे विम्लापन असे कार्य होते.

बालकास स्तनचुचुकामधून आचूषण करण्यास भाग पाडावे. किंवा अगदी हलक्या हाताने वा अन्य प्रकाराने आचूषण करून स्तन्य काढावे. (ही क्रिया स्तन्य स्तनवह स्रोतसांतून स्रवावयास लागल्यानंतरच करावी.) जर स्तनस्तब्धता असताना आचूषण केले तर सूतिकेला तीव्र वेदना होतात. अशा वेळी मर्दन करू नये.

बाकी सर्व औषधी चिकित्सा, आहारविहार सामावस्थेच्या चिकित्सेप्रमाणे दोषांचे बलाबल पाहून व सामादी अवस्थांनुरूप करावी.

स्तन्यज ज्वराचे क्वचित वेळी स्तनविद्रधीमध्ये रूपान्तर झालेले आढळते. त्या वेळी स्तनविद्रधीची चिकित्सा करावी.

## ५. ग्रहज ज्वर चिकित्सा :

ग्रहत्थोज ज्वरामध्ये योनिदुष्टीबरोबर मनोवह स्रोतस् दुष्ट झालेले आढळते.

अशा वेळी मनोवह स्रोतसांवर चिकित्सा करणे आवश्यक ठरते. या वेळी निद्राजनक अशी औषधे देऊन रुग्णेस दिवसातून काही काळ झोपवून ठेवणे आवश्यक असते. त्यामुळे मानसिक व शारीरिक विश्रांती मिळून औषधी चिकित्सा फलद्रूप होते.

(१) अहिफेन कल्प २–४ गुं.
(२) खुरासनी ओवा २–३ मासे
(३) निद्रोदय रस २–४ गुं.
} अनुपान— गरम पाणी
(४) मेधामृत ४ चमचे सकाळ-संध्याकाळ देणे
(५) प्रशम ४ चमचे ते ८ चमचे रात्री झोपताना देणे.

याचबरोबर योनिदुष्टीवरील सर्व चिकित्सा दोषानुरूप व अवस्थेनुरूप द्यावी.

तिची शुश्रूषा, औषधोपचार व आहार गर्भोपद्रव-अपस्मार प्रकरणी दिल्याप्रमाणेच सूतिकेस द्यावा. कारण ती तोंडाने काहीही घेण्यास असमर्थ असते.

**उपद्रव :**

सूतिका शोथ.

## (२) सूतिका–शोथ

**प्रकार :**

द्विधा वा निजमागन्तुं सर्वाङ्गैकाङ्गजं च तम् ॥ वा. नि. १३–२३

सर्वांगजन्य, एकांगजन्य किंवा निज व आगन्तू [illegible] शोथाचे दोन प्रकार होतात.

सूतिकेमध्ये आश्रयभेदाने सर्व शरीराला व्यापून असणारा, अर्ध शरीराला व्यापून असणारा आणि विशिष्ट मर्यादित अवयवांना व्यापून असणारा– (एक पाय–पावला-पासून जांघेपर्यंत; एक पाऊल; एक पाऊल ते गुडघ्यापर्यंत; कमरेपासून मांडीपर्यंत व अशाच पद्धतीने दोन्ही पाय)– अशा तीन प्रकारचा शोथ चरकाने सांगितला आहे व ते प्रत्यक्षातही आढळतात.

**कारणे व संप्राप्ती :**

प्रसवोत्तर झालेल्या रक्तस्रावामुळे व श्रमामुळे सूतिकेचे शरीर क्षीण झालेले असते व अग्निमांद्यही असल्यामुळे मिथ्याहार व मिथ्योपचार यांच्यामुळे शरीरामध्ये दोषदुष्टी उत्पन्न होऊन प्रथम योनिदुष्टी होते व दुष्ट झालेले दोष रक्त, पित्त व कफ (रस) यांच्यामध्ये वैगुण्य उत्पन्न करते. वायू प्रकुपित होतो. हा प्रकुपित झालेला वायू रक्तपित्तकफांना दुष्ट करून त्यांना शरीरांतील बहि:सिरामध्ये घेऊन



जातो. या बहि:सिरामध्ये आलेला दुष्ट रक्तपित्त कफाने वायूचाच मार्ग रुद्ध होतो आणि त्यामुळे रक्तपित्तकफादी द्रव्ये ज्या अवयवांत स्थानवैगुण्य असेल त्या अवयवांतच त्वक् आणि मांस यांच्या आश्रयाने शोथ उत्पन्न होतो.

**प्रकार :**

वातज, पित्तज, सान्निपातिक अशा चार प्रकारचा शोथ उत्पन्न होतो.

**लक्षणे :**

| | वातजशोथ | पित्तजशोथ | कफजशोथ | सान्निपातिक शोथ |
|---|---|---|---|---|
| स्थानिक लक्षणे | तीव्र वेदना<br>शूल<br>नीलवर्ण<br>नोन्नमित<br>हळूहळू<br>वरून खाली<br>पसरत जातो. | स्पर्शासहत्व<br>शूल<br>रक्तवर्णता<br>स्पर्शासहत्व | गौरव<br>शूल<br>त्वचा तुकतुकीत<br>प्रोन्नमित<br>एकदम येतो. | त्रिदोषज |
| सार्वदैहिक लक्षणे | निद्रानाश<br>जिव्हा साम<br>वंक्षणभागी ग्रंथी<br>योनिदुष्टी | निद्रानाश<br>साम<br>वंक्षणभागी ग्रंथी<br>योनिदुष्टी | निद्रानाश<br>साम<br>वंक्षणभागी ग्रंथी<br>योनिदुष्टी | त्रिदोषज |
| योनी | स्राव दुर्गंधी | दुर्गंधी | दुर्गंधी | त्रिदोषज |
| ज्वर | विषमवेग | तीव्रवेग | मध्यमवेग | त्रिदोषज |

**चिकित्सा :**

| | आमावस्था | पच्यमानावस्था | पक्वावस्था |
|---|---|---|---|
| | योनिदुष्टीची चिकित्सा करावी. | योनिदुष्टीची चिकित्सा करावी. | योनिदुष्टीची चिकित्सा करावी. |
| औषधी | १. आमपाचकयोग, त्रिकटु, शिग्रुबीज कज्जली सूक्ष्म त्रिफळा | चंद्रप्रभा गुग्गुळकल्प | चंद्रप्रभा गुग्गुळकल्प |
| | २. पुनर्नवासव<br>३. वरुणादि क्वाथ<br>४. देवदार्व्यादि क्वाथ | दशमूलारिष्ट<br>वरुणादि क्वाथ<br>— | दशमूलारिष्ट<br>वरुणादि क्वाथ<br>— |
| लेप | अहिफेन, धोतरा, बचनाग, टेंटू, शिग्रु, वचा | अहिफेन, धोतरा बचनाग, टेंटू, शिग्रु वचा | अहिफेन धोतरा बचनाग, टेंटू, शिग्रु, वचा |
| आहार | पेया, त्रिकटुसिद्ध दुग्ध लवण व अभिष्यंदी आहार वर्ज्य | मऊ भात<br>लवणे व अभिष्यंदी आहार वर्ज्य | सामान्य आहार<br>लवण व अभिष्यंदी आहार वर्ज्य |
| विहार | संपूर्ण विश्रांती | संपूर्ण विश्रांती | संपूर्ण विश्रांती |
| | पायाखाली उंच उशी देऊन उताणे झोपवावे. | | |
| काल | ८–१० दिवस | १५ दिवस | १ महिना |

संपूर्ण शोथ नाहीसा झाल्याशिवाय पायाचे चलनवलन सुरू करू नये. सुरुवातीस अगदी अल्प प्रमाणात व हळूहळू हालचाली कराव्यात.

संपूर्ण व्याधिमुक्तीस १½ ते २ महिन्यांचा काल लागतो.

पुढील प्रसवामध्ये योनिदुष्टी न होईल याची खबरदारी घेणे आवश्यक असते. अन्यथा वरील रोगांची उत्पत्ती पुन्हा होण्याची शक्यता असते.



## ( ३ ) सूतिका-मक्कल्ल

[1]प्रसूतीनंतर गर्भाशयातून वाहून जाणारे रक्त जर धातु-क्षीणता, वातप्रकोप, अवयवांची रूक्षता किंवा प्रसूतीनंतर करावयाच्या शोधन उपचारांची न्यूनता या कारणांनी वाहून गेले नाही व मार्गावरोधामुळे गर्भाशयातच साचून राहिले तर त्यामुळे गर्भाशय हा आत साठलेल्या रक्तामुळे ताणला जातो व ह्या ताणामुळे नाभीचे अधोभागी दोनही पार्श्वांमध्ये बस्ती व बस्तिशिर या ठिकाणी उत्सेध व तीव्र शूल उत्पन्न होतो व त्यामुळे या अवयवामध्ये सुयांनी टोचल्यासारखा, फाडल्यासारखा, फोडल्यासारखा शूल उत्पन्न होतो. पक्वाशयांमध्ये तो विशेष जाणवतो. उदरामध्ये आध्मान हे लक्षण दिसू लागते व मूत्रप्रवृत्ती होत नाही. या व्याधीस मक्कल्ल असे नाव आहे.

कित्येक वेळी याच संचित रक्तामुळे आलेल्या उत्सेधातून गर्भाशयामध्ये विद्रधीही उत्पन्न होतो.

**चिकित्सा :**

[2]वीरतरू (शमीसारखी बारीक पाने असणारा एक काटेरी वृक्ष. काही अर्जुन असा याचा अर्थ करतात.), कोरांटी, बांडगुळ, नागरमोथे, पाषाणभेद, अग्निमंथ,

१ प्रजातायाश्च नार्या रूक्षशरीरायास्तीक्ष्णैरविशोधितं रक्तं वायुना तद्देशगतेनातिसंरुद्धं नाभेरधः पार्श्वयोर्बस्तौ बस्तिशिरसि वा ग्रन्थिं करोति, ततश्च नाभिबस्त्युदरशूलानि भवन्ति, सूचीभिरिव निस्तुद्यते भिद्यते दीर्यते इव च पक्वाशयः समन्तादाध्मानमुदरे मूत्रसंगश्च भवतीति मक्कल्ललक्षणम् । सु. शा. अ. १०–२२
प्रजातायाः प्रजननशोणितसंजनितशूलं मक्कल्लः अवरुद्धरक्तपाकजनितो विद्रधीरपि मक्कल्लः, कार्ये कारणोपचारात् ।
वायुः प्रकुपितः कुर्यात्संरुध्य रुधिरं च्युतम् ।
सूताया हृच्छिरोबस्तिशूलं मक्कल्लसंज्ञितम् ॥ सु. शा. अ. १०–२२ टीका

२ तत्र (सर्पिषा सुखोष्णेन लवणचूर्णेन वा) वीरतर्वादिसिद्धं जलमुषकादिप्रतीवापं पाययेत्, यवक्षारचूर्णं वा पिप्पल्यादिक्वाथेन, पिप्पल्यादिचूर्णं वा सुरामण्डेन, वरुणादिक्वाथं वा पञ्चकोलैलाप्रतीवापं, पृथक्पर्ण्यादिक्वाथं वा भद्रदारुमरिचसंतुष्टं पुराणगुडं वा त्रिकटुक चतुर्जातककुस्तुम्बुरुमिश्रं खादेत, अच्छं वा पिबेदरिष्टमिति ।। सु. शा. अ. १०–२२
टीका – मक्कल्लचिकित्सामाह—तत्रेत्यादि । जलं क्वाथम् । यवक्षारचूर्णसुखोदकेन मन्दाग्नौ, कफप्रकृतीनां पिप्पल्यादिक्वाथेन, पिप्पल्यादिचूर्णं वा सुरामण्डेन, एवमन्येऽपि योगादोषादीनवेक्ष्य योजनीयाः । अच्छं केवलम् । अरिष्टमभयारिष्टादिकम् ।। सु. शा. अ. १०–२२ टीका

मोरवेल, आघाडा, गोखरू या द्रव्यांचा काढा करून त्यात खाऱ्या मातीपासून तयार केलेले मीठ घालून प्राशन करावे.

अग्निमांद्यात यवक्षार कोंबट पाण्यातून वा कफप्रकृतीत पंचकोलाच्या काढ्याबरोबर द्यावा.

पंचकोलाचे चूर्ण मध्याच्या निवळीतून द्यावे.

वायवर्णा, शेवगा, देवडांगरी, करंटी, तोंडली, आघाडा, चित्रक, शतावरी, बेल, काकडीशिंगी, मेढशिंगी, दर्भ, रिंगणी, डोरली या वरुणादिगणातील द्रव्यांचा क्वाथ करून त्यात पंचकोल व एला यांचे चूर्ण घालून तो प्राशन करावा.

त्रिकटू, चतुर्जात व धने यांचे चूर्ण व जुना गूळ एकत्र करून खाण्यास द्यावा. अभयारिष्ट वा दशमूलारिष्ट द्यावे.

[1]हिंगाची लाही तुपाबरोबर सेवन करावी. वर ऊन पाणी प्यावे.

मक्कल्लशूलासाठी काळा बोळ व लताकरंज यांचे चूर्ण गुळातून द्यावे. यामुळे संचित रक्ताचे शोधन व वाताचे अनुलोमन होऊन शूल थांबतो.

बिब्याची शेवते तुपात पाडून ते तूप सूतिकेस द्यावे. भल्लातक हा विबंधघ्न व वातहर असल्यामुळे मक्कल्लशूल थांबण्यासाठी त्याचा चांगला उपयोग होतो.

## ( ४ ) विद्रधी

मक्कल्लाचा उपद्रव म्हणून हा व्याधी बहुधा आढळतो. शोधनार्ह रक्त संचित होऊन वातादिदोषांनी दुष्ट होते व इतरही धातूंना दुष्ट करते. त्यामुळे सूतिकेचा अपत्यपथ वा त्याच्या आसमंत भागी विद्रधी उत्पन्न होतो. त्यामुळे ज्वर, शूल, स्पर्शासहत्व, मलमूत्र संग, श्रोणीभागी तीव्र वेदना अशी लक्षणे उत्पन्न होतात.

### चिकित्सा :

विद्रधी हा आमावस्थेत व सौम्य स्वरूपात असताना सूक्ष्म त्रिफळा, गंधकरसायन, त्रिभुवनकीर्ती, कुमारी आसव, देवदार्व्यादी क्वाथ, अशी द्रव्ये वापरावीत व अवगाह स्वेद, उत्तरबस्ती ( दशमूल क्वाथाचा ) द्यावा.

प्रारंभीच्या अवस्थेमध्ये संचित दोषांचे शमन या उपचारांनी होते.

विद्रधी आकाराने मोठा, ज्वर तीव्र वेदना इ. लक्षणांनी युक्त व पक्वावस्थेत असेल

१ हिंगुघृढं ससर्पिष्कं भुक्तं मक्कल्लशूलनुत । यो. र., पान ६०३, भाग २



तर त्याचे शस्त्राने भेदन करावे. विद्रधीच्या स्थानाप्रमाणे हे शस्त्रकर्म योनिमार्गातून किंवा अधोदरामध्ये छेद घेऊन करावे लागते.

अधोमार्गाने भेदन केले असल्यास व्रणकर्मासवे धावनासाठी पंचवल्कलाचा कोष्ण उत्तरबस्ती वापरावा.

## ( ५ ) योनिक्षत

विषम प्रसूतीमध्ये वा कष्ट प्रसूतीमध्ये अपत्य योनिद्वारातून बाहेर पडताना योनिमार्ग क्षययुक्त होतो. दाह, स्पर्शासहत्व, स्राव, शूल अशी लक्षणे असतात.

### चिकित्सा :

[1]कडू तोंडल्याची पाने व लोध्र समभाग घेऊन वाटून श्लक्ष्ण कल्क करावा. त्याचा लेप योनिभागास केला असताना सूतिकेचे त्या स्थानी असलेले व्रण भरून येतात.

योनिव्रण।शाडी पंचवल्कल कषाय, शोधनतेल, रोपणतेल, शतधौतघृत, मधुघृत, शंखजीरक, गैरिक यांचा अवस्थेनुरूप उपयोग करावा.

## ( ६ ) वाताष्ठीला

[2]अष्ठीलेप्रमाणे स्पर्शास कठीण अशी गाठ नाभीच्या खालील भागी (अधोभागी) उत्पन्न होते. ही क्वचित स्थिर असते; क्वचित चल असते. या ग्रंथीचा आकार उंच, लांबट असा असून ती ग्रंथी वर उचलल्यासारखी लागते. या ग्रंथीलाच वाताष्ठीला

१ तुंबीपत्रं तथा लोध्रसमभागान् कारयेत् ।
दद्यात् लेपं भगस्येदं प्रसूताप्यक्षताभवेत् ॥ वंगसेन स्त्रीरोगाधिकार

२ अष्ठीलावद्धनं ग्रान्थिमूर्ध्वमायतमुन्नतम् ॥
वाताष्ठीला विजानीयाद्बहिर्मार्गावरोधिनीम् ॥
एतामेव रुजायुक्तां वातविण्मूत्ररोधिनीम् ॥
प्रत्यष्ठीलामिति वदेज्जठरे तिर्यगुत्थिताम् ॥ सु. नि. अ. १–९०

न्या. च. प्रतिशब्द विशेषणसामान्यादुदरगतसामान्याच्चांपरमपि वातरोगं निर्दिशन्नाह– अष्ठीलावद्धनं ग्रान्थिरित्यादि । 'अष्ठीला उत्तरापथे वर्तुलपाषाणः' इत्येके; 'चर्मकाराणां वर्तनीया लौही भाण्डिः' इत्यपरे । बहिर्मार्गावरोधिनी बहिर्मार्गाणि वातविण्मूत्राणि तेषां नियमेन रोधिनी या; तामेव तिर्यगुत्थितां वाताविण्मूत्र रोधनशीलां निर्दिशेत् । उभे अप्येते पक्वाशयोत्थिते अत्रैव वाताद्यवरोधेन क्रियोपलम्भात् ! अन्ये त्वत्र 'नाभेरधस्तात् संजातं चलं वा यदि वाऽचलाम्' इति पठन्ति ॥ सु. नि. १, ९० न्या. च. टीका

असे म्हणतात. या ग्रंथीमुळे वात, पुरीष, मूत्र हे जे बहिर्मलमार्ग त्यांचा अवरोध होतो. हीच ग्रंथी या वेळी वेदनायुक्त असेल व तिची वाढ तिरप्या दिशेत झाली असेल त्या वेळी तिला प्रत्यष्ठीला असे म्हणतात. हिच्यामुळेही वातमूत्रपुरीष यांचा निरोध होतो.

टीकाकारांनी या दोन्हीही ग्रंथी पक्वाशयोत्थ असतात असे सांगितले आहे. माधवनिदान सम्मत पाठाप्रमाणे नाभीच्या अधोभागी एवढेच स्थान सुचविले जाते. या रोगाचे स्वरूप निश्चित काय आहे हे नक्की सांगणे कठीण आहे.

वाताष्ठीला या नावाने आणखी एक रोग सु. उ. अ. ५८ सूत्र ७, ८ येथे मूत्राघात प्रकरणात उल्लेखिला आहे. त्या ठिकाणी बस्ती हे स्थान निश्चित असावे असे एकंदर वर्णनाचा विचार करता वाटते. त्यामुळे निदान स्थानात वर्णिलेला रोग हा या व्याधीपेक्षा निराळा असला पाहिजे.

या व्याधीमध्ये उल्लेखिलेल्या ग्रंथीची घनता, विण्मूत्ररोध आणि रुजायुक्तता या लक्षणांवरून पक्वाशयाच्या अधोभागाला या ठिकाणी उत्पन्न होणारा हा एक प्रकारचा ग्रंथिसदृश रोग असला पाहिजे.

हा क्रमाने वाढत जाऊन वेदना व मार्गावरोध ही लक्षणे अधिकाधिक उत्पन्न करीत असावा.

घनता, रुजा, मार्गावरोध या लक्षणांवरून याचे स्वरूप सान्निपातिक असावे.

अष्ठीला नावाच्या एक प्रकारच्या वर्तुळाकृती पाषाणाशी त्याची तुलना केली असल्यामुळे तो बरा होण्यास कठीण असला पाहिजे असे वाटते.

विषमप्रसव, बहुप्रसव, अतिमैथुन, या कारणांनी स्त्रियांच्यामध्ये प्रथमावर्त, द्वितीयावर्त वा तृतीयावर्ताच्या ठिकाणी अशा रीतीचे लेपन, स्वेदन, दीपन, पाचन या उपचारांनी बरे न होणारे असे सान्निपातिक ग्रंथी उत्पन्न होतात.

पुढे पुढे यांच्यामुळे धातुदुष्टी उत्पन्न होऊन तीव्र वेदना, पांडू, कामला, आध्मान, शूल, स्राव अशी गंभीर लक्षणे उत्पन्न होतात. हा व्याधी औषधसाध्य नाही. धातुदुष्टी गंभीर होण्यापूर्वी आरंभीच्या अवस्थेत शस्त्रकर्माने ग्रंथियुक्त भाग काढून टाकून स्त्रीचे रक्षण करता येते.

यापुढे कोष्टक रूपाने सूतिकेला होणाऱ्या सर्व रोगांचा हेतु, लक्षण, चिकित्सा संक्षिप्तरीत्या दिली आहे. त्यातील लक्षणे ही व्याधीच्या नावावरून अनुमानिता येणाऱ्या व्याधिस्वरूपास अनुकूल अशी प्रत्यक्ष प्रमाणाने सांगितली आहेत. चिकित्साही अनुभविक आहे. कारण लक्षणचिकित्सा यांना ग्रंथांतरी स्पष्ट आधार नाही.

## मासानुमासिक गर्भिणी–परिचर्या

| | प्राकृत | | | | विकृत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मास | गर्भाची मासानुमासिक वाढ | प्राकृत लक्षणे | प्रा. ल. ची कारणे | उपचार | गर्भाची विकृति | विकृत लक्षणे | उपचार | परिणाम |
| प्रथम | कललभाव एक रात्री पुरताच असतो. ७ दि. त बुडबुड्याचे स्वरूप, १५ दि. नंतर गोळास्वरूप व १ महिन्याचे शेवटी घनता प्राप्त होते. | प्रसेक, आलस्य, तंद्रा, अंगसदन, योनिस्फुरण, हृत्स्पंद | गर्भाधान | व्यवाय-व्यायाम अजीर्ण. तीक्ष्ण द्रव्ये वर्ज्य | — | स्राव | पूर्ण विश्रांती, मौक्तिक, प्रवाळ, माक्षिक अशोक कमळ, यांचा उपयोग तीक्ष्ण, उष्ण वर्ज्य. शीत द्रव्योपयोग | गर्भस्राव कष्टसाध्य |
| द्वितीय | घनता प्राप्त होऊन त्यास पिंड, पेशी वा अर्बुदाकार; पुढे उत्पन्न होणाऱ्या अपत्याच्या पुरुष, स्त्री वा नपुंसक लिंगाच्या अनुक्रमाने येतो. | हृल्लास, रजोऽप्रवृत्ति. अरुचि, छर्दी, अम्लप्रीति | गर्भदोषोत्पीडन | लघु-मधुर द्रवशीत आहार, निंबु-दाडिम रस आमल्की प्रवाळ पंचामृत नारीकेलजल | — | छर्दि, कार्श्य. अनन्नाभिलाषा, अवष्टंभ, स्राव | मयूरपिच्छामषी. मृद्भृष्टजल, दाडिमादिघृत, च्यवनप्राश गर्भपालरस, शतामृत, शतावरी कल्प, मात्राबस्ति, द्राक्षा + आमलकी- फांट- अनुलोमनासाठी | गर्भस्राव कष्टसाध्य |

## मासानुमासिक गर्भिणी–परिचर्या

| | प्राकृत | | | | विकृत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मास | गर्भाची मासानु-मासिक वाढ | प्राकृत लक्षणे | प्रा. ल. ची कारणे | उपचार | गर्भाची विकृती | विकृत लक्षणे | उपचार | परिणाम |
| तृतीय | सर्व इंद्रिये, सर्व अंगावयवांची उत्पत्ती होते. हात, पाय, व डोके असे पाच पिंडाकुर गर्भ-शरीरावर व्यक्त होतात. | स्तनपुष्टी, गौरव, कृशता | — | — | दंतोत्पत्ति. स्त्रीलिंगी अपत्यामध्ये रज (रक्त) व स्तन यांचे दर्शन होते. | छर्दीनंतर रक्तप्रवृत्ती | लाक्षा, प्रवाळ दाडिमघृत | गर्भस्राव कष्टसाध्य |
| चतुर्थ | अंगप्रत्यंग विभाग व्यक्ततर होतो व गर्भाला स्थिरत्व येते. | स्तनमंडल ओष्ठ-कृष्णता, अपांग, श्यावता, रोमराजी, कृष्णत्व, जृंभा, गंधा-प्रीती, योनिशैथिल्य, गौरव | गर्भाचे स्थिर होणे. | — | — | शोथ, योनि-भ्रंश, गर्भ-पात. | चंद्रप्रभा, पुनर्नवा, गर्भपालरस, अस्थि-पोषक अवनत शिर-स्कासन. मीठ वर्ज्य, पिचुधारण, प्रवा-हाण वर्ज्य | गर्भपात, कष्टसाध्य |
| पंचम | मन अधिक जाणीव-युक्त होते. मांस शोणित इत्यादी धातूंचा उपचय चेतना व्यक्त होते. पृष्ठवंश आकार घेतो. | कार्श्य, गर्भस्फुरण उदर वृद्धि व्यक्त, गर्भहृत्स्पंदन | गर्भधातुवृद्धी | मधुरौषध-सिद्ध घृत. | — | शूल, अरति निद्रानाश शोथ | फलघृत शतावरी-कल्प | गर्भपात कष्टसाध्य |

## मासानुमासिक गर्भिणी–परिचर्या

| | प्राकृत | | | | विकृत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मास | गर्भाची मासानु-मासिक वाढ | प्राकृत लक्षणे | प्रा. ल. ची कारणे | उपचार | गर्भाची विकृती | विकृत लक्षणे | उपचार | परिणाम |
| षष्ठ | बुद्धी उत्पन्न होते. केश, रोम, नख अस्थी, स्नायू, बल, वर्ण हे भाव स्पष्ट रूप घेतात. मुख नाक, डोके, कान यांचे आकार स्पष्ट होतात. | बलवर्णहानी, अल्पपादशोथ, पाण्डुता | गर्भ बलवर्ण वृद्धी | यकृतप्राश, मंडूरभस्म, नवजीवनरस | — | अतिपांडु हृद्रोग | रक्तवर्धक, लक्ष्मीविलास | गर्भपात कष्टसाध्य |
| सप्तम | सर्व अंगप्रत्यंग विभागाने पूर्ण होतो अवयवांचे स्वरूप विकसित होते. | क्लम, किक्विस | गर्भ सर्वांग-पूर्णता, | लघु-बल्य बृंहण आहार, मधु-मालिनी वसंत, आमगर्भ | — | कंडू, विदाह, अकालप्रसव | करंजतैल, परि-भद्रतैल, प्रति-सारण निंबजल-धावन, फलघृत | गर्भपात कष्टसाध्य |
| अष्टम | | म्लानता, हर्ष, वरचेवर | ओजाचे परिवर्तन | विश्रांती, प्रवास वर्ज्य | — | बालमृत्यू | — | — |

## मासानुमासिक गर्भिणी-परिचर्या

| प्राकृत | | | | | विकृत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मास | गर्भाची मासानुमासिक वाढ | प्राकृत लक्षणे | प्रा. ल. ची कारणे | उपचार | गर्भाची विकृती | विकृत लक्षणे | उपचार | परिणाम |
| नवम | गर्भ सर्व शरीरावयवांत परिपूर्ण पुष्ट होऊन प्रसवोन्मुख होतो. | क्षुद्रश्वास, उरोदाह छर्दी, सौहित्यं न सहते, पादशोथ, पुरोनमन कष्टदायक | गर्भप्रपीडन | थोडे थोडे खावे शंखभस्म, सज्जीक्षार निंबुपानकातून दूध+पाणी गार करून घेणे. | — | — | — | — |
| दशम | — | अधोगुरुत्व, हृदयबंधविमोचन मलमूत्रप्रवृत्ती वारंवार, ऊरुसाद | गर्भप्रपीडन | एरंडस्नेहाने अनुलोमन, स्निग्धबस्ती तैलाने योनिभागी अभ्यंग | — | मूढगर्भ | — | कष्टप्रसव |

## सूतिका परिचर्या

| प्राकृत | | | | विकृत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| काल | प्राकृत लक्षणे | हेतू | उपचार | विकृत लक्षणे | हेतू | उपचार | परिणाम |
| (१) प्रसूत मात्र (सुमारे ३–४ तास | ग्लानी, क्लम, योनिस्राव, अधोदरशूल, अंगमर्द | प्रसव, रक्तस्राव, श्रम | विश्रांती, उदरबंध, काळाबोळ, दशमूलारिष्ट, संवाहन, कोष्ण सघृत पेया | अतिदौर्बल्य, अतिरक्तस्राव, तंद्रा, भ्रम, मूर्च्छा, ज्वर, तीव्र शूल | कष्टप्रसव, रक्तस्राव धातुक्षय दौर्बल्य | द्राक्षासव, दशमूलारिष्ट, मोचरस, कार्पासमूल, घनसार, विश्रांति, उदराभ्यंग, मर्दन बलातैलाने | ज्वर, पाण्डु, मक्कल, मृत्यू |
| (२) पहिला दिवस | क्लम, स्राव, शूल अंगमर्द, निद्रानाश | प्रसव, रक्तस्राव श्रम | निद्राजनन, शूलघ्न औषधे, भल्लातक तुपातून, खुरासनी ओवा, दशमूलारिष्ट, दशमूलक्वाथाचा बस्ति, पेया, लवण वर्ज्य | अतिदौर्बल्य, अतिरक्तस्राव, तंद्रा, भ्रम, मूर्च्छा, ज्वर, तीव्रशूल, मूत्रसंग | कष्टप्रसव, रक्तस्राव धातुक्षय, दौर्बल्य | चंद्रप्रभा, अवगाहस्वेद, वातगजांकुश | ज्वर, पाडु, मक्कल, मृत्यू, |

| काल | प्राकृत लक्षणे | हेतू | उपचार | विकृत लक्षणे | हेतू | उपचार | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ( ३ ) दुसरा तिसरा दिवस | वरील सर्व लक्षणे मंदावतात. अग्निमांद्य | प्रसव, रक्तस्राव, श्रम | औषधे वरीलप्रमाणेच. आहारात विलेपी, घृत, लशुन, मरिच, सुंठी, धूप योनीस प्रत्यही द्यावा. लताकरंज+पिंपळमूळ, ओवा, शोपा. गुग्गुळ, लवण वर्ज्य. | वरील लक्षणे वाढतात. अरुची, अनन्नाभिलाषा, मलावष्टंभ, आध्मान | कष्टप्रसव, रक्तस्राव, धातुक्षय, दौर्बल्य | एरंडस्नेह + सुंठी-क्वाथ, लताकरंज, पिंपळमूळ, त्रिभुवनकीर्ती, शंखवटी, द्रव आहार | शूल |
| ( ४ ) चवथा पाचवा दिवस | स्तन्योत्पत्ती, स्तनगौरव, योनिस्राव कृष्णवर्ण | — | अल्पतापस्वेद, आचूषण, मऊ भात, तूप, मूलारिष्ट; कोष्णजलस्नान, शिरा, त्रिकटू, दशतांबूल भक्षण | स्तनांमध्ये स्पर्शासहत्व, ज्वर, निद्रानाश, योनिस्राव, ग्रंथिल, दुर्गंधियुक्त | स्तन्य प्रादुर्भाव | लेप, स्वेद, आचूषण, त्रिभुवनकीर्ती, सूक्ष्म त्रिफळा | स्तन-विद्रधि. |
| ( ५ ) पाच ते दहा दिवस | बल, वर्ण, सुधारू लागतात. भूक लागते. स्राव कमी होतात. गर्भाशयाचा आकार लहान होऊ लागतो ( कुक्षिऱ्हास ) | — | खसखस, बदाम, हळीव यांची खीर, बाजरीची भाकरी, तूप, स्नेहयुक्त संवाहन, कोष्णजलाने स्नान | स्तन्याल्पत्व, दौर्बल्य, निद्रानाश | ज्वर, आचूषणाभाव | शतावरीकल्प, अश्वगंधारिष्ट, शतावरीघृत, निद्रोदयरस | — |

## सूतिका रोग

| रोग | हेतू | लक्षणे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) योनिक्षत योनिभेद | अतिप्रवाहण, कष्टप्रसूती, योनिसंवरण मूढगर्भ. | व्रण, मूत्रामुळे दाह, रक्तस्राव, तोद, निद्रानाश. | पंचवल्कल क्वाथ, त्रिफला क्वाथ-धावन | सीवन पिचुधारण–बलातैल, शतधौतघृत, रोपणतैल, व्रण दुष्ट झाल्यास शोधनतेल, त्रिफळा गुग्गुळ | विश्रांती, स्वच्छता पटबंध, गुरू अभिष्यंदी वर्ज्य | योनिभ्रंश योनिवेदना, |
| (२) योनिशोथ | अतिप्रवाहण, कष्टप्रसूती, योनिसंवरण, मूढगर्भ | शोथ, शूल. | बाष्पस्वेद स्नेह, विरेचन (एरंड) | लेपगोळीचा लेप, दशांगलेप, पुनर्नवासव, आरोग्यवर्धिनी, त्रिफळा, गुग्गुळ | विश्रांती | योनिपाक |
| (३) योनिसुप्ती | विशेषतः विलंबित प्रसव. | सुप्ती, राग. | | | | |
| (४) योनिभ्रंश | मूढगर्भ, प्रवाहण. | शूल, स्राव, अरति. | बस्ती, उत्तरबस्ती (कषाय द्रव्ययुक्त). | बलातैल पिचुधारणा, गोफणाबंध अवगाहस्वेद, म. यो. गुग्गुळ, अवनत शिरस्कासन, घृतपान, | पूर्ण विश्रांती | मैथुनासहत्व |
| (५) अंगमर्द | प्रवाहण, कष्टप्रसव | श्रम, निद्रानाश, अरति. | एरंडस्नेह | तैलाभ्यंग, संवाहन अवगाहस्वेद, म. यो. गुग्गुळ, वातविध्वंस, खुरासनी ओवा | विश्रांती, स्निग्ध उष्ण भोजन | — |

| रोग | हेतू | लक्षणे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| (६) पार्श्वशूल पृष्ठशूल कटिशूल | प्रवाहण, कष्टप्रसव | पार्श्वपृष्ठकटी पीडा, अंगमर्द, निद्रानाश | एरंडस्नेह | वातगजांकुश, वातविध्वंस, ल. मा. वसंत, खुरासनी, ओवा, पिंपळमूळ, दशमूलारिष्ट, नारायण तेलाने वा विषगर्भतेलाने अभ्यंग, स्वेद, | स्नेहन, वातकर आहार वर्ज्य उष्णसेवा, विश्रांति | — |
| (७) हृच्छूल | अतिप्रवाहण; अजीर्ण | हृद्‌भागी शूल, आध्मान, अरति | एरंडस्नेह बस्ति | वातगजांकुश, समीरपन्नग, विषतिंदुक, शंखवटी, हिंगाष्टक, शृंग, अर्जुनारिष्ट, अर्जुन पिंपळमूळ सिद्ध दूध, कुचलाकल्प, लक्ष्मीविलास | विश्रांति वातानुलोमन उष्ण आहार | हृद्रोग |
| (८) अर्धशिरःशूल | अतिप्रवाहण मिथ्याहारविहार | शिरःशूल, भ्रम, अरति, निद्रानाश | बस्ति नस्य (गुडशुंठी) | सूतशेखर + जटामांसी, वचा, समीर पन्नग, वातविध्वंस, सर्पगंधा, खुरासनी ओवा, शंखोदराचे नस्य | उष्ण, तीक्ष्ण पित्तकर वर्ज्य | |
| (९) दौर्बल्य कार्श्य. | कष्टप्रसव रक्तस्राव | ग्लानी, भ्रम, तंद्रा | — | ताप्यादिलोह, सु. मा. वसंत, अश्वगंधारिष्ट, च्यवनप्राश, द्राक्षासव, शतावरीकल्प, शतावरी घृत, मधुमालिनी वसंत | लघु स्निग्ध आहार | राजयक्ष्मा |

| रोग | हेतू | लक्षणे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| (१०) अक्षिरोग भ्रूक्षेप | अतिप्रवाहण | नेत्ररोग, अक्षिकूट शोथ. | एरंडस्नेह | नेत्राचे घृताने तर्पण, म. यो. गुग्गुळ, सूतशेखर, नेत्राभोवती तैलाने अभ्यंग, मृदुतापस्वेद | नेत्र मिटावे | नेत्राभिष्यंद |
| (११) गलग्रह | अतिप्रवाहण मिथ्याहारविहार | गिळणे बोलणे, पीडादायक, कंठशूल | — | तालिसादी चूर्ण, यष्टिमधू, कंकोळ धारण, कोष्णजलाने गंडूष | कोष्ण जलपान, द्रव आहार, | — |
| (१२) ज्वर | श्रम, मिथ्योपचार कष्टप्रसव, मिथ्याहार विहार, योनिदुष्टी | संताप, अरति, अंगमर्द, योनिस्राव दुर्गंध, शूल. अधोदरात स्पर्शासहत्व (वरील लक्षणे कारणानुरूप बदलतात.) | अनुलोमन उत्तरबस्ती | प्रतापलंकेश्वर, देवदार्व्यादिक्वाथ, चतुर्भुज, सूक्ष्मत्रिफळा, त्रिभुवनकीर्ती, वातविध्वंस. | वातुळ आहार, | वातव्याधी. मूर्च्छा संन्यास मृत्यू, |
| (१३) मक्कल्ल | कष्टप्रसव, मिथ्योपचार, दौर्बल्य, बहुप्रसवता | शूल (तीव्र) निद्रानाश, अरति, आध्मान, मलसंग स्रावसंचिती | बस्ती, उत्तरबस्ती | उदराभ्यंग-विषगर्भतैलाने, भल्लातक, काळाबोळ, दशमूलारिष्ट, कुमारी आसव, पटबंध | वातुळ आहार वर्ज्य | गुल्म विद्रधी |

| रोग | हेतू | लक्षणे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| (१४) योनिस्राव रक्तपित्त (अधोग) | कष्टप्रसव, मिथ्योपचार, मूढगर्भ, धातुक्षय | स्राव, ग्लानी, श्रम, शोथ, पाण्डुता, भ्रम, क्षुद्रश्वास, भयाकुलता | उत्तरबस्ति (पंचवल्कलाचा) | मोचरस, अशोक, प्रवाळ, लोहपर्पटी, बोलपर्पटी, अशोकारिष्ट, लोध्रासव, कार्पासमूलघन, रक्तवर्धक, यकृत्पाश, लोहासव | विश्रांती, बृंहण, आहार | पाण्डु रक्तक्षय |
| (१५) निद्रानाश, भ्रम | कष्टप्रसव, चिंता, शोक | अरति, भ्रम, प्रलाप, विकृत चेष्टा | — | सर्पगंधा, जटामांसी, खुरासनी ओवा, वचा, सुतशेखर, ब्राह्मी, निद्रोदयरस | सांत्वन करावे | उन्माद अपस्मार |
| (१६) विद्रधि, रक्तगुल्म | मिथ्योपचार | उदरवृद्धी | — | अवस्थेनुरूप शस्त्रकर्म | — | कष्टसाध्य |
| (१७) महोदर | बहुप्रसवा | उदरलंबन, श्रम, आध्मान, शूल | विरेचन बस्ती | पटबंधन, चंद्रप्रभा, आरोग्यवर्धिनी त्रिकटू, कुंभजतु, त्रिफला, लोहासव. | व्यायाम, अल्पभोजन | मेदोरोग |
| (१८) वाताष्ठीला | अतिप्रवाहण कष्टप्रसव मिथ्याहारविहार बहुप्रसवता | मलसंग, मूत्रजठर, शूल, आध्मान, ज्वर, अरती | अनुलोमन | औषधाने असाध्य क्वचित् शस्त्रकर्मसाध्य | — | असाध्य, मृत्यू |
| (१९) विसर्प | योनिक्षत | दाह, रोग, ज्वर, अरती, विसर्पण | विरेचन | सूक्ष्म त्रिफला, चंद्रकला, मौक्तिक, सर्जरस, कामदुधा, शतधौतघृताने लेपन | — | कष्टसाध्य, मृत्यू |

| रोग | हेतू | लक्षणे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| (२०) ग्रहबाधा, उन्माद, प्रलाप, | मिथ्योपचार | ज्वर, मूर्च्छा, विषम चेष्टा, निद्रानाश, प्रलाप | — | योनिधूपन, स्मृतिसागर, पाचकेन्द्र, समीरपन्नग, चतुर्भुज, निद्रोदयरस, खुरासनी ओवा, उन्मादगजकेसरीप्रशम | — | कष्टसाध्य |
| (२१) वातव्याधी हनुस्तंभ, मन्यास्तंभ, अपतानक शाखावात अर्दित कंपन | मिथ्योपचार मिथ्याहारविहार, कष्टप्रसव. | रोगाप्रमाणे | एरंडस्नेह अनुवासन बस्ती | म. यो. गुग्गुळ, वातविध्वंस, बलातैल, माषतैल, भल्लातक, स्नेहन, स्वेदन | स्निग्ध, वातहर, आहार | कष्टसाध्य |
| (२२) अतिसार प्रवाहिका विषूचिका. | मिथ्याहारविहार | द्रवमलप्रवृत्ति-रसक्षय | मोचरस पिच्छा बस्ती | अहिफेन कल्प, कुडाकल्प, संजीवनी भल्लातक, जातिफलादि, कुटजारिष्ट | ताक, भात, लशुनसिद्ध मुग्दयुष | कष्टसाध्य |
| (२३) छर्दी | मिथ्याहारविहार | हृल्लास, प्रसेक, छर्दी, शूल, उरोदाह | वमन अनुलोमन | मयूरपिच्छामषी, प्रवाळपंचामृत मृद्भृष्टजल, सूतशेखरमिश्रण, कामदुधा | ताक, निंबूपानक, नारिकेलजल लाजमंड | रसक्षय साध्य |
| (२४) कामला | मिथ्योपचार मिथ्याहारविहार. | नखनेत्रमूत्रपीतता, दाह, मंदज्वर, अग्निमांद्य | विरेचन (कुटकी) | आरोग्यवर्धिनी, एरंडपत्रस्वरस + दूध, सूतशेखर, चंद्रकला | दुग्धाहार | कष्टसाध्य |

| रोग | हेतू | लक्षणे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| (२५) श्वास कास, हिक्का | मिथ्योपचार, मिथ्याहारविहार | रोगाप्रमाणे | अनुलोमन | श्वासकुठार, चौ.-पिंपळी तालिसादी-चूर्ण, समीरपन्नग, त्रिफळा, मयूर-पिच्छामषी, सूतशेखर, कामदुहा | द्रव, लघु, उष्ण कुलत्थयूष | कष्टसाध्य |
| (२६) आनाह, आध्मान | मिथ्योपचार, मिथ्याहारविहार | मलावष्टंभ, शूल, श्वास, अरति | बस्ती | शंखवटी, हिंगाष्टक, त्रिकटू, संजीवनी | द्रव, पिंपळमूळ सिद्धआहार, | कष्टसाध्य |
| (२७) विड्ग्रह, मूत्रग्रह | कष्टप्रसूती | आध्मान, शूल, अरति | बस्ती, उत्तर-बस्ती, मूत्रनि-र्हरण, | आरोग्यवर्धिनी, अश्वकंचुकी, आर-ग्वध+त्रिफला→फांट, चंद्रप्रभा, वात गजांकुश, अवगाहस्वेद | द्रव, आम्लरस सिद्धआहार शाकसूप | कष्टसाध्य |
| (२८) शोथ | कष्टप्रसूती | सर्वांग-एकांगशोथ; तोद-दाह | विरेचन | वरुणादी-पुनर्नवादी-देवदार्व्यादी-क्वाथ, हेमशिलाजतु, प्रतापलंकेश्वर, लेपगोळी लेप, बचनाग शिग्रु-वरुण, टेटू-चंदन-अहिफेन यांपैकी इष्ट तो लेप, शोथघ्नलोह | दुग्धाहार | कष्टसाध्य |
| (२९) मुखपाक | मिथ्याहारविहार, पाण्डु | कटुरसाक्षमता, लालस्राव, दाह | विरेचन | शंखजीरक+गैरिक प्रतिसारण, काम-दुहा, सूतशेखरमिश्रण, मधु+घृत चाटावे, गंडूष | मधुर-द्रव आहार | साध्य |

| रोग | हेतू | लक्षणे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| (३०) पाण्डु | योनिस्राव मिथ्योपचार मिथ्याहारविहार | वैवर्ण्य, श्रम, श्वास, हृत्स्पंद, अक्षिकूट शोथ | अनुलोमन | नवजीवनरस, ताप्यादिलोह, शोथघ्न लोह, यकृतप्राश, रक्तवर्धक, यकृतरस | लघु तर्पण, अम्लरस-युक्त आहार | कष्टसाध्य |
| (३१) अविपाक भक्तद्वेष | मिथ्याहारविहार कष्टप्रसव | अरुचि, प्रसेक, तृप्ति, शूल | — | आमपाचनवटी, अग्नितुंडी, दीपनीवटी, पंचकोलासव, द्राक्षारिष्ट | लघु | साध्य |
| (३२) प्रतिश्याय | मिथ्याहारविहार | नासास्राव, शिरः-शूल, मंदज्वर, नासारोध | धूम, नस्य, अनुलोमन | त्रिभुवनकीर्ति, नागगुटी, श्वासकुठार | उष्णसेवन | साध्य |
| (३३) स्तनरोग | मिथ्याहारविहार आघात | शोथ, शूल, ( स्तनभागी ) स्तन्याप्रवृत्ति, ज्वर | विरेचन | लेपगोळी, काळाबोळ, दशांगलेप, लेपन, सूक्ष्म त्रिफला, चतुर्भुज, त्रिफला, गुग्गुल, रक्तशोधक, शस्त्र-कर्म अवस्थेप्रमाणे. | बाजरीची भाकरी, लसूण ताक, कुलत्थयूष | कष्टसाध्य |
| (३४) उष्णवात | मिथ्योपचार | हातापायांस भेगा, दाह | एरंडस्नेह | म. यो. गुग्गुल, आरोग्यवर्धिनी, सुदर्शन मलम, त्रिफळा घृत | हातापायास मातीचा स्पर्श नको | — |

| रोग | हेतू | लक्षणे | शोधन | शमन | पथ्यापथ्य | परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| (३५) त्वग्रोग विचर्चिका, पामा दद्रु, किटिभ | मिथ्याहार विहार | स्राव, दाह, राग, कंडूविस्फोट. | निशोत्तर + द्राक्षा-विरेचन | आरोग्यवर्धिनी, गंधक रसायन त्रिवंगभस्म, निंबगंधक, सारीवाद्यासव, महामंजिष्ठादि क्वाथ, हरताळ मिश्रण + करंजतैल प्रतिसारणासाठी निंबजलधावन | लवण वर्ज्य. दूध + पोळी दही वर्ज्य | साध्य |
| (३६) राजयक्ष्मा | मिथ्याहारविहार धातुक्षय, कष्टप्रसव | श्रम, ज्वर, कास, कार्श्य, बलक्षय | — | सु. मा. वसंत, म. मा. वसंत, अस्थिपोषक, नारीकेल, कुसुमावटी, पूर्णचंद्रोदय, द्राक्षासव, अश्वगंधारिष्ट | बृंहण, जीवनीय आहार, शेळीचे दूध, मांस, आमगर्भ | असाध्य |



# स्तन्य–विकृती

## १ क्षीणस्तन्य–कारणे :

[1]क्रोध, शोक, वात्सल्याचा अभाव, लंघन, अतिव्यायाम, चिंता, दीर्घव्याधिकर्षण ही कारणे स्त्रियांच्या ठिकाणी स्तन्याचा अभाव उत्पन्न करतात.

## लक्षणे :

[2]स्तन्यक्षयामुळे स्तन सुकतात व बालकाला स्तन्य मुळीच मिळत नाही वा फारच थोडे मिळते. त्याचा परिणाम म्हणून बालक रडवे, चिडचिडे, कृश, निस्तेज, दुर्बल होत जाते.

## चिकित्सा :

[3]मानसिक कारणांनी जर स्तन्य कमी झाले असेल तर तिचे मन प्रसन्न होईल अशी व्यवस्था प्रथम करावी. यव, गोधूम, शाली, षष्टिक, मांसरस, मद्य, लसूण, मत्स्य, शिंगाडा, बिस, भुई कोहोळा, यष्टिमधू, शतावरी, दूधभोपळा, नारळ या द्रव्यांचा आहारात उपयोग करावा.

[4]स्तन्य उत्पन्न होण्यासाठी ग्राम्य, आनूप, औदक, प्राण्यांचे मांसरस व आनूप औदक अशी धान्ये व भाज्या वापराव्यात ( तांदूळ, शिंगाडा ). आहारामध्ये द्रव, मधुर, आम्ल, लवण या गुणांचे प्राधान्य असावे. दूध प्यावे. श्रम करू नयेत. तृण-पंचमूलांचा काढा प्यावा.

शतावरीकल्प, अश्वगंधा, मुसळी ही द्रव्ये व कार्पासबीज, हळीव, खसखस, गोडांबी, चारोळी यांच्या खिरी भरपूर दूध घालून त्यात साखर, केशर घालून त्या सेवन कराव्या. स्निग्ध भोजन करावे व वर द्राक्षासव घ्यावे.

१ क्रोधशोकवात्सल्यादिभिश्च स्त्रियाः स्तन्यनाशो भवति । सु. शा. १०–३०
२ स्तन्यक्षये स्तनयोर्म्लानता स्तन्यासंभवोऽल्पता वा । सु. सू. १५–१२
३ तत्रश्लेष्मवर्धनद्रव्योपयोगः । सु. सु. १५–१२
– अथास्याः क्षीरजननार्थं सौमनस्यमुत्पाद्य यवगोधूमशालिषष्टिक मांसरससुरा-सौवीरकपिण्याकलशुनमत्स्यकशेरुकशृङ्गाटकबिसविदारिकन्दमधुकशतावरीनालि-कालाबूकालशाकप्रभृतीनिविदध्यात् ॥ सु. शा. १०–३०
४ क्षीरजननानि तु मद्यानि सीधुवर्ज्यानि, ग्राम्यानूपौदकानि च शाकधान्यमांसानि, द्रवमधुराम्ललवणभूयिष्ठाश्चाहाराः, क्षीरिण्यश्चौषधयः, क्षीरपानमनायासश्च, मनायासश्च, वीरणषष्टिकशालीक्षुवालिकादर्भकुशकाशगुन्द्रेत्कटमूलकषायाणां च पानमिति क्षीरजननानि । च. शा. ८–५७

### क्षीणस्तन्यज व्याधी—लक्षणे :

[१]पुरेसे स्तन्य बालकाला न मिळाल्यामुळे मुलाची तृप्ती होत नाही व त्याचे अपतर्पण होते. बालकाच्या ठिकाणी पोषणाचा अभाव, निद्रानाश, रोदन, कार्श्य, दौर्बल्य अशी लक्षणे दिसतात.

### चिकित्सा :

मातेचे दूध वाढविण्याचा प्रयत्न करावा. बालकास शेळी वा गाय यांचे दूध सिद्ध करून पाजावे.

### २. स्तन्यवृद्धी—कारणे :

वर स्तन्य क्षयावर जे उपचार म्हणून सांगितले आहेत त्यांचा अतियोग नेहमीच्या आहारात जर स्वभावतःच झाला असला तर स्तनाची वृद्धी होते. उत्पन्न होणाऱ्या स्तन्याचे अनेक कारणांमुळे पुरेसे आचूषण झाले नाही तरीही स्तनवृद्धीची लक्षणे उत्पन्न होतात.

### लक्षणे :

स्तनाच्या ठिकाणी काठिण्य, शूल, स्पर्शासहत्व, ज्वर, स्तनवृद्धी, गौरव, इ. लक्षणे आढळतात.

### चिकित्सा :

[२]संचित स्तन्य स्तनांतून काढून टाकावे व त्यावर हळद, धोत्र्याची मुळी, यांचा लेप घालावा. त्यामुळे विम्लापन होऊन शूलगौरवादी लक्षणे कमी होतात.

आहारात द्रव, मधुर गुण जेवढे कमी करता येतील तेवढे कमी करावे. रूक्ष, लघू भोजनात्मक लंघन करावे.

स्तन घट्ट बांधून ठेवावेत. त्यावर उत्पीडनासाठी काळाबोळ, तांदूळ भिजवून वाटून त्यांचा कल्क व दूर्वांचा कल्क एकत्र करून त्यांचा लेप घालावा. पोटामध्ये लघुमालिनी वसंत, चंद्रप्रभा, कर्पूरादिचूर्ण असे मधाबरोबर चाटवावे.

१ नाप्यायते यः स्तनपश्च बालो ।
जागर्ति नित्यं भृशरोदनश्च । का. सं. भोजनकल्प, पान २१०

२ तेषां यथास्वं संशोधनं क्षपणं च क्षयात्, अविरुद्धैः क्रियाविशेषैः प्रकुर्वीत ।
सु. सू. १५–१७

— निशाकनककल्काभ्यां लेपः प्रोक्तः स्तनार्तिहा । यो. र. पान ६१०, स्तनरोग-चिकित्सा



शूलशान्तीसाठी स्तनांचे मर्दन करू नये वा फार शेकू नये. त्याने स्तनविद्रधी वा पाक होण्याची शक्यता असते.

### स्तन्यवृद्धिज व्याधी-लक्षणे :

वृद्ध स्तन्यामुळे बालकाच्या ठिकाणी अजीर्ण होऊन उत्क्लेश, छर्दी, शूल, ज्वर, दुर्गंधियुक्त द्रवमलप्रवृत्ती अशी लक्षणे दिसतात.

### चिकित्सा :

मातेस शोधन व अपतर्पण उपचार करावेत.

बालकाच्या स्तनपानाचे प्रमाण कमी करावे. दीपन-पाचन औषधांनी सिद्ध केलेला लाजमंड बालकास द्यावा.

### ३. स्तन्यदुष्टी-कारणे :

[१]अजीर्ण, असात्म्य, विषम, विरुद्ध अशा स्वरूपाचे भोजन अधिक प्रमाणात केल्यामुळे खारट, आंबट, तिखट, क्षारयुक्त व नासून लाळ आलेले पदार्थ सेवन केल्यामुळे, मन व शरीर यांचा संताप झाल्यामुळे, जागरण झाल्याने, चिंतेमुळे, वेग विधारण केल्यामुळे, उत्पन्न न झालेले वेग बळाने उत्पन्न केल्यामुळे, गुळापासून तयार केलेली पक्वान्ने खाल्ल्याने, खिचडी, आदमोरे दही, ग्राम्य आणि औदक प्राण्यांचे मांस वा अभिष्यंदी पदार्थ खाऊन त्यावर दिवसा झोप घेणे असे वरचेवर केल्याने, अती मद्य पिण्यामुळे, मुळीच हालचाल न केल्यामुळे, मार लागल्यामुळे, क्रोधामुळे, निरनिराळ्या व्याधींनी कृशता आल्यामुळे, दोष प्रकुपित होऊन स्तन्यवह स्रोतसामध्ये जाऊन स्तन्यास प्रदुष्ट करतात. ही दुष्टी आठ प्रकारांनी होते.

या आठ प्रकारांचे वातजदुष्टी, कफजदुष्टी, पित्तजदुष्टी असे मुख्यतः तीन वर्ग आहेत.

१ अजीर्णा सात्म्यविषमाविरुद्धात्यर्थभोजनात् ।
लवणाम्लकटुक्षारप्रक्लिन्नानां च सेवनात् ।।
मनःशरीरसंतापादस्वप्नान्निशि चिन्तनात् ।
प्राप्तवेगप्रतीघातादप्राप्तोदीरणेन च ।।
परमान्नं गुडकृतं कृशरां दधि मन्दकम् ।
अभिष्यन्दीनि मांसानि ग्राम्यानूपौदकानि च ।।
भुक्त्वा भुक्त्वा दिवास्वप्नान्मद्यस्यातिनिषेवणात् ।
अनायासादभीघातात् क्रोधाच्चातङ्ककर्शनैः ।।
दोषाः क्षीरवहाः प्राप्य सिराः स्तन्यं प्रदूष्य च ।
कुर्युरष्टविधं भूयो दोषतस्तन्निबोध मे ।। च. चि. अ. ३०–२३२–२३६

## वातज दुष्ट स्तन्य लक्षणे :

[1]वायूमुळे दुष्ट झालेले स्तन्य हे श्याव, अरुण वर्णाचे, तिक्तकषाय अनुरस असलेले, ओशटपणा नसलेले, स्पष्ट गंध नसलेले रूक्ष, पातळ, फेसकट, लघु, तृप्ती न उत्पन्न करणारे आणि कृशता आणणारे असे असते. यामुळे आध्मान होते. मलमूत्रप्रवृत्तीचा विबंध होतो. हे स्तन्य पाण्यात टाकले असता पसरते; आणि फुटीर होऊन तरंगते. या स्तन्याच्या सेवनाने वातामुळे उत्पन्न होणारे असे निरनिराळे व्याधी होतात.

## वातदुष्ट स्तन्यज व्याधी–लक्षणे :

[2]वातदुष्ट स्तन्य प्राशन केल्यामुळे तोंड बेचव होते. बालकाचा आवाज बारीक होतो, बालक कृश होते, पोट फुगते, मल-मूत्राची प्रवृत्ती होत नाही, याशिवाय व्याधी गंभीर झाल्यास आक्षेपक, अपतानक, अपस्मार, पांगुल्य, वातज शिरोरोग, पीनस असे वातदोषामुळे उत्पन्न होणारे व्याधी बालकास होतात.

## चिकित्सा :

बालकाला स्वरभेदासाठी यष्टिमधू, कंकोळ, लवंग, खदिर, शर्करा, असे चूर्ण प्रत्येकी ½ ते गुंज या प्रमाणात एकत्र करून मधाबरोबर वरचेवर चाटवावे.

कृशतेसाठी शतावरी, अश्वगंधा, भुईकोहळा, विडंग, सुंठ यांनी सिद्ध केलेले गोदुग्ध पाजावे. मधुमालिनी वसंत ½ ते ½ गुंज लोणी–मधातून चाटवावा.

आध्मान व मूत्रपुरीषरोध यासाठी नारायणतेलाचा १ तोळा मात्रेमध्ये अनुवासन बस्ती ( मात्रा बस्ती ) द्यावा.

प्रवाळ पंचामृत ½ गुंज, कपिला १ ते २ गुंज दुधातून दोन वेळा द्यावे.

१ श्यावारुणवर्णं कषायानुरसं विशदमनालक्ष्यगन्धं रूक्षं द्रवं फेनिलं लघ्वतृप्तिकरं कर्शनं वातविकाराणां कर्तृ वातोपसृष्टं क्षीरमभिज्ञेयं ॥ च. शा. ८–५५

– तत्र श्याममरुणवर्णं तिक्तकषायानुरसं विशदं रूक्षमलक्ष्यगन्धं फेनिलमतृप्तिकर-माध्मान मूत्रवर्चोविबन्धकृत् । कर्शनमप्सु विसर्पति विच्छिन्नं च प्लवते वातदुष्टम् ॥ अ. सं. उ. २ पान १६

– तत्र वातदुष्टं श्यावादिलक्षणम् । तिक्तकषायावनुरसौ यस्य तत् अनुरसकथनं माधुर्यस्य प्रधानस्निग्धत्वात् । अलक्ष्य गन्धमव्यक्तगन्धम् । अप्सु विसर्पति व्याप्नोति । अप्सु च विच्छिन्नं सत् प्लवेत ॥ टीका

२ वातदुष्टं शिशुः स्तन्यं पिबन् वातगदातुरः ।
क्षामस्वरः कृशाङ्गस्याद्बद्धविण्मूत्रमारुतः ॥ माधव नि. बालरोगाधिकार, स. १



बाळहिरडा व यष्टिमधू उगाळून मधाबरोबर चाटवावा व वर मनुकांचा काढा २ ते ४ चमचे पाजावा.

कुमारी आसव ½ ते १ चमचा पाण्याबरोबर दिवसातून २–३ वेळा द्यावे. पांगुल्य, अपस्मार, आक्षेपक, वातज शिरोरोग, पीनस या वातव्याधींवर त्या त्या व्याधी-प्रमाणे चिकित्सा करावी.

वातज स्तन्यदोष दूर करणारी चिकित्सा मातेवर करावी.

औषधांचा लेप स्तनावर करून बालकांस औषध पोहोचविणे या पद्धतीचाही अवलंब केला जातो. बालकास संपूर्ण लंघन कधीच घालू नये. तसेच स्तन्य-दुष्टी फार गंभीर स्वरूपाची असेल तरच स्तन्यप्राशन बंद करावे.

[1]वातदुष्ट स्तन्यामुळे उत्पन्न होणाऱ्या वातज विकारावर बालकाला रास्ना, अजमोदा, सरल व देवदारू यांचे चूर्ण तुपाबरोबर चाटवावे किंवा याच औषधाने सिद्ध केलेले तूप खडीसाखरेबरोबर उपयोगात आणावे.

[2]वातदूषित स्तन्यावर स्त्रीस देवदारू, कुटकी, वचा, कुष्ठ, पाठा, भार्गी, पिंपळी, लहानमेढशिंगी, चित्रक, अजमोदा, सुंठी, मिरे यांचा काढा वा दशमूलकाढा ३ दिवस-पर्यंत प्यावयास द्यावा; व त्यानंतर वातघ्न औषधांनी सिद्ध केलेली घृते द्यावीत. त्यावर दशमूलारिष्ट, कुमारी आसवासारखे अनुपान द्यावे. नंतर स्नेहन देऊन मृदू विरेचन वा बस्तिकर्म करावे. वातघ्न द्रव्यांनी सिद्ध केलेल्या द्रव्यांचा अभ्यंग द्यावा. स्वेदनासाठीही वातघ्न द्रव्ये वापरावीत. वातघ्न द्रव्येच स्तनावर लेप घालण्यास

१ रास्नाजमोदासरलदेवदारुरजोन्वितम् ।
बालो लिह्याद् घृतं तैर्वा विपक्वं ससितोपलम् ॥ वाग्भट उ. २–१२

२ तत्र वातदूषिते स्तन्ये देवदारुसरलकटुरोहिणी वचाकुष्ठपाठाभार्ङ्गीमागधिका-वृश्चिकालीचित्रकाजमोदशुण्ठीमरीचानां क्वाथं दशमूलक्वाथं वा त्रिरात्रं पाय-यित्वा वातव्याधिविहितानां सर्पिषामन्यतमं निगदमदिरानुपानं दद्याद्वातहरद्रव्य-सिद्धं वा । ततः स्निग्धां मृदुविरेच्य बस्तिकर्मणोपचरेत् । वातघ्नैश्चाभ्यङ्गस्वेदो-पदेहोन्मर्दनैः । सरलरास्नाजमोदादेवदारुचूर्णं सर्पिषा बालमवलेहयेत् । एवंविधैरेव च विपक्वं सशर्करं सर्पि ॥ अ. सं. उ. २ पा. १७

तत्रेति निर्धारणे । वातदूषिते स्तन्ये धात्रीं देवदार्वादिक्वाथं दशमूलक्वाथं वा त्रिरात्रं पाययेत् । ततोऽनन्तरंवातव्याधिविहितानां सर्पिषामन्यतमं शोधनादि-गणोक्तवातहरद्रव्यसिद्धं वा सर्पिर्मदिरानुपानं दद्यात् । निगदं निर्दोषम् एवं स्निग्धां धात्रीं मृदु विरेच्य बस्तिकर्मणा यथा प्राप्तेनोपाचरेत् । वातघ्नद्रव्यकृत-त्वाच्च वातघ्नैरभ्यङ्गादिभिरुपाचरेत् । तत्र च वातदूषिते सरलादिचूर्णं सर्पिषा वैद्यो बालमवलेहयेत् । एवंविधैः पक्वं सिद्धं सर्पिः सशर्करम् । टीका

वापरावी. बालकाला सरल, रास्ना, अजमोदा, देवदारु यांचे चूर्ण तुपाबरोबर चाटवावे; व याच औषधाने सिद्ध केलेले तूप साखर घालून चाटवावे.

[1]वातदुष्ट स्तन्यामध्ये तिक्तानुरस विशेषेकरून मूग, उडीद यांची पाने, काकोली, क्षीरकाकोली (अनुपलब्ध) यांचा काढा द्यावा किंवा गव्हुला, धायटी, पद्मकाष्ठ, देवदारु यांचा काढा मध घालून द्यावा. कषायानुरस जास्त असेल तर हिंगु व सैंधव तुपाबरोबर स्त्रीस चाटवावे. दूध, फेनिल, विच्छिन्न तरंगणारे असे असेल तर शोधनासाठी बेलमूळ व एरंणमूळ यांनी दूध सिद्ध करून, तूप घालून द्यावे किंवा मसूर, काकोली, डोरली बाकुचि यांनी दूध वा तूप सिद्ध करून ते वापरावे.

## [2]पित्तज-दुष्ट स्तन्य लक्षणे :

पित्तज दुष्टीमुळे स्तन्य हे काळसर, निळसर, पिवळसर, तांबूस वर्णाच्या छटा असलेले, कडू, आंबट, तिखट असे अनुरस असलेले, कुजल्यासारखा वा रक्तासारखा वास येणारे, अतिशय उष्ण असे असते. ते विदाह उत्पन्न करते, पाण्यात टाकले असता त्यात पिवळ्या रेषा दिसतात. यांच्या सेवनाने पित्तविकार उत्पन्न होतात.

## पित्तदुष्ट स्तन्यज व्याधी लक्षणे :

[3]पित्तदूषित स्तन्याच्या सेवनाने बालकाला फार घाम येणे, तृषा, द्रवमलप्रवृत्ती, मलाचे स्वरूप चोथा-पाणी असणे, अंग सतत गरम असणे, पांडु, कामला असे विकार होतात. याशिवाय पित्ताच्या विविध गुणवृद्धीप्रमाणे हृदयोद्वेष्टन( म्हणजे हृदयस्पंद व उत्क्लेश) विदग्धाजीर्ण, अम्लपित्त, छर्दी, अतिसार, श्वास, कास असे विकार होतात.

## चिकित्सा :

[1]पित्तदुष्ट स्तन्यासाठी स्त्रीस गुळवेल, कडू पडवळ, तमालपत्र, सारिवा; शतावरी, निंब, चंदन यांचा काढा द्यावा. बालकासही हाच काढा द्यावा किंवा

(१) त्रिफळा, काडेचिराईत, कुटकी, नागरमोथे

(२) ज्येष्ठमध, कायफळ, काकडशिंगी

(३) पंचवल्कलाचा काढा.

यांपैकी एखादा काढा द्यावा किंवा याच औषधांनी सिद्ध केलेले तूप द्यावे. पित्तघ्न द्रव्यांनी विरेचन द्यावे. अभ्यंग प्रदेह सेक शीतगुणाचे करावे.

तांबूस छटा असलेल्या दुधामुळे बालकाच्या हृदयाचे उद्वेष्टन होते. या स्तन्य-दुष्टीसाठी गव्हुला, नागरमोथे, शाबरलोध्र यांचा काढा वापरावा.

[2]अम्लानुरस स्तन्य अम्लपित्तकर होते, त्यासाठी द्राक्षा, यष्टिमधू, खिरणी, शाल्मली या द्रव्यांचा काढा वापरावा.

कटू अनुरस असलेले स्तन्य हे छर्दी, अतिसार, कास, श्वास, उत्पन्न करणारे असते; त्यासाठी भुईकोहळा, गुळवेल यांचा काढा द्यावा.

भृशोष्ण स्तन्याच्या सेवनाने मूळव्याध (अहिपूतन), दाहज्वर, अतिसार, अशी लक्षणे होतात. त्यासाठी चंदन, कमल, नीलकमल या द्रव्यांचा काढा वापरावा.

---

१ अपि च । तिक्तानुरसं स्तन्यं मुद्गमाषपलाशाभ्यां काकोलीयुगलेन च शोधयेत् । प्रियङ्गुधातकी पुष्पमद्मकदेवदारूक्षौद्रैर्वा । कषायानुरसं हिङ्गुसैन्धववता घृतेन । फेनिलं विच्छिन्नं प्लवमानं च बिल्वाग्निमन्थशृते पयसा हविषा च । सूप्यपर्णी काकोलीबृहत्यवल्गुजफलैर्वा ।। अ. सं. उ. २ पान १७

– अपि चेति समुच्चये । तिक्तानुरसं स्तन्यं मुद्गादिभिःप्रियङ्ग्वादिभिर्वा शोधयेत् । कषायानुरसं तु हिङ्गुसैन्धवयुक्तेन घृतेन् शोधयेत् । फेनिलं विच्छिन्नं प्लवमानं च बिल्वादिशृतेन पयसा हविषा च शोधयेत् । उभयमप्युभयेन । सूप्यपर्ण्यादिभिर्वैतदुभयं शोधयेत् । इति वातदुष्टे ।। टीका

कृष्णनीलपीतताम्रावभासं तिक्ताम्लकटुकानुरसं कुणपरुधिरगन्धि भृशोष्णं पित्तविकाराणां कर्तृ च पित्तोपसृष्टं क्षीरमभिज्ञेयम् ।। च. शा. ८–५५

२ कृष्णनीलताम्रावभासं तिक्ताम्लकटुकानुरसं कुणपरुधिरगन्धि भृशोष्णमप्सु पीतराजिमद्विदाहकरं च पित्तदुष्टम् । अ. सं. उ. पान १६

कृष्णादिलक्षणं पित्तदुष्टं । कुणपं क्लिन्नम् ।। टीका

३ स्विन्नो भिन्नमलो बालः कामलापित्तरोगवान् ।
तृष्णालुरुष्णसर्वाङ्गः पित्तदुष्टं पयः पिबन् ।। मा. नि. बालरोगानि सू. २

---

१ पित्तेऽमृतापटोल पत्र शारिवाशतावरीनिम्बचन्दनक्वाथं धात्री बालश्च पिबेत् । जीवकर्षभकाद्रिकाकोळीमधुककट्फल कर्कटशृङ्गीक्वाथो वा । सक्षौद्रं पटोलादि वा । शारिवादि न्यग्रोधाद्यादि वा । एभिरेव च द्रव्यैः सर्पींषि पित्तघ्नानि च विरेचनानि शीतांश्चाभ्यङ्गप्रदेहसेकान् कुर्यात् ।। अ. स; उ. २ पान १८

– पित्ते पित्तदुष्टे स्तन्ये अमृतादीनां क्वाथं धात्री पिबेत् बालश्च । त्रिफलादिक्वाथं वा तौ पिबेताम् जीवकादिक्वाथं वा । पटोलाद्यन्यतमक्वाथं सक्षौद्रं तौ पिबेताम् । एभिरेव च यथायोगं पृथक्क्वाथोक्तैर्द्रव्यैः सर्पींषि कुर्यात् । कल्पोक्तानि पित्तहन्तृणि विरेचनानि च । शीतांश्चाभ्यङ्गादींश्च ॥ टीका

२ अपि च । ताम्रावभासं पयो हृदयमुद्वेष्टयति । तत्प्रियङ्गुमुस्ताशाबरलोद्ध्रैः शोधयेत् । अम्लानुरसमम्लपित्तकरम् । तत् द्राक्षामधुकपयस्याश्रीपर्णीभिः । कटुकानुरसं छर्द्यतिसारकासश्वासकरम् । तत् काकोलीविदारीभ्यां मधुपर्ण्या च । भृशोष्णमनामदाहज्वरकरं विरेचनं च तच्चन्दनोत्पलकमलैः ।।

अ. सं. उ. २; पान १८

बालकास—अतिस्वेदासाठी—वचा, चंदन, उशीर, कोष्ठ यांच्या श्लक्ष्ण चूर्णाने उद्धूलन करावे.

तृषेसाठी—मनुका, वाळा, सुंठ, मुस्ता, धान्यक, यांचा फांट थोडा थोडा एका वेळी १ ते २ चमचे वरचेवर द्यावा.

द्रवमलप्रवृत्तीवर—अतिविष, कुटज, बिल्वमज्जा, सुंठ, काकडशिंगी, धायटीची फुले यांचे चूर्ण दाडिमावलेहातून २ ते ४ गुंजा या मात्रेत चाटवावे.

कुटजारिष्ट ४ ते ८ थेंब दिवसातून ३ वेळा पाण्यातून द्यावे.

अंग गरम असणे—यावर गुळवेलसत्त्व, सूतशेखर, प्रवाळभस्म, चंद्रकलारस कामदुघा, मौक्तिकभस्म अशी द्रव्ये ½ ते ४ गुंजा अशा प्रमाणात मोरावळ्यातून किंवा दुधातून घालावी.

हृद्स्पंद—यावर भृंगभस्म, अभ्रकभस्म, अर्जुनचूर्ण ही औषधे ½ ते १ गुंज या प्रमाणात तूप व मध यांच्यासवे द्यावीत.

सुवर्णसिद्ध जल द्यावे.

उत्क्लेश—यासाठी प्रवाळ-पंचामृत, मयूरपिच्छामशी, सुंठ, आमलकी, कामदुघा ही औषधे १ ते २ गुंजा या प्रमाणात मोरावळा, दाडिमावलेह वा दूध यासवे द्यावीत. इतर व्याधींवर त्या त्या व्याधीप्रमाणे चिकित्सा करावी.

**कफज दुष्ट स्तन्य लक्षणे :**

[1]कफाने स्तन्य पांढरे, चवीला फार गोड व लवण अनुरस असलेले असे असते. तूप, तेल, वसा, मज्जा, यांच्यासारखा गंध त्याला येतो. त्याचे स्वरूप बुळबुळीत, तंतुयुक्त

— अपि चेति समुच्चये । ताम्रावभासगुणं स्तन्यं बालस्य हृदयोद्वेष्टनं करोति । तत् क्षीरं प्रियङ्ग्वादिभिर्दोषं कुर्यात् । अम्लानुरसं स्तन्यं बालस्याम्लपित्तकरं भवति । तत् क्षीरं द्राक्षादिभिः शोधयेत् । कटुकानुरसं स्तन्यं छर्द्यादिकरं भवति । तत् क्षीरं काकोलीविदारीभ्याम् शोधयेन्मधुपर्ण्या च । मधुपर्णी जीवन्ती । भृशोष्णं स्तन्यं बालस्यानामादिकरं भवति तत्स्तन्यं चन्दनादिभिः शोधयेत् । अनामो नाम रोगो रक्तकफोद्भवो वक्ष्यते । इति पित्तदुष्टे ॥ टीका

१ अत्यर्थशुक्लमातिमाधुर्योपपन्नं लवणानुरसं घृततैलवसामज्जगन्धि पिच्छिलं तन्तुमदुदकपात्रेऽवसीदच्छ्रेष्मविकाराणां कर्तृ श्लेष्मोपसृष्टं क्षीरमभिज्ञेयम् ॥

च. शी. ८-५५

— अत्यर्थशुक्लमधुरं लवणानुरसं घृततैलवसामज्जगन्धि पिच्छिलं बहलं तन्तुमत् गुरु सलिलेऽवसीदति निद्राबहुलं च ॥ अ. सं. २-३ पान १६

— अत्यर्थशुक्लादिलक्षणं श्लेष्मदुष्टम् । बहुलं घनम् । निद्राबहुलमुपयोगिनः ॥ टीका



पुष्कळ प्रमाण असलेले, गुरु, दाट असे असून, पाण्यात टाकले असता हे स्तन्य बुडते. या स्तन्याच्या सेवनाने कफाचे रोग होतात.

**कफजदुष्ट स्तन्यज व्याधी लक्षणे :**

[1]कफदुष्ट स्तन्यप्राशनामुळे मुलाला लाळ फार सुटणे, झोप फार येणे, त्याची संज्ञा कमी होणे, तोंड व डोळे यांवर सूज येणे, उलट्या होणे, अंगावर विसर्प, कोठ उत्पन्न होणे, खाज सुटणे, प्रतिश्याय, कास, श्वास, अलसक, हृद्रोग असे विकार होतात.

**चिकित्सा :**

[2]कफदुष्ट स्तन्यासाठी सैंधव आणि पिंपळी यांचे चूर्ण बालकास चाटवावे. सैंधव, यष्टिमधु, गेळफळ, यांचा कल्क करून तो स्तनास व बालकाच्या ओठांस लावावा. त्यामुळे बालकाला सुखाने वमन होते. धात्रीस मात्र वचा, सर्षप, पिप्पली यांसारख्या तीक्ष्ण द्रव्यांनी वमन करवावे. वमनानन्तरचा संसर्जनक्रम झाल्यानंतर बृहत्पञ्चमुळे, नागरमोथे, वेखंड, अतिविष यांचा काढा स्त्रीस पाजावा किंवा तगर, देवदार, इंद्रयव, काळेजिरे वा हिंगुपत्री, लहान मेढशिंगी यांचा काढा द्यावा. आरग्वधादिगणांतील वा मुस्तादिगणांतील द्रव्यांचा काढा द्यावा. नस्य, धूम, गण्डूष, प्रदेह, परिषेक यासाठी रूक्ष, उष्ण गुणाची द्रव्ये वापरावी. ( वचा, हिंग, मिरे, लसूण अशी ) कफघ्न असा आहारविहार असावा.

१ कफदुष्टं पिबन् क्षीरं लालालुः श्लेष्मरोगवान् ।
निद्रान्वितो जडःशूनवक्त्राक्षश्छर्दनः शिशुः ॥ मा. नि. बालरोग सू. ३

२ कफे तु सैन्धवपिप्पलीयुक्तं सर्पिर्बालं पाययेत् । सैन्धवमधुकसंसृष्टं वा मदनपुष्पकल्केन च सक्षौद्रेण स्तनं बालस्य चोष्ठमालिम्पेत् तेन सुखं वमति धात्रीं तु तीक्ष्णैर्वामयेत् । ततः कृतसंसर्जनां पञ्चमूलघनवचातिविषाक्वाथं पाययेत् । तगरसुरदारुसुरेन्द्रयवपृथ्वीकावृश्चिकालीक्वाथं वा । आरग्वधादि मुस्तादिं वा । रूक्षोष्णांश्च नस्यधूमगण्डूषप्रदेहपरिषेकान् शीलयेत् । अविरुद्धं चान्नपानं योजयेत् ॥

अ. सं. उ. २, पा. १८

— कफे कफदुष्टे स्तन्ये पुनः सैन्धवपिप्पलीभ्यां युक्तं सर्पिर्बालं पाययेत् । सैन्धवादिसंसृष्टं वा वमनायेत्यर्थात् गम्यते । मदनपुष्पाणां च कल्केन क्षौद्रयुक्तेन धात्र्याः स्तनौ बालस्य चोष्ठावालिम्पेत् । तेन ह्यालेपनेन बालः सुखं वमति । धात्रीं तु तीक्ष्णैर्यथायोग्यं वमनैर्वामयेत् । ततो वमने कृते कृतसंसर्जनां विहितपेयादिक्रमां धात्रीं पञ्चमूलादिक्वाथं तगरादिक्वाथं वा पाययेत् । इन्द्रयव एव सुरेन्द्रयवः । पृथ्वीका हिङ्गुपत्रिका । मुस्तादिगणमारग्वधादिगणं वा । पाययेत् प्रकरणात् क्वथितम् । रूक्षोष्णद्रव्यैः कृतत्वाद्रूक्षोष्णान् नस्यादीन् शीलयेत् । अन्नपानं चाविरुद्धं योजयेदर्थाच्छ्लेष्मणीति ॥ टीका

[१]लवणानुरस स्तन्यदुष्टीमुळे विसर्प, कोठ, कण्डू अशी लक्षणे होतात. त्यासाठी कडूनिम्ब, कडू पडवळ व पञ्चवल्कल यांचा काढा शोधनासाठी द्यावा.

तंतुयुक्त स्तन्यदोषामुळे दौर्बल्य, श्वास, कास अशी लक्षणे उत्पन्न होतात. त्यावर पिप्पली, सुंठ यांचे चूर्ण मध व तूप यांबरोबर द्यावे. गुरु स्तन्यदोषामुळे सदन, प्रतिश्याय, सिंघाणक क्षीरालसक अशी लक्षणे होतात. यासाठी पहाडमूळ व त्रिकटू यांचे चूर्ण मधुघृताबरोबर द्यावे किंवा पञ्चकोल चूर्ण मधुघृताबरोबर द्यावे.

बालक-लालास्राव यासाठी मधाने जिव्हा व मुख यांस प्रतिसारण करावे. हरिद्रा, खदिर, गौरिक यांचे चूर्ण १ ते २ गुंजा या प्रमाणात मधाबरोबर चाटवावे. एरंड-स्नेहाचे विरेचन द्यावे.

अतिनिद्रा–यावर स्तन्यप्राशन कमी करावे. कडुजिऱ्याचे पाणी पाजून वमन करावे. तळहात व तळपाय शेकावे. बाळहिरडा मधातून चाटवावा.

शोथ–हरीतकीचूर्ण, कपिला १ ते २ गुंज प्रमाणात चाटवावे. वमनासाठी कडूजिरे द्यावे. पुनर्नवासव ४ ते ८ थेंब २–३ वेळा पाण्यासवे घालावे.

[१]छर्दी-दूध पिताच बालकाला पुन्हा पुन्हा उलटी होत असेल त्या वेळी रिंगणी, डोर्ली यांच्या फळांचे रस व पंचकोल, तूप आणि मध यांतून चाटवावे.

किंवा पिंपळी, पंचलवण, कडुलिंब, यांचे चूर्ण मध–तुपातून चाटवावे.

त्याप्रमाणेच रानमांजर (खवले मांजर) घोरपड, अस्वल व मोर या प्राण्यांचे उपलब्ध होईल त्याप्रमाणे कातडे, केस (पिसे) घेऊन त्याची काळी राख करावी व ती त्रिकटूच्या चूर्णाबरोबर मधातून चाटवावी.

१ अपि च । लवणानुरसं विसर्पकोठकण्डूकरम् । तत् पिचुमन्दपटोलीक्षीरीवृक्षैः शोधयेत् । तन्तुमद्दौर्बल्यश्वासकासकरम् । तत् पिप्पलीनागरचूर्णेन समधुघृतेन । गुरु सदनात्मकं प्रतिश्यायसिङ्घाणकक्षीरालसकरम् । तत् पाठाव्योषकल्केनपञ्च-कोलचूर्णेन वा क्षौद्रघृताप्लुतेन । दोषोपक्रमणीयं चेक्षेत ।। अ. सं. उ. २ पा. १९ अपि चेति समुच्चये । लवणानुरसं स्तन्यं बालस्य विसर्पादिकरं भवति । कोठाः सोत्सेधानि रक्तमण्डलानि । तत् क्षीरं पिचुमन्दादिभिः शोधयेत् । पिचुमन्दो निम्बः । त तन्तुमत्क्षीरं दौर्बल्यादिकरं भवति । तत् क्षीरं पिप्पलीनागरचूर्णेन मधुघृताभ्यां युक्तेन शोधयेत् गुरु तु क्षीरं सदनात्मकं सादकरस्वभावं प्रतिश्या-यादिकरं च सिङ्घाणकंनासास्रावः । क्षीरालसकं वक्ष्यमाणलक्षणम् । तत् गुरु क्षीरं पाठादिकल्केन शोधयेत् पञ्चकोलस्यचूर्णेन वा क्षौद्रघृताप्लुतेन । इति कफदुष्टे एषु च वातादि दुष्टेषु स्तन्येषु दोषोपक्रमणीयं चेक्षेत । तदुक्तेन प्रकारेण संयोजनादिनापृथक्संसृष्टानां च दोषाणां चिकित्सा भवतीत्यर्थः ।। टीका



शंखभस्म, प्रवाळपंचामृत १ ते २ गुंजा दुधातून दोन वेळा देणे.

कण्डूवर चंदनतेल प्रतिसारणासाठी वापरावे. निम्बजलाने स्नान घालावे.

इतर व्याधींवर त्या त्या व्याधींवरील चिकित्सा करावी.

या तीन भेदांचे पुन्हा आठ प्रकारचे स्तनदोष उत्पन्न होतात ते असे–

[१]वाताने दुष्ट झालेल्या स्तन्याचे वैरस्ययुक्त स्तन्य, फेनसंघातयुक्त स्तन्य, रौक्ष्य-युक्त स्तन्य असे तीन प्रकार होतात.

पित्ताने दुष्ट झालेल्या स्तन्याचे वैवर्ण्ययुक्त स्तन्य व दुर्गंधियुक्त स्तन्य असे दोन प्रकार होतात.

कफाने दुष्ट झालेल्या स्तन्याचे स्नेहयुक्त स्तन्य, पिच्छिलतायुक्त स्तन्य व गौरव-युक्त स्तन्य असे तीन प्रकार होतात.

असे हे एकूण तीन दोषांनी होणारे स्तन्यदुष्टीचे आठ प्रकार होतात.

रुक्षादिकारणांनी प्रकुपित झालेला वायू स्तन्यवह स्रोतसात येऊन स्तन्यातील रस दुष्ट करतो या वातसंसर्गामुळे स्तन्य बेचव होऊन त्याचे सेवन करणारे बालक कृश होते. स्तन्य त्यास आवडत नाही व त्याची वाढ फारच कष्टाने होते.

प्रकुपित वायू ज्या वेळी स्तन्यवह स्रोतसामध्ये येऊन स्तन्याला जणू घुसळतो त्या वेळी स्तन्य हे फेनयुक्त बनून स्तनातून कष्टाने बाहेर पडते. या स्तन्याच्या सेवनाने मुलाचा आवाज ओढल्यासारखा होतो. त्याची मलमूत्रवातप्रवृत्ती अवरुद्ध होते. वातामुळे उत्पन्न होणारे शिरोरोग त्याला होतात, किंवा पीनस होते.

प्रकुपित वायू ज्या वेळी स्तन्यवह स्रोतसांतील स्तन्याची स्निग्धता शोषित करून टाकतो, त्या वेळी स्तन्य रूक्ष होते व या स्तन्याच्या सेवनाने बालकाच्या बलाचा (ओजाचा, शक्तीचा, धातूचा) ऱ्हास होत जातो.

– पीतं पीतं वमति यः स्तन्यं तं मधुसर्पिषा ।।
द्विवार्ताकीफलरसं पंचकोलं च लेहयेत् ।
पिप्पलीपञ्चलवणं कृमिजित्पारिभद्रकम् ।।
तद्वल्लिह्यात्तथा व्योषं मषीं वा रोमचर्मणाम् ।
लाभतः शल्यकश्वाविग्दोधर्क्षाशिखिजन्मनाम् ।। वा. उ. २, सू. ५८ ते ६०

१ वैरस्य फेनसंघातो रौक्ष्यं चैत्यनिलात्मके ।
पित्ताद्वैवर्ण्यदौर्गन्ध्ये स्नेहपैच्छिल्यगौरवम् ।।
कफाद्भवति । च. चि. ३०–२३७

[1]गुर्वादिसेवनाने प्रकुपित झालेला कफ स्त्रियांच्या स्तन्यवह स्रोतसात येतो. कफ हा स्वतःच स्निग्ध असल्यामुळे त्याच्या संसर्गाने स्तन्य हे अधिकच स्निग्ध बनते. या स्तन्याच्या सेवनाने बालकाला वरचेवर छर्दी होते. त्याला सारखी लाळ येते. ते सारखे कुंथते. त्याची स्रोतसे स्नेहाने अवरुद्ध झाल्यामुळे बालक झोपाळू होते. त्याला फारशी हालचाल करवत नाही. श्वास, कास, प्रसेक, मूर्च्छा अशी लक्षणे त्याच्या ठिकाणी विशेष दिसतात.

प्रकुपित कफ ज्यावेळी स्तनाचा पिच्छिल गुण वाढवून त्याला दुष्ट करतो, त्या वेळी या स्तन्याने मूल मद्द बनते. त्याच्या तोंडावर, डोळ्यांवर सूज दिसते. या बालकाची लाळ सारखी गळत असते.

प्रकुपित होऊन स्तन्यवह स्रोतसांत आलेल्या कफाच्या गुरुत्वाने स्तन्य दुष्ट होऊन गुरू होते. या स्तन्याच्या सेवनाने बालक हृद्रोगी होते व इतरही अनेक कफाचे विकार या दुधाच्या सेवनाने उत्पन्न होतात.

अ—............रुक्षाद्यैरनिलः स्वैः प्रकोपणैः ।
क्रुद्धः क्षीराशयं प्राप्य रसं स्तन्यस्य दूषयेत् ॥
विरसं वातसंसृष्टं कृशीभवति तत् पिबन् ।
न चास्य स्वदते क्षीरं कृच्छ्रेण च विवर्धते ॥
तथैव वायुः कुपितः स्तन्यमन्तर्विलोडयन् ।
करोति फेनसंघातं तत्तु कृच्छ्रात् प्रवर्तते ॥
तेन क्षामस्वरो बालो बद्धविण्मूत्रमारुतः ।
वातिकं शीर्षरोगं वा पीनसं वाऽधिगच्छति ॥
पूर्ववत् कुपितः स्तन्ये स्नेहं शोषयतेऽनिलः ।
रुक्षं तत् पिबतो रौक्ष्याद्बलन्हासः प्रजायते ॥ च. चि. ६०–२३८ ते २४२

१ क्रुद्धो गुर्वादिभिः श्लेष्मा क्षीराशयगतः स्त्रियाः ।
स्नेहान्वितत्वात्तत्क्षीरमतिस्निग्धं करोति तु ॥
छर्दनः कुन्थनस्तेन लालालुर्जायते शिशुः ।
नित्योपदिग्धैः स्रोतोभिर्निद्राक्लमसमन्वितः ॥
श्वासकासपरीतस्तु प्रसेकतमकान्वितः ।
अभिभूय कफः स्तन्यं पिच्छिलं कुरुते यदा ॥
लालालुः शूनवक्त्राक्षिर्जडस्यात्तत् पिबञ्छिशुः ।
कफः क्षीराशयगतो गुरुत्वात् क्षीरगौरवम् ॥
करोति गुरु तत् पीत्वा बालो हृद्रोगमृच्छति ।
अन्यांश्च विविधान्रोगान्कुर्यात्क्षीरमाश्रितात् ॥ च. चि. ३०–२४६, २५०

## स्तन्यदुष्टीची सामान्य चिकित्सा :

[1]स्तन्य शुद्ध करण्यासाठी स्त्रीवरच शोधन-शमनादी उपचार करावे लागतात. यासाठी प्रथम स्त्रीला शास्त्रोक्त रीतीने स्नेहन देऊन योग्य प्रकारे स्वेदन करावे. व नंतर वमन करावे. त्यासाठी वचा, प्रियंगु, यष्टिमधू, गेळफळ, कुडा, सर्षप यांचे कल्क, निम्ब व कडू पडवळ यांच्या काढ्यासवे मीठ घालून द्यावेत व वमन करवावे.

वमनकर्म चांगल्या प्रकारे झाल्यानंतर शास्त्रोक्त रीतीने संसर्जनक्रम आचरावा. नंतर पुन्हा दोषाच्या व कालाच्या बलाबलाचा विचार करून पुन्हा स्नेहन देऊन विरेचनकर्म करावे. त्यासाठी निशोत्तर, हरीतकी किंवा त्रिफळ्याच्या काढ्याबरोबर हरीतकी किंवा नुसती हरीतकी मधाबरोबर द्यावी. विरेचनासाठी गोमूत्राबरोबरही हरीतकी द्यावी.

विरेचन चांगले झाल्यानंतर पुनः संसर्जनक्रम आचरावा व अवशिष्ट दोषांच्या शमनासाठी पुढे सांगितल्याप्रमाणे अन्नपान द्यावे.

साठेसाळी, साव्याचे तांदूळ, गव्हला, कोद्रू, जव, वेणूवय ( बांबूचे डोळे ), ही धान्ये व वंश, वेत्र, कलाय ( वाटाणा ) या भाज्या ( स्नेहसंस्कृत करून ) वापराव्यात. मूग, मसूर, हुलगे ही कडधान्ये यूषासाठी वापरावी. हे यूष त्रिकटू, सैंधव घालून तयार करावेत व ते करताना त्यांत निम्ब, नेत्रांकुर, वांगी, आवळे अशी द्रव्ये घालावीत.

१ तत्रादौ स्तन्यशुद्ध्यर्थं धात्रीं स्नेहोपपादिताम् ॥
संस्वेद्य विधिवद्वैद्यो वमनेनोपपादयेत् ।
वचाप्रियङ्गुयष्ट्याह्वफलवत्सकसर्षपैः ॥
कल्कैर्निम्बपटोलानां क्वाथैः सलवणैर्वमेत् ।
सम्यग्वान्तां यथान्यायं कृतसंसर्जनां ततः ॥
दोषकालबलापेक्षी स्नेहयित्वा विरेचयेत् ।
त्रिवृतामभयां वाऽपि त्रिफलारससंयुताम् ॥
पाययेन्मधुसंयुक्तामभयां वाऽपि केवलाम् ।
पाययेन्मूत्रसंयुक्तां विरेकार्थं च शास्त्रवित् ॥ च. चि. ३०–२५१ ते २५५

– सम्यग्विरिक्तां मतिमान् कृतसंसर्जना पुनः ।
ततो दोषावशेषघ्नैरन्नपानैरुपाचरेत् ॥
शालयः षष्टिका वा स्युः श्यामाका भोजने हिताः ।
प्रियङ्गवः कोरदूषा यवा वेणुयवास्तथा ॥
वंशवेत्रकलावाश्च शाकार्थे स्नेहसंस्कृताः ।
मुद्गान् मसूरान् यूषार्थे कुलत्थाश्च प्रकल्पयेत् ॥ च. चि. ३०–३५६ ते ५८

मांसाहारी व्यक्तीसाठी ससे, कपिंजल (कवडा), हरीण याचे मांस संस्कृत करून द्यावे. पिण्यासाठी सप्तपर्णी, अश्वगंधा, कुटकी, त्वग् यांनी सिद्ध केलेले पाणी वापरावे. स्तन्यशुद्धीसाठी गुळवेल, सप्तपर्ण्याची साल, सुंठ यांचा काढा किंवा काडेचिराइताचा काढा वापरावा.

[1]वैरस्ययुक्त क्षीरदोषावर द्राक्षा, यष्टिमधू, सारिवा, खिरणी यांचे चूर्ण कोंबट पाण्याबरोबर प्राशन करावे. पंचकोल आणि कुळीथ यांच्या पिठाचा लेप स्तनावर घालावा. लेप वाळल्यावर स्तन धुवावेत आणि स्तन्य पिळून काढावे.

फेनसंघातयुक्त ह्या स्तन्यदोषावर पहाडमूळ, सुंठ, करंज (शारंगेष्टा), मोरवेल यांचे चूर्ण कोंबट पाण्याबरोबर सेवन करावे. स्तनावर रसांजन, सुंठ, देवदारू, बेलमूळ, गव्हला यांचा लेप घालावा व नंतर दूध पिळून काढावे. किंवा काडेचिराईत, सुंठ, गुळवेल यांचा काढा प्राशनास द्यावा व स्तनावर यव, गहू व मोहोरी यांच्या चूर्णाचा लेप घालावा.

— निम्बवेत्राग्रकुलकवार्ताकामलकैः शृतान् ।
सव्योषसैन्धवान् यूषान्दापयेस्पतन्यशोधनान् ॥
शशान् कपिञ्जलानेणान् संस्कृतांश्च प्रदापयेत् ।
शार्ङ्गेष्टासप्तपर्णत्वगश्वगन्धाशृतं जलम् ॥
पाययेताथवा स्तन्यशुद्धये रोहिणीशृतम् ।
अमृतासप्तपर्णीत्वक्क्वाथं चैव सनागरम् ॥
किराततिक्तकक्वाथं श्लोकपादेरितान् पिबेत् ।
त्रीनेतान्स्तन्यशुद्धयर्थमिति सामान्यभेषजम् ॥ च. चि. ३०–२५९ ते २६२

१ पाययेद्विरसक्षीरां द्राक्षामधुकसारिवाः ।
श्लक्ष्णपिष्टां पयस्यां च समालोड्य सुखाम्बुना ॥
पञ्चकोलकुलत्थैश्च पिष्टैरालेपयेत् स्तनौ ।
शुष्कौ प्रक्षाल्य निर्दुह्यात्तथा स्तन्यं विशुध्यति ॥
फेनसंघातवत्क्षीरं यस्यास्तां पाययेत् स्त्रियम् ॥
पाठानागरशार्ङ्गेष्ठामूर्वाः पिष्ट्वा सुखाम्बुना ।
अञ्जनं नागरं दारु बिल्वमूलं प्रियङ्गवः ॥
स्तनयोः पूर्ववत् कार्यं लेपनं क्षीरशोधनम् ।
किराततिक्तकं शुण्ठी सामृतां क्वाथयेद्भिषक् ॥
तं क्वाथं पाययेद्धात्रीं स्तन्यदोषनिबर्हणम् ।
स्तनौ चालेपयेत् पिष्टैर्यवगोधूमसर्षपैः ॥

च. चि. ३०–२६३ ते ६८



[1]रौक्ष्ययुक्त क्षीरदोषावर षड्विरेचनशताश्रितीय अध्यायात (चरकाचा स. अ. ४) सांगितलेली पहाडमूळ, सुंठ, देवदारू, नागरमोथे, मोरवेल, गुळवेल, इंद्रजव, काडेचिराईत, कुटकी, सारिवा ही स्तन्य शोधन करणारी द्रव्ये घेऊन त्यांनी दूध वा तूप सिद्ध करून ते प्यावे. लघुपंचमुळाचा लेप स्तनांवर करावा.

[2]वैवर्ण्ययुक्त स्तन्यदुष्टीवर ज्येष्ठमध, मनुका, खिरणी, निर्गुंडी यांचा कल्क थंड पाण्याबरोबर सेवन करावा, मनुका व यष्टिमधू यांच्या कल्काचा स्तनावर लेप करावा.

दौर्गन्ध्ययुक्त स्तन्यदोषावर काकडशिंगी, मेढशिंगी, त्रिफळा, हरिद्रा, वचा यांचे चूर्ण थंड पाण्याबरोबर सेवन करावे. सारिवा, वाळा, मंजिष्ठा, भोकर व रक्तचंदन, तमालपत्र, नागरमोथे, चंदन, वाळा, यांचे लेप स्तनांवर घालावेत.

[3]स्नेहयुक्त स्तन्यदोषावर देवदारू, नागरमोथे, पहाडमूळ यांचे चूर्ण सैंधव घालून कोंबट पाण्याबरोबर सेवन करावे.

[4]पैच्छिल्ययुक्त स्तन्यदोषावर करंज, हरीतकी, वचा, नागरमोथे, सुंठ, पाठा यांचे चूर्ण कोंबट पाण्याबरोबर प्राशन करावे किंवा तक्रारिष्ट प्राशन करावे. भुईकोहळा, बेलमूळ, ज्येष्ठमध यांचा लेप स्तनांवर घालावा.

१ षड्विरेकाश्रितीयोक्तैरौषधैः स्तन्यशोधनैः ।
रूक्षक्षीरा पिबेत् क्षीरं तैर्वा सिद्धं घृतं पिबेत् ॥
पूर्ववज्जीवकाद्यं च पञ्चमूलं प्रलेपनम् ।
स्तनयोः संविधातव्यं सुखोष्णं स्तन्यशोधनम् ॥ च. चि. ३०–२६९ ते ७०

२ यष्टीमधुकमृद्वीकापयस्यासिन्धुवारिकाः ।
शीताम्बुना पिबेत्कल्कं क्षीरवैवर्ण्यनाशनम् ॥
द्राक्षामधुककल्केन स्तनौ चास्याः प्रलेपयेत् ।
प्रक्षाल्य वारिणा चैव निर्दुह्यात्तौ पुनः पुनः ॥
विषाणिकाजशृङ्ग्यौ च त्रिफलां रजनीं वचाम् ।
पिबेच्छीताम्बुना पिष्ट्वा क्षीरदौर्गन्ध्यनाशिनीम् ॥
लिह्याद्वाऽप्यभयाचूर्णं सव्योषं माक्षिकप्लुतम् ।
क्षीरदौर्गन्ध्यनाशार्थं धात्री पथ्याशिनी तथा ॥
सारिवोशीरमञ्जिष्ठाश्लेष्मातककुचन्दनैः ।
पत्राम्बुचन्दनोशीरैः स्तनौ चास्याः प्रलेपयेत् ॥ च. चि. ३०–२७१ ते ७५

३ स्निग्धक्षीरा दारुमुस्तपाठा पिष्ट्वा सुखाम्बुना ।
पीत्वा ससैन्धवाः क्षिप्रं क्षीरशुद्धिमवाप्नुयात् ॥

४ पाययेत् पिच्छिलक्षीरां शार्ङ्गेष्टामभयां वचाम् ।
मुस्तनागरपाठाश्च पीताः स्तन्यविशोधनाः ॥ च. चि. ३०–२७६ ते ७७

गौरवयुक्त स्तन्यदोषावर त्रायमाण, गुळवेल, निम्ब, कडू पडवळ, त्रिफळा यांचा काढा प्राशन करावा किंवा पिंपळमूळ, च्यवक, चित्रक, सुंठ यांचे चूर्ण गरम पाण्याबरोबर घ्यावे.

त्रिफळा, सुंठ, करंज, मोरवेल यांचा किंवा पीठवण, खिरणी यांचा लेप स्तनांवर घालावा.

## सान्निपातिक स्तन्यदुष्टी :

विरुद्ध, दुष्ट, अशुची, अभिष्यंदी असा आहार, अध्यशन, दिवास्वाप यांसारख्या सन्निपातप्रकोप करणाऱ्या कारणांचे सेवन स्त्री करते, त्या वेळी तीनही दोष एकदम प्रकुपित होऊन स्तन्यवह स्रोतसांमध्ये येऊन स्तन्य दुष्ट करतात. त्या वेळी तीनही दोषांची लक्षणे स्तन्यामध्ये दिसतात. असे स्तन्य अज्ञानाने, अवहेलनेने वा चुकून बालकास पाजले जाते. त्या वेळी त्याला पाण्यासारखी स्वच्छ वा फुटीर, आमयुक्त, दुर्गन्धी, विविध वर्ण व वेदनायुक्त फेसाळ अशी द्रवमलप्रवृत्ती होते वा क्षीरालसक नावाचा व्याधी उत्पन्न होतो.

---

– तक्रारिष्टं पिबेच्चापि यदुक्तं गुदजापहम् ।
विदारीबिल्वमधुकैः स्तनौ चास्याः प्रलेपयेत् ॥
त्रायमाणामृतानिम्ब पटोलत्रिफलाशृतम् ।
गुरुक्षीरा पिबेदाशु स्तन्यदोषविशुद्धये ।
पिबेद्वा पिप्पलीमूलचव्यचित्रकनागरम् ।
बलानागरशार्ङ्गमूर्वाभिर्लेपयेत् स्तनौ ॥
पृश्निपर्णीपयस्याभ्यां स्तनौ चास्याः प्रलेपयेत् ।

च. चि. ३०–२७८ ते ८१

– यदा पुनर्धात्री सन्निपातप्रकोपणान्यासेवेत तदास्यास्त्रयो मला युगपद्वक्षोऽभिप्रसन्नाः क्षीरवहा रसायनीः समनुसृत्य संकीर्णलिङ्गं स्तन्यमावहन्ति । तच्चेदविज्ञानात् । सततमप्रत्यवेक्षणात् प्रमादाद्वा मातुः कुमारः पिबति ततः स तेन सलिलोपममच्छं विच्छिन्नमामं दुर्गन्धि नानावर्णवेदनं फेनिलमतिसार्यते । अ. सं. उ. २ पान १९

– यदा तु धात्री सन्निपातप्रकोपणान्याहारादीन्यासेवते तदास्या धात्र्या युगपत्त्रयो मला वातपित्तश्लेष्माणो वक्ष उरोऽभिप्रपन्नाः प्राप्ताः क्षीरवहा रसायनीः समन्तादनुसृत्य संकीर्णलिंगं मिश्रत्रिदोषलक्षणयुक्तं स्तन्यमावहन्ति कुर्वन्ति । तत् क्षीरमविज्ञानाद्वैद्यल्याप्रत्यवेक्षणान्मार्तुवा प्रमादावहेलापरत्वाद्यदि कुमारः पिबति तत स तेन सन्निपातक्षीरेण पीतेन सलिलोपत्वादियुक्तं मलमतिसार्यते । टीका.



## चिकित्सा :

[1]धात्रीला पूर्वीप्रमाणेच वमनादिकर्म व संसर्जनकर्म करून नागरमोथे, पहाडमूळ, अतिविष, कुष्ठ, कुटकी यांचा काढा द्यावा किंवा पुढील काढ्यांचा उपयोग करावा.

( १ ) रास्ना, अजमोदा, गव्हला, देवदार.
( २ ) पहाडमूळ, तेजबळ, पुनर्नवा, लहान मेढशिंगी.
( ३ ) काडेचिराईत, गुळवेल, इंद्रजव, सारिवा.
( ४ ) वचा, हरिद्रादी गणांतील औषधे.
( ५ ) जांभूळ, आम्र, टेंटू व कवठ यांची पाने, बेलकाचरी.
बालावरही असेच उपचार करावेत.

## हारितोक्त क्षीर-दोष :

[2]हारिताने पाच प्रकारचे क्षीर-दोष सांगितले आहेत ते असे :
मृदुक्षीर असणे ही प्रकृती. बाकीच्या घनक्षीर, उष्णक्षीर, अम्लक्षीर, अल्पक्षीर आणि क्षारक्षीर या पाच विकृती होत.

स्तन्यामध्ये हे पाच दोष असल्यास ते बालकाला बाधक होते.

हारिताने जरी या पंचविध क्षीरदोषांचे दोषदृष्ट्या वर्गीकरण केले नसले तरी दोष हेच या पंचविध दोषांना कारणीभूत आहेत ते असे.—

---

१ तत्र धात्रीं बालं च पूर्वमेवाशु वामयेत् । विहितसंसर्गयोश्च मुस्तापाठातिविषाकुष्ठकटुकानां क्वाथं पानाय दद्यात् । रास्नाजमोदाप्रिङ्गुभद्रदारणां वा । पाठातेजोवतीपुनर्नवा वृश्चिकालीनां वा । भूनिम्बामृताकुटजफलशारिवाणां वा । वचाहरिद्रादिगणयोर्वा । पाठादिमहाकषायस्य वा । जम्ब्वाम्रतिन्दुककपित्थपत्राणां वा । बिल्वभंगस्य वा । अनुबन्धे च यथा व्याधिं प्रतिकुर्वीत । अ. सं. उ. २–२०

– तत्र पूर्वमेव प्रथममेवाशु धात्रीं बालं च वामयेत् । विहितसंसर्गयोः कृतपेयादिक्रमयोर्धात्री बालयोर्दोषाद्यपेक्षया मुस्तादिक्वाथं वा रास्नादिक्वाथं वा पाठादिक्वाथं वा भूनिंबादिक्वाथं वा वचाहरिद्रादिक्वाथं वा, पाठादिमहाकषायक्वाथं वा, जम्ब्वादिक्वाथं वा, बिल्वभङ्गस्य वा, क्वाथं पानाय दद्यात् । अनुबन्धे त्वनिवृत्तौ क्षीरालसकस्य यथाव्याध्युत्कृष्टव्याध्यनतिक्रमेण यथास्वं प्रतिकारं कुर्यात् । टीका

२ पंचैव क्षीरदोषाश्च स्त्रीणां च कथिता बुधैः ।
घनक्षीरोष्णक्षीराम्लक्षीरा चैव तथा परा ॥
अल्पक्षीरा मृदुक्षीरा क्षारक्षीरा तथापरा ॥
मृदुक्षीरा भवेत् सौख्या पंचान्या दोषकारकाः ॥

हा. सं. तृतीयस्थान, अ. ५४, पान ४५८

वातदोषामुळे अल्पक्षीरत्व, पित्तदोषामुळे उष्णक्षीरत्व व अम्लक्षीरत्व, कफदोषामुळे घनक्षीरत्व व क्षारक्षीरत्व.

संग्रहकाराने दोषदुष्ट स्तन्यामध्ये अनुरस दुष्टी सांगून जे वर्णन केले आहे त्यामध्येच या पंचविध विकारांचा समावेश करता येणे शक्य आहे. संग्रहातील वचनावरून ते सहज लक्षात येईल.

मागे सांगितलेली दोषानुरूप चिकित्साच या ठिकाणीही करावी.

## द्वन्द्वज व्याधी–बालरोग :

[1]द्वन्द्वज दोषामुळे द्वन्द्वज व सान्निपातिक दोषामुळे सान्निपातिक असे त्या त्या दोषलक्षणांनी युक्त असे विकार होतात.

## हारितोक्त स्तन्यज व्याधी :

[2]हारिताने सांगितलेल्या पंचविध क्षीरदुष्टीमुळे उत्पन्न होणाऱ्या रोगाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

वातदोषामुळे उत्पन्न होणाऱ्या अल्पक्षीर विकृतीमुळे बालक अल्पसत्त्व (नाजूक, हळवे, चिडचिडे), कृश, दीन, श्वास, अतिसारपीडित व आवाज बसलेले असे होते.

पित्तदोषामुळे उत्पन्न होणाऱ्या उष्णक्षीर विकृतीमुळे बालकाच्या ठिकाणी ज्वर, शोष, खुजट शरीर, राहणे, अतिसार ही लक्षणे उत्पन्न होतात.

अम्लक्षीर विकृतीमुळे उत्पन्न होणाऱ्या पित्तदोषजन्य विकारांचे वर्णन हारिताने केलेले नाही. संग्रहातील वचनावरून अम्लपित्त, अम्लछर्दी, विड्भेद, मुखपाक, विदग्धाजीर्ण हे विकार अम्लक्षीर दोषांमुळे उत्पन्न होतात असे मानता येईल.

१ द्वन्द्वजे द्वंद्वजं रूपं सर्वजे सर्वलक्षणम् ॥ मा. नि. बालव्याधि सू. ४

२ घनाध्माननिरोधत्वं श्वासकासादिसम्भवः ॥
उत्फुल्लकुक्षितैवं हि घनक्षीरस्य सेवनात् ॥
अल्पसत्त्वः कृशो दीनः श्वासातीसारपीडितः ॥
अल्पक्षीरस्य दोषेण सम्भवेद्धतवाक्सुतः ॥
ज्वरः शोषस्तथाल्पवमुष्णक्षीरेण बालके ॥
तथैव चोष्णक्षीरेण ज्वरातीसार एव च ॥
सुसत्वं बलमाप्नोति चारोग्यं लभते शिशुः ॥
मृदुक्षीरेण नियतं जायते रूपवानपि ॥
चक्षुरोगश्च कण्डूश्च क्षतश्लेष्मावस्राविता ॥
संक्लेदयुक्तं नासास्यं जायते क्षारदुग्धके ॥ हा. सं. तृतीयस्थान
५४-३ ते ७, पृ. ३५९



[1]कफदोषाने उत्पन्न होणाऱ्या घनक्षीर विकृतीमुळे उदराचा स्पर्श कठीण लागणे, आध्मान, वातमूत्र पुरीषांचा निरोध, श्वास, कास किंवा उत्फुल्लकुक्षिणा असे विकार होतात.

कफोत्पन्न क्षार-क्षीर विकृतीमुळे चक्षुरोग, कण्डू, कफज व्रण (व्रणशोथ), कफज शूल, प्रतिश्याय असे व्याधी होतात.

या क्षीरदोषांमुळे उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या विकारांसाठी हारिताने पुढीलप्रमाणे चिकित्सा सांगितली आहे.

घनक्षीर प्राशनामुळे जी लक्षणे उत्पन्न होतात त्याच लक्षणांसह कुशीमध्ये विशेष आध्मान होऊन कुशी खूप फुगल्यासारख्या झाल्या म्हणजे उत्पन्न होणाऱ्या रोगाला 'उत्फुल्लिका' असे नाव दिले आहे. यामध्ये ज्वराचा उल्लेख नसल्यामुळे लौकिकामध्ये 'डब्बा होणे' या नावाने प्रसिद्ध असलेला जो वातकफज्वर तो हा नव्हे असे म्हटले पाहिजे.

उत्फुल्लिका रोगामध्य आमाशय व पच्यमानाशय (ग्रहणी) या ठिकाणी स्रोतोरोधामुळे आध्मान उत्पन्न होऊन अवयव दुर्बल होतात. त्यामुळे आध्मान वाढत जाऊन उत्फुल्लकुक्षिता अशी अवस्था उत्पन्न होते. या आध्मानामुळे प्राणापानाच्या कार्यामध्ये व्यत्यय येऊन श्वास-कास व वातमलांचा संग अशी पीडाकर लक्षणे होतात. या अवस्थेमध्ये हारिताने सांगितलेल्या जलोकावचरणाचे प्रयोजन लक्षात येत नाही. स्वेद व दहनचिकित्सा मात्र उपयोगी पडण्याची शक्यता आहे. तीक्ष्ण द्रव्यांनी तयार केलेली गुदवर्ती या अवस्थेत वापरावी. उदरावर लेप घालावा.

[2]ज्वरासाठी पित्तपापडयाचा काढा मधसाखर घालून द्यावा. काडेचिराइताचा काढा मध घालून द्यावा.

[3]श्वासकासासाठी रास्ना, काकडशिंगी, भार्ङ्गी यांचे चूर्ण मधाबरोबर चाटवावे.

१ आध्मानात्फुल्लकुक्षिश्च श्वासदोषादिपीडितः ।
उत्फुल्लिका च विज्ञेया बालानां दुःखकारिणी ॥
उदरे च जलौकाभिः रक्तं चादौ विमोक्षयेत् ।
उत्फुल्लदोषे दातव्यं क्षीरदोषनिवारणम् ॥
अग्निना प्रबलः स्वेदो दहेद्वापि शलाकया ।
जठरे बिन्दुकाकारा जायन्ते भिषगुत्तमम् ॥
हा. सं. बालरोग निदान ९ ते ११, पृ. ४५९

२ हितः पर्पटक्वाथः शर्करामधुयोजितः ।
बालानां ज्वरनाशाय कैरातं मधुसंयुतम् ॥ हा. सं. बालरोगनिदान, पृ. ४५९

३ रास्नाकर्कटकं भार्ङ्गीचूर्णं च मधुसंयुतम् ।
लेहो वा बालकस्यापि श्वासकासनिवारणः ॥ हा. सं. बालरोगनिदान १६

[१]कासासाठी हरीतकी, वचा, सुंठ, मुस्ता, काकडशिंगी यांचे चूर्ण मधासवे द्यावे.

[२]मूत्रसंगावर पळसाची पाने, त्रिफळा, काकडीचे बी, शतावरी, पिंपळी यांचे चूर्ण तांदुळाच्या धुवणाबरोबर साखर घालून द्यावे.

[३]विद्रधीवर सुंठ, हरीतकी, दंतीमूळ यांचे चूर्ण गुळाबरोबर द्यावे.

[४]अतिसारासाठी पाठा, गिल्व, शिलाजतु, कुडा, शाल्मलित्वचा यांचे चूर्ण दुधाबरोबर द्यावे.

[५]त्वक् दोषासाठी अर्जुन, कदंब, कुष्ट, गैरिक यांचा लेप त्वचेवर घालावा.

[६]नेत्ररोगासाठी लोध्र, रसांजन, आमलकी, गैरिक श्लक्ष्ण चूर्ण मधात कालवून अंजन घालावे.

[७]बालकाची वाढ चांगली होण्यासाठी वचा, ब्राह्मी, मंडूकपर्णी, मुस्ता, कुष्ठ, सुंठ यांचे चूर्ण तुपाबरोबर सकाळी द्यावे.

[८]बुद्धीच्या वाढीसाठी गुळवेल, अपामार्ग, विडंग, विष्णुक्रांता (?), वचा, हरितकी, सुंठ यांचे चूर्ण रोज तुपातून द्यावे.

१ पथ्यावचानागरकं घनं कर्कटमेव च ॥
चूर्णं सगुडमेवं हि बालानां कासनाशनम् ॥ हा. सं. बालरोगनिदान १६

२ पलाशभेदं त्रिफलात्रपुसीवरीमागधीः ॥
पिष्ट्वा तण्डुलतोयेन सिताढ्यं मूत्ररोधजित् ॥ हा सं. बालरोगनिदान, सू. १७

३ नागरीभयादन्तीगुडचूर्णं प्रदापयेत् ॥
बालानां विद्रधिञ्चैव नाशयेच्च न संशयः ॥ हा. सं. बालरोगनिदान सू. १८

४ पाठाबिल्वशिलादीनि वत्सकं शाल्मलीत्वचम् ॥
दुग्धेन पानं बालानामतिसारनिवारणम् ॥ हा. सं. बालरोगनिदान १९

५ अर्जुनश्च कदंबश्च कुष्ठं गैरिकमेव च ॥
लेपनं त्वचि दोषाणां वारणं बालकस्य च ॥ हा. सं. बालरोग २०

६ लोध्रं रसांजनं धात्री गैरिकं मधुना युतम् ॥
अञ्जनं चैव बालानां नेत्ररोगनिवारणम् ॥ हा. सं. बालरोग १२

७ वचा ब्राह्मी च मण्डूकी घनकुष्ठं सनागरम् ॥
घृतेन प्रातर्दयंश्च बालानां पुष्टिकारकम् ॥ हा. सं. बालरोग २२

८ गुडूचिकापामार्गश्च विडंगं शंखपुष्पिका ॥
विष्णुक्रान्ता वचा पथ्या नागरञ्च शतावरी ॥
चूर्णं घृतेन संमिश्रं लिहतो धीः प्रवर्तते ॥ हा. सं. बालरोग २२



[१]वाणी वा स्वर चांगला होण्यासाठी त्रिकटू, त्रिफळा, धने, ओवा, साल वृक्षाचे मूळ, वचा, ब्राह्मी, भांर्गी यांचे चूर्ण मधाबरोबर द्यावे.

## कमारागार

[२]लहान मुलांकरिता स्वतंत्र खोली असावी. ती चांगली प्रशस्त असावी. बालकाच्या उपचारासाठी आवश्यक असणारी उपकरणे व साधने त्या ठिकाणी व्यवस्थितपणे सज्ज ठेवलेली असावीत. सर्व खोली व ही साधने अत्यंत स्वच्छ असावीत. खोलीमध्ये वारा खेळता असावा; पण वाऱ्याचे सरळ झोत आत येतील अशा उघड्या खिडक्या-दारे नसावीत. खोलीमध्ये दक्ष व गुणसंपन्न अशा परिचारिका सतत उपस्थित असाव्यात. वृद्ध स्त्रिया व वैद्य यांनी या कुमारागारास वरचेवर भेट देऊन तेथील व्यवस्था नीट आहे का नाही हे पाहिले पाहिजे.

या कुमारागारामध्ये डास, ढेकूण, चिलटे, पिसवा, माशा, उंदीर यांचा उपसर्ग मुळीच नसावा. तसेच खोलीमध्ये अंधारही नसावा. खोलीमधील बालकांसाठी

१ त्रिकटु त्रिफला धान्या यवानी सालमूलिका ॥
वचा ब्राह्मी तथा भार्ङ्गी चूर्णञ्च मधुना हितम् ॥
वाक्पटुत्वञ्च बालानां नादो वीणासम स्वरः ॥ हा. सं. बालरोग सू. २५

२ प्रशस्तवास्तुशरणं सज्जोपकरणं शुचि ।
निवातं च प्रवातं च वृद्धास्त्रीवैद्यसेवितम् ।
शुचिधौतोपवानानि निर्वलीनि मृदूनि च ।
शय्यास्तरणवासांसि रक्षोघ्नैर्धूपितानि च ॥ अ. सं. उ. अ. १ पान ८

– अतोऽनन्तरं कुमारागारविधिमनुव्याख्यास्यामः —
वास्तुविद्याकुशलः प्रशस्तं रम्यमतमस्कं निवातं प्रवातैकदेशं दृढमपगतश्वापदपशुदंष्ट्रिमूषिकपतंगं सुविभक्त सलिलोलूखलमूत्रवर्चः स्थानस्नानभूमिमहानसमृतुसुखं यथर्तुशयनासनास्तरणसंपन्नं कुर्यात्; तथा सुविहितरक्षाविधानबलिमंगलहोमप्रायश्चित्तं शुचिवृद्धवैद्यानुरक्तजन संपूर्णम् । इति कुमारागारविधिः ॥
च. शा. ८–५९

– शयनासनास्तरणप्रावरणानि कुमारस्य मृदुलघुशुचिसुगन्धीनि स्युः स्वेदमलजन्तुमन्ति मूत्रपुरीषोपसृष्टानि च वर्ज्यानि स्युः, असति संभवेऽन्येषां तान्येव च सुप्रक्षालितोपधानानि सुधूपितानि शुद्धशुष्काण्युपयोगं गच्छेयुः ॥ च. शा. ८–६०

– सुप्रक्षालितोपधानानीति सुधौतोत्तरप्रच्छादनानि । शुद्धशुष्काणीति धौतान्यपि यद् मलादिरागेणापि रहितानि भवति शुष्काणि च तदैवोपयोज्यानि, सुधौतं ह्यार्द्रमपि स्यात्, तथा गाढराग(गि) मलादिभावितं धौतमप्यशुद्धं स्यात्, तस्मादुक्तं— शुद्धशुष्काणीति । टीका च. शा. अ. ८–५९, ६०

वापरावयाची शय्या चांगली ऐसपैस खाटेवर घातलेली असावी. शय्येवरील अंथरुणे; पांघरुणे व कपडे निर्मळ, रोज धुतलेले, कोरडे ( उपवानानि ), सुरकुत्या, डाग नसलेले, मऊ असे असावेत.

१या सर्व वस्त्रप्रावरणांना रोज वचा, ओवा, गुग्गुळ, ऊद, सर्षप, जटामांसी, सापाची कात यांपैकी काही रक्षोघ्न द्रव्यांची धुरी द्यावी व नंतर ती वस्त्रे बालकांसाठी वापरावी.

सूतिकागारांमधील कुमारागाराची स्वतंत्र व्यवस्था ही एक आदर्श कल्पना आहे; यात शंका नाही. सूतिका श्रांत, दुर्बल अशा स्थितीत असल्यामुळे तिला विश्रांती मिळण्याच्या दृष्टीने व बालकालाही स्तनपानादींची सवय नियमित लावण्याच्या दृष्टीने बालक मातेपासून दूर ठेवलेले असणे हे पहिल्या काही दिवसांत तरी इष्ट ठरते. स्वतंत्र कुमारागारामध्ये बालकांचे संरक्षण सहजासहजी उत्तम रीतीने होते. त्याची स्वच्छता व टापटीप या गोष्टी स्वतंत्र व्यवस्थेमध्ये राखणे सोपे असते.

कुमारागार कृमिकीटकांपासून अलिप्त राखणे, व्याधिपरिवर्जनाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

मुलांची वस्त्रे-प्रावरणे स्वच्छ राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या बाबतीत जर दुर्लक्ष झाले आणि वस्त्रांच्या स्वच्छतेची चांगली काळजी घेतली नाही तर मुंग्या, उवा, पिसवा, झुरळे, इतकेच नव्हे तर विंचूसुद्धा या वस्त्रप्रावरणांतून आढळतात. त्यामुळे बालकाला किती प्रकारचे उपद्रव सहन करावे लागतील त्याची कल्पना करवत नाही.

स्वच्छतेसंबंधीची ही काळजी सर्वांगीण रीतीने घेण्याकडे प्राचीन ग्रंथकारांनी विशेष लक्ष दिले आहे ते येवढ्यासाठीच.

जातमात्रोपचारातील नाळेचे व्रणकर्म व स्नान आटोपल्यानंतर बालक रेशमी वस्त्रामध्ये गुंडाळून रेशमी वस्त्र अंथरलेल्या शय्येवर झोपवावे.

त्याची टाळू तेलाने माखून ( भरून ) त्याच्यावर तेलात भिजविलेला कापसाचा पिचू ठेवून टोपडे घालून डोके झाकावे. बालकास रक्षोघ्न द्रव्यांनी धुपवावे.

१ धूपनानि पुनर्वाससां शयनास्तरणप्रावरणानां च यवसर्षपातसीहिङ्गुगुग्गुलवचाचोरकवयःस्थागोलोमीजटिलापलङ्कषाशोकरोहिणीसर्पनिर्मोकाणि घृतयुक्तानि स्युः ॥ च. शा. ८–६१

२ अथ बालं क्षौमपरिवृतं क्षौमवस्त्रास्तृतायां शय्यायां शाययेत्, पीलुबदरीनिम्बपरुषशाखाभिश्चैनं परिवीजयेत् । मूर्ध्नि चास्याहरहस्तैलपिचुमवचारयेत् धूपयेच्चैनं रक्षोघ्नैर्धूपैः रक्षोघ्नानि चास्यपाणिपादशिरोग्रीवास्ववसृजेत् तिलातसीसर्षपकणांश्चात्र प्रकिरेत् अधिष्ठाने चाग्निं प्रज्वालयेत् व्रणितोपासनीयं चावेक्षेत् ।

सु. शा. १०–२३

"तालु चोऽस्य स्नेहपिचुनोपरिष्टादवगुण्ठयेत्" ॥ अ. सं. उ. अ. १, पान ३



बालकांच्या खोलीमध्ये शेगडी ठेवून त्यात खोलीमध्ये ऊब राहील इतका अग्नी प्रज्वलित राखावा.

व्रणितोपासनीय अध्यायामध्ये सांगितलेल्या इतर गोष्टीही संभाळाव्यात.

पूर्वीच्या ग्रहबाधानिवारक व मांगल्याच्या कल्पनेप्रमाणे पीलू, बोर, निंब, फालसा (परूषक) यांच्या डाहळ्या बालकावरून ओवाळून टाकण्यास सांगितले आहे. त्यांच्या उशागती, पायगती व बाजूलाही तीळ, अळशी, मोहऱ्या या विखरून टाकाव्यात. तसेच मुलाच्या हातात, पायात, गळ्यात दृष्ट लागू नये, म्हणून केसाळीसारखे विशिष्ट पदार्थ बांधावेत, असे सुचविले आहे.

सुश्रुताच्या सूत्रस्थानातील व्रणितोपासनीय या १९ व्या अध्यायात 'व्रणित' व्यक्तीने आचरावयाच्या आहार-विहारासंबंधीच्या अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. बालकही एका दृष्टीने नालकर्तनामुळे व्रणितच असते. तसेच त्याची सर्व त्वचा अत्यंत मृदू, सुकुमार असल्यानेही त्यासंबंधीची काही काळजी घेणे आवश्यक असते.

धूळ, धूर, वारा, अंगावर पडणारे ऊन यांपासून बालकाचे संरक्षण करावे. त्याचे अंथरूण-पांघरूण घाणेरडे, वर-खाली, वेडे-वाकडे, ओले-दमट असे नसावे. लहान मुलाच्या मल-मूत्रोत्सर्गानंतर त्याचे अंथरूण-पांघरूण इ. सर्व कपडे बदलून प्रत्येक वेळी दुसरे चांगले कोरडे, स्वच्छ असे कपडे वापरले पाहिजेत

विशेषतः मुलाच्या पोटाच्या भोवती नाळेसाठी बांधलेला जो पटबंध असतो त्याची स्वच्छता व कोरडेपणा दक्षतापूर्वक राखली पाहिजे. मलमूत्रामुळे वा अनवधानादी इतर कारणांनी तो पटबंध जर ओला वा गलिच्छ राहिला तर व्रण दुष्ट होण्याची व बालकास ज्वरादी उपद्रव होण्याची फार भीती असते.

गारव्यापासून बालकाचे संरक्षण करणे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. नाही तर वातकफांचा प्रकोप होऊन बालकास पीडा होते. आपल्याकडे शेक-शेगडीची व्यवस्था यासाठीच रूढ आहे.

बालकाच्या अंगावर विशेषतः डोळे, नाक, नाळ या ठिकाणी माशा मुळीच बसू देता कामा नये.

नाळेसाठी बांधावयाचा उदरावरील पटबंध फार घट्ट असू नये व कातडीला टोचेल असा खरखरीतही असू नये. बालकावर करावयाचे स्वच्छतारक्षणादी उपचार शक्य तो त्याला निजवूनच करावेत.

– वातातपरजोधूमावश्याय...... विषमशयनोपवास वाग्व्यायामस्थामचंक्रमणशीतवातविरुद्धाध्यशनाजीर्णमक्षिकाद्याः बाधाः परिहरेत् । सु. सू. १९–२०
– शुचिना शुक्लवाससा भवितव्यम् इति । सु. सू. १९–२३
– व्रणं न च विघट्टयेत् न तुदेत् न च कण्डुयेत् शयानः परिपालयेत् ।

सु. सू. १९–३०

तसेच बालकाला अजीर्ण होणार नाही अशी दक्षता घ्यावी. मूल स्तनपान करू लागल्यानंतर ही काळजी घेणे अधिक महत्त्वाचे असते; कारण अंगावरील दुधाचे माप ठरविणे कठीण आहे. स्तनपानाच्या वेळा नियमित करणे एवढेच शक्य असते व त्यासंबंधीचा कटाक्ष पाळावा.

प्रसूतीनंतर पहिल्या दोन-तीन दिवसांत स्त्रीच्या ठिकाणी स्तन्यप्रवृत्ती बहुधा नसते. स्तनांतील स्तन्यवाहिन्या मोकळ्या होऊन दूध सुटू लागण्यास थोडा काळ लागतोच. या काळामध्ये चिकाच्या स्वरूपाचा गुरु, घन, पिच्छिल असा स्राव स्तनांमध्ये उत्पन्न होतो. तो सर गुणाचा असला तरी गुणदोषबहुल व अभिष्यंदी असल्याने बालकास प्राशनासाठी देणे इष्ट नसते. बालकाला पहिल्या दिवशी अनंतमिश्रित मधुघृत दिवसातून तीन वेळा चाटवावे.

दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी लक्ष्मणा या वनस्पतीने सिद्ध केलेले तूप मुलास चाटवावे. चवथ्या दिवशी स्तनपान करवावे. पण तत्पूर्वी त्या मुलाच्या तळहातावर जेमतेम मावेल एवढे मध व तूप एकत्र करून ते दोन वेळा चाटवावे आणि मग ते स्तन्य द्यावे.

वाग्भटाने मधुघृताच्याऐवजी ताज्या लोण्याचा उपयोग करण्यास सांगितले आहे. 'अन्तताः' हा शब्द सुश्रुतामध्ये केवळ अनंत एवढाच असून टीकाकाराने त्याचा अर्थ 'सुवर्ण' असा केला आहे व एक गुंज त्याचे प्रमाणही सांगितले आहे (सु. शा. १०–१५) ते इष्ट वाटत नाही. एवढ्या मोठ्या मात्रेत इतक्या लहान मुलास सुवर्ण सोसणे शक्य नाही. जुन्या परंपरेमध्ये सोन्याच्या अंगठीचे दोन तीन वळसे मधांत उगाळून तो मध बालकास चाटवायची पद्धत आहे. पित्याने सुवर्णास मध लावून तो अपत्यास चोखवावा व त्यानंतर इतर आहारद्रव्ये वापरावीत अशीही रूढी आहे.

---

– सिराणां हृदयस्थानां विवृतत्वात् प्रसूतितः ।
तृतीयेऽह्नि चतुर्थे वा स्त्रीणां स्तन्यं प्रवर्तते ।। अ. सं. उ. अ. १, पान ३

– तस्मात् प्रथमेऽह्न्यनन्ताभिश्रिते मधुसर्पिषी मंत्रपूते त्रिकालं प्राशयेत् ।
द्वितीये लक्ष्मणासद्धं सर्पिस्तृतीये च ।। अ. सं. उ. अ. १ पान ३

– ततः प्राङ्निवारितस्तन्यस्य स्वपाणितलसम्मितं सर्पिर्द्विकालं दापयेदनन्तरं च स्तन्यमिष्टतः । अ. सं. उ. अ. १ पान ४

– स्तन्यानुपानं द्वौ कालौ नवनीतं प्रयोजयेत् ।। वा. उ. १–१४

– ततः प्राङ्गिवारितस्तन्यं मधुसर्पिः स्वपाणितलसंमितं द्विकालं पाययेत् ।।
सु. शा. १०–१५

– क्षीरं तत्कालसूताया घनं पीयूषमुच्यते । गुरवः श्लेष्मलः ।
भावप्रकाश पूर्वखंड, पान २३५, २८–३३



वाग्भटाने वा संग्रहाने 'अनंता' असाच पाठ स्वीकारला आहे. याचा अर्थ उपळसरी किंवा दूर्वा असा आहे. दोनही द्रव्ये मुलाच्या दृष्टीने हितकरच आहेत. दुसऱ्या दिवशी वापरावयास सांगितलेली लक्ष्मणा ही वनस्पती दुर्मिळ आहे. 'लक्ष्मणा' शब्दाने काही लोक पांढऱ्या फुलाची रिंगणी असा अर्थ घेतात. पण तीही क्वचितच सापडते. साधी रिंगणीही वापरण्यास हरकत नाही, असे आम्हांस वाटते. या वनस्पतींचा रस ५ ते ६ थेंब किंवा पंचांगाचे श्लक्ष्ण चूर्ण १–२ गुंजा मधुघृताबरोबर वापरावे.

पहिले ३ दिवसपर्यंत प्राचीन ग्रंथकारांनी मध-तूप व लोणी असे पदार्थ द्यावयास सांगितले आहे. पण आज या पद्धतीचा अवलंब करणे कठीण आहे. कारण औषधासारख्या लहान मात्रेत दिलेली ही द्रव्ये अर्भकाची भूक भागविण्याच्या दृष्टीने फारच कमी पडतात आणि आहार या दृष्टीने जर ही द्रव्ये वापरली तर त्यांचे प्रमाण मोठे वापरावे लागून ती सोसत नाहीत.

एखाद्या मुलाचे आरोग्य व अग्नी असाधारणपणे आदर्श असेल तर गोष्ट वेगळी; पण सध्याच्या काळी अशी आदर्श स्थिती क्वचितच आढळते. सर्वसाधारण मुलांना ती स्तन्यप्राशन करू लागेपर्यंत आहार म्हणून या मधुघृतासवेच शेळीचे, गाईचे वा दायीचे दूध देणे आवश्यक आहे. शेळीचे वा गाईचे दूध द्यावयाचे झाल्यास ते विडंग सुंठीने सिद्ध करून व समभाग जल घालून देणे आवश्यक असते.

पहिले दोन तीन दिवस बालकाच्या मलमूत्रप्रवृत्तीवरही लक्ष ठेविले पाहिजे. गर्भाशयामध्ये असताना मातेचा आहाररस हाच बालकाचा आहार असल्यामुळे तो प्रसादरूपच असतो. परंतु गर्भाच्या शरीरामध्ये संचार करून त्यांचे पोषण करीत असताना काही मलभाग हा उत्पन्न होतोच. गर्भाचे शरीर हे सुकुमार असल्याने मातेच्या प्रसादरूप आहाररसातही बालकाच्या धातुपोषणाच्या दृष्टीने काही मलभाग असतोच. तसेच बालकाच्या शरीरातील सप्तधातूंच्या उत्पत्तीबरोबरच कफपित्त हे दोषही उत्पन्न होत असतातच. या दोषांचे इतर शरीरव्यापाराबरोबर महास्रोतसात येऊन अन्नाचे पचन करणे हेही एक कार्य असतेच, परंतु बालकाच्या शरीरामध्ये महास्रोतसांत अन्न येत नसल्यामुळे त्या ठिकाणी येणाऱ्या कफपित्तांना कार्य असत नाही व म्हणून त्यांना मलरूपता येते. या ठिकाणी अशी एक शंका येईल की, आहार महास्रोतसात येतातच कशाला ? थोड्याशा विचाराने ही शंका योग्य नाही

---

– प्रसूतासु च नारीषु बलेन सह सूयते ।
तेन स्रोतोविशुद्धिः स्यात् क्षीरमाशु प्रवर्तते ।।
तस्मात् सद्यःप्रसूतायां जायते श्लेष्मिकं पयः ।
तेन कठिनता याति तस्मात्तत् परिवर्जयेत् ।।
हारित संहिता पान ५८, प्रथमस्थान अ. ८. सू. ११–१२

हे लक्षात येईल. दोष येण्यासाठी स्रोतसांची उत्पत्ती आवश्यक असते आणि स्रोतसे उत्पन्न झाली की त्यातून ते ते भाव स्रवावयाचेच.

प्रयोजन असेल त्या वेळी विशेषरीत्या, प्रयोजन नसेल त्या वेळी अल्प प्रमाणात ते ते भाव स्रवतात. बालकाच्या शरीरामध्ये शरीराच्या वाढीबरोबर सर्वच स्रोतसे उत्पन्न होत असल्यामुळे महास्रोतसांमध्ये दोषांना आणणारी स्रोतसेही उत्पन्न झालेली असतातच. इतर वेळी अन्नमलाबरोबर हे दोष शरीराच्या बाहेर पडतात. गर्भस्थितीत अन्नमल नसल्यामुळे दोषांना आलेली मलरूपता विशिष्ट काळपर्यंत तेथेच संचित होऊन राहते.

मातेच्या आहाररसामध्ये ज्या दोषाचे आधिक्य असेल त्याप्रमाणे श्वेत, कृष्ण, पीत असा वर्ण या मलाला येतो व त्याच्या सांद्र, पिच्छिल या गुणधर्मातही थोडा-बहुत फरक असतो.

हाच मल पहिल्या दोन-तीन दिवसांत गुदद्वाराने बाहेर पडतो आणि बालकाला जो एरंडस्नेह चाटवावयाचा तो याच मालाच्या शोधनासाठी होय. दोन तीन दिवसांनंतर जो मल येतो तो मात्र बालकाने स्वतंत्रपणे घेतलेल्या आहारापासून उत्पन्न झालेला असतो. म्हणून त्याचे स्वरूपही पहिल्या दोन तीन दिवसांतील मलापेक्षा वेगळे असते. या मलाचे स्वरूप अधिक पीतवर्ण व अधिक द्रव असे असते.

गर्भाच्या शरीरात उत्पन्न होणारा क्लेदही मूत्रासवे बस्तीमध्ये येऊन संचित झालेला असतो. तो प्रथम मूत्राच्या वेळी बाहेर पडतो.

[1]लहान मुलाच्या कानामध्ये प्रतिदिनी तेल घालून वर कापसाचाही मऊ बोळा ठेवावा. तसेच त्याच्या कानशिलावरही ( शृंगाटक ) तेलात भिजलेली कापडाची लहान घडी बांधावी. निदान तैलाने हळुवारपणे त्याची कानशिले चोळून वर टोपडे घालावे.

[2]बालकाला रोज अभ्यंग करून उटणे लावून स्नान घालावे. त्यासाठी बला, सालवण, रेणुकबीज, कमल, डोरलीची फळे, ऐरण, मोहऱ्या, कोष्ठ, सैंधव, अश्वगन्धा, मोठी बला,

१ अहरहश्चास्य श्रोत्रशृङ्गाटकं स्नेहाप्लुतेन प्लोतेन प्रच्छादयेत् ।
अ. सं. उ. १ पान ४

२ अभ्यङ्गोद्वर्तनं स्नानं प्रत्यहं च समाचरेत् ।
सहदेवास्थिराकौन्तीकुमुदोत्पलचन्दनैः ॥
बृहतीफलतर्कारीसर्षपाकुष्ठसैंधवैः ।
अश्वगन्धाबलैरण्डतिलापामार्गतण्डुलैः ॥
सात्मगुप्ताफलैस्तैलं साजक्षीरं विपाचितम् ।
रक्षोघ्नः पुष्टिदोऽभ्यङ्गस्तद्वदुद्वर्तनं च तैः ॥
दधिमाक्षिकसंयुक्तैस्त्रिगुणीकृतचिक्कसैः । अ. सं. उ. १, पान १३



एरण्ड, आघाड्याचे बी, खाजकुहिलीचे बी, यांच्या चूर्णाने शेळीच्या दुधामध्ये तैलसिद्ध करून त्याने बालकाला अभ्यंग करावा. उद्वर्तनासाठी याच द्रव्यांचे श्लक्ष्ण चूर्ण एक भाग, दही एक भाग, मध एक भाग व तीन भाग भाजलेल्या यवाचे पीठ एकत्र करून वापरावा.

[1]बालकाला रोज स्नेहन (अभ्यंग) उद्वर्तन करून स्नान घालावे. सुगंधी द्रव्यांनी धूपन करावे. त्याच्या शय्येवरील वस्त्रे वरचेवर (आवश्यकतेप्रमाणे) बदलावीत. रोज रात्री बालकाचे अंग तेलाने माखून चोळावे. यामुळे बालकास झोप चांगली येते; त्याच्या श्रमांचा परिहार होतो. बल वाढते व त्याची वाढ व्यवस्थितपणे होते. म्हणून स्नेहमर्दन बालकाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

[2]उटण्यासाठी मोरवेल, हळद व दारुहळद यांचे चूर्ण किंवा नुसते हुलग्याचे चूर्ण किंवा अश्वगंधाचे चूर्ण वापरावे. स्नानासाठी जीवनीय गणांनी सिद्ध केलेले जल वापरावे.

## स्तनपान

[3]चवथ्या दिवसापासून स्तनामध्ये दूध चांगल्या प्रकारे येऊ लागते, त्या वेळी बालकास अंगावर प्यावयास घ्यावे.

– बालस्य चाभ्यङ्गादिकं प्रत्यहं समाचरेत् । सहदेवादिभिरजाक्षीरयुक्तं तैलं पाचितं रक्षोघ्नत्वादिगुणोऽभ्यङ्गो भवती । सहदेवा बला । स्थिरा सालपर्णी । कौन्ती हरेणुका । बृहत्याः फलं तथोक्तम् । तैः सहदेवादिभिरुद्वर्तनं तद्वदिति रक्षोघ्नं पुष्टिकृच्च । किम्भूतैः सहदेवादिभिरुद्वर्तनमित्याह । दधिमाक्षिकयुक्तैस्त्रिगुणीकृतचिक्कसैश्च । ईषत् भृष्टानां यवानां चूर्णं चिक्कसम् । अ. सं. उ. पान १३ टीका

१ मूर्वामूलद्विरजनीयवैश्चोद्वर्तनं हितम् ।
त्र्यक्षणोद्वर्तनस्नानं गन्धधूपनिषेवणम् । बालानां शस्यते तत्र शय्यायाश्च विकल्पनम् । नित्यमेव तु बालानां निशि स्नेह विमर्दनम् । हितं निद्राकरं बल्यं वर्धनं श्रमनाशनम् । तस्माच्च शस्यते नित्यं बालानां परिमर्दनम् । का. सं. पृ. १२९

२ कुलत्थचूर्णमेकं वा वाजिगन्धारजोऽपि वा ॥
स्नाने सर्वौषधीकल्को जीवनीयाम्बु चेष्यते । अ. सं. उ. १, पान १३

– मूर्वादिभिर्द्वितीयमुद्वर्तनम् । अथवैकं केवलमेव कुलत्थचूर्णमुद्वर्तनम् वाजिगन्धाया अश्वगन्धाया रजश्चूर्णं वा केवलम् । बालस्य च स्नाने प्रसिद्धानां सर्वौषधीनां कल्क इष्यते जीवनीयशृतं जलं च ॥ टीका

३ अतोऽनन्तरं जातकर्म कुमारस्य कार्यम् । तद्यथा मधुसर्पिषी मन्त्रोपमन्त्रिते यथाम्नायं प्रथमं प्राशितुं दद्यात् । स्तनमत ऊर्ध्वमेतेनैव विधिना दक्षिणं पातुं पुरस्तात् प्रयच्छेत् । च. शा. ८·४६

[१]बालकाच्या पोषणाच्या दृष्टीने त्याच्या मातेचे दूधच श्रेष्ठ आहे. तेच बालकाचे नैसर्गिक अन्न आहे. गर्भधारणेपासून मातेच्याच आहाररसाने बालकाचे पोषण झालेले असल्याने त्याच आहारसापासून उत्पन्न होणारे स्तन्य बालकास स्वभावतःच सात्म्य होते, म्हणून मातेच्या दुधाइतके मुलाला दुसरे चांगले अन्न नाही.

[२]मातेचे स्तन्य जर निरनिराळ्या दोषांनी दूषित असले वा मातेस एखादा व्याधी असला किंवा दूध मुळीच नसले, सौन्दर्यरक्षणाच्या मिथ्या कल्पनांनी स्वतःच्या अंगावर मुलास पाजणे एखाद्या स्त्रीस इष्ट वाटत नसले तर बालकाच्या पोषणासाठी स्तन्य पाजू शकेल अशा दाईची योजना करावी. वाग्भटाने दोन दाया नेमाव्यात व त्या प्रेमळ असाव्यात असे सुचविले आहे.

## धात्री

[३]दाई जी नेमावयाची ती शक्यतो स्वतःच्या जातीची, मध्यम वयाची, पवित्र आचरणाची, खाण्यापिण्याची हाव नसलेली, चिंता-व्यग्रता नसलेली, निरोगी, मूल जिवन्त असलेली, प्रेमळ, दक्ष, ब्रह्मचर्य पाळणारी, अवयवाचे व्यंग नसलेली, पुष्कळ दूध असलेली, स्वच्छ, शुभ्र कपडे घालणारी, सभ्यतेने वागणारी, विनयी, हलकी, घाणेरडी कामे न करणारी, किळस नसलेली, नाकी डोळी नीटस असलेली, आपल्याच प्रांतातली, चंचलपणा, अस्थिरपणा नसलेली अशी असावी.

फार काळी, फार पांढऱ्या रंगाची, फार उंच, फार बुटकी, फार बारीक, फार लठ्ठ;

१ मातुरेव पिबेत् स्तन्यं तद् परम् देहवृद्धये । वा. उ. १–१५

२ स्तन्यधात्र्यावुभे कार्ये तदसम्पदि वत्सले ॥ वा. उ. १–१५

३ अथास्य समानवर्णा मध्यमवयाः शुचिरलोलुपा निभृतानातुरा जीवद्वत्सा वत्सला दक्षिणा ब्रह्मचारिण्यव्यङ्गा शुक्लाम्बराचारा दीर्घह्रस्वादिदेहदोषोष्टकरहिता अलम्बोर्ध्वचूचुकातिपीनहीन स्तनदोषमुक्ता । युक्तेचूचुका धात्री स्यात्तस्या एव स्तन्यं पिबेत् । अ. सं. उ. १ पान ५

– ततो यथावर्णं धात्रीमुपेयान्मध्यम प्रमाणां मध्यमवयस्का (सा)मरोगां शीलवतीमचपलामलोलुपामकृशामस्थूलां प्रसन्नक्षीरामलम्बोर्ध्वस्तनीमव्यङ्गामव्यसनिनीं । जीवद्वत्सां दोग्ध्रीं वत्सलामक्षुद्रकर्मिणीं कुले जातामतो भूयिष्ठैश्च गुणैरन्वितां श्यामामारोग्यबलवृद्धये बालस्य । तत्रौर्ध्वस्तनी करालं कुर्यात् लम्बस्तनी नासिकामुखं छादयित्वा मरणमापादयेत् । सु. शा. १०–२५

– अतो धात्रीपरीक्षामुपदेक्ष्यामः । अथ ब्रूयात् धात्रीमानय समानवर्णा यौवनस्थां निभृतामनातुरामव्यङ्गामव्यसनामविरूपामजुगुप्सितां देशजातीयामक्षुद्रकर्मिणीं कुले जातां वत्सलामरोगां जीवद्वत्सां पुंवत्सां दोग्ध्रीमप्रमत्तामनुच्चारशायिनीमनन्त्यावसायिनीं कुशलोपचारां शुचिमशुचिद्वेषिणीं स्तनस्तन्यसंपदुपेतामिति ॥ च. शा. ८-५२



सगळ्या अंगावर केस असलेली, किंवा डोक्यावर केस तुरळक असलेली अशी नसावी. तिचे स्तनही फार उंच, आकाराने फार मोठे, फार लहान, व लोंबकळलेले नसावेत. स्तनचूचुक हे योग्य त्या आकाराचे व बालकास सुखाने चोखता येतील असे असावेत. स्त्रीचे स्तन फार वर असतील तर त्यामुळे मूल कराल ( दात पुढे असणारे ) होईल. तसेच तिचे स्तन फार लोंबकळणारे असतील तर त्याचा दाब मुलाच्या नाकातोंडावर पडून ते गुदमरून मरेल. यासाठीच मूल पिण्यास घेताना निजून घेऊ नये. मूल शक्य तो बसून मांडीवर घेऊनच पाजावे.

दाई मध्यम वयाची म्हणजे प्रौढ असावी; याचे जे कारण टीकाकाराने सांगितले आहे ते चिन्त्य आहे. दाई वयाने फार तरुण असेल तर तिला माया कमी असते व वृद्ध असेल तर ती कष्ट सोसू शकत नाही. आणि तिच्या दुधात बालकाचे पोषण करण्यास आवश्यक ते गुण नसतात. चरकाने जरी 'यौवनस्था' असावी असे म्हटले असले तरी त्या 'यौवनस्था'चा अर्थही मध्यमवयस्का असाच केला पाहिजे. कारण त्याला 'यौवनस्था' शब्दाने परिपूर्णधातुका स्त्री अपेक्षित आहे, हे टीकाकारानेही स्पष्ट केले आहे. माया नसलेल्या ज्या तरुणीचा निरास संग्रहाच्या टीकाकाराने केला आहे, तिला चरकाचा टीकाकार 'बाला' असे म्हणतो. दुधासाठी नेमावयाची स्त्री ही 'अनागतार्तवा' अशा अर्थाने बाला असणे शक्यच नाही; म्हणून बाला शब्दाचा अभिप्रेत अर्थ 'फार तरुण' असाच असावा.

[१]दाईचे स्तन्य पाण्यात टाकल्याबरोबर त्वरित मिसळून पाण्याशी एकरूप झाले पाहिजे. तसेच स्तन्याचे म्हणून जे दोष सांगितले आहेत ते तिच्या स्तन्यामध्ये नसावेत. दाईचे व दुधाचे असे परीक्षण करून नेमलेली दाई बालकाच्या आरोग्यास व पोषणास उपयुक्त ठरते.

– समानवर्णामिति तुल्यजातीयाम् । यौवनस्थामित्यनेन बालावृद्धयोरसंपूर्णक्षीणधातुत्वेन तयोर्निरासं करोति । निभृतामिति विनीताम् । अविरूपामिति अविकृतावयवाम् । अव्यङ्गामिति अहीनाङ्गीम् । देशजातीयां समानदेशजाम् । अनन्त्यावसायिनीमिति शूद्राभिप्रायेण, शूद्रस्य हि सवर्णत्वेन चाण्डालादिस्त्री प्रसक्ता, सा च निषिध्यते; ब्राह्मणादीनां स्वसवर्णत्वेनैव सा निरस्ता किंवा ब्राह्मणादीनामपि पतित ब्राह्मण्याद्या अनन्त्यावसायिनीमितिशब्देन क्षिप्यते ॥ टीका.

१ तच्चोदकपात्रे दुह्यमानमेकतां यदुदकेन सह गच्छति वक्ष्यमाणदोषरहितं च तच्छुद्धमारोग्यबलजननम् ॥ अ. सं. उ. १, पान ५

– तच्चेति स्तन्यमुदकपूर्णे पात्रे दुह्यमानमुदकेन सह यदेकतामविभक्तवृत्तित्वं गच्छति । बालामयप्रतिषेधे वक्ष्यमाणैः स्तन्यदोषैः रहितं तच्छुद्धमारोग्यादिजननं च दोढव्यम् ॥ टीका

[1]धात्रीने बालकास पिण्यास घेण्यापूर्वी स्वच्छ, निर्मळ स्नान करून, शुभ्र, स्वच्छ अशी वस्त्रे परिधान करावीत. काही मंगल औषधी अंगावर धारण कराव्या. प्रसन्न मनाने पूर्वेकडे तोंड करून बसून बालकाला प्रथम उजवे स्तन पाजावे. पाजावयास देण्यापूर्वी स्तन हाताने पिळून त्यातील दूध थोडेसे काढून टाकावे व मग मूल पाजावे.

[2]स्तन्य पाजण्यापूर्वी थोडेसे पिळून दूध काढून टाकावयास सांगितले आहे. ते जर केले नाही तर दुधाने पूर्ण भरलेल्या स्तनातून एकदम पुष्कळ दूध स्रवू लागते व त्यामुळे मुलास ठसका लागून कास, श्वास, छर्दी अशी लक्षणे उत्पन्न होण्याचा संभव असतो. या लक्षणांच्या अधिक प्रमाणाने मूल ज्वरपीडितही होते.

मुलाला प्यावयासाठी एका वेळी अधिक दाया असणे इष्ट नाही. प्रकृतिवैचित्र्यामुळे एका दाईचे दूध तंतोतंत दुसऱ्या दाईसारखे असत नाही आणि या स्तन्यव्यत्यासाने बालकाला दूध असाम्य होऊन अनेक प्रकारचे व्याधी उत्पन्न होण्याची भीती असते.

वाग्भटाने दोन दायांची नेमणूक करावयास सुचविले असले तरी एका वेळी दोन दायांचा उपयोग करावा असा त्याचा उद्देश नसावा. नेमलेली दाई आपले काम करण्यास कोणत्याही कारणाने असमर्थ झाली तर ऐन वेळी बालकाची उपासमार होऊ नये म्हणून लगेच कामावर येऊ शकेल अशी दाई पाहून ठेवलेली असावी, एवढेच सांगण्याचा वाग्भटाचा उद्देश दिसतो.

## स्तन्य-संपत्

[3]दूध (स्तन्य) हे योग्य ते वर्ण, गंध, रस, स्पर्श असलेले असावे. त्याचा रंग शंखाप्रमाणे शुभ्र असावा. ते पातळ असावे. पाण्यामध्ये टाकताच ते पाण्याशी मिसळून

१ अथ धात्री स्नातानुलिप्ता नित्यमहतवासाः सुमनाः प्रजास्थापनौषधीः शिरसा बिभ्राणा प्राङ्मुखी स्तनं प्राग्दक्षिणं धौतमीषत्परिस्रुतं पाययेत् ॥ अ. सं. उ. १, पान ५

– अथेत्यादिना धात्र्याः प्रथम स्तनपानविधानम् । सुमनाः सुचित्ता प्रजास्थापनीयान्यौषधानि ऐन्द्रीदूर्वादिनि महाकषायसङ्ग्रहोक्तानि । ईषत्परिस्रुतं स्तोककृष्टस्तन्यं स्तनं बालं धात्री पाययेत् ॥ टीका

२ नानास्तन्यस्य हृयसात्म्यत्वान्नानाविधा व्यापदो भवन्ति । अपरिस्रुते चातिस्तन्यपूर्णस्तनपानेनोत्स्नेहनात् कासश्वासज्वरच्छर्दिषां सम्भवः ॥ अ. सं. उ. १, पान ६

– नानेत्यादिनानेकस्तन्यपानप्रतिषेध प्रयोजनम् । अतिस्तन्यपूर्णस्तनपानेन बालस्योत्स्नेहनात् कासादिसंभवः उत्स्नेहनं तत्स्नेहस्यान्तर्गमनम् ॥ —टीका

३ स्तन्यसंपत्तु प्रकृतिवर्णगन्धरसस्पर्शम्, उदकपात्रे च दुह्यमानमुदकं व्येति प्रकृतिभूतत्वात् तत् पुष्टिकरमारोग्यकरं चेति ( स्तन्यसंपत् ) ॥ च. शा. ८–५४

– अथास्याःस्तन्यमप्सु परीक्षेत;तच्चेच्छीतलममलं तनु शङ्खाभासमप्सु न्यस्तमेकीभावं



एकरूप व्हावे. पाण्यात टाकताच त्या दुधामध्ये फेस वा धागे दिसू नयेत. तसेच ते पाण्यावर तरंगूही नये व बुडूही नये. स्तन्याची चव मधुर असावी. कोणताही गंध त्याच्या ठिकाणी असू नये.

### स्तनपानाचा काळ :

[1]बालकाला पहिल्याप्रथम दिलेले दूध, औषध पचल्यानंतरच पुन्हा प्यावयास घ्यावे. अजीर्ण स्थितीत मुलास कधीही पाजू नये. कारण त्यामुळे दोष, औषध, मल, अन्न, यांच्या वेगांची उत्पत्ती तीव्रतेने होण्याची भीती असते. तसेच जिचे स्तन्य पाजावयाचे ती स्त्री भुकेली, दमलेली, शोकाकुल, गर्भिणी, अजीर्ण झालेली वा विरुद्ध आहार घेतलेली नसावी.

स्तनपानापूर्वी धात्रीने पेलाभर दूध प्राशन करावे. 'वृद्धिः समानैः सर्वेषाम्' या नियमाप्रमाणे अंगावरील दूध वाढण्यास या दुग्धपानाची मदत होते, तसेच स्तनपानाच्या वेळी अपत्याच्या दर्शनस्पर्शनाने तद्विषयक वात्सल्याची भावना उत्कट होते आणि तिचाही दुग्धस्रावासाठी विशेष उपयोग होतो. यासाठी मूल अंगावर पीत असताना त्या स्त्रीने इतर कार्यामध्ये आपले चित्त गुंतवू नये वा दुसरे व्यवधानही ठेवू नये.

[2]आईचे वा दाईचे दूध मिळण्यासारखे नसेल किंवा ते दोषदुष्ट असल्यामुळे बालकास पाजणे इष्ट नसेल किंवा अंगावरचे दूध पुरे पडत नसल्यामुळे मूल अंग धरत नसेल, शांत झोपत नसेल, व सारखे रडत असेल तर त्याचे अपतर्पण होत आहे असे समजून बालकाला ते क्षीरसात्म्य असल्यामुळे दुसरे कोणते तरी दूधच देणे इतर कोणत्याही आहारापेक्षा अधिक चांगले असते. त्या दृष्टीने शेळी वा गाय यांचे दूध अनुक्रमाने मातेच्या वा दाईच्या दुधानंतर येते. तेही डोर्ली, रिंगणी, सुंठ, पिंपळी, दालचिनी, मिरे अशा औषधांनी सिद्ध करून बालकांना पुरेसे होईल अशा योग्य मात्रेत वापरावे.

गच्छत्यफेनिलमतन्तुमन्नोत्प्लवतेऽवसीदति वा तच्छुद्धमिति विद्यात् तेन कुमारस्यारोग्यं शरीरोपचयो बलवृद्धिश्च भवति ॥ सु. शा. १०–३१

१ न च क्षुधितशोकार्तश्रान्तप्रदुष्टधातुगर्भिणीज्वरितातिक्षीणातिस्थूलविदग्धभक्तविरुद्धाहारतर्पितायाः स्तन्यं पाययेत; नाजीर्णौषधं च बालं, दोषौषधमलानां तीव्रवेगोत्पत्तिभयात् ॥ सु. शा. १०–३१

– स्तन्याभावे पयश्छागं गव्यं वा तद्गुणं पिबेत् ।
मूलैः सिद्धं बृहत्याद्यैःस्थिराभ्यां वा सितायुतम् अ. सं. उ. १, पान ९

२ स्तन्याभावे स्त्रीस्तन्याभावे तद्गुणमिती पूर्वोक्तस्य स्त्रीस्तन्यस्य सर्वैराकारादिभिर्गुणैःसदृशम् । तच्च गव्यं छागं वा बृहत्याद्यैर्मूलैर्लघुना पञ्चमूलेन सिद्धम् । स्थिराभ्यां वा सिद्धमुभयमपि सितायुतम् ॥ टीका

बालकाचे क्षीरसात्म्य लक्षात घेता व देशजातीकुळाप्रमाणे निरनिराळ्या प्रकारच्या दुधाचा उपयोग बालकांसाठी केला जातो; ते लक्षात घेता दूध या द्रव्याविषयी आयुर्वेदीय विचार काय आहे तोच समजून घेणे आवश्यक आहे.

## दुधाचे गुण :

[1]दूध हे निरनिराळ्या वनस्पती खाणाऱ्या प्राण्यांचे वापरले जात असल्याने ते स्वभावतःच जणू सर्व औषधींचे सारभूत असे असते. देवांना जसे अमृत त्याप्रमाणे जरायुज प्राण्यांना दूध हे जीवन आहे.

[2]जो जो आहार दूध देणारा प्राणी सेवन करतो त्या त्या आहाररसाचेच पुढे दूध बनत असते. आहाररस हा अन्न व जल यांवर जाठराग्नीचे पचनसंस्कार होऊन पच्यमानावस्था संपल्यानंतर स्तन्यवह सिरामध्ये पित्तासह येतो व त्या ठिकाणी त्याला क्षीरत्व प्राप्त होते.

आहाररस व पाचकपित्ताचे संस्कार यामुळे दूध हे अग्निसोमात्मक बनते आणि म्हणूनच ते पचावयास सोपे असून जीवन बृंहण करणारे आहे. सर्व प्राणिमात्रांचे ओज वाढविणारे ते जणू अमृतच असते.

– क्षीरसात्म्यतया क्षीरमाजं गव्यमथापि वा ।
दद्यादास्तन्यपर्याप्तेर्बालानां वीक्ष्य मात्रया ॥ सु. शा. १०–४८

– स्त्रीस्तन्याभावे च क्षीरान्तरं निर्दिशन्नाह-क्षीरसात्म्यतयेत्यादि । आस्तन्यपर्याप्तेरिति यावत् स्तन्यस्य पुनः पर्याप्तिः परि समन्ततो भावेन प्राप्तिर्भवति, अथवा यावत् स्तन्यपानस्य योग्यता तावदित्यर्थः ॥ टीका

– नाप्यायते यः स्तनपश्च बालो ।
जागर्ति नित्यं भृशरोदनश्च ॥ सू. ८५

– एते शृतं क्षीरमथाभ्यसेयुः । का. सं. कल्पस्थान, पान २१०, सू. ८६

१ यथा सर्वौषधिसारं क्षीरोदे मथिते पुरा ॥
संभूतममृतं दिव्यममरा येन देवताः ।
तथा सर्वौषधिसारं गवादीनां तु कुक्षिषु ॥
क्षीरमुत्पद्यते तस्मात् कारणादमृतोपमम् ।
जरायुजानां भूतानां विशेषेण तु जीवनम् ॥ का. सं. खिलस्थान, पान ३५५

२ यद्यदाहारजातन्तु रसं क्षीरशिरानुगम् ॥
रसो जलं च भुक्तं च तथा पित्तेन संयुतम् ।
पाचितं जाठरे वह्नौ पित्तेन सह मूर्च्छितम् ॥
पच्यमानं शिराप्राप्तं क्षीरतोयेन पुत्रक ।
तत् क्षीरमिति ख्यातमग्निसोमात्मकं पयः ॥
अमृतं सर्वभूतानां जीवनं बलकृन्मतम् ।
हा. सं. प्र. स्था. अ. ८ सू. २, ३, ४, पृष्ठ ५७



[1]दूध हे प्रकृत्या मधुर, शीत, मृदू, स्निग्ध, पुष्टिकर, श्लक्ष्ण, पिच्छिल, गुरू, मंद व प्रसन्न अशा गुणांनी युक्त असते. हे गुण गाईच्या दुधामध्ये विशेष उत्कटतेने असतात. ओजाचेही गुण हेच असल्यामुळे दूध हे ओजोवर्धक होते म्हणून जीवनीय व रसायनद्रव्यामध्ये दूध हे श्रेष्ठ ठरते.

[2]दूध हे जन्मतःच सात्म्य असल्यामुळे कोणत्याही व्यक्तीला बहुधा निषिद्ध असत नाही. आमदोष व कफदोष वगळले तर वातपित्तामुळे उत्पन्न होणारे विकार, रक्तदुष्टीमुळे उत्पन्न होणारे व्याधी, मानसरोग, या सर्व विकृतींमध्ये दूध हितकर आहे. विशेषतः जीर्णज्वर, कास, श्वास, मुखकण्ठतालूचा शोष, राजयक्ष्मा, वातपित्तजगुल्म, उन्माद, उदर, मूर्च्छा, भ्रम, दाह, तृष्णा, हृद्रोग, मूत्ररोग, पांडू, ग्रहणीची जीर्णावस्था, रक्तपित्तप्रधान अर्श, शूल, उदावर्त, वातपित्तज अतिसाराची पक्वावस्था (वातप्रधान), प्रवाहिका, योनिरोग, गर्भस्राव, रक्तपित्त, श्रम, क्लम, या अवस्थेत दूध द्यावे. मात्र व्याधी साम असताना कफाचे प्राधान्य असताना वा विशेषस्वरूपाचे अग्निमांद्य असेल तर दूध देऊ नये. दुग्धप्राशन हे मंगल आहे. मांसाचा उपचय करणारे आहे. शुक्र वाढविणारे आहे. कामोत्तेजक आहे. ते सप्तधातूचे पोषण करते, बुद्धी वाढविते, तारुण्य टिकविते, आयुष्य वाढविते, जीवनाचे रक्षण करते, वजन वाढविते, व्रण भरून आणते, मोडलेले हात जोडते, वमन, विरेचन, अस्थापना इ. पंचकर्मोपचारासाठी उपयोगात आणता येते.

बाल, वृद्ध, क्षत, क्षीण, भुकेने व अतिव्यायामाने कृश झालेले, मैथुनाने क्षीण झालेले अशा लोकांना पथ्यकर असते.

१ स्वादु शीतं मृदु स्निग्धं बहलं श्लक्ष्णपिच्छिलम् ।
गुरु मन्दं प्रसन्नं च गव्यं दशगुणं पयः ।
तदेवंगुणमेवौजः सामान्यादभिवर्धयेत् ।
प्रवरं जीवनीयानां क्षीरमुक्तं रसायनम् ॥ च. सू. २७–२१७, २१८

२ तत्र सर्वमेव क्षीरं प्राणिनामप्रतिषिद्धं जातिसात्म्यात् वातपित्तशोणितमानसेष्वपि विकारेष्वविरुद्धं, जीर्णज्वरकासश्वासशोषक्षयगुल्मोन्मादोदरमूर्च्छाभ्रममदाहपिपासाहृद्बस्तिदोषपाण्डुरोगग्रहणीदोषार्शःशूलोदावर्तातिसारप्रवाहिकायोनिरोगगर्भस्रावरक्तपित्तश्रमक्लमहरं, पाप्मापहं बल्यं वृष्यं वाजीकरणं रसायनं मेध्यं वयःस्थापनमायुष्यं जीवनं बृंहणं संधानं वमनविरेचनास्थापनं तुल्यगुणत्वाच्चौजसो वर्धनं बालवृद्धक्षतक्षीणानां क्षुद्व्यवायामकर्शितानां च पथ्यतमम् ॥ सु. सू. ४५–४९

– तत्वनेकौषाधिरसप्रसादं प्राणदं गुरु ॥
मधुरं पिच्छिलं शीतं स्निग्धं श्लक्ष्णं सरं मृदु ॥
सर्वप्राणभृतां तस्मात् सात्म्यं क्षीरमिहोच्यते ॥ सु. सू. ४५–४८

[1]दूध हे बालाची वाढ त्वरित करते व इंद्रियांना बळकटपणा आणते. दुधाच्या सेवनाने गर्भ वाढीस लागतो आणि गर्भाची स्रावपात होण्याची भीती राहात नाही. दुधाच्या सेवनाने मुले न होणाऱ्या स्त्रीपुरुषांसही संतती होते. वार्धक्यातही गर्भाधानक्षमता टिकून राहते. क्षीरसेवनाने शरीराचा वर्ण उजळ व तेजस्वी होतो. केसांची चांगली वाढ होते. केसांना पांढरेपणा लवकर येत नाही. केस गळण्याचे थांबतात. नेहमी दूध पिणाऱ्या व्यक्तीस सहसा रोग होत नाही.

[2]दूध हे शीतगुणाचे असल्यामुळे आणि त्यामध्ये निरनिराळ्या वनस्पतींच्या परिणामाने किंचित कषायरसता येत असल्याने वातप्रकृतीच्या व्यक्तीमध्ये दुधामुळे आरंभी थोडासा शूल, आध्मान व मलावष्टंभ उत्पन्न होण्याची शक्यता असते.

दूध हे गुरू असल्यामुळे आमावस्थेत स्रोतोरोध करून शूल उत्पन्न करते.

पित्तप्रकृतीच्या व्यक्तींत दुधामुळे विरेचन होते.

कफप्रकृतीच्या व्यक्तींमध्ये दूध हें स्निग्ध, शीत, मधुर, गुरू, पिच्छिल या कफसदृश गुणांनी कफवर्धक होते.

स्त्यानगुणाने स्रोतसांमध्ये गुंतून राहिलेले दोष दुधाच्या पिच्छिलतेमुळे शिथिल होतात व त्यामुळे स्रोतसांचे शोधन होण्यास साहाय्य होते.

दूध हे प्रथम किंचित शूल उत्पन्न करीत असले तरी दुधाच्या स्निग्ध, मधुर गुणांनी व मधुर विपाकांनी परिणामतः ते शूलहरच होते.

दुग्धसेवन हे एकूण विचार करता पुष्टि-तुष्टीकर, असूनही दोषोत्पादक नाही.

---

१ क्षीरं हि सद्योबलमादधाति । दृढीकरोत्याशु तथेंद्रियाणि । पुष्टिर्दृढत्वं लभते च गर्भो । वंध्या च षंढश्च जरश्च सूते ॥ क्षीरं वर्ण्यं क्षीरमाहुश्च केश्यम् । क्षीरं पिबंतं न च रोगमेति । का. सं. पान २१०

२ शैत्यात् पयो वर्धतेऽनिलं प्राक् पित्तात्मनस्तेन भिन्नत्ति वर्चः ।
ईषच्च शूलं कुरुते गुरुत्वात् स्नेहद्विपाके शमयत्युभे द्वे ॥
माधुर्यतो वर्धयते शरीरं प्रसादयत्याशु तथेन्द्रियाणि । स्थैर्यं पयः सान्द्रतया करोति पैच्छिल्यतः शोधयतेऽन्तराणि ॥ विष्टभ्यते चापि कषायभावात् वातात्मनस्तेन करोति शूलम् । स्नेहाच्च माधुर्यगुणाच्च शूलं । पयो नियच्छत्यनुजीर्यमाणम् ॥ स्नेहाद् गुरुत्वात् सकषायशैत्यात् । विस्रस्य सद्यो बलमादधाति । स स्नेहशैत्यान्मधुरान्वयत्वात् । कफात्मनां वर्धयते कफं च ॥ का. सं. पृ. २१०–११



**गाईचे दूध :**

[1]गाईचे दूध स्निग्ध, गुरू, मधुर, शीत असून ते अभिष्यंदी नाही वा फारच अल्प प्रमाणात अभिष्यंद करते. रक्तपित्तहर आहे. रसायन जीवनीय व वातापित्तघ्न आहे.

[2]भावप्रकाशकाराने गाईच्या रंगाप्रमाणे दुधातील गुणधर्मांत उत्पन्न होणाऱ्या भेदांचे वर्णन केले आहे. तो म्हणतो काळ्या रंगाच्या गाईचे दूध हे वातघ्न असून अधिक गुणकारी आहे. पिवळ्या रंगाच्या गाईचे दूध पित्तहर व वातहर आहे. पांढऱ्या रंगाच्या गाईचे दूध गुरू व कफकर आहे व तांबड्या रंगाच्या वा चित्रविचित्र रंगाचे दूध वातघ्न आहे.

**स्त्रीचे दूध :**

[3]स्त्रीचे दूध हे मधुर व कषायानुरस असून शीतवीर्य आहे. लघु व दीपन असल्याने पथ्यकर आहे. सात्म्यामुळे जीवनीय आहे. नस्य व आश्चयोतन यासाठी या दुधाचा विशेष उपयोग होतो. स्त्रीच्या दुधाची मधुरता सर्वांत अधिक असून ते सर्वांत लघुही आहे. म्हणून बालकाच्या बाबतीत ते सर्वांत अधिक प्रिय व जीवनीय आहे. या मधुर गुणामुळेच मूल पुढे अंगावरून तोडणे कठीण होते.

**शेळीचे दूध :**

[4]शेळीचे दूध गुणाला जवळ जवळ गाईसारखेच आहे. ते दीपन, लघू व ग्राही गुणाचे असून श्वास, कास, रक्तपित्त या व्याधींमध्ये देण्यासारखे आहे. क्षय रोगामध्ये विशेष हितकर आहे.

---

१ अल्पाभिष्यन्दि गोक्षीरं स्निग्धं गुरु रसायनम् ।
रक्तपित्तहरं शीतं मधुरं रसपाकयोः ॥
जीवनीयं तथा वातपित्तघ्नं परमं स्मृतम् ॥ सु. सू. ४५–५०
२ कृष्णाया गोर्भवेद्दुग्धं वातहारि गुणाधिकम् ।
पीताया हरते पित्तं तथा वातहरं भवेत् ॥
श्लेष्मलं गुरु शुक्लाया रक्तचित्रा च वातहृत् ॥ भावप्रकाश, पान २३२
३ नार्यास्तु मधुरं स्तन्यं कषायानुरसं हिमम् ॥
नस्याश्च्योतनयोः पथ्यं जीवनं लघु दीपनम् ॥ सु. सू. ४५–४७
४ गव्यतुल्यगुणं त्वाजं विशेषाच्छोषिणां हितम् ॥
दीपनं लघु संग्राहि श्वासकासास्रपित्तनुत् ॥
अजानामल्पकायत्वात् कटुतिक्तनिषेवणात् ॥
नात्यम्बुपानाद्व्यायामात् सर्वव्याधिहरं पयः ॥ सु. सू. ४५–५१

शेळी ही लहान, खुज्या शरीराची, अतिशय चपळ असल्यामुळे भरपूर व्यायाम करणारी, फार पाणी न पिणारी, तुरट, तिखट, कडू वनस्पतींची आवड असलेली अशी असल्याने तिचे दूध बहुतेक सर्वच व्याधींमध्ये हितकर ठरते. कारण व्याधी बहुधा अग्निमांद्य व आम यामुळे उत्पन्न होतो व हे दूध शेळीच्या स्वभावामुळे दीपन, लघु गुणांचे असते.

## उंटिणीचे दूध :

[1]उंटिणीचे दूध रूक्ष, उष्ण, लवण रसात्मक, मधुर, लघु असे असून ते शोथ, गुल्म, उदर, अर्श, कृमी, कुष्ठ या व्याधींचा नाश करते, तसेच ते विषघ्नही आहे.

## मेंढीचे दूध :

[2]मेंढीचे दूध हे मधुर, स्निग्ध, गुरू असून पित्तकफांचा प्रकोप करणारे आहे. वीर्याने ते उष्ण आहे. केवळ वातव्याधी व वातज कासामध्ये त्याचा उपयोग करावा. वात आवृत असताना वा इतर दोषांच्या अनुबंधाने असताना मेंढीचे दूध वापरू नये.

मेंढीचे दूध हे शुक्रवर्धक व वृष्यही आहे. पण त्यासवेच ते अहृद्यही आहे. (नकोसे वाटणारे.)

## म्हशीचे दूध :

[3]म्हशीचे दूध हे अतिशय अभिष्यंदी असून अग्निमांद्य उत्पन्न करणारे आहे. रसाला ते मधुर असून शीतवीर्याचे आहे. झोप उत्पन्न करणारे आहे. स्निग्ध व गुरू आहे.

म्हशीच्या दुधाच्या गुणधर्मासंबंधी चरक व सुश्रुत यांच्यामध्ये विरोध दिसतो. चरकाने म्हशीच्या दुधाला गाईच्या दुधापेक्षा 'स्नेहात ऊनम्' असे म्हटले आहे, तर सुश्रुत 'स्निग्धतरम्' असे म्हणतो. खरनादाने चरकाचाच अनुवाद केला असून तो

१ रूक्षोष्णं लवणं किंचिद्दोष्ट्रं स्वादुरसं लघु ॥
शोफगुल्मोदरार्शोघ्नं कृमिकुष्ठविषापहम् ॥ सु. सू. ४५–५३

२ आविकं मधुरं स्निग्धं गुरू पित्तकफावहम् ॥
पथ्यं केवलवातेषु कासे चानिलसंभवे ॥ सु. सू. ४५–५४

– आविकं लवणं स्वादु स्निग्धोष्णं चाश्मरीप्रणुत् ॥
अहृद्यं तर्पणं वृष्यं शुक्रपित्तकफप्रदम् ॥
गुरू कासाऽनिलोद्भूते केवले चानिले वरम् ॥ भा. प्र. पान २३५, पू. खंड

३ महाभिष्यंदि मधुरं माहिषं वह्निनाशनम् ।
निद्राकरं शीततरं गव्यात् स्निग्धतरं गुरु ॥ सु. सू. ४५–५५



गाईच्या दुधाला क्षीरोत्तम असे विशेषण देतो. यावर टीकाकाराने केलेला समन्वय चिन्त्य आहे. टीकाकार म्हणतो, चरकाचे वर्णन गाईच्या स्नेहाचा शरीरावर होणारा परिणाम लक्षात घेऊन केलेले आहे. तर सुश्रुताचे वर्णन हे सारख्याच मापाच्या गाईच्या व म्हशीच्या दुधातून निघणाऱ्या तुपाचे प्रमाण लक्षात घेता केलेले आहे. म्हशीच्या दुधातून जरी प्रमाणतः गाईच्या दुधापेक्षा तूप अधिक निघत असले तरी स्नेहाचे ओजोवर्धनादी गुण म्हशीच्या दुधापेक्षा गाईच्या दुधात अधिक आहेत.

## घोडीचे व गाढवीचे दूध :

[1]एका खुराचे जे प्राणी आहेत (गाढव, घोडा) त्यांच्या मादीचे दूध हे बल-वर्धक, घुल, रूक्ष, मधुराम्ल, लवण रसाचे असून त्याच्या सेवनाने शाखामार्गातील (बाह्यमार्गातील) वातव्याधी नष्ट होतात.

किंवा वाताहत शाखांमध्ये (हातपाय) उपयोगी पडते.

– हितमत्यग्न्यनिद्रेभ्यो गरीयो माहिषं हिमम् ॥ वा. सू. ५–२३

– माहिषगुणानह–हितमिति । अत्यग्नयः–तीक्ष्णाग्नय; । अनिद्राः–नष्टनिद्राः । गरीयः– गव्याद्गुरु । सामान्यवचनात्सिद्धेऽपि हिमत्वे हिमग्रहणमतिशयार्थम् । नन्वेवं चेद्गुरुतिशब्दादीयसुन् न कर्तव्यः, गुरुशब्दादेवातिशयसिद्धेः । मैवम् । शीतत्वादपि गुरुत्वातिशयार्थमीयसुन् कृतः अत्र चरकसुश्रुतयोर्विरोधः । तत्र चरकः (सू. अ. २७–२१५)–"महिषणा गुरुतरं गव्याच्छीततरं पयः स्नेहान्नूतमनिद्राणामत्यग्नीनां हितं च तत् ॥," इति । सुश्रुतः (सू. अ. ४५–५५)–" महाभिष्यन्दि मधुरं माहिषं वह्निनाशनम् । निद्राकरं शीततरं गव्यात्स्निग्धतरं गुरु ॥ " इति तत्र चरकोक्तं गव्यान्माहिषस्य स्नेहोन्नत्वं हृद्यादिगुणविषयम् माहिषक्षीरजात्स्नेहात् गव्यक्षीरजः स्नेहो हृद्यादिभिर्गुणैरधिकत्वं मात्राविषयम् यावतो गव्यात् क्षीराद्यावान् स्नेहस्तावतो माहिषत्ततोऽधिक इत्यर्थः अत एव खारणादिनोत्तमशब्दः प्रयुक्तः– "गव्यं स्नेहोत्तमं क्षीरं गव्याच्च पयसः पयः । यथोत्तरं स्नेहहीनमौरभ्रच्छागमाहिषम् ॥" इति । उदभ्रादीना यथोत्तरस्नेहहीनत्वमुद्देशवाक्यक्रमापेक्षया "क्षीरकरागौर्महिषी अजावी करभी गजी । हयी स्त्री चाष्टमी तेषां पृथक्कर्मगुणान् शृण ॥ इति । गव्यं स्नेहोत्तमम् ततो जघन्यं माहिषम् तत आजम्; तत आविकमिति जघन्यत्वमानं चोक्तं तेनैव— "गुरु शीततरं गव्यात्स्वप्नलं माहिषं पयः । चतुर्थभागस्नेहोनं पित्तघ्नं च विशेषतः ॥ " इति । निदर्शनं चेदम् । तेन माहिषात् छागं चतुर्थभागस्नेहोनम्, छागादौरभ्रमिति । आ. र. हेमाद्री टीका

१ उष्णमैकशफं बल्यं शाखावातहरं पयः ॥
मधुराम्लरसं रूक्षं लवणानुरसं लघु । सु. सू. ४५–५६

## हत्तिणीचे दूध :

[1]हत्तिणीचे दूध मधुर व कषायानुरसयुक्त असून, शीतवीर्य, गुरू व स्निग्ध आहे. ते स्थिरता उत्पन्न करते म्हणजे शरीराला दृढता आणून तारुण्य टिकविते, बल वाढविते. डोळ्यांना हितकर होते.

[2]सर्वसामान्यपणे सकाळी काढलेले दूध हे गुरू, शीतवीर्य व विष्टंभ उत्पन्न करणारे आहे. कारण जनावरे रात्री गोठ्यात बांधलेली असतात. त्यांना व्यायाम असत नाही. खाणे चालूच असते. रात्रीच्या शीतगुणाचाही परिणाम होतो. त्यामुळे दूध गुरू बनते.

[3]गुरे ठाणबंध असणे व त्यांना चूण, फोल, आंबोण, पेंड असे पदार्थ खावयास घालणे यामुळे गुरांचे दूध सकस, अधिक लोणी निघणारे, प्रमाणास पुष्कळ असे होत असले तरी ते अत्यंत गुरू व अभिष्यंदी असते.

तसेच जी जनावरे अंगाने थोराड असतात त्यांचेही दूध गुरूच असते. दुधाच्या हितकरतेच्या दृष्टीने जनावरे लहानखुरी, चपळ, रानावनांत हिंडून चरणारी व सरकी, पेंड न खाता केवळ गवत, कडबा यावर पोसली गेलेली असावीत. ती रात्रंदिवस ठाणबंध असू नयेत. अशा जनावरांच्या बाबतीतच, त्यातही अशा गाईचे दूध ग्रंथोक्त वर्णन केल्याप्रमाणे अमृतासारखे हितकर ठरते, हे सत्य आहे.

निरसे दूध ( न तापविलेले ) हे गुरू व अभिष्यंदी आहे. एकदा उकळी आणलेले दूध हे लघु व अनभिष्यंदी आहे. यासाठी स्त्रीदुग्धाव्यतिरिक्त सर्व प्रकारचे दूध एकदा उकळी आणून मगच वापरावे.

( स्त्रीदुग्ध अंगावरूनच प्यायले जात असल्यामुळे ते तापविण्याचा प्रसंगच कधी येत नाही. )

१ हस्तिन्या मधुरं वृष्यं कषायानुरसं गुरु ॥
स्निग्धं स्थैर्यकरं शीतं चक्षुष्यं बलवर्धनम् । सु. सू. ४६-५८

२ प्रायः प्राभातिकं क्षीरं गुरु विष्टम्भिशीतलम् ॥
राञ्याः सोमगुणत्वाच्च व्यायामाभावतस्तथा ॥
दिवाकराभितप्तनां व्यायामानिलसेवनात् ॥
श्रमघ्नं वातनुच्चैव चक्षुष्यं चापराह्णिकम् ।
पयोऽभिष्यन्दि गुर्वामं प्रायशः परिकीर्तितम् ॥
तदेवोक्तं लघुतरमनभिष्यंदि वै शृतम् ।
वर्जयित्वा स्त्रियाः स्तन्यमाममेय हि तद्धितम् ॥
धारोष्णं गुणवत् क्षीरं विपरीतमतोऽन्यथा ।
तदेवातिशृतं शीतं गुरू बृंहणमुच्यते ॥ सु. सू. ४५-५९ ते ६३

३ पिण्याकाम्लाशिनीनां तु गुरू अभिष्यंदि तत् भृशम् ।
अ. सं. सु. स्था. अ. ६, पृ. ३६



धारोष्ण दूध मात्र (निरोगी स्थितीत) सर्व दृष्टींनी हितकर आहे, दूध जो जो अधिक अधिक तापवून आटवावे तो तो ते गुरुतर होत जाते. देह पुष्ट करण्याच्या दृष्टीने हे अधिक उपयोगी पडते.

[1]दूध हे फार काळजीपूर्वक संरक्षावे लागते. थोडयाशा दुर्लक्षामुळे वा चुकीमुळे दूध बिघडते. अशा बिघडलेल्या दुधाची चव बदलते. त्याला विचित्र वास येतो. ते आंबट लागते. ते फुटते. त्याचा रंग बदलतो. असे दूध नासले आहे असे समजून पूर्णपणे वर्ज्य मानले पाहिजे.

दुधात थोडेसे मीठ पडले तरी ते वर्ज्य समजले पाहिजे. अशा दुधाचा उपयोग करणे हे सर्वांनाच विशेषतः लहान बालकांना अपायकारक आहे.

दुधाच्या या गुणधर्मांचा विचार करता बालकाला पहिल्या सहा महिन्यांत तरी दुग्धाहारासारखे दुसरे अन्न नाही, हे लक्षात येईल.

बालकाची प्रकृती व कुलसात्म्य लक्षात घेऊन शेळीचे व गाईचे दूधच मातेचे (स्त्रीचे) दूध उपलब्ध नसल्यास पाजावे. इतर प्राण्यांच्या दुधामध्ये काही विशिष्ट गुणधर्म असले तरी सर्वसामान्य आहार म्हणून त्या दुधाचा उपयोग करणे आपल्या इकडे सात्म्य ठरत नाही. लहान मुलाला दूध पाजताना पहिल्या १०-१५ दिवसांत निम्मे दूध व निम्मे पाणी असे एकत्र करून त्यात वावडिंग, सुंठ, खडीसाखर, दालचिनी यांतील इष्ट ती द्रव्ये दहा तोळे दुधात सर्व मिळून १ ते २ मासे घालून पाच मिनिटे ते मिश्रण चांगले उकळून द्यावे.

खाली उतरून पांढऱ्या स्वच्छ चौघडी फडक्यातून गाळून घ्यावे व बालकास प्रत्येक २½ ते ३ तासांनी ४ ते ६ तोळे अशा प्रमाणात पाजावे.

रात्री सहसा दूध पाजू नये. निदान रात्री दूध देण्याच्या वेळामध्ये ५ ते ६ तासांचे अंतर ठेवावे.

मूल जसजसे वाढत जाईल तसतसे प्रत्येक महिन्यास एका वेळी मात्रा २ ते ३ तोळ्यांनी वाढवीत जावी.

तिसऱ्या महिन्यापासून दुधामध्ये एक भाग पाणी व दोन भाग दूध असे मिश्रण करून ते पूर्वीप्रमाणेच उकळून पाजावे.

[2]सहा महिन्यांनंतर दूध व अर्धे पाणी एकत्र करून पाणी आटवून, दूध शिल्लक ठेवावे व ते दूध बालकास पाजावे.

१ अनिष्टगन्धमम्लं च विवर्णं विरसं च यत् ॥
वर्ज्यं सलवणं क्षीरं यच्च विग्रथितं भवेत् ॥ सु. सू. ४५-६४

२ अर्धोदकं क्षीरं शिष्टं आमाल्लघुतरं पयः । भा. प्र. २३५

बालकाच्या अग्निप्रमाणे वर सांगितलेल्या दुधाच्या मात्रेमध्ये थोडा उणे-अधिकपणा करावा लागतो. ही अग्निपरीक्षा बालकाच्या मलाच्या स्वरूपावरून निश्चित करता येते. बालकाचा मल निराम, किंचित पीतवर्ण व सांद्र असा असतो. यामध्ये दुर्गंधी, फेसकटपणा, फुटीरपणा येऊ लागल्यास दूध पचत नाही असे समजावे व अशा वेळी दुधाचे प्रमाण कमी करावे व पाण्याचे प्रमाण वाढवावे वा दीपन-पाचन द्रव्याचे प्रमाण वाढवावे.

पहिल्या तीन महिन्यांपर्यंत बालकाला सूतिकागाराच्या बाहेर आणू नये.

[1]चवथ्या महिन्यात सूतिकेला, बालकाला स्नान घालून, अलंकृत करून देवदर्शनास नेऊन आणावे.

[2]पाचव्या महिन्यात दोन हात जमीन सारवून त्यावर देवताव्हानपूर्वक बालकास बसवावे व बसते करताना त्याला आधार द्यावा. अष्टांग संग्रहकाराने अशा बसते केलेल्या मुलाच्या रक्षणासाठी मंत्र म्हणून हवन करण्यास सांगितले आहे.

[3]बालक असे बसू--रांगू लागले म्हणजे त्याची कंबर मांड्या यांचे रोज दोन्ही वेळा भरपूर तेल घेऊन चांगले मर्दन करावे म्हणजे त्याच्या श्रमाचा परिहार होऊन अवयव बळकट होण्यास मदत होते.

१ चतुर्थे सूतिकागारादग्निस्कन्दपुरोगमान् ।
मासे निष्कामयेद्देवान् नमस्कर्तुं स्वलङ्कृतम् । अ. सं. उ. १ पान ९

— तं च बालं जन्मनश्चतुर्थे मासे सूतिकागारात् स्वलंकृतं निष्कामयेदग्निस्कन्दपुरोगमान् देवान् नमस्कर्तुम् । टीका

२ पंचमे मासे पुण्येऽह्नि धरण्यामुपवेशयेत् ।
द्विकिष्कुमात्रं लिप्तायां बलिं दत्वा चतुर्दिशम् । अ. सं. उ. १, पान ९

— ततः पंचमे मासे पुण्येऽहनि बालं धरण्यामुपवेशयेत । किष्कुद्वयमात्रलिप्तायां धरणीत्यादिना स्वाहान्तेन मन्त्रेण करणभूतेन [illegible] बालं [illegible]पवेशयेत् । किष्कुहस्तो न वितस्तिः ।। टीका

३ धरण्यशेषभूतानां माता त्वमसि कामधुक् ।
अजरा चाप्रमेया च सर्वभूतनमस्कृता ।।
चराचराणां लोकानां प्रतिष्ठास्यथ्यासि च ।
कुमारं पाहि मातेव ब्रह्मा तदनुमन्यताम् ।।
स्वाहेति मन्त्रेणानेन प्रत्यहं च ततः परम् ।।
साश्रयं सावलम्बं च कलपादान् मर्दयेदसु । अ. सं. उ. १. प. ९



[1]सहाव्या महिन्यामध्ये मुलाला अन्नप्राशन करवावे. अगदी अल्प प्रमाणापासून आरंभ करून अगदी सावकाशपणे अन्नाचे प्रमाण वाढवत न्यावे. मुळीच घाई करू नये.. सावकाशीने अन्न सेवन करणाऱ्या बालकाला रोग होण्याची भीती राहत नाही. मूल जसजसे अन्न खाऊ लागेल तसतसे त्याचे स्तनपान कमी करावे.

[2]दात आले म्हणजे तर बाळकाचे स्तनपान सोडवावेच. लघू आणि बृंहण गुणाचे अन्नच त्यास क्रमाक्रमाने देऊ लागावे.

[3]एक वर्ष होईतो बालकास घराच्या बाहेर फारसे हिंडवू नये. तसेच भडक प्रकाश त्याच्या डोळ्यांवर येणार नाही अशी काळजी घ्यावी.

[4]बालकाचे त्याच्या आहारानुरूप तीन भेद कल्पिले आहेत.

क्षीरप, क्षीरान्नाद व अन्नाद असे तीन कालविभाग मुलांच्या अवस्थेचे कल्पिले आहेत.

मूल नुसते दूध पीत असते ती क्षीरपावस्था. ही सामान्यतः एक वर्षभर असते. मूल दूध आणि अन्न दोन्ही सेवन करत असते त्या वेळी क्षीरान्नादावस्था. ही दोन वर्षे म्हणजे बालकाच्या वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत असते. त्यानंतर बालकाला दुधाची अपरिहार्यपणे आवश्यकता उरत नाही. त्या वेळी त्याला अन्नादावस्था प्राप्त झाली असे म्हणता येते.

या अवस्था आहाराचे स्वरूप लक्षात येण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

क्षीरप ही अवस्था संपूर्णपणे अशी पहिल्या ६–७ महिन्यांतच असते. त्यानंतर त्याला थोडे थोडे अन्न घालावयास सांगितले आहे. त्याचा उल्लेख वर आला आहेच.

१ षष्ठेऽन्नप्राशनं मासि क्रमात्तच्च प्रयोजयेत् ।
चिरान्निषेवमाणोऽन्नं बालो नातुर्यमश्नुते ।
भजेद्यथा यथाचान्नं स्तन्यं त्याज्यं तथा तथा । अ. सं. उ. १, पान ९

— षष्ठे मास्यन्नप्राशनं कुर्यात् । तच्च क्रमेण स्तोकाभ्यासेन प्रयोजयेत् । क्रमादित्यत्रैव हेतुः चिरादित्यादी । स च बालो यथा यथा वृद्धयान्नं भजेत्तथा तथापचयेन स्तन्यं त्यजेत् ।। टीका

२ अथैनं जातदशनं क्रमशोऽपनयेत् स्तनात् ।
पूर्वोक्तं योजयेत् क्षीरमन्नं च लघुबृंहणम् ।। अ. सं. उ. १, पान ११

३ वर्षं स्त्रवसतेर्बाह्यं कुमारस्य न दर्शयेत् ।
दीपमातपमग्निं च रूपमन्यच्च भासुरम् ।। अ. सं. उ. १ पान ११

४ ते त्रिविधाः—क्षीरपाः, क्षीरान्नादा, अन्नादा इति । तेषु संवत्सरपराः क्षीरपाः द्विसंवत्सरपराः क्षीरान्नादाः, परतोऽन्नादा इति । सु. सू. ३५–२९

— वर्षावरः क्षीरपः स्याद्यावत् पिबति वा पयः ।
वयस्तब्दालमस्माच्च यावत् षोडशवार्षिकः ।। का. सं. पान २४१–७३

या सामान्य स्थितीत बालकाची क्षीरपावस्था एक वर्षापेक्षा अधिक असू नये. एक वर्षानंतर बालकास त्याच्या प्रकृतीच्या वाढीच्या दृष्टीने अन्नप्राशन आवश्यकच होते. म्हणून एक वर्षानंतर क्षीरान्नाद काळ येतो, असे निश्चयाने सांगितले आहे.

## बालग्रह

बालग्रह हे बालकांना होणाऱ्या अशा विशिष्ट वर्गातील रोगाचे वर्णन आहे की, ज्याचे कारण शारीरिक निजदृष्टचा वा प्रत्यक्ष होणाऱ्या आंगतू हेतूंनी सांगितलेले नाही वा सांगता येत नाही. व्याधीची लक्षणे अतिशय गंभीर, इंद्रियवैकल्यकर, प्राणवह, मनोवह स्रोतसांच्या दुष्टींनी युक्त अशी सांगितलेली आहेत. व्याधीचा परिणाम आशुकारी व दारुण आहे. पण कारणांच्या वर्णनामध्ये मात्र ग्रंथकाराने मुग्धता स्वीकारलेली आहे आणि शब्दप्रामाण्याचा आधार घेतला आहे.

रोगाच्या उत्पत्तीचे केलेले वर्णन पाहता मिथ्योपचारामुळे स्थानवैगुण्य उत्पन्न होते व त्या ठिकाणी दौर्बल्याचा लाभ घेऊन सूक्ष्म, अदर्शन अशी ही रोगबीजे बालकाच्या शरीरामध्ये प्रविष्ट होतात. या रोगकारणांनाच ग्रह अशी संज्ञा दिलेली आहे. हे ग्रह चर्मचक्षूंनी कधी दिसत नाहीत, दिसणार नाहीत. असे ग्रंथकारांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे.

[1]कारण अप्रत्यक्ष व अज्ञात असल्यामुळे या ग्रहबाधेसंबंधी काही पुराणकथा प्राचीन ग्रंथकारांनी सांगितल्या आहेत. त्यांचा सारांश असा—

शंकरपुत्र षडानन यांच्या संरक्षणासाठी शंकरांनी काही पुरुष व स्त्री–सेवकांची योजना केली होती. कुमार कार्तिक मोठा झाल्यानंतर सेवकांनी शंकरास विनविले की 'प्रभो, आता आम्हास उद्योग काय ? आम्ही काय करावे ?' तेव्हा शंकर म्हणाले, 'तुम्ही मनुष्यलोकी जाऊन अधार्मिक, अपवित्र, अस्वच्छ अशा लोकांना त्यांच्या दुर्वर्तनासाठी पीडा देण्याचे काम करा आणि त्यांच्याकडून दंड म्हणून पूजादी उपचार वसूल करा.' त्याप्रमाणे ते मनुष्यलोकी येऊन ज्या घरांमध्ये अमंगलता, अपवित्रता, अस्वच्छता असते, तेथील बालकांना पीडाकर होऊ लागले. यातील धार्मिक आचाराच्या व पापाच्या कल्पना पौराणिक व श्रद्धेचा विषय म्हणून लक्षात घ्यावयाच्या नाहीत, असे ठरविले तरी स्वच्छतेच्या व संयमांच्या नियमांचे महत्त्व आजही लक्षणीय आहे, यात शंका नाही.

– ऐश्वर्यस्थास्ते न शक्या विशन्तो देहं द्रष्टुं मानुषैर्विश्वरूपाः ।।
आप्तं वाक्यं तत्समीक्ष्यामिधास्ये लिङ्गान्येषां यानि देहे भवन्ति ।। सु.उ. २७–५
– आविशन्तश्च लक्ष्यन्ते केवलं शास्त्रचक्षुषा । अ. सं. उ. ३–३५
– शास्त्रचक्षुषैव लक्ष्यन्ते । न तु मांसगोलकेन । अ. सं. टीका



[1]रागावलेले, भ्यालेले, विमनस्क झालेले, ओसाड जागेत वावरणारे, इतरांनी वापरलेली फुले, माळा, वस्त्रे धारण करणारे, अस्वच्छ, फार रडणारे, ज्याची धात्री घाणेरडी आहे असे बालक या ग्रहांच्या पीडेस एकाएकी घाबरून झोपेत वा जागेपणीही बळी पडते.

संध्याकाळी वा पर्वसमयी ( अष्टमी, चतुर्दशी, पूर्णिमा, अमावास्या, संक्रान्ती ) या ग्रहांची विशेष पीडा होते, अशी समजूत आहे. हे ग्रह वैगुण्य पाहून प्रहार करतात.

**पूर्वरूप :**

[2]ग्रहबाधेचे पूर्वरूप म्हणून सतत रोदन आणि ज्वर ही लक्षणे सामान्यतः सापडतात.

**सामान्य लक्षणे :**

[3]दचकणे (उत्रास), जांभया येणे, भिवया मोडणे, तोंडाला फेस येणे, डोळे फिरविणे, दात-ओठ खाणे, झोप न येणे, रडणे, कण्हणे, दूध न पिणे, आवाज विकृत होणे;

१ शूलिनेतिनियुक्तास्ते बलिपूजाभिकाङ्क्षिणः ।
क्रुद्धान् भीतान् विमनसः शून्यस्थानैकचारिणः ।
परोपभुक्तकुसुमवस्त्राभरणधारिणः ।
बालान् कश्मलधात्रीकान् सन्ध्यासुरुदतोऽशुचीन् ।
ऋक्षोलूकबिडालादिरूपैरन्यैस्तथाद्भुतैः ।
सन्त्रासयन्तः शयितान् कदाचिज्जाग्रतोऽपिवा ।
प्रायः पर्वसु गृह्णन्ति ग्रहाच्छिद्रप्रहारिणः । अ. सं. उ. पान ३४, ३५
इत्यनेन प्रकारेण शूलिना भगवता ते ग्रहः नियुक्ताः सन्तो बलिपूजाभिकाङ्क्षिणश्च क्रुद्धादिगुणान् बालान् हन्ति । विमनसो दुश्चित्तान् । शून्ये तिष्ठन्तीति शून्यस्थास्तान् । एकचारिणो ये सर्वत्रासहायाश्चरन्ति । परेणान्येनोपभुक्तान् कुसुमादीन् धारयन्तीति तथोक्तास्तान् । कश्मला दुराचारा धात्री येषां ते तथोक्तास्तान् । कथं गृह्णन्तीत्याह । अद्भुतैराश्चर्यैः ऋक्षादिप्राणिरूपैर्बालाञ्छायितान् जाग्रतोऽपि वा संत्रासयन्तः । कदा गृह्णन्तीत्याह । प्रायः पर्वस्वष्टम्यादिषु । ते च ग्रहाच्छिद्रप्रहारिणच्छिद्रे रन्ध्रे प्रहरन्ति ।। टीका
२ तेषां ग्रहीष्यता रूपं प्रततं रोदनं ज्वरः । अ. सं. उ. ३–३५
– तेषां च ग्रहाणां ग्रहीष्यतां ग्रहणं करिष्यतां प्रततं रोदनं ज्वरश्च सामान्येन पूर्वरूपम् ।। टीका
३ सामान्यं रूपमुत्रासजृम्भाभ्रूक्षेपदीनताः ।
फेनस्रावोर्ध्वदृष्टयोष्ठदन्तदंशप्रजागराः ।
रोदनं कूजनं स्तन्यविद्वेषः स्वरवैकृतम् ।
नखैरकस्मात् परितः स्वधात्र्यङ्गविलेखनम् । अ. सं. उ. ३५

आईचे वा स्वतःचे अंग ओरबाडणे, स्वतःस वा दाईस चावणे, कृश होणे, अंग सुजणे, मांस, रक्त यांसारखा शरीरास गंध येणे, अन्न तुटणे, दुर्बल होणे, शरीर मलिन होणे, मूर्च्छा येणे अशी लक्षणे ग्रहबाधेमध्ये सामान्यपणे होतात. दैन्य आणि विड्भेद ही लक्षणे असतात.

[1]बालग्रह १२ आहेत, असे वाग्भट म्हणतो. त्यांची नावे अशी—

| | | |
|---|---|---|
| (१) स्कंध | (२) विशाख (स्कंधापस्मार) | (३) मेषास्य (मेषाख्य) |
| (४) श्वग्रह | (५) पितृग्रह | (६) शकुनी |
| (७) पूतना | (८) शीतपूतना | (९) अंधपूतना) (अदृष्टिपूतना) |
| (१०) मुखमण्डितिका (मुखमण्डिता-मुखपीडिका) | (११) रेवती | (१२) शुष्क रेवती. |

यांतील पहिले पाच पुरुषग्रह असून, पुढील सात स्त्रीग्रह आहेत असे मानतात. या ग्रहांमुळे बाधा उत्पन्न होऊन विविध प्रकारचे लक्षणसमुच्चय उत्पन्न होतात.

– उत्रासादिकं स्वधात्र्यङ्गविलेखनान्तं सर्वग्रहाणामाविष्टाना सामान्यं लक्षणम् । फेनस्रावो मुखात् । ओष्ठयोर्दन्तानां च दंशो दंशनम् । अकस्मादिति कारणं विना । टीका ।

– क्षणादुद्विजते बालः क्षणात्त्रस्यति रोदिति ।
नखैर्दन्तैर्दारयति धात्रीमात्मानमेव च ।
ऊर्ध्वं निरीक्षते दन्तान्खादेत्कूजति जृम्भति ।
भ्रुवौ क्षिपति दन्तौष्ठं फेनं वमति चासकृत् ।
क्षामोऽति निशि जागर्ति शूनांगो भिन्नविट्स्वरः ।
मांशशोणितगन्धिश्च न चाश्नाति यथा पुरा ।।
दुर्बलो मलिनांगश्च नष्टसंज्ञोऽपि जायते ।
सामान्यग्रहजुष्टानां लक्षणं समुदाहृतम् । यो. र. भाग २, बालरोग पान ६१७

१ पुरा गुहस्य रक्षार्थं निर्मिताः शूलपाणिना ।
मनुष्यविग्रहाः पञ्च सप्त स्त्रीविग्रहा ग्रहाः ।
स्कन्दो विशाखो मेषाख्यः श्वग्रहः पितृसंज्ञितः ।
शकुनिः पूतना शीतपूतनाऽदृष्टिपूतना ।।
मुखमण्डितिका तद्वद्रेवती शुष्करेवती । अ. सं. अ. पान ३४



## सूतिका–स्त्रीरोग परीक्षापत्रकम्

बाह्यरुग्ण क्रमांक– शय्या क्रमांक– प्रवेशित रुग्ण क्रमांक–

उपवैद्य– चिकित्सक– विद्यार्थी

प्रभाग—

रुग्णाचे नाव वय—

जात — व्यवसाय उत्पन्न—

संपूर्ण पत्ता—

दाखल करणाराचे नाव, नाते व पत्ता—

प्रवेशित दिनांक— वेळ—

निर्गम दिनांक— वेळ—

रोगनिदान— चिकित्सा—

चिकित्सा फल—बरी झाली / पुढील चिकित्सा घरी घेण्यास सांगितली / वैद्यकीय सल्ल्याविरुद्ध घरी गेली / इतरत्र पाठविले / मृत पावली.

दिनांक— वेळ— मृत्यूचे कारण—

कोणी पाठविले—

चिकित्सकाचे नाव—

| | |
|---|---|
| रुग्णासंबंधीची व रोगाची माहिती संपूर्ण खरी आहे. जरूर ते संमोहन देऊन शस्त्र-क्रिया करण्यास माझी संमती आहे.<br>सही —<br>साक्षीदाराची सही — | रोगाबाबत व उपचाराबाबत त्रोटक वृत्तांत.<br>सहवैद्य |

**वेदना विशेष :**

वर्तमान व्याधिवृत्त—

मातृपितृ-समाचार ( कुलवृत्त )

सात्म्यासात्म्य—

दोहृद ( सगर्भावस्था इतिहास )—

पूर्वोत्पन्न व्याधी—

रजःप्रवृत्तीचा इतिहासय

प्रसवाचा इतिहास—

प्रकृति—

अष्टविधा परीक्षा—

| | |
|---|---|
| नाडी | रक्तदाब |
| देहोष्मा | जिव्हा |
| मल | मूत्र |
| शब्द | स्पर्श |
| आकृति | |



## विशेष परीक्षण—प्रसवोत्सुका

**उदर** : परीक्षण
- दर्शन
- स्पर्शन
- गर्भशिर — गर्भहृद्स्पंद
- गर्भासन — गर्भस्थिती

**श्रोणी** : परीक्षण — संकुचित । प्राकृत
- कटिमापन

**योनी** : परीक्षण
- बाह्य
- अभ्यंतर
- स्राव

**अपत्यलिंग अनुमान :**

**अवस्था :**

| | |
|---|---|
| आविप्रारंभ दिनांक | गर्भोदक स्रुति दिनांक |
| समय | समय |
| गर्भजन्म दिनांक | अपरापतन दिनांक |
| समय | समय |

**अवस्था** : एकुण काळ

स्रावप्रमाण व स्वरूप

**चिकित्सोपक्रम :**

**प्रजायिनी :**

**उपस्थितप्रसवा :**

**प्रजनयिष्यमाणा :**

**प्रसवस्वरूप :**

**प्रसवोत्तर :**

| | |
|---|---|
| नाडी | रक्तदाब |
| श्वसन | देहोष्मा |
| गर्भाशय स्थिती— | |

## विशेष परीक्षण—सूतिका

**उदरपरीक्षण :**

| | |
|---|---|
| दर्शन | उदर |
| स्पर्शन | गर्भाशय |
| प्रश्न | |

**योनिपरीक्षण :**

बाह्य

अभ्यंतर

स्राव

**स्तनस्तन्यपरीक्षण :**

स्तनदर्शन

स्पर्शन

प्रश्न

**स्तन्य :**

**स्तन्यप्रवर्तन दिनांक :**



## विशेष परीक्षण ( स्त्रीरोग )

**योनिपरीक्षा :**

| | |
|---|---|
| प्रथमावर्त | दर्शन<br>वाह्यप्रदेश व स्पर्शन<br>प्रश्न |
| द्वितीयावर्त | दर्शन ( योनिव्रणेक्षण यंत्राने )–<br>स्पर्शन<br>प्रश्न |
| तृतीयावर्त | स्पर्शन ( गर्भाशय )<br>गर्भाशयपार्श्व ( आर्तववह स्रोतस ) प्रश्न |

**योनिगत स्रावपरीक्षण :**

**उदरपरीक्षण**

दर्शन
स्पर्शन
प्रश्न—

**इतर स्रोतस परीक्षण :**

रसवह–
रक्तवह–
मांसवह–
मेदोवह–
अस्थिवह–
मज्जावह–
स्तन्यवह–
उदकवह–
प्राणवह–
अन्नवह–
पुरीषवह–
मूत्रवह–
स्वेदवह–

## नैदानकीय अर्वाचीन परीक्षण

## शस्त्रकर्म वृत्तान्त



## दैनंदिन परीक्षण

| दिनांक | वेदनाविशेषा: | उपचार | पथ्यापथ्यम् |
|---|---|---|---|
| | | | |

## सूतिकागृह प्रवेशित पत्रिका

| | | |
|---|---|---|
| बाह्यरुग्ण क्रमांक | प्रवेश क्रमांक | दिनांक |
| रुग्ण नाम | पत्ता | |
| वय प्रसवसंख्या | पूर्वरज:काल | पूर्व प्रसवकाल |

**सामान्य परीक्षा :** वेदना विशेष :

| | | | |
|---|---|---|---|
| उपचय- | नख | नेत्र | जिव्हा |
| दंत- | दंतवेष्ट | त्वचा | |
| नाडी- | श्वसन | तपमान | रक्तदाब |
| उर:परीक्षण- | हृद्ध्वनी | फुफ्फुसध्वनी | |
| उदरपरीक्षण- | ग. उंची | ग. परिघ | |
| | गर्भशिर | गर्भस्थिती | गर्भहृद्स्पंद |

कटिमापने–
अपत्यलिंगअनुमान–
योनिपरीक्षा=
मूत्रपरीक्षण–

प्रसवकालावस्था— { प्रजायिनी / उपस्थितप्रसवा / प्रजनयिष्यमाणा }

परीक्षक

| | | |
|---|---|---|
| आविप्रारंभ– दि. | | समय |
| गर्भोदकस्रुति– दि. | | समय |
| गर्भजन्म दि. | | समय |
| रक्तस्राव प्रमाण– | प्रसवपूर्व | प्रसवोत्तर |
| अपरापतन– दि. | | |
| अपरापरीक्षण– | | |
| योनिबाह्यपरीक्षा– | | |
| सीवनकर्म– दि. | | सीवनकर्ता वैद्य– |
| नाडी | श्वसन | तपमान |

**प्रसवस्वरूप–**

प्रसवोपस्थित वैद्य



## दैनंदिन–उपचार–पत्रक

| सूतिकादिन | दिनांक | वेदना विशेष | चिकित्सा | पथ्यापथ्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## सूतिका–निर्गमकालिक–स्थिती

सूतिकावस्था–
प्रकृतिमान–
गर्भाशयऱ्हास–
सूतिका-स्राव-स्वरूप–
स्तन-स्तन्य-स्थिती–
उपदेश–
निर्गम दिनांक पुन:परीक्षण दि.–
विनंतीवरून घरी पाठविले. दि.
वैद्यकीय सल्ल्याविरुद्ध घरी गेली–

स्वाक्षरी

अधिकारी वैद्य

## सूतिकागृह–बालपत्रक

पुत्र–कन्या— जन्मकाल ( स्टँ. टा. ) दिनांक

आयनानवृत्त—

जातमात्रस्वरूप—

भार ( वजन ) कि. ग्रॅ. गॅ. आयाम (उंची) शीर्षपरिघ–

सहज–वैगुण्य–विशेष—

## दैनंदिन–बालप्रकृति–पत्रिका

| जन्मदिन | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | | | | | | | | | | | | | |
| देहोष्मा– | | | | | | | | | | | | | |
| नाडी– | | | | | | | | | | | | | |
| श्वसन– | | | | | | | | | | | | | |
| मलवेग | | | | | | | | | | | | | |
| मूत्रवेग | | | | | | | | | | | | | |
| स्तनपानांतर– | | | | | | | | | | | | | |
| निद्राप्रमाण– | | | | | | | | | | | | | |
| भार कि. ग्रॅ. ग्रॅम | | | | | | | | | | | | | |

नालपतन दि.



| जन्मदिनांक | दिनांक | वेदना-विशेष | औषधोपचार | पथ्यापथ्योपचार |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## निर्गमन–कालिक–बाल–स्थिति

ज्वर– कामला– मुख–

जिव्हा– नेत्र– शिरोरंध्र– बृहात-सम-लघु

मलद्वार– मूत्रद्वार– नाभिस्वरूप -

उपदंश–बालोपयोगी– धात्र्युपदेश (बालहितार्थ)

निर्गमन दिनांक—

(स्वाक्षरी) अधिकारी वैद्य.............

५

# रक्तदाब, रक्त-मूत्र परीक्षण शस्त्रकर्मे—औषधी पाठ

## रक्तदाब घेणे

रुग्णेस टेबल किंवा कॉटवर झोपवून रुग्णेच्या डाव्या किंवा उजव्या हाताचे दंडास रक्तदाब घेण्याच्या यंत्राचा पट्टा जास्त घट्ट व फार सैल न होईल अशा रीतीने बांधावा. त्याच हाताच्या कोपऱ्याच्या वरच्या बाजूस वा अंगठ्याजवळ—मणिबंधाजवळ वैद्याने आपल्या डाव्या हाताच्या बोटांनी नाडीचे स्पंदन पाहावे. वैद्याने स्वतःच्या उजव्या हातात रक्तदाबयंत्रातील फुगा धरून त्याची किल्ली घट्ट करून, हळूहळू दाबावा. म्हणजे आत हवा भरली जाऊन रक्तदाबाच्या यंत्रातील पारा वर चढू लागेल. (हवेचे यंत्र असल्यास त्याच्या घड्याळातील काटा हळूहळू वरच्या बाजूस पुढच्या आकड्याकडे फिरतो.) पारा वर चढवत असताना वैद्याने स्वतःच्या हाताने रुग्णाच्या नाडीचे स्पंदन पाहात राहावे. या दोन्ही क्रिया एकाच वेळी लक्षपूर्वक कराव्या. ज्या वेळी नाडीचे स्पंदन हाताला लागणे बंद होईल त्या वेळी हवा भरणे बंद करावे व स्टेथॉस्कोप छातीवर ठेवून तपासण्याचा जो भाग (चेस्ट पीस) तो भाग कोपऱ्याच्या वरच्या बाजूस जेथे नाडीचे स्पंदन पाहिले होते तेथे ठेवून त्याने नाडीचे स्पंद ऐकू येतात का ते पाहावे. त्याच वेळी वैद्याने स्वतःच्या उजव्या हाताने रक्तदाब घेण्याच्या यंत्रातील घड्याळाचा पारा चढविताना फुग्याजवळील घट्ट केलेली किल्ली हळूहळू सैल करावी व पारा खाली उतरवण्यास सुरुवात करावी. बंद झालेले नाडीचे स्पंद ज्या आकड्यापासून ऐकू येऊ लागतील तो आकडा लक्षात ठेवावा व पुन्हा पारा तसाच खाली उतरवत आणावा. ज्या



आ. ९३ : रक्तदाब कसा घ्यावा ? → १. रक्तदाब घेण्याचे यंत्र
२. फुगा ३. किल्ली
४. वैद्याचा डावा हात
५. रुग्णाचा (उजवा) हात
६. पट्टा. ७. वैद्याचा उजवा हात.





आ. ९४ : श्रवणनलिका (स्टेथॉस्कोप)

आकड्यावर पुन्हा नाडीचे स्पंद क्षणभर थांबून पुन्हा ते पूर्ववत्‌ म्हणजे प्राकृतरीत्या ऐकू येऊ लागतो तो आकडा लक्षात ठेवावा.

रक्तदाब लिहिताना वा वाचताना एक वर व एक त्याच्या खाली आकडा लिहिला वा वाचला जातो (गणितातील अपूर्णांकाप्रमाणे उदा० $\frac{३}{४}$ )त्यातील

(१) वरचा आकडा—पारा उतरवत असताना जेथे प्रथम नाडीचे स्पंदन ऐकू येते तो आकडा. त्याला सिस्टॅलिक रक्तदाब म्हणतात.

(२) खालचा आकडा—नाडीचे स्पंदन ऐकू येऊ लागल्यानंतरही यंत्रातील पारा खाली उतरवत असताना जेथे क्षणभर नाडीचे स्पंदन बंद झाल्याचे जाणवते व लगेच पुन्हा ते पूर्ववत प्राकृतरीत्या सुरू होते त्या आकड्याला डायस्टॉलिक रक्तदाब म्हणतात.

**रक्तदाब लिहिणे रक्तदाब : $\frac{१२०}{८०}$ मि. मि. पारद**

**रक्तदाब**

| | प्राकृत | विकृत | |
|---|---|---|---|
| | | कमी होणे | जास्त होणे |
| (१) बालक–साधारणतः जन्मापासून १२-१३ वर्षांपर्यंत | $\frac{८०}{६०}$—$\frac{१००}{७०}$ मि. मी. पारद | प्राकृतपेक्षा कमी होणे | प्राकृतपेक्षा वाढणे |
| (२) तरुण–१४ ते ३० वर्षांपर्यंत | $\frac{१२०}{८०}$ मि. मी. पारद | $\frac{१००}{६०}$ मि. मी. पारद याचे खाली | $\frac{१२०}{८०}$ मि. मी. पारदाचे वर साधारणतः $\frac{२००}{१००}$ मि. मी. असे सापडते |
| (३) प्रौढ–३१ ते ५० | $\frac{१२०}{८०}$ मि. मी. पारद | $\frac{१००}{६०}$ मि. मी. पारद यांचे खाली | $\frac{१२०}{८०}$ मि.मी. पारदाचे वर साधारणतः $\frac{२००}{१००}$ मि. मी. असे सापडते |
| (४) वृद्ध–५१चे पुढे | $\frac{१३०}{९०}$ मि. मी. | $\frac{१००}{७०}$ मि. मी. पारद याचे खाली | $\frac{२७०}{१२०}$ मि. मी. पारद इतके सापडते. |

रक्तदाब वाढणे किंवा कमी होणे हे वाताच्या विकृतीचे लक्षण आहे. मार्गावरोधजन्य वातवृद्धीमुळे रक्तदाब वाढलेला सापडतो. [त्यात रुग्णेस भ्रम इ. लक्षणे असता पित्ताची विकृती पण लक्षात घ्यावी.] तर योनिगत रक्तस्रावासारख्या धातुक्षयजन्य वातवृद्धीमुळे रक्तदाब प्राकृतपेक्षा कमी झालेला आढळतो. काही वेळा रक्तस्राव हा अभ्यंतरतः होत असेल तर तो नाडीच्या वेगावरून व रक्तदाब कमी झाल्यावरून जाणणे शक्य होते.

शस्त्रकर्म करण्यापूर्वी रक्तदाब प्राकृत असेल तरच शस्त्रकर्म करावे. अन्यथा कमी व जास्त असेल तर त्याप्रमाणे चिकित्सा देऊन मगच रुग्णेचे शस्त्रकर्म करावे.

रक्तदाब कमी झाल्यास—संपूर्ण विश्रांती देऊन पुढील चिकित्सा चालू करावी.

(१) शतावरी कल्प २ चमचे–सकाळ संध्याकाळ–दुधाबरोबर.

(२) मधुमालिनी वसंत.

(३) आत्यंतिक अवस्थेत लक्ष्मीविलास व हेमगर्भ यांचे चाटण आले, रस व साखर यांतून चाटवावे.

रक्तदाब वाढला असल्यास पुढीलप्रमाणे चिकित्सा द्यावी.

(१) संपूर्ण विश्रांती.

(२) लवण व अभिष्यंदी आहार वर्ज्य.



(३) सकाळ, दुपार, संध्याकाळ–रक्तगंधावटी १ गोळी ज्या प्रमाणात वाढले असेल त्याप्रमाणे द्यावी. किंवा

(४) पुढीलप्रमाणे चाटण द्यावे.

सर्पगंधा ४ गुं.
जटामांसी ४ गुं. } सकाळ दुपार संध्याकाळ चाटण द्यावे.
सूतशेखर ४ गुं.

(५) रात्री—निशोत्तरासारखे अनुलोमन द्यावे.

(६) शोथ असल्यास शोथाची चिकित्सा चालू करावी.

(८) अपस्माराचे वेग येणार नाहीत ना, याकडे लक्ष ठेवून त्याप्रमाणे चिकित्सा द्यावी.

(८) मूत्रपरीक्षण करून घेऊन त्यात दोष आढळल्यास त्याची दोषानुरूप चिकित्सा द्यावी.

❀ ❀

# रक्तपरीक्षण करणे

## रक्तातील रक्तवर्ण मापनाची (हिमोग्लोबिन) पद्धत

तत्त्व—रुग्णामध्ये रक्तातील रक्तवर्ण किती आहे ते पाहणे. यावरून पांडुत्व किती आहे ते कळू शकते.

### शहालीच्या पद्धतीने रक्तपरीक्षण करणे

**साहित्य**




आकृती : ९५

१. रक्तवर्ण मापनाची पेटी. अ रिकामी जागा.

२. आकडे असलेली काचेची नळी. (टक्क्यांचे आकडे असलेली.)

३. रक्त ओढून घेण्यास वापरावयाची काचेची नळी–त्यावर २०cmm किंवा ०·०२cm³ अशी अक्षरे असतात व तेथे खूण केलेली असते. त्याच्या वरच्या टोकाला एक रबराची नळी जोडलेली असून रबराच्या नळीच्या दुसऱ्या टोकाला पुन्हा एक काचेची वा प्लास्टिकची बारीक नळी जोडलेली असते.

४. ढवळण्यासाठी (एकत्र करण्यासाठी) वापरावयास लागणारी काचेची नळी.

५. सुई

६. रक्तपरीक्षणात टाकावयास लागणारे औषध एच सी एल—एन् बाय् टेन.

**७. शुद्ध व निर्जंतुक पाणी (Distilled water)**

८. कापूस व स्पिरिट.



**कृती :** प्रथम आकृती २ यात दाखविलेल्या नळीमध्ये त्यावर असलेल्या वीस या आकड्यापर्यंत रक्त-परीक्षण करताना वापरण्यात येणारे औषध (एच सी एल्–एन् बाय् टेन) घालावे, व ती नळी नं. १ मध्ये रिकाम्या दाखविलेल्या जागेत ठेवावी.

रुग्णाचे डाव्या हाताच्या मधल्या बोटाचे पुढले पेर कापसावर स्पिरिट टाकून त्याने स्वच्छ व निर्जंतुक करावे. तसेच नं. ५ मध्ये दाखविलेली सुई पण स्पिरिट लावून स्वच्छ व निर्जंतुक करून घ्यावी व नंतर ती सुई रुग्णाच्या स्वच्छ केलेल्या पेराला टोचावी. म्हणजे अल्प प्रमाणात रक्त येऊ लागेल. अगदी प्रथम आलेले रक्त स्पिरिटमध्ये भिजविलेल्या कापसाने पुसून टाकावे व ते स्पिरिट वाळू द्यावे. नंतर पुन्हा ते पेर थोडेसे दाबावे. म्हणजे त्यातून रक्तस्राव होऊ लागेल. तो नं. ३ मध्ये दाखविलेल्या नळीने त्यावर असलेल्या खुणेपर्यंत वैद्याने स्वतःच्या तोंडात ती नळी धरून ओढून घ्यावा, व लगेच (ते गोठणार नाही इतक्या अत्यल्प अवधीत) ते नं. १ मध्ये औषध घालून ठेवलेल्या नळीतील औषधात सोडावे. ते नं. ४ प्रमाणे दाखविलेल्या काचेच्या नळीने नीट हालवून पुन्हा ते नं. १ मध्ये प्रथम ठेवलेल्याच जागी ठेवावे. ५ मिनिटे ते स्वस्थ राहू दिल्यानंतर थोडे थोडे निर्जंतुक व स्वच्छ असलेले पाणी टाकावे व त्याच वेळी ते नं. ४ मध्ये दाखविलेल्या काचेच्या नळीने हालवावे. त्याचा रंग नं. १ मध्ये असलेल्या दुसऱ्या काचेच्या नळीतील रक्ताच्या रंगाप्रमाणे रंग होईपर्यंत घालावे. ते दोन्ही रंग सारखे झाले म्हणजे तो आकडा पाहावा तो आकडा म्हणजेच रक्तातील रक्तवर्ण (हिमोग्लोबीन) मापनाचा आकडा होय.

हा आकडा ग्रॅम्समध्ये किंवा टक्क्यांमध्ये मोजला जातो. उदा.— १० ग्रॅम्स किंवा ६५ टक्के.

यावरून आपणास रक्तातील रक्तवर्ण किती कमी झालेला आहे, याचे ज्ञान होते.

प्राकृत रक्तवर्णाचा आकडा (हिमोग्लोबीन)—७०—७५ टक्के;

कमी.....................६०—६५ टक्के किंवा त्याहूनही कमी.

गर्भिणी, शस्त्रकर्मपूर्व हे रक्तपरीक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. रक्तातील रक्तवर्ण प्राकृत असेल तरच रुग्णेचे शस्त्रकर्म करावे. कमी असल्यास पांडूची सर्व चिकित्सा देऊन रक्तवर्ण प्राकृत झाल्यावर शस्त्रकर्म करावे. आवश्यकता वाटल्यास शस्त्रकर्म–पूर्व, शस्त्रकर्म चालू असताना व शस्त्रकर्मोत्तर रक्तदानादी चिकित्सा द्यावी.

गर्भिणी परिचर्येमध्ये अनेकापत्यता, अतिगर्भोदक, गर्भोपद्रव यांत रक्तातील रक्तवर्णाचे परीक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण अशा गर्भिणीमध्ये प्रजनयिष्यमाणा अवस्थेत वा अपरापतनानंतर (प्रसवोत्तर) रक्तस्राव प्रभूत प्रमाणात होण्याची शक्यता असते. त्यामुळे रक्तवर्ण कमी असल्यास गर्भिणी परिचर्येमध्येच पांडूची चिकित्सा द्यावी अथवा प्रजनयिष्यमाणा अवस्थेत रक्तदानादी चिकित्सेची तयारी ठेवावी.

# मूत्र-परीक्षण करणे

दोन प्रकारचे परीक्षण करावयाचे आहे.

( १ ) मूत्रातून शर्करा जाते का ? जात असल्यास साधारणतः किती प्रमाणात जाते ?

( २ ) मूत्रात कफाधिक्य ( अल्ब्युमिन ) आहे का ?

## ( १ ) मूत्रातून शर्करा जाणे

**साहित्य :**




आकृती ९६ :

१ काचेच्या रिकाम्या नळ्या (टेस्ट ट्यूब्ज), २ काचेच्या रिकाम्या नळ्या ठेवण्यास उपयुक्त स्टँड, ३ काचेची नळी धरण्याचे यंत्र ( टेस्ट ट्यूब होल्डर ), ४ स्पिरिटचा दिवा, ५ औषधी द्राव — ( अ ) बेनेडिक्ट क्वालिटेटिव्ह सोल्युशन, ( ब ) ॲसिटिक ॲसिड.






आकृती ९७ : १ औषधी द्राव (बेनेडिक्ट सोल्युशन), २ काचेची नळी (टेस्ट ट्यूब), ३ काचेची नळी धरण्याचे यंत्र (टेस्ट ट्यूब होल्डर), ४ वैद्याचा उजवा हात, ५ स्पिरिटचा दिवा.

कृती : काचेची रिकामी नळी (टेस्ट ट्यूब) ती धरण्यास उपयुक्त अशा यंत्रात धरावी व त्यात ५ सी. सी. होईल एवढे बेनेडिक्ट सोल्युशन ( क्वालिटेटिव्ह ) घालावे. स्पिरिटचा दिवा पेटवून त्यावर ती नळी त्याच्या बुडाकडे तापेल अशा तऱ्हेने धरावी. त्यातील औषध उकळू लागल्यावर त्यात मूत्राचे ८ थेंब टाकावे व पुन्हा ते मिश्रण उकळवावे. उकळल्यानंतर ती नळी स्थिर राहील अशा प्रकारे त्यासाठी असलेल्या स्टँडमध्ये ठेवावी. ५ मिनिटांनंतर त्याचा रंग बदललेला आहे का ते पाहावे.

त्यांतील रंग पुढीलप्रमाणे बदललेले असल्यास त्याचे खाली निर्देशित केलेल्या प्रमाणात मूत्रातून शर्करा जाते, हे लक्षात घ्यावे व त्याप्रमाणे प्रमेहाची चिकित्सा द्यावी.

## ( २ ) मूत्रातील कफाधिक्याचे प्रमाण ( अल्ब्युमिन ) पाहणे




आकृती ९८ :
१. मूत्र, २. काचेची नळी (टेस्ट ट्यूब), ३. काचेची नळी धरण्याचे यंत्र (टेस्ट ट्यूब होल्डर), ४. वैद्याचा हात, ५. स्पिरिटचा दिवा.

**साहित्य** : वरीलप्रमाणे (५२४).

**कृती** : काचेच्या नळीमध्ये ती $\frac{3}{4}$ भरेल इतके मूत्र घ्यावे. स्पिरिटचा दिवा पेटवून त्यावर ती नळी जेथपर्यंत मूत्राने भरलेली असेल ते टोक तापविले जाईल अशा तऱ्हेने तिरपी धरावी. (आकृतीत दाखविल्याप्रमाणे) व ते मूत्र उकळवावे. उकळल्यानंतर त्यात ॲसिटिक ॲसिडचे १० थेंब टाकावे. व पुन्हा ते उकळवावे. उकळल्यानंतर ती नळी स्थिर राहील अशी त्यासाठी असलेल्या स्टँडमध्ये ठेवावी; ५ मिनिटांनंतर त्या मूत्राचा रंग बदललेला आहे का ते पाहावे.

त्याचा रंग गढूळलेला झालेला अससल्यास त्यात कफाधिक्य (अल्ब्युमिन) आहे, असे समजून त्याप्रमाणे रुग्णेस चिकित्सा द्यावी.

हे साधारणतः गर्भोपद्रव शोथ, अपस्मार यांत सापडते.

# १ स्त्री-रोग-विषयक शस्त्रकर्मे

## १. गर्भाशय-मुख दहन कर्म

**साधने :**

( १ ) क्षार द्रव्ये—तुत्थ (मोरचूद), अपामार्ग-क्षार, मधुहरिद्रा, मध इत्यादी.

( २ ) अग्नीच्या सहाय्याने — विद्युत्-सहाय्याने दहनकर्म करणे.



आ. ९९ : द्विताल योनिवीक्षण यंत्र ( प्रथम आवर्ताचे परीक्षण करण्याकरिता )

**दहनकर्म करण्यास योग्य असे व्याधी**

( १ ) क्षाराने-गर्भाशयमुखाच्या ठिकाणी असलेले मांसांकुर, कफज योनी अर्श, इ. ठिकाणी क्षार लावून दहनकर्म करावे.

( २ ) अग्नीने-गर्भाशयमुखाच्या ठिकाणी असलेले मांसांकुर. योनी अर्श, गुल्म निर्हरणानंतर गुल्माचे ठिकाणी अपुनरोद्भव ( त्याच ठिकाणी पुन्हा गुल्म उत्पन्न होऊ नये ) म्हणून त्याच ठिकाणी दहनकर्म करणे.

## २. आर्तववह स्रोतसांचे गर्भाशयमार्गे परीक्षण

**परीक्षण करण्यास योग्य व्याधी :** वंध्या-काकवंध्या.

हे दोन पद्धतींनी करता येते.

( १ ) हवेच्या सहाय्याने परीक्षण करणे.

( २ ) औषधी द्रव्याच्या सहाय्याने क्ष-किरण प्रतिमा काढणे व त्याच्या सहाय्याने परीक्षण करणे.

## १. हवेच्या सहाय्याने परीक्षण करणे :

**साधने :**

योनिवीक्षण यंत्र (अर्धनाडी यंत्र), एषणी, द्विताल यंत्र, नाडी यंत्र (गर्भाशय-मुखातून गर्भाशयात हवा भरण्यासाठी), कंकमुख स्वस्तिक यंत्र, सूचिकाभरणाची पिचकारी, श्रवणनलिका, स्वच्छ व शुद्ध (निर्जंतुक) केलेला कापूस, स्वच्छ व निर्जंतुक केलेले कपडे—टॉवेल्स, वैद्याला परिधान करावयाचे कपडे, रबरी हातमोजे.



आ. १०० : बस्ती देण्याचे यंत्र (एनिमापॉट)



आ. १०१ : स्वस्तिकयंत्र (पिचू धरण्यासाठी)



आ. १०२ : अर्धनाडी यंत्र (योनिवीक्षणार्थ)





आ. १०३ : कंकमुख स्वस्तिक यंत्र ( गर्भाशय मुख धरण्यासाठी )



आ. १०४ : द्वितालयंत्र



आ. १०५ : एषणी ( गर्भाशयाची व्याप्ती व स्थिती परीक्षणार्थ )



१०६ : नाडी यंत्र ( आर्तव व वाहिनी परीक्षा करण्याकरता )



आ. १०७ : सूचिका भरणाची पिचकारी व सूची



आ. १०८ : श्रवणनलिका (स्टेथॉस्कोप)



आ. १०९ : आर्तववह स्रोतसांचे परीक्षण करण्याचे यंत्र



आ. ११० : आर्तववह स्रोतसांचे परीक्षण करण्याचे यंत्र



## पूर्वकर्म :

या शस्त्रकर्मास सहसा संमोहनाची जरुरी भासत नाही. परंतु रुग्णा हळवी असेल तर मात्र संमोहन देऊन हे कर्म करावे लागते.

मूत्राशय व मलाशय बस्ती देऊन रिक्त करावा. बाह्ययोनि-प्रदेशी असलेले केस काढून त्याची शुचिता करावी व उत्तरबस्ती देऊन योनीची स्वच्छता ठेवावी.

## प्रधानकर्म :

वैद्याने स्वतःचे दोन्ही हात साबणाने स्वच्छ धुवावेत. स्वच्छ व निर्जंतुक केलेले कपडे परिधान करावेत व नंतर रबरी हातमोजे घालावेत. आपल्या उजव्या हाताची तर्जनी व त्याजवळील बोटाने योनिपरीक्षा करावी. योनिपरीक्षेमध्ये गर्भाशयाचा आकार व स्थिती पाहून नंतरच त्या दिशेने प्रधानकर्म करावे. योनीमध्ये योनिवीक्षण यंत्र व द्विताल-यंत्र घालून त्यांच्या साहाय्याने गर्भाशयमुख पाहून ते कंकमुख स्वस्तिक यंत्राच्या सहाय्याने गर्भाशयमुखाच्या वरील बाजूस (म्हणजेच घड्याळाच्या बारा या आकड्याच्या ठिकाणी) धरावे. नंतर गर्भाशयमुखात एषणी घालून गर्भाशयाची दिशा व स्थिती निश्चित करून मग त्याच दिशेने नाडीयंत्र गर्भाशय मुखातून गर्भाशयात घालावे. या नाडीयंत्रातून गर्भाशयामध्ये सूचिकाभरणाच्या पिचकारीने एका विशिष्ट दाबाने हवा गर्भाशयात रेटावी. याच वेळी रुग्णेच्या अधोदरावरून दुसऱ्या सहाय्यक वैद्याने श्रवणनलिकेमार्फत कानाने आर्तववहस्रोतसांमधून हवा आत जात असताना हवेचा जो फुसफुस असा आवाज होतो तो ऐकावा. याच वेळी गर्भाशयात भरलेली हवा गर्भाशयमुखातून योनीमार्गे बाहेर येत नाही वा येणार नाही याची खात्री करून घ्यावी. हे दोन प्रकारांनी पाहता येईल.

(१) गर्भाशयमुखाचे आसमंतात चारही बाजूंनी कोरडा कापूस ठेवावा. जर हवा गर्भाशयमुखातून योनिमार्गे बाहेर येत असेल तर ह्या कापसाचे तंतू हालताना दिसतील.

(२) द्विताल यंत्रामध्ये गर्भाशयमुख बुडेल इतके शुद्ध व निर्जंतुक केलेले पाणी घालावे. या परीक्षणामध्ये गर्भाशयमुखातून बाहेर आलेल्या हवेचे बुडबुडे द्वितालयंत्रात घातलेल्या पाण्यात प्रत्ययास येतील.

आर्तववाहिन्या जर बंद असतील तर हवेचा फुस्फुस् असा आत जाण्याचा आवाज ऐकू येत नाही व आत रेटलेली हवा गर्भाशयमुखातून परत बाहेर आलेली शस्त्रकर्म करणाऱ्या वैद्यास समजते.

आर्तववाहिन्या बंद असताना आर्तववाहिन्यांमध्ये तीन प्रकारांनी मार्गावरोध झालेला आढळतो.

(१) आर्तववह स्रोतसाची वक्रता असल्यामुळे मार्गावरोध होतो. ही वक्रता ३–४ ठिकाणीसुद्धा असू शकते.

(२) आर्तववाहिनीला आतील बाजूकडून असलेल्या शोथामुळे मार्गावरोध असतो.

(३) आर्तववह स्रोतसामध्ये जलसंचिती किंवा पूयसंचिती असल्यामुळे मार्गावरोध होतो.

**२. औषधी द्रव्याच्या सहाय्याने क्ष-किरण प्रतिमा काढणे व त्याच्या सहाय्याने परीक्षण करणे :**

**साधने :**

सूचिकाभरण यंत्र, नाडीयंत्र, योनिवीक्षण यंत्र, कंकमुख स्वस्तिकयंत्र, एषणी; कापूस, औषधी द्रव्य. ( आकृत्या पृ. ५२८, ते ५३० वर पाहा )

**पूर्वकर्म :**

मूत्राशय व मलाशय बस्ती देऊन रिक्त करावा. बाह्ययोनिप्रदेशी असलेले केस काढून त्याची शुचिता ठेवावी. उत्तरबत्ती देऊन योनीची स्वच्छता ठेवावी.

**प्रधानकर्म :**

हवेच्या सहाय्याने परीक्षण करणाऱ्या पद्धतीप्रमाणेच करावे. फरक इतकाच की, हवेच्या ऐवजी क्ष-किरण प्रतिमा काढण्याकरिता एक विशिष्ट प्रकारचा द्राव ( औषध ) वापरून क्ष-किरण प्रतिमा काढून नंतर त्याचे परीक्षण करावे.

या परीक्षणाच्या सहाय्याने आर्तववाहिनीमध्ये मार्गावरोध नसेल तर संपूर्ण आर्तववाहिनीमध्ये आपण घातलेले औषध जाऊन ते आर्तववाहिनीच्या सुटचा टोकाकडून उदरामध्ये पडलेले दिसते.

जर आर्तववाहिनीमध्ये स्रोतोरोध असेल तर ज्या ठिकाणी स्रोतोरोध असेल तेथपर्यंत हा द्राव गेलेला आढळेल.

## गर्भाशय-मुख विस्तृतीकरण व गर्भाशय लेखनकर्म

**शस्त्रकर्म करण्यास योग्य व्याधी :**

(१) गर्भाशय-मुख विस्तृतीकरण→
सूचिमुखी योनी, अंतर्मुख योनी, उदावर्ता योनी.



(२) गर्भाशय लेखनकर्म→
रक्तप्रदर, गर्भस्राव, गर्भपात, वंध्यायोनी प्रसादरूप रजाची परीक्षा करण्याकरिता करावे लागणारे लेखनकर्म, आमगर्भपतनामुळे उत्पन्न झालेला बुद्‌बुदाकृती गुल्म.

**साधने :**

योनिवीक्षण यंत्र (अर्धनाडी यंत्र), द्वितल यंत्र, कंकमुख स्वस्तिकयंत्र, एषणी; गर्भाशयमुखविस्तृतीकरण शलाका, लेखनशस्त्र, शोधनद्रव्ये एक बाटली व त्यात लेखन द्रव्य टिकविण्यासाठी योग्य तो द्राव (फॉर्मल सलाईन).

स्वच्छ व शुद्ध (निर्जंतुक) केलेले कपडे, कापूस.



आ. १११ : नाडी यंत्र (मूत्रनिर्हरणार्थ)



आ. ११२ : स्वस्तिक यंत्र (पिचू धरण्यासाठी)



आ. ११३ : अर्धनाडी यंत्र (योनिवीक्षणार्थ)



आ. ११४ : द्वितालयंत्र



आ. ११५ : सूचिकाभरणाची पिचकारी व सूची



आ. ११६ : एषणी ( गर्भाशयाची व्याप्ती व स्थिती परीक्षणार्थ )



आ. ११७ : शलाकायंत्र ( गर्भाशयमुख विस्तृतीकरणाकरिता )





आ. ११८ : लेखनशस्त्र ( बायोप्सी क्युरेट )



आ. ११९ : लेखनशस्त्र ( गर्भाशय लेखना व धावनाकरिता )



आ. १२० : लेखनशस्त्र ( गर्भाशय लेखनाकरिता )



आ. १२१ : स्वस्तिक यंत्र- (गर्भस्राव व पात यात वापरण्यासाठी)

**पूर्वकर्म :**

शस्त्रकर्म करण्यापूर्वी निरूहबस्ती देऊन मलाशय व मूत्राशय रिक्त करणे; उत्तरबस्ती देऊन योनीची शुचिता ठेवणे, बाह्य योनि-प्रदेशी असलेले केस काढून त्याची शुचिता करावी. संमोहन देण्याच्या दृष्टीने रुग्णेस तयार करणे. संमोहन देण्याच्या अगोदर कमीत कमी चार तास आधी संपूर्ण लंघन द्यावे. पाणीसुद्धा देऊ नये.

**प्रधानकर्म :**

वैद्याने स्वतः हाताची नखे काढून हात स्वच्छ धुऊन शक्यतो स्वच्छ व शुद्ध केलेले कपडे परिधान करून रुग्णा संपूर्ण संमोहित झाल्यानंतर शस्त्रकर्म करण्यास सुरुवात करावी.

प्रथम योनिपरीक्षा करून गर्भाशयाची असलेली स्थिती व आकार लक्षात घ्यावा व त्यानुसार पुढील शस्त्रकर्म करावे. योनिवीक्षणयंत्र व द्वितालयंत्र योनीमध्ये योग्य तन्हेने घालून (प्रथम आवर्तात) गर्भाशयमुख कंकमुख स्वस्तिकयंत्राने वरच्या बाजूस (घड्याळाच्या बारा ह्या आकड्याच्या ठिकाणी) पकडून ते जरा पुढच्या बाजूस ओढावे. नंतर एषणी गर्भाशयमुखातून गर्भाशयात घालण्याचा प्रयत्न करावा. या एषणीच्या द्वारे गर्भाशयाची म्हणजेच तृतीय आवर्ताची व्याप्ती व स्थिती कळते. एषणी बाहेर काढून नंतर शलाका एकानंतर एक अशा क्रमाने वाढत्या जाडीच्या घालून गर्भाशयमुख विस्तृत करावे. आठ ते नऊ नंबरपर्यंतच्या शलाका गर्भाशय-मुखातून जाऊ लागल्यावर ही क्रिया थांबवावी व गर्भाशय लेखनशस्त्र गर्भाशयात घालून गर्भाशयाच्या सर्व भागाचे सावकाश व अगदी हलक्या हाताने लेखन करावे. लेखन केल्यानंतर जो स्राव मिळेल त्याचे परीक्षण करावे. संप्राप्तीच्या परीक्षणार्थ (हिस्टोपॅथॉलॉजिक इन्व्हेस्टिगेशन) पाठवावयाचा लेखनस्राव फॉर्मल सलाइनमध्ये ठेवून पाठवावा. लेखनकर्म झाल्यावर योनिगत रक्तस्राव थांबणे व गर्भाशयमुख संकुचित होणे या दोन लक्षणांवरून सम्यक् शस्त्रकर्म झाले आहे असे वैद्याने समजावे. ही परीक्षा विशेषतः गर्भस्राव व गर्भपात यामध्ये करत असलेल्या शस्त्रकर्मामध्ये सापडते.

**पश्चात्कर्म :**

संमोहनाच्या दृष्टीने पथ्यापथ्य पाळणे; संमोहनानंतर कमीत कमी चार तास खाद्यपेय रुग्णेस देऊ नये. या काळात तिला कोणत्या तरी एका कुशीवर झोपवावे.

योनीच्या ठिकाणी स्वच्छता ठेवावी व योनिदुष्टी होऊ नये म्हणून काळजी घ्यावी.

**चिकित्सा :**

सूक्ष्म त्रिफळा २ गुंजा दर दोन तासांनी एक दिवस पाण्याबरोबर द्यावे. नंतर पुढील ५-६ दिवस सूक्ष्म त्रिफळा २ गुंजा सकाळ दुपार संध्याकाळ द्यावे.

**शस्त्रकर्मामध्ये उत्पन्न होण्याची शक्यता असलेले व्याधी ( उपद्रव ) :**

गर्भाशय भेद, योनिदुष्टी, वंध्यत्व.

## ४. गर्भाशय पुरःप्रवर्तित करणे

**तत्त्व :**

दुःस्थित गर्भाशय शस्त्रकर्माच्या सहाय्याने सुस्थित करणे.

**शस्त्रकर्म करण्यास योग्य व्याधी :**

अंतर्मुखी योनी (पश्चात प्रवर्तित गर्भाशय असलेली) योनिस्रंस.



**साधने :**

संदंश-यंत्र सनिग्रह व अनिग्रह, स्वस्तिक यंत्र, शरीरामुखी शस्त्र, कर्तरी, स्वस्तिक यंत्र (राउंड लिगामेंट पकडण्यासाठी वापरण्याचे यंत्र), दोरा, नाडीयंत्र (मूत्राशयात घालून ठेवण्यासाठी, संदंश यंत्र (टॉवेल क्लिप), वृद्धिपत्र (चाकूची पाती व मूठ), ताल यंत्रे (उदरविस्तारणासाठी), संदंश स्वस्तिक यंत्र (रक्त-वाहिन्या व पेशी पकडण्याकरिता), स्वस्तिक यंत्र ८ ते १० (Artery Forceps), डॉ. शिरोडकरांचे यंत्र (अंतर्मुखी योनीचे शस्त्रकर्म करीत असताना वापरण्याचे यंत्र), सूची-वक्र, आयात प्रत्येकी ३-४; प्राणिज सूत्र (कॅटगट) शारीर अवयव शिवण्यासाठी, स्वस्तिकयंत्र (सुई धरण्याकरिता).



आ. १२२ : नाडी यंत्र (मूत्रनिर्हरणार्थ)



आ. १२३ : स्वस्तिक यंत्र (पिचू धरण्यासाठी)



आ. १२४ : संदंश यंत्र (टॉवेल क्लिप)



आ. १२५ : वृद्धिपत्र ( चाकूची मूठ )



आ. १२६ : वृद्धिपत्र ( चाकूची पाती )



आ. १२७ : अनिग्रह संदंश यंत्र



आ. १२८ : सविग्रह संदंश यंत्र





आ. १२९ : कर्तरी



आ. १३० : स्वस्तिक यंत्र



आ. १३१ : संदंश स्वस्तिक यंत्र ( पेशी पकडण्याकरिता )



आ. १३२ : तालयंत्र ( उदरविस्तारणार्थ )



आ. १३३ : स्वस्तिक यंत्र (रक्तवाहिन्या व पेशी धरण्याकरिता)



आ. १३४ : स्वस्तिक यंत्र



आ. १३५ : डॉ. शिरोडकरांचे यंत्र
(अंतर्मुखी योनीचे शस्त्रकर्म करीत असताना वापरण्यात येणारे यंत्र-
राउंड लिगामेंट फॉर्सेप्स)



आ. १३६ : स्वस्तिक यंत्र (सूची धरण्यासाठी)





आ. १३७ : सूचि-वक्र, आयात



आ. १३८ : प्राणिज सूत्र ( कॅटगट–शरीर अवयव शिवण्यासाठी )

**पूर्वकर्म :**

अधोदरावरील लव काढून टाकून नाभी व भगास्थी या दोन बिंदूंच्यामध्ये उदराची शस्त्रकर्मे करण्यास योग्य अशी तयार करावी.

निरूह बस्ती द्यावा. मूत्रमार्गातून मूत्राशयात मूत्रनिर्हरण नलिका(नाडीयंत्र) घालून ठेवावी. संमोहनाच्या दृष्टीने वरीलप्रमाणे रुग्णेस तयारी करावी.

**प्रधानकर्म :**

नाभीचे खाली पण भगास्थीच्या वर एक अंगुळपर्यंत असा सरळ उभा छेद घ्यावा व उदरपाटन करावे व गर्भाशयाची स्थिती व आर्तववाहिन्या डोळ्याने पाहाव्या. नंतर तो गर्भाशय हाताने पकडून त्याच्या दोनही बाजूंस शिथिल झालेल्या पेशी ( राउंड लिगामेंट ) दोऱ्याने पकडाव्यात. या पकडलेल्या पेशी ( राउंड लिगामेन्ट फॉर्सेप्समध्ये ) स्वस्तिकयंत्रामध्ये धरून पेरिटोनियम व उदराचे स्नायू यांच्यावर काढाव्यात. त्यानंतर अगोदर पेरिटोनियमचे सीवनकर्म करावे व नंतर त्या दोन्ही पेशी राऊंड लिगामेंट्स एकमेकांस दोऱ्याने घट्ट बांधून शिवाव्यात. त्यानंतर शीथ कॅटगटने शिवून घ्यावा. नंतर बाह्य त्वचेचे सीवनकर्म दोऱ्याने करावे. व्रणकर्म करावे.

या क्रियेमुळे पश्चात्प्रवर्तित असलेला गर्भाशय पुरःप्रवर्तित करून त्याच स्थितीत ठेवला जातो.

**पश्चातकर्म :**

संमोहनाच्या दृष्टीने पथ्यापथ्य प्रथम दिवशी वर सांगितल्याप्रमाणे पाळावे. दुसरे दिवशी भोजन (सामान्य आहार) द्यावा. विहार वर्ज्य करावा.

सूक्ष्म त्रिफळा २ गुं. }
गंधक रसायन १ गुं. } दररोज तीन वेळा. पाण्याबरोबर देणे.

सातव्या दिवशी सीवनसूत्र निर्हरण करावे.

सहा आठवडेपर्यंत ओझे उचलू नये. प्रवास वर्ज्य करावा. व्यायाम बंद ठेवावा.

## ५. गुल्मनिर्हरण

### १. अंतःफलाचे गुल्मनिर्हरण करणे :

**साधने :**

वरीलप्रमाणे, क्रॉकर्स, स्थानिक दहनकर्म करण्यासाठी विजेचे यंत्र (इलेक्ट्रिक कॉटरी)



आ. १३९ : नाडी यंत्र (मूत्रनिर्हरणार्थ)



आ. १४० : स्वस्तिक यंत्र (पिचू धरण्यासाठी)





आ. १४१ : संदंश यंत्र (टॉवेल क्लिप)



आ. १४२ : वृद्धिपत्र (चाकूची मूठ)



आ. १४३ : वृद्धिपत्र (चाकूची पाती)



आ. १४४ : सनिग्रह संदंश यंत्र



आ. १४५ : अनिग्रह संदंश यंत्र



आ. १४६ : स्वस्तिक यंत्र



आ. १४७ : स्वस्तिक यंत्र (क्रॉकर्स)



आ. १४८ स्वस्तिक यंत्र





आ. १४९ : तालयंत्र (उदरविस्तारणार्थ)



आ. १५० : कर्तरी



आ. १५१ : स्वस्तिक यंत्र



आ. १५२ : स्वस्तिक यंत्र ( सूची पकडण्याकरिता )



आ. १५३ : प्राणिज सूत्र ( कॅटगट–शरीर अवयव शिवण्यासाठी )

**पूर्वकर्म :**

वरीलप्रमाणे.

**प्रधानकर्म :**

नाभीपासून खाली भगास्थीपर्यंत गुल्मास योग्य एवढा छेद घ्यावा व उदरपा करावे. त्यानंतर गुल्म हातात पकडून त्याची परीक्षा करावी. त्या गुल्मास अ. पासच्या प्रदेशात संसक्ती असल्यास ती दूर करून गुल्मास मोकळे करावे. त्यानंतः गुल्माच्या मुळापाशी पक्क्या दोऱ्याने घट्ट बांधावे. नंतर दोऱ्याच्या वरच्या बाजूस त्याच्या स्थानापासून कापून काढावा व त्या ठिकाणी विजेच्या सहाय्याने दहनकर्म करावे आणि नंतर उदरावर घेतलेल्या छेदाचे सीवनकर्म करावे.

**२. गर्भाशयस्थ गुल्मनिर्हरण करणे :**

**साधने :**

वरीलप्रमाणे.

**पूर्वकर्म :**

वर सांगितल्याप्रमाण.

**प्रधानकर्म :**

नाभीपासून खाली भगास्थीपर्यंत गुल्मास योग्य एवढा छेद घ्यावा उदरपाटन करावे.



वैद्याने गुल्माचे गर्भाशयातील स्थान व व्याप्ती पाहून त्याप्रमाणे गर्भाशयापासून सोडवून नुसता गुल्म काढावा. किंवा गर्भाशयासह गुल्म शस्त्रकर्माने काढावा. उदरावर घेतलेल्या छेदाचे सीवनकर्म करावे व व्रणकर्म करावे.

**पश्चातकर्म :**

वरीलप्रमाणे.

## ६. गर्भाशयनिर्हरण

**शस्त्रकर्म करण्यास योग्य व्याधी :**

रक्तप्रदर, गर्भाशयस्थ रक्तगुल्म, गर्भाशयस्थ अर्श, त्रिदोषजन्य गर्भाशयदुष्टी अर्बुद, महायोनी, गर्भाशयभ्रंश.

**१. उदरपाटनपूर्वक गर्भाशय निर्हरण करणे :**

**साधने :**

वर सांगितल्याप्रमाणे, स्वस्तिक यंत्र (गर्भाशय पकडण्याकरिता)



आ. १५४ : नाडी यंत्र (मूत्रनिर्हरणार्थ)



आ. १५५ : स्वस्तिक यंत्र (पिचू धरण्यासाठी)



आ. १५६ : संदंश यंत्र ( टॉवेलक्लिप )



आ. १५७ : वृद्धिपत्र (चाकूची मूठ)



आ. १५८ : वृद्धिपत्र ( चाकूची पाती )



आ. १५९ : कर्तरी





आ. १६० : अनिग्रह संदंश यंत्र



आ. १६१ : सनिग्रह संदंश यंत्र



आ. १६२ : स्वस्तिक यंत्र



आ. १६३ : स्वस्तिक यंत्र ( रक्तवाहिन्या व पेशी धरण्याकरिता )



आ. १६४ : स्वस्तिक यंत्र ( क्रॉकर्स )





आ. १६५ : तालयंत्र ( उदरविस्तारणार्थ )



आ. १६६ : स्वस्तिक यंत्र ( गर्भाशय पकडण्याकरिता )



आ. १६७ : स्वस्तिक यंत्र ( सूची पकडण्यासाठी )





आ. १६८ : प्राणिजसूत्र (कॅटगट)



आ. १६९ : सूचि-वक्र आयात

**पूर्वकर्म :**

वरीलप्रमाणे.

**प्रधानकर्म :**

नाभीपासून भगास्थीपर्यंत उभा छेद घेऊन उदरपाटन करावे. गर्भाशयाचे परीक्षण करून गर्भाशयाच संसक्ती असल्यास ती सोडवून वैद्याने गर्भाशय हातात पक्का पकडावा. नंतर गर्भाशयाच्या दोनही अंगांकडील (डाव्या व उजव्या) पेशी व रक्तवाहिन्यांपासून गर्भाशय कापून व पेशी व रक्तवाहिन्या बांधून मोकळा करावा. म्हणजेच अलग करावा. याप्रमाणे गर्भाशयमुखापर्यंत मोकळा केलेला गर्भाशय प्रथम आवर्तापासून गर्भाशयमुखासह कापून वेगळा करून बाहेर काढावा, व उदरावरील छेदाचे सीवनकर्म करून व्रणकर्म करावे.

**विशेष सूचना :**

वरील शस्त्रकर्म करीत असताना वैद्याने मूत्रवाहिनी व मूत्राशय यांचे प्रयत्न-पूर्वक रक्षण करावे.

## २. योनीमार्गे गर्भाशय निर्हरण करणे :

**साधने :**

स्वस्तिक यंत्र (पिचू धरण्याकरिता), कंकमुख स्वस्तिक यंत्रे, संदंश–अनिग्रह व सनिग्रह यंत्र, वृद्धिपत्र, स्वस्तिक यंत्र, (सूची धरण्यासाठी) प्राणिज दोरा, नाडीयंत्र (मूत्रनिर्हरणार्थ धातूचे), योनिवीक्षणार्थ तालयंत्र, वक्र संदंश स्वस्तिक यंत्र. रक्तवाहिन्या व पेशी पकडण्याकरिता)



आ. १७० : स्वस्तिक यंत्र (पिचू धरण्यासाठी).



आ. १७१ : नाडी यंत्र (मूत्रनिर्हरणार्थ)



आ. १७२ : नाडीयंत्र (धातूचे मूत्रनिर्हरणार्थ)





आ. १७३ : तालयंत्र ( योनिवीक्षणार्थ )



आ. १७४ : नाडीयंत्र ( मूत्रनिर्हरणार्थ )



आ. १७५ : कंकमुख स्वस्तिक यंत्र ( गर्भाशय मुख धरण्यासाठी )



आ. १७६ : स्वस्तिक यंत्र



आ. १७७ : स्वस्तिक यंत्र



आ. १७८ : स्वस्तिक यंत्र



आ. १७९ : सनिग्रह संदंश यंत्र



आ. १८० : अनिग्रह संदंश यंत्र





आ. १८१ : वृद्धिपत्र (चाकूची मूठ)



आ. १८२ : वृद्धिपत्र (चाकूची पाती)



आ. १८३ : सूचि—वक्र आयात



आ. १८४ : प्राणिज सूत्र (कॅटगट)



आ. १८५ : स्वस्तिक यंत्र (सूची धरण्यासाठी)

**पूर्वकर्म :**

वरीलप्रमाणे.

**प्रधानकर्म :**

या शस्त्रकर्मामध्ये गर्भाशय हा गर्भाशयमुखापासून त्याच्या दोनही अंगांकडील रक्तवाहिन्या व पेशी यांच्यापासून कापून विभक्त करून योनीमार्गे बाहेर काढावा. या वेळीही मूत्राशय व मलाशय यांचे रक्षण करावे.

**पश्चात् कर्म :**

संमोहनाच्या दृष्टीने पथ्यापथ्य प्रथमदिवशी वर सांगितल्याप्रमाणेच पाळावे. २४ तास तोंडाने काहीही देऊ नये. दुसरे दिवसापासून पेयाहार, ३ रे दिवशी पेयाविलेपी क्रमाने आहारात सुरुवात करून ४ थे दिवसापासून संपूर्ण आहार द्यावा.

मूत्रप्रवृत्ती ८ तासांनंतर न झाल्यास मूत्रनिर्हरणनाडीयंत्राने काढून टाकावी. हळू-हळू विहार करण्यास सांगावे व ५ वे दिवसापासून चालण्यास सांगावे.

सकाळ दुपार संध्याकाळ— सू. त्रिफळा २ गुं.<br>
गं. रसायन १ गुं. पाण्याबरोबर द्यावे.

७ वे दिवशी सीवनसूत्र निर्हरण करावे.

सहा आठवडेपर्यंत ओझे उचलू नये. प्रवास वर्ज्य करावा. व्यायाम बंद ठेवावा.

## २ प्रसवकालीन शस्त्रकर्मे

### १. विटपछेद

**शस्त्रकर्म करण्यास योग्य व्याधी :**

गर्भसंग, संवृतयोनी; मूढगर्भ.

**साधने :**

कर्तरी, सूची, सूत्र (दोरा), कॅटगट, स्वस्तिकयंत्र, स्थानिक संमोहनास लागणारे साहित्य.





आ. १८६ : संदंश यंत्र ( टॉवेल क्लिप )



आ. १८७ : सूचिकाभरणाची पिचकारी व सूची



आ. १८८ : वक्र कर्तरी ( विटपछेदाकरिता )



आ. १८९ : सूचि–वक्र आयात



आ. १९० : प्राणिज सूत्र (कॅटगट)



आ. १९१ : स्वस्तिक यंत्र (सूची धरण्यासाठी)



आ. १९२ : अनिग्रह संदंश यंत्र



आ. १९३ : सनिग्रह संदंशयंत्र





आ. १९४ : स्वस्तिकयंत्र



आ. १९५ : कर्तरी

**शस्त्रकर्म करण्याचा सम्यक् काल :**

योनिमुखाच्या बाह्यपेशीवर गर्भशिराचा ताण पडलेला पाहून त्याच क्षणी विटपछेद करावा. हा विटपछेद झाल्याबरोबर पुढच्या येणाऱ्या आवीबरोबर गर्भशिराचे योनिमुखातून सुलभ तऱ्हेने निष्क्रमण होते.

**पूर्वकर्म :**

योनीची स्वच्छता ठेवावी.

**प्रधानकर्म :**

स्थानिक संमोहन गुद व योनी यांना जोडणारी जी सीवनी तिच्या वरच्या टोकापासून द्यावे. नंतर त्या सीवनीच्या वरच्या टोकापासून विटपछेदास प्रारंभ करुन वाम वा दक्षिण बाजूस आवश्यकतेप्रमाणे सुमारे एक ते दीड इंचापर्यंत तिरका छेद घ्यावा. या छेदामध्ये योनीचा प्रथमावर्तातील काही भाग व बाह्य ओष्ठ हे अंतर्भूत होतात.

प्रत्यक्षामध्ये गर्भिणीला येत असलेल्या आवी विटपछेदामध्ये, विटपछेद केल्याबरोबर काही काल स्थगित झालेल्या आढळतात. याचे कारण घेतलेल्या विटपछेदामुळे अपानवायूची गती त्रासनामुळे कुंठित होते. वैद्याने थोडा काल आवींची वाट पाहिली असता आवी येणे सुरू झालेले आढळते. विटपछेदानंतर योग्य कालात प्रसव झाला पाहिजे. विटपछेद केल्यानंतर २–३ आवींमध्ये प्रसव न झाल्यास गर्भ गर्भशंकूने निर्हरण करावा.



आ. १९६ : विटपछेद करण्यासाठी स्थानिक संमोहन देत असताना



आ. १९७ : विटपछेद करीत असताना



**सीवनकर्म :**



आ. १९८ : विटपछेदाचे सीवनकर्म करताना

योनीच्या प्रथम आवर्ताच्या छेदातील भागाचे सीवनकर्म कॅटगट करून नंतर बाह्य योनीच्या त्वचेच्या ठिकाणचे दोऱ्याने सीवनकर्म करावे व व्रणकर्म करावे.



आ. : १९९ विटपछेदाचे सीवनकर्म केल्यानंतर

**पश्चात्कर्म :**

मलमूत्रविसर्जनानंतर योनीची स्वच्छता ठेवावी. व्रणाच्या ठिकाणचे स्वेदन व स्नेहन दिवसांतून ४–५ वेळा करावे. त्यामुळे व्रण रूढ होण्यास मदत होते. सीवन-सूत्र ६ व्या किंवा ७ व्या दिवशी काढावे.

वैद्याकडून योग्य त्या वेळी विटपछेद घेतला गेला नाही तर योनी व गुद या मार्गामधील जी सीवनी त्या सीवनीचा भेद होऊन गर्भनिष्क्रमण होते. अपत्यपथ व गुद हे दोन्ही मार्ग आघाताने एक होतात व सूतिकेचे मलविसर्जनाचे कार्य तिच्या ताब्यात राहात नाही.

## २. गर्भशंकूने गर्भनिर्हरण करणे

**शस्त्रकर्म करण्यास योग्य व्याधी :**

गर्भसंग, योनिसंवरण, मूढगर्भ.

**गर्भशंकू लावण्यास सम्यक् काल :**

समालंब्य दृढं कर्षेत्कुशलो गर्भशंकुना ।
अभिन्नशिरसं त्वक्षिकूटयोर्गंडयोरपि ॥ वा. शा. २–३२

(१) गर्भशिर अपत्यपथात म्हणजे भगास्थीच्या खाली कटिरात उतरले पाहिजे.

(२) गर्भाशयमुख इतके विस्तृत झाले पाहिजे की गर्भाचा गंडप्रदेश व कान हे वैद्याला योनीमधून सुलभपणे स्पर्शता आले पाहिजेत. या परीक्षणावरून गर्भशिराचे योग्य त्या प्रमाणात परिवर्तन झाले आहे याची खात्री वैद्याला पटते.

**साधने :**

वरीलप्रमाणे विटपछेदाची साधने व गर्भशंकू.



आ. २०० : गर्भशंकू

**पूर्वकर्म :**

मलविसर्जन करून घ्यावे. मूत्रविनिर्हरण नाडीयंत्राने करावे. योनिभागाची स्वच्छता ठेवावी. संमोहनाची तयारी करावी व संमोहनाच्या दृष्टीने गर्भिणीची तयारी करावी.






आ. २०१ गर्भशिराला गर्भशंकूचे डावे (पहिले) पाते लावीत असताना




आ. २०२ : गर्भशिराला गर्भशंकूचे उजवे (दुसरे) पाते लावीत असताना




आ. २०३ : गर्भशिराला गर्भशंकू संपूर्णपणे लावून जमिनीकडे ओढत असताना




आ. २०४ : गर्भशिराला गर्भशंकू संपूर्णपणे लावून आकाशाकडे ओढत असताना



**प्रधानकर्म :**

वैद्याने गर्भशंकूचे डावे पाते डाव्या हातात धरून उजव्या हातात पात्याचे मुख धरावे व ते योनीमध्ये उताण्या स्थितीत पार्श्वभागी गर्भशिराला लागून आत घालावे (आ. २०१). व नंतर ते रुग्णेच्या डाव्या बाजूस उभे वळवावे. याच पद्धतीने गर्भशंकूचे उजवे पाते पण योनीत घालावे (आ. २०२). ही दोन्ही पाती एकमेकांत योग्य तऱ्हेने तात्काल अडकली की गर्भशंकू सम्यक तऱ्हेने लावला गेला असे समजावे. नंतर गर्भशंकू योग्य त्या दिशेने म्हणजेच प्रथम जमिनीकडे (आ. २०३) ओढून गर्भशिराच्या निष्क्रमणाच्या वेळी हळूहळू गर्भशंकूची दिशा वरच्या बाजूकडे म्हणजेच आकाशाकडे (आ. २०४) करावी म्हणजे गर्भशिराचे योग्य तऱ्हेने निष्क्रमण होते.

यानंतर गर्भाचे अंस, उदर, स्फिक् या क्रमाने अवयवाचे निष्क्रमण करून अपरा काढावी. विटपछेदाचे सीवनकर्म करावे व व्रणकर्म करावे.

**पश्चात् कर्म :**

दोन दिवस संपूर्ण विश्रांती द्यावी. त्यानंतर क्रमाक्रमाने विहार करण्यास परवानगी द्यावी. योनीच्या ठिकाणी योनिदुष्टी न होईल या दृष्टीने परिचर्या करावी.

**उपद्रव :**

**१. मातेवर होणारे :**

१. गर्भाशयमुखाचा भेद होणे.
२. योनीचा गुदापर्यंत भेद होणे.
३. योनिदुष्टी.
४. अतिरक्तस्राव.
५. सूतिकारोग.
६. मूत्रमार्गातून नाडीव्रण.
(अ) तात्कालिक.
(ब) परिणामजन्य— ४ थ्या ५ व्या दिवशी परिणाम म्हणून कोथ होतो व त्याचा परिणाम होऊन नाडीव्रण तेथे उत्पन्न होतो.

**१. बालकावर होणारे :**

१. बालकाच्या शिराला इजा होणे.
२. प्रपीडतजन्य वातव्याधी उदा. अर्दित, आक्षेपक.
३. प्रपीडनजन्य नेत्र, ओष्ठ या अवयवांत आघात होणे.




आ. २०५ : १ गर्भशिर, २ गर्भशंकू
गर्भशिराला गर्भशंकू लावलेला असताना दिसणारी आकृती




आ. २०६ : १ गर्भशंकू, २ गर्भशिर
आभुग्न स्थितीत उत्तानगर्भाचे शिरास लावलेला गर्भशंकू



## ३. [1]वामदेवीय प्रसव

बस्तिद्वारे विपन्नायाः कुक्षिः प्रस्पंदते यदि ।
जन्मकाले ततः शीघ्रं पाटयित्वोद्धरेच्छिशुम् ॥   वा. शा. अ. २–५३

### शस्त्रकर्म करण्यास योग्य व्याधी :

मूढगर्भ (उत्क्षेपण–अपक्षेपणादी क्रिया करणे जेथे अशक्य होतील त्या ठिकाणी); मूढगर्भ -अपरादर्शन; योनिसंवरण; गुल्म व गर्भ एकाच वेळी असणे; प्रसवामध्ये माता किंवा गर्भ यांपैकी एकास किंवा दोघांनाही विपन्नावस्था प्राप्त झाली असताना; गर्भोपद्रव.

### शस्त्रकर्म करण्यास अयोग्य :

(१) मृतगर्भा—क्वचित वेळी मृतगर्भ असून योनिसंवरण असेल तर अपरिहार्य म्हणून वामदेवीय करूनच गर्भनिष्क्रमण करावे लागते.

(२) विकृतगर्भा– जलशीर्षक, विपुलशिर, मस्तिष्काचा अभाव असणे. (क्ष-किरण प्रतिमा काढून याचे निदान गर्भिणी अवस्थेत साधारणतः ९ व्या महिन्यात करता येते.)

### साधने :

वृद्धिपत्र (चाकूची पाती व मूठ,) स्वस्तिकयंत्र (सूची धरण्यासाठी), स्वस्तिक यंत्र (पिचू धरण्यासाठी), नाडीयंत्र (मूत्रनिर्हरणार्थ) सूची, अनिग्रह व सनिग्रह संदंशयंत्र, कॅटगट, दोरा नं. १०, तालयंत्रे (उदरविस्तारास्तव), स्वस्तिकयंत्रे, कर्तरी.



आ. २०७ : नाडी यंत्र (मूत्रनिर्हरणार्थ)

१ वामदेवीय–संदर्भ–ऋग्वेद ४-१८ ते २६.



आ. २०८ : स्वस्तिकयंत्र ( पिचू धरण्यासाठी )



आ. २०९ : संदंश यंत्र ( टॉवेलक्लिप )



आ. २१० : सूचिकाभरणाची पिचकारी व सूची



आ. २११ : वृद्धिपत्र ( चाकूची पाती )





आ. २१२ : वृद्धिपत्र ( चाकूची मूठ )



आ. २१३ : कर्तरी



आ. २१४ : स्वस्तिक यंत्र



आ. २१५ : स्वस्तिक यंत्र



आ. २१६ सनिग्रह संदंश यंत्र



आ. २१७ : अनिग्रह संदंश यंत्र



आ. २१८ : स्वस्तिक यंत्र



आ. २१९ : तालयंत्र ( उदरविस्तारणार्थ )





आ. २२० : स्वस्तिक यंत्र (सूची धरण्यासाठी)



आ. २२१ : सूचि–वक्र आयात



आ. २२२ : प्राणिज सूत्र (कॅटगट)

**पूर्वकर्म :**

बस्ती देऊन मलाशय व मूत्राशय रिक्त करावा. उदरावरील लव वगैरे काढून उदराची शुचिता ठेवावी. मूत्राशयात नाडीयंत्र घालून ठेवावे. संमोहनाच्या दृष्टीने रुग्णेस तयार करावी.




## प्रधानकर्म :

स्थानिक किंवा सार्वदेहिक संमोहन देऊन मगच शस्त्रकर्मास सुरुवात करावी.

नाभीपासून भगास्थीपर्यंत उदरावर उभा छेद घेऊन उदरपाटन करावे. गर्भाशयाच्या अधोभागी मूत्राशयाला खाली ढकलून आडवा चंद्राकृती असा छेद घ्यावा. गर्भाचे शिर अथवा पाय धरून गर्भाला गर्भाशयाच्या बाहेर ओढून काढावा (उद्धरेत् शिशुम्).

आ. २२३ : वामदेवीय प्रसवांत चंद्राकृती गर्भाशय भेदन करीत असताना



आ. २२४ : वामदेवीय प्रसव–गर्भाशयावर छेद घेतल्यानंतर वैद्याने आपला उजवा हात गर्भाशयात घालून गर्भशिर बाहेर काढीत असताना



या पद्धतीने गर्भनिष्क्रमण करीत असताना गर्भाच्या अवयवांना इजा पोहोचणार नाही याची काळजी वैद्याने घ्यावी. गर्भनिष्क्रमणानंतर अपरानिर्हरण करून गर्भाशयाला घेतलेल्या छेदाचे कॅटगटचे सीवनकर्म करावे व त्यानंतर उदराचे वरील बाह्यत्वचेचे सीवनकर्म दोऱ्याने करावे. व्रणकर्म करावे.

संमोहन दिल्यापासून दोन ते तीन मिनिटांमध्ये गर्भाचे निष्क्रमण झाले पाहिजे हे लक्षात ठेवावे.




आ. २२५ : वामदेवीय प्रसव–ज्या वेळी गर्भाशयावर चंद्राकृती छेद घेणे शक्य नसेल त्या वेळी उभा छेद घेऊन बालकास बाहेर काढीत असताना

## पश्चात् कर्म :

२४ तासांपर्यंत तोंडाने काहीही देऊ नये. (पाणीसुद्धा देऊ नये). २४ तास संपूर्ण विश्रांती द्यावी. नंतर हळूहळू थोडेथोडे पाणी देऊन द्रवाहार देण्यास सुरुवात करावी. तसेच हालचाल पण करण्यास सांगावी.

तिसरे दिवशी बस्ती द्यावा. क्रमाक्रमाने रुग्णेस सामान्य भोजन देण्यास सुरुवात करावी. सातवे दिवशी सीवनसूत्र निर्हरण करून व्रणकर्म करावे. उदरबंध बांधावा.

दोन महिने जिन्याची चढउतार करू नये. जड उचलू नये. स्नेहन, स्वेदन देण्यास हरकत नाही. परंतु उदरभागी चोळू नये.

## ४. आर्तववाहिनी छेदन वा वंध्यत्वीकरण

ही शस्त्रक्रिया स्त्रियांवर करतात. ती कधीही करता येण्यासारखी असली तरी ती प्रसूतीच्या तिसऱ्या दिवसापासून पाचव्या ते सातव्या दिवसापर्यंत करणे जास्त सुलभ जाते. मासिक पाळीचे ५–६ वे दिवशी-(संभोग होण्यापूर्वी) सुद्धा हे शस्त्रकर्म करता येते.

हे शस्त्रकर्म करण्याच्या दोन पद्धती आहेत त्या अशा—

(१) उदरपाटनपूर्वक वंध्यत्वीकरण.

(२) योनीमार्गे वंध्यत्वीकरण.

### १. उदरपाटनपूर्वक वंध्यत्वीकरण :

**साधने :**

वृद्धिपत्र—चाकूची पाती व मूठ, स्वस्तिक यंत्रे (एक सुई धरण्यासाठी व दुसरे पिचू धरण्यासाठी). नाडी यंत्र (मूत्रनिर्हरणार्थ), सूची, अनिग्रह व सनिग्रह संदंश यंत्र, कॅटगट, दोरा नं. १०, तालयंत्र (उदरविस्तारणार्थ), स्वस्तिक यंत्रे, कर्तरी, स्वस्तिकयंत्र (आर्तववाहिनी धरण्यासाठी).



-आ. २२६ : स्वस्तिक यंत्र (पिचू धरण्यासाठी)



आ. २२७ : नाडीयंत्र (मूत्रनिर्हरणार्थ)





आ. २२८ : संदंश यंत्र ( टॉवेल क्लिप )



आ. २२९ : ताल यंत्र ( उदरविस्तारणार्थ )



आ. २३० : सनिग्रह संदंश यंत्र



आ. २३१ : अनिग्रह संदंश यंत्र



आ. २३२ : वृद्धिपत्र ( चाकूची मूठ )



आ. २३३ : वृद्धिपत्र (चाकूची पाती)



आ. २३४ : स्वस्तिक यंत्र



आ. २३५ : कर्तरी



आ. २३६ : स्वस्तिक यंत्र





आ. २३७ : स्वस्तिक यंत्र (आर्तववाहिनी धरण्यासाठी)



आ. २३८ : सूची, वक्र आयात



आ. २३९ : स्वस्तिक यंत्र (सूची पकडण्यासाठी)



आ. २४० : प्राणिज सूत्र (कॅटगट)

## पूर्वकर्म :

बस्ती देऊन मलाशय व मूत्राशय रिक्त करावा. उदरावरील व बाह्य योनीच्या ठिकाणचे केस काढून दोन्हींचीही शुचिता ठेवावी. मूत्राशयात नाडीयंत्र घालून ठेवावे. संमोहनाच्या दृष्टीने रुग्णेस तयार करावी.

## प्रधानकर्म :

सार्वदेहिक संमोहन देऊन मगच शस्त्रकर्मास सुरुवात करावी.

उदरपरीक्षण करून गर्भाशयाची उंची लक्षात घेऊन साधारणतः गर्भाशयाच्या उंचीच्या वर ½" व खाली ½" असा अंदाजे १ ते १½" पर्यंत उभा छेद घ्यावा (उदरावर आडवा १ ते १½ इंचापर्यंत छेद घेऊनही हे शस्त्रकर्म करता येते. ) व उदरपाटन करावे. गर्भाशयाच्या वाम व दक्षिण बाजूस एक एक अशा दोन आर्तववाहिन्या आहेत. त्यांतील एक आर्तववाहिनी स्वस्तिकयंत्राने धरावी व ती दुसऱ्या टोकाजवळ म्हणजेच अंतःफलाकडील बाजूला स्वस्तिक यंत्राने धरून तेथेच सूत्र व सूचीने दोन वेळा सीवनकर्म करावे. त्या सीवनकर्माच्या व बंधाच्या वरची बाजू स्वस्तिक यंत्राने धरावी व त्यावरील बाजू कापून टाकावी व कापून टाकलेल्या जागी पण दाबून टाकावे म्हणजे क्वचित वेळी होणारा अत्यल्प प्रमाणातील रक्तस्राव थांबतो. तो थांबला आहे ना ? याची खात्री करून ती आर्तववाहिनी बोटाने जागेवर सरकवावी (ठेवावी). याच पद्धतीने दुसऱ्या आर्तववाहिनीचे शस्त्रकर्म करावे. तदनंतर उदरपाटन केलेल्या भागाचे प्रथम कॅटगटने व बाह्य त्वचेचे सूत्राने सीवनकर्म करावे. व्रणकर्म करून पटबंध बांधावा.

याच पद्धतीने उदरपरीक्षणावरून गर्भाशयाच्या उंचीचा अंदाज लक्षात घेऊन त्याच्या वर, खाली व उभय बाजूंस (वाम व दक्षिण) तिरक्या रेषेत दोन इंचांपर्यंत स्थानिक संमोहन देऊन आर्तववाहिनी छेदनकर्म करावे.

रुग्णेचे शस्त्रकर्म प्रसूतीनंतर पाच दिवसांच्या आत केल्यास उदरावरील छेद लहान (१–१½ इंच) घेतला तरी चालतो. परंतु तदनंतर व मासिक पाळीच्या पाचव्या सहाव्या दिवशी (प्रथम संभोग होण्यापूर्वी) शस्त्रकर्म करीत असताना मात्र छेद मोठा (३–४ इंच) घ्यावा लागतो. कारण गर्भाशय पूर्वस्थितीप्रत गेलेला असतो.



## पश्चात्कर्म :

वरीलप्रमाणे.

## २. योनिमार्गे वंध्यत्वीकरण :

## साधने

वरीलप्रमाणे व योनिवीक्षण यंत्र, द्वितालयंत्र, ( गर्भाशयमुख धरण्यासाठी ) कंकमुख स्वस्तिकयंत्र.



आ. २४१ : अर्धनाडी ( योनिवीक्षणार्थ )



आ. २४२ : द्वितालयंत्र



आ. २४३ कंकमुख स्वस्तिक यंत्र ( गर्भाशयमुख धरण्यासाठी )

**पूर्वकर्म :**

वरीलप्रमाणे.

**प्रधानकर्म :**

सार्वदैहिक संमोहन दिल्यानंतर पुन्हा एकदा नाडीयंत्राने मूत्रनिर्हरण करावे व मगच शस्त्रकर्मास सुरुवात करावी.

योनीमध्ये अर्धनाडीयंत्र (योनिवीक्षण यंत्र) घालावे. गर्भाशयमुख कंकमुख स्वस्तिक यंत्राने धरावे व त्याच्या पूर्व वा पश्चात भागी पेरिटोनियमला आडवा चंद्राकृती साधारणत: १½ ते २ इंचपर्यंत छेद घ्यावा. तेथून गर्भाशयाच्या अगदी जवळून वाम वा दक्षिण बाजूस असलेल्यांपैकी एक आर्तववाहिनी स्वस्तिकयंत्राने धरावी व तिच्या दुसऱ्या म्हणजेच अंत:फलाकडील टोकाजवळ ती स्वस्तिकयंत्रात धरून दोनदा सूत्र व सूचीने सीवनकर्म करावे व बांधावे. वरील भाग कापून टाकून दाबून टाकावा. तसेच दुसऱ्या आर्तववाहिनीचे शस्त्रकर्म करावे. व त्या पूर्ववत सरकवाव्यात (ठेवाव्यात). पेरिटोनियमचे सीवनकर्म कॅटगटने प्रथम करून नंतर प्रथमावर्ताचे सीवनकर्म करावे व व्रणरोपण करावे.

**पश्चात् कर्म :**

संमोहनाच्या दृष्टीने पथ्यापथ्य पाळावे. दुसरे दिवसापासून पेयाविलेपी क्रमाने व चवथे दिवसापासून सामान्य आहार द्यावा. हळूहळू विहारास पण परवानगी देऊन रुग्णेस ४ थ्या दिवशी चालण्यास लावावे.

सकाळ, दुपार, संध्याकाळ-सूक्ष्म त्रिफळा २ गुंजा,
गं. रसायन १ गुं. पाण्याबरोबर द्यावे.

सातव्या दिवशी सीवनसूत्र निर्हरण करावे.

१½ महिनापर्यंत जड उचलू नये. व्यायाम बंद ठेवावा.

**वंध्यत्वीकरणाचे परिणाम :**

(१) वंध्यत्व

(२) मैथुनाचे असहत्व—योनिमार्गे वंध्यत्वीकरण शस्त्रकर्म करून घेणाऱ्या स्त्रियांमध्ये याचे प्रमाण जास्त आढळते.

(३) रज व आर्तव यांच्या विकृती : रज:क्षीणता, रक्तप्रदर (रजाची अतिप्रवृत्ती), रजाची अकाली निवृत्ती.

(४) उदरशूल—अधोदरातील अवयवांची एकमेकांशी संसक्ती होऊन उदरशूल उत्पन्न होतो.



# संततिप्रतिबंधक उपाय

कुटुंब नियोजित राहावे अशी इच्छा असेल तर अपत्यांची संख्यादेखील नियोजितच असणे आवश्यक ठरते आणि यासाठी म्हणून प्रत्येक व्यक्तीने गर्भधारणेची व गर्भपोषणाची क्रिया याविषयी माहिती करून घेऊन त्याप्रमाणे आपले वर्तन ठेवणे आवश्यक आहे.

**गर्भधारणा :**

गर्भधारणेस आवश्यक अशा गोष्टी खालीलप्रमाणे आहेत.

ज्याप्रमाणे उत्तम धान्य मिळविण्याकरिता म्हणून उत्तम शेत, उत्तम बीज, भरपूर पाणी व शेताचे उत्तम संरक्षण याची आवश्यकता भासते त्याचप्रमाणे उत्तम संतती प्राप्त करून घेण्याकरिता निरोगी असा गर्भाशय, उत्तम गर्भबीज, त्याच प्रमाणे गर्भाचेही पोषण करणारे भाव (रसरक्तादी) उत्तम प्रकारे असणे आवश्यक ठरते.




आ. २४४: पुरुष इंद्रियांचा बाजूने दिसणारा भाग.
(बाणाची टोके पुंबीजाचा मार्ग दाखवितात.)

| | |
|---|---|
| १. शिश्न, | ४. मूत्राशय, |
| २. वृषण, | ५. शुक्रवहस्रोतस्, |
| ३. मूत्राष्ठिला, | ६. शुक्रवाहिनी |




आ. २४५ : पुरुष इंद्रियाचा पुढून:दिसणारा भाग.
( बाणाची टोके पुंबीजाचा मार्ग दाखवितात. )

१. शिश्न,
२. वृषण,
३. मूत्राष्ठिला,
४. मूत्राशय,
५. शुक्रवह स्रोतस्,
६. शुक्रवाहिनी.




आ. २४६ :
स्त्री इंद्रियाचा बाजूने दिसणारा भाग. ( बाणाची टोके स्त्रीबीजाचा मार्ग दाखवितात. )

| | |
|---|---|
| १. गर्भाशय, | २. अंतःफल, |
| ३. आर्तववाहिनी, | ४. मूत्राशय, |
| ५. योनिलिंग, | ६. योनिपटल, |
| ७. प्रथमावर्त. | |

स्त्रीमध्ये प्रत्येक महिन्याला तिच्या अंतःफलापासून एक अथवा दोन दोन बिंद्वात्मक आर्तव ( स्त्रीबीजे ) बाहेर टाकली जातात. याच कालामध्ये गर्भाशयामध्ये गर्भधारणेस योग्य असे क्षेत्र तयार झालेले असते व याच कालाला 'ऋतुकाल' अशी संज्ञा आयुर्वेदीय ग्रंथांत दिलेली आढळते. हा ऋतुकाल सर्वसाधारण स्त्रियांमध्ये मासिक पाळीच्या अगोदर १४ दिवस असतो. परंतु काही स्त्रियांमध्ये हा ऋतुकाल मासिक पाळी सुरू होण्याच्या आदले दिवसांपर्यंतसुद्धा असण्याची शक्यता असते. अंतःफलातून बाहेर पडलेले आर्तव ( स्त्रीबीज ) आर्तववाहिनीमध्ये आकर्षिले जाते. याच वेळी स्त्री-पुरुष समागमानंतर योनीमध्ये प्रथम आवर्तामध्ये शुक्रच्युतीनंतर






आ. २४७ :
स्त्री इंद्रियाचा पुढून दिसणारा भाग.

| | |
|---|---|
| १. आर्तववाहिनी, | ३. योनि–प्रथमावर्त |
| २. अंतःफल, | ४. आर्तव-स्त्रीबीज, |
| ५. शुक्र व आर्तव यांच्या संयोगाची जागा | ६. शुक्र |

शुक्रामध्ये असलेल्या असंख्य पुंबीजा– (पुरुष बीज) मधील एक पुंबीज हा गर्भाशया-मध्ये प्रविष्ट होऊन आर्तववाहिनीमधीलआर्तवामध्ये ( स्त्रीबीजामध्ये ) प्रविष्ट होते.

प्रविष्टमात्रं बीजं हि रक्तेन परिवेष्टते ।
—का. शा. असमानगोत्रीय अध्याय, पान ७०

यालाच शुक्रार्तवसंयोग असे म्हणतात व याच वेळी आत्मा प्रविष्ट होतो व असे बीज आर्तववाहिनीमधून गर्भाशयामध्ये ऋतुकालात तयार केलेल्या भूमीमध्ये पेरले जाते म्हणजेच संसक्त होते. या क्रियेलाच गर्भधारणा असे म्हणतात.

आतापर्यंत गर्भधारणा कशी होते ते आपण पाहिले. यापुढे या गर्भाची मासानुमासिक वाढ होत असते. ही वाढ गर्भिणीने घेतलेल्या आहारामुळे तिच्याच आहार-रसामार्फत होत असते. गर्भाचे पोषण उत्तम तऱ्हेने व्हावे म्हणून गर्भिणीची मासानुमासिक परिचर्या गर्भिणी विज्ञानीय प्रकरणात पान क्र. २१३ व ३३० वर पाहावी. असा हा गर्भ उत्तम (सुलभ) तऱ्हेने कसा प्रसव पावेल याचेही विवेचन सूतिका विज्ञानीय प्रकरणी पृ. ३४५ वर पाहावे.

या प्रकरणात आपणास संतति-प्रतिबंधक योजना अभिप्रेत आहेत. त्यासाठी म्हणून वरील प्रकरणाचा ऊहापोह केला आहे.






## [ १ ] संपूर्ण ब्रह्मचर्य

ही पद्धती बहुसंख्य लोकांना मानवणारी नाही. स्त्री व पुरुष या दोघांची आध्यात्मिक बैठक बळकट असेल तरच त्यांना संपूर्ण ब्रह्मचर्य पाळणे साध्य होते.

३५ ते ४० वर्षे वयाच्या सुमारास असलेल्या पति-पत्नींमध्ये संभोगाची इच्छा ही पहिल्यापेक्षा कमी झालेली आढळते. याच वयात जर अध्यात्माची जोड मिळाली तर हे जास्त सुलभ होऊ शकेल. २५ ते ३५ वर्षे वयाच्या पति-पत्नींना या योजनेचा अवलंब करण्याचा सल्ला देऊ नये.

## [ २ ] संभोग घेऊनही गर्भधारणा होऊ न देणे

### ( १ ) साधने न वापरता – ( अ ) अपूर्ण संभोग :

या पद्धतीमध्ये शुक्रच्युती होण्याची वेळ निर्माण होत असताना पुरुषाने आपले इंद्रिय योनीतून तात्काळ बाहेर काढून शुक्रच्युती योनीच्या बाहेर करावी.

या पद्धतीचा अवलंब करणारे समाजामध्ये बरेच लोक सापडतात. कारण या पद्धतीला पैसा खर्च करावा लागत नाही. किंवा साधनेही वापरावी लागत नाहीत. आणि सामान्यपणे संभोगाला जेवढा एकांत लागतो, तेवढ्या किंवा त्यापेक्षा अधिक एकांताची जरुरी लागत नाही. असे असले तरीही ही पद्धती अनैसर्गिक आहे. कारण त्यामध्ये लैंगिक संभोग अपुरा राहतो व सतत मानसिक ताण पडतो. वर्षानुवर्षे जर ही पद्धत अंगीकारली तर शारीरिक व मानसिक अस्थिरता निर्माण होते. तेव्हा ही पद्धत घातक आहे. जर काटेकोरपणे अंमलात आणली तर ही तद्‌विषयक सल्ला केंद्राची मदत न घेता सत्तर टक्के परिणामकारक व यशस्वी होत असते. यापासून सारांश असा निघतो की, ज्या वेळी इतर पद्धती काही कारणाने साध्य नसतील त्या वेळी ही पद्धत जरूर पडल्यास अंमलात आणावी.

ज्या पुरुषांचे वीर्यपतन लौकर होते, व पुरुष किंवा स्त्री यांना मानसिक ताण पडतो, संभोग वासनेला तडा पडतो अशा व्यक्तींना ही पद्धत मुळीच उपयोगाची नाही.

ही पद्धत वापरणाऱ्या लोकांमध्ये दोघांमध्येही मानसिक विकृती उत्पन्न झालेली आढळते.

### ( ब ) सुरक्षित काल पद्धती [ ऋतुकालातीत ( सुरक्षित कालात ) संभोग घेणे ]

या पद्धतीला 'ताल' पद्धती किंवा इंग्रजीमध्ये रिदम् पद्धती म्हणतात. ही पद्धती पुढे दिलेल्या तीन मूलभूत सिद्धांतांवर आधारलेली आहे.

(१) आगामी मासिक स्रावाच्या पूर्वी १४ दिवस आर्तव (स्त्री-बीज) आर्तववाहिनीमध्ये सरकलेले असते ( ऋतुकाल ).

(२) आर्तव (स्त्रीबीज) या वाहिनीमध्ये आल्यावर अठ्ठेचाळीस तासच जिवंत राहू शकते.

(३) शुक्र (पुरुषबीज) अधिकात अधिक बहात्तर तास जिवंत स्थितीत राहू शकते.

तेव्हा मासिक चक्रामध्ये फक्त मधल्या पाच ते सहा दिवसांच्या अवधीतच गर्भधारणा होऊ शकते. इतर दिवशी नैसर्गिक संभोग केला तरीसुद्धा गर्भधारणा होऊ शकत नाही. ही पद्धती पन्नास टक्के यशस्वी होते असे आढळून आले आहे. कारण आर्तव (स्त्रीबीज) निर्माण करण्याची क्रिया (ऋतुकाल) किंवा मासिक पाळी एकाच स्त्रीच्या बाबतीत केव्हाही अनियमित होण्याची शक्यता असते. जर आर्तव (स्त्रीबीज) आर्तववाहिनीमध्ये जाण्याचे दिवस (ऋतुकाल) किंवा मासिक पाळी अनियमित असेल तर ही पद्धत अयशस्वी होते.




आ. २४८ : सुरक्षित कालपद्धती चक्र

सुरक्षित कालांतर शोधून काढण्याच्या तीन रीती आहेत. मासिक पाळी सुरू झाल्यावर दिवस मोजण्याची पहिली रीत. पुढे एक तक्ता देण्यात आला आहे. त्यामध्ये निरनिराळ्या मासिक पाळ्यांच्या बाबतीत सुरक्षित काळ कोणता हे दर्शविण्यात आले आहे.

अष्टांगसंग्रहाच्या मताप्रमाणे निरनिराळ्या प्रकृतींच्या (वात, पित्त, कफ) स्त्रीमध्ये निरनिराळे ऋतुकालांचे दिवस सापडतात.



उदा. वातप्रकृती स्त्रीमध्ये–अनियमित असतात.
पित्तप्रकृती स्त्रीमध्ये– मासिक पाळीच्या १४ ते १९ दिवसपर्यंत असतात.
कफप्रकृती स्त्रीमध्ये–मासापर्यंत (मासभर) ऋतुकालांचे दिवस असतात.

## सुरक्षितकाल

| मासिक पाळीचा दिवस | सुरक्षित काल | शेरा |
|---|---|---|
| २४ दिवस | दिवस १५ वा ते २३ वा. | पाळीच्या दिवसापासून दिवस मोजणे. ज्या दिवशी मासिक पाळी चालू होते, तो पहिला दिवस. |
| २५ दिवस | दिवस १६ वा ते २५ वा | |
| २६ दिवस | दिवस ६ वा, ७ वा<br>आणि १७ वा ते २३ वा | |
| २७ दिवस | दिवस ६ वा ते ८ वा<br>दिवस १८ वा ते २७ वा | |
| २८ दिवस | दिवस ६ ते ९ वा<br>दिवस १८ वा ते २८ वा | |
| २९ दिवस | दिवस ६ ते १०<br>दिवस २१ वा ते २९ वा | |
| ३० दिवस | दिवस ६ वा ते ११ वा<br>दिवस २२ वा ते ३० वा | |
| ३१ दिवस | दिवस ६ वा ते १२<br>दिवस २३ वा ते ३१ वा | |

दुसरी रीत उष्णतामानाचा तक्ता ठेवणे ही आहे. म्हणजेच ऋतुकाल निश्चित करण्याची रीत होय. हे तपमान स्त्रीच्या गुदद्वारातून मोजावे लागते. ऋतुकालाच्या काळात हे तपमान इतर काळापेक्षा १°. ने वाढलेले सापडते. याकरिता म्हणून सबंध महिनाभर या तपमानाचा तक्ता ठेवावा लागतो. त्यामुळे ही रीत व्यवहार्य ठरत नाही.

तिसरी रीत म्हणजे पुढे दिलेल्या नियमावलीप्रमाणे सुरक्षित अवधी मुक्रर करणे होय !

(१) ज्या दिवशी मासिक पाळी चालू होते त्या दिवशी पहिला दिवस धरावा. उदा०—पहिला सोमवार. पुढच्या आठवड्यात तोच सोमवार दुसऱ्या पाळीचा समजावा. आणि असेच पुढे चालू ठेवावे.

(२) मासिक पाळी सुरू झाल्यापासून (पाचव्या दिवसापासून) ते दुसऱ्या पाळीच्या दिवसापर्यंतचा काल (दुसऱ्या सोमवारपर्यंत). हा गर्भाधानापूर्वीचा सुरक्षित काल समजावा.

( ३ ) दुसऱ्या पाळीचा दिवस म्हणजे दुसरा सोमवार ते चौथ्या पाळीच्या दिवसापर्यंतचा काल हा गर्भधारणेला योग्य काल आहे. हे कालांतर असुरक्षित कालांतर समजावे.

( ४ ) पाळीच्या चौथ्या दिवसापासून ( चौथा सोमवार ) ऋतुदर्शनाची पुढची पाळी सुरू होईपर्यंत गर्भधारणा होण्याच्या नंतरचे कालांतर म्हणजे ऋतुकालातीत कालावधी असतो. या सुरक्षित कालावधीमध्ये संततिप्रतिबंधक साधने उपयोगात आणावी आणि त्या उत्पादनाच्या कालावधीमध्ये किंवा असुरक्षित कालावधीत संपूर्ण संयम पाळावा.

## २. साधने वापरून संभोग घेणे व गर्भधारणा होऊ न देणे.

### ( अ ) रासायनिक पद्धती :

या पद्धतींत दोन रासायनिक पद्धती आहेत. त्या म्हणजे फेस गोळ्या व जेली.

### ( १ ) फेस गोळ्या :




संभोगापूर्वी तीन किंवा चार मिनिटे पाण्यात बुडवून ओली केलेली फेस गोळी (फोम टॅब्लेट्स) जननेंद्रियामध्ये शक्य तेवढ्या खोल बसवावी. प्रत्येक संभोगाच्या वेळी

आ. २४९ : स्त्री इंद्रिये ( फेसाच्या गोळीचा फेस असलेली )



नवी गोळी वापरावी. शुक्राची (पुं बीज) हालचाल ही गोळी थांबविते त्याच वेळी शुक्र (पुं बीजे) मारक रसायन बहुतेक शुक्र (पुं बीजे) मारते. ही फेस गोळी अथवा फोम टॅब्लेट साठ ते सत्तर टक्के परिणामकारक असते. सुरक्षित कालावधीत ह्या फेस गोळ्यांची पद्धत अंमलात आणली तर परिणामाचे प्रमाण जादा वाढेल. ही गोळी सुरक्षित कालावधीच्या वेळी वापरावी व उत्पादक किंवा धोक्याच्या कालावधीमध्ये संपूर्ण संयम पाळावा.

तीन ते आठ टक्के स्त्रिया फेस गोळी वापरल्यानंतर योनिकंडू, दाह किंवा श्वेत-स्रावाची तक्रार करतात. तसे होत असल्यास ही गोळी वापरू नये. तसेच याबाबत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

### ( २ ) जेली पद्धत ( जेली व पिचकारी पद्धत )

जेली लावण्याच्या पिचकारीसह मिळते. या पद्धतीचा शिफारस करण्यात आली आहे. ही पद्धत अशी :—




आ. २५० : जेली पद्धत

संपूर्ण पिचकारीमध्ये जेली घ्यावी व नंतर ती योनीमध्ये खुपेपर्यंत, जितक्या खोल सोडता येईल तितकी सोडावी. प्रत्येक वेळी जेली नव्याने घ्यावी. जेलीचा परिणाम

नव्वद टक्क्यांपेक्षाही जास्त होतो व योनि-कंडू किंवा दाह झाल्याची तक्रारही नाही. काहीजण तिच्या बुळबुळीतपणाबद्दल तक्रार करतात एवढेच ! जेली लावण्याची पिचकारी उकळू नये. जेली भरून वापरण्यापूर्वी पिचकारी साबणाच्या कोमट पाण्याने धुवून घ्यावी.

( बाजारामध्ये अनेक तऱ्हेच्या जेली आहेत. त्यांमध्ये प्रिसेप्टीन जेली सर्वांत जास्त परिणामकारक आहे म्हणून तिची शिफारस करण्यात येते. )

### ( ब ) तांत्रिक व रासायनिक पद्धत :

### ( १ ) रबरी पिशवी ( शीथ कंडोम ) पद्धती




आ. २५१ : गुंडाळी उलगडलेली टोपी ( कंडोम )

ही रबरी पिशवी हवेत उडविण्याच्या फुग्यासारख्या पातळ लॅटेक्स रबराची करतात. ही पिशवी किंवा टोपी पुरुषांनी वापरावयाची असते. या टोपीबरोबरच संततिनियमनाची जेली वापरण्याचा प्रघात आहे. जेली नसल्यास मऊ व बुळबुळीत करणारे वंगणसुद्धा वापरतात. धुण्यास योग्य नसलेल्या अशा टोप्या एकदाच वापरावयाच्या असतात वा धुण्यास योग्य असणाऱ्या टोप्या ( ह्या टोप्या जाड



लॅटेक्स रबराच्या किंवा कातड्याच्या असतात. ) राखून ठेवतात. या एक किंवा दोन महिने वापरता येतात.

ही टोपी उत्थापित शिश्नावर चढवावयाची असते. तिच्या टोकाला जवळजवळ एक इंच जागा हवा काढून वीर्य राहण्यासाठी व फाटू नये म्हणून सोडायची असते.

ही टोपी वापरण्यापासून त्याचा परिणाम पंच्याण्णव टक्के यशस्वी होतो. धुण्यास योग्य नसणाऱ्या पिशव्या धुण्यास योग्य असणाऱ्या टप्युत्रांपेक्षा अधिक पसंत केल्या जातात.

टोपी वापरताना पुढील मुद्दे लक्षात ठेवले पाहिजेत.

( १ ) टोपी विश्वासार्ह कारखानदाराने तयार केलेली असावी.

( २ ) तिच्यामध्ये हवा अगर पाणी घालून, सूक्ष्म छिद्रे, हवेचा फुगा, घट्टा, रबर जोडण्यासाठी मारलेला पॅच, इ. आहेत की काय याची चाचणी करावी.

( ३ ) ही टोपी चढवल्यावर त्यातील हवा दाबून बाहेर काढली पाहिजे.

( ४ ) शुक्रस्खलनानंतर शिश्नाचे उत्थापन कमी होण्याच्या आत शिश्नासहित टोपी बाहेर काढून घ्यावी.

( ५ ) शिश्न बाहेर काढीत असता त्याच्या मुळाकडे असलेली टोपीची कडा बोटाने धरावी.

( ६ ) धुण्यास योग्य असणारी टोपी, साबणाने व पाण्याने धुवावी, सुकवावी व तिला पावडर लावावी. ही टोपी पुन्हा वापरण्यापूर्वी परत ती तपासून घ्यावी.

## [ २ ] डायफ्रॅम अथवा गोल टोप्या व जेली

स्त्रियांच्या जननेंद्रियांमध्ये (प्रथमावर्तात) शुक्रनाशक (पुं. बीजनाशक) जेली फासलेली व योजलेल्या ठराविक आकाराची पेसरी किंवा टोपी बसविण्याची एक पद्धत आहे. ही पेसरी बरोबर बसविण्याची रीत केंद्रावर समजावून घ्यावी लागते. सर्वसाधारणपणे वापरण्यात येणाऱ्या जेलीला ' ऑर्थेजिनॉल जेली ' असे म्हणतात. या डायफ्रॅम पेसरीजना किंवा वर्तुळाकार पेसरीजना किंवा टोप्यांना त्यांच्या आकारानुसार ५०, ५५, १०० असे क्रमांक दिलेले असतात. हे क्रमांक त्या पेसरीचा आस (डायमीटर) मिलिमीटरमध्ये दर्शवितात (ते दोन तऱ्हेचे असतात.)

( १ ) वाटोळी स्प्रिंग व कॉइल स्प्रिंग असलेल्या टोपीमधील लागोपाठ आकारामध्ये २·५ व ५ मिलिमीटर्स प्रत्येकी फरक असतो.

ही टोपी किंवा डायफ्रॅम वापरताना पुढील मुद्दे लक्षात घ्यावेत :–

डॉक्टरनी माप घेऊन सांगितलेल्या आकाराचा डायफ्रॅम विकत घ्यावा,

योनीमध्ये ही टोपी बसवितांना मूत्राशय रिकामा करावा आणि भाग धुवावेत व शय्येवर पडण्यापूर्वी ही टोपी बसवावी. कुटुंबनियोजन केन्द्रावर शिकविलेल्या पद्धतीने ही टोपी किंवा पेसरी बसवावी.

हिच्या दोन्ही बाजूला संततिप्रतिबंधक जेली लावावी.

ह्या पेसरीने गर्भाशयाचे मुख, प्रथमावर्त व द्वितीयावर्ताच्या संधीमध्ये बरोबर झाकलेले आहे किंवा नाही हे बोटांनी चाचपून पाहावे.




आ. २५२ : टोपी दुमडून आत घाला आणि शक्य तितकी खोल ढकला.






आ. २५३ : पुढचे टोक अशा रीतीने खेचा की पुढील हाडाच्या मागे ते घट्ट बसावे.




आ. २५४ : दुसरे टोक ग्रीवाच्या खाली आणि मागे बरोबर बसावे अशा रीतीने खाली ढकला.




आ. २५५ : टोपी ग्रीवाचा संपूर्ण भाग झाकते. बोटाने चाचपून टोपीमधून ग्रीवाचा शोध घ्या.






आकृती २५६ : बाहेर काढण्यासाठी बोटाने टोपीची बाहेरील कडा अडकवून धरा आणि खाली ओढा.

पेसरी दुसऱ्या दिवशी सकाळी काढावी. गर्भाशय (प्रथमावर्त) धुण्याची (उत्तर-बस्तीची) जरुरी नसते. काही झाले तरी चार तास झाल्याशिवाय पेसरी काढू नये. रबर पेसरी प्रथमावर्तात १८ तासांपेक्षा जास्त वेळ ठेवू नये.

ही पेसरी नळाखाली किंवा नळ नसल्यास स्वच्छ पाण्यात धुवावी; नंतर नरम किंवा मऊ कपड्याने पुसून कोरडी करावी व तिजवर फ्रेंच चॉक पावडर घालून एका पेटीत ठेवावी.

प्रत्येक वेळी ही पेसरी वापरत असता तिला छिद्र पडले आहे की काय याबद्दल खात्री करून घ्यावी. यासाठी टोपीमध्ये पाणी भरून किंवा ती ताणून व उजेडाकडे धरून तिला छिद्रे पडली आहेत किंवा ती फुटली आहे की काय हे तपासून घ्यावे.

ही पद्धती जर काटेकोरपणे अमलात आणली तर तिचा परिणाम ९० टक्के यशस्वी होतो.

# [ ३ ] इतर पद्धती

## ( १ ) तात्पुरती संतति-प्रतिबंधक योजना :

### ( अ ) लूप बसविणे :

#### लूप कसे असते ?




आ. २५७ : लूप

लूप हे पॉलिथेलिन प्लॅस्टिकपासून तयार केलेले असते. त्याचा आकार इंग्रजी 'एस' हे अक्षर दोनदा एकाखाली एक काढले तर जो आकार होईल तसा असतो. त्याच्या खालच्या एका टोकास नायलॉनचा दुहेरी दोरा असतो. तो जवळजवळ तीन सेंटिमीटर लांब असतो. लूप साधारणतः तीन आकाराचे असते. ते गर्भाशयात एका लांब व बारीक पिचकारीच्या (इन्सरटर) सहाय्याने बसविले जाते. प्रथम पिचकारी-मध्ये पुढील बाजूने हे लूप घुसवावे लागते. या नळीत असेपर्यंत लूप सरळ राहते पण लूप गर्भाशयात एका सळईच्या सहाय्याने ढकलल्यावर त्याला पूर्वीचा आकार प्राप्त होतो. लूपच्या खालील भागास जोडलेल्या नायलॉनच्या दोऱ्यांच्या सहाय्याने लूप गर्भाशयात आहे की नाही हे हाताच्या बोटाने योनिमार्गात दोरा चाचपून अथवा स्पर्श करून ठरविता येते. लूप फारच लहान असते त्यामुळे ते आपल्या शरीरात बसविले आहे अशी भावना स्त्रीला एकसारखी होत नाही. पतीलाही त्याची जाणीव होत नाही. स्त्रीच्या गर्भाशयात लूप वैद्य बसवतात व त्याचा त्रासही होत नाही. शस्त्रक्रिया व भूल देण्याची गरज नसते. लूप बसवल्यावर स्त्री आपल्या पायाने घरी येऊ शकते. 'लूप' जोवर गर्भाशयात आहे तोवर गर्भधारणा होत नाही. कारण लूप हे गर्भाशयात शल्यवत असते. लूप बसवूनही क्वचित गर्भधारणा झालीच तर त्या मुलातही काही विकृती निर्माण होत नाही असा प्रत्यक्ष अनुभव आहे.



#### लूप केव्हा बसवतात ?

हे लूप प्रसूती झाल्यानंतर प्रथम संभोग होण्यापूर्वी बसविणे आवश्यक असते. किंवा मासिक पाळी झाल्यानंतर लगेच ( रजःप्रवृत्ती संपूर्ण थांबल्यानंतर )बसवावे. दोन मुलांमधील अंतर ( अनुजननकाल ) वाढविण्यासाठी हे सुरक्षित व अगदी सोपे साधन आहे.

#### लूप बसविण्यास अयोग्य :

( १ ) गर्भाशयातील शोथ.

( २ ) गर्भाशय-मुख-पाक.

( ३ ) गर्भाशयस्थ वा गर्भाशय-मुखस्थ दुष्टार्बुद ( कॅन्सर ).

( ४ ) कटिरांतील शोथ.

( ५ ) अति रजःप्रवृत्ती – रक्तप्रदर.

( ६ ) योनी – प्रथमावर्त शोथ.

( ७ ) गर्भधारणा झालेली स्त्री.

लूप बसविल्यानंतर काही थोड्या स्त्रियांना थोडासा रक्तस्राव होण्याची शक्यता असते व नंतर येणाऱ्या मासिक पाळीत काही स्त्रियांच्या बाबतीत अतिरजःप्रवृत्ती होण्याची शक्यता असते. तसेच एखाद्या वेळी मासिक पाळीचा रजःस्राव १ किंवा २ दिवस जास्त चालू राहील. त्यावेळी जवळच्या प्राथमिक केंद्रात जाऊन उपचार करून घ्यावा. कटि–पृष्ठशूल, उदरशूल अल्प प्रमाणात असतील तर औषधोपचारांनी कमी करता येतात, परंतु जर त्यामुळे अस्वस्थ वाटणे, रक्तप्रदर, योनिगत श्वेतस्राव प्रभूत प्रमाणात होणे, योनिदुष्टीची ( दुर्गंधी वगैरे येणे ) लक्षणे दिसू लागल्यास, कटि–पृष्ठ–शूल अति तीव्र झाल्यास संतति-प्रतिबंधक केंद्रात जाऊन 'लूप' वैद्याकडून काढून टाकावा व इतर साधनांचा उपयोग करावा.

लूप काढल्यावर स्त्रीला गर्भ राहील व ती नेहमीसारखी बाळंत होईल. नंतर पुन्हा गर्भधारणा होऊ नये म्हणून ती परत लूप बसवून घेऊ शकते.

#### लूपची अयशस्विता : ( लूप अयशस्वी होणे )—

( १ ) लूप पडून जाणे.

( २ ) लूप बसवूनसुद्धा गर्भधारणा होणे.

गर्भाशयात लूप राहूनसुद्धा गर्भधारणा झाल्यास गर्भ प्रकृत अवस्थेत वाढून प्रसवामध्ये अपरेबरोबर तो आपोआप बाहेर पडतो.

गर्भाशयामध्ये लूप असताना गर्भधारणा झाल्यास गर्भाच्या वाढीच्या वेळी जर लूप गर्भाशयाचा भेद करून उदरामध्ये प्रविष्ट झाला आहे व जो अपरेबरोबर बाहेर न पडला तर प्रसवानंतर त्याचे क्ष-किरण प्रतिमेच्या सहाय्याने निश्चितीकरण करून पहिल्या दहा दिवसांतच उदरपाटनपूर्वक शस्त्रकर्म करून लूप काढावा.

(३) लूप गर्भाशयाचा भेद करून स्त्रीच्या अधोदरामध्ये प्रविष्ट झाल्यास क्ष-किरण प्रतिमेच्या साहाय्याने त्याचे निश्चितीकरण व निदान करून मगच उदर पाटनपूर्वक लूप काढावा.

## ( ब ) द्रवरूप : औषधी चिकित्सेने संततिप्रतिबंधन करणे

योगरत्नाकराप्रमाणे संततिप्रतिबंधक उपाय.

### [अ] पान :

(१) पिंपळी, विडंग व शुद्ध टंकण समभाग चूर्ण ऋतुकालात म्हणजेच मासिक पाळीचे १४ ते १९ दिवसपर्यंत दुधाबरोबर घ्यावे.

(२) जास्वंदीच्या फुलाचे चूर्ण कांजीबरोबर ऋतुकालात ३ दिवस घ्यावे.

(३) जुना गूळ १ पळ रोज ऋतुकाळात खावा.

(४) तांदुळजाची भाजी यांच्या मुळाचे चूर्ण तांदुळाच्या धुवणाबरोबर ऋतुकालात ३ दिवस घ्यावे.

(५) तालिसपत्र व गैरिका (सोनकाव) समभाग (१ कर्ष) प्रमाणात थंड पाण्याबरोबर ऋतुकालात घ्यावे.

### [ ब ] पिचुधारणा :

(१) संभोगापूर्वी सैन्धव तेलात भिजवून कापसात ठेवून योनीमध्ये ठेवावा.

(२) धोत्र्याच्या मुळीचे चूर्ण योनीत ठेवावे.

### अनुभविक योग :

(१) चंदनतेलाचा पिचू योनीत ठेवावा.

(२) तिलतैलाचा पिचू योनीत ठेवावा.



### ( क ) धूपन :

(१) कडूलिंबाच्या सालीने योनीचे धूपन करावे (धुरी द्यावी).

### ( ड ) कटिबंधन :

(१) धोत्र्याची मुळी कृष्णपक्षातील चतुर्दशीला आणून कमरेला बांधावी.

## ( २ ) कायम संततिप्रतिबंधक उपाय :

# शस्त्रकर्मे

### ( अ ) आर्तववाहिनी छेदन– वंध्यत्वीकरण :

ही शस्त्रक्रिया स्त्रियांवर करतात. ती कधीही करता येण्यासारखी असली तरी प्रसूतीच्या तिसऱ्या दिवसापासून पाचव्या ते सातव्या दिवसापर्यंत करणे जास्त सुलभ व सोईस्कर असते. ही शस्त्रक्रिया मासिक पाळीच्या ५–६ व्या दिवशी संभोग होण्यापूर्वीसुद्धा करता येते.

ही शस्त्रक्रिया दोन प्रकारांनी करता येते.

(१) उदरपाटनपूर्वक वंध्यत्वीकरण
(२) योनीमार्गे वंध्यत्वीकरण.

### ( १ ) उदरपाटनपूर्वक वंध्यत्वीकरण :

सार्वदैहिक संमोहन देऊन मगच शस्त्रकर्मास सुरुवात करावी.

उदरपरीक्षण करून गर्भाशयाची उंची लक्षात घेऊन साधारणतः गर्भाशयाच्या उंचीच्या वर $\frac{1}{2}''$ व खाली $\frac{1}{2}''$ असा अंदाजे १ ते $1\frac{1}{2}''$ पर्यंत उभा छेद घ्यावा. (गर्भाशयावर आडवा १ ते $1\frac{1}{2}''$ इंच छेद घेऊनही हे शस्त्रकर्म करता येते.) उदरपाटन करावे. गर्भाशयाच्या वाम व दक्षिण बाजूस दोन आर्तववाहिन्या आहेत. त्यांतील एक आर्तववाहिनी स्वस्तिकयंत्राने धरावी व ती दुसऱ्या टोकाजवळ म्हणजेच अंतःफलाकडील स्वस्तिकयंत्राने धरून तेथेच सूत्र व सूचीने दोन वेळा सीवनकर्म करावे. त्या सीवनकर्माच्या व बंधाच्या वरची बाजू स्वस्तिकयंत्राने प्रथम कापून टाकावी व कापलेल्या जागी दाबून टाकावे. म्हणजे अत्यल्प प्रमाणात (क्वचित वेळी) होणारा रक्तस्राव थांबतो. कापलेल्या ठिकाणाहून रक्तस्राव होत नाही ना, असे पाहून ती आर्तववाहिनी बोटाने जागेवर सरकवावी. (ठेवावी) याच पद्धतीने

दुसऱ्या आर्तववाहिनीचे शस्त्रकर्म करावे. तदनंतर उदरपाटन केलेल्या भागाचे प्रथम कॅटगटने व बाह्यत्वचासूत्राने सीवनकर्म करावे. व्रणकर्म करून पटबंध बांधावा.




आ. २५८ : स्त्रियांवरील आर्तववाहिनीछेदन शस्त्रकर्म

याच पद्धतीने उदर परीक्षेवरून गर्भाशयाच्या उंचीचा अंदाज लक्षात घेऊन त्याच्या वर व खाली व उभय बाजूंस तिरक्या रेषेत दोन इंचपर्यंत स्थानिक संमोहन देऊन आर्तववाहिनी छेदनकर्म करावे.

रुग्णेचे शस्त्रकर्म प्रसूतीनंतर पाच दिवसांच्या आत केल्यास उदरावरील छेद लहान ( १ – १½ इंच ) घेतला तरी चालतो. परंतु तदनंतर व मासिक पाळीचे पाचवे वा सहावे दिवशी ( प्रथम संभोग होण्यापूर्वी ) शस्त्रकर्म करीत असताना मात्र छेद मोठा ( ३ – ४ इंच ) घ्यावा लागतो. कारण गर्भाशय पूर्वस्थितीप्रत गेलेला असतो.

## ( २ ) योनिमार्गे वंध्यत्वीकरण :

सार्वदेहिक संमोहन दिल्यानंतर योनीमध्ये योनिवीक्षणयंत्र घालावे. गर्भाशयमुख स्वस्तिकयंत्राने पकडावे व त्याच्या पश्चात्‌भागी पेरिटोनियमला आडवा चंद्राकृती साधारणतः १½ ते २ इंचपर्यंत छेद घ्यावा. तेथून गर्भाशयाच्या जवळून वाम वा दक्षिणतः असलेल्यांपैकी एक आर्तववाहिनी स्वस्तिकयंत्राने धरावी व तिच्या दुसऱ्या टोकाजवळ म्हणजे अंतःफलाकडील टोकाजवळ स्वस्तिकयंत्रांत पकडून दोनदा सूत्र व



सूचीने सीवनकर्म करून बांधावे व वरील भाग कापून टाकून दाबून टाकावा. तसेच दुसऱ्या आर्तववाहिनीचे शस्त्रकर्म करावे. व त्या पूर्ववत सरकवाव्यात (ठेवाव्यात). पेरिटोनियमचे सीवनकर्म करून नंतर प्रथमावर्ताचे सीवनकर्म पण करावे व व्रणरोपण करावे.

### वंध्यत्वीकरणाचे परिणाम :

( १ ) वंध्यत्व.

( २ ) मैथुनाचे असहत्व.

( ३ ) रज व आर्तव यांच्या विकृती – रजःक्षीणता, रक्तप्रदर ( रजाची अतिप्रवृत्ती ), रजाची अकाली निवृत्ती.

( ४ ) उदरशूल – अधोदरातील अवयवांची एकमेकांशी संसक्ती होऊन उदरशूल उत्पन्न होतो.

( ५ ) योनिमार्गे वंध्यत्वीकरण शस्त्रकर्म करून घेणाऱ्या स्त्रियांमध्ये मैथुनाचे असहत्व जास्त प्रमाणात आढळते.

## ( ब ) शुक्रनाडीकर्तन :




आ. २५९ : पुरुषांवरील शुक्रनाडीकर्तन शस्त्रकर्म

ही शस्त्रक्रिया पुरुषावर करतात. ती करण्यास ५ ते १० मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागत नाही. शस्त्रकर्म झाल्यानंतर पुरुष स्वतःच्या पायाने लगेच घरी जाऊ शकतो.

एका वैद्याने पुरुषाच्या वाम वा दक्षिण यांपैकी एका वृषणावर शुक्रवाहिनी दोन्ही हातांच्या बोटांनी परीक्षण करून धरून ठेवावी. दुसऱ्या वैद्याने साधारणतः तिच्या जवळच ½ इंच स्थानिक संमोहन द्यावे व आडवा छेद घ्यावा. त्यातून वैद्याने दोन्ही हातांत पकडून (धरून) ठेवलेली शुक्रवाहिनी स्वस्तिकयंत्रात धरून छेदाच्या वर काढावी. त्यावरील सर्व आवरणे हळूहळू बाजूला करून ती दोन ठिकाणी धरावी व त्यांतील मधला भाग कापून टाकावा. दोन्ही कापलेल्या भागांचे सीवनकर्म करावे व ती पूर्ववत ठेवावी. दोन्याने बाह्यत्वचेचे सीवनकर्म करावे. तसेच वृषणावरील शुक्रवाहिनीछेदन करावे व व्रणकर्म करावे.

एक दिवसाच्या विश्रांतीनंतर पुरुष आपल्या कामावर जाऊ शकतो.



# चिकित्साक्रम

वैद्यांनी रुग्णेचे निदान निश्चित केल्यानंतर पुढील दहा[१] गोष्टींचा विचार करून षड्विधोपक्रमांतील चिकित्सा करावी.

(१) दूष्य—रोगांचे स्थान— ज्या स्थानात व्याधी असेल त्या स्थानावर चिकित्सा करावी. उदा० ब्यावर्त योनीमध्ये ज्या स्थानामध्ये गुल्म असेल त्या स्थानावर चिकित्सा करावी. सूतिकारोगामध्ये योनिदुष्टीवर चिकित्सा करावी.

(२) देश—आनूप, जांगल व साधारण—या देशांचा दोषानुरूप विचार करून चिकित्सा करावी.

(३) बल—रोग्याचे व रोगाचे बल पाहून चिकित्सा करावी.

(४) काल—व्याधीचा काल—आम, पच्य व पक्व; व ऋतुकाल वसंतादी या दोन्ही कालांतील दोषांचा विचार करून चिकित्सा करावी.

(५) अनल—रुग्णाचा अग्नी पाहून चिकित्सा करावी.

(६) प्रकृती—रुग्णाच्या वातादी प्रकृतीनुसार चिकित्सा करावी.

(७) वय—रुग्णाचे वय पाहून चिकित्सा द्यावी. साध्यासाध्यता ठरवावी. उदा० वयाच्या चाळिसाव्या वर्षी वंध्या योनीची चिकित्सा करणे कष्टसाध्य किंवा असाध्य ठरेल. उतारवयात वातव्याधींची चिकित्सा करावी.

(८) सत्त्व—रुग्णाचे हीन, मध्यम, प्रवरादी सत्त्व पाहूनच चिकित्सेचे यशापयश ठरवावे.

(९) सात्म्य—रुग्णाचा नेहमीचा आहार औषधी सात्म्य पाहूनच चिकित्सा करावी.

(१०) आहार—रुग्णाचा आहार ठरविताना वरील सर्व गोष्टींचा विचार करून मगच ठरवावा.

आहार पुष्ट करणारा, बल देणारा, आयुष्य- उत्साहवर्धक, स्मृती, ओज व अग्नी वाढविणारा असावा. त्यासंबंधीच्या इतरही नियमांचे पालन केले जावे.

१ दूष्यं देशं बलं कालमनलं प्रकृतिं वयः ।
सत्त्वं सात्म्यं तथाहारमवस्थाश्च पृथग्विधाः ॥—वा. सू. अ. १२–६७






## १. लंघन ( अ ) स्वेदन :

( १ ) **रूक्षस्वेद**—आमवातात मिठाच्या पुरचुंडीने, तवा, विटेच्या टोल्याने विशेषतः सूतिकारोगात शेकावे.

( २ ) **तापस्वेद**—स्तनविद्रधीच्या आमावस्थेत फडक्याने शेकावे; गरम पाण्याच्या पिशवीने शेकावे.

( ३ ) **बाष्पस्वेद**—वातकंटकामध्ये ( लचक भरली असताना ) कढत पाण्यात फडके बुडवून घट्ट पिळून त्यातून येणाऱ्या वाफेने शेकावे.

( ४ ) **अवगाह स्वेद**—सूतिका, अर्श, भगंदर, परिकर्तिका, वातरोग उदा०— कटिशूल यात एखाद्या रुंद व मोठ्या भांड्यात गरम पाणी घेऊन त्यात दोषानुरूप द्रव्ये टाकून उदा०— तुरटी, लवण, मध, हळद, त्रिफळाक्वाथ, बसून शेकणे. हा शेक पाच मिनिटांपर्यंतच द्यावा. अन्यथा तृष्णा, भ्रम इ. अतियोगाची लक्षणे दिसू लागतात.

( ५ ) **उपनाह स्वेद**—पोटीस बांधणे. परंतु स्तन-विद्रधीमध्ये तो वर्ज्य सांगितला आहे.

## ( ब ) शोधन :

( १ ) **वमन**—उलटी करणे करविणे. परंतु गर्भिणी व सूतिका यांना वमन वर्ज्य सांगितले आहे.

( २ ) **विरेचन**—गर्भिणी व सूतिका यांना शोधन म्हणून विरेचन वर्ज्य आहे. परंतु अनुलोमन व स्रंसन म्हणून ते योग्य ठरते. उदा०— आरग्वधकल्प, गं. हरीतकी, त्रिफळा चूर्ण अल्प मात्रेत द्यावे.

( ३ ) **रक्तमोक्ष**—गर्भोपद्रवात मार्गावरोधजन्य वातवृद्धी असेल, उदा. रक्तदाब वाढून जर भ्रम, मूर्च्छा इ. अपस्माराची लक्षणे दिसू लागली तर रक्तमोक्ष आवश्यक ठरते. मात्र ते रोगाचे व रोग्याचे बलाबल पाहून योग्य त्या प्रमाणात करावे.

( ४ ) **नस्य**—गर्भिणी व सूतिका यांना अपस्मारामध्ये अवस्थेनुरूप शमन व शोधन नस्य द्यावे.

शोधन नस्य—गुडशुंडी नस्य वचाचूर्ण प्रधमन नस्य.

शमन नस्य—अणुतैल, घृताने नस्य करणे.

( ५ ) **बस्ती**—उपस्थित प्रसवा-अवस्थेत गर्भिणीला अनुवासन बस्ती द्यावा. शस्त्रकर्मपूर्व पण अनुवासन बस्ती द्यावा.

उत्तरबस्ती हा स्त्र्यावर्त योनी व बस्तिमार्गात स्त्रियांना देतात व पुरुषांमध्ये फक्त बस्तिमार्गात देतात. उदा.—शोधनासाठी–मूत्राश्मरी, मूत्रकृच्छ्र यात देतात.

शमनासाठी—मूत्रमार्गे रक्तस्राव होत असता मोचरस वा दुधाचा उत्तरबस्ती देतात.

### (क) रूक्षण :

(१) **बाह्य रूक्षण**—लेप घालणे—शोथ असता लताकरंजाचा लेप; लहान मुलांमध्ये मूत्रवृद्धी असेल तर लेपगोळीचा लेप घालावा.

(२) **अभ्यंतर रूक्षण**—मद्य, क्षारयुक्त कल्प—शंखवटी, यवक्षार, अपामार्गक्षार पोटातून देणे.

### २. बृंहण (ड) स्नेहन :

(१) घृत—याने दोन प्रकाराने स्नेहन करता येते.

[२] **अभ्यंतरतः घृताने स्नेहन करणे**—शतावरीघृत, दाडिमादी घृत, कल्याणक घृत इ. सिद्ध घृते देणे, अनुपान म्हणून तूप वापरावे. मलावष्टंभात तूप व गरम पाणी पिण्यास सांगावे.

[२] **बाह्यतः घृताने स्नेहन करणे**—हस्त पाद-गुद-व्रण इ. ठिकाणी घृत लावणे—शतधौत घृत, यष्टिमधू घृत. विशेषतः परिकर्तिकेत याचा जास्त चांगला उपयोग होतो. सर्वांत गोघृत श्रेष्ठ आहे.

(२) **तैल**—[१] **अभ्यंतरतः तैलाने स्नेहन करणे**—वातव्याधीमध्ये तिलतैल पिण्यास देतात. यासाठी सिद्धतैल पण वापरतात.

[२] **बाह्यतः तैलाने स्नेहन करणे**—अनुवासन बस्तीसाठी वापरावे. गर्भिणी-गर्भोपद्रव, वातव्याधी, बालरोग यांत सिद्धतैलाने (दोषानुरूप) चोळावे. योनीमध्ये बलातैल, करंजतैल यांचा पिचू ठेवावा.

[३] **वसा** } रोगाच्या धातुगत अवस्थेमध्ये वसा व मज्जा यांचा वापर करावा.
[४] **मज्जा** } मांसाहारी लोकांना याचा उपयोग जास्त चांगल्या प्रमाणात होतो.

### (इ) शमन :

(१) **दीपन**— } दीपन-पाचन औषधीकल्प दोषानुरूप द्यावेत.
(२) **पाचन**— } उदा.—सुंठ, मिरे, पिंपळी.

(३) **क्षुत् निरोध**—गर्भोपद्रवात क्षुधा निरोध करावी.

(४) **तृड् निरोध**—गर्भोपद्रव शोयांत तृष्णेचा निरोध करावा.

(५) **व्यायाम**—गर्भोपद्रव, पांडू, छर्दी, हृद्रोग यांत व्यायाम वर्ज्य करावा.

(६) **आतपसेवन**—गर्भिणीला व सूतिकेला उन्हात जाणे वर्ज्य आहे. शिवाय रक्तप्रदर, अत्यार्तव इ. रोगांत उन्हात जाऊ नये.

(७) **मारुत सेवन**—सूतिका, गर्भिणी, वातव्याधी रुग्णांस वाऱ्यावर जाणे वर्ज्य आहे.



### (फ) स्तंभन :

(१) **स्थानिक**—तुरटी, लोध्र, टंकणलाही यांचा लेप घालावा. मधाचा पिचू ठेवावा.

(२) **सार्वदैहिक**—कुडा, मोचरस, नागकेशर, प्रवाळ, तुरटी, लोध्र इ. औषधे पोटातून द्यावीत.

या वरील सर्व षड्विधोपक्रमांबरोबर रुग्णांमध्ये आणखीही काही कर्मे करावी लागतात. ती पुढीलप्रमाणे—

(१) **दहन कर्म**—हे स्थानिक दोषांच्या पक्वावस्थेतच करावे. आमावस्थेत केल्यास दहनानंतरचा व्रण दुष्ट होण्याची शक्यता असते.

(२) **लेखन कर्म**—ही क्रिया शोधनाची आहे. दोषांचे पाचन झाल्याशिवाय लेखनकर्मही करू नये. आमावस्थेत गर्भाशयाचे लेखनकर्म केल्यास व्याधी हा गंभीर होऊन बहिर्मार्गातून अंतरमार्गामध्ये प्रविष्ट होतो. उदा०—गर्भस्रावामध्ये ज्वर, शीतता, योनिगत स्रावात दुर्गंधी येणे ही लक्षणे असताना गर्भाशय लेखनकर्म केले असताना दोष हे धातुगत होऊन ज्वरादी लक्षणे. तीव्र स्वरूपाची होतात व रुग्णा असाध्य होण्याची शक्यता असते.

(३) **पिचुधारणा**—पिचू हा कापसाच्या वरील बाजूस मऊ अशा जाळीदार वस्त्राने गुंडीप्रमाणे गुंडाळून दोऱ्याने बांधावा व बांधलेला दोरा एक ते दोन इंच लांब ठेवून मग तो कापावा. असा पिचू दोषानुरूप सिद्ध द्रव्यांमध्ये बुडवून योनीच्या प्रथमावर्तात बसवावा व त्याच्या दोऱ्याची टोके योनीच्या बाहेर ठेवावी. बाहेर आलेल्या दोऱ्यामुळे पिचू काढणे सुलभ होते. हा पिचू ६ ते १२ तासांपर्यंत ठेवावा व नंतर काढून टाकावा.

(४) **वर्ती**—योनीच्या ठिकाणी अंगठ्याएवढीही जाड शलाकावजा सुमारे $\frac{1}{2}$" लांबीच्या वर्ती वापराव्या. या वर्तीची द्रव्येही दोषानुरूप असावी. उदा. काळाबोळ, दारुहरिद्रा, मोचरस. मलावष्टंभात गुदवर्ती वापरतात.

(५)—**प्रतिसारण** अर्श, परिकर्तिका यांत शतधौतघृत, अर्शशामक मलम गुद-मार्गात बोटाने लावावे. मुखपाकामध्ये मधू व घृत लावावे.

# औषधी पाठ

## १. अर्जुनारिष्ट

द्रव्ये : अर्जुनत्वक् ५ भाग, जल ५० भाग, मनुका $२\frac{१}{२}$ भाग क्वाथ करून $\frac{१}{८}$ उरविणे, व त्यात
गूळ ५ भाग, धायटी १ भाग, मोहाची फुले १ भाग घालून आसव विधीने तयार करावे.

मात्रा : २ ते ४ चमचे.

अनुपान : समभाग पाणी.

काल : जेवणानंतर दोन्ही वेळा.

## २. अतिविषादी चूर्ण (चि. प्र. १९६१)

द्रव्ये : अतिविषा १ भाग  पिप्पली १ भाग
हरीतकी १ ,,

मात्रा : २ – ४ गुंजा.

अनुपान : मध

काल : दिवसातून तीन वेळा.

## ३. अनंतमूळ चूर्ण

द्रव्ये : अनंतमूळ चूर्ण.

मात्रा : (१) १–२ मासे चूर्णाचा फांट करण्यास.  (२) २–४ गुंजा चूर्ण नुसते घ्यावयास.

अनुपान : (१) फांट करून प्यावा.  (२) मध.

काल : (१) दिवसातून दोन वेळा.  (२) दिवसातून तीन वेळा.

## ४. अभ्रक भस्म

द्रव्ये : अभ्रक भस्म.

मात्रा : $\frac{१}{२}$ ते १ गुंजा.

अनुपान : तूप व साखर.

काल : दिवसातून तीन वेळा.



## ५. अविपत्तिकर चूर्ण

| | |
|---|---|
| द्रव्ये : त्रिकटू चूर्ण ३ भाग | मुस्ता : १ भाग |
| विडंग १ ,, | एला १ ,, |
| तमालपत्र १ ,, | लवंग १२ ,, |
| निशोत्तर २४ ,, | शर्करा ४८ ,, |

मात्रा : १ ते २ मासे

अनुपान : पाण्याबरोबर

काल : दिवसातून तीन वेळा

## ६. अर्शशामक मलम

द्रव्ये : अहिफेन १ भाग  शतधौतघृत १० भाग
मलम पद्धतीने तयार करावे.

काल : दिवसातून २ -३ वेळा विशेषतः मलवेगानंतर लावावे.

## ७. अशोक चूर्ण

द्रव्ये : अशोक त्वक् चूर्ण

मात्रा : ४ गुंजा ते १ मासा

अनुपान : थंड पाणी

काल : दिवसातून तीन वेळा

## ८. अशोकारिष्ट

द्रव्ये : अशोक ४०० भाग  जल ४०९६ भाग
क्वाथ करून $\frac{१}{८}$ उरवावा व त्यात

| | |
|---|---|
| गूळ ८०० भाग | धायटी फुले ८० ,, |
| जिरे ४ ,, | नागरमोथा ४ ,, |
| सुंठ ४ ,, | दारुहळद ४ ,, |
| त्रिफळा ४ ,, | अडुळसा ४ ,, |
| चंदन ४ ,, | |

घालून अरिष्ट विधीने तयार करावे.

मात्रा : २ ते ४ चमचे

अनुपान : समभाग पाणी

काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर

## अश्वगंधारिष्ट

द्रव्ये : अश्वगंधा २०० भाग — मुसळी ८० भाग
मंजिष्ठा ४० „ — हरीतकी ४० „
हरिद्रा ४० „ — दारुहरिद्रा ४० „
यष्टिमधु ४० „ — रास्ना ४० „
भुईकोहोळा (विदारी) ४० भाग — अर्जुनत्वक् ४० „
मुस्ता ४० भाग — निशोत्तर ४० „
अनंता ३२ „ — सारिवा ३२ „
रक्तचंदन ३२ „ — श्वेतचंदन ३२ „
वचा ३२ „ — चित्रक ३२ „
जल ८१९२ „
काढा करून ¼ उरवावा व त्यात
धायटीची फुले ६३ भाग — मध १२०० „
त्रिकटू ८ „ — दालचिनी १६ „
तमालपत्र १६ „ — एला १६ „
गव्हला १६ „ — नागकेशर ८ „
एकत्र करून आसवविधीने तयार करावे.

मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर

## १० अस्थिपोषक

द्रव्ये : प्रवाळ पंचामृत ५ भाग — अजास्थिभस्म १ भाग
मात्रा : ४ ते ८ गुंजा
अनुपान : दूध, पाणी, लोणी
काल : दिवसातून दोन वेळा; तीन वेळा

## ११. आमपाचक वटी

द्रव्ये : हरीतकी १ भाग — त्रिकटू ३ भाग
कारस्कर १ „ — हिंगु १ „
गंधक १ „ — सैन्धव २ „



भावना : कुमारी रस—१
मात्रा : ४ ते ८ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून दोन्ही वेळा जेवणानंतर.

## १२. आमलकी चूर्ण

द्रव्ये : आमलकी चूर्ण
मात्रा : १ ते २ मासे
अनुपान : गरम पाणी
काल : रात्री झोपण्यापूर्वी

## १३. आरग्वध कल्प

द्रव्ये : बहावा मगज ६ कि.
याचा फांट तयार करावा
फांट २० लिटर — साखर ४० लिटर
याचा अवलेह तयार करावा.
मात्रा : ४ ते ५ चमचे
अनुपान : गरम पाणी
काल : रात्री झोपण्यापूर्वी

## १४. आरोग्यवर्धिनी

द्रव्ये : पारद १ भाग — गंधक १ भाग
लोहभस्म १ „ — अभ्रकभस्म १ „
ताम्रभस्म १ „ — त्रिफळा २ „
शिलाजतू ३ „ — गुग्गुळ ४ „
चित्रकमूळ ४ „ — कटुका १८ „
भावना : निम्बपत्ररस—३
मात्रा : पाणी
अनुपान : पाणी
काल : दिवसातून दोन तीन वेळा

## १५ इसबगोल

द्रव्ये : ( अ ) इसबगोल ( कोंडा )
मात्रा : ५–२ चमचे
अनुपान : पाणी
काल : रात्री झोपताना
द्रव्ये : ( ब ) इसबगोल ( बीज )
मात्रा : २ ते ३ चमचे
अनुपान : भिजत घालून दुधात खीर करून घेणे.
काल : रात्री झोपताना

## १६. उशीरासव

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : उशीर २० | भाग | श्वेतपद्म १ | भाग |
| काश्मरी १ | ,, | प्रियंगु १ | ,, |
| लोध्र १ | ,, | पद्मकाष्ठ १ | ,, |
| मंजिष्ठा १ | ,, | दुरालभा १ | ,, |
| पाठा १ | ,, | किराततिक्त १ | ,, |
| वटत्वक् १ | ,, | उदुंबरत्वक् १ | ,, |
| कर्चूरक १ | ,, | पर्पट १ | ,, |
| पटोल १ | ,, | कांचनार १ | ,, |
| जम्बुत्वक् १ | ,, | मोचरस १ | ,, |
| धातकीपुष्प १६ | ,, | जल ५१२ | ,, |
| शर्करा १०० | ,, | मध ५० | ,, |

आसवविधीने तयार करावे.

मात्रा : २ ते ४ चमचे.
अनुपान : पाणी ( समभाग )
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर.

## १७. कपिला

द्रव्ये : कपिला चूर्ण
मात्रा : १ ते ३ मासे
अनुपान : मध.
काल : रात्री झोपताना.



## १८. कर्पूरादी चूर्ण

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : कर्पूर १ | भाग | त्वक् १ | भाग |
| कंकोल १ | ,, | जातीफल १ | ,, |
| जातिपत्रिका १ | ,, | लवंग २ | ,, |
| जटामांसी ३ | ,, | मरिच ४ | ,, |
| पिपली ५ | ,, | शुंठी ६ | ,, |
| शर्करा २५ | ,, | | |

मात्रा : १ ते २ मासे
अनुपान : मध
काल : दिवसातून दोन तीन वेळा

## १९. कामदुधा (शौ. युक्त) (साधी)

द्रव्ये : शंखजीरक १ भाग गैरिक १ भाग
मात्रा : ४ ते ८ गुंजा
अनुपान : मध, दूध, लोणी व साखर
काल : दिवसातून तीन ते चार वेळा

## २०. कांतलोहभस्म

द्रव्ये : कांतलोहभस्म
मात्रा : १/२ ते १ गुंजा
अनुपान : मध, तूप व साखर
काल : दिवसातून दोन ते तीन वेळा

## २१. कार्पासमूल घनसार

द्रव्ये : कार्पासमूळ १ भाग पाणी १६ भाग
काढा १/८ उरवून वाफेवर आटवून घनसार करावा.
मात्रा : ४ गुं. ते १ मासा
अनुपान : पाणी
काल : दिवसातून तीन वेळा

## २२. कुटकी चूर्ण

द्रव्ये : कुटकी चूर्ण
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : मध
काल : दिवसातून दोन वेळा

## २३. कुटजपर्पटी

द्रव्ये : कुटज चूर्ण ७ रसपर्पटी १ भाग
एकत्र खलावे व पर्पटी विधीने तयार करावी
मात्रा : २ ते ६ गुंजा
अनुपान : पाणी
काल : दिवसातून तीन ते चार वेळा

## २४. कुटजारिष्ट

द्रव्ये : कुटजमूल ४०० भाग — द्राक्षा २०० भाग
काश्मरी ४० ,, — जल ४०९६ ,,
काढा १/४ उरवावा व त्यात
धातकी ८० ,, — गूळ ४०० ,,
घालून अरिष्ट विधीने तयार करावे
मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून दोन ते तीन वेळा

## २५. कुडाकल्प

द्रव्ये : कुटजचूर्ण १ भाग — संजीवनी १ भाग
शंखोदररस १ ,,
भावना : कुटजक्वाथ—३ मासे
मात्रा : १ ते ३ मासे
अनुपान : पाणी
काल : दिवसातून दोन ते तीन वेळा



## २६. कुमारी आसव

द्रव्ये : कुमारी रस २०४८ भाग — गूळ ४०० भाग
हरीतकीक्वाथ २५६
काढा १/४ उरवावा व त्यात भाग

| | |
|---|---|
| मधु २५६ भाग | धातकी ६४ ,, |
| जातिफल ४ ,, | लवंग ४ ,, |
| कंकोल ४ ,, | जटामांसी ४ ,, |
| चवक ४ ,, | चित्रक ४ ,, |
| जातिपत्री ४ ,, | शृंगी ४ ,, |
| बिभीतक ४ ,, | पुष्करमूळ ४ ,, |
| ताम्रभस्म २ ,, | लोहभस्म २ ,, |

घालून आसवविधीने तयार करावे.
मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर

## २७. कुमारीकल्प (चि. प्र. १९६१)

| | |
|---|---|
| द्रव्ये : कुमारी आसव २५० भाग | कटुकाक्वाथ २० भाग |
| वसाक्वाथ २० ,, | पुनर्नवाक्वाथ २० ,, |
| गोक्षुरक्वाथ २० ,, | गुडूचीक्वाथ २० ,, |
| कंटकारीक्वाथ २० ,, | |

व त्यात

| | |
|---|---|
| चतुर्जात १६ भाग | नृसार १६ भाग |
| ताम्रभस्म १ ,, | लोहभस्म १ ,, |

घालून आसव विधीने तयार करावे.
मात्रा : २ ते ६ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन ते तीन वेळा

## २८. खदिरचूर्ण

द्रव्ये : खदिर चूर्ण
मात्रा : १ ते २ गुंजा

अनुपान : मध
काल : दिवसातून ३ वेळा

## २९. खदिरादी गुटी

द्रव्ये : खदिर ५० भाग    जल १२८ भाग
काढा $\frac{१}{८}$ उरवावा व त्यात

| | | | |
|---|---|---|---|
| जातिपत्र १$\frac{१}{२}$ | भाग | कर्पूर १$\frac{१}{२}$ | भाग |
| पूगफल १$\frac{१}{२}$ | ,, | त्वक् १$\frac{१}{२}$ | ,, |
| तमालपत्र १$\frac{१}{२}$ | ,, | नागकेशर १$\frac{१}{२}$ | ,, |
| एला १$\frac{१}{२}$ | ,, | कस्तुरी १$\frac{१}{२}$ | ,, |

घालून गुटी-पद्धतीने गुटी तयार करावी.

मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : पाणी खडीसाखर } तोंडात धरून
काल : दिवसातून ३–४ वेळा } चघळावी

## ३०. खुरासनी ओवा

द्रव्ये : खुरासनी ओवा
मात्रा : ४ गुंजा ते १ मासा
अनुपान : गरम पाणी
काल : रात्री झोपण्यापूर्वी

## ३१. गर्भपाल रस

द्रव्ये :

| | | | |
|---|---|---|---|
| हिंगुळ १ | भाग | नागभस्म १ | भाग |
| वंग १ | ,, | त्रिकटु १ | ,, |
| दालचिनी १ | ,, | तमालपत्र १ | ,, |
| वेलची १ | ,, | धने १ | ,, |
| जिरे १ | ,, | च्यवक १ | ,, |
| मनुका १ | ,, | देवदार १ | ,, |
| लोहभस्म $\frac{१}{२}$ | ,, | | |

भावना : विष्णुक्रांता काढा – ७.
कल्प तयार करावा.
मात्रा : २ ते ४ गुंजा



अनुपान : दूध व साखर
काल : दिवसातून ३ ते ४ वेळा

## ३२. गर्भाशयामृत ( शतामृत )

द्रव्ये : अश्वगंधा    शतावरी
वगैरे समभाग जीवनीय औषधांचा कल्प
मात्रा : ३ ते ६ मासे
अनुपान : दूध
काल : दिवसातून दोन वेळा

## ३३. गंधकरसायन

द्रव्ये : गंधक १ भाग
भावना :

| | | | |
|---|---|---|---|
| गोदुग्ध ३ | ,, | त्वक् १ | भाग |
| तेजपत्र १ | ,, | नागकेशर १ | ,, |
| एला १ | ,, | गुडुची १ | ,, |
| त्रिफळा १ | ,, | शुंठी १ | ,, |
| भृंगराज १ | ,, | आर्द्रक १ | ,, |

मात्रा : २ ते ३ गुंजा
अनुपान : पाणी
काल : दिवसातून २ ते वेळा

## ३४. गंधर्वहरीतकी चूर्ण

द्रव्ये : हरीतकी
एरंडस्नेहात भाजावी व तिचे चूर्ण करावे.
मात्रा : १ ते ३ मासे
अनुपान : गरम पाणी
काल : रात्री झोपण्यापूर्वी

## ३५. गोक्षुरादी गुग्गुळ

द्रव्ये : गुग्गुळ ७ भाग    त्रिकटु ३ भाग
त्रिफळा ३ ,,    मुस्ता १ ,,

भावना : गोक्षुरक्वाथ– १ गुग्गुळ–कल्प विधीप्रमाणे तयार करावा.
मात्रा : ४ ते ८ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून ३ ते ४ वेळा

## ३३. चंदनचूर्ण

द्रव्ये : चंदन (श्वेत) चूर्ण
मात्रा : २ ते ३ गुंजा
अनुपान : पाणी
काल : दिवसातून ३ वेळा

चंदनाचे खोड उगाळून पण घेतात.

## ३७. चंदनासव

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : श्वेतचंदन २० | भाग | उशीर ४ | भाग |
| मुस्ता ४ | ,, | किराततिक्त ४ | ,, |
| कमल ४ | ,, | वट–त्वक् ४ | ,, |
| प्रियंगु ४ | ,, | कर्चूरक ४ | ,, |
| लोध्र ४ | ,, | पर्पट ४ | ,, |
| मंजिष्टा ४ | ,, | यष्टिमधू ४ | ,, |
| रक्तचंदन ४ | ,, | रास्ना ४ | ,, |
| पाठा ४ | ,, | कांचनार ४ | ,, |
| आम्र-त्वक् ४ | ,, | पटोल ४ | ,, |
| मोचरस ४ | ,, | धातकी ६४ | ,, |
| द्राक्षा ६० | ,, | जल २०४८ | ,, |
| गूळ २०० | ,, | | |

आसवविधीने तयार करावे.

मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : थंड पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर.

## ३८. चंद्रकला रस

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : पारद | १ भाग | ताम्रभस्म | १ भाग |
| अभ्रकभस्म १ | ,, | गंधक | २ ,, |



| | | | |
|---|---|---|---|
| भावना : मुस्ताक्वाथ | १ भाग | दाडिमरस | १ भाग |
| दूर्वारस | १ ,, | केतकीरस | १ ,, |
| सहदेवीरस | १ ,, | कुमारीरस | १ ,, |
| पर्पटक्वाथ | १ ,, | मूर्वारस | १ ,, |
| शतावरीरस | १ ,, | | |

त्यांत

| | | | |
|---|---|---|---|
| कटूका चूर्ण १ | भाग | गुडुची सत्त्व १ | भाग |
| पर्पट चूर्ण १ | ,, | उशीर चूर्ण १ | ,, |
| मधुमालती चूर्ण १ | ,, | चंदन चूर्ण १ | ,, |
| अनंतमूळ चूर्ण १ | ,, | | |

भावना : द्राक्षारस — ७
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : पाणी, मध
काल : दिवसातून तीन ते चार वेळा; वा दर २ तासांनी.

## ३९. चंद्रप्रभा

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : कर्चूर १ | भाग | वचा १ | भाग |
| मुस्ता १ | ,, | गुडुची १ | ,, |
| देवदारू २ | ,, | हरिद्रा १ | ,, |
| अतिविषा १ | ,, | पिप्पलीमूळ १ | ,, |
| चित्रक १ | ,, | निशोत्तर १ | ,, |
| दन्तीमूळ १ | ,, | तमालपत्र १ | ,, |
| त्वक् १ | ,, | एला १ | ,, |
| वंशलोचन १ | ,, | धान्यक $\frac{1}{2}$ | ,, |
| त्रिफळा $\frac{1}{2}$ | ,, | च्यवक $\frac{1}{2}$ | ,, |
| विडंग $\frac{1}{2}$ | ,, | गजपिप्पली $\frac{1}{2}$ | ,, |
| त्रिकटु $\frac{1}{2}$ | ,, | पंचलवण $\frac{1}{2}$ | ,, |
| लोहभस्म २ | ,, | शिलाजतु ८ | ,, |
| गुग्गुळ ८ | ,, | भावना – त्रिफळा क्वाथ – १ | |

मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : थंड पाणी तंडुलोदक
काल : दिवसातून ३ ते ४ वेळा

## ४०. चुक्र तैल

| | |
|---|---|
| द्रव्ये : चुक्ररस १ भाग | बदरक्वाथ १ भाग |
| दधि १ भाग | तैल १२ ,, |
| कल्कद्रव्ये–यवक्षार १½ भाग | शुंठी १½ ,, |

तैलविधीप्रमाणे तेल सिद्ध करावे.

½–१ चमचा दिवसातून ३–४ वेळा लावावे.

## ४१. चौसष्टी पिंपळी

द्रव्ये : पिंपळीचूर्ण १ भाग
भावना : पिंपळीक्वाथ–६४
मात्रा : २ ते ३ गुंजा
अनुपान : मध
काल : दिवसातून ३–४ वेळा

## ४२. च्यवनप्राश

| | |
|---|---|
| द्रव्ये : आमलकी फळ ८० भाग | पुष्करमूळ १ भाग |
| द्राक्षा ५ भाग | वासा १ ,, |
| एला १ ,, | मुस्ता १ ,, |
| गोक्षुर ½ ,, | कंटकारिका ½ ,, |
| भूकूष्मांड १ ,, | गुडूची १ ,, |
| त्रिफळा ३ ,, | शृंगी १ ,, |
| जल १०९६ ,, | |

काढा करून ½ उरवावा. आमलकी तुपात भाजावी व त्यात

| | |
|---|---|
| शर्करा ८० भाग | मधु ५ भाग |
| चतुर्जात १ ,, | पिंपळीचूर्ण २ ,, |

मात्रा १–२ मासे

घालावे.

मात्रा : १–२ मासे
अनुपान : दूध व साखर वर प्यावे
काल : दिवसातून दोन वेळा



## ४३. जटामांसी चूर्ण

द्रव्ये : जटामांसी चूर्ण
मात्रा : ४ गुंजा १ मासे
अनुपान : पाणी
काल : दिवसातून दोनतीन वेळा.

## ४४. जातिफल चूर्ण

द्रव्ये : जातिफल चूर्ण
मात्रा : ½ ते १ गुंजा
अनुपान : मध
काल : दिवसातून दोन वेळा

## ४५. डिकेमाली चूर्ण

द्रव्ये : डिकेमाली चूर्ण
मात्रा : ½ ते १ गुंजा
अनुपान : मध
काल : दिवसातून ३–४ वेळा

## ४६. ताप्यादिलोह

| | |
|---|---|
| द्रव्ये : रौप्यभस्म १ भाग | शिलाजतु १ भाग |
| माक्षिकभस्म १ ,, | लोहभस्म १ ,, |
| चित्रक ½ ,, | त्रिफळा ¾ ,, |
| विडंग ½ ,, | त्रिकटु ¾ ,, |
| शर्करा २ ,, | |

मात्रा : २ ते ८ गुंजा
अनुपान : मध, तूप व साखर, लोणी व साखर
काल : दिवसातून दोन-तीन वेळा

## ४७. तालिसादी चूर्ण

| | |
|---|---|
| द्रव्ये : तालिसपत्र २ भाग | मारिच २ भाग |
| शुंठी ३ ,, | पिंपळी ४ ,, |

वंशलोचन ५ भाग — एला $\frac{1}{2}$ भाग
त्वक $\frac{1}{2}$ ,, — शर्करा ३२ ,,

मात्रा : १ ते २ मासे
अनुपान : मध
काल : दिवसातून दोन तीन वेळा; चाटणासारखे सतत.

## ४८. त्रिकटू चूर्ण

द्रव्ये : सुंठ १ भाग — मिरे १ भाग
पिंपळी १ ,,

मात्रा : २ गुंजा–४ गुंजा
अनुपान : मध
काल : दिवसातून दोन वेळा

## ४९. त्रिफळा चूर्ण

द्रव्ये : हरीतकी १ भाग — बिभीतक १ भाग
आमलकी १ ,,

मात्रा : १ ते ३ मासे
अनुपान : गरम पाणी; मध
काल : रात्री झोपण्यापूर्वी

## ५०. त्रिफलाघृत

द्रव्ये : त्रिफळा काढयाने घृत सिद्ध करणे
मात्रा : १ ते २ तोळे
अनुपान : पाणी
काल : दोन वेळा

## ५१. त्रिफलागुग्गुळ

द्रव्ये : त्रिफळा १ भाग — त्रिकटु १ भाग
गुग्गुळ २ ,,

भावना : त्रिफलाक्वाथ – १



मात्रा : ४ ते ८ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून दोन तीन वेळा

## ५२. त्रिभुवनकीर्ती

द्रव्ये : हिंगुळ १ भाग — विष १ भाग
त्रिकटु १ भाग — पिप्पलीमूळ १ ,,
टंकण १ ,,

भावना : तुलसीरस— १
आर्द्रकरस— १
स्वर्णधत्तूररस— १

मात्रा : २ ते ३ गुंजा
अनुपान : गरम पाणी, मध, तुलसीपत्रस्वरस व मधु, विड्याच्या पानाबरोबर,
काल : दिवसातून तीन चार वेळा

## ५३. दगडीबोर चूर्ण

द्रव्ये : दगडीबोर चूर्ण
मात्रा : ४ गुंजा ते ६ गुंजा
अनुपान : तंडुलोदक, थंड पाणी, लिंबू सरबत
काल : दिवसातून ३–४ वेळा

## ५४. दशमूलारिष्ट

द्रव्ये : दशमूळे १०० भाग — हरीतकी १० भाग
पुष्करमूळ ५ ,, — जल १००० ,,

काढा $\frac{1}{4}$ उरवावा व त्यात

| | | | |
|---|---|---|---|
| मध | ३० भाग | गूळ | ८० भाग |
| धायटी | १० ,, | लवंग | १ ,, |
| कंकोल | १ ,, | उशीर | १ ,, |
| श्वेतचंदन | १ ,, | जातिफळ | १ ,, |
| चतुर्जात | १ ,, | पिप्पली | १ ,, |

अरिष्ट विधीप्रमाणे सिद्ध करावे.

मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : जेवणानंतर दिवसातून दोन्ही वेळा

## ५५. दशांग लेप

द्रव्ये : शिरीष १ भाग — तगर १ भाग
यष्टिमधू १ ,, — चंदन १ ,,
एला १ ,, — जटामांसी १ ,,
हरिद्रा १ ,, — दारुहरिद्रा १ ,,
कुष्ठ १ ,, — उशीर १ ,,

काल : दिवसातून दोन वेळा लावा.

## ५६. दाडिमावलेह

द्रव्ये : दाडिमस्वरस १ भाग — शर्करा ४ भाग
जल ४ ,,

अवलेह तयार करावा.

मात्रा : १ ते २ चमचे
अनुपान : अनुपान म्हणून वापरावे
काल : दिवसातून दोन तीन वेळा

## ५७. दाडिमादी घृत

द्रव्ये : धान्यक ८ भाग — चित्रक ८ भाग
शुंठी ४ ,, — पिप्पली २ ,,
घृत ६४ ,, — दाडिमरस ३२ ,,

घृतविधीप्रमाणे सिद्ध करावे.

मात्रा : २–४ चमचे
अनुपान : अनुपान म्हणून वापरावे.
काल : दिवसातून २–३ वेळा

## ५८. द्राक्षारिष्ट

द्रव्ये : काळया मनुका २०० भाग — पाणी २०४८ भाग
काढा १/४ उरवावा व त्यात



गूळ ४०० भाग — धायटीची फुले ३२ भाग
वावडिंग ४ ,, — गव्हला ४ ,,
पिंपळी ४ ,, — दालचिनी ४ ,,
तमालपत्र ४ ,, — वेलदोडे ४ ,,
नागकेशर ४ ,, — मिरे ४ ,,
सुंठ ४ ,,

एकत्र करून आसवविधीने तयार करावे.

मात्रा : २–४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दोन्ही वेळा जेवणापूर्वी

## ५९. द्राक्षासव

द्रव्ये : द्राक्षा ४०० भाग — जल ४०१६ भाग
काढा १/४ उरवावा व त्यात

शर्करा ४०० भाग — मध २०० भाग
धातकी ६४ ,, — कंकोल ४ ,,
लवंग ४ ,, — जातिफळ ४ ,,
मरिच ४ ,, — चतुर्जात १६ ,,
पिप्पली ४ ,, — चित्रक ४ ,,
च्यवक ४ ,, — पिप्पलीमूळ ४ ,,
चंदन २ ,, — कर्पूर १/४ ,,

आसवविधीप्रमाणे सिद्ध करावे.

मात्रा : २-४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर

## ६०. दीपनी वटी

द्रव्ये : सुंठ १ भाग — मिरे २ भाग
पिंपळी ४ ,, — आमसुल (वृक्षाम्ल) ७ ,,

भावना : आल्याचा रस—७
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून २-३ वेळा

## ६१. नवायस चूर्ण

द्रव्ये : शुन्ठी १ भाग
पिप्पली १ „
विडंग १ „
मुस्ता १ „
मरिच १ भाग
चित्रक १ „
त्रिफळा ३ „
लोहभस्म ९ „

मात्रा : २ ते ८ गुंजा
अनुपान : तूप व साखर, लोणी व साखर
काल : दिवसातून दोन वेळा

## ६२. नागकेशर चूर्ण

द्रव्ये : नागकेशर चूर्ण
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : मध
काल : दिवसातून २-३ वेळा

## ६३. नागगुटी

द्रव्ये : लवंग १ भाग
जातिपत्रिका १ „
मरिच १ „
कस्तुरिका १/२ „
जातिफल १ भाग
विष १ „
पिप्पलीमूल १ „
कुंकुमम् १/२ „

भावना : आर्द्रक रस – १
मात्रा : १/२ – २ गुंजा
अनुपान : मध, गरम पाणी, आले रस व मध
काल : दिवसातून ३–४ वेळा

## ६४. पंचकोलासव

पिंपळी १ भाग
च्यवक १ „
सुंठ १ „
पिंपळमूळ १ भाग
चित्रक १ „
पाणी १६ „

काढा १/२ उरवावा व त्यात

गूळ ४ भाग
मध १ भाग



धायटीची फुले १ भाग घालून आसव तयार करावे.
मात्रा : २–४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणापूर्वी

## ६५. पंचवल्कल चूर्ण

द्रव्ये : वड साल १ भाग
पिंपळसाल १ „
पारोसा पिंपळ साल १ „
उंबरसाल १ भाग
पिंपळ ( पिंपर्णी ) साल १ „

मात्रा : १–२ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून २–३ वेळा

## ६६. पाचकेन्द्ररस

द्रव्ये : रससिंदूर १ भाग
शु. मनःशिला १ „
शु. कुचला १ „
बचनाग २ „
शु. हरताळ १ भाग
कस्तुरी १ „
धोत्र्याचे बी २ „
सुवर्णभस्म १/२ „

भावना – कोरफडीचा रस – २ भाग
तुळशीचा रस – २ „

मात्रा : १ ते ३ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून २–३ वेळा

## ६७. पारिजातकगुटी

द्रव्ये : पारिजातकाची पाने १ भाग
त्रिभुवनकीर्ती १ „
मिरे १ भाग

भावना : पारिजातकाचा रस
माधा : २ ते ४ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून ३–४ वेळा

## ६८. पारिभद्रतैल

द्रव्ये : कडूनिंबपाला रस ४० लिटर, तिळतैल ३२, लिटर, पाणी २४ लिटर. तैल पद्धतीने सिद्ध करावे.

काल : दिवसातून ३–४ वेळा लावणे.

## ६९. पिंपळमूळ चूर्ण

द्रव्ये : पिंपळमूळचूर्ण

मात्रा : २ ते ४ गुंजा

अनुपान : पाणी

काल : दोन वेळा जेवणानंतर

## ७० पुनर्नवादिमंडूर

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : पुनर्नवा | ५ भाग | निशोत्तर | ५ भाग |
| शुंठी | ५ ,, | मरिच | ५ ,, |
| पिप्पल्ली | ५ ,, | विडंग | ५ ,, |
| देवदारू | ५ ,, | चित्रक | ५ ,, |
| कुष्ठ | ५ ,, | त्रिफळा | ५ ,, |
| दन्तीमूळ | ५ ,, | च्यवक | ५ ,, |
| कटुका | ५ ,, | इंद्रयव | ५ ,, |
| पिप्पलीमूल | ५ ,, | मुस्ता | ५ ,, |
| शृंगी | ५ ,, | जीरक | ४ ,, |
| यवानी | ५ ,, | कटुफळ | ५ ,, |
| मंडूरभस्म २३० | | गोमूत्र २७६० | |

एकत्र करून त्यात

गूळ ३४५ भाग

मात्रा : ४ ते १२ गुंजा

अनुपान : तूप व साखर

काल : दिवसातून दोन तीन वेळा

## ७१. पुनर्नवासव

| | |
|---|---|
| द्रव्ये : पुनर्नवा १६ भाग | पाठा ८ भाग |
| दंतीमूल ८ ,, | गुडुची ८ ,, |
| चित्रक ८ भाग | त्रिफळा २४ भाग |
| जल १०१४ ,, | |

काढा ¼ उरवावा व त्यात

| | |
|---|---|
| मध ३२ भाग | गूळ २०० भाग |

घालून आसव विधीने तयार करावे



## ७२. पुष्यानुग चूर्ण

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : पाठा | २० भाग | जम्बुबीज | १० भाग |
| आम्रबीज | १० ,, | पाषाणभेद | १० ,, |
| दार्वी | १० ,, | मोचरस | १० ,, |
| लाजालू | १० ,, | कमलकेशर | १० ,, |
| अतिविषा | १० ,, | मुस्ता | १० ,, |
| बिल्वमूल | १० ,, | लोध्र | १० ,, |
| गैरिक | १० ,, | कटफल | १० ,, |
| मरिच | १० ,, | शुंठी | १० ,, |
| द्राक्षा | १० ,, | रक्तचंदन | १० ,, |
| अनंतमूल | १० ,, | धातकी | १० ,, |
| यष्टिमधू | १० ,, | अर्जुन | १० ,, |
| कुटज | १० ,, | इंद्रयव | १० ,, |

मात्रा : १ ते ३ मासे.

अनुपान : पाणी

काल : दिवसातून २–३ वेळा.

## ७३. पूर्णचंद्रोदय

| | |
|---|---|
| द्रव्ये : सोन्याचा वर्ख ४ भाग | संस्कृतपारद ३२ भाग |
| शु. गंधक ३२ ,, | |

कज्जली करावी व त्यास

भावना : कोरफडीचा रस – ३

कज्जली वाळल्यानंतर वालुकायंत्राने क्रमाग्नीने कुपिस्थ रसायन पद्धतीने पचन करावे. स्वांगशीत झाल्यावर कंठस्थ व तलस्थ द्रव्ये एकत्र करून त्यात

| | |
|---|---|
| कस्तुरी ¼ भाग | लवंग ¼ भाग |
| जायफळ ¼ ,, | समुद्रशोकफळ ¼ ,, |

मिसळून खल करावा.

मात्रा : १ ते २ गुंजा
अनुपान : मध

## ७४. प्रतापलंकेश्वर

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : पारद | १ भाग | गंधक | १ भाग |
| मरिच | १ ,, | लोहभस्म | ४ ,, |
| शंखभस्म | ८ ,, | गोमयभस्म | १६ ,, |
| विष | १ ,, | अभ्रकभस्म | १ ,, |

भावना : भृंगराजरस – १
मात्रा : २ ते ६ गुंजा
अनुपान : मध, गरम पाणी
काल : दिवसातून ३–४ वेळा

## ७५. प्रवाळपंचामृत

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : मौक्तिकभस्म | १ भाग | शंखभस्म | : १ भाग |
| प्रवाळभस्म | २ ,, | कपर्दिकभस्म | : १ ,, |
| शौक्तिकभस्म | १ ,, | | |

भावना : अर्कक्षीर – १

पचन करावे व गजपुट एकदा द्यावे

मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : दूध व साखर, पाणी
काल : दिवसातून ३–४ वेळा

## ७६. प्रवाळभस्म (चं. पु.)

द्रव्ये : प्रवाळ भस्म
मात्रा : २ ते ६ गुंजा
अनुपान : मध, दूध व साखर, लोणी व साखर
काल : दिवसातून ३–४ वेळा



## ७७. प्रशम

द्रव्ये : शंखपुष्पी     जटामांसी
खुरासनी ओवा

अशी द्रव्ये असलेला कल्प

मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा, रात्री झोपताना

## ७८. फलघृत

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : मंजिष्ठा | १ भाग | यष्टिमधू | १ भाग |
| कुष्ठ | १ ,, | त्रिफळा | १ ,, |
| सितोपला | १ ,, | बला | १ ,, |
| अश्वगंधा | १ ,, | अजमोदा | १ ,, |
| हरिद्राद्वय | २ ,, | कटुका | १ ,, |
| प्रियंगु | १ ,, | कमल | १ ,, |
| लाक्षा | १ ,, | रक्तचंदन | १ ,, |
| श्वेतचंदन | १ ,, | घृत | ६४ ,, |
| शतावरीरस | ७४ ,, | क्षीर | २५६ ,, |

घृत विधीप्रमाणे तयार करावे.

मात्रा : १ ते २ चमचे
अनुपान : पाणी
काल : दिवसातून दोन वेळा

## ७९. बालहरीतकी

द्रव्ये : बालहरीतकी चूर्ण १६ भाग     तुत्थ १ भाग
भावना : निम्बुकरस – ७
मात्रा : २–४ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : रात्री झोपताना

## ८०. ब्राह्मीपाश

द्रव्ये : ब्राह्मीरस २०० भाग        शर्करा १०० भाग
जल        २००  ,,

अवलेह तयार करावा

मात्रा : १ ते २ चमचे

अनुपान : अनुपान म्हणूनसुद्धा वापरतात.

काल : दिवसातून दोन वेळा. रात्री झोपताना पाणी

## ८१. बेहडाचूर्ण

द्रव्ये : बेहडा चूर्ण

मात्रा : २–४ गुंजा

अनुपान : मध, खडीसाखरेबरोबर तोंडात धरणे

काल : दिवसातून २–३ वेळा

## ८२. बोलपर्पटी

द्रव्ये : पारद    १ भाग        गंधक १ भाग
रक्तबोळ २  ,,

पर्पटी-कल्पाप्रमाणे तयार करावी

मात्रा : १ ते २ गुंजा

अनुपान : पाणी

काल : दिवसातून दोन तीन वेळा

## ८३. बोलबद्धरस

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : पारद | ५ भाग | गंधक | ५ भाग |
| गुडुचीसत्त्व | ५ ,, | रक्तबोळ | १५ ,, |

भावना : शाल्मलीत्वक्क्वाथ – १

मात्रा : २ ते ३ गुंजा

अनुपान : पाणी

काल : दिवसातून दोन तीन वेळा



## ८४. भल्लातक तैल

द्रव्ये : अधःपातन यंत्राने भल्लातकाचे ( बिब्ब्यांचे ) तेल काढावे.

मात्रा : ५ ते १० थेंब

अनुपान : दूध, तूप.

काल : दिवसातून एकदा वा दोनदा.

## ८५. भास्करलवण चूर्ण

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्य : मीठ | ८ भाग | पादेलोण | ८ भाग |
| बिडलोण | ८ ,, | शेंदेलोण | ८ ,, |
| धने | ८ ,, | डाळिंबाचे दाणे | ४ ,, |
| नागकेशर | २ ,, | तालिसपत्र | २ ,, |
| अमलवेतस | २ ,, | पिंपळी | १ ,, |
| पिंपळीमूळ | १ ,, | जिरे | १ ,, |
| तमालपत्र | १ ,, | मिरे | १ ,, |
| शहाजिरे | १ ,, | सुंठ | १ ,, |
| दालचिनी | ½ ,, | वेलदोडे | ½ ,, |

मात्रा : १ ते ३ मासे

अनुपान : गरम पाणी

काल : दिवसातून दोन वेळा

## ८६. मकरध्वज

द्रव्ये : सोन्याचा वर्ख १ भाग        शु. गंधक २ भाग
शु. पारद    ८  ,,

कज्जली करून कुपिस्थ रसायनविधीने कल्प तयार करावा. वरती रससिंदूर व खाली सुवर्णभस्म मिळते. ते दोनही भाग घोटून कल्प सिद्ध करावा.

मात्रा : ½ ते १ गुंजा

अनुपान : मध, तूप व साखर, लोणी व साखर

काल : दिवसातून दोनदा

## ८७. मध

द्रव्ये : मध

मात्रा : १ ते २ चमचे

अनुपान : अनुपान म्हणूनही वापरतात.
काल : दिवसातून १–२ वेळा

## ८८. मधुमंडूर

द्रव्ये : मंडूरचूर्ण १ भाग
भावना : १. त्रिफळाक्वाथ – ७
२. गोमूत्र – ७
३. कोरफडीचा रस – ७
प्रत्येकानंतर २१ पुटे द्यावी
उत्तम गेरूच्या रंगाचे श्लक्ष्ण भस्म तयार झाल्यावर
भावना : दूध – ३ तूप – ३
मध – ३ दही – ३
साखरेचा पाक – ३
व नंतर लघुपुट द्यावे.
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : तूप व साखर, लोणी व साखर
काल : दिवसातून दोन वेळा

## ८९. मधुमालिनीवसंत

द्रव्ये : हिंगुळ १ भाग, डाळिंबाच्या रसात खलून त्यास सात भावना द्याव्यात. त्यात खर्पर चूर्ण १ भाग, कोंबडीच्या अंड्याचा बलक तव्यामध्ये घालून मंदाग्नीवर ठेवून अंड्यातील बलक चूर्णात हळूहळू जिरवावा. ते चांगले कोरडे झाल्यावर त्यात
कचोरा $\frac{१}{२}$ भाग गव्हला $\frac{१}{२}$ भाग
मिरे $\frac{१}{२}$ ,,
घालावे व त्यास
भावना : लिंबूरस – ७
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : दूध
काल : दिवसातून दोन वेळा



## ९०. मयूरपिच्छामशी

द्रव्ये : मोराच्या पिसाची अंतरधूम पद्धतीने काळी राख करून त्यांचे चूर्ण.
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : मध, लिंबू सरबत
काल : दिवसातून ३–४ वेळा, दर चार तासांनी

## ९१. मल्लसिंदूर

द्रव्ये : पारद ९ भाग रसकर्पूर ९ भाग
मल्ल ४ ,, गंधक ५$\frac{१}{२}$ ,,
वालुकायंत्रात विधिपूर्वक पाचन करून तयार करावा.
मात्रा : $\frac{१}{४}$ ते २ गुंजा
अनुपान : मध, तूप व साखर
काल : दिवसातून २ ते ३ वेळा

## ९२. महामंजिष्ठादी काथ

द्रव्ये :

| | | | |
|---|---|---|---|
| मंजिष्ठा | १ भाग | चित्रक | १ भाग |
| मूर्वा | १ ,, | शतावरी | १ ,, |
| कुटज | १ ,, | त्रायमाण | १ ,, |
| गुडूची | १ ,, | पिप्पली | १ ,, |
| कुष्ठ | १ ,, | इंद्रयव | १ ,, |
| शुंठी | १ ,, | वासा | १ ,, |
| भार्ङ्गी | १ ,, | भृंगराज | १ ,, |
| कंटकारिका | १ ,, | देवदारू | १ ,, |
| वचा | १ ,, | पाठा | १ ,, |
| निम्ब | १ ,, | खदिर | १ ,, |
| हरिद्राद्रव्य | ३ ,, | चंदन | १ ,, |
| त्रिफळा | ३ ,, | निशोत्तर | १ ,, |
| पटोल | १ ,, | वरुण | १ ,, |
| कटुका | १ ,, | किराततिक्तक | १ ,, |
| विडंग | १ ,, | बाकुची | १ ,, |
| असन | १ ,, | आरवध | १ ,, |
| करंज | १ ,, | अतिविषा | १ ,, |
| इंद्रवारुणी | १ ,, | अनंतमूळ | १ ,, |
| पर्पट | १ ,, | | |

मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून २ वेळा जेवणानंतर

## ९३. महायोगराजगुग्गुळ

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : शुंठी | १ भाग | पिप्पलीमूळ | १ भाग |
| गजपिप्पली | १ ,, | पिप्पली | १ ,, |
| कटुका | १ ,, | च्यवक | १ ,, |
| अतिविषा | १ ,, | चित्रक | १ ,, |
| भार्ङ्गी | १ ,, | हिंगू | १ ,, |
| वचा | १ ,, | अजमोदा | १ ,, |
| मूर्वा | १ ,, | सर्षप | १ ,, |
| त्रिफळा | २० ,, | जरिकद्वय | २ ,, |
| गुग्गुळ | ६० ,, | रेणुकबीज | १ ,, |
| रौप्यभस्म | १६ ,, | इंद्रयव | १ ,, |
| लोहभस्म | १६ ,, | पाठा | १ ,, |
| अभ्रकभस्म | १६ ,, | विडंग | १ ,, |
| मंडूरभस्म | १६ ,, | रससिंदूर | १ ,, |

मात्रा : २ ते ८ गुंजा
अनुपान : दूध, गरम पाणी, तूप
काल : दिवसातून २–३ वेळा

## ९४. मंजिष्ठादी क्वाथ

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : मंजिष्ठा | १ भाग | त्रिफळा | १ भाग |
| कटुका | १ ,, | वचा | १ ,, |
| दारुहरिद्रा | १ ,, | अमृता | १ ,, |
| निम्ब | १ ,, | | |

मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर



## ९५. मृगशृंगभस्म

द्रव्ये : मृगशृंगभस्म
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : मध, तूप व साखर
काल : दिवसातून २–३ वेळा

## ९६. मातुलुंगावलेह

द्रव्ये : मातुलुंगरस १ भाग — शर्करा ४ भाग
जल ४ ,,
अवलेह तयार करावा.

मात्रा : १ ते २ चमचे
अनुपान : दूध
काल : दिवसातून १–२ वेळा

## ९७. माष तैल

द्रव्ये : उडीद ४ भाग — पाणी १६ भाग
काढा १/४ तयार करावा. त्यात
उडीदकल्क १/१६ भाग
घालून स्नेहपाकविधीने तेल तयार करावे.

मात्रा :
अनुपान :
काल :
} बाह्य स्नेहनाकरिता वापरावे.

## ९८. मोचरस

द्रव्ये : मोचरस
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : पाणी
काल : दिवसातून ३–४ वेळा

## ९९. मोचरस पिच्छाबस्ती

द्रव्ये : मोचरस भाग — जल ४० भाग
काढा ७/८ उरवावा.

काल : दिवसातून एकदा बस्ती द्यावा.

## १००. यकृतप्राश

द्रव्ये : यकृतसार हे महत्त्वाचे द्रव्य असलेला कल्प
मात्रा : १ ते २ चमचे
अनुपान : पाण्याबरोबर
काल : दोन वेळ जेवणानंतर

## १०१. यकृतरस

द्रव्ये : यकृतखंड १ भाग पाणी ४ भाग
काढा $\frac{1}{4}$ उरवावा व त्यात
त्रिकटू $\frac{1}{16}$ भाग दालचिनी $\frac{1}{16}$ भाग
घालून तयार करावे.

मात्रा : १–२ चमचे
अनुपान : पाणी
काल : दिवसातून एकदा वा दोनदा

## १०२. यष्टिमधू चूर्ण वा घनसार ( शिरा )

द्रव्ये : यष्टिमधू चूर्ण घनसार (शिरा)
मात्रा : २ ते ४ गुंजा तोंडात चघळणे (धरणे)
अनुपान : मध
काल : दिवसातून ३–४ वेळा

## १०३. यमकस्नेह

द्रव्ये : एरंडस्नेह १ भाग घृत (तूप) १ भाग
मात्रा : १ ते २ औंस
अनुपान : शुंठीक्वाथ, कोष्णजल
काल : दिवसातून एकदा



## १०४. योगराज गुग्गुळ

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : चित्रक | १ भाग | पिप्पलीमूळ | १ भाग |
| यवानी | १ ,, | मिश्रेया | १ ,, |
| विडंग | १ ,, | अजमोदा | १ ,, |
| जटिक | १ ,, | मुस्ता | १ ,, |
| देवदारु | १ ,, | त्रिकटू | ३ ,, |
| च्यवक | १ ,, | त्वक् | १ ,, |
| एला | १ ,, | उशीर | १ ,, |
| सैंधव | १ ,, | यवक्षार | १ ,, |
| कुष्ठ | १ ,, | तालिसपत्र | १ ,, |
| रास्ना | १ ,, | लवंग | १ ,, |
| गोक्षुर | २ ,, | सर्जिकाक्षार | १ ,, |
| धान्यक | १ ,, | शडी | १ ,, |
| त्रिफळा | ३ ,, | दन्ती | १ ,, |
| हपुषा | १ ,, | गुडूची | १ ,, |
| अश्वगंधा | १ ,, | शतावरी | १ ,, |
| गुग्गुळ | ३१ ,, | | |

मात्रा : ४ ते ८ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून ३–४ वेळा

## १०५. रक्तवर्धक

द्रव्ये : च्यवनप्राशावलेहातील महत्त्वाची औषधे व लोहभस्म असलेला कल्प.
मात्रा : $\frac{1}{2}$ ते १ चमचा
अनुपान : दूध
काल : दिवसातून एकदा किंवा दोनदा

## १०६. रोपणतेल

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : तगर | १ भाग | कृष्णागरु | १ भाग |
| हरिद्रा | १ ,, | दार्वी | १ ,, |
| देवदारु | १ ,, | लोध्र | १ ,, |
| गव्हला | १ ,, | पाणी | ११२ ,, |

काढा ⅛ उरवणे व तो

काढा ४ भाग तिळतेल १ भाग
वरील चूर्णाचा कल्प ⅛ „
स्नेहपाक विधीने तयार करावा.

काल : दिवसातून २ वेळा लावावे.

## १०७. रोहितकारिष्ट (औ. गु. शा.)

द्रव्ये : रक्तरोडयाची साल ४०० भाग पाणी ४०९६ भाग
काढा ⅛ भाग उरवावा व त्यात

गूळ ८०० भाग धायटीफूल चूर्ण ६४ भाग
पिंपळी ४ „ पिंपळमूळ ४ „
च्यवक ४ „ चित्रक ४ „
सुंठ ४ „ त्रिजात १२ „
त्रिफळा १२ „

मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर

## १०८. लघुमालिनी वसंत

द्रव्ये : खर्पर २ भाग मरिच १ भाग
भावना : लोणी—१
निंबुकरस—२१
त्यातील स्नेहांश कमी होतो
मात्रा : २-३ गुंजा
अनुपान : दूध व साखर
काल : दिवसातून दोन वेळा

## १०९. लघुसूतशेखर

द्रव्ये : शु. सोनकाव २ भाग सुंठ १ भाग
भावना : नागवेलीच्या पानांचा रस ३ दिवस
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : दूध, लिंबू-सरबत
काल : दिवसातून २-३ वेळा



## ११०. लताकरंज चूर्ण

द्रव्ये : लताकरंज बीज चूर्ण
मात्रा : ४ ते ६ गुंजा
अनुपान : गूळ
काल : दिवसातून २-३ वेळा

## १११. लवंगादी वटी

द्रव्ये : लवंग १ भाग मरिच १ भाग
बिभीजक १ „ खदिरत्वक्सार ३ „
भावना : बब्बुलत्वक्क्वाथ—१
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : गरम पाणी } तोंडात धरणे
काल : दिवसातून ३-४ वेळा } तोंडात धरणे

## ११२. लशुनादी वटी

द्रव्ये : लशुन १ भाग शुंठी १ भाग
मरिच १ „ हिंगु १ „
पिप्पली २ „ सैंधव १ „
गंधक १ „
भावना : निम्बुकरस - १
मात्रा : ४ ते ८ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून ३ ते ४ वेळा

## ११३. लक्ष्मीविलास रस

द्रव्ये : रससिंदुर ११ भाग सुवर्णभस्म १ भाग
अभ्रकभस्म १ „ रौप्यभस्म १ „
ताम्रभस्म १ „ वंगभस्म १ „
कांतलोहभस्म १ „ तीक्ष्ण लोहभस्म १ „
मुंडलोहभस्म १ „ नागभस्म १ „
मौक्तिकभस्म १ „ विष १ „
भावना : मध - १

पाचक करून तार्क्ष्यपुट एक द्यावे.

भावना : चित्रकक्वाथ – १
मात्रा : $\frac{1}{2}$ ते २ गुंजा
अनुपान : दूध
काल : दिवसातून दोन वेळा

## ११४. लेपगोळी

द्रव्ये :

| | | | |
|---|---|---|---|
| पुनर्नवा | ८ भाग | लोध्र | २ भाग |
| चित्रक | २ ,, | शुंठी | २ ,, |
| गुग्गुळ | ५६ ,, | हरिद्रा | २ ,, |
| त्रिफळाक्वाथ | ९६ ,, | गोमूत्र | ३० ,, |

एकत्र पाचन करावे.

काल : दिवसातून दोन वेळा लेप घालावा.

## ११५. लोध्रासव

द्रव्ये :

| | | | |
|---|---|---|---|
| लोध्र | १ भाग | कटुका | १ भाग |
| कचोरक | १ ,, | भार्ङ्गी | १ ,, |
| पुष्करमूळ | १ ,, | इंद्रयव | १ ,, |
| एला | १ ,, | तगर | १ ,, |
| मूर्वा | १ ,, | चित्रक | १ ,, |
| विडंग | १ ,, | पिप्पलीमूळ | १ ,, |
| त्रिफळा | ३ ,, | कुष्ठ | १ ,, |
| प्रियंगु | १ ,, | अतिविषा | १ ,, |
| पुगीफल | १ ,, | पाठा | १ ,, |
| इंद्रवारुणी | १ ,, | नागकेशर | १ ,, |
| किराततिक्त | १ ,, | तमालपत्र | १ ,, |
| जीरक | १ ,, | मुस्ता | १ ,, |
| जल | १२४ ,, | | |

काढा $\frac{1}{4}$ उरवावा व त्यात

मध २५६ भाग

घालून आसव विधीने तयार करावे.

मात्रा : २–४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर



## ११६. लोहासव

द्रव्ये :

| | | | |
|---|---|---|---|
| लोहचूर्ण | १६ भाग | सुंठ | १६ भाग |
| मिरे | १६ ,, | पिंपळी | १६ ,, |
| हिरडा | १६ ,, | बेहडा | १६ ,, |
| आवळकाठी | १६ ,, | ओवा | १६ ,, |
| वावडिंग | १६ ,, | नागरमोथे | १६ ,, |
| चित्रक | १६ ,, | धायटीची फुले | ८० ,, |
| पाणी | २०७८ ,, | मध | २५६ ,, |
| गूळ | ४०० ,, | | |

आसवविधीने तयार करावे.

मात्रा : २–४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर

## ११७. वचातैल

द्रव्ये : वचाक्वाथ १६० भाग    तैल ८० भाग
वचाकल्क २० ,,

तैलविधीप्रमाणे सिद्ध करावे.

मात्रा : ५ ते १० थेंब
काल : दिवसातून दोन वेळा

## ११८. वातगजांकुश

द्रव्ये : पारद ८ भाग    कारस्कर ८ भाग
गंधक ८ ,,    त्रिकटू १२ ,,

भावना : निम्बुकरस – १
मात्रा : ४ ते ८ गुंजा
अनुपान : पाणी
काल : दिवसातून २–३ वेळा

## ११९. वातविध्वंस

द्रव्ये : पारद १ भाग    पिप्पली २ भाग
गंधक १ ,,    शुंठी १ ,,

| | | | |
|---|---|---|---|
| नागभस्म | भाग | मरिच | भाग |
| वंगभस्म | ,, | विष | ४ १/२ ,, |
| ताम्रभस्म | ,, | टंकण | १ ,, |
| अभ्रकभस्म | ,, | | |
| लोहभस्म | ,, | | |

भावना :

| | | | |
|---|---|---|---|
| त्रिफळाक्वाथ | – ३ | भृंगराजरस | – ३ |
| चित्रकमूलक्वाथ | – ३ | निर्गुंडी रस | – ३ |
| कुष्ठक्वाथ | – ३ | भूम्यालकीरस | – ३ |
| अर्कक्षीर | – ३ | आर्द्रक रस | – ३ |
| निंबुक रस | – ३ | | |

मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : पाणी
काल : दिवसातून २–३ वेळा

## १२०. वासकासव

द्रव्ये :

| | | | |
|---|---|---|---|
| वासक्वाथ | १६० भाग | गुड | ६० भाग |
| धातकीपुष्प | १ ,, | त्वक् | १/२ ,, |
| एला | १/२ ,, | तेजपत्र | १/२ ,, |
| नागकेशर | १/२ ,, | कंकोल | १/२ ,, |
| त्रिकटू | १/२ ,, | उशीर | १/२ ,, |

आसवविधीने तयार करावे.

मात्रा : २–४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर

## १२१. विडंगारिष्ट

द्रव्ये :

| | | | |
|---|---|---|---|
| विडंग | ८० भाग | पिप्पलीमूळ | ८० भाग |
| रास्ना | ८० ,, | इंद्रयव | ८० ,, |
| पाठा | ८० ,, | आमलकी | ८० ,, |
| जल | ६४०० ,, | | |

काढा १/२ उरवावा व त्यात



| | | | |
|---|---|---|---|
| मध | १२०० भाग | धातकी | ८० भाग |
| त्वक | ८ ,, | तमालपत्र | ८ ,, |
| एला | ८ ,, | प्रियंगू | ८ ,, |
| कांचनारत्वक् | ४ ,, | लोध्र | ४ ,, |
| त्रिकटू | ३२ ,, | | |

'अरिष्ट' विधीप्रमाणे तयार करावे.

मात्रा : २–४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
कास : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर

## १२२. विषगर्भ तैल

द्रव्ये : तिलतैल ३२० भाग    कांजिक ३०० भाग

करवीरमूळ, धत्तूरमूळ, निर्गुंडीमूळ, अर्कमूळ } समभाग घेऊन काढा ३२० भाग

कल्क द्रव्ये—

| | | | |
|---|---|---|---|
| धत्तूर | ४ भाग | देवदारु | ४ भाग |
| कुष्ठ | ४ ,, | दार्वी | ४ ,, |
| कलिहारी | ४ ,, | स्वर्णक्षीरी | ४ ,, |
| विष | ४ ,, | रास्ना | ४ ,, |
| करवीर | ४ ,, | ज्योतिष्मती | ४ ,, |
| मरिच | ४ ,, | चित्रक | ४ ,, |
| दन्ती | ४ ,, | सर्षप | ४ ,, |
| जटामांसी | ४ ,, | एरंड | ४ ,, |
| वचा | ४ ,, | लाक्षा | ४ ,, |
| त्रिफळा | ४ ,, | लजाळू | ४ ,, |

तैलविधीप्रमाणे तयार करावे.

मात्रा : २० ते ६० थेंब
काल : दिवसातून दोन वेळा लावणे.

## १२३. वृष्यवटी

| | | | |
|---|---|---|---|
| श्वेतकरवीरमूलत्वक | १० भाग | जातिफल | २ भाग |
| कुंकुम | २ ,, | जातिपत्री | २ ,, |
| लवंग | २ ,, | एला | २ ,, |
| आकारकरभ | २ ,, | | |
| महिषीक्षीर | ८०० ,, | | |

१/२ उरवावे व त्यात

मल्ल २ भाग — कर्पूर २ भाग

घालून दध्यादिक्रमाने घृत सिद्ध करावे.

घृत २० भाग — बरतांड २० भाग

एकत्र भाजावे व त्यात

| | | | |
|---|---|---|---|
| पिप्पली | २० भाग | सैंधव | २० भाग |
| कर्पूर | ३/४ ,, | अहिफेन | १/२ ,, |
| शिलाजतू | ३ ३/४ ,, | | |

घालून एकत्र खलावे.

मात्रा : ४ ते ८ गुंजा
अनुपान : पाणी, दूध
काल : दिवसातून २ वेळा

## १२४. शतधौत घृत

द्रव्ये : (तूप) घृत १ भाग — जल ३ भाग

तांब्याच्या परातीत तूप घेऊन त्यात तुपाच्या वजनाच्या तीन पट पाणी घेऊन तांब्याच्याच पात्राने ४–५ मिनिटे चांगले घोटावे व नंतर पाणी ओतून टाकावे. पुन्हा पाणी घालून वरीलप्रमाणेच घोटावे असे १०० वेळा करावे.

काल : दिवसातून २ वेळा लावणे.

## १२५. शतावरी कज्जली

द्रव्ये : शतावरी चूर्ण ७ भाग — समगंधक कज्जली १ भाग

एकत्र खलावे

मात्रा : १ ते ३ मासे
अनुपान : दूध
काल : दिवसातून २ वेळा



## १२६. शतावरी कल्प

द्रव्ये : शतावरी चूर्ण व साखर यांचा बनविलेला कल्प
मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : दूध
काल : दिवसातून दोन वेळा

## १२७. शतावरी घृत

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : शतावरी क्वाथ | २० भाग | घृत | २० भाग |
| क्षीर | ८० ,, | शतावरी कल्क | ५ ,, |

घृतविधीप्रमाणे सिद्ध करावे.

मात्रा : १ ते २ चमचे
अनुपान : पाणी, साखर
काल : दिवसातून दोन वेळा

## १२८. शतावरी चूर्ण

द्रव्ये : शतावरी चूर्ण
मात्रा : १ ते २ मासे
अनुपान : पाणी, दूध
काल : दिवसातून ३–४ वेळा

## १२९. शतावरी लेह

द्रव्ये : शतावरी क्वाथ ४० भाग — शर्करा २० भाग

अवलेह तयार करावा.

मात्रा : १ ते २ चमचे
अनुपान : दूध
काल : दिवसातून दोन वेळा

## १३०. शंखभस्म

द्रव्ये : शंखभस्म
मात्रा : २ ते ४ गुंजा

अनुपान : दूध
काल : दिवसातून २-३ वेळा

## १३१. शंखवटी

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : चिंचाक्षार | ४ भाग | स्नुहीक्षार | ४ भाग |
| अर्कक्षार | ४ „ | शंखभस्म | ८ „ |
| हिंगू | २ „ | अष्टलवमानी | ३२ „ |
| यवाक्षार | २ „ | स्वर्जिकाक्षार | २ „ |

भावना : निम्बुकरस– ३   निर्गुंडीरस–१
चित्रक मूलक्वाथ–३   मुंडीरस–१
भृंगराज-१   आर्द्रकरस-१

मात्रा : २ ते ८ गुंजा
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून २–३ वेळा

## १३२. शंखोदर

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : शंखभस्म | ४ भाग | अहिफेन | १ भाग |
| जातिफल | १ „ | टंकण | १ „ |

भावना : अहिफेन बीजक्वाथ– १
मात्रा : १ ते ४ गुंजा
अनुपान : पाणी
काल : दिवसातून २–३ वेळा

## १३३. शुंठीचूर्ण

द्रव्ये : शुंठीचूर्ण
मात्रा : १ ते २ गुंजा
अनुपान : मध, क्वाथ करून घेणे, दूध
काल : दिवसातून २–३ वेळा

## १३४. शुंठीपाक

द्रव्ये : सुंठीचे चूर्ण व साखर यांचा कल्क
मात्रा : २-४ गुंजा



अनुपान : दूध
काल : दिवसातून दोन वेळा

## १३५. शूलहर वटी

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : सुंठी | १ भाग | सैंधव | ३ भाग |
| टंकन | १ „ | हिंगू | १ „ |

भावना : तिक्तशिग्रुरस-३
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : पाणी
काल : दिवसातून दोन तीन वेळा

## १३६. शोधनतेल

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : आघाडा | १ भाग | बाहवा | १ भाग |
| निंब | १ „ | कडू घोसाळे | १ „ |
| रिंगणी | २ „ | डोरली | १ „ |
| पाणी | ९६ „ | | |

काढा १/४ उरवावा व

| | | | |
|---|---|---|---|
| काटा | ४ भाग | तिळतेल | १ भाग |
| रानतुळस | १/४ „ | मेढशिंगी | १/४ „ |
| कडुवृंदावन | १/४ „ | कळलावी | १/४ „ |
| करंज | १/४ „ | चित्रक | १/४ „ |
| पहाडमूळ | १/४ „ | विडंग | १/४ „ |
| त्रिकटू | १/४ „ | पंचलवण | १/४ „ |
| मनशिळ | १/४ „ | हरताळ | १/४ „ |
| कासीस | १/४ „ | निशोत्तर | १/४ „ |
| दंती | १/४ „ | | |

स्नेहपाक विधीने तेल सिद्ध करावे

काळ : दिवसातून दोन वेळा लावावे.

## १३७. शोधघ्न लोह

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : त्रिकटू | १ भाग | त्रिफळा | १ भाग |
| द्राक्षा | १ „ | पुष्करमूळ | १ „ |

| | | | |
|---|---|---|---|
| उशीर | १ भाग | कचोरा | १ भाग |
| लोहभस्म | १ ,, | वचा | १ ,, |
| लवंग | १ ,, | कर्कटशृंगी | १ ,, |
| दालचिनी | १ ,, | बाळंतशेप | १ ,, |
| बेहडा | १ ,, | वावडिंग | १ ,, |
| धायटी | १ ,, | मंडुरभस्म | १५ ,, |

भावना : कुडयाच्या सालीचा रस–३ व तो कल्क ठेवून त्यास लघुपुट द्यावे. स्वांगशीत झाल्यावर काढून घोटून वापरावे.

मात्रा : २ ते ४ गुंजा

अनुपान : पाणी

काल : दिवसातून ३ ते ४ वेळा

## १३८. श्लीपदारिकाथ

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : वरुण | १ भाग | पुनर्नवा | १ भाग |
| शिग्रु | १ ,, | हरीतकी | २ ,, |
| मार्कंडिका | १ ,, | देवदारु | १ ,, |
| त्रिकटू | ३ ,, | गुडुची | १ ,, |

मात्रा : २ ते ४ मासे

अनुपान : समभाग पाणी

काल : दिवसातून दोन वेळा

## १३९. सर्पगंधा चूर्ण

द्रव्ये : सर्पगंधा चूर्ण

मात्रा : १ ते २ मासे

अनुपान : पाणी

काल : दिवसातून दोन तीन वेळा

## १४०. समीरपन्नग रस

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : पारद | १ भाग | मल्ल | १ भाग |
| गंधक | १ ,, | हरिताल | १ ,, |
| मनःशिला | १ ,, | | |



भावना : तुलसीरस–१
वालुकायंत्रात विधिपूर्वक पाचन करावे.

मात्रा : ½–२ गुंजा

अनुपान : मध

काल : दिवसातून २–३ वेळा

## १४१. संजीवनी

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : विडंग | १ भाग | हरीतकी | १ भाग |
| शुंठी | १ ,, | आमलकी | १ ,, |
| पिप्पली | १ ,, | बिभीतक | १ ,, |
| वचा | १ ,, | गुडूची | १ ,, |
| भल्लातक | १ ,, | विष | १ ,, |

भावना : गोमूत्र

मात्रा : २ ते ४ गुंजा

अनुपान : पाणी, मध

काल : दिवसातून २ ते ३ वेळा

## १४२. सामुद्रादिचूर्ण

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : लवण | १ भाग | सैंधव | १ भाग |
| यवक्षार | १ ,, | स्वर्जिकाक्षार | १ ,, |
| सौवर्चल | १ ,, | शुंठी | १ ,, |
| मरिच | १ ,, | पिप्पली | १ ,, |
| चित्रक | १ ,, | हिंगु | १ ,, |
| विडंग | १ ,, | | |

मात्रा : १ ते २ मासे

अनुपान : गरम पाणी

काल : दिवसातून दोन वेळा

## १४३. सारिवाद्यासव

| | | | |
|---|---|---|---|
| द्रव्ये : सारिवा | ५ भाग | मुस्ता | ५ भाग |
| लोध्र | ५ ,, | वट | ५ ,, |
| पिप्पल | ५ ,, | शठी | ५ ,, |
| अनंतमूळ | ५ ,, | पद्म | ५ ,, |

| | | | |
|---|---|---|---|
| पाठा | ५ भाग | उशीर | ५ भाग |
| आमलकी | ५ ,, | गुडूची | ५ ,, |
| चंदनद्वय | ५ ,, | एलाद्वय | ५ ,, |
| यवानी | ५ ,, | कटुका | ५ ,, |
| कुष्ठ | २० ,, | हरीतकी | २० ,, |
| जल | ५१२० ,, | गूळ | १४० ,, |
| धातकीपुष्प | ५० ,, | द्राक्षा | ३२० ,, |

आसव विधीप्रमाणे तयार करावे.

मात्रा : २ ते ४ चमचे
अनुपान : समभाग पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर

## १४४. स्वादिष्टविरेचन चूर्ण

द्रव्ये : यष्टिमधु १६ भाग — मार्कंडिका १६ भाग
मिश्रेया ८ ,, — गंधक ८ ,,
शर्करा ४० ,,

मात्रा : २ ते ४ मासे
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून २ वेळा रात्री झोपण्यापूर्वी

## १४५. स्मृतिसागर

द्रव्ये : पारद १ भाग — गंधक १ भाग
हरिताल १ ,, — मन:शिला १ ,,
ताम्रभस्म १ ,,

भावना : वचाक्वाथ—२१
ब्राह्मीरस—२१

मात्रा : १–२ गुंजा
अनुपान : पाणी, ब्राह्मीप्राश
काळ : दिवसातून २ वेळा



## १४६. सितोपलादी चूर्ण

द्रव्ये : पिप्पली ४ भाग — वंशलोचन ८ भाग
एला २ ,, — त्वक् १ ,,
शर्करा १६ ,,

मात्रा : १ ते २ मासे
अनुपान : मध
काल : दिवसातून ३–४ वेळा

## १४७. सुवर्णमाक्षिक भस्म

द्रव्ये : सुवर्णमाक्षिक भस्म
मात्रा : १ ते २ गुंजा
अनुपान : मध
काल : दिवसातून २–३ वेळा

## १४८. सुवर्णमालिनी वसंत

द्रव्ये : सुवर्णभस्म १ भाग — मौक्तिकभस्म २ भाग
हिंगुळ ३ ,, — मरिच ४ ,,
खर्पर ८ ,,

भावना : लोणी – १ — निम्बुकरस – २१
मात्रा : $\frac{1}{2}$ ते २ गुंजा
अनुपान : दूध
काल : दिवसातून १–२ वेळा

## १४९. सूतशेखर

द्रव्ये : पारद १ भाग — सुवर्णभस्म १ भाग
गंधक १ ,, — ताम्रभस्म १ ,,
शंखभस्म १ ,, — विष १ ,,
धत्तूरबीज १ ,, — चातुर्जात ४ ,,
त्रिकटू ३ ,, — बिल्वमज्जा १ ,,
कचारेक १ ,, — टंकण १ ,,

भावना : भृंगराजरस – १ किंवा २१

मात्रा : ½ ते २ गुंजा
अनुपान : आलेरस, दूध, लिंबू सरबत
काल : दिवसातून २–३ वेळा

### १५०. सूक्ष्म त्रिफळा

द्रव्ये : त्रिफळा चूर्ण
भावना : त्रिफळा क्वाथ – ३
मात्रा : २ ते ४ गुंजा
अनुपान : पाणी
काल : दिवसातून २–३ वेळा

### १५१. सौराष्ट्री चूर्ण

| | (१) | (२) |
|---|---|---|
| द्रव्ये : | (१) तुरटी चूर्ण | (२) तुरटी लाही |
| मात्रा : | ४ गुं. ते ६ गुं. | १–२ गुं. गुळण्यासाठी पाण्यात |
| काल : | उत्तरबस्तीसाठी वापरावा | विरघळवून वापरावी. |

### १५२. सौराष्ट्र बोलवटी

द्रव्ये : तुरटी लाही १ भाग    तांबडा बोळ १ भाग
सोनकाव १ „
भावना : मोचरस
मात्रा : ४ ते ६ गुंजा
अनुपान : पाणी, अशोकारिष्ट, लोध्रासव
काल : दिवसातून ३ वेळा

### १५३. हरिद्राचूर्ण

द्रव्ये : हरिद्राचूर्ण
मात्रा : ½ ते २ गुंजा } गंडुषार्थ वापरतात.
अनुपान : मध
काल :

### १५४. हरीतकी चूर्ण

द्रव्ये : हरीतकी चूर्ण
मात्रा : १ ते ३ मासे



अनुपान : गरम पाणी
काल : रात्री झोपताना।

### १५५. हिंगाष्टक चूर्ण

द्रव्ये : त्रिकटु १ भाग    अजमोदा १ भाग
सैंधव १ „    जीरकद्वय १ „
हिंगु १ „
मात्रा : १ ते २ मासे
अनुपान : गरम पाणी
काल : दिवसातून दोन वेळा जेवणानंतर, रात्री झोपताना

### १५६. हेमगर्भ

द्रव्ये : पारद ४ भाग    गंधकभस्म २ भाग
सुवर्णभस्म १ „    ताम्रभस्म ३ „
पाचन करावे. पोट्टलीकल्पाप्रमाणे तयार करावा.
मात्रा : ½ ते १ गुंजा, मात्रा उगाळून देणे.
अनुपान : आलेरस व मध, मध
काल : चाटण

### १५७. हेमाभ्रकर्पूरमिश्रण

द्रव्ये : हेमगर्भ ½ भाग    अभ्रकभस्म ½ भाग
कर्पूर १ „
मात्रा : २–३ गुंजा
अनुपान : मध
काल : चाटण

### १५८. हेमशिलाजतु

द्रव्ये : शु. शिलाजित ७ भाग    हेमगर्भरस १ भाग
एकत्र खलावे.
मात्रा : २–४ गुंजा
अनुपान : मध
काल : दिवसातून २ वेळा

# परिशिष्ट : १

## प्रत्यक्ष रुग्ण परीक्षण

**(१) दर्शन स्पर्शन प्रश्नैः परीक्षेताथ रोगिणम् ।     वा. सू. १/२२**

**(२) दर्शन प्रश्न संस्पर्शैः परीक्षा त्रिविधा स्मृता ।**
**वयोवर्ण शरीराणामिन्द्रियाणां च दर्शनात् ।।    च. चि. २५/२२**

रुग्णपरीक्षण करण्यासाठी ग्रंथात एक क्रम सांगितला आहे. वैद्याने प्रथम॰ रुग्णाची दर्शनपरीक्षा करावी. नंतर स्पर्शनपरीक्षा करावी व शेवटी प्रश्नपरीक्षा करावी. ह्या क्रम सांगण्यात एक महत्त्वाचा संकेत आढळतो, तो असा की, वैद्याने दर्शनपरीक्षेत जे ज्ञान मिळवले असेल त्याची निश्चिती, स्पर्शनपरीक्षेने निश्चित करावयाची आहे व ह्या दोनही परीक्षांत मिळालेल्या ज्ञानाचे निश्चितीकरण प्रश्नपरीक्षेने करावयाचे आहे. या क्रमाने रुग्ण तपासल्यास वैद्याला रोगाचे नेमके व अचूक ज्ञान होते, व त्यामुळे चिकित्साही फलद्रूप होते. पूर्वीचे अनुभविक वैद्य रुग्णाला समोरून चालत येत असतानाच दर्शनपरीक्षा करून रुग्णाच्या रोगाचे अर्धेअधिक ज्ञान प्राप्त करून घेत असत.

प्रत्यक्ष रुग्णपरीक्षणाचे मुख्यत्वेकरून दोन भाग पडतात. एक सामान्य परीक्षण व दुसरा रुग्णाचे विशेष परीक्षण.

सामान्य परीक्षणात अष्टविध परीक्षण समाविष्ट होते व विशेष परीक्षणात स्रोतसांचे परीक्षण येते.

### सामान्य परीक्षण :

**रोगक्रान्तशरीरस्य स्थानान्यष्टौ निरीक्षयेत् ।**
**नाडीं मूत्रं मलं जिव्हा शब्दं स्पर्शं दृगाकृती ।।    यो. र. पान ८**

**दोषकोपे घनेऽल्पेच पूर्वं नाडीं परीक्ष्य च ।**
**अन्ते चादौ स्थितिस्तस्या विज्ञेया भिषजा स्फुटम् ।।    यो. र.**

रुग्णाचे सामान्य परीक्षण असो किंवा विशेष परीक्षण असो, त्यात दर्शन, स्पर्शन व नंतर प्रश्न अशाच क्रमाने वैद्याने तपासण्याचा क्रम ठेवावा. वरील आठ प्रकारांपैकी मल, मूत्र, जिव्हा, नेत्र, आकृती यांची प्रथम दर्शनपरीक्षा करावी, व नंतर नाडीपरीक्षा करावी. ती करत असताना नाडीची गती, नाडीचे बल, नाडीचा वेग हे पाहणे महत्त्वाचे ठरते. त्यावरून दोषांचे ज्ञान होते. त्यानंतर रुग्णाला प्रश्न विचारून त्यावरून त्याचा शब्द कळतो. त्यावरून त्याचा आवाज कळतो. आवाजावरून त्याचे बलही कधी कधी कळू शकते. स्पर्शामुळे रुग्णाची त्वचा कशी आहे ते कळते. रसक्षय असल्यास नाडी, त्वचा, नेत्र व शब्द यांवरून कळण्यास मदत होते.

## विशेष परीक्षण :

प्रत्येक रुग्णपरीक्षेत सामान्य परीक्षण व विशेष परीक्षण हे आवश्यक असते. कारण स्त्री रुग्णा असली तर तिला फक्त स्त्री-रोगच असेल असे नाही तर त्याबरोबर किंवा स्त्री-रोगाशिवाय इतर स्रोतसांचाही व्याधी तिला असण्याची शक्यता असते. उदा० गर्भिणी स्त्रीला, गर्भोपद्रव आहे व त्याच वेळी तिला तमकश्वासासारखा व्याधी असणे किंवा हृद्रोग असणे. याच्या उलट पुरुष रुग्ण आहे, त्यालाही पुरुषविशिष्ट व्याधींबरोबर इतरही व्याधी असण्याची शक्यता असते, उदा० आमवृद्धी हा व्याधी एका पुरुषाला आहे. त्याचबरोबर त्याला तमकश्वास असणे व त्याचे ज्ञान वैद्याला होणे आवश्यक ठरते. आणि म्हणून स्त्रियांमध्ये नुसत्या आर्तववह स्रोतसांचे परीक्षण करून भागत नाही; तर रसरक्तादी तेराही स्रोतसांच्या परीक्षा करणे अत्यावश्यक ठरते. अशा तऱ्हेने तपासणी करीत असताना बऱ्याच वेळा या इतरही स्रोतसांतील विकार किंवा स्थानवैगुण्य वैद्याला समजते व त्याचा त्याला चिकित्सा करताना उपयोग होतो. उदा० वर दिलेल्या गर्भिणीत तमकश्वास हा व्याधी सापडतो, किंवा हृद्रोगही सापडतो; व मग त्या रुग्णात प्रसवकालीन धोके वैद्याच्या लक्षात येऊन त्याप्रमाणे वैद्य काळजी घेऊ शकतो.

पुष्कळ वेळा रुग्णा लक्षणे फसवी सांगत असते, व आपल्याला रुग्णेच्या परीक्षणात अगदी भिन्न लक्षणे आढळत असतात. मग त्या वेळी वैद्याने ठामपणे आपले निदान निश्चितपणे न भिता तिच्या नातेवाइकांना सांगावे. मग ते रुग्णेला आवडणारे असो वा नसो. (अशी वेळ बहुधा कुमारी स्त्री गर्भिणी असेल तर येते. किंवा गर्भिणी का गुल्मिणी या निदान-निश्चितीच्या वेळी येते.)

रुग्ण तपासता तपासता मिळालेल्या लक्षणांवरून जर आपण रुग्णेला प्रश्न विचारले तर ते अगदी अचूक ठरतात व रुग्णेला वैद्याबद्दल एक प्रकारचा विश्वास वाटू लागतो. व मग तपासणी करणे, निदान करणे व चिकित्सा करणे सोपे होते. उदा० योनिपरीक्षण करत असताना, सूचिमुखी योनी असताना किंवा गर्भाशयात गुल्म असताना, रुग्णेला तुला रज:प्रवृत्तीच्या वेळी उदरशूळ होतो का म्हणून



प्रश्न विचारला असता त्याचे होय हेच उत्तर येते, व मग रुग्णेला वाटते की, यांना आतून तपासून हे कसे बरे कळले ? अर्थात वैद्याला मुळात सर्व ज्ञान असले पाहिजे, हेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

वैद्याकडे तपासून घेण्यास येणाऱ्या रोग्यांचे बहुधा दोन गट असतात. एक, दुसऱ्या डॉक्टर किंवा वैद्याकडून तपासून न घेताच प्रथमत: आपल्याकडे आलेला—तर दुसरा— दुसऱ्या डॉक्टर किंवा वैद्याकडून तपासून घेऊन मग आपल्याकडे आलेला. त्यांतही दोन प्रकार सापडतात. एक— दुसऱ्या डॉक्टरची संपूर्ण चिकित्सा घेऊन मग आपणाकडे येतो. तर एक डॉक्टरचे नुसते तपासणीनंतरचे मत व सल्ला घेऊन मग आपणाकडे येतो. व आपणास आल्याबरोबर पूर्व-तपासणीचे बाड आपल्या हातात देऊ लागतो. त्या वेळी वैद्याने शांतपणे ते बाड हातात घ्यावे व दूर ठेवावे; व त्यांना गोड भाषेत सांगावे की, " मी हे सर्व मागाहून बघेन, नाही तर तुमची तपासणी पूर्वग्रह-दूषित होईल." यामुळे रुग्णा नाराज न होता आपणास सर्व प्रकारे सहकार्य देते. आपल्या तपासणीनंतर काही वेळा आपल्या तपासणीत व पहिल्या तपासणीतील रिपोर्टमध्ये तफावत असण्याची शक्यता असते. त्या वेळी आपले मत ठामपणे सांगावे, पण त्या वेळी त्या दुसऱ्या डॉक्टरला दूषण किंवा नावे ठेवू नयेत.

ज्या वेळी आपले व त्यांचे मत एक ठरेल त्या वेळी मात्र चिकित्सा देण्यास मागे पुढे पाहू नये.

प्रथमच आपल्याकडे आलेल्या रुग्णाला तपासणे फारच सोपे व सोईचे होते.

स्त्रीरोगी तपासणाऱ्या वैद्याला, स्त्रीच्या प्राकृत शरीराचे सम्यग् (योग्य) ज्ञान असले पाहिजे. आणि ते तसे असेल तरच त्याला विकृती चटकन समजते व निदान करण्यास सोपे जाते.

## स्त्री-रोग :

स्त्रीरोगामध्ये— रज:क्षीणता, रजोवृद्धी, रजोदुष्टी, रक्तप्रदर, योनिरोग (विंशति योनिरोग) रक्तगुल्म, स्तनरोग, योनिकंद, सोमरोग असे रोग समाविष्ट होतात. या सर्व रोगांत रुग्णेची प्रथम सामान्य परीक्षा करावी व नंतर विशेष परीक्षा करावी. विशेष परीक्षणात योनिपरीक्षण हे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

योनिपरीक्षण—

योनी ही तीन भागांत विभागली गेली आहे.—

(१) **प्रथम आवर्त** : योनीचा बाह्य भाग – योनीचा गर्भाशय मुखापर्यंतचा भाग.

(२) **द्वितीय आवर्त** : गर्भाशयाच्या बाह्य मुखापासून ते आंतर–मुखापर्यंतचा भाग.

**(३) तृतीय आवर्त** : गर्भाशय, आर्तववाहिनी व अंतःफल, असे अवयवांचे परीक्षण करावे.

प्रत्यक्ष स्त्रीरुग्ण-परीक्षण करण्यापूर्वी रुग्णेला मूत्रविसर्जन करण्यास सांगावे. व मग तिला उत्तानासनात टेबलावर घ्यावे. गर्भाशय हा मूत्राशय व मलाशय यांच्या मध्ये अधोदरात (कटिरात) असतो. त्यामुळे मूत्राशय व मलाशय हे जर भरलेले असतील तर गर्भाशयाची परीक्षा करणे कठीण जाते. परीक्षण चुकते, व मग वैद्याची फजिती होते. उदा० मूत्राशय मूत्राने भरलेला असेल तर, गर्भाशयाचा आकार व स्थिती ही बरोबर कळत नाही व मग निदान चुकते. गर्भिणी नसताना गर्भिणी वाटते, इत्यादी. मलाशय मलाने भरलेला असताना गर्भाशयाच्या पश्चात भागी ग्रंथी, गुल्म असेही निदान होऊ शकते व रुग्णेला निरूह बस्ती दिल्यानंतर ते नाहीसे होते.

योनिपरीक्षण करणाऱ्याने आपल्या दोन्ही हातांच्या बोटांची नखे काढून, हात स्वच्छ धुऊन, जरुरीप्रमाणे शुद्ध हातमोजा ( Hand Glove ) घालावा. हातमोजा न घालता बोटांच्या स्पर्शज्ञानाचा वैद्यास उपयोग होतो. केव्हाही रुग्ण तपासताना वैद्याने एक नियम लक्षात ठेवावा. रुग्णेला आपले अंग ढिले सोडण्यास सांगावे व आपणही (वैद्याने) आपल्या हातांचा अगदी हलक्या हातानेच वापर करावा. आपण जर जोरात हाताचा वापर केला तर लगेच रुग्णा आपले अवयव किंवा अंग आखडून घेते व मग आपले सर्व परीक्षण बरोबर येतेच असे नाही. प्रथम रुग्णेस पूर्ण विश्वासात घेणे आवश्यक ठरते. पुष्कळ वेळा स्त्रिया दुखण्याच्या कल्पनेनेच घाबरतात. त्यासाठी तपासताना काय काय होणार आहे, त्याची तिला पूर्ण कल्पना द्यावी. एकीकडे तपासताना तिच्याशी काही गोष्टीही कराव्यात व मग तपासण्यास सुरुवात करावी.

**प्रथम आवर्ताचे दर्शनपरीक्षण** : बाह्य योनीचे दर्शनपरीक्षण प्रथम करावे. योनीचा बाह्य भाग पुष्ट असला पाहिजे. म्हणजेच योनिओष्ठ हे पुष्ट असावेत. हे पुष्ट असले म्हणजे बहिर्गोलाकार भाग दिसतो व त्यालाच ग्रंथांत शकटाकृती, म्हणजेच छकड्याच्या वरील असलेल्या बहिर्गोलाकार छपरासारखा आकार असणे असे म्हटले आहे. योनिओष्ठ वगळून त्याच्या आसपास भगास्थीपर्यंत बारीक केस (लव) असणे हे लक्षण प्राकृत आहे. ही लव जास्त प्रमाणात असणे किंवा मुळीच नसणे ही दोन्ही लक्षणे विकृत मानावीत.

कुमारिका असेल तर तिच्यामध्ये योनिपटल सुस्थितीत असले पाहिजे (म्हणजेच ते फाटलेले असता कामा नये.) कुमारिकेमध्ये फक्त दर्शनपरीक्षणच करावयाचे असते. स्पर्शन परीक्षण करू नये. ज्यावेळी तृतीय आवर्ताचे परीक्षण अत्यावश्यकच असेल तेव्हा योग्य ती काळजी घेऊन वैद्याने काळजीपूर्वक अगदी हलक्या हाताने योनिपरीक्षा करावी.



याच वेळी मूत्रमार्गाचेही दर्शनपरीक्षण करावे.

योनीचे स्पर्शनपरीक्षण वैद्याने आपल्या उजव्या हाताच्या तर्जनी व मध्यमा या दोन बोटांनी करावयाचे आहे. प्रथम वैद्याने आपले दोन्ही हात स्वच्छ धुऊन, आपल्या डाव्या हाताचा अंगठा व तर्जनीने रुग्णाच्या योनिओष्ठांना अगदी हलक्या हाताने बाजूस सारून, (बाईच्या मांड्यांच्या दिशेस सारून) शुद्ध कापसाने बाह्य-योनी पुसून घ्यावी. व या वेळी स्रावाचे दर्शनपरीक्षण करावे. नंतर आपल्या उजव्या हाताची तर्जनी व मध्यमा ही दोन बोटे अगदी हलक्या हाताने योनीत घालावीत. आपली दोन बोटे वापरण्याने रुग्णेस फारच त्रास होत असेल तर त्या वेळी वैद्याने आपले एकच बोट वापरावे.

प्रथम वैद्याच्या बोटाला गर्भाशयमुख लागेल. हे गर्भाशयमुख योनीमध्ये कोणत्या दिशेला वळलेले आहे ते बघावे. ते योनीच्या पोकळीत अगदी मध्यावर आहे का, ते पाहावे. का ते डाव्या किंवा उजव्या बाजूस आहे ते पाहावे. नंतर गर्भाशय मुखाचा आकार पाहावा. तो मोठा असतो, प्राकृत असतो किंवा लहानही असतो. गर्भाशयमुखाची लांबीही कधी कधी जास्त लांब असते. या सर्व विकृत अवस्था कळण्यासाठी वैद्याने प्राकृत योनिपरीक्षण बऱ्याच वेळा केलेले असले पाहिजे.



आकृती २६०

यानंतर दोन बोटे आणखी खोलवर सरकवून गर्भाशयाची परीक्षा करावयाची (तृतीय आवर्ताची) असते. गर्भाशय, या कटिराच्या पोकळीत दोन्ही बाजूंस वळलेला सापडतो तर तो कधी मागे किंवा पुढेही वळलेला सापडतो. काही वेळेला गर्भाशय हा गर्भाशयमुखापाशी चारही दिशांला अगदी काटकोनात वळलेला सापडतो (जसा चिंचेचा आकडा वळलेला सापडतो तसा).



आकृती २६१

गर्भाशयाची स्थिती बघत असताना परीक्षकाने आपला डावा हात रुग्णेच्या अधोदरावर ठेवावा व उजव्या हाताच्या बोटाने (तर्जनी व मध्यमा) योनीच्या आतून परीक्षण करावे. एकाच वेळी दोन्ही हातांचा उपयोग करावा. प्रथम उजव्या हाताने गर्भाशयमुखाचे परीक्षण केल्यानंतर तीच दोन बोटे गर्भाशयाच्या मागून हलकेच घालून गर्भाशय वरच्या बाजूस उचलावा व त्याच वेळी हा आतून उचललेला गर्भाशय वरील हाताच्या बोटाने आणखीन पुढील बाजूस सरकवावा. म्हणजे पश्चात भागी असलेला गर्भाशय पुढील भागी येऊन त्याचा आकार बरोबर लक्षात येतो. ज्या वेळी गर्भाशय पश्चात प्रवर्तित असतो त्या वेळी वरील परीक्षणाचे तंत्र अवलंबावे. या वेळी गर्भाशयमुख भगास्थीकडे तोंड केलेले आढळते. अशा वेळी गर्भाशय चल असतो, व तो पुन्हा मागे पडतो. कधी कधी गर्भाशय पश्चात भागी संसक्त असतो. त्या वेळी तो पुढे ढकलता येत नाही. व त्यामुळे गर्भाशयाचा आकारही निश्चित कळत नाही.

ज्या वेळी गर्भाशय चल असूनही, पश्चात भागी ढकलून वर आणता येत नाही, त्या वेळी परीक्षकाने गर्भाशयमुखावर वरून खाली दाब द्यावा म्हणजे गर्भाशय आपोआप वरील बाजूस उचलला जातो व त्याच वेळी वरील हाताने तो धरून पुरःप्रवर्तित करावा.






आकृती २६२

ज्या वेळी गर्भाशय पुरःप्रवर्तितच असेल त्या वेळी परीक्षकाने याच वर दिलेल्या पद्धतीने परीक्षण करावे. म्हणजेच गर्भाशयमुखापासून पुढील बाजूस आपली दोन बोटे हलकेच ठेवावीत; म्हणजे लगेचच गर्भाशय आतील दोन बोटांना लागेल व त्याच वेळी वरील हाताच्या बोटाने तो गर्भाशय दाबून धरावा; म्हणजे गर्भाशयाचा आकार चांगला कळतो. व या वेळी गर्भाशयमुख त्रिकास्थीकडे तोंड केलेले आढळेल.

गर्भाशय पुरःप्रवर्तित असणे ही प्राकृत अवस्था आहे. परंतु एक प्रसव झाल्यावर कधी कधी गर्भाशय पश्चात प्रवर्तित होतो. व तो त्या वेळी प्राकृतच समजावा. पण गर्भाशय ज्या वेळी पश्चात प्रवर्तित असून आकाराने मोठा असला व हळूहळू तो संसक्त होऊ लागला म्हणजे मग स्त्रीमध्ये कटिशूल, कष्टरजःप्रवृत्ती अशी लक्षणे दिसू लागतात, तेव्हा ती विकृत अवस्था मानावी.

प्राकृत योनिपरीक्षणात जसा आपल्या हाताला आतून गर्भाशय लागतो, तसे दोन्ही बाजूंचे अंतःफल आपल्या हाताला लागत नाहीत. आणि ते जर आतून आपल्या हाताला लागतील तर ती विकृत अवस्था समजावी. उदा० शोथ, वृद्धी, रक्तगुल्म यात अंतःफल स्पर्शगम्य आहेत.

**रजःक्षीणता :**

**योनिपरीक्षण :** दर्शन – लोम कमी, योनिओष्ठ शुष्क.

**गर्भाशय :** आकाल असेल, लहान असेल, आकारमान $\frac{1}{2}$, $\frac{2}{4}$, $\frac{3}{4}$ असेही असते.

रजाचे प्रमाण कमी सापडेल.

**रजोवृद्धी :**

**योनिपरीक्षण :** दर्शनपरीक्षणात योनीच्या ठिकाणी पांडुता दिसेल, रक्तस्राव दिसेल.

**गर्भाशय** : आकार मोठा असेल,
अंतःफल स्पर्शगम्य असतील.

पार्श्वात स्पर्शासहत्व असेल.

गर्भाशयमुख रक्तवर्ण असेल, विस्तृतही असेल.

**रजोदुष्टी :**

दर्शनपरीक्षण : दोषानुरूप लक्षणे दिसतील.
**गर्भाशय** : स्पर्शसहत्व, आकार मोठा, स्राव दुर्गंधी.
**पार्श्व** : स्पर्शासहत्व
**गर्भाशयमुख** : पाक
**स्राव** : सपूय—

**योनिदुष्टी :**

दर्शन परीक्षणात बाह्ययोनीवर दुष्ट व्रण, सपूय स्राव दिसेल.

अशा वेळी अंतःपरीक्षण करू नये. बाहेरील व्रण बरे झाल्यावर मग आतून योनिपरीक्षण करावे. अन्यथा बाहेरील दुष्टी आत पसरते.

## काही विशेष रोग

**योनिरोग :**

**सुचिमुखी योनी** : गर्भाशयमुख स्पर्शाला अगदी संकुचित लागते. अगदी सुईच्या टोकाप्रमाणे असते. योनिवीक्षण यंत्राने हे पाहता येते.

**अंतर्मुखी योनी** : गर्भाशय व गर्भाशयमुख हे कोणत्याही एका विशेस वळलेले सापडतात. पुरोनमित, पश्चात नमित — किंवा पश्चात प्रवर्तित सापडतात.

**महायोनी** : दर्शनामध्येच गर्भाशय मुख योनीमधून बाहेर आलेले दिसेल. त्याच्याबरोबर मूत्राशय व मलाशयही आपली स्थाने सोडून योनिमार्गातून बाहेर आलेले दिसतात. या वेळी गर्भाशय मुखावर व्रण आलेले दिसतात. त्यातून स्रावही दिसतो. क्वचित वेळी तो दुष्टही असतो. अशा वेळी गर्भाशय हाताने आत ढकलून मग योनिपरीक्षा करावी व गर्भाशयाचा आकार पाहावा.

**रक्तगुल्म :**

**गर्भाशयस्थ रक्तगुल्म** : हा रक्तगुल्म मोठा असेल तर तो उदरावरूनही कळेल. योनिपरीक्षणात गर्भाशयाचा आकार मोठा लागेल, स्पर्श कठीण लागेल, गर्भाशय चल असेल किंवा संसक्तही असेल.

कष्टार्तव; अतिरजःप्रवृत्ती, पांडू, अग्निमांद्य अशी लक्षणे सापडतील.



अंतःफलाचा गुल्म असेल तर—

अनार्तवाचा इतिहास, स्तनांत कदाचित स्राव असतील, दौहृदाची लक्षणे दिसतील, उदरावरून गुल्म लागेल.

योनी परीक्षणात —

गर्भाशय — स्वतंत्र लागेल किंवा लागणारही नाही. आकार लहान असेल.

पार्श्वात — ज्या बाजूच्या अंतःफलाचा गुल्म असेल त्या पार्श्वात गुल्माचे टोक आपल्या हाताला लागेल व गुल्मात द्रवप्रचीती लागेल.



आकृती २६३

**योनिकंद :**

दर्शनपरीक्षणातच योनी ओष्ठांच्या ठिकाणी एकीकडे किंवा क्वचित वेळी दोन्ही ठिकाणी ग्रंथी दिसते (उत्सेध). त्या ठिकाणी व्रण शोथाची सर्व लक्षणे दिसून येतात.

योनिपरीक्षा अशा वेळी करू नये; तर व्रणशोथाचीच सर्व चिकित्सा करावी.

पक्वावस्थेनंतर मात्र संमोहन देऊन संपूर्ण मुळापासून त्या ग्रंथीचे निर्मूलन करावे. अन्यथा तेथे पुन्हा योनिकंद होण्याची शक्यता असते.

## गर्भिणी-परीक्षण

गर्भिणी अवस्था ही एक स्त्रीच्या जीवनातील तिला सहज प्राप्त होणारी अवस्था आहे. या वेळी गर्भ हा संपूर्णपणे गर्भिणीवर अवलंबून असतो. गर्भिणी-

मध्ये गर्भिणीची व गर्भाची स्वतंत्र परीक्षा करावी लागते. स्त्रीला गर्भिणी अवस्था प्राप्त होते. गर्भ गर्भाशयात मासानुमासिक वाढतो. त्याचा गर्भवास संपला की अगदी स्वाभाविकपणे गर्भाशयातून बाहेर येतो. याच वेळी त्याचा जन्म होतो व तो मातेपासून अलग होऊन स्वतंत्रपणे जगात जगू लागतो. इतकी ही सहज स्थिती आहे. अशी ही सुलभता पूर्वी बऱ्याच प्रमाणात सापडत असे. पण सध्याच्या काळात ही सुलभता सर्वांच्या वाट्याला फारच कमी वेळा आलेली दिसते. याची शास्त्रीय कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील : (१) स्त्रियांचे लग्नाचे वय वाढले. त्यामुळे गर्भधारणेचा कालही वाढला. आपल्या शास्त्रात 'पूर्ण षोडश वर्षा स्त्री' असे सांगितले आहे. आणि त्याप्रमाणे पूर्वी १६ ते १८ वर्षांच्या वयात बाईचे पहिले बाळंतपण येत असे. त्यामुळे प्राकृत प्रसवाचेच प्रमाण जास्त सापडे. पुढे बालकाला स्तन्यही भरपूर मिळत असे व त्यामुळे बालकही सुदृढ होत असे.

स्त्रीच्या शरीरात दर १५ ते १६ वर्षांमध्ये काही प्रमाणात दोषानुसार फरक होत असतात. १६ वर्षांपर्यंत स्त्रीची सर्वांगीण पुष्टी (वाढ) होते. १६ वर्षांपासून ३२ वर्षांपर्यंत गर्भधारणेचा काल मानावा व त्यानंतर ५० वर्षांपर्यंत किंवा त्याच्यापुढेही स्त्रीच्या शरीराची कार्यक्षमता कमी कमी होत जाते. म्हणजेच प्रथम कफाचे प्राधान्य असते. मध्ये पित्ताचे प्राधान्य असते तर नंतर शेवटी वाताचे प्राधान्य दिसते.

जसजसे स्त्रीचे वय वाढत जाते तसतसे तिच्या सर्व अवयवांचे मार्दव कमी होऊ लागते. व त्या ठिकाणी काठिण्य, रूक्षता इत्यादी गुण दिसू लागतात. आयुर्वेदात सम्यग योग, हीन योग, मिथ्या योग व अतियोग असे सांगितले आहेत. त्यानुसार जर विचार केला तर, स्त्रीला प्रथम गर्भिणी अवस्था १६ ते १८ व्या वर्षी येणे ही सम्यग् अवस्था आहे. पण सध्या लग्नाची वयोमर्यादाच २५ वर्षांच्या पुढे गेली असल्यामुळे गर्भधारणा सुमारे ३० वर्षांपर्यंत होते, व मग प्राकृत प्रसव संभवत नाही.

गर्भिणीचे सामान्य परीक्षण नेहमीप्रमाणेच करावे. विशेष परीक्षणात स्तनांचे परीक्षण, उदरात गर्भाचे परीक्षण करावे, व योनिपरीक्षणही करावे.

स्तनांचे ठिकाणी स्तनचुचुकांची परीक्षा करावी. स्तनचुचूक अति-आखूड म्हणजेच अतिलहान आहेत, का योग्य आकाराचे व सहज बालकाला तोंडात धरता येतील असे आहेत का ते पाहावे. स्तनांची पुष्टी पाहावी, स्तनचुचुकांतून चिकासारखा स्राव दिसेल. तो पाहावा.

उदरपरीक्षणात गर्भाशयाची वाढ पाहावी. ज्या महिन्याची गर्भिणी असेल त्याप्रमाणे वाढीत फरक दिसेल.

पहिल्या दोन महिन्यांत गर्भाशयाची वाढ उदरावरून लागणार नाही, तिसऱ्या महिन्यापासून ती उदरावरून म्हणजे भगास्थीच्या वर आपल्या हाताला लागू



लागेल. वैद्याने या वेळी आपला तपासणीचा हात अगदी हलका ठेवून, अलगद गर्भाशयाची उदरावरूनच परीक्षा करावी. असा अनुभव आहे की, जितका तपासणारा आपला हात हलका ठेवील तितके वैद्याला चांगले ज्ञान होते. वैद्याला गर्भाचे आसन कोणत्या महिन्यात कोणते असते याचे नेमके ज्ञान असणे आवश्यक असते. म्हणजे त्याप्रमाणे गर्भाचे प्राकृत आसन ठरवणे सोपे जाते. गर्भिणीला नवव्या महिन्यात अल्पपादशोथ व पांडुता ही लक्षणे दिसतात. तिच्याकडे वैद्याने उपेक्षाच करावी. काही वेळा गर्भिणी स्त्री आपल्याकडे येते ती, तिला तपासून तिचा प्रसव प्रकृत रीत्या होईल का नाही ते विचारण्यासाठी, आणि त्या वेळी वैद्याने पुढील गोष्टींचा विचार करून मग आपला निर्णय सांगावा.

(१) गर्भिणीचे वय
(२) गर्भाचे आसन. ( प्रसवापर्यंत प्राकृत आसन असणे )
(३) गर्भिणीचे ९ महिने पूर्ण होत असतानाच आपण घेतलेले अंदाज बरोबर येऊ शकतात. तत्पूर्वी घेतलेले अंदाज बदलू शकतात.
(४) गर्भिणीचे बल उत्तम पाहिजे. तिला कोणतेही अन्य व्याधी नसावेत.
(५) गर्भाला प्रसवाच्या वेळी ज्या मार्गातून प्रवास करावयाचा असतो तो मार्ग व गर्भ यांचे प्रमाण सम्यग् ( म्हणजे योग्य प्रमाणात ) असावे. कधी मार्ग हा गर्भापेक्षा संकुचित असतो, तर कधी मार्गापेक्षा गर्भ खूप मोठा असतो. एकूण काय, तर दोघांचे प्रमाण योग्य पाहिजे. आणि हे प्रमाण बरोबर आहे का नाही ते गर्भिणीमध्ये प्रसवाच्या आधी ८-१० दिवस निश्चित कळू शकते. आयुर्वेदात या स्थितीला आसन्नप्रसवा असे म्हणतात.

त्या वेळी गर्भशिर गर्भिणीच्या कटिरात उतरलेले आढळते. त्यामुळे तिचे मलमूत्रविसर्जन वरचेवर होत असलेले आढळते.
(६) योग्य काळी आवी सुरू होणे.
(७) गर्भिणीच्या प्राकृत बलाचीही आवश्यकता असते. कारण आवी (कळा आल्या तरी प्रवाहण करणे हा भाग गर्भिणीलाच करावा लागतो. त्या वेळी तिचे मानसिक बळ व शारीरिक बळ यांची सत्त्वपरीक्षाच असते.

वर दिलेल्या गोष्टींच्या व्यतिरिक्त काही वेळा गर्भाशयमुखाची विस्तृती न होताच गर्भोदक सृती होते. व आवी मात्र सुरू होण्याची चिन्हे दिसत नाहीत. औषधोपचार सुरू करून आवी आल्या तर ठीक नाही तर गर्भाशयात गर्भ धुसमटू लागतो.

कधी कधी गर्भाच्या गळ्याभोवती नाळेचे ३, ४ वेढे असलेले सापडतात व त्यामुळे गर्भ पुढे सरकतच नाही व आतल्या आत धुसमटू लागतो. गर्भहृदस्पंदीत

वरून वैद्याला गर्भाचे घुसमटणे कळते. यासाठी वैद्याने सावधपणे प्रसवावस्था हाताळावी. विशेषतः कालातीत गर्भावस्था असताना (गर्भिणीचे ९ महिने ९ दिवस उलटून वर ८-१५ दिवस जाणे) व प्रथम गर्भिणीमध्ये स्त्रीचे वय ३० च्या आस-पास असताना वैद्याने फारच सावध राहावे लागते. अन्यथा अपयश पदरी पडते.

## गर्भिणीमधील योनिपरीक्षा

गर्भिणीमध्ये योनिपरीक्षण करावे का करू नये, केल्यास केव्हा व कसे करावे, असे प्रश्न वैद्यापुढे असतात.

गर्भिणीमध्ये पहिल्या २-३ महिन्यांत तरी योनिपरीक्षा शक्यतो टाळावी. गर्भिणी अवस्था ही इतर दौहृदाच्या लक्षणांवरून निश्चित करावी. २ महिन्यां-नंतर मग जर अगदी आवश्यक वाटली तर अगदी हलक्या हाताने योनिपरीक्षा करावी. त्यात गर्भाशयाची स्थिती व गर्भमुखाची परीक्षा करावी. कधी कधी गर्भाशयमुख शिथिल असल्यामुळे गर्भाच्या वजनाने हळूहळू विस्तृत होऊ लागते व मग गर्भस्राव किंवा गर्भपात संभवतो. गर्भाशयमुखाची ही स्थिती वैद्याला लवकर कळली तर गर्भाशयमुखाला दोऱ्याचा टाका घालून आवळून धरता येते व योग्य वेळी तो टाका काढून सुलभ प्रसूती साधता येते. हा टाका घालणे ही पद्धत एका भारतीय डॉक्टरने शोधून काढली, म्हणून त्या टाक्याला त्याचे नाव दिलेले आहे. त्याचे नाव आहे–

**शिरोडकर स्टिच :**

(१) गर्भिणीमध्ये कटिरामध्ये शिरलेल्या गर्भावयवाचे निदान होत नसेल तर योनिपरीक्षा करावी.

(२) गर्भ व गर्भिणीचे कटिर यांच्या परस्प[illegible]बंधाचा अंदाज जर वैद्याला घेता येत नसेल तर योनिपरीक्षा करावी.

(३) आसन्न प्रसवेत व उपस्थित प्रसवा असताना योनिपरीक्षण करावे. ( यामध्ये स्राव व गर्भाशयमुखाची विस्तृती पाहावी. )

(४) गर्भिणीमध्ये ७ ते ९ महिन्यांत केव्हाही आविविरहित रक्तस्राव होऊ लागला तर योनिपरीक्षा करावी; पण या वेळी वामदेवीय शस्त्र-कर्माची सर्व तयारी ठेवून मगच योनिपरीक्षण करावे. या वेळी अपरादर्शन असण्याची शक्यता असते.

(५) पूर्वीचा गर्भस्राव किंवा गर्भपाताचा इतिहास असेल तर योनिपरीक्षा जरूर करावी.

(६) कधी कधी गर्भोदक सृती आली का मूत्रप्रवृत्ती झाली हे रुग्णेस न कळल्यामुळे योनिपरीक्षण आवश्यक ठरते.

(७) गर्भ का गुल्म अशी शंका असेल तरीही योनिपरीक्षण करावे.






आकृती २६४

योनिपरीक्षणात प्राकृत स्थितीत परीक्षकाच्या बोटांना त्रिकास्थीच्या आतील बाजूचा उंचवटा लागत नाही. परंतु हा जर उंचवटा गर्भशिराच्या मागून बोटे घालून, हाताला लागला तर हे संकुचित कटिर आहे असे वैद्याने ठरवावे, व मग पुढील निर्णय घ्यावा.

गर्भिणीला कधी कधी ७ व्या महिन्यात शोथ दिसू लागतो व त्याचे रूपान्तर गर्भोपद्रवात होते. त्यावर उपचार न केले गेल्यामुळे त्याचे रूपान्तर अपस्मारामध्ये होते, व मग ही परिस्थिती माता व बालक या दोघांनाही घातक ठरते. म्हणून या वेळी म्हणजे ७ ते ९ महिन्यांत गर्भिणीची तपासणी वरचेवर करावी. शोथ किंवा पांडू– या दोन लक्षणांवर वैद्याचे पूर्ण लक्ष असावे. ही जोपर्यंत लक्षणेच असतात तोपर्यंत नुसत्या पथ्यापथ्याने कमी होतात. परंतु नुसत्या आहारविहारावर नियं-त्रण घालून जर ही लक्षणे कमी होत नसतील तर मात्र त्यात व्याधिप्रत्यनीक चिकित्साच उपयुक्त ठरेल. उदा० पुनर्नवासव, चंद्रप्रभा, गोक्षुरादी गुग्गुळ इत्यादी; पांडुकरिता– लोहासव, नवायस चूर्ण, कांतलोह अशी रक्तवर्धक चिकित्सा करावी.

## वंध्यत्व असलेल्या रुग्णेचे परीक्षण

'विकारो दुःखमेवच' या न्यायाने वंध्यत्वाला रोग म्हणावे. अन्यथा वंध्यत्व ही स्त्रीमध्ये उत्पन्न होणारी एक अवस्था आहे. वंध्यत्व ही स्त्रीच्या जीवनात अत्यंत

:ख देणारी अवस्था आहे. या अवस्थेचे ६ प्रकारांचे वर्णन सापडते.

(१) गर्भाशय अतिशय लहान असतो.
(२) एक किंवा ( दोन ) मुले होऊन पुढे वंध्यत्व येणे.
(३) अपत्य होतच नाही; गर्भधारणाच होत नाही (शुक्रदुष्टी).
(४) गर्भस्राव होतात.
(५) गर्भ मरतो ( मृत गर्भ जन्मास येतो).
(६) लवकरच रजोनिवृत्ती होऊन गर्भधारणा होत नाही.

(१) या प्रकारात सहजच गर्भाशयाची वाढ कमी असेल तर योनिपरीक्षणाने निश्चित करावी. व मग गर्भाशयाच्या अभिवृद्धीसाठी फळघृतासारख्या औषधांचा वापर करावा. बाईचे वय २० ते २५ वर्षांत असेल तर उपयोग चांगला झालेला दिसतो. जास्त वय वाढल्यानंतर मात्र चिकित्सेचा फारसा उपयोग होत नाहीं. बाईचे नशीब बलवत्तर असेल तर मात्र गर्भधारणा होऊ शकते.

(२) या प्रकारात– प्रथम प्रसवामध्ये सूतिका ज्वराचा इतिहास मिळतो का ते पाहावे. योनिपरीक्षणात, आर्तववाहिनीची व अंतःफलाची परीक्षा करावी. त्यांत दोष सापडला तर बरेच, नाही तर मग आर्तववाहिनीची 'क्ष 'किरण प्रतिमेने परीक्षा करावी व त्याप्रमाणे चिकित्सा करावी. लताकरंज, त्रिफळा, गुग्गुळ, व सूक्ष्म त्रिफळा अशा औषधांचा उत्तम उपभोग झालेला आढळतो.

(३) या अवस्थेत बाईमध्ये काहीच दोष सापडत नाही. ( ऋतू, क्षेत्र, अंबु या तीनहींमध्ये दोष सापडत नाही. ) पण बीजातील शुक्र-परीक्षणात निर्बीजता आढळते; व यात मात्र शुक्रधातूचीच चिकित्सा करावी.. पण हा प्रकार प्रत्यक्षामध्ये कष्टसाध्य आहे. सध्या, का कोणास ठाऊक, हा प्रकार फार प्रमाणात दिसून येत आहे. नेहमी वंध्यत्वाच्या रुग्णांमध्ये बाईलाच अगोदर तपासून उपचार करण्याचा प्रघात आहे. पुरुषालासुद्धा तपासावे हा विचारसुद्धा करणे म्हणजे बाईला प्राणसंकट वाटत असे. या वेळी एक आठवण होते ती अशी : एक चांगला जवान, तालिमबाजच दिसत होता तो, त्याने आपल्या तीन बायका बरोबर आणल्या होत्या. पहिली होती ३५ वर्षांची, दुसरी ३० च्या आसपास असलेली, व तिसरी होती २० वर्षांची. मला मोठा प्रश्न पडला की याला एवढ्या बायका कोणी दिल्या ? पहिलीला मूल होत नाही म्हणून दुसरी बायको करणे, एक वेळ समजू शकेल, पण दोघींनाही मूल होत नाही म्हणून तिसऱ्या माणसाने तरी, या माणसातच दोष कशावरून नसेल, अशी शंका तरी घेणे योग्य होते का नाही ? पण त्याचा विचार न करता तिसरीही बायको त्या गृहस्थास मिळाली. मी शांतपणे त्या गृहस्थांना सांगितले, आता तरी तुमची धातू तपासून पाहू या का ? मला वाटते, की तुमच्यातच काही तरी दोष असावा. त्यावर तो प्रथम म्हणाला, माझी प्रकृती पाहा कशी ठणठणीत आहे. मी इतके जोर-बैठका काढतो इत्यादी, मी त्यांना सांगितले, तुमचे म्हणणे मला मान्य आहे, पण आपण तुमची धातू तपासून पाहू, आणि मग ठरवू. त्याची खूप समजूत घातली, तेव्हा तो तयार झाला. ताराचंद रुग्णालयात सर्व विभाग असल्यामुळे लगेच त्याचे शुक्रपरीक्षण करून मिळाले. येथे वैद्याने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, ज्या वेळी असे शुक्रपरीक्षण करावयाचे असते त्यावेळी निदान कमीत कमी ७–८ दिवस तरी दोघांनी ब्रह्मचर्य पाळलेले असावे. त्यावेळी मला हा नियम माहीत असूनसुद्धा मी त्याला लगेचच शुक्रतपासणीस पाठवले. कारण एकदा हे लोक घरी गेले की मग परत आपणाकडे येत नाहीत, असे लक्षात घेऊन मी व्यवहार केला. अशा वेळी शास्त्र थोडेसे बाजूला ठेवून व्यवहार पाळावा लागतो. त्यांचा रिपोर्ट आला. त्यात एकही जीवाणू (स्पर्म) सापडला नाही. अर्थात मग मी त्यांना अगदी शांतपणे सांगितले की, बाबा, तुम्ही आणखी कितीही बायका केल्यात तरी तुम्हाला मूल होणार नाही. ही गोष्ट सुमारे २५ वर्षांपूर्वीची आहे. सध्या शुक्र परीक्षणाची पद्धत अपमानास्पद मानत नाहीत.



४. या प्रकारांत बरेच वेळा पुढील कारणे दिसून येतात.

(१) गर्भाशय लहान असतो. यात गर्भधारणा होते पण गर्भ वाढू लागला की तो त्यांत मावत नाही व गर्भपात होतो.
(२) गर्भाशय पश्चात प्रवर्तित असतो.
(३) गर्भमुख गर्भ ग्रहण करण्यास असमर्थ असते.
(४) रक्तदुष्टी असते ( फिरंग उपदंशज ).
(५) गर्भोपघातकर भावांमुळे होणारे गर्भस्राव व पात.

वरीलपैकी जे कारण असेल त्याप्रमाणे चिकित्सा करावी.

ज्या वेळी गर्भाशय पश्चात प्रवर्तित असेल, त्यावेळी किंवा गर्भाशय लहान असेल त्यावेळीं व रक्तदुष्टी असेल त्यावेळीं दोघांनीही चिकित्सा गर्भधारणेपूर्वीच करावी. सध्या स्कूटर, रिक्षा यांचा वापर बरेच वेळा केल्यामुळे गर्भस्रावपात आढळतो.

५. या प्रकारात गर्भ मृत होण्याचे कारण बालकाचा जन्म झाल्यानंतर समजण्यात येते.

(१) गर्भाची नाभीनाडी खूप लांब असली तर तिला निरगाठ बसलेली सापडते. त्यामुळे प्रसूतीमध्ये बालक मातेकडून मिळणारे पोषण बंद पडल्यामुळे मृत होते.
(२) गर्भनाभीनाडी जास्त लांब असल्यामुळे बालकाच्या गळ्याभोवती तिचे ४–५ वेढे पडतात व त्यामुळे बालक घुसमटून मृत होते.
(३) गर्भनाभीनाडी आखूड असली तरीही ती ओढली जाते, व अपरा गर्भाशयापासून सुटून गर्भाचे पोषण बंद होते.
(४) उपस्थित प्रसवामध्ये गर्भशिर कटिरात शिरत असताना कधी कधी ( गर्भनाभीची लांबी जास्त असताना ) नाळेचा थोडासा भाग शिर व

कटिर यांच्यामध्ये सापडतो व बालकाचे पोषण बंद होते. व बालक मृत होते.

(५) कालातीत गर्भामध्ये जसे पिकलेले फळ झाडापासून आपोआप सुटते, तसे गर्भाशयास चिकटलेली अपरा आपोआप सुटते व मग गर्भाचे पोषण बंद होऊन गर्भ मरतो.

(६) मूढ गर्भामध्येही चिकित्सेच्या अभावी गर्भ मृत होतो.

यांतील काही वेळा वैद्याला गर्भाला वाचवण्याची संधी मिळते. पण बाई, वैद्याकडे वेळेवर आली पाहिजे व वैद्याला बाईच्या अवस्थेची परीक्षा झाली पाहिजे. आणि हे सर्व शेवटी दैवावरच अवलंबून असते असे म्हणावेसे वाटते.

६. हा प्रकार बहुधा असाध्य असतो.

काही वेळा सूचिमुखी योनी हेही वंध्यत्वाला कारण असू शकते.

गर्भाशयात गुल्म किंवा अर्श असणे हेही वंध्यत्वाला कारण असू शकते त्यावर त्वरित चिकित्सा करावी.

## सूतिका परीक्षण

नवप्रसूता असेल तर प्रथम बाईचा प्रसव प्राकृत रीत्या झालेला आहे, का कष्ट-प्रसूती आहे ते पाहावे व मग रुग्णेस तपासावे. बाई झोपली असेल तर तिला उठवून तपासू नये. यावेळी झोप ही आवश्यक असते.

दर्शनपरीक्षेत बाईचे श्वसन, नेत्र, त्वचा पाहून मग नाडी पाहावी. नाडीच्या वेगावरून बाईचा रक्तस्राव किती प्रमाणात आलेला आहे, किंवा अजून रक्तस्राव होत आहे किंवा काय, याची कल्पना करता येते. नवप्रसूतेमध्ये प्रसवोत्तर रक्तस्राव होत असेल तर सूतिकेच्या शरीरावर रक्तक्षयाची लक्षणे तात्काळ दिसून येतील. उदा० श्वसन वाढेल, घाम येईल, जांभया येऊ लागतील, तहान लागेल, व मग मूर्च्छा येईल.

यावेळी रक्तस्रावाचे कारण शोधणे आवश्यक ठरते.

(१) गर्भाशय मुखाच्या ठिकाणी भेद असेल तर रक्तस्राव फारच होतो.

(२) गर्भाशय शिथिल राहून रक्तस्राव होईल.

(३) योनीच्या ठिकाणी छेद-भेद असेल तरीही रक्तस्राव होईल.

या सर्व कारणांची त्वरित चिकित्सा करावी. उदरपरीक्षणात गर्भाशयाची परीक्षा करावी. त्याचा आकार व स्पर्श पाहावा. नवप्रसूतेमध्ये गर्भाशयाचा आकार नेहमी कठीण पाहिजे. तो जर मृदू असेल तर त्या ठिकाणी शैथिल्य आहे असे समजावे. त्या ठिकाणी स्पर्शासहत्व असेल तर तेथे पित्ताचे लक्षण– पाक होण्याची दुष्टी असण्याची शक्यता समजावी.



नवप्रसूता असताना तिचे बलरक्षण करणे हे महत्त्वाचे ठरते. त्याप्रमाणे तिचा आहार व विहार ठेवणे आवश्यक ठरते. सूतिका ही व्रणी, क्षती असते, हेही लक्षात ठेवून तिची रोज परीक्षा करावी. तिची नाडी, उदरपरीक्षण, योनिगत स्रावाचे परीक्षण, स्तन परीक्षण रोजच्या रोज करावे. तसेच सूतिका-परिचर्येचे काटेकोरपणे पालन होते का नाही ते पाहावे. कमीतकमी १० दिवस तरी त्याकडे लक्ष द्यावे, अन्यथा योनिदुष्टी होऊन नवप्रसूता ही सूतिकारोगाला बळी पडते.

## नवजात बालकाची परीक्षा

प्रथम बालकाचे रडणे ऐकू आले तर ते स्वाभाविक आहे याची खात्री करून घ्यावी. कारण कष्टप्रसूती किंवा गर्भशंकूने प्रसूती झाली असेल तर, किंवा विलंबित प्रसूती असेल तर बालकाचे रडणे किंचाळल्याप्रमाणे ऐकू येते. त्याचे ज्ञान वैद्याला पाहिजे. नवजात बालकाची सर्व कर्मेंद्रिये प्राकृत आहेत याची वैद्याने स्वतः खात्री करून घ्यावी. विशेषतः गुदद्वारातून एक बारीकशी रबरी नलिका घालून तो मार्ग संपूर्ण चालू असल्याची खात्री करून घ्यावी. कारण कधी कधी बाहेरून गुदद्वार अगदी प्राकृत दिसते पण त्याच्या आतील बाजूस एखादा पडदा असण्याची शक्यता असते. किंवा, मलमार्ग हा मूत्रमार्गात मिळालेला असून, मल व मूत्र हे दोनही एकाच वेळी मूत्र मार्गातून बाहेर पडतात. अशा वेळी त्वरित शल्यवैद्याचा सल्ला घ्यावा. यात बालक वाचणे बहुधा कठीणच असते. ही विकृती कशी असेल त्यावर त्याचे साध्यासाध्यत्व अवलंबून असते.

निरुद्ध योनी, निरुद्ध प्रकश, मुख, नाक, याच्या ठिकाणी असलेल्या विकृती, (ओष्ठभंगता, तालूच्या ठिकाणी भोक असणे) अवयव हीनता किंवा हातापायाच्या बोटांची संख्या कमीजास्त असणे अशा सर्व सहज-विकृतींची परीक्षा, नोंद करून ठेवावी.

नंतर बालकाचे नालकर्तन व नालकर्म व्यवस्थित झालेले आहे का नाहीं ते पाहावे. कारण जन्मानंतर काही काळानंतर बांधलेली नाळ सैल पडते व बालकाच्या रडण्यामुळे त्यातून रक्तस्राव आलेला सापडतो.

पहिले दहा दिवस तरी बालकाला शक्यतो वैद्यानेच स्नान घालावे असे माझे मत आहे. तसे जमले नाहीतर निदान त्यावेळी वैद्याने स्वतः तेथे हजर तरी असणे आवश्यक आहे. कारण फक्त स्नानाचेच वेळी बालकाची सर्वांगीण परीक्षा करणे सोईचे होते. नाळ परीक्षण, गुदपरीक्षण, (पाक असतो) त्वचा, नेत्र यांची परीक्षा करता येते. ही आपोआपच परीक्षा होते. त्यासाठी निराळा वेळ खर्च करावा लागत नाही.

बालकाचे मलपरीक्षण करणे हेही एक महत्त्वाचे कर्म आहे. बालकाचा जन्मानंतरचा पहिला मल हा काळपट रंगाचाच असतो. त्यातील विशेष रंग हे त्या त्या

बालकाच्या प्रकृतीप्रमाण बदललेले दिसतात. विशेषतः वातप्रकृतीचा बालक असेल तर त्याच्या (मलाचा) रंग जास्त काळपट असेल, पित्तप्रकृतीच्या बालकात मलाचा रंग पिवळट काळपट असतो. तर कफप्रवृत्तीच्या बालकाच्या मलाचा रंग बुळबुळीत काळपट असतो. स्तनपानानंतर बालकाच्या मलाचा वर्ण बदलत जातो, तो जास्त पिवळट होत होत संपूर्ण पिवळा होतो. त्याचीही वैद्याने स्वतः तपासणी करावी. कधी कधी ह्या मलाचा वर्ण जसाच्या तसाच राहतो व बालकाच्या ठिकाणी उदरवृद्धी, श्वास, अरती इत्यादी लक्षणे दिसू लागली तर मात्र सहजव्याधीची ही पूर्वसूचना समजावून त्वरित शल्यवैद्याला बालक दाखवून घ्यावे. अशा वेळी बहुधा महास्रोतसांत कोठे तरी मार्गावरोध असतो. सर्वसाधारणतः दिवसातून ४–५ वेळा बालकाची मल व मूत्र प्रवृत्ती ही प्राकृत धरावी. बालकाचे वजन पहिल्या दिवशी असते ते पहिल्या ३–४ दिवसांत थोडे कमी होते व पुन्हा १० दिवसपर्यंत ते पूर्वी एवढे तरी होते. कधी कधी ते थोडेसे वाढलेलेही दिसते हे लक्षात ठेवावे. पहिल्या दिवशी बालक टवटवीत दिसते. कारण ते गर्भोदकातून नुकतेच बाहेर आलेले असते. हळूहळू ते सुकलेले दिसेल, व परत दूध पचनी पडू लागले की ते पुन्हा टवटवीत दिसू लागते. त्याच्या त्वचेच्या रंगात बदल दिसू लागतो. त्वचा पहिल्यापेक्षा जून दिसू लागते.

सूतिका ही व्रणी असल्यामुळे तिला कमीत कमी १० दिवस तरी इतर संसर्गापासून दूर ठेवावे. सध्या बहुसंख्य बायकांची प्रसूती ही कोणत्या ना कोणत्या रुग्णालयातच होत असते. त्यामुळे कोणीही, केव्हाही, कसेही रुग्णालयात जाऊन बालक व माता यांना भेटू शकतो. नुसत्या भेटण्यापेक्षाही कॉटवर बसणे, पायांत चपला, बूट तसेच ठेवून आत जाऊन बसणे, बालकाला काढून घेऊन मांडीवर घेणे, व त्याचे पापे घेणे असे प्रकार चालतात. पूर्वी आपण सोवळयाच्या नावावर सुरक्षित होतो. पण आता सोवळे जुने बुरसटलेले म्हणून टाकले गेले व फॅशनखाली स्वच्छताही नाहीशी होत चालली आहे. त्याकडेही वैद्याने जातीने लक्ष घालावे. अन्यथा बालकांचे रोग व सूतिकारोग बळावले तर त्यात नवल नाही.

सूतिकेची रोजपरीक्षा करणे आवश्यक असते. तिचा आहार, निद्रा, मलमूत्रप्रवृत्ती, योनिस्रावाची परीक्षा इत्यादींची विचारणा करणे, गर्भाशयाचा ऱ्हास कसा होत आहे यावर लक्ष ठेवणे जरुरीचे ठरते. कारण सूतिका ही प्रसवातील झालेल्या रक्तस्रावामुळे दुर्बल झालेली असते. तिचा अग्नीही मंद झालेला असतो. त्यामुळे ती लवकरच योनिदुष्टी होऊन सूतिका रोगाला बळी पडते. म्हणून सूतिका परिचर्येचे तंतोतंत पालन करावे; व तसे केल्याने बालक व बाई–स्वस्थ राहतात.

## स्तन व स्तन्य परीक्षण

तिसरे दिवशी स्तन चुचूक स्वच्छ पुसून काढावेत. त्यांतून येत असलेला स्राव पिळून काढावा व बालकाला, स्तनचुचूक त्याच्या तोंडात देऊन आचूषण करण्यास लावावे. बालक लगेचच चुरूचुरू ओढू लागते.

स्तनचुचूक पुरेसे मोठे नसतील तर ते ओढून धरून बघावे. त्यानेही योग्य झाले नाहीत तर रबरी आचूषण साधन वापरावे. यामूळ स्तनचुचुक हळूहळू उन्नत होऊन बालकाला स्तनपान करता येते.

बालकाने स्तन्यपान केल्यानंतर प्रत्येक वेळी गरम पाण्याने ते चुचूक कापसाने शेकून काढावेत व मग त्याला तूप + मध एकत्र करून त्यावर लावावे. यामुळे स्तनचुचुकाला आचूषणामुळे होणारे व्रण दुष्ट होत नाहीत. आणि या ठिकाणी जर परिकर्तिका (चिरा) झाल्या व त्या दुष्ट झाल्या तर त्यातून स्तनांत दुष्टी पसरून स्तनविद्रधी होतो व तो टाळण्यासाठी म्हणून स्तनचुचुकाची काळजी घेणे इष्ट ठरते.

स्तन्यपान करण्यास बालकाला घेण्यापूर्वी मातेने प्रत्येक वेळी दूध किंवा खीर प्यावी. काही मिळाले नाही तर निदान एक भांडेभर पाणी तरी प्यावे. म्हणजे बालकाला दूध चांगले मिळते (सुटते), व बालक तृप्त होते. दोनीही स्तनांतील दूध मातेने बालकाला सारख्या प्रमाणात पाजावे. कारण ज्या बाजूला बालक स्तनपान करील त्या बाजूस 'दूध' जास्त भरते व तो स्तन पुष्ट होतो. दोनही स्तन सारखे पुष्ट राहावे असे वाटत असल्यामुळे दोन्हीकडे सारखे पाजावे.

कमीत कमी बालकाला दात येईपर्यंत तरी मातेने स्तन्यपान द्यावे. यात दोनही हेतू साध्य होतात. एक म्हणजे बालकाची वाढ चांगली होते; बालक बुद्धिमान होते. व दुसरे सहजासहजी संततिनियमन होते. जोपर्यंत स्तन्याची उत्पत्ती होत असते तोपर्यंत मातेची रजःप्रवृत्ती सुरू होत नाही व त्यामुळे गर्भधारणाही संभवत नाही. यात एक अपवाद संभवतो तो असा की, स्त्रीला प्रसूतीनंतर मासिक पाळी न येताच गर्भधारणा झालेली दिसून येते. यात घडते असे की, प्रथमत ऋतुकाळ प्राप्त होतो व त्याच कालात संभोग घडून गर्भधारणा होते. त्यामुळे रजःप्रवृत्ती होत नाही व त्यामुळे बाईला २ / ३ महिने पत्ता लागत नाही; यालाच मिधे दिवस राहणे असे म्हणतात.

दहा दिवसांत सूतिकेमध्ये आढळणारे व्याधी—

(१) सूतिका ज्वर : स्तन्यज ज्वर — स्तनविद्रधीत रूपान्तर होते
(योनिदुष्टी) वातज ज्वर
पित्तज ज्वर
ग्रहरोग — हा फार कमी प्रमाणात सापडतो.
हा कष्टसाध्य आहे.

(२) **एकांगज शोथ** : पादशोथ.

(योनिदुष्टी)

यामध्ये सूतिकेचा जंघेपासून पाय दुखू लागतो. व हळूहळू मांडीपासून शोथास सुरुवात होते, ती सबंध पावलापर्यंत सूज येते. त्या ठिकाणी तीव्र वेदना असतात. सर्व पाय स्पर्शाला गरम लागतो. दोषांप्रमाणे इतर लक्षणे दिसतात. योनिदुष्टी असतेच. सूतिकेला चालणे कष्टाचे होते व पुढे पुढे ती चालूच शकत नाही.

हा व्याधीसुद्धा कष्टसाध्यच आहे. याच्यावर योनिदुष्टीवरील चिकित्सा देऊन, त्याचबरोबर स्थानिक चिकित्सा द्यावी लागते. लेप— टेंटूमूळ, अहिफेन, गुग्गुळ, बाल्यवर्णा, लताकरंज, यांचा उगाळून लेप घालावा. याने शूळ कमी होतो.

१॥ ते २ महिन्यांनी रोगमुक्ती मिळते. संपूर्ण विश्रांती घ्यावी.

(३) **योनिगत स्राव** : योग्य वेळी म्हणजेच ७ व्या दिवशी सूतिकेचा योनिगत रक्तस्राव थांबला पाहिजे; व स्रावाचा वर्ण पांढरट होणे आवश्यक आहे. म्हणजे असे अनुमान करता येते की, आतील व्रण (अपरा सुटल्यानंतर गर्भाशयाच्या ठिकाणी असलेला व्रण) संपूर्णपणे आरूढ झाला आहे व गर्भाशयाचा ऱ्हासही संपूर्ण झाला आहे. परंतु काही वेळा ७ व्या किंवा ६ व्या दिवशी सूतिकेला एकाएकी योनिगत रक्तस्राव सुरू होतो. त्यावेळी त्याचे एकमेव कारण वैद्याने समजावे की या ठिकाणी गर्भाशयात कोठे तरी अपरेचा छोटासा भाग तसाच चिकटून राहून तो आता शल्याप्रमाणे आपला प्रभाव दाखवत आहे. किंवा गर्भाशयातील व्रण दुष्ट होऊन त्यातून हा स्राव येत असावा. त्यावरील लगेच उपचार करावेत. स्राव दुर्गंधी असेल तर योनिदुष्टीवरील चिकित्सा करावी. स्राव दुर्गंधी नसेल तर योनिपरीक्षा करून पाहावी. गर्भाशयमुख अल्पसे विस्तृत असेल व रक्तस्राव प्रभूत असेल तर लगेच लेखनकर्म करून आतील शल्य काढून टाकावे की लगेच रक्तस्राव थांबतो. नाही तर रक्तस्राव इतका होतो की सूतिका प्राणास मुकते.

# परिशिष्ट : २

## लेपरॉस्कोपी

रोगाचे निदान करताना दर्शन, स्पर्शन, प्रश्न या तीन आयुधांनी रुग्णाची परीक्षा करण्याची पद्धत आहे. काही लक्षणांवरून 'यत्र यत्र धूमः तत्र तत्र वन्हिः।' या न्यायानेसुद्धा निदानाला मदत होते. परंतु यात दर्शनपरीक्षेचे महत्त्व श्रेष्ठ आहेच.

उदरामधले असलेले अवयव, स्रोतस किंवा व्याधीचे दर्शन पूर्वी फक्त शस्त्रकर्माने होत असे आणि नुसत्या दर्शनासाठी मोठे शस्त्रकर्म करणे ही त्रासाची बाब होती.

लेपरॉस्कोपच्या शोधामुळे उदरातील अवयव, व्याधी किंवा स्रोतस यांचे दर्शन सुलभ झाले आहे.

**लेपरॉस्कोपी** : लेपरॉस्कोप नावाच्या दुर्बिणीतून उदरात बघणे यास लेपरॉस्कोपी असे म्हणतात, अर्थात याचा विविध तऱ्हेने उपयोग करून घेता येतो.

(१) रोगनिदानासाठी
(२) निदानाच्या मूल्यमापनासाठी
(३) शस्त्रकर्मासाठी.
(४) स्त्री-बीज हेरून काढून घेण्यासाठी (Aspiration of an orum for tube–baby).

(१) **रोगनिदानासाठी** :
(अ) अधोदर शूल
(ब) बीजवाहिन्यांत होणारी गर्भधारणा ओळखण्यासाठी.
(क) अधोदरात असणारा गोळा
(ड) आंत्रपुच्छाच्या पाकाचे निदान निश्चित करण्यासाठी (Appendicitis)

(ई) उदराचा राजयक्ष्मा

(२) निदानाच्या मूल्यमापनासाठी

(अ) वंध्यत्व

(ब) रजोनाश

(क) जन्मतः स्त्री-अवयवात असणाऱ्या न्यूनतेसाठी किंवा दोषासाठी.

(ड) पुरुष-स्त्री या लिंगांतील फरक कळत नसल्यास.

(ई) गर्भाशयास धक्का पोहोचला असल्याचा संशय असल्यास (Suspected Perforation)

(३) **शस्त्रकर्म :**

(अ) वंध्यत्वीकरण.

(ब) अंतःफलात जलांश साठला असल्यास.

(क) स्त्री-बीज काढून घेण्यासाठी (Aspiration of orum tube baby).

(ड) गर्भाशय पश्चात प्रवर्तित असल्यास पूर्व प्रवर्तित करण्यासाठी.

(ई) बीजवाहिनी इतस्ततः चिकटली असल्यास सोडवण्यासाठी.

(फ) लूप किंवा 'कॉपर टी' गर्भाशयाचा छेद करून पोटात गेली असल्यास काढण्यासाठी.

(ग) अंतःफलाचा छेद घेण्यासाठी.

(४) **लेपरॉस्कोपी कधी करू नये ?**

(अ) पूर्वीचा उदर, भागाचा शस्त्रकर्माचा इतिहास असल्यास.

(ब) उदरात मोठा गोळा असल्यास.

(क) हृद्‌रोग.

(ड) नाभीप्रदेशी गोळा.

(ई) अती स्थूल रुग्ण.

(५) **लेपरॉस्कोपीसाठी लागणारी यंत्रसामग्री**

(अ) स्प्रिंग असलेली सूचिका; याचा उपयोग उदरात वायू भरण्यासाठी होतो.

(ब) वायू भरण्याचा पंप (कार्बन डाय ऑक्साइड गॅस, ऑक्सिजन, हवा किंवा नायट्रोजन).

(क) उदरात छिद्र पाडण्याची सूचिका. त्यातून दुर्बीण उदरात ढकलतात.

(ड) दुर्बीण.

(ई) प्रकाशयंत्र (Light Source).



(६) **लेपरॉस्कोपी संमोहन :**

(अ) जागीच संमोहन देऊन शस्त्रकर्म.

(ब) सबंध भूल देऊन शस्त्रकर्म.

वरील दोन तऱ्हेच्या संमोहनांखाली ही छोटी शस्त्रक्रिया पार पाडता येते.

पाठीतल्या इंजेक्शनची भूल तितकीशी सोईस्कर नसते. कारण या शस्त्रकर्मात रुग्णेस वेगवेगळ्या स्थितीत झोपवावे लागते; त्यामुळे अशी भूल वर वाढत जाऊन धोका होण्याचा संभव असतो.

(७) **प्रत्यक्ष शस्त्रकर्म : लेपरॉस्कोपी :**

रुग्णेस पाठीवर झोपात्र्यास सांगून तिचे पाय बांधण्यात येतात (नूष्णा स्थिती). योनी व उदर निर्जंतुक करून घेतात. नंतर भूल देण्यात येते. नाभीच्या खालच्या बाजूस लहानसा छेद घेऊन त्यातून हवा भरण्याची सुई उदरात खुपसण्यात येते. या आधी रुग्णाच्या टेबलाचा डोक्याचा भाग खाली करतात. या सुईमधून उदरात वायू भरतात. सामान्यतः ३ ते ४½ लीटरपर्यंत वायू (कार्बन डाय ऑक्साइड, ऑक्सिजन, हवा किंवा नायट्रोजन) भरण्यात येतो. नंतर ही सुई काढून टाकून त्या जागी मोठी सुई खुपसण्यात येते. ही सुई खुपसत असताना खूपच काळजी घ्यावी लागते. या सुईच्या बाहेर एक आवरण असते.

नंतर आतील मोठी सुई काढून घेऊन बाहेरील आवरण तसेच ठेवण्यात येते. यातून दुर्बिण उदराच्या पोकळीत ढकलतात. या दुर्बिणीस प्रकाशयंत्र जोडण्यात येते. त्याच वेळी योनीतून गर्भाशय-शलाका गर्भाशयात ढकलण्यात येते, व गर्भाशय योग्य दिशेने फिरवून दुर्बिणीतून बघण्यात येतो. तसेच त्याच्या दोन्ही बाजूंस असणाऱ्या अंतःफल व बीजवाहिन्यांचे परीक्षण करता येते.

जरूर वाटल्यास बीजवाहिन्या मोकळ्या आहेत किंवा नाहीत हे पाहण्यासाठी गर्भाशयात मिथिलिन ब्ल्यू नावाचे औषध भरण्यात येते. बीजवाहिन्या प्राकृत असल्यास त्यातून हे औषध वाहिन्यांवाटे उदरात येताना दिसू शकते.

(८) **वंध्यत्वीकरण शस्त्रकर्म :**

या शस्त्रकर्मासाठी—

(१) रिंग.

(२) क्लिप.

(३) किंवा कॉटरी वापरतात. दहनकर्म करण्यासाठी

रिंग किंवा क्लिप बीजवाहिनीवर बसवण्यासाठी दुसऱ्या यंत्राचा वापर करतात.

(९) **कॉटरी करण्यासाठी :**

यासाठी कॉटरी यंत्राचा वापर करावा लागतो. कॉटरीमुळे होणाऱ्या दहन-कर्माच्या जखमांचा विचार करून कॉटरीने वंध्यत्वीकरण करण्याची प्रथा जुनी होत चालली आहे. या शस्त्रकर्मातून निर्माण होणारे धोके :

(१) रक्तवाहिन्यांपासून धोका पोहोचून अंतर्गत रक्तस्राव होणे.

(२) वायू उदरपोकळीत न भरली जाता उदरत्वचेखाली जाणे, किंवा आतील अवयवांना धक्का लागणे. मूत्रपिंड, आतडी, यकृत, प्लीहा, जठर इत्यादी.

(३) वायू रक्तवाहिनीत शिरणे (Gas or air embolism)

(४) हृदयाच्या स्पंदनात फरक पडणे.

(५) रक्तातील कार्बन-डाय-ऑक्साइडचे प्रमाण वाढणे.

(६) मूर्च्छा (Shock).

(७) कॉटरीमुळे इतर अवयवांना इजा पोहोचणे,

लेपरॉस्कोपमधून आतल्या अवयवांचा फोटो काढता येतो. या सर्दीमुळे बघित-लेल्या भागाचे निरीक्षण परत केव्हाही करता येते.

लेपरॉस्कोप हे यंत्र या युगात खरेच मानवाच्या हाती पडलेले उत्तम दर्शनाचे साधन आहे.

याच प्रकारची व याच तत्त्वावर इतर साधनेही उपलब्ध आहेत.

(१) कलडोस्कोप : उदर परीक्षणासाठी.

(२) हिस्टरोस्कोप : गर्भाशयाच्या आतून परीक्षणासाठी.

(३) सिस्टोस्कोप : मूत्राशयाच्या परीक्षणासाठी.

(४) गॅस्टोस्कोप : जठराच्या परीक्षणासाठी.

(५) कल्पोस्कोप : योनीच्या परीक्षणासाठी.

वरील साधनांचा नीट विचाराने उपयोग केल्यास निदानाचे काम खूपच सुलभ होते.

❋ ❋

# सूची


अ

अग्नीचे कार्य १७८, १७९
अतिगर्भोदक ३२६–३२९
अतिविषादी चूर्ण ६०८
अनेकापत्यता १८२
अनंतमूळ चूर्ण ६०८
अपरा १७७, ३६९
अपरादर्शन कारणे ४०५
अपरादर्शन चिकित्सा ४०७
अपरादर्शन प्रकार ४०५
अपरादर्शन प्रकार– १. ४०७–८
अपरादर्शन प्रकार– २. ४०८
अपरादर्शन लक्षणे ४०७
अपरानिर्हरण ३६९
अपराभाग १७९
अबीज– शुक्र २४
अभ्रक भस्म ६०८
अर्जुनारिष्ट ६०८
अर्बुद चिकित्सा १३८
अर्बुद व्याख्या १३७
अर्बुद स्थानपरत्वे भेद १३८,
अर्बुद स्वरूप १३७
अर्शशामक मलम ६०९
अवयव परीक्षा ७
अविपत्तिकर चूर्ण ६०९
अशोक चूर्ण ६०९
अशोकारिष्ट ६०९
अश्वगंधारिष्ट ६१०
अस्थिपोषक ६१०
अस्थि–मृदू व लहान ४
अस्थि स्त्रीकटिरातील ८

आ

आमपाचक वटी ६१०
आमलकी चूर्ण ६११
आरग्वधकल्प ६११
आरोग्यवर्धिनी ६११
आर्तवम् २६
आर्तवनाश २१
आर्तववह स्रोतस १८
आर्तववह स्रोतसे– औषधी द्रव्याने क्ष-किरण प्रतिमा काढणे व परीक्षण करणे ५३२

आर्तववह स्रोतसे गर्भाशयमार्गे परीक्षण ५२७–२८
आर्तववह स्रोतसे गर्भाशयमार्गे हवेच्या साहाय्याने परीक्षण ५२८–३२
आर्तववाहिनी छेदन–वंध्यत्वीकरण उदरपाटनपूर्वक ५७४–७८ ५९९–६००
आर्तववाहिनी छेदन-योनिमार्गे ५७९-८०
आवर्त ११
आवर्त योनिमार्ग २२
आहाररसाचे कार्य १७७

इ

इतर पद्धती–तात्पुरती संततिप्रतिबंधक योजना ५९६
इसबगोल ६१२

उ

उपस्थितप्रसवा ३५०
उपस्नेहन न्याय १७८
उरःप्रदेशाचे अंगुली प्रमाण ६
उल्ब १७७, १८१, १८३
उशिरासव ६१२
उंटिणीचे दूध ४९८

ऋ

ऋतुकाल–चक्र २९
ऋतुकालाचे वैशिष्ट्य २९
ऋतुमती ३०
ऋतुमती लक्षणे ३०
ऋतुमती गर्भग्रहणकाल ठरवणे ३१

ए

एकनाभिज अपरा १८३

ओ

ओजाचे परिणाम २०१–२०२
ओजाचे स्थैर्यास्थैर्य २०१
ओजाबद्दलची मते २०१

औ

औषधी पाठ ६०८–५५

अं

अंगुली प्रमाण ६
अंतःफल १६

क

कटिबंधन ५९९
कपिला ६१२
कफ आचूषण यंत्र ३७२
कफज रजोदुष्टी ४१
कफदुष्ट–स्तन्य लक्षणे व चिकित्सा ४७०–४७४
कर्पूरादी चूर्ण ६१३
काठिण्य (धातूंना) ३
कांत लोहभस्म ६१३
कामदुधा (शौ. युक्त) ६१३
कायम संततिप्रतिबंधक उपाय ५९९
कार्पास मूल घनसार ६१३
काश्यपोक्त गर्भोपद्रव व चिकित्सा ३११–३२०
किक्विस २००
कुटकी चूर्ण ६१४
कुटज पर्पटी ६१४
कुटजारिष्ट ६१४
कुडाकल्प ६१४
कुणपपूतिपूय-रजोदुष्ट चिकित्सा ४२-४३
कुमारागार ४८३–४८९
कुमारी आसव ६१५
कुमारी कल्क ६१५
कुयोनि-लक्षणे ७



केदारकुल्यान्याय १७८
कोमलांगी ४

ख

खदिरादी गुटी ६१६
खदिर चूर्ण ६१५
खुरासनी ओवा ६१६

ग

गर्भ १७७
गर्भग्रहण काळ ३१
गर्भनाभी नाडी १७७
गर्भपरीक्षण ३५०
गर्भपात–पूर्वरूपे २१८
गर्भपात व्याख्या २१७
गर्भपात संप्राप्ती २१८
गर्भपाल रस ६१६
गर्भव्यापद–उपविष्टक २२९
गर्भव्यापद नागोदर २३०–३२
गर्भव्यापत मृतगर्भ २३३–३५
गर्भव्यापद लीन गर्भ २३२-३३
गर्भलिंग १८५
गर्भलिंग प्राप्तीचा काळ १९६
गर्भलिंग विशेष लक्षणे १९६
गर्भविकृती १८८
गर्भविकृती आनुवंशिक १८९
गर्भविकृती कारणे १८५–१९४
गर्भव्यापद २१६
गर्भशय्या १२
गर्भशंकूने गर्भनिर्हरण करणे ५६२–३६
गर्भसंग ४२३
गर्भप्रकार ४२३
गर्भसंभव सामग्री १४४
गर्भस्राव–पात–रूपे २१९
गर्भस्राव–पात २१७
गर्भस्राव सामान्य चिकित्सा २२६–२२९
गर्भस्राव हेतू १५०
गर्भधारणेचा सम्यक योग ३
गर्भधारणेचा काळ (स्त्रीमधील) ४
गर्भाचा वर्ण १६९
गर्भाचा पितृज, मातृज, देशकुलज, महाभूतज १६९
गर्भाची मासानुमासिक वाढ १६५, १६९
गर्भाची वाढ १७८
गर्भाची वृद्धी १७७
गर्भाचे आसन १७०, ३४९
गर्भाचे पोषण १७६, १७७
गर्भाचे मलविसर्जन १८०
गर्भाचे मासानुमासिक पाच महाभूतांचे कार्य २६४, १६५
गर्भाचे श्वसन १८०, १८१
गर्भाचे सादृश्य १८६
गर्भाच्या अवयवांची उत्पत्ती कारणे १५३
गर्भाच्या अवयवांचा उत्पत्तिक्रम १७४
गर्भाच्या उपचयाचे कोष्टक १७४
गर्भाच्या नेत्राचा वर्ण १७०
गर्भाधान १४९
गर्भाधानाचा काळ २
गर्भाशय १०, १८३, ३६९
गर्भाशय पेशी १७७
गर्भाशय निर्हरण करणे उदरपाटनपूर्वक ५४७, ५१
गर्भाशय पुरःप्रवर्तित करणे ५३६, ४१
गर्भाशयमुख विस्तृतीकरण व लेखन ५३२, ३६
गर्भाशयामृत (शतामृत) ६१७
गर्भाशयस्थ गुल्मनिर्हरण करणे ५४६, ५४७

गर्भिणीपरिचर्या २१३, २१६
गर्भिणी-को ्टक ३३०, ३३८
गर्भिणी-परीक्षण ३५०
गर्भिणीपरिचर्या (मासानुमासिक) २२२, २२६
गर्भिणी-विज्ञानीय १९५
गर्भिणीची व्यक्त लक्षणे १९८, १९९
गर्भोदक १७७, १७९, १८३
—चे वर्णन १८०
गर्भोपघातकर भाव २०६, २१३
गर्भोत्पत्ती १६२
गर्भोपद्रव—अतिसार ३०९
—अतिसार कारण ३०९
अतिसार चिकित्सा ३१०
अपस्मार कफज ३०५
अपस्मार कारणे संप्राप्ती ३०२
अपस्मार कारणे चिकित्सा ३०६—३०९
अपस्मार पित्तज ३०५
अपस्मार प्रकार ३०४
अपस्मार रूपे-पूर्वरूपे ३०३
अपस्मार रिष्ट लक्षणे ३०६
अपस्मार व्याख्या प्रकार ३०१
अपस्मार वातज ३०४
अपस्मार कारणे २३५
अपस्मार सान्निपातिक ३०५
अपस्मार साध्यासाध्यता ३०५
—अरुची लक्षणे २६५—६६
अरुची व्याख्या, प्रकार, कारणे २६४
अरुची साध्यासाध्य चिकित्सा २६६—६७
अरुची संप्राप्ती—पूर्वरूपे २६५
—छर्दी—उपद्रव २४१
छर्दी कारणे २३७
छर्दी व्याख्या २३७
छर्दी-चिकित्सा २४२—२४४
पूर्वरूपे २३८—२३९
साध्यासाध्य विवेक २४२
गर्भोदक संप्राप्ती २३८
गर्भोदक प्रकार २३९—२४१
—ज्वर-चिकित्सा २५०—२५३
ज्वर प्रकार २४५
ज्वर व्याख्या २४४
ज्वर कारणे २४८—२४९
ज्वर पूर्वरूपे २४६
ज्वर रूपे २४७-४८
ज्वर रिष्ट लक्षणे २५०
ज्वर साध्यासाध्यत्व २४९
ज्वर संप्राप्ती २४६
—पांडु २६७
पांडु उपद्रव—साध्यासाध्यत्व चिकित्सा २७४—७५
पांडु कारणे—संप्राप्ती २६९—२७०
पांडु रूपे—पूर्वरूपे २७०—२७१
पांडु प्रकार २७१—२७३
पांडु व्याख्या—प्रकार २६८
—प्रमेह—चिकित्सा ३००—३०१
प्रमेह रूपे २९६
प्रमेह साध्यासाध्यत्व २९९
प्रमेह संप्राप्ती—पूर्वरूपे २९५
प्रमेह व्याख्या, प्रकार, कारणे २९४
—मक्कल ३२१—३२६
मक्कल व्याख्या २३५
मक्कल संप्राप्ती २३६
—शोथ—कारणे २५४—२५६
शोथ चिकित्सा २६३—२६३
शोथ पूर्वरूपे—रूपे २५८
शोथ प्रकार २५८—६०
शोथ अवस्था, वृद्धी, स्थान व क्षय २६०
शोथ प्रकार २५३
शोथ व्यवच्छेदक निदान २६१—६२
शोथ व्याख्या २५३
शोथ साध्यासाध्यत्व २६१
शोथ संप्राप्ती २५६-२६८
—श्वास- स्वरूप, मार्ग, प्रकार कारणे २८५—२८६
—श्वास- स्वरूप, मार्ग, प्रकार कारणे २८५—२८६
श्वास पूर्वरूपे—प्रकार २८८—२९०
श्वास साध्यासाध्यत्व चिकित्सा २९०—२९३
श्वास संप्राप्ती २८७
श्वास व्याख्या— शरीर २८४
—हृद्रोग- चिकित्सा २८२—२८३
हृद्रोग पूर्वरूपे प्रकार २७९-८१
हृद्रोग प्रकार, कारणे व संप्राप्ती २७८
हृद्रोग शारीर- कार्य- व्याख्या २७६—२७७
हृद्रोग साध्यासाध्यत्व २८१
गाईचे दूध ४९७
गुल्म निर्हरण- अंत:फलाचे ५४२—४६
गुरुत्व ५
गुह- मर्म २२
गोक्षुरादि गुग्गुळ ६१७
गंधक रसायन ६१७
गंधर्वहरीतकी चूर्ण ६१७
ग्रहबाधेने गर्भिणीवर होणारे परिणाम २१९—२२२
ग्रंथिल रजोदुष्टी—चिकित्सा ४२

## घ

घोडीचे—गाढवीचे दूध ४९९

## च

चिकित्साक्रम ६०३-६०७
चुक्रतेल ६२०
चंक्रमण ९
चंदनचूर्ण ६१८
चंदनासव ६१८
चंद्रकलारस ६१८
चंद्रप्रभा ६१९
च्यवनप्राश ६२०

## ज

जरायू १०, १७७, १८३
जातमात्र परिचर्या ३७२
जातिफळचूर्ण ६२१
जीवयोनी (चार योनी) १६०
जेली पद्धती (२) ५८९—९०

## ड

डायफ्रॅम अथवा गोळ टोप्या व जेली ५९१—९५
डिकेमाली चूर्ण ६२१

## त

तन्वी ४
तांत्रिक व रासायनिक पद्धत
(१) रबरी पिशवी पद्धत ५९०—९१
ताप्यादि लोह ६२१
तालिसादी चूर्ण ६२१
त्रिकटू चूर्ण ६२२
त्रिफळा घृत ६२२
त्रिफळा गुग्गुळ ६२२
त्रिफळा चूर्ण ६२२
त्रिभुवन कीर्ती ६२३

## द

दगडी बोर चूर्ण ६२३

दशमूलारिष्ट ६२३
दशांगलेप ६०४
दाडिमादी घृत ६२४
दाडिमावलेह ६२४
दीपनी वटी ६२५
दुधाचे उपयोग ५००–५०४
दुधाचे गुण ४९४–९६
दोषदुष्टी ३३
द्रवरूप-औषधी–चिकित्सेने संतती
बंधन करणे ५९८
द्राक्षारिष्ट ६२४
द्राक्षासव ६२५
द्वंद्वज व्याधी बालरोग ४८०

ध

धमनी–अर्थ–निश्चिती २०
धमनी (चेतनी) १८
धात्री ४९०–४९२
धूपन ५९९

न

नग्निका २
नवजात बालकाची परिचर्या ४८४–४८९
नवायस चूर्ण ६२६
नागकेशर चूर्ण ६२६
नागगुटी ६२६
नाभिनाडी १७७
नालकर्तन विधी ६०४
नालकल्पन विधी ३७४

प

परिचारिका ३४४
पाचकेंद्ररस ६२७
पान (प्राशन करणे) ५९८
पारिजातक गुटी ६२७
पारिभद्र तैल ६२८
पिचुधारणा–अनुभविक योग ६९८
पित्तज दुष्टस्तन्य लक्षणे–चिकित्सा
४६८–४६९
पित्तज रजोदुष्टी–चिकित्सा ४२
पिंपळमूळ–चूर्ण ६२८
पिंपळी–चौसष्टी ६२०
पुनर्नवादी मंडूर ६२८
पुनर्नवासव ६२८
पुरुषगर्भ १८६
पुरुषबीज (शुक्र) १४५
पुष्यानुग चूर्ण ६२९
पुंसवन विधी १९६
पूर्ण चंद्रोदय ६२९
पेशींचा स्थाननिर्देश १३, १४, १५, १६
पेशी स्त्रीमधील १२
पेशींचे सविस्तर वर्णन १२
पंचकोलासव ६२६
पंचवल्कल चूर्ण ६२७
प्रकृती १८१
प्रकृतीची उत्पत्ती १८१
प्रकृती घडविणारी कारणे १८१
प्रकृतीचे प्रकार १८२
प्रजायिनी अवस्था ३४६
प्रजायिनी अवस्था व्याप्ती ३४६
प्रतापलंकेश्वर रस ६३०
प्रथम गर्भधारणेचा काळ ४
प्रदर कोष्टक १३१
प्रवाळ पंचामृत ६३०
प्रवाळ भस्म (चं. पु.) ६३०
प्रशम ६३१
प्रसव ३४५
प्रसवकालावस्था ३४५
प्रसवकालीन शस्त्रकर्मे–५५६ ते ५८०
आर्तववाहिनीछेदन वा वंध्यत्वीकरण
५७४ ते ५८०
गर्भशंकूने गर्भनिर्हरण करणे
५६२ ते ५६६
वामदेवीय प्रसव ५६७ ते ५७४
विटपछेद– ५५६ ते ५६२
प्रसवोत्तर रक्तस्राव ३६९
प्रसवोत्तर रक्तस्राव- उपद्रव ३७१
प्रसवोत्तर रक्तस्राव कारणे ३६९
—तत्त्व ३७१
चिकित्सा द्रव्ये ३७१
लक्षणे ३७०
संप्राप्ती ३७०
साध्यासाध्यत्व ३७०

फ

फलघृत ३३१
फेस गोळ्या ५८८

ब

बस्ति मर्म २१
बह्वापत्यता १८२
बालकाच्या तीन अवस्था ५०३
बालग्रह ५०४, ५०६
बालग्रह (१२) ५०६
बालग्रह पूर्वरूप ५०५
बालग्रह पूर्वरूप सामान्य लक्षणे ५०५
बाल हरीतकी ६३१
बाला ४
बीजवाहिनी छेदन २१
बेहडा चूर्ण ६३२
बोल पर्पटी ६३२
बोलबद्ध रस ६३२
ब्राह्मी प्राश ६३२

भ

भल्लातक तैल ६३३
भास्कर लवण चूर्ण ६३३

म

मकरध्वज ६३३
मद्य ६३३
मधुमालिनी वसंत ६३४
मधुमंडूर ६३४
मध्यम वय (स्त्रीचे) ४
मयूरपिच्छामशी ६३५
मर्म (स्त्री मधील) २०
मल्लसिंदूर ६३५
महामंजिष्ठा काढा ६३५
महायोगराज गुग्गुळ ६३६
महायोनी ६७
मातुलुंगावलेह ६३७
मातेची विपन्नावस्था (कारणे) ४२४
" " मार्गावरोध ३४
माषतैल ६३७
मासानुमासिक गर्भिणी परिचर्या
४४९–४६२
मासानुमासिक गर्भिणी परीक्षा
२०३–२०६
मूढगर्भ– अपरा दर्शन ४०५
मूढगर्भ (१) कील ४९
" (२) प्रतिखुर ३९१
" (३) बीजक ३९१
" (४) परिघ ३९३
चिकित्सा (अ) (ब) अपकर्षण ४१०
चिकित्सा (२) अपकर्षण ४१०
चिकित्सा उत्कर्षण ४१०
उत्तानगर्भ ४०१
उपचारातील मर्माघात २२

मूढगर्भ चिकित्सा–औषधी ४१३
,, चिकित्सा (१) कील ४१४
,, चिकित्सा (१) चिकित्सा तत्त्व ४१४
,, चिकित्सा तपशील ४१४
,, चिकित्सा प्रजनयिष्यमाणा ४१५
,, (१) कील ३९०
मूढ गर्भगती ३९६
,, गर्भगती (१) ऊर्ध्वगती ३९६
,, गर्भगती (२) तिर्यग् गती ३९६
,, गर्भगती (३) न्युब्ज गती ३९६
,, गर्भाचे बाह्य परिवर्तन ३९४–९५
,, चिकित्सा देवव्यपाश्रय चिकित्सा ४१३
,, नाल दर्शन ४०४
,, प्रत्यक्षात सापडणारे इतर प्रकार ४०१–४०३
,, सुश्रुतानुसार चिकित्सा-तत्त्व ४१७
,, चिकित्सा सुश्रुतानुसार ४१७
,, साध्यासाध्यता ४०९
,, सुश्रुतानुसार चिकित्सा (१)
,, तपशील ४१७–४२३
,, चिकित्सा (१) प्रतिखुर ४१६
,, चिकित्सा (२) प्रतिखुर ४१६
,, चिकित्सा (२) तपशील ४१६
,, चिकित्सा (३) बीजक ४१६
,, चिकित्सा (३) उत्कर्तन ४११
,, चिकित्सा (३) बीजक चिकित्सा ४१६
,, चिकित्सा (३) तपशील ४१६
,, चिकित्सा (४) परिघ ४१६
,, चिकित्सा (४) चिकित्सा ४१६
,, चिकित्सा (४) तपशील ४१७
,, चिकित्सा (४) भेदन ४१२
मूढगर्भ चिकित्सा (५) छेदन ४१२
,, चिकित्सा (६) पीडन ४१२
,, चिकित्सा (७) ऋजुकरण ४१२
,, चिकित्सा (८) दारण ४१२
मूढगर्भाचे प्रकार ३९०
मूढगर्भाची संप्राप्ती ३८८
मूत्रपरीक्षण कारणे ५२४–२६
मूत्रवह मर्म २२
मूत्रसेक मर्म २२
मूत्रातिसार १२८
मूत्रातिसार चिकित्सा १३०
मृगशृंग भस्म ६३७
मृद्वंगी ४
मेंढीचे दूध ४९८
मोचरस ६३७
मोचरस पिच्छाबस्ती ६३७
मंजिष्ठादी काढा ६३६
म्हशीचे दूध ४९८

य

यकृत प्राश ६३८
यकृत रस ६३८
यमकस्नेह ६३८
यमगर्भ १८२
यमगर्भाची कारणे १८३
यमगर्भावरील प्रश्न १८४, १८५
यमज अपरा १८३
यष्टिमधुचूर्ण वाघनसार (शिरा) ६३८
योगराज गुग्गुळ ६३९
योनी अर्श १२६
योनिचिकित्सा १२७
योनी निदान १२६
योनिकंद-कारणे १२५



योनिकंद चिकित्सा १२६
योनिकंद प्रकार १२५–२६
योनिपरीक्षण ७
योनिभ्रंश ६७
योनिमार्गे गर्भाशय निर्हरण करणे ५५२–५५६
योनिव्यापत ५४
योनिव्यापत अचरजा ५८
,, अतिचरणा ५८
,, अत्यानंदा ६९
,, अपवृत्त फलयोनी ७१
,, अरजस्का ५८
,, असृजा ५७
,, अंतर्मुखी ६२
,, उदावर्ता ६०
,, उपप्लुता ५९
,, कफज ५७
,, कफप्रधान ७३
,, कर्णिजी ६१
,, चिकित्सा ७१
,, तौलनिक नामकरण ४८–७८
,, परिप्लुता ६०
,, पित्तज ५६
,, पित्तप्रधान ७२
,, पुत्रघ्नी ६२
,, प्राकचरणा ५९
,, फलिनी ७०
,, बीज दोषामुळे ७३
,, महायोनि ६५
,, मिथ्याचाराने ७३
,, रजोदुष्टीने ७३
,, लोहितक्षरा ६९
,, वातज ५५
कौ...४४
योनिव्यापत वातप्रधान ७२
,, वामिनी योनी ६४
,, विप्लुता ६९
,, वंध्या योनी ६७
,, शुष्का योनी ६४
,, षंढी योनि ६५
,, सान्निपातिक ५७, ७२
,, सामान्य कारणे ५४
,, सूचिमुखी ६३
,, उद्वृत्त फल योनी ७१
,, चिकित्सा अजरजा ८४
,, चिकित्सा अरजस्का ८४
,, चिकित्सा अंतर्मुखी ८९
,, चिकित्सा उदावर्ता ८७
,, चिकित्सा उपप्लुता ८५
,, चिकित्सा अतिचरणा ८५
,, चिकित्सा कफज ८१
,, चिकित्सा कोष्टक ९३–९६
,, चिकित्सा पित्तज ८१
,, चिकित्सा व्यंजिनी ८७
,, चिकित्सा वामिनी ९०
,, चिकित्सा पुत्रघ्नी ८८
,, चिकित्सा प्राक्चरणा ८५
,, चिकित्सा महायोनि ९०
,, चिकित्सा रक्तज ८२
,, चिकित्सा शुष्का ९०
,, ,, षंढी ९०
,, ,, सान्निपातिक ८२
,, ,, सूचिमुखी
योनिसंपत ७
योनिस्रंस ६७

र

रक्तगुल्म ९७
रक्तगुल्म कारणे ९९
रक्त गुल्म– कारणे, लक्षणे, दोषानुबंध व चिकित्सा १२१–१२४
रक्तगुल्म काश्यपोक्त लक्षणे १०७, १०९
रक्तगुल्म व गर्भ यांचे व्यवच्छेदक निदान १११
रक्तगुल्म चिकित्सा ११३
,, शस्त्रकर्म ११८, ११९
,, सिरावेध ११३
,, अपुनरोद्भव ११८
,, चरकोक्त ११६ ते ११८
,, निदान विवेक १२१
,, पांडु लक्षण ११०
,, पूर्व रूपे ९८
,, पोषण १०७
,, फक्त स्त्रीलाच होतो त्याचे कारण ११६
,, बद्दल विचारलेले प्रश्न १०५
,, व्याख्या ९७
,, लक्षणे १०७
,, साध्यासाध्यता १२०
,, सामान्य रूप ९७
रक्तदाब घेणे ५१८, २१
रक्तदाब घेणे ५१८, २१
रक्तपरीक्षण करणे ५२२, २३
रक्तप्रदर ४३
,, कफज ४६
,, चिकित्सा ४७
,, निदान ४४
,, पर्याय ४४
रक्तप्रदर पित्तज ४५
,, वातज ४५
,, व्याख्या ४३
,, सान्निपातिक ४६
,, संप्राप्ती ४४
रक्तवर्धक ६३९
रक्तविद्रधी १३८
,, चिकित्सा १३९
,, निदान १३८
,, लक्षणे १३९
रज ४
रज उपधातू २४
रज रक्त आर्तव २३
रज रंगाचे वर्णन २४
रजस्रावाचा काळ २५
रजःस्वला २६
रजःस्वला नियम २३
रजःस्वलेच्या नियम भंगाचे परिणाम २९
रजाचे प्रमाण २५
रजोदुष्टी ३८
रजोदुष्टी चिकित्सा ४०
,, धावनासाठी द्रव्ये ४१
,, पिचू ४१
,, प्रकार ३९
,, बस्ती ४१
,, विरेचन ४१
,, साध्यासाध्यत्व ४०
रजोनिवृत्ती ३२
रजोवह स्रोतस १८
रजोविकृती २१,
रजोवृद्धी २१, ३७
,, चिकित्सा ३७
,, व्यवच्छेदक लक्षणे ३७
रजःप्रवृत्ती १२
रजःक्षीणता ३४
,, चिकित्सा ३५
,, परतंत्र ३५
,, प्रकार ३४
,, स्वतंत्र ३४
रूक्षता (धातूंना) ३
रोपण तेल ६३९
रोम कूप १७९
रोहितकारिष्ट ६४०

ल

लघुमालिनी वसंत ६४०
लघुसूतशेखर ६४०
लताकरंज चूर्ण ६४१
लवंगादी वटी ६४१
लक्ष्मीविलास रस ६४१
लूप बसविणे ५९६, ९८
लेप गोळी ६४२
लोध्रासव ६४२
लोमकूपायनैः उपस्नेहनं १७७
लोहासव ६४३

व

वचातैल ६४३
वातगजांकुश ६४३
वातज दुष्टस्तन्य लक्षणे
— व्यक्त लक्षणे चिकित्सा ४६६, ४६८
वातज रजोदुष्टी चिकित्सा ४१
वातविध्वंस ६४३
वामदेवीय प्रसव ५६७–७४
वासकासव ६४४
विडंगारिष्ट ६४४
विपन्नावस्था बालकाची चि. ४२५
विपन्नावस्था मातेची ४२४
विषगर्भ तैल ६४५
वृष्यवटी ६४६
वंध्यत्व २१
वंध्यत्वीकरण-उदरपाटनपूर्वक ५९९, ६००
वंध्यत्वीकरणाचे परिणाम ५८०, ६०१
— योनिमार्ग ६००-६०१
वंध्यायोनी सहा प्रकार ६८
व्याधीची उत्पत्ती ३३

श

शतधौत घृत ६४६
शतावरी कल्प ६४६
शतावरी घृत ६४७
शतावरी चूर्ण ६४७
शतावरी लेह ६४७
शुक्र – शुद्ध – गर्भोत्पत्तीस उपयोगी १४६
शुक्रदुष्टी – कारणे १४६
शुक्रदुष्टी चिकित्सा १४८
शुक्रदुष्टी लक्षणे १४७
शुक्रनाडीकर्तन ६०१ – ६०२
शुंठीपूर्ण ६४८
शुंठी पाक ६४८
शूलहरवटी ६४९
शेळीचे दूध ४९७
शोधन तेल ६४९
शोधघ्न लोह ६४९
शंखवटी ६४८
शंख भस्म ६४७
शंखोदर ६४८
श्रोणीचे अंगुली प्रमाण ६
श्लीपदारिक्वाथ ६५०
श्वेतप्रदर १२९

ष

षड्विधोपक्रम ६०४

**स**

सद्योगृहीत गर्भाची लक्षणे १९५
सप्तधातू २२
समत्वागत कार्य ३
समीरपन्नग रस ६५०
सर्पगंधा चूर्ण ६५०
साधने न वापरता (अ) अपूर्ण संभोग ५८६
साधने वापरून संभोग घेणे व गर्भधारणा होऊ न देणे (अ) रासायनिक पद्धती ५८८, ८९
सान्निपातिक स्तन्यदुष्टी ४७८, ७९
सामुग्द संधी (कटिरातील) ९
सामुद्रादी चूर्ण ६५१
सारिवाद्यासव ६५१
सितोपलादी चूर्ण ६५३
सुरक्षित काल पद्धती–ऋतुकाळातील (सुरक्षित काळात संभोग घेणे) ५८५
सुकुमारी ४
सुरक्षित काळ ५८७
सुरक्षित काळपद्धती चक्र ५८६
सुवर्ण मालिनी वसंत ६५३
सुवर्ण माक्षिक भस्म ६५३
सूतशेखर ६५३
सूतिकागार ३४२
सूतिकागार प्रवेश ३४५
सूतिका व्याख्या ३७७
,, परिचर्या ३७७, ३७८
,, कोष्ठशोधन ३८०
,, गर्भाशय शोधन ३८०
,, तत्त्व ३७८
,, पथ्यापथ्य ३८५
,, (१) आश्वासन ३७८
,, (२) स्नेहन मर्दन
सूतिका (३) पटबंध
,, (४) स्नेहपात ३७९
,, (७) स्तन्योत्पत्ती व वृद्धी
,, (८) रक्षोघ्न ३८१
,, (९) स्नान
,, (१०) आहार
सूतिका रोग ४२७
,, कारणे ४२७
,, अतिप्रवाह ४२९
,, अतिप्रवाहामुळे ४२९
,, चिकित्सा ४३१
,, चिकित्सा सामान्य तत्त्व ४३१
सूतिका ज्वर ४३२
,, ज्वर व्याख्या ४३२
,, ज्वर उपद्रव ४३२
,, रोग ज्वर कारणे ४३२
,, ग्रहज ज्वराची चिकित्सा ४४१
,, चिकित्सेचे नियम ४३६
,, आमावस्थेची चिकित्सा ४४१
,, पक्वावस्थेची चिकित्सा ४४०
,, स्तन्यज चिकित्सा ४४१
,, पित्तज ज्वर ४३४
" प्रकार ४३३
,, रूपे ४३३
,, कफज्वर ४३४
,, ग्रहज ज्वर ४३५
,, वातज ज्वर ४३३
,, सान्निपातिक ज्वर ४३४
,, स्तन्यज ज्वर ४३५
,, संप्राप्ती ४३३
,, (४) मिथ्योपचारामुळे होणारे व्याधी ४३०



सूतिका रोग (३) मिथ्योपचार ४३०
,, (४) मिथ्याहार विहार ४३०
,, (४) मिथ्याहार विहारामुळे होणारे व्याधी ४३१
सूतिका रोग सूतिका मक्कल्ल ४४५
,, चिकित्सा ४४५
,, योनिक्षत ४४७
,, लक्षणे ४२७
सूतिकाचे वाताष्ठिला ४४७-४८
,, विकृत प्रसव ४३०
,, विकृत प्रसवाने होणारे व्याधी ४३०
,, विद्रधी ४४६
,, चिकित्सा ४४६
सूतिकेमध्ये सापडणारे विशिष्ट रोग व चिकित्सा ४३२
सूतिका रोग शोध लक्षणे ४४३
,, प्रकार ४४२, ४४३
,, चिकित्सा ४४२, ४४४
,, कारणे व संप्राप्ती ४४२
सूतिका स्त्रीरोग परीक्षापत्रक ५०७-१७
,, परीक्षापत्रक ५०७–११
सूक्ष्मत्रिफळा ६५४
स्तन्य १६
स्तनकीलक चिकित्सा १३७
,, निदान १३५
स्तन चुचूक १६
स्तनपान ४८१-९०
स्तनपान काल ४९३–९४
स्तनपानाचे नियम ५०१–५०३
स्तनरोग १३१
,, चिकित्सा १३४
,, विद्रधी–निदान १३२
,, प्रकार १३२–३३
स्तन संपत् १७
स्तन्य ३
स्तन्योत्पत्ती ३
स्तन्योत्पत्तीचा अभाव ३
स्तन्य दुष्टी–कारणे ४६५
सामान्य चिकित्सा ४७५–४७८
स्तन्यविकृती ४६३
स्तन्यवृद्धी–कारणे ४६४
स्तन्यवृद्धी व्याधी लक्षणे–चिकित्सा ४६५
स्तन्यवृद्धी व्याधी लक्षणे–चिकित्सा ४६४
स्तन्य संपत् ४९२–९३
स्त्री २
स्त्री (अल्पबळ) ४
स्त्रीगर्भ १८६
स्त्रीचे दूध ४९७
स्त्रीबीज १४७
स्त्रीमधील आशय ९
स्त्री रोग–गर्भिणी–परीक्षापत्रक ३३९–३४१
स्त्रीरोग विषयक शस्त्रकर्म ५२७–५५६
आर्तववहस्रोतसांचे गर्भाशयमार्ग परीक्षण ५२७–५३२
गर्भाशयमुख दहनकर्म ५२७
— विस्तारण व लेखनकर्म ५३२ ते ५३६
— पुरःप्रवर्तित करणे ५३६–५४२
गुल्म निर्हरण करणे ५४२–५४७
गर्भाशय निर्हरण करणे ५४७–५५६
स्त्री–व्याधी ४
स्त्री–शरीर ४

स्त्रीच्या शरीरावयवाची वाढ २
स्त्रीची वैशिष्टचे ४
स्त्री–शुक्र २२, २३
स्त्री – श्रोणी ४
स्त्री ( सुकुमार ) ४
स्त्री–श्रेणी ५
स्त्री स्तन ४
स्त्री – स्रोतसे ४
स्त्रियांमधील स्रोतसे – वैशिष्टय ४
स्त्रीहृदय ४
स्रोतसे – अंतरमुखी १८
स्रोतसे बाह्यमुखी १८
स्त्रीमधील स्रोतस १७
स्थानवैगुण्य ३३
स्नायुबंध – शिथिल ४
सेवनी मर्म २१
सोम रोग १२७
सोम रोग चिकित्सा १३०
„ निदान १२७
„ प्रकार १२८
„ व्याख्या १२८
„ लक्षणे १२७
सौराष्ट्र बोलवटी ६५४
सौराष्ट्र चूर्ण ६५४
स्मृतिसागर – रस ६५२
संग ३४
संजीवनी ६५१
संतति–प्रतिबंधक उपाय
— गर्भधारणा ५८१
संधी ( स्त्री कटिरातील ) ९
संधी सामुद्ग अल्प चल असणे ९
संपूर्ण ब्रह्मचर्य ५८५
संभोग घेऊनही गर्भधारणा होऊ न देणे ५८५
स्वादिष्ट विरेचन चूर्ण ६५२

**ह**

हत्तिणीचे दूध ५००
हरिद्राचूर्ण ६५४
हरीतकी चूर्ण ६१४
हारीतोक्त क्षीर-दोष ४७९
हारीतोक्त स्तन्यज व्याधी ४८०, ४८३
हिंगाष्टक चूर्ण ६५५
हारीतोक्त स्तन्यज व्याधी ( कफज ) ४८१–४८३
हेमगर्भ ६५५
हेमशिला जतु ६५५
हेमाभ्रकर्पूर मिश्रण ६५५

**क्ष**

क्षीण स्तन्य – कारणे ४६३
„ लक्षणे – चिकित्सा ४६३
„ व्याधी लक्षणे चिकित्सा ४६४